म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0002721

# समर्थांचें सामर्थ्य

किंवा

# श्रीरामदास स्वामींचा लीलानुग्रह.

# सार्थ-श्रीदासबोध.

किंमत ४ रुपये.

लेखक--लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी. ए.

---

# सार्थ-श्रीमनाचेश्लोक.

किंमत ८६ आणे.

लेखक-भालचंद्र शंकर देवस्थळी.

---

श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र, काव्य विवेचन व आख्यायिका. } छापत आहे.

---

श्रीरामदासांचे-समग्र ग्रंथ—छापत आहे.

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# श्रीरामदास स्वामींचा लीलानुग्रह.

## ( पूर्वार्ध व उत्तरार्ध )

सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें
परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ॥ १ ॥

दा. द. २० स. ४

लेखक

" महाराष्ट्रभाषाचिलमयूर "

## कृष्णाजी नारायण आठल्ये.

प्रकाशक

## केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,

ठाकुरद्वार–मुंबई, नं. ४.

माघ, वसंत ५ शके १८४६ सन १९२५

किंमत २॥ रुपये.

मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर, ‘ जगद्धितेच्छु ’ प्रेस
५०७ शनवार पेठ, पुणें.

प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर, ठाकुरद्वार—मुंबई. नं. ४
सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना।

२८२९

समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें ॥
त्रैलोक्यासि पहिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥ १ ॥

—श्रीसमर्थप्रताप.

हें सारें ब्रह्मांड एका सामर्थ्यावरच चाललें आहे. प्रत्येक प्राण्याला जन्मास येण्यास सुद्धां सामर्थ्य लागतें. सजीवपणा आहे, तावत्कालपर्यंत प्रत्येक प्राणिमात्रांत कमी प्रमाणानें म्हणा कीं जास्ती प्रमाणानें म्हणा सामर्थ्य हें निसर्गतःच प्राप्त झालेलें असतें. परंतु शेकडों मनुष्यें हजारों मनुष्यें आपल्या स्वाधीन करून घेणें, त्यानां वश करणें, त्यानां अंकित करून सोडणें हें सामर्थ्य केवळ लोकोत्तर होय. सामर्थ्याचे प्रकार दोन. एक शरीरसामर्थ्य आणि दुसरें मनस्सामर्थ्य. ह्यांत मनस्सामर्थ्य जरी श्रेष्ठ आहे तरी त्याला शरीरसामर्थ्याची आवश्यकता ही असतेच. ह्मणजे हीं दोन्हीही परस्परावलंबी आहेत. केवळ शरीरसामर्थ्याच्या बळावर किंवा तरवारीच्या जोरावर हजारों लोकांवर सत्ता चालवितां येते; हजारों लोक अंकित करून टाकतां येतात. परंतु केवळ मनःसामर्थ्यानें, अमृततुल्य वाणीनें, बुद्धिचातुर्यानें हजारों लोक आपलेसे करणें; त्यानां आज्ञाधारक बनाविणें ही गोष्ट त्याहूनही श्रेष्ठ होय. पहिले भीतीनें लोकांस अंकित करून घेतात, आणि दुसरे भक्तिप्रेमानें हजारो लोकांस आपले दासानुदास करून सोडतात. असे प्रेमळ पुरुष ह्मणजे साधुसंत होत. त्यांतच

श्रीसमर्थ रामदासस्वामी ह्यांची गणना आहे. आमच्याच देशांतील नव्हेत, तर कोणत्याही देशांतील साधुसंत पाहिले तरी ते समर्थच असतात. पण त्यांतल्यात्यांत समर्थांचें सामर्थ्य इतरांपेक्षां कांहीं विशेष होतें. त्यांनीं केवळ आपल्या भक्तिप्रेमानें, मधुर वाणीनें, व बुद्धिकौशल्यानें सारा महाराष्ट्रदेश आपला अंकित करून सोडला; आसेतुहिमाचल आपल्या मठांची स्थापना केली, हजारों शिष्यसमुदाय जमविला; लाखों लोक भक्तिमार्गास लावले. हें तर काय, पण आपले 'स्वराज्य' स्थापनकर्तें श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराज ह्यांचें गुरुत्व संपादन केलें; ज्यांच्या कडकडीत वैराग्याचा मराठी राज्यांत अद्याप भगवा झेंडा फडकत राहिला आहे; व सर्व मराठ्यांच्या मुखांतून अद्याप ज्यांच्या उपास्य दैवताच्या पवित्र नामाचा वारंवार 'रामराम' असा घोष होत आहे. त्या पुरुषाचें सामर्थ्य काय सांगावें ? ते खरोखरच समर्थ होते. 'समर्थ' हेंच त्यांचें नांव त्यांच्या हयातीपासून तें आजपर्यंत सारखें दुमदुमत आहे. आणि तें दिलें कोणी ? तर त्याकालचे त्यांच्याच तोडीचे समर्थ जे स्वामी पंचायतन त्यांतील चौघांनीं ! तेव्हां अशा समर्थ पुरुषाचे आपणही यथानुशक्त्या गुणानुवाद गाऊन कांहीं सेवा झाल्यास करावी म्हणून आम्हीं ह्या कार्यास हात घातला.

दुसरा हेतु हा कीं, समर्थ रामदास स्वामी हे पूर्वकालीन भक्तमंडळांस जसे वंद्य आहेत, तसेच ते आर्वाचीन पंडितांसही वंद्यच आहेत. कारण '**मराठा तितुका मेळवावा**' '**आधीं प्रपंच करावा नेटका**' इत्यादि आजमितीस संघशक्तीस अवश्यक लागणारीं त्यांचीं तत्त्वें त्यांस मान्य आहेत. व तींच समर्थ रामदासस्वामींच्या अनुग्रहांत गोंवलेलीं असल्यामुळें, अर्वाचीन लोकही इतर साधुसंतांपेक्षां समर्थ रामदास स्वामींस ते विशेष मान देतात. आजकालची स्थिति व रामदासांच्या वेळची परिस्थिति बहुतेक सारखीच होती. हल्लीं जशी प्रत्येकाला

**‘ स्वराज्या ’ ची तळमळ लागलेली दिसते,** त्याप्रमाणें समर्थांच्या मनासही तळमळ लागलेली होती. ‘ तीर्थक्षेत्रें मोडलीं; ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं, सारी पृथ्वी आंदोळली !’ कां ? तर ‘ धर्म गेला !’ ह्यामध्यें समर्थांनीं जरी एका धर्माबद्दलच उल्लेख केला आहे तरी त्याच्या गर्भितार्थांत ‘ स्वराज्य ’ गेलें, असा ध्वनितार्थ आहेच. कारण स्वधर्मा-शिवाय स्वराज्य नाहीं, व स्वराज्याशिवाय धर्मही नाहीं. हीं दोन्हीही परस्परावलंबी आहेत हें ते पूर्णपणें जाणून होते. आणखी श्रीमच्छत्रपतींना स्वराज्य-प्राप्तीच्या कामीं त्यांनीं अनेक प्रकारें साह्य केलें, हें सर्वसंमत आहे. तेव्हां अशा ह्या चळवळीच्या व आपत्तीच्या प्रसंगीं त्या समर्थांचेंच चरित्र व लीला थोड्याशा निराळ्या स्वरूपानें जनाच्या निदर्शनास आणावी आणि तिचा कांहीं उपयोग होण्यासारखा असल्यास त्याबद्दलही लोकांस विचार करतां यावा असाही एक उद्देश आहे. आजकाल स्वराज्यप्राप्तीसाठीं लोक अगदीं हवालदील झालेले दिसतात. व त्यासाठीं राष्ट्राचे पुढारी लोक आपआपल्या मताप्रमाणें प्रयत्न करीत आ· हेत. खादी म्हटलें खादी; बहिष्कार म्हटलें बहिष्कार असे आपआपल्या-परी सारखे प्रयत्न सुरूं आहेत. पण अद्याप सिद्धि म्हणून कशांतच नाहीं. ह्यास्तव समर्थांनीं ह्या बाबतींत काय काय केलें, त्यांच्या शिकवणींत ह्या संबंधानें कोण कोणतीं तत्त्वें निष्पन्न होतात, व त्यावरून ह्या संबंधाचा एखादा नवा मार्ग निघण्यासारखा आहे कीं काय, ह्याचाही विचार व्हावा हाही एक प्रधान हेतु आहे. ह्याशिवाय आबालवृद्धांचें मनोरंजन व्हावें, व सर्वांनीं सन्मार्गास लागावें हा हेतु तर दिसतोच आहे. ह्या हेतूनें हें पवित्रकार्य ‘ उद्बाहुरिववामनः ’ अशा न्यायानें हातीं घेण्याचें धाडस केलें.

चरित्रनायकांचीं व्यवहारिक कृत्यें ज्यामध्यें सत्यासत्याची छाननी करून हल्लींच्या इतिहासाप्रमाणें वर्णन केलेलीं असतात, त्याला चरित्र म्हणण्याचा हल्लीं परिपाठ पडलेला आहे. आणि जे पुरुष ईश्वरावतारी म्हणून समजले जातात, त्यांच्या ज्या दैविक किंवा अमानुष कृत्यांचें वर्णन

असतें, त्याला लीला असें म्हणतात. समर्थ रामदासस्वामींच्या पूर्वी लिहिलेल्या बखरींमधून तर सारे अघटित चमत्कारच भरलेले आहेत. तेव्हां त्यांस लीला म्हणणें हेंच उत्तम आहे. परंतु हीं त्यांचीं अघटित कृत्यें अलीकडच्या विद्वान् लोकांस मुळींच संमत नाहींत. 'तीं त्यांच्या भक्तमंडळींनीं लिहिलेलीं असून तीं निखालस खोटीं आहेत.' असें त्यांचें ह्मणणें आहे. परंतु भाविक लोकांना तीच त्यांची लीला प्राणाहूनही प्रिय वाटते. त्याशिवाय तें चरित्र सांगूं म्हटलें तर त्यांस नीरस व कंटाळवाणेंच वाटतें. ह्यास्तव आम्ही त्यांचें चरित्र सांगतांना त्यांच्या लीलाही सांगितल्या आहेत. कारण, अलीकडील विद्वानांच्या मताप्रमाणें क्षणभर त्या साऱ्या खोट्या व भाकडकथाच आहेत असें मानलें, तरी पुराणांतील कथा आपण भक्तिभावानें व प्रेमानें वाचीत किंवा ऐकत नाहीं काय ? मग ह्या समर्थांच्याच कथांचा कां वरें अव्हेर करावा ? पूर्वीपासून कागदावर नमुद् झालेल्या कथा आजिबात नष्ट करण्यापेक्षां त्यांचा संग्रह करणेंच अवश्य आहे. शिवाय त्या सर्वस्वीं खोटें म्हणणें सुद्धां कठीण आहे. हें पुढच्या सर्व ग्रंथावरून कळून येण्यासारखें आहेच.

आतां ह्या ग्रंथाला आधार कोणकोणता घेतला आहे ? असें विचारल्यास पूर्वीच्या उपलब्ध असलेल्या बखरीं, कागदपत्र, व समर्थांचीच लहान मोठीं उपलब्ध चरित्रें हेच मुख्य आधार होत. परंतु ह्यापुढें कोणीही समर्थांचें चरित्र लिहूं लागेल त्याला आधीं रा. रा. **शंकर श्रीकृष्ण देव–धुळें**–ह्यांची स्मृति झाल्यावांचून राहवयाचीच नाहीं. ह्या सद्गृहस्थानीं आज सुमारें एक तप समर्थांची तन, मन, धनाला झीज लावून जी सेवा केली आहे ती निखालस बिनमोल होय. रामदास व रामदासी हें मासिक पुस्तक काढलें. इतकेंच नव्हे, तर निरनिराळ्या ठिकाणीं स्वतः पर्यटण करून समर्थांचीं अनेक पवित्र स्थळें, गुहा, घळी वगैरे त्या त्या ठिकाणीं जाऊन सूक्ष्म रितीनें अवलोकन केल्या. ठिकठिकाणच्या मठाधिपतींना व समर्थांच्या अनुयायांच्या वंशजांना समक्ष

भेटून मोठ्या मेहनतीनें त्यांच्यापाशीं असलेले जुने कागदपत्र जमवून ते जुळवून, घरचा स्वतःचा छापखाना घालून कितीतरी मोठमोठाले ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत व समर्थांच्या चरित्रांत नवी नवी भर घातली आहे व आणखी घालीतही आहेत. ह्यांच्याजवळ हें असें ज्ञानभांडार आहे तरी किती ह्याची कल्पनासुद्धां होत नाहीं. बारीक सारीक मिळेल तेवढी चटसारी समर्थांच्या व ह्यांच्या शिष्यपरंपरेच्या संबंधाची माहिती ते अखंड प्रसिद्ध करीत आहेत. व त्यावर आपल्या प्रस्तावनेचाही भक्तिरसप्रपूरित लेख लिहित आहेत. ही आजपर्यंत प्रसिद्ध झालेली माहिती जरी वाचली तरीसुद्धां जबरदस्त लेखकाची छाती दडपून जाईल. ही सारी यच्चायावत् माहिती ग्रथित करून समर्थांचें चरित्र तयार करूं ह्मटलें तर तें काम बहुतेक दुरापास्तच होईल असें आह्मांस वाटतें. रा. देव ह्मणतात अशी यच्चयावत् माहिती परिपूर्ण होऊन त्यानंतर समर्थांचें संपूर्ण चरित्र कधीं व कोण तयार करील तें करो! पण त्यावर आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, अशा सर्वांग सुन्दर चरित्राची अपेक्षा बाळगून तपेंच्या तपें घालविणें हें मुळींच इष्ट नाहीं. त्यांची जेवढी माहिती उपलब्ध असेल त्यापैकीं सुद्धां निवडक व ग्राह्य असेल तेवढीच घेऊन सवड होईल त्यानें तेवढीच जनापुढें ठेवली तरी पुष्कळ कार्य होईल. आणखी अत्यंत बारीक सारीक गोष्टी कथन करण्यापासून तरी विशेष फायदा तो कोणता? कोणाचेंही चरित्र असो; त्याच्या ठोकळ माहितीचेंच चरित्र उत्तम शोभेल. तितकें अगदीं बारिक सारीक गोष्टी देत बसल्यानें तें खुलणार नाहीं. समर्थांचे शेंकडों मठ, हजारों शिष्य, त्यांचीं हजारों सनदापत्रें व पत्रव्यवहार ह्या सर्वांचाच समावेश समर्थांच्याच चरित्रांत करूं ह्मटलें तर तें चरित्र महाभारतासही मागें सारील! समर्थांच्या एकएका शिष्याचें किंवा महंताचेंच चरित्र लिहिलें तर तें सुद्धां समर्थांच्या चरित्राच्याच जवळ जवळ होईल. ह्यास्तव उपलब्ध

असलेल्या माहितींतून जी उपयुक्त मनोरंजक व संग्राह्य अशी वाटली तेवढी माहिती एकत्र करून हें पुस्तक तयार केलें आहे.

आतां ह्या प्रस्तावनेंत विशेषेंकरून दोन मुद्यांच्या संबंधानें विचार करावयाचें योजिलें आहे. एक मुद्दा असा कीं, ह्या सर्व चरित्रा-वरून व लीलेवरून एकंदरींत इत्यर्थ काय निघतो ? आणि दुसरा मुद्दा हा कीं, त्यावरून हल्लींच्या परिस्थितींत लोककल्याणाचा एखादा मार्ग दिसतो कीं काय ? व दिसत असेल तर तो कोणता ? येवढा विचार झाला म्हणजे ह्या पुस्तकाची परिपूर्णता झाली.

आतां अनुक्रमानेंच ह्याचा विचार करूं. समर्थांच्या ह्या चरित्रावरून कोणकोणतीं अनुमानें निघूं शकतात ?

**१ अवतारी पुरुषांतील तेज त्यांच्या पूर्वजांपासूनच आलेलें असतें**—सूर्याजीपंतांची भक्ति लोकविलक्षण होती. त्यांस झालेलें प्रत्यक्ष दर्शन खोटें म्हटलें तर त्यांच्या जवळ पट्टाभिषेक रामाच्या मूर्ति प्रत्यक्ष होत्या; व पुढें गेल्या त्याही चमत्कारानें गेल्या ! हें कसें ? शिवाजी महाराजांची गोष्ट ही तशीच आहे. मालोजी राजे ह्यांस दृष्टांत झाला, भूमीगत द्रव्य ×सांपडलें; त्यांनीं त्याचा तलांव बांधला; आपली मुलगी शहाजीला न देण्याबद्दल लुकजी जाधवाचा केवढा धुडगूस ! पण बाद-शहानें मालोजीचा कैवार घेऊन ती मुलगी त्यास जबरीनें देव-विली ! ह्या गोष्टी ईश्वरीप्रभावाशिवाय व संकल्पाशिवायच आजालाही द्रव्य सांपडणें, नातवालाही द्रव्य सांपडणें, बादशहानें लग्नाच्या कामीं हात घालणें ह्या गोष्टी कशाच्या दर्शक आहेत ? ह्याचा नव्या मंडळींनी थोडासा आपल्या मनाशीं विचार करावा. आणि मग किती फाकांड फोडावयाचे ते फोडावेत.

---

× ' मराठी दप्तर ' रुमाल पहिला पान ९७ पहा.

आतां अद्भुत चमत्काराविषयीं—लंकेंत जाऊन बिभिषणाची भेट झाली; ही गोष्ट खोटी मानावी तर समर्थांनीं स्वहस्तूरचा अभंगही केलेला खोटाच काय ? त्यांत त्यांनीं स्पष्ट ह्मटलें आहे कीं,

‘ भेटीचा हा लाभ मारुतीच्या संगें ।
पुष्पांचिया योगें लाभ झाला ॥ १ ॥
ह्मणूनीया विनंती ऐका लंकापती ।
लोभ फार चित्तीं असों द्यावा ॥ २ ॥

तेव्हां हा अभंगही खोटा ! अशी सारी खोट्याचीच परंपरा लावित बसावयाची हेंचि कीं नाहीं ? बरें, रंगनाथ स्वामींनीं रेडा मारलेला खोटा, तटावरून उडी मारलेली खोटी; असें जरी मानलें तरी समर्थांच्या चरित्रामध्यें अद्भुत चमत्कार नाहीं असा कोठें ? ‘ सर्वाश्चर्यमयंनभः ’ जसें ह्मटलें आहे, त्याप्रमाणें समर्थांचें सारेंच चरित्र अद्भुत आहे. आधीं रामनवमीच्या दिवशीं दुपारीं बारा वाजतां श्रीरामजयंतीच्या दिवशीं त्याच वेळेवर जन्मास येणें व त्याच्याच उपासनेंत जन्म घालविणें हाच अद्भुत चमत्कार नव्हे काय ? ह्यावर अर्वाचीन संशोधक काय कोटी लढवितात ? ‘ हा दिवस व ही वेळच खोटी ! ’ म्हणतील तर न जाणों ! म्हणतील ही. त्याबद्दल त्यांना विधीही नाहीं आणि निषेधही नाहीं. बरें असो; पण नवव्या वर्षींच परमार्थाकडे चित्त वळून अनुग्रहाचा हट्ट धरणें ही तरी गोष्ट सामान्य काय ? हल्लींच्या कोणत्यातरी एखाद्या मुलांत अशा वृत्तीची जागृति झालेली कोठें आढळते काय ? बाराव्या वर्षीं लग्नासारख्या मंगळ सोहळयास लाथ मारून साऱ्या संसारसुखावर पाणी सोडून भिक्षावृत्ति पतकरून सारखी तपश्चर्या आचरण करणें हें आत्मसंयमन व हा मनोनिग्रह हल्लींच्या काळीं बारा वर्षांच्या मुलास कधीं तरी शक्य आहे काय ? तापत्रयाचें दुःख व संसाराच्या यातना ह्या अंतःकरणांत खोल शिरल्यावांचून अशी उपरति होईल काय ? व ह्याच वृत्तीचें प्रतिबिंब दासबोधांतलि तिसऱ्या दशकांत ‘ संसारदुःखें ’ ह्या रूपानेंच व्यक्त झालेलें नव्हे काय ?

समर्थांचा पहिला अमानुष चमत्कार म्हटला म्हणजे टाकळीचा कुळकर्णी जिवंत करणें हा होय. तो खोटा म्हणावा तर प्रत्यक्ष उद्धव गोसावी व दशपुत्रे हें त्यांचें पडलेलें आडनांव हीच त्याची साक्ष होय. आणखी अशा कडकडीत वैराग्याला, अशा कडकडीत मनोनिग्रहाला, अशा अघोर तपश्चर्येला ही जर साक्षात्कार न घडेल तर जगामध्यें परमेश्वरही नाहीं आणि साक्षात्कारही नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. हेंही असो; हे अमानुष चमत्कार जरी क्षणभर बाजूस ठेवले, तरी इतर मनुष्यकृतीचे अघटित चमत्कार त्यांनीं काय थोडे केले आहेत? सतीबाई शहापुरकरणीस दाखविलेला चमत्कार तर कांहीं अमानुष नव्हता, तरी तो किती लोकविलक्षण? कुळकरणाच्या कामांत तोहमत येऊन बादशहानें विजापुरास नवरा धरून नेला, म्हणून ती रडत होती! समर्थांनीं तुझा पति आजपासून अकराव्या दिवशीं सुखरूप आल्यास तूं राम राम म्हणशील काय? ही कबुलायत करून घेतली व त्याप्रमाणें लागलीच कारकुनाच्या वेषानें विजापुरीं जाऊन बादशाहास हिशोब समजावून देऊन बाजीपंतास सोडून अकराव्या दिवशीं बरोबर घरीं आणलें! मग ह्या बाईनें राम राम म्हणावें व ती पतिसहवर्तमान समर्थांच्या भजनीं लागावी ह्यांत नवल तें काय? मसूरच्या उत्सवांत एका घटकेंत आंब्याची फांदी तोडण्याबद्दल विजापुराहून बादशहाचा हुकूम आणून शेखदारास लावणें, कल्याण स्वामींना शेंड्याकडे बसून फांदी तोडावयास सांगणें, तो विहिरींत पडून बुडाला तरी त्याची दाद न घेणें, अखेर तो जिवंत बाहेर निघणें ह्या गोष्टी तरी अद्भुतच नव्हेत काय? समर्थांची कोणतीही गोष्ट घ्या; तिच्यामध्यें अद्भुतपणा नाहीं असें कधींच घडत नाहीं. ह्यावरूनच त्यांचें सामर्थ्य कांहीं विशेष होतें. आणि त्यावरून त्यांना अवतारी पुरुष असें म्हणतात.

समर्थांच्या आंगचे गुण जन्मापासूनच कांहीं अप्रतिम होते. तेच त्यांच्या भाग्योदयाला किंवा प्रभावाला कारणीभूत झाले. त्यांपैकीं कांहीं सांगतों.

१ **चळवळ्या स्वभाव**–किंवा हूडपणा. उद्योगाशिवाय त्यांना चैनच पडत नसे, त्यामुळें त्यांची शरीरप्रकृति शेवटपर्यंत निकोप होती. ‘सामर्थ्य आहे चळवळीचें’ हें त्यांचें वाक्य त्याच गुणाचें निदर्शक आहे. कपाळाला आलेलें टेंगुळ आजन्म कायम होतें. तीच त्याची प्रत्यक्ष साक्ष होय. ‘उद्योगाचे घरीं, ऋद्धि सिद्धि पाणी भरी’ ही झण-जी पुढें खरी झाली, त्याचें कारण हाच गुण.

२ समर्थांच्या अंगचा दुसरा एक अप्रतिम गुण झटला झणजे **पोहणें** हा होय. समर्थांना लहानपणापासून पोहावयालाच चांगलें येत होतें असें नाहीं, तर त्यांना जलस्तंभिनी विद्याही उत्तमप्रकारें अव-गत होती. झणजे पाण्यामध्यें दिवसेंच्या दिवससुद्धां ते बुडून राहत. जांबेमध्यें असतांना लहानपणींच झाडावरून डोहांत उडी टाकली. ते कांहींकेल्या वरच येईनात. अखेर श्रेष्ठांस बातमी समजल्यावर ते धरा-कडून नदीवर आले व ‘नारायणा! वर ये!’ असें म्हणतांच स्वारी बाहेर निघाली! कोयनानदीच्या महापूरांत तर ते तीन दिवस बुडून राहिले होते! स्वामी बुडाले हीच वदंता! अखेर चौथ्या दिवशीं कल्याणस्वामींनीं बुडी देऊन समर्थांच्या आसनमांडींत डोकें घालून त्यांस वर आणलें! चांदजी पाटील जवळ होतेच! कर्नल वेबनें नाय-गाराच्या धबधब्यांत उडी टाकून ६० तासांनीं वर निघाला म्हणून त्याचे पोवाडे गावयाचे आणि समर्थांच्या बुडण्यास निखालस खोटें म्हणावयाचें! हा शुद्ध कालमहिमा! दुसरें काय? जयराम स्वामीस विहीरींत ढकलून तीन दिवसांनीं वर काढलें! भिकाजी बुवाबरोबर आपणही विहीरींत बुडी दिली इत्यादि गोष्टीवरूनही ह्या जलस्तंभिनी विद्येचें नैपुण्य व्यक्त होतें.

३ **समर्थांनीं घोड्यावर बसण्याचा अभ्यास** कोठें केला हें माहित नाहीं. परंतु ते घोड्यावर बसण्यांत पटाईत होते यांत शंका

नाहीं. शिवाजी महाराजांनीं एक उत्तम घोडा साज घालून मोतद्दाराच्या हातीं समर्थांस नजर पाठविला. समर्थांनीं मोतद्दाराकडून सर्व सामान उतरविलें. लगाम काढविला ! आणि सोड म्हणाले ! मोतद्दार घाबरला. पण तो खंदा घोडा फुर्र करून निघतांच समर्थ उपलाणी पाठीवरच उड्डाण करून स्वार झाले ! घोडा किल्ल्याखालीं चौफेर × निघाला तो तीन कोस गेला ! पण समर्थ वरून हालले नाहींत ! खुद्द समर्थांच्या दिलेल्या पत्रांतही घोड्यावर स्वार होऊन चाफळास आलों, असा उल्लेख आहेच. ह्यावरून अश्वारूढ कलेंतही त्यांची गति उत्तम असल्याचें स्पष्ट आहे. शिवाय प्रत्येक शिलंगणाचे दिवशीं सारे सरदार आपआपले घोडे सज्ज करून समर्थांपुढें आणीत आणि समर्थ ज्याच्या घोड्यावर स्वार होतील त्याचा भाग्योदय होईल असें समजत.

**४ चित्रें काढणें व करणें**—हा चवथा गुण होय. इंदुरास दगडावर कोळशानें मारुतीची मूर्ति काढली व ती तशीच दगडावर कोरून निघाली! सतीबाईला चुन्याचा मारुती करून दिला. टाकळीस शेणाचा मारुती करून स्थापला. व तंजावरच्या कारागिरास रामपंचायतनाच्या मूर्ति मेणवून मेणाच्या करून दिल्या.

**५ परमार्थाची आवड**—'मला अनुग्रह द्यावा' म्हणून समर्थांनीं आपल्या वयाच्या सातव्या वर्षीच श्रेष्ठापाशीं हट्ट घेतला होता ! श्रेष्ठांनीं थोडें अनुमान करतांच त्यांनीं मारुतीपाशीं उपोषित राहून खुद्द श्रीकडूनच अनुग्रह घेतला ? ही गोष्ट पूर्व संचितावांचून होणें शक्य आहे काय ?

---

× ह्याच घोड्याचें नांव समर्थांनीं "रामबाण" असें ठेविलें होतें. समर्थांस जळीं स्थळीं, काष्टीं पाषाणीं रामाशिवाय अन्य कांहीं दिसतच नसे. बोक्याचें नांव "राम" घोड्याचें नांव 'रामबाण' आणि घळीचें नांव रामघळ ? ' इतकी त्यांची वृत्ति रामरूपांत तद्रूप झालेली होती.

**६ विरक्ति**—बाराव्या वर्षीच बहुल्यावरून पलायन ! आजन्म ब्रह्मचर्य. बारावर्षे पाण्यांत उभें राहून बारा वर्षे तीर्थाटनें ! केवढी विरक्ति व केवढी तपश्चर्या !

**७ काटकपणा**—समर्थांनीं ऐहिक सुखाची अपेक्षा म्हणून कधीं केलीच नाहीं. रानावनांतून फिरणें ह्यांत त्यांना कांहींच कष्ट वाटत नसत. डोंगरकटारीची, खडीची तर त्यांना मनस्वी आवड. सुग्रास अन्नाची त्यांस कधींच अपेक्षा नसे. ते भिक्षान्नाचे पानगे सुद्धां करून खात !

**८ विद्वत्ता**—त्याकालची विद्या म्हणजे मोडी बालबोध वाचन व संस्कृत. समर्थ हे जाड्या विद्वानांत जरी मोडण्यासारखे नव्हते, व त्यांना स्वतःविद्वानांचा थोडासा कंटाळाच होता, तरी त्यांची संस्कृतांतही गति चांगली असली पाहिजे. कारण पंचवटीच्या श्रीरामचंद्राच्या देवालयांत त्यांनीं आपण होऊनच पुराण सांगितलें होतें. मोडींचें त्यांच्या हातचें पत्र उपलब्ध झालेलें आहे. कल्याणस्वामींना त्यांनीं कित्ता दिलेला आहे. ह्यावरून मोडी बालबोध मध्यें त्यांची गति चांगलीच असली पाहिजे. समर्थ जरी पट्टीच्या विद्वानांत मोडत नाहींत तरी त्यांचें ग्रंथावलोकन व बहुश्रुतपणा हा अवर्णनीय होता. सर्वप्रकारच्या गीता, उपनिषदें वेद व वेदांत अवलोकन केल्याचें दासबोधाच्या पहिल्याच समासावरून समजतें. वामनपंडितांना तर त्यांनीं बृहदारण्यकोपनिषदाचा आधार दिला आहे. ह्यावरून त्यांचें ग्रंथावलोकनही पुष्कळच होतें असें दिसतें. बहुश्रुतपणाची उदाहरणें तर त्यांच्या कवितेंत पदोपदीं आढळतात.

**९ कवित्त्वशक्ति**—समर्थांच्या अंगीं कवित्त्वशक्तीच काय, पण शीघ्रकवित्त्वशक्ति अगदीं नैसर्गिक होती. समर्थांच्या अंगीं तर काय, पण श्रेष्ठांच्या अंगीं व त्या वेळच्या यच्चयावत् साधुसंतांच्या अंगीं, स्वामी पंचायतनाच्या अंगीं व समर्थांच्या शिष्यमंडळीच्या अंगींही थोड्या-

बहुतप्रमाणानें तत्काल कवित्त्वस्फूर्तिही होतीच. पृथ्वीप्रदक्षिणा करून परत घरीं आल्यावर **‘ तेंच भूत गे माय ’** ह्या तत्काल स्फूर्तीच्या पदानें केलेलें मातुश्रींचें समाधान; श्रेष्ठांनीं म्हटलेल्या शीघ्र श्लोकार्धास शीघ्र श्लोकार्धानेंच दिलेलें उत्तर, स्वामीपंचायतनांनीं परस्परांवर केलेले तात्कालिक श्लोक; इत्यादि गोष्टी प्रसिद्धच आहेत. समर्थ व तुकाराम ह्यांनीं परस्परांस आपलीं चरित्रें थोडक्यांत पद्यात्मक सांगितलीं आहेत, तीं तात्काल स्फूर्तीनेंच सांगितलीं आहेत. समर्थांनीं अंतकालीं श्लोकार्ध म्हणतांच उद्धवांनीं तत्काल स्फूर्तीनें श्लोक पुरा केला ! ही शीघ्रकवित्व शक्ति तरी काय सामान्य ? कोणास पत्र लिहिणें तरी समर्थ कवितात्मकच लिहित असत. हीं उदाहरण त्यांच्या चरित्रांत भरलेलींच आहेत.

१० **बिनोदात्मक परीक्षा**—समर्थांचा स्वभाव विनोदी होता त्या विनोदांत तरी बोध व मार्मिकताच भरलेली असे. एके दिवशीं सकाळीं मळवट भरून, जटा मोकळया सोडून हातांत भवानी तरवार घेऊन समर्थ सर्वांच्या आंगावर धांवत सुटले व अखेर रानांत तीन दिवस निघून गेले. ते कोणाच्याच हातीं लागेनात. शेवटीं कल्याणांनीं कसोटीस उतरून त्यांस मठांत घेऊन आले. गोमांतकी आंबा पायास बांधून करट झाल्याचें ढोंग केलें आणि हें करट चोखील तो मरण पावेल व मी वांचेन असें सांगितलें ! तेव्हां सर्व मंडळींनी चुकवाचुकवी केली, पण कल्याणांनीं तें चोखलें ! तों तो कलमी आंबा होता ! इत्यादि विनोदी गोष्टी अनेक आहेत.

११ **मनुष्य वश करून घेण्याची हातोटी**—ही समर्थांची हातोटी फार अपूर्व होती. त्यांचें एकदां दर्शन झालें पुरे कीं, मधाला माशी लुब्ध झाल्याप्रमाणें लोकांस त्यांच्या सहवासांतून हालावेसेंच वाटत नसे. मोठमोठे मी मी ह्मणविणारे पंडित सुद्धां त्यांच्या चरणीं लीन होत. पट्टीचा विद्वान् सदाशिव शास्त्री देव अगदीं चंग बांधून वादास आला होता. बिचारा नमस्कार सुद्धां करीना ! उलट समर्थांनींच त्याला नमस्कार केला! पण अखेर त्याची फट्फजिती होऊन तो

वासुदेव गोसावी या नांवाचा शिष्य बनला. 'अहं व्याघ्रः' ह्मणून गर्जना करणारे वामन पंडितही त्यांचे शिष्य बनले! 'माझ्या भरल्या घरांत रामराम ह्मणत जाऊं नको' ह्मणून समर्थांस दरडावणाऱ्या सतीबाई! त्या समर्थांच्या दर्शनाकरितां अकरा अकरा दिवस उपोषणें काढून जन्मभर समर्थांच्या सजोड एकनिष्ठ शिष्य बनल्या! प्रत्यक्ष स्वराज्य हस्तगत करणाऱ्या छत्रपतींना एक पत्र पाठवितांच त्या पत्राचें उत्तर हातांत पडतें न पडतें तोंच राजेश्रींची स्वारी पाठोपाठ उभी! त्याच दिवशीं अनुग्रह घेऊन जन्मभर समर्थांचे दासानुदास बनले! इतकेंच नव्हे, तर येवढें आटोकाट प्रयत्नानें मिळविलेलें सारें राज्य त्यांनीं समर्थांसच अर्पण केलें! यापेक्षां मनुष्याला वश करून घेण्याची हातोटी अधिक कोणती राहिली? छत्रपति सुद्धां जर शिष्य बनले, तर मग इतर प्राकृतजनांची कथा ती काय? समर्थांच्या सर्व शिष्यांची, सर्व शिष्यिणींची व सर्व मठांची मोजदाद करणार कोण? प्रत्येक मठावरील अधिपतीस 'महंत' असें म्हणत. असे समर्थांचे महंत ८९ होते. शिष्यांपैकीं मुख्य शिष्य २८ होते; शिष्यिणी १४ होत्या. हें तर असोच; पण समर्थांच्या शिष्यांच्या आणखी शिष्यशाखा किती होत्या ह्याची तर गणतीच नाहीं! कल्याणस्वामींचे महंत ४२ असून जगन्नाथ स्वामींचे महंत २७ होते! ह्यावरूनच समर्थांच्या संप्रदायाचा विस्तार केवढा होता ह्याची कल्पना करावी.

१२ पण समर्थांचा सर्वांत लोकोत्तर गुण म्हणजे '**अंतर्ज्ञान**' हा होय. मातुश्री जांबेंत व समर्थ सज्जनगडीं. किती अंतर! असें असतां मातुश्रीचा अंतकाल येतांच समर्थ आपल्या खोलींत बसले, व बाहेरून कुलूप लावून सोळा दिवस उघडूं नये अशी आज्ञा केली, व मातुश्रीनें 'नारायण कोठें आहे?' म्हणतांच 'हा मी!' म्हणून हजर झाले, व यथाविधि पुत्रधर्म झाल्यानंतर सोळाव्या दिवशीं पुन्हां स्वारी सज्जनगडावर क्षौर केलेली हजर झाली!

श्रेष्ठांच्या अंतकालीं स्वतः स्वारी गेली नव्हती. पण त्या दिवशीं सज्जन-

गडावर त्यांनीं कीर्तन करविलें, व दुपारीं स्वारी पुन्हा स्नानास गेली! तेव्हां शिष्यमंडळीनें असें कां म्हणून विचारतां " श्रेष्ठ आज निजधामास गेले! आमचें छत्र नाहींसें झालें!" असें उत्तर दिलें. दुसऱ्या दिवशीं तिकडे श्रेष्ठांची पत्नी सती गेली. त्यादिवशींही त्यांनीं तसेंच स्नान केलें व ' आज श्रेष्ठांच्या पत्नी गेल्या!' असें सांगितलें. ही बातमी राजेश्रींस कळतांच महाराजांनीं स्वतः येऊन विचारलें कीं, जांबेकडील पत्र वगैरे कांहीं एक नसतां हा प्रकार खरा कशावरून? समर्थ ह्मणाले " मातुश्रींच्या वेळेस आह्मी प्रत्यक्ष गेलों होतों ह्मणून तो प्रकार खरा, व हा आह्मीं गेलों नाहीं म्हणून खोटा कीं काय! त्यावर ' समर्थ त्रिकालज्ञ आहेत.' असें ह्मणून शिवाजी महाराज गप्प बसले. पुढें समर्थांच्या मुलांस पत्र देऊन उद्धव गोसाव्यांस जांबेस पाठविलें. तों तो प्रकार खराच.

**१३ स्वप्नसाक्षात्कार**—समर्थांनीं कित्येक भक्तांनां विशेषेंकरून छत्रपतींच्या स्वप्नांत जाऊन वेळोवेळ त्यांस दर्शन दिलें असा बखरीमध्यें उल्लेख केलेला आहे. फारतर काय, पण शिवाजी महाराजांना जेव्हां प्रथमच समर्थांच्या भेटीविषयीं उत्कंठा लागून राहिली, तेव्हां त्याच रात्रीं समर्थांनीं त्यांस स्वप्नांत दर्शन दिलें असेंही लिहिलेलें आहे. ही गोष्ट अर्वाचीन विद्वानांना मुळींच पटणार नाहीं. ती निखालस खोटी आहे. असेंच तें ह्मणतील. पण ह्या गोष्टीला कागदोपत्रीं सुद्धां पुष्कळ आधार मिळाला आहे.

" श्रीसमर्थ शिवथरीं असतां राजश्री शिवछत्रपति यांस शरीर व्यथा बहुत कठीण झाली आहे असें ऐकून त्यांनीं कल्याणस्वामीस कृपापूर्वक आज्ञा केली कीं तुझें नाम कल्याण आहे. कल्याणार्थ प्रसाद घेऊन राजे यांजकडे जाणें. त्याप्रमाणें प्रसाद घेऊन कल्याणस्वामी साताऱ्याच्या दरवाजापाशीं गेले, तों तेचसमयीं छत्रपतींस स्वप्नसाक्षात्कार झाला कीं श्रीसमर्थांकडून कल्याण गोसावी कल्याणार्थ प्रसाद घेऊन आले आहेत. जागृत होऊन खरें कीं काय हें पहाण्यासाठीं छत्रपतींनीं दरवाजापाशीं

सेवक पाठविला, तों कल्याणस्वामी दरवाजावरच बसलेले त्यांस आढळले. सेवकाबरोबर कल्याणस्वामी राजदर्शनास गेले. पलंगावरून उठून उभे राहून, पुढें येऊन वंदनपूर्वक प्रसाद घेऊन छत्रपति त्रिवार ह्मणाले कीं, श्रीसमर्थांचा प्रसाद कल्याण गोसावी याबरोबर आला, आतां कल्याण आहे."

हें पत्र खुद्द कल्याणांनींच दिवाकर भट यांस पाठविलेलें रा. रा. देवांनीं प्रसिद्ध केलेली श्रीसांप्रदायांचीं कागदपत्रें' ह्यांत लेखांक ५० मध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. दुसरें पत्र लेखांक २६ हें दत्तोत्रीमल ह्यांनीं दिवाकर गोसाव्यास लिहिलें आहे. त्यांतः—

"श्रीछत्रपति शिवाजी महाराज कर्नाटकच्या स्वारीस जाण्यापूर्वी वाडीस असतां श्रीसमर्थ शिवथर प्रांतीं होते. व मध्यें महानदीला महापूर आला होता. अशा स्थितींत अकस्मात् रात्रीं पलंगापाशीं येऊन श्रीसमर्थांनीं राजे यांस साक्षात्काररूपें दर्शन दिलें आणि राजे यांच्या चित्तींही ते तेच कित्येक आशिर्वाद, दिले." असा उल्लेख आहे. हें तर काय पण अशीं आणखीं कितीतरी पत्रें या ग्रंथांत प्रसिद्ध झालीं आहेत. असो.

अशा प्रकारें समर्थांचे गुणानुवाद गावे तितके थोडेच होणार. ह्यावरून कयास निघतो तो असा. समर्थ हे पूर्व सुकृतेंकरून उत्पन्न झाले होते. ते अवतारी पुरुष होते. म्हणूनच सातवर्षांच्या वयापासून त्यांचा कल परमार्थाकडे वळला; आपल्या देशाची व लोकांची दैन्यावस्था त्यांच्या अंतःकरणांत बिंबली. त्याबद्दल त्यांचा अंतरात्मा कळवळूं लागला. व त्यांतून मुक्त होण्याला व लोककल्याण होण्याला स्वराज्यस्थापनेवांचून दुसरा मार्ग नाहीं, ही गोष्ट त्यांच्या मनानें घेतली. आणि स्वधर्मस्थापनेवांचून स्वराज्य स्थापन होणेंही अशक्य आहे. ह्यासाठीं प्रथम धर्मस्थापना झाली पाहिजे. तें काम ब्राह्मणांचें आहे. आपण ब्राह्मणकुलांत जन्म घेतला आहे. त्याकरितां

आपलें काम आपण करून टाकूं या. म्हणजे निम्में कार्य होईल-तें झालें कीं स्वराज्यस्थापनेचें काम क्षत्रियाकडे आहे. तें करणारा कोणीना कोणी तरी क्षत्रीय वीर उत्पन्न होईलच. ह्या भरंवशावर त्यांनीं आपलें कार्य सुरू केलें. देशकार्याला आपला स्वतःचा संसार व सुख हें मोठें विघ्न आहे. ज्यानें देशकार्याला हात घालावयाचा असेल, त्याला मोहपाश कामाचा नाहीं. म्हणून त्यांनीं बाराव्या वर्षींच संसारावर लाथ मारली; आत्मसुखावर पाणी सोडलें आणि भिक्षावृत्ति पतकरून ह्या कामीं परमेश्वराचें साह्य मागण्यासाठीं त्यांनीं कडकडीत तपश्चर्या सुरू केली. तेव्हां परमेश्वरासही करुणा येऊन त्यानेंही तसाच दुसरा महात्मा शिवाजीमहाराजांच्या रूपानें क्षत्रिय राजा जन्मास घातला. शिवाजीमहाराजही अवतारी पुरुष होते. त्यांचीही पुण्याई जबरदस्त होती. समर्थांच्या अंतःकरणांत जन्मतःच स्वधर्मस्थापनेचा अंकुर होता. म्हणूनच त्यांनीं समर्थाप्रमाणेंच स्वराज्य-स्थापनेस जे जे कार्य गुण लागावयाचे त्यांची पैदास केली, व समर्थाप्रमाणें ते ही आपल्या क्षत्रियधर्माच्या तपश्चर्येस लागले. हें अंतर्ज्ञानानें जाणून ह्मणा कीं ईश्वरीसंकल्पाप्रमाणें ह्मणा समर्थ ही आपली तपश्चर्या पुरी करून शिवाजी महाराजांच्या साह्यासाठींच कृष्णातीरीं जाऊन त्यांनीं स्वधर्माची स्थापना केली; हजारों लोक आपले आज्ञांकित करून सारी भूमिका तयार करून ठेवली असें पाहतांच शिवाजी महाराजांनींही तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याचा झेंडा उभारला. आणि मग या उभय पुरुषांचा मिलाफ होऊन दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें. ह्या उभयतांत गुरु-शिष्याचें नातें जडून त्या उभयतांनीं महाराष्ट्र देशास दुःखांतून कसें सोडविलें आणि सारा देश कसा सुखांत नांदू लागला ह्या गोष्टी इतिहासप्रसिद्धच आहेत.

तात्पर्य, एकाच हातानें नीट कार्य होणें शक्य नाहीं; एकाच डोळ्यानें नीट पाहतां येणें शक्य नाहीं; त्याप्रमाणें एकाच शक्तीनें कोणतेंही कार्य होणें शक्य नाहीं. सारें ब्रह्मांड चाललें आहे तेंही दोन शक्तीनेंच

चाललें आहे. ह्या दोन शक्ति एकरूपच आहेत. त्या कधींही विभक्त व्हावयाच्या नाहींत. ब्रह्म आणि माया; जड आणि चैतन्य; निगेटिव्ह आणि पॉझिटिव्ह. ह्या जोडशक्ति एकत्र झाल्याशिवाय कोणतेंही कार्य शेवटास जावयाचें नाहीं. त्याप्रमाणें स्वराज्याची गोष्ट आहे. तें प्राप्त होण्याला दोन शक्ति एकत्र झाल्या पाहिजेत. त्याला स्वधर्माचा पाया आधीं बळकट घातला पाहिजे. म्हणजे दुसरा कार्यकर्ता पुरुष कोणीना कोणी तरी होतोच होतो. असाच ईश्वरी संकल्प आहे. देहापेक्षां आत्मा हा श्रेष्ठ असल्याचें सर्वमान्य आहे. त्याप्रमाणें शिवाजीमहाराज व समर्थ हे उभयतांही आपआपल्यापरी समर्थच होते. तरी त्यांतल्यात्यांत समर्थांची योग्यता विशेष समजली पाहिजे. उभयतांनींही आपआपलीं कर्तव्यें उत्तम प्रकारेंच एकनिष्ठेनें पार पाडलीं. तरी धर्म ज्याअर्थीं सर्वांत श्रेष्ठ मानला जातो, त्या अर्थीं समर्थांच्या कृपेनेंच सर्व घडून आलें हें स्पष्ट दिसतें. व तीच गोष्ट शिवाजी महाराजांनाही मान्य होती. म्हणूनच सारें राज्य त्यांनीं त्यांस अर्पण केलें असें असतां त्यासमर्थांचा ह्या स्वराज्यप्राप्तींत यत्किंचितही अंश नाहीं असें म्हणणें हेंच न्यायाच्या विरुद्ध आहे. ह्याकरितां आतां जर विपत्तींतून-दैन्यांतून-मुक्त होणें असेल, व स्वराज्याची आशा करावयाची असेल तर त्यांनीं समर्थांचा मार्ग आधीं स्वीकारला पाहिजे. म्हणजे कोणीना कोणी तरी शिवाजी महाराज हे उत्पन्न होतीलच होतील. ह्यासाठीं देशकार्यकर्त्या पुरुषांनीं प्रथमतःसमर्थांचाच मार्ग धरावा. म्हणजे कोणीना कोणी तरी समर्थ पदवीला पोंचेल. व तसें झालें तर कार्यच झालें. तसें न झालें तरी सर्वांस त्या मार्गाचा कित्ता लावून द्यावा. तो कसा लावावा व समर्थ कसें व्हावें? '**समालोचना**' ह्या स्वतंत्र लेखांत विशद केलें आहे. तो लेख निदान मननपूर्वक वाचून तरी पाहावा आणि त्याबद्दल विचार करावा. ह्या पुस्तकाचें व लेखाचें मनन करून कोणी जर समर्थ निपजेल तर आमच्या भाग्यास पारावारच नाहीं. किंवा समर्थांच्या मार्गास लागून त्यांच्या अनुग्रहाचें नित्य मनन करितील तरी आमचें निर्म्मे

कार्य होईल. निदान ह्या पुस्तकानें आबालवृद्धांचें मनोरंजन होऊन त्यांस तें बोधप्रद वाटलें तरी सुद्धां आमच्या श्रमाचें साफल्य झालें असें आम्ही समजूं. हा सेवेचा योग स्वतः समर्थानींच ज्याअर्थी पुनः पुन्हां आह्मांस आणून दिला आहे; त्याअर्थी आमचा मनोरथ पूर्ण करण्यासही तेच समर्थ आहेत. ह्यासाठीं त्याच समर्थचरणीं शतशः प्रणिपातपूर्वक प्रसादाची याचना करून हें पवित्र सेवेचें पवित्र कलम तूर्त खालीं ठेवतों. व पूर्वपद्धतीप्रमाणें प्रार्थना करतों कीं:—

## श्लोक.

ग्रंथीं या अढळेल न्यून बरवें जें वाचतां त्वन्मना ।
तें मातें अति आदरें कळविणें ही प्रार्थना सज्जना ॥
ईशा वंदुनि शेवटीं सविनयें मी एक मागें वर ।
कीं सेवा तुमची घडो पुनरपी या हातुनी सत्वर ॥ १ ॥

पुणें शनिवार पेठ घ. नं. ३०६ गुरुवार ता. २९।१।१९२५ ई० — समर्थांचा दासानुदास, कृ. ना. आठल्ये.

**विनंति**—विषय विस्तृत असल्यामुळें कोठें कोठें पुनरुक्तीचा भास होईल त्याबद्दल व छापतांना क्वचित् हस्तदोष राहिले आहेत त्याबद्दल सदय वाचक क्षमा करोत.

# समर्थांचें सामर्थ्य.

## अनुक्रमणिका.

### पूर्वार्ध—भाग १ ला.


| पूर्वार्ध भाग १ ला. | पृष्ठ. |
| --- | --- |
| सामर्थ्याचे प्रकार व वाढ ... ... ... ... | १ |
| शरीरसामर्थ्य ... ... ... ... | १८ |
| दुसरें भक्तिसामर्थ्य ... ... ... ... | १९ |
| तिसरें युक्तिसामर्थ्य ... ... ... ... | २० |
| चौथें बुद्धिसामर्थ्य ... ... ... ... | २२ |
| विरक्तिसामर्थ्य ... ... ... ... | २७ |
| ६ सिद्धिसामर्थ्य ... ... ... ... | ४० |
| १ मनोधर्म ... ... ... ... | ४७ |
| ५ वाग्सिद्धि ... ... ... ... | ४८ |
| एका आंग्ल साधूचा शाप ... ... ... ... | ५२ |
| गोगलगायींचें तारायंत्र ... ... ... ... | ६१ |
| ८ शरीर सूक्ष्म करून वायुवेगानें संचार करणें ... ... | ६५ |
| ९ मृत मनुष्य जिवंत करणें ... ... ... ... | ६५ |
| १० महिने जमिनींत पुरून घेऊन जिवंत निघालेला फकीर. ... | ६८ |
| **भाग २ रा.** | |
| बखरकारावरील आरोपांचें निरसन ... ... ... | ७७ |
| दिवाकर गोसावी यास भास्कर गोसाव्याचें पत्र ... ... | १३४ |
| **भाग ३ रा.** | |
| समर्थांची लीला-पहिलें तप ... ... ... ... | १६७ |
| वंशपरंपरा ... ... ... ... | १७९ |
| मातापितरें ... ... ... ... | १४५ |

साक्षात्कारोपपत्तिविचार ... ... ... ... १९२
जन्म ... ... ... ... १९५
नाथांचा आशिर्वाद ... ... ... ... १९७
श्रेष्ठांचा अनुग्रह व पितृवियोग ... ... ... १९९
ह्याची उपपत्ति ... ... ... ... २०१
पितृवियोग ... ... ... ... ,,
समर्थांची बाललीला ... ... ... ... २०२
१ पहिली गोष्ट ... ... ... ... २०५
२ दुसरी गोष्ट ... ... ... ... २०७
शिक्षण ... ... ... ... २०८
अनुग्रह ... ... ... ... २१०
लग्नाचा बोजवारा ... ... ... ... २११
तपश्चर्या— ... ... ... ... २१७
१ पहिला चमत्कार ... ... ... ... २१७
पुष्पाची गोष्ट ... ... ... ... २२०
ह्या गोष्टीची उपपत्ति ... ... ... ... २२४
पृथ्वी प्रदक्षिणा—तिसरें तप ... ... ... ... २२६
श्रीक्षेत्र काशी ... ... ... ... २२६
अयोध्या ... ... ... ... २२७
द्वारका ... ... ... ... २२८
काश्मीर ... ... ... ... ,,
हिमालय ... ... ... ... २२९
रामेश्वर व लंका ... ... ... ... २३०
पुढचीं क्षेत्रें ... ... ... ... २३२
पैठणास घार उठविली ... ... ... ... २३५
जन्मभूमीचें दर्शन ... ... ... ... २३८
गंगाप्रदक्षिणा ... ... ... ... २४३

भाग ४ था. चवथें तप.

श्रीक्षेत्र वाई ... ... ... ... १२५
जरंडा व माहुली ... ... ... ... ,,

| | |
|---|---|
| जयराम स्वामींची भेट ... ... ... ... | २५८ |
| रंगनाथ स्वामींची भेट ... ... ... ... | २६२ |
| तुकाराम बोवांची भेट ... ... ... ... | २६३ |
| मोरयादेव ... ... ... ... | २६६ |
| रघुनाथ स्वामी व आनंदमूर्ति ... ... ... ... | २६७ |
| केशवस्वामी ... ... ... ... | २६८ |
| सतीबाई शहापुरकर ... ... ... ... | २६९ |
| अक्का व वेणूबाई ... ... ... ... | २७७ |
| कल्याणस्वामी ... ... ... ... | २७७ |
| मसूरच्या उत्सावाची सुरवात ... ... ... ... | २८१ |
| मसुरांतील २ चमत्कार ... ... ... ... | २८३ |
| ह्याच नमुना भिकाजीबावांचा ... ... ... ... | २८५ |
| डोहांतील रामचंद्राच्या मूर्ति ... ... ... ... | २८८ |
| चाफळच्या उत्साहाची सुरवात ... ... ... ... | २९१ |
| समर्थांचा शिष्यसमुदाय ... ... ... ... | २९६ |
| मोरयागोसावी व तुकारामबावा यांची भेट ... ... ... | ३०२ |


## भाग ५ वा. ४ थ्या तपांतील पुढील भाग.


| | |
|---|---|
| श्रीमच्छत्रपति शिवाजीमहाराज यांची भेट व अनुग्रह ... ... | ३०५ |
| समर्थांचें शिवाजीस पत्र ... ... ... ... | ३१२ |
| लघुबोध ... ... ... ... | ३१७ |
| राजधर्म ... ... ... ... | ३२२ |
| क्षात्रधर्म ... ... ... ... | ३२४ |
| सेवकधर्म ... ... ... ... | ३२८ |
| इच्छागमन ... ... ... ... | ३३६ |
| कुबडी तीर्थ ... ... ... ... | ३३८ |
| डोंगरांत २००० पात्रांचें भोजन ... ... ... ... | ३३८ |
| तुकारामबुवांचा मासला तोच ... ... ... ... | ३४० |
| वामनपंडितांची गाळण ... ... ... ... | ३४८ |
| अनुग्रह परत दिला ... ... ... ... ... | ३४८ |

| | |
|---|---|
| पंढरपूरची यात्रा ... ... ... ... ... | ३४९ |
| घरीं पाठविलेलें पत्र ... ... ... ... ... | ३५१ |
| तुकारामाची व शिवाजीची भेट ... ... ... ... | ३५२ |
| परळीस राहाण्याचा निश्चय ... ... ... ... | ३५२ |
| छाटी पडली ... ... ... ... ... | ३५३ |
| सज्जनगडावरील सज्जनांचा मेळा ... ... ... ... | ३५४ |
| दगडांतली बेडकी ... ... ... ... ... | ३५९ |
| श्रेष्ठांचें पत्र ... ... ... ... ... | ३६२ |
| इमारतीप्रकरण ... ... ... ... | ३६६ |
| श्रेष्ठांस दिलेलें पत्र ... ... ... ... ... | ३६७ |
| गोमांतकी आंबे ... ... ... ... | ३६८ |
| समर्थांचा कित्ता ... ... ... ... | ३६९ |
| तीन मागण्या ... ... ... ... | ३७० |
| भोळाराम ... ... ... ... | ३७२ |
| मारुतीची स्तुति ... ... ... ... | ३७३ |
| रंगनाथस्वामींचा रेड्यांचा चमत्कार ... ... ... | ३७७ |
| कटिबंध ... ... ... ... | ३८४ |
| आगीचा भडका ... ... ... ... | ३८५ |
| विलक्षण मागण्या ... ... ... ... | ३८७ |
| मातोश्रीस पत्र ... ... ... ... | ३८८ |
| शहाजी महाराजांची भेट ... ... ... ... | ३९१ |
| मातृदर्शन ... ... ... ... | ३९२ |
| श्रीदत्तात्रेयांचें दर्शन ... ... ... ... | ३९२ |
| आरती ... ... ... ... | ३९५ |
| इंदूरची पर्जन्यवृष्टि ... ... ... ... | ३९६ |
| तुपाची घागर ... ... ... ... | ३९९ |
| सर्पदंश ... ... ... ... | ४०१ |
| वेणूबाईची निष्ठा ... ... ... ... | ४०३ |
| माध्यपंथी सोवळें ... ... ... ... | ४०४ |

रामेश्वरची यात्रा ... ... ... ... ४०८
समर्थांच्या अस्सल तसबिरा ... ... ... ... ४१०
पुनरागमन ... ... ... ... ... ४१२
मातोश्रीचें निर्याण ... ... ... ... ... ४१२
एकनाथपंताची गोष्ट ... ... ... ... ... ४१४
राज्यदान ... ... ... ... ... ४१९
राज्यधर्म व परमार्थ ... ... ... ... ... ४२२
सावधता ... ... ... ... ... ४२४
जलस्तंभिनी विद्या ... ... ... ... ... ४२९
अश्वसंजीवन ... ... ... ... ... ४३१

## भाग ६ वा: तप पांचवें.

हुरड्याचें बक्षीस ... ... ... ... ... ४४०
छाटींतलें हींव ... ... ... ... ... ४४३
अंत्यजाकडून वेद बोलविले ... ... ... ... ४४४
अफजुलखानाचें पारिपत्य ... ... ... ... ४५०
वस्त्रें भिजण्याचें कारण ... ... ... ... ४५२
समर्थांचें वेड– ... ... ... ... ... ४५५
पद ... ... ... ... ... ... ४५७
श्रेष्ठांचें श्रेष्ठत्त्व ... ... ... ... ... ४५८
विषारी करट ... ... ... ... ... ४६१
मेलेल्या गायीचें दूध ... ... ... ... ... ४६७
वाघिणीचें दूध ... ... ... ... ... ४७१
वाघिणीचें पद ... ... ... ... ... ४७५
भागानगरांतलि म्हातारी ... ... ... ... ४७७
बाह्यांतील रेडकूं ... ... ... ... ... ४८१
जयराम स्वामीस बुडविलें ... ... ... ... ४८३
आनंदमूर्तींची भेट ... ... ... ... ... ४८५
उद्धव गोसाव्यांचें पत्र ... ... ... ... ... ४८७
घटपटादि खटपट ... ... ... ... ... ४९०

उद्धव गोसाव्यांचें कीर्तन ... ... ... ... ४९१
सर्वांवर चढ... ... ... ... ... ... ४९३
डफ गाणें ... ... ... ... ... ... ४९३
खंडोबाचें दर्शन ... ... ... ... ... ४९४

## पूर्वार्ध भाग ७ वा.

सहावें तप ... ... ... ... ... ... ४९७
कर्नाटक प्रांतीं गमन ... ... ... ... ... ४९८
निरंजन स्वामी ... ... ... ... ... ४९९
राजेश्रींची कर्नाटकांतील दुसरी सफर ... ... ... ५०२
मठांत चोर ! ... ... ... ... ... ५०४
समर्थांचा वोका राम ... ... ... ... ... ५०५
शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक... ... ... ... ५०७
दक्षिणेचे दगड ... ... ... ... ५११
प्रारब्धाची परिक्षा ... ... ... ... ५१३
श्रेष्ठांचें निर्याण ... ... ... ... ५१६
नायत्याच्या नवसाची फेड ... ... ... ... ५१८
वेणुबाईचें प्रयाण ... ... ... ... ५२२
व्यंकोजी राजे ह्यांचें बोलावणें ... ... ... ... ५२४
डोमगांवचा मठ ... ... ... ... ५२६
राजश्रीस शेवटचा निरोप ... ... ... ... ५२८
शिष्यांचीं प्रश्नोत्तरें ... ... ... ... ५२९
छत्रपतींचें निर्याण ... ... ... ... ५३१
नंतरची परिस्थिति ... ... ... ... ५३२

## भाग ८ वा.

### उपसंहार.

श्रीचें शेवटचें दर्शन ... ... ... ... ५३४
संभाजीमहाराज ... ... ... ... ५३६
अंतकालची स्थिति ... ... ... ... ५३९

अवतार समाप्ति ... ... ... ... ५४०

नंतरचें वर्तमान ... ... ... ... ५४४

संभाजीमहाराजांची भक्ति ... ... ... ५४५

कल्याणस्वामींच्या काळाचा योगायोग ... ... ... ५४६

पश्चात् संस्थानची व्यवस्था ... ... ... ... ५४८


## उत्तरार्ध.

### भाग पहिला.


अनुग्रह ... ... ... ... ... ... ५५१

दासबोध ... ... ... ... ... ... ५५३

दासबोधाच्या रचनेचा काल ... ... ... ... ५३


## उत्तरार्ध.

### भाग २


दासबोध ... ... ... ... ... ... ५९६

कोड्याचा उलगडा ... ... ... ... ... ६२०

दासबोधांतील सुभाषितें... ... ... ... ... ६४२


## उत्तरार्ध—भाग ३ रा.


जुना दासबोध व आत्माराम ... ... ... ... ६४७

रघुनाथाचें ध्यान ... ... ... ... ... ६५२

आत्माराम ... ... ... ... ... ६६०

मनाचे श्लोक ... ... ... ... ६६७


## उत्तरार्ध-भाग ४ था.


अभंग व रामायण ... ... ... ... ... ६९५

बालक्रीडा ... ... ... ... ... ११

रामायण ... ... ... ... ... ११९

पहिला प्रसंग ... ... ... ... ... ७२२

दुसरा प्रसंग ... ... ... ... ... ११

तिसरा प्रसंग ... ... ... ... ... ७२३

चवथा प्रसंग ... ... ... ... ... ७२३

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पांचवा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| सहावा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| सातवा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ७२४ |
| आठवा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| नववा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| दहावा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| अकरावा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ७२५ |
| बारावा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| तेरावा प्रसंग | ... | ... | ... | ... | ... | ११ |

## उत्तरार्ध-भाग ५ वा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| इतर ग्रंथ व किरकोळ प्रकरणें | | | ... | ... | ... | ७२६ |
| षड्रिपु विवेचन | ... | ... | ... | ... | ... | ७२६ |
| अन्वय व्यतिरेक | ... | ... | ... | ... | ... | ११ |
| भीमरूपी स्तोत्रें | ... | ... | ... | ... | ... | ७२८ |
| धांवा | ... | ... | ... | ... | ... | ७३० |

## उत्तरार्ध-भाग ६ वा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| समारोप | ... | ... | ... | ... | ... | ७३३ |

समाप्त.

# श्रीसमर्थांचें स्तोत्र.

( रघुनाथपंडितकृत )

आम्हां तुम्हांस भववारिधिमाजि तारूं ।
जे वाचितां परिसितां मग होय तारूं ॥
ते दासबोध-रचना घडली जयाला ।
वंदूं निरंतर तया गुरुराजयाला ॥ १ ॥

वैराग्य-भाग्य भरलें असतां अनन्या ।
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्ति कन्या ॥
चौथी तयांत वरिली, उरल्या न पाहे ।
तो आमुचा गुरु-समर्थ समर्थ आहे ॥ २ ॥

श्रीरामदास-गुरु शांति-वधूस अंगीं ।
अंगीकरूनि मिरवे स्वसुखांतरंगीं ॥
रंगीं उभा कर उभारुनि वंदनाचे ।
नाचे मुखीं गुण वदे रघुनंदनाचे ॥ ३ ॥

खेळावयास हनुमंत गडी जयाचा ।
जो या महीवरि वसंत जितेंद्रियांचा ॥
ज्याचीं पद प्रणमिताति कवींद्र राजे ।
श्रीरामदास गुरु तो आमुचा विराजे ॥ ४ ॥

जो डोंगरीं गिरिदरीं फिरतां न भागे ॥
ज्याची पवित्र घन कीर्ति जनीं विभागे ॥
जो तत्वबोधकविता करितां न मोजी ।
तो रामदास गुरुवर्य नमो नमो जी ॥ ५ ॥

शोभे शतद्वय समास समास-भारी
जो दासबोध निजबोधसुखा उभारी ॥

त्या शेवटीं दशक जोडित जो विसावा ।
श्रीरामदास-गुरु तो अमुचा विसावा ॥ ६ ॥

चिद्बोध सेज अरुवार नव्या फुलांची ।
सायुज्यमुक्ति ललना असतां जयाची ॥
तो रामदास ' अकलत्र ' कसें गणावें ? ।
अज्ञान होत जन, काय तयां म्हणावें ॥ ७ ॥

जो लेखणीसहित कागद दौती वाहे ।
तो दंड सद्गुण उदंड जयांत आहे ॥
हस्तीं तयासि मिरवी फिरवी विनोदें ।
श्रीरामदासगुरु तो नमिला प्रमोदें ॥ ८ ॥

जो भर्जरी सरस पाटलवर्ण चैलें ।
शोभे जयास लघुसें निटळीं अवाळें ॥
बोले ' समर्थ रघुवीर समर्थ ' ऐसें ।
तो मी स्तवीन निजसद्गुरु वाग्विलासें ॥ ९ ॥

जेणें प्रशिष्य निजशिष्य अनेक केले ।
देतां प्रसाद कफनी कफ नीट जाले ॥
लोकाभिरामगुण बोलत ' राम कर्ता ' ।
साष्टांग वंदन करीन तया समर्था ॥ १० ॥

श्रीरामदास-गुरुवर्णन-रूप पद्यें ।
वृत्तें ' वसंततिलका ' सुजनैकहृद्यें ॥
संख्या करूनि दशकावरि एकतेनें ।
केली अपूर्व रघुनायकपंडितानें ॥ ११ ॥



मनोजवं मारुततुल्यवेगं । जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

*Joshi Art Bombay, 1.*



समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणावें ॥
त्रैलोक्यासि पाहिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥ १ ॥

*Joshi Art Bombay, 1.*

स. २. च. २८
२५३१५
नों. नं. २६०३
२८-३-५

॥ श्री ॥

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## पूर्वार्ध.

## भाग पहिला.

### सामर्थ्याचे प्रकार व वाढ.

आर्या.

शिवराजास ज्ञानद जो, जैसा याज्ञवल्क्य जनकास।
तरले भवार्णवीं बहु दृढतर ज्याची धरूनियां कास ॥१॥
पूजी त्यातें ताडी जो कर्षक मूढ काढितां हुरडा।
यशशुद्ध रामदासीं; याचिकडे म्हणुनि साधु हो! मुरडा ॥२॥

—मोरोपंत—



'समर्थ' आणि 'सामर्थ्य' हे दोन शब्द उच्चारले कीं, त्याबरोबरच आपलें दौर्बल्य मनांत उभें राहतें, व ते शब्द ज्या व्यक्तीच्या संबंधानें उच्चारले जातात, त्याची थोरवी मनांत येऊन एकदम विद्युल्लतेची प्रभा फांकल्याप्रमाणें अंतःकरण अगदीं दिप्प होऊन जाऊन त्या दिव्य विभूतीच्या चरणीं लीन होतें. असा ह्या शब्दांचाच प्रभाव आहे. मग येवढी दिव्य पदवी ज्या पुरुषाच्या वांट्यास येते, त्याच्या भाग्याचें, पुण्याईचें, व प्रतापाचें वर्णन कोठपर्यंत करावें ? समर्थांच्या

चरणीं लीन होणार नाहीं असा प्राणी कोण ? त्यांचा नामोच्चार झाल्या-बरोबरच विद्युत्संदेशाप्रमाणें जीवात्मा हा आधींच जाऊन त्यांच्या पायावर लोळण घेतो--नव्हे मगरमिठी घालतो. हात जोडून, मस्तक वांकवून नमस्कार करण्याचें कार्य मागाहून ! प्रत्यक्ष कृति ही केवळ कवाईत. त्याला थोडा तरी अवधी लागेल. खरा संस्कार जो काय होणें तो सकृद्दर्शनींच मनावर--अंतःकरणावर घडतो. तोच खरा परिणाम होय. तोच त्याचा खरा खरा नमस्कार व तेंच त्याचें खरें खरें शरण येणें. मागाहून तुम्ही प्रत्यक्ष हस्त मस्तक त्याच्या चरणीं ठेवा कीं न ठेवा. पदीं नम्र होण्याची जी फलश्रुति, ती त्यास प्रत्यक्ष दर्शनानें किंवा स्मृतीनें सुद्धां होऊं शकते. कारण मनांत पूज्य भावना नसली, त्याच्या सामर्थ्याच्या तेजाचा मनावर प्रकाश पडलेला नसला, आणि केवळ वरकरणी एखाद्याच्या पायावर जाऊन शतशः लोटांगणें घातलीं तरी तीं काय होत ? बलात्कारानें किंवा दांभिकपणानें नमस्कार करणें, लीन होणें, हात जोडणें आणि अंतः-करणांतील पूज्य बुद्धीनें तसें करणें ह्यांत केवढें अंतर आहे, याचा आप-णच आपल्याशीं विचार करावा.

समर्थांच्या चरणीं लोक लीन होतात, नम्र असतात, तें कां ? समर्थांशीं लीन होण्याचीं कारणें दोन. एक भय आणि दुसरी आशा. एखादा मनुष्य राक्षसासारखा धिप्पाड, किंवा सशस्त्र असलेला, सामान्य लोकांच्या दृष्टीस पडला, कीं ते बोलत असले, गडबड करीत असले, किंवा अनाचार करा-वयाच्या बेतात असले, तरी ते एकदम स्तब्ध होतात. न जाणों त्याच्या मर्जीविरुद्ध आपण कांहीं केलें तर हा आपल्यास शिक्षा करील किंवा वेळे-नुसार ठार करण्यासही मागें पुढें पाहणार नाहीं, म्हणून ह्याला भिऊन वागावें हेंच उत्तम; किंवा ‘ दुर्जनं प्रथमं वंदे ’ हा न्याय स्वीकारून आपण आपलें ह्याच्यापासून दोन पावलें दूरच रहावें, त्याला दुरूनच नमस्कार करावा, त्याच्या वाटेस सुद्धां जातां कामा नये, असें मनांत आणून सर्व लोक जागच्या जागीं दबून राहतात. असें झालें म्हणजे बलाढ्य असेल त्याला आयतेंच फावतें. तो करील ती पूर्व दिशा ! कोणी हूं कां चूं सुद्धां बोलाव-वयाचें नाहीं. ही एक तऱ्हा झाली.

दुसरी तऱ्हा म्हणजे एखादा मनुष्य मोटारींत बसून आला, बरोबर

चोपदार, भालदार, शिरपेच, तुरा, कंठ्या, गोफ वगैरे अलंकारांनीं मंडित असून उत्तमोत्तम जामानिमा केलेला पहिला, म्हणजे सर्वांच्याच तोंडाला पाणी सुटतें. भिकाऱ्यास वाटतें हा मला पैसा देईल, म्हणून ते त्याच्यापुढें गयावया करूं लागतात. भटाभिक्षुकांस वाटतें, आपल्यास आतां पुष्कळशी दक्षिणा मिळेल म्हणून ते त्याच्यापुढें मंत्राक्षता ठेवूं लागतात. मोठमोठ्या लोकांस वाटतें, आपण स्थापन केलेल्या संस्थेस पांच चार हजार रुपये तरी मिळतील, म्हणून त्यास मानपत्रें, पानसुपाऱ्या व मेजवान्या वगैरे करतात. मध्यम स्थितीच्या लोकांस वाटतें कीं, आपल्यास एखादी बरीशी नोकरी मिळेल म्हणून ते उगाच पुढें पुढें करतात व घिरट्या घालित असतात. म्हणजे त्या श्रीमंत असलेल्या धनाढ्याकडून आपल्याला कांहींना कांहींतरी लाभ होईल व आपली आपत्ति दूर होईल म्हणून ते सारे लोक त्याची हांजी हांजी करतात व त्याला नम्र होतात. तोच कोणी एखादा सामान्य मनुष्य असूं द्या, त्याला कोणी कुत्रा सुद्धां विचारीत नाहीं. ज्याला जेवावयाला खावयाला कमी नाहीं, जो पानावर बसला असतां चाखत माखत एक दोन घांस घेतो न घेतो, त्यास भोजनास येण्याविषयीं कोण आग्रह ! आणि ज्याला अन्न मिळत नाहीं, दोन दोन दिवसांचा उपाशी, दुपारच्या वेळीं दाराशीं येऊन दीनवाणीनें आर्जव करील त्यास धक्के मारून बाहेर घालवावयाचें, परंतु शिळापाका अन्नाचा एखादा घांस सुद्धां त्याच्या पदरांत टाकावयाचा नाहीं ! ही बहुतेक जगाचीच चाल आहे.

तथापि ते दोघेही समर्थच होत. कारण एकाजवळ द्रव्यसामर्थ्य असतें आणि दुसऱ्याजवळ बलसामर्थ्य असतें. ह्यामुळें तें आपल्यास आज ना उद्यां कधीं काळीं तरी उपयोगी पडेल म्हणून म्हणा, किंवा निदान त्याच्याकडून असल्यास अपाय तरी होऊं नये म्हणून म्हणा सामान्य लोकांस त्यांच्यापुढें वरकरणी तरी नम्र व्हावें लागतें. कांहीं लोक असेही आढळतात कीं, ते अशा लोकांपुढेंसुद्धां नम्र होत नाहींत. त्यांची गोष्ट निराळी.

परंतु ह्या दोहोंपेक्षां तिसरेहि एक ' समर्थ ' लोक असतात. ते ह्या दोघांहूनही श्रेष्ठ होत. वर जे दोन प्रकारचे लोक सांगितले, त्यांस समर्थ होण्याला द्रव्य, शस्त्र किंवा बाहुबळ हीं दोन साधनें हातांत असावीं

लागतात. त्याशिवाय त्यांस समर्थताच प्राप्त होत नाहीं. पण हे जे तिसऱ्या प्रकारचे ' समर्थ ' सांगितले, [ खरोखर ते कांहीं तिसऱ्या प्रतीचे नव्हेत; ते पहिल्या प्रतीचे होत. परंतु लोकव्यवहाराप्रमाणें आम्हीं त्यांस थोडेंसें पुढें घातलें आहे. ] त्यांची कोटि अगदीं वेगळी. त्यांच्यापाशीं द्रव्य-सामर्थ्यही नसतें शस्त्रसामर्थ्यही नसतें, किंवा सत्तासामर्थ्यही नसतें.

सत्तेचा समावेश शस्त्रसामर्थ्यांतच होतो. म्हणजे ज्याच्या हातांत सत्ता असते, त्याच्या हातांत प्रत्यक्ष शस्त्र नसलें तरी, त्याच्या शब्दानेंच शस्त्राचें काम होत असतें. किंबहुना ज्याच्या हातांत प्रत्यक्ष शस्त्र असतें त्याच्या हातून सुद्धां कधीं कधीं त्याचा उपयोग होत नाहीं, किंवा मनांत प्रबळ इच्छा उद्भवली तरी त्याला तो करतां येत नाहीं. पण ज्याच्या हातांत सत्ता असते, त्याच्या हातांत प्रत्यक्ष शस्त्र नसतांही पाहिजे त्या शस्त्राचा तो उपयोग करूं शकतो. उदाहरणार्थ न्यायाधीश. न्यायाधीशाच्या हातांत प्रत्यक्ष शस्त्र कधींच नसते. तरी त्यानें एखाद्याचा ' शिरच्छेद करा ' असा हुकूम केला पुरे, कीं लगेच दुसरे आज्ञाधारक लोक आपल्या शस्त्राचा उपयोग करून त्याचा तत्काल शिरच्छेद करतात ! अथवा एखाद्याला ' कारागृहांत नेऊन ठेवा ' अशीं अक्षरें न्यायाधीशाच्या मुखांतून निघालीं पुरे, कीं लगेच त्याला चतुर्भुज करून न्यावयास पांच चार लोक तयार असतात. ह्यावरून सत्तेचा प्रभाव शस्त्राहूनही अधिक बलवत्तर आहे ही गोष्ट ध्यानांत येते.

हे जे तिसऱ्या प्रतीचे समर्थ पुरुष सांगितले, त्यांच्याजवळ द्रव्य नसतें, ते कफल्लक असतात. द्रव्य पुढें आलें तर ते लाथेनें झुगारून देतात, तें आम्हांस गोमांससमान निषिद्ध आहे, असें समजतात. शस्त्राला तर ते मुळीं शिवत सुद्धां नाहींत. इतके ते निष्कांचन व निःशस्त्र असतात. तरी त्यांचें सामर्थ्य पूर्वीं वर्णन केलेल्या द्रव्यसामर्थ्यवानाहून व सत्तासामर्थ्य-वानाहून किंवा शस्त्रसामर्थ्यवानाहूनही अधिक बलवत्तर असतें ! अशा पुरु-षांनाच लोक साधु, संत, किंवा सत्पुरुष असें म्हणतात. तेच खरे समर्थ किंवा सर्वसमर्थ होत. किंबहुना पूर्वींच्या दोन समर्थांच्या अंगीं जें सामर्थ्य येतें तें ह्या सर्वसमर्थांच्याच प्रसादानें येतें असें म्हटलें तरी सुद्धां त्यांत कांहीं वावगें नाहीं. कोणतेंही पुराण पहा, कीं इतिहास पहा, हीच गोष्ट दिसून येते. पूर्वीं सांगितलेले जे द्रव्यबळानें, सत्ताबळानें, किंवा शस्त्रबळानें

समर्थ होतात, त्यांस ' पृथ्वीपति ' ' भूपति ' किंवा ' राजे ' असें म्हणतात. राजे झाले तरी ते कमी शमर्थ असतात अशांतला भाग तर मुळींच नाहीं. तेही समर्थच होत. म्हणूनच त्यांना ' ना विष्णुः पृथ्वीपतिः ' म्हणजे विष्णूचा अवतार असें म्हणतात.

वरील प्रतिपादनावरून ही गोष्ट लक्षांत येईलच कीं जगामध्यें ' समर्थाच्या ' पदवीस पोंचणारे पुरुष दोनच होत. एक राजे आणि दुसरे साधुसंत किंवा सत्पुरुष. ज्यांच्या हातांत शस्त्र असतें, सत्ता असते, त्यांस ही लोक नमूनच असतात. म्हणून त्या समर्थांचा तिसराही एक प्रकार आम्ही पूर्वी सांगितला होता. परंतु द्रव्य, शस्त्र व सत्ता ही बहुधा राजापाशींच एकत्र झालेलीं असतात. शस्त्र हातांत घेतल्या वाचून ' राजा ' होणें बहुतेक दुरापस्तच आहे. ह्या करितां ' समर्थाच्या ' ह्या तिसऱ्या प्रकारचा या पुढें उल्लेख करण्याचें मुळींच कारण नाहीं. ' शस्त्र धारी ' या शब्दांतच ' राजाचा ' समावेश होतो. म्हणून यापुढें राजा आणि साधुसंत किंवा सद्गुरु ह्या उभयतांचाच विचार करूं.

राजा हा तरी कांहीं कमी समर्थ असतो किंवा कमी पुण्यवान् असतो अशांतला तर मुळींच भाग नाहीं. कारण, हजारों लोकांनीं आज्ञापाळणें, हजारों लोकांनीं पायाशीं नम्र होणें, एका शब्दासरशीं हजारों लोकांनीं आपला प्राणदेण्यासही मागें पुढें न पाहणें, ही गोष्ट तरी काय सामान्य आहे ! आपल्या घरांतील चाकर नोकर, बायकांपोरें सुद्धां आपल्या हुकमांत वागत नाहींत. मग येवढ्या अफाट देशांतील निरनिराळ्या स्थितींचीं व स्वभावाचीं मनुष्यें ज्याच्या आज्ञेंत वागत असतात, त्याला लोकांनीं समर्थ म्हणावें यांत आश्चर्य तें काय ? व वावगें तरी कसलें ?

समाजांतील एखाद्या कार्यासाठीं एखादी मोठी सभा जमूं द्या, किंवा ग्रामपंचायत मिळूंद्या आणि तेथें एखादा समंजस मनुष्य त्यासर्वांस एखादी गोष्ट न्यायानें सांगून त्याप्रमाणें वागावयास सांगूं द्या. पण बहुजनसमाजाचे मत जर त्याच्या विरुद्ध असेल तर ते त्या सभाध्यक्षाचा हुकूम खुशाल धाब्यावर बसवितील. कोणी कोणाचें ऐकणार नाहीं, व जो तो मनः पूत वागूं लागेल. आणि सांगणारा कितीही विचारी असला, समंजस असला तरी त्याचें कांहीं चालणार नाहीं, व त्यास आळा बसणार नाहीं. पण

तोंच राजाचा हुकूम सुटूंद्या कीं, तो सारे लोक निमूटपणें शिरसा वंद्य करतील. मग तो हुकूम न्यायाचा असो कीं अन्यायाचा असो. येवढी सत्ता असणे ही तरी सामान्य गोष्ट काय ? परमेश्वरसत्तेचीच ती एक पायरी होय. म्हणून राजाला ' समर्थ ' म्हणणें हें ही यथायाग्येच आहे. कारण त्याचेंही सामर्थ्य तसेंच ईश्वरी प्रभावाचें असतें.

परंतु राजा जरी प्रत्यक्ष पृथ्वीपती असला,कितीही समर्थ असला तरी तो साधुसंतांच्या व अवतारी पुरुषांच्या खालींच होय. त्याच्यानें साधुसंतांची बरोबरी कधीं व्हावयाची नाहीं. साधुसंतांची योग्यता पृथ्वीपतीहून कितीतरी पटीनें अधिक आहे. म्हणूनच मोठे मोठे राजे—नव्हे चक्रवर्तीसुद्धां—साधूच्याचरणीं लीन होतात. साधु हे राजाच्या पायावर कधींही लोळण घ्यावयाचे नाहींत. राजे लोक संतमहंतांपुढें हात जोडतात व त्यांच्या प्रसादाची याचना करतात. सत्पुरुष राजापुढें कधींही हात जोडीत नाहींत व त्यांची याचनाही करीत नाहींत. राजेरजवाडे साधूच्या दर्शनाची अपेक्षा करीत असतात, पण सत्पुरुष राजदर्शनाची कधींच अपेक्षा करीत नाहींत. राजवैभव प्राप्त होण्याला साधुसंतांच्या आशिर्वादाची, प्रसादाची नेहेमीं अवश्यकता असते. परंतु साधूंना राजाच्या अशिर्वादाची किंवा प्रसादाची अपेक्षा नसते. किंबहुना पृथ्वीपतींचे वैभव प्राप्त होणें, निरंतर यशस्वी होणें, हें सर्व साधुसंतांच्याच प्रसादानें, उपदेशानें किंवा अनुग्रहानें प्राप्त होतें अशींच जगाच्या इतिहासांतील आजपर्यंतचीं उदाहरणें आढळतील.

वास्तविक पाहिलें तर राजाही समर्थ आहे; व साधु—सत्पुरुष—महात्मा—विरक्त हाही समर्थच आहे. पण त्या उभयतांच्या वैभवांत, रहाणींत, परिस्थितींत, गुणधर्मीत व सामर्थ्यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. परस्परांचें ध्येय एक; परंतु साधनें व मार्ग परस्परांशीं अगदीं विरुद्ध !

राजापाशीं कोट्यावधिरुपयांची संपत्ति असते; साधूपाशीं सुतळीचा तोडाही नसतो. राजापाशीं शस्त्रें असतात, साधूपाशीं शस्त्राचे नांव नाहीं. 'क्षमा' येवढेंच काय तें त्यांचें शस्त्र. राजाला रहावयाला राजवाडा असतो; निजावयाला गाद्या गिर्द्या व जेवावयाला सुग्रास अन्न असतें. साधूपाशीं ह्यांपैकीं एकही नाहीं. ' करतल भिक्षा तरुतल वासः ' हाच त्याचा बाणा.

तुकारामबुवांनीं म्हटलें आहे:—

**लोकाघरीं गायी म्हशी। आम्हा घरीं उंदीर घुशी।**

किंवा:—

**आम्ही भाग्याचे भाग्याचे। आम्हां तांबे भोंपळ्याचे।**

अथवा भर्तृहरीनें म्हटलें आहे:—

**भूमीपर्यंक बाहू मृदुलतर उशी चांदवा व्योमकांती।**
**चंद्राचा दीप मोठा सममति ललना संगमें हर्ष चित्तीं॥**
**दासी दाही दिशा ह्या फिरवुनि चवऱ्या घालिती गोड वारा।**
**थाटानें भिक्षु ऐशा नृपसम निजतो सोडुनी लोभ सारा॥१॥**

ह्याच मासल्याचा त्याचा दुसराही एक श्लोक आहे:—

**भूमी हाच पलंग दोन भुज हे खाशी उशी टेकणा।**
**रत्नांचा वर चांदवा गगन हा वायू करी विंझणा॥**
**तेजस्वी शशिदीप कीं सुखविते संगें विरक्ती सती।**
**ऐशा सुस्थिर वैभवांत निजतो योगी जसा भूपती॥२॥**

तरी पण राजाच्या आज्ञेला ज्याप्रमाणें हजारों लोक तत्पर असतात, त्याप्रमाणेंच किंबहुना अधिकच साधूची आज्ञा पाळण्यास लोक तत्पर असतात. दोघांचे मार्ग मात्र निखालस भिन्न भिन्न—राजेलोकांच्या चरणीं जे हजारों लोक लीन होतात, ते त्याच्या शस्त्राच्या, सत्तेच्या—व क्रोधाच्या भीतीनें होतात. राजा सर्वांना वश करतो तें आपल्या पराक्रमानें करतो. त्याच्यापाशीं तीक्ष्ण धारेची तरवार असते. त्या तीक्ष्ण धारेच्या लखलखाटानें तो साऱ्या लोकांस आपले अंकित करून सोडतो. पण साधूंचा पराक्रम ह्याहूनही अधिक. त्यांच्याजवळ एक जिव्हा मात्र असते. तिच्या मधुर वाणीनें ते सारें जग आपलेंसें करून टाकतात. ह्यावरूनच राजाच्या तरवारीपेक्षांही साधुसंतांच्या जिव्हेचा पराक्रम किती अद्भुत आहे ही गोष्ट लक्षांत येईल. म्हटलेंच आहे 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' विद्वान् हा राजापेक्षांही श्रेष्ठ होय. कारण, राजाचें स्तोम काय तें त्याच्या देशांतच, पण विद्वान् कोठेंहि जावो, कोणत्याही देशांत असो;

लोक त्याला पूज्यच मानतात. मग साधू तर विद्वानाहून विद्वान्—त्रिकालज्ञ असतो. त्याच्या अंगीं भगवत् सत्ता असते. तेव्हां त्याला सारें जग पूज्य मानील ह्यांत आश्चर्य तें काय ? सत्ता हा राजाचा पराक्रम; आणि सद्बोध, अनुग्रह हा साधूचा पराक्रम. राजापाशीं शिक्षा असते; आणि साधूपाशीं क्षमा असते. दया हें साधूचें व्रत. साधूपाशीं एक कपर्दिक नसते तरी त्याच्या घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरीत असतात !

तरी सृष्टि हें एक वेगानें फिरणारें रहाटगाडगें आहे. त्यामुळें आपल्या किंवा सामान्य लोकांच्या चर्मचक्षूंस कसा भ्रम पडतो तो पहा ! पहाण्याचीं किंवा निरीक्षण करण्याचीं साधनें दोन आहेत. एक चर्मचक्षु आणि दुसरें ज्ञानचक्षु. सामान्य मनुष्याचें पहाणें नेहमीं चर्मचक्षूनेंच असतें. ज्ञानचक्षूनें पहावयास थोडासा विचार करावा लागतो, आणि विचार म्हणजेच ज्ञान. एखाद्या नौकेंत बसून चाललों असतां ती नौका झपाट्यानें जाऊं लागली तर तीरावरचे वृक्ष आपल्या गमनाच्या उलट दिशेनें धांवत आहेत असें वाटतें. सामान्य मनुष्याचें तर असोच, पण स्टेशनावर दोन आगगाड्या उभ्या असल्या आणि त्यांपैकीं एक चालू झाली तर, आपली गाडी पुढें जाते कां दुसरी पुढें जाते हें आपलें आपल्यासच समजत नाहीं. असाच हा सारा भ्रमाचा प्रकार आहे. चर्मचक्षूंना दिसतें एक आणि खरा प्रकार असतो निराळाच ! दररोज सूर्यनारायण पूर्वेकडून पश्चिमेस गेलेला आपणांस दिसतो. पण खरोखर आपणच पृथ्वीसहवर्तमान पश्चिमेकडून पूर्वेकडे जात असतों. परमेश्वर पहावयास गेलें तर चर्मचक्षूला कोठेंच दिसत नाहीं. पण तो सर्वत्र भरलेलाच आहे. एक गृहस्थ विनोदानें दुसऱ्यास म्हणाला "परमेश्वर कोठें आहे तो मला जो कोणी दाखवून देईल त्याला मी शंभर रुपये बक्षीस देईन !" दुसऱ्या गृहस्थानें ताबडतोब उत्तर दिलें "परमेश्वर जेथें नाहीं असें स्थळ मला कोणी दाखवून दिल्यास मी दोनशें रुपये देईन !" खरें आहे. आकाश म्हणजे पोकळी. जेथें कांहीं नाहीं तें आकाश, असें म्हणतात. पण ती समजूत चुकीची आहे. सर्व कांहीं ज्यांत भरलेलें आहे तें आकाश. आकाशांत अमुक एक नाहीं असें नाहीं. सर्व कांहीं आकाशापासूनच उत्पन्न होतें. 'यद्दष्टं तन्नष्टं' हा सिद्धांत आहे. आपल्या डोळ्यांस जें जें काय दिसतें तो सारा भास, आणि जें

डोळ्यांस दिसत नाहीं, तें खरें—शाश्वत स्वरूप. ह्या चर्मचक्षूंच्या भ्रामक ज्ञानामुळेंच मनुष्याची सारी समज उलट झालेली आहे. ज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे " जन्मांतील एक वर्ष गेलें कीं, त्याच्या आयुष्यांतील एक वर्ष कमी होतें. अर्थात् त्याच्या आयुष्याचा ऱ्हास होतो. असें असतां लोक त्याचा वाढदिवस करतात! हें लोकांचें किती अज्ञान आहे ? "

इतर प्राण्यांत, पशुपक्ष्यांत व कृमिकीटकांतही परमेश्वरानें त्यांच्या त्यांच्या संरक्षणासाठीं केस, लोंकर, घरटीं हीं दिलेलीं असतात. व शत्रूच्या प्रतिकारार्थ शिंगें, दांत, विषारी कांटे, नखें वगैरे दिलेलीं आहेत. परंतु मनुष्य हा किती दुबळा प्राणी ? त्याला तीव्र नखें नाहींत, दांत नाहींत, शिंगें नाहींत, थंडीच्या निर्वाणार्थ केस नाहींत लोंकर नाहीं! तेव्हां हा प्राणी किती भाग्यहीन! असेंही कित्येकांस वाटतें. पण विचार केला तर त्याच्याइतकीं उच्च प्रतीचीं साधनें इतर कोणत्याच प्राण्यापाशीं नाहींत. त्याला बुद्धि आणि हात हीं दोन साधनें स्वयंसिद्धच असल्यामुळें, पाहिजे तीं नवीं साधनें तयार करून घेतां येतात. तो आपल्याला लोंकरीचीं वस्त्रें, मऊ गाद्या, गिरद्या, उत्तम प्रतीचें घर वगैरे पाहिजे त्या सुखवस्तु निर्माण करतो. तोफा, बंदुका, तरवारी इत्यादि इतकीं प्राणघातक हत्यारें तयार करतो कीं, त्याच्यापुढें सिंह, वाघ, हत्ती हे बिचारे दीन होऊन जातात!

अशा प्रकारें सामान्य लोक सारेच चर्मचक्षूनें पाहात असल्यामुळें त्यांना साधूचें स्वरूपही उलटच दिसत असतें. निदान सकृद्दर्शनीं तरी तें तसें दिसतें. त्याच्या बाह्य स्थितीवरून तरी तो एक यःकश्चित मनुष्य आहे, केवळ कफल्लक आहे असेंच त्यास वाटत असतें. पण ज्ञानदृष्टीनें पहा कीं तो राजापेक्षांही राजा असतो. त्याच्यापाशीं शिबंदी नाहीं, त्याच्यापाशीं द्रव्य नाहीं, त्याला राजवाडा नाहीं, राणी नाहीं, सत्ता नाहीं; कांहीं नाहीं. तरी त्याची सत्ता, वैभव, राजापेक्षांही अधिक असतें. त्याच्या भांडारांतील अमूल्य ठेवा राजाच्या भांडारांतही मिळावयाचा नाहीं. साधु हा विरक्त असल्यामुळें त्याला 'संसार' नाहीं असें म्हणतात. परंतु साधुयेवढा मोठा संसार दुसऱ्या कोणाचाच नाहीं. त्याला 'दारासुतादि' उपाधी नसल्यामुळें त्याच्यामागें कोणताच पाश नाहीं असें सामान्य लोकांस वाटते खरें. परंतु त्यांच्यामागें मोठीच उपाधी असते. ती कोणती ? तर

'वसुधैव कुटुंबकम्' हेंच त्यांचें व्रत असल्यानें साऱ्या जगाचीच काळजी त्यास रात्रंदिवस वहावी लागते. ह्या सर्वांचा मथितार्थ हा कीं, साधूपाशीं कांहीं नाहीं असें जें म्हणणे आहे तें व्यर्थ असून त्याच्याजवळ सर्व कांहीं आहे हेंच तत्व निदर्शनास येतें.

साधूचा लोककल्याण करण्याचा मार्ग आणि सर्वांवर सत्ता चालविण्याची हातोटी हीं तर पृथ्वीतील सर्व राजांहून अपूर्व होय. राजाला सैन्य जमवावयाचें असेल तर त्यास पगार द्यावा लागतो. त्याचें अर्जव करावे लागतात, तरी 'रिक्रूट' भरण्याची कोण मारामार! तसा प्रकार साधूंचा नाहीं. ते आपल्या मधुर वाणीनेंच सारे लोक आपलेसे करून टाकतात. त्यांना पगार द्यावा लागत नाहीं. ते आपल्या आपणच त्यांच्या भजनीं लागतात. नव्हे उलट भिक्षा मागून आणून आपल्या गुरूचा सुद्धां चरितार्थ चालवितात. राजाला आपल्या संपत्तीची, जडजवाहिराची व स्वसंरक्षणाची रात्रंदिवस काळजी असते. साधूंना त्याची मुळींच पर्वा नाहीं. राजवाडा नाहीं, अलंकार भूषणें नाहींत, खजिना नाहीं कांहीं नाहीं. आणि देहरक्षणाची तर त्यांना मुळींच पर्वा नाहीं. कारण त्यांना शत्रु म्हणून जगांत कोणीच नाहीं हें एक, आणि स्वतःच्या देहावर ममता नाहीं हें दुसरें. ह्यामुळें ते सदासर्वदा ब्रह्मानंदांत निमग्न असतात. राजाला सुख तें कशाचें? त्याच्याइतका घोर दुसऱ्या कोणालाच नसतो. 'जगीं सर्व सुखी असा कोण आहे?' असा एक व्याजोक्तीचा प्रश्न आहे. त्याचें ध्वनितार्थानें उत्तर 'कोणीच नाहीं' अशाच अर्थाचें असावें असें वाटतें, आणि तेंच खरें आहे. पण एखाद्या चाणाक्ष मनुष्याला त्याचें उत्तर समर्थांस समक्षच देण्याचा योग आला असतां तर कदाचित् त्यानें त्याचें उत्तर असें दिलें असतें कीं, "महाराज! जगामध्यें सर्वसुखी असे एक आपण मात्र आहां. बाकी कोणीही सुखी नाहीं. सुखाचा मार्ग आपण शोधून काढलांत. दुःखाच्या खाच खळग्यांनीं भरलेला मार्ग चुकविला असा आपणच." हेंच उत्तर यथायोग्य आहे.

राजापाशीं सैन्य असतें; साधूपाशीं शिष्यसमुदाय असतो. राजाला उपाधी असते; साधु निरुपाधिक असतात. राजापाशीं स्वार्थ असतो;

साधूपाशीं परमार्थ असतो. राजाला द्रव्याचा नेहमीं तुटवडा असतो; साधूपाशीं नेहमीं सिद्धीचीच समृद्धि असते. राजाच्या मागें सदासर्वदा घोर असतो; साधु रात्रंदिवस निजानदांत निमग्न असतात. राजाचा सर्व लोकांना धाक वाटतो; पण साधूबद्दल पूज्यबुद्धि व प्रेम वाटतें. राजापाशीं शिक्षा असते आणि साधूपाशीं क्षमा असतें. राजापाशीं रोष आणि साधूपाशीं संतोष. राजाला दुःख असतें आणि साधूला दुःखाचा गंधही नसतो. राजापाशीं बंधन असतें आणि साधूपाशीं मोक्ष असतो. राजापाशीं ऐहिक सुख असतें परंतु साधूपाशीं ऐहिक सुख असून शिवाय पारमार्थिकही सुख असतें; म्हणून राजापेक्षांही साधुसंत हेच अधिक समर्थ होत.

मुलांना जसा पंतोजी किंवा मास्तर त्याप्रमाणेंच प्रजेला राजा होय. मास्तर हाही गुरूच आहे, त्याप्रमाणेंच राजाही सर्वांस वंद्य आहे. पण साधुसंत हे मायबापाप्रमाणें होत. मास्तर कितीही वंद्य असला, त्याचे शिष्यावर कितीही उपकार असले, व तो कितीही श्रेष्ठ असला तरी आईबापांची ममता कांहीं त्यास यावयाची नाहीं. आईबाप ते आईबापच! तीच गोष्ट साधुसंतांची. मुलास एखाद्या अपराधाबद्दल शिक्षा करावयाची झाली, तर मास्तराचा हात वेगळा व मनही वेगळें. आणि आईबापांनीं मुलांस शिक्षा करावयाचें मनांत आणलें तर त्यांचे हात वेगळे व मन वेगळें. मास्तरचे हात जसें त्या कामाला धजतील तसे आईबापांचे हात धजतील काय? आईबापांची कळकळ मास्तरास येणें कधीं शक्य आहे काय? नाहीं; कधींच नाहीं. राजा हा मास्तराप्रमाणें आहे असें मानल्यास साधु हा मायबापांप्रमाणें समजलें पाहिजे. सद्गुरूची योग्यता व अधिकार राजापेक्षां कितीतरी पटीनें अधिक आहे. राजा हा समर्थ तर सद्गुरु हा ‘ सर्वसमर्थ ’ इतकें त्यांत अंतर आहे. किंबहुना राजाला राज्य मिळवावयाला व तें नीट चालावयाला सद्गुरूची कृपाच कारणीभूत होत असते. सद्गुरूच्या कृपेशिवाय राजाचेंही पाऊल पुढें पडत नाहीं. म्हणजे राजा समर्थ होतो तो ह्या सद्गुरूच्याच सामर्थ्याच्या बळावर होतो. अर्थात् राजा हा नांवाचा धनी, खरे खरे सिंहासनाचे धनी एक सद्गुरूच होत! म्हणूनच राजेलोक सद्गुरूच्या चरणीं लीन होतात. सद्गुरु जर खरोखरच निष्कांचन असते, दरिद्री असते तर मोठमोठे सर्वभौम राजे त्यांच्या चरणीं लीन झाले असते

काय ? कधींही झाले नसते. परंतु जगाचा इतिहास पहा; असा एकही राजा सांपडणार नाहीं कीं, ज्याला कोणीना कोणी सद्गुरु नाहीं !

दाशरथी रामचंद्र तर प्रत्यक्ष अवतारी पुरुष होते. त्यांना खरोखर गुरु कशाला पाहिजे होता ? पण तेही वसिष्ठांच्या आज्ञेबाहेर वागत नसत. भगवान् श्रीकृष्ण हेही साक्षात् परब्रम्हस्वरूप होते तरी त्यांसही ' संदीपनी ' हा गुरु होताच. ह्या पौराणिक गोष्टी सोडल्या तरी अर्वाचीन इतिहास सुद्धां हेंच सांगतो. अलेक्झांडर—ज्याला शिकंदर बादशहा—असें म्हणतात त्यालाही ' अरिस्टाटल ' हा गुरु होताच. श्रीशिवाजीमहाराज येवढे पराक्रमी होते तरी श्रीसमर्थ रामदासस्वामी हें त्यांचें गुरुस्थान होतें. श्रीमंत पेशव्यांना ब्रम्हेंद्रस्वामी व नरवीर बापू गोखल्याचें तर गुरूच्या आज्ञेशिवाय पान हालत नसे. ह्यावरून राजा हा जर ' समर्थ ' असें मानलें तर सद्गुरु हे समर्थांचेही समर्थ होत.

परंतु जगामध्यें अज्ञानांचा भरणा फार आणि संतांचें स्वरूप राजाहून फार भिन्न असल्यामुळें तें कोणास सहज ओळखावयास मिळत नाहीं. आणि मयसभेमध्यें जशी दुर्योधनाची अवस्था झाली तशीच जगाची अवस्था होते. जेथें सपाट जमीन असे तेथें पाणी आहे असें समजून दुर्योधन आपलीं वस्त्रें सांवरून घेऊन चाले आणि जेथें पाणी असे तेथें सपाट जमीन आहे असें वाटून तो पाऊल टाकी तों डबकर पाण्यांत पडून भिजून चिंब होत असे. दार उघडें आहे असें वाटून पुढें जावयास लागे तों ताडकर कपाळास भिंत आपटून टेंगूळ येत असे. आणि जेथें खरोखर दार उघडें असे तेथें तो आंधळ्यासारखा भिंत म्हणून चाचपीत बसे ! हीच अवस्था सर्व जगाची आहे. त्यासही संतांचें—सद्गुरूचें—स्वरूप सहसा ओळखूं येत नाहीं.

ह्याकरतां समर्थांच्या अंगीं असें कोणतें सामर्थ्य असतें कीं, त्यांस समर्थ म्हणावें ? किंवा त्यांस ईश्वरी अवतार समजावें ? अवतारी पुरुष म्हणजे ईश्वरी अंश ज्याच्यामध्यें दृष्टीस पडतो तो. तेव्हां अशा पुरुषाच्या अंगांत ईश्वरी अंश तो कोणता ? त्याचा प्रभाव काय ? हेंच आतां विशद करून सांगितलें पाहिजे. कारण सामान्य जनांची दृष्टि नेहमीं उलट असते. चर्मचक्षूंना सत्यस्वरूप कळणें दुरापास्त आहे. चर्मचक्षूनें मनुष्याच्या

दृश्यस्वरूपाचें ज्ञान होईल, पण अंतःकरणाचें ज्ञान होणार नाहीं, हें पूर्वी सांगितलेंच आहे. जगाची दृष्टि अज्ञानांतच गुरंफटल्यामुळें त्यास वाटतें कीं, सामर्थ्य हें बळ, शस्त्र, सत्ता व द्रव्य ह्यांच्यामध्येंच भरलेलें असतें. परंतु ही समज चुकीची आहे. सामर्थ्य हें बळांत नाहीं; शस्त्रांत नाहीं; शद्वांत नाहीं; सत्तेंत नाहीं; द्रव्यांत नाहीं; कशांतच नाहीं. तर तें अंतस्थ शरीरांत गुप्त आहे.

आपल्याला कोणताही पदार्थ दिसतो, व त्याचें यथार्थ ज्ञान होतें हें कोणाचें सामर्थ्य ? डोळ्यांचें. कारण डोळे आहेत म्हणून आपल्याला दिसतें. आंधळ्याला डोळे नसतात म्हणून दिसत नाहीं. परंतु हें म्हणणें सुद्धां चुकीचेंच आहे. डोळ्यांतच जर दिसण्याचें सामर्थ्य असतें तर प्रेताला तरी कां दिसूं नये ? त्याचे नेत्रही शाबूतच असतात. अथवा जीव असला, नेत्र शाबूत असले, आणि प्रकाशच मुळीं नसला तरी मनुष्याला कांहीं दिसेल काय ? नाहीं. तात्पर्य, नेत्र पाहिजेत, प्रकाश पाहिजे, आणि त्या नेत्रांतून पाहाणारा जीव पाहिजे. ह्या त्रयीची सांगड असेल तेव्हांच पदार्थ दिसावयाचा. ह्या त्रयींतही: अंतस्थ परमात्मा—पाहणारा जीव किंवा आत्मा—हा मुख्य होय. ह्या जीवाचाच सारा खेळ. हा जीव नसेल तर बाकी सर्व व्यर्थ होत. तात्पर्य, प्रत्येक देहांत असणारा जीव किंवा आत्मा—जो निराकार व निर्विकार आहे—अदृश्य आहे—तोच अंतःशक्तीचा प्रेरक. खरें खरें सामर्थ्य एक त्याचेंच.

तेव्हां आतां ह्या मूळ पुरुषाला-आत्म्याला-जीवाला हें सामर्थ्य कसें प्राप्त झालें ? त्याचा व्यापकपणा किती ? त्याची वृद्धि होते किंवा नाहीं ? होत असेल तर किती होते? तें वृद्धिंगत करण्याचीं साधनें कोणतीं? ह्याचा विचार करणेंही अत्यंत अवश्य आहे. सामान्य मनुष्यास ह्या गोष्टी स्पष्टपणें कळत नाहींत येवढेंच नव्हे, तर त्यासंबंधानें त्यांच्या कल्पनाही अगदीं विरुद्ध असतात. तो समज दूर झाला पाहिजे, म्हणून कांहीं अनुभविक चमत्कारावरून त्याचें अनुमान काढूं.

गीतेंतील १० व्या अध्यायांत भगवंतांनीं म्हटलें आहे कीं:—

**" अहमात्मा गुडाकेशःसर्व भूताशय स्थितः "**

" प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांत मींच वस्ती केलेली आहे. " परंतु प्रत्येक प्राणिमात्रांत जर परमेश्वर असेल, तर सारे प्राणी परमेश्वरच होतील. मग निराळा परमेश्वर तो राहिला कोठें ? अशी सहजी शंका मनांत येते. तर त्याचा अर्थ परमेश्वर कांहीं प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांत परिपूर्ण अंशानें भरलेला नाहीं; त्याचा अल्पांश मात्र प्राणिमात्राच्या हृदयांत असतो, आणि तो प्रत्येक प्राण्यामध्यें निरनिराळ्या प्रमाणांत असतो. कृमिकीटकांपेक्षां पशुपक्ष्यांमध्यें त्याचा अंश अधिक, व पशुपक्ष्यांपेक्षां मनुष्यमात्रांत त्याचा अंश अधिक, अशा त्याच्याही पायऱ्या आहेत. भगवंतांनीं सुद्धां आपला साराच अंश प्रत्येक प्राण्यांत आहे असें म्हटलेलें नाहीं. तरः—

**अथवा बहुनैतेन किंज्ञातेन तवार्जुन।**
**विष्टभ्याह मिदंकृत्स्न मेकांशेन स्थितो जगत् ॥१**

असें गीतेच्या दहाव्या अध्यायाच्या क्षेवटीं म्हटलें आहे. " माझा केवळ अंश मात्र जगांत व्यापलेला आहे. बाकी माझें स्वरूप आहे तें वेगळेंच आहे ! "

तेव्हां आतां प्रत्येक प्राण्यामध्यें ईश्वरी अंश आहे तो कोणता ? तो कसा काय दृष्टोत्पत्तीस येतो ? त्याचा अधिकार किती ? ईश्वरी अंशाचा अद्भुत प्रभाव कसा काय दृष्टोत्पत्तीस येतो ? ह्याचा विचार करूं लागलें तर कांहींच कळत नाहीं. ' कोण तें ? ' म्हणून कोणी एखाद्यानें विचारलें असतां ' मी तो ' असा आपण जबाब देतों. पण मी म्हणजे तरी कोण ? ' मी कशाला म्हणावयाचें ?' देहाला मी म्हणावयाचें का हाडामासाला मी म्हणावयाचें ? देह म्हणजे कांहीं मी नव्हे, आणि हाडें, मांस म्हणजेही कांहीं मी नव्हे. कारण मेल्यानंतर त्यांस जाणीव नाहीं. मग मी म्हणणारा कोण ? हेंच मुळीं समजत नाहीं, हा पहिला चमत्कार होय. आपण सर्व जाणतों, आपणास ज्ञानी म्हणवितों, पण मी कोण हें मात्र समजत नाहीं ! हा काय सामान्य चमत्कार ? सजीव देह हाच काय तो मी. देह दिसतो; तो कशाचा बनला आहे हें समजतें. पण त्याच्या आंत असलेला जीव कशाचा आहे ? त्याचें स्वरूप काय ? तो येतो कसा व जातो कसा ? हें कांहींच कळत नाहीं. देहाचें सर्व जरी

नसलें तरी थोडेसें ज्ञान आपल्याला आहे. परंतु जीवाचें—आत्म्याचें—आपल्या मुळींच कधीं ज्ञान होत नाहीं. त्याची आम्हाला जाणीव आहे, पण त्याविषयींचें ज्ञान नाहीं.

ह्याकरितां सजीव देह हाच परमेश्वराचा अंश असें आपण तूर्त समजू. पण सजीव देह म्हणजे तरी काय? हाडामांसानें भरलेली एक चामड्याची कोथळी किंवा पिशवी! आणि तिच्या तोंडांतून भात्याप्रमाणें आंत बाहेर जाणारा वायु हा जीव. यापेक्षां अधिक ज्ञान असें आपल्याला कांहींच नाहीं. तरी त्या सजीव देहाचा चमत्कार किती अपूर्व आहे? हाडें, मांस आणि त्वचा हे पदार्थ भिन्न भिन्न करून ठेवले तर ते एक प्रहरभरसुद्धां नीट रहात नाहींत. लागलीच कुजूं लागतात. पण तेच पदार्थ एकत्र असून त्यांत जीव असला म्हणजे वर्षानुवर्षें ताजेच्या ताजे राहतात! कधीं कुजत नाहींत. येवढेंच नव्हे, तर उलट वृद्धि पावतात! हा चमत्कार किती अद्भुत आहे? दुसरा चमत्कार जाणिवेचा. डोळे शाबूत असले, प्रकाश पडला असला म्हणजे आपल्याला छाया व प्रकाश यांतील भेद समजून सारे पदार्थ स्पष्टपणें दिसूं लागतात. कानांनीं उच्च नीच स्वरांतील भेद समजतो. हें तर असोच, पण ह्याहूनही मोठा चमत्कार किंवा आपला अधिकार व सत्ता आहे ती तर सर्वांहूनही श्रेष्ठ आहे. ती कोणती? तर आपल्या इच्छेप्रमाणें हस्तपादादि इंद्रियांवर चालणारी हुकमत! दोन पाय, दोन हात, आणि तोंड हे तीन सेवक रात्रंदिवस आपल्या आज्ञेंत असतात. हातांना ‘ वर या ’ म्हटलें कीं ते वर येतात. कांहीं काम करा म्हटलें कीं करतात. लिहितात, चित्रें काढतात, यंत्रें तयार करतात, हातांत तरवार घेतात व एखाद्याचा ‘शिरच्छेद करा’ म्हटलें कीं तें ही करतात! एक क्षणभरसुद्धां मागेंपुढें पहात नाहींत! धन्याची आज्ञा पाळावयाची हेंच त्यांचें व्रत. त्यांत हें सत्कर्म किंवा दुष्कर्म ह्याचा विचारच करावयाचा नाहीं! फार तर काय, पण आत्महत्या करण्याची इच्छा झाली तरी आतां आपला प्राण खर्ची पडतो म्हणून कां कूं करावयाचें त्यांच्या स्वप्नांतसुद्धां येत नाहीं. तेव्हां ह्या त्यांच्या स्वामीभक्तीला कांहीं सीमा आहे काय? केवढी आज्ञाधारकता ही!

राजाला तरी इतका आज्ञाधारक रात्रंदिवस न विसंबणारा इमानी सेवक

मिळेल काय ? तीच गोष्ट पायांची. उठावयाची इच्छा झाली कीं उठले ! चालावयाची इच्छा झाली कीं निघाले ! एखादा शत्रु वगैरे आला आणि आतां धांव मारा असें मनांत आणण्याचा अवकाश कीं, दोन चरणरूपी सेवक निमिषेचाही अवकाश न करतां हें आपल्या देहाचें मणा दीड मणाचें ओझें घेऊन धांवत सुटलेच ! असें सदासर्वदा सज्ज असलेलें वाहन एखाद्या सार्वभौम बादशहाला तरी दुसरें मिळेल काय ? नांव कशाला पाहिजे ? बग्गी असो कीं मोटार असो; ड्रायव्हरला पगार शंभर असो कीं दोनशें असो; त्याला तें आपलें वाहन सज्ज करावयाला पंधरा वीस मिनिटांचा तरी अवधि लागेलच लागेल. परंतु आपल्या ह्या दोन पायांना निघावयाला एका निमिषाचा तरी विलंब लागतो का ? छे छे ! विलंबाचें नांव नको. मनांत येण्याचा अवकाश, इच्छा होण्याची खोटी, कीं ही मंडळी तयार.

वाणीची गोष्ट तरी किती अजब ! राग, लोभ, मोह उत्पन्न करण्याची हातोटी तर असोच; पण आपल्या अंगच्या माधुर्यानें, अधिकारानें हजारों लोकांस आपलेसें करून घेणें, व जें कार्य मोठमोठे पगार देऊनही होणारें नव्हे तें सहजासहजीं घडवून आणणें हा तरी प्रभाव काय सामान्य ? ह्याचेंच नांव सामर्थ्य. केवळ आपल्या जिवाच्या इच्छेबरोबर–जीव म्हणजे इच्छाच–दुसरें काय ! इच्छेशिवाय जिवाला दुसरें कांहीं अस्तित्व असल्याची जाणीवच होत नाहीं–हस्त पादादि अवयवांनीं तें तें कार्य पार पाडावें, जिवाचा अमंल, अधिकार–त्यांच्यावर चालावा, आणि निमेष मात्रांत महत्कार्यें घडून यावींत हेंच ईश्वरानें दिलेलें सामर्थ्य होय. हाच काय तो प्राण्यांमध्यें दिसून येणारा ईश्वराचा अंश.

हा ईश्वरी अंश प्रत्येक प्राणिमात्रांत आहेच, पण तो कमजास्ती प्रमाणानें आहे. कृमिकीटकांत व पशुपक्षांत तो अंश फार कमी प्रमाणानें असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांच्या त्यांच्या जिवांचा इच्छाशक्तीचा अंमल जरी त्यांच्या त्यांच्या अवयावर चालतो, तरी त्यांस हात व वाणी–भाषा–हीं दोन श्रेष्ठ इंद्रियें नसल्यामुळें व त्यांस प्रेरणा करणारी विचारशक्तीही नसल्यामुळें त्यांच्यामध्यें हा ईश्वरी अंश कमी असल्याचें स्पष्टच कळतें.

परंतु मनुष्यमात्रामध्यें हीं साधनें परिपक्क दशेस आलेलीं असल्यामुळें त्यांच्यांत हा ईश्वरी अंश कितीतरी पटीनें अधिक आढळून येतो.

ह्यावरून सामर्थ्य म्हणजे जिवाचें सामर्थ्य. आणि जिवाचें सामर्थ्य म्हणजे इच्छा, अर्थात् इच्छेप्रमाणें होणें ह्यांचें नांव सामर्थ्य. हें सामर्थ्य प्रत्येक प्राण्यामध्यें आहे हें खरें, तरी तें कांहीं एका विशिष्ट प्रमाणांत असतें. मनुष्यालाही तोच नियम लागू. मनुष्यदेहाचे अवयव त्याचे इच्छेवरहुकूम त्याची सर्व कामगिरी बजावतात हेंही खरें आहे; तथापि सारेच अवयव कांहीं त्याचे हुकूमबंदे नाहींत. हात, पाय, तोंड, इत्यादि कांहीं अवयव त्याचे ताबेदार आहेत. ते त्याची म्हणजे त्याच्या इच्छेची आज्ञा तत्काळ पाळतात. परंतु कांहीं अवयव खुद्द त्याच्याच देहाचे असूनही त्याची आज्ञा पाळीत नाहींत. उदाहरणार्थ, जनावरांचे कान त्यांच्या इच्छेप्रमाणें हालतात. परंतु मनुष्यानें कान हालविण्याची इच्छा केली तरी ते हालत नाहींत ! श्वासोश्वास कांहीं कालपर्यंत बंद ठेवूं म्हटलें तर त्यास तो बंद ठेवतां येतो. परंतु हृदयाचें उडणें, नाडी वाहणें ह्या क्रिया त्याला बंद करतां येत नाहींत. ह्यावरून मनुष्याचें किंवा त्याच्या जीवाचें सामर्थ्यही मर्यादित आहे हें उघड आहे. परमेश्वरानें जेवढे अवयव त्याच्या ताब्यांत म्हणून दिले आहेत तेवढ्यावरच त्याची सत्ता चालते, त्याच्याबाहेर त्याची सत्ता चालत नाहीं.

पण त्याच्यांतही एक अद्भुत गुण आहे. तो हा कीं, हें ईश्वरदत्त सामर्थ्य जरी मर्यादित असल्याचें दिसतें, तरी तें कित्येक साधनांनीं अर्थात् सद्गुणांनीं—सदाचारांनीं पाहिजे तितकें वाढवितां येतें ! आणि ह्याच तत्त्वावर ' नराचा नारायण ' होतो. अर्थात् आपल्यांत असलेला ईश्वरी अंश वाढवून कोणताही मनुष्य अवतारी पुरुष होऊं शकतो. 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' अशी एक पूर्वापार चालत आलेली म्हण प्रसिद्धच आहे. म्हणजे जे जे चमत्कार व कार्यें पिंडामध्यें—देहामध्यें—दृष्टोत्पत्तीस येतात, ते ते चमत्कार व तीं तीं कार्यें ब्रह्मांडामध्येंही दृष्टोत्पत्तीस येतात. मनुष्य हा तरी ईश्वर कृतीचेंच अनुकरण करणारा प्राणी आहे. ईश्वरानें डोळा केला, मनुष्यानें लेन्स केला; ईश्वरानें मासा केला, मनुष्यानें त्याच तत्त्वावर नौका केली; देवानें हातपायांचे सांधे केले, मनुष्यानें बिजागऱ्या केल्या; परमात्म्यानें ग्रहमाला घडली, मनुष्यानें घड्याळें सुरूं केलीं; देवानें प्राणी घडविले, मनु-

ष्यानें त्याच्या प्रतिमा तयार केल्या; विधात्यानें शिरा धमन्या केल्या, मनुष्यानें पाण्याचे नळ बांधले; ईश्वरानें विद्युल्लता केली, मनुष्यानें तिचे दिवे लावले; देवानें ज्ञान तंतूंची रचना केली, मनुष्यानें तारायंत्राचें जाळें विणलें. असा हा सारा अनुकरणाचा प्रकार आहे.

मनुष्यांची राज्यव्यवस्था व लोकव्यवहार ह्यामध्यें आणि सृष्टीच्या क्रमामध्येंही असेंच साम्य आहे. कोणी एखादा मनुष्य थोर बुद्धिमान् व अधिकारास पात्र असा दृष्टीस पडला, म्हणजे राजा त्यास प्रथम कांहीं विवक्षित अधिकार व सत्ता देतो, व त्या अधिकाराचा त्यानें सद्व्यय केला; त्यांत चतुराई व हुषारी दाखविली म्हणजे तोच त्याचा अधिकार वाढवितो. तोच धारा परमेश्वराचा. तोही मनुष्याला प्रथमतः कांहीं विवक्षित अधिकार व विवक्षित सामर्थ्य देतों, व त्याचा त्यानें सदुपयोग केला तर तो त्यास त्याहून उच्चपदास चढवून त्याला त्याहूनही मोठा अधिकार व सत्ता देतो. आणि त्यांतही त्याची वाढ व कर्तबगारी दिसून आली म्हणजे त्याहूनही त्यास उच्च प्रतीचा अधिकार देतो. असें होतां होतां कित्येक पुरुष रंकाचे राव झाल्याप्रमाणें ते अगदीं ईश्वरी तेजाच्या जवळ जवळ जाऊन पोंचतात. आणि परशुराम त्र्यंबक कुलकर्णी ज्याप्रमाणें यःकश्चित् कारकून, खर्डे घासणारा असतां आपल्या पराक्रमानें शाहुमहाराजांचा प्रतिनिधी— साक्षात् प्रतिमा बनला, त्याप्रमाणें तोही ईश्वराची साक्षात् प्रतिमाच बनतो. तोच महात्मा, तोच समर्थ व तोच अवतारी पुरुष होय. हा त्याचा उपक्रम अत्यंत मनन करण्यासारखा असून तो अत्यंत मनोरंजकही आहे. म्हणून त्याचें थोडें तरी विवरण केल्यावांचून पुढें जाववत नाहीं.

अशा समर्थ पुरुषाच्या अंगीं येवढें परमेश्वरी सामर्थ्य तरी काय असतें ? त्यास तें कसें प्राप्त होतें ? ह्याचा उहापोह करणें हेंही अत्यंत अवश्य व हितावह आहे. ह्या सामर्थ्यामध्यें भेद व उपभेदही पुष्कळच आहेत. उदाहरणार्थ—१ शक्तिसामर्थ्य, २ भक्तिसामर्थ्य. ३ युक्तिसामर्थ्य. ४ विरक्तिसामर्थ्य. ५ बुद्धिसामर्थ्य. आणि ६ सिद्धिसामर्थ्य. इत्यादि किती तरी प्रकार दिसून येतात.

१ शरीरसामर्थ्य—एखादा अधिकार प्राप्त झाल्यानंतर तो अधिकाधिक

वाढवून घेणें जसें प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेवर व उद्योगशीलतेवर अवलंबून असतें, त्याप्रमाणेंच ईश्वरीसामर्थ्यही वाढवून घेणें मनुष्याच्या स्वाधीन आहे. ह्याचा क्रमशः विचार करूं लागलें तर शक्तिसामर्थ्य किंवा शरीर-सामर्थ्य हें सर्वांत पहिलें होय. ह्याच्याइतकें श्रेष्ठ सामर्थ्य दुसरें कोणतेंच नाहीं. कारण–'**शरीर माद्यं खलुसर्व साधनं**' शरीरसामर्थ्य असेल तर बाकीचीं हवीं तेवढीं साधनें पैदा करतां येतील. तेंच नसेल तर बाकीचीं साधनें पैदा करण्याचा मार्गच खुंटतो. खाण्यापिण्यांत नेमस्तपणा; पौष्टिक अन्न; स्वच्छ हवा; व्यायाम; ब्रह्मचर्य आणि सदाचार ह्यांच्या योगानें शरीरसामर्थ्याची वृद्धि करतां येते. ती इतकी कीं, त्याचें सामर्थ्य पाहून इतर लोक आश्चर्यानें थक्क होतात.

श्रीकृष्णांनीं करांगुलीनें गोवर्धन पर्वत उचलला; मारुतीरायांनीं द्रोणागिरीच्या द्रोणागिरी उचलून आणला; ह्या गोष्टी तर असोतच, पण आलीकडच्या गोष्टी तरी काय कमी आहेत ? सुप्रसिद्ध पाश्चात्य पैलवान् स्यांडो. ह्यानें शिकागोमध्यें लोखंडी पूलच्या पूल हातभर उचलला; सिंहाबरोबर कुस्ती धरली ! प्रोफेसर राममूर्तींनीं भरवेगांत असलेली मोटार टक्कर देऊन थांबविली ! बाबाजी सोनार दोन हातांत शंख धरून त्याचा चूर करी, लोखंडाच्या पहारेचें गळ्याभोंवतीं कडें वळवून तें पुन्हां सरळ करी ! ह्यावरून शरीराची यथायोग्य जोपासना करणारा असला तर त्याचें सामर्थ्यही कल्पनेच्या बाहेर असतें ही गोष्ट सहज सिद्ध होतें.

**दुसरें भक्तिसामर्थ्य**–नारदांनीं भक्तीच्याच बळानें परमेश्वरास आपलासा करून ते त्रिभुवनास वंद्य झाले. प्रल्हादानें तर बाल्यावस्थेंतच भक्तशिरोमणीच्या पदास पोंचून अग्नीला शीतळ केलें; विषाचें अमृत करून सोडलें व भक्तवत्सल प्रभूला खांबांत आणून नरसिंहरूपानें प्रगट केलें ! नामदेवानें पाषाणाच्या मूर्तीला दूध प्यावयास लावलें. पुंडलीकानें पांडुरंगाला युगानुयुगें आणून विटेवर उभा करून ठेवला. अर्जुनानें भगवंताला आपला सारथी केलें. जयदेव कवीच्या पत्नीनें तर पतीस वाघानें खाल्लें ही खोटी बातमी कानावर येतांच तेथल्या तेथें प्राणत्याग केला !

ह्या पौराणिक गोष्टी क्षणभर बाजूस ठेवल्या तरी अर्वाचीन इतिहासांतील स्वामीभक्त तरी सामान्य होते काय ? जीव हा सर्वांसच प्यारा

आहे. तो स्वामीकार्यार्थ अर्पण करणें म्हणजे कांहीं असें तसें औदार्य नव्हे. मनुष्यजन्माचें खरें खरें सार्थक काय तें त्यांतच भरलेलें आहे. स्वार्थाकरितां, पोटाकरितां पुढें पुढें करणारे हवे तितके लोक आढळतील, परंतु अणीबाणीच्या प्रसंगीं तळहातावर शिर घेईल तोच खरा सत्पुरुष होय. मनुष्याच्या अंतःकरणाची परीक्षा त्यांतच असते. चाफाजी टिळेकर श्रीमंतांचा यःकश्चित् हुजऱ्या होता, पण त्याचे वंशज अद्याप इनाम खातातच आहेत. नारायणराव पेशव्यावर आपला देह टाकतांना 'मी मेलों तर मला आपण काय द्याल?' असा त्यानें थोडाच करार करून घेतला होता! बाजीप्रभु देशपांडे रक्तानें उभा न्हाला पण आपला धनी छत्रपति गडावर पोंचेपर्यंत पाऊलभर मागें सरकला नाहीं! सुरक्षित पोंचल्याची तोफ ऐकल्यावर त्यानें आनंदानें प्राण सोडला! तात्पर्य, भक्तीइतकें अद्वितीय सामर्थ्य दुसरें कोणतेंच नाहीं. तिच्या योगानें परमेश्वरसुद्धां बद्ध होतो. मग इतरांची कथा काय?

**तिसरें युक्तिसामर्थ्य**—द्रोणाचार्यांनीं बाण मारून कौरव पांडवांची विहिरींत पडलेली विटी बाहेर काढली, इत्यादि वर्णनें केवळ काल्पनिक व अतिशयोक्तीचीं समजावीं तर थोड्या वर्षांपूर्वीं प्रो० सरतान सिंहांनीं पुण्यपत्तनामध्यें लो० टिळक इत्यादि मंडळींच्या समक्ष बंदुकीच्या गोळीनें विहिरींतील लिंबू वर काढलें! डोळे बांधून त्यांनीं निरनिराळ्या आकाराचे मृत्तिकाघट केवळ शब्दवेधानें फोडले. मग दशरथाचा शब्दवेधच तेवढा काल्पनीक कां समजावा? पृथ्वीराजानें दोन्ही डोळे गेले असतां केवळ शब्दवेधानें सात तवे बाणानें फोडले, व अखेर शाबुद्दिन गोरीनें शब्द उच्चारतांच सज्जावर बाण मारून त्याचें कंठनाळ वेधलें. हा आलीकडच्या इतिहासांतही शब्दवेध नाहीं काय? सरतान सिंहांनीं वर फिरता कागदाचा मासा टांगून तराजूच्या पारड्यांत पाय ठेवून खालीं लहानशा आरशांत पाहून वर गोळी मारली. तोंच त्या माशाच्या डोळ्यांतून स्वच्छ आकाश दिसूं लागलें! द्रौपदीस्वयंवरांतील अर्जुनाच्या मत्स्ययंत्रभेदाचीच ही आज साक्ष नव्हे काय? मत्स्ययंत्रभेदांत अतिशयोक्ति आहे असें म्हणणारांनीं हें पाहून व ऐकून तरी मान खालीं घालावी! फार लांब कशाला? श्रीमंत सयाजीराव महाराज गाइकवाड राज्यावर बसले, त्या समारंभांत एक युरोपि-

यन निशाण मारणारा आलेला होता. त्यानें आपल्या मडमेस पुढें उभी करून तिच्या मस्तकावर दोन बटाटे ठेवले व त्यावर आपलें चारपांच वर्षांचें मूल उभें केलें, आणि दोन्ही माणसें शाबूत ठेवून बंदुकीच्या जोडगोळीनें त्या मुलाच्या पाया खालचे दोन्हीही बटाटे उडविलें असें सांगतात.

हें तर असोच; पण पशूनांच नव्हे तर हिंस्र पशूंना सुद्धां शिकवून त्याना आपले बंदे गुलाम करून ठेवणें हा तरी एक लोकोत्तर चमत्कार नव्हे काय? सिंह वाघासारख्यांचा सभोंवार पाळा पडला असतांही त्यांच्यामध्यें निःशस्त्र उभें राहणें, त्यास फटके मारणें व त्यांच्याकडून कुत्र्याप्रमाणें हवीं तीं कामें करून घेणें हें तरी सामर्थ्य हलकें असें कोण म्हणेल? प्रसिद्ध सर्कसकार प्रो० कार्लेकर किंवा प्रो० परशुरामराव हे बेधडक वाघाच्या व सिंहाच्या पिंजऱ्यांत शिरतात, त्यांस चाबूक मारतात व त्यांच्याकडून पाहिजे तीं कामें करून घेतात. सिंह घोड्यावर बसतो; वाघ बायसिकल चालवितो; हत्ती सोंडेनें बिगुल वाजवितो व शेपटीनें तालावर ढोल बजावतो! हें तर कांहींच नव्हे, पण वाघाला व बकऱ्याला हांक मारतांच तीं दोन्हीही जनावरें विनादिक्कत समोरासमोर येतात व एका पात्रांतील दूध खुशाल पितात! ह्यापेक्षां आधिक सामर्थ्य तें काय राहिलें? ज्या गोष्टी पूर्वी अश्रुतपूर्व वाटत होत्या त्याच आज प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत आहेत.

सर्प म्हणजे किती घातुक व चपळ प्राणी! परंतु तो सुद्धां धरून रात्रंदिवस उशाशीं बाळगून गारुडी लोक त्याच्या लीलेवर पोट भरतात! तुकारामांनीं म्हटलें आहेः—

**साधूनीं बचनाग खाती तोळा तोळा। इतरांतें डोळां न पाहावें॥**
**गारुडी ते सर्प धरिताती हातीं। इतरांना भीती पाहतांना॥**

हें इतकें अद्भुत सामर्थ्य कशानें प्राप्त होतें? ह्याचा सारभूत सिद्धांत त्यांनीं फारच उत्कृष्ट व थोडक्यांत सांगितला आहे. तो कोणता? तरः—

**असाध्य तें साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका म्हणे॥**

ह्या सर्व असाध्य—केवळ अद्भुत वाटणाऱ्या गोष्टी सुद्धां—केवळ अभ्यासानेंच साध्य होण्यासारख्या आहेत. म्हणूनच तुकारामासारखे अनुभवी व सत्यनिष्ठ पुरुष सांगतात कीं, अभ्यासाला दुष्कर असें कांहींच नाहीं.

पाश्चात्य शूर वीर नेपोलियन बोनापार्ट ह्याच्या तोंडीं नेहमीं ह्याच अर्थाची म्हण असे. तो म्हणे "अशक्य हा शब्दच माझ्या कोशांत नाहीं!" खरेंच आहे. अभ्यास केल्यानें साध्य होत नाहीं असें जगामध्यें काय आहे? कांहींच नाहीं. प्रत्येक गोष्टीचा पिच्छा पुरविणारा मनुष्य मात्र पाहिजे.

पण हा गुण आमच्या लोकांमध्यें आजकाल बहुतेक लुप्तप्राय झालेला दिसतो. आणि पाश्चात्य लोकांच्या तो आज बऱ्याच वर्षें हाडीं खिळल्यामुळें विशाल रूपानें दृष्टीस पडतो. लोकोपयोगी यंत्रें तयार करण्यांत त्यांचें जें अप्रतीम कौशल्य दृष्टोत्पत्तीस येतें तें पाहून मन अगदीं थक्क होऊन जातें.

चौथें बुद्धिसामर्थ्य–हजारों खंडी माल, शेकडों माणसें, घटकेघटकेला नियमित वेळीं, नियमित ठिकाणीं अग्नीकडून पोंचविणें, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों पृथ्वीच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत १/२ सेकंदांत संदेश पोंचविणें, कैक मनुष्यांसहवर्तमान पक्ष्याप्रमाणें आकाशस्थ विमानांतून भरारी मारणें ह्या गोष्टी किती बरें अलौकिक आहेत? हें सर्व बुद्धिसामर्थ्य होय.

कित्येकांची स्मरणशक्तीच महाजाज्वल्य असते. तासगांवास एक पाटील होता. त्याला पाढ्यावर काळे सुद्धां करतां येत नव्हतें. तरी तो वर्ग, घन, वर्गमूळ, घनमूळ इत्यादि मोठमोठीं उदाहरणें तोंडानेंच सोडवीं! त्यामुळें तासगांवास जे जे कोणी डे. ए. इन्स्पेक्टर शाळा वगैरे तपासावयास येत ते ते ह्या पाटलांस मुद्दाम बोलावून आणून त्यास पाहिजे तेवढीं लांबलचक उदाहरणें घालीत व तीं तो तोंडानेंच भरभर सांगत असे! नाना सुखात्मे हे तर 'शतावधानी' म्हणून प्रसिद्धच होते. एकीकडे बुद्धिबळाचा व गंजिफांचा डाव चालावयाचा, एकीकडे मोठमोठीं उदाहरणें सोडवावयाचीं, एकीकडे श्लोकांतील मागें पुढें सांगितलेलीं अक्षरें ऐकून घेऊन श्लोक जुळवावयाचा, अशीं ते पाहिजे तितकीं अवधानें चालवीत व अखेर सर्वांचीं उत्तरें बरोबर येत असत.

एकदां हे गृहस्थ नामदार गव्हरनरसाहेब ह्यांच्यापुढें आपले शतावधानाचे प्रयोग करून दाखवीत असतां तेथें पुष्कळ युरोपियन लोक जमले होते. ते दहा दहा पंधरा पंधरा आंकड्यांचीं उदाहरणें घालीत होते, व

कांहीं युरोपियन लोक स्लेटपाट्या घेऊन तीं उदाहरणें सोडवीत होते. सर्व प्रयोग संपल्यावर सुखात्म्यांनीं एक एक लांबलचक संख्येच्या उदाहरणाचें उत्तर सांगण्यास प्रारंभ केला. तों एक स्लेटपाटीवर उदाहरण करीत असलेला साहेब म्हणाला, " ह्यांतील ६ अंक चुकला. येथें ७ यावयास पाहिजेत. " हें ऐकून नाना [ सुखात्मे ] क्षणभर स्तब्ध राहिले आणि थोडा विचार करून म्हणाले, " नाहीं, नाहीं. माझा आंकडा बरोबर आहे. साहेबच करावयास चुकले ! " हें ऐकतांच सर्व मंडळींनीं तें स्लेटपाटीवर केलेलें उदाहरण तपासलें. तों खरोखर साहेबच चुकलेले ! आणि सुखात्म्यांचा ६ आंकडाच बरोबर !

लंदन शहरामध्यें कंबरलंड म्हणून एक साहेब होते. ते दुसऱ्यानें मनांत धरलेला अंक त्याचा हात धरून सांगत असत. एक वेळ पार्लमेंटच्या सभागृहामध्यें ' धूम्रपानाची खोली ' म्हणून एक खाजगी बैठकीची जागा आहे, तेथें कांहीं मंडळीं जमून कंबरलंड साहेबांचे प्रयोग पहात होती. इतक्यांत इंग्लंडचे सुप्रसिद्ध प्रधान ग्ल्याड्स्टनसाहेब अकस्मात त्या खोलींत गेले. प्रधानसाहेबांस पाहतांच सर्व मंडळी उठून उभी राहिली, व त्यांचें त्यांनीं परमादरानें स्वागत केलें. प्रधानसाहेबांनीं विचारलें, " कां ? काय चाललें आहे ?" मंडळी म्हणाली, "हे कंबरलंडसाहेब आलेले आहेत, ते मनकवडे आहेत. त्यांचे कांहीं चमत्कार पहात आहोंत. " दुसरा कोणी म्हणाला, " आपणही मनामध्यें एखादा आंकडा धरावा. " प्रधानसाहेब हंसून म्हणाले, " परंतु माझ्या मनामध्यें त्यांना पाहिजे तसा भोळसरपणा सांपडणार नाहीं." कंबरलंड साहेब म्हणाले, "तें तरी अनुभव घेतल्यावांचून कसें कळणार ? " ग्ल्याड्स्टन साहेब म्हणाले, "बरें का होईना ?" कंबरलंड साहेबांनीं त्यांस एक तीन अंकांची संख्या धरावयास सांगितली. ग्ल्याड्स्टन साहेबांनीं ३६५ हा आंकडा मनांत धरला. नंतर कंबरलंड साहेबांनीं त्यांचा हात आपल्या हातांत धरून सांगितलें कीं " पहिला अंक ३ आहे. " ग्ल्याड्स्टन साहेबांनीं ती गोष्ट मान्य केली. नंतर दुसरा आंकडा कोणता ? म्हणून त्यास प्रश्न केला. तेव्हां ते म्हणाले " दुसरा आंकडा ६. " ती गोष्टही प्रधानसाहेबांनीं मान्य केली. पण त्या योगानें ग्ल्याड्स्टन साहेबांच्या मनांत आश्चर्य उत्पन्न होऊन आतां याच्यापुढें

या गृहस्थास चुकवावयास काय करावें ? अशी त्यांच्या मनांत कल्पना आली. कारण, वर्षांचे दिवस ३६५ असतात हें प्रसिद्धच आहे. तेव्हां ह्यांनीं दोन आंकडे तर बरोबर सांगितले. आतां वरचा एकच अंक राहिला, तो ५ असणें स्वाभाविकच आहे, असें ते धोरणानें ओळखतील. ह्याकरितां आपण ३६५ संख्या आहे तिच्या ऐवजीं ३६६ धरावी म्हणजे झालें. असें म्हणून ते स्वस्थ होते. कंबरलंड साहेबही कांहीं पुढें बोलेनात. तेव्हां ग्ल्याड्स्टन साहेब म्हणाले, "बरें, आतां वरचा तिसरा आंकडा कोणता ? तो सांगावा." कंबरलंड साहेब थोड्याशा विचारांत पडल्यासारखें करून आणखी थांबले. तेव्हां ग्ल्याड्स्टन साहेब त्यांस पुन्हा म्हणाले "कां ? उशीरसा लागला ?" कंबरलंड साहेब म्हणाले "आंकडा ५ कां सहा ? ह्याबद्दल आपल्या मनाचा निश्चय झाला म्हणजे मीही सांगेन. तोंपर्यंत निश्चयानें असें मला कांहींच सांगतां यावयाचें नाहीं." ही मनांतली खूणगांठ पटतांच ग्ल्याड्स्टन साहेब इतके प्रसन्न झाले कीं, त्यांनीं त्यांस एक उत्तम पारितोषिक देऊन त्यांचा मोठा सन्मान केला !

ही गोष्ट केवळ बुद्धिसामर्थ्यामध्येंच घालणें इष्ट नाहीं. कारण, हिचा अंतर्भाव तादात्म्यतेंत—मनाच्या वशीकरणांत—करणेंच योग्य आहे. तथापि तो सुद्धां सामर्थ्याचाच एक भाग असल्यामुळें हीही गोष्ट येथेंच सांगितली आहे.

पाठशक्ति, एकपाठीपणा, शीघ्र कवित्व, वक्तृत्व, बुद्धिबळें, चित्रकला हेही प्रकार बुद्धिकौशल्याचेच आहेत. ह्यामध्येंही कित्येक लोक कल्पनेच्या बाहेर प्रवीण असलेले दृष्टोत्पत्तीस येतात. पदें, क्रम, घन, जटा, वगैरे पाठ करणारे जटापाठी, घनपाठी, एक सोडून एक, दोन सोडून एक, तीन सोडून एक असे पद पाठ म्हणणाऱ्या वैदिकांची पाठशक्ति तरी किती अंजंग होती ! एकपाठीपणाचा चमत्कार तरी काय सामान्य ?

रावसाहेब गोपाळ बळवंत नेने साताऱ्यास डे० ए० इन्स्पेक्टर असतां त्यांनीं एक स्वतःच्या घरची गोष्ट सांगितली होती. ती अशी कीं, त्यांच्या घरीं कोणी एक संन्याशी रामेश्वरास जाण्याकरतां आला होता. हा संन्याशी केवळ शतावधानीच होता असें नाहीं, तर त्याची बुद्धि इतकी अलोट होती कीं, जी भाषा त्याला येत नसे, त्या भाषेंतील एखादा ग्रंथ त्यांस जर कोणी वाचून दाखविला तरी तो त्यांतील एखादें पान सबंद पुन्हां

म्हणून दाखवी ! ह्याचा अनुभव पाहाण्याकरितां एका गृहस्थानें त्यांच्या-पुढें मेकॉलेच्या एसेचें एक पान मोठ्यानें वाचलें. एक दोन मिनिटें इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर त्या संन्याशानें तेंच पान एक अक्षर न चुकतां इंग्रजी भाषेप्रमाणेंच बोलून दाखाविलें ! त्या संन्याशाला इंग्रजी भाषेचा मुळींच कधीं संस्कार झालेला नव्हता, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. पण खरा चमत्कार तो ह्याहून पुढेंच आहे.

तो असा कीं, हेच स्वामी रामेश्वरास जाऊन तिकडील सर्व यात्रा करून सुमारें चार सहा महिन्यांनीं पुन्हा साताऱ्यास परत येऊन रावसाहेब नेन्यांच्या येथेंच उतरले, व तेथें त्यांच्या स्मरणशक्तीबद्दल पुन्हा मंडळीमध्यें गोष्टी निघाल्या. तेव्हां त्यांनीं पूर्वींचेंच मेकॉलेच्या एसेमधील तेंच पान पुन्हां तोंडपाठ म्हणून दाखविलें !! ह्या पाठाशक्तीला व स्मरणशक्तीला काय नांव द्यावें हेंच समजत नाहीं.

पंडित गट्टूलालजीसारखे शीघ्र कवि तरी कोठें दृष्टीस पडतात? ते दोन्ही नेत्रांनीं अंध होते. तरी ते माधवबागेंत भरगच्च विद्वानांच्या समोर व्यास पीठावर बसून बृहस्पतितुल्य भाषण करीत. इतकेंच नव्हे तर दोहों बाजूस दोन लेखक बसवून हव्या त्या वृत्तावरच्या हव्या त्या विषयावर नव्या कविता रचून दोन्हीही लेखकांना सारख्या लिहावयास सांगून पुऱ्या करीत असत ! अशा कविरत्नाला प्रत्यक्ष सरस्वतीनें कालिदासास म्हटलेलें ‘ त्वमेवाहं न संशयः ’ हें वाक्य लावलें तर त्यांत कोणी वावगें म्हणेल काय ? छे ! छे ! कोणीही म्हणणार नाहीं.

वक्तृत्वगुणांचें अनुपमेयत्व जर कोणी अवलोकन केलें असेल तर तें नरसिंहवाडींचे रामभाऊ कवीश्वर ह्यांचें पुराण होय. ह्यांच्यासारखा वक्ता आजपर्यंत झाला नाहीं व पुढें होणारही पण नाहीं, असें म्हटलें तरी सुद्धां कोणास मोडून काढवेलसें वाटत नाहीं. आधीं त्यांच्यांत एक विशेष गुण हा होता कीं, ते पुराणास बसले म्हणजे कोणत्याही पोथीची किंवा ग्रंथाची त्यांस मुळींच गरज नसे. पूजेसाठीं पाहिजे तो ग्रंथ बांधून आणून पुढें ठेवावा. आणि मग भारत, भागवत, रामायण, सप्तशती, गीता ह्यांपैकीं किंवा हव्या त्या ग्रंथांपैकीं हवें तें कथानक सांगून देण्याचा अवकाश कीं, पुराणाला सुरवात झालीच ! एका श्लोकाचा अर्थ संपला कीं, दुसरा.

दुसरा संपला कीं तिसरा. जणों काय सारा ग्रंथ पुढें उघडलेलाच आहे ! अशा रीतीनें त्यांस एकामागें एक श्लोक आठवत असत ! आणि वाणी म्हणजे तर काय शुद्ध अमृत ! तिला दुसरी उपमाच नाहीं. उत्प्रेक्षा, अलंकार सर्व कांहीं तींत गुंफलेलें असे. शब्दरचना इतकी कोमल व रसभरित असे कीं, तिच्यापुढें कादंबरीकार, नाटककार, किंवा कवीही कधीं टिकाव धरूं शकणार नाहीं अभिमन्यूचें वर्णन ऐकून चितार्‍यानें त्याची तसबीर काढावी. त्यांचें वीरश्रीचें भाषण कानीं पडतांच काडी पैलवानाचे सुद्धां बाहू फुरफुरूं लागत. कीचकाचा लघळपणा पाहून इष्कीबाज लोक आनंद सागरात हेलकावे खात आणि सैरंध्रीनें केलेली निर्भत्सना श्रवण केली म्हणजे संतापानें त्यांचा चेहरा लाल होत असे. ह्या अश्रुतपूर्व वक्तृत्वाचें वर्णन कोण व किती करणार ? बोलतां हें सर्वांसच येतें. परंतु अशी रसाळ अस्खलित वाणी आणि असें अद्वितीय पांठांतरसामर्थ्य अंगीं असणें हा केवळ ईश्वरी प्रभावच होय.

आणखी अशींच बुद्धिसामर्थ्याची एक दोन अनुपम उदाहरणें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. त्यांपैकीं पहिलें म्हणजे श्रीमंत गाइकवाड सरकारच्या पदरीं वंशपरंपरेनें असलेले माधवराव बुद्धिबळे हे होत. हें बुद्धिबळक्रीडेच्या कामांत इतके प्रवीण आहेत कीं, त्याला दुसरी तोडच नाहीं. राजे सर टी. माधवराव, राव० विनायक जनार्दन कीर्तने, राव० अबासाहेब भाटवडेकर, राव० रामभाऊ देशमुख, श्रीमंत भाऊसाहेब मुजुमदार वगैरे मंडळींत ते खेळावयास बसले म्हणजे मंडळींनीं त्यांच्या भोंवतीं अगदीं काहूर करून सोडावयाचें ! तें इतकें कीं, प्रथमपासूनच त्यांचा वजीर काढून टाकावयाचा ! तरी ते त्याबद्दल कांहीं कुरकुरत नसत. तसेच मुकाट्यानें खेळूं लागत. पण कांहीं केलें तरी शेवटीं त्यांची प्यादी कांहीं कधीं चुकत नसे ! माजी कलेक्टर व हल्लीं पेन्शनर श्री. आप्पासाहेब देशमुख ह्यांनीं त्यांस एक जर्मनींतील प्रख्यात बुद्धिबळ क्रीडनपटु लिली ह्याचा २५०० पौंड बक्षिसाचा डाव घातला होता. तो त्यांनीं जेवतां जेवतांच घातल्याबरोबर सोडविला ! जणों काय त्याचें उत्तर लिलीनेंच येऊन त्यांच्या कानांत सांगितलें ! आणखी ह्या डावांत मोहरींही कांहीं कमी होतीं अशांतला अर्थ नाहीं.

दहा पांचाच्यावर मोहरीं होतीं. अर्थात् दहापांच डाव त्यांत निरनिराळ्या रीतीनें विचार करण्यासारखें होते. हे सर्व खेळ बुद्धिसामर्थ्याचे होत.

ह्याच्या पुढचें सामर्थ्य म्हणजे **विरक्तिसामर्थ्य**—येथपर्यंत जीं सामर्थ्यें सांगितलीं तीं युक्तीचीं, अभ्यासाचीं, व बुद्धिचातुर्याचीं होतीं. परंतु विरक्तिसामर्थ्याचा प्रकार ह्याहून फार वेगळा आहे. विरक्तिसामर्थ्य म्हणजे तपःसामर्थ्य. तपःसामर्थ्य ह्याचा अर्थ आपल्या देशांतील व आपल्या धर्मांतील लोक थोडासा निराळा समजतात. म्हणजे पंचाग्नि साधन वगैरे हठयोगाचे जे प्रकार आहेत, त्यांचाही त्यांत समावेश करतात. पण तो समज चुकीचा आहे. जो मनुष्य खराखुरा विरक्त असतो, निस्पृह असतो, स्वार्थत्यागी असतो, तो आपला देह स्वसंतोषानेंच झिजवीत असतो. त्याला आणखी निराळ्या साधनाचें खरोखर कांहीं कारणच उरत नाहीं.

विरक्तपणा म्हणजे तरी काय ! तो कसा असतो ? विरक्तपणा म्हणजे संसाराच्या उपाधीचा त्याग करणें. सामान्यपणें मनुष्याची प्रवृत्ति आपआपल्या सुखाकडे असते. चांगलें चांगलें खावयाला प्यावयाला, ल्यायला नेसायला आपल्याला हवें. सुंदर स्त्री असावी; मुलेंबाळें असावींत, मुबलक पैसा मिळवावा; आणि यथेच्छ संसारसुख भोगावें हेंच कायतें जन्माचें सार्थक असेंच बहुधा प्रत्येकास वाटत असतें. परंतु विरक्त मनुष्याची प्रवृत्ति व समजूत मात्र ह्याच्या अगदीं उलट असते. सुग्रासान्नाची गरज नाहीं, वस्त्राभूषणांची अपेक्षा नाहीं, घरदाराची पर्वा नाहीं, संसार हा सर्व व्यापाचें व उपाधीचें मूळ, ह्याकरितां तो त्यांना मुळीच नको असतो. म्हणून ते मुळापासूनच गृहस्थाश्रमाच्या भरीसच पडत नाहींत. स्त्रीचा संबंधच ठेवीत नाहींत. सुखाचें सर्वस्व म्हणून जें काय आहे तें संसारांत आहे, असें मनुष्यास सकृद्दर्शनीं वाटत असतें. पण तो निवळ भ्रम असतो. विवेकी लोक त्यांतील तत्त्व ओळखून असतात. श्री समर्थ रामदास स्वामींनीं आपल्या दासबोधांत मूर्खाच्या व पढत मूर्खाच्या लक्षणाचे दोन निरनिराळे समासच घातले आहेत. त्यांत अमुक अमुक करतो तो एक मुर्ख, तमुक करतो तो एक मूर्ख, अशी परंपरा सांगतां सांगतां अखेरचा सिद्धांत सांगितला आहे कीं हे सारे मूर्ख झाले. आतां ह्या सर्वांत मूर्खांचा शिरोमणी कोण ? किंवा मूर्खांचा राजा कोण ?

तरः—

**मूर्खांमाजी परम मूर्ख । जो संसारीं मानी सुख ॥**
**संसारदुःखायेवढें दुःख । आणीक नाहीं ॥ ?**

ह्यावरून संसारांत सुख तर नाहींच पण उलट अपरंपार दुःख मात्र भरलेलें आहे. ही गोष्ट संसारांत बऱ्याच दिवस गटकळ्या खाल्यानंतर विषयलोलुप मनुष्याला कळूं लागते. व मग तो पश्चात्तापांत पडून मोठ्या कष्टानें अखेर संन्यासवृत्ति धारण करतो किंवा विरक्त बनून देशोधडीस लागतो ! पण 'बैल गेल्यावर मग झोपा लावण्यांत' अर्थ काय ? अगदीं मरणोन्मुख मनुष्य होऊन घटके दोन घटकेचा सोबती झाला म्हणजे त्यास उठून बसवितात, स्नान घालतात, भगवे कपडे देऊन हातांत दंड देतात ! अशीही कोठें कोठें चाल दृष्टीस पडते ! ही संन्यासाची दीक्षा कीं संन्यासाची थट्टा ?

परंतु कित्येक पुरुष असे असतात कीं, ते जन्माचेच संन्यासी; जन्माचेच विरक्त; जन्माचेच निःसंग. असे पुरुष केवळ लोकोत्तर होत. त त्यांच्या पूर्वजन्मार्जिताचें फल असतें. ही वृत्ति सामान्य मनुष्यांना कधींही प्राप्त होणें नाहीं. मला चांगलें आंगडें टोपडें नको; मला दागदागिने नकोत; असें एका तरी समंजस मुलास वाटतें काय ? बारा वर्षांचें वय होतें न होतें तोंच आपलें लग्न व्हावें; आपण नवरदेव सजावें; आपल्यास बायको यावी अशी कोणत्या मुलाला हौस वाटत नाहीं ? परंतु चमत्काराची गोष्ट अशी आहे कीं, कित्येक पुरुष जन्मापासूनच विरक्त असतात. त्यांना स्वतःच्या सुखाची मुळींच अपेक्षा नसते. 'वसुधैव कुटुंबकम्' हाच त्यांचा बाणा; हेंच त्यांचें व्रत; तीच त्यांची उपासना. त्यांना स्वतःला कुटुंब नाहीं. जग हेंच त्यांचें कुटुंब. त्यांना संसार नाहीं; साऱ्या जगाचा संसार तोच त्यांचा संसार. ते स्वतःच्या सुखाकरितां कोणताच व्याप करीत नाहींत. देह चालण्याकरितां जो ते व्याप करितात तो फारच अल्प असतो. पण जनाच्या सुखाकरितां ते पाहिजे तितका व्याप करण्यास तयार असतात. स्वतःच्या सुखानें त्यांना आनंद होत नाहीं. पण जनाचें सुख पाहिलें कीं, तें आनंदानें डुलत राहतात. जनाच्या सुखापुढें आपलें सुख त्यांना तुच्छ वाटतें. ह्या स्थितीचें वर्णन तुकारामांनीं फार उत्कृष्ट केलें आहे.

पद.

**मागणें लइ नाहीं लइ नाहीं। पोटा पुरतें देई ॥ धृ०**
**भाकर ताजी अथवा शिळी।**
**देवा द्यावी भुकेच्या वेळीं ॥ मागणें० ॥ १ ॥**

किंवा:—दुसरें पद.:—

**अशाश्वत संग्रह कोण करी॥ धृ० ॥**
**चिरगुट चिंध्या जोडुनी कंथा।**
**गोदडी हेचि बरी ॥ अशा० ॥ १ ॥**
**कोण बांधी घर सोपे माड्या।**
**विवरीं वस्ती बरी ॥ अशा० ॥ २ ॥**

असे विरक्त पुरुष हेच खरे समर्थ होत. असे पुरुष उत्पन्न झाल्यावांचून समाजाची कधींच घडी बसावयाची नाहीं. 'एक भिक्षापति कीं, एक लक्षापति' ही जी म्हण आहे तीच खरी आहे. लक्षाधीश जसा समर्थ असतो, तसाच भिक्षापतीही समर्थच असतो. कारण त्याला कशाचीच गरज नसते. म्हणून तोही समर्थच होय. मग तो लक्षाधीशाची हांजी हांजी तरी करील कशाला?

अलेक्झांडर धि ग्रेट ज्याला शिकंदरबादशहा असें म्हणतात, त्याच्या वेळीं 'डायजेनीस' म्हणून एक मोठा विरक्त तत्त्वज्ञानी पुरुष होता. त्याच्याजवळ एक मोडकें तोडकें पीप असून त्यांतच तो नेहेमीं राहत असे. कमरेला एक दोरखंड बांधी, व कौपीन लावून फिरत असे. कोठेंही जावयाचें झालें कीं, गोगलगाईच्या शंखाप्रमाणें त्याचें तें पीप नेहेमीं त्याच्या पाठीशीं असे. हा मनुष्य भिक्षा मागून निर्वाह करी. आणि शिळी ताजी भाकर मिळे तेवढ्यांतच तृप्त असे. रस्त्यांतील चिंध्या किंवा पाला पाचोळा वगैरे जमा करून त्या पिपांतच आपली शय्या तयार करी आणि रात्रंदिवस जनास ज्ञानोपदेशाचें काम करीत असे. हा त्याचा लौकिक श्रवण करून खुद्द शिकंदरबादशहा स्वतः त्यास एके दिवशीं सकाळीं भेटावयास आला. तेव्हां डायजेनीस हा आपल्या आडवें ठेवलेल्या पिपाच्या तोंडांत बसला होता, व सकाळचें ऊन घेत होता. बादशहा त्याच्याजवळ जाऊन

उभा राहिला, व त्याच्या सेवकांनीं शिकंदरबादशहाची स्वारी भेटावयास आल्याचें त्यास कळविलें. तेव्हां थोडेसें हास्य करून त्यानें आपली मान डोलविली. उभयतांमध्यें थोडेसें हिकडचें तिकडचें भाषण झाल्यानंतर बादशहानें त्यास विनंति केली कीं, " आपणास काय पाहिजे आहे तें कळवावें. म्हणजे तें मी देण्यास तयार आहे. " डायजेनीस थोडेसें हास्य करून म्हणाला " आपण जरा बाजूस होऊन आमचें बंद झालेलें उन्ह तेवढें पुन्हा आम्हास द्या म्हणजे झालें! दुसरें कांहीं नको. " शिकंदरबादशहा ह्या मागणीनें किती खजिल झाला असेल हें सांगणें नकोच. ज्यांना दुसऱ्यापासून कांहीं मिळविण्याची आशा असते ते त्याची हांजी हांजी करतात; त्याला भिऊन वागतात; परंतु ज्यांना काडीचीही अपेक्षा नसते ते त्याची हांजी हांजी करीत नाहींत व त्याला भीतिही नाहींत. उघडच आहे. जो चोर असेल त्याला पोलिसाचें भय. जो सभ्य आहे तो पोलिसाला भितो थोडाच ! उलट पोलिसानांच त्याला नमून वागावें लागतें. हाच प्रकार निस्पृह विरक्तांमध्यें व राजेलोकांमध्यें असलेला दृष्टीस पडतो.

परंतु कितीएक लोक अशीही शंका घेतील कीं, देह आहे तावत्कालपर्यंत मनुष्याला कांहींना कांहींतरी गरज ही लागणारच. मुळींच गरज नाहीं असें होईल कसें ? मुळींच गरज नाहीं म्हटलें तर देहच मुळीं चालणार नाहीं. मग विरक्तपणा तरी धरतां येणार कसा ? परंतु विरक्ति म्हणजे सारे देहधर्मच सोडून देणें असा कांहीं त्याचा अर्थ नाहीं. तर देहाला जितक्या कमी गरजा लागतील तितक्या काटकसरीनें रहावयाचें ह्याचेंच नांव विरक्ति. एक वेळ जाडें भरडें तरी अन्न खावायास पाहिजे, व कंथा कौपीन तरी आच्छादनास पाहिजे. केवढाही विरक्त असला तरी त्याला इतकें लागतेंच लागतें. पण यापेक्षां अधिक व्याप तो कधीं वाढवीत नाहीं. यामुळें लोकोपयोगी कामाकडे तो आपला देह झिजविण्यास नेहेमीं तयार असतो. त्याचें अन्नाच्छादन केवळ उदरपूर्तीपुरतेंच असल्यामुळें तें त्याला परमेश्वर सहजासहजीं देतो. त्याकरितां त्याला कोणाचेंही अंकित होण्याची पाळी येत नाहीं, व कधीं त्याबद्दल चिंताही वहावी लागत नाहीं. म्हणून तो स्वभावगत्याच तेजस्वी असतो.

सर्व पातकाचें मूळ काय तो एक स्वार्थ. तोच नष्टप्राय झाला म्हणजे

सत्य, दया, क्षमा, शांति, समबुद्धि, विवेक हींच त्याच्या सान्निध्याला असतात. त्यामुळें त्याला परब्रह्माचें म्हणजे ईश्वराचेंच सारूप्य येत चाललेलें असतें, व त्यामुळेंच तो सर्वसमर्थ होतो.

सत्य हें सर्वांस प्रिय वाटतें; मनाला कळतें; पण तें सर्व ठिकाणीं बोलून मात्र दाखवितां येत नाहीं. कारण जेथें तेथें स्वार्थच आड येत असतो. पण ज्याला स्वार्थाची पर्वा नसते, तो पुरुष मात्र बेधडक सत्याला अनुसरून बोलतो. कारण आपलें काडीइतकेंही नुकसान होण्याची भीति नाहीं इतका त्याच्या मनाला धीर असतो.

कित्येक लोक प्रपंच करूनही विरक्त असतात. तुकाराम महाराज हे महा साधु पट्टीचे विरक्त असून प्रापंचिकच होते. त्यांनीं आपल्या धर्म पत्नीचें एकच लुगडें असतां, व तें ती बाहेर ठेवून स्नान करीत असतां त्यांनीं तें एका अनाथ स्त्रीला देऊन टाकलें ! शिवाजी महाराजांनीं गुप्त-रीतीनें नवसाची गोणी म्हणून बाजरी आणून टाकली असतां त्यांनीं त्यांतील शेरभर बाजरी ठेऊन घेऊन बाकीची बाजरी गोरगरिबांस वांटून टाकली! जेमतेम एका दिवसाची बेगमी घरांत ठेवावयाची, दुसऱ्या दिवसाची काळजी त्यांनीं कधीं केलीच नाहीं.

इतकी त्यांची निष्कांचन वृत्ति होती ! शिवाजी महाराजांनीं मोहरा पुतळ्यांनीं भरलेलें ताट त्यांच्यापुढें ठेवलें तें त्यांनीं 'आम्हांस गोमांसा' समान असें सांगून उधळून टाकलें ! इतके ते विरक्त होते म्हणूनच परमेश्वर त्याचा योगक्षेम चालवीत होता.

छत्रपति शिवाजी महाराजासारखा आत्मप्रभुही त्यांच्या कीर्तीस लुब्ध होऊन त्यांस 'दिवटी, छत्री, घोडे' पाठवून सन्मानानें बोलावणें पाठ-विलें असतां त्यांनीं त्यास किती निस्पृहपणाचें उत्तर पाठविलें तें पहाः—

**तुम्हापाशीं आम्ही येवोनी काय। वृथा शीण आहे चालण्याचा॥**
**मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर। निद्रेसि तो थार पाषाणाचा ॥**

त्यांत 'दर्शनांची फार उत्कंठा लागली आहे.' असे छत्रपतींनीं लिहिलें होतें. त्यावर ते सांगतातः—

**रोड हात पाय दिसे अवकळा। काय तो सोहळा दर्शनाचा ॥**

आतां इतक्याही उपर आपल्या सारख्या प्रभूच्या आमंत्रणाचा अव्हेर केला म्हणून आपल्यास रागबीग येईल तरः—

**ऐकोनी मानाल उदासता जरी। तरी मज हरी उपेक्षीना ॥**

आपणास माझा राग आला तरी परमेश्वर कांहीं माझी उपेक्षा करणार नाहीं. डायजेनिसच्या उत्तरांत व तुकाराम महाराजांच्या उत्तरांत काय बरें अंतर आहे ? इतकें निस्पृहपणाचें उत्तर विरक्तावांचून इतरांच्यानें देववेल काय ? यावरून ' निस्पृहस्य तृणं जगत् ' असें जें म्हटलें आहे तें कांहीं खोटें नव्हे.

अशी तुकारामांच्या अंगीं विरक्ति होती, म्हणूनच त्यांनीं आपल्या सामर्थ्यानें कीर्तनामध्यें;—

**' अशक्य तें काय तुम्हा नारायणा। निर्जिवा चेतना आणावया. '**
ह्या अभंगाचें भजन करून तेलणीचें मूल जिवंत केलें, आणि रामेश्वर भट्टाच्या आंगाचा दाहा शमन केला!

' कीर्तनांतून उठून जाऊं नये ' असें सांगून छत्रपतींचें महत्संकटांतून संरक्षण करणें हा अधिकार; ' अशक्य तें काय ' असें भगवंतास आळवून मृत बालक जिवंत करणें हें सामर्थ्य; मंमाजीबावानें रक्त फुटेपर्यंत काठ्यांनीं मारलें असतांही त्याचे पाय चेपावयाचे ही शांति; रामेश्वर भटाच्या अंगाचा दाह क्षणार्धांत कमी केला ही क्षमा; अशा सत्पुरुषाच्या वाणीला ' वेदवाणी ' म्हटलें व त्यास पांडुरंगानें विमान पाठवून सदेह वैकुंठास नेलें तर त्यांत नवल तें काय?

श्रीमंत पेशव्यांच्या पदरीं रामशास्त्री प्रभुणे हे मुख्य न्यायाधीश होते. श्रीमंतांचे मुख्य न्यायाधीश म्हणजे हल्लींच्या हायकोर्टाचे चीफ जस्टिस होते! पण त्यांचा पगार किती? हजार कीं पांच हजार? छे छे! नांव कशाला घेतां ? फक्त सहा मनुष्यांचा रोजचा शिधा आणि नवराबायकोची वर्षांचीं जाडीं भरडीं सहा वस्त्रें! आटपला कारभार! एकदां श्रीमंतांच्या वाड्यांतून हळदी कुंकवासाठीं शास्त्रीबुवाच्या कुटुंबास पालखी आली. बाई नेहेमीप्रमाणें सुताडा नेसून गळ्यांत मणीमंगळसूत्र घालून वाड्यांत

गेल्या. श्रीमंत माधवरावांचें कुटुंब सौ० रमाबाई साहेब यांस ही शास्त्रीबुवांच्या कुटुंबाची स्थिति पाहून कींव आली, व त्यांनीं एक भरजरीचा शालू आणून त्यांस नेसावयास दिला. व सोन्या मोत्यांचीं अलंकार भूषणेंही त्या बरोबरच त्यांस अर्पण केलीं. त्या 'नको नकोच' म्हणत होत्या, परंतु सौ० रमाबाई कांहीं केल्या ऐकेनात. त्यामुळें त्यांची भीड मोडणेंही बाईच्या जिवावर आलें. अखेर शास्त्रीबुवांचें कुटुंब तसाच तो शालू नेसून व ते अलंकार अंगावर घालून पालखींत बसून आपल्या घरीं आल्या. शास्त्रीबुवांनीं दुरून त्यांस पाहतांच भोयांस विचारलें, "अरे ही कोणाची बायको येथें आणलीत ? ही आमची बायको नव्हे. चला उचला. आमची खरी बायको असेल तीच आमच्या घरीं आणा." त्यांची पत्नीही मोठी समंजस व थोर मनाची होती. ती मनांत उमजली व तिनें ते सर्व अलंकार व शालू वाड्यांत परत पाठवून दिला !

शास्त्रीबुवा इतके कडकडीत विरक्त होते म्हणूनच त्यांनीं राघोबा दादांच्या तोंडावर यथायोग्य व स्पष्ट न्याय दिला. नारायणरावांचा वध झाल्यानंतर त्या दुष्कृत्याबद्दल लोकांनीं दादांचें अगदीं कपाळ उठवून सोडलें. तेव्हां आपणावर आलेल्या ह्या किटाळांतून मुक्त होण्याकरितां प्रायश्चित्त तरी घ्यावें असें मनांत आणून त्यांनीं एके दिवशीं शास्त्रीबुवांस प्रश्न केला कीं "शास्त्रीबुवा ! नारायणराव मारला गेला. त्यास कांहीं मीं मारलें नाहीं. तथापि माझ्यावर जनापवाद आला आहे, त्याला कांहीं तरी प्रायश्चित्त देऊन माझी त्यांतून मुक्तता करा." शास्त्रीबुवा म्हणाले, "ठीक आहे, ग्रंथ वगैरे पाहून उद्यां दुपारीं काय तें सांगूं." असें सांगून घरीं गेले व दुसऱ्या दिवशीं आपलीं सर्व बायकामुलें काशीयात्रेस रवाना करून एकटेच दरबारांत गेले. त्यांस श्रीमंत दादासाहेब पेशव्यांनीं तोच प्रश्न पुन्हा विचारला. तेव्हां शास्त्रीबुवा म्हणाले "त्याला देहांत प्रायश्चित्तावांचून दुसरें कोणतेंच प्रायश्चित्त नाहीं." ह्यावर दादासाहेब क्रुद्ध मुद्रेनें कांहीं बोलणार तोंच शास्त्रीबुवांनीं दादासाहेबांस सांगितलें कीं "श्रीमंतांनीं अधिक तसदी घेण्याचें प्रयोजन नाहीं. मी घरच्या सर्व मंडळींची महायात्रेस रवानगी करून देऊन श्रीमंतांचा शेवटचाच निरोप घेण्यास आलों आहे." इतकें बोलून त्यांनीं तडक आपला मार्ग धरला ! असा

लोकोत्तर पुरुष कोठें पाहण्यांत आहे काय ? शास्त्रीबुवांची ती नोकरी नव्हे. ती निखालस तपश्चर्याच होय. तिला नोकरी कोण म्हणेल ?

ह्या सर्व गोष्टी विरक्तांच्या झाल्या खऱ्या, पण ह्याहूनही उच्च प्रतीचे किंवा उच्च कोटींतील विरक्त असतात. ते जन्मसिद्ध विरक्त होत. उदाहरणार्थ आद्य श्रीमच्छंकराचार्य. ह्यांना तिसऱ्या वर्षांत लेखनवाचनाची विद्या प्राप्त झाली. चौथ्या वर्षी संस्कृत भाषा वगैरे अवगत झाली. पांचव्या वर्षी प्रतबंध होऊन वेदोपनिषदें करतलमलवत् झालीं. आठव्या वर्षी त्यांच्या अनाथ मातुश्री त्यांच्या लग्नाचा विचार करीत असतां कालडींतील पूर्णानदीमध्यें पोहावयास जाऊन नक्रानें धरल्याचें निमित्त केलें. व " आई धांव ! " म्हणून मोठ्यानें ओरडले. बिचारी आई स्वयंपाक करतां करतां घाबरून बाहेर आली, व तिनें मोठ्या दुःखानें हंबरडा फोडला. तेव्हां ते म्हणाले " तूं जर मला संन्यास घ्यावयास आज्ञा देशील तर हा नक्र माझा पाय सोडील. नाहींतर मी वांचत नाहीं. " बिचारी माउली. काय करते ? " बाबा घे संन्यास; पण खुशालपणें एकदां बाहेर नीघ, " असें म्हणतांच नक्र नाहींसा झाला ! स्वारी तीरास येऊन पोंचली. नवव्या वर्षी संन्यास ग्रहण करून त्यांनीं श्रृंगेरीच्या आद्यमठाची स्थापना केली. मंडणमिश्रासारख्या धेंडाशीं वाद करून त्यास हार आणून त्याचें मुंडण करून त्यास आपला शिष्य बनविलें. काश्मीरच्या शारदापीठावर आरोहण करून ३२ व्या वर्षीं आपला अवतारही संपविला !

आचार्यांसारखें वैराग्य दुसरें कोठें आढळणार ? विद्वत्ता किती अलोट ? कविता किती रसाळ आणि प्रासादिक ? केवळ देववाणी ! वादाची हातोटी काय ? आणि आसेतुहिमाचल दिग्विजय केला २२ वर्षांत ! ह्या गोष्टी अन्य जन्मीच्या संस्कारावांचून घडणें कधीं तरी शक्य आहे काय ? पूर्वार्जितावर ज्यांचा विश्वास नसेल, त्यांच्याशीं वादविवाद करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि त्यांनीं आचार्यांच्या चरित्राचें मनन केल्यास त्यांचा ग्रह खचित पालटेल येवढें खात्रीनें सांगतां येतें.

ह्याच जोडीची विरक्ति प्रत्यक्ष श्रीसमर्थांचीच होय. समर्थ म्हणजे कोण ? हें आज काल महाराष्ट्रीयांना तरी खास सांगणें नको. श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराजांचे गुरु रामदासस्वामी ह्यांचें प्रसिद्ध नांव ' समर्थ ' असें होतें.

आणि दिलें कोणी ? तर प्रत्यक्ष त्या वेळच्या साधुश्रेष्ठ स्वामी पंचायतनापैकीं चौकडीनें ! तेव्हां 'समर्थ' ही पदवी सामान्य नव्हे; खरी खरी आहे. ५।१० वर्षांच्या अभ्यासानें हल्लीं बी. ए., एम्. ए. सारख्या पदव्या मिळतात, त्या सुद्धां जर श्रेष्ठ मानल्या जातात तर ही 'समर्थ' पदवी स्वामीसारख्या श्रेष्ठ पुरुषांनीं व श्रीमच्छत्रपतींनीं दिलेली आहे. तेव्हां ती किती यथार्थ असेल याचा वाचकांनींच विचार करावा. त्यांचें सामर्थ्य व लीलानुग्रह सांगण्याचेंच ह्या ग्रंथाचें ध्येय असल्यामुळें, ते समर्थ तर ह्या ग्रंथातील प्रधान दैवत होय, हें सांगणें नकोच. त्यांचें सारें चरित्र पुढें येणारच आहे. तथापि येथें ओघानुसार त्यांची विरक्तता मात्र सांगावयाची आहे.

श्रीसमर्थ रामदास स्वामी हे जन्मापासूनच विरक्त होते. त्यांना लग्नही करावयाचें नव्हतें, व संसारांतही पडावयाचें नव्हतें. परंतु आईचा जीव वेडा. तिला राहवेना व त्यांचें 'नको' म्हणणें आवडेना. तिनें त्यांस विनविले कीं "नारायणा ! तूं निदान अंतरपाट धरीपर्यंत तरी नको म्हणू नको." नारायणानें [ रामदास स्वामींनीं ] ती आईची आज्ञा अक्षरशः मान्य केली ! म्हणजे त्यापुढें कोणी लग्नाची गोष्ट काढली तर 'नको' म्हणावयाचें सोडून दिलें. मग काय ? मुलगा वळतीवर आला म्हणून लग्न ठरविलें. मुहूर्त धरला; नवरानवरी बहुल्यावर आणून उभीं केलीं. उपाध्ये बुवांनीं अंतरपाट धरला व 'शुभमंगल सावधान' सुद्धां म्हटलें ! समर्थ मनांतल्या मनांत हंसत होते. ते आपणापाशींच म्हणाले 'खुळ्यांनो ! मी तर जन्मापासून सावधच आहे. मला तुम्ही पुन्हा 'सावधान ! सावधान !' म्हणून कशाला बजावता ?' असें म्हणून तेथून जे पळत सुटले ते पार नाहींसे झाले ! कशाचें लग्न, कशाचें वऱ्हाडी आणि कशाचा सोहाळा ! साराच विचित्र गोंधळ माजून राहिला.

समर्थ तेथून जे निघाले ते नाशीक पंचवटीजवळ टाकळीच्या वाटेवर एका झाडाच्या ढोलींत जाऊन राहिले. भगवीं वस्त्रें धारण केलीं, कौपीन घातली व जटा वाढविल्या. दररोज प्रातःकाळीं गोदावरीमध्यें जाऊन पाण्यांत उभे राहून सूर्योदयापर्यंत गायत्रीपुरश्चरण करीत असावें. पाण्यांत उभें राहून पाय कुजत, मासे तोडीत तरी त्याची त्यांनीं क्षिति ठेवली नाहीं. दोन प्रहरीं मधुकरी मागून आणावी आणि त्या ढोलींत नैवेद्य समर्पण

करावा आणि मग अन्न ग्रहण करावें. अशी १२ वर्षें कडकडीत तपश्चर्या केली. नंतर हिमलयावर आरोहण करून तेथें श्वेत मारुतीची स्थापना करून चार धामांची यात्रा केली. आणि मग केवळ वनचर वृत्तीनें कृष्णातीरीं वास्तव्य केलें. रानावनांत हिंडावें, भिक्षा मागावी आणि श्रीरामचंद्राची उपासना वाढवावी. कोणी शरण आल्यास त्यास अनुग्रह द्यावा. त्यांच्या तपःप्रभावानें जयरामस्वामी, केशवस्वामी, रंगनाथस्वामी व आनंदमूर्ति, वामनपंडित इत्यादि महान् महान् साधु व भगवद्भक्त त्यांच्या चरणीं लीन झाले. होतां होतां त्यांची कीर्ति श्रीमच्छत्रपतींच्या कानापर्यंत गेली. त्यांनीं त्यांचें दर्शन घेऊन अनुग्रह घेतला.

हें तर असोच; पण यापुढें एके दिवशीं समर्थांची स्वारी साताऱ्याच्या राजवाड्यांत भिक्षेस येऊन ‘ जयजयरघुवीरसमर्थ ’ अशी गर्जना करतांच शिवाजी महाराजांचा कंठ भरून आला. त्यांच्या नेत्रांत आनंदाश्रु भरले. व मनांत आलें कीं ‘ हाय हाय ! येवढे प्रत्यक्ष महानुभव समर्थ माझ्या घरीं भिक्षेस आले! तेव्हां आतां यांना कोणती बरें भिक्षा घालावी? ह्यांच्यावरून सारें राज्यही ओंवाळून टाकावें. ’ असा विचार मनांत घोळूं लागला. त्यासरशीं त्यांनीं चिटणिसास हांक मारून ‘ सर्व राज्य समर्थचरणीं अर्पण ’ असें दानपत्र लिहून त्यावर शिक्कामोर्तब करून ती चिठ्ठी स्वहस्तें नेऊन समर्थांच्या झोळींत टाकली ! समर्थ म्हणजे काय ? मूर्तिमंत समर्थच ते ! निरंतरचे त्रिकालज्ञ. त्यांस त्या कागदांत काय असावें तें कळलें नसेल काय ? असें कसें होईल ? तें तर त्यांनीं तत्काळ जाणलेंच. तथापि थोडें हास्य करून विनोदानें बोलले “ काय शिवबा ! आज ही कागदाची भिक्षा कसली घातलीत ? मूठ पसा दाणे असते किंवा पीठ असतें तर आम्ही एखादा पानगा भाजून श्रीला नैवेद्य तरी केला असता ! आज तुम्ही आम्हाला ह्या कागदाच्या तुकड्यावरच बोळवितां कीं काय ? ” शिवाजी महाराज हात जोडून म्हणाले “ तसें कांहीं नाहीं. समर्थ त्रिकालज्ञच आहेत, तथापि वाचून दाखविण्याची आज्ञा व्हावी म्हणजे समजेल. ” समर्थांनीं कल्याणाकडून कागद बाहेर काढून वाचावयास सांगितला. तों त्यांत श्रीसमर्थचरणीं मिळविलेलें सर्व राज्य अर्पण केल्याची सनद ! तें ऐकून समर्थ पुन्हा हंसले आणि म्हणाले “ शिवबा ! तुम्ही तर आम्हास सर्व

राज्य अर्पण केलेत. आतां तुम्ही काय करणार ? ” महाराजांनीं उत्तर दिलें “ मी आपल्याबरोबर कंदमुळें भक्षण करून आपली सेवा करणार. ”

समर्थ म्हणाले “ बापा ! आमची वृत्ति भिक्षेची. आम्हाला संसाराचा सुद्धां व्याप नको म्हणून आम्ही ही विरक्ति पतकरली. आणि राज्याचा जोजार आमच्यामागें कशाला ? तो तुझा तुलाच लखलाभ होवो. आम्ही त्याला शिवणारसुद्धां नाहीं ! मूठभर दाणे घालावयाचे असतील तर घाला नाहीं तर आम्हास काय ? चालले पुढें. ‘ एक घर सुना तों दसघर दुना ’ महाराज हात जोडून म्हणाले “ गुरुमहाराज ! हें मी आपलें सर्व राज्य स्वहस्तें शिक्का मोर्तब करून श्रीचरणीं अर्पण केलें तें मला आतां परत घेतां येत नाहीं. तसें करीन तर मला पाप लागेल. मी नरकांत जाईन. ह्याकरितां कसेंही करून ही माझी विनंति मान्य करून राज्याचा स्वीकार व्हावा. ”

ह्याप्रमाणें उभयतांचा बराच वेळ संवाद झाला. नंतर समर्थांनीं महाराजांची समजूत घातली कीं “ शिवबा ! मी जरी राज्याचा स्वीकार केला अशी कल्पना केली तरी मी स्वतः का राज्य चालविणार ? माझा सारा जन्म रानावनांत आणि भिक्षेंतच गेलेला, तेव्हां राज्यशकट मला काय होय ? तूं येवढा दक्ष, हुशार, व्यवहारचतुर असूनही तुला प्रधान हे लागतातच. तेव्हां आतां तूंच माझा प्रधान हो म्हणजे झालें. आणि पूर्वींप्रमाणें राज्य चालीव. भरतानें रामाचें राज्य चालविलें नाहीं का ? ”

महाराज म्हणाले “ आज्ञा प्रमाण. परंतु भरताला जशा रामरायांनीं आपल्या पादुका दिल्या होत्या, त्याप्रमाणें मला कांहींतरी मुद्रा पाहिजे. ” ही गोष्ट मान्य करून समर्थांनीं ठरविलें कीं, हें राज्य माझें गोसव्याचें आहे हें समजण्यासाठीं आजपासून झेंडा भगवा करावा. आणि आमची रामाची उपासना चालविण्यासाठीं आजपर्यंत ब्राह्मणाशिवाय इतर जातींत नमनाच्या वेळीं ‘ जोहार जोहार ’ म्हणतात त्यांनीं ‘ राम राम ’ असें म्हणत जावें. त्याप्रमाणें दोनीही आज्ञा राजेश्रींनीं शिरसावंद्य करून तत्काल अमलांत आणल्या. आणि तेथपासून मराठ्यांचा झेंडा भगवा झाला !

**‘ अप्रियस्यच पथ्यस्य श्रोतावक्ताच दुर्लभः ’**

असें एक वाक्य आहे. त्याचा अर्थ ‘ अप्रिय परंतु हितकर सांगणारा

व विशेषेंकरून ऐकून घेणारा हे दोघेही विरळाच आढळतात! तद्वत्च अशा प्रकारें राज्यदान करणारा आणि असलें राज्य पदरीं पडल्यानंतर तें 'नको' म्हणून परत करणारा ह्या दोन्हीही व्यक्ति परम दुर्मिळ होत.

असेंच एक अपूर्व उदाहरण इतिहासांतीलच आठवतें. तेंही येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हें उदाहरण अनंत फंदीचें होय. दिवट्या रावबाजींना मधून मधून हुक्की येत असे कीं, आपल्यावर कवींनीं रचलेलें एखादें तरी स्तोत्र असावें! पण कवी पडले मदाड! ते काम कोणीच पार पाडीनात! तेव्हां त्यांच्या कारकिर्दीत हयात असलेले सुप्रसिद्ध शीघ्र कवि अनंत फंदी ह्यास त्यांनीं आपले गुणानुवाद कवितेंत गुंफण्याविषयीं स्वतःच फर्माविलें. फंदींनीं विचार केला कीं, श्रीमंताचे गुणानुवाद वर्णन ते काय करावयाचे? 'उडदामाजी काळे गोरे। काय निवडावे निवडणारे ॥' अशांतलाच प्रकार. किंवा ज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटलें आहे, कीं उंटाचें वर्णन करावयाचें तर कोणतें अंग सरळ व सुंदर आहे म्हणावयाचें? ह्यांनीं कोठें तरवार गाजविली नाहीं, किंवा दुसरेंही शतकृत्य केलें नाहीं. तेव्हां ह्यांच्या गुणानुवादाचें वर्णन करावयाचें म्हणजे ह्यांच्या दुर्गुणांचें पातडें वाचावयाचें! त्यापेक्षां मौन धरलेलें काय वाईट? म्हणून त्यांनीं त्यासंबंधानें बऱ्याच दिवस टोलवाटोलवच चालविली होती! परंतु अखेर श्रीमंतांची मर्जी फार खप्पा झाली, व त्यांनीं उद्याच्या उद्यां आमच्या कारकीर्दीवर कविता झाल्या पाहिजेत म्हणून फंदीस सक्त ताकीद दिली! तेव्हां मात्र फंदीचा उपाय खुंटला. त्यांनीं श्रीमंतांचे जे गुणावगुण होते त्यांचा पवाडा स्पष्टपणें त्यांच्या तोंडावरच म्हणून दाखविण्याचा संकल्प करून आपलीं बायकामुलें रातोरात भागानगरास [ द. हैद्राबादेस ] रवाना करून दिलीं. आणि आपण दुसऱ्या दिवशीं श्रीमंतांच्या भेटीस गेले. तेव्हां श्रीमंतांनीं पुन्हा प्रश्न केला कीं "काय हो फंदी, आमच्या कविता आणल्या कीं नाहीं?" फंदी हात जोडून म्हणाले "होय; आणल्या आहेत." हें ऐकून श्रीमंतांनीं त्या मोठ्या उत्सुकतेनें वाचावयास सांगितल्या. तेव्हां फंदींनीं श्रीमंतांच्या कृतींचा पाढा त्या भर सभेंत वाचून दाखविला. त्यांतील मासला:—

## ओंव्या.

वडिलांचे जुने चाकर। त्यास खावया न मिळे भाकर॥
अजागळ ते तूपसाखर। चारूनि व्यर्थ पोशिले॥ १
जो पाइलीची खाई क्षिप्रा। पालखी द्यावी तया विप्रा॥
× × × × ×
एके दिवशीं व्हावी खुशाली। पालखीबरोबर शंभर मशाली॥
एके दिवशीं जैशी निशा आली। मशाल एकही नसावी॥२
क्षणांत व्हावी प्रसन्न मुद्रा। क्षणांत यावा कोप रुद्रा॥
क्षणांत करणी दिसे अभ्रद्रा। स्वेच्छाचारी प्रभू हा॥३

अशी ही निंदा; आणि ती प्रत्यक्ष प्रभूच्याच तोंडांवर! मग काय विचारावें? बाजीरावाच्या तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंचली! हें पाहून फंदींनीं लगेच नमस्कार केला, व ते तडक आपल्या वाटेस लागले!

फंदी पुण्याहून जे निघाले ते हैद्राबादच्या नबाबाच्या आश्रयास गेले. श्रीमंत पेशव्यांचें व नबाबाचें आंतून आंतून वैमनस्यच होतें. त्यांस फंदींनीं श्रीमंतांपाशीं घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून नबाबसाहेबांच्या अंतःकरणास अगदीं गुदगुल्याच झाल्या. त्यांनीं फंदीस अश्वासन देऊन आपल्याच आश्रयास राहवयास सांगितलें. त्याप्रमाणें फंदी राहिले. व त्यांनीं निजामसाहेबांच्याही वर्णनपर कांहीं पद्यें रचून तीं दरबारांत त्यांस वाचून दाखविलीं. तीं ऐकून दरबारच्या मंडळींनींही माना डोलविल्या. खासे नबाबसाहेब तर इतके खूष झाले कीं, त्यांनीं लागलीच २००० रुपयांच्या इनाम जमिनीची सनद लिहवून ती मोठ्या सन्मानानें फंदींच्या हातांत दिली, आणि मोठ्या आढ्यतेनें म्हणाले "ही घ्या, दोन हजार रुपयांची सनद! असा दाता आजपर्यंत आपल्यास भेटला होता काय?" परंतु फंदीसारख्या निस्पृह पुरुषाला ही आढ्यता थोडीच खपणार? त्यांनीं तत्काल मुजरा करून जबाब दिला "खाविंद! मला तर असा कोणी आजपर्यंत दाता भेटला नाहीं हें तर खरेंच; पण आपल्याला तरी अशी ही २००० ची सनद फाडून परत करणारा याचक कधीं आढळला होता काय?" असें म्हणून त्यांनीं ती सनद फाडून टाकली आणि म्हणाले

" येवढ्याशा चार कवितावद्दल आपण २००० रुपयांचें इनाम दिले, तर एखाद्या क्षुल्लक अपराधा बद्दल कधीं काळीं शिरच्छेदाचीही पाळी यावयाची. अशा गाजरपारख्या शहरांत एक क्षणभरही पाऊल ठेवणें बरें नव्हे." असें म्हणून ते तेथूनही चालते झाले. ही गोष्ट तरी केवढ्या धारिष्टाची आहे ?

समर्थांची योग्यता छत्रपतींपेक्षांही अधिक समजली पाहिजे. कारण छत्रपतींनीं राज्य मिळविलें त्यांत किती एकांचे प्राण बळी पडले होते. त्यांना स्वतःला पराक्रम करावा लागला होता. परंतु समर्थांनीं कोणाचाही जीव खर्ची न घालतां व स्वतः रणांगणांत न जातां, केवळ शांत वृत्तीनें, गोड बोलून, केवळ झोळीनें राज्य मिळविलें ! ही कला किती बरें अप्रतिम ?

शिवाजी महाराज जाणते होते; महा धूर्त होते; प्रत्येक मनुष्याचे डाव-पेंच ते ओळखून होते. त्यांचा स्वभाव मानी होता. दिल्लीच्या दरबारांत अमंळ खालीं उभे केलेलें सुद्धां त्यांस खपलें नाहीं. त्यांनीं लगेच आपल्या समशेरीला हात घातला ! ते कोणालाच कधीं नमून वागले नाहींत. असें असतां समर्थांच्याच चरणीं ज्या अर्थी ते लीन झाले, आपलें येवढें हाडांचीं काडें करून मिळविलेलें सारें राज्य त्यांस अर्पण केलें, त्या अर्थी समर्थांची योग्यता श्रीमच्छत्रपतींपेक्षांही पुष्कळ अधिक होती, व ते खरे खरे समर्थ होते ह्याबद्दल शिवरायांचीही बालंबाल खात्री असली पाहिजे हें उघड आहे.

अशा समर्थांचें सामर्थ्य काय, व लीला कशा हा पुढें सांगावयाचाच भाग आहे. अशी पुण्य पर्वणी आणखी कधीं येणार ? समर्थांच्या अंगीं येवढें सामर्थ्य येण्याचें मुख्य बीज काय ? तर एक विरक्ति !

येथपर्यंत पंचसामर्थ्यांचें वर्णन सांगितलें. आतां फक्त एकच सामर्थ्य सांगावयाचें राहिलें. तें कोणतें ? तरः—

६ **सिद्धिसामर्थ्यः**—पूर्वीं सांगितलेल्या सामर्थ्य वृद्धीचीं साधनें, तपस्सिद्धी, हीं पूर्णतेस पोंचून सर्वांत श्रेष्ठ जें सामर्थ्य प्राप्त होतें त्यास 'सिद्धि-सामर्थ्य' किंवा परमेश्वरी सामर्थ्य असें म्हणतात. सर्वांत श्रेष्ठ सामर्थ्य हेंच असल्यामुळें वरील पांच सामर्थ्यांचा त्यांतच अंतर्भाव होतो. सिद्धिसामर्थ्या-पुढें वरील सर्व सामर्थ्यें कनिष्ठ होत. म्हणून हें सिद्धिसामर्थ्य ज्या पुरुषाच्या अंगीं उद्भूत होतें त्यासच माहात्मा, ईश्वरी अवतार असें म्हणतात. कारण 'कर्तुमकर्तुं' ही शक्ति स्वभावतःच त्याच्या अंगीं आलेली असते.

तरी तिच्याबद्दल त्याला यत्किंचित्‌ही अभिमान वाटत नाहीं. किंबहुना त्याची जाणीवही त्यास असेल किंवा नाहीं ह्याचा वानवाच. तेव्हां असें जें हें सर्वांत श्रेष्ठ सामर्थ्य, त्यांत वरच्या सर्व सामर्थ्यांहून विशेष तें काय? त्याची वाढ किती व कशी? त्याची मर्यादा कोठपर्यंत? हें सर्व समजण्यासाठीं त्याचेंही मनास पटेल असेंच विवेचन केलें पाहिजे.

सामर्थ्य म्हणजे तरी काय? त्याची व्याख्या अगदीं थोडक्यांत आहे. आपल्या इच्छेनें कार्य करतां येतें किंवा होतें ह्याचें नांव सामर्थ्य. ह्यामध्यें पूर्वीं सांगितलेल्या सर्व सामर्थ्यांचा किंवा कोणत्याही इतर सामर्थ्यांचा अंतर्भाव होतो. आपण हात हलविण्याची इच्छा केली कीं तात्काल हात हालतो. चालावयाची इच्छा केली कीं, पाय चालूं लागतात. डोळे मिटावयाचे म्हटलें कीं, ते तात्काल मिटतात. ह्या साध्या गोष्टीपासूनच सामर्थ्याला प्रारंभ होतो. हात हालणें, पाय उचलणें, ह्या गोष्टी नेहेमींच्या प्रचारांतल्या असल्यामुळें आपल्याला त्याबद्दल फारसें नवल वाटत नाहीं. तरी तो एक ईश्वरी साक्षात्कारच आहे. केवळ हात उचलावा येवढी गोष्ट मनांत येण्याबरोबर हात उचलावा, व चालावयाचें मनांत येतांच मणादीडमणाचें देहाचें ओझें घेऊन सहजगत्या धांव घ्यावी, यापेक्षां अधिक अद्भुत गोष्ट ती कोणती? हीच काय ती मनुष्यासच नव्हे—तर प्रत्येक प्राणिमात्रास ईश्वराची अपूर्व व दयार्द्र दृष्टीनें दिलेली देणगी होय. हिची वाढ तो हवी तितकी करूं शकतो, ती गोष्ट निराळी. परंतु मूळ देणगी जी काय परमेश्वराची ती हीच कीं, त्याच्या इच्छेबरोबर कोणतेंही कार्य घडावें. इच्छाशक्ति जें कार्य करते, तें केवळ वाणीच्या उच्चारानें कधींही होत नाहीं. तें तिनें स्वतःच केलें पाहिजे. ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण पहावयास लांब जाणें नको. आपण उगाच स्वस्थ बसावें आणि तोंडानें शंभर वेळ म्हणावें कीं, "हे हाता! चल वर ये." तरी तो हात कांहीं जाग्यावरून हालत नाहीं. पण हात वर उचलण्याची इच्छा मात्र करावी कीं हात उचलाच! पायांनाहीं तसेंच 'चल, चल' असें तोंडानें पाहिजे तितक्या वेळ म्हणा. त्याच्या कानाशीं ओरडा. तरी पाय कांहीं हालावयाचे नाहींत. पण तीच इच्छा झाली पुरे कीं लगेच पाय चालूं लागतात. ह्यावरून इच्छाशक्तीचा प्रभाव केवढा अपूर्व आहे हें लक्षांत आणावें. अशी जी अपूर्व व स्वयं-

सिद्ध इच्छाशक्ति तिचें स्वरूप तरी काय ? असा प्रश्न सहजीं मनांत येतो. खरोखर पाहूं गेलें तर इच्छाशक्ति ही दिसत नाहीं; ती निराकार आहे. तरी ती उत्पन्न होण्याबरोबर हात पाय कसा हालतो ? आपण तोंडानें प्रत्यक्ष कोणत्याही अवयवाला आज्ञा दिली तरी तो हालत नाहीं. पण इच्छा शक्तीनें प्रत्यक्ष तोंडीं आज्ञा न देतांही प्रत्येक अवयवाकडून तात्काल कार्य होतें. तेव्हां ही इच्छा त्या जड अवयवांस कळते कशी ? व त्या कार्यास त्या अवयवास प्रवृत्त करते कोण ? ह्याचा उलगडा होत नाहीं. तरी त्यावर बराच तर्क चालवितां येतो. इच्छाशक्ति म्हणा किंवा मन म्हणा जरी निराकार आहे तरी तें वायुरूप असून तेंच आपल्या शरिरांतील ज्ञानतंतूंतून शहरांतील पाण्याच्या नळाप्रमाणें खेळत असलें पाहिजे, आणि त्या इच्छाशक्तीचा सांठा कोठें तरी एके ठिकाणीं मस्तकामध्यें—मेंदूंत—संग्रहीत असला पाहिजे. हातानें हालावें असें मनांत येतांच इच्छाशक्तीचा लोंढाच्या लोंढाच झटकर निघून तो ज्ञानतंतूंच्या द्वारें हातांच्या स्नायूंत जाऊन धडकतो. आणि त्या धक्यासरशी हातांच्या स्नायूस एकदम चलन उत्पन्न होऊन त्याच्या जोरानें तो हात उचलतो. पायांची गोष्टही तशीच. म्हणजे इच्छाशक्ति ही आपल्या मर्जीप्रमाणें प्रत्येक अवयवांतील स्नायूस्नायूंतून शिरून त्यांना जोरानें उचलते. अर्थात् हल्लींची तारायंत्रांतील वीज आणि इच्छाशक्ति ही एकरूपच होत. तारेचा ठोका पडतांच ज्याप्रमाणें तिच्यांतील वीज लगेच त्या त्या गांवांत जाऊन तेथील यंत्रावर आदळते, त्याप्रमाणेंच मनाचा ठोका पडतांच इच्छाशक्ति त्या त्या अवयवावर जाऊन आदळते, व त्या त्या अवयवांच्या स्नायूंना जोरानें चलन देते ! इतक्या गोष्टी ज्याअर्थीं खऱ्या आहेत, त्याअर्थीं इच्छाशक्तीला गति आहे व तिच्या अंगीं जोर किंवा चलन देण्याचेंही सामर्थ्य आहे, ही गोष्ट अगदीं स्पष्टपणें सिद्ध झाली. म्हणजे इच्छाशक्ति हीच मनुष्य मात्रांतील प्रधान ईश्वरी शक्ति होय. इच्छाशक्तिशिवाय दुसरी दैविक शक्ति मनुष्य मात्रांत कांहींच नाहीं.

आतां त्यामध्येंही सदिच्छा व असदिच्छा हेही भेद असल्याचें दिसून येतें. परतुं त्याचा विचार येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण, सदिच्छा असो कीं असदिच्छा असो, इच्छेचा कार्यभाग व्हावयाचा तो होतच

असतो. त्यांतही इच्छाशक्तीचें सामर्थ्य हें दिसून यावयाचें तें येतेंच. ते कार्य चांगलें किंवा वाईट ह्याचा विचार करण्याचा विषय स्वतंत्र होय. त्याचा प्रस्तुत विषयाशीं कांहीं संबंध नाहीं.

ह्या इच्छाशक्तीच्या सामर्थ्याच्या संबंधानें आणखी एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, हें इच्छाशक्तीचें कोणतेंही सामर्थ्य असो, त्याचा प्रभाव कोठपर्यंत ? तर देहामध्यें जीवात्मा आहे तोंपर्यंतच. जीवात्मा नष्ट झाला कीं, तिचें सामर्थ्य लंगडें पडलेंच म्हणून समजावें. मग तें सामर्थ्य लहान प्रमाणांतील असो कीं मोठ्या प्रमाणांतील असो.

ज्या अंगाला अर्धांग वायूचा विकार होतो, तो भाग इच्छाशक्तीनें हालत नाहीं कीं चालत नाहीं ! अर्थात् त्या ठिकाणची इच्छाशक्ति—दैविकशक्ति नष्ट होऊन जाते. म्हणजे त्या ठिकाणची ईश्वरी अंशच नष्ट होतो म्हटलें तरी चालेल.

इच्छाशक्ति म्हणजे तरी काय ? जीव किंवा आत्मा. ह्याचेंच नांव इच्छाशक्ति. देहाचे सारे खेळ म्हणजे इच्छाशक्तीचेच सारे खेळ होत. पूर्वीं सांगितलेले सर्व शरीरसामर्थ्यांचें काय, शक्तिसामर्थ्याचें काय, किंवा बुद्धिसामर्थ्यांचे काय साऱ्या खेळाची जननी हीच. इच्छाशक्तीइतका प्रभाव दुसऱ्या कोणाचा आहे ?

पूर्वीं जीं निरनिराळीं सामर्थ्यें सांगितलीं आहेत, तीं सर्व इच्छाशक्तीचींच होत. तीं किती अद्भुत असतात तेंही आपल्यास समजलें. पण आतां जें तिचें सिद्धिसामर्थ्य सांगावयाचें आहे तें त्याहूनही अद्भुत केवळ ईश्वरी प्रभावाचें सांगावयाचे आहे. तें कोणतें ? तर अलौकिक चमत्कार किंवा अमानुष कृत्यें हें होय. म्हणजे दुसऱ्याच्या मनांतील गोष्ट सांगणें, जें बोलतील तें खरें होणें, इच्छेनुरूप पर्जन्य पाडणें, मृत मनुष्य जिवंत करणें, एका क्षणांत शेकडों कोस जाणें, लहानशा छिद्रांतून बाहेर पडणें, व्याघ्रासारखीं हिंस्र जनावरें वश करून घेणें इत्यादि गोष्टी मानवी शक्तीच्या बाहेरच्या आहेत. परंतु ज्यांस सिद्धीचें सामर्थ्य प्राप्त होतें, त्यांस ह्या अद्भुत वाटणाऱ्या गोष्टी सुद्धां करतलमलवत् होतात, असे आजपर्यंतच्या पुराणांतून व बखरींतूनही अनेक दाखले आहेत. तथापि असे सिद्धिसामर्थ्यांचे पुरुष जगावर फार विरळा उत्पन्न होत असल्यामुळें तसले चम-

त्कारही विरळाच दृष्टोत्पत्तीस येतात. या कारणानें ते सर्वांस पहावयास मिळत नाहींत. पण तेवढ्यावरूनच आलीकडचे कांहीं विद्वान् लोक—विशेषें-करून इंग्लिशभाषाभिज्ञ—हे सर्व चमत्कार केवळ झूट असें मानतात. व ते लिहून ठेवणारे मोठे संत महंत असले तरी ते भोळे, खोडसाळ, इत्तलकी बात तित्तल करणारे असा त्यांच्यावर बेलाशक आरोप करतात. परंतु आमच्या देशांतच नव्हे, तर जगांतील अनेक देशांत जे जे असे सिद्धि-सामर्थ्यवान् पुरुष—संत—महंत—किंवा ईश्वरावतारी महात्मे जन्मास येतात, त्यांचीं त्यांचीं चरित्रें असल्या अलौकिक चमत्कारानेंच भरलेलीं असतात. परंतु अर्वाचीन पंडितांस तें मुळींच पटत नाहीं. आणि ते स्वतः अशा पुरुषांचीं चरित्रें लिहितांना त्यांनीं केलेले अद्भुत चमत्कार तेवढे मुका-ट्यानें बाजूस काढून ठेवून इतर व्यावहारिक कृत्यांचें चरित्र मात्र जमेस धरून तेवढ्याचीच चर्चा करीत बसतात. त्यामुळें मिठाशिवाय जेवण असावें त्याप्रमाणें हें सोवळें चरित्र निखालस आळणी, बेचव असें होतें. त्यामुळें बैल विकून ज्याप्रमाणें गोठा बांधावा; राघू सोडून देऊन पिंजरा तयार करावा, अशांतलाच तो प्रकार होतो! आणि नीरस व अरसिक लोकांना त्यांतच गोडी वाटते. पण अशा कृतीनें प्राचीन काळच्या भोळ्या भाविक लोकांचा विनाकारण उपहास केल्यासारखें होऊन त्यांच्या पदरांत अज्ञानपणाच नव्हे, तर खोडसाळपणाही घातल्याचें श्रेय येतें! ह्याला थोडा तरी आळा बसावा म्हणूनच येवढा विस्तार केला आहे. व त्यासाठींच साधुसंतांकडून घडत असलेल्या अद्भुत चमत्कारांची शक्य तेवढी उपपत्ति देत आहोंत. तिचा दोन्हीही पक्षांचे वाचक निर्विकल्प मनानें विचार करतील अशी आशा आहे.

जीवात्म्याच्या ठिकाणीं इच्छा उत्पन्न होते. ही इच्छा अदृश्य असते. आत्मा, मन, इच्छाशक्ति हीं सारीं एकरूपच आहेत, असें गृहित धरून आम्ही चालतों. कारण, त्यांच्यांत कांहीं भेद असलाच तर तो पाहाव-याच्या आम्ही भरीस पडत नाहीं. इच्छाशक्ति हें एक वायु—विद्युत् किंवा ईथर ह्याच्यासारखेंच सूक्ष्म तत्त्व असून त्याचा प्रवाह जीवात्म्याच्या परि-स्थितीप्रमाणें कमजास्ती प्रमाणानें पाहिजे तितका दूर जाऊं शकतो. आणि वायूप्रमाणें किंवा विजेप्रमाणें त्याचा धक्का विवक्षित ठिकाणीं बसून त्याचा

परिणामही दृग्गोचर होतो. हीच गोष्ट या विवेचनामध्यें होईल तितकी स्पष्ट करावयाची आहे.

उदाहरणार्थ, विजेचा प्रवाह कसकसा वाढत जातो, ह्याचाच प्रकार पाहूं. प्रत्येक इस्पिळांत विजेची पेटी असते. ती बहुतकरून सर्वांच्या पहाण्यांत असतेच. तिच्यांतील चक्र फिरूं लागलें म्हणजे विद्युत्प्रवाह सुरू होतो व त्या पेटीच्या दोन्हीही बाजूंच्या तारांतून निघून धातूंच्या मुठींतून तो मनुष्याच्या अंगांत शिरतो, आणि त्यास अति दुःसह धक्का बसतो. ही वीज किती प्रमाणाची असते हे डोळ्यांना समजण्याला मार्ग नाहीं. तरी त्या पेटीच्या आंतील चक्रावर थोडासा अंधार करून पाहिलें म्हणजे चकमकीप्रमाणें तेथें विजेचा प्रकाश पडलेला स्पष्ट दिसतो. तो प्रकाश फारच थोडा असतो. त्या प्रकाशाच्या ज्योतीची लांबी $\frac{1}{2}$ इंच सुद्धां पुरती असेल नसेल. हें विजेचें अल्प प्रमाणांतील स्वरूप होय.

सजीव मनुष्याच्या देहांतील हाडांचा फोटो काढावयाचा असला तर त्याच्यावर विद्युत्प्रकाशाचे 'एक्सरेज' नांवाचे किरण असतात ते पाडावे लागतात. तें काम ह्या विजेच्या पेटीनें भागत नाहीं. त्यासाठीं विजेची मोठी ब्याटरी तयार करावी लागते. ह्या ब्याटरींतील विजेच्या प्रकाशाची ज्योत ९ इंच लांबीची लागते. तेव्हांच एक्सरेज पडतात व देहांतील चित्र निघतें ! तारायंत्रामध्यें विजेचा प्रवाह तारेनें पृथ्वीभर पोंचविलेला असतो. त्यामुळें कोणत्याही स्टेशनावर विजेचा प्रवाह उत्पन्न केला कीं, त्याचा धक्का $\frac{1}{2}$ सेकंदांत पृथ्वीला प्रदक्षिणा करून येतो ! असा हा विजेचा प्रकार आहे. म्हणजे तिच्या प्रबळतेप्रमाणें—प्रखरतेप्रमाणें—तिच्या प्रवाहाची लांबी वातावरणांत पाहिजे तितकी वाढूं शकते.

इच्छाशक्तीची व तिच्या प्रवाहाची स्थिति हुबेहुब अशीच आहे. इच्छा जीवात्म्यामध्यें उत्पन्न होते, व ती हस्तपादादि तिच्या हुकमांत असणाऱ्या अवयवांतील स्नायूंत निमिषार्धांत शिरून त्यास धक्का देते, व ते ते अवयव इच्छित कार्य तत्काल करतात. येथपर्यंत इच्छाशक्तीची मर्यादा आपल्या नेत्रांस स्पष्टपणें दिसते. परंतु इच्छाशक्तीच्या प्रवाहाची मर्यादा केवळ आपल्या देहापर्यंतच आहे असें नाहीं. तर तिचा प्रवाह देहाच्या बाहेरील वातावरणांतून पाहिजे तितका लांब जाऊन इच्छित ठिकाणीं आपला धक्का

देतो आणि कार्य करतो. हीही गोष्ट अशक्य दिसत नाहीं. कारण वीजसुद्धां तार असली तरच इच्छित ठिकाणीं जाते, तार नसली तर ती जात नाहीं, असेंही नाहीं. कारण, हल्लीं 'वायरलेस' टेलेग्राफी निघालीच आहे. तिच्या योगानें तार वगैरे कोणतेंही साधन नसतां केवळ वातावरणांतूनच विजेचा प्रवाह गुप्त रीतीनें जातो, आणि जगांतील कोणत्याही ठिकाणीं आपला धक्का देऊन बातमी पोंचविण्याचें वगैरे कार्य करतो, हें प्रसिद्धच आहे. तशीच गोष्ट हुबेहुब इच्छाशक्तीची आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें पंचसामर्थ्यानें जे पुरुष संपन्न असतात, त्यांची इच्छाशक्ति अत्यंत प्रबळ झालेली असते, तिचा प्रवाह वाटेल तितक्या लांबीच्या पल्यावर जातो, व तो हवा तेवढा प्रचंड धक्का देऊन हवें तें कार्य करतो.

ह्यामुळें ज्या अवयवावर आपली सत्ता चालत नाहीं असें आपल्यास वाटतें, ते अवयवही त्या पुरुषाच्या आज्ञेंत चालतात. म्हणजे ते सुद्धां इच्छाशक्तीच्या कक्षेच्या मर्यादेंत येतात. जसें कान हे मनुष्याला हालवितां येत नाहींत, परंतु जनावरप्रमाणें कान हालविणारे मनुष्य प्रत्यक्ष पहावयास मिळतात. ह्यावरून सिद्धीसामर्थ्याची सत्ता, ज्या अवयवावर इच्छाशक्तीचा जोर चालत नाहीं असे दिसतें त्या अवयवावरही ते सत्ता चालवूं शकतात, हें तर उघडच आहे. पण याहूनही त्यांच्या सामर्थ्याची मजल फार पुढें असते.

ही पुढची मजल म्हणजे पंचमहाभूतावर सत्ता चालविणें ही होय. पर्जन्य-काल नसतांही आज पर्जन्य पडावा अशी त्यास इच्छा झाल्यास त्यांची इच्छाशक्ति इतकी प्रबल असते कीं, तिचा प्रवाह आकाशांत संचार करून मेघ मंडळास धक्का देतो. यामुळें तेथें तात्काल मेघ जमतात; विजा चमकूं लागतात; आणि लागलीच मुसळधार पाउस पडूं लागतो. पंचमहाभूतें त्यांच्या इच्छाशक्तीची गुलाम बंदी असतात. येवढें म्हटलें म्हणजे अशा प्रकारचे पाहिजे ते अलौकिक व अमानुष चमत्कार होतात, हें आणखी विस्तारानें सांगण्याची अवश्यकताच राहिली नाहीं.

ह्याहूनही त्यांच्या सामर्थ्याची एक विशेष गोष्ट म्हटली म्हणजे प्रसंगो-पात मेलेलीं मनुष्येंही ते सजीव करूं शकतात. ह्यापेक्षां अलौकिक सामर्थ्य तें जगांत काय राहिलें? आणि ईश्वर स्वरूपांत कमतरता ती कितीशी उरली?

पण येवढ्यावरूनच चिकित्सक लोकांस त्या गोष्टी खऱ्या वाटत नाहींत. ह्या साठीं आजकाल अशा गोष्टी थोड्या बहुत प्रमाणांनीं तरी घडतात, किंवा नाहीं तें पाहण्यासाठीं तशा प्रकारचीं प्रत्यंतरें आज आम्हांस शक्य तेवढीं देणें भाग आहे.

१ मनोधर्मः—मन म्हणा, इच्छाशक्ति म्हणा कीं आत्मा म्हणा हें एक ईश्वरी अंशमय तत्त्व आहे. त्याचे गुणधर्म पहावयाचे तर ते प्रत्येकानें आप-आपल्या मनाशींच अनुभवानें ताडून पाहिले पाहिजेत. त्याला दुसऱ्या कोणाचाही साक्षीपुरावा नको. परंतु सर्वच गोष्टींचा आपल्याला अनुभव येतो असें नाहीं. याकरतां ' शितावरून भाताची परीक्षा ' करीत असावें. घोडे बैलावांचून एक मण ओझें, दोन मनुष्यें घेऊन जातांना जर एखादी गाडी प्रत्यक्ष दृष्टीस पडली, तर १०० खंडी ओझें व १००० मनुष्यें वाहून नेणारी गाडीही असू शकेल हें खरें मानलें पाहिजे. तशा प्रकारची आपोआप चालणारी गाडी मुळींच कधीं पहावयास मिळाली नाहीं, तर तिच्याबद्दल तशी शंका घेतल्यास शोभेल. परंतु थोड्या प्रमाणांत तो चमत्कार प्रत्यक्ष पाहिल्यावर तो मोठ्या प्रमाणांत करतां येणार नाहीं असें म्हणणें शोभावयाचें नाहीं; तें असंबद्ध दिसेल. हीच गोष्ट मनोधर्मास लावून पहावी. म्हणजे इच्छाशक्तीचे बरेच व्यापार आपल्या अनुभवास येतील.

२ एखाद्या मनुष्यावर आपली अत्यंत भक्ति असावी; त्याचा आपल्या मनाला निजध्यास असावा; त्याचा वियोग होऊन चारसहा महिने गेलेले असावेत; आणि एकदम एके दिवशीं मनांत यावें कीं, तो मनुष्य आज येईल. आणि तीच गोष्ट कांहीं वेळ घोळत असावी. तोंच तो मनष्य अकस्मात् येऊन पोंचतो. तो आज येणार ह्याची वार्ताही पूर्वीं आलेली नसते. ही गोष्ट बऱ्याच लोकांच्या प्रत्ययास आलेली असेल.

३ एखादा गृहस्थ परम मित्र असून चारसहा महिन्यांत त्याचा पत्रव्यवहारही नसावा. आणि एकदम एके दिवशीं अकस्मात् त्याची आठवण होऊन आपण त्यास पत्र लिहावें कीं, आपल्या भेटीस फार दिवस झाले; ह्याकरितां मी ४।५ दिवसांनीं आपल्याकडे येणार आहे. हें आपलें पत्र ज्या दिवशीं रवाना होतें, त्याच दिवशीं तो मित्र ही तिकडून पत्र पाठवितो कीं, आपल्यास भेटून फार दिवस झाले, तरी आपण अमुक अमुक कारणा-

करितां ४ दिवस येऊन अगत्य भेटून जावें! हीं दोन्ही ही पत्रें परस्परांस बरोबरच पोंचतात! हाही अनुभव बऱ्याच लोकांस असेल अशी आमची खात्री आहे. हा मजकूर लिहीत असतांच ' ज्ञानमित्र पुस्तक माले ' पैकीं ' लंघन चिकित्सा शिक्षक ' आवृत्ति तिसरी हें पुस्तक भेटीस आलेलें आमच्या टेबलावर पडलें होतें; तें सहज उघडून प्रस्तावनेवर नजर टाकली तों तींतही त्या लेखकाला हाच अनुभव आलेला त्यानें सांगितला आहे. तोही सहज वाचकांकरितां येथें नमूद करावा असें वाटल्यावरून त्यांचा तेवढा उतारा येथें देत आहों.

सदरहू पुस्तकाचे लेखक रा. रा. लक्ष्मण नारायण जोशी हे आहेत. ते आपल्या प्रस्तावनेंत म्हणतातः—

" आपल्या देशबंधूंकरितां अनुभवसिद्ध असें एक लंघनाच्या बाबतींतलें पुस्तक प्रसिद्ध करावें असें मनांत येतें. तों तीच गोष्ट ईश्वरी संकेतानें आमचे मित्र रा रा. ना. ब चव्हाण ह्यांच्याही मनांत उद्भवली होती. हा प्रकार कांहींसा गोगलगायीच्या तारायंत्राप्रमाणेंच झाला. कारण आम्हां दोघांत जरी ६० मैलांचें अंतर होतें तरी एकच विषय एकाच वेळीं दोघांच्या अंतःकरणांत उत्पन्न होणें ही गोष्ट विशेष आहे. मी सहज रा. रा. चव्हाणांस भेटावयास गेलों, त्यांच्यापाशीं अशा प्रकारचें पुस्तक लिहिण्याचा माझा उद्देश प्रगट करण्याच्या आधींच त्यांनीं आपला उद्देश प्रगट केला. "

असे अनुभव वारंवार येतात. मात्र त्या गोष्टी स्मरणांत ठेवल्या पाहिजेत.

४ एखादा आपला आवडता पुत्र किंवा भ्रतार किंवा दुसरें कोणीही आवडतें मनुष्य दूरदेशीं असलें, आणि कांहीं कारणानें अकस्मात् त्याचा अंत झाला, तर त्या दिवशीं त्याला त्याबैकीं कोणतेंही वर्तमान समजलें नसलें तरी, उदास उदास वाटूं लागतें; काय होतें तें मनास कळत नाहीं. हातांतून दिवा पडून विझून जातो. पायास किंवा कपाळास एकाएकीं मोठी ठोकर बसते. आणि एक दोन दिवस उगाचच्या उगाच मनाला वाईट वाटत असतें. मनाला हुरहुर वाटते. तोंच तें दुःखदायक वर्तमान येऊन पोंचतें! ह्या गोष्टी पुष्कळांच्या अनुभवांतल्या असतील, यांत संशय नाहीं.

५ **वाग्सिद्धीः**—जे लोक निस्पृह असतात, विरक्त असतात, स्वार्थ

म्हणून ज्यांना शिवत नाहीं; सत्य, दया, क्षमा हेंच ज्यांचें व्रत असतें. ते लोक जें जें काय बोलतात, त्यांच्या मुखांतून जें जें काय निघतें, तें तें आपोआपच खरें होत असतें. त्यांच्या तोंडांतून आशिर्वाद निघाला तर तो खराच होतो. ह्याचें सामान्य अनुभव बऱ्याच लोकांस असले पाहिजेत, असें आमची मनोदेवता सांगते. म्हणून आम्ही ते येथें देण्याच्या भरीस न पडतां एक मोठी चमत्काराचीच एक गोष्ट येथें देतों.

श्री शृंगेरीमठाचे अधिकारी जे माजी शंकराचार्य होते, ते फार पुण्य-शील व महात्मे असल्याबद्दल त्यांची फार ख्याति असे. त्यांच्या दर्शनास मोठमोठे युरोपियन अमलदार सुद्धां येत असत. लॉर्ड नार्थब्रुक हे मद्रासचे गव्हर्नर असतां त्यांची स्वारी म्हैसुरास गेली होती. तेथें त्यांनीं ह्या स्वामींची कीर्ति श्रवण केली. त्यामुळें त्यांच्या मनांत त्यांच्या विषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन ते मुद्दाम स्वामींच्या दर्शनासाठीं म्हैसूरच्या महाराजांसह शृंगेरीस गेले, व स्वामींस वंदन करून बराच वेळ उभयतांचा संवाद झाला. नंतर उठते वेळीं साहेबांनीं ५०० रुपये स्वामींपुढें ठेवून पुन्हा वंदन केलें, आणि निरोप मागितला. तेव्हां स्वामी प्रसन्न मुद्रेनें म्हणाले " ठीक आहे. आतां आपण लौकरच गव्हर्नरजनरल व्हाल. " हें ऐकून साहेबांनीं नम्रपणानें विनंति केली कीं " महाराज ! माझी येथची मुदतही अगदीं भरली आहे. आतां मी लौकरच विलायतेस जाणार, व फिरून हिंदुस्थानांत येण्याचा माझा विचार नाहीं. आणि गव्हर्नरजनरल होण्याची माझी रँकही नाहीं. मी कांहीं लॉर्ड नव्हे. [त्यावेळीं नार्थब्रुक साहेबांस लॉर्ड ही पदवी मिळालेली नव्हती.] " ह्यावर स्वामी हास्य-वदन करून म्हणाले " परमेश्वर करील तर काय एक होणार नाहीं ? तो रंकाचा सुद्धां राव करतो. आपण आज लॉर्ड नसलां तर उद्यां व्हाल. " ह्यावर नार्थब्रुक साहेब हांसून म्हणाले " हो; तसाच योग आला तर कोणी सांगावें ?" इतकें बोलून ते स्वामींचा निरोप घेऊन मद्रासेस निघून गेले.

परंतु त्यास पुरता महिनाही लोटला नाहीं तोंच बंगालचे गव्हर्नरजनरल लॉर्ड मेयोसाहेब हे आंदमान बेटांतील एका कैद्याकडून मारले गेले !

आणि लागलीच नार्थब्रुक साहेबांस 'लॉर्ड' ही पदवी मिळून त्यांची नेमणुक गव्हर्नरजनरलच्या जागयावर झाली ! !

.. तेव्हां कलकत्यास जातांना लॉर्ड नार्थब्रुक साहेब प्रथम शृंगेरीस जाऊन स्वामी महाराजांचें सद्गदिद अंतःकरणानें दर्शन घेऊन मग कलकत्याच्या आपल्या नव्या अधिकारावर रुजू झाले. व तेथपासून प्रतिवर्षास त्यांजकडून श्रींकडे ५०० रुपये वर्षासन येत असे !

अशा गोष्टी आणखीही हजारों मिळतील. जिज्ञासूंनीं लक्ष ठेवून त्याबद्दल शोध करीत असावें. म्हणजे त्या आढळल्यावांचून राहावयाच्या नाहींत.

६ जुन्या लोकांनीं अनुभवानें ठरविलेलीं मतें आलीकडच्या लोकांस मुळींच पटत नाहींत. तीं त्यांस निवळ थोतांडें वाटतात. उदाहरणार्थ, दृष्ट. एखाद्या मुलाला किंवा पदार्थाला एकाद्या मनुष्याची दृष्ट लागली असें म्हणतात. पण ती केवळ बायकांची वेडगळ समजूत आहे, तीत कांहीं अर्थ नाहीं, असें कितीएकांचें ठाम मत आहे. परंतु कित्येक मनुष्यांची दृष्ट लागते व त्या पदार्थाचा नाश होतो ही गोष्ट पुष्कळांच्या अनुभवास येते. आमचा एक लहानपणाचा अनुभवच आम्ही येथें नमूद करतों.

आम्ही लहान असतां आमच्या गांवीं एक पांडोबा तात्या या नांवाचे गृहस्थ असत. त्यांची दृष्टि बाधक होते अशाबद्दल फार ख्याति होती. म्हणजे ते ज्या पदार्थाला चांगलें म्हणतील, त्या पदार्थाचा तात्काल नाश व्हावयाचा ! आमच्या अंगणांत दोन केळीं लावलेल्या होत्या. त्या येवढ्या मोठ्या माजल्या होत्या कीं, त्या पाहून पाहणाराला आश्चर्यच वाटावें. त्या केळी विऊन नुकतेच केळांचे मोठमोठे घड पडले होते. एक दिवशीं तेथचे इनामदार आमच्या घरीं सहज येऊन बसले आणि आमच्या वडिलांस म्हणाले "कां नाना ! तुमच्या ह्या केळी मोठ्या जोमांत आलेल्या दिसतात. पांडोबा तात्यांची फेरी अद्याप इकडे आली नाहीं वाटतें !" पांडोबा तात्यांचें नांव आमच्या साऱ्या गांवांत अगदीं प्रसिद्ध होतें. त्यामुळें आमचे वडील हंसून म्हणाले, "नाहीं बुवा. अद्याप कधीं आली नाहीं." इतके बोलून ते गृहस्थ निघून गेले. दुसऱ्या दिवशींच 'कर्मधर्म संयोगानें' पांडोबा तात्यांची स्वारी येऊन झोंपाळ्यावर बसली. तें पाहून आमच्या वडिलांच्या व वडील बंधूंच्या पोटांत धसका बसलाच ! म्हणून

२७२७९१

त्यांनीं त्या केळींकडे त्यांची नजर जाऊं नये म्हणून बरीच खटपट चालविली. तपकिरीची डबी पुढें करून त्यांस नादास लावलें. तरी अखेर त्यांची नजर त्या केळींवर जावयाची ती गेलीच ! ती जातांच ते म्हणाले, " ओहो ! नाना ! काय तुमच्या केळी आल्या आहेत हो ह्या ! मला वाटतें शंभर शंभर केळांचा एक एक घड असेल ! " इतकें बोलून स्वारी निघून गेली. आमचे वडील म्हणाले, " झालें. आटोपलें. आतां कांहीं केळीं खावयास नकोत ! " आणि खरोखर तसाच प्रकार झाला. म्हणजे त्याच रात्रीं त्या केळींच्या बुंधास घूस लागून तिनें त्या केळींचे दोन्हीही कांदे पोखरले ! उजाडल्यावर पहातात तों दोन्हीही केळी मोडून खालीं पडलेल्या ! ह्या गोष्टीचा प्रत्यय अनेकांनाही आलेला असेल. नसेल तर त्यांनीं सूक्ष्म दृष्टीनें अशा गोष्टी पाहिल्या नसतील असेंच म्हटलें पाहिजे. मनुष्याची दृष्ट लागून मूर्ति भंगल्याचीं व तसबिरी फाटल्याचीं उदाहरणें तर शेंकडों ठिकाणीं ऐकूं येतात.

असले लोक त्या पदार्थाची जी तारीफ करतात ती केवळ त्यांची वरकरणी तारीफ असते. मनांतून त्यांची इच्छा वाईटच असली पाहिजे. ते मत्सरी स्वभावाचे असले पाहिजेत. ते तोंडानें जरी दुसऱ्याच्या पदार्थाची स्तुति करीत असतात, तरी मनांतून त्यांची इच्छा अशी असते कीं, ह्या पदार्थाचा नाश केव्हां होईल ! असले लोक हे साधुसंतांपैकीं तर नव्हेतच, पण उलट नीच वृत्तीचे होत, हें सांगणें नकोच. तरी पण त्यांच्या वृत्तीवरून त्यांच्या इच्छाशक्तीची प्रबळता दिसून येते.

असले मनुष्य म्हणजे हलके व कुत्सित स्वभावाचे होत. त्यांचें उदाहरण एका बाजूस ठेवूं; परंतु दुसरे किती एक महात्मे व साधु असे असतात कीं, त्यांनीं प्रसंगोपात एखाद्या दुष्ट व छलक मनुष्याला शाप दिला, तर तोही तात्काल विलक्षण रीतीनें प्रत्ययास येतो. अशीं उदाहरणें पौराणिक कथांतून तर शेकडों आहेतच, परंतु आम्ही आज एक पाश्चात्य देशांतील प्रत्यक्ष इतिहासांतलेंच उदाहरण देत आहों. हें पाहून व ऐकून तरी अर्वाचीन पंडितांचा ग्रह पालटेल व त्यांचा दुराग्रह थोडा तरी शिथिल पडेल अशी आशा आहे. तें उदाहरण असें:—

## एका आंग्ल साधूचा शाप !

प्राचीन काळीं सत्वस्थ वृत्ति पाळणें आणि केवळ परोपकारार्थ देह झिजविणें हीं कर्मे आपल्यांतील ब्राह्मण लोकांनीं पाळलेलीं होतीं. तें व्रत ते आमरण चालवीत होते, तोंपर्यंत त्यांच्या अंगीं ब्रह्मतेज असे. त्यामुळें ते जे जे काय शद्ब मुखांतून काढीत ते ते सत्य होत असत. त्यांच्या निस्पृह वृत्तीमुळें व त्यांच्या स्वार्थत्यागाच्या बाण्यामुळें त्यांच्या मनोविकाराचा भार परमेश्वरावर पडत असे. कारण त्यांत स्वार्थाचा, कपटाचा किंवा दुसऱ्याच्या नाशाचा कधीं लेशही वसत नसे. मनांत यत्किंचित् स्वार्थ नसतां, केवळ निरपेक्ष बुद्धीनें व भूतदयेच्या कळकळीनें भाषण केलें म्हणजे तें सत्य व्हावें असा ईश्वरी संकल्पच असतो. फार तर काय, पण त्यामुळें सृष्टीचे नियम पालटून पंचमहाभूतांच्या घडामोडींत मुद्धां विलक्षण फेरफार होतात. ह्या गोष्टी हल्लींच्या मन्वंतरांत तें ब्रह्मतेज नष्ट झाल्यामुळें लोकांस बहुधा खोट्या वाटतात, पण त्या साऱ्या खऱ्या आहेत. त्याचा प्रकाश हृदयावर पडावा म्हणून आम्हींही एका आंग्ल साधूच्या शापाची गोष्ट मुद्दाम खालीं देत आहों. ती वाचली म्हणजे परोपकाराचें व स्वार्थत्यागाचें सामर्थ्य किती अद्भुत असतें ह्याची साक्ष पटेल.

स्कॉटलंडच्या पश्चिमेकडील किनाऱ्यावर अर्दनामर्चन म्हणून एक डोंगराळ प्रदेश आहे. ह्या प्रदेशांत दरीं खोरीं फार असून पाण्याचे ओढे नालेही विपुल आहेत. येथें प्राचीनकाळीं कांहीं शेतकरी जाऊन राहिले होते. ते तेथें रात्रंदिवस मेहनतमशागत करून पीक पिकवीत आणि सुखानें खात असत. त्यांतच एक सज्जन शेतकरी राहत असे. तो झुंजुक झुंजुक उजाडलें नाहीं तोंच हातांत कुदळ, खोरें घेऊन आपल्या कामास लागे, आणि झटून झोंबून शेतकाम करी. अर्थात् त्याचें पीक उत्तम आलें म्हणजे त्यास मोठा आनंद होत असे. परंतु जगाचा नियमच असा आहे कीं, सुखामागून दुःख आणि दुःखामागून सुख हें असावयाचेंच. त्याप्रमाणें शेतकऱ्यांचें कांहीं वर्षें बरें चाललें होतें. परंतु पुढें कालचक्र फिरलें. आणि त्याच्यावर एक भलतेंच संकट येऊन गुदरलें; तें असें:—

हेब्रीडर्स म्हणून तेथून बऱ्याच लांबीवर एक बेट आहे. तेथें त्यावेळीं

लुटारू लोक रहात असत. त्यांत **लान** म्हणून एक त्या लुटारू लोकांचा नाईक मोठा गबर होता. त्याला ह्या शेतकऱ्यांची बातमी समजली. तेव्हां तो एके वर्षी ह्या शेतकऱ्यांची सर्व पिकें पिकून तयार झालीं अशी संधी पाहून आपलीं गलबतें घेऊन आला. त्याच्याबरोबर हत्यारबंद शेंकडों चोर होते. तो चोरांचा तांडाच्यातांडा घेऊन त्या सर्व दऱ्याखोरींतून हिंडला आणि सर्वांचीं पिकें कापून व बुचाडें बांधलीं होतीं तीं सर्व बुचाडून त्याचीं ओझीं बांधून गलबतावर चढविलीं, आणि शिवायसर्व शेतकऱ्यांच्या झोंपड्या लुटून त्यांतही होतें नव्हतें तें सर्व हिसकावून घेऊन व त्या सर्व शेतकऱ्यांना कफल्लक करून तो आपलीं गलबतें हांकारून आपल्या गांवीं गेला. तेव्हां त्या गरीब शेतकऱ्यांचे वर्षभर किती हाल झाले असतील ह्याची कल्पनाच केली पाहिजे. बरें इतक्यावर भागलें, तर तेंही नाहीं. मनुष्याला एक वेळ द्रव्याची लालूच लागली कीं, तो त्याला सोकावतो, हीं चालच आहे. त्याप्रमाणेंच झालें. म्हणजे दुसऱ्या वर्षी त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांनीं पुन्हा आपल्या शेतांची मेहनत मशागत करून हाडांची काडें करून पीक तयार केलें. तों पुन्हा **लानची** जहाजें येऊन त्यानें पुन्हां पहिल्या वर्षाप्रमाणेंच सर्वांची चट सारी मालमत्ता धुऊन काढून तो चालता झाला.

अशा हालवनवासांत दोन वर्षे गेलीं. इतक्यांत कर्मधर्म संयोगानें त्या भल्या शेतकऱ्याच्या झोंपडीमध्यें एक सत्पुरुष आला. त्या शेतकऱ्याला साधूसंतांची फार आवड असे. आपल्या गरिबाच्या झोंपडीला एवढा समुद्र ओलांडून कोणी पाय लावले तर त्याला मोठी धन्यता वाटे. त्यांत हा साधु पुरुष मुद्दाम आपल्या झोंपडींत आलेला पाहतांच 'अभाग्याच्या घरीं कामधेनु आली' असें त्यांस होऊन गेलें. त्यानें गरीबी रीतीनें होतें त्यांत त्याचा भक्तिपूर्वक आदरसत्कार केला. ह्या साधूचें नांव **कोलंबा**. हा साधु त्या कालीं म्हणजे इ. सनाच्या सहाव्या शतकांत त्या प्रांतीं फार प्रसिद्ध होता. आपल्यांतील तुकाराम महाराजांप्रमाणें किंवा श्रीसमर्थ रामदासस्वामींप्रमाणें त्याची वृत्ति होती. तो पाहिजे तिकडे रानोमाळ फिरत असे. त्याला स्वतःला कशाचीच गरज नव्हती. केवळ परोपकारार्थ देह झिजवावा येवढेंच तो जाणत असे.

त्या गरीब शेतकऱ्यानें आपला येवढा आदरसत्कार केलेला पाहून त्या

महापुरुषाला फार आनंद झाला. परंतु बराच वेळ कुशलप्रश्न झाल्यानंतर त्याच्या लक्षांत असें आलें कीं, शेतकऱ्याला आपण आल्यापासून जो आनंद झाला आहे तो केवळ वरकरणी आहे. त्याच्या अंतर्यामीं कांहीं तरी मोठें दुःख असलें पाहिजे. म्हणून त्यानें त्यास प्रश्न केला कीं "बाबारे! तुझी शेतकी वगैरे बरी चालली आहेना?" शेतकऱ्यानें उत्तर दिलें "महाराज! आपल्या कृपेनें शेतकी चांगली पिकते." हें ऐकून कोलंबा म्हणाला "मग तुझ्या अंतःकरणाला दुःख असल्याचें दिसतें तें कां?" हा प्रश्न ऐकतांच त्या शेतकऱ्याच्या डोळ्यांतून खळ्कर टिपें पडलीं. आणि त्यानें हात जोडून लानच्या लुटारूपणाची इत्थंभूत हकीगत त्यास सांगितली; व आज दोन वर्षें त्यानें आम्हापाशीं एक मूठभर दाणा किंवा पैसा अडका सुद्धां राहूं दिला नाहीं असें म्हणाला. कोलंबा तें सर्व लक्ष लावून ऐकत होता. त्याची ती केंविलवाणी हकीगत ऐकून त्या दयाशील पुरुषाच्या अंतःकरणास पीळ पडला. एक मोठा दुःखाचा सुस्कारा टाकून तो म्हणाला "असो; ईश्वराची इच्छा!" असें म्हणून जग हें असेंच आहे, इत्यादि अनेक जेवढ्या सांगण्यासारख्या होत्या तेवढ्या समाधानाच्या गोष्टी त्यानें त्यास सांगितल्या, आणि त्याच्या व त्याच्या मुलाबाळांच्या मस्तकावर हात ठेवून त्यानें त्यांस चांगला आशिर्वाद दिला व 'कांहीं चिंता नाहीं, तूं धीर धर; ईश्वर तुझें बरें करील; मात्र तो पुन्हा आला तर मला कळीव;' इतकें सांगून तो साधु पुरुष निघून गेला. परंतु झालेली गोष्ट परत येणार थोडीच! तरी तेवढ्यानें त्या शेतकऱ्याच्या मनाला बराच धीर आला.

ह्या गोष्टीला कांहीं दिवस लोटले नाहींत, तोंच तिसरें साल आलें. तों पुन्हा तोच प्रसंग येऊन गुदरला. पीक तयार होऊन तें काढण्याचा हंगाम आला. बिचारे शेतकरी मोठ्या आशेनें काढण्यामोडण्याला लागले. इतक्यांत अर्दमर्चनच्या जंगली किनाऱ्यावर तीं यमस्वरूपी जहाजें पुन्हा दृष्टीस पडून त्यांच्या भाल्यांचीं टोकें लखलख लखलख चमकूं लागलीं. मग काय विचारावें? भयानें आणि निराशेनें साऱ्या शेतकऱ्यांचीं अंतःकरणें अगदीं द्विधा होऊन गेलीं. दरोडेखोरांचा नाईक लान फिरून आपला डल्ला साधायास आला!

त्याचे सारे लोक जहाजावरून उतरले, ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत

रानोमाळ पसरले. आणि भराभर लूट जमा करूं लागले. साऱ्यांचा ढीग होतांच तो सर्व माल जहाजावर चढविण्याची इशारत झाली.

लान हा कोलंबाला ओळखीत होता. पण त्याची त्यावर श्रद्धा अशी नव्हती. तरी तो त्या वृद्ध मनुष्याला वचकत असे. तो साधु ह्यावेळीं ह्या ठिकाणीं असेल अशी त्याची कल्पना नव्हती. तो कोठें तरी दुसरीकडे आहे असें त्यास वाटत होतें. पण ही त्याची समज चुकीची होती. कारण तो सत्पुरुष त्या वेळेस तेथें अर्दमर्चन मध्येंच होता. ह्याची टोळधाड येतांच तो भला शेतकरी आपल्या इतर शेजाऱ्यापाजाऱ्यांना घेऊन धांवत धांवत जाऊन त्यानें चालविलेला सारा प्रकार कोलंबाच्या कानावर घातला. तेव्हां कोलंबा मोठ्या लगबगीनें निघून जहाजें लागलेल्या किनाऱ्यावर येऊन पोचला. तो चोरांच्या टोळींतील चोर एक एक गठ्ठा घेऊन एका-मागून एक जहाजावर चढत होते. त्यांत लानही होता.

कोलंबा त्याच्या दृष्टीस पडतांच तो थोडासा ओशाळला व त्यानें आपल्या भिवयास आठ्या घातल्या. त्यानें त्यास लवून सलाम वगैरे कांहीं केला नाहीं; येवढेंच नव्हे, तर त्या वृद्ध मनुष्याचा पुढून मोठ्या तोऱ्यानें तो निघून गेला. हें पाहून कोलंबाही त्याच्या पाठोपाठ जहाजावर चढून त्यास म्हणाला "हें पहा लान ! अर्दमर्चनचे लोक अतिशय गरीब आहेत. ते रात्रंदिवस एका भाकरीच्या तुकड्याकरितां व जाड्या भरड्या पटकुरा-करितां मर मर मरतात. आणि तूं तर कांहीं एक श्रम न करतां त्यांच्या बाराब् बारा चोवीस महिने केलेल्या श्रमाचें सारें फळ आयतें खमाटतोस आणि आपल्या ह्या देशबांधवांना उपाशीं पोटीं तडफडत ठेवतोस हें ठीक नाहीं. तर तुला माझी अशी विनंति आहे कीं, हा तूं लोकांचा विना-कारण लुटून आणलेला माल परत कर."

पण दरोडेखोरांच्या नाइकानें ह्यावर बराच वेळपर्यंत कांहीं उत्तर दिलें नाहीं. आणि पाण्यांत वल्हीं पडून जहाज जेव्हां किनारा सोडून निघालें, तेव्हां मात्र तो मोठ्यानें 'खो खो खो खो' करून हंसून त्या साधूची टवाळी करूं लागला. हा प्रकार पाहतांच त्या सत्पुरुषानें एकदम समुद्रांत उडी टाकली ! आणि त्या चोरांच्या जहाजाला आडवून धरण्यासाठीं हवा तेवढा जोर केला. पण तो व्यर्थ गेला, हें सांगणें नकोच. अखेर तो साधु

घुरुष कोलंबा निराश होऊन खाऱ्या पाण्यानें भिजून चिंब झालेला किनाऱ्यास येऊन लागला. आणि त्यानें दोन्हीही हात वर करून परमेश्वराची दीन वाणीनें प्रार्थना केली. त्यावेळीं किनाऱ्यावर त्याची मित्रमंडळी व अनुयायी जमलेलेच होते. त्यांजकडे वळून तो म्हणाला " तुम्हां लोकांस तळतळत ठेवणाऱ्या ह्या मनुष्याचें पाय पुन्हा जमिनीला म्हणून कधीं लागावयाचे नाहींत. उत्तरेच्या बाजूला आजच एक ढग आकाशामध्यें उत्पन्न होऊन लानचीं जहाजें भयंकर तुफानांत सांपडतील आणि त्यांच्यावरचा एकही मनुष्य जिवंत राहणार नाहीं. "

ह्यावर ' तथास्तु ' म्हणून सर्व शेतकऱ्यांनीं माना डोलविल्या. कारण, त्यांचे आत्मे दुःखानें होरपळत होते, हें काय सांगावयास पाहिजे ? त्या दिवशीं स्कॉटलंडांतील पर्वतांवर स्वच्छ व निरभ्र आकाश होतें. आणि अटलांटिक महासागर उन्हाच्या तापानें असा कांहीं चकाकत होता कीं, त्यावरून कोलंबाचे भविष्य खरें होण्याचा तिळमात्र संभव नव्हता. परंतु ईश्वराची करणी अगाध आहे. कोलंबानें काढलेल्या उद्गारांत ओतप्रोत भूतदया भरलेली होती. त्याचा अंतरात्मा त्या दीनदुबळ्या लोकांच्या दुःखानें होरपळत होता. त्याच्या हृदयांत स्वार्थाचा एक लवलेश नव्हता. तेव्हां अर्थात् त्याचें भाषण सत्य करून दाखविण्याचा भार ईश्वरावर पडावा हें साहजिक आहे. म्हणून त्यानेंही आपली अद्भुत माया दाखवून त्या लोकांस थक्क करून सुखांत ठेवलें म्हटलें तरी चालेल. कारण, कोलंबा हे उद्गार काढून थोडा वेळ झाला न झाला तोंच उत्तरेकडच्या बाजूला आकाशामध्यें फार लांबीच्या पल्ल्यावर एक लहानसा ढगाचा ठिपका दिसूं लागला. आणि तो वाढतां वाढतां इतका वाढला कीं, त्यानें सारें आकाश व्यापून जिकडे तिकडे अंधारी आली. पाऊस गच्च भरून येऊन चमचम चमचम विजा चमकूं लागल्या. मेघगर्जनांचा तर सारखा कडकडाट सुरू झाला. दरीखोरीं, पर्वत, नद्या व समुद्र ह्यावर मुसळधार पावसाची वृष्टि ओतली. वारा तर असा तुफान सुटला कीं, मोठमोठाले अजस्र वृक्ष मोडून व उन्मळून पडूं लागले. ह्या ईश्वरीक्षोभांत लानचीं तीं जहाजें आणि त्यांच्यावरचे लोक आणि स्वतः लान कोठें गडप झाला त्याचा पत्ताच लागला नाहीं ! समुद्राच्या तळीं जाऊन ते कोणत्या खबदडींत पडले असतील, कां माशांच्या

व जलचरांच्या भक्ष्यस्थानीं पडले असतील तें परमेश्वर जाणें ! पण दुसऱ्या वर्षापासून त्या शेतकऱ्यांच्या पाठीमागचा हृद्रोग नाहींसा झाला आणि ते सुखांत नांदू लागले.

हा कोलंबा साधु सहाव्या शतकांत होऊन गेल्याचें इतिहासप्रसिद्धच आहे. ह्यावरून असें वाटतें कीं, अंगीं खरें खरें साधुत्व पाहिजे; आपलें तन, मन, धन, सर्व परोपकाराकडे वळलेलें पाहिजे. त्यांत स्वार्थाचा गंधही कामाचा नाहीं. अशी वृत्ति झाली म्हणजे आत्मस्वरूपाची खरीखरी ओळख झाली म्हणून समजावें. आपण स्वतःच परमात्मा बनल्यावर त्याच्या इच्छा-शक्तीनें काय एक होणार नाहीं ? सर्व सृष्टीमध्यें इच्छाशक्ति हीच कायती मुख्य आहे. तिलाच आपण ईश्वरी माया म्हणतों. ती परमात्माची दासी आहे. मात्र परमात्म्याचें स्वरूप निर्मल, निर्विकार व निस्पृह असतें हें ध्यानांत असलें म्हणजे झालें. त्याला अनुसरून कृति घडल्यावर शापोक्ति किंवा आशिर्वाद खरे होतील ह्यांत फारसें नवल वाटावयास नको. मग ती वृत्ति ब्राम्हणाची असो, शूद्राची असो, आंग्ल साधूची असो, कीं एखाद्या आफ्रिकेंतील शिद्याची असो; तिचा परिणाम जगावर घडल्यावांचून राहणें शक्यच नाहीं.

ही पाश्चात्य देशांतील गोष्ट झाली. आमच्या देशांत तर अशा गोष्टी अनेक वेळां घडल्या आहेत. व सांप्रतही--तुरळक कां होईना, परंतु घडत आहेत. श्रीसमर्थांनींही एक वेळ असा पाऊस पाडल्याचा दाखला सांप-डतो. तो पुढें येईलच. पण कांहीं वर्षोपूर्वी पनवेल येथें असाच एक पर्जन्य-वृष्टीचा चमत्कार घडून आला होता. तेवढा येथें सांगणें अशा प्रसंगीं कांहीं वावगें होणार नाहीं असें वाटतें, म्हणून तोही प्रकार थोडक्यांत सांगतों.

इ स. १८७८ च्या सुमारास जो मोठा भयंकर दुष्काळ पडला त्या सालीं अनावृष्टीनें जिकडे तिकडे एकच हाहाःकार उडाला होता, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. त्यावेळीं पनवेलीसही कैक दिवस पावसाचा थेंब नाहीं व पुढेंही पडण्याचें चिन्ह नाहीं, हें पाहून तेथील ग्रामस्थ मंडळीही अगदीं हवालदील होऊन गेली. कोणांस कांहीं सुचेना. पाऊस पडण्याला उपाय काय ? त्याला उपाय एकच. तो कोणता? तर परमेश्वराचें अनुष्ठान !

ईश्वराची प्रार्थना ! तो परमेश्वर केवळ ब्राह्मणांच्या हातीं, ही पूर्वापार समजूत. ‘ शापादपि शरादपि ’ हें ब्राह्मणांचें बिरुद ! आणि ब्राह्मणांचीं शस्त्रें कोणतीं ? तर पर्जन्यसूक्त, रुद्राभिषेक, संततधार, लघुरुद्र, महारुद्र, आणि अखेरचें पाशुपतास्त्र कोणतें ? तर शृंगऋषी ! हीं अनुष्ठानें एकामागून एक त्यांनीं सुरू केलीं. जिकडे तिकडे पावसासाठीं हाकाटी चाललीच होती. संततधार सुरू केली; रुद्राभिषेक झाले; लघुरुद्र, महारुद्र, सर्व कांहीं जारीनें सुरू झालें; पण पावसाचा थेंब नाहीं. देवाला पाण्यांत कोंडलें, तरी ज्याचें नांव तें ! अनुष्ठानाच्या वगैरे खर्चासाठीं कांहीं वर्गणी गोळा केली होती. तिला बाजारांतील शेटसावकारांनींही हातभार लावला होता. त्या सर्वांचे डोळे एकसारखे पावसाकडे लागून राहिले होते. जो तो म्हणे, पाऊस कधीं पडतो ? ब्राम्हणांनीं म्हणावे “ आज पहा; उद्यां पहा. ” या गोष्टीला आठ दहा दिवस लोटले. आकाशांत ढग सुद्धां नाहीं ! त्यामुळें सारे लोक ब्राह्मणांस चिडवूं लागले. ‘ कां बामण बुवा ! कुट हाय पाऊस?” अखेर ब्राह्मणही इरेस पडले. सारे ब्राह्मण भट भिक्षुक पहाटे स्नानें करून जे एकदां अनुष्ठानास बसत ते सायंकाळपर्यंत हालत नसत. सर्व दिवस उपोषण. सारे एकदिलानें झटत होते. त्यांस वाटे ब्राह्मणाचें सत्त्व आजच सारें नष्ट झालें काय ? देवळांत सोंवळ्या ब्राह्मणांची गर्दी व पहाणारांचीही दाटी. ज्यानें त्यानें उपहास करावा कीं, ‘ कां बामण बुवा ! पाऊस कवा आणतां ? ’ साऱ्या ब्राम्हणांचीं तोंडें वाळून चिमणीसारखीं झालीं. अखेर आतां काय करावें ? ही ब्राह्मणांस विवंचना पडली. कोणत्याही उपायानें पाऊस पडेनासा झाला, म्हणजे अखेरचें ब्राह्मणांचें ब्रह्मास्त्र कोणतें ? तर शृंगऋषीचा भलामोठा पुतळा करून त्याचें आराधन करावयाचें; कीं, पाऊस हा ठाम पडावयाचाच. ही ब्राह्मणधर्माची पूर्वापार प्रतिज्ञा ! हें मनांत आणून पनवेलकरांनीं शृंगऋषींची स्थापना करावयाचें ठरविलें. शृंगऋषीचा विधि मोठा बिकट असतो. सर्वांनीं जमून शृंगऋषीचा मोठा जगड्व्याळ मृत्तिकेचा पुतळा करावयाचा असतो. नंतर त्याचे पूजा अनुष्ठान वगैरे विधि ! इतकें होतें तरी करावयाचा म्हणून तेथील ब्रह्मवृंदांनीं कंबर बांधली. सकाळपासून सारे ब्राह्मण झटून त्याच कामास लागले. मुलेंबाळेंसुद्धां चिखलाचे गोळे करून देऊं लागलीं. गांवांतील सारे भिक्षुकच आले असें

नाहीं, तर इतर गृहस्थ मंडळी व वकील मंडळीही तमाम गोळा होऊन शृंगऋषीचा पुतळा उभारण्याचें काम सुरू झालें.

आधींच शेंकडों लोक ब्राह्मणांचें अनुष्ठान पहावयास येत होते. त्यांत आतां तर काय ? ' समदं बरामन शिंगरुशी करत्यात ' ही अवई उठली ! ह्यामुळें खेड्यापाड्याचे लोकसुद्धां जमूं लागले. तमाम ब्राह्मणलोक सोवळ्यांनीं देवालयापुढें जमून भराभर चिखलाचे गोळे तयार करून श्रृंगऋषीची भव्य मूर्ति तयार होत चालली. दुपार भरली ! पुतळ्याला बहुतेक आकार आला. तरी पाऊस आहे कोठें ? त्याचा ठिकाण नाहीं.

इतर जातींचे लोक ब्राह्मणांची टवाळी करूं लागले. ' बामन बुवा ! आना, आतां पाऊस आना. ' असा जनापवाद ऐकूं येऊं लागला. ब्राह्मणांची निखालस सत्त्व जाण्याची पाळी आली. अद्याप ब्राह्मणांस वाटत होतें कीं, आपल्यामध्ये कांहीं तरी ब्रह्मतेज म्हणून आहे. तो भ्रमाचा भोपळा फुटण्याची वेळ येऊन ठेपली. आजही पाऊस न पडेल तर सारें ब्राह्मण्यच नष्ट झाल्यासारखें झालें असें मनांत येऊन सारे ब्राह्मण चिंताक्रांत झालेलें स्पष्ट दिसूं लागलें. सर्वांचे डोळे आकाशाकडे ! पण कोठें ढगाचा ठिपका नाहीं!

अखेर परमेश्वरास करुणा आली. दोन वाजावयाच्या सुमारास आकाशांत उत्तरेकडे एक ढग दिसूं लागला. सर्वांच्या मुखावर आशेचें तेज दिसूं लागले. होतां होतां तीन वाजले नाहींत तोंच मस्तकावर काळा भोर ढग भरून आला व चार वाजतां पर्जन्याला सुरवात झाली. ती कशी ? तर केवळ मुसळधार ! सर्वांस 'दे माय धरणी ठाय' असें होऊन गेलें. कशाचा श्रृंगऋषी आणि कशाचें काय ? चट सारा पुतळा वाहून गेला ! साऱ्या बाजारांत पाणीच पाणी होऊन रस्ता बंद पडला. होड्या घालून मनुष्यांचे प्राण वाचवावे लागले. मग तो आनंद काय विचारावा ? साऱ्या ब्राह्मणांस तर जाणों काय कुंडींत नवा प्राण आल्याप्रमाणें वाटलें. ह्यावरून,

**तुजकरितां नोहे ऐसें कांहीं नाहीं ।**

हाच तुकाराम महाराजांचा सिद्धांत अनुभवास आला.

अशा प्रकारें पनवेलच्या ब्राह्मणांचें परमेश्वरानें त्यावेळीं सत्व राखल्यानें अद्यापही तेथील ब्राह्मणलोक त्याचे पोवाडे गात असतात. आतां ह्यालाही

कदाचित् आमचे अर्वाचीन पंडित ‘ काकतालीय न्याय ’ असेंच म्हणतील. म्हणोत बिचारे. पण कावळा बसायला व डहाळी मोडायला गांठ पडणें हा तरी परमेश्वराच्या घरचा अद्भुत संकल्प नव्हे काय?

ह्यावरून तरी समर्थ लोकांचा अंमल पंचमहाभूतावरही चालूं शकतो हा अर्वाचिन पंडितांनीं बोध ग्रहण करावा.

ह्यासंबंधानें आणखीं एक विशेष गोष्ट आहे ती ही कीं,एखाद्या मनुष्यानें दुसऱ्याचा छळ केला,तर त्या मनुष्यानें त्याला प्रत्यक्ष शाप दिला तरच हानी होते, नाहीं तर कांहीं होत नाहीं, अशांतला मात्र भाग नाहीं. तर कोणाचें ही मन विनाकारण कोणी दुखविलें तर दुःख सोसणारा मनुष्य कितीही क्षमाशील व शांत असला तरी त्या दुःख देणारास आपोआपच त्याची शिक्षा होते. म्हणजे सज्जनाशीं जे सद्भावनेनें वागतात, त्यांचा शेवट अमृताहूनही गोड होतो; त्याला आशिर्वादाचीच गरज आहे असें नाहीं. आणि जे दुष्ट भावनेनें वागतात, त्यांचा शेवट आपोआपच विषाहूनही कडू होतो. त्याला प्रत्यक्ष शापाचीही गरज लागत नाहीं. ह्या सर्व गोष्टी सृष्टिनियमानुसारच घडत असतात.

७ **प्रेमबंधन**—दोन मनुष्यांचा जीवात्मा अत्यंत प्रेमानें दृढतर परिचयानें किंवा निस्सीम भक्तीनें एकरूप होत असतो. म्हणजे त्यांची नेहेमीं तादात्म्यता होत असते. अशा मनुष्यांपैकीं एकाचा प्राण गेला कीं, तत्काळ दुसऱ्याचाही आपोआप जातो. ‘ गीतगोविंद ’ काव्याचे सुप्रसिद्ध कवि जयदेव ह्यांच्या पत्नीनें आपला पति मृत झाल्याचें कानीं पडतांच आपला देह ठेवला! हें कथानक सर्वविश्रुतच आहे. अश्वत्थामा मृत झाला हें ऐकून द्रोणाचार्यांनीं आपला आत्मा ब्रह्मांडीं नेला होता! अशा प्रकारची उदाहरणें वर्तमानपत्रांतून हल्लीं सुद्धां कधीं कधीं कानावर येतात. परंतु तीं कोणीही टिपून ठेवीत नाहीं. तथापि अशा प्रकारच्या दृढतर स्नेहानें दोन जीवांचें तादात्म्य कसें होतें व त्यांना एकसमयावच्छेदेंकरून मृत्यु कसे येतात, त्यांच्या संवदेना कशा एकरूप असतात याचा एक अद्‌भुत प्रयोग प्रत्यक्षच येथें सांगतों.

## गोगलगायीचें तारायंत्र.

पूर्वीं आम्ही ' लंघन—चिकित्सा शिक्षक ' ह्या पुस्तकाचे लेखक रा. रा. जोशी ह्यांच्या प्रस्तावनेंतील एक लहानसा चुटका दिला आहे. त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं " अशा रीतीनें एकमेकांच्या मनांत एकच गोष्ट एकदम उद्भवणें हें कांहीं अंशीं 'गोगलगायीच्या तारायंत्रा'प्रमाणेंच आहे." हा जो गोगलगायीच्या तारायंत्राचा त्यांनीं उल्लेख केला आहे, दृष्टांत दिला आहे, त्या अद्भुत तारायंत्राच्या प्रयोगाची प्रत्यक्ष कृतीच आम्ही खालीं सांगतों.

गोगलगाय हा प्राणी पावसाळ्यांत जमिनीवरून चालतांना किंवा भिंतीवर वगैरे चढतांना पुष्कळांनीं पाहिलेलाच आहे. हा एक चपटासा काळसर किंवा उदी रंगाचा लांबट लिबलिबीतसा मांसल असा एक गोळाच असतो म्हटलें तरी चालेल. ह्याच्या तोंडापाशीं दोन लहान लहान मांसलच शिंगासारखें अवयव असतात. दुसरा त्याला कोणताच अवयव नसतो म्हटलें तरी चालेल. कारण, डोळ्यांना तरी त्याचे अवयव दिसत नाहींत. फार तर काय, पण ह्याला पाय सुद्धां नसतात. तो पोटानेंच हळूहळू सरकत जात असतो. गोगलगायीची गति इतकी मंद आहे कीं, ती जाग्यावरून हालल्याचें फारकरून समजतही नाहीं. हा प्राणी चालूं लागला म्हणजे त्याच्या पोटाचा भाग जमिनीला, भिंतीला किंवा झाडाला लागून जातो, तेथें तेथें चांदीसारखा लहानसा पांढरा सफेत डाग पडत असतो.

ह्यावरून ह्या प्राण्याची ओळख सर्वांस पटेलच. ह्या गोगलगायी दोन राहतील इतक्या बेताच्या मोठ्या टिनच्या किंवा दुसऱ्या कशाच्या तरी ५२ डब्या खरेदी कराव्यात. ह्या प्रत्येक डबीस हवा आंत जाईल अशा बेताचीं भोकें पाडावींत किंवा जाळी बसवावी. नंतर ह्या डब्यांपैकीं २६ डब्या घेऊन त्यांच्यावर A. B. C. D अशीं इंग्रजीं २६ अक्षरें घालावींत. नंतर ५२ जिवंत गोगलगायी धरून आणून अक्षरें घातलेल्या प्रत्येक डबींत २।२ याप्रमाणें ठेवाव्यात. प्रत्येक डबींत थोडी ओली माती, शेवाळ वगैरे त्यांचें निर्वाहाचें द्रव्य ठेवावें. आणि ह्या २६ अक्षरें घातलेल्या डब्या सुमारें १५ दिवस झांकून ठेवाव्यात. मधूनमधून डब्या उघडून पहावयास

हरकत नाहीं. तरी पण त्या फार वेळ उघड्या ठेवूं नयेत. किंवा त्यास हालचाल करावयास फारशी सवड देऊं नये. किंवा डबीवर चढूनही येऊं देऊं नयेत. याप्रमाणें ८।१५ दिवस गेले म्हणजे दुसऱ्या रिकाम्या असलेल्या सव्वीस डब्या घेऊन त्यांच्यावरही पूर्वीप्रमाणेंच ए. बी. सी. डी. अशीं इंग्रजी अक्षरें लिहावींत व त्या डब्यांतही पूर्वीच्या डब्यांत घातल्याप्रमाणें थोडी चिकण माती, शेवाळ वगैरे त्या प्राण्यांच्या पोषणाचे थोडेसे पदार्थ ठेवावेत.

नंतर पहिल्या डब्यांपैकीं ए. अक्षराची डबी उघडून त्यांत असलेल्या दोन गोगलगायींपैकीं, एक गोगलगाय काढून ती नव्या अक्षरें लिहिलेल्या डब्यांतील ए. अक्षराच्या डबींतच ठेवावी, आणि ती डबी झांकावी. ह्याप्रमाणें बीमध्यें बी; सीमध्यें सी; अशा २६ अक्षरांच्या डब्या सव्वीस अक्षरांनीं भरून टाकाव्यात. ज्या अक्षराची गोगलगाय त्याच अक्षराच्या डबीमध्यें गेली पाहिजे. त्यांत चूक होतां कामा नये हें पूर्णपणें लक्षांत ठेवावें.

असें केलें म्हणजे ए, बी. अक्षरांचे २६ डब्यांचे २ जोड तयार होतात. ह्यांपैकीं एक सेट आपल्यापाशीं ठेवावा व दुसरा सेट आपल्या दुसऱ्या स्नेह्यापाशीं देऊन त्याला कितीही अंतरावर जावयास सांगावें. किंवा एखाद्या परगांवीं पाठवावें. नंतर अमुक दिवशीं अमुक वाजतां अमुक मिनिटांनीं तार–बातमी घालावयाचा संकेत करून ठेवावा. प्रथम बातमी कोणी द्यावयाची हेंही ठरवून ठेवावें. आणि त्या संकेताच्या दिवशीं उभयतांनींही आपआपल्या ठिकाणीं आपआपल्या डब्यांचीं झांकणें काढून त्यांतील गोगलगायींकडे पहात बसावें.

ज्याच्याकडे बातमी देण्याचें काम असेल त्यानें आपल्यापाशीं एक लांबसें लोखंडी दाभण घ्यावें. आणि तें दिव्यावर थोडेंसें तापवून–फार तापवूं नये–ह्याचें कारण फार तापलेलें दाभण गोगलगाईस लावलें तर ती तत्काल मरेल. थोडेंसें तापविलें म्हणजे तिचें आंग थोडेंसें भाजतें पण ती मरत नाहीं. हें दाभणाचें तापविलेलें टोंक ज्या डबींतील गोगलगायीस लावाल ती गोगलगाय तेथें तडफडूं लागते व आंगास आळेपिळे देते. तिनें हालचाल केली कीं, त्याच अक्षराच्या दुसऱ्या गांवच्या डबींतील गोगलगायही

तडफडूं लागते. अशा रीतीनें पाहिजे त्या डबींतील गोगलगायीस तापलेलें दाभणाचें टोंक लावून हवी ती बातमी पाठवितां येते.

'मुंबई' शब्द कळवावयाचा असला तर बी, ओ, एम, बी, ए, वाय् ह्या डब्यांतील गोगलगायींना डिवचलें म्हणजे त्याच डब्यांतील दुसऱ्या गांवांतील गोगलगायी हालूं लागतील. ह्याप्रमाणें पाहिजे तो मजकूर तार बातमी प्रमाणें पाठवितां येतो.

दाभण अधिक तापवून लाल केलें, आणि ते एखाद्या डबींतील एका गोगलगायीस लावलें आणि ती तत्काल मेली, तर त्याच अक्षराच्या डबींतील दुसऱ्या गांवची गोगलगायही तत्काल मरण पावेल. ह्याचें कारण पुष्कळ दिवसांच्या सहवासानें त्यांचा जीवात्मा एकरूपच झालेला असतो.

असा प्रकार इतर कोणतेही प्राणी किंवा जीव घेतले तर कां होऊं नये? तोही होणें शक्य आहे. परंतु शांति, गांभीर्य व सत्वस्थ स्वभाव हे ज तादात्म्यता होण्याचे प्रधान गुण ते जसे ह्या गोगलगायींत असतात, तसे इतर प्राण्यांत नसतात. म्हणून हा प्रयोग गोगलगायीवरच होतो. ह्या कामास मुंगळे घेतले तर काय होय? कारण तो बिचारा एक क्षणभरही स्थिर राहणारा नव्हे. तो दुसऱ्या जीवाशीं सख्यत्व करतो कशाला?

कांहीं वर्षांपूर्वी राधिका व दुधिका ह्या नांवाच्या दोन जुळ्या मुली मुंबईस आल्या होत्या. त्यांचीं शरीरें अगदीं भिन्न भिन्न असून नाभीपाशीं मात्र चार बोटें चामडीनें जडलेलीं होतीं. त्यांची सचित्र माहिती के. को. व. ६ अं. १२ मध्यें दिलेली आहे. ह्या दोघींचे देह जसे एकत्र होते, तसेच त्यांचे जीवात्मेही एक होते. त्यांपैकीं एकीस आम्ही एक फोटो पसंत करण्यास सांगितला. तो तिनें रामाचा पसंत केला. नंतर तो दुसरीस दिसूं न देतां आम्ही तिच्या पुढें सारे फोटो नेऊन ठेवले. व तिनें पसंत केलेला फोटो कोणता म्हणून विचारलें. तेव्हां तिनें नेमका रामाचाच फोटो उचलून दिला! ह्यावरून प्रेमानें किंवा भक्तीनें दोन जीवांचें तादात्म्य होऊं शकतें, हा सिद्धांत अगदीं स्पष्ट होतो.

८ इच्छामरण—सिद्धि सामर्थ्यवान् लोकांची पंचमहाभूतांवर सत्ता चालते त्याप्रमाणेंच मृत्यूवरही त्यांची सत्ता चालते. मृत्यु जर मी आज येतो असें त्यांस म्हणेल तर ते त्यास बेलाशक सांगूं शकतात कीं, माझी

अमुक अमुक कामें व्हावयाचीं आहेत; तीं झाल्याशिवाय मी येत नाहीं. तर त्याच्यापुढें मृत्यूलाही चूप बसावें लागतें. किंवा मृत्यु म्हणेल कीं मला आज वेळ नाहीं; तर ते त्याची वाट पहात न बसतां पाहिजे तेव्हां देह टाकून मोकळे होतात! अशांपैकीं प्रसिद्ध उदाहरण म्हणजे भीष्माचार्यांचें होय. भीष्माचार्य रणांगणीं पतन पावले, त्यावेळीं दक्षिणायन होतें. तो काल मरणास उक्त नव्हे, म्हणून ते उत्तरायण लागेपर्यंत शरपंजरी निजून होते, व उत्तरायण लागतांच त्यांनीं आपला देह ठेविला. ही गोष्ट महाभारतांत आहेच.

पण नेहेमींच्या अनुभवांत सुद्धां अशीं उदाहरणें कैक वेळां आढळण्यांत येतात. कित्येकांस दुखणें बाणें कांहीं नसतें. ते चांगले बोलत चालत असतात. आणि एकाएकींच सांगतात कीं, आम्ही आज अमुक वाजतां देह ठेवणार! आणि त्याप्रमाणें ते खरोखरच आपला देह ठेवतात. अशीं उदाहरणें ज्याचीं त्यांनींच शोधून पहावींत म्हणजे थोडीं कां होईनात परंतु आढळल्यावांचून रहावयाचीं नाहींत.

खुद्द आमच्या वडिलांसच म्हणण्यासारखी कोणतीही व्याधी नव्हती. ते प्रातःकाळीं नेहेमींप्रमाणें कृष्णातीरीं जाऊन प्रातर्विधि आटोपून आले. व आमच्या वडील बंधूस म्हणाले "आज आम्ही देह ठेवणार. याकरितां ब्राम्हणांस बोलावून आणून मला तीर्थ द्यावें. वांटेकऱ्यास हांक मारून आणा." हें ऐकून आमचे बंधु चकित झाले. त्यांनीं त्यांस विचारलें कीं, "आज काय होतें आहे? प्रकृतींत कांहीं अधिक आहे कीं काय?" ते म्हणाले "कांहीं नाहीं. आतां आम्ही जाणार येवढें कळतें." त्याप्रमाणें सर्व मंडळी घरीं आली. त्यानीं कृष्णेचें स्नान घालावयास सांगितलें. तदनुसार गार पाणी आणून त्यांस स्नान घातलें. त्यांनीं ब्राह्मणांचें तीर्थ घेतलें; दक्षिणा दिली. व स्वतः साष्टांग नमस्कार घालून 'आतां आम्ही येतों' असें सांगून सर्वांचा निरोप घेतला, व आमच्या वडील बंधूस मांडी द्यावयास सांगितलें. आणि पांचचार मिनिटांतच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें.

असे अनुभव निरनिराळ्या लोकांसही आलेले असणारच. आपल्या लोकांत अशा सर्व गोष्टी टिपून ठेवण्याचा प्रघात नसल्यामुळें आणि लोक त्याकडे द्यावें तितकें लक्ष देत नसल्यामुळें अधिक उदाहरणें देतां येत

नाहींत. तथापि ओघानुसार गोष्टी निघाल्या म्हणजे पुष्कळ लोक सांगणारे आढळतात.

प्रस्तुतच्या श्रीसमर्थ लीलेंतील वेणूबाईचा मृत्यु म्हणजे एक लोकोत्तरांतला लोकोत्तर चमत्कार आहे. वेणुबाई प्रत्येक वर्षी 'मी माहेरास जाते' म्हणून निरोप मागत असत, आणि 'आतांच घाई कशाची? पुढच्या वर्षी पाहूं' अशी समर्थांची आज्ञा होतच असे. चवथ्या वर्षी "ठीक आहे आज कर तयारी." म्हणून समर्थ निरोप देतात. मठांत पुरणावरणाचा नैवेद्य करावयास आज्ञा होते. वेणुबाईस आपल्याबरोबर जेवावयास बसवितात. नंतर कीर्तन करावयास आज्ञा होते. वेणूबाई हातांत वीणा घेऊन प्रहरभर कीर्तन करतात. आरतीच्या वेळीं 'आतां आज्ञा असावी' असें म्हणून त्या निरोप मागतात. व समर्थ 'ठीक आहे. चला तर.' असें म्हणतांच वेणूबाई तेथल्या तेथें सभेंतच देह टाकतात! सारेंच आश्चर्य! मृत्यूवर येवढा अंमल गाजविणें ह्यापेक्षां अद्भुत सामर्थ्य तें काय राहिलें? हे सर्व चमत्कार पुढें समर्थांच्या लीलेमध्यें येणारेच असल्यामुळें त्यांचा येथें अधिक ऊहापोह करण्याचें कारण नाहीं.

८ **शरीर सूक्ष्म करून वायुवेगानें संचार करणें**—आद्य श्री मच्छंकराचार्य मंडणमिश्राच्या घरीं गेलें ते आकाशमार्गानें गेले. समर्थ मिरजेच्या किल्ल्याखालीं जंगींतून जाऊन दिलेलखानास 'ये; म्हणजे तुला राम दाखवितों.' असें म्हणाले. शंकराचार्य देहांतर करून कामशास्त्र शिकलें; रंगनाथस्वामी एक दिवसांत हैद्राबादेहून वडगांवास आले; वगैरे लेख आढळतात. हल्लीं सुद्धां कैक मनुष्यें घेऊन विमानें वर आकाशांत उडतात, कित्येक योगी लोक आपलें आसन हात हात उंच नेऊन दाखविणारे आढळतात. कार्लेकरांच्या वगैरे सर्कशींत वीतभर व्यासाच्या पिपांतून मनुष्य दुमता होऊन सुळकर बाहेर पडतो, तर हीं वर्णनें तरी अशक्य कां म्हणावीं?

९ **मृत मनुष्य जिवंत करणें**—एक वेळ मृत झालेला प्राणी पुनरपि सजीव होणें कधींच शक्य नाहीं. असें असतांही कित्येकांनीं मृत मनुष्य जिवंत केल्याची वर्णनेंहीं ठिकठिकाणीं आढळतात. परंतु मृत्यूवरच ज्यांची सत्ता चालते, जे स्वतःच इच्छामरणी असतात, अशा समर्थ पुरुषांना मृत मनुष्य जिवंत करणें यांत अवघड तें काय? तुकाराम महाराज कीर्तन करीत

असतां, एका तेल्याच्या बायकोनें आपलें मेलेलें मूल रागारागानें आणून त्यांच्या पायांवर टाकलें तेव्हां:—

**अशक्य तें काय तुम्हा नारायणा ।**
**निर्जिवा चेतना आणावया ॥ १ ॥**

हा अभंग म्हणून भजन करतांच तें मूल जिवंत झाल्याची आख्यायिका चालत आली आहे, व या गोष्टीच्या खरेपणाबद्दल हा अभंगच साक्ष आहे; हा अभंग त्यांनीं म्हटला असेल परंतु त्यामुळें मूल जिवंत झालें हें कशावरून? अशी शंका राहतेच. परंतु ज्यानें रामेश्वरभटाच्या आंगाचा दाह शांत केला; पाखरांनीं खाल्लेल्या शेतांतील दाण्यांचें पीक दुप्पट झालें; कीर्तनांत शिवाजी महाराज बसले असतां त्यांच्या भोंवतीं यवनांचा गराडा पडूनही त्यांतून त्यांचा बचाव झाला; अशा सत्पुरुषाच्या भजनानें मृत मूल जर जिवंत न झालें तर:—

**अशक्य तें काय तुम्हा नारायणा ।**
**निर्जीवा चेतना आणावया ॥ १ ॥**

हा जो सिद्धांत त्यांनीं प्रतिपादन केला आहे त्यालाच मुळीं हरताळ लागेला असता. आणि त्याच्यावर पाणी पडून त्यांच्या वाणीला कोणी वेदवाणी म्हटलेंही नसतें!

श्रीसमर्थांनीं तर पंचवटींत असतांनाच सहगमनास निघालेल्या स्त्रीस 'अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव' असा आशिर्वाद देऊन टाकळीच्या कुळकण्याचें प्रेत उठविलें! आणि आठ तर काय पण दहा पुत्र होतील अशी त्या आशिर्वादास पुस्ती जोडून तें आपलें वचन खरें केलें. आणि त्यावरूनच त्यांचें 'दशपुत्रे' हें आडनांव कायम झालें. त्या उपकाराप्रीत्यर्थ त्या साध्वीनें आपला पहिला मुलगा स्वामीचरणीं अर्पण केला. तेच उद्धव गोसावी होत. येवढीं स्मारकें डोळ्यापुढें असतां त्या गोष्टींना घडघडीत खोटें म्हणावें काय? ज्यांना म्हणवेल ते म्हणोत. 'समर्थ' हे थोरामोठ्यांनीं दिलेलें नांव पाहून तरी असें म्हणणारांनीं थोडीशीं मान खालीं घालावी. पण ह्या सर्व गोष्टींचें विवेचन पुढें समर्थांच्या लीलेमध्यें येणारच आहे.

अशा प्रकारें इच्छाशक्तीचें सामर्थ्य किती प्रबळ असतें हें सांगितलें.

त्याच सामर्थ्यावर साधुसंतांनीं अनेक चमत्कार केलेले आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनीं रेड्याच्या मुखानें वेद बोलविले! हें खोटें म्हणावें तर तो रेडा त्यांनीं आपल्यां बरोबर घेतला होता. आणि तो ज्या गांवीं समाधिस्थ झाला, त्या गांवीं 'म्हसोबा'ची मूर्ति स्थापन केलेली आहे. येवढेंच नव्हे, तर 'म्हसोबा' हें दैवत महाराष्ट्रांत तेथपासूनच उत्पन्न झालें. तेंच ह्या गोष्टीचें जिवंत स्मारक आहे. तेव्हां ती गोष्ट खोटी तरी कशी काय मानावी? वासुदेव शास्त्री देवाच्या दुराग्रहावरून समर्थांनींही एका अंत्यजाकडून त्यांच्याशीं वाद करविला होता! त्या अंत्यजानें म्हणजे महारानें आपल्या पूर्वजन्माची सर्व हकीकत समर्थांस निवेदन करून तेथेंच मुक्ति घेतली! त्यानें जेथें मुक्ति घेतली तेथें मोठा दगड स्थापन केलेला आहे. त्या महाराचें नांव बहिऱ्या होतें, म्हणून त्या धोंड्यालाही आतां 'बहिर्धोंडा' असेंच म्हणतात.

चांगदेव, ज्ञानेश्वर महाराजांना भेटावयास आले ते वाघावर बसून आल्याचें वर्णन आहे. हल्लींही कार्लेकराच्या वगैरे सर्कशींत ढाण्या वाघालाही जर हुकमांत वागवितात, त्यांस खांद्यावर घेतात, बकऱ्यापुढें बोलावून आणतात, तर चांगदेव वाघावर बसून आले ह्यांत मोठेसें नवल तें कसलें?

तुकाराम महाराजांनीं तेल्याचें मूल उठविलें; ज्ञानेश्वरांनीं सच्चिदानंद बुवांना जिवंत केलें; समर्थांनीं टाकळीच्या कुळकर्ण्याला पुन्हा संसारांत घातलें, ह्यांत तरी अघटित तें काय? मृतानें जिवंत होणें हें सामान्य दृष्टीला केवळ सृष्टिनियमाच्या विरूद्ध आहे असें वाटतें. परंतु तें कांहीं तितकें सृष्टिनियमाच्या विरुद्ध नाहीं. मृतसम झालेलें बेडूक, साळू वगैरे प्राणी कित्येक महिन्यांनीं पुन्हा जिवंत होतातच. ही गोष्ट प्राणीशास्त्रवेत्त्यांना माहीत आहे. पाण्यांत पडलेलें मनुष्य मरून तास दोन तास लोटलेलें सुद्धां पुन्हां जिवंत होऊं शकतें. रशियाचे झार दुसरे अलेक्झांडर ह्यांनीं असा प्रहरभर पाण्यांत पडून मेलेला मनुष्य जिवंत केला होता. एक बेडेकर या नांवाचा मुलगा कृष्णेमध्यें पोटाशीं घागर घेऊन पोहत असतां पाण्यांत बुडाला. त्याला पाण्यांतून शोधून काढून वर आणावयाला तासाच्यावर वेळ गेला होता. तो बाहेर काढला तेव्हां त्याला श्वासोच्छ्वास नव्हता, किंवा जिवंतपणाची कोणतीही खूण नव्हती. तरी त्याच्या बापानें त्यास कुंभा-

राच्या चाकावर घालून गरगर फिरवून पोटांतील पाणी वगैरे काढून टाक-ल्यावर बऱ्याच वेळानें त्याचा श्वासोच्छ्वास सुरू झाला. व कांहीं वेळानें तो सावध झाला!

पण ह्याहीपेक्षां मृत्यु हा इच्छाशक्तीच्या किती स्वाधीन असतो, हें पहाणें असल्यास व प्रत्यक्ष मेलेला मनुष्य दहा दहा महिन्यांनीं सुद्धां कसा जिवंत होतो ह्याची साक्ष पाहिजे असल्यास रणजितसिंगाच्या कारकीर्दींत जो फकीर १० महिने जमिनींत पुरून घेऊन जिवंत निघाला होता, त्याची हकीगत वाचावी. ही हकीगत अत्यंत महत्त्वाची, अत्यंत अद्भुत व या विषयास विलक्षण पुष्टिकरक असल्यामुळें तेवढी आम्ही मुद्दाम येथें दाखल करतों.

## १० महिने जमिनींत पुरून घेऊन जिवंत झालेला फकीर!

ही लोकोत्तर गोष्ट इ. स. १८३८ मध्यें रणजितसिंगाच्या कारकीर्दींत प्रत्यक्ष घडलेली असून त्या फकिराचें चित्र व वर्णन, मूळ 'London Magazine,' नामक इंग्रजी मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें आहे. व तिच्यावरून 'केरळकोकिळ' नामक मासिक पुस्तकाच्या पंधराव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत त्याचा उतारा घेऊन त्या फकिराचें चित्रहि पण दिलें आहे. त्याचा वृत्तांत असाः—

" खालीं दिलेली गोष्ट खरोखर घडलेली आहे किंवा नाहीं ह्याबद्दल खालीं ज्या मोठमोठ्या सन्माननीय [ इंग्लिश ] गृहस्थांच्या साक्षी दिल्या आहेत त्यावरून तसा संशय घेण्यास जागाच राहत नाहीं. पंजाबमध्यें एक फकीर होता. तो मोठा अवलिया असे. तो कोणापाशीं कशाचीच याचना करीत नसे. तो रस्त्यांतून स्वच्छंद फिरे. एकांतांत राही. कोणी कांहीं भक्तिभावानें आणून देई तेवढ्यावर निर्वाह करून निरंतर ब्रह्मानंदांत निमग्न असे. तो सर्वांशीं मृदु व मधुर असें भाषण करी. तथापि फार निस्पृह असे. त्याला राजा व रंक दोन्हीही समसमान वाटत असत. हा विरक्त मनुष्य कधीं कधीं स्वेच्छेनेंच समाधि लावून घेऊन त्या मृतवत् स्थितीमध्यें कित्येक दिवस राही, व पुन्हा पूर्ववत् जिवत होत असे. त्यानें अनेक वेळ आपल्याला पुरून घेतलें होतें व कैक महिन्यांनीं तो जिवं-

तच्या जिवंत बाहेर पडला होता. आणि ही त्याची कीर्ति त्यावेळचे शीख लोकांचे महाराज रणजितसिंग ह्यांच्याही कानावर गेली. कित्येक दिवस तर त्यांना ती खोटीच वाटत होती. परंतु पुढें मोठमोठ्या लोकांनीं जेव्हां त्यांची अगदीं खात्री केली तेव्हां त्यांनीं ती गोष्ट स्वतः पाहण्याचा निश्चय केला. तरी त्यांत कांहीं तरी ढोंग असलें पाहिजे, असा त्यांस दृढतर संशय होता. तथापि तो काय प्रकार आहे, त्याचा छडा काढण्याचा त्यांनीं कृतनिश्चय केला. त्यांनीं त्या फकिरास राजवाड्यांत सन्मानानें बोलावून आणलें; व आपण कृपा करून माझ्या समक्ष एक वेळ समाधि लावावी म्हणून विनंती केली. ती त्या फकिरानें मोठ्या आनंदानें मान्य केली. काय काय तयारी पाहिजे म्हणून महाराजांनीं विचारल्यावर त्यानें सांगितलें कीं, " मला बसतां येईल असें एक प्रशस्त चुनेगच्ची थडगें, जमिनीमध्यें सुमारें तीन पुरुष खोल तयार करावें. तेथें एक मजबूत पोतें किंवा गोण, एक मेणाचा गोळा, एक मजबूत पेटी कुलूप किल्लीसह, लाख, व राजमुद्रा इतकें सामान तयार असावें. मग मला कसें बसावयाचें तें मी तेथें सांगेन. त्याप्रमाणें तेथें बसवून त्या थडग्यावर माती लोटून तें बुजवून टाकावें, व त्यावर पाहिजे असल्यास कांहीं धान्य पेरावें म्हणजे संशय राहणार नाहीं. नंतर आपणांस वाटेल तेव्हां वर्षानें किंवा सहा महिन्यांनीं मला उकरून बाहेर काढा व माझ्या टाळूवर पाणी ओता म्हणजे मी पुन्हा देहभानावर येईन." इतकें सांगून तो फकीर निघून गेला. रणजितसिंग महाराजांनीं फकिरानें सांगितल्याप्रमाणें कारभाऱ्याकडून सर्व तयारी करविली.

तेथेंच राहणारे दोन इंग्लिश ऑफिसर रणजितसिंग महाराजांचे मोठे स्नेही होते. एक जनरल व्हेंचुरा आणि दुसरे क्याप्टन वेद. त्यांस त्यांनीं दरबारांत बोलावून आणून ही फकिराची हकीगत कळविली. तेव्हां त्यांनीं बहुतेक असंभाव्य आहे असें सांगून तिचा बराच उपहासच केला म्हटलें तरी चालेल. तथापि तो फकीर स्वेच्छेनेंच जर पुरून घेण्याला तयार आहे, तर तमाशा पहावयाला आपलें काय जातें अशी संमति दिली. परंतु त्याच वेळीं दरबारांतील दुसरे नामांकित गृहस्थ ती गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्याचेंहि खात्रीनें सांगत होते. ह्याप्रमाणें त्याविषयीं पुष्कळ भवतिनभवति होऊन

अखेर त्यास पुरण्याचा दिवस मुकरर करण्यांत आला, व दरबार बरखास्त झाला. इ. स. १८३८ सालांतील ही गोष्ट आहे.

नेमलेल्या दिवशीं तो चमत्कार पहाण्यासाठीं थडग्याजवळ हजारों लोकांची दाटी झाली. थडगें, रणजितसिंग महाराजांच्या क्यांपामध्येंच तयार केलें होतें. महाराजांची स्वारी आपल्याबरोबर **जनरल व्हेंचुरा** व **क्याप्टन वेद** वगैरे बड्या बड्या इंग्रजी कामदारांसह तेथें येऊन दाखल झाली. शेजारपाजारचें संस्थानिक, राजेरजवाडे, व अनेक शीख सरदारही त्या प्रसंगीं हजर होते. सर्व मंडळी जमतात तोंच फकिरास सूचना गेल्याप्रमाणें तोही तेथें येऊन हजर झाला. त्याचें महाराजासुद्धां सर्व तमाम मंडळींनीं जयघोषपूर्वक फारच सत्कारानें स्वागत केलें. थोडा वेळ क्षेम कुशल प्रश्न वगैरे झाल्यानंतर तो फकीर थडग्यांत शिरण्यासाठीं जाग्यावरून उठला, आणि त्यानें फार प्रेमानें व विनयानें सर्वांचा पुनरपि एक वेळ निरोप घेऊन सर्वांस वंदन केलें. नंतर तेथें असलेलें मेण घेऊन त्यानें आपल्या दोन्ही कानांत, नाकपुड्यांत भरून तीं चारही द्वारें अगदीं बंद करून टाकलीं, आणि मग आपल्या अंगावरचे सारे कपडे उतरून ठेवले. नंतर तेथेंच असलेलें मजबूत बळकट पोतें होतें तें उघडावयास सांगून त्यांत तो आपण जाऊन बसला, व जवळ असलेल्या मनुष्यास म्हणाला, आतां तुम्ही माझ्या जिभेचा शेंडा वर दुमडून ती घशांत कोंबून बसवा. त्याप्रमाणें त्या मनुष्यानें त्याची जीभ दुमडूं लागतांच ती सहज दुमडली गेली, व तिनें त्याच्या घशाचें द्वार बंद केलें. इतकें सर्व झाल्याबरोबर त्या फकिरानें समाधि लावली. समाधि लावतांच ज्या पोत्यामध्यें फकिरास बसविलें होतें तें पोतें नीट रीतीनें बळकट दोऱ्यानें शिवून बंद केलें, व त्यावर महाराज रणजितसिंग ह्यांनीं स्वहस्तें लाख लावून मोहोर केली. नंतर तें फकीर बसलेलें पोतें उचलून एका जवळच ठेवलेल्या भक्कम पेटींत घालून तिला जाड कुलूप लावून त्यावरही पूर्वींप्रमाणेंच मोहोर करून ती पेटी त्या बांधलेल्या थडग्याच्या कमानींत ठेवून दिली. आणि लागलीच त्या थडग्यावर माती लोटून तें बुजवून जमीन अगदीं बेमालूम करून सोडली. ती चांगली तुडविली, तिच्यावर पाणी घालून तेथें जवस पेरले, तेथें विश्वासू मनुष्यांचा खडा पाहरा ठेवला, आणि नंतर सारी

मंडळी आपआपल्या घरीं निघून गेली. इतक्या तजविजी करून शिवाय महाराजांस संशय येत असे, म्हणून ते दिवसांतून दोन वेळां त्या पुरलेल्या ठिकाणावर फेरी मारून येत. ह्या गोष्टीस दहा महिने लोटले. तोंवर त्या जमिनीवर पेरलेल्या जवसाचें पीक येऊन पिकून सुद्धां गेलें. तेव्हां त्या फकिरास उकरून काढण्याची तारीख नेमली. त्या तारखेला पहिल्याहूनही अधिक लोक तो अपूर्व चमत्कार पहावयास जमा झाले. त्यांत दूरदूरचे लोक आले होते. **महाराज रणजितसिंग, जनरल व्हेंचुरा, क्याप्टन वेद** वगैरे बडी बडी मंडळी उत्कंठितपणानें जमा झाली. बहुतेक इंग्लिश कामदारांचें मत होतें कीं, बिचाऱ्या फकिराचें प्रेत मात्र सांपडणार! दुसरें काय!

सर्व मंडळी जमल्यावर जमीन उकरण्यास सुरवात झाली. थोड्याच वेळांत पेटी बाहेर निघाली. महाराजांसमक्ष **जनरल व्हेंचुरा** व **क्याप्टन वेद** ह्यानीं स्वतः मोहोर फोडून कुलूप काढलें. फकिराला बाहेर काढला. परंतु त्याला नाडी नव्हती, ऊब नव्हती, किंवा जिवंत असल्याची कोणतीच खूण उरलेली नव्हती. त्याला पुन्हा देहभानावर आणते वेळीं कोणी एकानें त्याची जीभ हळूच पहिल्यासारखी केली. तेव्हां त्याच्या टाळूला थोडी ऊब येऊं लागली. नंतर त्याच्यावर पाणी शिंपडलें. थोडा वेळ गेल्यानंतर तो चांगला जिवंत झाला! त्याचा श्वासोच्छ्वास चालूं लागला; त्यानें डोळे उघडले; हातपाय हालवूं लागला. सुमारें दोन तास गेल्यानंतर तो फकीर खुशाल त्या जमलेल्या मंडळीबरोबर बोलूं लागला, गप्पा मारूं लागला, व आनंदानें हंसूं लागला. अन्न नसल्यामुळें त्याच्या अंगात थकवा किंवा ग्लानि वगैरे कांहीं एक आलेली दिसत नव्हती.

ह्या अद्भुत मनुष्यानें सांगितलें कीं, ह्या दीर्घ समाधीमध्यें मी फारच आनंदांत व मजेंत स्वप्न पडल्याप्रमाणें होतों. ह्या देहाच्या शुद्धीवर आल्यानें वाईट मात्र वाटतें. अशा समाधीमध्यें लांकडी पेटींतील किंवा पोत्यांतील जीवजंतु देहास चावतील येवढेंच कायतें भय असतें; बाकी कांहीं नाहीं. हा फकीर पूर्ववत् जिवंत होतांच सर्व मंडळीनीं मोठा जयघोष केला. **जनरल व्हेंचुरा** व **क्याप्टन वेद** ह्या इंग्लिश गृहस्थांनीं त्या फकिराचें लागलीच चित्र काढून घेतलें, व ती सारी अपूर्व हकीगत विलायतेस प्रसिद्ध करण्यासाठीं पाठवून दिली."

ह्यावरून समर्थ, साधु, संत, महंत जे जे सिद्धिसामर्थ्यवान् असतात ते ते अद्भुत, अलौकिक व अमानुष चमत्कार करतात, त्याची उपपत्ति बऱ्याच अंशानें लागण्यासारखी आहे. ते चमत्कार आज सर्वत्र दृष्टीस पडत नाहींत, ह्याचें कारण तसे समर्थ पुरुषही हल्लीं निर्माण होत नाहींत. आणि केव्हांही झाले तरी असे पुरुष उत्पन्न होण्याचा योग फार विरळाच असतो. तेव्हां असले चमत्कार विरळाच दृष्टीस पडले तर त्यांत नवल नाहीं. आणि घडतात तेव्हां तरी ते सर्वांच्याच दृष्टीस पडतात थोडेच ! पण ते पहावयास मिळाले नाहींत म्हणूनच ते खोटे म्हणणें किंवा ते तसे घडले म्हणून सांगणारास किंवा लेखकास एकदम भोळसर म्हणून, खोटसाळ म्हणून त्याचे ते लेख बेलाशक झुगारून देऊन त्यांचा नष्टांश करणें हें सुज्ञपणाचें लक्षण नव्हे.

इतका विस्तार करण्याचें कारण, पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, संशोधनाच्या नांवाखालीं, हुतुतू घालणारे कांहीं अर्वाचीन कलमबहाद्दर 'खऱ्या इतिहासा'ची पताका खांद्यावर घेऊन बिचाऱ्या भोळ्या भाविक परंतु अत्यंत सन्माननीय महात्म्यांवर यथेच्छ तोंडसुख घेऊन ह्या अद्भुत चमत्कारावर बहिष्कार टाकून सोंवळीं चरित्रें लिहिण्याचा त्यांनीं हल्लीं प्रघात पाडला आहे. आणि समर्थ रामदास स्वामींच्या चरित्रांत तर असले अद्‌भुत चमत्कार फारच आहेत. किंबहुना त्यांचें सारें चरित्र ह्याच चमत्कारांनीं भरलेलें आहे म्हटलें तरी चालेल. हे सर्व चमत्कार वगळून टाकून चरित्र लिहिणें म्हणजे त्यांचें चरित्र तें काय ? हेंच आम्हास समजत नाहीं. व्यवहारिक गोष्टींचें चरित्र लिहिणें म्हणजे तें कांहीं समर्थांचें चरित्र नव्हे. समर्थ आणि असमर्थ–सामान्य आणि विशिष्ट ह्यांतील भेदच ज्यांना कळत नाहीं त्यांना मनुष्याची पारखच नाहीं असें म्हटलें पाहिजे. तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे:—

**कल्पतरू रूया नव्हति बाभुळा ।**
**पुरविता फळां इच्छिलिया ॥ १ ॥**
**उदंड त्या गायी म्हैशी आणि शेळ्या ।**
**परि त्या निराळ्या कामधेनु ॥ २ ॥**

**तुका म्हणे देव दाखविती दृष्टी।**
**तयां सर्वे भेटी थोर पुण्य॥ ३॥**

रुया, बाभळी व कल्पतरू; गायी, म्हशी, शेळया आणि कामधेनु ह्या कांहीं एक नव्हेत. त्यांच्यांतील भेद कळला पाहिजे; ओळखला पाहिजे. इतर मनुष्येंही मनुष्येंच आहेत; तसेच समर्थही मनुष्यच होत. पण त्यांची कोटी वेगळी. इतर जनांची आणि त्यांची बरोबरी करील तो गाजरपारखी समजला पाहिजे.

तुकोबा म्हणतातः—

**दह्याचीया अंगीं निघे ताक लोणी।**
**एके मोलें दोनी मागूं नये॥१॥**
**आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें।**
**दोहींशीं समान पाहों नये॥२॥**
**पृथ्वीचीया पोटीं हिरा गारगोटी।**
**दोहींशीं संसाटी करूं नये॥३॥**
**तुका म्हणे तैसे संत आणि जन।**
**दोहोंशीं समान मानूं नये॥४॥**

हिरा आणि गारगोटी दोन्हीही पृथ्वीच्याच पोटांतून निघतात तरी तीं दोन्ही एक नव्हेत. त्यांच्यांत जमीन अस्मानाचें अंतर असतें. तीच गोष्ट समर्थ आणि असमर्थ ह्यांस लागू आहे. सामान्य लोक आणि साधुसंत एका मोलानें विकतां कामा नयेत. त्यांना ओळखावयाला रत्न परीक्षकाप्रमाणें दृष्टीही निराळीच लागते. अद्भुत गोष्टींना फांटा देऊन समर्थांचें चरित्र लिहिणें म्हणजे मिठाशिवाय जेवण, अशांतलाच प्रकार होय. आज जर कोणी म्हटलें कीं लो० टिळकांचें चरित्र लिहावयाचें तें 'केसरी' चें नांव वगळून लिहा; किंवा न्या० रानड्यांचें चरित्र लिहिणें तर त्यांचें हायकोर्टांतील काम सोडून लिहा; तर तें कितीसें शोभेल? कारण, त्या गोष्टी तर त्यांच्या मुख्य होत. त्याप्रमाणें अद्भुत चमत्कार ह्या तर समर्थांच्या मुख्य गोष्टी. म्हणूनच त्यांना मोठ्या कौतुकानें व अभिमानानें मोठमोठे लोक 'समर्थ' म्हणत होते. तें सामर्थ्य जर त्यांच्यामध्यें

नसतें तर त्यांस ‘ समर्थ ’ असें गौरवानें कोणी म्हटलें असतें ? कोणीही म्हटलें नसतें.

आतां समर्थांचीं जीं चरित्रें पूर्वीं लिहिलेलीं आहेत तीं तरी त्यांच्या सत्पात्र शिष्यांनीं, त्यांच्या पुण्यशील वंशजांनीं, शिवाजी महाराजांच्या कारभाऱ्यांनींच लिहिलेलीं आहेत. तीं अगदीं शब्दशः खरींच असतील, आतांप्रमाणें तीं चिकित्सेच्या धारवाडी कांट्यांत तोललेलीं असतील, त्यांत अतिशयोक्तीचा गंधही नसेल, असें आम्ही म्हणत नाहीं. मनुष्याच्या स्वभावधर्माप्रमाणें त्यांतही कोठें कोठें कमजास्ती हें असावयाचेंच. पण तेवढ्यावरूनच ते सारे चमत्कार झुगारून देऊन बखरकारांच्या पदरीं बेलाशक खोडसाळपणाचा आळ बांधावा हें कांहीं इष्ट नाहीं. त्यांनीं स्वदस्तुरानें लिहिलेले सारेच चमत्कार खोटे असें मानण्याला आपल्याला तरी अधिकार काय ? आजमितीस ही जगावर कोठें कोठें अद्भुत चमत्कार झालेले आपण ऐकत नाहीं काय ? मग ते तरी तसेच घडले नसतील म्हणून कशावरून ? त्यांत कदाचित् थोडी बहुत अतिशयोक्ति असलीच, तरी तेवढ्यावरून ते सारेच त्यांनीं इतक्या पूज्यभावनेनें नमूद करून ठेवलेले चमत्कार आज नष्ट करून त्यांचा मागमोसही नाहींसा करावा काय ? हल्लींच्या अर्वाचीन पंडितांना जर एखादा निरोप सांगावयास सांगितला, किंवा एखाद्या पाहिलेल्या गोष्टीचें वर्णन लिहावयास सांगितलें तर ते तरी अगदीं ततोतंत—एक अक्षरही न चुकतां सांगूं शकतील काय? नाहीं, ती गोष्ट कधींच शक्य नाहीं. कोणतीही गोष्ट सांगतांना थोडेसें पदरचें तिखट मीठ लावून किंवा थोडें कमजास्ती करून सांगण्याचा मनुष्यजातीचा स्वभावधर्मच आहे. मग येवढ्या आस्थेनें व कळकळीनें लिहून ठेवलेले बखरकारांचे लेख तरी एकदम खोटे ठरवून अजिबात गाळून टाकण्याला आपल्याला अधिकार काय ? क्षणभर कल्पना करूं कीं, हे सारे पूर्वीच्या बखरकारांनीं लिहिलेले चमत्कार अजिबात खोटे आहेत; तरी सुद्धां ते लेख परम आस्थेनें व भक्तीनें लिहिलेले आहेत. ते त्या वेळेच्या मतांचें स्मारक म्हणून तरी कायम ठेवले पाहिजेत. ते अजिबात नष्ट केल्यास पातक मात्र पदरीं पडेल. त्यांचा अर्थ पुढील पिढ्या कसाही करोत; पण ते जसेच्यातसे, पाहिजे तर आपल्या अभिप्रायासह नमूद करणें हेंच आमचें

कर्तव्य आहे. आणखी त्यांना मुळींच कांहीं उपपाचि नाहीं असेंही नाहीं. तर्कवितर्कच चालवावयाचे असतील तर कशावर चालवितां येणार नाहींत? कोणतीही गोष्ट प्रमाणांत असली पाहिजे. हल्लींच्या लोकांचें तर्कवितर्क काढण्याचें व शंका प्रतिशंका काढण्याचें काम प्रमाणाच्या बाहेर गेलेलें दृष्टीस पडतें. तेव्हां अशांच्या नादीं लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुकारामांनीं सारा जन्मच्या जन्म उपदेशांत घालवून अगदीं अखेरेची गुरुकिल्ली वैकुंठास जातांना सांगून ठेवली आहे. ती ही कीं:—

**ऐका ऐका भाविक जन। कोण कोण व्हाल ते॥**
**सोडा तार्किकाचा संग। पांडुरंग स्मरा हो॥**
**नका शोधूं मतांतरें। नुमगें खरें बुडाल॥ १**

"भक्त कोण कोण व्हाल? परमेश्वराच्या प्रीतीस पात्र कोण कोण व्हाल? तुम्हास सात्विक वृत्ति कशी प्राप्त होईल? तें सांगतों ऐका. प्रथम तुम्ही या तर्कवितर्क करणाऱ्या वितंडवाद्यांच्या नादास लागूं नका. परमेश्वराचेंच स्मरण ठेवून त्याच्याच मार्गानें चाला. हा काय म्हणतो? आणि तो काय म्हणतो? हें फार पहाण्याच्या भरीस पडूं नका. कारण, जग हें त्रिविध आहे. त्याच्या तोंडास लागलें तर क्रमिक पुस्तकांतील 'म्हातारा आणि त्याचा बैल' अशी अवस्था होऊन खरें काय तेंच कळेनासें होईल आणि तुम्ही संशयसागरांत व्यर्थ गटंगळ्या मात्र खात बसाल."

हेंच तुकोबांचें महावाक्य पुढें ठेवून आम्ही आज श्रीसमर्थांचें सामर्थ्य व त्यांचा लीलानुग्रह कथन करण्यासाठीं हातांत कलम घेतलें आहे. त्यांत आम्ही त्यांच्यासंबंधानें जें जें कांहीं सांगण्यासारखें आहे, तें तें बखरींतील असो व नव्या संशोधनांतून तावून सुलाखून बाहेर पडलेलें असो, दोनीही बाजू जगापुढें ठेवण्याचा संकल्प केला आहे. व प्रत्येक अद्भुत चमत्काराखालीं त्याचीं साधक बाधक प्रमाणें व त्यावर उत्पन्न होणारें शंका समाधानही होईल तितकें थोडक्यांत देण्याचें ठरविलें आहे. हा परिपाठ अगदीं नवा आहे. त्यानें थोडासा विस्तार होईल हें खरें आहे. तरी तशी छान होणें हेंच अधिक इष्ट आहे असें आम्हांस वाटतें. कारण तसें केल्यानें

पुढील पिढीस त्यासंबंधानें तत्काल विचार करावयास सवड मिळून सत्यासत्याचा कयास बांधण्यास सुलभ जाईल.

आतां श्रीसमर्थांच्या लीलामृताचें स्नानपान करण्यासाठीं सर्वांचाच जीव उत्कंठित झाला असेल यांत संशय नाहीं. तथापि त्या लीलामृत-नदीच्या ओघाला जाऊन पोंचेपर्यंत मध्यंतरी एक प्राचीन बरवरींवरील किटाळरूपी रुक्ष वाळवंट थोडेसें मध्यें आडवें आलेलें दिसत आहे. कोणत्याही तीर्थक्षेत्रीं गेलें तरी तत्पूर्वीं वाळू ही थोडी तरी तुडवावी लागतेच. त्यावांचून गत्यंतर नाहीं. आतां त्यांतून एखाद्या उदार माहात्म्याला ती अडचण दिसूं लागली तर तो तें सर्व काढून टाकून तेथें सुंदर घाट बांधतो. असें रुक्ष वाळवंट पाहिलें कीं कोणासही घाट बांधण्याची इच्छा ही होतेच. व तसा घाट बांधून सर्वांस सोपा मार्ग करून देणें हें एक पुण्यकर्मच आहे. घाट बांधणें नच होईल तर निदान अगदींच मार्गांत आलेले कांटे-कुटे व दगडधोंडे बाजूस सारून तरी मार्ग थोडा सुलभ केला पाहिजे. ह्यास्तव थोडासा धीर धरणें भाग आहे. तेवढें काम संपलें कीं, आपण समर्थ-लीलामृताच्या पवित्र प्रवाहांत स्नानपानादि यथेच्छ विहार करून तृप्त होऊं. मजल थोडी आहे; ती आपण हां हां म्हणतां गांठूं. इतका धीर देऊन पुढचा मार्ग धरतों.

# समर्थांचें सामर्थ्य
# किंवा
# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## भाग दुसरा.

### बखरकारांवरील आरोपांचें निरसन.

ज्याचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा॥
मत्सर धरी जो पुंसा। तयासि तेंचि प्राप्त॥ १॥
पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण।
तो दुरात्मा दुरभिमान। मत्सर करी॥ २॥

दासबोध द. १. स. १

श्रीमद्भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायांत प्रथमारंभींच एक वाक्य आहे कीं "अश्वत्थंप्राहुरव्ययम्" म्हणजे संसाररूप अश्वत्थ हा खरोखर क्षणभंगुर असूनही त्याला 'अव्यय' म्हणजे अविनाशी असें म्हणतात! खरोखर हा संसार म्हणा किंवा सारें ब्रह्मांड म्हणा हें निखालस क्षणभंगुर आहे. असें असतां तें अविनाशी कसें काय? अशी सहजीं मनांत शंका उद्भवते. त्याचें समाधान श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं फारच समर्पक दृष्टांत देऊन केलें आहे. ते म्हणतात, आपण एखाद्या भागीरथीसारख्या मोठ्या नदीकडे

पाहिलें म्हणजे तिचा प्रवाह आपल्याला अखंडच वाहत असल्याचें दिसतें. व तो युगानयुगेंही तसाच वहात असतो. तरी पण त्याला क्षणाची तरी शाश्वती आहे काय? मुळींच नाहीं. त्या प्रवाहाच्या पाण्यांतील प्रत्येक लोंढ्याकडे किंवा प्रत्येक बिंदूकडे लक्ष देऊन बसा, म्हणजे समजेल कीं, त्यांतील लोंढा किंवा बिंदु एक क्षणही एका ठिकाणीं थांबत नाहीं. त्याचे लोंढे एकामागून एक येतच असतात. एक लोंढा येऊन आपल्या पायांना स्पर्श करतो न करतो तों चालला खालीं! आणि त्याच्या ठिकाणीं दुसराच लोंढा येऊन तोच आपल्या पायांना विळखा घालतो. डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तों तो चालला! आणि नवाच एक पुढें आला. असाच हा क्रम सारखा सुरू असतो. जें भागीरथीचें उदक आज आपल्याला शुद्ध, निर्मळ व अमृतासारखें मधुर वाटत असतें तेंच उदक आठ चार दिवस गेलें नाहींत तोंच समुद्राशीं एकरूप होऊन खारट घोट बनतें! ह्यावरून नदीचा प्रवाह जरी अखंड सुरू आहे असें आपल्यास भासतें, तरी त्याची शाश्वति ती कितीशी? एका घटकेच्या पूर्वींचें उदक जर ह्या घटकेला नाहीं, तर हजारों वर्षांच्या पूर्वींचें उदक आज तींत कोठून दिसणार? तरी भागीरथीसारख्या नदीचा प्रवाह अखंड चालूंच आहे असें समजतात; व 'आज युगानयुगें भागीरथी जशी आहे तशीच आहे.' असेंच म्हणण्याचा जगाचा प्रघात आहे. हा नदीचा प्रवाह ज्याप्रमाणें अखंड असून ही अशाश्वत; क्षणभंगुर; त्याप्रमाणेंच हें सारें ब्रह्मांड व त्यांतील सर्व दृश्य वस्तु आणि खेळ, हे सुद्धां असेच शाश्वत असून अशाश्वतच आहेत. शेंपन्नास वर्षें जाऊंद्यात कीं आज पृथ्वीवर जितकीं मनुष्यें म्हणून वावरत आहेत त्यांपैकीं एकाचासुद्धां मागमोस रहावयाचा नाहीं. त्या ठिकाणीं दुसऱ्याच मनुष्यांचें पीक पिकेल! आज जे स्त्रीपुरुषांचें पोशाख दृष्टीस पडत आहेत ते नष्ट होऊन त्या ठिकाणीं निराळाच थाट दृष्टीस पडेल! आज जीं ओबड धोबड वाहनें दृष्टीस पडतात, तीं नष्ट होऊन त्यांच्या ऐवजीं पक्षाप्रमाणें विहार करणारीं सुखासनें पहावयास मिळतील. असा हा कालमहिमा आहे.

शेंपन्नास वर्षांतली आपल्या हिंदुस्थानचीच स्थिति कशी झाली पहा! वेदघोष लुप्त होऊन तेथें इंग्रजी व्याख्यानांचे सप्ताह सुरू झाले. ब्राह्म-

णांची धावळी व पळीपंचपात्रीं जाऊन बूट पाटलोण, कोट जाकिटें चिकटून बसलीं; पाट नाहींसे होऊन त्याच्या जागीं खुर्च्या टेबलाचा थाटमाट निघाला; जातीं उखळें बुडून गिरण्यांच्या वरण्या लागल्या; फूफू करीत बसावयाचा त्रास चुकल्यामुळें लहान लहान मुलीही कळीच्या चुली पेटवूं लागल्या. बैलांच्या खटारगाड्या मागें पडून आगगाड्यांचा सुळसुळाट झाला. मंत्रतंत्र नष्ट होऊन बिनतारेचें तारायंत्र सुरू झालें. हातानें ग्रंथ लिहिण्याचा काल जाऊन छापखान्याचा सवंग सुकाळ झाला. अशी ही घडामोड अनंत कालापासून चालली आहे, व पुढेंही अशीच चालावयाची. नवीन म्हणून ज्या ज्या वस्तु किंवा साधनें प्रचारांत येतात, त्या त्या पहिल्याहून अधिक सोयीस्कर व हल्लींच्या परिस्थितीनुरूप दिसण्यांतही सुरेख व सुशोभित असतात, ह्यांत शंका नाहीं. परंतु तेवढ्यावरून आपल्या पूर्वजांनीं ओबडधोबडच कां होईनात परंतु त्या स्वकष्टानें आदरपूर्वक तयार केलेल्या ज्या ज्या वस्तु आहेत, त्यांबद्दल त्यांचे उपकारच मानले पाहिजेत. त्यांत कांहीं अल्प स्वल्प उणेपणा असला तरी त्यावर आपण झांकणच घातलें पाहिजे. कारण पूर्वजांची ओबडधोबड कृति हाच आजकाल दिसणाऱ्या मनमोहक वस्तूंचा पाया आहे. पूर्वजांच्या ओबडधोबड कृति हें मूळ; आणि आळीकडील सुधारणा हा त्याचा विस्तार होय, हें कोणी विसरतां कामा नये. पूर्वजांचें मूळ बीज जींत नाहीं, अशी सुधारणा हल्लींच्या काळांत एक सुद्धां नाहीं. खटारगाडीची कल्पना होती म्हणून आगगाडी झाली. जात्याची कल्पना होती म्हणून गिरण्या झाल्या. तात्पर्य, पूर्वजांच्या मूळ पायावरच हल्लींच्या साऱ्या दिव्य इमारती उभारलेल्या आहेत.

पक्ष्याचे पंख कितीही मजबूत असले, आणि त्याचे जर पाय मोडले, किंवा एक पाय जरी दुखवला तरी त्यांस उडतां येत नाहीं! पंख चांगले दणदकट असतां असें कां बरें व्हावें? ह्याचें कारण येवढेंच कीं, आकाशांत उडावयाचें झालें तरी त्यास प्रथम जमिनीचा आधार घ्यावा लागतो. पायानें उश्शी घेतल्याशिवाय त्यांस उडतां येत नाहीं. तें जमिनीवर उश्शी घेण्याचें साधन जे पाय तेच निर्जीव झाल्यावर तो उडणार कसा? ह्यावरून मूलाधाराची महति केवढी आहे ह्याची उत्तम साक्ष पटते. इमारत केवढीही मोठी असली, ती कितीही सुंदर असली तरी तिला पाया हाच मूळ

आधार होय. झाडाचा विस्तार केवढाही मोठा वाढला, त्याला कितीही पालवी फुटली, तरी त्याला मूळ हेंच आदि कारण असतें. त्या मुळाला व पायाला कोणीही विसरतां कामा नये. त्याबद्दल उपकार मानणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य आहे. तें न करतां त्याचाच उपहास करून त्यांच्याच कृतीला नावें ठेवणें हा शुद्ध कृतघ्नपणा होय.

इतके विचार सुचण्याचें कारण श्रीसमर्थांच्या चरित्राची स्मृति हें होय. समर्थांचें अवतारकृत्य संपून आज दोनशेंच्यावर वर्षें होऊन गेलीं. त्यांची लीला आज वर्णन करावयाची तर आमच्या पूर्वजांच्या कृतीकडेच आम्हांस पाहिलें पाहिजे. त्यांनीं जर त्यांच्याबद्दल एकही अक्षर लिहून ठेवलेलें नसतें, तर आपल्याला ती कळावयाला कोणताच मार्ग उरला नसता. परंतु 'इतिहासाचें जें काय महत्त्व कळूं लागलें आहे तें आम्हाला; पूर्वींच्या लोकांस त्याचा गंधही नव्हता' असा जर कोणाचा समज असेल तर तो निखालस चुकीचा होय. आमच्या लोकांस सुद्धां प्राचीन कालापासून इतिहासाची आवड ही आहेच. 'महाभारतांत' तर सारा इतिहासच भरलेला आहे. इतकेंच नव्हे, तर महाभारताला 'इतिहास' हेंच नांव पूर्वापार चालत आलेलें आहे. रामायण हें तरी काय? इतिहासच. आतां त्या वेळची लिहिण्याची पद्धत वेगळी, व हल्लींच्या काळांतील लिहिण्याची पद्धत वेगळी. प्रत्येक परिस्थिति कालमन्वंतरावरच अवलंबून असावयाची. कल्हण कविकृत 'राजतरंगिणी' हा ग्रंथ तर सारा काश्मीरच्या राजवंशाच्या इतिहासानेंच भरलेला असून त्यांतील कारकीर्द अगदीं युधिष्ठिरापर्यंत आणून पोंचविलेली आहे.

हल्लीं छापखान्याची कला सुरू झाल्यापासून कोणताही ग्रंथ लिहून काढावयाला अगदीं सुलभ मार्ग झालेला आहे. तसा प्रकार पूर्वीं नव्हता. तरी सुद्धां प्रत्येक राजकारकीर्दीच्या लहान मोठ्या बखरी ह्या आहेतच. 'दामाजीपंताची बखर' 'विक्रमराजाची बखर' 'भोजराजाची बखर' येथपासून तों तहत 'भोंसल्यांची बखर' 'पेशव्यांची बखर' 'भाऊसाहेबांची बखर' 'शाहुमहाराजांची बखर' 'पंत प्रति निधींची बखर' इत्यादि बखरी फार आस्थापूर्वक लिहिलेल्या आजही आढळतात. आणखी त्यांत विशेष चमत्कार हा कीं, ह्यांपैकीं कितीएक बखरी अथपासून इति-

पर्यंत एक एका पुरुषानें तोंडानेंच सांगितल्या आहेत व लिहिणारांनीं त्या उतरून काढल्या आहेत ! ह्यासारखा लोकोत्तर चमत्कार तर अन्य देशांत कोठें पहावयास व ऐकावयास सुद्धां मिळणार नाहीं असें आम्हांस वाटतें. कृष्णाजीपंत निफाडकर ह्यांनीं पेशव्यांच्या एकूण एक वंशाची बखर शक मिती सुद्धां तोंडानें सांगितली आणि वैजनाथच्या ग्रामस्थ मंडळींनीं ती लिहून काढली ! तोच प्रकार समर्थांच्या बखरीचा. श्रेष्ठांचे वंशज श्री मत्सद्गुरु हनुमंत स्वामी ह्यांनीं समर्थांची बखर समग्र तोंडानें सांगितली आणि त्यांच्या शिष्यवृंदांनीं ती लिहून घेतली. आणि ती सुद्धां जंत्री-सारखी अनुक्रमानें शकावली सुद्धां ! ह्यापेक्षां आमच्या पूर्वजांना इतिहा-साची आवड आणखी ती किती असावयाची ? तेव्हां त्यांच्या स्मरणश-क्तीची आणि ग्राहकतेची केवढी बरें धन्यता मानावी !

ही श्रीहनुमंत स्वामीकृत ' समर्थांची बखर ' येवढाच काय तो श्रीस-मर्थांच्या चरित्राचा मूलाधार तंतु आहे. तेवढ्यावरच काय त्या आज-कालच्या इमारती. हा येवढा तंतु जर आज उपलब्ध नसता तर आपण आज समर्थांच्या लीलाश्रवणाच्या लाभास सारेच पारखे झालों असतों. तेव्हां त्या श्रीहनुमंत स्वामींचे आपल्या महाराष्ट्रावर किती बरे उपकार आहेत ? त्यांचे आम्ही जितके उपकार मानूं तितके थोडेच होतील.

असें असतां आलीकडच्या तार्किक लोकांनीं त्यांचे उपकार मानावयाचे बाजूस ठेऊन त्या महात्म्याला ' भोळसर ' 'मठ्ठ डोक्याचा' ' खोडसाळ ' ' आपल्या पूर्वजांचें स्तोम माजविणारा ' ' आपल्याच घराण्याभोंवतीं दिवे ओंवाळणारा ' इत्यादि मनसोक्त दुर्वचनांचा भडिमार करून त्या परमपूज्य बखरीला व त्या बखरकाराला जणों काय ' कवडचिं मोल ' ठरविलें आहे. ह्यापेक्षां अर्वाचीन पंडितांचा मासलेवाईक अर्वाच्यपणा तो कोणता ?

इतिहाससंशोधनाचें काम हें सत्कृत्य नव्हे, असें कोण म्हणेल ? कोणीच म्हणणार नाहीं. पण त्याकरितां पूर्व लेखकांचे वाभारेच काढले पाहिजेत, व त्यांच्यावर तोंडपाटिलकीच गाजविली पाहिजे अशांतला कांहीं अर्थ नाहीं. असा कृतघ्नपणा करणें अत्यंत गैरशिस्त होय. हल्लींच्या लोकांनीं आगगाडी केली, म्हणून, बैलगाडी करणारे कांहीं मूर्ख होत नाहींत. पीठ दळणाऱ्या गिरण्या निघाल्या म्हणून जातें निर्माण करणारे कांहीं वेडेखुळे नव्हेत.

कारण, गिरण्यांना तरी जात्याच्याच कल्पनेचा समूळ पाया आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. गिरण्यांमध्यें आज तुम्ही हवी तेवढी करामत करा, परंतु जात्याचें मूळकार्य करणाराचे उपकार माना. त्याप्रमाणेंच समर्थांचीं चरित्रें आज तुम्ही हव्या तेवढ्या करामतीनें लिहा, त्याबद्दल हवातेवढा उहापोह करा, त्याबद्दल कोणाची ना नाहीं. परंतु मूळ बखर विसरूं नका, व त्या लेखकाशीं कृतघ्नपणा करू नका. येवढेंच आमचें म्हणणें आहे.

ही गोष्ट इतकी न्यायाची व सरळ असतांही आलीकडच्या समर्थांच्या म्हणा कीं शिवाजी महाराजांच्या म्हणा, चरित्रकारांनीं त्या परमपूज्य जुन्या बखरींची आणि त्या बखरकाराची अत्यंत नालस्ती केली आहे. आणि खुद्द समर्थांच्याच वंशावर यथेच्छ तोंडसुख घेतलें आहे. आणि येवढा गहजब कां ? तर त्यांनीं केलेले अद्भुत—केवळ अमानुष—चमत्कार हे त्यांत नमुद केले म्हणून ! ‘ उद्धव गोसाव्यांच्या वडिलास जिवंत केलें; पैठणास घार उठविली; बिभीषणास लंकेस जाऊन भेटले; रंगनाथ स्वामींनीं रेडा जिवंत केला; मिरजेच्या किल्ल्याच्या जमीनींतून बाहेर पडले; माहुलीच्या ब्राह्मणास दक्षिणा म्हणून दिलेले दगड सुवर्णाचे झाले; कल्याणांनीं तटा-खालीं उडी टाकली; शिवाजी महाराजांना वाघिणीचें दूध काढावयास पाठविलें व त्यांनीं तें आणलें; इत्यादि गोष्टी निरवालस असंभवनीय होत. त्या केवळ भाकडकथा ! त्यांचा समावेश ह्या खबरींत केलेला आहे. म्हणून हनुमंत स्वामी ‘ भोळा ! ’—नव्हे खोडसाळ, मिथ्या प्रलाप करणारा, असा त्यांच्यावर आरोप केलेला आहे. ह्या समर्थांच्या मूळ जुन्या बखरीवर आरोप करण्यांत पुढारी म्हटलें म्हणजे सुप्रसिद्ध इतिहास संशो-धक प्रो. राजवाडे हे होत. हे हनुमंत स्वामींवर अरे तुरेवर येऊन, तो ‘ भोळा ’ ‘ त्याच्या डोक्यांतील कल्पनेचे हे खेळ ’ वगैरे बरीच त्यांनीं त्यांच्यावर तान झाडली आहे. दुसरे प्रख्यात विद्वद्वर्य रामचंद्र भिकाजी जोशी ‘ मराठी भाषेची घटना ’ घडविणारे. ह्यांची कडी तर सर्वांहून वरची ! त्यांनीं ‘ दासबोध ’ हा ग्रंथच मुळीं कुचकामाचा म्हणून ठरविलें आहे ! त्याचा विचार उत्तरार्धांत करूं. असे एकाना दोन ! बहुतेक चरित्र कारांचा कटाक्ष त्यांनीं वर्णन केलेल्या अद्भुत चमत्कारांवर फार आहे. त्यांचें म्हणणें हें अद्भुत चमत्कारांचें बंड प्रत्येक साधूच्या चरित्रांत आलेंच

पाहिजे. त्याशिवाय त्यास शोभा नाहीं. असा त्यांचा समज असल्यामुळें हे सारे पूर्वीचे लोक आपल्या अंगचेंच नानाप्रकारचे असंभवनीय प्रकार आरेबियननाइटप्रमाणें तयार करून त्यांची खोडसाळ माळा त्यांत गुंफीत. म्हणून हीं चरित्रें मुळींच विश्वसनीय नाहींत, हा त्यांच्यावर त्यांचा शेरा !

ह्या अद्भुत चमत्कारासंबंधानें आम्ही पहिल्या भागांत जेवढें समर्थन करणें शक्य होतें तेवढें केलेंच आहे. व पुढील भागांत प्रत्येक अद्भुत चमत्काराखालीं इसापनीतींतील तात्पर्याप्रमाणें त्याचीं साधक बाधक प्रमाणें देण्याचें आम्ही ठरविलें आहे. तेव्हां त्याबद्दल येथें विचार करण्याचें तादृश कारण नाहीं. हे लोक समर्थ असमर्थ ह्या दोघांनाहीं सारखेच समजून लौकिक दृष्टीनेंच त्याचा विचार करतात. तपश्चर्येचा प्रभाव काय, स्वार्थत्यागाचें महत्त्व काय, ब्रह्मचर्याचें तेज कसें ? वैराग्याचें सामर्थ्य केवढें ? आत्मसंयमाचा महिमा काय ? आणि भक्तीची शक्ति किती, ह्यांची त्यांना तिळमात्रही ओळख नसल्यामुळें त्यांच्या दृष्टीला तें सारें विपरीतच दिसतें.

अमानुष प्रकार हे केवळ खोडसाळ आहेत; भोळेपणाचे दर्शक आहेत; तेव्हां त्यांचा समर्थांच्या चरित्रास विटाळ होऊं नये म्हणून सोवळीं चरित्रें लिहिण्याचा हा एक पक्ष झाला; पण ह्याशिवाय दुसरेही आणखी दोन पक्ष आहेतच. त्यांतील एक पक्षाचें म्हणणें शिवाजी महाराजांस स्वराज्य मिळविण्याविषयीं अंतःप्रेरणा करणारे समर्थ होत. ह्या पक्षाचे लोक आपली बाजू अनेक प्रमाणें देऊन समर्थन करीत असतात. ह्याचा उलट पक्ष म्हणजे ब्राह्मणेतरांचा, सत्य समाजाचा किंवा ' वेदोक्त ' प्रकरणाचा होय. ह्या पक्षाचें म्हणणें स्वराज्यस्थापनेच्या कामांत रामदास स्वामींना शिवाजी महाराज कोणतेंच कांहीं विचारीत नसत. राजकारणाची सल्ला त्यांनीं त्यांस कधीं विचारली नाहीं व त्यांनीं ती दिलीही नाहीं. उलट समर्थांनीं दासबोधांत जें राजकारण म्हणून प्रतिपादन केलें आहे त्याची स्फूर्ति शिवाजी महाराजांनीं पराक्रम केलेला पाहून, स्वराज्याची स्थापना केलेली पाहून मग झाली असावी. असें हे समर्थांच्या चरित्राच्या संबंधानें पक्षभेद झालेले आहेत. त्या सर्वांचीच शहानिशा करण्याला स्थळही नाहीं व वेळही नाहीं. तथापि त्याच्यापैकीं एकच मासला म्हणून रा. रा. कृष्ण-

राव अर्जुन केळुसकर ह्यांनीं इ.स. १९२० मध्यें 'छत्रपति शिवाजी महाराज ह्यांचें चरित्र' लिहिलें आहे. त्यांत ह्या श्री. समर्थ रामदास स्वामींच्या संबंधीं काय काय व कसकसे उद्गार काढले आहेत तेच येथें दाखल करून त्यांत कितपत तथ्यांश आहे तेवढेंच दिग्दर्शन करतों.

ह्या चरित्रामध्यें ' सज्जनसेवा ' म्हणून त्यांनीं एक २९ वा भाग घातलेला आहे. त्यांत ते म्हणतातः—[ पृ. ५२७ ]

" समर्थांचें चरित्रलेखक आज उपलब्ध आहेत त्यांत समर्थांच्या वडील बंधूंचा हनुमान स्वामी म्हणून एक वंशज होता. त्यानें समर्थांच्या देहावसानानंतर सुमारें सवाशें वर्षांनीं समर्थांचें एक चरित्र लिहिलें. तेंच पहिलें असून तदनंतरच्या इतर एतद्विषयक लेखांस आधारभूत झालें. हनुमान स्वामीच्या ह्या बखरींत महाराजांस समर्थांकडून स. १६४९ त अनुग्रह मिळाला होता, व तेव्हांपासून ते समर्थांच्या उपदेशानुरूप राज्यव्यवहारांत वागत असत, असा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु ही अनुग्रहाची तारीख बिलकुल खरी नाहीं. "

" सदरील चरित्रलेखांत ज्या कांहीं तारखा दिल्या आहेत, त्या बहुतेक विश्वसनीय वाटत नाहींत. महाराजांच्या चरित्रक्रमासंबंधानें कांहीं तारखा यांत दिल्या आहेत. त्या बहुतेक चुकल्या आहेत. "

" रामदास्वामींची महति वाढविण्याच्या उद्देशानें त्यांच्या चरित्रकारांनीं हा सत्यापलाप केला असावा, किंवा पूर्वपरांगत चालत आलेल्या आख्यायिका सत्यवत् मानून त्यांचा अनुवाद त्यांनीं स्वलेखांत केला असावा. हे पूर्वकालीन चरित्रकार महीपतीचें अनुकरण करून अद्भुत चमत्कारांचें वर्णन स्वग्रंथांत करितात. त्यावरून त्यांची सत्यनिष्ठा कितीशी होती हें उघड दिसत आहे. महासाधूच्या लीला वर्णन करावयाच्या म्हटल्या म्हणजे त्यांत चमत्कारांचें कथन अवश्य झालें पाहिजे अशी समजूत सामान्य लोकांची असल्यामुळें त्यांच्या एतद्विषयक लेखांस ऐतिहासिकरीत्या प्रमाण म्हणवत नाहीं. तरी त्यांच्या ह्या अद्भुत कथामय ग्रंथांत सत्याचा अंश बराच असतो. तो सत्यान्वेषण करणारानें निवडून घेतला पाहिजे. "

' विद्या ददातिविनयम् ' विद्येनें मनुष्य अधिक विनयसंपन्न होतो,

असें एक पूर्वापार चालत आलेलें वाक्य आहे. परंतु आलीकडे त्याचा प्रकार उलटच दृष्टीस पडू लागला आहे. मोठ्या लोकांविषयीं बोलतांना बहुमानानें बोललें तर त्यांत वावगें तें काय? उलट आपल्याला सुद्धां तें भूषणच आहे. परंतु आलीकडच्या लेखकांनीं अरे तुरे म्हणण्याचा जणों काय शिष्टाचारच घालून दिला आहे. प्रस्तुत लेखांतलिच मौज पहा! ज्यानें समर्थांची सर्व बखर स्वमुखानें सांगून मूळ पाया स्थापन केला; जो श्रेष्ठांचा वंशज; श्रेष्ठांची योग्यता केवढी? ते समर्थांहूनही कांकणभर अधिकच म्हटलें तरी चालेल. समर्थ ब्रह्मचारी आणि श्रेष्ठ गृहस्थाश्रमी, येवढाच काय तो फरक! त्यांच्याच वंशजाकडे हल्लीं सर्व संस्थान चालत आहे. ते पहिल्या प्रतीचे सरदार आहेत, त्यांचेच पूर्वज हनुमान् स्वामी. त्यांनीं ही समर्थांची सर्व बखर तोंडानें अगदीं अनुक्रमवारीनें सांगितली. इतकेंच नव्हे, तर तत्कालीन सर्व साधूसंताच्या जन्मसमाधीच्या वगैरे टिपण्या दिल्या आहेत! येवढ्या ज्यांचा अधिकार त्यांचा गौरव प्रस्तुत ग्रंथकारानें कसा केला आहे तें पहाः—

"समर्थांच्या वडील बंधूचा हनुमान स्वामी म्हणून एक वंशज होता (!)"

'राज्य सर्व आपलें आहे; मी फक्त सेवेचा धनी' असें म्हणून प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांचे नातू शाहूमहाराज ज्यांच्यापुढें हात जोडीत होते, अशा परमपूज्य महात्म्याची अरे तुरे, अशा एकेरी संबोधनानें बोळवण करणें रा. केळूसकरांस शोभलें काय? कोठें छत्रपतींचें गुरुस्थान आणि कोठें फर्ड्या शाईवर पुढें येणारे केळूसकर! बहुवचनानें त्यांचा उल्लेख केला असता तर त्यांचें कलम झिजलें असतें वाटतें? पण नाहीं. 'शिवाजी महाराज मोठे पराक्रमी होते' असें म्हणण्याचा प्रसंग आला तर 'शिवाजी महाराज मोठा पराक्रमी होता' असें एकेरीवर येऊन सांगितलें तर तें उक्त दिसेल काय? प्रस्तुतच्या छत्रपतींच्या चरित्रकारानें 'स्वामी' ह्या शब्दाच्या अधिकाराकडे तरी कांहीं लक्ष द्यावयाचें होतें. छत्रपति व छत्रपतींचें वंशजही ज्यांस पूज्य मानीत त्यांची आलीकडच्या अरेराव लेखकांनीं एकेरी संबोधाननें संभावना करावी, यापेक्षां अधिक शोचनीय गोष्ट ती कोणती? पण 'अरे तुरे' म्हणण्यांतच आलीकडचे लेखक भूषण समजतात असें दिसतें.

आतां ह्यापुढें रा. केळूसकरांनीं ह्या समर्थांच्या मूळ बखरीसंबंधानें

जीं जीं विधानें केलीं आहेत, व त्या परमपूज्य हनुमान स्वामीवर जो नाहीं नाहीं त्या आरोपांचा वर्षाव केला आहे तो कितपत खरा आहे तें पाहूं.

'अनुग्रहाची तारीख बिलकूल खरी नाहीं.' 'तारखा विश्वसनीय वाटत नाहींत.' 'त्या बहुतेक चुकल्या आहेत' 'चरित्रकारांनीं हा सत्यापलाप केला असावा' 'त्यांची सत्यनिष्ठा कितीशी होती हें उघड दिसत आहे.' 'एतद्विषक लेखांस ऐतिहासिकरीत्याप्रमाण म्हणवत नाहीं.' हे त्यांच्यावर केलेले आरोप.

आतां समर्थांच्या पूर्व चरित्रांत 'सत्यापलाप' केला असावा असें म्हणणारांचीं हीं विधानें तरी कितपत सत्यस्वरूपाचीं आहेत हेंही जगास कळणें अवश्य आहे.

सकृद्दर्शनींच त्यांचें विधान असें आहे कीं, हनुमान स्वामींनें जें समर्थांचें चरित्र लिहिलें व जो ह्या समर्थांच्या चरित्राचा आज मूळ पाया समजला जातो, तें चरित्र 'समर्थांच्या देहावसानानंतर सुमारें १२५ वर्षांनीं लिहिलें आहे.'

'हें बखर लिहिणाराचें एक उपकारस्मरण आहे' असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु वास्तविक तसें कांहींच नसून त्याचा ध्वनितार्थ अगदीं निराळा आहे. तो हा कीं, समर्थांच्या देहावसानानंतर १२५ वर्षांनीं चरित्र लिहिलें आहे असें म्हटलें म्हणजे इतका काळ लोटल्यानंतर, त्या लेखकास त्यांची माहिती मिळणार ती कशी? आणि कितीशी? तेव्हां अर्थात् ती अविश्वसनीयच असावयाची! ती शुद्ध भाकडकथा! असा अर्थ ध्वनित केला आहे; नव्हे स्पष्टच म्हटलें आहे. परंतु या बखरीचा खरा प्रकार अगदीं निराळाच आहे. ती समर्थांच्या देहावसानानंतर अवघी ३०।४० वर्षांनींच लिहिली गेली आहे. कशी तें पहा:—

"श्रीहनुमान स्वामी मठाधिपाति असतांना शके १७१५ मध्यें शिष्य मंडळींनीं त्यांस समर्थांचें चरित्र सांगण्यासाठीं प्रार्थना केली. तेव्हां ते म्हणाले "बापहो! समर्थ हे अवतारी पुरुष होते. त्यांची लीला आणि चरित्र यथासांग वर्णन करण्यास कोण समर्थ आहे? तथापि पूर्वीं समर्थांचे पुतणे म्हणजे श्रेष्ठांचे चिरंजीव रामचंद्र बाबा ह्यांचे पुत्र श्री. गंगाधर स्वामी मठाधिपाति असतांना येथील शिष्यवर्गानेंही असाच प्रश्न केला होता. त्या

वेळीं ती० मातोश्री आक्का ह्यांचे मुखें श्रुत झालें तें, कल्याण स्वामी, उद्धव स्वामी, भिकाजी बुवा, वासुदेव गोसावी, अंताजी गोपाळ बांकनीस, कुडाळकर देशपांडे, इत्यादिकांनीं लिहून ठेवलेले लेख व समर्थांनीं ग्रंथामध्यें वर्णन केलेलें आहे, त्या आधारें मला जें श्रुत आहे तें तुम्हास सांगतों. असें म्हणून शके १६४० मध्यें त्यांनीं सर्व चरित्र निवेदन केलें. त्याच आधारानें मीही तुम्हांस सांगत आहे."

समर्थांची लीला म्हणजे कांहीं बाहुलाबाहुलीचा खेळ नव्हे. कीं तो शेंसवाशें वर्षें कोनाकोपऱ्यांत पडून राहील! त्यांची लीला ऐकावयाला ज्याप्रमाणें हजारों मंडळी उत्कंठित असत, त्याप्रमाणेंच त्यांचें गुणानुवाद व लीला वर्णन करण्याविषयींही शेकडों लोक तत्पर असत. आतां ही लीला म्हणजे त्या कालांतली भोळी भाबडी कथाच असेल—हल्लींप्रमाणें 'स्पिनिंग आणि वीव्हिंग' मशिनांतून पिंजून पिंजून निःसत्त्व झालेल्या कापसाप्रमाणें कदाचित् इतिहासस्वरूपाची नसेल हें खरें आहे. ओबडधोबड स्वरूपाची कां होईना, परंतु ह्या समर्थांच्या चरित्राचें बीज त्यांच्या हयातीपासूनच रुजत पडलेलें होतें. व त्यास पुनः पुन्हा जीवन सिंचन करून त्यांचें भक्त तें रोप प्राचीन काळापासूनच वाढवीत होते, यांत तिळमात्र शंका नाहीं. हा मूळ मुद्दाच रा. केळूसकर विसरून गेले. किंवा जाणून बुजूनच त्यांनीं तो बाजूस सारला आणि समर्थांच्या देहावसानानंतर १२५ वर्षांनीं त्यांच्या चरित्राची लोकांस स्मृति झाली असें भासविलें आहे, व येवढा काल लोटल्यानंतर मग तें चरित्र शेंसव्वाशें वर्षांनीं तोंडानें सांगितलें, तेव्हां तें कितीसें खरें असणार? आणि त्यांत माहिती ती कितीशी मिळणार? म्हणजे हें सारेंच समर्थांचें चरित्र किंवा बखर ही निखालस अविश्वसनीय होय. असा ह्या छत्रपतींच्या चरित्रकारांचा गार्भितार्थ आहे.

परंतु ह्या बखरीच्याही पूर्वीं सारेच लोक घोरत पडले होते काय? त्याच्या आधीं समर्थांचें चरित्र लिहिण्याची कोणासच बुद्धि झाली नाहीं काय? असें होईल तरी कसें? साधारण प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र लिहिणारे सुद्धां शेंकडों लोक असतात. मग ज्यांचा शिष्यपरिवार काशीपासून रामेश्वरापर्यंत अव्याहत पसरलेला होता, खेड्यानिहाय ज्यांचे मारुतीराय

भुभुःकार करीत होते, शेंकडों शिष्य प्रत्यहीं ज्यांच्या सेवेसाठीं हापापत होते, प्रत्यक्ष छत्रपतीही पट्ट छात्र असून ज्यांच्यापुढें हात जोडीत होते, त्यांचें चरित्र लिहिण्याविषयीं शेंसव्वाशें वर्षे दम निघणार कोणाला? त्यांचें चरित्र लिहिण्याचें काम प्रत्यहीं चालूंच होतें. त्यांच्या चरित्राचा नवा नवा भाग लिहिला गेला नाहीं, असा एक दिवसही सुनका जात नसे. त्यांची दिनचर्या, उत्सव, विशेष गोष्टी, अल्पसें चरित्र, तवारिख, वगैरे लहान मोठ्या प्रमाणावर दररोज लोक कांहींना कांहींतरी लिहीत किंवा टांचण तरी करीत. शिवाजींच्या कारभाऱ्यांचा, चिटणीसांचा, वांकनिसांचा रोजखर्डा त्यांजकडे जात असे तो वेगळाच. इतक्या गोष्टी जर जगजाहीर आहेत, प्रमाणसूद आहेत तर मग 'समर्थांच्या देहावसानंतर १२५ वर्षांनीं हनुमान् स्वामींनीं चरित्र सांगितलें तोच समर्थांच्या पुढील सर्व चरित्राचा मूळाधार' म्हणणें याचा अर्थ काय? ह्याचा अर्थ हा कीं, हनुमान् स्वामींनीं जें समर्थांचें चरित्र सांगितलें, तें मुळापासून जीं जीं लहान लहान टिपणें झालेलीं होतीं, ज्या ज्या गोष्टी प्रसंगोपात लिहून ठेवल्या गेल्या होत्या, त्या सर्वांचें म्हणजे समर्थांच्या तोंपर्यंत वर्णन केलेल्या यच्चयावत् लीलांचें परिपूर्ण स्वरूप होय. त्यामध्यें तत्पूर्वकालिन सर्व बखरींचा, चरित्रांचा प्रत्यक्ष वा परोक्ष अनुभवांचा व टांचणांचा वगैरे सर्व वृत्तांत गोवलेला आहे. त्यांत हनुमान् स्वामींच्या पदरचें असें फारच थोडें आहे. किंबहुना मुळीच कांहीं नाहीं म्हटलें तरी चालेल. त्यांच्या मनांत ही कल्पना सुद्धां आली असावीच कीं, पुढें मागें कोणीतरी हरीचे लाल असे विचारणारे निघतीलच कीं, ह्या ज्या तुम्ही भाकडकथा लावल्या आहेत, तो तुमच्या डोक्यांतील कल्पनेचाच खेळ आहे, का त्याला कांहीं प्रत्यंतरीं पुरावा आहे? अशा पृच्छकांस त्यांनीं ज्ञानेश्वरांचेंच चोख उत्तर देऊन ठेवलें आहे. तें असें;—

**तेथ माझें उरलें। पाइकपण ॥१॥**

"मूळ गीता ही भगवंतांनीं अर्जुनास सांगितली. आचार्यादिकांनीं तिच्यावर भाष्य केलें. तें संस्कृतांत होतें. म्हणून मीं त्याचाच भावार्थ मराठी भाषेंत सांगितला. ह्यांत माझ्या पदरचें असें कांहींच नाहीं. मी

फक्त सांगकाम्या आहे, हिकडचा निरोप तिकडे पोंचवावयाचा होता तेवढें काम मीं केलें."

त्याप्रमाणेंच हनुमान स्वामींनींही मोठमोठ्या लोकांकडे बोट दाखवून ते ह्या समर्थांच्या चरित्रांतील गुणदोषांपासून अलित राहिले आहेत. म्हणजे ही समर्थचरित्राची बखर हनुमानपाशींच कांहीं मूळ उत्पन्न झालेली नाहीं. तर ती गंगाधर स्वामींच्या कारकीर्दींतच शके १६४० मध्यें तयार झालेली आहे. गंगाधर स्वामी म्हणजे श्रेष्ठांचे सख्खे नातू. शाहुमहाराज औरंगजेबाकडून मुक्त होऊन आल्यानंतर त्यांनींच गंगाधर स्वामींची सज्जनगडावर स्थापना केली. स्वामींची स्वारी माहुलीस आल्याचें समजतांच खुद्द शाहुमहाराज त्यांस भेटावयास गेले होते. त्या वेळीं स्वामींची स्नान संध्या चाललेली असून स्वामी ध्यानस्थ बसले होते. त्यांचें ध्यान विसर्जन होईपर्यंत बराच वेळ महाराजांची स्वारी उभी होती! त्या वेळेस श्रीपतराव प्रतिनिधि जवळच्या एका मनुष्यापाशीं म्हणाले " शाहुमहाराजांपुढें कोणाचें आसन टिकावयाचें नाहीं, आणि स्वामींचें टिकलें. त्या अर्थीं ते फार योग्य पुरुष दिसतात!" यावरून गंगाधर स्वामींची योग्यता केवढी होती ही गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे. तेव्हां अशा सत्पुरुषाच्या कारकीर्दींत व अशा सत्पुरुषाच्या मुखानें समर्थांचें चरित्र बाहेर पडलेलें आहे, ही गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेवावी. हनुमान् स्वामींनीं (शके १७१५ मध्यें) फक्त त्याचा अनुवाद मात्र केलेला आहे. म्हणजे हनुमान् स्वामींच्या मुखांतून निघालेली ही समर्थांच्या चरित्राची किंवा बखरीची पुनरावृत्ति किंवा द्वितीयावृत्ति होय.

वरील सर्व विवेचनावरून हीं गोष्ट लक्षांत येईलच कीं, समर्थांचें चरित्र प्रथम परिपूर्ण रीतीनें बाहेर पडलें तें गंगाधर स्वामींच्या मुखांतूनच बाहेर पडलें. पण गंगाधर स्वामींनीं तरी तें कोणत्या आधारानें सांगितलें ? समर्थांची कारकीर्द पहावयास ते तव्हतें हें उघड आहे. समर्थांच्या समाधीच्या वेळीं त्यांचा जन्म झाला असेल किंवा नाहीं, ह्याचाही वानवाच. तेव्हां गंगाधर स्वामींनीं हें समर्थांचें अथपासून इतिपर्यंत साद्यंत चरित्र सांगितलें कसें ? हाही प्रश्न उभा राहतोच. त्याचें उत्तर गंगाधर स्वामींनीं आरंभींच देऊन ठेवलें आहे. त्यावरून समर्थांच्या चरित्रास मूळ आधार इतके दिसतातः—

१ ती० मातोश्री आक्का ह्यांच्या मुखें श्रुत झालें तें.
२ कल्याण स्वामी ह्यांचे लेख.
३ उद्धव स्वामी ह्यांचे लेख.
४ भिकाजी बोवा ह्यांचे लेख.
५ वासुदेव गोसावी ह्यांचे लेख.
६ अंताजी गोपाळ वांकनीस ह्यांचे लेख.
७ कुडाळकर देशपांडे ह्यांचे लेख.
८ समर्थांनीं ग्रंथामध्यें वर्णन केलेलें आहे तें.
९ आणि स्वतः गंगाधर स्वामींना श्रुत होतें तें.

अशी ही विशेषेंकरून नऊ प्रकारची माहिती समर्थांच्या चरित्रांत संकलित झालेली आहे. ह्या सर्वांत आक्कांचा मूळ आधार फार असला पाहिजे हें तर उघडच दिसतें. कारण, समर्थांनीं कृष्णातीरीं पाय ठेवल्यापासून रात्रंदिवस त्या त्यांच्याच सान्निध्याला होत्या. समर्थांच्या चरित्राची खडानखडा माहिती त्यांच्या इतकी इतरांस असणें फारसें शक्यच नाहीं. म्हणून ह्या चरित्रांतील इत्थंभूत माहितीची सारी मदार आक्कावरच येतें हें उघड आहे. पण यावर आमच्या प्रतिपक्षास असें म्हणण्यास सहजच सवड होईल कीं, म्हणूनच त्यांत साऱ्या 'भाकडकथा' भरलेल्या आहेत. कारण आक्का ह्या बोलून चालून बायको माणूस. त्यांचें शिक्षण तें कितीसें? आणि ज्ञान तें काय असणार? त्यांतून तो काळ जुना; समजुती जुन्या; तेव्हां त्यांच्या मुखांतून रेखलेलें सत्य बाहेर पडावे कसें? अशा तार्किकांचीं जणों काय तोंडें बंद करण्याकरितांच १ कल्याणस्वामी, २ उद्धवस्वामी, ३ भिकाजी बोवा, ४ वासुदेव गोसावी ह्या चौघां पुरुषानीं समर्थांचें चरित्र स्वहस्तें लिहून ठेवण्यासाठीं कंबर बांधली!

समर्थांचे हे चार शिष्य म्हणजे कांहीं सामान्य पुरुष होते अशांतला भाग नाहीं. ते त्यांचे पट्टछात्र होते. ते समर्थांच्या १०० नंबरी कसास उतरलेले होते. समर्थांची सदसद्विचारशक्ति त्यांच्यामध्यें जागृत होती.

ईशभक्ति, सद्गुरुसेवा, भिक्षेचें व्रत, ज्ञानोपदेश आणि लोककल्याण ह्या शिवाय स्वार्थ म्हणजे काय तें त्यास माहीतच नव्हतें. किंबहुना ह्या समर्थांच्या लहान मोठ्या चार प्रतिमाच होत्या म्हटलें तरी सुद्धां फारसें वावगें होणार नाहीं.

विहिरीवर आलेली फांदी शेंड्याकडे बसून तोडावयास आज्ञा केली असतां ' आज्ञा प्रमाण ' म्हणून ती तोडली, व पोहावयास येत नसतां विहिरींत पडून तासभर झाल्यावर ' कायरे! अंबाजी ! (हें कल्याणांचें पूर्वीचें नांव,) कसें काय आहे ?' म्हणून विचारलें असतां ' कल्याण ! ' म्हणणारा पट्टशिष्य तेच कल्याणस्वामी ! समर्थांचें सातपडदी करट चोखून अमृत फलाच्या रसानें ढेकर देणारा पट्टछात्र हाच ! कल्याण स्वामींची योग्यता काय सांगावी ? श्रीरामचंद्राचे जसे हनुमान् तसे हे समर्थांचे कल्याण ! ही गुरुशिष्यांची जोडी केवळ अपूर्व होय. कल्याणस्वामी हे डोमगांव मठाचे अधिपति होते.

सती जावयास निघालेल्या सतीचा पति जिवंत करून ' अष्टपुत्रा ' ऐवजीं ' दशपुत्रा ' असा आशिर्वाद देऊन ' दशपुत्रे ' हें कायमचें उपनामचकरून सोडलें. तदुपकाराप्रीत्यर्थ बाईनीं आपला प्रथम पुत्र श्रीसमर्थचरणीं अर्पण केला. तेच उद्धवस्वामी होत. म्हणजे समर्थांचे खरेखरे चिरंजीवच तें. हे टाकळीच्या मठाचे अधिपति होते.

बालवयांत प्रथमदर्शनींच 'विहिरींत उडी टाक,' म्हणतांच धांवत जाऊन उडी टाकणारे तेच भिकाजीबोवा. व्यंकोजी महाराजांनीं समर्थांपाशीं नित्यदर्शनाची अपेक्षा केली म्हणून समर्थांनीं भिकाजीबोवांस तंजावर मठाचे अधिकारी केले. समर्थांची पहिली हातानें तसबीर काढणारे हेच. व त्यांचें चरित्र लिहिणारेही हेंच. तेव्हां त्यांची योग्यता काय सांगावी ?

काशीक्षेत्रामध्यें अलोट अध्यन करून यज्ञोपवीतास सुरी अडकवून जयपत्रें घेण्याचा चंग बांधून समर्थांस उलट नमस्कार न करितां हटवादास उभें राहणारे व बहिऱ्या माहराकडून पुरा पुरा पराभव करून घेणारे सदाशिवशास्त्री देव तेच वासुदेव गोसावी ! हेच पुढें समर्थांचे शिष्य होऊन कण्हेर मठाचे अधिपति झाले !

इतका ह्या समर्थ चरित्र लेखकांचा अधिकार होता. पण ह्यावर सुद्धां हल्लींचे आक्षेपकार म्हणणारच कीं, हे सर्व शिष्य झाले तरी ते समर्थांचेच होते. म्हणूनच त्यांनीं समर्थांची महति वाढविण्याकरितां खोट्या नाट्या भाकड-कथा सांगून त्यांचें चरित्र हवें तसें फुगाविलें आहे ! पण असें म्हणण्यासही त्यांना जागा राहूं नये ह्यास्तवच जणों काय अंताजी गोपाळ वांकनीस व कुडाळकर देशपांडे ह्यांनींही त्यावर आपलें स्वदस्तूरचे लेख लिहून सत्य-त्वाच्या साक्षीबद्दल आपलें शिक्का मोर्तब करून ठेवलें आहे ! *

इतक्या गोष्टी खऱ्या व प्रमाणसिद्ध डोळ्यांपुढें असतां बिचाऱ्या एकट्या हनुमान् स्वामींवरच रा० केळुसकरांचा येवढा गहजब कां ? हनु-मान स्वामींवरच जर तोहमत ठेवावयाची तर त्यांच्या बरोबरच गंगाधर-स्वामी, कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, भिकाजीबुवा, वासुदेव गोसावी, इतकेंच नव्हे तर सरकारी कारभारी, वांकनीस म्हणजे कोठावळे, व देशपांडे ह्या साऱ्याच्या साऱ्या व्हॉलेंटियर कोरलाही त्यांत खेचावयास नको काय ?

---

* ह्या हनुमान स्वामींच्या बखरींसंबंधानें खुद्द स्वामीसच 'भोळें' म्हणणारे व अद्भुत चमत्काराला 'त्याच्या डोक्यांतील कल्पनाचे खेळ' म्हणणारे व इतिहाससंशोधनास सारा जन्म अर्पण करणारे प्रो० वि. का. राजवाडे काय म्हणतात ते पहा:—

" श्री. समर्थांचें चरित्र आज जें महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालेलें आढ-ळतें, त्यांचे बहुतेक श्रेय श्रीहनुमान स्वामीकृत श्रीसमर्थांच्या बखरीस आहे. गेल्या चाळीस पंचेचाळीस वर्षांच्या महाराष्ट्राला हें चरित्र प्रथम या बख-रीनें सांगितलें. तेव्हां या बखरीचें आपणावर मोठे उपकार आहेत. "

" ह्या गोष्टीवरून निर्विवाद गोष्टी ठरतात त्या अशा:—

( १ ) १७१५ माघ वद्य १२ ला हनुमान स्वामींनीं छोटी बखर तयार केली.

( २ )तिचा विचार करण्याविषयीं हनुमंत स्वामी यांनीं मल्हार रामराव चिटणीस व रंगो लक्ष्मण यांस आज्ञा केली.

( ३ ) त्याप्रमाणें त्या उभयतांना विस्तृत अशी बखर १७४० च्या आश्विन शुद्ध १० स संपविली.

कारण हेही सारे संतमहंत त्या समर्थांच्या चरित्राचे अंशभाक् आहेतच. म्हणजे रा० केळूसरांनीं एकट्या हनुमान् स्वामीसच जें 'सत्यालापी' म्हणून भयंकर विशेषण लागू केलें आहे, तें एकट्या हनुमान स्वामीलाच लागतें असें नाहीं, तर परंपरया ही वरची सर्व संतमहंत मंडळीही 'सत्यापलापीच' होतात !

पण ह्या सर्व मंडळींनीं सत्यापलाप तरी येवढा कोणता केला ? हेंही आतां पाहिलें पाहिजे. अर्वाचीन पंडितांच्या मताप्रमाणें अगदीं पहिला 'सत्यापलाप' तो हाः—

"त्याचें निरुपण अम्दुत चमत्कारांनीं युक्त असल्याकारणानें त्यांचा अनुवाद प्रकृत ग्रंथांत करणें उचित दिसत नाहीं. रामदास स्वामींची महती वाढविण्याच्या उद्देशानें त्यांच्या चरित्रकारांनीं हा 'सत्यापलाप' केला असावा, किंवा पूर्वपरंपरागत चालत आलेल्या आख्यायिका सत्यवत् मानून त्यांचा अनुवाद त्यांनीं स्वलेखांत केला असावा. हे पूर्वकालीन चरित्रकार महिपतीचें अनुकरण करून अद्‌भुत चमत्कारांचें वर्णन स्वग्रंथांत करतात.

त्यावरून त्यांची सत्यनिष्ठा कितीशी होती हें उघड दिसत आहे. महा साधूंच्या लीला वर्णन करावयाच्या म्हटल्या म्हणजे त्यांत चमत्कारांचें कथन अवश्य झालें पाहिजे, अशी समजूत सामान्य लोकांची असल्यामुळें त्यांच्या एतद्विषयक लेखांस ऐतिहासिक रीत्या प्रमाण म्हणवत नाहीं. तरीत्यांच्या ह्या अद्‌भुत कथामय ग्रंथांत सत्याचा अंश बराच असतो. तो सत्यान्वेषण करणारानें निवडून घेतला पाहिजे."

महिपतीनें 'भक्तलीलामृत' नांवाचा ग्रंथ रचून महाराष्ट्र भाषेंत साधुसंतांचीं चरित्रें लिहून ठेवण्याचा प्रथम प्रघात सुरू केला त्याबद्दल आम्ही त्याचे खरोखरच उपकारच मानले पाहिजेत. तें सोडून देऊन त्यानें अद्‌भुत गोष्टी सांगितल्या येवढ्याच आरोपावरून त्यास 'सत्यापलापी' ठरविणें हा शुद्ध कृतघ्नपणा होय. आधीं मुळीं साधूसंतांचें व भगवद्भक्तांचें सामर्थ्य हेंच अलीकडच्या लोकांस माहीत नाहीं; तेव्हां ज्यांना रसायनशास्त्राची ओळख नाहीं; यंत्रशास्त्राची माहिती नाहीं; अर्वाचीन विद्येचा व ज्ञानाचा गध नाहीं, अशा हाटेंटाट लोकांनीं आगगाड्यांच्या गोष्टी व तारायंत्राचें अद्भुत चमत्कार, व विमानाचें वर्णन ऐकून त्याचा उपहास केला, त्या केवळ

माकडकथा मानल्या, तर त्यांत मोठेंसें नवल वाटावयास नको. त्या प्रमाणेंच ज्यानें वैराग्याची शीव सुद्धां कधीं पाहिलेली नाहीं, ब्रह्मचर्याची ओळख ठेवलेली नाहीं, परमार्थाचा विचार स्वप्नांत सुद्धां ज्याला शिवत नाहीं, अशा वाक्पटूनीं साधूच्या अद्भुत चमत्कारास खोटसाळ समजून त्यांच्या कपाळावर ‘ सत्यापलापाचा ’ छाप मारावा ह्यांतही फारसें नवल वाटावयास नको. पण हेंच लोक त्याच विषयाशीं एकरूप होऊन ते थोडा जरी त्याचा अनुभव घेतील, तरी त्यांची खात्री होईल कीं, साधुसंतांच्या अंगीं अद्भुत सामर्थ्य कांहींना कांहींतरी असतें, याबद्दल तिळमात्र शंका नाहीं.

कविवर्य मोरोपंत ह्यांनीं नरमाधवदास ह्यांचें वर्णन करतांना एक मोठी बहारीची कल्पना लढविली आहे. ती अशीः—

आर्या.

**साधु म्हणावे म्हणती नरमाधवदास साधु याला जे ॥**

नरमाधवदास ह्यांना जे कोणी साधु म्हणतात त्यानाच साधु म्हणावें. अशी त्यांची योग्यता होती. मग प्रत्यक्ष नरमाधवदास ह्यांची योग्यता केवढी असावी बरें ? अशीच कल्पना रा. केळूसकर ह्यांनींही आपल्या पुस्तकांत लढविली आहे. ते म्हणतातः—

“ हे पूर्वकालिन चरित्रकार महिपतीचें अनुकरण करून अद्भुत चमत्काराचें वर्णन स्वग्रंथांत करतात. यावरून त्यांची सत्यनिष्ठा कितीशी होती हें उघड आहे. ”

म्हणजे साधुसंतांचे अद्भुत चमत्कार हे आधीं खोटे, आणि ते वर्णन करणारा महिपति सात खोटा, आणि त्याचे अनुकरण करणारे इतर चरित्रकार हे सारे काळेकुट्ट रंगाचे असत्याचे पुतळे; आणि रा. केळुसकरासारखे अर्वाचीन ग्रंथकार हे गोरे धवधवीत संगमरवरी दगडाच्या मूर्ति ! असें धडधडीत म्हणणाराला काय म्हणावें हेंच समजत नाहीं.

बरें; ही अद्भुत वर्णनें खोटीं व अप्रमाण असें गृहीत धरलें तरी तीं अथपासून इतिपर्यंत खोटींच काय ? त्यांत एक अक्षरही खरें नाहीं ? अरेबीयननाइट सारखीच त्यांची घटनाना ? त्यांत थोडी बहुत अति-

शयोक्ति असू शकेल. कदाचित् चुकीची माहितीही असू शकेल. पण निखालस 'सत्यापलाप' कसा काय होणार ? त्यांत थोडा बहुत तरी सत्यांश असणारच; व ती गोष्ट रा. केळुसकरांनींही मान्य केली आहे. ते म्हणतातः—

**"तरी त्यांच्या ह्या अद्भुत कथामय ग्रंथांत सत्याचा अंश बराच असतो. तो सत्यान्वेषण करणारानें निवडून घेतला पाहिजे.**

हें जर खरें, तर मगः—

## 'त्याची सत्यनिष्ठा कितीशी होती.'

हा सिद्धांत कसा काय सोडवावयाचा ? कोणतेंही मूलद्रव्य पाहिलें तरी तें असेंच अशुद्ध स्थितींत असावयाचें. तें ज्याच्या हातीं पडेल त्यानें शुद्ध करून घ्यावयाचें कीं, तें 'प्रमाण म्हणवत नाहीं.' 'ग्राह्य करवत नाहीं.' म्हणून उकिरड्यावर फेंकावयाचें ? आंबेमोहोर तांदुळाचें स्वरूप पाहिलें तरी प्रथमारंभीं कसें असतें बरें ? आधीं त्यावर फोल हें असावयाचेंच. शिवाय त्यांत माती, दगड, पाकड वगैरें यथास्थित असतात. ते तसे असले म्हणून कोणी अस्सल आंबेमोहोर तांदळाची गोणी पायानें लोटून देईल काय ? असे मूलद्रव्यांत कांहीं पाकड आहेत असें वाटल्यास ते निवडून काढणें हे प्रत्येकाचें कर्तव्यकर्मच नव्हे काय ? मग रा. केळूसकर सत्याचे जर इतके चहाते होते, तर त्यांनीं तेवढें काम कां बरें केलें नाहीं ? 'तद्विषयक लेखास प्रमाण म्हणवत नाहीं' असें म्हणून त्यांनीं त्या लेखांवर येवढा बहिष्कार कां बरें टाकला ? ह्यापेक्षां त्यांतील पाकडाची छान करून 'सत्याचा बराच भाग' कोणता ? त्याचा नमुना जरी दाखविला असता, तरी महाराष्ट्रदेशावर, समर्थांच्या भक्तांवर इतिहासाच्या भोक्त्यावरही मोठा उपकार होऊन त्यांसही तें भूषणावह झालें असतें. असो.

ह्या अद्भुत चमत्कारांच्या संबंधानें ह्यापूर्वीचा सबंध भाग खर्ची घालून त्याचें प्रामाण्य संभनीय आहे किंवा नाहीं याचा यथासांग विचार केलाच आहे. व पुढील भागांत तर त्या त्या चमत्कारांपुढें त्यांतील शंकांचें संक्षेपतः दिग्दर्शन होणारच आहे. ह्यास्तव हा अद्भुत चमत्काराचा भाग इतकाच ठेवून आणखी ह्या प्राचीन समर्थांच्या चरित्रकारांनीं म्हणजे 'हनु-

मान स्वामीनें ' किंवा 'हनुमान्स्वामी आणि को' यांनीं—ह्याशिवाय आणखी 'सत्यापलाप' कोणकोणता केला हेंही पाहिलें पाहिजे.

रा. केळूसकर त्या समर्थांच्या वंशज स्वामींची पहिली घोडचूक चव्हाट्यावर आणतात ती ही कीं:—

"हनुमान् स्वामीच्या ह्या बखरींत महाराजांस समर्थांकडून इ. स. १६४९ त अनुग्रह मिळाला होता, तेव्हांपासून ते समर्थांच्या उपदेशानुरूप राज्यव्यवहारांत वागत असत, असा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु ही **अनुग्रहाची तारीख बिलकुल खरी नाहीं.**"

ह्या वाक्यांतील असंबद्धता किती किती व काय काय म्हणून सांगावी? 'अनुग्रहाची ही तारीख बिलकुल खरी नाहीं.' हनुमान् स्वामींनीं आपल्या बखरींत सारे शकच दिलेले आहेत. सनाचे त्यांत नांवही नाहीं. रा. केळूसकरांनीं त्या शकांचें रूपांतर सनांत केलेलें आहे. तारीख मुळींच दिलेली नाहीं. मग 'अनुग्रहाची तारीख बिलकुल खरी नाहीं.' ह्याचा अर्थ काय? स. १६४९ हीच तारीख कीं काय? तसें असेल तर 'तारीख' शब्दाला नवाच कोश तयार केला पाहिजे!

हनुमान् स्वामींनीं बखर सांगितली खरी, पण ती कांहीं स्वकपोलकल्पित नव्हे. तर त्यांनीं मूळ गंगाधरस्वामींनीं सांगितलेल्या समर्थांच्या चरित्राची पुनरावृत्तीच केली आहे. आणि त्या गंगाधर स्वामींच्या मूळ बखरीला किती लेखकांचा आधार आहे; शिवाजी महाराजांच्या तर्फेच्या कारभाऱ्यांचाही त्यांत किती किती अंश आहे, हेंही पूर्वींच सांगून ठेवलें आहे. ही बखर म्हणजे मुलांच्या चिमणी कावळ्याच्या गोष्टीसारखी भाकडकथा नव्हे. तर ती अत्यंत संगतवार आहे. ती इतकी कीं, आलीकडच्या पद्धतीच्या लेखकांनींही तोंडांत बोटें घालावींत. ह्या बखरीची रा. मोरो बाबुराव गोगटे ह्यांनीं इ. स. १९१० मध्यें एक पुनरावृत्ति छापून प्रसिद्ध केली आहे. ते आपल्या प्रस्तवानेंत म्हणतात:—

"ह्या बखरीला २०० वर्षें झालीं तरी तिची भाषा इतकी शुद्ध व सरळ आहे कीं, हल्लीं जे मराठींत उत्तम ठरलेले गद्य ग्रंथ आहेत, त्यांत देखील हिची प्रत बरीच वर लागेल. कुलीन स्त्रिया व पुरुष यांस ही बखर अत्यंत प्रिय आहे. समर्थांच्या अद्भुत चमत्कारांविषयीं जरी कांहीं

दीर्घ शहाणे शंकित होत असले तरी बहुतेक समाज श्रीसमर्थ यांस ईश्वरी अवतार समजत असल्यामुळें त्यांविषयीं त्यांस पूर्ण आदर आहे."

गोगटे ह्यांचें ह्या बाबतींल हें मत अगदीं अक्षरशः खरें आहे. ह्या बखरीची भाषा शुद्धच आहे असें नाहीं तर प्रत्येक भाग सुसंगत आणि शकवारीनें दिलेला आहे. तो इतका कीं, त्याला खोटें पाडण्याला कांहीं मार्गच नाहीं. प्रत्येक शकाची–नव्हे–प्रत्येक दिवसाची जंत्री जर आरशासारखी पुढें ठेवलेली–आहे तर त्यांत चूक होणार कशी? केवळ आडोशा पडोशानें किंवा अमनधबक्यानें अस्सल लेखांतील शक चुकला म्हणणें हा निखालस भ्रम किंवा मत्सर* होय. बखरींतील प्रत्येक गोष्टीचा शक जर अथपासून इतीपर्यंत खरा आहे, तर अनुग्रहाचीच तेवढी तारीख व शक चुकला कसा काय?

पण आधीं रा. केळूसकरांनीं जो 'तारीख' चुकली म्हणून उल्लेख केला आहे, त्याचा अर्थ काय? तारीख म्हणजे दिवस. तो चुकला असेल तर तें संभवनीय तरी म्हणतां येईल. परंतु त्यांच्या पुढील सर्व प्रतिपादनावरून सन किंवा शक म्हणजे सालच चुकलें आहे असें म्हणण्याचा रोख

---

* बखरकाराचें तर एक असोच; कारण ते थोडेसे प्राचीन कालांतील तरी लोक होते. त्यांच्या लेखांत कांहीं अल्पस्वल्प असंबद्धता दृष्टीस पडली, तर त्यांत फारसें वावगें नाहीं. पण हे अर्वाचीन कालांतले लेखक तरी टाकाचे कितीसे बळकट असतात, ह्याचा मासला पाहणें असेल तर, त्यानें ह्याच बखरीची प्रस्तावना वाचावी. म्हणजे ही समर्थांच्या चरित्राची प्रस्तावना आहे कां, वायु झालेलें बरळणें आहे ह्याचाच भ्रम पडल्यावांचून राहणार नाहीं.

ही श्रीरामदासस्वामींची बखर मोरो बाबुराव गोगटे ह्यांनीं इ. स. १९१० मध्यें छापून प्रसिद्ध केली आहे. अर्थात् हिला छापून अवघीं दहा पांचच वर्षें झालीं. म्हणजे ही प्रस्तावना अगदीं आलीकडची आहे. पण तिची दशा पहा! ही प्रस्तावना पुरी एक पान असेल किंवा नसेल. तरी तिच्यांतील नमुन्याला एकच वाक्य आणि तें सुद्धां अगदीं पहिलेंच देतोंः–

"श्रीसमर्थरामदास ह्यांची ही बखर, त्यांचें सर्व चरित्र प्रत्यक्ष पाहिलेलें

दिसतो. ह्याकरितां तें सालच चुकलें आहे असा प्रस्तुत छत्रपति चरित्र-कर्त्यांचा ध्वनितार्थ आहे असें समजून त्याची शहानिशा करूं.

ह्या समर्थांच्या जुन्या बखरींत समर्थांच्या चरित्राचेच शक दिले आहेत असें नाहीं, तर त्याशिवाय दरोबस्त महाराष्ट्रांतील साधूसंतांच्या जन्म समाधीचे वगैरे शक दिलेले असून साताऱ्चे महाराज श्रीमंत पेशवे वगैरें-चीही शकावलि दिली आहे, ही गोष्ट लक्षांत आणावी. म्हणजे ती बखर अशी तशी नसून इतिहासाच्याच स्वरूपाची आहे ही गोष्ट लक्षांत येईल.

इतकी ही बखर प्रमाणसूद व प्रत्यक्ष पाहिलेल्या मनुष्यांनीं [ हनुमान् स्वामी हे फक्त नांवाचे व सांगण्याचे धनी ] लिहिलेली असून ती सर्वा-नुमतें तपासलेली आहे. तिच्यांतील बाकी सारे शक बरोबर आणि शिवाजी महाराजांच्या अनुग्रहाचा शक व तारीख तेवढी खोटी !

रा. केळुसकरांचे तर्क, अनुमानें, कल्पना व संभवनीय गोष्टी ह्या मात्र खऱ्या, अगदीं दगडावरच्या रेषा, आणि मठांतील संत महंतांचे व सरकारी माणसांचे लेख असलेले मात्र खोटे ! आज कालचा न्याय हा असाच आहे.

---

त्यांचे शिष्य हनुमंतस्वामी ह्यांनीं लिहिलेली आहे. समर्थांनीं समाधि घेऊन आपलें अवतारकृत्य संपविल्यानंतर एक वर्षाच्या आंतच ही बखर लिहिली गेली आहे. ”

हें वाक्य वाचून आम्हांस एका हरदासाच्या नकलेची आठवण होते. ती नकल कोणती ? तर एका गृहस्थानें दुसऱ्या गृहस्थास माहिती विचारली कीं ‘ पांडव किती हो ! ’ दुसरे गृहस्थ फारच विद्वान् होते ! त्यांनीं उत्तर दिले “ अहो ! पांडव किती म्हणजे ? बाजेच्या खुराइतके तीन ! ” म्हणजे पांडव मुळीं पांच; बाजेचे खूर चार; तोंडानें म्हणतो तीन; हातानें बोटें दाखवितो दोन; आणि डोळा मिचकावतो एक ! ! ! वरील वाक्यांत हुबेहुब असाच प्रकार आहे.

हे प्रकाशक आपल्या वाचकांना ह्या बखरीची माहिती सांगतात. ही बखर कोणी लिहिली ? तर हनुमंत स्वामींनीं लिहिली. हे हनुमंतस्वामी कोण ? तर समर्थांचें चरित्र प्रत्यक्ष पाहिलेले त्यांचे शिष्य ! ह्या ऐतिहासिक ज्ञाना-

ही अनुग्रहाची तारीख बेधडक खोटी म्हणावयाला रा. केळूसकरांपाशीं येवढीं प्रमाणें तरी कोणतीं आहेत ?

१ पहिलें प्रमाण हें कीं, शिवाजी महाराज समर्थांच्या दर्शनास प्रथम आले, ते प्रतापगडाहून वाईवरून आले, आणि राज्यदानाचा प्रकार साताऱ्यास घडला; परंतु हा सर्व प्रांत १६७३ पर्यंत महाराजांस हस्तगत झाला नव्हता.

'ह्या ऐतिहासिक प्रमाणावरून स्वामींच्या भक्तांनीं सर्वत्र प्रसृत केलेले वादविषयक प्रवाद अगदीं निराधार आहेत, असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं.'

जणों काय अनुग्रहाची तारीख दहा पांच वर्षें मागें आणण्यांत रामदास भक्तांना एखादें मोठें मोक्षपदच मिळवावयाचें होतें.

मग ह्या समर्थांच्या चरित्राच्या संबधानें विश्वसनीय असे लेख तरी कोणते ? ह्यासंबंधानें रा. केळूसकर म्हणतात—

'महाराजांच्या बखरींत अद्भुत चमत्कार नाहींत म्हणून त्या बखरी खऱ्या म्हणावयास हरकत नाहीं.'

---

पुढें हातच टेकले पाहिजेत. इतके लेखकाचे तारे तुटलेले आजपर्यंत कोठेंच पाहण्यांत नव्हते ! कसे ते पहा:—

समर्थांनीं शके १६०३ मध्यें समाधि घेतली आणि हनुमंत स्वामींचा जन्म शके १६९० सालांतला. म्हणजे समर्थ समाधिस्थ झाल्यानंतर ८७ वर्षांनीं हनुमंत स्वामी जन्मास आले. असें असतां त्यांनीं समर्थांचें चरित्र प्रत्यक्ष पाहिलें तें कसें काय ? समर्थांच्या पश्चात् आकांनीं संस्थानचा कारभार ४० वर्षें चालविला. त्यानंतर श्रेष्ठांचे नातु श्री. गंगाधर स्वामी ह्यांना शाहुमहाराजांनीं दिल्लींतून सुटून आल्यानंतर सज्जनगडीं बोलावून आणलें. गंगाधरस्वामींच्या परंपरेंतीलच उत्पन्न झालेले वंशज हनुमंत स्वामीं, ते समर्थांचें शिष्य कसे व केव्हांपासून झालें ?

समर्थांचा अवतार समाप्त झाल्यानंतर ९० वर्षांनीं जन्मास आलेल्या हनुमंत स्वामींनीं जर ही खबर लिहिली, तर ती समर्थांच्या अवतार समाप्ती-नंतर एक वर्षाच्या आंतच कशी काय तयार झाली ?

अद्भुत चमत्कार नसले कीं, त्या बखरी खऱ्या ! बरें, सिद्धांत बांधून तरी निर्वाह होतो आहे म्हणावें, तर तेंही नाहीं. तेथेंही केळूसकरांच्या घोड्यानें पेंड खाल्ली ! कारण त्या बखरी बगलेशीं मारून सुद्धां त्यांचे बेच म्हणतातः—

" चिटणीसकृत बखरींत व श्रीशिवदिग्विजय ग्रंथांत अनुग्रहाची तारीख (!) १६४९ च दिली आहे. "

अरेरे ! कोण हा प्रसंग ! भरवंशाची म्हैस म्हणून चरित्रकारांनीं अद्भुत कथाहीन बखरींची कास धरली, तों तेथेंही ठणगाच झाला ! तेही म्हणतात कीं शिवाजी महाराजांस अनुग्रह झाला, तो १६४९ तच झाला ! आतां काय करणार ? परंतु गोमीचे दोन पाय तुटले तर दुसरे हजार पाय तयार असतात ! त्याप्रमाणेंच अर्वाचीन पंडितांनाही ' वचने किं दरिद्रता ? ' ह्या न्यायानें कागदी घोड्यांचा कांहीं त्यांच्या पागेंत तुटवडा नाहीं. ते सुरूखुरू तोंडानें म्हणतातः—

' तेवढा शक त्यांनीं त्या बखरीवरूनच उतरून घेतला असेल. ' रा. केळूसकरांची आपल्या तर्फेनें पुरावा जमविण्याची हातोटी तर काय बेहद्द आहे. शिवाजी महाराजांच्या जुन्या बखरी व चरित्रें हाच काय तो प्रस्तुत लेखकाचा भक्कम आधार ! त्यासंबंधानें ते म्हणतातः—

" ह्या जुन्या चरित्रांत ह्या अनुग्रहाचा उल्लेख मुळींच नाहीं ! " वः ! फार उत्तम ! येवढा पुरावा सांपडल्यावर आणखी पाहिजे पाहिजे तें काय ?

एखाद्या दीड शहाण्या वकीलानें कोर्टास सांगावें कीं, ' माझ्या अशीलाच्या तर्फेनें एक नव्हे दोन नव्हेत—पन्नास साक्षीदार मीं कोर्टापुढें

---

तात्पर्य वरच्या वाक्यासारखा हास्यास्पद प्रकार दुसऱ्या कोठेंच आढळावयाचा नाहीं. आणि तो अर्वाचीन लेखकांत सन १९१० सालांत ! तेव्हां अर्वाचीन म्हणविणाऱ्या अर्वाचीन लेखकांची ' इतिहास संशोधक मंडळाच्या' धामधुमींत जर ही दशा, तर मग इतके शकवारीनें दिनचर्या सांगणारे प्राचीन बखरकार काय वाईट ? त्यांची खरोखरच धन्य समजली पाहिजे. व त्यांच्या लेखांत कांहीं चुका—आर्वी नाहींतच पण असल्या तरी सुद्धां—त्यांच्याकडे मेहरनजरेनें व उपकारबद्ध दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे.

हजर केले आहेत व स्पष्ट सांगण्याला तयार आहेत कीं, आम्हाला ह्या खटल्यांतील एकही गोष्ट माहीत नाहीं ! आणि असे साक्षीदार आणखी एक हजार सुद्धां आणून उभे करण्यास मी तयार आहे !' असें प्रतिपादन करून साऱ्या कोर्टांत हशाचे हशा पिकवावा, अशांतलाच हाही एक प्रकार होय. 'कांहीं एक उल्लेख नाहीं' हा कांहीं आपल्यातर्फेचा पुरावा नव्हे. किंवा त्यानें बखरींतील, अनुग्रहाची १६४९ तारीख (!) खोटीही पण पडत नाहीं !

2529

यापुढील रा. केळूसकरांचा भक्कम पुरावा म्हणजे समर्थांचे शिष्य दिवाकर गोसावी ह्यांचें शके १५९४ तलें एक पत्र सांपडलें आहे. व त्यांत 'शिवाजी महाराजांची ही पहिलीच भेट आहे' असें म्हटलेलें आहे. अर्थात् ह्यापूर्वी समर्थांची व महाराजांची भेटच झाली नव्हती, तर इ. स. १६४९ त अनुग्रह होणार कसा ? ही यांची शंका. परंतु 'पहिलीच भेट' येवढ्या एका शब्दावरूनच रा. केळूसकरांनीं येवढ्या मोठमोठ्या लोकांच्या शकावल्या खोट्या म्हणण्याचें धारिष्ट करावें ही किती आश्चर्याची गोष्ट आहे ? ह्याचें सविस्तर वर्णन पुढें येणारेंच असल्यामुळें येथें त्यावर अधिक विवेचन करण्याचें कारण नाहीं.

इतके पुरावेही कोणाला अपुरेच वाटतील म्हणून अखेरीस रा. केळूसकरांनीं आपलें निकराचें पाशुपतास्त्र टाकून आपल्या प्रतिपक्षास चीत करून सोडलें आहे. हें पाशुपतास्त्र कोणतें ? तर पुण्यपत्तनांतील मिश्रविवाहाचे पुढारी प्रो. भाटे यांचें विधान ! ह्यासंबंधानें केळूसकर असे लिहितात:—

"पुण्याच्या फर्ग्यूसन कॉलेजचे प्रोफेसर भाटे ह्यांनीं दोन वर्षांपूर्वी 'सज्जनगड व समर्थ रामदास' नांवाचें एक लहानसें पण सुंदर (!) पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांचा गुरुशिष्य संबंध कधीं घडून आला, याचा निर्णय प्रकृत ग्रंथांतल्या सारखाच केला आहे. [तो कसा काय ?] ह्या वादाचा योग्य निर्णय विशेष स्पष्टपणें लक्षांत यावा असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं त्यांचें सदरील पुस्तक अवश्य वाचावें. रा. चांदोरकरांचीं अस्सल पत्रें त्यांनीं नीट तपासून वाचून पाहिलीं आहेत. प्रो. भाटे म्हणतात कीं "केशव गोसा-

त्यानें पूर्वोक्त पत्र पाठविल्यावर आठ दिवसांनीं म्हणजे चैत्र वद्य नवमीला महाराजांस अनुग्रह झाला असावा. कारण, ह्या तिथीस अमृतसिद्धि योग असून उत्तराषाढा नक्षत्र येतें." ह्या अभिजात मुहूर्तावर अनुग्रह झाल्याचा उल्लेख एक दोन बखरींत आहे. (कोणत्या? पूर्वी तर दोन बखरींत अनुग्रहाचें नांवही नसल्याचें केळूसकरच सांगतात!) ह्यास्तव "हें त्यांचें अनुमान खरें आहे."

अनुमानावरून सिद्धांत बांधणाऱ्या पंडितांची ही जोडी खरोखरच अजब आहे यांत शंका नाहीं. येवढीं जबरदस्त अनुमानें व इतके प्रचंड तर्क शिखरास पोंचल्यानंतर समर्थांच्या अनुग्रहाच्या 'तारखेनें' स्थानभ्रष्ट होऊं नये तर काय करावें?

ह्या सर्व विधानांचा फोलपणा दाखविण्यासाठीं आम्हीही कांहीं तरी लिहिण्याच्या बेतांत होतों. इतक्यांत इतिहाससंशोधक प्रो. राजवाडे ह्यांचे ह्याच विषयावर लिहिलेले कांहीं लेख व कागदपत्रही वाचावयास मिळाले, व त्यांत रा. केळूसकर ह्यांच्या विधानाचे अगदीं धुडके धुडके उडविलेले आढळून आले. तेव्हां त्यांतील कांहीं मुद्यांच्या गोष्टी येथें दिल्या म्हणजे तें काम भागण्यासारखें आहे.

धुळे येथील रा. रा. शंकररावजी देव ह्यांनीं 'रामदास आणि रामदासी' म्हणून जे सुप्रसिद्ध मासिकपुस्तक काढलें आहे, त्यांतील १५ व्या भागांत 'श्री मत्समर्थ रामदासस्वामी ह्यांनीं श्री शिवछत्रपतींस अनुग्रह दिल्याचा नक्की काळ' असें मोठें सदर घालूनच त्यांनीं त्याचा यथोचित निर्णय लावला आहे. त्यांतील वरच्या मुद्यासंबंधानें जेवढा मजकूर देणें अवश्य आहे, तेवढाच देतों. प्रो. राजवाडे म्हणतात:—

"दहा पांच वर्षें झालीं. दिवाकर गोसावी यांच्या कागदपत्रांतील दोन पत्रांचा, अस्सल म्हणून महाराष्ट्रांत घाईघाईनें पुकारा करण्यांत आला. वस्तुतः तीं पत्रें मुळींच *अस्सल नाहींत (!) तीं फारतर नक्कल

---

* एकानें अस्सल पत्रें महत्प्रयासानें अमुक अमुक ठिकाणीं अमक्या अमक्या गबाळांत सांपडलीं म्हणून प्रसिद्ध करावींत आणि दुसऱ्यानें 'तीं अस्सल नाहींत,' 'शुद्ध बनावट आहेत' म्हणून डिंडिम वाजवावा. हा

असून त्यांतील शकांच्या आंकड्यासंबंधानें तरी संशय घेण्यास सबळ कारणें आहेत. याविषयीं कोणास आतां शंका उरली नाहीं. अशा त्या पत्रांतील शब्दांचा व वाक्यांचा जर वाच्यांश घेतला, तर शके १५८० पूर्वीं शिवछत्रपतींस रामदासांचें नांव देखील माहीत नव्हतें व शके १५९४ पूर्वीं त्यांची भेट झाली नव्हती. असा अभिप्राय अभिव्यक्त होतो. रामदासी लोकांच्या सांप्रदायपरंपरेंत शिवसमर्थासंबंधानें, ज्या गुरुशिष्यरूपक कथा फार कालापासून प्रचलित आहेत, त्यांशीं सर्वथा विसंगत असा हा अभिप्राय, सूक्ष्म विचार करून साधक बाधक, वर्तमान भावी आणि संभाव्यासंभाव्य प्रमाणें लक्ष्यांत घेण्याचा परिपाठ ज्यांच्या अंगवळणीं पडला आहे, त्या लोकांना बिलकुल मान्य नाहीं.

"हनुमंतस्वामींकृत बखर भाकडकथांनीं भरलेली आहे, सबब ती अप्रमाण, असा आक्षेप वाच्यार्थाभिमान्यांनीं काढला. अप्रमाणिकतेचा शिक्का एकदां या बखरींवर बसला म्हणजे तींत शिवानुग्रहाचा जो अध्याय आहे तोही अप्रमाण ठरलाच. हनुमंतस्वामींकृत बखर चांगली प्रमाणभूत आहे, हें स्पष्टपणें सिद्ध करण्याचा बोजा वाच्यार्थाभिमान्यांनीं व्यंग्यार्था-

---

संशोधकांचा व्यापार मोठा नेकीचाच खरा ! दिवाकर गोसव्याचीं अस्सल पत्रें उपलब्ध झालीं म्हणून कांहीं लोक नगारा वाजवितात व त्यांतलि मजकुरावर हवीं तशीं तर्कटें रचतात, तोंच हे प्रो० राजवाडे सांगतात कीं, तीं पत्रें अस्सल तर नव्हेतच; कदाचित् नक्कल असली तर असेल, असें ठरवितात.

हें तर असोच; पण भिंगारकरबुवा व प्रो. राजवाडे हे उभयतां तर एक पक्षाचे; एक मताचे; व परस्परांचे अभिमानी. असें असतां त्यांचीच आपआपसांतील लठ्ठालठ्ठी पहा !

कांहीं वर्षांपूर्वीं 'भारद्वाज' या सहीनें ज्ञानेश्वर व ज्ञानदेव हे दोन असावेत. ज्ञानेश्वरीकर्ता ज्ञानदेव वेगळा, व अभंगादि करणारा वारकरी पंथाचा ज्ञानदेव वेगळा. अशा अर्थाचा एक वाद बऱ्याच दिवस धुमसत होता. त्यांत भिंगारकर बुवांनीं भरद्वाजाच्या उलट लांबलचक लेख लिहून त्यांचें खंडण केलें होतें. तो लेख पाहून प्रो० राजवाड्यांनीं 'भारद्वाजा' च्या लेखाचा चांगलाच धुव्वा उडवून दिला म्हणून भिंगारकरबुवांची मोठ्या अभिमा-

भिमान्यांवर अन्यायानें टाकला. शिवसमर्थांचा गुरुशिष्यसंबंध सिद्ध करूं पाहणारा दुसरा पुरावा म्हटला म्हणजे तुकारामानें शिवाजीस पाठविलेले अभंगमय पत्र. त्यांत लहान वयांत शिवाजीला अष्टप्रधान होते असाही उल्लेख आढळला. सिंहसनारूढ झाल्यानंतर छत्रपति संज्ञा व अष्टप्रधान संस्था प्रथम प्रचारांत आल्या, असा आक्षेप तुकाराच्या पत्रावर घेऊन तेंही या लोकांनीं अप्रमाण ठरविलें. पुढें तुकाराममलिखित पत्राच्या फार पूर्वींपासून छत्रपति ही संज्ञा व अष्टप्रधान संस्था प्रचलित होत्या, असें सस्सल पत्रांच्या आधारानें जेव्हां सिद्ध झालें, तेव्हां ह्या लोकांचा हा आक्षेप लंगडा पडला."

"पण हनुमंत स्वामीकृत बखर प्रामाणिक नाहीं, हा आक्षेप खोडून टाकावयाचा अद्याप राहिलेलाच होता. तो खोडून टाकण्याला उत्तमोत्तम आधार नुकताच सांपडलेला असल्यामुळें आतां **हनुमंत स्वामीकृत बखर बव्हंशानें प्रमाण मानावयाला** कोणतीच **हरकत नाहीं.**"

"हा पुरावा येणेंप्रमाणें:—शिवकालीन पत्रव्यवहारार्थ हिंडत असतां गेल्या महिन्यांत चाफळ येथें जाणें मला जरूर झालें. तेथें रा. रा. बापू-

---

नानें पाठ थोपटली होती. पण अखेर अमृताच्या कुंभांत मद्याचा बिंदु टाकल्याप्रमाणें शेवटच्या एका वाक्यानें त्यांच्या सर्व करामतीवर बोळा फिरविला ! तें वाक्य कोणतें ? तर ह्या वादांत भिंगारकरांनीं अस्सल म्हणून जी पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत तीं सर्व बनावट आहेत ! कशी आहे ही पाठिंबा देण्याची तऱ्हा ! भिंगारकर व राजवाडे हे उभयतांही संशोधन मंडळांतले अग्रगण्य; दोघेही सत्याचे भोक्ते; असें असूनही आपआपसांतील यादवी ! म्हणजे एकानें हा कागद अस्सल म्हणावा आणि दुसऱ्यानें बनावट म्हणून सिद्ध करावें ! अशा स्थितींत सत्यासत्याची छान व्हावी कशी ? ती व्हावी अशी इच्छा असल्यास ह्या संशोधकांवर दुसरें एक 'संशोधन—संशोधक मंडळ' म्हणून नेमलें पाहिजे ! असा हा गणितश्रेढीचा व भूमितीश्रेढीचा फेरा कधीं संपावयास नको, आणि सत्याचें बीज हातास लागावयास नको. ह्या वादविवादरूपीं आवर्तांतून सत्याची कधीं सुटका होईल तें परमेश्वर जाणें !

राव उपाध्ये यांच्या येथील कागदपत्रांच्या गळाठ्यांत एक वांकेनिशी स्मरण टिपण सांपडलें........................................ .

"समर्थांची वांकेनिशी दिवाकर गोसाव्याकडे असे. व त्यांचे हस्तक अंताजी गोपाळ देशपांडे कुडाळकर हे असत. समर्थांची रोजची दिनचर्या शिवछत्रपतींकडे दिवाकर गोसावी लिहून पाठवीत व त्या दिनचर्येचा उतारा आपल्या वांकेनिशी दप्तरांत बार करून ठेवीत. सबब समर्थ समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या चरित्रांतील ठळक ठळक लीलांचें स्थूल टिपण वांकेनिशी दप्तरांत नमूद करून ठेवण्यास दिवाकर गोसाव्यांनीं अंताजी गोपाळ कुडाळकर यांस आज्ञा केली व तीहि **समाधीनंतर चार दिवसांत केली**, हें त्यांच्या पूर्वापार प्रघाताला अनुसरून होतें हें सांगणें नलगे. समर्थांच्या वेळोवेळच्या लीला, भक्तमंडळींनीं त्यावेळीं तीथवारासुद्धां लिहून ठेविलेल्या होत्या. त्यांच्या आधारें हें स्थूल टिपण करून ठेविलेलें आहे."

ह्या टिपणांत एकंदर ३९ कलमें असून अनुग्रहाचें कलम १८ वें आहे. त्यांतील मजकूर असाः—

**"१८ शिवाजी महाराज यांस अनुग्रह शके १५७१ शिंगणवाडीचें बागेंत वैशाख शुद्ध नवमी गुरुवारीं जाला. वरकड शिवछत्रपति प्रकरण आलाहिदा लिहिलें आहे."**

शकांत ७८ मिळविले म्हणजे सन निघतो, हा नियम सर्वत्र प्रसिद्धच आहे. तेव्हां वरच्या १५७१ शकामध्यें ७८ मिळवले म्हणजे रा. केळूसकरांच्या म्हणण्याप्रमाणेंच स. १६४९ येतो, व तोच हनुमंतस्वामींच्या बखरींत असून तोच खरा आहे.

ह्याच टिपणांत २१ वें कलम समर्थांची स्वारी परळीस राहावयास गेल्याचा शक आहे तो असाः—

**"२१ परळीस नेहमीं राहणें शके १५७२ विकृति नाम संवत्सर वैशाख मास ........"**

तसेंच शिवाजी महाराजांनीं राज्यदानाची चिठ्ठी समर्थांच्या झोळींत टाकली, तें कलम २६ वें असून त्यांतील तपशील येणेंप्रमाणें आहेः—

**"२६ शके १५७७ येकनाथपंतांचें चरित्र झालें. याच शकांत**

**वैशाख शुद्ध द्वितियेस शिवाजी महाराज यांनीं झोळींत चीटी टाकली. मन्मथनाम संवत्सर. याच सालीं रामेश्वरास स्वारी गेली. चंदावरी येकोजी राजे यांस कार्तीक मासीं अनुग्रह जहाला वेणुबाईस मिरजेस याच शतकांत ठेवलें. ”.......**

ह्या तिन्ही कलमांवरून तिनही गोष्टींचा कायमचा निर्णय लागला. अशा प्रकारें हें सर्व टिपण देऊन त्याच्या सप्रमाणतेबद्दलही प्रो. राजवाड्यांनीं बरेंच प्रतिपादन केलें आहे, व अखेर हनुमंत स्वामींच्या बखरीवर जे कोणी ' सत्यापलाया ' चा दोष ठेवतात त्यांसही विस्तृत उत्तरें दिलीं आहेत. त्यांपैकीं एक दोन मुद्यांतील सारांश रा. केळूसकरांच्या आक्षेपावर लागू होण्यासारखा आहे तेवढाच येथें देतों. राजवाडे म्हणतात:—

“ १५७१ च्या वैशाखांत रामदासांची व शिवछत्रपतींची मोठ्या सायासानें प्रथम भेट झाली, हें दिवाकर गोसाव्यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर सही शिक्यानिशी रामदासांच्या निधनानंतर फक्त चारच दिवसांनीं जगजाहीर केलें आहे. असें असतां प्रथम भेट शके १५९४ नंतर केव्हां तरी झाली असल्यास असेल, असें कित्येकांचें तर्कट आहे. शक १५९४ तल्या पत्रांतील 'प्रथम भेट' या शब्दानें ही मंडळी कावरीबावरी झालेली दिसते. पण, ह्या शब्दांनीं इतकें गांगरून जाण्याचें कारण नाहीं. अनेक भेटींची एक मुलाखत होत असते. प्रत्येक मुलाखतींत प्रथम भेट, द्वितीय भेट, अशा जरूरी प्रमाणें अनेक भेटी होतात. तेव्हां शके १५९४ तील मुलाखतींत प्रथम भेटीचे विशेष माहात्म्य तें काय आहे? प्रस्तुत वांकेनिशी टिपणानें ह्या वादाचा कायमचा निकाल लागला. शिवाजींची व रामदासांची पहिली मुलाखत शके १५७१ त झाली. आणि पहिली भेट शिंगणवाडीच्या बागेंत झाली. ”

“ १५७१ त अनुग्रह घेतल्यानंतर सर्व राज्य अर्पण केल्याची चिठ्ठी समर्थांच्या झोळींत शके १५७७ वैशाख वद्य द्वितियेस टाकली. परंतु समर्थांनीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. शेवटीं अतिकाकुळतीस येऊन १२१ गांवांची नेमपत्रिका शके १५९० पासून ९९ पर्यंतच्या अवधींत करण्याचा मनसुबा शिवाजीनें समर्थांपाशीं अनेकवार काढला. शिष्य मंडळींचाही मनोदय शिवाजीस अनुकूल होता. तथापि समर्थांनीं हा बडिवार वर्जून,

शिष्यांना अशी आज्ञा केली कीं, सदर नेमपत्रिकेपैकीं कांहीं अगदीं क्षुल्लक भाग घ्यावा. तेव्हां नंतर शक १६०० तील अर्पण पत्रिका आस्तित्वांत आली. असा हा चाफळच्या ब्रेहड्याचा परंपरित इतिहास आहे. तो न पाहतां आक्षेप काढणें म्हणजे प्रतिपक्षाला उत्तर देण्याच्या कामीं काल हरण करण्यास लावण्यासारखें आहे."

इत्यादि अनेक प्रमाणें देऊन प्रो. राजवाड्यांनीं अखेर हनुमंत स्वामीच्या बखरीची महति सांगून हा भाग संपविला आहे. ती महति अशीः—

" प्रस्तुत स्मरण टिपणाशीं हनुमंत स्वामीच्या बखरीची तुलना करावी म्हणजे समजेल कीं, हनुमंतस्वामीची बखर प्रस्तुत टिपणाच्या व हें टिपण ज्या इतर टिपणांवरून तयार केलें त्या वाकेनिशींतील टिपणांच्या आधारें रचिलेली आहे. अर्थात् तिचें प्रामाण्य प्रस्तुत टिपणाहून फारसें कमी नाहीं."

रा. केळूसकरांची आक्षेप काढण्यांत ज्याप्रमाणें अपूर्वता आहे, त्याच प्रमाणें शंकेचें समाधान करण्यांत व प्रतिपक्ष खंडण करण्यांतही त्यांची अपूर्वताच आहे ! त्यांनीं उभारलेल्या सिद्धांताच्या आड कोणताही नदी नाला येवो कीं मोठा खंदक येवो, ते त्याला तिळभरही न डगमगतां त्यावरूनही अचानक उडून पार होतात. त्यांत आपला पाय घसरेल किंवा आपण तोंडघशीं पडूं ह्याबद्दल त्यांच्या मनाला कल्पनाही शिवत नाहीं ! 'अनुग्रहाची तारीख चुकली' हा सिद्धांत वर्तविल्यानंतर त्यांस दोन बखरी आड आल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. पण 'त्यांनीं तो उतारा हनुमंत स्वामीच्या बखरींतून घेतला आहे' असें बेलाशक उत्तर देऊन ते अल्लाद पार पडून गेले ! पण त्या बखरकारांनीं त्याच बखरीचा उतारा केला कशावरून ? तसें म्हणण्याला पुरावा काय ? ह्याबद्दल 'तुम्हीं विचारूं नये व आम्ही सांगूं नये !' हाच त्यांचा कायदा ! एखाद्याचा लेख निखालस आडवा आलाच आणि तो अगदीं अनावरच झाला, तर तो 'प्रक्षिप्त' असा त्याच्यावर आपला खासगी रबरी स्टँप मारून ते त्याला बेलाशक हातानिराळा करतात !

ह्यावर कित्येक लोक विचारतील कीं, रा. केळुसकरांचा ह्या अनुग्रहाच्या तारखेवरच येवढा कटाक्ष कां ? ह्याच तारखेचा येवढा कीस पाडण्यांत मतलब काय ? अनुग्रह झाला होता हें जर खरें, तर मग तो आज झाला

काय आणि आणखी दहा पांच वर्षांनीं झाला काय, त्याबद्दल येवढी हमरी तुमरी ती कशाला? ह्यांतली खरी गोम अगदीं वेगळीच आहे. ती ही कीं, शिवाजींनीं राज्य मिळविण्याच्या आधींच अनुग्रह घेतला, व ते रात्रंदिवस समर्थांच्याच आज्ञेनुसार वागले, आणि त्यांच्याच शिकवणीनें त्यांस स्वराज्य प्राप्त करून घेण्याची स्फूर्ति उत्पन्न झाली असें जें त्यापासून विधान उत्पन्न होतें तें रा. केळूसकरांच्या डोळ्यांत अगदीं कुसळाप्रमाणें सलतें. तें त्यांना नको आहे. मग समर्थ हे ब्राह्मण म्हणून म्हणा कीं अन्य कांहीं कारणानें म्हणा, पण त्या श्रेयांतील एक कष्पर्दिकही ह्या 'गोसाव्यास' द्यावयाची नाहीं असा त्यांचा कट्टा निग्रह! समर्थांची आणि छत्रपतींची गांठ अगदीं मागाहून—महाराजांनीं स्वराज्य सपादन केल्यानंतर पडली. आणि समर्थांनी जो दासबोध केला तो शिवाजी महाराजांच्या आंगचे गुण पाहून मग केला. असें त्यांस सिद्ध करावयाचें आहे. म्हणजे एकंदरींत काय कीं, शिवाजी महाराजांना राजकारणाच्या बाबतींत समर्थांची काडी इतकीही मदत नव्हती. व समर्थांच्या अंगीं तेवढा वकूबही नव्हता, असें त्यांचे हृद्गत आहे. समर्थांची महति केवळ त्यांच्या भक्तांनीं व शिष्यांनीं वाढविली आहे. बाकी त्यांत कांहीं अर्थ नाहीं. रा. केळूसकरांच्या मनांत तर असेंच घोळत असले पाहिजे कीं, शिवाजी महाराजांनीं समर्थांचा मुळीं अनुग्रहच घेतलेला नाहीं, असा बाहणा करावा होता. पण तो पचेल न पचेल ह्याचा त्यांस संशय पडल्यामुळेंच ती गोष्ट त्यांना स्पष्टपणें बोलवली नाहीं. आणि न जाणों कदाचित् पुढें मागें तसा ठराव पुढें आणण्याचा त्यांचा विचारही असेल. कारण तेंच त्यांच्या अंतःकरणांतलें ध्येय आहे.*

---

* हें आमचें अनुमान खालीं दिलेल्या त्यांच्या उद्गारांवरून सहज पटण्यासारखें आहे. ते त्यांचे उद्गार असेः—

" १ महाराजांचे देहावसान झाल्यावर थोड्याच वर्षांनीं सभासदानें महाराजांच्या चरित्राची बखर लिहिली. तींत रामदासाचा मुळींच उल्लेख नाहीं. [ मग तर काय ? उत्तमच झालें. रामदासस्वामी ही व्यक्तीच जर अस्तित्वांत नाहीं, तर मग अनुग्रह तरी कशाचा व तारीख चुकते तरी कशाची ? औषधावांचून खोकला गेला ! ] ह्यानंतर चित्रगुप्तानें बखर

समर्थांची शिवाजीमहाराजांपुढें येवढी बडेजाव पाहून रा. केळूसकरांच्या हातापायांची अगदीं लाही लाही उडून गेली आहे. मत्सरानें त्यांच्या हृदयाच्या सांदींकोंदीं अगदीं कोंदून गेल्या आहेत. त्या पाहावयास एक्सरेज पाडण्याची यातायात नको, किंवा फोटो काढण्याच्याही भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. खालीं दिलेले थोडेसे लेख चाळले तरी ते मनांतल्या मनांत कसे जळफळतात हें सहजदृष्टीस पडेल. त्यांच्या शंका कशा विचित्र आहेत त्या पहाः—

"महाराजांनीं समर्थांची सल्ला हरएक महत्त्वाच्या प्रसंगीं घेतल्याचे उल्लेख ऐतिहासिक बखरींतून नाहीं. याविषयीं समर्थभक्तांस वैषम्य वाटून हनुमान स्वामीच्या बखरींत ह्या उल्लेखांच्या अभावाची मीमांसा पुढील भाकडकथा देऊन केली आहे. शिवाजीमहाराजांनीं स. १६४९ त अनुग्रह घेतल्यापासून ते प्रतिगुरुवारीं रामदासांच्या दर्शनास येऊन राजकीय प्रकरणीं सल्ला समलत विचारीत. हा त्यांचा नेम पाळण्यास त्यांना कित्येक वेळां निकडीच्या प्रसंगांमुळें अडचण येऊं लागली हें जाणून समर्थांनीं त्यांस एके प्रसंगीं असें सांगितलें कीं, 'शिवबा, तुमचा हा नेम चालणार नाहीं. तुम्ही प्रसंग येईल तशी मसलत करून काम करीत असावें.' महाराजांनीं म्हटलें कीं, 'हा प्राण राहो किंवा जावो, आपल्या आज्ञेवांचून पाऊलही पुढें पडावयाचें नाहीं.' हा असा त्यांचा निर्धार पाहून रामदासांनीं त्यांस अशी तोड सुचावेली कीं, "हे राजा, शुचिर्भूत होऊन एक प्रश्न विचाणारा व एक लेखक असे तिघे एकांतीं बसा, आणि कार्यासंबंधानें प्रश्न विचारावयाचा असेल, तो प्रश्न विचारणारानें

---

लिहिली. तींत रामदासांचा उल्लेख फक्त दोन स्थलीं अगदीं त्रोटक केला आहे. त्यांचा अनुग्रह महाराजांनीं घेतल्याचा वगैरे उल्लेख मुळींच नाहीं. [ मग काय ? 'बाबा वाक्यं प्रमाणं' मग आम्ही केलेलें अनुमानच अमलांत आणावयाला बांधा राहिला नाहीं. ]"

वेंचक वेंचकच सारीं कुळें शोधून काढल्यावर मग पुराव्याला तोटा तो काय ? ज्यांत कशाचाच उल्लेख नाहीं, असले ग्रंथ पुराव्याला ! रा. केळूसकरांचा हा युक्तिवाद निरवालस अश्रुतपूर्व आहे यांत शंका नाहीं.

विचारावा म्हणजे तुमच्या अंगांत देवी संचारून तुमच्या मुखें बोलेल. ते शद्ब लेखकानें लिहून ठेवावे. मग देवीचें वारें विसर्जन पावल्यावर लिहून ठेवलेला मजकूर वाचून त्यांत केलेल्या आज्ञेप्रमाणें वर्तत जा."

ही अशी भाकडकथा रचण्याला सदर स्वामीला आधार येवढाच होता कीं, महराजांना एखादा बिकट प्रसंग प्राप्त होऊन कांहीं एक सुचेनासें झालें म्हणजे त्यांच्या अंगांत देवीचें वारें येऊन त्या प्रसंगीं कसें वागावें तें ते वदत असत, असें इतिहासांत नमूद झालें असून तें सर्वश्रुत होतें. परंतु रामदासां सारख्या कट्टया रामभक्तानें ज्या देवतांचा आपल्या काव्यांत अनेकशः उपहास केला आहे, त्यांतल्या एका देवतेचें साहाय्य घेण्याचा उपदेश करावा हें विचित्र दिसतें. समर्थ येवढें निस्सीम रामभक्त होते कीं, त्यांना पंढरपूरच्या विठोबाचें त्यावेळीं अतिशयित गाजत असलेलें महात्म्य तुच्छ वाटे. एकदां कोणाच्या आग्रहास्तव पंढरपुरास ते गेले तेव्हां विठोबाची मूर्ति रामरूप झाली अशी कथा आहे. शिवाय ते मारुतीचे अवतार असून त्यांनीं जिकडे तिकडे रामाचीं व मारुतीचीं देवालयें स्थापिल्याचा प्रवाद (!) आहे. ह्या दोन्हीही प्रवादांस अनुसरून त्यांनीं महाराजांस तुमच्या अंगीं राम किंवा मारुति संचारून जी आज्ञा देईल, तदनुसार वागा असें सांगावयास हवें होतें. हनुमान स्वामी, समर्थ व महाराज यांच्या तीस बत्तीस वेळां झालेल्या भेटींच्या गोष्टी देतो, त्यांतील एकाहि प्रसंगीं महाराजांनीं त्यांस राजकीय बाबतींत सल्ला मसलत विचारल्याचा उल्लेख तो कोठेंहि करीत नाहीं. शिवाय रामदास साधूशीं १६४९ पासून संघटन झालें होतें हें जर खरें तर महाराजांच्या मनांत उपासनांतर कां उद्भवलें नाहीं? हें एक कोडेंच आहे. खरें पाहतां महाराज अखेरपर्यंत भवानीचे उपासक होते. ते रामभक्त झाल्याचा पुरावा नाहीं."

ह्या लोकांचे तर्क व कोट्या इतक्या फोंफावलेल्या असतात कीं, त्याची शहानिशा करीत बसणें म्हणजे निखालस आपल्या कालाचा अपव्ययच करणें असतें. त्यांत 'ना पाप ना पुण्य.' तेव्हां त्याच्या भरीसच पडूं नये असेंही एकवार मनांत येतें. परंतु 'तांदुळांत खडे दृष्टीस पडले तर ते निवडून काढणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे,' असें ज्ञानेश्वर महाराजांनीं सुद्धां म्हटलें आहे. ह्याकरितां हें प्रत्यक्षच तांदुळांत खडे पाहिल्यावर त्यांची

अगदींच उपेक्षा करणें बरें नव्हे. 'महाराजांनीं समर्थांची सल्ला हरएक महत्त्वाच्या प्रसंगीं घेतल्याचा ऐतिहासिक बखरींतून उल्लेख नाहीं' म्हणून समर्थांच्या भक्तांना वैषम्य तें कां वाटावें ? ह्याचा अर्थ काय ? हेंच आम्हांस समजत नाहीं. सल्ला घेतल्याचा उल्लेख नाहीं म्हटल्यानें आपल्या आराध्य दैवताला कांहीं कमीपणा येतो अशी समर्थभक्तांची समजूत आहे काय ? मग त्यांस वैषम्य वाटण्याचें कारण काय ? हेंच आम्हांस समजत नाहीं. सल्ला घेतल्याचा उल्लेख नसला येवढ्यानेंच त्यांनीं अवज्ञा केली असें तर होत नाहींना ? शिवाजी महाराजांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला होता; 'दासस्य दासोस्म्यहं' असें त्यांनीं म्हटलें होतें; त्यांनीं त्यांस आपलें सर्व राज्य अर्पण केलें होतें; व ते स्वतः त्यांचे सेवक—प्रधान—बनले होते; मग आणखी निराळी सल्लामसलत ती काय घ्यावयाची ? व तिचा निराळा व तपशीलवार उल्लेख तरी कसा काय करावयाचा ? इतकें असूनही त्यांनीं समर्थांची सल्लामसलत घेतली नसेल, तरी समर्थांना कमीपणा येण्याचें मुळींच कारण नाहीं. उलट तशानें महाराजांकडे मात्र कृतघ्नपणा लागू होईल. कारण, अनुग्रह घेऊन, गुरुस्थान मानून, राज्य अर्पण करून, आपण त्यांचे सेवक बनून त्यांनींच जर त्यांस विचारलें नसेल, तर तो त्यांचाच बेमानपणा व कृतघ्नपणा समजला पाहिजे. त्यांत समर्थांच्या भक्तांना वैषम्य कशाचें ? 'कः केन संबंधः' हा संबंध कसा काय ? हेंच आमच्या ध्यानांत उतरत नाहीं.

बरें; घटकाभर कबूल केलें कीं, समर्थांच्या भक्तांच्या मनांत वैषम्य उत्पन्न झालें, तर त्यावर भाकडकथा रचावयाची ही शक्कल कसली ? देवीच्या संचाराची गोष्ट हनुमंत स्वामींच्या बखरींत येतांच ती भाकडकथा झाली आणि तीच इतिहासांत असून सर्वविश्रुत होती. मग तीच समर्थांच्या मुखांतून निघाल्यामुळें तिला भाकडकथेचें स्वरूप आलें, कीं हनुमंत स्वामींच्या बखरींत तिनें वास्तव्य केल्यामुळें तिला बट्टा लागला, हें समजण्याला कांहीं मार्ग नाहीं.

समर्थांनीं ही संचाराची गोष्ट सांगितली, म्हणून रा. केळूसकरांनीं एक दीर्घ शंका काढून मोठ्या आढ्यतेनें एक प्रश्न केला आहे. तो पाहून

तर त्यांची कींवच येते. त्यांत त्यांनीं उपहासपूर्वक अशी विचारणा केली आहे कीं,:—

"रामदास स्वतः हवें तेथें हवें तेव्हां प्रगट होत असत. अशी त्यांच्या संबंधानें आख्यायिका हनुमान स्वामीच्या बखरींत दिली आहे. तीस अनुसरून त्यांनीं महाराजांना असें कां नाहीं सांगितले कीं, "शिवबा, तुला एकाद्या कार्यासंबंधानें पेंच प्राप्त होईल तेव्हां माझें स्मरण कर म्हणजे मी प्रगट होईन."

अशी ही उपरोधीक पृच्छा करतांना हे लेखनीबहाद्दर निजले होते कीं जागे होते? शांतींत होते कीं भ्रांतींत होते? ह्या गृहस्थांनीं आधीं हनुमान स्वामींची बखर पुरतेपणीं चाळून मग तरी कलमगिरी करावयाची होती? म्हणजे 'मी हासते लोकांला, आणि शेंबूड माझ्या नाकाला' असला हा हास्यास्पद प्रकार तरी टळला असता! 'रामदास हवें तेव्हां हवें तेथें प्रगट होत' ही आख्यायिका रा. केळूसकरांना हनुमान स्वामीच्या बखरींत वाचावयास मिळाली. तींच त्यांनीं आणखी तिचींच चार दोन पानें चाळण्याची तसदी घेतली असती तर त्यांनींच ह्या त्यांच्या उपरोधिक प्रश्नाचें उत्तर समर्थांनीं शिवाजी महाराजांस पहिल्याच भेटींत दिलें इतकेंच नव्हे तर, त्याचा अनुभवही त्यास दिलेला आढळला असता! पण ज्यानें पुरती बखर वाचलीच नाहीं त्याला हें म्हणणें काय होय? आतां तरी रा. केळूसकरांनीं हनुमान स्वामीच्या गोगटे ह्यांनीं सन १९१०सालीं छापलेल्या ह्या समर्थांच्या बखरींचें पान १२८ वाचण्याची तसदी घ्यावी, म्हणजे खालचा मजकूर दृष्टीस पडेल:—

'आज्ञा प्रमाण' असें म्हणून नमस्कार करून महाराज उभे राहिले. तों 'जावें' म्हणून आज्ञा झाली. तेव्हां शिवाजीचे नेत्रीं उदक भरलें, आणि शरीरीं रोमांच उभे राहिले. तें समर्थांनीं पाहून संतोषयुक्त बोलले कीं, "कांहीं दिवशीं माझें दर्शन घडत जाईल. प्रसंगीं तुम्ही स्मरण कराल तेव्हां दर्शन घडेल."

कोठें त्रिकालज्ञानी समर्थ, आणि कोठें बखरीचीं चार दोन पानें उलटून कुत्सितबुद्धीनें 'सत्यापलाप' केल्याचें भाविष्य वर्तवून समर्थांचा उपहास करण्यास उद्युक्त होऊन प्रश्न करणारे अर्वाचीन लेखक! कशास

कांहीं मेळ आहे काय ? समर्थांनीं ह्या पृच्छेचें उत्तर महाराजांना पहिल्याच भेटींत पहिल्याच संभाषणांत देऊन टाकलें आहे. इतकेंच नव्हे, त्याचा अनुभव ही पण दाखविला आहे. पान १२९ पहाः—

" शिवाजीनें प्रतिगुरुवारीं स्वामी असतील तेथें जाऊन दर्शन घेत असावें आणि आठा दिवसांत झालेलें वृत्त स्वामींस निवेदन करावें, आणि पुढें आठा दिवसांत करावयाचें तें त्यांची आज्ञा घेऊन करीत असावें. याप्रमाणें क्रम चालू असतां कोणे एके समयीं यवनांकडून चढाई होऊन बहुत संकट पडलें असतां समर्थांस विचारल्यावांचून कांहीं मसलत करावयाची नाहीं म्हणून स्वामीचे दर्शनाविषयीं बहुत यत्न केला. परंतु दर्शन नाहीं. ते समयीं सर्व कारभाऱ्यांनीं विनंति केली कीं, स्वामी आपलें स्वाधीन नाहींत. आपल्यास तर त्यांना विचारल्यावांचून कांहींच कर्तव्य नाहीं, ही गोष्ट कशी चालेल ? तस्मात् जो प्रसंग आला आहे, तो सर्वत्रांचे मसलतीनें शेवटास न्यावा. नंतर स्वामींस विनंति करावी. तेव्हां शिवाजी महाराजांनीं सर्व कारभाऱ्यांस आज्ञा केली कीं, कसेंही असो स्वामींची आज्ञा जाहल्याशिवाय कोणतेंही काम सर्वथैव कर्तव्य नाहीं. असा निग्रह सर्वत्रांनीं पाहून बहुत विचारांत पडले. गनीम चढाई तर करून आला, असें संकट प्राप्त झालें. त्या काळीं स्वारी रायगडास होती. महाराज सभेंत मंडळीसहवर्तमान बसले आहेत. आणि स्वामींचें शोधास कारकून गेले आहेत व सर्व विनंति करीत आहेत कीं, स्वामींची गांठ कोठें पडत नाहीं, आणि गनीम तर चढाई करून जवळ आला; आतां कशी तरी मसलत शेवटास नेली पाहिजे. अशी लोक विनंति करीत आहेत तों अकस्मात पायांत पादुका व हातांत माळ अशा वेषानें समर्थ सभेंत येऊन उभे राहिले. हें पाहून महाराजांसहवर्तमान सर्व सभासद साष्टांग नमस्कार करून उभे राहिले. ते समयीं समर्थ बोलले कीं ' शिवबा, तूं हा राज्यकारभार करतोस यांत कोणते समयीं कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. आम्ही तर सतत तुम्हांपाशीं नाहीं, आणि तुमचा नेम तर असा आहे तो चालणार नाहीं. याकरितां जसा प्रसंग येईल तशी मसलत करून काम करीत असावें. ' अशी समर्थांची आज्ञा होतांच साष्टांग प्रणिपात करून हस्त जोडून आनंदाश्रुयुक्त व अष्टभावेंकरून पूर्ण होत्साता परम

नम्रतेनें शिवाजी महाराज बोलले कीं, " हा प्राणजावो अथवा राहो, दौलतीचा विषय तो किती ? आज्ञे वांचून पाऊलही पडावयाचें नाहीं. "

" अशी विनंती करतांच समर्थांनीं हास्यवदन करून राजास पोटाशीं धरून भाषण केलें कीं ' शिवाजी ! तूं धन्य आहेस. आतां आम्ही सांगतों त्याप्रमाणें वर्तावें. "

असें म्हणून त्या प्रसंगीं रा. केळूसकरांनीं निर्दिष्ट केलेली अंगांतील देवीच्या संचाराची गोष्ट [ भाकडकथा ? ] सांगून " समर्थ अदृश्य झाले ! हा चमत्कार पाहून महाराजांसहवर्तमान सर्व मंडळीस आनंद जाहला. "

ह्यावरून प्रस्तुत आक्षेपकारांनीं उपरोधिक म्हणून पृच्छा केलेला चमत्कार तर समर्थांनीं प्रत्यक्ष दाखविलाच. पण पुढेंही नड पडूं नये म्हणून ही देवीच्या संचाराची तोड सांगून ठेवली.

ह्या अद्‌भुत चमत्काराची गोष्ट अजिबात खोटी म्हणावी, तर त्या सभेंत अनेक लोक बसल्याची साक्ष आहे; शिवाजी महाराजांची व समर्थांची भेट झाल्या दिवसापासून प्रत्येक दिसाची दिनचर्या वाकनीस व दिवाकर गोसावी, शिवाजी महाराजांकडे पाठवीत हा प्रत्यक्ष दाखला आहे. तेव्हां हें टिपण शिवाजी महाराजांच्या व त्यांच्या मंत्रिमंडळाच्या नजरेखालून गेलेलें असलेंच पाहिजे हें उघड आहे. जर तेव्हांचा हा चमत्कार अजिबात खोटा असतां तर शिवाजी महाराजांनीं तो त्या टिपणांतून काढून टाकला नसतां काय ? शिवाजी महाराजांना असला मिथ्या प्रकार कधीं एक क्षणभरतरी खपला असता काय ? ह्यावर रा. केळूसकर काय पांडित्य लढवितात तें पहावें ! अशा प्रत्यक्ष प्रमाणाला खोटें म्हणण्याला किंवा ' सत्यापलापाचें स्वरूप ' देण्याला निधड्या छातीचाच मनुष्य पाहिजे.

आतां देवीच्या संचाराची गोष्ट वर दिलेल्या ह्याच प्रसंगा पासून झालेली असेल तर ती रितीचीच गोष्ट झाली. व रा. केळूसकराचें म्हणणें सारेंच फिकें पडलें. किंवा ती गोष्ट ह्याच्या ही आधींपासूनच सुरू असल्याचा दाखला मिळाला, तरी सुद्धां त्यांत विरुद्ध असें कांहींच नाहीं. कारण, पूर्वापार चालत आलेली देवीच्या संचाराची गोष्ट तिलाच अनुसरून तदनुसारच वर्तन करीत जावें अशी समर्थांनीं आज्ञा केली ती ही थोरपणाला व दूरदृष्टीला अनुरूपच आहे.

मुक्तेश्वरांनीं आपल्या महाभारताच्या आदिपर्वांत म्हटलें आहे:—

**विवेका ऐसा गुरू। चित्ता ऐसा शिष्य चतुरू।**
**जिवा ऐसा मित्र उदारू। भुवनत्रयीं मिळेना ॥ १ ॥**

'आत्मविचारासारखा गुरु; मनासारखा चतुर शिष्य आणि जीवासारखा उदार मित्र; त्रिभुवनांतसुद्धां मिळावयाचा नाहीं.' हेंच तत्त्व समर्थ पूरोपूर जाणून होते. 'सबसे सुन्ना और दिलसे करना' ही म्हणही प्रसिद्धच आहे. सल्लामसलत सर्वांची घ्यावी, परंतु शेवटीं जें काय करावयाचें तें आपल्या स्वतःच्याच विचारानें करीत असावें. स्वतःचाच विचार जितका उपयोगी पडतो, तितका दुसऱ्याचा विचार कधींही उपयोगी पडत नाहीं. ह्याचें कारण, उघडच आहे कीं, ज्याचें जें कार्य असते, त्यांत तो मनुष्य स्वतः पोहलेला असतो. त्यांतील डावपेंच त्याला स्वतःला जितके माहीत असतात, तितके इतरांस कळणें बहुधा अशक्यच असतें. शिवाय तें कार्य तडीस नेण्याची जी हिंमत असते ती कांहीं निराळीच असते. ती इतर लोकांस साधणें कधींच शक्य नाहीं.

'लोककल्याण' हें ध्येय जरी उभयतांचें एक असलें तरी आपला पंथ निराळा व महाराजांचा पंथ निराळा. आपला भक्तिपंथ आणि सात्विकवृत्ति. महाराजांचा नीतिपंथ व क्षात्रवृत्ति. तेव्हां अशा वीर पुरुषास आपणांस निश्चयानें सल्लामसलत देणें कधींच उक्त होणार नाहीं. कारण राजकारण निराळें आणि भक्तिपंथ निराळा. तेव्हां त्यांत आमच्यासारख्या गोसाव्यानें ढवळाढवळ करणें कधींच इष्ट नाहीं. राजकारणांतील विचार जन्मापासून शिवाजीच्या मनांत रात्रंदिवस घोळत असल्यामुळें, त्यावर तोड काढणें त्याला जितकें सुचेल, तितकें इतरांस सुचणें कधींच शक्य नाहीं. म्हणून प्रत्येकानें आपआपल्या संकटाची तोड आपणच काढावी हें उत्तम, हाच विचार मनांत आणून समर्थांनीं शिवाजी महाराजांवरच तें काम सोपविलें. पण त्यांत एक अंगामध्यें देवीच्या संचाराची युक्ति सुचविली. देवीच्या संचाराचा अर्थ इतकाच कीं, एकाग्र अंतःकरण कर; कुलस्वामिनीचें ध्यान मनांत आण. आणि त्या देवतेशीं तद्रूप होऊन कसें करणें त्याचा विचार कर; म्हणजे ती परमेश्वरीच त्यांत तुला सिद्धि देईल. त्या तुझ्या कार्यांत

यश यावें म्हणून श्रीरामचंद्राची प्रार्थना करणें हें आमचें कर्तव्य आहे, तें आम्ही रात्रंदिवस करीतच आहोंत. हाच देवीचा अंगांत संचार करण्याच्या गोष्टींतील भावार्थ आहे.

अशी ही अंगांत देवी संचरण्याची गोष्ट दूरदर्शीपणाची, व अनन्य भक्तिभावानें भरलेली असतां रा. केळूसकरांनीं तिच्यावर जे तर्कट रचलें आहे, व तिच्यावर जी कल्पना लढविली आहे, ती केवळ लोकोत्तरच समजली पाहिजे. तिचा मासला सर्वांच्या नजरेखालून जाणें फार अवश्य आहे. शिवाजी महाराजांच्या अंगांतील देवीच्या संचारावर त्यांनीं जें पांडित्य केलें आहे तें असें आहेः—

" रामदासासारख्या कट्टया रामभक्तानें ज्या देवतांचा आपल्या काव्यांत अनेकशः उपहास केला आहे, त्यांतल्या एका देवतेचें सहाय्य घेण्यास उपदेश करावा हें विचित्र दिसतें."

समर्थ हे स्वतः रामदासांचे कट्टे भक्त होते ही गोष्ट खरी आहे. पण त्यांनीं आपल्या काव्यांत इतर देवतांचा कधीं व कोठेंसा उपहास केला आहे? तो सदर आक्षेपकारांनीं दाखवून दिला असता तर आम्ही त्यांचे फार आभार मानले असते. केवळ साप साप म्हणून भुई धोपटावी ह्याचा अर्थ काय? रामाचे ते कट्टे भक्त होते; म्हणून देवीवर त्यांची कधींशी अश्रद्धा होती? शके १६०० सालामध्यें अंगावर नायटा उठला म्हणून प्रतापगडाच्या देवीस एक तोळ्याचें सुवर्णाचें पुष्प करून तें रातोरात नेऊन वाहिलें, व मातोश्रींचा नवस पूर्ण केला, ही गोष्ट तर प्रत्यक्ष हनुमानस्वामींच्या बखरींतच सविस्तर दिली आहे. होयः दिलेली आहे खरी; पण कोणाला? ती बखर वाचील त्याला! समर्थ जेजुरीस जाऊन त्यांनीं खंडेरावाचेंही दर्शन घेतलें होतें. मोरगांवच्या गणपतीसही ते गेले होते. बटव्यांत रात्रीं पानें नव्हतीं म्हणून कल्याणस्वामी किल्ल्यावरून खालीं जात असतां सर्पदंश होऊन बेशुद्ध पडले! त्यावेळीं समर्थांनीं तेथील बहिरोबास मणाचा गूळ वांटण्याचा नवस करून त्यांस उठविलें! ते पंढरीस गेले होते. काशी, रामेश्वर, जगन्नाथ, शिवकांची, विष्णुकांची वगैरे सर्व देवस्थानांत जाऊन त्या त्या देवतेचीं दर्शनें त्यांनीं घेतलीं होतीं. मग त्या 'रामदासानें' आपल्या काव्यांत कोणत्या दैवताचा उपहास केला आहे? आणि तो सुद्धां

एकवारच नव्हे तर अनेक वार! तो कोठें आहे ? समर्थांनीं इतर दैवतांच नावें ठेवलेलीं आम्हांस तर कोठें आढळत नाहींत. मग रा. केळूसकरांस कोठें आढळलीं तीं परमेश्वर जाणें !

**नव्हे जाखाई जोखाई। मायराणी म्हेसाबाई।**
**गणोबा विक्राळ। लाडू मोदकाचा काळ।**
**वेताळें फेताळें जळो त्यांचें तोंड काळें॥**

असे तुकाराममहाराजांचे क्षुद्र देवतांविषयीं उद्गार आहेत. परंतु समर्थांनीं आपल्या कवितेंत असें कधींच म्हटलेलें नाहीं. समर्थांचा अनुग्रह घेतला तरी ते आपल्या कुलस्वामीची उपासना सोडा व रामदासपंथाची दीक्षा घ्या, असें कोणासच कधीं सांगत नसत. आपआपल्या कुलदैवतांची उपासना करावी, आणि आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागावें असेंच नेहेमीं त्यांचें सांगणें असे. राम हें समर्थांचें कुलदैवत होतें. म्हणून ते श्रीरामाचीच उपासना करीत; तरी अन्य देवतांचा ते कधींही तिरस्कार करीत नसत. ते नेहेमी बोलतांना 'रामाची सेवा करीत जा;' किंवा 'रामाची उपासना सोडूं नका' इत्यादि भाषा वापरीत नसत. तर 'श्रीची सेवा तुम्ही करीतच आहां;' 'श्रीची आराधना करा' असें ते नेहेमीं म्हणत. ह्यावरुन 'श्री' म्हणजे कोणतेंही आपआपलें आराध्य दैवत. मग तो राम असो; विठोबा असो; देवी असो; कीं गणपति असो. दैवत कोणतेंही असलें तरी त्याचा अधिकार सारखाच. सारीं दैवतें एकरूपच आहेत हेंच नेहेमीं त्यांच्या उपदेशांतील सार असे. समर्थ पंढरीस गेले असतां श्री पंढरीनाथही त्यांना रामरूपच दिसले. म्हणून त्यांनीं म्हटलें आहे:—

**येथें उभा कां श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा।**
**काय केली सीताबाई। येथें राही रखुमाई।**
**काय केली अयोद्ध्यापुरी। येथें वसविली पंढरी।**
**काय केले धनुष्यबाण। कर कटावरि ठेवून।**
**काय केली शरयू गंगा। येथें आली चंद्रभागा।**
**काय केलें वानरदळ। येथें जमवीले गोपाळ॥**

इत्यादि जे अभंग केले आहेत, त्यांतील सार हेंच आहे. तात्पर्य, समर्थ जरी स्वतः कट्टे रामभक्त होते, तरी ते दुसऱ्या कोणत्याही दैवताचा तिरस्कार करीत नसत. इतकेंच नव्हे, तर सारीं दैवतें एक स्वरूपाचींच आहेत असाच त्यांचा दृढतर सिद्धांत होता. रा. केळूसकर पुढें म्हणतातः—

" शिवाय रामदाससाधूशीं १६४९ पासून संघट्टन झालें होतें हें जर खरें तर महाराजांच्या मनांत उपासनांतर कां उद्भवलें नाहीं ? हें एक मोठें कोडेंच आहे. "

पुष्कळ वर्षांचें सघंट्टण असलें म्हणजे उपासनांतर केलेंच पाहिजे असा कांहीं शास्त्रार्थ आहे कीं काय ? इतर धर्मांत ज्याप्रमाणें बाप्तिस्मा घ्यावा लागतो, त्याप्रमाणें कांहीं आपल्या वैदिक धर्माची गोष्ट नाहीं. गुरूचें उपास्य दैवत कोणतेंही असो; आणि शिष्याचें दैवत कोणतेंही असो. त्यापासून अनुग्रह देण्याला किंवा घेण्याला मुळींच कांहीं प्रतिबंध नाहीं. कोणत्याही दैवताची उपासना केली तर ती एकाच अधिष्ठानांत समाविष्ट होते. आमचे देव कितीही भिन्न भिन्न असले, किंबहुना तेहतीस कोटी देव जरी घेतलें किंवा मानले, तरी ते एकाच परमेश्वराचे निरनिराळे अवतार आहेत असें मानतात. ह्यामुळें:—

**अकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं ।**
**सर्व देव नमस्कारं केशवं प्रतिगच्छति ॥ १ ॥**

आकाशांतून पर्जन्याच्या रूपानें पडत असलेलें पाणी ज्याप्रमाणें चहूं बाजूंनीं गेलें तरी समुद्रासच जाऊन मिळतें, त्याप्रमाणें कोणत्याही देवाला नमस्कार केला तरी तो एका परमेश्वरालाच पोंचतो, हेंच तत्त्व समर्थांचें होतें; दुसरें कसें असणार ? रा. केळूसकरांना स्वधर्मांतील येवढेंही तत्त्व कळूं नये हें त्यांचें निखालस अज्ञान होय. ते आणखी यापुढें म्हणतातः—

" खरें पाहतां महाराज अखेरपर्यंत भवानीचे उपासक होते. ते रामभक्त झाल्याचा पुरावा नाहीं. "

आपल्या उपास्य दैवताची भक्ति सोडूं नये, हेंच समर्थांच्या अनुग्रहांतील मुख्य बीज होतें. मग त्यांनीं भवानीची उपासना कायम ठेवली ह्यांत आश्चर्य तें काय ? ते रामभक्त झाल्याचा पुरावा पाहिजे कशाला ?

रामभक्त व्हावयाला रामदासांच्या मुद्राच ठोकल्या पाहिजेत असा त्याला अर्थ नाहीं. महाराजांना जशी भवानीची भक्ति होती तशीच श्रीरामचंद्राचीही त्यांना भक्ति होतीच, व समर्थांना जशी श्रीरामरायाची व हनुमंताची भक्ति होती, तशीच भवानीचीही भक्ति होती. त्यांत रेंसमात्र कमतरता नसे. महाराज प्रत्यक्ष जरी रामभक्त असल्याचा पुरावा नसला तरी सज्जनगडावरील श्रीरामनवमीच्या उत्सवांत महाराज स्वतः सडासंमार्जन करीत ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सज्जनगडावरील उत्सवांत श्रीची सेवा कोणी कोणी कसकशी करावी याबद्दल जो निर्बंध केलेला होता त्यांत महाराजांकडेः—

**"८ राजेश्रींनीं...समर्थ सभेंत बसले म्हणजे उजवे बाजूस उभे राहून समर्थांवर मोरचल धरावें."**

**"२० राजेश्री...पहांटेस उठून मठाचें सडासंमार्जन आंगीं करावें व सर्व कामावर देखरेख व छबिन्याच्या मागें चालणें."**

श्रीरामचंद्राच्या मंदिरांत स्वतः पहांटेस उठून सडासंमार्जन करणें ह्यापेक्षां रामभक्त झाल्याचा आणखी पुरावा तो काय पाहिजे? रामभक्त झाले म्हणजे पूर्वीच्या उपास्याची उपेक्षा केली पाहिजे असा कांहीं त्याचा अर्थ होत नाहीं. मग रा. केळूसकरांची ह्यासंबंधानें कल्पना तरी काय आहे कोण जाणें! अनुग्रह घेणें म्हणजे धर्मांतर करणें असें रा. केळूसकर समजतात कीं काय? तसें असेल तर तो त्यांचा समज निखालस चुकीचा आहे असेंच समजलें पाहिजे.

पण रा. केळूसकर अनुग्रहाची तारीख (!) चुकीची आहे हें सिद्ध करण्याकरितां येवढा द्राविडी प्राणायाम करतात तो कां? अनुग्रह घेतला ही गोष्ट जर खरी तर मग तो आज घेतला काय आणि उद्यां घेतला काय? पण त्यांना त्यावरून जें काय अनुमान काढावयाचें आहे तें हेंच कीं, समर्थांचा शिवाजीमहाराजांनीं जो अनुग्रह घेतला तो अगदीं शेवटीं शेवटीं स्वराज्यसंपादन वगैरे झाल्यानंतर घेतला. आणि तें कां? तर समर्थभक्त असें म्हणतात कीं, शिवाजी महाराजांच्या अंगीं स्वराज्य प्राप्त करून घेण्याची जी स्फूर्ति किंवा करामत उत्पन्न झाली ती सर्व समर्थांच्या

शिकवणीनें झाली. आणि ती गोष्ट तर रा. केळूसकरांना कानांनीं ऐकावयास सुद्धां नको. तीच गोष्ट त्यांच्या नेत्रांत शल्याप्रमाणें खुपते, पण इतकें खुपण्यासारखें तिच्यांत काय आहे ? जी गोष्ट सारासार विचारानें सहज कळण्यासारखी असते, ती सोडून देऊन अर्वाचीन लेखकांना रिकामा वाद उपस्थित करण्यांतच भूषण वाटतें. आणि ह्या वादांत ते जो पुरावा म्हणून उभा करतात तोच आधीं लटपटींत असतो; म्हणून त्यास टेका देण्यासाठीं दुसरी मेढ उभी करतात, ती कीड लागलेली असते. अशा रीतीनें होतां होतां अखेर तो साराच डोल्हारा झुकता मनोरा होऊन केलेले सारे श्रम व्यर्थ मात्र होतात.

आतां ह्या प्रस्तुतच्या वादांतच कां पहाना ? शिवाजी महाराज समर्थांचा अनुग्रह केव्हांही घेवोत. दहा पांच वर्षें आधीं घेवोत कीं दहा पांच वर्षें मागाहून घेवोत. घेतला ही गोष्ट जर खरी आहे, व त्यांस राज्य समर्पण केल्याचेंही जर नमूद आहे, तर ते समर्थांच्या आज्ञेनुरूप वागले असतील हें अगदीं उघड उघड आहे. पण तें केव्हांपासून ? तर अनुग्रह घेतल्यापासून. त्याच्या आधींचा त्यांत कांहीं संबंध नाहीं. परंतु शिवाजीमहाराजांच्या अंगीं स्वराज्य संपादन करण्याची स्फूर्ति उद्भवली ती अगदीं बाल्यपणापासूनच उद्भवलेली आहे. बाल्यदशेंत तालीम करणें, मावळे लोकांत मिसळणें, जंगलांतील व डोंगरांतील चोरवाटांची माहिती करून घेणें, व यवनांचा तिरस्कार करणें हा सर्व स्वराज्यसंपादनाचा अंकुर त्यांच्यामध्यें अगदीं समजूं लागल्यापासूनच होता. तोरणा किल्ला घेऊन स्वराज्यस्थापनेचें जें मंगल तोरण बांधलें किंवा मुहूर्त मेढ रोंवली, त्यावेळीं समर्थांची व त्यांची ओळख सुद्धां नव्हती. मग सल्लामसलत देणें घेणें कशाचें ? ह्या दोन्हीही गोष्टी अगदीं सामान्य मनुष्याला सुद्धां कळण्यासारख्या आहेत. मग ह्यांत वादविवादाचें किंवा एकमेकांस खोटें पाडीत बसण्याचें कारण काय ? महाराजांच्या अंगीं स्वराज्यस्थापनेचा अंकूर मुळापासूनच होता. तसाच समर्थांच्या अंगींही स्वधर्मस्थापनेचा अंकुर मुळापासून होता. स्वराज्य आणि स्वधर्म ह्या दोहोंची नेहेमीं सांगड असते. शिवाजीमहाराजांनीं समर्थांशिवायही स्वराज्यस्थापनेचें काम पार पाडलें असतें, तसेंच शिवाजीमहाराजाशिवाय समर्थांनीं स्वधर्मस्थापनेचेंही काम पार

पाडलें असतें ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु समर्थांच्या स्वधर्मस्थापनेची गंगा आणि महाराजांची स्वराज्यस्थापनेची यमुना या उभयतांचा ' चक्रनेमि ' न्यायानें कृष्णातटाकीं संगम झाल्यानें त्यांचा पुढील प्रवाह फारच जोरानें फोंफावला. म्हणजे ही गोष्ट दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें. दूध नुसतें प्राशन केलें तरी तें अमृतच; पण तेंही आटवून त्यांत आणखी साखर मिश्रित झाली, तर त्याचा आस्वाद मनाला अधिक तृप्त करतो. त्याच मासल्याचा हा गुरुशिष्य जोडीचा योग ही एक महद्भाग्याची ईश्वरी संकेताची गोष्ट घडून आली. त्यामध्यें समर्थांच्या आशेवांचून महाराज पाऊल सुद्धां टाकीत नसत अशी कोणी थोडीशी अतिशयोक्ति केली असली म्हणून काय मोठा अपराध झाला ? किंवा शिवाजी महाराजांच्या अंगीं बालपणापासूनच स्वराज्य आक्रमण करण्याची स्फूर्ति होती म्हटलें, तर त्यांत तरी वावगें काय ? तीही गोष्ट खरीच आहे.

ह्या साऱ्या गोष्टी लहान मुलांस सुद्धां समजण्याइतक्या सोप्या असतां त्यांच्याविषयीं रिकामी अढी मनांत बाळगून त्यावर जें त्यांनीं पुराण रचलें आहे, व ह्या लेखकाला खोटसाळ म्हण, त्या लेखकानें ' सत्यालाप ' केला म्हण, आपल्या आड येणारा भाग ' प्रक्षिप्त ' म्हणून दडपून दे. ' हा सारा प्रकार बनावट ' आहे म्हणून बेलाशक विधान कर. असा सारा गोंधळ उडवून दिला आहे ! तो किती शुष्क आहे, व त्यांतून काढलेलीं अनुमानें व जागोजाग मारलेले शेरे किती अप्रयोजक आहेत ह्याची वानगी पहावयास मिळावी म्हणून त्यांनीं उकरून काढलेली नसती उठाठेव कशी आहे ती दाखवितों.

" रामदास स्वामींच्या चरित्रांत दिलेला अनुग्रहाचा शक खरा आहे असें मानून चाललें तर तुकारामबावांचें देहावसान झालें त्याच वर्षीं हा अनुग्रह झाला आहे असें म्हणावें लागतें. हें जर खरें तर समर्थांचा अनुग्रह घेतल्यानंतर तुकारामबावा, रामदासस्वामी, व शिवाजी महाराज यांच्या अनेक वेळां भेटी झाल्या, परळी येथें मोठा समारंभ झाला, तेव्हां तुकारामबावा आले होते, इत्यादि गोष्टी समर्थांच्या बखरींत आहेत. त्याही खऱ्या मानून तुकारामबावांचा निधनकाळ बराच पुढें लोटावा लागेल. परंतु तो इ. स. १६४९ साला पलीकडे मुळींच ढकलतां येत

नाहीं, हें निर्विवाद आहे. आणखी असें कीं, महाराजांनीं बावांस पत्र पाठविलें तें अर्थात् त्यांच्या देहावसानापूर्वीं कांहीं दिवस पाठविलें असलें पाहिजे. परंतु रामदासस्वामींच्या बखरींत तें अनुग्रह घेतल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं पाठविल्याचा उल्लेख आहे."

ह्यासंबंधानें आम्हीही त्याविषयीं बराच विचार केलेला आहे. त्यावरून आमचें तर दृढतर अनुमान असें आहे कीं, ह्या सर्व गोष्टी एकाच वर्षांत झाल्या असल्या पाहिजेत. किंवा एखाद्या वर्षाच्या शकांत कोठें तरी हस्तदोष असला पाहिजे. ह्याशिवाय दुसरी येथें कल्पनाच चालत नाहीं. त्या कालीं आतांप्रमाणेंच निरनिराळ्या पंचांगांतही फेर हे असतच. तेव्हां शकामध्यें असा एखाद्या वर्षाचा फेरफार असणें संभवनीय आहे. बाकी ह्या ज्या वर दिलेल्या गोष्टी घडल्याचें लिहिलें आहे, त्या गोष्टी घडल्या असाव्यात यांत मात्र शंका नाहीं. कारण त्यापैकीं एकही गोष्ट अशी नाहीं कीं, जी घडणें असंभाव्य आहे.

इतका वेळपर्यंत रा. केळूसकरांनीं केवळ 'सत्यापलापा' वरच भागविलें होतें. पण यापुढें त्यांनीं ह्या प्राचीन बखरकारावर बनावटपणाची कशी तोहमत आणली आहे ती ऐका:—

" ह्या बखरींत तर या संबंधाचा कांहींसा कृत्रिम प्रकार दिसतो. तींत तुकाराम बावांच्या अभंगरूप पत्रोत्तराचे दोन तुकडे केले आहेत. रामदास स्वामीचें दर्शन घडण्यापूर्वीं तुकाराम बोवा यांस बोलवावयास पाठविलें तेव्हां त्यांनीं उत्तर पाठविलें तें दोन अभंगांत दिलें आहे; आणि रामदास स्वामींनीं अनुग्रह दिल्यानंतर पुनः महाराजांनीं बावांस येऊन दर्शन द्यावयासाठीं विनंतिपत्र लिहिलें, त्याचें उत्तर त्यांनीं पाठविलें तें चार अभंगांत दिलें आहे. जर समर्थांच्या ठायीं महाराजांचा भाव दृढ झाला असून त्यांच्या दर्शनाचा वेध लागून राहिला होता, तर तुकाराम बावांकडे धांव घेण्याचें त्यांस काय प्रयोजन होतें ? नुसतें दर्शन घ्यावयाचें होतें तर त्यांस पत्र पाठवून बोलावण्याचें काय कारण होतें ? महाराज नेहेमीं फिरत असून वेळोवेळां तुकाराम बावांचें कीर्तन ऐकावयाची संधि साधीत असत. असा इतरत्र स्पष्ट उल्लेख आहे. अशा समयीं त्यांस दर्शन होत नसे काय ? तेव्हां अर्थात् हा सगळा प्रकार केवळ बनावट दिसतो."

समर्थांच्या संबंधानें कोणतींही विधानें केलीं तरी तीं रा. केळूसकरास शोभण्यासारखीं तरी होतीं. कारण ते समर्थांच्या व समर्थशिष्यांच्या विरुद्ध पक्षाचे तरी होते. पण त्यांत तुकाराम बावांच्या संबंधानें नाहीं नाहीं ते तर्कवितर्क काढीत बसण्याचें कांहींतरी कारण होतें काय? समर्थ-भक्तांनीं समर्थांची महति वाढविण्याकरितां आपल्या बखरींत खोटें नाटें घुसडलें असें म्हणण्यांत कांहीं तरी अर्थ होता. पण त्याच समर्थांच्या बखर-कारांनीं तुकाराम बोवांची हकीगत बनावट करून आपल्या बखरीची 'कृत्रिम' रचना करण्यांत हेतु कोणता? हें कांहींच सांगतां येत नाहीं. बरें, ह्यामध्यें समर्थांच्या बखरकारांनीं बनावट कृति केली ती कोणती? तर सहा अभंगांचें पत्र होतें त्याचे दोन तुकडे करून त्यापैकीं अभंगांचें पहिले पत्र केलें, व चार अभंगांचें दुसरें पत्र केलें. पण असें हें पत्र दुभंग करण्याचें कारण तरी काय? मतलब कोणता? हें आक्षेपकारानीं कोठेंच कांहीं दर्शविलें नाहीं! दुसऱ्या प्रश्नांत तरी अर्थ काय? 'समर्थांच्या ठिकाणीं भाव दृढ झालेला असून त्यांच्या दर्शनाचा वेध लागून राहिला होता तर तुकारामबोवांकडे धांव घेण्याचें महाराजांस काय प्रयोजन होतें?' आधीं हें पत्र पाठविलें त्यावेळीं त्यांस समर्थांचा वेध लागला होता किंवा नाहीं ह्याचा ही संशयच. बरें क्षणभर तसा वेध लागला होता असें मानलें तरी तशा स्थितींत दुसऱ्यास पत्र पाठवावयास हरकत कोणती? एका गोष्टीकडे मन वेधलें आणि तत्सदृश दुसरी वस्तु दृष्टीस पडली; तर तिचा लाभ आधीं मिळाल्यास तो मनुष्य साधून घेणार नाहीं काय? एका साधूचें दर्शन घेतलें कीं, पुन्हा दुसऱ्या साधूचें दर्शन घेऊं नये असा तर कांहीं निर्बंध नाहीं ना? उलट एका साधूचें दर्शन घडलें तर दुसऱ्या साधूच्या दर्शनाविषयीं अधिकच उत्कंठा लागून राहते. आणि त्यांतून महारा-जांस समर्थांच्या दर्शनाविषयींचा वेध लागून राहिला होता, असें रा. केळूसकरच म्हणतात. अर्थात् तोंपर्यंत समर्थांचेंहि दर्शन नव्हतें हा त्यांत ध्वनितार्थच आहे. तेव्हां समर्थांचें दर्शन घडत नाहीं, तर तुकाराम-बोवांचें तरी दर्शन घडो अशी इच्छा होणें स्वाभाविकच आहे. ह्यांत विपरीत असें कांहींच दिसत नाहीं. मग रा. केळूसकरांना त्यांत कृत्रिमता व बनावटपणा काय वाटला कोण जाणें!

'नुसतें दर्शन घ्यावयाचें होतें तर त्यांस पत्र पाठवून बोलवावयाचें काय कारण होतें ?' 'वेळोवेळीं त्यांच्या कीर्तनाची महाराज संधि साधीत व तेथें त्यांस त्यांचें दर्शन घडतच असे. मग त्यांच्या दर्शनासाठीं मुद्दाम दिवट्या, छत्री, घोडे कशाला पाठवितील ? ह्या त्यांच्या शंका आहेत. रा. केळूसकरासारख्या लेखकानें असल्या क्षुल्लक शंका काढीत बसावें ही खरोखरच कीव येण्यासारखी गोष्ट आहे. कारण महाराज कीर्तनास येत ते रात्री येत, आणि ते सुद्धां बहुधा वेषांतर करून येत असावेत. निदान राजकीय थाटानें तर खास येत नसतील. तेव्हां तशा पेशामध्यें कीर्तनासारख्या प्रसंगीं चारचौघांत महाराजांना मोकळ्या मनानें कितीसें बोलतां येण्यासारखें होतें ? ते कीर्तनमात्र ऐकत असावेत व कीर्तन समाप्त होतांच घाईघाईनें परत जात असले पाहिजेत. कारण तशा वेळीं त्यांचा गुप्त वेष असण्याचाच संभव आहे. आणि तेथें अधिक वेळ बसल्यास कदाचित् भलताच प्रसंग गुदरावयाचा अशीही त्यांच्या मनांत धाकधुक वाटत असावी. अशा वेळीं त्या महासाधूशीं मोकळ्या मनानें बोलण्यासवरण्याला वाव तो काय मिळणार ! आणि कोणत्याही सत्पुरुषाचा सहवास–त्याची सेवा–कांहीं काल तरी घडावी अशी प्रत्येक जिज्ञासूला इच्छाही असतेच. स्वस्थपणें त्यांचा एकांतांत सहवास घडून त्यांच्याशीं बरेंचसें मोकळेपणानें बोलल्याशिवाय कोणत्याही मनुष्याची तृप्ति होत नाहीं. हा अनुभव प्रत्येक मनुष्याला आहेच. मग शिवाजी महाराजांसारख्याभक्तिमान् मनुष्याला त्यांच्या दर्शनाविषयीं तळमळ लागून राहावी हें अगदीं स्वाभाविक आहे. ह्यांत रा. केळूसकरांना विपरीत काय वाटलें ?

'दर्शनाची उत्कंठा लागून राहिली आहे !' असें म्हटलें म्हणजे देवाच्या सगुण मूर्तीचें दर्शन घेतल्याप्रमाणें फक्त नेत्रांनीं मूर्ति पहावयाची–बोलण्या चालण्याचा प्रकार कांहीं नाहीं. असा कां अर्थ समजावयाचा ? तसें असेल तर महाराष्ट्रभाषा नैपुण्याचा कळसच झाला म्हणावयाचा ! तर 'दर्शनाची उत्कंठा' याचा अर्थ त्या पुरुषाचा सहवास, बोलणें चालणें, त्याचें आदरातिथ्य करणें व त्यांचें वचनामृत यथेच्छ प्राशन करणें इतका त्याचा अर्थ गर्भित असतो. असें असतां तो व्यापक अर्थ सोडून देऊन रा. केळूसकर सुरूखुरू तोंडानें वाचकांसच प्रश्न करतात कीं, महाराजांस कीर्तनांत बावांचें

दर्शन घडत नव्हतें काय ? मग आणखी दिवट्या, छत्री, घोडे पाठवून दर्शनाची अपेक्षा ती कशाला पाहिजे होती ? ही प्रतिपक्षाची युक्ती ऐकून त्यांची भाषाभिज्ञतेची कींव आल्यावांचून राहत नाहीं.

कोठें छत्रपति शिवाजी महाराज आणि कोठें आमचे केळूसकर ? ते आपल्या स्वतःवरूनच त्यांच्या हृदयाची कल्पना करतात ! आजकाल आपल्या देशांत दारिद्र्याचा सुकाळ होत चालला आहे. साऱ्याच गोष्टींचें दारिद्य. त्यांत चांगल्या गोष्टींचें दारिद्य तर विशेषच. भक्तीचें दारिद्र्य जिकडे तिकडे ! मग प्रस्तुत टीकाकारापाशीं ती कितीशी असणार हें दिसतेंच आहे. आणि त्यांच्या कलमांतून तिचें बहुतेक स्वरूप बाहेर पडलेलें स्पष्ट दिसतेंच आहे. आर्धी आलीकडच्या लोकांस आपल्यापेक्षां जगांत कोणी श्रेष्ठ आहे असें वाटतच नाहीं. ज्याला त्याला वाटतें कीं, आजकाल जर कांहीं थोडें बहुत समजत असेल तर तें मला. तेव्हां अशा लोकांच्या मनांत इतरांविषयीं आदरबुद्धि उत्पन्न व्हावी कशी ? याला अपवाद असा विरळाच सांपडावयाचा. जो तो मिशाला तूप लावूनच बाहेर ऐट मारीत असतो. आजकालची परिस्थितीच अशी असल्यामुळें कोणाविषयीं कोणालाच आदरबुद्धि असलेली आढळून येत नाहीं. तेव्हां दर्शनाचा सोहळा तरी दृष्टीस पडावा कसा ? त्यांतून साधूंचें दर्शन तर कोणालाच नको. हल्लींच्या साधु वर्गामध्यें ढोंगी लोकांचाच विशेष भरणा असल्याचा बोभाटा ऐकू येतो. हें एक कारण, आणि दुसरें त्यांची वृत्ति निस्पृह व निष्कांचन असल्यामुळें त्यांच्या दर्शनाची फार करून इच्छाच कोणी करीत नाहीं. त्यांतून अर्वाचीन तत्त्वविचारांत निमग्न झालेले लोक तर त्यांच्याकडे तिरस्कारबुद्धीनेंच पाहतात ! न होऊन रस्त्यांत वगैरे कोणाची भेट झालीच तर नमस्कार चमत्कार होऊन फार तर 'कसें काय आहे ?' 'ठीक आहे.' म्हटलें कीं आटपला कारभार ! घराकडेच कोणी अवर्जून आला तर या, बसा. 'अस्पृश्यवर्गासंबंधानें आपलें मत कसें काय आहे ?' असा एखादा प्रश्न काढून जुन्या लोकांच्या अज्ञानाविषयीं थोडेंसें पुराण होऊन 'ठीक आहे तर; आतां मला हापिसांत जावयाचें आहे' असें म्हणून स्वारी उठावयाची. कोणी होस हो मिळाविलेंच आणि औदार्य दाखविण्याची पाळी आलीच

तर एखादा चहाचा कप यावयाचा! त्यांत स्वदेशी साखरेचें व्रत आड आलें कीं 'तेरे बी चीप आणि मेरे बी चीप!' भेटीला आलेला गृहस्थ रात्रींचा जिना उतरूं लागला तरी 'कंदील दाखवा' किंवा 'बुलडॉग बांधून ठेवा' येवढीं अक्षरें सुद्धां मुखांतून निघावयाचीं नाहींत! इतके अगत्य! अशी स्थिति शिवाजी महाराजांच्या वेळेस नव्हती. ते स्वतः येवढ्या मोठ्या राजकारणांत रात्रंदिवस जखडलेले होते तरी, त्यांच्या मनांत क्षात्रधर्मज्योतिप्रमाणेंच भक्तीची ज्वालाही निरंतर प्रज्वलित असे. त्या विषयींही ते सदासर्वदा जागृत असत. सत्पुरुषांच्या दर्शनाविषयीं त्यांच्या अंतःकरणास किती तळमळ लागून राहिली होती, हें ह्याच हनुमंत स्वामींच्या बखरीवरून कोणासही कळण्यासारखें आहे. तेव्हां अशा भक्तिमान् प्रभूला, कीर्तनांत जरी त्या महासाधूचें दर्शन होत होतें तरी तेवढ्यानें त्यांची तृप्ति न होतां उलट अधिकाधिक बलवत्तर होणें हेंच उक्त आहे. त्या पुरुषाचा चार दिवस सहवास घडावा, आपण त्याचें यथेच्छ दर्शन घ्यावें, मनमुराद उपदेशामृत प्राशन करावें, हीच त्यांच्या मनाला ओढ लागून राहिली होती म्हणूनच त्यांनीं त्यांस मुद्दाम बोलावणें पाठविलें. आतां दिवट्या, छत्री, घोडे, कां पाठविले? इतकी अवश्यकता कोणती? तर शिवाजीमहाराज छत्रपति होते; महाराष्ट्रासारख्या सुप्रसिद्ध देशाचे प्रभु होते; आणि साक्षात् जगन्माउलीनें त्यांस मोहराधुतळ्यांनीं भरलेले रांजण-च्यारांजण देण्याइतकें ते भाग्यशाली होते. तेव्हां अशा भाग्यवंतांनीं तुकाराम बोवासारख्यांस बोलावणें पाठवावयाचें तें हल्लींच्या लग्नचिठ्याप्रमाणें किंवा हळदीकुंकुमाच्या आमंत्रणपत्रिकेच्या सरक्युलराप्रमाणें छापील पत्रक न पाठवितां इतक्या इतमामानें पाठविणें हेंच त्यांच्या इभ्रतीला, धर्मशीलतेला, व राज्यवैभवाला अनुरूप असेंच होतें. तात्पर्य, रा. केळूसकरांनीं कीर्तनांत तुकारामबावांचें दर्शन घडत असतां महाराजांनीं दर्शनासाठीं म्हणून पुन्हा मुद्दाम बोलावणें कां पाठविलें, व दिवट्या, छत्री, घोडे येवढा सरंजाम कशाकरितां दिला? असा जो मोठ्या आढ्यतेनें वाचकांस प्रश्न केला आहे, तो अशा कारणामुळें निखालस निरर्थक होय. ह्यांत रा. केळूसकरांचा अविचारीपणा मात्र निदर्शनास येतो. हें वर दिलेल्या विवेचनावरून वाचकांच्याही पूर्णपणें लक्षांत येण्यासारखें आहे. असल्या पोंचट

शंका काढून हनुमान स्वामींसारख्यांच्या समर्थांच्या बखरीवर बेलाशक 'बनावटपणा'चा आरोप घ्यावा, यापेक्षां आणखी शोचनीय गोष्ट ती कोणती?

दुर्योधनाला सारेच लोक कपटी व दुराचारी दिसत आणि धर्मराजाला सारेच लोक सरळ व सदाचारी दिसत असत. त्याप्रमाणेंच ह्या अर्वाचीन टीकाकारांची स्थिति आहे. त्यांनाही सारे ग्रंथ अबद्ध वाटतात. प्राचीन बखरी म्हणजे भाकडकथा; त्यांच्या मताच्या विरुद्ध जें जें काय दृष्टीस पडेल तें तें खोटें; त्यांना जो जो लेख नडिकसा वाटेल तो बनावट; असें म्हणण्याची त्यांची नेहेमींचीच वहिवाट आहे. जी जी बाजू त्यांच्या विरुद्ध म्हणून पुढें येईल तिच्यांत कांहीं अर्थ नसतो. ती विश्वसनीय वाटत नाहीं. ती गोष्ट ऐतिहासिक रीत्या महत्त्वाची म्हणतां येत नाहीं. वगैरे पालेपदें जोडून ते आपल्याकडून त्यांना फेंटाळून लावतात. पण एखादे वेळीं एखाद्या संतमहंताचें काव्यच त्यांस आडवें येतें! व त्यावर आडव्या तिडव्या कल्पना कांहींच लागू पडत नाहींत. अशा वेळीं हे आपलें अखेरचें पाशुपतास्त्र सोडून मोकळे होतात. आणि आपणास विजयश्रीनें माळ घातली म्हणून मनांत मांडे खात बसतात. हें पाशुपतास्त्र कोणतें? तर त्या कविता "प्रक्षिप्त!" आहेत म्हटलें कीं सारा बाजार आटोपला!

यापुढें केळूसकरांनीं हाच प्रकार अमलांत आणला आहे. वरच्या सर्व कल्पना परस्परांस सांधून त्यांतून त्यांनीं एक कल्पनेचा डोल्हारा उभारला. तो हाः—

**"तुकारामबोवांच्या कांसेस लागण्याचा प्रयत्न महाराज करीत होते तेव्हां समर्थांचें नांवही त्यांस माहीत नसावें"**

पण याला तुकोबाची वाणी आड आली. शिवाजीमहाराजांनीं दिवट्या, छत्री, घोडे पाठवून त्यांस येण्यासाठीं कारकुनाबरोबर जें पत्र दिलें होतें, त्याच्या अभंगमय उत्तरांत त्यांनीं छत्रपतिमहाराजांस येणेंप्रमाणें लिहिलें आहेः—

**सद्गुरु श्रीरामदासाचें भूषण। तेथें घाली मन चळों नको।**
**बहुता ठाईंवृत्ति चाळवली जेव्हां। रामदास तेव्हां घडे कैसें॥**

* * * *

राया छत्रपती ऐकावें वचन। रामदासीं ध्यान लावा वेगीं।
रामदास स्वामी सोयरा सज्जन। त्याशीं तूं मन अर्पी बापा ॥२॥
मारुति अवतार स्वामी प्रगटला। उपदेश केला तुजलागी ॥
रामनाम मंत्र तारक केवळ। झालासे शीतळ उमाकांत ॥
उफराटीं नामें जपतां वाल्मीक। झाला पुण्य श्लोक तात्कालिक ॥
तेंच बीज त्यासी वसिष्ठ उपदेशी। त्याहूनी विशेष काय आहे ॥
आतां धरूं नका भलत्याचा संग। राम पांडुरंग कृपा करी ॥
धरूं नको आस आमुची भूपाळा। रामदासीं डोळां लावा वेगीं ॥
शरण असावें रामदासालागीं। नमन साष्टांगी घाली त्यासी ॥

'ही तर तुकोबाची मेख !' हीं मध्यें आलेली निघणार कशीं? ती निघण्याला सरळ मार्ग नाहीं. असें पाहिल्याबरोबर 'वांकड्या मेढीला वांकडा नेम' [ येथें खरोखर सरळ्या मेढीला वांकडा नेम आहे. ] ह्या न्यायानें ह्या टीकाकारानीं शेवटचें पाशुपतास्त्र सोडलें ! त्याचा वेग पहा:—

ही तुकारामाच्या अभंगाची शंका लोक घेतल्यावांचून राहावयाचे नाहींत, हें जाणून ते आपण होऊनच आधीं ही शंका घेतात. म्हणजे 'अस्वलाच्या आधीं किंकाळी' म्हणतात ती हीच !

"यावर सहजीं अशी शंका उत्पन्न होते कीं, तुकारामबावांनीं आपल्या पत्ररूप अभंगांत रामदासस्वामींचा उल्लेख केला आहे. त्याची वाट काय? ह्या शंकेचें निरसन असें कीं, त्या अभंगांपैकीं कांहीं अभंग [ त्यांच्या विरुद्ध असतील तेवढे ] तुकारामबावांचे नसून केवळ '**प्रक्षिप्त**' आहेत. (!)"–( पा. ५३५ )

'**प्रक्षिप्त**' म्हणजे बनावट ! ते कोणी व केव्हां तयार करून त्यांत घुसडले? याबद्दल हे टीकाकार मुद्देमालानिशी गुन्हा पदरांत घालतात:—

"आणि ते बहुतेक [ निश्चित नव्हेच कां? ] राज्याभिषेकानंतर **रामदासस्वामींच्या भक्तांनीं रचून** [रामदासस्वामींच्या भक्तावर मोठा कटाक्ष] **त्यांत सामील केले आहेत.**"

पण हें कशावरून? त्याला पुरावा काय? असें कोणी विचारल्यास हे कलमबहाद्दर त्याचा पुरावा देतात:—

" असें त्यांतील 'छत्रपति' विशेषणाच्या व अष्टप्रधानांच्या उल्लेखावरून म्हणावें लागतें. कारण तुकारामबावांच्या हयातींत महाराज छत्रपति झाले नसून अष्ट प्रधानांचीही योजना त्यांनीं केली नव्हती. हा अक्षेप करणारांनीं आपल्या गुरूची महति वाढविण्यासाठीं हा सत्यापलाप केला नसता तर महाराजांस हीनपणा आणणारा प्रवाद आज महाराष्ट्रांत प्रचलित झाला नसता. हा प्रवाद अर्थात् असा कीं, स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापन हीं मुख्यतः रामदास स्वामींच्या उपदेशानें महाराजांकडून घडली. ह्या प्रवादाचें सत्यत्त्व स्थापित करण्यासाठीं कांहीं इतिहाससंशोधक गृहस्थ साधेल तेवढा पुरावाही गोळा करण्यांत गुंतले आहेत असें समजतें. परंतु वर नमूद केलेलीं पत्रें खोटीं ठरत तोंपर्यंत त्यांचा हा प्रयत्न व्यर्थ होय. व त्यांचें आजंपर्यंतचें एतद्विषयक वाक्पांडित्य हीं अनर्थक होत. "

रा. केळूसकरासारख्या लेखकानें अशा प्रकारें 'भुसका लड्डू' घेऊन त्यावरच जिभल्या चाटीत बसावें, व अजागळासारखें बरळत सुटावें म्हणजे सरस्वतीदेवीची निखालस विटंबना होय. असा हवेंत किल्ला बांधून परचक्राचा मोड होईल अशी आशा बाळगणें हा निखालसभ्रम आहे. सारासार विचार ज्यास कळतो, त्याच्या हातून असें प्रकार घडणें कधींच शक्य नाहीं. ह्या शुष्क पाल्हाळांत सदरहु लेखकानें किती चमत्कार केले आहेत ते पहा. प्रथम तुकारामाच्या अभंगरूपी पत्रांत रामदासांच्या भक्तांनीं नवें रचून घुसडून दिलें हें म्हणणें क्षणभर तरी शोभतें काय? यत्किंचित् तरी मनास पटतें काय? तुकारामबावांच्या अभंगांत ढवळा ढवळ कोण व कशी करूं शकेल? तुकारामबावांच्या अभंगांत तुकाराम बावांच्याच भक्तांनीं कांहीं अभंग प्रक्षिप्त करून घुसडले म्हटलें तर कांहीं तरी शोभण्यासारखें आहे. रामदासांचे भक्त तुकाराम बावांच्या अभंगांत ढवळाढवळ कशी करूं शकतील? शिवाय गद्य लेखाची योग्यता व पद्य लेखाची योग्यता रा. केळुसकर सारखीच समजतात काय? समजत असतील तर त्यांना वाङ्मयांतील गम्य नाहीं असेंच म्हणणें भाग आहे. आज मोरोपंतांच्या केकावलींत एक प्रक्षिप्त केकावली करून घाला म्हटलें तर हे टीकाकार घालतील काय? आणि घातलीच तर तिची दशा काय होईल? ह्याची त्यांस कल्पना आहे काय? म्हणजे तें शालजोडीस थिग-

ड्याचें ठिगळ लागलेलें पाहून रसिक लोकांना हास्यरसाची एक मेजवानीच मिळेल ! वस्त्राला सुद्धां जर बेमालूम ठिगळ लावतां येणें शक्य नाहीं, तर काव्यासारख्या प्रासादिक वाणीला ठिगळ लावण्याचें काम कोण बरें करणार ? असा खोटसाळपणा करण्याला सज्जन मनुष्याचें हातच मुळीं धजावयाचे नाहींत. कोणतेंही काव्य म्हटलें कीं तें आधीं ईश्वरी[१] प्रसादाचेंच असतें. '**कवित्व हें नव्हे टांकसाळी नाणें**' असें तुकारामांनींच म्हटलें आहे. ह्यावरून उठावें त्यानें कवित्व करीत सुटावें अशांतला कांहीं तो प्रकार नाहीं. आणि त्यांतून तुकारामांची वाणी म्हणजे शुद्ध वेदवाणी ! तिच्यांतील प्रसाद म्हणजे शुद्ध भूवैकुंठांतील पांडुरंगाकडून मिळालेला. तेव्हां त्यांच्या अभंगांत ढवळाढवळ करण्याइतका चारगट मनुष्य कोण ? दुसरें, तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांची एक रात्रंदिवस सुरू असलेली टांकसाळ ! तिला कधीं खळ म्हणून नाहींच. पत्र पाठविणें, बोलणें सुद्धां अभंग रूपानेंच ! समर्थांचे अभंग तुकारामाच्या अभंगाच्या मानानें कांहींच नव्हत. म्हणजे तुकारामबावांना जितका अभंगरचनेचा व्यासंग व सराव होता, तितका समर्थांचा सुद्धां नव्हता. खुद्द समर्थांचाच व्यासंग जर अभंगावर नव्हता तर त्यांच्या भक्तांत तरी तो कितीसा असणार ? तेव्हां समर्थांच्या भक्तांनीं प्रक्षिप्त किंवा बनावट अभंग रचून ते तुकारामबावांच्या अस्सल पत्रांत घुसडले ही कल्पनाच मुळीं असंभाव्य आहे. आणि जर कदाचित् घुसडलेच असें मानलें, तर ते रामदासांच्या भक्तांचे बनावट अभंग, तुकारामाच्या देहूच्या वाडांत कसे काय गेले ? ते फार तर सज्जनगडावर, चाफळ संस्थानांत, किंवा डोमगांवच्या मठांतच राहिले असते. पण नारोअप्पाजी गोडबोले यांच्या छापखान्यांतील तुकारामाची मोठी गाथा पहा. म्हणजे हें पत्र अथपासून इतिपर्यंत छापलेले अभंग देहूच्या प्रतींतही असल्याचें आढळून येईल. ते तिकडे कसें काय गेले ? दुसरें असें कीं, प्रत्येकाचें हस्ताक्षर ज्याप्रमाणें चाणाक्ष मनुष्य तत्काल ओळखतो, त्याप्रमाणें

---

**१ सकल करणें जगदीशाचें । आणि कवित्व तेवढें मनुष्याचें ॥ ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ॥ १ ॥**

—दासबोध—

कवितेची रचनाही रसिक लोक तत्काल ओळखतात. तुकारामाच्या अभंगांत जर प्रत्यक्ष समर्थांनीं केलेले अभंग घुसडले, तर ते सुद्धां सहज बाजूस काढतां येतील. मग समर्थांच्या भक्तांनीं बनावट केलेले अभंग रसिक जनांना ओळखतां येणार नाहींत काय? पण टीकाकारांना ह्याची ओळख आहे कोठें? 'टक्का शेर भाजा आणि टक्का शेर खाजा' हाच मंत्र ज्याच्या घरीं पाणी भरीत आहे, त्यांना ही सत्यासत्याच्या पारखीची गोष्ट कळावी कशी? त्यापेक्षां तुकारामबावांच्या शिष्यांनीं ते अभंग बनावट केले आहेत असें म्हटलें असतें तर त्यांत कांहीं तरी अर्थ होता. पण समर्थांच्या भक्तांनीं ते बनावट केले हें म्हणणें शुद्ध वेडगळपणाचें आहे.

आतां हें तुकारामबावांच्या पत्रांतील अभंग नवे रचून खोटसाळपणानें त्यांत कां घातलें? तर समर्थांची महति वाढावी म्हणून! खोटे अभंग रचून ते तुकारामबावांच्या गाथ्यांत घुसडल्यानें समर्थांची महति ती कशी काय वाढणार? आणि ते अभग नसते घातले म्हणून त्यांची महति कमी ती कशी काय झाली असती? तर या सर्वांमध्यें रा. केळूसकरांनीं एक गोम काढली आहे. ती गोम अशी तशी नव्हे, तर पठाडी! ती कोणती? तरः—

"हा प्रक्षेप करणारानीं आपल्या गुरूची महति वाढविण्यासाठीं हा 'सत्यापलाप' केला आहे."

हा 'सत्यापलाप' त्या भगवद्भक्तांनीं केला नसता तर कोणता अनर्थ ओढवला असतां ते रा. केळूसकर सांगतातः—

"हा सत्यापलाप केला नसता तर महाराजांस हीनपणा आणणारा प्रवाद आज महाराष्ट्रांत प्रचलित झाला नसता." हा प्रवाद तरी कोणता?

"हा प्रवाद अर्थात् असा कीं, स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापना हीं मुख्यतः रामदास स्वामींच्या उपदेशानें महाराजांकडून घडलीं." समर्थांच्या भक्तांना कोठें कशानेंच 'वैषम्य' वाटल्याचें आढळून येत नाहीं. ती केवळ रा. केळूसकरांची मनःकल्पना आहे. पण रामदासस्वामींच्या उपदेशानें महाराजांकडून स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापना झाली, ही कल्पना मनांत आल्याबरोबर त्यांच्या आंगाचा मात्र तिळपापड झाला आहे. पण हा शुद्ध केळूसकरांच्या कलुषितपणाचा परिणाम होय. समर्थांच्या उपदेशा-

नेंच ह्या सर्व गोष्टी घडल्या असें कोणीही म्हटलेलें नाहीं. म्हटलें असलें तर तें प्रत्यक्ष महाराजांनींच म्हटलेलें आहे.

आतां ह्यांतील खरा प्रकार काय तो आम्ही पूर्वी सांगितलाच आहे. म्हणजे समर्थभक्तांनीं म्हटलेंच असेल तेंही औपचारिकच होय. महाराजांच्या अंतःकरणांत स्वराज्यस्थापनेचा अंकुर लहानपणापासूनच होता, ही गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं, त्याबद्दल कोणी कांहींच सांगण्याची गरज नाहीं व तसें कोणी म्हटलें तरी तें कोणास खरेंही वाटणार नाहीं. मग समर्थभक्तांना त्याबद्दल यत्किंचित् तरी वैषम्य वाटण्याचें कारण काय ? व तसें कोणास वाईट वाटलेंही पण नाहीं. रा. केळूसकरांची मात्र तशी भावना होऊन त्यांचें स्वतःचें वैषम्य मात्र शिखरास जाऊन पोंचल्याचें त्यांच्या या उद्गारांवरून स्पष्ट दिसतें. ' रामदासाच्या उपदेशानें स्वधर्मरक्षण व स्वराज्य-स्थापनाही घडली ' असें म्हणण्यांत महाराजांस हीनपणा आणणारा प्रवाद महाराष्ट्रांत कसा काय प्रचलित झाला ? गुरूच्या उपदेशानें शिष्याच्या हातून पराक्रम झाला म्हटलें कीं त्यांत शिष्याकडे हीनपणा येतो काय ? त्याला तर उलट त्याचें भूषणच वाटलें पाहिजे. आणि नेहेमींचा प्रघातही असाच आहे. आपण पराक्रम केला तो थोरामोठ्यांच्या आशिर्वादानें केला असें म्हणण्यांतच पराक्रम करणाराला भूषण वाटत असतें.

म्हणूनच ती गोष्ट खुद्द महाराजांनीं स्वदस्तूरच्या पत्रांत कबूल केली आहे. आणि रा. केळूसकरांनींच त्या पत्राचा गोषवारा आपल्या चरित्राच्या ३३५ पानावर दिला आहे. त्यांत ते म्हणतातः—

" आणि दुसरें [ पत्र ] १६७० तलें असून त्यांत रामदासांच्या कृपेनें व उपदेशानुसार वर्तनानेंच आपणांस यशःप्राप्ति झाल्याचा परम लीनतेचा व अहंभावविरहित असा उल्लेख आहे. "

हें जर धडधडीत त्याला प्रत्यक्ष प्रमाण आहे, तर मग त्याच्या प्रवादाबद्दल टीकाराच्या नाकाला इतक्या मिरच्या तरी कां लागाव्यात ? मल्लाची पाठ जमिनीस लागली तरी, नाक कोणाचें वर ? त्यापैकींच ह्या चरित्रकारांनीं ह्या पत्रावरही आपली मखलाशी चढविली आहे. ते म्हणतातः—

" ह्या अशा औपचारिक लेखाचा आधार केवळ दुर्बळ आहे. महाराजां- सारख्या परम भाविक व साधुसंतांविषयीं परम आदराची वृत्ति सर्वदा हृदयांत वागविणाऱ्या साधुनृपानें आपल्या परम योग्य गुरूपाशीं असा विनय प्रगट करावा हें केवळ अनुरूप होय. ह्यावरून भलतेच तर्क करणें अप्रयोजक होय. "

'अशा औपचारिक लेखाचा आधार केवळ दुर्बळ होय.' आधीं हें महाराजांचें म्हणणें औपचारिकच आहे हें कशावरून ? आणि तें औपचा- रिक असलें तरी त्याचा आधार दुर्बळ कसा काय ? खुद्द महाराजांनीं जी गोष्ट कबूल केली, तीही ज्या राजेश्रींनां पटत नाहीं:—

**'तयाच्या पुढें सर्वही रद्द झालें'**

असेंच म्हटलें पाहिजे. दुसरें काय ? औपचारिक रीतीनें कां होईना ? परंतु महाराजांनीं ती गोष्ट कबूल केली ना ? कां केली ? ती त्यांस भूषणप्रद वाटली म्हणूनच ना ? मग तीच गोष्ट रा. केळूसकरांच्याच जिव्हारी कां लागावी ? महाराज परम भाविक होते. साधुसंतांविषयीं परमादराची वृत्ति निरंतर त्यांच्या हृदयांत वागत होती; ते साधुनृपति होते; म्हणून त्यांनीं गुरूपाशीं असा विनय करणें निखालस अनुरूप होतें. अर्थात् रा. केळूस- करांची स्थिति त्यांच्या अगदीं उलट आहे. ते अभाविक आहेत; साधुसंता- विषयीं त्यांच्या हृदयांत अनादर बुद्धि जागृत आहे; समर्थांविषयीं महा- राजांची जितकी कृतज्ञता होती, तितकीच ह्यांच्या ठिकाणीं कृतघ्नता आहे, असें त्यांच्याच लेखावरून दिसून येतें. अशी शिवाजीमहाराजांची व त्यांची व्युत्क्रम स्थिति असल्यामुळें त्यांना समर्थांच्या अनुग्रहासंबंधानें वैषम्य वाटलें व त्यांनीं ज्याला त्याला खोटसाळ, सत्यापलापी, बनावट, म्हणून शिरा ताणणें हें वस्तुस्थितीला अनुरूपच आहे. त्यांत विरुद्ध असें कांहींच नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणणें भाग येतें त्यास उपाय नाहीं.

आतां त्यांचा जो मोठा ताम्रपटी सिद्धांत आहे तो कितपत टिकतो तें पाहूं. वर ज्या दोन पत्रांचा टीकाकारांनीं मोठा बाऊ करून दाखविला आहे, तीं दोन पत्रें आहेत तरी कसलीं व कोणाचीं ? अशी वाचकांस सहजीं जिज्ञासा उत्पन्न होईल. याकरितां तीं सारांशरूपानें तरी देणें जरूर आहे.

" हीं पत्रें रा. गो. का. चांदोरकर यांनीं केसरीच्या ता. २६ जून स. १९०६ इसवीच्या अंकांत एक पत्र प्रसिद्ध केलें आहे त्यांत नमूद केलीं आहेत...केशव गोसावी यानें दिवाकर गोसाव्यास पाठविलेले उत्तरः— " राजेश्री शिवराजे भोंसले समर्थांचे भेटीस येणार म्हणोन लिहिलें, समजलें. मी येणार होतो परंतु माझी प्रकृति फार विघडली. येणें होत नाहीं. मीं इकडून अकास येणेसाठीं लिहिलें परंतु अंकांचेंही येणें व्हावयाचें नाहीं. मानजी गोसावी तेथें असतील. राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोक खटपटीस आणावे. उपयोग होईल........दत्ताजीपंतांकडून दोनशें होन उत्सवास पाठविले ते आले असतील. लोभ करावा. मित्ती चैत्र वद्य १ शके १५९४ (ता. ४ एप्रिल १६७२)"

## दिवाकर गोसाव्यास भास्कर गोसावी यांचें पत्रः—

"शिवाजीराजे यांच्याकडे भिक्षेस गेलों. त्यांनीं विचारलें, तुम्ही कोठील कोण, कोणा ठिकाणीं असतां? त्यावरून आम्ही बोललों कीं, आम्ही रामदास श्री समर्थांचे शिष्य, चाफळास राहतों. मग ते बोलले कीं, ते कोठें राहतात? व मूळ गांव कोण? त्यावरून आम्हीं सांगितलें कीं, ' गंगातीरचे जांबेचे राहणार. प्रस्तुत चाफळास मठ करून श्रीदेवाची स्थापना करून उत्साह महोत्सव चालू करून आम्हा सर्वत्रांस आज्ञा कीं, तुम्ही भिक्षा करून उत्साह करीत जावा. ऐसें सांगितल्यावरून आम्ही हिंडत आहों. असें बोलतांच राजश्रींनीं दत्ताजीपंत वाकेनिवीस यास प्रतिवर्षीं श्रीचे उत्साहास दोनशें होनु देत जाणें म्हणून पत्र पाठविलें. ते होनु समयास येतील, कळावें. फाल्गुन शुद्ध २, शके १५८०"

ज्या पत्रावर रा. केळूसकर येवढ्या लांबलचक उड्या मारतात तीं हीं. त्या पत्रांची इतिहाससंशोधक प्रो० राजवाडे ह्यांनीं अस्सल कागदापत्रावरून कशी रेवडी वळविली आहे ती पूर्वी सांगितलीच आहे. ते म्हणतात, " वस्तुतः हीं पत्रें मुळींच अस्सल नाहींत. शिवाय त्यांतील शकाच्या संबंधानें संशय घेण्यास सबळ कारणें आहेत. याविषयीं आतां शंका राहिली नाहीं."

" तुकाराममलिखित पत्राच्या फार पूर्वीपासून छत्रपति ही संज्ञा व अष्ट प्रधान संस्था प्रचलित होत्या, असें अस्सल पत्रांच्या

आधारानें जेव्हां सिद्ध झालें तेव्हां ह्या लोकांचा हा आपेक्ष लंगडा पडला."

अर्वाचीन कालांत लेखनकलेची सारीच व्याख्या बदलून गेली आहे. आपलीं स्वतःचीं अनुमानें असलीं तरी तीं चटसारीं खरीं आणि त्याचेंच नांव इतिहास. दुसऱ्याचे लेख मग ते कोणाचेही असोत, व कितीही योग्यतेचे असोत, त्यांचे सारे लेख खोटे, बनावट म्हणणें ह्याचें नांव इतिहास शास्त्र. केवळ्याही ग्रंथांत कसलेंही प्रमाण असो; बेधडक 'प्रक्षिप्त' म्हणून त्यावर शिक्का ठोकावयाचा ह्याचें नांव 'संशोधन.' हाच प्रकार जारीनें सुरू झाला आहे.

समर्थांची बखर एक दोघांनींच नव्हे तर दहा पांच मोठमोठ्या सन्मान्य व राजमान्य पुरुषांनीं प्रत्यक्ष डोळ्यानीं पाहून लिहिलेली, वेळो-वेळीं टांचणें करून ठेवलेलीं, महाराजांच्या कारभाऱ्यांनीं प्रत्यहीं लिहून कळविलेल्या हकीगती, त्या देखील अशा तशा नव्हेत. तर शकवारीनें क्रमशः संवत्सर, तिथीसुद्धां नमूद करून ठेवलेल्या यच्चयावत् खोट्या; आणि 'हे प्रांत अमक्या अमक्या सुमारास घेतले असावेत' 'तमक्या सुमारास हस्तगत झाले असावेत' हीं चरित्रकाराचीं अनुमानें मात्र खरीं; अगदीं अस्सल ताम्रपट!

बखरीमध्यें शके १५७१ विकारी नाम संवत्सर वैशाख शुद्ध ९ गुरु-वार ही शिवाजी महाराजांची अनुग्रहाची मिति नमूद केलेली आहे. साऱ्या यादींत व टांचणांत दाखला तोच. असें असतां 'ती तारीख बिलकुल खरी नाहीं.' आणि प्रो० भाटे म्हणतात "चैत्र वद्य ९ ला महाराजांस अनुग्रह झाला असावा. [कारण काय? तर] ह्या तिथीस अमृतसिद्धियोग असून उत्तराषाढा नक्षत्र होतें."

प्रो० भाट्यांचें 'असावा' हें अनुमान खरें, आणि समर्थांच्या वंश-जांच्या बखरींतील लेख 'बिलकुल खरा नाहीं'. रा. केळूसकरांचें हे तर्क-शास्त्र व न्यायशास्त्र अर्वाचीन कालच्या प्रदर्शनांत मांडण्यासारखें नाहीं असें कोण बरें म्हणेल?

तात्पर्य, शिवाजी महाराजांच्या कारकीर्दींत समर्थ रामदास स्वामींचें आणि त्यांच्या 'दासबोधाचें' वर्चस्व असल्याबद्दल जो प्रवाद सर्वतो-

मुखीं झाला आहे तो ह्या चरित्रकारास अत्यंत दुःसह झाला आहे. त्याचें म्हणणें शिवाजी महाराजांनीं जी स्वराज्याची स्थापना केली, ती आपल्या एकट्याच्याच करामतीवर, एकट्याच्याच पराक्रमावर व एकट्याच्याच बुद्धिचातुर्यावर केली. तींत कोणाचा रेसभरही वांटा नाहीं. मग रामदासासारख्या 'गोसावड्याची' व 'दासबोधा' सारख्या 'चिटोऱ्याची' कथा ती काय ?

परंतु कोणताही पराक्रमी, शूर, वीर, व चतुर पुरुष सिंहासनावर बसतो तो आपल्या स्वतःच्याच करामतीनें बसतो, ह्यांत तर शंकाच नाहीं. तो सिद्धांत त्रिकालाबाधीत आहे; देहाला जसा आत्मा त्याप्रमाणेंच प्रजेला राजा होय. देहांतील क्रिया जरी हस्तपादादि अवयवांनीं होत असलेल्या दिसतात, तरी त्या सर्व एका आत्म्याच्याच सत्तेखालीं चालत असतात. कर्ता, करविता, काय तो तोच. येवढा जरी आत्म्याचा अधिकार आहे; येवढी जरी त्याची सत्ता आहे, येवढी जरी त्याची कर्तबगारी आहे, तरी त्याला साह्यकारक मंडळही कांहीं कमी नसते. राजाची गोष्टही हुबेहुब तशीच आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. देहस्थ प्रभूला काय, आणि देशस्थ प्रभूला काय, परिस्थिति आणि साह्यकारी मंडळ ह्या दोन गोष्टींची अवश्यकता ही असतेच. त्यांच्याशिवाय त्यांची करामत व्यर्थ होय. आत्मा हा सर्व ब्रम्हांडाचा नियंता खरा, तरी त्याला सुद्धां देहद्वारें क्रिया करण्याला परिस्थिति ही अनुकूल पाहिजेच. उदाहरणार्थ हवा, पाणी आणि अन्न. हीं त्याच्या देहाला अनुकूल नसतील तर काय उपयोग ? सहन न होण्यासारखी उष्णताच असेल तर देह तरी टिकणार कसा ? किंवा अन्न पाणी नसेल तरीही देह टिकणार नाहीं. हीं सर्व समतोल देहाला मानवतील अशा बेताचीं असलीं पाहिजेत. तरच देह उत्पन्न होणार. व देह उत्पन्न झाला तरच आत्म्याचा प्रभाव दृष्टीस पडणार. तो पडण्याला सुद्धां त्या देहाला सारे अवयवही तसेच आशाधारक पाहिजेत, व ते निर्व्यंग पाहिजेत. मग आत्मा आपल्या चातुर्यानें व सत्तेनें हवी ती क्रिया करून दाखवील. परिस्थिति सर्व अनुकूल असून देहाचे सर्व अवयव निर्व्यंग असून आत्माच नसेल तर तींही सारीं व्यर्थच होत. राजालाही हाच नियम लागू आहे. त्यालाही परिस्थिति अनुकूल असावी लागते, व आशाधारक सहायकारीही मिळावे लागतात.

एकटा राजा कितीही पराक्रमी असला, कितीही चतुर असला, तरी करणार काय ? त्याला साह्य करणारीं इतर बाह्य उपकरणें हीं पाहिजेतच पाहिजेत. त्याच्या एकट्याच्यानें कांहीं होणार नाहीं. हा सिद्धांत आज कालचा नव्हे, त्रिकालाबाधित आहे. असें असतां " महाराजांच्या अंगच्या अलौकिक करामतीचें तें फल होय. त्याचा अल्पांशही इतराकडे देणें म्हणजे निखालस अन्याय होय. " असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय.

परकीयांची सत्ता व छळ, मुसलमानी धर्म हिंदु धर्माच्या अगदीं उलट, मुसलमान बादशहांत आक्रमशक्ति नाहीं, बादशहा राहणार दिल्लीसलांबीच्या पल्लयावर, त्यास कोंकणासारख्या दूरच्या डोंगराळ प्रदेशाचा बंदोबस्त व्हावा कसा ? देवीस जात्यांत घालून भरडावयाचें, मूर्ति फोडून त्यांचा चकाचूर करावयाचा, हिंदूवर ' जिजिया ' सारखा अन्यायाचा कर लादून त्यांचा छळ करावयाचा. येणेंकरून हिंदु लोकांना मुसलमान लोकांचा वीट आला होता. संतमंडळानें महाराष्ट्राच्या अंतःकरणाची मेहनत मशागत करून हवी तशी भूमिका तयार केली होती. जातीमत्सराचीं ढुमसें काढून टाकून तिच्यांतील वक्रता मोडली होती. त्यांस मावळ्यांसारखे एकनिष्ठ व आज्ञाधारक वीर मिळाले. आणि त्याच वेळीं शिवाजीमहाराजांचा प्रतापदिनकर उदयास आला. म्हणून सर्व वस्तुस्थिति जमून स्वराज्याचें पीक पिकलें.

किंवा खालीं दिलेलें रूपक ह्याहून अधिक समर्पक आहे. त्यावेळची मुसलमानांचीं अनन्वित कृत्यें हा कोळसा; संतमंडळाचा टाहो हा गंधक; मावळे लोकांचा काटकपणा व स्वामिभक्ति हे सोर मीठ; ह्या तिहींचें मिश्रण एकरूप होऊन ह्या स्फोटक द्रव्याला शिवाजी महाराजांच्या देदिप्यमान किरणांचा स्पर्श होतांच भयंकर स्फोट उडाला व त्यांत शत्रूंचे अभेद्य वाटत असलेले व्यूह ढांसळून पडून स्वराज्याचा अपूर्व ठेवा हस्तगत झाला, व स्वातंत्र्यरूप भागीरथी पुन्हा महाराष्ट्रांत उतरली.

सूर्यकांतमणी कितीही सोज्वळ असला, सूर्याचे किरण कितीही प्रखर असले, तरी स्फोट होण्याला स्फोटक द्रव्यें, स्फोटक साहित्य—अवश्य असावें लागतें. पण ह्या नवीन शिवचारित्रकारांचें मत त्यांत कोणाची कांहीं कप-

र्दिक नाहीं; रेसभरेस महाराजांचाच आहे. इतिहासज्ञांनीं व संशोधकांनीं त्यांतला अल्पांश कां होईना—परंतु कमिशनाचा भाग इतरांस दिला हें त्यांनीं अगदीं आपल्या अधिकाराबाहेरचें काम केलें. ह्या त्यांच्या विधानांत कितपत तथ्यांश आहे ह्याचा वाचकांनींच विचार करावा.

अर्वाचीन इतिहासज्ञांचे सुद्धां असें मत आहे कीं, महाराष्ट्रांतील लोकांची मनोभूमिका स्वाभिमानास व स्वराज्यास योग्य अशी तत्कालीन संतमंडळीनें तयार केली. त्यांनीं वारकरी पंथांत अग्रमान घेऊन भागवत धर्माचा प्रसार केला. व जातीजातींतील मत्सर कमी करून सर्व मनुष्यें एकाच आईबापांचीं लेकरें होत, परमेश्वरापाशीं जातीपातींचा भेदभाव नाहीं, असें ऐक्य उत्पन्न केलें. आणि हें मत आज सर्वमान्य असें लोक समजतात. परंतु ' मूलें कुठारः ' ह्या न्यायाप्रमाणें हें मत रा. केळूसकर ह्यांना मुळींच पसंत नाहीं. त्यांनीं भागवत धर्मावर येणेंप्रमाणें हल्ला चढविला आहेः—' भागवत धर्माचें सहाय्य ' या भपकेदार शिरोलेखांत ते म्हणतातः—

**" तसेंच त्या पंथामुळें जातिभेदादि भेदभाव विनष्ट होऊन महाराष्ट्रीयांचा ऐक्यभाव संभवला हें म्हणणेंही युक्त नव्हे. कारण तेव्हांची वस्तुस्थिति पाहतां ह्या म्हणण्यास मुळींच आधार नाहीं."**

हातांत दौतलेखण पडली, व मस्तकावर लेखनकलेचें छत्र असलें, म्हणजे ' मनःपूत ' विधानें करीत सुटणें हें कांहीं विचाराचें काम नव्हे. कोणतीही गोष्ट कागदावर नमूद करतांना मागचा पुढचा कांहींतरी विचार करावा लागतो. रस्त्यांतून जाण्याची सुद्धां चोरी; सावली पडली तरी सुद्धां सचैल स्नान; इतका जेथें दुजाभाव नांदत होता, तेथें ह्या सर्व जातींचा मिलाफ करण्याची बिनतोड व अपूर्व शक्कल जर कोणी काढली असेल तर ती भागवत धर्मानेंच. किंवा ह्याहून सरळ सांगावयाचें तर वारकरी पंथानेंच. ब्राह्मण, शूद्र, तेली, तांबोळी, साळी, माळी, सोनार, शिंपी, कुंभार —नव्हे महार, चांभार इतकेंच नव्हे—तर मुसलमानांसुद्धा दरोबस्त जातीं एकत्र व्हाव्यात, तेथें कोणासही मनाई करण्याची बुद्धि होऊ नये ही कल्पना केवळ अघटित होय. आणि ती अगदीं सहज—कोणत्याही प्रकारचा गाजा-

वाजा न करितां ह्या संतमंडळींनीं अमलांत सुद्धां आणली ! ती कोणती ? तर 'देवाचें भजन आणि हरिनामाचा गजर!' ह्यांत जातिभेदाचें घोडें अगदींच लंगडें पडलें ! त्या भक्तिरसाच्या आनंदांत ह्या गोष्टीचें कोणास स्मरण सुद्धां होत नसे. भक्तीला आणि नामस्मरणाला नांवें ठेवणार कोण ? भजनाला विन्मुख होण्याइतका व दूषण देण्याइतका अधम कोण ? 'वेदाचा अधिकार ब्राह्मणाशिवाय इतर जातींना नाहीं;' फार उत्तम. नाहींतर नाहीं. आम्ही तो वेद गुंडाळूनच ठेवतों, आणि 'रामनामाचाच गजर चालू करतों.' ह्या शकलेवर ब्राह्मणासारख्यांची सुद्धां कांहीं तोंड उरली नाहीं. कर्मठ व अहंमन्य ब्राह्मणांचीं तोंडेंच बंद होऊन गेलीं !

चोखामेळा निवळ महार. त्याची सावली पडली तरी सुद्धां ब्राह्मणांना सचैल स्नानाचें प्रायश्चित्त. पण त्याच चोखामेळ्याची समाधि कोठें ? नामदेवाच्या पायरीशीं खेटून ! हा प्रभाव कशाचा ? कबीर हा खरें म्हटलें तर मूळचा शिखानष्ट ! जातीचा पक्का मुसलमान ! त्यानें आपण होऊन श्रीरामभजनीं लागावें आणि रामनंदासारख्या ब्राह्मणाला नको नको म्हणत असतांही पायांतील खडावानें मस्तक फुटून रक्तबंबाळ झालें असतांही 'हेच माझे गुरु !' 'हाच त्यांचा अनुग्रह !' असें बोलून यावज्जन्म त्यांचे शिष्य बनावें ह्याची आमच्या केळूसकरांस कानगी तरी आहे काय ? मुसलमान लोकांनीं सुद्धां आमच्या भजनमार्गास भुलून 'राम राम' हा जप करीत बसाव' ह्यापेक्षां आमच्या संतमंडळींची आणखी लोकोत्तर सद्दी ती कोणती ? ह्यापैकीं एकाही गोष्टीची शिवचरित्रकारास दाद नाहीं ! ते ह्या विषयावर इतकेंच पांडित्य करून थांबले नाहींत. तर, ह्यापुढेंही त्यांनीं आपल्या तर्कांची व विचारसरणीची मजल पुढें ढकलली आहे. ते आणखी म्हणतात—नव्हे आढयतेनें पृच्छा करतात—

"संतमंडळींनें व पंढरपूरच्या इतर वारकऱ्यांनीं ह्या पवित्र क्षेत्रीं गेल्यावर जातिभेदाविषयीं थोडीशी बेपर्वाई दर्शविली असली, तरी ते स्वग्रामीं परत आल्यावर ती वृत्ति कायम ठेवून तदनुरूप व्यवहार करीत असें कोण म्हणेल ?"

शिवचरित्रकार म्हणत नसले तरी आम्ही म्हणतों—नव्हे सारें महाराष्ट्र म्हणते कीं, होय; तदनुरूपच ते व्यवहार करीत असत. कारण, हे लेखक

भलत्याच समजुतीच्या भरी पडून जसे भांबावलेले दिसतात तसे इतर लोक कांहीं भांबावलेले नाहींत. केळुसकरांना पूर्व स्मृतीचें व पूर्वेतिहासाचें जसें विस्मरण पडलें आहे, तसें इतरांस अद्याप पडलेलें नाहीं. स्वग्रामीं गेल्यावर वारकरी लोक किंवा भागवत—बारीक सारीक गोष्टींत कसें आचरण ठेवीत हें समजण्याला जसा केळुसकरांना मार्ग नाहीं, तसाच आम्हालाही पण मार्ग नाहीं, हें खरें आहे. तरी एकनाथ महाराजांनीं जो जाति भेदाच्या अभेद्य तटावर विजयश्रीचा झेंडा उभारला तो तर जग जाहीर आहे ! आणि तो सुद्धां पंढरपुरास नव्हे तर पैठणास ! स्वग्रामीं !

वडिलांची श्राद्धतिथि, ब्राह्मणक्षणास सांगितलेले, त्यांच्याकरितां स्वयंपाक तयार झालेला, तों महारांची पंगत बसवून त्यांस यथेच्छ तृप्त केलें. क्षणाचे ब्राह्मण जेऊन उठल्याशिवाय खरोखर इतर इष्टमित्र सुद्धां जेवावयास बसत नाहींत ही अनादिकालची परंपरा ! अशा बिकट परिस्थितींत म्हारापोरांना सुद्धां तें श्राद्धासाठीं तयार केलेलें अन्न, क्षण घेतलेल्या ब्राह्मणांच्याही आधीं वाढणें हें केवढें धारिष्ट ! एकानें कसला बसला पुनर्विवाह लावला कीं सुधारक लोक वर्तमानपत्रांतून त्याची केवढी टिमकी वाजवितात ! चित्पावनांत व देशस्थांत शरीरसंबध झाला कीं, त्याच्या सुधारणेच्या धुरीणत्वाबद्दल त्याचें केवढें स्तोम ! मग त्यावेळच्या परिस्थितींत ह्या एकनाथमहाराजांच्या ह्या समदृष्टीचें केवढें बरें कौतुक केलें पाहिजे ? हें एकनाथाचें कृत्य शिवचरित्रकारांस माहीत नसेल काय ? माहीत नाहीं असें कसें घडेल ? तर त्यांनीं जाणून बुजून त्याकडे डोळेझांक केली असें म्हणणें भाग येतें. हें सर्व गुंडाळून ठेवून पुढें दिलेले सिद्धांत ते बिनदिक्कत स्थापित करतातः—

" सनातन विहित उच्च नीचत्त्वाचा भाव अन्नव्यवहार व लग्नव्यवहार यासंबंधानें ते सभोंवतालील कर्मठ लोकांप्रमाणेंच पाळीत असत. "

वर दिलेल्या सुप्रसिद्ध व जगजाहीर असलेल्या एकनाथांच्या लोकोत्तर कृतीवरून हें विधान कितीं पोकळ व मिथ्या आहे हें सहज कळण्यासारखें आहे. असें असतां ह्या भागवत धर्माचें म्हणजे वारकरी पंथाचें वैय्यर्थ्य कसें होतें तें सांगतातः—

" ह्यावरून पाहतां संतमंडळाच्या भागवत धर्मामुळें त्या कालच्या

समाजस्थितींत म्हणजे फारसें रूपांतर झालें होतें असें सहसा म्हणवत नाहीं."

इतकें झालें—क्षणाच्या ब्राह्मणांच्या आधीं अतिशूद्रास भोजन घातलें—तरी त्या धर्माचें रूपांतर झालें नाहीं खरेंच! ह्यापेक्षां आणखी रूपांतर तें कसें काय व्हावयास पाहिजे होतें? अतिशूद्राचे शूद्र, व शूद्रांचे ब्राह्मण; असे सारे देहच पालटून जावयास पाहिजे होतें असें या चरित्रकाराचें म्हणणें आहे कीं काय कोण जाणें!

ह्या भागवत धर्मावर शिवाजीमहाराजांची तर मुळींच श्रद्धा नव्हती. हें सिद्ध करण्याकरितां रा. केळूसकरांनीं जो कोटिक्रम रचला आहे, तो फारच अद्वितीय असल्यामुळें त्याचें सार येथें देतों:—

"भागवत धर्मावर म्हणजे त्यांची (शिवाजीमहाराजांची) आढळ श्रद्धा होती असें वाटत नाहीं; [कशावरून?] तर ते आमरण देवीचे उपासकच होते. [मग त्यांची श्रद्धा डळमळल्याचें जें पुढें विधान केलें आहे तें स्वप्नांत कीं भ्रांतींत?] शेवटीं शेवटीं रामदासस्वामींचें दर्शन घडून व बोधामृत श्रवण करून त्यांच्या ठायीं थोडेसें उपासनांतर झालें होतें (!) असें वाटतें. तरी खुद्द समर्थांनीं त्यांस त्यांचें उपास्य दैवत जें सांब त्याच्या प्रसादाप्रीत्यर्थ कोटी पार्थिव लिंगें करण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगितलें होतें; आणि हें गुरुवचन त्या सच्छिष्यानें पाळलें असावें, यांत शंका नाहीं. ह्यावरून असें म्हणावें लागतें कीं, महाराज मूळचे कट्टे शैव मताभिमानी असून पुढें रामदासस्वामींच्या संघट्टनानें **त्यांची वृत्ति द्विधा झाली असावी.**"

आमरण देवीची उपासना केली, तींत अंतर पडूं दिलें नाहीं म्हणून भागवतधर्मावर श्रद्धा नाहीं असें होतें काय? एका देवतेची घरांत नित्य पूजा करतात. ही पूर्वापार चाल आपल्यामध्यें सर्वत्र आहे. म्हणून इतर देवावर त्यांची श्रद्धा नसते काय? इतर देवतांच्या दर्शनास ते जात नाहींत काय? उपास्य देवतेशिवाय अन्य देवतेस ते नमस्कार करीत नाहींत काय? इतरांची भक्ति करावयाची नाहीं असा कोणी नियम केला आहे काय? प्रत्यक्ष शिवाजीमहाराज हे श्री भवानीचे भक्त असून व निखालस शैव असून समर्थांच्या मठांतील श्रीरामनवमीच्या उत्साहांत वगैरे 'स्वयें

सडासंमार्जन '.करून श्रींची सेवा करीत व सभामंडपांत उभे राहून कीर्तनही करीत असत. ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे. मग त्यांची भागवत धर्मावर श्रद्धा नव्हती ती कशी काय? एकदां म्हणावयाचें महाराजांनीं उपासनांतर केल्याचा मुळींच कोठें दाखला नाहीं. आणि पुन्हां 'शेवटीं उपासनांतर झालें होतें' म्हणून 'करॉलरी' काढावयाची! आणि 'शेवटीं शेवटीं त्यांची वृत्ति द्विधा झाली होती' म्हणून आपल्याच तोंडानें म्हणावयाचें; ह्यापैकीं खरें कोणतें, तर्क कोणता व अनुमान कोणतें? मग ह्यावरून निघणारा सिद्धांत निवडून काढण्याचें काम कोण करील तें करो!

ह्या असल्या अनुमानावरून व तर्कावरून शिवचरित्रकारांनीं जो निष्कर्ष काढिला आहे तो हाः—

"तेव्हां तात्पर्य काय कीं, महाराजांनीं जो येवढा लोकसंग्रह केला, व त्यांच्याकडून जें हें अपूर्व देशकार्य करविलें त्याच्या मुळाशीं भागवत धर्म प्रसाररूप कारण नसून केवळ महाराजांच्या अंगच्या अलौकिक करामतीचेंच तें फल होय. त्याचें थोडेसें श्रेय ह्या भागवतधर्मास देणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें."

म्हणजे भागवत धर्मानें अर्थात् संतमंडळीच्या 'टाहो' फोडण्यानें यत्किंचित्‌ही महाराजास स्वराज्याच्या कामीं सहाय्य झालें नाहीं, हें शिवचरित्रकाराचें मत! अर्थात् आजपर्यंत मोठमोठ्या इतिहासज्ञांनीं न्या रानड्यासारख्यांनीं तत्कालीन संतमंडळींनीं महाराष्ट्राची जी मनोभूमिका तयार केली म्हणून धन्यवाद दिला आहे, तो सारा चुकीचा! ह्या दुराग्रहाला काय नांव द्यावें हेंच आम्हांस समजत नाहीं.

ह्या संतमंडळांनें शिवाजीमहाराजांना स्वराज्य मिळविण्याच्या कामीं म्हणजे यवनांचें निर्दालन करण्याच्या बाबतींत कोणत्याही प्रकारचे सहाय्य तर केलें नाहींच पण उलट ही मंडळी त्यांच्या हेतूच्या आड केवळ विघ्नभूत मात्र झाली! अशीच प्रस्तुत लेखकाची समजूत आहे. म्हणून त्यांनीं संतमंडळांच्या अपकृतीचा येणेप्रमाणें पाढा वाचला आहे. त्यांत ते म्हणतात—"खरें म्हटलें असतां संतमंडळीनें प्रचलित केलेल्या निवृत्ति मार्गामुळें महाराष्ट्रांतील प्रवृत्तिमार्ग तीनशें वर्षें बहुतेक लोपल्यासारखाच झाला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. राम व रहिम एक म्हणणारे शांत,

विरक्त, अहंताशून्य, उदासीन व परमार्थ साधनपर भगवद्भक्त, संसार क्षणभंगुर मानून त्यांतून मुक्त होण्याची उत्कट इच्छा अहर्निश करीत असत. त्यांला ऐहिक सुखदुःखाचें मुळींच कांहीं वाटत नसे, व सर्वजनास हाच उपदेश ते कंठरवानें करीत असत. त्यांच्या हातून यवन निर्दलनाचा उपदेश होणें मुळींच शक्य नव्हतें; आणि हा असा उपदेश रामदासाखेरीज करून अन्य कोणाही साधूच्या ग्रंथांत यत्किंचित्‌ही सांपडेल असें वाटत नाहीं." ह्यास्तव शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेंत ह्या संतमंडळाचें यत्किंचितही साह्य झालें असें म्हणण्यांत केवढें पातक आहे तें हे चरित्र-कार सांगतातः—

"तिचें यश बापड्या संसारसुखबहिष्कृत साधुमंडळाच्या निवृत्ती मार्गास अंशतः तरी देणें म्हणजे आमच्या चरित्रनायकाच्या वास्तविक योग्यतेस लघुत्त्व आणणें होय, असें आम्ही समजतों."

प्रस्तुत लेखकानें हें जें पांडित्य लढविलें आहे, व आपले विचार प्रगट केलें आहेत, त्यावरून महाराष्ट्रांतील साधुसंतांच्या अंतःकरणाची त्यांस यत्किंचितही ओळख नाहीं असें स्पष्ट दिसतें. ह्या संतमंडळीनें साधुवृत्तीनें रहावें, जातमित्सर धरूं नये, असा जो उपदेश केला, तो तर यथार्थच केला आणि त्याच्या योगानें महाराष्ट्रांतील आपआपसांतील द्वेषभाव जातीमत्सर हें नष्ट झालें. हें काम सर्वांत पहिलें होय. म्हणजे एकाद्या भिंतीवर कोणतेंही चित्र काढणें झाल्यास आधीं ती भिंत उखरवाखर असल्यास तीस गिलावा करून ती साफ करावयाची. नंतर तिच्यावर सफेती देऊन ती साफ, तुळ-तुळीत व निर्मळ करावयाची हें कुशल चितार्‍याचें आद्यकर्तव्य असतें. ही भिंत किंवा जमीनच मुळीं निर्मळ नसेल, सरळ नसेल, तर तिच्यावर केवढाही मोठा कारागीर असला तरी तो चित्र कसें काय काढणार ? आणि काढ-लेंच तर तें कितीसें शोभिवंत दिसेल ? व कितीसें खुलून उठेल ? तसाच प्रकार स्वराज्याचा आहे. स्वराज्य प्राप्त करून घेणें असेल त्यानें आधीं स्वदेशांतील लोकांची मनें आपआपसांतील क्षुद्र मत्सर व द्वेषभाव सोडून देऊन कोणतेंही कार्य असो, तें आपण सारे मिळून एकदिलानें पार पाडूं अशा प्रकारची प्रत्येकाच्या मनाची तयारी होईल अशी योजना केली पाहिजे. ती नसेल तर पुढील सारा व्यूह व्यर्थ होय. त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील

लोकांचीं मनें जीं विसकळीत झालेली होतीं, तीं ह्या भागवतधर्मानें किंवा वारकरी पंथानें एकरूप करून सोडलीं. स्वार्थ, मत्सर, द्वेष, एकमेकांचें उणें पहाणें, हें सारें कशाकरितां ? तर एका ऐहिक सुखाकरितां. तें ऐहिक सुखच मुळीं क्षणभंगुर आहे ह्याच मताचा त्यांनीं प्रसार करून एकमेकांच्या मनांतील किल्मिष काढून टाकून सर्वांचीं मनें निर्मळ करून टाकण्याचें जें मोठें व अवघड कार्य तेंच साधुसंतांनीं करून ही भूमिका तयार करून ठेवली. आतां तिच्यावर कुशल कारागिरानें काय व कसें चित्र काढावयाचें तें ठरवून आपल्या कामास लागावें इतकी कडेकोट तयारी करून ठेवली. ही तयारी म्हणजे पूर्वीं सांगितल्याप्रमाणें चित्रासाठीं तयार केलेल्या भिंतीप्रमाणेंच सफेती दिलेली जमीन होय. हें करावयाला मोठासा कुशल मनुष्य लागतों असें नाहीं. हें काम साधारण मनुष्यसुद्धां करूं शकतों. त्यावर अप्रतिम चित्र वठविणें हें काम लोकोत्तर कारागिराचें आहे हें तर उघडच आहे. नामांकित चितान्याच्या कौशल्यांत भिंतीला रंग सफेती देणाराचा मुळींच कांहीं अंश नाहीं हेंही म्हणणें एका अर्थी खरेंच आहे. तरी पण त्यानें चितान्याचें काम पुष्कळ अंशीं सुलभ केलें ही गोष्ट विसरतां कामा नये. तद्वत् महाराष्ट्रीयांच्या मनांतील विषमभाव नष्ट करून ती भूमिका सोज्वळ करून ठेवणें, तिला स्वामीभक्तीची, एकनिष्ठेची झिलई देणें, '**कर्मण्येवाधिकारस्ते माफलेषु कदाचन**' असें निरपेक्ष कर्म करण्याचा धडा लावून देणें, ही कामगिरी भिंतीस किंवा जमिनीस रंग सफेती देण्याप्रमाणेंच होय. व आरशासारख्या भिंतीवर स्वराज्याचें अनुपम चित्र वठवून देणारे कुशल कारागीर हे शिवाजी महाराज होत. ही गोष्ट कोणालाही समजण्यास कठीण नाहीं, व ती कोणास अमान्य होईल असेंही वाटत नाहीं.

दुसरी गोष्ट ह्या संतमंडळींच्या हातून यवनांचें निर्दाळण करण्याचा उपदेश करण्याचें काम मुळींच शक्य नव्हतें. हें म्हणणें सुद्धां गौण पक्षाचेंच दिसते. संतमंडळीं स्वभावानें जरी शांत व क्षमाशील दिसतात तरी '**वज्रादपि कठोराणी मृदूनि कुसुमादपि**' अशीं त्यांची अंतःकरणाची रचना असते. म्हणसे कित्येक ठिकाणीं त्यांचें अंतःकरण फुलाहूनही मृदु असते; पण तेंच अंतःकरण दुसऱ्या ठिकाणीं वज्राहूनही कठीण असतें. ते शांत व

क्षमाशील कोणाला ? सज्जनांना. दुष्ट दुर्जनाशीं प्रसंग पडला म्हणजे ते शांत व क्षमाशील कधींच नसतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शरण येईल त्यास मरण द्यावयाचें नाहीं हें त्यांचें व्रत खरें. पण जे शरणही येत नाहींत, उपदेशानेंही ज्यांचें हृदय द्रवत नाहीं, अनाथाचा छळ करणें हेंच ज्याचें ब्रीद, अशा अधमांना ते कधींच क्षमा करीत नाहींत. व दुसऱ्यालाही क्षमा करा असें सांगत नाहींत, तर ते जशाला तसेंच वागतात. व जनाला उपदेश करतात तो ही तसाच करतात. 'कोणी विनाकरण श्रीमुखांत लगावली, तर दुसरा गाल पुढें करावा,' असा नामर्दपणा तर तें कधींच शिकवीत नाहींत.

प्रत्यक्ष तुकाराम महाराज म्हणजे क्षमेचें सागर व शांतीचें आगर होतें. हें तर सर्व प्रसिद्धच आहे. परंतु त्यांचा उपदेशाचा बाणा कसा आहे तो पहा:—

**पाया झाला नारू । तेथें बांधिला कापुरू ॥**
**तेथें बिबव्याचें काम । अधमाशीं तो अधम ॥**
**देव्हाऱ्यावरि विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ॥**
**तेथें पैंजारीचें काम । अधमाशीं तो अधम ॥१॥**

"पायाला नारू झाला तर तेथें कापूर बांधून काय उपयोग ? तशाला बिब्याचेच चरके दिले पाहिजेत. 'वांकड्या मेढीला वांकडा नेम' हाच न्याय. देव्हाऱ्यावर विंचू येऊन बसतो; त्याला देवपूजेसारखें सत्कृत्य आवडत नाहीं. त्याला पैजार घेऊनच ठेंचलें पाहिजे. अधमाला अधमपणाच योग्य आहे; त्याला क्षमा आणि दया काय होय ? "

हा तुकारामांच्या अंतःकरणाचा चित्रपट आहे. ह्यावरून दुष्टांचें निर्दालन करणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य नव्हे असें कोण म्हणेल ? मग 'यवनांचें निर्दालन करण्याचा उपदेश ह्या संत मंडळीच्या हातून होणें शक्य नाहीं तें कसें काय ? नीच मनुष्य; मग तो यवन असो, हिंदू असो कीं, ब्राह्मण असो. त्याला शासन करणें हेंच यथायोग्य होय. आणि हाच संतवाक्यांतील अभिप्राय आहे. 'हातांत तरवार घेऊन यवनांचें निर्दालन करा' असा प्रत्यक्षच त्यांनीं पाढा वाचावयास पाहिजे असें नाहीं. देवालयांचा

उच्छेद; मूर्तींचा भंग; ब्राह्मणांचा छळ; धर्मभ्रष्ट करण्याचें व्रत, व जुलमाचा सुळसुळाट हे तर यवनांच्या संबधानें दरोबस्त साधुसंतांचे शेरे आहेत. मग त्यांच्याशीं कसें वागावें हें काय आणखी निराळें सांगाव्यास पाहिजे ?

' असा उपदेश रामदासाखेरीज दुसऱ्या कोणी केलेला नाहीं. ' असे लेखक म्हणतात. परंतु रामदासस्वामींनीं तरी असें प्रत्यक्ष कोठें सांगितलें आहे ? त्यांच्या उपदेशाचा ध्वनितार्थही तुकाराम महाराजांप्रमाणेंच आहे. ' कांटा काढावयाचा तर तो कांट्यानेंच काढला पाहिजे ' हाच त्यांच्या बोलण्यांतील भावार्थ आहे. साऱ्या भगवद्गीतेचें सारही तेंच.

' परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् '

भगवंतांची प्रतिज्ञाही हीच. मग साधूसंत तरी ह्या भगवद्वाणीच्या विरुद्ध कसे जातील ? साधुसंत जितके शांत असतात तितकेच ते कोपिष्ट असतात. ते जितके दयाळू असतात तितकेच ते निष्ठुर असतात. ही गोष्ट तुकारामांनीं एका अभंगांत फार उत्कृष्ट रीतीनें दर्शविली आहे. तो अभंग हा:—

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास ।
कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥१॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें ।
विष तें बापुडें कडू किती ॥२॥
भोळे तरी देऊं गांडीची लंगोटी ।
खठ्याळाच्या काठी देऊं माथा ॥३॥
माय बापाहूनी आम्ही दयावंत ।
करूं घातपात शत्रूहूनी ॥४॥
तुका म्हणे आम्ही निजोनियां जागे ।
जो जो जैसें मागें देऊं तया ॥५॥

किंवा:—

तुका म्हणे ऐशा नरा ।
मोजुन माराव्या पैजारा ॥१॥

" आम्ही विष्णुदास हे मेणापेक्षांही मऊ आहोंत. आणि कठीण म्हणाल तर वज्राचेंही तुकडे तुकडे करून टाकूं; आमच्या पुढें अमृत तें गोड कितीसें ? पण कडूपणांत म्हणाल तर विष तें बिचारें आमच्यापुढें काय होय ? भोळे म्हणाल तर आम्ही नेसलेली लंगोटी सुद्धां एखाद्याला देऊन टाकूं. पण खट्याळ भेटला कीं त्याच्या टाळक्यांत बडगा घातल्यावांचून राहणार नाहीं. दया करूं लागलों तर आमच्यापुढें आईबापांची माया ती कितीशी ? पण एखाद्याचा घात करूं लागलों तर शत्रूला सुद्धां आमची बरोबरी व्हावयाची नाहीं. तुकारामबोवा म्हणतात आम्ही निजूनच जागे असल्यासारखे [ सावध ] आहोंत. जो जो जें जें मागल तें तें त्याला देऊं."

ह्यावरून संतांचें म्हणणें असें कीं, आम्ही जरी कशांतच पडत नाहीं असे दिसत असलों तरी आम्ही कांहीं झोंप घेत नाहीं. सदासर्वदा जागृतच असतों. कोण काय करतो, आणि कोणाला काय पाहिजे, तें आम्हाला समजतें. आणि त्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें तें तें त्याला आम्ही देत असतों. भगवंतांनीं गीतेमध्यें सुद्धां संतांचा स्वभाव हाच सांगितलेला आहेः—

**या निशा सर्व भूतानी तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जागर्ति भूतानी सानिशा पश्यतो मुनेः ॥ १ ॥**

" सर्व लोकांची जी रात्र, तो साधुसंतांचा दिवस; आणि सर्व लोकांचा दिवस ती साधुसंतांची रात्र असते." हें एक रूपक आहे. ह्याचा अर्थ हा कीं, लोकांना अज्ञानामुळें ज्या गोष्टी दिसत नाहींत त्या साधुसंतांना माहीत असतात, आणि त्याविषयीं ते निरंतर सावध राहतात. आणि लोक ज्याकरितां जिवाची इतकी आटापीट करित असतात, त्याविषयीं साधुसंत अगदीं बेफिकीर असतात. कारण, त्या गोष्टी क्षुल्लक आहेत, क्षणभंगुर आहेत, केवळ भासमान आहेत, हें त्यांस कळत असतें. साधुसंतांची दृष्टि नेहेमीं दूरवर असते. तशी प्राकृत जनांची नसते. सामान्य लोकांतील व साधुसंतांतील जो भेद आहे तो हाच आहे.

पण ह्या उभयतांत आणखी एक मोठाच भेद आहे; तो हा कीं, सामान्य लोकांना दुष्टांचा संहार करावयाला किंवा नाश करावयाला हातांत शस्त्र घ्यावें लागतें, किंवा दुसऱ्या अनेक तऱ्हेचे अघोरी उपाय योजावे

लागतात. तसा प्रकार साधुसंतांचा नाहीं. त्यांना तत्प्रीत्यर्थ असें कांहींच करावें लागत नाहीं. त्यांच्या मनांत आलें धुरें कीं, दुष्टांचा आपोआपच नाश होतो. फार तर काय पण साधूंचें मन दुखलें धुरे कीं, दुराचारी असतो तो तत्काल रसातळास जातो. ही त्यांच्या तपश्चर्येची जाज्वल्यता होय. ते स्वतः क्षमाशील असल्यानें दुष्टांनीं त्यांचा कितीही छळ केला तरी त्यांचा नाश करावा असें त्यांच्या कधीं मनांत सुद्धां येत नाहीं. तरी तें कार्य आपोआप घडावयाचें तें घडतेंच. असा ईश्वरी नियमानियम आहे.

दाह्य पदार्थाला भस्म करावयाचें अग्नि मनांत आणो कीं न आणो, त्याचा स्पर्श होतांच त्याचें आपोआपच भस्म होऊन जातें. हा जसा वस्तु-धर्म आहे, त्याप्रमाणेंच साधुसंतांचाही धर्म आहे. त्यामुळें त्यांचा छळ करणाराचें त्यांचा छळ केल्यानेंच नव्हे तर दुसऱ्याचा छळ करतांना पाहून हे दुष्ट आहेत इतकें त्यांच्या मनांत आल्यानें सुद्धां त्यांची राख रांगोळी होऊन जाते! आणि जे सज्जन असतात, भक्तिमान् असतात, त्यांच्या दर्शनानें आपोआपच कल्याण होतें. म्हणजे 'जसें द्यावें तसें घ्यावें' असाच प्रकार साधुसंतांपाशीं आहे.

ह्याचा अर्थ हा कीं, साधुसंत हे कल्पवृक्षासारखे आहेत. कल्पतरू-खालीं बसून ज्याप्रमाणें इच्छा करावी त्याप्रमाणेंच घडून येतें. चांगली इच्छा केली तर चागलें होतें; वाईट इच्छा केली तर वाईट होते. अर्थात् आपलें कल्याण किंवा अकल्याण करून घेणें हें ज्याच्या त्याच्या स्वाधीन आहे. आरशांतलें प्रतिबिंब चांगलें किंवा वाईट दिसणें हें आपल्याच मुद्रे-वर अवलंबून असतें. आपण ऐटीनें उभे राहिलों तर प्रतिबिंबही ऐटदार दिसतें. आपण तोंड वेडें वांकडें केलें तर प्रतिबिंबही तसेंच वेडें वांकडें होतें. हाच सारा न्याय!

ह्यावरून साधुसंत जितके उदासीन दिसतात, तितकेच ते लोकहितैषि असतात. साधुसंतांच्या अंगीं आणखी एक विशिष्ट गुण असतो. तो गुण सामान्य नव्हे, तर निखालस लोकोत्तर होय. त्याचा येथें अवश्य उल्लेख केला पाहिजे.

संतमंडळीनें हा जो भागवत धर्म किंवा वारकरी सांप्रदायाचा निराळा म्हणून पंथ काढला, त्याचें कारण काय? ह्याचें कारण येवढेंच कीं, ब्राह्म-

णांनीं देवदेवतार्चनामध्यें व धर्मकर्मामध्यें जिकडे तिकडे आपलेंच वर्चस्व स्थापन केलें होतें. त्यामुळें परमेश्वरभक्तींत सुद्धां ब्राम्हणेतर जातींना केवळ जखडल्यासारखें होऊन गेलें होतें. तेंच त्यांना दुःसह झालें. ब्राम्हणांशिवाय इतर जातींस वेदाधिकार नाहीं. देवाची पूजा करावयाची तरी सुद्धां इतर जातींनीं ब्राह्मणांच्या द्वारें करावी. इतर जातींनीं ब्राह्मणांस स्पर्श सुद्धां करतां कामा नये. कित्येक जातींची सावली सुद्धां पातकाचें मूळ ! सोवळें ओंवळें सर्व ब्राह्मणांचें. देवळांत जाण्याला सुद्धां ब्राम्हणेतरांना चोरी !

ह्या सर्व स्थितीला विटूनच ब्राह्मणेतर बुद्धिमान् साधूंनीं ही राम नामाच्या गजराची व भजनाच्या सप्ताहाची पद्धति सुरू केली. त्यामुळें त्या पंथांत ब्राह्मणेतर जातींचा समावेश होऊं लागला. हल्लीं जसा 'ब्राह्मणेतरांचा' म्हणून एक निराळाच पंथ झालेला दिसतो, त्यांतलाच हा एक भागवत धर्माचा किंवा वारकऱ्यांचा पंथ होय. पण ह्या वारकरी पंथांत व हल्लींच्या ब्राह्मणेतर पक्षांत केवढें अंतर ! हल्लींचा ब्राह्मणेतर पक्ष ब्राम्हणांना आपल्यामध्यें घेत नाहीं, येवढेंच नव्हे, तर त्यांची टवाळी करण्यांत, कुचेष्टा करण्यांत, नव्हे—छळ करण्यांतच त्यांस भूषण वाटतें; इतकेंच नव्हे, तसें करणें हेंच जणों काय आपलें ब्रीद असें ते समजतात. तसा प्रकार ह्या संतमंडळाचा नाहीं. त्यांच्या पंथांत जशी ब्राह्मणेतरांस जाण्याची मोकळीक आहे, त्याप्रमाणेंच ब्राह्मणांसही मोकळीक आहे. ब्राह्मणांनीं आजपर्यंत ब्राह्मणेतरांवर वर्चस्व गाजविलें होतें, तरी साधुसंतांनीं त्यांचा कधींही द्वेष केला नाहीं. इतकेंच नव्हे तर, ते त्यांस अद्यापपर्यंतही देवाप्रमाणें पूज्यच मानतात, व त्यांना परमवंद्यच समजतात.

प्रत्यक्ष तुकाराम महाराजांचीच का गोष्ट घ्या ना ? त्यांना ब्राह्मणांनीं काय थोडें छळलें होतें ? रामेश्वर भट तर त्यांच्या हात धुऊन पाठीस लागला होता ! चंद्रभागेंत अभंगाच्या वह्या बुडविण्यास कारण तोच. त्यांस गांवांतून हांकून देण्यास कारण तोच. त्यानें त्यांचा नाहीं नाहीं तो छळ केला होता. पण त्या महासाधूनें त्याच्याविषयीं चुकून सुद्धां कधीं वाईट शब्द तोंडांतून काढला नाहीं. उलट सारे ब्राह्मण त्यांना अत्यंत पूज्यच वाटत. खालचा अभंग पहाः—

**ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट।**
**तरि तो तिहीं लोकीं श्रेष्ठ ॥ १**

ही ह्या भागवत धर्माची किंवा वारकरी पंथाची सात्विक वृत्ति, पूज्य-भावना कोणीकडे, आणि आलीकडच्या ब्राम्हणेतरमंडळीची निंदा, टवाळी व छळणा कोणीकडे ! भागवत धर्मांत सर्वांची एकी करण्याचें जोमदार बीज आहे. आणि ह्या नव्या ब्राह्मणेतर पंथांत एकीचा खेळखंडोबा होऊन समाजांत अधिक द्वेषभाव उत्पन्न होण्याचें मात्र बीज रुजतें आहे ! ह्यावरून ह्या भागवत धर्मानें केवढी कामगिरी केली ह्याची सहज साक्ष पटण्यासारखी आहे.

येवढ्या प्रतिपादनावरून ही गोष्ट दिसून येईलच कीं, प्रवृत्तिमार्ग आणि निवृत्तिमार्ग हे दिसण्यांत जरी भिन्न दिसतात तरी ते सांख्यमार्ग आणि योगमार्ग जसे भिन्न भिन्न नाहींत त्याप्रमाणेंच हेही दोन मार्ग भिन्न भिन्न नाहींत. दोन्हीही एकरूपच आहेत. ते परस्परांस विरुद्ध तर नाहींतच; पण उलट परस्परांस पुष्टिदायकच आहेत. निवृत्तिमार्ग तर कल्याणकारक व मोक्षदाता असल्याचें पूर्वींपासून श्रुतिस्मृतिपुराणें सांगतच आलीं आहेत. परंतु प्रवृत्तिमार्गही कांहीं कमी नाहीं. तोही निवृत्तिमार्गाचाच पोषक असून उभयतांचें ध्येय एकच आहे. मात्र त्याचें आचरण करणें तें यथाशास्त्र झालें पाहिजे. ‘ प्रपंच साधून मग परमार्थ साधावा ’ असेंच साधूसंतांचें सरशहा मत आहे.

**‘ तो नर भला भला, प्रपंच साधुनि परमार्थ ज्यानें केला. ’**

असें तर संतांचें पालोपद आहे ! ह्याचा मथितार्थही तोच ! हें भागवत धर्मातील खरें रहस्य प्रस्तुत चरित्रकारांच्या विचाराच्या आटोक्यांत न आल्यामुळें निवृत्तिमार्ग हा प्रवृत्तिमार्गाच्या आड येतो असें त्यांनीं भलतेंच विधान केलें आहे. त्यावर उत्तर म्हणजे श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितलें आहे कीः—

**सांख्य योगौपृथग्बालाः प्रवंदति न पंडिताः ॥ १ ॥**

“ सांख्य आणि योग हे भिन्न भिन्न आहेत असें म्हणणारे आहेत ते

अप्रबुद्ध होत. शहाणे लोक असें कधीं म्हणावयाचे नाहींत. " हेंच उत्तर त्यांसही देणें भाग आहे.

तात्पर्य, हा संतमंडळीचा भागवत धर्म किंवा निवृत्तिमार्ग, शिवाजी-महाराजांच्या उद्देशाला कधींच आड आलेला नाहीं. उलट त्यानें त्यांस अनेक प्रकारें सहाय्यच केलें आहे. तो जर खरोखरच आपल्या कार्याला विघातक आहे असें शिवाजी महाराजांस वाटलें असतें, तर त्यांनीं त्यास वाढूं न देतां प्रथमपासूनच खच्ची करून टाकला असता. आणि मग ते समर्थांचे अनुग्रहित होऊन सेवक तरी कां बनते ? तेव्हां जी गोष्ट खुद्द शिवाजी महाराजांस सुद्धां स्वराज्यप्राप्तीच्या कार्यास विघातक वाटली नाहीं, उलट ती पोषक अशीच वाटली, तीच गोष्ट आज त्यांच्या चरित्रकाराला विघातक वाटावी हें केवढें आश्चर्य आहे ? बरें, ह्या भागवत धर्माला स्वराज्यप्राप्तीचें अल्पसें श्रेय दिलें, म्हणून शिवाजी महाराजांच्या कीर्तीस उणेपणा तो कसा काय येतो ? खुद्द शिवाजी महाराजांनीं ह्या भागवत धर्माची व संतमंडळाची जोपासना केली, नव्हे, सर्व राज्य त्यांस अर्पण केलें, आणि त्याच संतमंडळीनें व भागवत धर्मानें त्यांचें चरित्रकार त्यांस उणेपणा आणला असें समजतात हें किती आश्चर्य आहे ? ह्याचेंच नांव कालमहिमा !

प्राचीन पंडित असोत, कीं अर्वाचीन पंडित असोत; इतिहासज्ञ असोत कीं शास्त्रज्ञ असोत; त्यांनीं आजपर्यंत समर्थ व त्यांचे अनुग्रहित शिष्य जे शिवाजी महाराज यांच्यासंबंधानें जीं जीं विधानें केलीं आहेत व अनुमानें काढलीं आहेत तीं तीं सर्व चुकीचीं आहेत. खरें अनुमान व खरा तर्क काय तो आमचा. असाच ह्या शिवचरित्रकारांचा समज आहे. म्हणून ते सर्वांचीच सरसकट कानउघाडणी करण्यासाठीं:—

## ' रामदास स्वामीं कडून स्फूर्ति मिळाली नाहीं. '

या मोठ्या भव्य सदराखालीं म्हणतात:—

" ह्या गुरुशिष्यांच्या भेटी वगैरे झाल्याचें समर्थांच्या बखरींत लिहिलें आहे. त्या कशा संभवल्या याचा ह्या इतिहासपंडितांनीं अंमळ विचार करावयास पाहिजे होता. "

म्हणजे आजपर्यंत ज्या ज्या इतिहासपंडितांनीं त्यांच्याइतक्या बखरी लिहिल्या, त्यांनीं त्या गुरुशिष्यांच्या भेटीसंबंधानें कांहीं विचार म्हणून केलाच नाहीं. सारेच बिचारे विचारशून्य ! आजपर्यंत एक दोघांनींच नव्हे, तर कैक लोकांनीं लिहिलेल्या बखरी, टांचणें व इतिहास खोटे, आणि ह्या शिवचरित्रकारांनीं काढलेलीं अनुमानें खरीं ! कां ? तर विचारानें काढलीं आहेत !

ह्यापुढें ते दासबोधावर घसरले आहेत; ते असेः—

" तसेच ज्या दासबोधाच्या बळकट पुराव्यावरून हें विधान त्यांनीं इतकें निक्षून केलें आहे, त्याचें तरी त्यांनीं सूक्ष्म दृष्टीनें साद्यंत अध्ययन करावयाचें होतें. "

रा. केळूसकरांची अशी कल्पना आहे कीं, सारे इतिहास धुंडाळले आहेत असे काय ते आपणच. सारासार विचार कळतो काय तो एक आपल्याला, दासबोधाचें अथपासून इतीपर्यंत धुरश्वरण केलें आहे काय तें मी एकट्यानें, त्याचें सूक्ष्मदृष्टीनें अध्ययन घडलें आहे तें एक मला, इतर इतिहासपंडित हे केवळ नांवाचे. त्यांपैकीं कोणी एकानेंही दासबोधाचें पान उलटलेलें नाहीं. पाहिलेंच असलें तर उडत उडत ! सूक्ष्म दृष्टीनें कोणीच अध्ययन केलेलें नाहीं. केवढी ही अहंमन्यता ! इतिहासज्ञांपैकीं दासबोधाचें कोणींच अध्ययन केलें नाहीं व त्याबद्दल कोणींच विचार केलेला नाहीं, असें बेधडक विधान ठोकून देणें हें निखालस धाष्ट्र्य होय. इतिहासविशारदांस जर हें सर्टिफिकिट तर आमच्यासारख्याची वर्दी तेथें कशी काय लागणार ? आम्ही केलेल्या ' सार्थ व सटीप दासबोधा'ला सुद्धां ते खोट्या प्रतिष्ठेंत घालणार नाहींत म्हणून कशावरून ? तरी पण आम्ही कशीबशी दासबोधाचीं चार पानें उलटलीं आहेत, त्यावरून ह्या लेखकाच्या मुद्द्याला बळकट पुरावा काय निघतो किंवा लेचापेचा पुरावा काय निघतो हें आम्हांस तर कांहीं समजत नाहीं. ह्यावरून निघणारीं अनुमानें पुढें उत्तरार्धांतील ' दासबोध ' ह्या प्रकरणांत देणारच असल्यामुळें हा मुद्दा येथेंच सोडून देतों. तथापिः—

" त्यांच्या हातून यवननिर्दालनाचा उपदेश होणें मुळींच शक्य

नसे; आणि हा उपदेश रामदासाखेरीजकरून अन्य कोणाही साधूच्या ग्रंथांत यत्किंचितही सांपडेल असें वाटत नाहीं."

ही गोष्ट शिवचरित्रकार स्वतःच जर कबूल करतात तर 'दासबोध' हा त्यांच्याच तोंडचा व त्यांच्याच कबुलीचा 'बळकट' पुरावा नव्हे काय ? दासबोधांत जो पुरावा पाहिजे तो त्यांत असल्याचें आपण स्वतःच सांगावयाचें आणि दुसऱ्यास 'दासबोध' पाहिला नाहीं म्हणावयाचें हें शास्त्र कोणतें ? असे आपले आपणच विसंगत प्रकार करून आणखी सुरूखुरू तोंडानें 'इतिहास कसा लिहावा' 'त्यांत काय काय असावें' 'त्याला उणेपणा कशानें येतो' ह्याचा धडा ते पूर्वइतिहासकारांना देत आहेत. हे पूर्वइतिहासकार कोण ? तर असेतसे नव्हेत, तर मि. किंकेड, प्रो० सरकार, रावबहद्दूर पारसनीस इत्यादिकांना ! जणो काय ह्या मंडळींना अद्याप इतिहासांतील रहस्य कळतच नाहीं ! रा. केळूसकर वरील मंडळींच्या घोडचुका दाखवितातः—

"प्रो० भाटे ह्यांनीं आमच्या पुराव्याचें स्वतंत्र रीतीनें समर्थन केलें आहे. [स्वतंत्र, म्हणजे 'मनसोक्त !' परतंत्र रीतीनें नव्हे. कारण त्याला पुरावा असा कांहींच नाहीं ! केवळ अमनधबक्याचें अनुमान !] तरी देखील कित्येक इतिहाससंशोधक ह्या बाबतींत अद्यापही साशंकच आहेत. [रा. केळूसकरांच्या मताचें समर्थन, आणि ते करणारे प्रो० भाटे, आणि तेही एकी एक ! असें असून अद्याप ह्या इतिहाससंशोधकांच्या शंका णात नाहींत हें आहे तरी काय ? त्यांनीं एकदम त्यास वेदतुल्य मानून 'क्षमस्व ! क्षमस्व !' म्हणावयाचें सोडून देऊन हे आपले मुखस्तंभ आहेत तसेच आहेत ! ह्यांना म्हणावें तरी काय ? तरी बरें.] प्रो० सरकार ह्या प्रवादावर फारसा भरंवसा ठेवीत नाहींत. [ह्यावरून थोडासा तरी ठेवतात, हेंच नशीब !] मि. किंकेड, व रा० ब० पारसनीस ह्यांना हनुमंतस्वामीची बखर व तींत वर्णिलेले चमत्कार खरे वाटतात असें दिसतें. कारण त्यांनीं वर निर्दिष्ट केलेल्या इतिहास ग्रंथांत रामदासानें केलेल्या कांहीं चमत्कारांचा उल्लेख मोठ्या आवडीनें केला आहे ! [किती असमंजस लोक हे ! असल्या लोकांनीं असल्या पातकांत पडावें हा केवढा प्रमाद !] असल्या भाकडकथा (!) दिल्यानें आपल्या ग्रंथाची इतिहास

या दृष्टीनें विश्वसनीयता कमी होते हें त्यांच्या लक्षांत कसें आलें नाहीं ?"

नाहीं नाहीं; खरोखरच नाहीं. काय मठ्ठ डोकीं ही !

"तरी त्यांच्या ह्या अद्भुत कथामय ग्रंथांत सत्याचा अंश बराच असतो. तो सत्यान्वेषण करणारानें निवडून घेतला पाहिजे."

हें जर चरित्रकारच कबूल करतात, तर तो 'सत्याचा बराच अंश' आपल्या इतिहासांत नमूद केल्यानें 'विश्वसनीयता' कमी ती कशी काय होते ? हा सत्याचा अंश निवडून काढावयाचा तो कसा काय ? त्याला चाळण तरी कोणती ? रव्याची कीं पिठीची ! रा. केळूसकरांच्या चाळणी-शिवाय दुसरी चाळण त्यांच्या पसंतीस पडेल हें तर मनांतच आणावयास नको!

ह्या चरित्रकारांना 'टेंकू' देणारे गृहस्थ एकच आहेत. ते कोण ? तर प्रो० भाटे. ह्यांची सारी मदार कायती त्यांच्यावर. ह्यांचा कैवार घेणारे ब्यारिष्टर काय ते तेच. आजपर्यंत स्वानुभवानें लिहिलेले संतमहंतांचे शकवारीचे लेख खोटे आणि 'अमृतसिद्धियोग' येवढ्यावरून अनुग्रहाची ती तारीख असावी, हें काढलेलें अनुमान खरें ! इतकाच जेथें दुराग्रह भरलेला आहे, त्या विषयाची अधिक भवति न भवति करण्यांत तरी अर्थ कोणता ?

ह्याकरितां हा पाल्हाळ सोडून देऊन रा. केळुसकर ह्यांच्या मनांतील हृद्गत तरी काय ? त्यांचा येवढा राग तरी कोणावर ? तेवढा मुद्दा त्यांच्याच शब्दांनीं देऊन हा भाग पुरा करूं. रा. केळूसकरांनीं शिछत्रपतींचें चरित्र लिहिण्यासाठीं जेव्हां कलम हातांत धरलें, त्यावेळीं त्यांच्या संबंधाच्या अनेक बखरी, चरित्रें वगैरे ग्रंथ त्यांस धुंडाळावे लागले. त्यांत शिवाजीमहाराज हे केवळ एका सरदाराचे पुत्र असून त्यांनां लहानपणापासून स्वातंत्र्याची आवड कशी होती, ते मर्दानी खेळ कसे शिकले, मावळे लोकांशीं परिचय करून त्यांनीं त्यांस कसें वश करून घेतलें, डोंगरकटारीची माहिती कशी मिळविली, आणि प्रचंड कार्य हातांत धरून दिल्लीपतीशीं सामना केला; पराक्रम गाजविला; युक्ति प्रयुक्ति लढविल्या; आणि स्वराज्य हस्तगत करून, अखेर छत्रपति बनून सिंहासनाधीश झाले.

ह्यामुळें त्यांची थोरवी, त्यांचा पराक्रम, त्यांचें चातुर्य, त्यांची कर्तबगारी त्यांच्या मनांत बिंबली व त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली; त्यांचा आदर वाटूं लागला. इतकेंच नव्हे, तर त्यांस कोठें ठेवूं आणि न ठेवूं असें त्यांस होऊन गेलें. हें सर्व ठीकच झालें. त्यांत वावगें असें कांहींच नाहीं. तसें कोणालाही होणें साहजीकच आहे. पण पुढें पाहातात तों तो त्यांत एक ' बामण '—नव्हे ' गोसावडा '—आडवा पडला. तो कोण ? समर्थ—नव्हे नव्हे रामदास ! त्याची ह्या महाराजांपेक्षांही बडेजाव अधिक ! तो म्हणे महाराजांचा गुरु !! त्याचा म्हणे महाराजांनीं अनुग्रह घेतला ! ते त्याचे शिष्य बनले ! त्याच्या आज्ञेशिवाय ते म्हणे पाऊल सुद्धां टाकीत नव्हते. त्या गोसाव्यानें ' दासबोध ' ' आत्माराम ' अशीं कायशीशीं एक दोन ' चिटोरीं ' तयार केलीं. त्यांचें केवढें स्तोम ! त्यांतील उपदेशावरूनच म्हणे त्यांच्या आंगांत ही स्वातंत्र्यप्राप्तीची स्फूर्ति आली. काय हा वेड्यांचा बाजार ! हे विचार मनांत येऊन ती गोष्ट त्यांच्या अगदीं काळजाला झळंबली ! महाराज छत्रपति केवढे ? त्यांचा पराक्रम काय ? चातुर्य किती ? आणि ते म्हणे रामदासासारख्या ' गोसाव्याच्या ' तोंडानें पाणी पीत ! रामदास तो काय ? केवळ ' बामण ' ! शुद्ध भिक्षापति ! गोसावडा ! त्याचें छत्रपति महाराजांच्या ह्या स्वराज्य प्राप्तीच्या कार्यांत नांव हवें कशाला ? त्याच्या योगानें सारा अन्यायच ' अन्याय ' माजून राहिला आहे. हेंच त्यांच्या मनानें घेतलें. आणि तोच आपला सिद्धांत त्यांनीं येणेंप्रमाणें लोकांपुढें ठेवला आहे:—

" तेव्हां एकंदरींत काय कीं, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, स्वराज्याभिमान व स्वातंत्र्यप्रीति ह्या वृत्ति समर्थांसारखा गोसाव्याच्या (!) बोधानें महाराष्ट्रांत पुढें कांहीं काळ जागृत राहिल्या असें म्हणण्या पेक्षां त्यांचें बीजारोपण व संगोपन शिवाजी महाराजांच्या उज्वल चरित्र महिम्यानेंच मुख्यतः झालें होतें. हें म्हणणें विशेष सयुक्तिक दिसतें. औरंगजेबानें संभाजीस पकडून ठार मारून स्वराज्य बहुतेक पायाखालीं तुडविलें असतां त्याच्याशीं मोठ्या आवेशानें व शौर्यानें सतत १९ वर्षें टक्कर देऊन त्याला ज्या वीरांनीं त्राहित्राहि करण्यास लावलें, त्यांस रामदास याजकडून मुळीच सहाय झालें नसावें, तर हा अलौकिक आवेश शिवरायाच्या कर्तृत्वामुळें

व त्याच्या तालमेंत तरबेज झाल्यामुळें त्यांच्या ठायीं संचरला होता, असेंच ह्मटलें पाहिजे. ( म्हणावयाला काय ? पाहिजे ते म्हणावें. ) ह्याचें सर्व यश त्या राजमणीसच दिलें पाहिजे. समर्थांनीं लिहिलेल्या एखाद्या दुसऱ्या चिटोऱ्यास (!) तें देऊन त्यांचा नसता बडेजाव वाढविणें (!) अन्याय होणार आहे. ”

समर्थांसारख्या ‘ गोसावड्याच्या ’ चिटोऱ्याचा ‘ नसता बडेजाव ’ वाढविल्यानें खरोखरच घोर अन्याय माजून मोठा अनर्थापात घडेल ! त्यापेक्षां समर्थास ‘ गोसावडा ’ व त्यांच्या ‘ दासबोधा ’ सारख्या ग्रंथास ‘ चिटोरें ’ म्हणणाऱ्या अहंमन्य पंडिताच्या ‘ परमपूज्य दस्तऐवजाची ’ मिरवणूक काढून ‘ असला बडेजाव ’ वाढविल्यास न्यायदेवता सुप्रसन्न मुद्रेनें जिकडे तिकडे फडकत राहील ! हाच ह्यांतील ध्वनितार्थ नव्हे काय?

स्वाभिमानाच्या व स्वातंत्र्यप्रीतीच्या वृत्तीची जागृति महाराष्ट्रामध्यें जी कांहींकाल राहिली, तिचें बीजारोपण व संगोपन शिवाजीमहाराजांच्या उज्वल चरित्रानें झालें ही गोष्ट कोणास नाकबूल आहे? ती सांगावयास रा०—केळूसकरांनींच हातांत कलम धरलें पाहिजे अशांतला भाग नाहीं. पण त्यांत रामदासस्वामींचा अल्पांश सुद्धां नाहीं म्हणणें हें तरी कितपतसें सयुक्तिक आहे ! शिवाजीमहाराजांच्या पश्चात् ज्या मंडळींनीं औरंगजेबाला त्राहि त्राहि करून सोडलें, त्यांस ‘रामदासाकडून साह्य झालें नसावें, ’ ह्याला तरी आधार काय ? त्यावेळीं रामदासाला ( ! ) समाधिस्थ होऊन बरींच वर्षे झालीं होतीं. तेव्हां ‘तो’—किंवा ते—त्यांस सहाय तें कसें करणार ? तेव्हां त्यांचें त्या प्रसंगीं सहाय असलें तर तें अंतःप्रेरणेचें साह्य असावयाचें. तें नव्हतें असें तरी कशावरून ? साऱ्या महाराष्ट्रीयांची मनोभूमिका तयार करण्याच्या कामांत तत्कालीक साऱ्या संतमंडळीचा—व त्यांतही विशेषेंकरून रामदासांचा अंश होता, असें सर्व इतिहासज्ञांचें एकमतानें म्हणणें आहे. तर त्यांचें साह्य केव्हांही त्यांत असलेंच पाहिजे. शिवाय ज्या ज्या महाराष्ट्रवीरांनीं शिवाजीमहाराजांच्या पश्चातही येवढाले पराक्रम गाजविले, ते सारेच रामदासांचे अनुयायी नसले तरी ते स्वधर्मनिष्ठ होते, याबद्दल तिळमात्र शंका नाहीं. संभाजीमहाराजांच्या पश्चात् ज्या वीरचतुष्टयानें

तरवारबहाद्दरी केली, त्यांपैकीं प्रमुख असे दोन असामी. म्हणजे रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचीव हे तर रामदासस्वामींचे अनुग्रहीतच होते. म्हणूनच त्यांच्या येथें रामवनमीचा उत्सव प्रतिवर्षास मोठ्या थाटामाटानें होत असतो. प्रतिनिधि मात्र असे नव्हते. ते देवीचे उपासक होते. तरी ते स्वतः व त्यांच्या हाताखालचे सरदार ह्यांच्या अंतःकरणांत संतमंडळी विषयीं अत्यंत पूज्यबुद्धि होती, व त्या सत्पुरुषांच्याच कृपेनें सर्व कांहीं होत आहे, आपणांस यश येणें हेंही त्यांच्याच कृपाप्रसादाचें फळ, हीच भावना त्यांच्या अंतःकरणांत निरंतर जागृत होती.

परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि, मिरज प्रांतांत मोंगलांचा पाठलाग करीत असतां त्यांचा मोड होऊन ते परत तुंगच्या मुक्कामास येऊन छावणी देऊन राहिले. त्यांच्या हाताखालचे कांहीं प्रमुख सरदार मोठे भक्तिवान् होते. त्यांच्या छावणीपासून श्रीक्षेत्र ब्रह्मनाळ अगदीं जवळ. तेथें स्वामी पंचायतनापैकीं आनंदमूर्ती हे राहत असून ते हयात होते. त्यांनीं आपले गुरु रघुनाथस्वामी ह्यांची तेथें मोठी समाध बांधलेली असून तिच्या दर्शनास अनेक लोक जात असत. ही पाषाणाची समाध एखाद्याची भक्ति पाहून किंवा विशेष प्रसंगीं डोलत असल्याची प्रसिद्धि होती व ती अद्यापही आहे. त्या समाधीचें दर्शन घ्यावयासाठीं प्रतिनिधींच्या हाताखालचे दोन सरदार बाबाजी आणि शिवाजी डफळे, मानकरी गेले होते. त्यांस परत यावयास थोडासा उशीर लागला, म्हणून प्रतिनिधि त्यांच्यावर रुष्ट झाले. तेव्हां त्या सरदारांनीं ब्रह्मनाळेंतील त्या समाधीचा सर्व प्रकार सांगितला व तिच्या दर्शनासाठीं आम्ही गेलों होतों, ह्याबद्दल क्षमा असावी म्हणून विनंति केली. तो साक्षात्कार ऐकून स्वतः प्रतिनिधि त्या समाधीच्या दर्शनास गेले, व समाधीनें डोल दिल्यास व कृष्णेनें उतार दिल्यास तोच गुरूचा प्रसाद समजून आपण पुन्हा शत्रूवर चालून जाऊं असा त्यांनीं संकल्प केला. त्याप्रमाणें समाधीचा डोल झाला, व कृष्णाबाईनेंही उतार दिला. म्हणून प्रतिनिधि मोठ्या आवेशानें पुढें सरूस त्यांनीं औरंगजेबाच्या सैन्यावर छापा घातला आणि त्याची दाणादाण उडविली ! त्यानें घेतलेला सर्व मुलूख परत घेतला ! आणि ह्या विजयाप्रीत्यर्थ आनंद-

मूर्तीस १२ गांवांची सनद देऊं लागले. परंतु त्या सत्पुरुषानें ती घेण्याचें नाकारलें. एक गांव मात्र मोठ्या आग्रहास्तव घेतला.*

हा जो जय मिळाला तो या सत्पुरुषाच्या कृपेनेंच मिळाला अशी प्रतिनिधींची दृढतर समजूत होती. हें सामर्थ्य कशाचें ? समर्थांनीं किंवा संतमंडळींनीं मनोभूमिका तयार करून ठेवली होती तिचेंच नव्हे काय ? श्रद्धा, भक्तिबळ, एकनिष्ठा, आणि स्वधर्मजागृति हींच त्यावेळीं अंतःस्फूर्तीला विशेष कारणीभूत होतीं. ही सर्व स्फूर्ति महाराष्ट्रामध्यें संतमंडळींनीं व रामदासांनींच उत्पन्न केली असें इतिहासज्ञांचें मत आहे, व तें रा. केळूसकरांनींही अंशतः मान्य केलेंच आहे. कारण, राजकारणाचा उल्लेख रामदासाखेरीज इतर कोणत्याही साधूंच्या ग्रंथांत आढळून येत नाहीं, असें तेच म्हणतात. आणि ह्या स्वातंत्र्य मिळविण्याच्या किंवा स्वराज्यप्राप्तीच्या आवेशाचें मूळबीज ही अंतःस्फूर्तीच होय. मग रामदासस्वामींचें त्या वेळच्या मंडळीस यत्किंचित साह्य झालें नाहीं तें कसें काय ? रामदासस्वामींनीं किंवा त्यांच्या शिष्यांपैकीं कोणी एकानेंही प्रत्यक्ष रंणांगणांत उभें राहून हातांत तरवार घेतली नाहीं हें खरें आहे. परंतु श्रीकृष्णांनीं भारतीय युद्धांत ज्याप्रमाणें:—

---

* हा पद्यात्मक वृत्तांत 'आनंदचरितामृत' ह्या ग्रंथांत फारच रसभरीत वर्णिलेला आहे. त्याचा आम्ही गद्यांत सारांश देतों:—

"प्रतिनिधि कीर्तन करावयास उभे राहिले. सर्व मंडळी जमली. गायन उत्तम, वक्तृत्व उत्तम, चार्वाकदर्शन, बौद्ध, सांख्य, मीमांसक इत्यादि मतांचें खंडण करून अद्वैताचें प्रतिपादन केलें. नामरूपात्मक जें जें दिसतें तें तें सर्व वाचारंभण आहे. सत्ता आणि प्रकाश, हे दोन ब्रह्माचे अंश होत. आणि तिसरा आनंद तो जगामध्यें गुप्त असतो. तोच हुडकून काढावा आणि मग महावाक्याचें विवरण करावें. तरच जन्माचें सार्थक. तोच आनंद ह्या गुरुचरणापाशीं पाणी भरीत आहे. तो दर्शनाला येतील त्याला दिसतो.' असें कीर्तनांत प्रतिपादन होतें. त्यावेळीं वृंदावन डोलूं लागलें. पण प्रतिनिधींना त्याबद्दल संशय वाटूं लागला. म्हणून त्यावर भोपळे ठेविले. तेही डोलूं लागले, म्हणून भाले उभे केले ते एकमेकांस

**न धरी शस्त्र करीं मी गोष्टी सांगेन युक्तिच्या चार ॥**

"मी प्रत्यक्ष हातांत शस्त्र धरणार नाहीं; परंतु युक्तिप्रयुक्तीच्या चार गोष्टी सुचतील त्या सांगेन" म्हणून प्रतिज्ञा केली होती. त्याप्रमाणेंच ह्या साधुसंतांची किंवा रामदासस्वामींची प्रतिज्ञा होती. श्रीकृष्णांनीं भारतीय युद्धांत प्रत्यक्ष हातांत शस्त्र धरलें नाहीं तरी, सर्व भारतीय युद्धांत करते करविते तेच होते. ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्धच नव्हे, तर सर्वमान्य ही आहे. तद्वत् रामदासांचें स्वराज्य घेण्याच्या बाबतींत प्रत्यक्ष असें साह्य नव्हतें असें वर वर पाहणारांस वाटतें तरी, अंतःस्फूर्ति सर्व त्यांचीच होती, ही गोष्ट सर्वांस व सर्व इतिहासज्ञांसही माहीत आहे. असें असतां तीच गोष्ट रा. केळूसकरांना अन्यायाची वाटतें हें दुर्दैव होय.

बरें; रामदासांचें साह्य ह्या कामांत मुळींच नव्हतें असें मानावें तर खुद्द शिवाजीमहाराज स्वदस्तूरच्या पत्रांत सद्गदित अंतःकरणानें कबूल करतात कीं, "हें सर्व आपल्या कृपेचें फल होय." अशी तर खुद्द शिवाजी महाराजांची भावना होती, तर ती खोटी कशी काय मानावयाची ? आणि

---

घांसूं लागले. हा चमत्कार पाहून प्रतिनिधींना गहिंवर येऊन त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. क्षमा मागितली. ते आजानुबाहू असून देवीचे उपासक होते. त्यांनीं दोन्ही हातांनीं वृंदावनास मिठी घातली. तेव्हां त्यांचें आंगही डोलूं लागलें! पुन्हा दोन घटका कीर्तन करून मग आरती केली. इतक्यांत शत्रु भिलवडीवर आल्याची बातमी आली. त्यामुळें मनांत गडबडले. सारे म्हणाले पळून जावें. पंत म्हणाले "नाहीं; आज निःशंकपणें युद्ध करणार. स्वामींची कृपा आहे. वांचून काय कीर्ति मिळवणार! असें म्हणून पादुकावरील शमी हातांत घेतली. तोच प्रसाद मस्तकांत तुरा खोंवला. स्नान करून पूजा केली. भोजन प्रसाद घेतला. शरीरावर कांति चढली. 'जय रघुवीर' म्हणून निघाले. [येथें प्रतिनिधींनीं 'जय जगदंब' न म्हणतां 'जय रघुवीर' म्हटलें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.] एकांडे वगैरे घोडे दवडीत निघाले. हत्यारें लखलखूं लागलीं. शिरपेंच, तुरा, रत्नखचित अलंकार व चिलखत असा पोषाख होता.

प्रतिनिधि येतात ही बातमी मुसलमानांस मुळींच नव्हती. त्यांपैकीं

मानली तर शिवाजी महाराजांकडे खोटेपणाचा किंवा निदान दांभिकपणाचा तरी दोष येत नाहीं काय? रा. केळूसकर हें पत्र केवळ त्यांच्या विनयाचें व गुरुभक्तीचें दर्शक 'औपचारिक' होय असें म्हणतात. हें म्हणणें तरी कितीसें शोभतें? बरें, क्षणभर तें पत्रही औपचारिकच असेल असें मानलें, तर महाराजांनीं जी येवढी भक्ति केली, येवढा अनुग्रह घेतला, इतकीं पायांवर लोटांगणें घातलीं, इतकेंच नव्हे, तर स्वकष्टानें मिळविलेलें राज्यही अर्पण केलें तेंही औपचारिकच काय? मनांत कांहींतरी पूज्य भावना असल्याशिवाय त्यांच्याच कृपेचें फळ आपण भोगीत आहों ही भावना अंतःकरणांत रुजल्याशिवाय कोणी कोणास राज्य अर्पण करील काय? कधींच करणार नाहीं. ह्यावरून शिवाजी महाराजही ज्यांना पूज्य मानीत होते, ज्यांच्या चरणीं लीन होत होते, त्यांची योग्यता महाराजांहूनही अधिक असली पाहिजे हें कोणासही समजण्यासारखें आहे. व तीच त्यांची योग्यता शिवाजी महाराजांच्या मनांत ज्याअर्थी वागत होती, त्याअर्थी रामदासांची योग्यता व सामर्थ्य तसेंच मोठें असलें पाहिजे. आणि म्हणून त्यांस 'समर्थ' हें नांव सर्वतोमुखीं पडलेलें होतें. अशा महात्म्याच्या योग्यतेचें शिवाजी महाराजांनीं जसें कौतुक केलें, त्याप्रमाणेंच त्यांचें व

---

कोणी चुली पेटवीत होते; कोणी बाजारांत गेले होते, तर कोणी नदीवर गेले होते. त्यांची सारी वाताहात झाली. कोणाचे हात तोडले, कोणाचे पाय तोडले, कोणास जमिनीवर पाडले. बाकीचे लोक जिकडे वाट फुटली तिकडे पळून गेले. मुख्य सरदार तर २५ स्वार बरोबर घेऊन पळून गेला! हत्ती, घोडे, चीज, वस्त सर्व लुटून आणली. आणि जयजयकार करीत पुन्हा ब्रह्मनाळेस आले. व आनंदमूर्तींच्या नांवानें १२ गांवच्या सनदा पुढें ठेवल्या. परंतु 'सेवेंत विक्षेप नको' असें म्हणून फारच आग्रहास्तव एका गांवची सनद ठेवून घेतली. शके १६१६ भावनाम संवत्सर."

ह्या एकाच बखरीवरून तत्कालीन साधुसंतांचें सामर्थ्य व प्रभाव कसा होता, आणि शूरवीर महाराष्ट्रीय लढवय्यांचा त्यांच्यावर केवढा भरंवसा होता, व त्याचीं फळेंही त्यांस किती शीघ्र व अचुक मिळत होतीं, ह्या सर्व गोष्टी एकसमयावच्छेदेंकरूनच कळण्यासारख्या आहेत.

त्यांच्या परम पूज्य ग्रंथांचें प्रत्येकानें कौतुक करणें हेंच त्यांचें कर्तव्य होय. असें असतां त्याच महानुभावाचें व त्याच्या ग्रंथांचें नांव घेतांच रा. केळूसकर ह्यांच्या अंगांचा तिळपापड झाला आहे. 'रामदास' आणि 'दासबोध' हीं नांवें निघालीं कीं त्यांचें आतां काय करावें आणि काय न करावें असें त्यांस होऊन जातें, असें त्यांच्या अमर्याद लेखावरून स्वष्ट दिसतें. ते त्यांच्यावर पदोपदीं तोंडसुख घेतां घेतां अखेर शिष्टाचाराला सोडून अनुचित उद्गार त्यांच्या लेखनींतून बाहेर पडलेचः—

"समर्थासारख्या गोसाव्याच्या (!) संबंधानें आणि त्यानें लिहिलेल्या एखाद्या दुसऱ्या चिटोऱ्यास (!) देणें हा अन्याय होणार आहे."

यांत 'गोसाव्यानें' हे शब्द त्यांनीं शिष्टाचाराला भिऊन केवळ औपचारिक पद्धतीनेंच घातलेले आहेत. खरोखर 'गोसावड्यानें' असाच शब्द योजावयाचा त्यांचा हेतु होता. व भाषासरणीच्या ओघानें पाहिलें तर तोच शब्द तेथें यथायोग्य होय, हें त्यांच्या विचाराच्या घाटणीवरून व आवेशावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

ज्या समर्थांना व त्यांच्या 'दासबोध' ग्रंथराजाला सारें महाराष्ट्र आजतागाईत वंद्य मानीत आले आहे, व आजही मानतें, ज्यांचा सांप्रदाय अद्याप सर्व महाराष्ट्रांत वंद्य मानला जातो, व ज्यांचा दासबोध अद्यापही उच्च स्वरांत प्रातःकाळीं कानावर पडून कान पवित्र होतात, ज्यांची पायधूळ खुद्द शिवाजी महाराज नित्य मस्तकीं धारण करीत, त्या सत्पुरुषाच्या मस्तकावर 'गोसावडा' हें शेलकें पुष्प वाहून व त्यानें केलेल्या परम पवित्र ग्रंथांस 'चिटोरें' म्हणून रा. केळूसकरासारख्या लेखकानें त्यांची उत्तरपूजा करावी यापेक्षा आणखी आपल्या महाराष्ट्राचें दुर्भाग्य तें कोणतें राहिलें ? शिवशिव ! हें ऐकूनः—

**जिव्हायाच्छेदिता नास्ति न तालु पतनाद्भयम् ।**
**निर्विशेषेण वक्तव्यं निर्लज्जः कोन पंडितः ॥१॥**

हें सुभाषित मनांत आणून स्वस्थ बसावें, दुसरें काय ? तात्पर्य, जग हें त्रिविध आहे. 'जगाच्या तोंडाला हात लावणार कोण !' ह्यासाठीं पूर्वी सांगितलेला तुकारामांचा अखेरचा उपदेशच उराशीं बाळगला पाहिजे. ते।

इाच कीं ' ह्या असल्या तर्कटी लोकांच्या नादाला लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण आपल्या मुद्याशीं गांठ घालावी. श्रीमद्विवेकानंद स्वामींचे गुरु भगवान् रामकृष्ण परमहंस यांच्या तोंडांत नेहमीं एक गोष्ट असे. व ते वेळोवेळ असे कोणी तर्क वितर्क काढले कीं ती त्यांस सांगत असत. ती गोष्ट अशी. एका श्रीमान् गृहस्थानें एक अंबराई खरेदी केली होती. त्या आंब्यांना आंबे येऊन त्यांना बहार आला होता. म्हणून त्यानें आपल्या दोन चार स्नेह्यांना तो बाग पहावयास बोलावलें. व त्याप्रमाणें चार गृहस्थ त्या आंबराईंत गेले. हे चौघेही विद्वान् असून त्या प्रत्येकानें एक एका शास्त्राचा अभ्यास केलेला होता. तीन असामी अत्यंत चिकित्सक होते. त्यांना सर्व गोष्टींचा काथ्याकूट करीत बसण्याची संवयच लागून गेली होती. परंतु चौथा होता तो गंभीर स्वभावाचा होता. तो नसत्या गोष्टींची उठाठेव कधींच करीत नसे. तो आपल्या मतलबाला गांठ घाली.

ही मंडळी त्या बागेंत पोंचल्यानंतर त्या चारही विद्वानांस ती सुंदर बाग पाहून फार आनंद झाला. एक गणितशास्त्रज्ञ होता तो लगेच आपल्या खिशांतील टेप काढून त्या बागेची लांबीरुंदी मोजूं लागला. व त्या बागेला किती किंमत पडली, ह्याची चौकशी करून दर चौरस यार्डास काय आकार झाला, त्यांत उत्पन्न प्रतिवर्षी किती होईल, सरकारसारा किती, आंबे वठल्यानंतर जळाऊ लांकडें किती निघतील ह्याच्या आंकडेमोडींत चूर होऊन गेला.

दुसरा रसायनशास्त्रवेत्ता होता. तो त्या मळ्यांत चहूंकडे हिंडून त्यानें ठिकठिकाणची माती गोळा करून आणली. त्यांत कांहीं काळी, कांहीं तांबडी व कांहीं शाडू अशी होती. नंतर तो त्या मातीचें पृथक्करण करूं लागला. हिच्यांत लोह किती, चुना किती, व उद्भिजभाग किती ? तेंच काढण्याच्या नादास लागला.

तिसरा भूगर्भशास्त्री होता. तो फूट घेऊन विहिरीकडे गेला. व ह्या जमिनींत पाणी किती हातावर लागलें आहे तें त्यानें पाहिलें. नंतर ह्या जमिनींत ' आर्टिशियन वेल ' निघेल किंवा नाहीं, ह्यांत चुनखडूचा थर किती उंचीचा आहे ? इत्यादि विचारांत गर्क होऊन गेला.

चवथा होता तो गंभीर वृत्तीचा होता. तो मुकाट्यानें आंब्याच्या झाडा-

खालीं गेला. आणि हापूसचीं झाडें कोणतीं व पायरी कोणती, ह्याची माहिती विचारून त्यांच्यावरील इरसाल पाड लागलेले आंबे त्यानें तोडून आणले आणि यथेच्छ फराळ केला.

तोंपर्यंत हे तिघे शास्त्री आपल्याच नादांत गुंगून गेले होते. इतक्यांत त्यांचा तांगेवाला आला, आणि म्हणाला "हं! आटपा, आटपा! गाडीची शीट झाली!" हें ऐकतांच ते चौघे विद्वान् घाईघाईनें माघारे गेले! ह्यामध्यें अधिक शहाणपणा कोणाचा? बिचारे तीन असामी चिकित्सा करतां करतां भुकेनें मात्र व्याकूळ झाले. आणि मुकाट्यानें आंबे खाणाराची यथेच्छ तृप्ति झाली. ह्यावरून मुद्याशीं गांठ घालणारा तोच शहाणा होय.

कृष्ण मथुरेंत जन्मला कां द्वारकेंत जन्मला? त्याला चार हात होते कीं दोन हात होते? ह्याची रिकामी वाटाघाट करण्यांत अर्थ कोणता? त्यानें गीतेंत सांगितलेल्या उपदेशाचें प्राशन करून आत्मा तृप्त करणें हें आपलें काम. तेवढें करावें म्हणजे झालें.

परंतु आजकालची स्थिति ह्याच्या अगदीं उलट झाली आहे. चिकित्सकपणा आणि तोंडाची पाटिलकी तर शिखरास जाऊन पोंचली आहे. आणि वितंडवादाचे तर्कवितर्क तुफान झालेल्या नदीप्रमाणें जिकडे तिकडे फोंफावत चालले आहेत. त्यांना धरबंद म्हणून कांहीं उरलाच नाहीं. '**प्रमाणामधें सर्व कांहीं असावें**' हें वाक्य कोणाच्या स्मरणांतही राहिलेलें दिसत नाहीं. ह्यामुळें '**जगीं कोण जाणें खरें आणि खोटें**' असाच प्रकार झाला आहे. ज्ञानेश्वर दोन! वारकरी अभंग करणारा ज्ञानदेव वेगळा व ज्ञानेश्वरी करणारा ज्ञानदेव वेगळा! वामनपंडित ५! यमक्या वामन वेगळा; भारद्वाजगोत्री वामन वेगळा; नृसिंह गोत्री वामन वेगळा; शृंगारवामन वेगळा व 'यथार्थ दीपिका'कार वामन वेगळा!

आणि ह्या विषयावर अलीकडच्या विद्वानांत धुरीण म्हणविणाऱ्या लेखकांनीं मनसोक्त पांडित्य लढवून स्वतंत्र लेखच नव्हेत तर पुस्तकेंही काढलीं आहेत! ह्या प्रकाराला काय म्हणावें? व प्राकृत जनांनीं त्यांत खरें तें काय समजावें? आलीकडचे विद्वान् आपण मोठे चिकित्सक, संशोधक, सत्यासत्याची शहानिशा करणारे म्हणून बाणा मिरवितात

आणि आपण स्वतः येवढाल्या घोडचुका करतात कीं, लहान पोरांनीं सुद्धां त्यास हंसावें ! इतकें त्यांचें ज्ञान अगाध असतें !

अशांपैकीं एकच मोठें मौजेचें उदाहरण येथें देतों. 'काव्येतिहास संग्रहकर्ते' किती विद्वान आहेत, केवढे शोधक आहेत, व वाङ्मयाचे कसे भोक्ते आहेत हें सर्वविश्रुतच आहे. त्यांच्याबद्दल ह्याहून विशेष माहिती कोणास कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. त्यांनीं आपल्या सुप्रसिद्ध मासिकांत '**खर्ड्याच्या लढाई**'ची एक जुनी बखर छापून प्रसिद्ध केली आहे, व त्याचें स्वतंत्र पुस्तकही पण छापलें आहे. ही लढाई उपस्थित होण्यापूर्वीं हैदराबादच्या नबाबाचे दिवाण, वकील वगैरे वडीबडी मंडळी तहाचें बोलणें करण्यासाठीं पुण्यास श्रीमंत पेशव्यांच्या दरबारीं आली होती, व 'त्यांच्या करितां तेथें **व्यंकट नरशींचें नृत्य गायन झालें.**' असा मूळ बखरींत उल्लेख आहे.

पण '**व्यंकट नरशी कोण ?**' याबद्दल वाचकांस कोडें पडेल. ह्यास्तव काव्येइतिहास संग्रहकारांनीं त्याच्याखालीं व्यंकट नरशींच्या माहितीची टीप दिली आहे. ती काय ? तरः—

"**व्यंकट नरशी हा एक पुण्यांतील नामांकित गवय्या होता.** (!!!)"

विद्वत्तेची, माहितीची आणि शोधकबुद्धीची तिहींचिही धन्य आहे ! व्यकंटनरशी ही त्यावेळीं पुण्यांतील एक सुप्रसिद्ध नृत्यांगना होती. तिच्या संबंधाच्या मनोरंजक अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. ती दिसण्यामध्यें अगदींच कुरूप असे. पण नृत्य गायनांत ती इतकी निष्णात होती कीं, तिची सर कोणालाच येत नसे. असें असून हे विद्वान् मासिककार सांगतात कीं '**हा एक सुप्रसिद्ध गवय्या होता !**' म्हणजे 'व्यंकटनरशी' ही स्त्री कां पुरुष ह्याची सुद्धां त्यांना दाद नाहीं ! बरें; कांहीं व्यवहार तरी मनांत आणावयाचा होता ! बखरींत मूळ '**नृत्य गायन होतें**' असे दोन शब्द आहेत. तेव्हां गवय्ये लौक कधीं नाचत असतात काय ? याचा तरी कांहीं विचार ? त्याचा विचार करतो कोण ? आपणास जी खरोखर माहिती नाहीं, तिच्याबद्दल काहींतरी बात झोंकून देण्यापेक्षां कांहीं न बोललेलें बरें. त्यांत कांहीं कमीपणा नाहीं. व्यंकटनरशी कोण ? हें जर काव्येतिहासकारांना माहीत नव्हतें, तर आढ्यतेनें अशी खोटी नाटी वेडगळ

पणाची टीप देण्याचें कांहीं कारणच नव्हतें. ती दिली नसती म्हणून कांहीं पातक झालें नसतें ! किंवा कोणी वाचक ही व्यंकटनरशी कोण ? तें आम्हांस सांगा म्हणून त्यांच्या दारांत धरणें पारणें घेऊन बसले नव्हते ! मग हा रिकामा डौल कशाला ?

तात्पर्य, ही नाहीं ती उठाठेव करून व सर्वज्ञतेचा आव आणून ह्या विद्वान दुकलीनें रिकामें हासें मात्र करून घेतलें आहे ! असल्या लेखावर भरंवसा तरी कसा बसावा ? असो.

तात्पर्य, शिवाजी महाराजांच्या स्वराज्य मिळविण्याच्या बाबतींत ' गो ब्राह्मणांचें प्रतिपालन ' हाच मुख्य उद्देश होता. ते ब्राह्मणांस परम वंद्य समजत होते. आणि हल्लीं त्यांचेच ज्ञातीबांधव ब्राह्मण व ब्राह्मणेतर समाज स्थापन करून ब्राह्मणांचा छळ व अवहेलना करीत आहेत. त्याच्या योगानेंच चालू स्वराज्य आक्रमण करण्याच्या मार्गांत किती खो बसत आहे ही गोष्ट सर्वांच्या डोळ्यापुढें आहेच. असें असतां त्याच द्वेषाग्नींत आणखी ' वेणु धमन्या प्रज्वलय ! ' हा मंत्र म्हणून फुंकर घालण्यासारख्या व्यक्ति निर्माण व्हाव्यात हें आपल्या महाराष्ट्राचें खरोखरच दुर्भाग्य होय. इतकेंच सांगून आम्ही समर्थांच्या लीलेचा जो प्रधान विषय त्याच्याकडे वळतों.

# समर्थांचें सामर्थ्य
## किंवा
# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## पूर्वार्ध.
## भाग तिसरा.
### समर्थांची लीला—पहिलें तप.

साकी

गावीं संत चरित्रें हो । पावन परम पवित्रें हो ॥ ध्रु० ॥

—मोरोपंत—

अभंग.

ब्रम्हज्ञान नव्हे लेंकुराच्या गोष्टी । तेथें व्हावा पोटीं अनुभव ॥ १ ॥
दगडाहूनी जीव करावा कठीण । अंतरींचा शीण जाय तेव्हां ॥२॥
मेल्या मनुष्याची न धरीती आस । तैसा हो उदास संसारासी ॥३

—तुकाराम—

'न हि ज्ञानेन सदृशं पवित्र मिह्मुत्तमम्'—' जगामध्यें ज्ञानाइतकें श्रेष्ठ व पवित्र असें दुसरें कांहीं नाहीं' असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. आमच्या सर्व धर्मांतील सार, व तत्त्वज्ञानांतील उत्तम तत्त्वज्ञान ज्यांत भरलें आहे असा ग्रंथ एक श्रीमद्भगवद्गीताच होय. तेव्हां तिच्यांतील वचनें किती सत्य व अनुभवशीर असतील ह्याची साक्ष आमच्या

लोकांना तर काय, पण पाश्चात्यांसारख्या परकीयांना सुद्धां पूरोपूर पटलेली आहे. सर्व प्राणिमात्रांत मनुष्यालाच जें श्रेष्ठत्त्व प्राप्त झालें आहे, तें एका ज्ञानामुळेंच. हें ज्ञान मनुष्याला आहे; आणि विचारानें व अभ्यासानें त्याला तें पाहिजे तितकें वाढवितां येतें. हें ज्ञान इतर प्राण्यांत नाहीं, व तें त्यांस वाढवितांही येत नाहीं. इतर प्राण्यांहून मनुष्यमात्रांत जी काय अपूर्वता आहे ती हीच.

ज्ञानामध्येंही अनेक भेद आहेत. उपजत ज्ञान म्हणून एक मोठा चमत्कारिक व सूक्ष्म भेद आहे. तो इतर प्राण्यांत स्वयंसिद्धच असतो. उदाहरणार्थ पक्षी घरटीं बांधतात; कोळी जाळीं विणतात; पोपट मनुष्यासारखे बोलतात; रेशमी किडे रेशीम तयार करतात; बदकें पोहतात; हें सर्व उपजत ज्ञान् होय. हें ज्ञान मनुष्यमात्रांत सुद्धां नाहीं. पण तें वाढविण्याची इतर प्राण्यांच्या अंगीं शक्तीही नाहीं. विचारानें व अभ्यासानें संपादन करण्याचें जें ज्ञान तें एका मनुष्यासच आहे. त्याच्या योगानें तो इतर सर्व सामर्थ्यवान् प्राण्यांवर सुद्धां आपलें वर्चस्व मिरवितो. ह्या मनुष्याच्या ज्ञानामध्यें सुद्धां नानाविध प्रकार असून त्यांतही अनेक पायऱ्या आहेत. लिहिणें, वाचणें, चित्रें काढणें, यंत्रें तयार करणें, नवे नवे शोध लावणें, कथा कीर्तन करणें, शास्त्राभ्यास करणें, इत्यादि त्यांतही असंख्य भेद आहेत.

परंतु खरें ज्ञान तें हें नव्हे. आमच्यामध्यें प्राचीन काळीं महान् महान् तपोनिधि व ऋषिवर्य होऊन गेले. त्याप्रमाणेंच जे साधुसंत व तत्त्वज्ञानी आजपर्यंत होऊन गेले व आज विद्यमान आहेत, त्या सर्वांचें हेंच मत आहे. लेखन, वाचन, ग्रंथावलोकन, येणेंकरून ज्ञान प्राप्त होतें ही गोष्ट खरी आहे. परंतु तें कांहीं खरें व श्रेष्ठ ज्ञान नव्हे. श्रेष्ठ ज्ञान आहे तें ह्याच्याही पलीकडे आहे. तें कोणतें ? तर आत्मानात्म विचार हें. आपण कोण ? जीव म्हणजे काय ? शाश्वत वस्तु कोणती व अशाश्वत वस्तु कोणती ? ह्याचा विचार करणें ह्याचें नांव आत्मानात्म विचार. हेंच ज्ञान श्रेष्ठ होय. त्याच आत्मज्ञानांत परिपूर्णता प्राप्त होणें ह्याचें नांव ब्रह्मज्ञान. 'ब्रह्मज्ञान' हें सर्वांत उच्च प्रतीचें मानलें जातें. इतर सर्व ज्ञानें ह्याच्या खालचीं. आत्मज्ञानाचा काय, इतर ज्ञानांचा काय, सर्वांचा समावेश ह्यांतच होतो. अवांतर शास्त्रें किंवा ज्ञानें कितीही लोकोपयोगी असोत, कितीही आनंददायक असोत,

तीं सर्व ब्रह्मज्ञानाच्या खालीं! ब्रह्मज्ञानाच्या तोडीला एकही शास्त्र लागा-वयाचें नाहीं.

आपला हा हिंदुस्थान देश अत्यंत प्राचीन कालीं प्रत्येक शास्त्रांत अग्रे-सर होता ही गोष्ट सर्वसंमत आहे. पण त्यांत सुद्धां ब्रह्मज्ञानांत त्यानें आघाडी मारली होती. आपल्या देशांत जितके ब्रह्मवेत्ते होऊन गेले तितके अन्य देशांत कोठेंही झालेले ऐकिवांत नाहींत. किंबहुना ब्रह्मज्ञान हा विष-यच अन्यत्र कोठें आढळत नाहीं म्हटलें तरी चालेल. आमच्या देशांतील ऋषिवर्यांनीं ह्या ज्ञानाचा अभ्यास अगदीं शिखरास पोंचविला होता. हें ज्ञान मिळविण्याचा वर्गच निराळा होता. तेच ब्राह्मण होत. 'ब्रह्मजानाति ब्राह्मणः' असें म्हणतात ह्याचें कारण तेंच. परंतु सर्वच बाबतींत ज्याप्रमाणें आम्हांस अवनति प्राप्त झाली, त्याप्रमाणे ब्राह्मणांचेंही तेज कमी कमी होत गेलें. ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेणें हेंच काय तें जीवाचें कर्तव्य, व जन्माची सार्थ-कता. त्याच्या पुढें इतर किरकोळ ज्ञानें, व्यवहारज्ञानें, केवळ कःपदार्थ होत अशी त्यांची समजूत असे. साऱ्या मनुष्यांची धडपड काय ती सुखा-करितां व दुःखाकरतां. सुख पाहिजे आणि दुःख नको. ब्रह्मज्ञान झालें कीं, सुखदुःखें सारींच विलयास जातात. तेथें सुखाचीही पर्वा नसते, आणि दुःखाचीही पर्वा नसते. ब्रह्मज्ञान्याला सुखाची लालसा नाहीं आणि दुःखाचा वीट नाहीं!

धर्म, नीति, सदाचार, सुशीलता इत्यादि सारे सद्गुण जे जगाच्या कल्याणाला व आत्महिताला साधनीभूत म्हणून समजले जातात, ते सर्व ब्रह्मज्ञानांतच अंतर्भूत होतात. कारण तेथें स्वार्थाचा लवलेश नसतो. आणि स्वार्थ हेंच काय तें कलहाचें मूळ, पातकाचें आगर, व दुःखाचें बीज आहे. लढाया, हमरीतुमरी त्याच्याचकरतां; दिवाणी व फौजदारी कोर्टें त्याच्याचकरतां. खून, मारामाऱ्या, रक्तपात, कपट, ढोंग सर्व कांहीं एका स्वार्थाकरतां चालू आहे.

ब्रह्मज्ञान म्हणजे काय? हें सांगण्याचें काम सुद्धां सोपें नाहीं. मग तें प्राप्त करून घेण्याची गोष्ट कशाला विचारावी? त्याचा उहापोह करतांना मोठमोठे संत महंत भागले आहेत इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष वेदांनीं सुद्धां 'नेति नेति' म्हणून कानावर हात ठेवले आहेत! त्याची व्याख्या करा-

याला सामर्थ्य कोणाला आहे ? तथापि थोडक्यांत त्याच्या लक्षणाची कल्पना सांगतां येण्यासारखी आहे. ती ही कीं, सर्व सदाचरणाचें मूळ कोठें ? साधु संतांचें व ऋषी महर्षींचें ब्रीद कोणतें ? पुण्य पुण्य तें कशाला म्हणतात ? ह्याचा विचार केला तर त्यांत एकच गोष्ट मुख्य आहे. ती कोणती ? तर आपल्या सुखावर पाणी सोडावयाचें, आणि दुसऱ्यांना सुख लागेल ते सदा सर्वदा यत्न करावयाचे. सर्व धर्मांचें, नीतीचें, सदाचाराचें मूलतत्त्व जें काय तें हें एक. कथा–कीर्तनें, पुराणें–श्रुति, स्मृति तरी काय सांगतात ? हेंच. व्यासांनीं अठरा पुराणें रचून जें काय रहस्य सांगावयाचें तें दोनच वाक्यांत सांगितलें आहे. तें रहस्य हें:—

**अष्टादश पुराणांतु व्यासस्य वचन द्वयम् ।**
**परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडणम् ॥१॥**

" परोपकार करणें म्हणजे दुसऱ्यास सुख देणें हें पुण्य; आणि दुसऱ्यास दुःख देणें, पीडा देणें हें पातक होय. "

जगांत सत्कीर्ति मिळवावयाची असेल, परमेश्वराशीं स्वस्वरूप व्हावयाचें असेल, आपल्या जन्माचें सार्थक करावयाचें असेल, त्यानें हेंच व्रत पाळलें पाहिजे, व तशीच वागणूक ठेवली पाहिजे.

परंतु ही गोष्ट जगाच्या रहाटीच्या विरुद्ध आहे.जगांतील यच्चयावत् मनुष्यांचाच नव्हे तर इतर कोणत्याही प्राण्यांचा स्वभावधर्म पाहिला तर असाच दृष्टीस पडतो कीं, सुख मिळवावयाचें तें आपल्याला मिळवावयाचें. चांगला पदार्थ दृष्टीस पडला तर तो आपल्या घरीं असावा. दुसऱ्याच्या सुखदुःखाची कोणीच कधीं पर्वा करीत नाहीं. म्हणजे जगांतील कोणताही मनुष्य घेतला तरी तो स्वार्थीच असतो. मनुष्यामध्यें अगदीं बाल्य दशेपासून पाहिलें तरी त्यांत स्वार्थाशिवाय दुसरें काय असतें? कांहीं नाहीं. चांगला व मोठा आंबा पाहिला तरी तो मला हवा म्हणून मूल हट्ट धरून बसतें. थोर मनुष्यांची गोष्टही तीच. श्रीमंत आणि गरीब हा भेद तरी कशाचा ? स्वार्थाचाच. स्वार्थ नाहीं असा मनुष्य कोण ? ' संसार ' हा सारा स्वार्थाच्याच पायावर उभारलेला आहे. तेव्हां स्वार्थत्याग करा म्हणजे सारा संसारच सोडून द्या असा अर्थ. म्हणजे संसार आणि ' ब्रह्मज्ञान ' ह्यांची

स्थिति नेहेमीं व्युत्क्रमच असते. स्वार्थाचा आणि ब्रह्मज्ञानाचा नेहेमीं ३६ चा आंकडा! अर्थात् संसारांत पडेल त्याला ब्रह्मज्ञान नाहीं; आणि ब्रह्मज्ञानांत पडेल त्याला संसार नाहीं. असा हा उलटा रोजगार आहे. आणि मनुष्यांच्या सर्व सुखाचें आदिस्थान जें काय तो संसार आणि संसार म्हणजे स्वार्थ. 'मी' आणि 'माझें' ह्याचा जप! तो उपजल्यापासून मरेपर्यंत हाडीं खिळलेला. खायाला, जेवायला 'घृतकल्लया मधुकल्लया;' उंची उंची कपडे; नाना प्रकारचे खेळ; अंगावर दागदागिने; अशी छानछोकी करून सजतो तों लग्नाची तयारी; मग काय? जिवाचा कलिजा काय ती स्त्री; आपल्याला नसलें तरी चिंता नाहीं, परंतु तिला आधीं. ती मागेल तितकें थोडें. करंजा, लाडू, आनरसे, साखरपाऱ्याच्या वड्या, आंब्याच्या वड्या, जिलब्या, साखरभात अशी घरामध्यें चंगळ चालते. इतक्यांत मुलें होऊं लागतात. त्या मुलांचे लाड व कौतुक करतां करतां पुरे. मग इतक्या सर्वांना रहावयाला घर पाहिजे. तें झालें म्हणजे गाडी, घोडे चाकर माणसें. इतकी सिद्धता झाल्यावर ऐषआरामाला काय कमी? त्याला वाटूं लागतें, माझ्या सारखा राजा आहे कोण? मी करीन ती पूर्व दिशा! परंतु 'अंदरकी बात राम जाने!' कर्जाचा बुजबुजाट! मिशाला तूप लावून बाहेर पडावयाचें. घरांत 'नकार घंटा!'

मनुष्याला पहिल्या प्रथम असें वाटत असतें कीं, संसारासारखें सुख दुसरें कशांतच नाहीं. बायकामुलें, घरदार, शेतेंभातें सर्व कांहीं चैन आहे. परंतु तो निखालस भ्रम असतो. आमच्यांतील संत महंतांनीं त्यांतील सार कधींच ओळखून काढलें आहे. समर्थांनीं म्हटलें आहेः—

### "जगीं सर्व सूखी असा कोण आहे?"

जगामध्यें सर्वोपरी सुखी असा आहे कोण? अर्थात् कोणी नाहीं असा भाव. सुखाचें सर्वस्व काय तो संसार, अशा मोहांत पडून त्याचें जूं मानेवर घेतात, त्यांना पुढें लौकरच अनुभव येऊन चुकतो कीं, 'नको नको' ही संसाराची यातायात नको. परंतु मग उपयोग काय? माशाच्या तोंडांत गेलेला गळ जसा जातांना चटकर आंत जातो, परंतु तो जीव घेतल्यावांचून बाहेर मात्र पडावयाचा नाहीं. त्याप्रमाणेंच प्रापंचिकांची अवस्था होते. ते

प्रथमतः ऐहिक सौख्याच्या लालचीनें संसारांत पडतात. परंतु पुढें त्यांना पश्चात्ताप होतो. आणि संसारांतील सुख केवळ क्षणभंगुर आहे, 'सुख पाहतां जवा पाडे, दुःख पर्वता येवढें' ह्या तुकोबाच्या वाणीची बालंबाल खात्री पटते. परंतु 'बैल निघून गेल्यावर झोपा लावून घेण्यांत अर्थ कोणता?' असा प्रसंग प्राप्त होतो. एकदां संसाराची मगरमिठी पडल्यावर ती सुटणार कशी? बायकोला टाकावयाची, का मुलांना उपाशीं ठेवावयाचें? कोणतेंही करवत नाहीं. ह्याचेंच नांव 'माया!' आज काय बायकोला चोळी लुगडें; मुलांना आंगडें टोपडें; घराची मोड तोड; लग्न कार्यें. इत्यादि कर कर करीत असतो. देह झिजून हाडांचीं काडें होतात. तरी दागदागिन्यासाठीं साऱ्यांचा रुसवा हा आहेच! अशा रितीनें विचारा प्रापंचिक साऱ्या गोष्टींनीं जिगजिगून जातो. मोठा जहागिरदार असला तरी सुद्धां बायकोचा मागें लागलेला 'आणा' म्हणून कांहीं सुटत नाहीं.

ह्या संसाराच्या तापत्रयाचें वर्णन समर्थांनीं 'दासबोधा'मध्यें फारच सुरेख केलें आहे. तात्पर्य, मधाला लुब्ध होऊन माशी त्याला चिकटून बसते त्याप्रमाणेंच हा मनुष्यप्राणी संसारांत गुरफटून जातो; बद्ध होतो; जखडतो; त्यांतून त्याची सुटका होत नाहीं. लग्न करतांना मोठी हौस वाटते खरी; परंतु 'सवामणाची बेडी पायांत पडली' असें वृद्ध लोक त्यावेळीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

ऐहिक विषयाचा उपभोग घेणें ह्याचें नांव संसार. त्यांत स्वार्थाशिवाय दुसरें आहे काय? जो तो आपल्या पोळीवर तूप ओढतो. आपल्यापुढें वाढलेलें ताट दुसऱ्याला देण्याइतका उदार मनाचा कोण? आपण उपाशीं पडलों तरी बेहेत्तर पण आधीं दुसरा उपाशी असेल त्याला अन्न द्यावयाचें; आपण थंडीनें कुडकुडावें पण दुसऱ्यास वस्त्र द्यावें, अशी बुद्धि कोठें दृष्टीस पडते काय? आणि पडली तरी कितीशी? आणि ब्रह्मज्ञान ब्रह्मज्ञान तें हेंच कीं, आपली स्वतांची काळजी करावयाची नाहीं, परंतु दुसऱ्याची आधीं करावयाची. हें संसारी मनुष्याला घडावें कसें? आपल्या अंगावरचा भरजरीचा पोषाख दुसऱ्यास देऊन दुसऱ्याच्या लकतऱ्या कोणी आपण घेऊन बसेल काय? आपलें सोन्यासारखें घर दुसऱ्यास देऊन टाकून आपण कोणी

रस्त्यावर जाऊन पडेल काय ? असें करण्याला मनाचा केवढा धडा पाहिजे ? येवढा मनाचा धडा करणें ह्याचेंच नांव ' ब्रह्मज्ञान. '

हरिदास आणि पुराणिक यांची ' माया ' आणि ' ब्रह्म ' ही काथ्याकूट ऐकतां ऐकतां कान किटून जातात. परंतु उपयोग काय ? पुराणिकबुवा आणि कथेकरी बुवा हे स्वतःच संसारांत गटकळ्या खात असतात आणि इतरांस संसार हा निस्सार असल्याचें डोळ्यांत आंसवें आणून सांगतात. त्याचा उपयोग काय ? तुकोबांनीं म्हटलें आहेः—

**माप आणि गोणी। तुका म्हणे रितीं दोन्ही ॥१॥**

तशीच फलश्रुति होते. विषयाची गोडी सुटत नाहीं; संसाराची व मायापाशाची बेडी तुटत नाहीं; आणि हृदयांत वतनदार होऊन बसलेला स्वार्थ कांहीं हालत नाहीं. ब्रह्मज्ञान पाहिजे असेल तर विषयांचा वीट आला पाहिजे; संसाराची आसक्ति दूर झाली पाहिजे; आणि हृदयांत स्वार्थाचा लेशही राहतां उपयोग नाहीं. अर्थात् हें सर्व जगाच्या रहाटीच्या अगदीं विरुद्ध आहे. तेव्हां ब्रह्मज्ञान मिळवावयाचें असेल तर त्याला मनाची चांगलीच तयारी पाहिजे; तें चांगलेंच निर्ढावलेलें पाहिजे. हा सारा अनुभव घेऊनच तुकाराममहाराज शिरोभागीं दिलेल्या अभंगांत सांगतातः—

" ब्रह्मज्ञान, ब्रह्मज्ञान म्हणून जो उठतो तो उपदेश करीत सुटतो, परंतु ब्रह्मज्ञान म्हणजे कांहीं पोरचेष्टा नव्हेत. त्यांतील खरें तत्त्व काय आहे तें अंतःकरणांत बिंबलें पाहिजे. हृदयांत असलेली माया ममता ही चट सारी सोडून देऊन आपलें हृदय दगडापेक्षांही कठीण केलें पाहिजे. तरच ह्या संसारदुःखांतून मुक्तता होईल. त्याशिवाय मनाचें समाधान होण्याला दुसरा कांहीं मार्ग नाहीं. मेलेलें मनुष्य कितीही आवडीचें असो; प्रेमाचें असो; मायेचें असो; त्याची जशी कोणी मग आशा धरीत नाहीं; त्याच्या जवळ सुद्धां कोणास जावेंसें वाटत नाहीं; त्याप्रमाणेंच संसाराचा वीट आला पाहिजे. तरच ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होईल. त्याशिवाय रिकामी तोंडानें बडबड करणें व्यर्थ होय. 'नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें' अशांतलाच सारा प्रकार.

इतकें ब्रम्हज्ञान जरी गहन आहे, दुस्तर आहे, तरी सुद्धां त्याला हस्तगत करणारे लोकोत्तर पुरुष पृथ्वीवर निर्माण होतातच. ते ह्या क्षणभंगुर विषयाला व दिखाऊ संसारसुखाला लाथ मारतात. आणि ईश्वराच्या सिंहासनाला जाऊन भिडतात; नव्हे त्याशीं तद्रूप होतात. आतां असे लोक विरळाच दृष्टीस पडतात हें तर उघडच आहे. कारणः—

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।**
**साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥१॥**

" पर्वत हे काय ? जिकडे तिकडे आहेतच; पण प्रत्येक पर्वतावर कांहीं हिरेमाणकें सांपडत नाहींत. प्रत्येक संस्थानिकाकडे एक दोन तरी हत्ती असतातच; पण त्या प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळांत कांहीं मोती मिळत नाहीं. त्याप्रमाणेंच साधु—ब्रम्हज्ञानी पुरुष कांहीं जिकडे तिकडे आढळत नाहींत, तेही विरळाच दृष्टीस पडतात. उघडच आहे. प्रत्येक शेतांत कांहीं चंदनाचीं झाडें उगवत नसतात. "

इतकी जरी ह्यांची दुर्मिळता आहे, तरी ते कोठें ना कोठें तरी अवतार घेतातच. असे ब्रम्हज्ञानी पुरुष, संत, महंत व आचार्य अनेक होऊन गेले. त्यांनीं आपल्या सुखाची क्षिती बाळगली नाहीं. संसारावर पाणी सोडलें. स्वार्थाचा विटाळही होऊं न देतां परोपकारार्थच आपला सारा देह झिजविला. त्यांनीं आपलें अंतःकरण कठोर केलें होतें. आपल्या देहाची त्यांना शुद्ध नव्हती. मनाला त्यांनीं आपल्या कबजांत ठेवलें होतें. त्यांनीं इंद्रियांचे लाड म्हणून कधींच पुरविले नाहींत. त्यांचा निश्चय केवळ अपूर्व होता. त्यांच्या लीला केवळ कानांनीं ऐकल्या तरी सुद्धां जीव थक्क होऊन जातो. त्यांच्या स्मृतीनेंही आपल्या मनाला उपरति होते.

आद्य श्रीमच्छंकराचार्यांनीं मातोश्रीकडून लग्न न करण्याचें वचन घेऊन आठव्या वर्षीं संन्यास घेतला. पण गौतम बुद्धाचें धारिष्ट फारच लोकोत्तर ! तो स्वतः राजा होता; तरुण होता; स्त्री केवळ लावण्याची पुतळी होती; आणि नव्याच झालेल्या पुत्ररत्नाचा मोहपाश फार बळकट होता. तरी त्यानें आपलें मन घट्ट केलें. सर्व सुखावर पाणी सोडलें. आपला रत्नखचित पोषाख मोतद्दारास दिला आणि त्याचीं फाटकीं

तुटकीं वस्त्रें आंगावर घेऊन त्यानें आनंदानें अरण्याची वाट धरली ! असे ' लोखंडाचे चणे ' खाल्ले तेव्हां तो ब्रम्हपदावर नाचूं लागला !

असे जे ब्रह्मज्ञानी असतात तेच सर्व समर्थ होत. असे जे कोणी समर्थ आजपर्यंत होऊन गेले, त्यांतच श्रीसमर्थ रामदासस्वामी ह्यांची गणना आहे. कारण तेही परब्रह्मवेत्ते होते. त्यांनींही प्रथमपासूनच संसाराचा त्याग केला होता, व सर्व आयुष्य लोकोपदेशांत व परोपकारांत खर्च केलें होतें. आणखी आपले स्वराज्य स्थापनकर्ते छत्रपतिशिवाजीमहाराज ह्यांचे ते गुरु होते. छत्रपतींनीं त्यांस आपलें सारें स्वराज्य अर्पण केलें होतें. त्यांस सर्व लोक ' समर्थ ' असें म्हणत. त्यांचें चरित्र व लीला फार अगाध आहे; अगम्य आहे. कोणत्याही साधुसंताचें चरित्र म्हटलें कीं तें गोडच असतें. आणि त्यांतून समर्थ रामदास स्वामींच्या लीला तर इतक्या अद्भुत व रसभरित आहेत कीं, त्या आबालवृद्धांसही आनंदानें डुलावयास लावतात आणि त्या पुनः पुन्हा वाचाव्याशा व ऐकाव्याशा वाटतात. त्या कितीही ऐकल्या तरी मनाची तृप्ति होत नाहीं, अशी त्यांची अपूर्वता आहे. चरित्र आणि लीला ह्याचा अर्थ भिन्न भिन्न आहे. चरित्र म्हणजे सामान्य मनुष्याचा जीवनवृत्तांत येवढाच अर्थ निष्पन्न होतो. परंतु लीला ह्या शब्दांत त्याहून विशेष अर्थ आहे. म्हणजे ज्या गोष्टी व कृति सामान्य मनुष्यांमध्यें आढळून येत नाहींत, अशा अद्भुत कृति ज्यांत भरलेल्या असतात त्यांना लीला असें म्हणतात. अर्थात् सामान्य मनुष्याचें चरित्र म्हणजे कांहीं लीला नव्हेत. भगवंताच्या लीला वर्णन करितात. ह्याचें कारण त्याच्या कृति तशाच अद्भुत असतात. त्याप्रमाणेंच साधुसंतांच्या चरित्रांसही लीलाच म्हणतात. कारण त्यांत असाच अद्भुत रस भरलेला असतो. त्यांच्या कृतीही अशाच असामान्य असतात. ह्याचा स्पष्टार्थ इतकाच कीं, जे अवतारी पुरुष असतात त्यांच्याच चरित्राला लीला असें म्हण्याचा प्रघात आहे. तेव्हां त्यांचें महात्म्यही तसेंच मनाला आल्हादकारक असणार हें उघड आहे. अशा त्या समर्थांच्या पुण्यपावन लीलेला आतां सुरुवात करूं.

ही समर्थांची लीला वर्णन करावयास मूळ आधार पूर्वीं सांगितलेल्या श्रीहनुमान् स्वामीच्या बखरीचा आहे, हें तर उघडच आहे. पण त्या

शिवाय आतां समर्थांच्या चरित्रा संबंधानें दुसरेंही अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील जो अंश ग्राह्य असा वाटला, तो घेतलाच आहे. परंतु आम्हालाच नव्हे, तर कोणत्याही समर्थांचें चरित्र लिहिणारास सर्वांत आजकाल जय्यत सामुग्री मिळण्याचें ठिकाण म्हटलें म्हणजे धुळे येथील रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव ह्यांचें होय. ह्या भक्तिमान्, वाङ्मयभोक्त्यांनीं 'श्रीआत्माराम' नांवाचा अगदीं स्वतंत्र असा स्वतःचा छापखाना घालून 'रामदास आणि रामदासी' हें मासिक काढण्याचें काम आज कैक वर्षें सुरू केलें आहे. त्यांत ते समर्थांचें व त्यांच्या शिष्य शाखेचे त्या त्या ठिकाणीं स्वतः जाऊन व शोधन करून जुने जुने अप्रासिद्ध ग्रंथ, कागद-पत्र, माहिती वगैरे जमवून ती सुंदर स्वरूपांत प्रसिद्ध करीत आहेत. ह्या त्यांच्या सेवेला, त्यांच्या परिश्रमाला, व त्यांच्या एकनिष्ठ भक्तीला खरो-खर उपमाच नाहीं. ते समर्थांच्या लीलेमध्यें व भक्तीमध्यें अगदीं समरस होऊन गेले आहेत. त्यांचे ग्रंथ आजपर्यंत इतके प्रसिद्ध झाले आहेत कीं, ते सांगावयास गेले तर एखाद्यास खरें सुद्धां वाटावयाचें नाहीं. अठरा ग्रंथ तर आज आमच्या संग्रही आहेत. ह्याशिवाय त्यांचे प्रसिद्ध झालले ग्रंथ कितीतरी आहेत. आणखी त्यांचें काम सारखें पुढें चालूंच आहे. तेव्हां या पुढें समर्थांचें चरित्र कोणीही लिहूं लागला तरी त्याला ह्या महानुभाव शंकरराव देवांच्या कृतीचा आश्रय हा असावयाचाच असावयाचा. हें कोणी आज निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

आणखी हे रा. देव जी इतकी सेवा करीत आहेत, ती आपल्या द्रव्याला व शरीराला झीज सोसून करीत आहेत. म्हणजे त्यांनीं आपला सारा जन्मच समर्थ सेवेस खर्ची घातला आहे असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां त्यांनीं अशा ह्या अखिल महाराष्ट्रावर केलेल्या उपकाराबद्दल त्यांचे जितके धन्यवाद गावेत तितके थोडेच होणार.

सदरहू देवांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतून समर्थांच्या संबंधानें इतकी बारीक सारीक माहिती उपलब्ध झाली आहे कीं, त्यांतून किती घ्यावी आणि किती न घ्यावी असें होऊन जातें. आणखी त्यापैकीं आवश्यक कोणती ? व लोकांस प्रिय होण्यासारखी किती ह्याची निवडा निवड कर-ण्याचें कामही मोठें बिकट आहे. ह्यास्तव त्यांतील जो कांहीं थोडासा

भाग अत्यावश्यक वाटला तेवढ्याचाच आम्ही उपयोग करून घेणार आहों.

परंतु हनुमंत स्वामींच्या अस्सल बखरीशिवायही ह्या समर्थांच्या चरित्रास किंवा लीलावर्णनास दुसराही एक आधार आहे. आणि तो बखरीहूनही कांकणभर अधिकच आहे म्हटलें तरी चालेल. तो कोणता ? तर **गिरिधर** स्वामीकृत '**श्रीसमर्थप्रताप**' ह्या नांवाचा ओंवीबद्ध ग्रंथ हा होय. समर्थांच्या शिष्यिणीपैकीं **वेणूबाई** म्हणून एक होत्या हें सर्वविश्रुतच आहे. त्यांच्या शिष्यिणी **बाइआबाई**. आणि त्या बाइआबाईचे शिष्य हे **गिरिधर स्वामी** होत. ह्या समर्थप्रताप ग्रंथाचे २१ समास असून ओंव्या १३३२ आहेत ! हे गिरिधर स्वामी श्रीसमर्थांच्या हयातींत असून त्यांना समर्थांचें दर्शन झालें होतें, इतकेंच नव्हे, तर त्यांच्यावर समर्थांची कृपा असल्यामुळें ते समर्थांच्या सहवासांत बरेच दिवस काढीत असत. ह्याचा त्यांनीं सदर ग्रंथांत उल्लेख केला आहे. आणि समर्थांची दिनचर्या व रूपरेखा सुद्धां त्यांनीं त्यांत दिली आहे. तेव्हां एका दृष्टीनें हा 'श्रीसमर्थप्रताप' ग्रंथ बखरीहूनही अधिक महत्त्वाचा आहे. तथापि त्यांत कालानुक्रम, कथासंगति, हीं असावीं तशीं पद्धतशीर नाहींत. आणि कित्येक बाबींचा इतका पाल्हाळ व विस्तार आहे कीं, वाचकांना तीं पानें सोडूनच देण्याचा प्रसंग येतो. म्हणजे हा ग्रंथ निखालस जुन्या काळांतल्या धर्तीवर असल्यामुळें, चरित्रकथनांत त्याचा बखरीइतका उपयोग होणें शक्य नाहीं. तथापि त्यांतलि चरित्र ह्या दृष्टीनें जेवढा भाग ग्राह्य आहे, तेवढा अगदीं थोडा असला तरी सुद्धां तो अत्यंत आदरणीय* आहे, ह्यांत शंका नाहीं. ह्याशिवाय इतरही लहान मोठ्यां ग्रंथांचा व बखरींचा आम्हांस थोड्या

* गिरधर स्वामींनीं ह्या समर्थप्रतापा शिवाय अनेक मोठमोठाले ५०।६० पद्यात्मक ग्रंथ तयार केलेले आहेत. रामायणें तर मोरोपंतांप्रमाणेंच अनेक प्रकारचीं आहेत. त्यांत एक केवळ लोकोत्तर ग्रंथ आहे. तेवढ्याचाच येथें उल्लेख करतों. तो ग्रंथ म्हणजे 'अद्भनारायण' हा होय. ह्या ग्रंथांत एक मोठी अपूर्वता अशी आहे कीं, राम १४ वर्षे वनवासांत होते, तेथील प्रत्येक वर्षाची त्यांची दिनचर्या दिली आहे. येवढेंच नव्हे, तर प्रत्येक तिथीला व प्रत्येक वाराला काय काय गोष्टी घडल्या ह्याचा सुद्धां वृत्तांत

फार अंशानें उपयोग हा झालेलाच आहे. त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोंत.

रा.देव ह्यांनीं हे समर्थ सांप्रदायांचे जुने अप्रसिद्ध ग्रंथ व माहिती प्रसिद्ध करतांना असें म्हटलें आहे कीं, हें समर्थांचें साद्यंत, त्यांच्या हेतू प्रमाणें यच्चयावत् माहितीनें परिपूर्ण असें चरित्र कधीं तयार होईल व तें कोण करील तें खरें! हें त्यांचें म्हणणें एका अर्थी खरेंच आहे. परंतु आम्ही त्यावर इतकेंच म्हणतों कीं, इतकी अगदीं बारीक सारीक खडान् खडा माहिती एकत्र करून तिचा ह्या नव्या दमाच्या संशोधकरूपीं खलांत अगदीं वस्त्रगाळ खल करून तें काम लोकमान्य होण्यास मनुष्याचा सारा एक जन्महीं पुरेल असें वाटत नाहीं. व येवढ्या मोठ्या व विस्तृत ग्रंथांत हल्लींच्या उपलब्ध बखरीहून फारसें अधिक स्वारस्य उत्पन्न होईल असेंही आमची मनोदेवता आम्हांस सांगत नाहीं. आणि तों पर्यंत जिज्ञासूंना तिष्ठत ठेवणें आम्हांस उक्त दिसत नाहीं. ती समर्थांची लीला आहे; गोड आहे; आल्हाद जनक आहे; कोणत्याही जिवाला पवित्र करणारी आहे. ती पुनःपुन्हा कितीदाही कानावर पडो, तिचा कोणास कधीं कंटाळा येणारा नव्हे.

**कथा श्रवणचत्त्वरीं जरि पुनःपुन्हा ये रते ।**
**महारसिक तद्रसीं विटति ऐकतां येर ते ॥**

---

दिला आहे! ह्यावरून प्राचीन लोकांची उद्योगशीलता किती प्रबळ होती, व भक्ति किती निस्सीम होती, ह्या गोष्टी सहज निदर्शनास येतात.

शके १६५१ मध्यें गिरिधर स्वामी समाधिस्थ झाले. त्यांचा मठ बिडास असून तेथेंच त्यांची समाधि आहे. गिरिधरस्वामी गृहस्थाश्रमी होते, तरी त्यांस संतान नव्हतें. म्हणून तेथील मठाचा अधिकार त्यांचे बंधु भीमस्वामी ह्यांच्या वंशाकडे चालत आहे. बीड येथें गिरिधरस्वामींच्या समाधीवर खालचा श्लोक कोरलेला आहे:—

**श्रीमत्सन्नृप शालिवाहनशके चंद्रेषु भूपोन्मिते**
**सौम्ये माधव शुक्ल शुक्र दिवसेऽष्टम्यां प्रभाते विभुः ।**
**श्रीरामानुचराग्र गो गिरिधर स्त्वासोत्समाधि स्थितो**
**यस्तस्यानुज भीम निर्मित मिदं रम्यं तदीयं स्थलम् ॥१॥**

ह्या मयूरपंतांच्या उक्ती प्रमाणें ती कोणास केव्हांही प्रियच होणार. कारण त्या पुण्यपावन लीलेच्या योगानें श्रोत्यांचीं व वक्त्यांचीं अंतःकरणें केव्हांही पुनीतच होणार आहेत. अशी त्याची फलश्रुति आहे. ह्यास्तवः—

वैराग्ये कृतयानतीव जगतां तादृक् प्रवृत्त्यैवयः ।
कान्तारान्तर संचरैक निरतौ नीताःकियद्वासराः ॥
पश्चाल्लोकदयापरेणाहि पुरग्रामाय संसेविताः ।
तस्मै सद्गुरवेऽति सन्तु नतयः श्री रामदासाय मे ॥१॥*

ह्या वामनपंडितांच्या उक्तीनें त्या श्रीसमर्थ रामदासस्वामींस शतशः नमस्कार करून व त्यांच्याच वरप्रसादाची याचना करून पुढील कार्यास लागतों.

## वंशपरंपरा.

कालमन्वंतराप्रमाणें हल्लीं जीं जीं कांहीं स्थित्यंतरें झालेलीं दृष्टीस पडतात, त्यांत एक विशेष प्रकार आढळून येतो. तो हा कीं, आलीकडचा कोणताही पुरुष जो उदयास येतो, तो आपल्या स्वतःच्याच उद्योगानें व स्वतःच्याच गुणावर उदयास येतो. त्याच्या वंशपरंपरेच्या गुणांत व त्याच्या अंगच्या गुणांत कांहींच मेळ राहत नाहीं. पूर्वजांचे गुण एक तऱ्हेचे असतात, आणि ह्याचा स्वतःचा गुण त्याच्याहून अगदींच भिन्न असतो. बापजादे असतात सोनार किंवा तांबट आणि मुलगा होतो पोष्ट इनस्पे-

---

* "परमावधीचा जसा निवृत्ती मार्ग दाखवून दिला, तसाच प्रवृत्तिमार्गही प्रतिपादान केला. हिमालया सारख्या निर्जन प्रदेशांत, घोर अरण्यांत व रानावनांत ज्यानें वर्षांच्या वर्षे काढून घोर तपश्चर्या केली; देह झिजाविला. आणि मागाहून अखिल महाराष्ट्रीयांसाठीं पोटांत भडभडून ज्यानें खेड्यापाड्यांत व जनसांसर्गांत वस्ती केली. त्या श्रीमत्सद्गुरु समर्थ रामदास स्वामींस सदासर्वदा नमस्कार असो."

क्टर ! बाप पळी, पंचपात्री, दर्भ, समिधा घेऊन भिक्षुकी करतो, आणि मुलगा इंग्रजी शिकून मोठा न्यायाधीश किंवा ब्यारिष्टर बनतो ! कोणाचा बाप कुळकरणी असतो, आणि मुलगा होतो नामांकित चितारी ! कोणाचा बाप लक्षाधीश गलबतावरचा व्यापारी असतो; आणि मुलाचें पहावें तों पुण्यांत बुधवारामध्यें शिंप्याचें दुकान ! बाप आचारी, तर मुलगा शिरस्तेदार ! सोळा वर्षांचा पोऱ्या पहावा तों घांट वाजविणारा पुजारी ! आणि विसाव्यांवर्षीं पहावें तो ड्रायव्हर बनून बसला मोटारीवर ! असा हा विचित्र प्रकार दृष्टीस पडतो. परंतु प्राचीनकालची स्थिति फार निराळी होती. आधीं बहुतेक लोकांत—विशेषेंकरून ब्राह्मणांत—ईश्वरभक्ति,ब्रह्मज्ञान, वैराग्य; हीं वंशपरंपरेनेंच चालत असत. बहुतेक लोकांचें लक्ष ऐहिक विषयांपेक्षां पारमार्थिक विषयाकडे फार असे. आणि त्याचीच वृद्धि होऊन त्याच गुणाच्या विकासानें परिपूर्ण असा पुरुष त्यांच्या वंशांत उदयास येत असे. रघुवीर श्रीरामचंद्रांचीच वंशपरंपरा पहाना ? रघूपासून दिलीपापासून त्यांचे सारे पूर्वज धनुर्धारी व पराक्रमी होते. दशरथ राजा 'शब्दवेधी' म्हणून सुप्रसिद्धच होता. त्याचाच पुत्र दाशरथी रामचंद्र. तो येवढा जगद्विख्यात पराक्रमी निपजला यांत आश्चर्य नाहीं. कारण क्षात्रगुण हा त्याचा वंशपरंपरागत चालत आलेला होता.

तुकाराम महाराजांचे पूर्वजही असेच पांडुरंगाचे भक्त व वारकरी होते. तोच गुण तुकाराम महाराजांमध्यें परिपूर्ण स्वरूपानें विकास पावला. अशीच गोष्ट समर्थांच्या पूर्वजांची व बंधूंची आहे. मग समर्थांची लीला अश्रुतपूर्व असेल त्यांत नवल तें काय ? ज्या वृक्षाच्या पक्व अमृतफलाचा अपूर्व रसास्वाद चाखावयास मिळतो, तो आम्रवृक्ष तरी कसला असावा, हें जाणण्याची मनुष्यमात्रास साहजीक जिज्ञासा उत्पन्न होते. ती जर अनायासें तृप्त होण्याचा योग आला, तर तो व्यर्थ कां घालवावा ? घालवूं नये. ही समर्थांच्या पूर्वजांची माहिती समर्थांच्याच कृपेनें बरीच उपलब्ध आहे. त्यांतलि सार तेवढें आपण ग्रहण करूं.

आपल्या लोकांमध्यें ह्यासंबंधानें आणखी एक समज अगदीं पूर्वापार चालत आलेला आहे.तो हा कीं, असे जे कोणी अवतारी पुरुष जन्मास येतात, ते पुरुष अमुक कालीं, अमुक ठिकाणीं जन्मास येणार असें प्राचीन कालच्या ग्रंथांतरीं

पूर्वींच कथन केलेलें असतें. ' भविष्यपुराण ' म्हणून पुढील भवितव्यतेचा स्वतंत्रच एक ग्रंथ आहे. त्यांत पुढें अवतारी पुरुष कोण कोण कोठें कोठें होणार ह्याचें कथन केलेलें आढळतें. दशावतार कशाकरितां व कोठें कोठें होणार हेंही पुराणांतरीं कथन केलेलें आहे. रामायणाचा ग्रंथ तर श्रीरामचंद्रांच्या जन्माच्या पूर्वींच वाल्मीकऋषींनें लिहून तयार केला अशी आख्यायिका आजपर्यंत सर्वतोमुखीं चालत आली आहे. कोणत्याही अवतारी पुरुषाच्या संबंधानें हाच समज सर्वत्र रूढ होता. त्या अन्वयें श्रीसमर्थ रामदास हेही अवतारी पुरुष असून ते मारुतीच्या अंशेंकरून जन्मास येतील असें पूर्वींच भविष्य केलेलें होतें. ह्या मारुतीच्या अवतारांची भविष्योत्तर पुराणांतील परंपरा बखरकारांनीं येणें प्रमाणें दिली आहे:—

**कृतेतु मारुताख्यश्च, त्रेतायां पवनात्मजः।**
**द्वापारे भीम संज्ञश्च, रामदासः कलौयुगे ॥१॥**

" कृतयुगामध्यें मारुति ह्या नामेंकरून अवतार होईल. त्रेता युगांत ' पवनात्मज ' या नामेंकरून तोच अवतार पुन्हां होईल. द्वापार युगांत त्याच अवतारी पुरुषाला भीम असें नांव प्राप्त होईल व कलियुगामध्यें तो पुरुष रामदास ह्या नामेंकरून अवतीर्ण होईल. "

ह्या भविष्याप्रमाणें रामदासस्वामी हे मारुतीचे अवतार असल्याबद्दल लोकांत दृढतर समज होता. व त्यांची लीला पाहिली तर तें खरेंही असल्याचें प्रत्ययास येत होतें. त्यांच्या अगदीं जन्मदिवसापासून–बाल्यदशेपासून तों समाधीकालापर्यंत त्यांच्या लीलेंत कांहींना कांहींतरी मारुतीच्या कृतीचें साम्य हें दृष्टीस पडल्यावांचून राहत नाहीं.

पुण्यपुरुषाची सद्दी सारीच कांहीं अपूर्व असते. आपल्या वंशाचा किंवा पिढ्यांचा इतिहास जाणण्याची आपल्याला जिज्ञासा उत्पन्न झाली व त्या विषयीं आपण शोध करूं लागलों तर आजोबापर्यंत जेमतेम माहिती मिळते; पुढें कांहीं नाहीं. ठाव ना ठिकाण ! हाच प्रकार जिकडे तिकडे दृष्टीस पडतो.[1] हें सामान्य लोकांचें तर असोच; पण राजेरजवाड्यांचा तरी पूर्वेति-

---

१ ब्राह्मणांची वंशावळ कायम राहण्याची सनद म्हणजे ' ब्रह्मयज्ञ '. त्याला भागीरथीचें शुद्धोदक न मिळाल्यामुळें त्याची यमुनेच्या काळ्या-

हास घड सांपडतो काय ? फार तर शें दोनशें वर्षांची उडत उडत माहिती मिळाली तर मोठें नशीब ! आणि ती माहिती गोळा करून जुळवाजुळव करण्याला कोण यातायात ! समर्थांचा वंश भवद्भक्तांचा खरा; पण कांहीं राजेरजवाड्यापैकीं नव्हे. असें असतांही त्यांच्या पूर्वजांची माहिती शालीवाहन शके ८८४ दुदुंभी नाम संवत्सरापासून आजपर्यंत अगदीं प्रमाणसूद मिळते ही किती अद्भुत गोष्ट आहे ! शके ८८४ पासून आजपर्यंत म्हणजे शके १८४६ पर्यंत जवळ जवळ १००० वर्षांतील पिढ्या आज अगदीं बिनचूक मोजावयास मिळाव्यात व त्यांच्या कुलवृत्तींचा खरा खरा इतिहास आमच्या हातीं लागावा, ही पुण्याई तरी काय सामान्य !

ह्या पिढीपासून समर्थांच्या जन्मापर्यंत किती पिढ्या झाल्या व त्यांची वृत्ति कशी होती ह्याचें पर्यालोचन करणें हाच त्यांच्या पूर्वजांचा वृत्तांत होय. शके ८८४ म्हणजे इ. स. ९६२ येतात. त्या कालीं समर्थांच्या वंशाचे मूळ पुरुष कृष्णाजीपंत हे हयात होते. तेथपासून त्यांचा कुलवृत्तांत सांपडतो. यासाठीं ओघानुसार त्यावेळची आपल्या राष्ट्राची स्थिति कशी होती हेंही थोडक्यांत पाहिलें पाहिजे. ह्या कालांत आपल्या देशांत पूर्वकालीन क्षत्रिय राजे नष्ट होऊन मुसलमानांचा चांगलाच शिरकाव झालेला होता. शके ५१२ मध्यें दिल्लीस पिठोर वंशाचे राजे राज्य करीत असतां गिजनीच्या महंमदानें त्यांचा पराभव करून मुसलमान बादशाही सुरू केली. त्या वेळेस दक्षिणहिंदुस्थानांत प्रबळ राष्ट्र असें एकच राहिलें होतें. ह्या राजाची राजधानी 'किष्किंधा*'. ह्यासच 'विजयानगर' किंवा 'विद्यानगर' असें म्हणत असत. ह्या राजाचें नांव 'रामराजा' असें होतें. ह्याचें राज्य नर्मदेच्या दक्षिणेपासून रामेश्वरापर्यंत पसरलेलें होतें. मोडी लिपीचा उत्पादक प्रसिद्ध हेमाडपंत तो ह्याचा प्रधान.

---

पाण्यावर कधींच रवानगी झाली आहे ! हल्लींच्या मुलांना चार्लसाच्या पन्नास पिढ्या सांगतां येतील. पण आपल्या सख्ख्या आजोबाचें व पणजोबाचें कांहीं नांवसुद्धां सांगतां येणार नाहीं !

* सदर्न मराठा रेल्वेनें हुबळीहून बंगळुरास जातांना 'हास्पेट' म्हणून जें स्टेशन लागतें, त्या ठिकाणींच पूर्वीं किष्किंधा होती असें म्हणतात. व तेथें अद्यापही जुनी अनेक देवालयें वगैरे दृष्टीस पडतात.

**तेथ यदुवंश विलास । जो सकल कळा निवास ॥**
**न्यायाते पोशी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥ १८०५ ॥**

ज्ञा. अ. १८

हें जें ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत वर्णन केलें आहे, तो रामराजा हाच होय. ह्याच्या कारकीर्दींतच ज्ञानेश्वरांनीं आपला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पुरा केला. ह्या राजाच्या कारकीर्दींत विद्याकला ह्यांचा प्रसार पुष्कळच झाला होता. श्रीज्ञानेश्वर, नामदेव, गोरा कुंभार, सांवता माळी, भानुदास, विसोबा खेचर इत्यादि महान् महान् साधु ह्याच राजाच्या कारकीर्दींत उदयास आले. रामराजा साधुसंतांचा फार चाहता होता. त्याला परमार्थाची मनस्वी गोडी असे. तो ह्या साधुसंतांना मोठ्या आवडीनें बोलावून आणून त्यांच्याशीं परमार्थपर भाषणें करीत असे. त्याच्या दरबारीं कथा–कीर्तनें वारंवार होत. हा राजा एकवेळ आपला प्रधान हेमाडपंत ह्यास घेऊन पंढरपुरास गेला होता. त्यानें पांडुरंगास आपल्या राजधानींत म्हणजे विद्यानगरास नेऊन तेथें त्याची स्थापना केली व ती मूर्ति पुढें भानुदासांनीं परत आणली इत्यादि कथा ‘ भक्तविजयां ’ त सांगितलेली आहे.

असें हें रामराज्य चालत असतां *अल्लाउद्दीन खिलजीनें दक्षिणेंत शिरून दौलताबाद शहर घेतलें आणि मोठी धुमाळी मांडली. त्यांत विजययानगरचें राज्यही रसातळास गेलें. दिल्लीचा बादशहा व रामराजा ह्यांच्या नेहेमींच्या झगड्यांत दौलताबादप्रांत पूर्वींच ओसाड पडलेला होता. त्यांत मुळींच वस्ती नव्हती. तेव्हां अल्लाउद्दीनानें ती पडीत जमीन लागवडीस आणण्याची खटपट सुरू केली. त्यासाठीं ‘ जो कोणी ग्रामाची वसाहात व जमिनीची लागवड करील, त्यास तेथील वृत्ति द्यावयाची ’ असा ठराव केला.

---

* गुजराथेंतील राजा कर्णराय याचा पराभव करून त्याला देशोधडीला लावून त्याची राणी कमलदेवी व मुलगी देवलदेवी ह्यास ह्यानें धरून आणून कमलदेवीस आपली पट्टराणी केलें आणि देवलदेवीचें आपल्या मुलाशीं लग्न लावलें ! राणा भीमसिंगाची रूपवती राणी पद्मिनी हिचें रूप आरशांत पाहून बेहोष होणारा, व तिच्यासाठीं चितोडावर हल्ला करून अखेर तिची राखरांगोळी झालेली पाहाणारा दुर्दैवी बादशहा हाच !

अशा वेळीं समर्थांचे मूळपुरुष कृष्णाजीपंत ह्या नांवाचे होते. ते मोंगलाईंत बेदर प्रांतीं राहत असत. त्यांचें गोत्र जमदग्नि, सूत्र आश्वलायन, उपनाम ठोसर असें होतें. दुष्काळ व राज्यक्रांति अशा दुहेरी आपत्ति येऊन कोसळल्यामुळें त्या प्रांतांतील बरेच गृहस्थ श्रीगंगातीरास ( म्हणजे गोदावरीच्या कांठीं ) येऊन वस्ती करून राहूं लागले. त्यांत कृष्णाजीपंत ठोसर हेही आपलें कुटुंब घेऊन गोदावरीच्या दक्षिणतीरावर ‘ हिवरें ’ ह्या गांवीं शके ८८४ दुंदुभीनाम संवत्सरांत येऊन राहिले.

कृष्णाजीपंत बेदराहून निघाले त्यावेळीं त्यांस चार पुत्र होते. हिंवऱ्यास आल्यानंतर त्यांस पांचवा पुत्र झाला. त्याचें नांव दशरथपंत असें होतें. ह्या सर्वांनीं मिळून ४८ गांवांची वसाहत करून राहिले. प्रत्येक पुत्रानें १२।१२ गांव वांटून घेऊन ते चौघे बंधु तेथील ज्योतिष (जोशी) व कुलकरणी वृत्ति चालवून प्रपंच निर्वाह करीत.

त्यावेळीं पांचवे पुत्र दशरथपंत हे अगदीं लहान होते. ते वयांत आल्यावर त्यांनीं आपल्या भावांच्या वृत्तींत मुळींच हिस्सा घेतला नाहीं. त्यांनीं हिवऱ्यापासून तीन कोसांवर गोदावरीच्या उत्तरतीरीं मोठी पड पडलेली जमीन होती, तेथें पूर्वीं वडगांव म्हणून एक खेडेगांव होतें. तें उध्वस्त होऊन पुष्कळ वर्षे झालीं होतीं. त्याठिकाणीं फक्त कांहीं गौळी राहत असत, त्यावरून त्या जाग्यास ‘ गौळवाडा ’ असें म्हणत. तेथें दशरथपंत आपल्या कुटुंबासहवर्तमान जाऊन राहिले. आणि तेथें शके १६१० [इ.स. १६८८] मध्येंनवेंच गांव वसवून त्याचें नांव ‘जांब’ असें ठेवलें. लखमाजी गौळी होता त्यास त्या गांवची पाटीलकी देऊन आपण जोशीपणाची व कुळकरणीपणाची वृत्ति चालवून राहिले. त्या नंतर आणखी आसपासच्या बारा गांवांची तीच वृत्ति संपादन करून ते निर्वाह करूं लागले.

दशरथपंतांस ६ पुत्र झाले; त्यांचीं नांवें ( पूर्वकालीन पद्धति कळावी म्हणून मुद्दाम देत आहों ), १ रामाजीपंत, २ लक्ष्मणपंत, ३ भरतपंत, ४ शत्रुघ्नपंत, ५ हनुमंतपंत आणि सहावे वासुदेवपंत. ह्या पुत्रांच्या नामनिर्देशावरूनच समर्थांच्या वंशांत रामोपासना कशी चालत होती ही गोष्ट प्रत्ययास येते. भरतपंत व शत्रुघ्नपंत हीं नांवें हल्लीं कोठेंच प्रचारांत असलेलीं दृष्टोत्पत्तीस येत नाहींत, परंतु तींही यथानुक्रमें ह्यांत गुंफलीं आहेत.

यांतील कनिष्ठ पुत्र वासुदेवपंत हे व्याकरणशास्त्रांत अत्यंत प्रवीण होते; आणि रामोपासक तर सारेच होते. हे सर्व बंधु कृष्णाजीपंतांनीं मिळविलेल्या गांवांपैकी यथाविभागें आलेल्या गावगन्नाच्या वृत्तीवर आपआपल्या गांवीं स्थाइक झाले.

दशरथपंताचे ज्येष्ट चिरंजीव रामाजीपंत हे मात्र जांबेस राहिले. आजे कृष्णाजीपंत व वडील रामाजीपंत हे उभयतांही एकनिष्ठपणें रामोपसना चालवीत. त्याप्रमाणेंच रामाजीपंत हेही शट्कर्में, श्रीरामभक्ति, ह्यांत निष्णात असून परम वैराग्यशील होते. अशा भक्तिमान् घराण्याच्या पिढ्यान् पिढ्या चालत असतां एकविसावे पिढीचे[1] पुरुष त्र्यंवकपंत म्हणून झाले. हे समर्थांचे आजे. आणि त्र्यंबकपंताचे चिरंजीव सूर्याजीपंत हे समर्थांचे वडील होत.

## मातापितरें.

सूर्याजीपंत हे समर्थांचे तीर्थरूप; त्यांच्या वडिलांचें नांव त्र्यंबकपंत. त्र्यंबकपंत हे समर्थांचे आजे. त्र्यंबकपंतही आपल्या इतर पूर्वजाप्रमाणेंच महान् भगवद्भक्त असून रामोपासकच होते. कुळकरणीपणा ही सर्वांचीच कुलवृत्ति. तिचें काम करून निर्वाह करून रहावयाचें. सूर्याजीपंतही अगदीं लहानपणापासूनच भगवद्भक्त होते. ते महान् तपस्वी असत. भागवत धर्माविषयीं फार तत्पर. रामाची उपासना तर वाडवडिलापासून चालत आलेली. निरंतर स्नानसंध्यादिषट्कर्में यथासांग करावयाचीं. त्यांत अंतर पडूं द्यावयाचें नाहीं हा बाणा!

हें तर असोच; पण ह्याशिवाय ते आणखी सूर्याचीही उपासना करीत असत. आणि ती केव्हांपासून? तर १२ वर्षांच्या वयापासून! ह्या एकाच गोष्टीवरून भगवद्भक्तीकडे व तपश्चर्येकडे त्या वेळच्या लोकांचा केवढा

---

१ ह्या एकवीस पिढ्यांची संगतवार नांवनिशी मूळ बखरींत दिलेली आहे. ती विस्तार भयास्तव येथें देतां येत नाहीं हें उघडच आहे.

ओढा होता ही गोष्ट चांगली कळून येते. सूर्योदयाच्या आंत स्नान करून सूर्योदय होतांच त्याचें दर्शन घ्यावयाचें. सूर्यदर्शन झाल्यावांचून भोजन नाहीं, हा नेम असल्यामुळें पर्जन्यकाळांत कधींकधीं चार चार दिवस आठ आठ दिवस सुद्धां सूर्यदर्शन होत नसे, आणि त्या योगें त्यांस कितितरी दिवस उपास पडत ! सूर्योदय झाल्यानंतर अर्घ्यप्रदान, स्तोत्रें, नमस्कार, जप, ध्यान, इत्यादि त्यांचें देवदेवतार्चन सकाळपासून सायंकाळपर्यंत सारखें चालत असे. पण घरामध्यें कुलकरणी वृत्तीचें काम. तें ते रात्रीं बसून करीत असत. त्यासाठीं त्यांनीं गांवच्या पाटलाला व इतर सरकारी अंमलदारांना सांगून ठेवलें होतें कीं, मला दिवसां काम करावयाला वेळ मिळत नाहीं. मी काम करावयाचें तें रात्रीं करीत जाईन. सूर्याजीपंतांचें आचरण पवित्र, वृत्ति सात्विक, अंगांवर तपश्चर्येचें तेज, हीं असल्यामुळें सर्व लोक-त्यांना मान देत असत. अशा रितीनें त्यांनीं सारखी भगवद्भक्ति व तपश्चर्या चालविली होती. ती एक दोन वर्षेंच नव्हे, तर सारखीं दोन तपें ! म्हणजे चोवीस वर्षें झालीं ! ह्याचें नांव तपश्चर्या ! ही तपश्चर्या कोणीकडे आणि हल्लींचें तोंड धुतल्याशिवाय चहा पिणें आणि पारोशानीं न्हाव्या, धोब्याशेजारीं बसून बुरशा हाटेलांतील भजीं किंवा पावबिस्कूट खाणें कोणीकडे ? काय ही ब्राम्हणांची दशा ! तपश्चर्या म्हणजे कशाला म्हणतात, ह्याचा धडा ह्या सूर्याजीपंतांच्या आचरणावरून तरी शिकून घ्यावा. 'तपश्चर्या, तपश्चर्या !' हा जुना शब्द कानावर पडला म्हणून विनाकारण त्याची टवाळी व उपहास करूं नये. तपस्सामर्थ्य कसें असतें तें नीट लक्षांत आणावें. 'तप' हा शब्द जुन्या काळचा शुद्ध भोळसरपणाचा म्हणून केरासारखा उडवून देऊं नये. '**चणे खावे लोखंडाचे, तेव्हां ब्रह्मपदीं नाचें**' हें तुकोबाचें वाक्य ध्यानांत घेऊन त्याचें मनांतल्या मनांत विवरण करावें म्हणजे त्यांतील रहस्य व महति थोडी तरी मनांत उतरल्यावांचून रहावयाची नाहीं.

स्वतःचें नांव सूर्याजीपंत आणि त्यांनीं आराधनाही सूर्याचीच केली. सूर्याजीपंत ह्यांचें लग्न लहानपणींच झालें होतें. लग्न झाल्यानंतर लौकरच त्र्यंबकपंत वारल्यामुळें त्यांस वडिलांचा वियोग झाला. पुढें मातुश्रीही निवर्तल्या. सूर्याजीपंतांकडे कुळकरणीपणाची वृत्ति असून तें काम ते रात्रीं करीत असत हें पूर्वीं सांगितलेंच आहे. अशा रीतीनें दोन तपें गेलीं. अर्थात् त्यांचें वय

त्यावेळीं ३६ वर्षांचें झालें; तरी पोटीं संतान नाहीं. ह्यामुळें तीं उभयतां नवराबायको नेहेमीं उदासीन व चिंताक्रांतच असत. कारण, पोटीं पुत्रसंतान असल्याशिवाय सद्गति नाहीं ही त्यांची पूर्वापार चालत आलेली समजूत कथा पुराणें ऐकून दृढ झालेली होती. सूर्याजीपंत इष्टमित्रापाशीं केव्हांही संततीसंबंधानें गोष्ट निघाली तर नेहेमीं म्हणत 'पुत्र झाला तर भगवद्भक्त व्हावा, जगद्विख्यात व्हावा, नाहीं तर मुळींच नसलेला बरा.'

कोणतेंही व्रत म्हटलें कीं त्याचें उद्यापन हें झालेंच पाहिजे. सांगता झाल्याशिवाय त्याची फलश्रुति नाहीं, असें पुराणें सांगतात. सूर्याजीपंतांच्या सूर्यनारायणाच्या आराधनेच्या व्रतास २४ वर्षें पुरीं झालीं. तेव्हां आतां त्याची सांगता करावी असें त्यानीं मनांत आणिलें, आणि शके १५२५ [इ.स. १६०३] शोभकृन्नामसंवत्सरांतील माघ शुद्ध सप्तमीचा दिवस आला. त्या दिवशीं रथसप्तमी, सूर्यनारायणाचा मुख्य दिवस. ह्यासाठीं त्या दिवशीं व्रतोद्यापन करावयाचें असा निश्चय करून सर्व सिद्धता केली. रथसप्तमीच्या दिवशीं सूर्य रथांत बसावयाचा ही कथा. अर्थात् दिवस मोठे होण्याच्या प्रारंभाचा दिवस तो तो. म्हणून तोच दिवस योजिलेला होता.

आतां ह्या पुढील गोष्ट हल्लींच्या पाखांडी मतानें कान किटलेल्या व ऐहिक सुखासाठीं हापापलेल्या, अभाविक लोकांस निखालस खोटी व असंभाव्य वाटेल, हें तर ठरलेलेंच आहे. परंतु निस्सीम भक्ति करणाराला, कडकडीत तपश्चर्या पाळणाराला, व सत्यनिष्ठेनें वागणाराला परमेश्वर हा खरोखरच दूर नसतो. तो कोणत्याना कोणत्या तरी रूपानें त्यांस भेटतोच. किंवा पाहिजे तर असें म्हणा कीं, त्याच्या अंतःकरणाच्या भावनेनें मनांत कल्पना येतात त्याच खऱ्या होत जातात. कांहीं म्हटलें तरी त्यापासून सत्परिणाम होतो, व अभाविक लोकांहून त्यांच्या कृतीनें कांहीं तरी अद्भुत कार्य घडून येतें ह्याबद्दल शंका नाहीं. असो; जी गोष्ट प्राचीन कालापासून सत्पुरुषांनीं कागदोपत्रीं नमूद करून ठेवली आहे, व जिला ते केवळ अपूर्व ठेवा असें मानतात, ती गोष्ट आम्ही छपवूं तर त्यांच्या दृष्टीनें व इतर भाविकजनांच्या दृष्टीनेंही आम्ही सेवाचोर ठरूं. ह्याकरितां आम्हीही ती गोष्ट मोठ्या आनंदानें सांगतों.

सूर्याजीपंतांनीं रथसप्तमीच्या दिवशीं आपल्या सूर्योपासनेची सांगता

करण्याचें ठरवितांच सूर्यनारायणही त्यांची भक्ति व निस्सीम तपश्चर्या पाहून प्रसन्न झाले आणि ब्राह्मणाच्या वेषानें ते सूर्याजीपंतांस येऊन भेटले. सूर्याजीपंतांनीं त्यांस पाहून नमस्कार करून बसावयास आसन दिलें, व 'कोठून येणें झालें ?' म्हणून हात जोडून विनंति केली. तेव्हां तो ब्राम्हण म्हणाला "ज्याची तुम्ही आजपर्यंत एकनिष्ठेनें आराधना केलीत तोच सूर्य-नारायण मी ! तुमची तपश्चर्या व भक्ति पाहून मी तुमच्यावर प्रसन्न होऊन तुम्हास दर्शन देण्यासाठीं आलों आहे. तरी तुम्हाला पाहिजे तो वर मागून घ्यावा. तुम्ही प्रपंचामध्यें उदासीन दिसतां तें कां ? हें सांगा. आणि ही उग्र तपश्चर्या आजपासून सोडून द्या."

हें ऐकतांच सूर्याजीपंतांच्या अंगावर प्रेमरोमांच उभें राहिले. त्यांचा कंठ सद्गदित झाला. नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागले. त्यांनीं त्या ब्राह्मणाच्या चरणावर मस्तक ठेविलें. आणि हात जोडून विनंति केली कीं, "महाराज ! आपण प्रत्यक्ष दर्शन दिलें ह्यापेक्षां आणखी तें काय पाहिजे ? आपलें प्रत्यक्ष दर्शन घडलें हाच मोठा लाभ होय. यापेक्षां आणखीं नश्वर तें काय मागावें ? मला कोणतीच इच्छा नाहीं. फक्त सद्गति मिळावी म्हणजे झालें." तो ब्राह्मणरूपी सूर्यनारायण प्रसन्न मुद्रेनें म्हणाला, "तुम्हाला सद्गति मिळावयाची ती मिळेलच. परंतु आम्ही प्रत्यक्षच आलों आहों तदर्थीं कांहींतरी वर मागावा. आपली कांहींच इच्छा नसेल तर आपल्या पत्नीस हांक मारावी." अशी आज्ञा होतांच सूर्याजीपंत घरांत गेले व त्यांच्या पत्नी सौ० राणूबाई ह्यांस बाहेर घेऊन आले. येतां येतां त्यांनीं त्या ब्रह्माणाचा सर्व वृत्तांत तीस निवेदन केला. तेव्हां त्या साध्वीनेंही सद्गदीत अंतःकरणानें त्यांस नमस्कार करून हात जोडून पुढें उभी राहिली.

तीस सूर्यनारायण म्हणाले "बाई ! हे तुमचे पति तर आमच्यापाशीं कांहींच वर मागत नाहींत. आणि आम्ही तर तुम्हांस कांहीं तरी वर देण्यासाठीं मुद्दाम आलों आहोंत. ह्याकरितां तुम्ही तरी तुम्हांस काय इच्छित असेल तो वर मागून घ्या, म्हणजे आम्ही देऊं."

सौ० राणूबाई हात जोडून व नेत्रांत आनंदाश्रु आणून म्हणाल्या "भगवान् प्रसन्न झाले, यापेक्षां अधिक तें काय मागावयाचें ? तथापि

स्त्रीजातीस पुत्रावांचून गति नाहीं असें म्हणतात, तरी तेवढी कृपा व्हावी. आणि तो पुत्र परम भागवत असावा. ”

सूर्यनारायण अत्यंत हर्षयुक्त होऊन म्हणाले “ तथास्तु ! तथास्तु ! ” आम्ही त्याचसाठीं आलों होतों. पूर्व संकेतही असाच आहे. आपल्यास माझ्या अंशेंकरून एक व मारुतीच्या अंशेंकरून एक, असे दोन पुत्र होतील. माझ्या अंशेंकरून होईल तो वंशधर होईल. व मारुतीच्या अंशेंकरून होईल तो आजन्म ब्रह्मचारी राहून जगदुद्धार करील. एकाचें वास्तव्य गंगातीरीं व दुसऱ्याचें वास्तव्य कृष्णातीरीं होईल. आपण काळजी करूं नये. ” पुन्हा सूर्य नारायणांनीं विचारलें कीं “ आणखी काय पाहिजे ? ” सूर्याजीपंत म्हणाले “ श्रीचेंही प्रत्यक्ष दर्शन व्हावें अशी इच्छा आहे. ” सूर्यनारायणांनीं उत्तर दिलें “ ठीक आहे. पुढच्या वर्षीं रामनवमीच्या उत्सवांत श्रीरामचंद्र प्रत्यक्ष येऊन तुम्हास दर्शन देतील. निर्धास्त असावें.”

इतकें सांगून ब्राह्मणरूपी सूर्यनारायण अंतर्धान पावला. सूर्याजीपंतांनींही आपल्या सूर्याच्या आराधनेच्या व्रताची यथाविधि सांगतां केली. पूजा, अर्चा, ब्राह्मणभोजन, होमहवन, सर्व कांहीं यथास्थित झालें. सर्व ब्राह्मणांस यथाशक्ति दक्षिणा वगैरे देऊन सत्कार केला. हें सर्व झालें खरें. परंतु पुढची रामनवमी येते केव्हां, आणि आपणास श्रीरामचंद्राचें प्रत्यक्ष दर्शन घडतें केव्हां ह्याचा. सूर्याजीपंतांस अगदीं निजध्यास लागून राहिला.

दिवस हे काय हां हां म्हणतां निघून जातात. शके १५२६ क्रोधी नाम संवत्सराचा पाडवा येऊन पोंचला. प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें शुद्ध प्रतिपदेपासून श्रीरघुपतीचा उत्साव सुरू झाला. दररोज रात्रीं कीर्तन चालू असें. कीर्तन चालू झालें म्हणजे समाप्तीपर्यंत हरिदासाच्या मागें हात जोडून उभे राहवयाचें असा सूर्याजीपंतांचा नेहेमींचा सांप्रदाय असे. त्याप्रमाणें सर्व कांहीं क्रम चालू झाला. परंतु सूर्याजीपंतांच्या मनास चैन म्हणून नाहीं. सूर्यनारायणाच्या प्रत्यक्ष मुखांतील वाणी ! कीं तुम्हास रामनवमीच्या उत्सवांत श्रीचें प्रत्यक्ष दर्शन घडेल. तें कां नाहीं ? हीच विवंचना त्यांच्या मनास लागून राहिली होती. एक दिवस गेला; दोन दिवस गेले; तीन दिवस गेले. कांहीं नाहीं. चवथा दिवसही लोटला ! दर्शन नाहीं ! आठव्या दिवशीं रात्रीं यथापद्धतीनें कीर्तन सुरू झालें.

सौ० राणूबाईचे बंधु भानजीबोवा गोसावी हेच प्रतिवर्षी ह्या रामनवमीच्या उत्सवांत कीर्तन करीत असत. हे बेदनापूरचे कुळकरणी असून श्रीएकनाथमहाराजांचे शिष्य होते, व एकनाथमहाराजही ह्या कालीं विद्यमान होते. कीर्तनांत अद्वैताचें निरूपण चाललें असून मध्यरात्रीच्या सुमारास कीर्तनासही मोठा रंग चढला होता. सूर्याजीपंत पाठीमागें हात जोडून उभे होते. परंतु मनामध्यें चिंताक्रांत; कीं अद्याप भगवद्दर्शन कां नाहीं !

तोंच डोक्यावर घोंगडीची खोळ, हातांत काठी अशा वेसकराच्या वेषानें मारुतीराय दरवाजाबाहेर येऊन वेसकराच्याच भाषेनें सूर्याजीपंतांना हांका मारूं लागले "कुळकरणी बाबा ! या कुळकरणी बाबा ! हकीम येऊनशान् पारावर बसल्यात् नव्हका, तुम्हाली बोलावल हाय-चला देवळामंदी. लई निकडीचं काम हाय. चला जी मायबाप !" सूर्याजीपंत म्हणाले "मी कथेला बसलों आहे. कथा संपल्यानंतर येतों." येसकरानें उत्तर दिलें "नग नग ! येऊनशान् मंग कता पुरती करा. लई लई काम हाय म्हनत्यात." हें ऐकून सूर्याजीपंत मनामध्यें त्रासून म्हणाले "कोणाची होऊं नये बाईल आणि कुणाचें होऊ नये चाकर" असें म्हणतात तें खरें. हा कोण त्रास पहा ! मध्यान्हरात्रीं सुद्धां चैन पडूं देत नाहींत ! असें म्हणून मोठ्या त्रासानें कमलदान व दप्तर वगैरे घेऊन निघाले आणि बाहेर पारावर आले. पहातात तों तेथें पाठीशीं तीरकमठा बांधून दोन पठाण बसलेले आहेत ! 'हे नवेच हकीम कोठचे ? पाटील बिटीलही कोठें दिसत नाहीं ! बरें; आपण आधीं देवळांत जाऊन मारुतीचें दर्शन घेऊन मग ह्यांच्याशीं काय बोलावयाचें तें बोलूं' असा विचार करून ते दर्शनासाठीं मारुतीच्या देवालयांत शिरले !

सूर्याजीपंतांनीं देवालयांत जाऊन मारुतीस नमस्कार केला मात्र, तों एकदम विद्युत्पात झाल्याप्रमाणें जिकडे तिकडे देदीप्यमान प्रकाश पसरला ! त्या दिव्य तेजानें त्यांचे नेत्र दिपून जाऊन एकदम मूर्छा आली आणि ते जमिनीवर धाडकर आपटले ! तेव्हां श्रीराम व लक्ष्मण हे उभयतांही लौकर लौकर आंत जाऊन त्यांनीं त्यांस उठवून सावध केलें. सूर्याजीपंत डोळे उघडून पहातात तों:—

**ध्याये दाजानु बाहुं धृतशर धनुषं पद्ध पद्मासनस्थं**
**पीतं वासो वसानं नवकमलदल स्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।**
**वामांकारूढ सीता मुखकमलमिलल्लोचनं नीलदाभम्**
**नानालंकारदीप्तिं दधतुमुरुजटा मंडनं मंडनानाम् ॥१॥**

अशा प्रकारचें ध्यान समोर ! आजानुबाहू; पाठीशीं धनुष्यबाण बांधलेलें; पिंवळा पीतांबर धारण केलेला; प्रफुल्ल कमलासारखे नेत्र; वामांकावर बसलेली सीता व तिचे नेत्र पतीच्या दृष्टीकडे लागलेले; नानाप्रकारचे रत्नखचित अलंकार; वक्षस्थतळावर कुरळकेश; अशा प्रकारची रामचंद्राची मूर्ति व सन्निध उभे राहिलेले लक्ष्मण व मारुतिराय, ह्यांस पाहून सूर्याजीपंतास किती आनंद झाला असेल, ह्याची कल्पना सुद्धां होणें शक्य नाहीं.

डोळ्यांत आनंदाश्रु भरले, गळा दाटून आला, अंतःकरण सद्गदित झालें, आंगावर रोमाच उभे राहिलें. त्यांच्यानें एकही शद्ब बोलवेना अशी अवस्था झाली ! तरी त्यांनीं तसाच धीर धरून त्यांस साष्टांग नमस्कार घातला आणि हात जोडून उभे राहिले. त्यांस रामचंद्रानीं दृढ आलिंगन देऊन विचारलें कीं, " पूर्वीं सूर्यनारायणांनीं सांगितल्याप्रमाणें तुमचे मनोरथ पूर्ण झाले कीं नाहीं !"

सूर्याजीपंत म्हणाले " आपल्या दर्शनेंकरून सर्व मनोरथ परिपूर्ण झाले." त्यावर रामचंद्र म्हणाले "तर मग आतां कांहीं तरी वर मागावा."

सूर्याजीपंत म्हणाले " आणखी वर तो काय मागावयाचा राहिला ? याउपर कोणतीही इच्छा उरली नाहीं. "

श्रीरामचंद्र म्हणाले, " पूर्वीं तुम्हांस सूर्यनारायणांनीं वरप्रसाद देऊन दोन पुत्र होतील असें सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें सर्व कांहीं घडेल. " नंतर पुन्हा श्रीरामचंद्र हास्यवदन करून सूर्याजीपंतांस म्हणाले " तुम्ही वंशपरंपरागत उपासना मात्र चालवितां परंतु अद्याप मंत्रानुग्रह कां घेतला नाहीं ? तो घेतल्याशिवाय पुत्रप्राप्ती व्हावयाची नाहीं. "

सूर्याजीपंतांनीं विनंति केली " मंत्रानुग्रह घेणें तो वडिलापासूनच घ्यावा. परंतु आमचे वडील माझ्या लहानपणींच निवर्तले. ह्यामुळें अनुग्रह घेणें तसेंच राहिलें. उपासना मात्र चालवितों. "

रामचंद्र म्हणाले "असो; आतां कोणींतरी गुरु पाहून अनुग्रह घ्यवा." सूर्याजीपंत म्हणाले "आतां प्रत्यक्ष श्रीचें दर्शन झाल्यानंतर दुसरा गुरु कोठें शोधूं ? आपणच मंत्रानुग्रह देण्याची कृपा करावी."

हें ऐकून श्रीरामचंद्रास त्यांची दया आली. त्यांनीं सूर्याजीपंतांस त्रयोदशाक्षरी मंत्राचा अनुग्रह दिला. व तुमच्या "कुटुंबांस कालें-करून दर्शन देऊं." असें सांगून सूर्याजीपंतांस नित्य पूजेस श्रीरामचंद्र, सीता, लक्ष्मण व मारुति यांसह पट्टाभिरामाची तांब्यांची मूर्ति* स्वहस्तें देऊन व सूर्याजीपंतांच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून श्रीरामचंद्र आपल्या परिवारासह अंतर्धान पावले.

**साक्षात्कारोपपत्ति विचार**—सूर्यनारायणांनीं प्रत्यक्ष येऊन दर्शन देणें, श्रीरामचंद्रांनीं सीतेसहवर्तमान भेटणें, व त्यांनीं आपल्याबरोबर तांब्याच्या मूर्ति आणून त्या नित्य पूजेस देणें ह्या गोष्टी आजच्या कालांत भाकडकथा वाटणें अगदीं साहजिक आहे, व त्या खऱ्याच असाव्यात असें कोणी म्हणावयास गेल्यास त्याला लोक वेड्यांत किंवा भोळ्याभाबड्यांत काढ-

---

* ह्या सूर्याजीपंतास प्रत्यक्ष श्रीरामचंद्रानीं दिलेल्या तांब्याच्या मूर्ति समर्थांच्या वंशामध्यें १५६ वर्षें होत्या. समर्थांच्या पश्चात्‌ही सुमारें ८० वर्षें त्या त्यांच्या देवघरांत होत्या. पुढें त्या एकाएकीं नाहींशा झाल्या. त्या मोठ्या चमत्कारानें नाहींशा झाल्या. ह्या मूर्ति समर्थांचें मूळ गांव जें जांब तेथील देवघरांत असत. व त्यांची सूर्याजीपंतापासून नित्य परिपाठाप्रमाणें पूजा, अर्चा, आरती, धुपारती व्हावयाची ती यथापद्धतीनें होत असे. समर्थ हे आजन्म ब्रह्मचारीच असल्यानें त्यांचा प्रत्यक्ष वंश लोकदृष्टीनें पाठीमागें कांहींच नाहीं हें उघड आहे. त्यांचा शिष्यसांप्रदाय हाच त्यांचा वंश. समर्थांचे वडीलबंधु होते, त्यांचें नांव 'श्रेष्ठ.' त्यांचा म्हणजे श्रेष्ठांचाच वंश पुढें चालला. व तोच वंश अद्यापही चालत आहे. 'चाफळ' 'सज्जनगड' मूळचें 'जांब' हीं तिन्हीही संस्थानें त्यांच्याच ताब्यांत आहेत.

ह्या वंशापैकींच रामचंद्रबावा ह्यांचे **बावास्वामी** व **रामचंद्रबावा** [ उर्फ-आबास्वामी ] हे उभयतां सख्खे बंधु. त्यापैकीं बावास्वामी हे चाफळास श्रींचें संस्थान सांभाळून होते. आणि त्यांचे कनिष्ट बंधु रामचंद्रबावा

तीळ ह्याबद्दल मुळींच शंका नाहीं. परंतु त्यावर इतके विचार मनांत आणणें इष्ट आहे:—

( १ ) बारा वर्षांच्या (!) वयापासून २४ वर्षें सारखी तपश्चर्या केली.

( २ ) दिलेल्या मूर्ति प्रत्यक्ष आजपर्यंत देव्हाऱ्यांत होत्या व त्यांपैकीं एक मारुतीची मूर्ति अद्याप आहे.

( ३ ) ह्या मूर्ति नाहींशा झाल्या त्या चमत्कारानें नाहींशा झाल्या.

( ४ ) एकेच दिवशीं बंधूबंधूंस एकच साक्षात्कार झाला.

( ५ ) दिलेला आशिर्वाद फलद्रूप झाला.

इतक्या गोष्टी मनांत घेतल्या तर तसें भक्तिसामर्थ्य, तपोबळ व मनोनिग्रहशक्ति हल्लीं कोणांतच नाहीं. ह्यामुळें असे अद्भुत चमत्कार दृष्टीस पडत नाहींत, यांत मोठेसें नवल नाहीं ! येवढी एकनिष्ठ भक्ति, पाहिल्यावर ईश्वर काय एक न करील ? हें तत्त्व मान्य असल्यास तीही गोष्ट संभवनीय आहे.

आतां दुसरीही एक उपपत्ति अशी आहे कीं, सूर्यनारायणाकडे सारें

---

जांबेस होते. सूर्याजीपंतास प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांनीं दिलेल्या ह्या तांब्याच्या मूर्ति जांब येथील देवालयांत होत्या, व त्यांची पूजाअर्चा पूर्ववत्प्रमाणें ते करीत होते. इतक्यांत शके १६२८ [ इ. स. १७६० ] विक्रमनाम संवत्सर मार्गशीर्ष शुद्ध ८ ह्या दिवशीं रात्रौ पंचपदी करून देवाचें दार वगैरे बंद करून रामचंद्रबावा निजावयास गेले. तों रात्रीं मध्यान्हीच्या सुमारास एकाएकीं देवघराच्या दारांचीं सारीं कुलपें वगैरे निघून खाड खाड दारें उघडलीं. जिकडे तिकडे एकच मोठा गोंगाट झाला. काय झालें हें कोणासच कांहीं कळेना. इतक्यांत आबास्वामीही देवालयांत आले. आणि कारभारी यास व इतर माणसांस हांका मारून विचारूं लागले कीं, काकडआरतीच्या वेळेवांचून दारें उघडावयाचीं, तीं आधीं कोणी उघडलीं ? त्यावेळीं सर्वांनीं विनंति केली कीं, आम्ही कोणीही कवाडें उघडलीं नाहींत. म्हणून आबास्वामी स्वतः देवालयांत गेले आणि पाहतात तों सिंहासनावर राम, लक्ष्मण व सीता ह्या तिन्हीही मूर्ति नाहींत. फक्त मारुतीची मूर्ति मात्र आहे. म्हणून चौकशी केली तों देवालयाचीं सारीं कुलपें बाहेर

तन मन धन लागून राहिल्यावर सारे आले गेले लोक सुद्धां त्यांना सूर्यनारायण स्वरूपींच दिसूं लागावेत किंवा भासावेत,हाही मानसशास्त्रांतील एक धर्मच आहे. तेव्हां त्याच समयास कोणी एखादा सत्पात्र ब्राह्मण येऊन त्यांस आशिर्वाद देऊन गेला असेल. व तो त्यांस सूर्यनारायण स्वरूपीच आहे, असें त्यांच्या मनानें घेतलें असेल. व इतकी मनाची तल्लीनता झाल्यावर त्याचे आशिर्वाद फलद्रूप झाले, तर त्यांतही मानसशास्त्राच्या नियमाच्या विरुद्ध असें कांहींच नाहीं. तेव्हां हीही कल्पना बरीच संभवनीय म्हणतां येईल.

परंतु श्रीरामचद्रांच्या दर्शनाविषयीं तसा तर्क करणें बराच गौणपक्ष आहे. पारावर हकीम येऊन बसले होते, तेच रामचंद्र असावेत अशी मनाची भावना होणें हें निजध्यासानें शक्य आहे हें खरें, परंतु श्रीरामांनीं प्रत्यक्ष दर्शन देणें व मूर्ति स्वाधीन करणें ह्या गोष्टी अगदीं तर्काच्या बाहेरच्या आहेत. तथापि त्या मूर्ति आजपर्यंत जांबेस होत्या, व त्या नाहींशा

---

जशींच्या तशीं आणि आंतील मूर्ति मात्र गेल्या! ह्यावरून देव आपोआपच गेले असा निश्चय ठरून आबास्वामी फारच दुःख करूं लागले. त्यांनीं तो मजकूर दुसऱ्या दिवशीं चाफळास बावास्वामीस लिहून कळविला. व आपण दुसऱ्या दिवसापासून अनुष्ठानास बसले. रोज अर्धा शेर खारका व अर्धा शेर दूध मात्र भक्षण करीत. ह्याप्रमाणें २१ महिने अनुष्ठान केलें.

इकडे चाफळास बावा स्वामीस तें वर्तमान कळतांच त्यांनींही शिंगणवाडीच्या मारुतीपाशीं सत्रा महिनेपर्यंत अनुष्ठान केलें. गोमूत्र व सातूचें पीठ मात्र खात असत. ह्याप्रमाणें उभयतां बंधूंचीं अनुष्ठानें चालू असतां उभयतांस एकाच रात्रीं दृष्टांत झाला कीं, "आम्ही तुमच्या घरीं सात पिढ्या रहावयाचा संकल्प करून आलों होतों. तो संकल्प पुरा झाल्यामुळें आम्ही काशीस निघून आलों. आमच्याबरोबर मारुतीही येत होते, परंतु त्यांस आम्ही तुमच्या संरक्षणार्थ ठेवले आहेत. तरी ह्यापुढें तुम्ही निग्रह करूं नये. दुसऱ्या मूर्ति स्थापन करून पूर्वपद्धतीप्रमाणें उपासना करून राहावें." हे दृष्टांत परस्परांनीं परस्परांस एकाच दिवशीं कळविले व त्या दिवसापासून अनुष्ठानांचीही समाप्ति केली!

होतांना जो अद्भुत चमत्कार झाला तो मनांत आणला म्हणजे त्याही गोष्टीचा मनास चमत्कार वाटल्यावांचून राहत नाहीं.

अशा गोष्टींस अजिबात खोटें म्हणावें, कीं ह्या गोष्टी संभनीय आहेत म्हणावें ह्याचा विचार आम्ही दूरदर्शी वाचकांवरच सोपवितों; परंतु अशा गोष्टी त्या कालच्या भक्तिभावाला, मनोनिग्रहाला व तपस्तेजाला अनुरूप मानावयास जसें मनाचें धारिष्ट होतें, तसें त्या अजिबात खोट्या—केवळ भाकड कथा असाव्यात असें मुखांतून काढावयास व त्या कालच्या देवमाणसांच्या पदरीं कृत्रीमपणा, ढोंग, खोटसाळपणा बांधावयास आपलें मन कचरल्यावांचून व अंगांवर शहारे आल्यावांचून राहत नाहींत. आणि त्या अजिबात खोट्या असें कोणी मानलेंच, तर त्या कल्पित कथा इतक्या सुसंगत, इतक्या रमणीय व इतक्या भक्तिभावानें रसरसलेल्या आहेत कीं, त्यांच्यापुढें अलीकडच्या नामांकित कादंबरीकारांनीं सुद्धां त्या बखरकारांच्या चरणींच लागलें पाहिजे.

## जन्म.

मध्यान्हरात्रीं वेसकर बोलवावयास आला, व सूर्याजीपंत कथेंतून उठून बाहेर गेलेले सर्वांनीं पाहिलें. परंतु ते कोठें गेले व पुढें प्रकार काय झाला हें कोणास कांहीं माहीत नव्हतें. सूर्याजीपंत बाहेर गेले तरी कीर्तन सुरूच होतें. बराच वेळ गेल्यावर सूर्याजीपंत आपण बरोबर नेलेलें कलमदान, दप्तर, व रामचंद्रानीं हातांत दिलेल्या तांब्याच्या पट्टाभिरामाच्या मूर्ति घेऊन परत कीर्तनांत येऊन उभे राहिले. नंतर थोड्या वेळानें कीर्तन समाप्त होऊन आरती वगैरे झाली. श्रोतेमंडळी आपआपल्या घरास गेली. भानजीबोवा गोसावी कीर्तनकारही आपल्या स्वस्थानीं गेले. सौ० राणूबाई मात्र एकट्या राहिल्या. तेव्हां सूर्याजीपंतांनीं त्यांस देवापाशीं हाक मारून प्रसाद मिळालेल्या मूर्ति त्यांस दाखविल्या. त्या देव्हाऱ्यांत ठेवल्या, व झालेली सर्व हकीगत त्यांस परम भक्तीनें सांगितली. ती ऐकून त्या साध्वीसही परमानंद झाल्यावांचून राहिला नाहीं. आपल्या पतीस प्रत्यक्ष

परमात्म्याचें दर्शन घडलें व आपल्यास मात्र तें घडलें नाहीं म्हणून त्यांस अत्यंत खेद उत्पन्न झाला. तथापि त्या मूर्तीचें दर्शन हेंच प्रत्यक्ष दर्शन-तुल्य आहे असें मानून त्यांनीं त्या मूर्तीस प्रेमभावानें नमस्कार घातला.

नंतर सूर्याजीपंतांनीं तें हातांतील कलमदान त्याच मूर्तीपुढें ठेवलें, व नमस्कार घालून श्रीस म्हणाले "आजपर्यंत उदरनिर्वाहासाठीं वंशपरंपरेची वृत्ति म्हणून ही राजसेवा केली. ती बरी असो कीं वाईट असो; आजपासून श्रीच्या चरणीं अर्पण केली आहे. हें कलमदान श्रीस अर्पण असो. अतःपर हातांत लेखणी धरावयाची नाहीं." असा संकल्प करून तें कलमदान त्या मूर्तीपुढें ठेवलें. व पुनश्च ते त्या राजसेवेंत पडले नाहींत. हें कलमदान अद्याप चांफळच्या मठांत आहे.

हा साक्षात् ईश्वरी प्रसाद प्राप्त झाल्यानंतर सूर्याजीपंत व त्यांची पत्नी सौ० राणूबाई हीं उभयतां श्रीरामाची भक्तिभावानें उपासना करून यथोचित धर्मानें गृहस्थाश्रमांत राहत असतां सौ० राणूबाईच्या पोटीं गर्भ राहिला. व दिवसेंमासें वृद्धिंगत होत होत नऊ मास पूर्ण झाले. आणि शके १५२७ विश्वावसु नामसंवत्सरीं [इ. स. १६०५] मार्गशीर्ष वद्य १३ स त्यांस पहिलें पुत्ररत्न झालें. कोणतीही गोष्ट फार दिवसांनीं झाली म्हणजे त्याची अपूर्वाई फार असते. तद्वत् घडलें. राणूबाईच्या उदरीं पुष्कळ दिवसांत संतान नव्हतें तों आज प्रथम पुत्र झाल्यानें घरांतील सर्व मंडळीस व इतर त्यांच्या इष्टमित्रांसही फार आनंद झाला. फार दिवस मूल नाहीं म्हणून राणूबाईनीं गंगेस म्हणजे गोदावरीस नवस केला होता कीं, मला मूल होऊं दे म्हणजे त्या पहिल्या मुलाला मी तुझें नांव ठेवीन. त्याप्रमाणें हा पहिला मुलगा होतांच त्याचें नांव गंगाधर असें ठेविलें. व हेच पुढें 'श्रेष्ठ' ह्या नांवानें प्रसिद्धीस आले. ह्यांची योग्यताही समर्थांच्याच तोडीची होती. त्याबद्दलचा उल्लेख पुढें ओघानुसार येणारच आहे. समर्थांचीं चाफळ, सज्जनगड वगैरे संस्थानें ह्या श्रेष्ठांच्याच वंशजांकडे आज चालू आहेत.

सूर्याजीपंतांस सूर्यनारायणांनीं वरप्रसाद दिल्याप्रमाणें हा पहिला पुत्र झाला, व तो सूर्यनारायणाच्या अंशानें उत्पन्न झाला अशीच त्यांची सर्वत्र ख्याती होती. हा पहिला पुत्र हळू हळू मोठा होऊन बाललीलेनें मातापितरास व इतर आप्तस्वकीयांस आनंद देत देत बोलूं चालूं लागला. परंतु

सूर्यनारायणांनीं व रामचंद्रांनीं तुम्हांस दोन पुत्र होतील, व दुसरा पुत्र मारुतीच्या अंशानें जन्मास येईल असें सांगितलें होतें. तेव्हां त्याच्या-बद्दलही सर्वांस उत्कंठा लागून राहणें साहजीकच होतें. प्रत्यक्ष श्रीनींच स्वमुखें सांगितल्यानंतर त्यांत अंतर पडणार कसें? तेव्हां तोही योग पुढें आला.

सौ० राणूबाईस दुसऱ्यांदा गर्भ राहिला. व तोही वृद्धिंगत होतां होतां नऊमास नऊ दिवस पूर्ण होतांच शके १५३० कीलक नामसंवत्सरीं [ इ. स. १६०८ ] चैत्र शुद्ध नवमीस [ रामनवमी ] राम जन्माच्या वेळेसच (!) द्वितीय पुत्ररत्नाचें जन्म झालें. हा दुसरा मुलगा सूर्य-नारायणाच्या वरप्रसादानें झाला, म्हणून त्याचें नांव नारायण असें ठेवलें. हाच मुलगा पुढें ' श्री समर्थ रामदास स्वामी ' ह्या नांवानें प्रसिद्धीस आला.

## नाथांचा आशिर्वाद.

भानजीबोवा गोसावी हे सौ० राणूबाईचे बंधु. हे सूर्याजीपंताचे मेव्हणे—अर्थात् समर्थांचे मामा हें उघडच आहे. ते एकनाथमहाराजांचे शिष्य होते, हें पूर्वी सांगितलेंच आहे. एकनाथमहाराजांचें नांव सर्व-विश्रुतच आहे. ते पैठणास राहत. त्यांचे गुरु जनार्दन स्वामी. त्यांची पुण्यतिथि फाल्गुन वद्य ६ स असे. ह्या पुण्यातिथीचा समारंभ एकनाथ महाराज मोठ्या थाटानें करीत, व त्या समयास आपल्या इष्टमित्रांसही येण्याविषयीं आमंत्रणें करीत. त्याप्रमाणें भानजीबोवासही आमंत्रण जात असे. सूर्याजीपंतांचा व एकनाथ महाराजांचाही मनस्वी घरोबा होता. म्हणून ते त्यांसही प्रतिवर्षास सहकुटुंब यावें म्हणून लिहीत असत, व सूर्याजीपंतही आपल्या कुटुंबास घेऊन प्रतिवर्षाच्या ह्या पुण्यातिथीस पैठ-णास जात, व आठ चार दिवस राहून उभयताही परत येत असत. ह्या-मुळें सूर्याजीपंतांचा व एकनाथ महाराजांचा घरोबा अधिकच वाढला होता. सूर्याजीपंतांवर व सौ० राणूबाईवर त्यांचें अत्यंत प्रेम असे. परंतु पुष्कळ दिवस सूर्याजीपंतांस संतति नसल्यानें तीं उभयतां नवराबायको

सर्डीच जात व सर्डीच परत येत. सूर्याजीपंतांस व सौ० राणूबाईस पहिलाच पुत्र झालेला ऐकला तेव्हां एकनाथ महाराजांस परम आनंद झाला. आणि त्या पहिल्या पुत्रास घेऊन तीं उभयतां जेव्हां प्रथमच पुण्यतिथीच्या उत्सवास आलीं, त्या वेळेस त्या पुत्राला पाहून एकनाथ महाराजांस तर त्यांस कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें होऊन गेलें. त्यांनीं त्या मुलास अत्यंत प्रेमानें उचलून पोटाशीं धरलें, त्याच्या मुखावरून हात फिरवून त्यांस कुरवाळलें, व अत्यंत प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें. नंतर त्यास आंगडें टोपडें बाललेणें वगैरे करून व सौ० राणूबाईस लुगडें चोळी, वज्रचुडे वगैरे घालून त्या दंपत्यास रीतीप्रमाणें ८।१५ दिवस ठेवून घेऊन मोठ्या सन्मानानें त्यांची परत रवानगी करून दिली, व हा मुलगा गंगातीरीं राहून महान् भक्तिभावानें जगदुद्धार करील असा आशिर्वाद दिला, व त्याचें नांव 'श्रेष्ठ' असें ठेविलें.

ह्याप्रमाणें दोन वर्षें लोटल्यानंतर तिसऱ्या वर्षी सूर्याजीपंत व सौ० राणूबाई दुसऱ्या पुत्रास घेऊन आल्या. त्या वेळचा तर एकनाथमहाराजांचा आनंद केवळ अवर्णनीयच होता. ते त्रिकालज्ञ होते. त्यांस ह्या दुसऱ्या पुत्राचीं लक्षणें पूर्वींच कळून चुकलीं होतीं, असें त्यांच्या त्या वेळच्या आदरातिथ्यावरून स्पष्टच दिसून आलें. हा दुसरा मुलगा घेऊन सूर्याजीपंत येत आहेत असें समजतांच एकनाथमहाराज लगबगीनें उठून त्यांस बरेच लांब सामोरे गेले. त्यांस दुरून पाहातांच सूर्याजीपंत ह्या दुसऱ्या मुलास घेऊन त्यांच्या पायावर ठेवणार तोंच त्यांनीं आपण होऊन त्यास आधींच उचललें आणि फार फार प्रेमानें त्याचें चुंबन घेऊन त्यास हृदयाशीं धरलें. आणि वारंवार ते त्याच्या मुखाकडे पाहूं लागले; त्यांच्या नेत्रांत प्रेमाश्रु भरले; आणि परम संतोषानें ते त्या उभयतांस म्हणाले "धन्य तुमची कूस व धन्य तुमची उपासना! तुमचें वर्णन किती करावें? तुम्हास पुत्र झाला हा साक्षात् मारुतीच आहे. हा परम समर्थ होईल व श्रीकृष्णातीरीं राहून जगदुद्धार करील. ह्याची ख्याति सर्व जगांत दुमदुमून राहील. कोणी एक शककर्ता राजा होणार आहे. त्याच्या हातून हा भूभार सर्व दूर करून धर्मसंस्थापना करील व करवील." असें म्हणून ते त्या उभयतांस परमादरानें घरांत घेऊन आले. त्या मुलास रीतीप्रमाणें वस्त्रेंभूषणें, बाळलेणें वगैरे

करून सौ० राणूबाईसही लुगडें, चोळीबांगडी वगैरे देऊन व प्रतिवर्षा-प्रमाणें ८।१५ दिवस ठेवून घेऊन त्यांसही सन्मानानें पोंचवावयास निघाले. व निरोप देतांना म्हणाले " आतां आम्ही वृद्ध झालों. आमच्या हातून घडावयाचें कार्य अपुरें राहिलें आहे. तें आतां हे आपले उभयता पुत्र शेवटास नेतील. आमचे हेतु सफल झाले. आतां आम्ही आपला अवतार समाप्त करणार ! " असें म्हणून प्रेमानें त्या उभयता पुत्रांचें वारंवार चुंबन घेऊन व एकवार कृपादृष्टीनें त्यांजकडे पाहून त्यांनीं त्या दंपत्यास निरोप दिला, व पुढें खरोखर तसेंच घडून आलें. म्हणजे शके १५३१ सौम्य-नाम संवत्सरीं [ इ. स. १६०९ ] फाल्गुन वद्य ६ स नाथांनीं आपला अवतार संपविला ! ह्या येवढ्याशा त्रोटक माहितीवरूनही पूर्वकालीन साधुसंतांच्या अंतर्ज्ञानाची साक्ष पटते.

श्रेष्ठांचा अनुग्रह व पितृवियोग—सूर्याजीपंत नाथांचा निरोप घेऊन आपल्या पत्नी व दोन पुत्रांसह पैठणाहून निघाले ते जांबेस येऊन पोंचले. दोन्ही मुलगे हळूहळू मोठे होऊं लागले. आणि त्या कालची वहिवाट म्हटली म्हणजे अगदीं लहानपणीं लग्नमुंजी उरकून घ्यावयाच्या. त्याप्रमाणें श्रेष्ठांस पांचवें वर्ष लागतांच सूर्याजीपंतांनीं व्रतबंधाचा निश्चय केला. व तो समारंभही यथासांग पार पडला. परंतु व्रतबंधाची जशी त्वरा तशीच मुलाच्या लग्नाचीही त्या वेळीं त्वराच असे. मुलाच्या दोन हातांचे चार हात एकदां केव्हां होऊन जातात व सुनबाई घरांत कधीं येतात ह्याची पूर्वींच्या आईबापांस मोठी घाई होत असे. मुलाची मुंज झाली आणि तो घरचा खातापिता बरा असला, कीं मुली सांगून येण्याला सुरवात झालीच, असा पूर्वींचा प्रघात असे. त्याप्रमाणें श्रेष्ठांची मुंज होतांच त्यांनाही मुली सांगून येण्याची सुरवात झाली. त्यांत अंबाडकर देशमुखांची मुलगी चांगली नीटस व सुंदर होती. हे देशमुख काश्यप गोत्री असून सामवेदी होते. त्यांचीच मुलगी वधू नेमस्त करून श्रेष्ठांच्या वयाच्या सातव्याच वर्षीं विवाह करून टाकला. सर्व समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. तों समर्थांसही पांचवें वर्ष लागलें. म्हणून त्यांचाही व्रतबंध केला.

असें होतां होतां श्रेष्ठांना दहावें वर्ष लागलें. तेव्हां श्रेष्ठांनीं सूर्याजी-पंतांपाशीं गोष्ट काढली कीं 'मला अनुग्रह द्यावा.' तेव्हां सूर्याजीपंत म्हणाले

'देव्हाऱ्यांत श्रींच्या मूर्ति आहेत, त्यांच्यापाशीं तुम्हास जें काय मागणें असेल तें मागावें, किंवा श्रीमारुतींच्या देवालयांत जाऊन त्याच्यापाशीं काय मागणें तें मागावें.' अशी पंतांची आज्ञा होतांच श्रेष्ठ हे मारुतीच्या देवालयांत जाऊन उपोषित राहून अकरा दिवसपर्यंत श्रीमारुतीकवचाचें पठण करीत बसले !

हल्लींच्या मनुष्यांत व त्या काळच्या मनुष्यांत अंतर असेल तर नवल नाहीं. पण त्या वेळेच्या मुलांत व हल्लींच्या मुलांत जें विलक्षण अंतर दृष्टीस पडतें, तेवढ्याचा विचार केला तरी मन आश्चर्यानें थक्क झाल्यावांचून राहत नाहीं. दहा वर्षांचा मुलगा तो काय, आणि मला अनुग्रह द्यावा म्हणून बापापाशीं हट्ट घरतो तो काय ? 'अनुग्रह' म्हणजे काय ? त्याची महति केवढी ? त्याचा उपयोग काय ? हें आलीकडच्या मोठमोठ्या शाल्यांस सुद्धां कळण्याची मारामार ! मग मुलाची गोष्ट कशाला पहावी ? जेवावयाला घटकाभर उशीर झाला तर 'भूक भूक' म्हणून आईला नाचवून सोडतात ! नाहीं तर पैसा दोन पैसे घेऊन चहाच्या दुकानांत पळत सुटतात ! आणि श्रेष्ठांनीं दहाव्या वर्षाच्या वयांत सारखे ११ दिवस उपोषित राहून 'मारुतीकवचा,चें अनुष्ठान केलें ! बालपणापासूनच ज्यांची येवढी निष्ठा, त्यांच्याशीं देव येऊन प्रत्यक्ष बोलले तर त्यांत कांहीं फारसें आश्चर्य वाटत नाहीं ! असो.

अकराव्या दिवशीं मध्यान्ह रात्रीं श्रीमारुती श्रेष्ठांच्या समोर प्रत्यक्षच येऊन उभे राहिले. व 'काय पाहिजे तो वर माग' म्हणाले. मारुती प्रत्यक्ष दिव्य स्वरूपानें पुढें येऊन उभे राहिल्यावर दुसरा एखादा मुलगाच नव्हे, तर मोठा मनुष्य असता तर तो सुद्धां भांबावून गेला असता. परंतु श्रेष्ठांचें वय केवळ दहा वर्षांचें असतांही ते घाबरले नाहींत. त्यांनीं हात जोडून विनंति केली कीं, "मला दुसरें तिसरें कांहीं नको. अनुग्रहमंत्र देण्याची कृपा करावी."ही त्या मुलाची सदिच्छा श्रवण करून ते हास्यदवन करून बोलले कीं " कांहीं चिंता करूं नको. आम्हांस ज्यांनीं मंत्रानुग्रह केला, त्यांच्याच कडून तुलाही अनुग्रह करवितों." असें म्हणून त्यानें श्रीरामचंद्राचें ध्यान केलें. आणि रामचंद्र प्रगट होतांच त्याजकडून त्या मुलास म्हणजे श्रेष्ठांसही त्रयोदशाक्षरी मंत्राचा अनुग्रह दिला ! व त्याचवेळीं श्रीरामचंद्रांनीं

त्यांचें नांव 'रामीरामदास' असें ठेविलें. हेंच नांव त्यांनीं आपल्या सर्व कवितेंत गुंफलें आहे. त्या दिवशीं शके १५३६ आनंदनाम संवत्सरांतील फाल्गुन शुद्ध ११ होती.

**ह्याची उपपत्ति**—ह्या देवतादर्शनाचा साक्षात्कार कदाचित् स्वप्नामध्येंही झालेला असण्याचा संभव आहे. असे स्वप्नांत साक्षात्कार झाल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. डॉ. आनंदीबाई जोशी या आपलीं उदाहरणें स्वप्नांत सोडवीत असत, असें त्यांच्या चरित्रांत लिहिलेलें आहें. कित्येक कवींचे अपुरे राहिलेले ग्रंथ देवांनीं लिहून पुरे केल्याच्याही कथा आहेत, असा साक्षात्कार होणें अगदीं स्वाभाविक असून तशी कल्पना करण्यांतही कांहीं गौणपक्ष आहे असें नाहीं.

**पितृवियोग**—श्रेष्ठ घरांतून अनुग्रहासाठीं जे बाहेर पडले, ते मारुतीच्या देवालयांत अगदीं निर्जन व एकांत स्थलीं जाऊन बसले होते. त्यांच्या वडीलमातुश्रींनीं त्यांचा हवा तितका शोध केला, परंतु त्यांस कोठेंच कांहीं पत्ता लागला नाहीं. म्हणून तीं मातापितारें अत्यंत चिंताक्रांत झालीं होतीं. तों बाराव्या दिवशीं अकस्मात् श्रेष्ठ घरांत येऊन दाखल झाले. त्यांना ईश्वरी प्रसाद झाला असल्याकारणानें त्यांच्या अंगावर व मुखश्रीवर ईश्वरीतेज चकमत होतें. अकरा दिवसांच्या उपोषणानें खरें म्हटलें तर शरीराला ग्लानी यावी, हातपाय थकावेत, पण तसा कोणताच प्रकार त्यांच्यामध्यें दिसत नव्हता. त्यावरून सूर्याजीपंतांनीं तत्काल जाणलें कीं, मुलावर श्रीचा प्रसाद झालेला दिसतो. म्हणून त्यांनीं श्रेष्ठास विचारलें कीं, तूं इतके दिवस कोठें होतास ! तेव्हां श्रेष्ठांनीं वडीलमातुश्रींच्या चरणावर मस्तक ठेवून झालेली सर्व हकीगत त्यांस निवेदन केली. तेव्हां त्यानीं श्रेष्ठांची पाठ थोपटली व मस्तकावरून हात फिरावला. आपला पुत्र श्रींच्या कृपेस इतका पात्र झाला हें पाहून त्या मातापितरांस किती धन्यता वाटली असेल ह्याची वाचकांनींच कल्पना करावी.

पुढें दुसऱ्या पुत्राला म्हणजे समर्थांना—किंवा नारायणालाही—पांचवें वर्ष लागलें. तेव्हां सूर्याजीपंतांनीं त्यांचाही व्रतबंध केला. पुढें दोन वर्षांनीं म्हणजे नारायणाला सातवें वर्ष लागतें न लागतें तोंच सूर्याजीपंतांचा काळ झाला ! त्यामुळें त्या कुटुंबावर मोठा कठीण प्रसंग आला ! कारण

मुलें अवघीं दोन ! तींही लहान लहान ! श्रेष्ठ हेच काय ते मोठे ! त्यांचें वय अवघें दहा वर्षांचें ! तेव्हां अर्थात् प्रपंचाचा साराभार मातुश्री राणूबाईवर येऊन पडला. परंतु राणूबाई फार धीराच्या व प्रपंचांत दक्ष. त्यांनीं तें पतिवियोगाचें दुःसह दुःखही सहन करून त्या उभयतां पुत्रांचें यथापूर्व पालनपोषण केलें. मुलेंही फार सज्जन होतीं. नारायण थोडासा हूडपणा करी, पण श्रेष्ठ केवळ देवमाणूस. ते लहानपणापासूनच सात्विकवृत्तीचे. ते अगदीं मातुश्रीच्या आज्ञेंत वागत.

हल्लींच्या काळांत जर एखाद्या स्त्रिवर दुर्दैवानें असा प्रसंग आला, कीं पति जाऊन पाठीमागें आठ दहा वर्षांचीं दोनच मुलें राहिलीं तर तीं आईला अगदीं 'त्राहिभगवान्' असेंच करून सोडतील. कारण बापाच्या पश्चात् मुलांना अडपता ना दडपता असें होऊन जातें. आणि तीं नाहीं नाहीं तसला अवाच्यपणा करतात; त्यामुळें आईला अगदीं जीव नको नकोसा होऊन जातो. पण ह्या राणूबाईच्या दोन्ही मुलांची गोष्ट अगदींच भिन्न होती. तीं केवळ देवावतारी मुलें होतीं. त्यांना मातेची अवज्ञा करावयाची, किंवा जनास उपद्रव द्यावयाचा ह्या गोष्टी स्वप्नांत सुद्धां माहीत नसत. तेव्हां त्या माउलीच्या भाग्याचें वर्णन काय करावें ? धाकटा मुलगा नारायण ह्याचा स्वभाव थोडासा हूड होता खरा, पण तो हूडपणा निराळा. म्हणजे तो त्यांच्या शरीरसामर्थ्याचा असे. तो खोडकरपणाही नव्हे, किंवा दुसऱ्यास पीडा देणाराही नव्हे. आणि होता तो तरी किती दिवस ? तर सरासरी दहा वर्षेपर्यंत. पुढें त्यांचें चरित्र अगदींच भिन्न अनुग्रहावांचून व वैराग्यावांचून दुसरें नांव नाहीं ! दहा बारा वर्षांच्या वयांतच मुलांच्या अंतःकरणांत वैराग्य उत्पन्न होऊन दैविक शक्ति प्राप्त व्हावी ही गोष्ट जगाच्या रहाटीच्या दृष्टीनें सुद्धां अपूर्व नव्हे काय ?

## समर्थांची बाललीला.

असो; येथपर्यंत समर्थांच्या वाडवडिलांची देण्यासारखी होती तेवढी माहिती दिली; आतां खुद्द समर्थांच्या बाललीला कशा काय होत्या त्यांचें

थोडेसें कथन करूं. कारण प्रस्तुत लेखांतील प्रधान विषय तोच आहे. शके १५३० म्हणजे इ. स. १६०८ मध्यें समर्थांचा जन्म झाला, हें पूर्वी सांगितलेंच आहे. नंतर शके १६०३ म्हणजे इ. स. १६८१ मध्यें त्यांनीं आपला अवतार संपविला. अर्थात् ७३ वर्षें काय ती त्यांची इहलोकीं वस्ती होती. त्या ७३ वर्षांमध्यें त्यांनीं ज्या ज्या कायकृती केल्या, जनास कौतुक दाखविलें, तीच त्यांची लीला होय. तिचीच उपलब्ध असलेली माहिती ह्या भागांत द्यावयाची आहे. तिचा आरंभ बाल्यदशेपासून होणार हें तर उघडच आहे.

निखालस शैशव अवस्थेंतील लीला त्या काय असावयाच्या ? आणि तशा प्रकारच्या समर्थांच्या लीला समजण्याला आज मार्ग तरी काय ? कांहींच नाहीं हें उघड आहे. जवळ आलेल्या मनुष्याकडे टक लावून पाहणें, खुदकर गालांतल्या गालांत हांसणें किंवा अंगावर झेप घालून जाणें, किंवा बोबड्या शद्वांनीं बोलून जनांस रिझविणें ह्याच काय त्या शैशवलीला होत. त्या इतर मुलांप्रमाणें समर्थांनींही केल्या असतीलच. कोणत्याही मुलाच्या बाललीला पाहून जर मनास आल्हाद होतो, तर समर्थांच्या लीला पाहूनही जनास तसाच आल्हाद झाला असेलच. पण समर्थांच्या ह्या शैशव लीलेंत सुद्धां कांहींतरी विशेष हें असलेंच पाहिजे. कारण त्यांचें सारेंच चरित्र अगदीं अथपासून इतिपर्यंत जर चमत्कारांनींच भरलेलें आहे, तर त्यांच्या बाललीलेंत तरी कौतुक कां असणार नाहीं ? तें ही असावयाचेंच. त्या लीला ज्यांना प्रत्यक्ष पहावयास मिळाल्या असतील, त्यांच्या इतके भाग्यवान् दुसरे कोण आहेत ? त्या त्यांच्या शैशवलीला कळण्याला कांहीं साधन नाहीं खरेंच, तथापि त्यांपैकीं ही एक वानगी उपलब्ध झाली, तेवढीच येथें सांगतों.

सूर्याजिपंतांना हा जेव्हां दुसरा पुत्र झाला, तेव्हां तो मारुतीचा अवतार आहे अशी सर्वत्र प्रसिद्धी पूर्वींच झालेली होती. ह्यास्तव बारशाच्या दिवशीं बरेच मोठमोठे लोक व साधुसंत त्या पुत्राचें मुखावलोकन करावयास मुद्दाम आले होते. त्यांनीं तो दिव्य लक्षणीं पुत्र होऊन सर्वांनीं त्या मुलाची फार फार स्तुति केली. तेव्हां एक अद्भुत चमत्कार घडून आला. तो हा कीं, त्या बारा दिवसांच्या मुलानेंही त्यांच्याकडे पाहून ‘ खुदकर ’

हास्यमुख केलें ! हें पाहून जमलेल्या मंडळीस केवढें कौतुक वाटलें असेल हें सांगणें नकोच. ह्याचें वर्णन 'समर्थ–प्रतापां'त येणेंप्रमाणें केलें आहे:—

**ऐसें संतमुखें समर्थस्तवन ऐकिलें । मग अपूर्व तेथ एक वर्तलें ॥**
**हास्य मुखें सकळ संतासि सन्मानिलें । गोप्य देवें केलें निजवर्म॥१॥**

शैशवलीलेंतील येवढी वानगी मिळाली हीच अपूर्वता होय. असो.

ह्यापुढची लीला म्हणजे चार वर्षांपासून फार तर दहा वर्षांपर्यंतचीच लीला होय. कारण दहा वर्षांच्या पुढें 'अनुग्रह' 'संन्यास' 'वैराग्य' 'तपश्चर्या' ह्याच कोटींतील ही मंडळी होय. तेव्हां त्यांची बाललीला जी काय पहावयास मिळावयाची, ती ह्या दोन चार वर्षांतच मिळावयाची. म्हणून समर्थ बोलूं चालूं लागून धांवपळ करून क्रीडा करूं लागले त्या वेळची कांहीं लीला सांगूं. ही लीला अत्यंत कौतुकास्पद असल्यामुळें तिचा थोडासा विस्तार करणें अवश्य आहे.

समर्थांची प्रकृति लहानपणापासूनच सुदृढ होती. त्यांची अंगकांति गौर-वर्णाची असून बांधा वाटोळा असे. परंतु अंगांत चलाखी मनस्वी. घरांत बसावयाचा कंटाळा. सारा दिवस मुलांत खेळावयाचें. गोट्यांचा खेळ त्यांचा फार आवडता. ते बोटानें लोकांच्या गोट्या इतक्या नेमक्या टिचीत कीं, दुसऱ्याकडून हिराऊन घेतलेल्या गोट्यांचा त्यांच्याजवळ ढीगच्या ढीग पडत असे ! उड्या मारणें, झाडावर चढणें, आणि पोहणें ह्या तीन गोष्टींत त्यांचा अगदीं हातखंडा असे. झाडावर चढतांना ते इतकें सफाईनें व सहजवृत्तीनें चढत कीं जणों काय वानर ! आणि कितीही बारीक डहाळी असो तिला धरून ते खुशाल झोंबकाळे घेत. ह्या डहाळीवरून त्या डहाळीवर सहज उडून जात. झाडावरून घरावर उड्या मारीत. ह्या घरावरून त्या घरावर उडून जात. म्हणजे खऱ्या वानराच्या कृतींत व त्यांच्या ह्या वृत्तींत कांहीं अंतर नसे. आणि म्हणूनच त्यांना प्रथमपासून लोक जे मारुतीचे अवतार समजत असत, त्याला ह्या त्यांच्या कृतीनें चांगलेंच दृढीकरण आलें. पोहण्याच्या कामांत तर ते लहानपणापासूनच इतके प्रवीण होते कीं सांगता सोय नाहीं. ते पोहण्यांतच पटाईत असत असें नव्हे, तर पण्यांत किती-

तरी वेळ दम छाटून बेधडक बुडून बसत. एक दोन तासच नव्हे तर दोन दोन दिवस तीन तीन दिवस पाण्यांत बुडून राहून ते खुशाल पुन्हा जशाच्या तसे बाहेर पडत ! कल्याण स्वामींनींही पाण्यांत बुडण्याचा अभ्यास केलेला होता. तो भाग पुढें येणारा असल्यामुळें हा विषय इतकाच येथें सोडून देतों.

ह्याशिवाय समर्थांनीं [ अर्थात् ह्या बाल नारायणानें हें आतां पुनः पुन्हा सांगावयास नको. ] आणखी एक दोन गोष्टी कांहींशा कृष्णलीले-सारख्या मोठ्या मौजेच्या केलेल्या ' श्रीसमर्थप्रतापा'मध्यें वर्णन केल्या आहेत; त्याही येथें देतों.

१ पहिली गोष्ट—समर्थांची बाललीला अत्यंत विचित्र असे. ते मातेची आज्ञा कधीं उल्लंघन करीत नसत. पण त्यांत कांहींतरी एक विचित्र तऱ्हा [ मर्कटचेष्टा म्हटल्या तरी चालेल. कारण, त्यावेळीं लोकांचा समज समर्थांच्या संबंधानें ते वानराचा अवतार आहेत असाच असून त्यांच्या लीला त्या समजाला अगदीं साजेशा होत्या ] असे. एके दिवशीं त्यांच्या घरांत कांहीं दैविक कृत्य करावयाचें होतें. त्यासाठीं दुसऱ्या दिवशीं ब्राह्मणभोजनाचा बेत ठरविला, व उदईक सामुग्री काय काय पाहिजे त्याची योजना चालू झाली. त्यांत मातुश्री राणूबाई सहज म्हणाल्या " सारें खरें. पण उद्यांला ताक कसें पुरणार ? आणि ब्राह्मणांना तर ताक अवश्य पाहिजे. तें कोण आणणार ? हा आमचा नारायण पहा ! कोठें तरी हुदड्या मारीत बसेल, पण काम म्हणून कांहीं करावयाचा नाहीं. कायरे नारायण ! उद्यां सकाळींच तेवढें ताक आणून देईनास ?" नारायण म्हणाला " हो; आणीन आई." ह्यावर राणूबाई आपल्या थोरल्या सुनेस म्हणाल्या " तो कशाचा आणतो ? उद्यां सकाळीं सांगूं कोणाला तरी. " असें म्हणून त्या दुसऱ्या कामास लागल्या.

समर्थ जे तेथून उठले ते कुंभाराच्या घरीं गेले, आणि उद्यां आमच्या घरीं समाराधना आहे तरी ५१२५ मडकीं दे म्हणाले. कुळकर्ण्यांचें घर म्हणजे साऱ्या जांबगांवास पूज्य होतें. मग कुंभारास त्याचें अगत्य असेल हें काय सांगावें ? त्यानें तीं मडकीं देण्याचें कबूल केलें, व लागलीच तो पांच पंचवीस मडक्यांचा हारा डोक्यावर घेऊन समर्थांबरोबर निघाला.

मग ज्या ज्या ब्राह्मणाच्या घरीं दुभतें होतें, त्या त्या ब्राह्मणाच्या घरीं जाऊन समर्थ सांगत कीं, उद्यां आम्हाला ताक पाहिजे आहे. तरी आपल्या घरीं एकदोन मडकीं जितकें ताक मिळण्यासारखें असेल तितकें ताक, अगदीं सकाळीं उजडावयाच्या आंत आपण पोंचतें करण्याची कृपा करावी.

कुळकर्ण्याच्या वाड्यांतला निरोप आणि तो खुद्द राणूबाईचा ! ती बिचारी कधीं कोणाला शब्द टाकावयाची नाहीं, असें असतां आज एक ताकाचा शब्द टाकला, तो कोण अमान्य करणार ? प्रत्येकानें एक मडकें दोन मडकीं, ताक देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें समर्थांनीं एक एक दोन दोन मडकीं त्यांच्या त्यांच्या घरीं ठेवून दिलीं, व उद्यां तांबडें फुटावयाच्या आंत घराकडे पाठवा म्हणून सांगून त्यांनीं कुंभारास त्याच्या घरीं पाठविलें, आणि आपण घराकडे आले. आणि पहांटें चार वाजतांच आपण उठून घराचा दरवाजा उघडून ठेवला. धान्य ठेवावयाच्या खोलींत गेले. तेथें त्या कालच्या पद्धतीप्रमाणें तांदूळ, जोंधळे, डाळी यांच्या डेऱ्यांच्या उतरंडीवर उतरंडी लावलेल्या होत्या. त्या सर्व उतरल्या. त्यांतील धान्य जमिनीवर ओतून त्याच्या राशी घालून ते डेरे मोकळे केले. आणि ते चांगले धुऊन पुसून स्वच्छ करून ठेवले. घरांतील मनुष्यें मध्यान्ह्रात्रींपर्यंत दुसऱ्या दिवसाच्या कामांत गुंतलेलीं असल्यामुळें त्यांस गाढ झोंप लागली होती. त्यांना ह्या समर्थांच्या कृतीची दादही नाहीं ! पहांट होतांच एकामागून एक ताकाचे डेरे भर भरून येऊं लागले. ते समर्थांनीं त्या आपल्या घरच्या डेऱ्यांत भरून घेऊन आलेले डेरे परत केले !

इतक्यांत फटफटीत उजाडलें. घरांतील मंडळी उशीर झाला म्हणून गडबडीनें उठलीं. राणूबाई व श्रेष्ठांचें कुटुंब ह्या दोघीजणी कोठीच्या खोलींत येतात तों साराच विलक्षण देखावा ! जिकडे तिकडे ताकच ताक ! सारी खोली भिजून चिंब ! धान्याच्या राशी जमिनीवर ! आणि ताकाच्या डेऱ्यांच्या उतरंडी लावलेल्या ! हें पाहून राणूबाईनीं श्रेष्ठांस हांक मारली. व उभयतां आश्चर्यचकित होऊन नारायणास विचारलें " अरे नारायणा ! काय केलेंस तूं ? हें येवढें ताक कसलें ? आणि ही धान्याची नासाडी किती ? " समर्थ म्हणाले " आई ! तुम्ही काल उजाडावयाला ताक

आणून ठेव म्हटलें नव्हतें कां ? त्याप्रमाणें हें ठेवलें आहे, तुमच्या आज्ञे-प्रमाणें केलें ! ! "

२ दुसरी गोष्ट—आणखी एक अशीच मौजेची गोष्ट आहे. एके दिवशीं त्या गांवचे अधिकारी एकदां श्रेष्ठांस भेटण्यासाठीं आले. तों श्रेष्ठ देवघरांत पूजा करून ध्यानस्थ बसले होते. समर्थही तसेच स्नानसंध्या करून जपास बसले होते. राणूबाई आंत कोठें कामांत गुंतल्या होत्या. त्यामुळें त्या आलेल्या गृहस्थास कोणी ' या बसा ' म्हटलें नाहीं. व बाहेरच्या बाजूस पाट किंवा दुसरें कांहीं बसावयास ठेवलेलें नव्हतें. म्हणून त्या गृहस्थास बराच वेळ तेथें तिष्ठत उभे रहावें लागलें. ती गोष्ट त्या गृहस्थाच्या मनाला लागली. व श्रेष्ठ आणि समर्थ बाहेर येऊन भेटल्यावर त्या गृहस्थाच्यानें उगेंच राहवलें नाहीं. तो त्यांस म्हणाला "तुम्ही सारे भगवद्भक्त. जपातपांत गुंतलेले. सारेच वेदांती! पण बाहेर कोणी आलें गेलें तर बसावयाला सुद्धां कांहीं नाहीं ! एक पाट सुद्धां ठेवण्याची व्यवस्था नाहीं. हा वेदांत कसला ? " राणूबाई म्हणाल्या " हो; कांहीं तरी बसावयाची तजवीज केली पाहिजे खरी. हा आमचा नारायण कांहीं तिकडे लक्ष द्यावयाचा नाहीं !" इत्यादि भाषण होऊंन तो गृहस्थ आपल्या घरीं निघून गेला.

समर्थांच्या मनास तें आईचें बोलणें लागलें. तो दिवस कसाबसा गेला. मध्यान्ह रात्र होतांच समर्थ घरांतून बाहेर पडले. आपले चांगले चांगले खेळगडी जमविले. कुऱ्हाडी घेतल्या आणि आपल्या शेतांत जाऊन मोठमोठ्या वृक्षांच्या फांद्या तोडल्या. त्या उचलून घरीं आणल्या. हत्यारें घेऊन त्या तासल्या. करवत घेऊन फळया कापल्या. आणि त्याचे कांहीं पाट, चौरंग, घडवंच्या वगैरे अनेक बैठकी तयार केल्या. इतकेंच नव्हे; तर कांहीं भिंती घातल्या; ओटे तयार केले आणि उजाडावयाच्या आंत बसावयाची सारी तयारी केली. दुसरे दिवशीं तोच गृहस्थ पुन्हा आला आणि पहातो तों हा बैठकीचा नवाच थाट ! आणि तो एका रात्रींत तयार केलेला ! हा चमत्कार पाहून तो गृहस्थ व घरांतील मंडळीही सारी आश्चर्यचकित झाली. राणूबाई म्हणाल्या " हा आमचा नारायण असा आहे. मनांत आलें म्हणजे काय पाहिजे करतो ! आणि तें कांहींतरी विचित्रच करतो ! आणि तें केव्हां करतो हें समजत सुद्धां नाहीं. "

अशी समर्थांची वृत्ति व लीला मोठी लोकविलक्षण होती. घरांत बसून रहावयाचें त्यांना कधींच आवडत नसे. ते नेहेमीं रानावनांतच हिंडत. डोंगर कितीही अवघड असो; नारायण हा आपला त्यावर जाऊन बसाव-याचा. भोजनाची आवड नाहीं. परंतु वनफळांवर भक्ति विशेष. करवंदें, जांभळें, बोरें, हिरवे आंबे इत्यादि खाऊन दिवसाच्या दिवस काढावयाचे हा त्यांचा नेहेमींचा परिपाठ असे. इतर मुलांप्रमाणें त्यांना लत्याकपड्याची कीं दागदागीन्यांची कशाचीही आवड नसे. त्यांचा लहानपणापासूनच वैराग्यकडे ओढा फार. कथा, कीर्तन, पुराण म्हटलें कीं हे तेथें अगदीं प्रारंभीं असावयाचे, व तें सारें लक्षपूर्वक श्रवण करावयाचें. त्यांत कधींही अंतर पडूं देत नसत.

शिक्षण—समर्थांना होऊन गेल्यास आज तीनशेंच्या वर वर्षें होऊन गेलीं. त्या कालच्या शिक्षणांत आणि हल्लींच्या शिक्षणांत असें तसें नव्हे, तर जमिनअस्मानाचें अंतर आहे. आतांसारख्या त्या वेळेस शाळा नव्हत्या. आणि त्यांतून खेड्यापाड्यांतून तर त्यांची फारच टंचाई असे. बालबोध लेखनवाचन हा शिक्षणाचा आरंभ. तेवढें पदरांत पडलें कीं, संध्या, गायत्री, पुरुषसूक्त, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, रुद्र, सौर, पवमान, शिक्षा, ज्योतिष, छंद, निघंट, अष्टाध्यायी, वगैरे उपग्रंथ, नंतर संहिता. हाच ब्राह्मणांचा नेहेमींचा धारा असे. हें शिक्षण बहुधा घरांतच सांगत असत. नंतर गृहस्थीबाणा पतकरावयाचा असेल तर मग गांवठी पंतोजी! ते मोडी वाचन, लेखन, हिशेबठिशेब शिकवीत. तेव्हां समर्थांचें त्या कालचें शिक्षण ह्याहून भिन्न तें काय असणार? परंतु विद्यार्थी बुद्धिमान् असला, ग्राहक असला, म्हणजे त्याला कशाशीच अडचण नसते. कसलेंही शिक्षण असो; आणि कसलाही पंतोजी असो; तो तितक्यांतूनही पार होऊन आपला पल्ला गांठतो. समर्थांची अवस्थाही तशीच झाली. ते जन्मापासूनच तैलबुद्धी होतें. इतकेंच नव्हे, तर पूर्वजन्मींच्या उत्तम संस्काराचे होते. त्यांच्या पुढें एकपाठी आणला तरी सुद्धां हात टेकावयाचा. समर्थांच्या तैलबुद्धीचें कथन 'श्रीसमर्थ-प्रतापांत' असें केलें आहे:—

अक्रा घड्यांत केलें धुळाक्षर। अक्रा प्रहरांत वळविलें अक्षर।
अक्रा दिवसें केला जमाखर्च सुंदर। ब्रह्मांड कुळकर्ण चालवाया॥

स. २–ओ. १७.

" अकरा घटकेंत धुळाक्षर संपविलें; अकरा प्रहरांत अक्षर वळविलें; आणि सारें ब्रह्मांड चालविण्यास योग्य असा जमाखर्च अकरा दिवसांत लिहून दाखविला !"

ह्या वर्णनाला 'भाकडकथेंत'ही घालावयाला नको किंवा अतिशयोक्तीही म्हणावयास नको. पूर्वजन्ममींचा ज्यांना संस्कार असतो, त्यांना ज्ञान हें स्वयंभूच असतें. वरचा संस्कार केवळ निमित्ताला. बाह्य संस्काराचा स्पर्श झाला पुरे, कीं अंतर्ज्ञान असतें तें आपोआपच भांडारखाना उघाडल्याप्रमाणें बाहेर झळकूं लागतें. ह्याला उदाहरण आद्य श्रीमच्छंकराचार्यांचेंच पुरे आहे. त्यांचें लेखनवाचन तिसऱ्या वर्षींच झालें. पांचव्या वर्षीं वेदाध्ययन झालें. सातव्या यर्षीं षट्शास्त्रें झालीं. आणि आठव्या वर्षीं त्यांनीं संन्यासग्रहण केला. नवव्या वर्षीं काश्मीरच्या शारदापीठावर आरोहण केलें. आसेतुहिमाचल दिग्विजय करून बत्तीसाव्या वर्षीं तर इहलोकची यात्रा संपविली ! तीच प्रतिमा समर्थांची ! तेव्हां त्यांतही फारसें नवल वाटावयास नको.

समर्थ मोठीशी शास्त्रव्युत्पत्ति शिकले होते किंवा न्याय व्यकरणादि शस्त्रांत मोठे निष्णात होते असे जरीं म्हणतां येत नाहीं, तरी ते बहुश्रुत होते. त्यांची विद्वत्ता कांहीं सामान्य नव्हती. त्यांचें मोडी व बालबोध अक्षर उत्तम होतें. कारण त्यांनीं कल्याण स्वामींस घालून दिलेला कित्ता अद्याप डोमगांवच्या मठांत आहे. त्यांचा संस्कृत अभ्यास फारच उत्तम होता. वामन पंडिताशीं वाद करतांना 'बृहदारण्यकांत :' पहा. असें म्हटलें, ह्यावरून त्यांनीं बृहदारण्यक ग्रंथ पाहिलेला असावा हें उघड आहे. 'दासबोधां'त पहिल्याच दशकांत जी निरनिराळ्या गीतांची नांवनिशीं दिली आहे, तिच्यावरून त्यांनीं तितक्याही गीता पाहिल्या असाव्यात. शिवाय दासबोधांतही ठिकठिकाणीं संस्कृत श्लोक पुष्कळच दिलेले आहेत. आणखी पंचवटींत असतां देवळांत सांगत असलेल्या पुराणिकाला 'मी आज चार ओळी सांगतों' असें आपण म्हणून स्वतः पुराणही सांगितल्याचा दाखला आहेच. कविता करण्याचा उत्तम अभ्यास असून पाठांतरही मनस्वी होतें. ह्यावरून त्या कालीं जेवढी विद्या व्हावयास पाहिजे तितकी त्यांची झाली होती ह्यांत संशय नाहीं.

अनुग्रह—अशा रीतीनें दिवसें मासें थोर होतां होतां समर्थांस आठवें वर्ष लागलें. तेव्हां आपल्यासही मंत्रानुग्रह असावा अशी त्यांच्या मनास अत्यंत उत्कंठा लागून राहिली. त्यांत श्रेष्ठ हे इतर लोकांस मत्रांनुग्रह देत तें पाहून तर त्यांच्या मनाला अधिकच जिज्ञासा टोंचूं लागली. त्यांनीं योग्य समय पाहून श्रेष्ठांपाशीं गोष्ट काढली कीं, " मला आपला अनुग्रहप्रसाद व्हावा. " हें ऐकून श्रेष्ठांनीं उत्तर दिलें " तुमचें वय अद्याप लहान आहे. आपण मोठे झाला म्हणजे अनुग्रह देऊं. आपणाला पुष्कळ कार्यें करावयाचीं आहेत. तेव्हां अनुग्रहाची येवढी त्वरा करण्याचें कारण नाहीं."

ही गोष्ट समर्थांस रुचली नाहीं, त्यांचा अतिशय हिरमोड झाला. ज्ञानेश्वर महाराजांनीं ज्याप्रमाणें निवृत्तिनाथांचा अनुग्रह घेतला होता, त्याप्रमाणें आपणही श्रेष्ठांपासून अनुग्रह घ्यावा असें त्यांच्या मनांत फार होतें. परंतु श्रेष्ठांनीं असें जेव्हां लांबणीवर टाकलें तेव्हां त्यांना अत्यंत वाईट वाटलें. ते तसेच उठून मारुतीच्या देवालयांत गेले आणि मारुतीच्या मार्गे प्रदक्षिणेची चिंचोळी वाट असून तींत आंधार होता, त्या ठिकाणीं जाऊन निजले. ' निश्चयाचें वळ , तुका म्हणे तोंचि फळ ' असें तुकारामांनीं म्हटलेंच आहे. आपला निश्चय मात्र पाहिजे, म्हणजे परमेश्वर कांहीं कोठें दूर नाहीं. तोच अनुभव समर्थांसही आला. केवळ दहा वर्षांच्या वयाचा मुलगा आणि तो इतक्या दृढ निश्चयानें आपल्या मंदिरांत येऊन पडला हें पाहून मारुतीरायांनाही त्याची दया आली. ते प्रत्यक्ष स्वरूपानें त्यांच्या पुढें येऊन पाठीवर हात फिरवून म्हणाले " तुझी काय इच्छा आहे तें माग. " समर्थांनीं त्यांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून विनंति केली कीं " माझी इच्छा दुसरी तिसरी कांहीं नसून फक्त मला अनुग्रहप्रसाद मिळावा येवढीच आहे. " मारुतीरायांनीं त्यांची ती दीनवाणी व निस्सीम भक्ति पाहून श्रीरामचंद्राचें ध्यान केलें. तेव्हां श्रीरामचंद्रही प्रत्यक्ष प्रगट होऊन त्यांनीं समर्थांस प्रेमानें दृढ आलिंगन देऊन त्रयोदशाक्षरी मंत्राचा उपदेश केला. त्या दिवशीं शके १५३८ [ इ. स. १६१६ ] नलनाम संवत्सरांतील श्रावण शुद्ध ८ ची मध्यरात्र होती. नंतर श्रीनीं समर्थांस आज्ञा केली कीं, " सांप्रत पृथ्वी म्लेंच्छमय होऊन धर्माचा उच्छेद झाला आहे. ह्यासाठीं शिसोदे वंशामध्यें ' शिव ' नामेंकरून राजा

होईल तो धर्मस्थापना करील त्यास आपण कृष्णातीरीं राहून अनुग्रह देऊन धर्मस्थापना करावी." असें म्हणून व त्यांचें "रामदास" हें नांव ठेवून श्रीरामचंद्र व मारुती हे अंतर्धान पावले.

इकडे समर्थ रुसून गेले म्हणून श्रेष्ठांनीं त्यास शोधून आणण्यासाठीं चहूंकडे मनुष्य पाठविले. आपणही नदीवर, देवालयांत, गांवांत वगैरे शोध केला. परंतु कोठेंच कांहीं पत्ता लागेना. शेवटीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्रेष्ठ मारुतीच्या देवालयांत प्रदक्षिणेसाठीं गेले तों तेथें समर्थ बसलेले पाहिले. तेव्हां त्यांनीं त्यास उठवून हातास धरून बाहेर आणलें. तों समर्थांच्या मुखावर ईश्वरप्रसाद झाल्याचें तेज दिसूं लागलें. असें पाहतांच त्यांनीं त्यांच्या मस्तकावर हात ठेवून "तुझ्यावर ईश्वरी प्रसाद झाला, तूं धन्य आहेस." असें म्हणाले. "समर्थांनीं श्रेष्ठांच्या पायावर मस्तक ठेवलें, आणि श्रींची कृपा तीच आपली कृपा" असें म्हणाले. नंतर त्यांस श्रेष्ठांनीं घराकडे नेऊन मातुश्रीस भेटविले, तेव्हां मातुश्रीसही परमानंद झाला.

**लग्नाचा बोजवारा**—अशा प्रकारें श्रीराम—उपासनेंत तें सर्व कुटुंब कालक्रमणकरित असतां नारायण मोठा झाला, त्याचें आतां लग्न करावें असें राणूबाईच्या मनांत आलें. मुलगा मोठा झाला म्हणजे किती वर्षांचा? तर १२ वर्षांचा! परंतु तो कालच असा होता कीं, मुलगा १०।१२ वर्षांचा झाला कीं, त्याच्या दोन हातांचे चार हात एकदां केव्हां होऊन जातील, असें त्याच्या आईबापास होऊन जात असे. त्याप्रमाणें समर्थांच्याही मातुश्रीस होऊन गेलें होतें. त्यांनीं एके दिवशीं श्रेष्ठापाशीं गोष्ट काढली कीं, नारायणाचें आतां लग्न करून टाकावें. परंतु नारायणाचा स्वभाव कसा होता, त्याचें वर्तन कसें होतें हें श्रेष्ठ पूर्णपणें जाणून होते. त्यांनीं मातोश्रीस, आपण त्या भरीस पडूं नये; तशानें नारायण हातचा जाईल असें सांगितलें. पण अशा बोलण्यानें त्या वृद्ध मातेची समजूत कशी पटणार? तिनें श्रेष्ठाजवळ वारंवार तीच गोष्ट काढावी. तेव्हां श्रेष्ठांनीं विचार केला कीं कां होईना? मातोश्रींचा हेतु आहे, तर आपण तरी कशाला नाहीं होय म्हणावें? म्हणून त्यांनींही ठीक आहे; मुली आल्या म्हणजे पाहतों, म्हणून सांगितलें. मग काय विचारावें? मुलगा देखणा; सुस्वरूप; निर्व्यंग; बुद्धिमान्; विद्यासंपन्न; कुलवंत; असा पाहिल्यावर

तें स्थळ जाऊं देणार कोण ? मुलीच्या लग्नाचा काच ज्याच्या त्याच्या मागें बहुधा असतोच. त्यामुळें मुलींवर मुली सांगून येऊं लागल्या. 'नारायणाचें आंता लग्न होणार' असें गांवांत लोक बोलूं लागले. समर्थांच्या बरोबरीचे त्यांचे खेळगडी होते ते 'नारायण काय बोवा आतां नवरा होणार! लग्नाचें ठरलेंना ?' इत्यादि बोलून त्यांस चिडवूं लागले. समर्थांस तर पहिल्यापासून लग्नाचा तिटकारा होता. लग्नाचें कोणी नांव काढलें कीं ते अगदीं चिडून जात. धूम ठोकीत दूर निघून जावयाचें, किंवा मुलांना खडे मारावयाचें, किंवा दुरुत्तरें बोलावयाचीं असा क्रम चालत असे. एके दिवशीं अशीच एक मुलगी सांगून आली म्हणून मुलें त्यांस चिडवूं लागलीं. म्हणून ते जे पळत सुटले ते नदीच्या कांठावर एक वडाचें मोठें झाड होतें, त्यावर चढून बसले. ते खालींच उतरेनात. म्हणून राणूबाईनीं व श्रेष्ठांनीं वाड्यांतील एक दोन मनुष्यें त्यांस आणण्यासाठीं नदीवर पाठविलीं. तीं मनुष्यें त्या नदीकडे निघालीं, त्यांच्याबरोबर गांवांतील टवाळ मुलेंही गोंगाट करीत गांवाबाहेर पडलीं. त्या सर्वांस दुरून पाहतांच ज्या वटवृक्षावर समर्थ चढून बसले होते, त्या वटवृक्षाखालीं नदीच्या पाण्याचा मोठा डोहो होता, त्यांत समर्थांनीं एकदम धाडकर उडी टाकली ! हें पाहतांच सर्व मंडळी नदीकडे धांवली. परंतु समर्थ जे आंत बुडाले ते वरच येईनात. मंडळींनीं बराच वेळ वाट पाहिली. पोहणारांनीं पाण्यांत शिरून पाहिलें. परंतु समर्थ कांहीं कोणाच्या हातीं लागेनात. तेव्हां 'नारायण बुडाला, नारायण बुडाला !' असा जिकडे तिकडे हाहाःकार झाला ! कोणी धांवत धांवत जाऊन ती बातमी श्रेष्ठांस कळविली. श्रेष्ठही लगबगीनें डोहाशेजारीं आले. पाहतात तों समर्थ दिसेनात, तेव्हां त्यांनीं "नारायण ! वर ये" म्हणून मोठ्यानें हांक मारली. त्यासरशीं समर्थ डोहांतून एकदम वर आले ! ह्यावरून लहानपणापासूनच पाण्यांत बुडून दम छाटण्याचा सराव समर्थांस किती होता ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. ह्यांची पाण्यांत बुडण्याची गोष्ट पुढें येणारच आहे. ती ह्याहूनही फार अद्भुत आहे.

असो; ज्यावेळीं झाडावरून पाण्यांत उडी घेतली त्यावेळीं समर्थांच्या मस्तकास एक खडपांचें टोंक लागून वरच्या बाजूस एक टेंगूळ आलें, व तें टेंगूळ बरें न होतां पुढें जन्मभर तसेंच राहिलें होतें !

समर्थ घरीं येतांच राणूबाईंना फार आनंद झाला. परंतु लग्नाची गोष्ट काढली कीं, मुलगा आपण तें करीत नाहीं म्हणतो, पळून जातो व नाहीं नाहीं ते चाळे करतो, ह्याबद्दल त्यांना अत्यंत वाईट वाटूं लागलें. याला उपाय काय करावा, हेंच त्यांना कांहीं सुचेना. म्हणून त्यांनीं घरांतच राहत असलेल्या त्यांच्या कुलोपाध्यास सांगितलें कीं, तुम्ही कसेंही करून लग्न करण्याविषयीं नारायणाचें मन वळवा. पण अशा भट भिक्षुकाला समर्थ वळणार थोडेच ! तो जेव्हां त्यांच्यापाशीं गोष्ट काढावयास गेला, तेव्हां त्यांनीं त्यास अशीं कांहीं मार्मिक उत्तरें दिलीं कीं, त्यांच्यापुढें त्याची पुंगीच बंद झाली ! तेव्हां उपाध्ये बोवांनीं राणूबाईंना येऊन साफ सांगितलें कीं, नारायण महा हट्टवादी आहे; तो कांहीं ऐकत नाहीं. तो एखाद्या मोठ्या वेदांत्यासारखीं उत्तरें देतो. तेव्हां आपणही अतःपर त्याच्या लग्नाच्या भरीस पडूं नये.

तरी पण राणूबाईंचा जीव राहीना. त्यांना वाटे कसें तरी करून नारायणाचें लग्न करावें. तो आज जरी हट्ट करतो, तरी पुढें वयांत आला म्हणजे निवळेल. अशी त्यांची समजूत होती. म्हणून एके दिवशीं आपणच त्याला चार गोष्टी सांगून पांहूं या, असें मनांत आणून त्या त्यास म्हणाल्या "नारायणा ! ये असा हिकडे ये; बस पाहूं." अशी त्यांनीं समर्थास जवळ हांक मारली. त्यांच्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हणाल्या "नारायणा ! आईची आज्ञा पाळावी असें शास्त्रांत सांगितलेलें तुला माहीत आहेना ?" समर्थ म्हणाले. "होय; माहीत आहे." राणूबाई म्हणाल्या "मग तूं माझी आज्ञा पाळशील कीं नाहीं ?" समर्थ म्हणाले "हें काय विचारतां आई ? मी तुमची आज्ञा अवश्य पाळीन. तुमची आज्ञा पाळावयाची नाहीं तर कोणाची पाळावयाची ?" राणूबाई म्हणाल्या "शाबास नारायणा ! तूं खरोखरच मोठा शहाणा आहेस. तर मग तूं माझें एक काम ऐक." समर्थ म्हणाले "कोणतें काम ? सांगा पाहूं." राणूबाई म्हणाल्या "हें पहा. लग्नाचें नांव काढलें कीं, तूं तें करावयाचें नाहीं म्हणतोस; मुलांना खडे मारतोस; पळून जातोस; नदींत उड्या घेतोस; हें कांहीं चांगलें नाहीं. ह्याकारितां तूं आजपासून लग्नाची गोष्ट काढली कीं 'नाहीं' म्हणत जाऊं नकोस. निदान अंतरपाठ धरीपर्यंत तरी नाहीं म्हणूं नकोस.

मग तूं कांहीं का करीनास ? काय ? ऐकशील ना हें येवढें ? तुला माझ्या गळ्याची शपत आहे." समर्थ हांसून म्हणाले "येवढेंच ना ? कबूल. नाहीं 'नाहीं म्हणणार' मग तर झालें ना ?" राणूबाई म्हणाल्या "खरेंच बाळ मोठा शाहाणा आहे." इतकें झाल्यावर समर्थ तेथून उठून गेले. राणूबाईसही मुलानें आपल्या शद्बास मान दिला म्हणून मोठा आनंद झाला !

भोळी बिचारी राणूबाई ! तिला समर्थांचे डावपेंच काय समजणार ? तिची विचारीची दृष्टि ती काय ? केवळ सांसारिक ! समर्थांची दृष्टि किती विस्तृत ! परमार्थाच्याही पलीकडे जाऊन भिडलेली. राणूबाईना वाटे, मुलाचे दोन हातांचे चार हात झाले कीं, संसार थाटला. जन्माची सारी इतिकर्तव्यता झाली. पण समर्थांना सर्व जगाचाच-निदान आपल्या महाराष्ट्राचा तरी-संसार थाटावयाचा होता. एका बायकोंत आणि १०।५ मुलांतच त्यांना गुरफटून राहावयाचें नव्हतें. त्यांचीं हजारों मुलें पूर्वींच तयार होतीं. त्यांचेंच कोडकौतुक त्यांना पुरवावयाचें होतें. ही नव्या क्षुद्र संसाराची सव्वा मणाची बेडी पायांत अडकवून घेतल्यावर 'वसुधैव कुटुंबकम्' ह्या विशाळ संसाराचा भार कोण सहन करणार ? त्यासाठीं त्यांना भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें:—

### श्लोक.

**भूः पर्यंको निजभुजलता कंदुकं खं वितानं**
**दीपश्चंद्रः सुमतिललना लब्धसंगः प्रमोदः।**
**दिक्कांताभिः पवनचमरै र्विज्यमानः समंतात्**
**भिक्षुः शेतेनृपइवभुवि त्यक्तसर्व स्पृहोपि ॥ १ * ॥**

---

* [स्रग्धरा वृ०] भूमी पर्यंक बाहू मृदुलतरउशी चांदवा व्योमकांती।
चंद्राचा दीप मोठा सममतिललना संगमें हर्ष चित्तीं ॥
दासी दाही दिशा या फिरवुनि चवऱ्या घालिती गोड वारा।
थाटानें भिक्षु ऐशा नृपसम निजतो सोडुनी लोभ सारा ॥१॥
स्वकृत-'वैराग्य शतकादर्श.'

' करतल भिक्षा तरुतल वासः ' हीच वृत्ति पतकरण्याचा समर्थांचा संकल्प. तो त्या माउलीस कळावा कसा ? आपला मुलगा पुढें लोकोत्तर निघणार व त्याची उडी गगनाला भिडेशी उंच जाणार हें भोळ्या भाबड्या मातापितरांच्या विचारांच्या आटोक्यांत येणें कधींतरी शक्य असतें काय ? मग राणूबाईना तरी हें कसें कळावें ? त्यांस वाटलें, आपला मुलगा वळतीवर आला. आतां त्याच्या लग्नाची गोष्ट काढली तर तो कांहीं नको म्हणत नाहीं, व वेडे वेडे चारही करीत नाहीं. म्हणून त्या मोठ्या आनंदानें समर्थांच्या लग्नाच्या विचारास लागल्या.

मानजीबुवा हे राणूबाईचे बंधु असून ते प्रतिवर्षास सूर्याजीपंतांच्या घरीं कीर्तनास येत हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्यांची कन्या सुस्वरूप असून उपवर झाली होती, तेव्हां पहिलेंच नातें दृढतर करावें म्हणून तीच कन्या समर्थांसाठीं वधु नेमस्त केली. समर्थांनीं तर आईच्या आज्ञेप्रमाणें मौन व्रत धारण केलें होतें. तरी श्रेष्ठांचें आणि समर्थांचें मनोमन साक्ष असून ते परस्परांच्या हृदयांतील रहस्य जाणत असत.

झालें. लग्नाचा सर्व निश्चय ठरला. तिथि नेमस्त झाली. आसनगांवीं जाऊन लग्न करावयाचें असें निश्चित केलें. वाजत गाजत सारें वऱ्हाड नवऱ्यास घेऊन आसनगांवीं गेलें. रीतीप्रमाणें सीमांत पूजनाचा समारंभ पार पडला. समर्थ मधून मधून श्रेष्ठाकडे पाहून हास्यवदन करीत, व श्रेष्ठही ती खूण मनांतल्या मनांत जाणत. दुसऱ्या दिवशीं रुखवत वगैरे घेऊन नवरा मुलगा लग्नमंडपांत जाऊन दाखल झाला. जोशानें घटका भरली म्हणतांच बहुल्यावर मंडवळ्या बांधून नवऱ्यास उभा केला, व अंतरपाट धरला. लवकर लवकर नवरी मुलगीही समोर आणून उभी केली. समारंभास लोकांची बरीच दाटी झाली होती. इतक्यांत भटजींनीं हातांत मंत्राक्षता घेऊन ' शुभमंगल सावधान ! ' असा मोठ्यानीं गजर केला. तो ऐकतांच समर्थांनीं त्या भटजीस विचारलें " काहो भटजी ! सावधान ह्याचा अर्थ काय ? " भटजी म्हणाले " अहो आज ही तुमच्या पायांत सव्वा मणाची बेडी पडती आहे. ह्याकरितां आतां यापुढें सावध रहा. " समर्थ म्हणाले " मग मी आजपर्यंत बेसावध आहे असें तुम्हीं समजतां कीं काय ? मी सदासर्वदा सावधच आहे. मातुश्रींचें वचनही अंतरपाट

घरण्यापर्यंतच होतें. त्यांतूनही मी आतां मुक्त झालों. ठीक आहे हा मी सावध झालों !" असें म्हणून त्या बहुल्यावरून जे पळत सुटले ते वाऱ्या-सारखे धांवत दरवाजाबाहेर पार निघून गेले !!! "*

मग त्यावेळची धांदल काय विचारावी ? 'नवरा पळाला ! नवरा पळाला !' अशी एकच हूल पडली ! सारेच उठून धांवधांव करूं लागले. कोणी ह्या वाटेनें धांवले, तर कोणी त्या वाटेनें धांवलें ! पण नवरा कशाचा सांपडतो ? तो पार निघून गेला ! आतां पुढें काय करावें ? ह्याची पंचाईत येऊन पुढें पडली. एक दिवस गेला; दोन दिवस गेले; नवऱ्याचा ठिकाण नाहीं ! अखेर सर्व भिक्षुक मंडळींनीं शास्त्रार्थ काढून दुसरा वर नेमस्त केला, आणि वधूचें लग्न दोन चार दिवसांतच उर कून घेतलें !

असा हा भलताच प्रकार पाहाण्याचें वृद्धापकाळीं नशिबीं आलें म्हणून राणूबाईंना परमावधीचें दुःख झालें. त्या मनस्वी शोक करूं लागल्या. तेव्हां श्रेष्ठांनीं त्यांचें समाधान केले कीं " मातुश्री ! मी आपल्याला पूर्वींच सांगत होतों कीं, नारायणाच्या लग्नाच्या भरीस आपण पडूं नये. तशानें तो आपल्या हातचा जाईल ! परंतु आपण तें मनांत न आणतां हें कार्य आरंभिलें. असो; झालें तें झालें. त्यास उपाय नाहीं. नारायण खुशाल आहे. आपण काळजी करूं नये. तो लवकरच पुन्हा आपल्याला भेटेल.

---

* 'रामदास गुणवर्णनां'त कविवर्य मोरोपंतांनीं ह्या प्रसंगाचें वर्णन फारच बहारीचें केलें आहे. ते आर्या छंदानें म्हणतातः—

**द्विज सावधान ऐसें सर्वत्र विवाह मंगलीं म्हणती ।**
**तें एक रामदासें आयकिलें त्या असो सदाप्रणती ॥१॥**

प्रत्येक मंगलविवाहामध्यें ब्राम्हण हे 'शुभमंगल सावधान' [सावध असारे बाबांनो !] असें म्हणतच असतात. पण आजपर्यंत त्याच्याकडे कोणी कधीं लक्ष दिलें आहे ? जणों काय तें ऐकतांना साऱ्यांचें कान बधीरच झालेले असतात ! पण ते शब्द खरोखर ऐकलें असे एक रामदासस्वामींनींच ! तेव्हां अशा पुरुषाला सदासर्वकाल नमस्कार असो. ह्यांतील कल्पनेची थोरवी सांगावी तितकी थोडीच आहे !

ह्याकरितां चला आतां आपण जांबेस जाऊं." असें म्हणून ती सर्व मंडळी जांबेस परत आली.

**तपश्चर्या**—समर्थ आसनगांवच्या लग्नमंडपांतून जे निघाले ते थेट जांबेस जाऊन दाखल झाले, व एका अश्वत्थाच्या वृक्षावर अत्यंत अवघड ठिकाणीं जाऊन बसले. ते तीन दिवस तसेच वृक्षावर होते. परंतु राणूबाई किंवा श्रेष्ठ ह्यांपैकीं ह्या तीन दिवसांत कोणीच जांबेस आलें नाहीं. तीन दिवस झाल्यानंतर ते त्या वृक्षावरून खालीं उतरले आणि तसेच निघून नासिक पंचवटीस गेले. **त्यावेळीं समर्थांचें वय १२ वर्षांचें होतें.** त्यांनीं प्रथमतः श्रीगोदावरीचें स्नान करून श्रीरामचंद्राचें दर्शन घेतलें आणि पूर्वेस पंचवटीनजीक टाकळी म्हणून गांव आहे, तेथें एक रस्त्यावरच गुहा होती, त्या गुहेंत जाऊन राहिले. आणि शके १५४२ [ इ. स. १६१२ ] रौद्रनाम संवत्सरीं माघ शुद्ध ७ पासून मंत्रपुरश्चरण करण्याचा संकल्प केला. त्यांत १२ वर्षांत १३ कोटी जपसंख्या पुरी करण्याचा संकल्प होता! त्यासाठीं प्रातःकाळीं उठून गंगेंत कमरे इतक्या पाण्यांत उभे राहून प्रत्यहीं जप करीत. त्यामुळें नदींतील मासे आंगास चावून मांसाचे लचके तोडीत! तरी ते हूं कां चूं करीत नसत. त्यांच्या पायाला ठिकठिकाणीं क्षतें सुद्धां पडलीं होतीं. आणि कमरेखालचें सारें अंग पाण्यांत बुडून राहत असल्यामुळें तें पांढरें फटफटीत दिसे! सर्व काळ पुरश्चरण, भजन, पूजन ह्यांतच ते काळ घालवीत. सकाळपासून दुपारपर्यंत पुरश्चरण करावयाचें आणि दुपारीं पंचवटीस जाऊन मधुकरी मागावयाची आणि श्री रघुपतीस नैवेद्य समर्पण करून टाकळीच्या गुहेंत जाऊन भोजन करावयाचें, असा त्यांचा नित्य परिपाठ असे.

**१ पहिला चमत्कार**—वय केवळ बारा वर्षांचें आणि तपश्चर्या अशी कडकडीत; याप्रमाणें तीन वर्षें लोटलीं. टाकळीपासून उत्तरेस एका कोसावर दसपंचक म्हणून लहानसें गांव आहे. तेथें एक अग्निहोत्री कुलकरणी राहत असे. तो चांगला द्रव्यसंपन्न होता. पण त्याच्या पोटीं संतान नव्हतें. त्यास पूर्ववयांतच क्षयरोग जडला. अनेक औषधोपचार केले परंतु गुण नाहीं. अखेर त्यांतच तो मृत्यु पावला. त्याची स्त्री तरुण असून महासाध्वी होती. तिनें त्याच्याबरोबर सती जाण्याचा निश्चय करून सर्व साहित्य

सिद्ध केलें. आणि प्रेताबरोबर निघाली. प्रेत पुढें व कपाळास मळवट वगैरे भरलेली स्त्री पाठीमागें, याप्रमाणें ती सर्व मंडळी नासिकच्या घाटावर गंगेपाशीं येऊन पोंचली. तों त्याच वेळीं गंगेवर श्रीसमर्थांची स्वारी येऊन ब्रह्मयज्ञ करीत होते. सती जावयास आलेल्या बाईनें हा कोणी मोठा तपस्वी व तेजस्वी पुरुष आहे, ह्याचें दर्शन घ्यावें असें वाटून ती बाई त्यांच्याजवळ गेली आणि तिनें त्यांस नमस्कार केला. कांकणांचा आवाज कपाळीं कुंकू वगैरे पाहून समर्थांनीं सहज नेहेमींच्या पद्धतीप्रमाणें "अष्ट-पुत्रासौभाग्यवती भव" असा अशिर्वाद दिला. बाईनें हात जोडून किंचित् हास्ययुक्त मुद्रेनें विनंति केली कीं, "हा आपला आशिर्वाद कोणत्या जन्मी फळास येणार ? ह्या कीं पुढच्या ?" हें ऐकून समर्थ आश्चर्यानें तिच्या मुखाकडे पाहूं लागले. तों प्रेताबरोबर आलेली मंडळी पुढें येऊन समर्थांस सांगूं लागली कीं, ह्या बाईचा पति नुकताच मरण पावला असून त्याचें प्रेत येथें गंगेवर दहन करावयास आणलें आहे. ह्या बाई त्याच्याबरोबर सहगमन करण्यासाठीं निघाल्या आहेत !" हें वर्तमान ऐकून समर्थांस मोठें कोडें पडलें, व त्या बाईची ती स्थिति पाहून त्यांच्या पोटांत अगदीं भडभडून आलें. त्यांनीं मनांत श्रीरघुपतीचें ध्यान केलें, आणि "देवा ! माझ्या मुखां-तून आशिर्वाद निघून गेला; आतां तो सत्य करून दाखविणें आपल्याकडे. माझी वाणी तरी कोणाच्या सामर्थ्यानें बोलली ! आपल्याच सामर्थ्यानें ! आणि असे दिलेले आशिर्वाद सारेच जर मिथ्या होऊं लागतील तर देवब्राह्मणावर श्रद्धा तरी कोणाची बसेल ? आपण दीनवत्सल आहां. आपण मनावर घ्याल तर काय होणार नाहीं ? सर्व कांहीं होईल. याक-रितां यावेळीं आपलें ब्रीद आपण राखा." अशी अनन्यभावें प्रार्थना करून त्या प्रेतवाहकांस म्हणाले "बरें, त्यास इकडे आणा पाहूं. कसा काय प्राण गेला तें एक वेळ पाहूं या." प्रेत जवळच ठेवलेलें होतें तें त्या मंडळींनीं समर्थांच्या जवळ आणून ठेवलें. समर्थांनीं गंगेंतील गंगोदक घेऊन त्या प्रेतावर सिंचन केलें. आणि 'बाबा ऊठ !' म्हणाले. आणि चमत्कार पहा कीं, झोंपेंतून उठून बसल्याप्रमाणें तें प्रेत मुखानें 'राम राम' उच्चार करीतच उठून बसलें !! हा शके १५४५ रौद्रनाम सं. वैशाख शु. १०चा दिवस होता.

मग त्या चमत्कारास कांहीं सीमा आहे काय ? घाटांवर हजारों मनु-

त्यांची त्यास पहावयास दाटी झाली. नंतर समर्थ त्या बाईस म्हणाले "बाई! आतां तुम्ही आपला पति घेऊन घरीं जा, आणि सुखानें संसार करा बरें. आम्ही तुम्हास 'अष्टपुत्रासौभाग्यवती' हा अशिर्वाद पूर्वीं दिलाच आहे. आणखीही दोन पुत्र तुम्हांस अधिक होतील! जा आतां." नंतर त्या बाईनी व तिच्या भ्रताराने गंगेवर स्नानें केलीं व समर्थांचें घट्ट पाय धरले; आनंदाश्रूंनीं त्यांच्या चरणास स्नान घातलें, तेथें जमलेल्या सर्व ब्रह्मवृंदांस नमस्कार केला, आणि तीं नवराबायको व त्यांजबरोबर आलेली आप्तइष्ट मंडळी दसपंचकास निघून गेली.

घाटावर जमलेल्या ब्राह्मणमंडळीसही त्या गोष्टीचें परम आश्चर्य वाटलें. त्या सर्वांनीं येऊन समर्थांस साष्टांग नमस्कार घातले, व "आपण सामान्य पुरुष नसून केवळ परमेश्वरी अवतार आहांत," म्हणून समर्थांची फार फार स्तुति करूं लागले. तेव्हां समर्थ उठून त्यांच्या पुढें हात जोडून म्हणाले "महाराज! आपण सर्व भूदेव आहां. सर्व सामर्थ्य आपलें आहे. करते करविते आपण. श्रीरामचंद्राच्या कृपेंकरून सर्व कांहीं होत असतें. मी आपणां सर्वांचा दासानुदास आहे. असें म्हणून त्यांनीं भूमीवर दंडप्राय पडून त्या सर्वांस साष्टांग नमस्कार घातला!"

नंतर हळूहळू सर्व मंडळी आपआपल्या घरीं निघून गेली. समर्थही गंगोदकानें भरलेला कमंडलु घेऊन आपल्या गुहेंत गेले. ह्या अलौकिक लीलेमुळें त्या जिवंत झालेल्या कुळकरण्याची व त्याच्या त्या महासाध्वी पत्नीची समर्थांवर किती श्रद्धा बसली असेल हें कांहीं वाचकांस सांगावयास नको. ती दोघेंही नवराबायको दसपंचकाहून नित्य समर्थांच्या दर्शनास येत असत. अशा रीतीनें कांहीं दिवसांनीं त्या बाईस गर्भ राहिला व नऊ मास भरल्यावर पुत्र झाला. तो थोडासा मोठा झाल्यावर त्या उभयतांनीं त्या मुलास नेऊन समर्थांच्या चरणावर ठेवलें, आणि उभयतांनींही त्यांस साष्टांग नमस्कार घातला. तें पाहून समर्थ म्हणाले "तुम्हाला श्रीरघुपतीनें पुत्र दिला ह्याचा आम्हाला संतोष आहे. आतां आपण ह्याला घेऊन जा." त्या बाईनी हात जोडून प्रार्थना केली कीं "महाराज! आपण कृपा करून दहा पुत्र होतील म्हणून आशिर्वाद दिला, त्याचवेळीं मीं संकल्प केला होता कीं, ह्या पुत्रांपैकीं पहिला पुत्र होईल तो मी स्वामीचरणीं अर्पण करीन.

त्याप्रमाणें हा पुत्र मी आपल्या चरणीं अर्पण करावयास आणला आहे. याचा अव्हेर करूं नये. आपणच त्याचा पुत्रवत् प्रतिपाळ करावा." अशी त्या उभयतांची विनंति ऐकून स्वामींनीं हास्यवदन केलें आणि म्हणाले "आम्ही केवळ आरण्यवासी आहों. आम्हास पुत्र कशाला पाहिजे? तुमचा पुत्र तुम्ही न्यावा." परंतु तीं उभयतांही नवराबायको ऐकेनात. तेव्हां समर्थांनीं 'तथास्तु' म्हणून त्या मुलास जवळ घेतलें आणि त्या मुलाचें नांव 'उद्धव बावा गोसावी' असें ठेविलें, व त्याचा व्रतबंधाचा काल येईपर्यंत आपण त्याचा प्रतिपाळ करावा म्हणून त्यांस आज्ञा केली. त्याप्रमाणें त्या मातापितरांनीं त्या मुलास आपल्या घरीं नेऊन वाढविलें. व व्रतबंधाचा काल होतांच त्यांनीं व्रतबंधाचें सर्व साहित्य तयार करून समर्थांपाशीं त्या मुलास घेऊन आले. तेव्हां समर्थांनीं त्या मुलास म्हणजे उद्धव बावा गोसावी ह्यास मांडीवर घेऊन त्याचा व्रतबंध केला. त्या वेळेस उद्धव बावा गोसाव्यांस आठवें वर्ष लागलें होतें. नंतर उद्धव गोसावी समर्थांच्याच गुहेंत नेहेमीं राहूं लागले. पुन्हा ते आपल्या घराकडे गेले नाहींत. त्यानंतर त्या बाईस समर्थांच्या आशिर्वादाप्रमाणें आणखी नऊ पुत्र झाले. आणि त्यावरूनच पुढें त्यांचे आडनांव 'दशपुत्रे' असें पडलें!

**पुष्पाची गोष्ट**—आमच्यांतील साधुसंतांच्या चरित्रांत हा एक विलक्षण प्रकार वर्णन केलेला आढळतो कीं, कित्येक देव त्यांस प्रत्यक्ष प्रगट होऊन दर्शन देत, इतकेंच नव्हे तर इतर मनुष्यें जशीं त्यांच्याशीं बोलत त्याप्रमाणें तीं दैवतेंही त्यांच्याशीं बोलत. तसाच प्रकार ह्या पुष्पाच्या कथेंत आहे. श्रीमारुतिराय समर्थांस वेळोवेळीं दर्शन देत; इतकेंच नव्हे तर त्यांच्याशीं नेहमीं बोलतही असत असें त्यांच्या चरित्रांत ठिकठिकाणीं नमूद केलेलें आहे. त्यांपैकींच ही एक गोष्ट होय.

समर्थ जरी पंचवटींत पुरश्चरण करीत होते, तरी श्रीरामचंद्र व मारुति ह्या उभयतांचीही त्यांचे मागें छकट लागलेली होती कीं, "तुम्ही कृष्णातीरीं राहून भगवद्भक्ति करून जनांचा उद्धार करावा" त्यावर समर्थ विनंति करीत कीं 'मला आपली आज्ञा प्रमाण आहे. परंतु येवढें पुरश्चरण आरंभलें आहे तें पुरें करून मग जातों.' असें बरेच वेळां झालें. अखेर पंचवटींत समर्थांचीं बारा वर्षें पुरीं होत आलीं, असें पाहून श्रीरामचंद्र

वें मारुति प्रत्यक्ष प्रगट होऊन रामचंद्रांनीं समर्थास सांगितलें कीं, "शके १५४९ वैशाख शुद्ध ३ चे दिवशीं शिवाजी राजा जन्मास आला आहे. त्यास तुम्ही कृष्णातीरीं जाऊन साह्य करावें. आणि पृथ्वीला भारभूत झालेल्या म्लेंच्छांचा उच्छेद करून भूभार हलका करावा. आणि धर्म-स्थापना करून उपासना मार्ग वाढवून जगदुद्धार करावा." ह्यावर समर्थांनीं हात जोडून नम्रपणें विनंति केली कीं, "पुरश्चरण चालू आहे, तें परिपूर्ण झाल्यावांचून जाणें कसें घडेल? तें समाप्त झाल्यानंतर आज्ञेप्रमाणें जातों." ह्यावर श्रीमारुतिराय म्हणाले "पुरश्चरणाशीं तुम्हास काय कर्तव्य आहे? श्रीची आज्ञा हेंच तुमचें पुरश्चरण." समर्थ म्हणाले "आपण म्हणतां ही गोष्ट सत्य आहे. परंतु लोकसंग्रहाकरतां पुरश्चरण करणें अवश्य आहे, अशी आपलीच आज्ञा झालेली होती. त्याप्रमाणें १३ कोटींच्या जपाच्या संकल्पाला व बारा वर्षे भरावयाला आतां थोडाच अवधि राहिलेला आहे. आणि श्रीरामनवमीचा उत्सवही जवळच आलेला आहे. ह्याकरितां येवढा उत्सव करून आज्ञेप्रमाणें करतो." ह्याप्रमाणें भाषणें झाल्यानंतर श्रीरामचंद्र अंतर्धान पावले, व मारुतीरायही अदृश्य झाले.

पुढें थोड्याच दिवसांनीं शके १५५४ अंगिरा नाम संवत्सरांतील श्रीरामनवमीचा उत्सव आला. त्या वेळीं समर्थ तेथील नित्य सायंकाळीं पुराणास जात असत. त्याप्रमाणें समर्थ त्या दिवशीं पुराणास निघाले. तों मारुतीनीं प्रगट होऊन त्यांस सांगितलें कीं, "आपल्या मुखानें रामायणाचें पुराण ऐकण्याची आम्हांस फार इच्छा आहे. ह्याकरितां आजपासून आपण पुराण सांगा." समर्थ बोलले "आपल्यापुढें रामायण सांगण्याची कोणाची योग्यता आहे? दुसऱ्या कोणापुढें सांगतांना कांहीं चुकलें सवरलें तर त्याचा विधिनिषेध वाटत नाहीं. पण आपल्यापुढें तसें कांहीं चालावयाचें नाहीं." हें ऐकून मारुतीनीं हास्य केलें. आणि म्हणाले "कांहीं चिंता नाहीं, चुकेल तेथें आम्ही सांगूं." समर्थ म्हणाले "तर मग उत्तम आहे. आम्ही आज पुराण सांगतों." असें बोलून देवळांत गेले, तों मंडळी जमलीच होती. नित्याचे पुराणिकही व्यासपीठावर बसण्याच्या तयारींतच होते. त्यांच्याजवळ जाऊन समर्थांनीं त्यांस हळूच विनंति केली कीं "आज आपण पुराण सांगावें अशी माझी इच्छा आहे. आपली मर्जी असल्यास

सांगतों. आपण श्रवणास बसावें." पुराणिकबोवांनीं ती गोष्ट मोठ्या आनंदानें मान्य केली.

समर्थांना व्यासपीठ मांडून सर्व तयारी करून दिली, व समर्थ सर्वांची आज्ञा घेऊन पुराण सांगावयास बसले. इतक्यांत मारुतींनीं एका बटूचा वेष धारण करून तेही तेथें आले व समर्थांच्या अगदीं जवळ बसले समर्थांनीं पुराण सांगतांना विशेषेंकरून त्या बटूस अनुलक्षून कथा सांगत असावी, व त्या बटूनें आनंदित होऊन मान डोलवीत असावें. असे एक दोन दिवस गेले. अशा प्रकारें रोज रामायणांतील कथाभाग चालत असतां एके दिवशीं असा कथाभाग आला कीं, सीताशुद्धीकरतां मारुती लंकेस गेले, व तेथें सूक्ष्मरूपानें अवलोकन करीत करीत रावणाच्या स्नानगृहांत त्यांनीं प्रवेश केला, आणि तेथील कण्हेरीच्या झाडावर बसून सीताशुद्धीचा ते विचार करूं लागले.

ती कथा ऐकतांच समर्थांच्या शेजारीं जो बटु म्हणजे ब्राह्मणाचा ब्रह्मचारी मुलगा होता, त्यानें मध्येंच समर्थांस प्रश्न केला कीं "त्या कण्हेरीचीं पुष्पें पांढरीं होतीं कीं तांबडीं होती?" समर्थ म्हणाले "तांबडीं नव्हतीं, पांढरींच होतीं." तो मुलगा म्हणाला "छे छे! पांढरीं नव्हतीं, तीं तांबडींच होतीं." ह्याप्रमाणें बराच वेळ त्या ब्रह्मचारी मुलानें समर्थांबरोबर हुजत घेऊन वादविवाद सुरूं केला. कथा किंवा पुराण चालू असतांना श्रोत्यांपैकीं कोणी मोठा विद्वान् असला तरी सुद्धां वक्त्यांस कोणी भलताच प्रश्न विचारीत नाहीं किंवा त्याच्या भाषणावर कोणी शंका प्रतिशंका घेत नाहीं. असें असतां हा लहानवयाचा मुलगा पुराणिक बोवांशीं इतका वितंडवाद घालीत बसला आहे हें ठीक नाहीं, असें वाटून श्रोते मंडळी त्या मुलाला जरा दाबूं लागली. एक गृहस्थ त्यास म्हणाले "तूं पुराणिकाबरोबर वाद करतोस ही रीत कोठची? अरे! ह्या पुराणांतरींच्या गोष्टी आहेत. ह्याकरितां पुराणिक सांगतील त्याच्यावरच विश्वास ठेवावा. वास्तविक विचार केला तर पुराणिकही कांहीं त्या प्रत्यक्ष पहावयास गेले नाहींत. पुराणांत असेल तेंच पुराणिक सांगतात. त्याला आपण कधीं खोटें म्हणूं नये."

असें श्रोते मंडळी त्या ब्रह्मचारी मुलाला सांगूं लागली. तें ऐकून समर्थ

त्या सर्वांस म्हणाले " ह्या मुलाबरोबर तुम्ही कोणीही कांहीं बोलूं नका. " नंतर त्या ब्रह्मचाऱ्यास सांगितलें कीं, " तीं पुष्पें पांढरींच होतीं, हें मी खात्रीनें सांगतों. " ह्याप्रमाणें संवाद होऊन त्या दिवशींचें पुराण समाप्त झालें, व सर्व मंडळी आपआपल्या घरीं गेली.

परंतु मारुतीस कांहीं चैन पडेना. ते समर्थांच्या मागोमाग त्यांच्या गुहेंत गेले आणि त्यांस म्हणाले " रावणाच्या स्नानगृहांतील कण्हेरीचीं पुष्पें लाल रंगाचीं असलेलीं मीं आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलीं आहेत. आणि तुम्ही तीं पांढरीं म्हणता. तर चला उद्यां माझ्याबरोबर लंकेला. म्हणजे तेथें तुम्हाला तीं कण्हेर व तीं फुलें प्रत्यक्षच दाखवितों. " हें ऐकून समर्थ म्हणाले ' नित्य नेमानें पुराण सांगावें; नित्य नेमानें श्रीची पूजा करीत जावी; अशी आपली पूर्वींचीच आज्ञा आहे. असें असतां आपण आतां मला लंकेस चल म्हणतां, तेव्हां त्याचें कसें करावें ? ह्या नित्य नेमांत अंतर पाडावें काय ? याउपर आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन " असें म्हणतांच " तुम्ही पूजा करावी. तुमच्या पूजेला तींच पुष्पें मी उद्यां घेऊन यतों, " असे म्हणून मारुती तेथून निघून लंकेस गेले.

परंतु प्रथम बिभीषणास वगैरे न भेटतां ते तेथील स्नानगृहांत गेलें. आणि पाहूं लागले तों फुलें तांबडीं नसून खरोखर पांढरींच होतीं. तीं पाहून ते आपल्या मनांत आश्चर्य करून तेथील पुष्पें तोडूं लागलें तों इतक्यांत तेथें कांहीं कारणानें बिभीषणाचीही स्वारी आली. त्यांनीं मारुतीस पाहतांच प्रश्न केला कीं " हें काय आज आपण हिकडे कोणीकडे ? माझी भेट वगैरे न घेतां पुष्पें मात्र काढित आहां ह्याचें कारण काय ? "

**मारुती म्हणाले**—"नाशिक पंचवटीमध्यें एक माझ्या अंशेंकरून श्रीरघुपतींनीं रामदास ह्या नांवाचे सत्पुरुष निर्माण केले आहेत. ते रामायणाचें पुराण सांगत असतां ह्या कण्हेरीच्या झाडावर मारुती येऊन बसले होते, अशी त्यांनीं कथा सांगितली. त्यावेळीं मी त्यांस विचारलें कीं, त्या कण्हेरींचीं पुष्पें पांढरीं होतीं कीं तांबडीं होतीं ? त्यांनीं सांगितलें कीं, पांढरीं. मी म्हटलें तांबडीं होतीं. असा त्यांचा आमचा बराच वाद झाला. ह्यास्तव त्यांची खात्री करून देण्याकरितां मी मुद्दाम येथें आलों, तों खरो-

खरेंच तीं पुष्पें पांढरीं आहेत. हें पाहून आम्हाला अत्यंत विस्मय वाटत आहे."

बिभीषण म्हणाले—" आपण हीं पुष्पें प्रत्यक्षच पाहिलीं होतीं, असें असतां आपण पांढरीं म्हणून सांगितलें तें काय त्यांची परीक्षा पाहाण्याकरितां सांगितलें कीं काय समजत नाहीं. परंतु त्या मनुष्यानें हीं पुष्पें प्रत्यक्ष पाहिलीं नसतां ज्या अर्थी तीं पांढरींच आहेत असें निश्चयानें सांगितलें त्या अर्थी तो लोकोत्तर पुरुष असून त्याच्यावर श्रीची पूर्ण कृपा आहे असें वाटतें. ह्याकरितां त्या पुरुषाची आम्हांस अवश्य भेट करवावी." तेव्हां मारुतींनीं सांगितलें कीं "ठीक आहे. ते आतां पृथ्वीप्रदक्षिणेस निघणार आहेत. त्यावेळीं आम्ही आपल्याला त्यांची अवश्य भेट करून देऊं." असें म्हणून तीं तोडलेलीं पुष्पें बरोबर घेऊन मारुति परत पंचवटीस आले. आणि तीं पुष्पें समर्थांच्या पूजेसाठीं त्यांच्या स्वाधीन केलीं.

नंतर मारुती समर्थांस म्हणाले "आम्ही सीताशुद्धीस गेलों होतों तेव्हां तीं आम्हीं तर तांबडीं लाल पाहिलीं होतीं, म्हणून आम्हीं तीं तांबडीं असें म्हटलें. परंतु आपण तीं पांढरीं आहेत असें निश्चयानें सांगितलें तें कशावरून ? तें सांगावें."

समर्थ म्हणाले—" आपण पांढरीं म्हणाला हेंही खरें, आणि मी तांबडीं म्हणालों हेंही खरें. दोन्हीही खरींच आहेत. ह्याचें कारण आपण सीताशुद्धीला गेलांत तेव्हां क्रोधानें संतप्त झालां होतां. त्यामुळें आपणास सारेच पदार्थ लाल दिसत होते. आकाशाचा वर्ण सुद्धां आपल्याला तांबडा दिसत होता, यामुळें आपल्याला तीं फुलें पांढरीं असूनही तांबडीं दिसलीं. आतां मी तीं पुष्पें पांढरीं म्हणून म्हटलें ह्याचें कारण रावण हा शैव होता. तेव्हां शिवाच्या पूजेला पांढरींच पुष्पें उक्त सांगितलेलीं आहेत. तांबडीं पुष्पें शिवाला वाहत नाहींत. हें जाणूनच मी पांढरीं पुष्पें आहेत असें म्हटलें."

**ह्या गोष्टीची उपपत्ति**—ह्या गोष्टीची उपपत्ति लावणें मात्र अत्यंत कठीण आहे. कारण, ही गोष्ट निखालस प्राचीन पौराणिक कथेच्या धर्तीवर आहे. ह्यांतील वर्णनावरून लंका अद्याप आहे, बीभीषण आहेत, मारुती अद्याप आहेत व त्यांस इच्छामात्रेंकरून लंकेस जातां येतें,

इत्यादि गोष्टी निष्पन्न होतात. ह्यामुळें या गोष्टीवर कोणतीच कल्पना चालत नाहीं. परंतु बिभीषणाची व समर्थांची प्रत्यक्ष भेट झाल्याचें वर्णनही पुढें एका गोष्टींत आहेच. त्यांत तो प्रसंग समर्थांनीं प्रत्यक्ष अभंग रूपानेंच वर्णन केलेला आहे. ते अभंग पुढें येतीलच. त्यांना खोटे कसें काय म्हणावयाचें ? हाही बिकट प्रश्न पुढें येतो; परंतु नामदेवासारखी मंडळी देवाबरोबर बोलत होती हा एक त्याला पूर्वींचा आधार आहे.

पंचवटींतील ह्या वर्षाचा हा उत्सवही समाप्त झाला. समर्थांच्या तपश्चर्येचीं बारा वर्षेंही भरलीं, व पुरश्चरणाची १३ कोटी जपसंख्याही पुरी झाली. तेव्हां श्रीरामचंद्रानीं व मारुतींनीं पुन्हा समर्थांस सांगितलें कीं, आतां आपलें पुरश्चरण समाप्त झालें, तरी आतां कृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करावा. समर्थांनीं हात जोडून प्रार्थना केली कीं, 'आज्ञा झाली ती मान्य आहे. एकदां पृथ्वीप्रदक्षिणा करून येऊन नंतर जातों.' तें समर्थांचें म्हणणें उभयतांनींही मान्य केलें, व हुरमुजी वस्त्रें व एक माळ समर्थांस प्रसाद दिला. तो घेऊन समर्थ टाकळीस आले, व पृथ्वी प्रदक्षिणेस निघण्याच्या तयारीस लागले. तेव्हां उद्धव गोसावी त्या गुहेमध्यें होतेच; त्यांना अत्यंत वाईट वाटलें. ते समर्थांस म्हणाले, "मी आपणाबरोबर येणार; मी येथें आपल्याशिवाय एकटा रहावयाचा नाहीं." असें म्हणून त्यांनीं अगदीं पायावर लोळण घेतली. कारण त्यावेळीं उद्धव गोसाव्यांचें वयही लहानच होतें. तेव्हां समर्थांनीं त्यांची समजूत केली कीं, तुमचें वय फार लहान आहे, आणि हिमालयावरच्या सारखा प्रवास फार बिकट असतो. ह्याकरितां तुम्ही आमच्याबरोबर येण्याचा हट्ट धरूं नये. मधुकरी मागून येथेंच भक्तिमार्गांत कालक्षेप करावा, असें सांगून त्यांस अनुग्रह दिला. त्यांच्या मनाचें समाधान केलें. तेथें गुहेंतच एक गाईच्या शेणाचा मारुती करून दिला, व त्याची नित्य पूजा करीत जाण्याविषयीं आज्ञा दिली, आणि आपण पृथ्वीप्रदक्षिणा करून आल्यानंतर जेथें राहूं तेथें तुम्हास नेऊं असें सांगितलें. नंतर श्रीरघुपतीची आज्ञा घेऊन शके १५५४ [ इ. स. १६३२ ] मध्यें फाल्गुन महिन्याच्या शुक्लपक्षांत समर्थ हे पृथ्वीप्रदक्षिणेस निघाले.

# पृथ्वी-प्रदक्षणा.

## [ तिसरें तप. ]

कालमन्वंतराप्रमाणें सर्वच बाबतींत ज्याप्रमाणें स्थित्यंर झालें आहे त्याप्रमाणें शद्वाच्या अर्थांतही फेरबदल झाला आहे. हल्लींची पृथ्वी-प्रदक्षणा म्हणजे मानस सरोवरावरून थेट पूर्वेस आटलांटिक महासागरांतून जाऊन अमेरिकेंतून पार होऊन पुन्हा जिब्राल्टरच्या सामुद्रधुनींतून भूमध्य समुद्रांत येऊन सुवेझचा कालवा ओलांडून तांबडा समुद्र पहावा आणि आरबी-समुद्रांतून मुंबईस उतरून कलकत्यापर्यंत यावें तेव्हां पृथी-प्रदक्षणा व्हावयाची. त्यांत आगगाड्या, आगबोटी, इत्यादि कितीतरी वाहनांचे प्रकार ! किंवा रामचंद्राच्या पुष्पक विमानाऐवजीं आतां झेपेलेन वापरावें तेव्हां ही पृथ्वी-प्रदक्षिणा पुरी व्हावयाची. तसा प्रकार कांहीं पूर्वी नव्हता. तर 'आसेतुहिमाचल' हीच काय ती पृथ्वी-प्रदक्षिणा. हिमालया पासून तों सेतुबंधरामेश्वरापर्यंत सर्व हिंदुस्थानच्या तीर्थयात्रा केल्या म्हणजे पृथ्वी-दक्षिणा पुरी झाली असे लोक समजत असत. विशेषेंकरून तीर्थक्षेत्रें पहावयाचीं, देवतांचीं दर्शनें घ्यावयाचीं येवढाच पूर्वीच्या लोकांचा हेतु असे.

परमार्थावांचून दुसरें ध्येय नाहीं;ईश्वरभक्तींत सर्व कांहीं आलें.मनोनिग्रहानें रहाणें, तपश्चर्येचें साधन करणें हींच कायती इतिकर्तव्यता असा लोकांचा ग्रह असे. भरतखंड हीच कायती पुण्यभूमी; काशी हेंच कायतें तपोवन; भरतखंडापलीकडे पृथ्वी आहे, किंवा ती किती आहे ह्याची कल्पनाही बहुधा त्या वेळच्या लोकांस नसे, आणि आपल्या देशाच्या बाहेर जाण्याइतकीं त्यांच्यापाशीं साधनेंही नसत. ह्यामुळें हिमालयापासून रामेश्वरापर्यंतची यात्रा केली कीं तीच पृथ्वी-प्रदक्षिणा झाली असें लोक समजत. तीच प्रदक्षणा करण्याचा संकल्प करून समर्थ पंचवटींतून निघाले.

**श्रीक्षेत्र काशी**—ते प्रथम फिरत फिरत श्रीक्षेत्र काशी येथें गेले,

आणि श्री विश्वेश्वराच्या देवालयांत जाऊन दर्शनासाठीं देवालयाच्या आंत जाऊं लागले. तों तेथें ब्राह्मण मंडळीं बसलेली होती. त्यांनीं पाहिलें तों भगवीं वस्त्रें परिधान केलेलीं आहेत यावरून हें विरक्त पुरुष असावेत, ह्यांत तर शंका नाहीं. परंतु ते ब्राह्मण जातीचे असतील असें वाटत नाहीं. कोणीतरी अन्य जातीचे असावेत असें वाटल्यावरून तेथील ब्राह्मणांनीं त्यांस सांगितले कीं, देवालयाच्या गाभाऱ्यांत जाऊं नये. तें ऐकतांच समर्थ म्हणाले ' ठीक आहे. ' असें म्हणून ते परत फिरले आणि देवालयाच्या बाहेरच्या बाजूस येऊन बसले.

इतक्यांत देवालयामध्यें एक मोठा अद्भुत चमत्कार झाला. गाभाऱ्यामध्यें कितीएक ब्राह्मण लिंगावर अभिषेक करीत होते तों त्यास लिंग मुळींच दिसेनासें झालें ! तेव्हां तोच बोभाटा जिकडे तिकडे झाला. सारी गडबड उडाली. बाहेर बसलेल्या ब्राह्मणांच्या मनांत ती गोष्ट तेव्हांच आली कीं, जे वैराग्यशील सत्पुरुष आले होते त्यांचा अपमान झाला ! म्हणून ते लागलीच सर्व मिळून बाहेर समर्थ होते तेथें गेले, व त्यांस हात जोडून म्हणाले कीं "आमच्या अपराधाची क्षमा करून आपण आंत यावें." त्यावरून समर्थ आंत गेले. तों देवाचें लिंग पूर्ववत् दिसूं लागलें. नंतर समर्थांनीं विश्वेश्वराचें दर्शन वगैरे करून बाहेर आले, आणि भागीरथीचें स्नान करून यथाविधि त्रिस्थळीच्या यात्रा वगैरे करून कांहीं दिवस तेथें वास्तव्य केलें.

काशीमध्यें पूर्वीपासून हनुमंत घाट हा प्रसिद्ध होता. परंतु तेथें मारुतीची मूर्ति नव्हती, म्हणून समर्थांनीं त्या घाटावर मारुतीची एक नवीन मूर्ति स्थापन केली.

**अयोध्या**—कांहीं दिवस काशीवास केल्यानंतर समर्थ तेथून निघाले ते अयोध्येस गेले. समर्थांचें मुख्य दैवत श्रीरामचंद्र. सर्व कुळांतील उपासना त्याचीच; अनुग्रह दिलेला त्यांनींच. मुख्य गुरुस्थान व सर्वाधिष्ठान काय ते तें. त्यांच्या जन्मभूमीचें त्यांस दर्शन झाल्यानंतर त्यांस किती बरें आनंद झाला असेल ह्याची कल्पना होणें सुद्धां कठीण आहे. अयोध्येस गेल्यानंतर समर्थांनीं श्रीरघुपतीचें दर्शन घेतलें. तेथें साधुसंतांचे अनेक मेळे दृष्टीस पडले, त्यांचींही त्यांनी मोठ्या भक्तिभावानें दर्शनें घेतलीं. आणि ' अयोध्यामाहात्म्य ' श्रवण केलें. आणि मग श्रींची आज्ञा घेऊन

धुंडं निघाले. ते गोकुळ, वृंदावन, मथुरा, विंदार्क, प्रभास इत्यादि तीर्थें केलीं.

प्रत्येक तीर्थांत जाऊन तेथील देवतांचीं दर्शनें घ्यावयाचीं, कांहीं दिवस तेथें राहून शिष्यसंप्रदाय मिळवावयाचा, तेथें मठाची स्थापना करून श्रीच्या पूजा नैवेद्याची व्यवस्था करून तेथें आपल्या संप्रदायापैकीं एक एक शिष्यठेवावयाचा असाच त्यांचा नित्यक्रम असे.

**द्वारका**—अशा रीतीनें फिरत फिरत समर्थांची स्वारी पश्चिम समुद्राकडे वळून श्रीक्षेत्र द्वारका येथें जाऊन पोंचली. भक्तिभावानें श्रीकृष्णाचें दर्शन घेतलें. तेथील संप्रदायाप्रमाणें तीर्थविधिही केला. आणि तेथेंही सांप्रदाय वाढवून नेहमींच्या पद्धतीप्रमाणें श्रीरामचंद्राची मूर्ति स्थापन केली. आणि तेथेंही पूजा नैवेद्याची व्यवस्था लावून दिली. त्या वेळीं त्यांनीं तेथें एक अभंग केला. तो असाः—

**अंतरीं गुरुवचन। बाह्य नापीत वपन ॥१॥**
**अंतर्बाह्य शुद्ध झाला। रामदर्शनें निवाला ॥२॥**
**मन मुंडिल्या उन्मन झालें। शिर मुंडिल्या काय केलें ॥३॥**
**रामदासीं तीर्थविधी केला। रामीं पिंड समर्पिला ॥४॥**

ह्या अभंगावरून समर्थ जरी लोकव्यवहाराप्रमाणें चालत, तरी त्यांची दृष्टि कशी होती ही गोष्ट चांगली कळून येते.

**काश्मीर**—द्वारकेंतील तर्थियात्रा पुरी झाल्यानंतर समर्थांनीं हिमालयाकडचा रोंख धरला, आणि फिरत फिरत काश्मीरची राजधानी श्रीनगर येथें गेले. तेथें शीख लोकांचा गुरु नानकपंथी होता. तो अत्यंत भाविक असून सदासर्वदा आत्मानात्म विचारांतमग्न असे. परंतु मनाचें समाधान म्हणून नाहीं. यास्तव जे जे कोणी साधुसंत येतील त्यांस तो अनेक प्रकारचे वेदांतांतील प्रश्न करीत असे. परंतु कोणाच्याच संभाषणानें त्याच्या मनाचें खरें समाधान झालें नाहीं. तरी तो कोणाचा छळ न करतां सर्वांस नमस्कार करून निरोप देत असे. असें होतां होतां तेथें समर्थ रामदासस्वामींची स्वारी जाऊन पोंचली. तेव्हां त्या नानकपंथी गुरूनें त्यांस नमस्कार करून त्यांचें फार भक्तीपूर्वक आदरातिथ्य केलें. आणि मोठ्या युक्तीनें अनेक प्रकारचे

आत्मानात्म विचाराचे अनेक प्रश्न केले. त्यांचीं समर्थांनीं अबदीं यथायोग्य, अनुभवशीर व मनास पटतील अशीं उत्तरें दिल्यामुळें त्याच्या मनाचें अत्यंत समाधान झालें, व खरें खरें ज्ञान तें ह्यांच्याचपाशीं आहे अशी त्याची खात्री झाली. तेव्हां त्यानें स्वामींस नमस्कार करून त्यांची प्रार्थना केली कीं, ' मला अनुग्रहप्रसाद द्यावा. ' त्यावर समर्थ म्हणाले "तुम्हाला अनुग्रह व्हावयाचा तो पूर्वीं झालेलाच आहे. आतां नवा अनुग्रह नको" परंतु नानक गुरु ऐकेना. तो म्हणाला " जेथें कांहीं विशेष गुण दृष्टीस पडतात, तेंच सद्गुरूचें अधिष्ठान होय. ह्याकरितां स्वामींनी कृपा केलीच पाहिजे." असा फारच आग्रह पाहून स्वामी म्हणाले " आपण अनुग्रहाच्या संबंधानें दुराग्रह धरूं नये. एकवार अनुग्रह घेतल्या नंतर पुन्ह अनुग्रह घेऊं नये अशी शास्त्रमर्यादा आहे. तथापि तुमची मर्जीच आहे तर श्रीरामचंद्राची उपासना चालवावी. " असें सांगून त्यांस हुर्मुजी रंगांचीं वस्त्रें व एक जपमाळ दिली, आणि आपण थेट हिमालयाकडे निघाले.

हिमालय—आणि श्रीबदरीनारायण, केदारेश्वर ह्यांचें दर्शन घेऊन ज्या पर्वत शिखरावर श्वेतमारुति निरंतर ध्यानस्थ आहेत, जेथें मनुष्याचें गमन नाहीं, त्या ठिकाणींही समर्थ गेले. व त्या मारुतीचें दर्शन घेऊन तेथेंच कांहीं दिवस वास केला. तेथें थंडी मनस्वी. सभोंवार बर्फाच्या घोंडीच्या घोंडी पडलेल्या. हें जाणून मारुतीनीं समर्थांस टोप, मेखला, वल्कलें, हुरमुजीं रंगांचीं वस्त्रें, व जपाकरितां माळ, पायीं पादुका व हातांत कुबडी हीं सर्व आपल्या हातांनीं दिलीं. तेवढीच कायती त्यांच्या जवळ सामुग्री होती. तरी तेवढ्यावर त्यांनीं चतुर्मास काढला. नंतर श्रीमारुतीची आज्ञा घेऊन उत्तर मानस यात्रेला गेले. आणि पूर्वबाजूच्या तीर्थयात्रा करीत करीत ओढ्या जगन्नाथास आले. तेथें जे कोणी शरण येतील त्यांस अनुग्रह देत देत बराच शिष्यसांप्रदाय जमला. त्यांत पद्मनाभ म्हणून एक ब्राह्मण होता तोही शरण आला. त्यासही अनुग्रह दिला. नंतर तेथेंही मठ बांधून त्यांत श्रीची मूर्ति स्थापन करून तेथील सर्व अधिकार पद्मनाभ ह्यास दिला. ह्याप्रमाणें जे जे शरण येतील, व ज्यांस कृपानुग्रहाची पात्रता असेल त्यांस मठ करून देऊन त्या त्या ठिकाणचा अधिकार त्यास त्यास देत असत.

**रामेश्वर व लंका**—अशा रीतीनें पूर्वसमुद्रतीरानें पर्यटन करीत करीत दाक्षिणसमुद्रतीरीं श्रीरामेश्वरास येऊन पोंचले. आणि तेथें समुद्रस्नान करून श्रीरामेश्वराचें दर्शन घेऊन पूजा वगैरे केली. सेतुबंधांमध्यें मारुतीचेंही देवालय आहे, तेथें जाऊन श्रीमारुतीचें दर्शन घेतलें, व जाण्याविषयीं आज्ञा मागितली. तेव्हां मारुती म्हणाले कीं, आम्ही आपण पंचवटींत असतांना पुष्पासंबंधानें लंकेस गेलों होतों, त्यावेळीं बिभीषणांची भेट झाली. त्यावेळीं त्यांनीं आपल्या भेटीची फार इच्छा केली होती. म्हणून आपण पृथ्वी-प्रदक्षिणेस याल त्यावेळीं त्यांस आणून आपल्यास भेटवितों असें मी कबूल केलें आहे. आपण आज अनायासें येथपर्यंत आलां आहांत तरी आपण माझ्याबरोबर लंकेस चलावें." समर्थ म्हणाले "जशी आज्ञा." नंतर ते उभयतांही अंतरिक्षमार्गानें लंकेस जाऊन पोंचले. तों द्वारपाळानें धांवत धांवत जाऊन बिभीषणास कळविलें कीं "मारुति आले आहेत." तें ऐकतांच बिभीषण नगराच्या वेशीबाहेर त्यांस सामोरा आला आणि मारुतीस साष्टांग नमस्कार करून पुढें उभा राहिला. नंतर मारुतींनीं बिभीषणास आलिंगन देऊन सांगितलें कीं "तुम्ही पूर्वी सांगितलें होतें कीं, रामदासांची व आमची भेट करवावी. त्याप्रमाणें रामदासास आज बरोबर घेऊन आलों आहे; त्यांस भेटावें." असें म्हणतांच मोठ्या संतोषानें मिठी घालावयास जवळ जातात तोंच समर्थांनीं त्यांस साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां बिभीषणानें रामदासास उठवून दृढ अलिंगन दिलें आणि 'शाबास बापा! योग्य आहेस.' असें म्हणून पाठीवरून हात फिरविला. नंतर एका बाजूस बिभीषण, एका बाजूस मारुति व मध्यें समर्थ रामदास असे रथांत बसून मोठ्या समारंभानें राजवाड्यांत गेले.

बिभीषणाच्या राजमंदिरांत भोजनाचा वगैरे अत्युत्तम थाट केला होता. भोजनोत्तर दरबारही मोठ्या थाटाचा झाला. त्या समयीं बिभीषणानें मोठ्या विनयानें मारुतीपाशीं गोष्ट काढली कीं, "पूर्वी ज्ञानेश्वर असतांना नामदेव येथें येऊन आम्हांस कीर्तन ऐकवीत होते. त्या आलीकडे आम्हांस कीर्तन ऐकावयास मिळालें नाहीं." तें ऐकून मारुतींनीं समर्थ रामदासांस आज्ञा केली कीं, "बिभीषणाची आपलें कीर्तन श्रवण करण्याची फार इच्छा आहे. यास्तव आपण कीर्तन करावें." त्याप्रमाणें समर्थांनीं आज्ञा मान्य करून

उभे राहून कीर्तन केलें. रामदासासारख्या भगद्भक्ताला रंगदेवता प्रसन्न असेल हें काय सांगितलें पाहिजे ? आणि त्यांतून मारुतीसारखें बिभीषणासारखे रामभक्त श्रोते! मग त्या कीर्तनाची थोरवी ती काय सांगावी ? सारे श्रोतेमंडळ भक्तिरसांत तल्लीन होऊन सारखें आनंदानें डुलत होतें! बिभीषण तर रामदासांची रसाळ वाणी श्रवण करून फारच प्रसन्न झाला. त्यानें समर्थांस एक महिनाभर ठेवून घेतलें; दररोज कीर्तनाचा घडका चालला होता.

नतंर समर्थ रामदासांनीं बिभीषणाचा निरोप घेतला आणि मारुतीसहवर्तमान परत जावयास निघाले. ते वेळेस बिभीषण म्हणाले " आपल्याला श्रींनीं मुद्दाम विशेष कारणास्तव उत्पन्न केले आहेत. तरी आपण उपासना मार्गाची वृद्धि करून जगदुद्धार करावा." अशी बिभीषणाची आज्ञा होतांच साष्टांग नमस्कार करून एक अभंग म्हटला, तो हा:—

## अभंग.

**धन्य हें नगर धन्य बिभीषण ॥ धन्य वरदान समर्थांचें ॥१॥**
**समर्थांच्या कृपें वर हा पावला ॥ चिरंजीव झाला कल्प एक ॥२॥**
**कल्प एक वस्ती लंकेमाजीं जाण ॥ मारुति रक्षण जयालागीं ॥३॥**
**जयालागी कृपा समर्थ हनुमंता ॥ उपासना स्वतां राघवाची ॥४॥**
**राघवाचे कृपें भेटी याची झाली ॥ लंकादेवी आली भेटीलागी॥५॥**
**भेटीचा हा लाभ मारुतीच्या संगें ॥ पुष्पांचिया योगें लाभ झाला ६**
**लाभाचाही लाभ मारुती प्रसंगें ॥ समर्थांचा योग येणें कारितां ॥७॥**
**येणें झालें येथें प्रदक्षिणा योगें ॥ समर्थांचा संग म्हणूनियां ॥८॥**
**म्हणूनियां विनंती ऐका लंकापति॥लोभ फार चित्तीं असों द्यावा॥९॥**
**असूं द्यावी आतां कृपा दासावरी ॥ दास हा निर्धारी मनीं चिंती ॥१०॥**
**मनीचा हा लोभ फार असो द्यावा ॥ लोभायोगें सेवा घडो मज ॥११॥**
**मज घडो मुक्ती राघवाची भक्ती ॥ उभयपद प्राप्ती म्हणोनीया ॥१२॥**
**म्हणोनीया धन्य आपण म्हणवी ॥ दास म्हणे पदवी तुम्हा करतां १३**

ही समर्थांची अभंगरूपी प्रार्थना ऐकून उभयतांस ही फार संतोष झाला. नंतर बीभीषण मारुतीस म्हणाले " समर्थांस श्रींनीं तुमच्याच अंशेंकरून

निर्माण केलें आहे. आणि ते तुमच्याच आधिन आहेत. त्यांचें सर्वोपरी संरक्षण करणारे तुम्हीच. ह्याकरितां ह्यांच्याकडून जगदुद्धार वगैरे जें काय कार्य करणें तें तुमच्याकडेच आहे. तें तुम्हीच शेवटास न्यावें." हें ऐकून मारुतींनीं हास्य केलें आणि म्हणाले "त्यांस ज्यानें निर्माण केलें तोच तें करणार व शेवटास नेणार समर्थ आहे." असें म्हणून त्यांनींही निरोप घेतला आणि लंकादेवी पोंचवावयास आली होती तिला निरोप देऊन मारुती व समर्थ गेले होते त्याप्रमाणेंच आकाशमार्गानें पुन्हा सेतुबंध-रामेश्वरीं येऊन पोंचले !

**पुढचीं क्षेत्र**—नंतर मारुतींची आज्ञा घेऊन समर्थ रामेश्वराहून निघाले ते हंसक्षेत्रांत आले. तेथील श्रीव्यंटेशाचें दर्शन घेऊन श्रीशैल मल्लिकार्जुन, महोबळनरसिंह, वानकनरसिंह, राचोटी वीरभद्र, पंचमहालिंगें, यांचें दर्शन करून किष्किंधानगरीस गेले, व पंपासरोवर, ऋष्यमूक पर्वत इत्यादि तीर्थ-याला करीत करीत कार्तिकस्वामींचें दर्शन घेऊन फिरत फिरत चालले. कोठें महिनाभर मुक्काम करावा, कोठें आठ पंधरा दिवसच वास्तव्य करावें. प्रत्येक ठिकाणीं शिष्यसांप्रदाय हा होत असेच. त्यांस मठस्थापना करून द्यावी. तेथें श्रीरामचंद्रांची स्थापना करून पूजा नैवेद्याचा बंदोबस्त करून एक एक शिष्याची त्या त्या मठावर नेमणूक करून द्यावी. ह्याप्रमाणें देशाटन व तीर्थयात्रा करीत करीत दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेलें जें करवीर म्हणजे कोल्हापूर क्षेत्र तेथें येऊन पोंचलें.

तेथें कांहीं दिवस राहून व शरण येतील त्यांस अनुग्रह देऊन पुन्हा तेथून निघाले, ते पश्चिम मानसतीर्थें करीत करीत सह्याद्रीपर्वतांतील महा-बळेश्वरास आले. तेथून पंढरीनाथ आदि भिमाशंकर ह्यांचें दर्शन घेऊन त्र्यंबकेश्वरीं गेले. आणि तेथून पंचवटीस आले. तों बारा वर्षें भरून गेलीं. समर्थ गंगेमध्यें स्नान करून श्रीरामचंद्राच्या दर्शनास गेले आणि त्यांस प्रार्थना केली कीं, "मी कृतसंकल्पाप्रमाणें बारा वर्षेंपर्यंत पृथ्वीप्रदक्षिणा केली. मनुष्यसंचाराचीं स्थळें व निर्मनुष्य संचाराचीं स्थळें होतीं तीं सर्व पाहून तेथील देवतांचीं दर्शनें घेतलीं व तीर्थांचें स्नानही केलें. तें सर्व पुण्य आपणास अर्पण असो." असें म्हणून उदक सोडूं लागले, तेव्हां श्रीरामचंद्रानीं प्रसन्न होऊन हात पुढें करून तें उदक हातावर घेतलें.

आणि प्रसन्न मुद्रेनें समर्थांस आज्ञा केली कीं, 'आतां तुम्ही कृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करावा.' तेव्हां समर्थांनीं हात जोडून पुन्हा विनंति केली कीं, सांप्रत सिंहस्थ आहे; ह्याकारितां एकदां गंगातीरीं जाऊन जन्मभूमीचें दर्शन घेतों, मातुश्रीस भेटतों आणि मग कृष्णातीरीं जाऊन वास करतों.

श्रीरामचंद्र म्हणाले "बरें आहे; तसें करा. परंतु त्वरा करून सर्व कार्य आटोपून लौकर या." 'आज्ञेप्रमाणें करतों' असें म्हणून समर्थ टाकळीस जाऊन उद्धव गोसावी यांस भेटले. समर्थांस पाहतांच उद्धव गोसावी यांस परमानंद झाला. फारा दिवसांनीं चुकलेली धेनु वत्सास सांपडावी तशी त्यांची स्थिति झाली. समर्थ थोडे दिवस टाकळीस राहिले, आणि मग उद्धव गोसाव्यांस म्हणाले "आतां आम्ही गंगाप्रदक्षणेस जातों. नंतर कृष्णातीरीं वास्तव्य करावयास जाऊं; तेव्हां तुम्हाला तिकडे बोलवूं. तोंपर्यंत तुम्ही येथेंच रहावें." असें सांगून समर्थ गंगाप्रदक्षिणेस निघाले, ते फिरत फिरत पैठणास येऊन दाखल झाले, व तेथें आनंदनगरींत कांहीं दिवस वास केला.

इकडे समर्थ लग्नाच्याच दिवशीं बहुल्यावरून पळून गेल्यादिवसापासून समर्थांच्या मातुश्रींनीं जो शोक केला तो काय सांगावा? 'लग्नाचा घाट घातला काय, आणि हा विपरीत प्रकार झाला काय' असें त्यांस वाटे. त्यांतून त्या दिवसापासून नारायण मुळींच नाहींसा झाल्यामुळें तर त्यांच्या शोकास पारावारच नाहींसा झाला. 'माझा नारायण कोठें आहे? तो मला कधीं भेटेल?' हाच त्यांनीं सारखा निदिध्यास घेतला होता. श्रेष्ठ सर्व कांहीं जाणून होतें. ते आपल्यापरी मातुश्रीची पुष्कळ समजूत करीत. परंतु किती केलें तरी आईचें आंतडें! त्यांची समजूत व्हावी कशी? त्यांना जेवणसुद्धां गोड लागत नसे. नारायण आज येईल, उद्यां येईल अशा आशेवर त्या काल कंठित होत्या. वर्ष झालें, दोन वर्षें झालीं, नारायणाचा ठाव ना ठिकाण! पत्र नाहीं कीं समाचार नाहीं. शेवटीं बारानबारा चोवीस वर्षें गेलीं. तरी नारायण आहे कोठें? कोठेंच नाहीं. अखेर त्या वृद्ध मातुश्रीची दिवसेंदिवस निराशाच होत चालली. त्यांतून वृद्धापकाळ अधिकाधिकच होत चालल्यामुळें त्यांचे हातपाय थकत चालले. दृष्टि तर

अगदींच मंदावत चालली! त्यांच्या जिवाला चैन म्हणून नाहीसें झालें. हें पाहून एके दिवशीं श्रेष्ठ त्यांस म्हणाले:—

"आई! आपण नारायणाकरितां इतका शोक करतां व ध्यास धरून बसतां हें ठीक नाहीं. मी माझ्याकडून आपल्याला सांगावयाचें तेवढें सांगतों, पण आपले समाधान होत नाहीं. ह्यावरून आपल्याला पूर्ववृत्तांताचें स्मरण राहिलें नाहीं असें दिसतें. तें जर असतें तर आपण इतका शोक केला नसता. पूर्वीं नाथमहाराजांनीं नारायणास काय आशिर्वाद दिला आहे, तो आठवतोना? त्याचें स्मरण करा. 'हा मुलगा मोठा भगवद्भक्त होईल; जगद्विख्यात होईल; जगाचा उद्धार करील.' असा त्यांस आशिर्वाद दिला होताना? तो असत्य होईल असें आपल्याला वाटतें काय? नाहींना? तर मग आपण इतक्या कष्टी कां होता? नारायण कोठेंही असला तरी तो खुशालच असणार. श्रींची त्याच्यावर अशी तशी नव्हे—परिपूर्ण कृपा आहे. आणि साक्षात् मारुतिराय त्याच्या संरक्षणार्थ बसले आहेत. तो आपलें देहदंडन करीत आहे; तपश्चर्या करीत आहे; त्याचा अधिकार केवढा? हें आपण मनांत आणून स्वस्थ असावें. नारायणाची काळजी आपण तिळमात्र करूं नये. त्याची काळजी श्रीआपणाहूनच करीत आहेत."

हें ऐकून राणूबाई म्हणाल्या "होय; बाबा! तूं म्हणतोस तें सर्व सत्य आहे. मलाही आठवण झाली खरी. नाथमहाराजांच्या आशिर्वादानें नारायण तसाच होईल यांत शंका नाहीं. परंतु तो मला कधीं भेटेल? आणि मी त्याच्याशीं कधीं बोलेन? असें मला वाटतें."

श्रेष्ठ म्हणाले "आई! तुम्ही तिळमात्र काळजी करूं नका. अखंड श्रीचें ध्यान करून समाधानवृत्तीनें रहा. म्हणजे नारायण आपणांस लौकरच भेटेल."

हें श्रेष्ठांचें भाषण श्रवण करून राणूबाईच्या मनास पुष्कळ धीर आला. त्यांनीं श्रेष्ठांस आपल्याला आत्मानात्म विचार सांगा अशी आज्ञा केली. तेव्हां श्रेष्ठांनीं त्यांस आत्मनात्म विचार सांगितला, तेणेंकरून त्या वृद्ध मातुश्रीच्या मनास पुष्कळ समाधान वाटूं लागून त्या श्रीरामाच्या ध्यानांत निमग्न झाल्या.

**पैठणास घार उठविली**—इकडे समर्थ पैठणास येऊन तेथेंच कांहीं दिवस राहत होते. ते नाथांच्या वृंदावनापुढें उभे राहून नित्य कीर्तन करीत असत. त्यांचें तें रसाळ व भक्तिप्रेमयुक्त कीर्तन श्रवण करून लोकांस अत्यंत संतोष वाटे. तें इतकें कीं 'हे दुसरे नाथच आहेत कीं काय!' असें लोक म्हणत असत. इतकी त्यांची तेथें ख्याति झाली होती.

पैठणास असतांना पायांत पादुका, हातांत माळ, गळ्यांत मेखला, मस्तकीं जटाभार, त्यावर टोप, काखेंत कुबडी, अंगावर हुरमुजीरंगाचीं वस्त्रें आणि पाठीशीं गलोल, असा समर्थांचा वेष असे, व त्याच वेषानें ते सर्व गांवांत फिरत असत. एके दिवशीं समर्थ फिरत फिरत गंगातटाकीं गेले. तों तेथें पुष्कळ ब्राह्मणमंडळी स्नान करीत होती. कोणत्याही नव्या मनुष्याचा वेष थोडासा निराळा किंवा विचित्र पाहिला कीं, त्याच्याकडे पहात राहावें, त्याची कुचेष्टा करावी, त्याची टवाळी करावी अशी जनाची चालच आहे. त्यांतून क्षेत्रस्थ ब्राह्मणांत आणि त्यांच्या मुलांत तर ती खोड विशेषच असलेली दृष्टोत्पत्तीस येते. समर्थांचा हा असा वेष, व त्यांत पाठीशीं गलोल हीं पाहाण्याबरोबर तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांस चांगलेंच फावलें.

त्यांपैकीं एका ब्राह्मणानें 'सूतोवाच' केलें. तो समर्थांकडे पाहून म्हणाला "कांहो ! तुम्ही हा असा विचित्र वेष केला आहे; हा आश्रम तरी कोण ? संन्यासाश्रम कीं वानप्रस्थाश्रम ?" समर्थांनीं त्यास उत्तर दिलें "छे छे ! हा संन्यासाश्रमही नव्हे, आणि वानप्रस्थाश्रमही नव्हे; हा ब्रह्मचर्याश्रम आहे." ब्राह्मण म्हणाला "मग आपण नेहेमीं पाठीशीं गलोल बाळगतां ह्याचें कारण काय ?" समर्थ म्हणाले "आम्ही श्रीरघुपतीचे दास असून स्वेच्छाचारी आहों. ह्यास्तव उगाच खेळण्यासाठीं म्हणून जवळ गलोल बाळगतों." हें ऐकून ब्राह्मण अधिकच कुचेष्टा करूं लागले. एकजण म्हणाला "मग ही गलोल खेळावयाचीच आहे, कां कांहीं अभ्यास करतां ?" समर्थ म्हणाले "नाहीं, निवळ खेळासाठींच नाहीं. थोडाबहुत अभ्यासही आहे." ब्राह्मण म्हणाले "तर मग ही आकाशांत उंचावरून घार उडते आहे, तिला खडा मारून खालीं पाडा पाहूं."

"आपण भूदेव आहां. जशी आज्ञा." असें म्हणून समर्थांनीं पाठीशीं असलेली गलोल हातांत घेऊन तिच्यावर खडा ठेवला व त्याचा

नेम धरून त्या घारीवर मारतांच घार पटकन् खालीं पडली, आणि तिचा प्राण निघून गेला! मग तर काय? टवाळी करावयाला त्यांस चांगलेंच फावलें. घार पडलेली पाहतांच समर्थांभोंवतीं साऱ्या ब्राह्मणांनीं व बायकामुलांनीं सारखा गराडाच घातला, व अचावचा तोंड सोडण्यास सुरवात केली.

कोणी म्हणाले "कांहो? तुम्ही साधु; हातांत माळ घेतली आहेत; मस्तकावर जटा; हुरमुजी रंगाचीं वस्त्रें धारण करतां; आमचा ब्रह्मचर्याश्रम आम्ही रामदास असें सांगतां आणि अशी हिंसा करतां? हा धर्म कोठचा?" समर्थ म्हणाले, "आपण आज्ञा केली म्हणून मीं तीस खडा मारला." मंडळी म्हणाली "आम्ही पाहिजे तें सांगितलें म्हणून काय? ज्याच्या कृत्याचा त्यानें विचार करावा कीं नाहीं? छे छे तें कांहीं नाहीं. तुम्ही हें अनन्वित कृत्य केलें, ह्याबद्दल प्रायश्चित्त घेऊन शुद्ध व्हा." म्हणून साऱ्या ब्राह्मणमंडळींनीं समर्थांस अगदीं काव काव करून सोडलें! समर्थांनाही त्यांची मजा पहावयाचीच होती.

शेवटीं समर्थ म्हणाले "बरें बोवा! प्रायाश्चित्त घेतल्यावर मग तरी ह्या साऱ्या पातकाचें निरसन होईल ना?" ब्राह्मण म्हणाले "हो हो; धर्मशास्त्राप्रमाणें प्रायाश्चित्त घेतल्यावर शुद्धि झालीच पाहिजे. नाहींतर प्रायश्चितें केलीं आहेत कशाला?" समर्थ म्हणाले "ठीक आहे; तर मग आमचीही प्रायश्चित्त घेण्याला तयारी आहे." क्षेत्रावर प्रायश्चित्ताची तयारी आहे म्हटल्यावर मग उशीर तो काय?

**आली सिंहस्थ पर्वणी। न्हाव्या भटा झाली धणी॥**

ह्या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें न्हाव्याचा काय आणि भटांचा काय अगदीं सवंगसुकाळ असतो. अशा वेळींच त्यांची पोळी पिकावयाची. मग समर्थांनीं सर्व ब्राह्मणांस विचारिलें कीं, "ठीक आहे. तर मग काय प्रायश्चित्ताचा विधि असेल तो सांगा." ब्राह्मण म्हणाले "ह्याला सक्षौर प्रायश्चित घेतलें पाहिजे." क्षेत्रस्थ मंडळींना वैदिक शब्दांच्या गुंडिकाच्या गुंडिका झालेल्या असतात. आणि त्यांतून 'नापिक' म्हटला कीं तो महाधूर्त. 'पक्ष्यांत काऊ आणि माणसांत न्हाऊ' अशी म्हणच चालत आलेली आहे. आणि त्यांतून क्षेत्रांतील न्हावी तर काय अगदीं डोळ्यांत तेल घालूनच बसलेले असतात.

समर्थांनीं घार मारली, व ब्राह्मणांची व त्यांची बोलाचाली होऊं लागली तेव्हां त्यांच्या भोंवतीं लोकही जमा झाले. त्यांत एक न्हावीदादाही सशस्त्र उभे होतेच. त्यांनीं 'सक्षौर प्रायश्चित्त' हे शब्द ऐकतांच तो पटकर घाटावर बैठक मारून बसला, व काखोटींतून धोकटी काढून 'फट् फट् फट् फट्' आपलें चटपटपणें वाजवूं लागला व समर्थांस 'बुवाजी! या बसा;' असा सारखा हाका मारण्याचा त्यानें धोशा लावला.समर्थांनींही त्याच्या हांकेला मान दिला. न्हाव्यानें समर्थांच्या जटा, दाढी मिशा पार नाहींशा करून यथेच्छ मुंडन करून सोडलें. यथाविधि क्षौर झाल्यानंतर समर्थांनीं गंगेत जाऊन स्नान केलें. नवें यज्ञोपवीत धारण करून पंचगव्य प्राशन केलें. नंतर समर्थांनीं सर्व ब्राह्मणांस साष्टांग नमस्कार घालून 'आतां तरी मी शुद्ध झालों काय?' म्हणून हात जोडून प्रश्न केला. तेव्हां सर्व ब्राह्मण म्हणाले "हो हो; शुद्ध झालांत बरें. आतां कशाचें पातक?"

समर्थ म्हणाले "हें जर खरें तर मग ही मेलेली घार अद्याप उठली कां नाहीं?" ब्राह्मण बोलले "मृत्यु पावलेला प्राणी उठणार कसा? वेदाची आज्ञा इतकीच आहे कीं, हिंसादि कर्म घडल्यास प्रायश्चित्त घ्यावें." त्यावर समर्थ हास्य करून म्हणाले "प्रायश्चित्त घ्यावें येवढी मात्र वेदाची आज्ञा आहे, आणि मृत जीव सजीव करण्यास वेदाची आज्ञा नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! पूर्वीं नाथमहाराजांना आपणच ह्या क्षेत्रांत छप्पन्न प्रायश्चित्तें दिलीं आणि त्यांनीं घेतलीं. असो; आतां मृत जिव उठतो किंवा नाहीं तें पाहूं या." असें म्हणून समर्थांनीं ती मेलेली घार घेऊन तिच्या आंगावरून हात फिरवून म्हणाले "बाई जा; तूं आकाशामध्यें पूर्वीं विहार करीत होतीस त्याप्रमाणें विहार कर; जा." असें म्हणून सोडतांच ती घार पंख फडफडावून आकाशांत उड्डाण करून पूर्ववत् फिरूं लागली! इतक्यांत समर्थांकडे पाहतात तों त्यांच्या मस्तकावर पूर्वींप्रमाणें जटाभार आहे तसाच आहे!

हा देखतादेखत चमत्कार पाहून सर्व ब्राह्मण आश्चर्यानें चकित झाले. त्यांनीं समर्थांपुढें लोटांगण घालून आम्ही सर्वस्वी अपराधी आहों असें म्हणून ते त्यांस शरण आले. तेव्हां समर्थांनीं त्यांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून सांगितलें कीं "तुम्ही साक्षात् भूदेव अहांत; मूर्तिमंत वेद

अहांत; आणि श्रीराम कर्ता समर्थ आहे. तो काय एक करणार नाहीं? ह्याकरितां घार उठली, हें सामर्थ्य तुमचेंच."

असें म्हणून हातांतील गलोल तेथें टाकून दिली, आणि स्वस्थानाकडे निघून गेले.

## जन्मभूमीचें दर्शन.

**जननी जन्मभूमिश्च जान्हवीच जनार्दनः।**
**जनकः पंचमश्चैव जकाराः पंच दुर्लभः ॥***

घार उठविण्याच्या अद्भुत चमत्कारापासून तर पैठणचे सारे लोक समर्थांना प्रत्यक्ष देवच मानूं लागले. आधींच हे कोणी एकनाथ महाराजांचे अवतार आहेत, असें समजून त्यांच्या कीर्तनास मनस्वी दाटी होत असे, आणि आतां घार उठविल्यापासून तर श्रोत्यांचे मान पुष्कळच वाढलें. झुंडीच्या झुंडी येऊन कोसळूं लागल्या. असा समर्थांच्या कीर्तनांचा सपा चालला आहे तोंच अंबाड प्रांतांतील एक ब्राह्मण सहज पैठणास आला होता, तो एकनाथमहाराजांच्या समाधीपुढें समर्थांचें कीर्तन श्रवण करावयास आला होता. त्यानें समर्थांस ओळखलें, आणि कीर्तन आटोपल्यानंतर समर्थांस भेटून नमस्कार केला. आणि विचारलें कीं "जांबेच्या सूर्याजी पंताचे आपण चिरंजीव आहां असें वाटतें, आपलें नांव 'नारायणबावा' नव्हे काय?" समर्थ म्हणाले "होय." त्यावर तो ब्राह्मण म्हणाला "आपण हा तीर्थाटणाचा व लोकांस उपदेशामृत पाजण्याचा मार्ग धरला आहे हें तर उत्तमच आहे. परंतु तुमच्याकरतां घरीं श्रेष्ठ व तुमच्या मातोश्री ह्यांनीं तुमचा फार घोसरा घेतलेला आहे. तीं तुमच्याकरतां अतिशय शोक करीत

* "जन्मदात्रीमाता; जन्मभूमी; जान्हवी म्हणजे भागीरथी; आणि जनार्दन–परमेश्वर; आणि पांचवा जनक, म्हणजे पिता हे पांच 'जकार' म्हणजे जकारयुक्त वस्तु परम दुर्मिळ होत."

आहेत. शोक करून करून मातोश्रींचे डोळे सुद्धां गेले ! ह्यास्तव एकवार त्यांची भेट घेऊन त्यांचें समाधान करावें हें उक्त आहे." समर्थ म्हणाले "फार उत्तम. त्यांच्या भेटीला जाऊं, आणि जन्मभूमीचें एकवार दर्शन घ्यावें असेंही आहे. तेव्हां हा योग बराच आहे."

इतकें बोलणें झाल्यावर तो ब्राह्मण थोड्या दिवसांनीं गांवीं जाऊन सांगणार त्याच्या आधींच समर्थ निघाले, ते जांबेस येऊन पोंचले. पायांत पादुका, गळयांत मेखळा, मस्तकीं जटाभार, हुरमुजी रंगाचीं वस्त्रें, हातांत माळ, अशा वेषानें जाऊन श्रीमारुतीचें दर्शन घेऊन आपल्या घरीं गेले, आणि अंगणामध्यें उभें राहून 'जय जय रघुवीर समर्थ!' असा मोठ्यानें गजर केला. मातोश्री घरांत बसल्या होत्या. त्यांनीं तो शब्द ऐकून म्हटलें "अग ! कोणी गोसावी आला आहे, त्याला भिक्षा घाल ग !" इतक्यांत समर्थ ओसरी चढून वर आले. तों श्रेष्ठांच्या कुटुंबांनीं भिक्षा आणली. ती पाहून समर्थ म्हणाले "हा भिक्षा घेणारा गोसावी नव्हे." हें समर्थांचे शब्द ऐकून मातुश्रींना परम आश्चर्य वाटून त्या म्हणाल्या "कोण ? नारोबा आला कीं काय ?" हें ऐकून स्वामी म्हणाले "होय, आई ! मीच आलों !" असें म्हणून समर्थांनीं मातोश्रीस साष्टांग नमस्कार घातला, व त्यांच्या चरणावर मस्तक ठेवलें. मग त्या माउलीच्या आनंदास कांहीं पारावार आहे काय ? आईच ती ! तिनें त्यांस जवळ घेतलें. आंगावरून हात फिरविला, डोक्यावरून हात फिरविला आणि म्हणाल्या "नारोबा, आतां तूं मोठा झालासरे. तुला एकदां पहावेसें वाटतें. पण डोळे कोठचे आणूं !" मातोश्रींचे हे प्रेमाचे शब्द ऐकून समर्थ म्हणाले "आई ! आपली मला पहावयाची इच्छा आहे, तर डोळ्याला काय उशीर ?" असें म्हणून समर्थांनीं मातुश्रींच्या नेत्रांवरून हात फिरविला. तों तत्काल त्यांची दिव्य दृष्टि होऊन त्यांस नेत्रांनीं दिसूं लागले ! तेव्हां समर्थांच्या त्या भव्य मूर्तीकडे पाहून मातोश्री म्हणाल्या "नारोबा ! तूं देशांतरावर जाऊन ही भूतचेष्टा शिकून आलास वाटतें ?" समर्थ हांसून म्हणाले "आई ! ज्याच्या जवळ मी ही भूतचेष्टा शिकलों तें महद्भूत कोणचें तेंच तुम्हाला सांगतों." असें म्हणून 'भूत गे माय' अशा पालोपदाचें एक पद तयार करून म्हटलें तें असें:—

## पद.

होतें वैकुंठीचें कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं ॥
लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥१॥
जातां कौशिक राउळीं । अवलोकितां भयंकाळीं ॥
ताटिका ते छळोनि मेली । तेंचि भूत गे माय ॥२॥
मार्गीं आतां वनांतरीं । पाय पडला दगडावरी ॥
पाषाणाची झाली नारी । तेंचि भूत गे माय ॥३॥
जनकाचें अंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगिलें ॥
वैदेही अंगीं संचरलें । तेंचि भूत गे माय ॥४॥
जेणें सहस्रार्जुन वधिला । तोही तात्काळाचि भ्याला ॥
धनु देऊनि देह रक्षिला । तेंचि भूत गे माय ॥५॥
पितयाचे भाकेसी । कैकेयेचे वचनासी ॥
मानुनि गेलें अरण्यासी । तेंचि भूत गे माय ॥६॥
चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासी ॥
सांगाते भुजंग पोसी । तेंचि भूत गे माय ॥७॥
सुग्रीवाचें पालन । वाळीचें निर्दालन ॥
तारी पाण्यावरि पाषाण । तेंचि भूत गे माय ॥८॥
रक्षी मरणीं बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण ॥
तोडी अमरांचें बंधन । तेंचि भूत गे माय ॥९॥
वामांगीं स्त्रियेला धरिलें । धांवुनि शरयूतीरा आलें ॥
तेथें भरतासीं भेटलें । तेंचि भूत गे माय ॥१०॥
सर्वांभूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय ॥
रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे माय ॥११॥

हें पद ऐकून राणूबाईस तर काय, ब्रम्हानंद लोटला! माझा नारायण मला भेटला हा एक, आणि त्याला डोळे भरून पहावयाला डोळे दिलेत हा दुसरा! त्या माउलीनें त्यांना घट्ट पोटाशीं धरलें आणि प्रेमानें त्यांचा कितीतरी गौरव केला.

श्रेष्ठ घरांतील देवघरांत स्नानसंध्या करीत होते. ते हें सर्व संभाषण

ऐकतच होते. त्यांच्याही अंतःकरणांत आनंदाची उकळी आली, आणि 'नारोबा आला काय !' असें तोंडानें म्हणतच हातांत यज्ञोपवीत धरून तेहि ओसरीवर आले. त्यांना पाहतांच नारोबांनीं त्यांसही साष्टांग नमस्कार घातला, आणि चरणीं मस्तक ठेवलें. त्यांस श्रेष्ठांनीं उठवून पोटाशीं धरलें आणि मस्तकाचें अवघ्राण केलें. तो त्या उभयतांचा आनंद काय वर्णन करावा ? केवळ भरतभेटच ती ! श्रेष्ठांनीं हातांत यज्ञोपवीत धरलेलें पाहून समर्थांनीं प्रश्न केला कीं "यज्ञोपवीत हातांतसें धरलें आहे !" श्रेष्ठांनीं उत्तर केलें. "बहुत वर्षांनीं भेटी झाल्या तर त्या देवासन्निध व्हाव्यात असें शास्त्र आहे. ह्यास्तव यज्ञोपवीत हातांत धरलें आहे. ह्यांत सूर्य आणि गायत्री ह्या दोन देवता आहेत. त्यांच्यासन्निध तुमची भेट घेतली." नंतर श्रेष्ठांनीं समर्थांस श्लोकरूपी प्रश्न केला तो असाः—

## श्लोक. [ इंद्रवज्रावृत्त ]

**तारुण्य लावण्यसंपन्न नारी । कौशल्यता वैभव चित्तहारी ॥**
**एकांत काळीं पडतां समंधू । मोहीं गुतेना तरि धन्य साधू ॥१॥**

ह्या प्रश्नावर समर्थांनीं तत्काल उत्तर दिलें:—

## श्लोक. [ उपजातीवृत्त ]

**स्वर्गांगना सन्मुख शीघ्र आली । लावण्यरूपीं नच दृष्टि घाली ॥**
**मुक्ताफळें काय शुकास खाशीं । अरण्य हीं नित्य मिरास त्यासीं ॥२॥**

हा श्लोक म्हणून पुन्हा समर्थ बोलले "आजपर्यंत ब्राम्हण्य संरक्षण करून परमार्थ साधन केलें आणि आपल्या दर्शनास आलों." हें भाषण ऐकून श्रेष्ठांसही फार संतोष झाला. नंतर स्नानसंध्या पूजादिक आटपून त्रिवर्गांची मोठ्या आनंदानें भोजनें झालीं. मातोश्रीस तर काय, आज एक नवाच प्राण कुडींत आल्याप्रमाणें उल्हास वाटत होता. भोजनोत्तर पुन्हा त्रिवर्ग मायलेंकरें प्रेमाच्या व सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसलीं. तेव्हां श्रेष्ठांनीं समर्थांस पुन्हा प्रश्न केला कीं, "तुम्ही येथून निघाल्यापासून काय काय केलें तें श्रवण करण्याची फार फार इच्छा आहे, तरी तें वर्तमान सांगावें."

हें ऐकून समर्थांनीं जांब सोडल्यापासून परत येईपर्यंत झालेला सर्व प्रकार मोठ्या आनंदानें उभयतांसही निवेदन केला. तो सर्व ऐकून श्रेष्ठ व

मातोश्री सद्गदित अंतःकरणानें म्हणाल्या "बाबा, तूं धन्य आहेस ! सर्वथा आपल्या कुळाचा उद्धार केलास. आतां थोडे दिवस तरी येथें रहा." अशी आज्ञा केली. तेव्हां समर्थही तेथें कांहीं दिवस राहिले.

नित्य सकाळीं स्नानसंध्यादि कर्में आटोपलीं म्हणजे उभयतां बंधु मातोश्री सान्निध बसून परमार्थपर भाषणें करीत. श्रेष्ठांचें प्रपंचांत राहून परमार्थ कसा साधावा अशाविषयीं निरूपण असे आणि नाशवंत प्रपंचाविषयीं वैराग्यवृत्तीनें अरण्यवास, उपासना वगैरे करण्याच्या संबंधानें समर्थांचें निरूपण असे; आणखी तें सुद्धां गद्यांत नव्हे तर अभंग वाणींत ! पूर्वींची साधुसंत मंडळी म्हणजे आतांच्या 'ट' स 'ट' जुळविणाऱ्या हटकवित्वापैकीं नव्हती. तर सहज बोलूं लागले तरी सुद्धां तें अभंगात्मक वाणींनेंच बोलत किंवा एकाद्या प्रश्नाचें उत्तर देणें झालें तरी ते तसेंच अभंग वाणीनें देत. श्रेष्ठ व समर्थ ह्यांचा हा प्रेममय व परमार्थपर संवादही असाच अभंग वाणींत चालत असे. त्यांच्या मुखांतून अहर्निश अभंग वाणीच निघे. शंभर शंभर कडव्यांचा एक एक असे दिवसांतून कितीतरी अभंग त्यांच्या मुखांतून प्रगट होत. ती अभंगवाणी व तो प्रेमा पाहून मातोश्रीसहि परम आनंद होत असे. अशा आनंदांत व प्रेमांत आठ पंधरा दिवस गेल्यानंतर समर्थांनीं "मला आतां गंगाप्रदक्षिणा करून कृष्णातीरीं जावयाचें आहे, करितां आज्ञा द्यावी." म्हणून मातुश्रींची व श्रेष्ठांची प्रार्थना केली. श्रेष्ठांनीं 'उत्तम आहे. श्रींच्या आज्ञेप्रमाणें करून लौकर यावें' असें म्हणून त्यांस संमति दिली.

परंतु मातोश्रींना मात्र तें ऐकून अत्यंत वाईट वाटलें. त्या म्हणाल्या, "नारोबा ! तूं गेलास तो इतक्या वर्षांनीं आज आलास आणि आतां पुन्हा जातो म्हणतोस, हें काय ? तूं गेलास म्हणजे सारें उदास वाटतें, मनाला फार दुःख होतें, तें माझ्यानें कांहीं सहन होत नाहीं; ह्याकरितां तूं आतां पुन्हा जाण्याचें मनांत आणूं नको." असें म्हणून त्या त्यांस गळ घालूं लागल्या. तें ऐकून समर्थांनीं श्रेष्ठांकडे पाहून विचारलें कीं, "मातोश्रींची आज्ञा काय होत आहे पहा ! आपण जवळ असतां मातोश्रीस दुःख, शोक राहवेत हें कसें ?" श्रेष्ठ म्हणाले "दुःख, शोक, न करण्याविषयीं मी जितकें सांगावयाचें तितकें सांगितलें आहे. आतां परिपूर्ण सांत्वन करण्याचा भाग आपल्याकडे ठेविला आहे, तो आपण करावा."

अशी श्रेष्ठांची आज्ञा होतांच समर्थांनीं मातोश्रीस नमस्कार करून विनंति केली कीं, "आम्ही उभयतां पुत्र आपल्यास असतां आपण असें दुःख करावें हें योग्य नाहीं. बोलून चालून हा मृत्युलोक आहे. येथें आपल्या मनाप्रमाणें सुख तें येणार कोठून ? समुद्रांत शिरून कोरडें निघावें म्हटलें तर तें साधावें कसें ? शिवाय सुख आणि दुःख हें मानण्यावर आहे. परमेश्वरानें जी स्थिति आपल्याला दिली आहे तींतच समाधान मानणें ह्याचें नांव सुख; व नसतीच कल्पना मनांत आणणें व त्याविषयीं मनास तळमळ लावून घेणें ह्याचें नांव दुःख. ह्यासाठीं सर्व भार श्रींच्या चरणीं ठेवून स्वस्थ चित्तानें त्याचेंच ध्यान करीत असावें, म्हणजे सर्व कांहीं आपल्या मनाप्रमाणें होऊन इच्छित मनोरथ पूर्ण होतात. ह्याविषयीं आपल्यास एक कथा सांगतों." असें म्हणून समर्थांनीं श्रीमद्भागवतांतील कपिल महामुनींनीं आपल्या मातोश्री-देवहूतीस जें आख्यान सांगितलें होतें, ती कथा सांगितली. ह्याच कथेला 'कपिलगीता' असें नांव आहे. ती समर्थांच्या मुखानें रसभरित कथा श्रवण केल्यामुळें मातोश्रींच्या मनाचें अत्यंत समाधान झालें, व त्या म्हणाल्या कीं, "अशीच समाधान वृत्ति निरंतर असावी." समर्थ म्हणाले "श्रीकृपें-करून अशीच वृत्ति राहील. काळजी नसावी." नंतर मातोश्रींनीं समर्थां-पाशीं पुन्हा गोष्ट काढली कीं, "श्रींचें पूर्वींचें अभिवचन आहे कीं, मला प्रत्यक्ष दर्शन द्यावयाचें. तरी तेवढी इच्छा परिपूर्ण झाल्यास जन्माचें सार्थक झालेसें होईल."

ही मातोश्रींची आज्ञा ऐकतांच समर्थांनीं श्रीरामचंद्राचें ध्यान केलें, आणि त्यांची प्रार्थना करून श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमंत, ह्या सर्वांच्या मातोश्रीस प्रत्यक्ष भेटी करून दिल्या. यामुळें त्या वृद्ध मातोश्रीस परमानंद होऊन समाधानवृत्ति कायम राहिली. तेव्हां समर्थांनीं मातोश्रींचा व श्रेष्ठांचा परम विनयानें निरोप घेऊन "आपण स्मरण कराल त्यावेळीं मी प्रत्यक्ष येऊन भेटेन." असें मातोश्रीस अश्वासन देऊन ते तेथून गंगाप्रदक्षणेस निघाले.

**गंगाप्रदक्षणा**—समर्थ मातोश्रींचा व श्रेष्ठांचा निरोप घेऊन निघाले ते समुद्राच्या मुखाजवळ गंगेचे सप्त ओघ होतात तेथें गेले. १ पहिला ओघ राजमेंहद्रीजवळ आहे. त्याला 'वसिष्ठ कोटीलिंगस्थान' असें म्हणतात.

२; दुसरा ओघ 'कौशिका' ह्या नांवाचा आहे. ३; तिसरा ओघ 'गौतमी' ४ चौथा ओघ 'वृद्ध गौतमी'. ५ पांचवा ओघ 'भारद्वाजा'. ६ सहावा ओघ 'आत्रेया' आणि ७ सातवा ओघ 'तूर्या'. असे सात ओघ आहेत. ह्याच सात मुखांनीं गोदावरी पूर्वसमुद्रास मिळाली आहे. म्हणूनच 'तिला सप्त-गोदावरी' असें म्हणतात. ह्या सप्त ओघांस सव्य घालून ते गंगेच्या दक्षिण तीरास आले, आणि तसेच गोदावरीला उजवे घालून कोठें न थांबतां श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथें गेले, व त्यास उजवे घालून पंचवटीस येऊन पोंचले. तेथें श्रीचें दर्शन घेऊन व सर्व तीर्थयात्रेचा वृत्तांत त्यांस निवेदन करून टाकळीस गेले. तेथें उद्धव गोसावी केवळ चातकाप्रमाणें मार्गप्रतिक्षा करीत होते, त्यांस भेटून व क्षेम कुशल विचारून तेथेंच आठ पंधरा दिवस मुक्काम केला. समर्थ जरी टाकळीस रहात तरी पंचवटींस येऊन श्रीराम-चंद्राचें दर्शन घेऊन जात असत. त्यांच्यामागें श्रीरामचंद्रांचा नेहमीं तगादा असे कीं, आपणास आम्ही जगदुद्धाराकरितां निर्माण केलें आहे. तरी आपण आतां कृष्णातीरीं जाऊन रहावें. तेथें आम्ही 'शिवराय' नामें करून स्वराज्यस्थापनेसाठीं नवीन राजा उत्पन्न केला आहे. त्यास सहाय करावें. असें रामचंद्र वारंवार समर्थांस सांगत असत, व समर्थ त्यांस अमुक अमुक झालें म्हणजे जातों असें म्हणत असत. असें पांच चार वेळ झालें. ह्या खेपेस मात्र रामचंद्रांनीं समर्थांच्या मागें फारच निकड लावली. ते त्यांस म्हणाले "झालें, आतां इकडील तुमचा सर्व कार्यभाग पुरा झाला. बारा वर्षें तपश्चर्या झाली; पुनश्चरणहि संपलें; आपल्या मनाप्रमाणें बारा वर्षें तीर्थयात्राहि झाल्या; गंगाप्रदक्षणा करावयाची तीहि केलीत. आतां तुम्ही कृष्णातीरीं जाऊन वास्तव्य करावें; विलंब लावूं नये."

ह्याप्रमाणें रामचंद्रांची पुन्हा आज्ञा होतांच समर्थ म्हणाले "जी आज्ञा होईल ती मला शिरसावंद्य आहे. परंतु मनांत एक हेतु राहिला आहे, तेवढा पूर्ण झाला कीं माझी तयारी आहे." "तो हेतु कोणता?" असें रामचंद्रांनीं विचारतांच "मी जी काय आजपर्यंत तपश्चर्या केली, तीर्थाटणें केलीं, गंगाप्रक्षिणा केली, त्या सर्वांचें पुण्यफलाचें उदक श्रींच्या हातावर घालावें अशी फार इच्छा आहे. ती श्रींनीं पूर्ण करावी." असें म्हणतांच रामचंद्रांनीं हास्यवदन करून सांगितलें कीं, "येवढेंचना? त्याला

आमचीही तयारी आहे." नंतर समर्थ गंगेवरून जाऊन स्नान करून आले, व बरोबर कलशांतून गंगोदक आणलें. त्यावेळीं रामचंद्रांनींहि परम प्रसन्न मुद्रेनें आपला हात पुढें केला. तेव्हां समर्थांनीं "आपण बारा वर्षें केलेली तपश्चर्या, पुरश्चरण व बारा वर्षें केलेली तीर्थयात्रा व गंगाप्रदक्षिणा इत्यादिकांचें सर्व श्रेय श्रीचरणीं अर्पण असो." असा संकल्प करून गंगेचें उदक रामचंद्रांच्या हातावर घातलें व रामचंद्रांनीं तें ग्रहण करून खालीं सोडलें. "ठीक आहे. आतां तरी आपले मनोरथ पूर्ण झालेना ? इकडील सर्व कार्य आटोपलें, तरी आपण आतां कृष्णातीरीं सत्वर जाऊन तेथेंच वास्तव्य करावें." अशी पुन्हां रामचंद्रांची आज्ञा झाली. तेव्हां समर्थांनीं तात्काल श्रींच्या चरणावर मस्तक ठेवलें व "मी आज्ञेप्रमाणें जातों" असें म्हणून टाकळीस आले. आणि आपला झालेला निश्चय उद्धवगोसावी ह्यास सांगितला. तेव्हां उद्धवगोसावी यांस परम दुःख झालें. ते म्हणाले "स्वामींनीं माझा अव्हेर करूं नये. मी स्वामींस सोडून अतःपर एकटा राहाणार नाहीं." असें म्हणून त्यांनीं नेत्रांत अश्रु आणलें. व बरोबर नेण्याविषयीं फारच गळ घातली. ते कांहीं केल्या समर्थांचे पायच सोडीनात.

वास्तविक पाहिलें तर टाकळीच्या पलीकडे दसपंचक गांवीं उद्धव गोसाव्यांचीं मातापितरें होतीं. परंतु त्यांचा-म्हणजे प्रत्यक्ष आईबापाचा—सुद्धां त्यांस इतका लळा नव्हता. ते आईबापाकडे कधीं फारसे जातही नसत. समर्थ हेच काय ते आपले माय बाप असें त्यांस वाटे. आणि तेंही एका अर्थी खरेंच होतें. कारण, जन्मदातीं मायबापें केवळ नांवाचीं होतीं. त्यांचे खरेखुरे मायबाप समर्थच होते. ते रात्रंदिवस समर्थांपाशींच असत. लिहिण्यावाचण्याचा अभ्यास त्यांनीं सारा समर्थांपाशींच केला होता. आणि रात्रंदिवस समर्थांशींच सहवास असल्यानें व त्यांचाच उपदेश निरंतर कानावर पडत असे त्यानें त्यांची वृत्तीही समर्थांसारखीच बनली होती. मध्यंतरी उद्धवांचें वय अगदीं लहान-केवळ अल्लड वृत्ति असतांनांच त्यांस समर्थांचा वियोग झाला होता. आणि तोही असा तसा वर्ष दोन वर्षांचा सुद्धां नव्हे, तर १२ वर्षांचा ! म्हणजे तब्बल एक तप ! तरी सुद्धां त्यांनीं तो सहन केला. समर्थ बारा वर्षें तीर्थाटन करून येईपर्यंत ते टाकळीच्या मठांतच समर्थांप्रमाणें मधुकरी मागून व श्रींची सेवा करून

निरंतर भगवतद्भक्तींत निमग्न असत. परंतु मनांत निजध्यास सारा समर्थांचा. त्यांचें वय जरी त्यावेळीं ऐन उमेदीचें होतें तरी ते अत्यंत निग्रहानें वागत. त्यांचें वैराग्य, तप, ध्यान, धारणा व उपासना निखालस समर्थांसारखीच होती. हीं बारा वर्षें समर्थांच्या वियोगाचीं केवळ समर्थांच्या आज्ञेवर व त्यांच्या आश्वासनावर दृष्टि ठेवून कशीं तरी त्यांनीं कंठलीं होतीं. आणि आतां पुन्हां जेव्हां समर्थ पर्यटनास निघाले तेव्हां त्यांच्यानें एकटें राहवेना.

उद्धवांचा तो प्रेमळपणा व दीनवाणी स्थिति पाहून समर्थांच्या पोटांतही दया उत्पन्न झाली. त्यांनीं त्यांस उठवून पोटाशीं धरलें आणि त्यांची समजूत केली कीं, "बाबारे! मी कांहीं आतां कोठें दूर जात नाहीं. पूर्वीं माझी तीर्थयात्रा फार दूरदूरची होती. हिमालयामधील प्रवास फार कठीण होता. तसा कांहीं आतां प्रकार नाहीं. मी आतां कृष्णातीरीं जात आहे. तेथें श्रीची उपासना वाढविण्याची खटपट करतों. अवघा फार तर चार पांच दिवसांचा रस्ता. तेथें एखादें बरेंसें क्षेत्र पाहून श्रीची स्थापना झाली, व कांहीं उपासना मार्ग चालू झाला कीं, मी तुला घेऊन जाईन. तूं कांहीं काळजी करूं नको." ह्याप्रमाणें समर्थांनीं उद्धवाची समजूत केली. त्याच्या पाठी. वरून हात फिरविला, त्याचे डोळे पुसले आणि मुखावरून हात फिरवून त्याचा निरोप घेतला.

उद्धवांचं वय त्यावेळीं विशीच्या सुमाराचें होतें, तरी ते फार समजूतदार असत. त्यांनीं ती गोष्ट मान्य केली, व समर्थांच्या चरणांवर मस्तक ठेवलें. नंतर समर्थ तेथून निघाले ते शके १५६६ तारणनाम संवत्सरांत थेट कृष्णातीरीं श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथें येऊन दाखल झाले.

येथपर्यंत त्यांचीं तीन तपें पुरीं झालीं. म्हणजे पहिलीं बारा वर्षें बाल्यदशेंत जांबेमध्यें गेलीं. दुसरीं बारा वर्षें पंचवटींत तपश्चर्येंत गेलीं, आणि तिसरीं १२ वर्षें तीर्थाटनांत गेलीं. ह्यापुढील कृष्णातीरवासापासून त्यांच्या चवथ्या तपास सुरुवात झाली. राहिलीं. अर्थात् त्यांच्या जीवनक्रमाचें पूर्वार्ध संपलें. आतां चवथ्या तपापासूनत्यांच्या जीवनक्रमाचा उत्तरार्ध लागला. तोच काय तो अत्यंत महत्वाचा भाग होय. जगदुद्धाराचा खरा प्रारंभ काय तो येथपासूनच होतो. यास्तव हा तिसरा भाग येथेंच पुरा करून यापुढें चवथ्या भागाला व चवथ्या तपाच्या लीलेला प्रारंभ करूं.

# समर्थांचें सामर्थ्य.

## किंवा

# श्रीमत्सद्गुरु रामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## पूर्वार्ध.

### भाग ४ था–चवथें तप.

[ शके १५६६ ते १५७८. ]

**परोकाराय दुहंति गावः परोकाराय वहंति नद्यः**
**परोपकाराय फलंति वृक्षाः परोकाराय मिदं शरीरम् ॥ १ ॥ ***

कोठेंहि जा; जन्माच्या इतिकर्तव्यतेचें तत्त्व एकच; तें कोणतें? तर 'परोपकाराय मिदं शरीरं' परोपकाराकरतां देह झिजवणें हें. तें समर्थांच्या हृदयांत जन्मादारम्यच बाणलेलें होतें. म्हणूनच तें:—

**मना चंदनाचे परी त्वां झिजावें।**
**परी अंतरीं सज्जना नीववावें ॥**

ह्या सुभाषितरूपानें पुढें त्यांच्याच मुखांतून बाहेर पडलें. 'जगदुद्धार' 'जगदुद्धार' म्हणजे तरी काय? हेंच. लोककल्याणाकरितां अहर्निश झटावयाचें, ह्याचेंच नांव जगदुद्धार. पण कोणतेंहि कृत्य करावयाचें तर त्याला आधीं साधनसामुग्रीची सिद्धता करावी लागते. आपल्याला थोडेंबहुत समजावयाला लागलें पुरें कीं, लिहावयाला वाचावयाला शिकवितात; विद्या-

---

* " गायी दूध देतात त्या परोपकारासाठीं देतात; नद्या वाहतात त्याहि परोपकारासाठींच वाहतात; वृक्ष फलद्रूप होतात हे सुद्धां परोपकारासाठींच होतात. ह्यावरून हें सर्व शरीर जें निर्माण केलें आहे, तें केवळ परोपकारासाठींच निर्माण केलें आहे हें ध्यानांत ठेवावें."

भ्यास करावयास लावतात; तें का? तर थोरपणीं जगांतील आपलीं कर्तव्यें काय आहेत तीं कळावींत म्हणून. लिहिणें वाचणें, वेदाध्ययन, काव्य, व्युत्पत्ति, शास्त्राध्ययन, व्यायाम, हें सर्व काय? तर हीं सारी पूर्वतयारी. कशाची? तर आपण वयांत आल्यानंतर पुढें जगांत कसें वागावें? आपलें कर्तव्य यथायोग्य कसें करावें? ह्याची. ही पूर्वतयारी जितकी जोमाची व भरपूर असतें, त्या त्या मनानें तिचें फल मनुष्यास प्राप्त होत असतें. व त्याच मानानें त्याला सुख किंवा कीर्ति प्राप्त होत असते. म्हणून ह्या पूर्वतयारीसच लोक फार जपतात. तिच्यासाठीं करवेल तेवढे प्रयत्न करतात. आई, बाप, गुरु, पालक, आपआपल्या मुलांविषयीं अगदीं लहानपणापासून जीं जपत असतात तीं येवढ्याचकरितां कीं, त्यांची पूर्वतयारी उत्तम व्हावी; कारण प्रत्येक मनुष्याच्या भावी कर्तव्याची, सुखाची कर्तबगारीची सर्व मदार ह्या पूर्वतयारीवरच अवलंबून असते.

आपले दयाळु इंग्रजसरकार ह्या पूर्व तयारीबद्दल अर्थात् शिक्षण देण्याबद्दल किती दक्षता ठेवतें, ही गोष्ट जगजाहिर आहे. विद्यादानांत महत्पुण्य आहे, ह्याची त्याला पूर्णपणें जाणीव आहे. परंतु त्याच्या ह्या आलीकडच्या शिक्षणपद्धतींत व प्राचीन कालच्या किंवा पूर्वींच्या शिक्षणपद्धतींत जमिनअस्मानाचें अंतर आहे. लेखन, वाचन, पुस्तकें; प्रत्येक शास्त्रांतील गम्य समजावें म्हणून निरनिराळ्या शास्त्रांचे प्रोफेसर; ह्या प्रत्येक विषयाचा भारा त्या अल्पवयस्क मुलावर इतका लादला जातो कीं, त्याच्या गुरुत्वानें त्यांचीं हाडेंव्हाडें झिजून जातात. मग त्यांच्या शरीराच्या आरोग्याकरितां व्यायामाची योजना. क्रिकेट, टेनिस, बॉल, फुटबॉल वगैरे पाश्चात्य खेळ; स्वीमिंग बाथ, बोटिंग—होड्यांच्या शर्यती! पण अखेर काय? पालथ्या घागरीवर पाणी!

परंतु समर्थांचें शिक्षण कसें व किती झालें तें पहा. त्यांचें शिक्षण जांबेंतच झालेलें. अर्थात् तें खेडेंगांव, हवापाणी उत्तम. नदीचा कांठ. खेळणें, बागडणें, उड्या मारणें, झाडावर चढणें ह्याच्या योगानें शरीरप्रकृति निकोप. पोहण्यांत नंबर पहिला. तीन तीन दिवस पाण्यांत बुडून राहावयाचें. दगडाच्या मूर्ती डोहांतून वर उचलून आणावयाच्या. कोयना नदींत बुडालेल्या गोष्टीवरून व अंगारच्या डोहांतून व बाह्याच्या डोहांतून दगडी

मूर्ती बाहेर काढल्या ह्यावरून ह्या गोष्टी सिद्ध आहेत. ह्या शरीरसामर्थ्या-पुढें ह्या व्यायामापुढें क्रिकेट, टेनीस, फुटबॉल किंवा बोटिंग तरी काय होय ? ह्या शरीरसामर्थ्याच्या गोष्टी झाल्या. आतां विद्येंत पाहूं.

समर्थ हे आतांच्या कालच्या विद्वानाप्रमाणें बी. ए, एम्. ए. नव्हते हें तर उघडच आहे. पण त्या वेळच्या स्थितीप्रमाणें सुद्धां ते मोठे वैयाकरणी नव्हते ; वेदपाठी नव्हते ; जटापाठी नव्हते कीं दशग्रंथी ब्राह्मणही नव्हते. जांब हें बोलून चालून खेडें. तेथें कशाची शाळा आणि कशाचें विद्यापीठ ! एखादे गांवठी पंतोजी सुद्धां होते कीं नव्हते कोण जाणे ! त्यांसुद्धां बारा वर्षांतला सारा कारभार. १६३० मध्यें समर्थांचा जन्म झाला; आणि १५४२ मध्यें तर ते पंचवटीस जाऊन तपश्चर्येला बसले ! तेव्हां विद्या-भ्यासाला वेळ तो कितीसा मिळाला ह्याचा विचार करावा. बारा वर्षां पैकीं ५ किंवा निदान ४ वर्षें तरी अगदीं बाल्यदशेंत हीं जावयाचींच. चार वर्षांत शाळा कशाची आणि विद्याभ्यास कशाचा ? तेव्हां बाकी उरलीं वर्षें ८; तेवढ्यांत त्यांनीं किती किती गोष्टी साधल्या होत्या, त्या त्यांच्या पुढील चरित्रावरून कळून येण्यासारख्या आहेत.

त्यांना लिहितां वाचतां तर उत्तम येत होतें; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं कल्याणस्वामीच्या विनंतीवरून त्यांस घालून दिलेला कित्ता प्रत्यक्षच हल्लीं डोम-गांवच्या मठांत आहे. तेव्हां त्यांच्या पट्ट छात्राप्रमाणें (शिवाजीमहाराजांप्रमाणें) लेखनवाचनाच्या संबंधानें तरी वादविदाचा कीस पाडावयास नको ! ते धर्मशील ब्राह्मणांच्या घराण्यांत उत्पन्न झाले होते त्याअर्थी, संध्या, पूजा, नैवद्य, वैश्वदेव, ब्रह्मयज्ञ, पवमान, रुद्र, सौर, रामरक्षा इत्यादि किरकोळ अध्ययन हें झालेलें असणारच, ह्याबद्दल वाद नाहीं. पंचवटींत त्यांनीं ज्याअर्थी आपण होऊनच पुराण सांगितलें, त्याअर्थीं त्यांचा संस्कृत अभ्यासही चांगला असून व्युत्पत्तीही चांगलीच असली पाहिजे. पैठणास नाथ महाराजांच्या समाधीपुढें कीर्तन करीत ह्यावरून त्यांचें तालसुरज्ञान, वक्तृत्व व बहुश्रुतपणा ह्या गोष्टीही उत्तम प्रकारें व्यक्त होतात. त्यांची कविता तर पुष्कळच आहे. तेव्हां ते कवि असून त्यांनीं मराठी व संस्कृत कविताही पुष्कळच पाहिलेली असावी. आठ वर्षांत किंवा बारा वर्षांच्या वयांत येवढें ज्ञानसंपादन करणें म्हणजे बुद्धिमत्तेची पराकाष्ठा होय यांत तिळमात्र शंका

नाहीं. आणि म्हणूनच '**गुणिषु नच लिंगं नच वयः**' असें म्हणतात, तेंच खरें आहे.

पण विद्येपेक्षांही जगाचा अनुभव हा ह्या पूर्वतयारींतला मुख्य व प्रधान भाग होय. आणि प्रवासावांचून, देशपर्यटनावांचून हा अनुभव येणें निखालस दुरापस्त असतें. ही गोष्ट अर्वाचीन लोकांससुद्धां मान्य आहे. म्हणूनच इंग्रज सरकारसुद्धां केवळ परीक्षा पास झाली तरी तो परिपूर्णतेस पोंचला असें समजत नाहीं. विद्याभ्यास झाल्यानंतर त्यानें देशपर्यटन करून यावें तेव्हांच त्या विद्वत्तेची सांगता होते असें इंग्रजसरकारचें सुद्धां ठाम मत आहे. म्हणूनच सायन्स कॉलेजसारख्या विद्यालयांतील विद्यार्थी एकजुटीनें काश्मीरासारख्या प्रदेशापर्यंत पाठविण्यांत येतात. व 'राजकोट'च्या राजकुमार कॉलेजांतील राजकुमारांचाही शेवटीं देशभर प्रवास केल्यावांचून त्यांच्या विद्यासंपादनचा कोर्स पुरा झाला असें समजत नाहींत.

परंतु हा अलीकडच्या श्रीमंती व चैनी विद्यार्थ्यांचा प्रवास कोणीकडे ? आणि समर्थांचें खडतर तपश्चर्येचें पवित्र व निर्मळ तीर्थाटन कोणीकडे ? बूट, स्टाकिंग, कोट, जाकीट, रेनकोट, बायसिकल, रबरी गादी, उशी, स्टोव्ह, स्पिरिट, चहा, कंडेन्स मिल्क, सोडा, फ्रुट साल्ट, फराळाचा कीट, चाकरनोकर; सिगारेट; मॅचेस; एखादा जटलमन कंप्यानियन; सेकंड क्लासचें तिकिट; गांवांत मोटार, नोटांनीं भरलेला खिसा; ब्यांकेचें बुक बरोबर, आणि एक सुरेखसें रिव्हाल्व्हर उशाशीं ! इतक्या जय्यत तयारीनिशीं स्वारी बाहेर पडावयाची ! अशा श्रीमंती व ऐषआरामाच्य देशपर्यटनानें काय अनुभव येत असेल, व अंगांत कितीसा काटकपणा व सोशिकपणा येत असेल तो परमेश्वर जाणें !

पण तीच समर्थांच्या तीर्थाटनाची तयारी पहा ! किती बरें सोपी ? नेसावयाला कौपीन; अंगांत मेखळा; पायांत खडावा; हातांत माळ; आणि काखेंत कुबडी ! जवळ कपर्दिक नाहीं, मग फराळाचा डबा कोठचा ? अशा थाटानें गंगोत्रीपासून तों थेट लंकेपर्यंतचा प्रवास करून आले; इतकेंच नव्हे तर ठिकठिकाणीं मठ स्थापन करून श्रीची मूर्ति बसवून पूजानैवेद्याची तजवीज करून सांप्रदाय सुरू केला ! केवढा हा आत्मविश्वास !

ह्या समर्थांचा प्रवास कोणिकडे आणि हल्लींच्या लोकांचे ऐष आरामांतले गाद्यांगिरद्यांवरचे प्रवास कोणीकडे ? हल्लींचे उन्हाळ्यामध्यें राजविलास 'महाबळेश्वर' 'माथेरान' 'निलगिरी' इत्यादि ठिकाणचें गिरिशिखरारोहण कोणीकडे ? आणि हिमालयासारख्या बर्फाच्या धोंडींतून, गिरिकंदरांतून, निर्जन मनुष्यांतून रात्रंदिवस बेधडक फिरण्याचें धाडस कोणीकडे ? त्या शरीरसामर्थ्यांची, व हल्लींच्या शरीसामर्थ्यांची व 'सॅनिटरी' तत्त्वांची तुलना ज्यानें त्यानें आपआपल्या मनाशींच करावी म्हणजे नैसर्गिक पद्धति कोणती व कृत्रिम पद्धति कोणती, शाश्वत कोणती व अशाश्वत कोणती ह्याचा हृदयांत प्रकाश पडल्यावांचून राहावयाचा नाहीं. पण ह्याशिवाय आणखी एक मुख्य मुद्दा तो राहिलाच. तो मुद्दा हा कीं, हल्लींचे विद्वान् बी. ए., एम्. ए. च्या पदवीची मजल गांठीपर्यंत बहुधा दोनचार मुलांचे बाप बनून पाण्याचे पितर दिसूं लागतात ! 'कॉड लिव्हरऑईल'च्या पवित्र स्नेहाशिवाय त्यांचा एक दिवस जात नाहीं ! आणि समर्थांच्या मुखावर अव्वल ब्रह्मचर्याचें तेज झळकत असल्यामुळें त्यांची कांति दैदीप्यमान दिसत असे.

वरच्या सर्व प्रतिपादनावरून हल्लींचें शिक्षण किंवा स्वकर्तव्याची पूर्वतयारी कशी असते, व पूर्वींची समर्थांची पूर्वतयारी कशी झाली होती ह्या दोनही स्पष्टपणें डोळ्यासमोर उभ्या राहतात. ह्यासाठीं अशा रितीची अपूर्व तयारी समर्थांची झाल्यानंतर पुढें त्यांनीं आपल्या कर्तव्याचा रोंख कोणीकडे वळविला; त्यांत त्यांना कसकसें यश येत गेलें, त्यांनीं जगदुद्धादार केला तो कसा काय केला, जनांस कोणता अनुग्रह लावून दिला, व त्यांच्यावर श्रीरामचंद्रांनीं कशी कृपा केली, त्याचा प्रारंभ ह्या भागांत करावयाचा आहे.

शके १५३० मध्यें समर्थांचा जन्म झाला व ते १२ वर्षांच्या वयाचे असतां म्हणजे १५४२ मध्यें ते पंचवटीस गेले. हें त्यांचें पहिलें तप होय. हें त्यांचे बाललीलेंत, खेळ खेळण्यांत व शिक्षणांत गेलें. आणि अखेर लग्नाचा खेळखंडोबा करून ते घराबाहेर पडले. ही त्यांच्या जीवनचरित्रांतील प्रथम तपाची समाप्ति. पंचवटीस त्यांनीं कडकडीत तपश्चर्येंत, गायत्रीपुरश्चरणांत व श्रीरामचंद्राच्या सेवेंत एक तप म्हणजे बारा वर्षें घालविलीं आणि शके १५५४ मध्यें ते पृथ्वीप्रदक्षणेस निघाले. आणि

बद्रीकेदार, बद्रीनाथ वगैरे हिमालयपर्वतापासून तों थेट रामेश्वर; लंका, वगैरे तीर्थयात्रा व गंगाप्रदक्षिणा इत्यादिकांत एक तप म्हणजे बारा वर्षें घालविलीं. अर्थात् त्यांच्या जीवनक्रमांतील हें तिसरें तप पुरें झालें. नंतर श्रीरामचंद्रांच्या आज्ञेवरून ते शके १५६६ मध्यें पंचवटीहून निघून श्रीकृष्णातीरीं आले, व येथपासून त्यांच्या चवथ्या तपास आरंभ झाला.

ह्यावेळीं समर्थांचें वय ३६ वर्षांचें झालें होतें. पुढें त्यांचे आयुर्मान ३६ ३७ वर्षेंच राहिलें होतें. अर्थात् तीन तपें झालीं व तीनच तपें पुढें शिल्लक राहिलीं. म्हणजे त्यांच्या जीवनचारित्राचा पूर्वभाग संपला व उत्तरभागास आरंभ झाला. पूर्वभागांत म्हणजे पहिल्या तीन तपांत त्यांची फक्त पूर्व-तयारी झाली. आतां यापुढें कर्तव्य म्हणून जें काय करावयाचें तो भाग पुढें आला. त्यांत त्यांनीं श्रीरामचंद्रांच्या आज्ञेप्रमाणें ‘जगदुद्धार’ काय काय व कसा कसा केला तो पहावयाचा. हाच भाग काय तो अत्यंत महत्त्वाचा होय. समर्थांची जी काय कामगिरी ती सारी त्यांतच दिसून येते.

पृथ्वीप्रदक्षिणा पुरी झाल्यानंतर समर्थ पंचवटीहून जे निघाले ते शके १५६६ तारणनाम संवत्सरीं श्रीकृष्णेच्या तीरीं श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथें येऊन राहिले. समर्थ कोठेंहि जावोत तेथें कीर्तनाचा तडाका सुरू व्हावयाचा हें पहिलें काम; कारण, जगदुद्धार करावयाचा म्हणजे तरी काय? तर आधीं आपल्या परिस्थितीला चांगलें काय, वाईट काय, आपलें यावेळीं कर्तव्य कोणतें, जन्माची इतिकर्तव्यता कशी? हेंच प्रत्येकास स्पष्टपणें कळणें अवश्य असतें. ह्यासाठीं कोठेंहि पहा, जनास उपदेश करणें हेंच झाल्याचें पहिलें काम असतें. कोठेंहि गेलें तरी हाच क्रम दृष्टीस पडतो.

परंतु इतर सर्व बाबतीप्रमाणें पूर्वींची उपदेश करण्याची पद्धति व हल्लींची उपदेश करण्याची पद्धति ह्याही भिन्न भिन्नच आहेत. हल्लींच्या उपदेशाची पद्धत म्हणजे व्याख्यान मालिका. आज कोण हे महात्मे आले; आज कोण हे नामदार आले; आज कोण फलाणे फलाणे देशभक्त आले कीं, झाली व्याख्यानांची झोड सुरू. ही व्याख्यानांची पद्धति म्हणजे वाईट आहे असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु ती कित्येक वेळां अगदीं कंटाळवाणी होत असल्यामुळें तिच्या-पासून व्हावा तसा जनांच्या मनावर परिणाम होत नाहीं. ह्या व्याख्यानांना जावयाचे लोक म्हणजे देशभक्त, स्वराज्यभक्त, म्हणविण्यांत पुढाकार घेणारे

व चळवळे विद्यार्थी ह्यांचाच जमाव. येवढ्यांचीच बहुधा त्यांत भरती असते. इतर बायकामुलें किंवा खेड्यापाड्यांचे गांवढळ लोक त्यांत कोणीच नसतात. ह्याचें कारण, त्या विषयाचें, भाषेचें, व विचारसरणीचें ज्यांना ज्ञान असतें, तेवढ्यांनाच कायतीं तीं व्याख्यानें मनोरंजक वाटतात. इतरांना त्या व्याख्यानांत कांहींच मनोरंजकता वाटत नाहीं.

साधुसंतांनीं उपदेश करण्याची जी पद्धत सुरू केली ती अशी कंटाळवाणी नव्हती. त्यांची तऱ्हा म्हणजे कीर्तनाची होय. अति प्राचीन कालापासून चालत आलेली उपदेशाची पद्धत म्हटली तर ती पुराणीच होती. कीर्तनाची पद्धति प्राचीन काळीं सुद्धां होती असें दिसत नाहीं. महाभारत, भागवत, इत्यादि पुराणग्रंथांत 'सूत' हे शौनकादिक ऋषींना सांगतात असाच जेथें तेथें आरंभ आढळतो. निरंतर हातांत वीणा वागवून भगवद्गुणानुवाद गायन करावयाचें, कीर्तन करावयाचें, इत्यादि वर्णनें प्राचीन ग्रंथांत कोठें कोठें आढळतात. व 'कीर्तन' ही नक नवविधा भक्तीपैकीं एक भक्ती मानलेली आहे हेंही खरें आहे. परंतु तें कीर्तन केवळ नामसंकीर्तन व भजन होय. हल्लींची आपल्यामध्यें असलेली कीर्तन पद्धति कांहीं त्यावेळीं नव्हती. आपली हल्लींची आबालवृद्धांस, अक्षर शत्रूंस, शास्त्रीमंडळास, विद्वज्जनांस, काव्यरसिकांसही तृप्त करणारी, मनास तल्लीन करून टाकणारी जी कीर्तनपद्धति आहे ती नामदेव तुकाराम, इत्यादि महाराष्ट्र साधूंपासूनच उत्पन्न झाली आहे. चालू कीर्तनपद्धतीचा पाया त्यांनींच घातला.

आपली चालू कीर्तनपद्धति आहे ती फार अपूर्व आहे. तिच्यामध्यें असा कांहीं मोहकपणा साधला आहे कीं, कोणत्याही परिस्थितींतील मनुष्य असो; मधाला माशी लुब्ध झाल्याप्रमाणें तो तिला लुब्धच होऊन बसतो. गायन असल्यामुळें गायक मंडळी खूष होते; वाद्य असल्यामुळें वादनपटु आनंदानें डुलूं लागतात; काव्यमय प्रसादवाणी श्रवण करून रसिक लोकांचें अंतःकरण प्रसन्न होतें; वेदांत वाणीचें रहस्य ऐकून जिज्ञासूंचा आत्मा तृप्त होतो. मनोहर चरित्रें ऐकून भोळ्याभाबड्या स्त्रीपुरुषांच्या हृदयांत गुदगुल्या होतात. बोधामृतानें तत्त्ववेत्ते 'धन्य धन्य' म्हणूं लागतात, व विनोदपर गोष्टींनीं पंगत असलेल्या मुलांतसुद्धां हंशाच हंशा पिकतो. शिवाय अव्वलपासून अखेर-

पर्यंत भक्तिरसाचा पूर असल्यामुळें त्यांतून बाहेर निघावें असें कोणासच वाटत नाहीं. अशी ही आमची कीर्तनाची साधुसंतांनीं प्रचलित केलेली पद्धति सर्वांगसुंदर आहे. तेव्हां अशा सर्वमान्य पद्धतीशिवाय समर्थ तरी जनास उपदेशामृत पाजायास दुसरी कोणती पद्धत घेणार? अर्थात् महाबळेश्वरास गेल्यानंतर समर्थांनीं आपल्या कीर्तनाचा तडाका सुरूं केला.

समर्थांची मूर्ति भव्य; मुखावर तपश्चर्येची कांती; वैराग्याचें जागतज्योत स्वरूप; वाणी मधुर आणि दयाभूत; आवाज स्पष्ट, खणखणीत व आवेश-युक्त; पाठांतराची समृद्धि; मनास प्रसन्न करणारी समयसूचकता इत्यादि अनेक गुण कीर्तनास साधनीभूत असल्यामुळें त्यांच्या कीर्तनाची श्रोत्यांच्या मनावर छाप बसावयाला मुळींच वेळ लागत नसे. लोकांच्या झुंडीच्या झुंडी कीर्तनश्रवणास गोळा होत. आणि 'कोणास कांहीं न मागणें' हा बाणा; हें त्यांत आणखी विशेष. आधीं समर्थांची नेहेमींची रहाणीच अशी होती कीं, त्यांस पाहिल्याबरोबर त्यांच्या ठिकाणीं पूज्यभावच उत्पन्न व्हावा. आणखी त्यांत त्यांच्या तोंडच्या कीर्तनाची भर पडली म्हणजे भक्तिमाते मनुष्याच्या अंतःकरणाला त्यांचा वेधच लागून राहत असे. ह्यामुळें ते आपल्या कीर्तनांत जो जो विषय काढीत त्याचा त्याचा ठसा लोकांच्या मनावर अगदीं कायमचा होऊन रहात असे.

समर्थांची स्वारी महाबळेश्वरास गेल्यापासून ज्याच्या त्याच्या तोंडीं समर्थांचाच विषय भरून राहिला होता. कोणी म्हणत 'काय हो अधिकार-युक्त वाणी?' कोणी म्हणावें 'भक्तिरस ऐकून मनाला तर अगदीं पाझर फुटतो बोवा!' कोणी म्हणत 'आजपर्यंत पुष्कळ हरिदास पाहिले परंतु ह्यांची सर नाहीं' 'सद्‍गुरु असावा तर असा असावा. नाहींतर सारे गुरूच!' 'किती किती निस्पृह पुरुष आहे? एका दमडीची आशा नाहीं.' अशा प्रकारें जो तो समर्थांचें स्तुतिस्तोत्रच गात असे.

समर्थ कोठेंही जावोत, त्यांच्यापाशीं नवानवा शिष्यसंप्रदाय हा आपला जमावयाचाच. त्याप्रमाणें महाबळेश्वरींही अनेक शिष्य जमले. जो तो शरण येऊन अनुग्रहमंत्र मागत असे. समर्थही होतां होईल तों त्याची टाळाटाळच करीत. परंतु जो खराच मंत्रोपदेशाला पात्र असे व ज्याची निष्ठा खरी खरी दिसून येई त्यासच ते अनुग्रह देत असत. तरीसुद्धां

त्यांच्याजवळ प्रत्येक ठिकाणीं कितीतरी शिष्यवर्ग जमत असे. समर्थांनीं महाबळेश्वरास जो कीर्तनारंभ केला होता, तो चातुर्मास्याच्या निमित्तानें केला होता. त्यामुळें तेथील मंडळीस तो एक अपूर्व लाभच वाटत असे.

ह्या चातुर्मासाच्या अवधींत महाबळेश्वर येथील अनेक गृहस्थ व भिक्षुक समर्थांच्या भक्तीस लागले. त्यांत **अनंतभट महाबळेश्वरकर** व **दिवाकर-भट महाबळेश्वरकर** ह्या उभयतांचा अधिकार पाहून त्यांस अनुग्रहमंत्र दिले. आणि आपण पुनः देशपर्यटनास निघाले. त्यावेळीं अनंतभटांनीं आपण बरोबर येतों म्हणून फार आग्रहानें विनंति केली. कांहीं केल्यानें त्यांची समजूत पटेना, तेव्हां समर्थांनीं तेथें एका मारुतीची स्थापना करून व पूजानैवेद्याचा बंदोबस्त करून त्यांस तेथेंच मारुतीची सेवा करून राहण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां अनंतभट तेथेंच राहिले व समर्थ पुढें निघून गेले.

**श्रीक्षेत्रवाई**—महाबळेश्वर येथील चातुर्मास्यांतील कीर्तनाची समाप्ति करून समर्थ निघाले ते श्रीक्षेत्र वाई येथें आले. वाई हें क्षेत्र पहिल्यापासून नामांकित. ब्राम्हणवस्ती मोठी. म्हणून त्या ठिकाणीं समर्थांनीं बऱ्याच दिवस वास्तव्य केलें. तेथेंही त्यांचें कीर्तन चालू झालें. तेथेंही बरीच ब्राम्हण मंडळी समर्थांच्या भक्तीस लागली होती. त्यांत तेथील सुखवस्तु गृहस्थ **थिटे, चित्राव** व **पिटके** ह्यांच्या मातुश्रीस अनुग्रह दिले. आणि वाई येथील कृष्णाकांठीं दक्षिणतीरावर ‘ रोकडोबा ’ नांवाच्या मारुतीची स्थापना करून त्याच्या पूजानैवेद्याची सर्व तजवीज लावून दिली. हें देवालय वाईच्या उत्तर तीराच्या घाटावरून अद्यापही असलेलें समोरच दृष्टीस पडतें. ह्या मारुतीची पूजा समर्थांनीं **पिटके** यांजकडे सांगितलेली आहे.

**जरंडा व माहुलीः**—पर्वतावर, गुहेंत, रानांत, खडीवर, निर्जन प्रदेशांत व एकांतांत राहण्याची समर्थांना पहिल्यापासूनच फार आवड असे. ते कारणापुरतेंच जनसंसर्गास येत. वाईहून निघण्याचा विचार झाला, तेव्हां आतां कोठें वस्ती करावी ह्या विचारास ते लागले. तों त्यास कोणी साताऱ्या-पाशीं अत्यंत उंच जरंड्याचा पर्वत असून तें स्थान रम्य असल्याचेंहि सांगितलें. हा डोंगर सदर्न मराठा रेल्वेनें वाठार स्टेशनच्या पुढें सातारा रोड स्टेशन-कडे जातांना अर्ध्या मार्गावरून जो दिसूं लागतो, तो साताऱ्याच्या पुढें

कोरेगवांच्या अर्ध्या स्टेशनच्या रस्त्यापर्यंत उजव्या हाताला सर्वांपुढें दिसत असतो. हा पर्वत अतिशयच उंच असून त्यावर असलेले वृक्ष व देवालयादि इमारति झुंजक झुंजक आगगाडींतूनही दिसतात. तें स्थळ प्रत्यक्ष जाऊन पहाण्याविषयीं कोणासही मोहच उत्पन्न होतो. मग त्या पर्वतावर जाऊन तें स्थान पहाणाराला किती बरें आनंद होत असेल ? अशा त्या अत्युच्च पर्वतावरील रम्य स्थानावर जाऊन कांहीं दिवस वास्तव्य करावें असें समर्थांनीं मनांत आणून ते वाईहून निघाले ते जरंड्यास गेले.

परंतु समर्थांना केवळ पर्वतावरचेंच स्थान पुरत नसे; तर त्यांना जवळ-पास तीर्थही पाहिजे असे. तेंही तेथून जवळच होतें. हें तीर्थ म्हणजे साताऱ्याजवळचें श्रीक्षेत्र माहुली हें होय. येथें कृष्णेचा व वेण्णेचा संगम असून स्थानही अत्यंत रमणीय आहे. समर्थ जरंड्यावर रहात व पहांटेस उठून माहुलीस जाऊन संगमावर स्नानसंध्यादि कर्म करीत. नंतर दुपारच्या वेळीं क्षेत्रांत मधुकरी मागून आणून रामचंद्रास नैवेद्य समर्पण करून दुपारीं पुन्हा नदीवर जाऊन मुलांशीं खेळत बसत. समर्थांच्या अंगीं मोठमोठे लोक आपलेसे करून घेण्याचा जसा गुण होता, तसाच मुलांनाही आपलींशीं करून घेण्याचा त्यांच्या अंगीं विलक्षण गुण होता. ह्यामुळें समर्थ हे लहानापासून तों थोरांपर्यंत सर्वांसच प्रिय असत.

जरंड्यास वास्तव्य होतें तावत्कालपर्यंत त्यांचा हाच क्रम होता. पहांटे उठून माहुलीस जावयाचें, स्नानसंध्यादि आन्हिक ओटोपल्यावर मधुकरीला जावयाचें, दुपारीं मुलांबरोबर वाळवंटांत खेळावयाचें व रात्रीं पुन्हा जरंड्यावर जावयाचें ! येथें हा निराळाच क्रम स्वीकारल्यामुळें, तेथें कीर्तनाचा क्रम चालत नव्हता हें उघडच आहे. त्याचें कारण, एक तर समर्थांचा मुक्काम अत्युच्च पर्वतावर जरंड्यास असल्यामुळें तेथें वस्ती ती कितीशी असणार ? आणि प्रत्यहीं खालच्या गांवांतील लोक कीर्तनासाठींच रोज वर तरी कोण जाणार ? तेव्हां अर्थात् पर्वतावर कीर्तनाचा बेत जुळण्यासारखा नव्हताच. दुसरें, महाबळेश्वरास समर्थांनीं एकसारखें चातुर्मास्य कीर्तन केल्यामुळें त्यांना श्रमही फार झाले असावेत, आणि वाईसही कीर्तनें चालूंच होतीं तेव्हां त्या मानानें त्यांस थोडीबहुत विश्रांतीहि घेणें अवश्यच

होतें. ह्या दोन कारणांनीं त्यांनीं ह्या मुक्कामांत कीर्तनाचें मान कमी करून कृष्णासंगमीं मुलांशीं क्रीडा करण्याचेंच मान अधिक ठेवलें होतें.

तो कृष्णावेण्येचा संगम, तिचें तीर, तेथील सुंदर वाळवंट व तेथील सृष्टिसौंदर्याचा देखावा त्यांच्या मनाला अत्यंत आल्हाद देत असे. ते सायंकाळच्या समयीं तेथील वाळवंटांत जाऊन तासाच्या तास बसत, व नानाप्रकारच्या कवितांचा तोंडानें पाठ म्हणत असत. त्या पुण्यपावन नदीवर जातांच प्रथम दर्शनीं त्यांनीं एक त्या पवित्र नदीच्या स्तुतीपर मोठ्यानें श्लोक म्हटला होता; तो हाः—

## श्लोक

कृष्णाविष्णुतनुःसाक्षात्। वेण्यादेवो महेश्वरः॥
उभयोः संगमोयत्र। मुक्तिस्तत्र न संशयः॥ १॥

नंतर स्नानसंध्या वगैरे करून पूजा करतेवेळीं नवी आरती तयार केली; ती अशीः—

## ॥ आरती ॥

सुखसरिता पुण्यभरिता दुरिता नीवारी॥
निःसंगा भवभंगा चिद्रंगा तारी॥
श्रीकृष्णनिजतनु जळवेषधारी।
कलिमल दल जळनिर्मळ साक्षात्वें हारी॥
जयदेवी जयदेवी जयमाय कृष्णे।
आलों तुझिया उदरा निरसी ममतृष्णे॥ धृ०॥
हरिहर सुंदर ओघ ऐक्याशीं आले।
परमानंद बोध मिळणीं मिळाले॥
ऐसी हे संगमीं मिसळोनि गेले।
रामदास त्याचीं वंदी पाऊलें॥ २॥

अशा दिनचर्येंत म्हणजे जरंडा व माहुली ह्या दोन स्थळांत समर्थांनीं बरेच दिवस वास्तव्य केलें होतें. परंतु सुगंधयुक्त फूल कोठेंही उमललेलें असो, भ्रमर हे कोठूनना कोठून तरी तेथें गुंजारव करीत यावयाचेच. तशी स्थिति झाली. समर्थ अशा रीतीनें बहुतेक जरी एकांत स्थळीं म्हणून

राहिले होते, तरी त्यांची कीर्ति ऐकून मोठमोठे साधुसंतही त्यांस तेथें भेटावयास येऊं लागले.

**जयरामस्वामींची भेट**—ह्या कालांत पैठणचे एकनाथमहाराज समाधिस्थ होऊन जरी बरींच वर्षें लोटलीं होतीं तरी, त्यावेळेस इतर साधुसंत मंडळी महाराष्ट्रांत बरीच उदयास आलेली विद्यमान होती, व त्यांचीही गणना अवतारी पुरुषांतच असे. **तुकारामबावा, जयरामस्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी, रंगनाथस्वामी, रघुनाथस्वामी, मोरयादेव, धरणीधरदेव,** आणि **वामनस्वामी** इत्यादि सत्पुरुषांची कीर्ति त्याकालीं महाराष्ट्रभर दुमदुमत होती. ह्या सर्वांच्या बहुतेक भेटी ह्याच ठिकाणीं झाल्या. कारण, मोरोपंतांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहेः—

**॥ कस्तूरीचा परिमळ सांगाया शपथ वाहणें न लगे ॥**

"हा कस्तुरीचा सुगंध आहे, हें सांगावयाला कांहीं शपथ वाहावयास लागत नाहीं." तो अनुभवानें आपोआपच कळतो. त्याप्रमाणें समर्थांची कीर्ति कांहीं छपून राहण्यासारखीं नव्हती. महाराष्ट्रांत समर्थांचा पाय पडण्याबरोबर त्यांची कीर्ति सर्वतोमुखीं झाली. आणि '**समानशीलव्यसनेषु सख्यम्**' ह्या कव्युक्तीप्रमाणें साधुसंतांना साधुसंताची आवडहि असावयाचीच. त्यामुळें समर्थांकडेही मोठमोठे साधु भेटीकरतां, दर्शनाकरितां येऊं लागले. त्यांत प्रथम जयरामस्वामींची भेट झाली. तेव्हां जयरामस्वामी हे कोण, कोठचे ह्याची माहिती थोडक्यांत तरी देणें इष्ट आहे.

जयरामस्वामी हे कात्राबाद मांडवगण येथील भिकाजीपंत देशपांडे यांचे पुत्र. त्यांच्या मातोश्रींचें नांव कृष्णाबाई असून उपानम केशर असें होतें. 'देशपांडे' हें त्यांच्या वतनावरून पडलेलें नांव. जयरास्वामी लहान असतांच कृष्णाजीपंत वारले. पुढें कांहीं दिवसांनीं कृष्णाबाई ह्या आपल्या लहान मुलास म्हणजे जयरामास घेऊन पंढरपुरच्या यात्रेस गेल्या व तेथें कांहीं दिवस राहून परत फिरूं लागल्या. परंतु मुलगा जयराम कांहीं केल्या निघेना. तो पंढरपुरासच राहण्याबद्दल हट्ट घेऊन बसला. तेव्हां नाइलाजामुळें त्याही मुलास घेऊन त्याच क्षेत्रांत राहिल्या.

परंतु थोडे दिवस गेले नाहींत तों कृष्णाबाईही वारल्या. तेव्हां जयरामस्वामींनीं गोपाळपुऱ्यांत राहून पंढरिनाथाचें अनुष्ठान केलें; त्यावरून पंढरि-

नाथ प्रत्यक्ष दर्शन देऊन 'काय पाहिजे तो वर माग' म्हणाले. जयरामस्वामी हात जोडून म्हणाले "दुसरी तिसरी कांहीं इच्छा नाहीं. फक्त गुरुमंत्राचा अनुग्रह प्रसाद व्हावा." ही प्रार्थना ऐकून पंढरीनाथांनीं त्यांस सांगितलें कीं "वडगांवामध्यें कृष्णाजीअप्पा अभ्यंकर उरुणाबादकर म्हणून परमयोग्य पुरुष आहेत. त्यांजपाशीं जाऊन आपण अनुग्रह घ्यावा." अशी आज्ञा होतांच जयरामस्वामी वडगांवास गेले व कृष्णाजीपंत अप्पाची गांठ घेऊन त्यांजपासून अनुग्रह घेतला आणि गुरुसेवेकरितां ते तेथेंच वडगांवीं राहिले. अशा रीतीनें ते समाधान वृत्तीनें सदासर्वदा गुरुसेवेंत निमग्न असत. पुढें त्यांस परमप्रिय गुरूचाही अखंड वियोग होण्याचा प्रसंग आला तो असा:—

पूर्वकालीन लोकांच्या व आजकालच्या लोकांच्या मनस्थितीमध्यें अत्यंत मोठा म्हणून जो फरक आहे तो हा कीं, अलीकडच्या लोकांची देहावर अत्यंत ममता असते, आणि पूर्वींच्या लोकांची देहावर मुळींच ममता नसे. ते त्याचे लाड हवे तसे तर कधीं पुरवीत नसतच, पण उलट आपण ह्या जड देहांतून कधीं पार पडूं हीच त्यांच्या मनाला अरणी लागलेली असे. हा समज साधुसंतांत, भगवद्भक्तांत व कधीं कधीं पट्टीच्या विद्वानांत सुद्धां दृष्टीस पडत असे. असे जे तत्कालीन ज्ञाते असत, त्यांस वाटे कीं, आपल्या हातून जें काय घडण्यासारखें होतें तें घडलें, आतां हा देह वागवून वृद्धापकाळच्या खितपणींत पडून अखेर इष्टमित्रांच्या व आप्तस्वकीयांच्या तिरस्कारास पात्र होण्यापेक्षां आपणहोऊनच देहत्याग करावा हें उत्तम. असा विचार करून जिवंत समाधि—जळसमाधि घेण्याचाच त्यांचा फार प्रघात असे.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या वडिलांनीं प्रयागास जाऊन जिवंत समाधीच घेतली होती. ज्ञानेश्वरांनींहि जिवंत समाधीच घेतली. निरंजनस्वामींनीं [ रंगनाथस्वामींच्या वडिलांनीं ] कऱ्हाडच्या संगमावर जलसमाधि घेतली. भट्टपादाचार्यांनीं आपल्यास तुसामध्यें दग्ध करून घेतलें; तुकाराममहाराज सदेह वैकुंठास गेले हें जें वर्णन आहे, त्याचा अर्थ अलीकडचे विद्वान् लोक जिवंत समाधि किंवा जळसमाधि असाच समजतात. ह्या परंपरेच्या सांप्रदायाप्रमाणें कृष्णाप्पा यांनींहि वडगांवासच आपण जिवंत समाधि घेण्याचें ठरविलें. तेव्हां जयराम

स्वामींना केवळ आकाश कोसळल्याप्रमाणें झालें. कारण, त्यांचीं मातापितरें बालपणांतच गेलीं होतीं. आणि ते केवळ एक अनाथ लेंकरूं होऊन राहिले होतें. त्यांना जिव्हाळ्याचें माणूस असें कोणीच उरलें नव्हतें. तेंच काय ते एकीएकी एक राहिले होते. त्यामुळें आपले गुरु अप्पा हेच काय ते आपले मायबाप असें त्यांस वाटत असे. आणि त्यांच्या कृपेंतच समाधान मानून ते निरंतर उल्हासवृत्ति असत. त्याच अप्पांनीं हा जिवंत समाधि घेण्याचा जेव्हां विचार काढला, तेव्हां त्यांना दाही दिशा शून्य व्हाव्यात हें साहजिकच आहे. त्यांच्या डोळ्याचें पाणीच खळेना; अशी त्यांची अवस्था झाली. अखेर समाधि घेण्याचा निश्चित केलेला दिवस आला. तेव्हां गुरूपाशीं आपण अखेरचें एक तरी मागणें मागावें असें त्यांच्या मनांत आलें. व अप्पांची मर्जी सुप्रसन्न आहे असें पाहून हात जोडून त्यांनीं त्यांची प्रार्थना केली कीं, "गुरुमहाराज तर आम्हांस येथें असें मोकलून निघाले. तरी आतां एक मनोरथ पूर्ण करावा. तो येवढाच कीं, आपल्या मुखांतून आत्मानात्म विचार मला कळावा." ही प्रार्थना ऐकून कृष्णाप्पांनीं त्यांस सांगितलें कीं, "आमचा अवतार संपला. आतां आम्हांस उद्यांचा वेध, दुसरें कांहीं नाहीं. याकरितां मारुतीच्या अंशेंकरून श्रीरामदासस्वामींचा अवतार कृष्णातीरीं झालेला आहे, त्यांस तुम्ही भेटा; म्हणजे ते तुम्हांस आत्मानात्म विचार सांगतील." हें ऐकून "आज्ञा प्रमाण" असें म्हणून जयरामस्वामींनीं अप्पांच्या चरणीं मस्तक ठेविलें. अप्पांनीं त्यांस मोठ्या प्रेमादरानें आशिर्वाद दिला. मागची आपल्या मठाची सर्व व्यवस्था त्यांस सांगितली आणि दुसरे दिवशीं म्हणजे शके १५४५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरांतील माघ शुद्ध पौर्णिमेला जिवंत समाधि घेतली. तेव्हांपासून जयरामस्वामी हे श्रीरामदासस्वामींच्या दर्शनाच्या शोधार्थ कृष्णाकाठावरून फिरतच होते. पण दहा अकरा वर्षें झालीं तरी त्यांची भेट म्हणून नाहीं. अखेर शके १५६६ साल सुरू झाल्यावर त्यांच्या कानावर बातमी आली कीं, कोणी एक रामदासस्वामी ह्या नांवाचे सत्पुरुष श्रीक्षेत्र माहुली येथें वास्तव्य करून राहिले आहेत. हें वर्तमान ऐकतांच जयरामस्वामी मोठ्या उत्कंठतेनें निघाले आणि माहुलीस आले. आणि नदीच्या

वाळवंटावर जाऊन समर्थांस भेटून त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभे राहिले.

तेव्हां समर्थांनीं त्यांस विचारलें "तुम्ही कोण! कोठून आला?" ह्यावर जयरामस्वामींनीं आपला सर्व पूर्ववृत्तांत सांगितला. व कृष्णाप्पांच्या आज्ञे प्रमाणें आपल्या दर्शनास आलों आहे, तरी मला "आत्मानात्म विचार सांगण्याची कृपा व्हावी." अशी विनंती केली. ती ऐकून समर्थ हासले आणि म्हणाले "आप्पा व आम्ही दोन आहोंत अशांतला अर्थ नाहीं. तथापि आप्पांची आज्ञा प्रमाण." असें म्हणून समर्थांनीं जयरामस्वामींस कांहीं दिवस आपल्या जवळ ठेवून घेतलें. आणि त्यांस आत्मानात्म विचार सांगून त्यांचें समाधान केलें. त्यामुळें जयरामस्वामी हे अप्पा व समर्थ हे एकरूपच आहेत असें समजून समर्थ हेही आपलें गुरुस्थान असेंच मानीत. ते आपल्या पहिल्या गुरुसेवेसाठीं नेहेमीं वडगावांस रहात असत. तरी वारंवार माहुलीस येऊन समर्थांचें अगत्यपूर्वक दर्शन घेत. व काहीं अधिकोत्तर असल्यास ते समर्थांसही मोठ्या आग्रहानें वडगांवीं घेऊन जात. तेथें समर्थांस आठ पंधरा दिवस ठेवून घेण्याचा त्यांचा सांप्रदाय असे. कृष्णाप्पांची पुण्यतीथ प्रतिवर्षीं मोठ्या थाटानें जयरामस्वामी करीत, व त्या पुण्यतिथीला ते समर्थांस घेऊन जात.

समर्थ प्रथम जेव्हां वडगांवास गेले, त्याच वर्षापासून त्यांनीं तेथें कृष्णजयंतीच्या उत्सवास प्रारंभ करविला. त्या उत्सवांत सर्व कांहीं ठीक झालें, परंतु रथोत्सव करण्यास रथ नाहीं, ह्याची मोठी अडचण येऊन पडली. तेव्हां समर्थांनीं तेथें लागलाच भेंडाचा रथ तयार करून त्या समारंभाची परिपूर्णता केली. ह्यावरून समर्थांच्या अंगीं बारीक सारीक गुण व कलाकौशल्य किती वागत होतें हें मनांत आलें म्हणजे त्यांच्या समयसूचकतेचे जितके गुण गावेत तितके थोडेच वाटतात. असो;

अशा रीतीनें वडगांवचे जयरामस्वामींचा व समर्थांचा प्रथमच घरोबा जडला. व तो अखेरपर्यंत वृद्धिंगतच होत गेला. समर्थांस जयरामस्वामी 'तीर्थरूप' म्हणत. समर्थ त्यांस 'चिरंजीव' म्हणत. **समर्थांच्या** अमदानींत '**स्वामीपंचायतन**' म्हणून जें पुढें प्रसिद्धीस आलें, त्यां पैकीं जयरास्वामी हें पहिले होत. त्यांच्या पहिल्या भेटीचा वृत्तांत सांगितला.

**रंगनाथस्वामींची भेट**—गोपाळपंत अप्पा देशपांडे नाझरेकर म्हणून एक भक्तिमान् गृहस्थ होते. त्यांस तीन पुत्र. वडील पुत्र यादवराव हे बेदरबादशाहींत विजापुरास सरकारी कामावर असत. दुसरे चिरंजीव रंगनाथस्वामी हे ब्रह्मचारी होते, आणि धाकटे चिरंजीव विठ्ठलराव तात्या हे घर सांभाळून असत. गोपाळपंतास साक्षात् दत्तात्रयांनीं रामोपासना सांगून षडाक्षरी मंत्राचा अनुग्रह प्रसाद दिला होता. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं संन्यास घेतला. त्या आश्रमांत त्यांना 'निरंजनस्वामी' असें म्हणत. त्यांनीं रंगनाथस्वामींस मंत्रोपदेश देऊन मग कऱ्हाडच्या संगमावर जलसमाधि घेतली.

निरंजनस्वामी समाधिस्थ झाल्यानंतर रंगनाथस्वामी हे तीर्थयात्रेस गेले व हिमालयांत बदरीकेदार वगैरे यात्रा करून राजयोग धारण करून असत.

महाराष्ट्रांतील इतर साधुसंत व रंगनाथस्वामी ह्यांच्यामध्यें महदंतर होतें. तें येथें सांगणें अवश्य आहे. हें मुख्य अंतर म्हणजे वेषाचें होतें. रंगनाथस्वामी नेहेमीं सरदारी बाण्यानें रहात. त्यामुळें त्यांच्या पोषकावरून ते कोणी साधुपुरुष असतील असें कोणासच वाटत नसे. सदा खंदा वारू बसावयाला; मस्तकावर बालेंबेची पगडी व तुरा; अंगांत खुत्नीचा आंगरखा; कानांत चौकडा; गळ्यांत गोफ; पाठीशीं बाणभाता; कमरेला कंबरबस्ता; पायांत विजार; एका पायांत तोडा अशी त्यांची नेहमींची ऐट असे. अशा पुरुषाला साधु असें म्हणणार कोण? अशा वृत्तीलाच 'राजयोग वृत्ति' असें म्हणण्याचा परिपाठ आहे. शेंपन्नास लंगोटबंद शिष्यांचा तांडा नेहेमीं त्यांच्याबरोबर असे. रंगनाथस्वामी तीर्थयात्रा करून आले तोंच त्यांच्या कानीं श्रीसमर्थांची कीर्ति पडली. ती श्रवण करून समर्थांस आपणहि एक वेळ जाऊन भेटावें म्हणून ते उतावीळ झाले. एके दिवशीं ते आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें घोड्यावर स्वार होऊन समर्थांच्या भेटीसाठीं माहुलीच्या रोखानें निघाले तों मार्गामध्यें निगडीच्या माळावरील एका ओढ्यामध्यें घोडा रुतणीस पडला! बराच प्रयत्न केला, पण तो कांहीं पुढें पाऊल टाकीना. तेव्हां रंगनाथस्वामी त्यास म्हणाले "कायरे! तुझ्या मनांत काय येथेंच मुक्काम करावा असें आहे होय? ठीक आहे तर तसेंच करूं या." असें म्हणून ते घोड्यावरून उतरले. घोड्यावरचा सरंजाम काढला. त्यास बाहेर आणलें नंतर ते निगडींत जाऊन मठ स्थापन करून तेथेंच निरंतरची वस्ती केली.

आणि जयरामस्वामींस भेटावयास वडगांवीं गेले. तेथपासून जयरामस्वामींचा व रंगनाथस्वामींचा अत्यंत लोभ जडला. ते उभतांहि अगदीं जवळजवळ रहात असत. रंगनाथस्वामींनीं जयरामस्वामींपाशीं समर्थांच्या दर्शनास जाण्याविषयीं गोष्ट काढली. तेव्हां जयरामस्वामी म्हणाले, ' ते फारच योग्य पुरुष आहेत. मी त्यांचें दर्शन घेऊन आलों. ते येथें श्रीकृष्णाच्या उत्सवास व गुरूच्या पुण्यतिथीस प्रतिवर्षास वडगांवासही येत अतात. ' हें ऐकून तर रंगनाथस्वामींस परमानंद झाला. आणि समर्थांच्या दर्शनाविषयीं अधिकच बलवत्तर इच्छा उत्पन्न झाली. नंतर जयरामस्वामींस बरोबर घेऊन रंगनाथस्वामी समर्थांच्या दर्शनास माहुलीस गेले. तेथें आठपंधरा दिवस ह्या त्रिवर्गसंतांचा त्रिवेणी संगम जुळला. स्वामीपंचायतनांतील तीन मूर्ति ह्याच. हे त्रिवर्गसाधु नेहमीं अगदीं एकदिलानें असत. समर्थ त्या उभयतांस चिरंजीव म्हणत असत. ह्यानंतर महान् भगवद्भक्त तुकारामबोवांची व समर्थांची भेट झाली. ती तर केवळ अपूर्व होय. तो वृत्तांत पुढें देतों.

**तुकारामबोवांची भेट**—सूर्योदय कितीही दूर असो, कोठेंही होवो, त्याची प्रभा ही सर्वत्र पसरावयाचीच. तो पर्वताच्या आड असो, कीं झाडाझुडपाच्या पलीकडे असो; त्याच्या प्रभावाची जाणीव प्रत्येक घरांत व प्रत्येक खोलींत सुद्धां व्हावयाची. त्याप्रमाणें समर्थांचा कीर्तिप्रभावच असा होता कीं, त्यांच्या कीर्तीचे पाश प्रत्येक जिज्ञासूला त्यांच्याकडे ओढून नेत. मग ज्यांला साधुसंतांचीच आवड आहे, त्याच्या मनाला ओढ लागेल हें कांहीं निराळें सांगावयास नको. समर्थांच्या वेळीं जी साधुसंत मंडळी महाराष्ट्रांत गाजत होती, त्यांत देहूचे तुकाराममहाराज हे केवळ शिरोभूषण होत. त्यांच्या कानावर समर्थांची कीर्ति गेली. त्यांची निस्पृह वृत्ति, स्वार्थत्याग व तपश्चर्येचें तेज हें सर्व ऐकून तुकारामबोवांना तर एक मोठा अलभ्य लाभच मिळाला असें वाटलें. कारण संतसंगाइतकी दुसरी कोणतीच वस्तु त्यांना प्रिय नव्हती. **'नलगे मुक्ति धनसंपदा। संतसंग द्यावा सदा'** हेंच नेहेमीं पांडुरंगापाशीं त्यांचें मागणें असे ! तीच सोन्यासारखी संधी घरीं चालून आल्यावर ते ती वायां कशी दवडतील ? श्रीसमर्थांची

स्वारी कृष्णातीरीं येऊन श्रीक्षेत्र माहुली येथें आहे असें कळल्यावर त्यांना चैन कशाचें पडणार ?

आणि त्यांतून 'तुम्ही जाऊन रामदासस्वामींस भेटून यावें' असा पांडुरंगाचाही त्यांस दृष्टांत झाला. मग उशीर तो काय ? 'शुभस्य शीघ्रं.' तुकारामबावांची तयारी ती काय व्हावयाची ? वीणा टाळ, आणि चिपळ्या ! त्या तयारच होत्या. त्या घेऊन 'विठ्ठल विठ्ठल' असें भजन करीत स्वारी निघाली ती माहुलीस येऊन दाखल झाली. तुकाराममहाराजांची कीर्ति समर्थांनीं ऐकलेली होतीच, व त्यांची योग्यताही ते पूर्णपणें जाणून होते. म्हणून तुकारामांस पहातांच त्यांनीं दृढ आलिंगन दिलें. तुकारामांनीं समर्थांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांच्या पायांस घट्ट मिठी मारली ! तो उभयतांचा आनंद काय बरें विचारावा ? केवळ गंगायमुनेचा संगमच तो. त्याला उपमा कशाची ? नंतर समर्थांचें व त्यांचें परमार्थपर संभाषण सुरू झालें. तें ज्यांच्या कानीं पडलें असेल, ते खरोखरच भाग्यवान् होत. थोडे दिवस राहून तुकोबाही देहूस गेले. तरी तुकारामबावा वारंवार माहुलीस समर्थांच्या भेटीस येत असत. अशा प्रकारें उभयतांचा स्नेहभाव फारच वाढला. तुकोबांच्या मनांत समर्थांस देहूस घेऊन जावें असें फार होतें; परंतु तो योग आला नाहीं. एका भेटींत स्वामींनीं तुकोबास प्रश्न केला कीं, "आपणांस हें वैराग्य कसें प्राप्त झालें ? तुम्हावर पांडुरंगाची कृपा कशी झाली ?" त्याचें उत्तर तुकाराममहाराजांनीं तत्काल अभंगरूपानेंच दिलें. ह्या अभंगांत तुकारामांनीं थोडक्यांत आत्मचरित्रच निवेदन केलें आहे म्हटलें तरी चालेल. तो अभंग हा:—

## अभंग.

**याति शूद्र, वैश्य केला व्यवसाय। आधींच हा देव कुलपूज्य॥ १ ॥**
**न बोलावें परी पाळीलें वचन। केलीयाचा प्रश्न तुम्ही संतीं॥२॥**
**संसारीं तों झाल्या दुःखाचीया रासी। मायबापें शेखीं कर्मीयलीं॥३॥**
**देवाचें देऊळ होतें जें भंगलें। चित्तास हें आलें करावेंसें॥ ४ ॥**
**दुष्काळीं आटलों द्रव्य नेलें मानें। स्त्री एक अन्न अन्न करितां मेली॥५॥**
**लाज वाटे जीवा त्रासलों ह्या जीवा। व्यवसायीं देखा तुटी येत॥६॥**

काहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें। विश्वासें आदरें करूनियां ॥ ७ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें धृपद। भावें चित्त शुद्ध करोनीया ॥ ८ ॥
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही। मानीयेलें नाहीं बहुमत ॥ ९ ॥
मानीयेला स्वप्नीं गुरूचा उपदेश। धरिला विश्वास दृढ मनीं ॥१०॥
ठाकला तो थोडा फार परोपकार। केला हें शरीर कष्टवूनि ॥११॥
संतांचें सेवीलें तीर्थ पायवणी। आरंभ कीर्तनीं करितां झाला ॥१२॥
नव्हतें अभ्यासीं मन चित्त आधीं। लाज नाहीं मधीं येऊं दिली ॥१३॥
तयावरी झाली कवित्वाची स्फूर्ती। पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥१४
निषेधाचा कांहीं पडिला आघात। तेणें चित्त मध्यें दुखवलें ॥१५॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें। केलें नारायणें समाधान ॥ १६ ॥
आहे तोचि आतां दिसतो विचार। पुढील प्रकार देव जाणें ॥१७॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल। बोलावीलें बोल पांडुरंगें ॥ १८ ॥

ह्याप्रमाणें तुकारामबावांनीं आपलें सर्व वर्तमान समर्थास निवेदन केलें. आणि म्हणाले कीं, "मला स्वप्नांत जेव्हां अनुग्रह झाला तेव्हां 'चिदानंद' असें नांवही ठेवल्याचें स्मरतें. मला श्रीपांडुरंगांनीं आपला अवतार श्रीमारुतीच्या अंशेंकरून झाला असें सांगितलेंच आहे. परंतु आपल्या मुखानें सर्व वृत्त श्रवण करावें अशी इच्छा आहे." हें ऐकून समर्थ हास्यवदन करून बोलले कीं, "आपलें वृत्त स्वमुखेंकरून बोलूं नये. परंतु तुम्ही आपलें गुह्य आम्हांस सांगितलें, ह्यास्तव आम्हीही आपलें वृत्त सांगतों." असें म्हणून स्वामींनींही एक अभंग म्हटला. तो असाः—

## अभंग.

नमो अधिष्ठाता विष्णू मुख्य साधू। तेथूनीया बोधूं विधीलागी ॥ १ ॥
विधापासूनयाः ज्ञान विधीसूता। तेंचि ज्ञान प्राप्त वसिष्ठासी ॥ २ ॥
वसिष्ठें उपदेश केला रामचंद्रा। तोचि महारुद्रा हनुमंता ॥ ३ ॥
हनुमंत कलीमाजी चिरंजीव। झाले देव सर्व बौद्धरूप ॥ ४ ॥
बौद्ध नारायण होऊनी बैसला। उपाव बोलिला, व्यास मुनी ॥ ५ ॥
व्यास मुनी बोले, भविष्य पुराण। जगउद्धरणें कलीमाजी ॥ ६ ॥
कलीमाजी गोदा-तीरीं पुण्यक्षेत्र। तेथें वातपुत्र अवतरे ॥ ७ ॥

अवतरे अभिधानीं रामदास। कृष्णातीरीं वास, जगदोद्धारा ॥ ८ ॥
जगदोद्धारासाठीं, श्रीरामा सांकडें। केलें वाडेंकोडें भक्तीपंथें ॥९॥
भक्तीपंथें माठो केला श्रीरामानें। जंबू अभिधान, ग्राम तेथें ॥ १० ॥
तेथें ब्रह्मनिष्ठ अधिष्ठाता पूर्ण। सूर्य नामा जाण द्विजवर्य ॥ ११ ॥
द्विजवर्य सूर्य, जैसा तपोधन। अद्भुतविंदान, झालें तेथें ॥ १२ ॥
झाली रामनवमी, मध्यअष्टमीसीं। अर्धरात्रीं त्यांसीं दूत आले ॥१३॥
दूत आले, पुढें घालोनी चालिले। महाद्वारा आले भीम जेथें॥१४॥
भीमदेवाल्यांत, नेऊनी तयासी। तेथें उभयतांसीं देखियेलें ॥१५॥
देखियेले राजपुत्र सूर्यवंशीं। झांपड नेत्रांसी, पडे तेव्हां ॥ १६ ॥
पडे तेव्हां जैसा, दंडवत भूमी। मग अर्धांगीं, बोलविलें ॥ १७ ॥
बोलावूनी माथा, ठेवी सव्यपाणी। मंत्र सांगे कर्णीं रामनाम॥१८॥
नामा सांगोनिया ताम्रमूर्ती रम्य। पट्टाभिश्रीराम दिधला तया ॥१९॥
तया दिला वर तुज पुत्र होईल। ध्वज उभारील, रामदास्यें ॥२०॥
रामदास्य झालें, धन्यवंशोद्धार। बोलोनी सत्वर गैब झाले ॥ २१ ॥
झाला रामनवमी महोत्सव थोर। माध्यानीं सत्वर, जन्म झाला॥२२॥
जन्म झाला भला देव वंशीं आले। उपासना चाले राघवाची॥ २३ ॥
राघवाची भक्ती सुखाची विश्रांती।पितयाची शांती झाली पुढें ॥२४॥
पुढें ज्येष्ठ बंधु न सांगेचि कांहीं। सुखें देवालयीं निद्रा केली॥२५॥
निद्रा केली तेथें श्रीरामें उठवूनी। तोचि मंत्र कानीं सांगितला॥२६॥
सांगीतला बोध, रामींरामदास। गुरूच्याहि वंशा निरोपीलें ॥२७॥

हें समर्थांनीं आपलेंही वृत्त सांगितल्यामुळें तुकाराममहाराजांसही फार संतोष झाला. तें सर्व ऐकून तुकारामबावा सद्गदित अंतःकरणानें म्हणाले कीं " आपण साक्षात् मारुतीचे अंश आहांत. आपल्या दर्शनानें फार आनंद झाला. आतां आम्हांस निरोप द्यावा. " असें म्हणून प्रेमपूर्वक त्यांनीं समर्थांचा निरोप घेतला आणि ते देहूस निघून गेले.

**मोरया देवः**—चिंचवडचे मोरया देव हेही ह्या कालांत फार प्रसिद्ध सत्पुरुष होते. त्यांना श्रीगजाननाची उपासना असून श्रीचें प्रत्यक्ष दर्शनही घडत असे. गजाननाचें मूळ अधिष्ठान मोरगांवास असतांही मोरया

देवांच्या भक्तीकरतां श्रीगजानन प्रत्यक्ष स्वरूपानें चिंचवडास येऊन राहिले होते. समर्थांची कीर्ति ऐकून मोरया देवही माहुलीस येऊन समर्थांस भेटले, व पारमार्थिक विषयावर यथेच्छ भाषण करून तेही तृप्त झाले, व पुन्हा चिंचवडास परत गेले. तेही वारंवार समर्थांच्या भेटीस येत असत, व चार दोन दिवस राहून परत जात. असा त्यांचा परिपाठ होता.

**रघुनाथस्वामी व आनंदमूर्ति**—ही गुरुशिष्यांची जोडी त्याकाळीं फार अपूर्व होती. रघुनाथस्वामी हे गुरु आणि आनंदमूर्ति हे त्यांचे शिष्य. रघुनाथस्वामी हे मूळचे नाशिक येथील राहणारे अश्वलायन शाखी ब्राह्मण. ह्यांनीं काशीची कावड आणून रामेश्वरास घालावयाची, व रामेश्वराचा सेतु नेऊन काशींत टाकावयाचा हा त्यांचा नित्य क्रम असे. असे फिरत फिरत एके दिवशीं ते भालगांवच्या मुक्कामीं आले. तेथें अप्पाजीपंत देशपांडे हे कमाविसदार होते. व अनंतभट जोशी ह्या नांवाचे दुसरे एक गृहस्थ होते. हे उभयतांही परमयोग्य आहेत असें जाणून त्यांस त्यांनीं मंत्रानुग्रह दिला. आणि अनंतभटांचें नांव 'आनंदमूर्ति' असें ठेवलें. ह्या आनंदमूर्तींची ह्या आपल्या गुरूंच्या ठिकाणीं इतकी अप्रतिम निष्ठा होती कीं, त्यांची ती भक्ति पाहून त्यांचे गुरु रघुनाथस्वामी केवळ त्यांच्याकरितांच वेदवतीच्या तीरीं श्रीकृष्णासंगमीं ब्रम्हनाळेस राहिले. हे रघुनाथस्वामी व आनंदमूर्ति हेही उभयतां समर्थांची कीर्तिश्रवण करून त्यांना भेटावयास आले. पुढें त्या उभयतांचा व समर्थांचा चांगलाच दाट परिचय झाला. 'आनंदमूर्ति' हेच ह्या स्वामीपंचायतनापैकीं चौथे होत.

रघुनाथस्वामी कांहीं दिवसांनीं समाधिस्थ झाले. आनंदमूर्तींनीं ब्रम्हनाळेस त्यांची मोठी समाध बांधली. आनंदमूर्तींची ह्या आपल्या गुरूंच्या ठिकाणीं इतकी निस्सीम भक्ति होती कीं, ते समाधीपुढें कीर्तन करूं लागले असतां ही समाध डोलूं लागे! अद्यापही ही समाध रामनवमीच्या उत्सावांत वगैरे डोल देते असें म्हणतात. औंधच्या प्रतिनिधींच्या पूर्वजांनीं त्याबद्दल प्रत्यक्ष प्रचीति घेतली होती. त्यांनींच आनंदमूर्तींस ब्रम्हनाळ हा गांव इनाम दिला आहे. ते त्यांस बारा गांवच्या सनदा करून देत होते, परंतु त्यांनीं त्या घेतल्या नाहींत; फक्त एक गांव मात्र मोठ्या आग्रहानें घेतला. '**आनंदमूर्तीचरितामृत**' म्हणून एक प्राचीन ओवीबद्ध ग्रंथ ब्रम्हना-

ळेस उपलब्ध आहे. त्यांत ह्या रघुनाथस्वामींचें चरित्र अत्यंत मनोरंजक व बोधप्रद असून प्रतिनिधींच्या संबंधाची माहितीही मोठी अश्रुतपूर्व आहे.

हे गुरुशिष्य नेहेमीं समर्थांकडे येत जात असत, व समर्थही कधींकधीं ब्रह्मनाळेस जात. समर्थ एक वेळ असेच ब्रह्मनाळेस जाऊन कीर्तन करीत असतां समाधीचा डोल होऊं लागला. तो पाहून समर्थांनीं आनंदमूर्तींची पाठ थोपटून म्हटलें कीं, "धन्य आहे तुझी गुरुभक्ती, कीं ती पाहून समाधही डोलते!"

**केशवस्वामी**—ह्याच वेळीं केशवस्वामी ह्या नांवाचे एक महासत्पुरुष भागानगरास म्हणजे दक्षिण हैद्राबादेस रहात असत. त्यांच्या कानावरही समर्थांची कीर्ति गेली. तेव्हां त्यांनीं एक श्लोक लिहून तो आपल्या एका शिष्यापाशीं देऊन समर्थांकडे पाठविला. समर्थांनीं तो श्लोक वाचून शिरसावंद्य केला, आणि प्रत्यक्ष दर्शनतुल्य संतोष मानून त्या शिष्यास आठ पंधरा दिवस ठेवून घेतलें. आणि मग उत्तरादाखल एक श्लोक त्याच्यापाशीं लिहून देऊन त्याला निरोप दिला. निरोप देतेवेळीं त्यांनीं त्या शिष्यास विचारलें कीं, तूं हैदराबादेहून निघालास तेव्हां स्वामींनीं तुला खर्चास काय दिलें होतें? तो म्हणाला "सहा दिवसांचा शिधा व तुपाकरितां दोन पैसे दिले होते ते येथपर्यंत पुरले." तेव्हां समर्थांनीं त्यास दोन आण्यांचे पैसे खर्चावयास देऊन जावयास सांगितलें, व ते पैसे त्यास हैद्राबादेपर्यंत पुरले!

नंतर केशवस्वामी येऊन समर्थांचें दर्शन घेतले व पुढें समर्थ दक्षिणप्रांतीं गेल्यानंतर हैद्राबादेसही गेले होते. तेथें त्यांची व केशवस्वामींची गांठ पडली. तेव्हांपासून ह्या केशवस्वामींचेंही ह्या स्वामीपंचायतनांत नांव पडलें.

**स्वामीपंचायतन—१ श्रीसमर्थरामदासस्वामी; २ जयरामस्वामी-वडगांवकर; ३ रंगनाथस्वामी-निगडीकर; ४ केशवस्वामी-भागानगरकर; व ५ आनंदमूर्ती-ब्रह्मनाळकर.** हें स्वामीपंचायतन उत्तरोत्तर फारच प्रसिद्धीस आलें. हे सर्व परस्पर अत्यंत एकोप्यानें एक जीवानें वागत. सर्व लोक रामदासस्वामींना '**समर्थ**' '**तीर्थरूप**' किंवा '**वडील**' असें म्हणत; व समर्थ बाकी सर्वांना '**चिरंजीव**' असें म्हणत असत. ह्या सर्वांच्या वारंवार भेटी होत. नित्य नैमित्तिकांत किंवा

उत्सवांत पुण्यतिर्थीत वगैरे सर्व एकत्र जमत. कधीं कधीं मध्यंतरीही कांहीं विशेष प्रसंग आल्यास परस्परांचें परस्पर स्मरण करीत, व कोणी कितीही दूरच्या पल्ल्यावर असला तरी सारे एका क्षणांत त्या ठिकाणीं जमत! ह्या गोष्टी ओघाओघानें पुढें येणारच आहेत.

ह्याशिवाय धरणीधरस्वामी, वामनस्वामी वगैरे अनेक मोठमोठ्या लोकांच्या व समर्थांच्या भेटी होतच होत्या.

**सतीबाई शहापुरकरः**—अशाप्रकारें समर्थ हे कृष्णातीरीं राहून जे जे कोणी शरण येतील त्यांस अनुग्रहप्रसाद देत असत. एकदां त्यांच्या मनांत असें आलें कीं, प्रीतिसंगमावर स्नान करावें. म्हणून ते कऱ्हाडास गेले. कृष्णेच्या व कोयनेच्या प्रीतिसंगमावर स्नान करून शहापुराजवळ एक डोंगराची खिंड आहे, तेथें वस्ती करून राहिले. प्रत्यहीं कोसकोस दोन-दोन कोसांची मजल करणें ह्यांत समर्थांना कांहींच विशेष वाटत नसे. आणि तीही मजल सडकेनें वगैरे नव्हे, तर रानावनांतून, खिंडींतून, डोंगरांतून! डोंगर, खडी, माळ हीं त्यांचीं नेहमीं आवडतीं. ते ह्या शहापुरच्या खिंडींतून सकाळीं किंवा दुपारच्या वेळीं शहापूर किंवा मसूर अशा सभोंवतालच्या गांवांत जाऊन कोरडी भिक्षा मागून आणीत आणि तेथें पानगे भाजून श्रीरघुपतीस नैवेद्य समर्पण करून आपण भोजन करीत. एके दिवशीं काखेस झोळी घेऊन फिरत फिरत शहापुरकर कुळकर्णी यांच्या घरीं भिक्षेसाठीं गेले व आंगणांत उभे राहून नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें त्यांनीं ' जयजय रघुवीर समर्थ ! ' असा मोठ्यानें शब्द केला ! त्याबरोबर त्या कुळकर्ण्यांची बायको आंत होती ती वथवथतच बाहेर आली आणि म्हणाली " कोठचा आला आहे गोसावडा ! उगीच लावली आहेन् वटवट. आमचें हें मुलाबाळांनीं भरलेलें घर आहे. येथें असलें हें कांहीं बडबडत जाऊं नको. मुकाट्यानें भिक्षा घ्यावयाची असली तर घे. " असें म्हणून त्या बाईनें घरांत जाऊन भिक्षा आणून घातली.

समर्थांनीं दररोज त्या घरीं जाण्याचा परिपाठ ठेवला. समर्थांनीं ' जय-जय रघुवीर ' म्हटलें कीं घरांतील बायकांनीं खेकसून समर्थांच्या अंगावर यावें, आणि समर्थांनीं मुकाट्यानें चालतें व्हावें. असा क्रम बरेच दिवस चालला होता. एके दिवशीं समर्थ भिक्षेस गेले तों कुळकर्ण्यांच्या घरांतील

सर्व बायका म्लान मुखें करून चिंताग्रस्त बसल्या आहेत हें पाहून समर्थांनीं त्यांस विचारलें कीं "बाई ! अशा चिंताक्रांत कां दिसतां आज ?" एक बाई म्हणाली " कां ? तुला गोसाव्याला ही चौकशी कशाला हवी ? " समर्थ म्हणाले " सांगा तर खरें. रामाची इच्छा असली तर संकट दूर होईल. " तेव्हां कुळकर्ण्याची बायको त्यास म्हणाली " बाबारे ! कन्हाडीं मोंगलाई आहे. तेथील अधिकारी यवन. त्यानें गांवकीचे कुळकर्णी प्रकरणाबद्दल घरच्या पुरुषास विजापुरीं नेऊन बहुत पीडा करीत आहेत. तेव्हां कसें होतें आणि काय होतें ह्या काळजींत आम्ही पडलों आहोंत. कसें एकदां देव त्यांना त्यांतून पार पाडील तें खरें !" समर्थ म्हणाले "बाई ! आजपासून अकराव्या दिवशीं तुमचे यजमान तुमच्या घरीं सुखरूप आले तर तुम्ही ' राम राम ' असा जप कराल काय ? " बाई म्हणाल्या " होय बाबा; एकदां सोडून दहादां रामराम म्हणूं." " बरें तर ते आजपासून अकराव्या दिवशीं येतील बरें. कांहीं काळजी करू नका." असें म्हणून समर्थ निघून गेले. ह्या घरच्या कुळकर्ण्याचें नांव बाजीपंत व त्यांच्या पत्नीचें नांव सतीबाई असें होतें.

इतकें बोलून समर्थ जे तेथून निघाले ते कारकुनाचा वेष घेऊन विजापुरास गेले. आणि बादशहास भेटून मी कन्हाडच्या बाजीपंत कुळकर्ण्यांच्या श्वशुराकडून त्यांच्या गांवकीचा हिशोब समजावून देण्यासाठीं आलों आहे म्हणून सांगितलें. बादशहानें समर्थांकडे पाहिले तों तो मोठा तेजस्वी व पाणीदार पुरुष. त्यांस पाहून बादशहा अगदीं खूष झाला, व त्यानें 'तुमचें नांव काय ?' म्हणून विचारलें. समर्थ म्हणाले "माझें नांव दासोपंत." नंतर समर्थांनीं बादशहानें सांगितलेल्या कामदाराला बाजीपंतांचा गांवकीचा सर्व हिशेब नीट समजावून दिला. आणि बाजीपंताची सुटका करून घेतली. समर्थांनीं बादशहाचा निरोप घेतला तेव्हां बादशहा फार खुषी होऊन त्यानें समर्थांस पोषाख वगैरे देऊन त्यांचा चांगला सन्मान केला.

बादशहाचा निरोप झाल्यानंतर बाजीपंत व समर्थ उभयतांही आनंदभरित होऊन कन्हाडास यावयास निघाले. गांवांतून बाहेर पडल्यावर बाजीपंतांनीं समर्थांस विचारलें "तुम्ही कोण ? कोठून आला ? व तुम्हांस कोणी पाठविलें ?" समर्थांनीं उत्तर दिलें "तुमची स्त्री सतीबाई आणि तुमचे श्वशुर अबाजीपंत

ह्यांनीं पाठविलें म्हणून आलों." ह्याप्रमाणें सांगून समर्थ बाजीपंताबरोबर चालत होते. ते जेव्हां शहापूरच्या शिवेपर्यंत आले, तेव्हां समर्थ मागच्या-मागेंच कोठें निघून गेले. बाजीपंत मागें वळून पाहतात तों कोणा नाहीं; तेव्हां त्यांस आश्चर्य वाटल.

तरी ते तसेच मागें पहात पहात गांवांत शिरले व ग्रामदेवतेचें दर्शन घेऊन घरीं गेले. तो त्यांचा घराहून निघाल्याचा अकरावाच दिवस होता. घरीं जाऊन सर्वांस भेटतांच सर्वांसच आनंदीआनंद झाला. नंतर बाजी-पंतांनीं घरांत विचारलें कीं, "तुम्ही कारकून पाठविला होता तो कोण? त्यानें बादशहाच्या मर्जीप्रमाणें सर्व हिशेब देऊन मला सोडवून आणलें. तो कारकून कोठें आहे? शिवेपर्यंत तो आमच्याबरोबर होता. पण पुढें तो मागच्या मागेंच कोठें नाहींसा झाला." तें ऐकून सर्वजण सांगूं लागले कीं "आम्ही कोणी कारकून वगैरे कधींच पाठविला नाहीं. परंतु येथें एक गोसावी भिक्षेस येत होता, त्यानें आम्हास सांगितलें कीं, तुमचे बाजीपंत आजपासून अकराव्या दिवशीं घरीं येतील. ते आल्यावर तुम्ही 'रामराम' म्हणाल काय? असें त्यानें विचारलें व आम्ही होय म्हटलें."

तेव्हां बाजीपंतांनीं विचारलें कीं, "तो गोसावी कोठें राहतो?" बाकीची मंडळी म्हणाली "तो कोठें राहतो ठाऊक नाहीं. पण तो कोठें तरी अर-ण्यांत असतो." असें ऐकतांच बाजीपंतांनीं दोन चार मनुष्य पाठवून रानांत पुष्कळ प्रकारें शोध केला. परंतु कोठेंच कांहीं पत्ता लागेना. बाजी-पंतांच्या मनास तर त्या गोसाव्याच्या दर्शनाबद्दल चुटपुट लागून राहिली. त्यांनीं निश्चय केला कीं, त्या गोसाव्याची गांठ पडेपर्यंत अन्न ग्रहण म्हणून करावयाचें नाहीं. त्याप्रमाणें तीन दिवस अगदीं उपोषित राहिले. असा बाजीपंताचा कृतनिश्चय पाहून स्वामींस दया आली, आणि चवथ्या दिवशीं सकाळीं ते त्यांच्या घरीं भिक्षेस गेले, आणि नित्याच्या परिपाठाप्रमाणें 'जयजय रघुवीर समर्थ!' अशी आरोळी दिली. आणि त्यांच्या आंगणांत येऊन उभे राहिले. त्यांस पाहतांच गायीला पाहतांच वासरूं जसें हंबरडा फोडून तिच्याजवळ धांवत जातें, त्याप्रमाणें बाजीपंताची स्त्री सतीबाई मोठ्यानें हंबरडा फोडून धांवत धांवत आंगणांत जाऊन समर्थांच्या पायावर मस्तक ठेवून गडबडां लोळूं लागली! तेव्हां समर्थांनीं कृपाळू होऊन तिच्या

मस्तकावर हात ठेवून म्हटलें "तुम्ही असा शोक कां करतां? उठा." असें म्हणतांच तिनें उठून हात जोडून विनंति केली कीं, "आपण मला चुडेदान दिलें. त्याप्रमाणें भ्रतार घरीं आले. आणि ते आपल्या दर्शनाकरतां तीन दिवस उपोषित आहेत. ह्यास्तव त्यांवर स्वामींनीं कृपा करावी." अशी सतीबाई प्रार्थना करीत आहेत तों बाजीपंतही तेथें येऊन पोंचले. आणि साष्टांग नमस्कार करून विनंती करीत आहेत तोंच अंबाजी मुऱ्हार व त्यांचें चुलतबंधु दत्ताजी अनंत ह्यांनीं मुलांबाळासहवर्तमान येऊन साष्टांग नमस्कार करून प्रार्थना केली कीं, आम्हा सर्वांवर कृपा करून अनुग्रह प्रसाद द्यावा.

त्या सर्वांची ही दृढतर जडलेली भक्ति पाहून समर्थांनीं ती गोष्ट मान्य केली. नंतर स्वयंपाक तयार करून स्वामींस सर्वांनीं मंगलस्नान घालून त्यांची पूजा केली. समर्थांनीं प्रथम सतीबाईस, नंतर बाजीपंतांस, नंतर अंबाजी-मुऱ्हार व दत्ताजी अनंत या सर्वांस अनुक्रमेंकरून अनुग्रह दिला. नंतर पुन्हा सर्वांनीं समर्थांची पूजा केली. आणि तीर्थप्रसाद घेऊन स्वामींचे पंक्तीस भोजनें केलीं. भोजनोत्तर स्वामी निघून खिंडीवर गेले.

हा जो बाजीपंत कुळकरण्याच्या घरच्या मंडळींनीं समर्थांचा मंत्रानुग्रह घेतला, त्यांत समर्थचरणीं निस्सीम–निष्ठा अशी एक बाजीपंताच्या पत्नीची म्हणजे सौ० सतीबाईचीच होती. तिच्या निष्ठेच्या बरोबरीला लागणारी दुसऱ्या कोणाचीच निष्ठा नव्हती. आणि ज्या भक्ताची निष्ठा इतकी बलवत्तर आहे असें पहातों, त्या भक्ताचें परमेश्वरही पुरतेंपणींच सत्त्व पहात असतो. ही गोष्ट पुराणांतरींच्या अनेक कथांवरून दिसून येते. तसाच स्वभाव समर्थांचा होता. तेही आपल्या भक्ताची पुरीपुरी परीक्षा पाहत असत, व त्यासाठीं ते नानाप्रकारच्या विनोदात्मक कृति करीत. त्या स्वभावानुरूप सतीबाईचा तरी आपल्या ठिकाणीं किती दृढनिश्चय आहे तो पुरतेपणीं पाहण्याचा त्यांनीं निश्चय केला.

पण सतीबाईचा निश्चयही समर्थचरणीं असाच अपूर्व होता. त्यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतल्यापासून दररोज समर्थांचें दर्शन घेतल्यावांचून व त्यांच्या चरणांचें तीर्थ घेतल्यावांचून अन्न ग्रहण करावयाचें नाहीं असा नेम धरला होता. पण समर्थ कोणाचे बांधलेले होते थोडेच! ते सतीबाईचें

बांधलेले असणार ? समर्थांची वागणूक पहिल्या पासूनच स्वेच्छाचारी असे. तेव्हां सतीबाईना समर्थांच्या दर्शनाचा लाभ प्रतिदिवशीं घडावा कसा ? अर्थात् त्यांच्या नियमाप्रमाणें घडेना. म्हणजे समर्थांची स्वारी सतीबाईच्या घरीं प्रत्येक दिवशींच जाई असे नाहीं. एक दिवस गेले, तर दोन दिवस जावयाचेंच नाहीं. यामुळें सतीबाईस वारंवार एक एक दोन दोन दिवसांचीं उपोषणें पडूं लागलीं. पण सतीबाई त्याबद्दल कधींही कुरकुरत नसत, किंवा त्याबद्दल त्यांना वाईटही वाटत नसे. एकदां तर ते आठ दिवसपर्यंत सतीबाईच्या घराकडे मुळींच गेले नाहींत. [ सतीबाईना बयाबाई शहापुरकरीण असेंही म्हणत असत. ] आठ दिवसानंतर स्वामी भिक्षेस गेले, तेव्हां बाईनीं प्रार्थना केली कीं, मला आठ दिवसांचें उपोषण आहे, तरी आपण स्नान करून येथेंच भोजन करण्याची कृपा करावी. तें ऐकून स्वामी रागावले. आणि "हा कोण निग्रह ? उपास कशाला करीत बसावें ? दुसऱ्यावर संकट कां ?" इत्यादि बोलून व रागाचा अविर्भाव आणून समर्थ आंत गेले आणि त्यांच्या घरांतलि उतरंडीवर लाथ मारून त्यांनीं सारीं मडकीं फोडून टाकलीं ! तेव्हां तें सारें बारीकसारीक धान्य साऱ्या घरभर झालें; तरी बयाबाई कांहीं बोलल्या नाहींत कीं रागावल्या नाहींत. त्यांनीं मुकाट्यानें तें धान्य निवडलें व भरून जिकडच्या तिकडे ठेवून स्नान करण्याविषयीं समर्थांस पुन्हा विनंति केली. तेव्हां समर्थ उठले. नंतर सर्वांचीं स्नानें व भोजनें झालीं. अशा प्रकारें समर्थ सतीबाईचा अनेक प्रकारें अंत पहात असत. तरी बाई त्याचा संतोष मानून समर्थांची आज्ञा पालन करीत असत.

पुढें एकदां समर्थ चंद्रगिरि पर्वतावर जाऊन बसले. ते अकरा दिवसपर्यंत सतीबाईकडे गेलेच नाहींत. सतीबाईना दहा दिवस कडकडीत उपास पडले. अखेर त्या एकट्याच समर्थांचा शोध करीत रानावनांत चालल्या. पायाला खडे व कांटे रुतत रुतत त्या एकदांच्या चंद्रगिरीवर जाऊन पोंचल्या. पहातात तों समोरच वाघ, लांडगे, अस्वलें असल्या हिंस्र पशूंच्यामध्यें समर्थांची स्वारी बसलेली आहे; असें पाहून सतीबाईनीं मनाचा हिय्या करून इकडे तिकडे न पाहतां थेट जाऊन समर्थांचे पाय धरले !

दहा अकरा दिवसांचें उपोषण, डोंगरांतून चालतां चालतां थकलेली; खडे, कांटे लागून पाय अगदीं आंबून गेलेले; डोळ्यासमोर आंधेऱ्या येऊं लागल्या होत्या, अशी स्थिति पाहून समर्थांनीं तिच्या मस्तकावरून हात फिरविला, तिला उठविलें, आणि म्हणाले "हेः ! हा निग्रह काय? बरें असो. आतां आंग धुऊन स्वयंपाक करावा." सतीबाईंनीं हात जोडून विनंति केली कीं, बरोबर स्वयंपाकाचें साहित्य आणलेलें नाहीं. फक्त थोडीशी भाजणी आहे. हिचा स्वीकार व्हावा. हें ऐकून समर्थ हासले आणि म्हणाले "काहीं चिंता नाहीं. त्या पलीकडच्या जाळींत सर्व साहित्य आहे व भांडीं आहेत. तीं घेऊन स्वयंपाक करावा." बाई जाळीकडे जाऊन पहातात तों सर्व साहित्य व भांडींकुंडीं तयार आहेत. तीं पाहून त्यांनीं ओढ्यावर आंग धुतलें. आणि पुरणावरणाचा स्वयंपाक तयार केला, व समर्थांची स्नानसंध्या वगैरे आटोपतांच पान वाढून नैवेद्य वाढूं लागल्या. तेव्हां समर्थ म्हणाले "बाई! नैवेद्यावर वाढावयाचें तें पुष्कळसेंच वाढा बरें का. वाढण्यांत कसर करूं नका." सतीबाई म्हणाल्या "आज्ञा." असें म्हणून त्यांनीं समर्थांच्या आज्ञेप्रमाणें नैवेद्याचें पान वाढून तयार केलें. तेव्हां समर्थांनीं सतीबाईस सांगितलें कीं "तुम्ही आतां जरा पाठमोऱ्या बसा. मी नैवेद्य समर्पण करतों. इकडे पाहूं नका." "त्याप्रमाणें सतीबाई समर्थांकडे पाठ करून बसल्या, व समर्थ पात्रप्रोक्षणकरून नैवेद्य समर्पण करूं लागले. इतक्यांत सतीबाईंनीं हळुच पाठीमागें नजर करून ओझरतें पाहिलें. तों एकदम देदीप्यमान तेज दृष्टीस पडून त्या मूर्छित होऊन पडल्या.

नैवेद्य समर्पण झाल्यानंतर समर्थांनीं सतीबाईस सावध केल्या आणि म्हणाले "तुमच्या पूर्वपुण्याईनें तुम्हास श्रीमारुतीचें दर्शन झालें." असें म्हणून आपण भोजन केलें, व बाईस भोजनास घालून बाईस घेऊन शहापुरास आले आणि म्हणाले "तुम्हास ज्यांचें प्रत्यक्ष दर्शन झालें त्याच मूर्तीची येथें स्थापना करून देतों." असें म्हणून समर्थांनीं त्यांच्या तेथें एक मंदीर तयार केलें व चुना तयार करवून त्याची मारुतीची मूर्ति त्या मंदिरांत स्थापन केली. आणि त्याची स्वहस्तें अर्चा करून आपल्या स्नान-संध्येकरितां तेथें एक गुहाही तयार केली, आणि बाईस सांगितलें कीं, श्रीमारुतीची पूजा करून तीर्थ घेऊन स्वस्थपणें भोजन करीत असावें.

अतःपर उपोषण करूं नये. अशी आज्ञा करून समर्थांची स्वारी चाफळ खोऱ्यांत गेली.

**आक्का व वेणुबाई**—समर्थसांप्रदायामध्यें शेंकडों शिष्यमंडळी जमलेली होती. त्याप्रमाणेंच त्यांच्या सेवेस कांहीं शिष्यिणीही होत्या. त्यांत आक्का व वेणूबाई ह्या अत्यंत प्रमुख होत. आक्कांनीं तर समर्थांच्या पश्चात्‌ही ४० वर्षें सर्व संस्थानचा अधिकार चालविला होता. वेणुबाईचा अधिकारही त्याच तोडीचा होता. ह्यास्तव त्या उभयतांचाही पूर्ववृत्तांत कळणें अत्यंत अगत्याचें आहे.

समर्थ शहापुराहून निघाले ते चाफळखोऱ्यांत आल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. ह्या सर्व गोष्टी शके १५६६।६७ वर्षांतील आहेत. म्हणजे या वेळीं छत्रपति शिवाजीमहाराज ह्यांचें वय १७ वर्षांचें असून ते म्लेंच्छांचा उच्छेद करून स्वराज्य आक्रमण करीत करीत एक एक पाऊल पुढें टाकीत होते. त्याच सुमारास समर्थ रामदासस्वामीही चाफळखोऱ्यांत डेरवणच्या डोंगराच्या घळींत किंवा वाघापूरच्या सड्यावर किंवा भैरवगडच्या घळींत किंवा चंद्रगिरीवर किंवा कळंब्याच्या घळींत रहात असत.

त्यावेळीं तेथें नरसोमलनाथ अंबरखाने ह्या नांवाचे शिवाजीराजांच्या तर्फेनें मामलेदार होते. त्यांनीं व आनंदराव देशपांडे या उभयतांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला, आणि चाफळामध्यें समर्थांस मठ करून दिला. म्हणून समर्थ तेथें कांहीं दिवस येऊन राहत असत. पुढें भानजी जोशी म्हणून एक गृहस्थ होते त्यांनींही समर्थांचा अनुग्रह घेतला. तेव्हा-पासून त्यांचें नांव भानजी गोसावी असें पडलें. भानजी गोसावी हे रात्रं-दिवस समर्थांपाशींच राहूं लागले. असा शिष्यसांप्रदाय मनस्वी वाढत चालला. तेव्हां समर्थांनीं कांहीं शिष्यांस मठांत ठेवावें व कांहींना आपल्या बरोबर घेत असावें. कोणास नवा मठ स्थापन करून तेथें ठेवावें, असा क्रम चालविला होता.

पुढें स्वामी फिरत फिरत कऱ्हाडास गेले. तेथें रुद्राजीपंत देशपांडे म्हणून एक सुखवस्तु गृहस्थ रहात. त्यांच्या येथें रात्रौ समर्थांचें कीर्तन झालें. तें ऐकून पुष्कळ मंडळी समर्थांच्या भक्तीस लागली. पण त्यांतल्या त्यांत रुद्राजीपंतांची एक बालविधवा कन्या होती, ती मात्र समर्थांस

शरण जाऊन तिनें अनुग्रह मंत्राचा उपदेश घेतला, आणि ती वडीलांच्या आज्ञेनें समर्थांजवळच नेहेमीं राहूं लागली. प्रसिद्ध आक्का त्या ह्याच होत.

समर्थ एका ठिकाणीं असे फारसे कधीं राहतच नसत. ह्या गांवाहून त्या गांवाला जाण्याचा त्यांना कधीं कंटाळा नसे. कऱ्हाडास थोडे दिवस मुक्काम केल्यानंतर समर्थ फिरत फिरत मिरजेस गेले, व दुपारीं देशपांडे ह्यांच्या घरीं भिक्षेस उतरले. तेथें त्या देशपांड्यांची कन्या वेणूबाई ह्या नांवाची असून ती एकनाथी भागवत वाचीत बसलेली होती. तिला पाहून समर्थांनीं विचारिलें कीं "तुम्ही पारायण कशाचें करतां?" वेणूबाईनें उत्तर केलें कीं "एकनाथी भागवताचें पारायण करते." समर्थ म्हणाले "पण ह्यांतील भागवतधर्म तुम्ही समजून घेतला आहे काय?" वेणूबाई म्हणाली "नाहीं; मी धर्म समजून घेतलेला नाहीं. पारायण मात्र करते." "धर्म समजल्यावांचून पारायण केल्यास फळ काय?" असें समर्थ बोलले. वेणूबाई म्हणाली "तो आपण सांगण्याची कृपा कराल काय?" "ज्यांनीं तुम्हास पारायण करावयास सांगितलें, त्यांसच विचारावें, म्हणजे ते सांगतील;" असें म्हणून स्वामी निघून गेले.

वेणूबाईच्या जिवाला त्याबद्दल रुखरुख लागून राहिली. त्यांच्या घरचे उपाध्ये होते, त्यांनीं वेणूबाईस एकनाथी भागवताचें पारायण करण्यास सांगितलें होतें. ह्यास्तव त्या उपाध्येबुवांकडे जाऊन त्यांस म्हणाल्या कीं "आज कोणी एक साधु भिक्षेस आला होता. मी एकनाथी भागवत वाचतांना पाहून त्यानें मला विचारलें कीं "ह्यांतील धर्म काय, तो तुम्हास माहीत आहे काय?" मीं म्हटलें "नाहीं. मी फक्त पारायण करते. धर्म समजत नाहीं." ह्यावर तो साधु म्हणाला "तर मग तुम्हास ज्यानें पारायण करावयास सांगितलें त्याच्यापाशीं विचारा." "इतकें सांगून तो साधु निघून गेला. तरी आपण तो धर्म काय तो मला समजून सांगावा." हें ऐकून उपाध्येबुवा म्हणाले "त्यांतील धर्म काय तो आम्हांसही माहिती नाहीं. तो ग्रंथ वाचल्यानें वाणी पवित्र होते, म्हणून मीं तो तुम्हास वाचावयास सांगितला. आपल्यास तो धर्मच समजून घेणें असेल, तर तो त्याच साधूकडून समजून घ्यावा. त्या साधूला शरण जाऊन त्यासच तो विचार पुसावा."

अशा उपाध्येबोवांनीं वाटाण्याच्या अक्षता लावल्यावरून वेणूबाईची फारच निराशा झाली. आतां तो साधु पुन्हा भेटतो कसा, ह्याची त्यांस फार चिंता लागून राहिली. त्या साधूचा ठाव ठिकाणही माहीत नाहीं, तेव्हां शोध तरी कोठें करावा ? ह्याबद्दल त्यांना वाईट वाटूं लागलें. रात्रंदिवस चैन नाहीं. इतकी त्या कोमल अंतःकरणाच्या मुलीला तळमळ लागून राहिली. परंतु मनुष्याच्या मनाची इच्छा तीव्रतर झाली कीं, ती गोष्ट प्राप्त होतेच होते हा नियम असल्याचे पूर्वीं सांगितलेंच आहे. कारण इच्छाशक्तीचें सामर्थ्य तसेंच बलवत्तर असतें. त्याप्रमाणेंच घडून आलें. म्हणजे एके दिवशीं अकस्मात् समर्थांची स्वारी पूर्ववत् भिक्षेस आली. त्यांना पाहतांच वेणूबाईचा आनंद गगनांत मावेनासा झाला. वेणुबाईनीं आपल्या पित्यास सांगून मोठ्या आग्रहानें त्यांस आपल्या घरीं ठेवून घेतलें. त्यांची पूजा केली व वेणुबाईनीं व तिच्या पित्यानेंही समर्थांची अनुग्रहदीक्षा घेतली. आणि त्यानंतरही त्यास आणखी आठ पंधरा दिवस त्यांनीं आपल्या घरीं ठेवून घेतलें. तेवढ्या कालांत समर्थांची भक्ति, उपासना, वैराग्य, ज्ञानोपदेश, इत्यादि पाहून त्यांच्या मनांत अत्यंत पूज्य भाव उत्पन्न झाला. आणि ते ज्यावेळीं जावयास निघाले त्या वेळीं वेणूबाई आपल्या पित्याची आज्ञा घेऊन समर्थांची सेवा अखंड घडावी म्हणून समर्थांच्याच बरोबर निघाल्या व त्या शेवटपर्यंत समर्थांजवळच होत्या. ह्याच प्रसिद्ध वेणूबाई होत. ह्या कविताही चांगल्या करीत. ह्यांचें रसभरित चारित्र पुढें यथास्थलीं वाचावयास मिळेलच.

**कल्याणस्वामी**—समर्थांचा शिष्यवर्ग फार मोठा होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. उद्धवगोसावी हेही समर्थांच्या शिष्यांपैकीं पट्ट छात्र असून ते समर्थांचें प्रत्यक्ष पुत्रच होते. म्हणजे त्यांचा व्रतबंध समर्थांनीं आपल्या मांडीवर घेऊनच केलेला असल्यामुळें ते त्यांचे प्रत्यक्ष चिरंजीवच होते. पण कल्याणस्वामी हेही तसेच समर्थांच्या कृपेंतील असून त्यांचा कस उद्धवगोसाव्याहून कांकणभर अधिकच होता म्हटलें तरी चालेल. समर्थांचें नांव निघालें कीं, तेथें कल्याणस्वामींचें नांव हें निघावयाचेंच. अशी ही गुरुशिष्याची जोडी होती. श्रीराम आणि मारुती हीच त्यांना उपमा ! त्यांचा चरित्राचाभाग समर्थांच्या अनुरोधानें पुढें येईलच. पण त्यांचा पूर्ववृत्तांतही मोठा मौजेचा आहे हेंही खालीं दिलेल्या माहितीवरून कळून येईल.

समर्थांचा शिष्यसमुदाय दिवसेंदिवस वाढत चालला होता. कितीही शिष्य मठामध्यें ठेवले, कितीही शिष्यांस नवे मठ करून दिले, तरी आणखी बरीच शिष्यमंडळी बरोबर असेच. असा हा शिष्यांचा परिवार बरोबर घेऊन समर्थ करवीरास गेले. आणि तेथें श्रीमहालक्ष्मीचें दर्शन घेऊन रात्रौ मंडपांत कीर्तन केलें. त्याकीर्तनाला मनस्वी गर्दी झाली होती. त्यांत गांवचे लोक आलेले होते व कांहीं परगांवचीही मंडळी होती. कोल्हापूरच्या देवीच्या दर्शनाला लांब लांबचे लोक येत असतात. त्याप्रमाणें गोदातीरचे एक रहिवासी पाराजीपंत वाघ या नांवाचे गृहस्थ यात्रेसाठीं आलेले होते. तेही समर्थांचें कीर्तन ऐकावयास बसले होते. कीर्तन ऐकून त्यांना अत्यंत संतोष झाला, व हे फार योग्य अधिकारी पुरुष आहेत, असें मनांत येऊन ते दुसऱ्या दिवशीं त्यांच्याकडे गेले आणि त्यांनीं त्यांजपाशीं मंत्रानुग्रह मागितला. व समर्थांनीं ती गोष्ट मान्य करतांच दुसऱ्या दिवशीं आपल्या बिऱ्हाडीं सर्व तयारी केली. समर्थांस मोठ्या समारंभानें घरीं नेलें, व पूजा वगैरे यथाविधि करून अनुग्रह प्रसाद घेतला. नंतर पंक्ति मांडल्या. पाराजीपंताजवळ एक लहान दहा वर्षें वयाचा मुलगा होता. त्याचें नांव अंबाजी. तोच तेथील पूजेचें साहित्य वगैरे करीत होता. पाट मांडणें, रांगोळ्या घालणें हीं कामें त्यानेंच केलीं. तीं त्यानें इतकीं झटपट, इतकीं व्यवस्थित व इतकीं सुरेख केलीं कीं, तीं पाहून समर्थ त्याच्यावर अगदीं सुप्रसन्न झाले. आणि हा मुलगा कोणाचा कोण ? अशी त्याची त्यांनीं चौकशी केली. तेव्हां पाराजीपंतांनीं विनंति केली. कीं, हा माझा भाचा, गंगातीरीं बाभुळगांव आहे तेथील राहणारे कृष्णाजीपंत कुळकर्णी ह्यांचा मुलगा. ह्याचे तीर्थरूप कृष्णाजीपंत महायालेस गेले तेव्हां त्यांनीं ह्याची मातोश्री व याचा बंधु दत्तात्रय ह्या तिघांस माझ्यापाशीं ठेवलें आहे.

नंतर समर्थांनीं त्या मुलास जवळ हांक मारून विचारलें कीं, "तुझें नांव काय ? " तो म्हणाला " अंबाजी." "तुला लिहितां वाचतां येतें काय ? " " होय; येतें." असें सांगितल्यानंतर समर्थांनीं एक सवाई म्हणून ती त्यास लिहावयास सांगितली, ती त्यानें बरोबर लिहिली. तेव्हां समर्थांनीं त्यापेक्षां अवघड अशी दुसरी एक सवाई म्हटली, तीही त्यानें

लिहिली. ह्याप्रमाणें समर्थांनीं अकरा सवया म्हटल्या व तितक्याही त्या मुलानें बिनचूक शुद्ध, व स्पष्ट वळणदार अक्षरांनीं लिहून दाखविल्या. तें पाहून समर्थांची मर्जी फार सुप्रसन्न झाली. आणि आपण ग्रंथ करतों ते लिहावयास हा मुलगा फार योग्य आहे असें वाटून समर्थांनीं पाराजी-पंतांपाशीं गोष्ट काढली कीं "हा मुलगा आम्हास द्यावा."

त्यावर पंत हात जोडून म्हणाले "या त्रिवर्गांचें पालन पोषण करण्याचा अधिकार माझा आहे. परंतु त्यांच्यावर सत्ता कांहीं माझी एकट्याचीच नाहीं. मी स्वामीचरणांचा दास आहे. मीच स्वामींपाशीं अखंड सेवेस राहतों. म्हणजे सर्व आपलेंच आहे." समर्थ हंसून म्हणाले "तुमची बहीण व दुसरा मुलगा तुम्हापाशीं असूंद्या; हा येवढा आम्हास द्या म्हणजे पुरे."

समर्थ पुढें म्हणाले "बरें, पण कांहो? ह्यांचा बाप आपलीं बायका-मुलें तुमच्यापाशीं ठेवून गेला, हें कसें काय?"

तेव्हां पाराजीपंतांनीं त्याबद्दलचा सर्व वृत्तांत सांगण्यास प्रारंभ केला. तें म्हणाले "आम्ही व आमचे मामेबंधु पारगांवकर कुळकर्णी उभयतांही कांहीं रोजगार धंदा पाहवा म्हणून कोल्हापुरास आलों. कृष्णाजीपंत पाठीमागें होते. त्यांच्या वडिलांनीं त्यांचें लग्न केलें व त्यांस एक पुत्र होऊन तो थोरही झाला. तोंपर्यंत ते घरीं होते. नंतर आपण आतां स्त्रीऋणांतून मुक्त झालों असें समजून स्त्रीपुलास घरीं ठेवून उत्तर मानसयात्रा, दक्षिण मानसयात्रा करावी अशा उद्देशानें ते तीर्थयात्रेस निघाले. ते उत्तर मानसयात्रा करून दक्षिण मानसयात्रा करीत करीत करवीर क्षेत्रांत येऊन पोंचले. देवीचें दर्शन घेऊन ओवरीमध्यें भजन करीत होते. इतक्यांत आम्हीही देवदर्शनास आलों. जातांना कोणीतरी सत्पुरुष भजन करीत आहे तें थोडेसें श्रवण करावें असें मनांत येऊन श्रवण करावयास गेलों. तों ते सत्पुरुष दुसरे तिसरे कोणी नसून बाभुळगांवचे कुळकरणी कृष्णाजीपंतच आहेत अशी आमची ओळख पटली. म्हणून आम्ही त्यांस प्रश्न केला कीं, आपण कोठचे कोण? ते म्हणाले "आम्ही तीर्थवासी आहों." आम्ही म्हटलें "होय; तीर्थवासी तर खरेंच; परंतु आपण बाभुळगांवचे कुळकरणी, आपलें नांव कृष्णाजीपंत ना?" "होय;

आपण कोण पाराजीपंत काय ? ” मीही होय म्हटलें. परस्परांची ओळख पटली. तेव्हां मी त्यास आपल्या घरीं घेऊन आलों. ते चार पांच दिवस आमच्या घरीं होते. एके दिवशीं नित्याप्रमाणें ते पहाटें भजन करण्यास उठण्यापूर्वी त्यांस दृष्टांत झाला कीं, “पाराजीपंतांची भगिनी उपवर झाली आहे, तिच्याशीं तुम्ही लग्न करावें.” तेव्हां त्यांनीं पुन्हा मनांत विचार केला कीं, एक लग्न केलें आहे, त्यांतूनच सुटका कशी होईल ह्या विचारांत मी आहे आणि हें दुसऱ्या लग्नाचें जोखड गळ्यांत कोण घेणार ? असा विचार करून ते निद्रिस्त झाले. तों पुन्हा त्यांस दृष्टांत झाला कीं, तुम्ही पाराजीपंतांच्या भगिनीशीं लग्न केलें तर उत्तम;-नाहींतर तेवढ्याकरितां तुम्हाला पुन्हा जन्म घ्यावा लागेल. ह्याकरितां हें लग्न केलेंच पाहिजे. असा दृष्टांत पुन्हा झाल्यावर ते उठून तुळशीवृंदावनापाशीं पुन्हा जाऊन भजन करीत बसले. इकडे आम्ही निजलों होतों, तों आम्हांसही दृष्टांत झाला कीं, तुमच्या भगिनीचा विवाह कृष्णाजीपंतांशीं करून द्यावा. अनमान करूं नये. हा दृष्टांत झाल्यावर आम्ही जागे झालों आणि बाहेर पाहतों तों कृष्णाजीपंत तुळशीच्या कट्यावर भजन करीत होते, त्यांजपाशीं बसलों, तों त्यांनीं आपल्याला दृष्टांत झालेला आम्हास सांगितला व आम्हास झालेला दृष्टांत आम्हीही त्यांस सांगितला.

नंतर श्रीची आज्ञा उभयतांसही मान्य होऊन तिथीनिश्चय केला. परंतु कृष्णाजीपंतांनीं सांगितलें कीं, “ मी कांहीं प्रपंचांत गुंतून पडणार नाहीं.” तेव्हां “ आपण लग्न करून घ्यावें; कुटुंबाचें संरक्षण मी करीन.” अशी कबुलायत करून आम्ही त्यांचें लग्न करून दिलें. कृष्णाजीपंत कांहीं दिवस घरीं राहत व कांहीं दिवस तीर्थयात्रेस जात. असें होतां होतां त्यांस पहिला पुत्र झाला. तो अंबेच्या दृष्टांतानें झाला असें समजून त्याचें नांव ‘ अंबाजी ’ असें ठेवलें. पुढें दोन वर्षांनीं दुसरा पुत्र झाला त्याचें नांव त्याच्या मातोश्रीनें दत्तात्रय असें ठेवलें आहे. नंतर कृष्णाजीपंत काशियात्रेस गेले आणि तेथेंच संन्यासग्रहण करून राहिले. म्हणून ही आमची भगिनी व तिचीं हीं दोन मुलें माझ्यापाशीं आहेत. तेव्हां अर्थात् ह्या मुलांवर माझी पूर्ण सत्ता नाहीं. ह्याकरितां त्याच्या मातोश्रीस विचारावें हें बरें.

असें ऐकून समर्थांनीं त्या मुलाच्या मातुश्रीस हांक मारिली आणि विचारलें कीं "हा तुमचा मुलगा आम्हांस द्यावा." तेव्हां बाईनीं उत्तर दिलें "महाराज! आपण ह्या मुलाला नेतां, आणि आम्हांस येथेंच टाकणार कीं काय ? समर्थांनीं कृपा करून तिघांसही बरोबर न्यावें. आम्ही तिघेंही आपणांस शरण आहों आणि आपण शरणागतवत्सल आहां, तेव्हां सर्वांवरच कृपा करावी."

हें बाईचें भाषण ऐकून समर्थांसही फार संतोष झाला. त्यांनीं त्या तिघांसही अनुग्रहप्रसाद देऊन निघतांना त्या तिघांसही आपल्याबरोबर घेतलें, आणि पुढें निघालें. रत्नागिरीच्या मुक्कामापर्यंत पाराजीपंतही पोंचवावयास आले होते. नंतर ते परत गेले. ह्याच अंबाजीला 'कल्याण-स्वामी' हें नांव पडलें. तें कसें व कां पडलें तो भाग पुढें येईल.

मसूरच्या उत्सवाची सुरुवात—समर्थ ही सर्व मंडळी घेऊन निघाले ते कऱ्हाड प्रांतीं आले. आणि तेथें त्यांनीं टाकळीहून उद्धव-गोसावी यांस आणविलें. नंतर शिरगावांस मठ स्थापन करून तेथें त्या बाईस व दत्तोबास ठेवलें. आणि अंबाजी, उद्धव गोसावी व आणखी कांहीं निवडक एक दोन शिष्यमंडळी आपल्याबरोबर ठेवली. शिष्यसमुदाय वाढत चालला, तेव्हां आतां उपासनामार्ग वाढविण्याची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे असें मनांत आणून कोठें तरी श्रीच्या देवालयाची स्थापना करून उत्सवाची सुरुवात करावी असें समर्थांनीं मनांत आणलें. तेव्हां ती कोठें करावी याची योजना करतां करतां मसूर हें गांव योग्य आहे असें त्यांच्या मनांत आलें. कारण मसूर गांव चांगलें, ब्राम्हणवस्ती मोठी, म्हणून तिला 'ब्रह्मपुरी' असें म्हणत. तेव्हां तेंच गांव बरें असें मनांत आणून त्यांनीं तेथील कुळकरण्याच्या मातोश्रीस अनुग्रहमंत्र दिला आणि मारुतीची स्थापना करून शके १५६७ पार्थिवनामसंवत्सरांत राम-नवमीच्या उत्सवास प्रारंभ केला. त्या कालीं असा उत्सव म्हटला कीं, तो सर्व लोक मोठ्या हुरूपीनें पार पाडीत. त्याप्रमाणें हाही उत्सव मोठ्या थाटानें पार पाडण्याचें सर्वांनीं मनावर घेतलें.

इतर बाबींप्रमाणें त्या कालच्या उत्सवांत व अलीकडच्या उत्सवांतसुद्धा

पुष्कळ फेरबदल झालेला दृष्टीस पडतो. त्यांपैकीं सर्वांत मोठा फरक म्हटला म्हणजे '**काठ्यांचा.**' पूर्वीं कोणत्याही गांवीं मोठा उत्सव असला कीं, तेथें गांवोगांवाहून वाजत गाजत 'काठ्या' नेण्याची चाल असे. जितका जितका उत्सव अधिक अधिक मोठा, तितक्या तितक्या काठ्याही अधिक यावयाच्या, असा परिपाठ असे. अशा आपआपल्या नामांकित काठ्या घेऊन जाणारे कांहीं पिढीजाद भक्त असत. 'दिंड्या' 'पताका' जशा मोठ्या थाटानें निघत असत त्याप्रमाणेंच ह्या काठ्याही निघत. तो प्रचार हल्लीं फारसा कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. म्हणून त्याची थोडीशी माहिती देतों.

ही काठी म्हणजे कांहीं हातांत धरावयाच्या काठीसारखी लहान सहान नसते. तर ती त्या काठीचे भक्त आपआपली काठी जितकी जितकी अधिक उंच करवेल किंवा मिळववेल तेवढी मिळवून सर्वांत काठी उंच कोणाची ? तर फलाण्याफलाण्याची; ही कीर्ति मिळविण्यासाठीं नेहमीं चढाओढ लावीत असत. ही काठी म्हणजे गलबताच्या अवजाराची जशी मोठी थोरली डोलकाठी असते त्याच मासल्याची असे. ती उभी करावयालाच दहा पांच माणसें लागत ! नंतर ती शृंगारून ती उचलून उभीच्या उभी त्या गांवापर्यंत न्यावयाची, व ती त्या उत्सवाच्या छबिन्यांत मिरवावयाची अशी चाल असे ! ह्या काठीच्या बुंधापासून सुमारें ३ हात उंचीवर एका लांकडी फळीला भोंक पाडून ती फळी त्या काठींत गच्च बसविलेली असे. अशाकरितां कीं, उचलणारानें ती फळी खांद्यावर घेऊन ती काठी उचलतां व नेतां यावी ! पण असलें धूड एका दोघां मनुष्यांस झेंपणार कसें ? म्हणून त्या काठीच्या शेंड्यास १०।५ लांब लांब दोऱ्या बाधून त्यांचे पदर खालीं सोडीत आणि ते पदर धरून दहा पांच लोक त्या काठीचा तोल सांभाळून धरून चालत असत ! तरी पण त्यांची त्या कामीं जी तेधा उडे ती 'न भूतो न भविष्यति.' ह्या काठीला हिरवीं, तांबडीं, पांढरीं पागोटीं किंवा पागोट्यासारख्या कापडाच्या रंगारंगाच्या नागमोडीच्या आकाराच्या पट्टया शेंड्यापासून बुडख्यापर्यंत गुंडाळून त्यांस गोंडे वगैरे लावून सुशोभित केलेली असे. ही कोणाची तमक्याची काठी ! ही कोणाची अमक्याची काठी ! असा त्या काठ्यांचा मोठा लौकिक असे. आज अमक्या अमक्या गांवची, अमक्या अमक्या-

ची काठी येणार ती सर्वांत उंच आहे. असें म्हणून ती पहावयास झुंडी-च्या झुंडी येत. ह्यामुळें प्रत्येक उत्सवांत काठ्यांची एक मोठीच करमणूक होऊन राही. ह्या काठीवाल्यांचा मोठा मान असे. अमक्याची काठी पुढें व अमक्याची काठी मागें असे त्यांचे ठरीव मान असत व त्याकरितां तंटे बखेडे सुद्धां होत. प्रत्येक काठीवाल्याला प्रत्येक उत्सवांत नारळ, विडा, पागोटें वगैरे देण्याचा सांप्रदाय असे. व तो मोठा मान समजत.

मसुरास नवा उत्सव सुरू व्हावयाचा, तेव्हां तेथें काठ्याही पुष्कळ गांवच्या येण्याचा संभव होता. आणि उत्सवमंदिराच्या मार्गावर एक मोठा आम्रवृक्ष होता त्याच्या ढाळ्या मध्यंतरीं आडव्या आलेल्या होत्या, त्या तोडून काढल्यावांचून छबिना किंवा काठ्या जाण्याला वावच नव्हता. हें पाहून व साऱ्या उत्सवांत येवढाच व्यत्यय येतो तो कमी करावा म्हणून समर्थांनीं त्या आंब्याच्या ढाळ्या तोडून टाकाव्यात असें सांगितलें.

परंतु तें राज्य पडलें मोगलाईचें. तो विजापूरच्या बादशाहीखालचा मुलूख. अधिकारी सारे यवन. तेव्हां त्यांना या हिंदूंच्या उत्सवाचा हेवा-दावा वाटावा हें साहजिकच आहे. मसूरच्या यवन अधिकाऱ्यानें त्या आंब्याच्या डहाळ्या तोडण्यास प्रतिबंध केला. तो म्हणाला 'हे ब्राह्मण लोक हवे तसे नाचतात. त्यांना आळा हा घातलाच पाहिजे. बादशहाचा हुकूम कऱ्हाडच्या ठाणेदारास आल्याशिवाय खबरदार फांद्या तोडाल तर!'

**२ मसुरांतील चमत्कार**—श्रीरामचंद्र रावणाचा वध करून लंकेहून परत येतांना 'पुष्पक' विमानांत बसून आले, असें ज्या अर्थीं ग्रंथांतरीं वर्णन आहे, त्या अर्थीं त्या कालीं विमानांची कला प्रचारांत होती हें उघडच दिसतें. त्याप्रमाणेंच योगाभ्यासाच्या आद्य स्थितींतही 'अणिमा' 'लघिमा' इत्यादि अष्टसिद्धि प्राप्त होतात असें जें ग्रंथांतरीं म्हटलेलें आहे, व ज्ञानेश्वरासारख्यांनीं जर ती गोष्ट अनुभवानें खरी म्हटली आहे तर ती खरीच असली पाहिजे. शंकराचार्यसुद्धां मंडणमिश्राच्या घरीं 'वाद-भिक्षा' मागावयास गेले ते आकाशमार्गानें गेले असें वर्णन आहे. त्या अर्थीं अशा समर्थ लोकांना आकाशांतून सहज जातां येत होतें असें स्पष्ट दिसतें.

समर्थ रामदासस्वामी तर आकाशमार्गानें कैक वेळां गेलेले आहेत. त्यां-

पैकीं पहिला प्रसंग हा मसुरांतलाच होय. * मसुरास नवीनच सुरूं केलेल्या उत्सवांत मार्गांत आलेल्या फांद्या तोडून काढाव्यात असा समर्थांनीं विचार करतांच तेथील यवन अधिकारी आडवा आला, तो त्या तोडूं देईना. मग हें व्हावें कसें ? उत्सव तर सुरूं झाला. विजापूरचा पल्ला किती तरी लांबीचा; शिवाय तेथें बादशहापाशीं असल्या हलक्या सालक्या कामाची दाद लौकर लागणेंही तितक्यापुरतेंच. तेव्हां आतां ह्या एका फांदीमुळें उत्सवाचा सारा विसरच होणार असा रंग दिसूं लागला. त्याबरोबर समर्थांची स्वारी जी एकदां नाहींशी झाली, ती विजापूरच्या बादशहापाशीं जाऊन उभी राहिली ! पायांत पादुका, हातांत माळ, कौपीन, अंगावर छाटी, डोकीस जटाभार, अशी मूर्ति पाहतांच बादशहानें तत्काल ओळखलें कीं, हा कोणी तरी हिंदु अवलिया आहे. असें जाणून तो लागलीच तक्तावरून खालीं उतरून त्यानें चरणावर मस्तक ठेविलें आणि विचारिलें कीं "आपलें कोठून येणें झालें ? व काय हुकूम आहे ?" समर्थ म्हणाले "मसुरास देवाचा उत्सव सुरूं केला आहे. त्याचा छबिना जातांना मार्गावर आंब्याची ढाळी आड येत आहे. ती तोडल्याशिवाय रस्ता खुला व्हावयाचा नाहीं. आणि ती ढापी मसूर येथील बादशहाचा अधिकारी तोडूं देत नाहीं. तर ती तोडण्याबद्दल परवानगी मिळण्याचा ठाणेदारास हुकूम व्हावा." हें ऐकतांच बादशहानें तत्काल मसूर येथील मार्गावर आलेली आंब्याची फांदी तोडण्यास मनाई करूं नये असा आपल्या सही शिक्क्यानिशी हुकूम लिहून तो सीलबंद करून समर्थांपाशीं दिला. पण त्यानें समर्थांस विनंति केली कीं, 'परंतु हा हुकूम पोंचावयाला उशीर होणार त्याचें कसें. ?' समर्थ म्हणाले "उशीर कशाचा ? जसा आलों तसाच जातों" असें म्हणून ते तसेंच आकाशमार्गानें उड्डाण करून निघून गेले ! हें पाहून खुद्द बादशहाही अगदीं आश्चर्यानें थक्क झाला.

---

* पृथ्वीप्रदक्षणेच्यावेळीं लंकेस गेले होते तेही आकाशमार्गानेंच गेले होते. परंतु तेव्हां ते मारुतीबरोबर गेले होते. त्यामुळें कदाचित् त्यांनीं आपल्या पाठीवरून किंवा खांद्यांवरूनही नेण्याचा संभव आहे. म्हणून समर्थ एकटे आकाशमार्गानें गेल्याचा हा पहिलाच प्रसंग होय.

समर्थ विजापुराहून जे निघाले ते लगेच मसुरास येऊन मसूरच्या ठाणेदारास तो हुकूम दाखल करून व ती फांदी तोडण्याची परवानगी घेऊन मग मठांत आले. मठांतील मंडळींनीं नमस्कार करून प्रश्न केला कीं, " या उत्सवांतच स्वारी इतक्या वेळ कोठें गेली होती?" समर्थ म्हणाले " विजापूरच्या बादशहाकडून आंब्याची ढाळी तोडावयास मनाई करूं नये असा हुकूम आणून तो येथील ठाणेदारास आणून लावला आणि आलों. " ह्या समर्थांच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल मंडळीना आश्चर्य तर वाटलेंच पण इतरांपेक्षां थोडेसें कमी. कारण समर्थांच्या अलौकिक चमत्काराच्या गोष्टी हळूहळू त्यांच्या अंगवळणीं पडत चालल्याच होत्या.

नंतर समर्थांनीं अंबाजीला हांक मारून सांगितलें कीं " अंबाजी, कुऱ्हाड घे आणि आंब्याची डाहाळी तोड. " अंबाजीनें आज्ञेप्रमाणें कुऱ्हाड घेतली, आणि समर्थांस नमस्कार करून झाडावर चढला व तो ढाळी तोडूं लागला. जवळ आक्का, वेणूबाई, उद्धव गोसावी वगैरे पुष्कळ मंडळी उभी होतीच. अंबाजी झाडावर चढलेला पाहून आक्का त्यास म्हणाल्या " अंबाजी, खालीं विहीर आहे बरें कां ? ढाळी तोडावयाची ती जरा जपून तोड. " " बरें आहे " असें म्हणून अंबाजी ती ढाळी कुऱ्हाडीनें तोडूं लागला. त्यास समर्थ म्हणाले " अरे, तूं शेंड्याकडे बसून फांदी तोड ! " अंबाजी म्हणाला " आज्ञा. " आणि लागलीच शेंड्याकडे बसून बुडख्याकडचा भाग तोडूं लागला !

ह्यामध्यें गुरु आणि शिष्य ह्या उभयतांच्याही आत्मविश्वासाची तारीफ करावी तितकी थोडीच आहे. शिष्य विहिरींत पडला तरी त्यास आपण तारूं ही गुरूला खात्री, आणि आपण विहिरींत पडलों तरी गुरु आपल्याला तारतील ही शिष्याच्या मनाची खात्री! ह्यांत कोणाची अधिक धन्य म्हणावी, हेंच समजत नाहीं. परंतु त्यांतल्यात्यांत शिष्याच्या निश्चयाचीच अधिक धन्य समजली पाहिजे. हें कल्पनातीत गूढ रहस्य अलीकडच्या वितंडवादी चरित्रकारांना काय होय ? असो.

अंबाजीनें कोणताही अंदेशा किंवा भीति मनांत न बाळगतां गुरूच्या आज्ञेप्रमाणें काम बजावलें. म्हणजे शेंड्याकडे बसून कुऱ्हाडीनें ती

ढाळी तोडली, आणि व्हावयाचा परिणाम तो झाला. म्हणजे ती ढाळी तुटतांच ती डहाळी व अंबाजी दोघेही एकदमच विहीरींत पडले! आणि आक्कांनीं जी गोष्ट न होऊं देण्याविषयीं बजावलें होतें, तीच गोष्ट घडून आली. आणि तीसुद्धां चुकून सवरून नव्हे, तर जाणून बुजून! समर्थांच्या आज्ञेवरून! तेव्हां आतां बोलावें काय आणि कोणी? बरें; अंबाजी पडल्याबरोबर तरी 'अरे पडला! विहिरींत पडला!' म्हणून कोणी धांवाधांव करावी, तेही नाहीं. कारण समर्थांचें तेज व धाकच असा कांहीं विलक्षण होता कीं, ते पाहिजे तेव्हां पाहिजे तशी विचित्र आज्ञा करीत व ती मुकाट्यानें सहन करावी लागे. त्यामध्यें कोणी हूं कां चूं करण्याची प्राज्ञा नसे. तसाच प्रकार येथें झाला. अंबाजी डहाळी सहवर्तमान विहिरींत पडला, तरी समर्थ तोंडांतून ब्रही काढीनात. ते स्वस्थ मनानें दुसराच उद्योग करीत बसले होते! कोणी हळूच म्हटलें "अंबाजी विहिरींत पडला!" समर्थांनीं तें मुळींच ऐकलें न ऐकलेसें करून दुसऱ्याच गोष्टी बोलत बसले.

अंबाजी विहिरींत पडून घटका लोटली, दोन घटका लोटल्या तरी त्याची पूस ना तपास! कोणी कांहींच बोलेना आणि समर्थ तर कांहीं मनावर घेईनात. अंबाजीही कांहीं आंतून ओरडेना किंवा बाहेर येईना! मंडळी आपआपसांत कूजबुजूं लागली. पण उपयोग काय? समर्थांपुढें बोलण्याची कोणाचीच छाती नव्हती. अखेर आक्का ह्या समर्थांच्या फार मर्जीतल्या, तेव्हां त्यांनीं समर्थांपाशीं गोष्ट काढावी असें सर्वानुमतें ठरलें. त्यांनीं भीत भीत समर्थांपाशीं गोष्ट काढली कीं, "अंबाजीस विहिरींतून बाहेर काढून त्याचें देहसार्थक करण्याविषयीं कोणास तरी आज्ञा व्हावी."

हें ऐकून समर्थ म्हणाले "म्हणजे? अंबाजी मेला कीं काय?" आक्का म्हणाल्या "दोन घटका झाल्या; अद्याप कांहीं हालचाल नाहीं!" हें ऐकून समर्थ लगबगीनें उठून विहिरीजवळ गेले आणि विहिरीच्या कांठावर दोन हात टेंकून आंत डोकावून हांक मारली. "अंबाजी! कायरे? कसें काय आहे?" अंबाजी आंतून म्हणाला "समर्थांच्या कृपेंकरून कल्याण आहे!" "ये तर वर ये!" अशी आज्ञा होतांच अंबाजी विहिरींतून वर येऊन त्यानें समर्थांच्या चरणावर मस्तक ठेवलें. हा चमत्कार पाहून सर्व मंडळींना मोठें कौतुक वाटलें. नंतर समर्थ म्हणाले "हा आज 'कल्याण' म्हणाला,

त्याअर्थीं त्याचें नांव आजपासून कल्याणच ठेवतों." असें म्हणून साखर आणविली व ती देवापुढें ठेवून सर्वांस वांटली. व आजपासून ह्यास 'कल्याण'च म्हणावें अशी सर्वांस आज्ञा झाली. आणि तेच पुढें कल्याणस्वामी ह्या नांवानें प्रसिद्धीस आले.

**ह्याच नमुना भिकाजीबावांचा!**—समर्थांची स्वारी मसुरास राहूं लागली, तेव्हां त्यांच्या दर्शनासाठीं शहापूरकर बाई येत असत. त्यांच्या बरोबर अबाजीपंताचा एक मुलगा भिकू म्हणून येत असे. हा मुलगा बाईनीं बाळगलेला होता. म्हणून तो बाईचाच मुलगा असें लोक म्हणत असत. एके दिवशीं ह्या बाई मसुरास समर्थांच्या भेटीस येऊन समर्थांच्या चरणावर मस्तक ठेवून हात जोडून उभ्या राहिल्या, व समर्थांनीं आज्ञा केल्यावरून खालीं बसल्या. भिकोबा तेथेंच खांबाशीं टेंकून समर्थांच्या समोरच उभा राहिला. तें पाहून आक्का त्यास म्हणाल्या "अरे भिकू! तूं असा धटिंगणासारखा समर्थांच्या पुढें कां उभा रहातोस? त्यांना नमस्कार कर." भिकू म्हणाला "समर्थांस नमस्कार केला तर समर्थ काय देतील?" तें बोलणें ऐकून समर्थ म्हणाले "तूं आमची आज्ञा ऐकशील तर तूं काय मागशील तें देऊं." भिकोबा म्हणाला "तर मग सांगा काय करूं तें." समर्थ म्हणाले "जा, त्या विहिरींत उडी घे!" हे शब्द समर्थांच्या मुखांतून निघाले मात्र तोंच भिकोबा धांवत धांवत गेला आणि त्यानें धाडकर विहिरींत उडी घेतली!" ह्या आज्ञाधारकतेला किती धन्यवाद द्यावेत हेंच समजत नाहीं. वय किती, आणि धाडस केवढें!

ह्या वेळेस मात्र समर्थ जरासे घाबरल्यासारखे दिसले. "पोरानें आमच्या बोलण्यावर अपेश आणलें" असें म्हणून समर्थही त्याच्या मागोमाग धांवत जाऊन त्यांनींही विहिरींत उडी घेतली! तों विहिरींत काय काय चमत्कार झाला तो पहा! हा चमत्कार भिकाजीबावाच प्रत्यक्ष सांगत असत. ते म्हणत "मीं उडी घेतली येवढी मला शुद्धि होती. परंतु पुढें मात्र झोंप लागल्याप्रमाणें कांहींच भान राहिलें नाहीं. पण स्वप्नांत असल्याप्रमाणें मला एक मंदिर दिसूं लागलें. त्यांत सिंहासनावर स्वामी बसलेले माझ्या दृष्टीस पडले. मी जाऊन त्यांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून पुढें उभा राहिलों. तेव्हां "काय पाहिजे तो वर माग"

अशी त्यांनीं आज्ञा केली. मी म्हणालों ' मला अनुग्रह प्रसाद मिळावा. ' ह्यावरून त्या वेळच्या दहादहा बाराबारा वर्षांच्या मुलांची प्रवृत्ति ' अनुग्रह प्रसादा'कडे किती वळलेली होती ह्याची चांगली साक्ष पटते; असो.

भिकोबाच्या विनंतीप्रमाणें त्यास तेथेंच अनुग्रह प्रसाद मिळाला. त्यांनीं विचारलेल्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळून त्यांच्या अंतःकरणाचें समाधान झालें. नंतर समर्थ त्याला हाताला धरून विहिरीच्या बाहेर घेऊन आले. असें ह्या भिकोबाचें चरित्र आहे. पुढें ह्यांसच भिकाजीबावा गोसावी असें म्हणूं लागले. ते परमयोग्य होते. कल्याणस्वामी, उद्धव गोसावी ह्यांच्याच खालोखाल त्यांची योग्यता असून तेथपासून ते समर्थांच्या बरोबरच असत.

**डोहांतील रामचंद्राच्या मूर्ति**—ह्याप्रमाणें मसुरास बलभीमरायाचें चार पांच उत्सव झाल्यानंतर समर्थांच्या मनांत आलें कीं, आतां श्रीरामचंद्राच्या मूर्ति स्थापन करून रामचंद्राचा उत्सव सुरू करावा. त्यासाठीं त्यांनीं एका मूर्तिकारास बोलावून ' आम्हास श्रीरामचंद्राच्या चार मूर्ति करून दे ' असें सांगितलें. कारागीर हात जोडून म्हणाला " महाराज ! ह्या चार मूर्ति घडून तयार व्हावयाला निदान एक वर्षाचा तरी अवधि लागेल." समर्थ म्हणाले "बरें, रामाची इच्छा !" असें म्हणून स्वस्थ होते. परंतु ' साखरेचें खाणार त्याला देव देणार.' किंवा ' निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंचि फळ ' ह्या पूर्वापार म्हणीप्रमाणें इच्छा मात्र बलवत्तर असावी, कीं योगायोग हा कसा ना कसा तरी घडून येतोच. तसा प्रकार झाला. तो वृत्तांत फारच विस्मयकारक आहे.

रंगनाथस्वामींचे तीर्थरूप निरंजनस्वामी ह्यांच्या पुण्यतिथीला रंगनाथस्वामी स्वतः येऊन समर्थांना निगडीस घेऊन जाण्याचा प्रतिवार्षिक सांप्रदाय असे. त्याप्रमाणें ह्या वर्षींही रंगनाथस्वामी समर्थांस बोलावयास येऊन निगडीस घेऊन गेले. रितीप्रमाणें चार आठ दिवस राहून समर्थ निगडीहून परत फिरले. ते मार्गामध्यें रहिमतपूरच्या अलीकडे कृष्णेच्या पश्चिमतीरावर अंगापूरच्या रानांत 'शिवनाथ' म्हणून एक प्रसिद्ध स्थान आहे, तेथें स्नानाकरितां उतरले. कृष्णेंत स्नान करून संध्येस बसले. ब्रह्मयज्ञादिक सर्व आन्हिक उरकल्यानंतर श्रीमारुतीचें ध्यान करून मानसपूजेला आरंभ

करण्याचा संकल्प केला. तों मारुतीचें ध्यान मनांत न येतां पुन्हा पुन्हा श्रीरामचंद्रांचीच मूर्ति डोळ्यासमोर दिसूं लागली. तेव्हां समर्थांनीं विनंति केली कीं, " आज हें ध्यान आलें ह्याचें कारण काय तें दासास कळावें." त्या बरोबर डोहांतून शब्द झाला कीं, 'तुमच्या मनांतून जशा रामाच्या मूर्ति स्थापन करावयाच्या आहेत, तशाच मूर्ति ह्या डोहांत आहेत. त्या घेऊन जाव्यात.' मग त्या समर्थांच्या आनंदास काय विचारावें ! पारावारच नाहींसा झाला. त्यांनीं तत्काल डोहांत उडी घेतली. पाहतात तों दोन मूर्ति त्यांच्या हातांस लागल्या. त्या दोन्हीही समर्थ वर घेऊन आले. दिसण्यांत त्या दोन्हीही मूर्ति अत्यंत रमणीय होत्या. त्यांत श्रीरामाची मूर्ति तर कांहीं विचारूं नये.

रामचंद्राची मूर्ति एकाच पाषाणावर कोरलेली होती. पण ती केवळ अप्रतिम होती. म्हणजे रघुपतीची मूर्ति क्षत्रिय ध्यान, हातीं दोन कमळें, रथावर उभी, उजव्या बाजूस लक्ष्मण, डाव्या बाजूस सीता, उभयतांच्या हातांत चामरें, आणि मारुती सारथी, अशा ध्यानाची मूर्ति एका पाषाणावर होती. ती रथाच्या आकृतीसुद्धां होती. दुसरी मूर्ति होती ती महिषासुरमथनी देवीची होती. अशा दोन मूर्ति त्यांनीं बाहेर काढल्या आणि परम संतोषानें त्या दोनही मूर्तींची पूजा केली. त्या वेळीं त्या ध्यानाच्या स्तुतीपर समर्थांनीं एक श्लोक म्हटला तो असा:—

## श्लोक

[ स्रग्धरा वृत ]

**ध्याये दूर्वादलाभं करधृतकमलं जानकी लक्ष्मणाभ्याम्**
**वामेदक्षेच भागेहिमगिरिधवलै श्चामरैर्वीज्यमानम् ।**
**वज्रांगारूढ मूर्तिं सितहयवरयुक्स्यन्दने तिष्ठमानम्**
**रामक्षेत्रं सुपूर्णं दशवदन मुखात्कर्षयन्तं सुतेजः ॥ १ ॥**

अशा त्या रमणीय मूर्ति पाहून समर्थांनीं आपल्या झोळींत घातल्या आणि चाफळास त्यांची स्थापना करावी म्हणून शके १५६९ सर्वजिन्नाम संवत्सरांत निघून चालले. ही सर्व गोष्ट गुराख्यांनीं पाहून

अंगापुर गांवांत जाऊन गांवकऱ्यांना सांगितलें कीं, कोणी एक गोसावी येऊन त्यानें नदींतील डोहांत असलेल्या मूर्ति काढून तो घेऊन चालला आहे! खेड्यांतले लोक बोलून चालून गांवढळ! त्यांना कलागतीची, भांडणांची, सदासर्वदा एक प्रकारें हौसच वाटत असते. येवढीशी कुरापत निघाली पुरे, कीं लागलीच सारे लोक जमतात. तोच मासला अंगापुरांत उडाला! 'आपल्या गांवच्या मूर्ति गोसावी घेऊन चालला!' 'चला चला पाहतां काय? त्याला गांठून त्या मूर्ति परत आणूं या' म्हणून सारा घोळकाच्या घोळका जमला आणि पळतच समर्थांच्या मागें लागला! समर्थही चालण्याच्या कामांत कांहीं कमी नव्हते. तेही त्या मूर्ति घेऊन सपाट्यानें निघाले होते. तरी त्या लोकांनीं त्यास चेरगांवचे रानांत सुकटण्याची खिंड म्हणून आहे तेथें गांठलें. आणि त्यांस म्हणाले "अहो बावा! तुम्ही मूर्ति घेऊन चाललात त्या आमच्या गांवांतल्या आहेत. त्या तुम्ही नेऊं नका. आम्ही त्या तुम्हांस देत नाहीं." समर्थ म्हणाले "पण आम्ही ह्या मूर्ति नदीच्या डोहांतून आणल्या आहेत. तुमच्या गांवांतून आणल्या नाहींत." गांवकरी म्हणाले "त्या आमच्या गणपतीच्या देवालयांतील मूर्ति आहेत. त्या मागें मोंगलाईच्या दंग्यांत आमच्या वडिलांनीं डोहांत टाकलेल्या होत्या. त्या द्यावयाच्या नाहींत." समर्थ म्हणाले "बरें आहे, फार उत्तम." असें म्हणून त्यांनीं त्याच खिंडींत त्या मूर्ति ठेवल्या आणि आपण चाफळास निघून आले.

अंगापूरकरांनीं त्या मूर्ति न्याव्यात म्हणून प्रयत्न केला. पण त्या मूर्ति कोणासच उचलेनात, म्हणून ते परत गांवांत गेले, त्यांनीं दोन गाडे, व पांच पन्नास मनुष्यें गोळा करून आणलीं आणि पाहिजे तितकी खटपट केली, परंतु मूर्ति कांहीं जाग्यावरून हालेनात! हा चमत्कार पाहून त्या लोकांना पश्चात्ताप झाला आणि ते सारे लोक समक्ष चाफळास जाऊन समर्थांस भेटले व म्हणाले "आमचा अपराध झाला, ह्याची क्षमा असावी. आपण आणलेल्या मूर्ति आपण इकडे घेऊन याव्यात. हें ऐकून समर्थ म्हणाले "बरें आहे." नंतर भानजी गोसावी यांस हांक मारून सांगितलें कीं, "जा; त्या सुकटण्याच्या खिंडीमध्यें मूर्ति आहेत त्या घेऊन ये." त्या-

प्रमाणें भानजी गोसावी गेले आणि त्यांनीं आपल्या झोळींत घालून त्या मूर्ति आणल्या! तें पाहून अंगारपूरकर समर्थांच्या सामर्थ्याबद्दल अत्यंत धन्यवाद गाऊं लागले.

नंतर जातेसमयीं अंगारपुरच्या लोकांनीं समर्थांची प्रार्थना केली कीं, आपल्या सेवेमध्यें आमचा कांहींतरी अधिकार असावा. त्यावरून स्वामींनीं आज्ञा केली कीं, "प्रतिवर्षी श्रीरामनवमीच्या उत्सवांत त्रिनीस सिंहासनाची काठी तुमची असावी." त्यावरून प्रतिवर्षीं चाफळच्या उत्साहांत त्रिनीचा मान अंगापुरकरांचाच चालू झाला, व तो अद्यापही चालत आहे.

**चाफळच्या उत्सावाची सुरुवात**--समर्थांच्या मनाप्रमाणेंच नव्हे तर त्याहूनही कांकणभर सरसच अशा मूर्ति हस्तगत झाल्यामुळें त्यांच्या मनाची इच्छा अधिकच दुणावली व आतां त्या स्थापन करून त्यांचा रामनवमीचा उत्सव कधीं सुरू होतो असें त्यांस होऊन गेलें. परंतु समर्थांच्या मनांत गोष्ट आल्यानंतर ती घडावयाला उशीर तो कशाचा! तें कार्य तत्काल व्हावें अशीच त्यांची सदी असे, किंवा ईश्वरी संकल्पही तसाच असे असें म्हटलें तरी चालेल. त्या कामाला आधीं मंदीर बांधावयास जागा पाहिजे हा पहिला प्रश्न होता. त्यासाठीं चाफळकरापाशीं त्यांनीं ती गोष्ट काढली. आमचे लोक धर्माभिमानी आहेत; धर्म त्यांचा प्यारा आहे, 'धर्म धर्म' म्हणून ते हाकाटीही करतात; ह्या गोष्टी खऱ्या आहेत. पण प्रत्यक्ष धर्म करण्याची पाळी आली कीं, त्यांच्या कृतीची साक्ष पटते. देवापुढें सुपाऱ्या ठेवावयाला आणावयाच्या त्या निवडून सन्याशाचीं डोकीं! भिक्षेकऱ्याला जोंधळे ठेवावयाचे म्हणजे पेवांतले किडलेले! भटाला भात करावयाचा तो हत्तीभोगाचा! गोरक्षणाला पैसा टाकावयाचा तो खोटा असेल तो! मग हाच पंक्तिप्रपंच देवाच्या जागेंत तरी कां न दाखवावा? चाफळकरांनींही समर्थांच्या म्हणण्याला मान दिला. मांड नदीच्या कांठी एक जागा दिली. पण ती जागा कसली होती? कुंभार डोहाच्या पलीकडे दक्षिणतीरास मोठ्या झाडीची, भूतपिशाच्चांनीं युक्त, अमंगळ व मसणवटयाची जागा होती ती दाखविली! समर्थांनीं ती जागा पाहिली, आणि फार उत्तम आहे म्हणून सांगितलें; कारण

समर्थांपाशीं अशुभ आणि अमंगल राहणार कोठें? ' विपरितः सुकृतो भवेत्'. समर्थांचें जेथें वास्तव्य घडेल तेथें अशुभाचें शुभच व्हावयाचें. हें ठरलेलें असे. '**अशुभाचें शुभ करितां तुज कांहीं! अवघड नाहीं पांडुरंगा ॥** ' असें तुकोबांनीं म्हटलेलेंच आहे.

ती जागा हातीं येतांच समर्थांनीं प्रथमतः स्थलशुद्धीचे काम सुरू केलें. त्या ठिकाणीं, म्हसोबा, वेताळ, बिरोबा अशीं बरींच दगडाला शेंदूर लावून दैवतें केलेलीं होतीं. तीं चटसारीं समर्थांनीं काढून टाकलीं व त्यांनीं पुन्हां कोणास कधीं कांहीं उपद्रव देऊं नये म्हणून त्यांची एका जांभळीच्या झाडाखालीं स्थापना करून उत्सवांत रथ ओढण्याच्या पूर्वदिवशीं मापटेंभर तांदूळ व एक नारळ, आणि रथावरून श्रींची स्वारी परत आल्यानंतर श्रींवरून ओवाळून दहीभात टाकतील तेवढ्यावर संतुष्ट असावें अशी आज्ञा केली.

नंतर श्रींचें देवालय बांधण्याचा विचार काढला. तेव्हां सर्व शिष्य मंडळीकडून द्रव्य आलें तें, नरसोमलनाथ मामलेदार ह्यांनीं द्रव्य दिलें तें, आनंदराव देशपांडे चाफळकर ह्यांची देणगी, गिरीगोसावी यांजकडून आलेलें द्रव्य. छत्रपतींकडून आलेले ३०० होन, [ ह्याचा उल्लेख छत्रपति स्वतः चाफळच्या मठांत प्रथमच आल्या वेळीं होणार असल्यामुळें त्याचा तपशील येथें देत नाहीं. ] इत्यादि खर्ची घालून श्रींचें देवालय बांधलें व अंगापुरच्या डोहांतून आणलेल्या श्रीरामचंद्राच्या मूर्तींची मोठ्या समारंभानें स्थापना करून शके १५७० सर्वधारी नामसंवत्सरांत रामनवमीचा उत्सव चालू केला. तो आजपर्यंत चालत आहे.

ह्या उत्सवांत कोणाचे मान कसे, कोणाकडे कोणकोणती सेवा, ह्याचे नियम करण्यांत आले. शहापूरकर साठे पाटील यांजकडे सर्व कारखान्याचा व छडीचा मान आहे. तो चालू ठेवून क्रमाप्रमाणें शिष्यमंळींनीं उत्सव करीत असावा. श्रींची पूजा भानजी गोसावी व विठ्ठल गोसावी ह्यांनीं करावी, साहित्य पाहण्याचा अधिकार दिवाकर भटजी महाबळेश्वरकर यांस सांगितला. उत्सवास प्रारंभ झाला म्हणजे प्रतिपदेचा दिवस व नित्य सवाई म्हणणें व प्रथम कीर्तनास प्रारंभ करणें तो शहापूरकर बाईकडे अधिकार. तसेंच रामजन्माच्या दिवशीं श्रींचा जन्मकाळही बाईनींच करावा. रथा-

वरून मूर्ति जातांना बाईचे पालखींत बसवून न्यावी. रथापुढें कीर्तन करणें तें बाईचे भ्रतार बाबजीपंत, सौ. बाई व भिकाजीपंत यांनीं करावें. द्वितीयेचा दिवस रुद्राजीपंत देशपांडे कऱ्हाडकर ह्यांनीं करावा. तृतीयेचा दिवस तारळेकर देशपांडे ह्यांनीं करावा. चतुर्थीचा व पंचमीचा दिवस शिराळकर देशपांडे यांनीं करवा. षष्ठीचा दिवस पवाराच्या निगडीचे रंगोबा गोसावी यांनीं करावा. सप्तमीचा दिवस नरसोमलनाथ यांनीं करावा. अष्टमीचा दिवस वेणूबाईनीं करावा. नवमीचा दिवस मुख्य मठींच कल्याण गोसावी यांनीं करावा. दशमीचा आनंदराव देशपांडे चाफळकर ह्यांनीं करावा. ह्याप्रमाणें ज्याचा जो दिवस नेमलेला आहे, तो दिवस त्यानें करून त्या दिवशीं कीर्तनही त्यानेंच करावें. ह्यावरून समर्थांनीं आपल्या कार्यबाहुल्यांत कीर्तनसांप्रदाय किती वाढविला होता ही गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे. रथ माघारा येतांना शिराळकर ह्यांनीं पुढें कीर्तन करावें. येतांना मूर्ति त्यांचे पालखींत बसवून आणावी, आणि लळित करणें तेंही त्यांनींच करावें. शहापूरकर पाटील ह्यांनीं अठरा कारखाने चालवावे, व शिवाय हुद्याचेंही काम करावें. वांकनिशीचें काम अंताजी गोपाळ कुडाळकर देशपांडे ह्यांनीं करावें. सवाया ह्मणण्याच्यापूर्वीं त्यांनींच वाका सांगावा. मठांतील सर्व व्यवहार आक्का व वेणूबाई, दिवाकरभट ह्यांनीं सदोदित पहावा. वेणूबाईनीं सर्वकाळ मठांत असावें. ह्याप्रमाणें कामें नेमून दिलीं. समर्थांनीं उत्सवांत मठांत असावें अथवा रामघळींत किंवा शिंगणवाडीच्या गुहेंत स्वारी असावी.

ह्या चाफळच्या रावनवमीच्या उत्सवाचें वर्णन समर्थांनीं डफगाण्यावर केलें आहे तें असें:—

## डफगाणें

**भोंवतें डोंगराचे फेर। मध्यें देवाचें शिखर॥**
**पुढें मंडप सुंदर। नवखणाचा॥ १॥**
**चहूं खांबांवरी रचना। वरत्या चोव्वीस कमाना॥**
**कमकटाऊ नयना। समाधान॥ २॥**

नानातरू आंबे वनें। दोहींकडे वृंदावनें ॥
वृंदावनीं जगज्जीवनें। वस्ती केली ॥ ३ ॥
पुढें उभा कपीवीर। पूर्वेकडे लंबोदर ॥
खालीं दाटलें दरबार। ठाईं ठाईं ॥ ४ ॥
दमामे चौघडे वाजती। धडाके भांड्यांचे होती ॥
फौजा भक्तांच्या भाजती। ठाईं ठाईं ॥ ५ ॥
पाही मरातबे निशाणें। मेघडंबरें सूर्यपानें ॥
पताका छत्र्या सुखासनें। दिंड्या विंझणे कुंचे ॥ ६ ॥
काहळे कर्णे बुरुंग वाकें। नानाध्वनी गगन झांके ॥
बहु वाद्यांचे धबके। परोपरी ॥ ७ ॥
टाळ मृदंग उपांग। ब्रह्मविणे चुटक्या चंग ॥
तानमानें माजे रंग। हरिकथेशीं ॥ ८ ॥
घंटा घाटा शंख भेरी ॥ डफडीं पांवे वाजंतरी ॥
भाट गर्जती नागरी। परोपरी ॥ ९ ॥
उदंड यात्रेकरू आले। रंगीं हरिदास मिळाले ॥
श्रोते वक्ते कथा चाले। भगवंताची ॥ १० ॥
नाना पुष्पमाळा तुरे। पाहों जातां भडस पुरे ॥
रंग स्वर्गीचा उतरे। ठाईं ठाईं ॥ ११ ॥
गंध सुगंध केशरें। उदंड उधळिती धूसरें ॥
जगदंतरें हरिहरें। वस्ती केली ॥ १२ ॥
दिवट्या हिलाल चन्द्रज्योती। नळे अरडत उडती ॥
बाण हवया झरकती। गगनामध्यें ॥ १३ ॥
उदंड मनुष्यांचे थाटे। दिसताती लखलखाटे ॥
एकमेकांसी बोभाटे। बोलाविती ॥ १४ ॥
उदंड उजळिल्या दीपिका। नामघोष करताळिका ॥
कित्येक म्हणती ऐका ऐका। ऐसे शब्द होती ॥ १५ ॥
क्षीरापतीची वांटणी। तेथें जाहलीसे दाटणी ॥
पैस नाहीं राजांगणीं। दाटी जाहली ॥ १६ ॥

रंगमाळा नीरांजनें । तेथें वस्ती केली मनें ॥
दिवस उबावला सुमनें । कोमाइला ॥ १७ ॥
रथदेवाचा ओढिला  यात्रेकरां निरोप झाला ॥
पुढें जावयाचा गलबला । ठाईं ठाईं ॥ १८ ॥
भक्त जन म्हणती देवा । आतां लोभ असों द्यावा ॥
धन्य सुकृताचा ठेवा । भक्ती तुझी ॥ १९ ॥
दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो ॥
देव भक्तांसवें जातो । ध्यानरूपें ॥ २० ॥

ह्या समर्थांच्या डफगाण्यावरून चाफळच्या उत्सवाच्या गजगजाटाची कल्पना बऱ्याच प्रकारें मनांत उभी राहते. आणखी समर्थांच्या कृतींत एक गोष्ट विशेष होती. ती ही कीं, इतकी सारी खळबळ ते करीत खरी, पण ते स्वतः करून सवरून नामानिराळे राहत. एकदां सुरवात करून द्यावयाची, कित्ता गिरवून दाखवावयाचा आणि आपण नामानिराळें व्हावयाचें ही त्यांची नेहमींची पद्धत असे. चाफळास येवढा रामनवमीचा उत्सव सुरू केला खरा; परंतु समर्थांची वस्ती पहिल्याच वर्षाला काय असेल ती, बाकी उत्सवास समर्थांचें राहणें यथातथाच. ते ठिकठिकाणीं मठ स्थापन करीत, पण त्या मठांत आपण कधीं वर्ष सहा महिने राहिले आहेत असें कधींच घडत नसे. त्यांना रानावनांत फिरणें, डोंगर कटारींत जाऊन बसणें, गुहेंत वस्ती करणें ह्याचीच निरंतर आवड असे. डोंगरांतून फिरण्याचा तर त्यांना कंटाळा म्हणून नाहींच. हा चाफळचा रामनवमीचा उत्सव चालू केल्यापासून तर तेथें आठ पंधरा दिवस धूमधडाका चाले. जेवणें, खाणें, वाद्यें, छबिने सारी गर्दीच गर्दी! पण समर्थ त्यांमध्यें फारसें कधींच मिसळत नसत. तर "**दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो**" हाच त्यांचा नित्याचा बाणा! देवीची मूर्ति आणलेली होती, ती परळीस स्थापली. [त्याचा वृत्तांत पुढें येणार आहे.] चाफळास श्रीचे देवालयासमीप दक्षिणेस जागा करून मठ बांधला. त्या मठांत शिष्यमंडळींनीं राहात असावें. आपण स्वतः अरण्यांत किंवा घळींत किंवा मठांत किंवा शिंगणवाडीचे खिंडींत गुहा करून मारुति स्थापला आहे तेथें, किंवा धोंडोबाचे डोंगरीत लहान

गुहा व पाण्याचें टांकें आहे, तेथें इत्यादि ठिकाणीं वास करून श्रीचें देवालय पहावें. अशा प्रकारें समर्थांचा विहार असे. फिरण्याचा किंवा चालण्याचा कंटाळा म्हणून त्यांना कधीं ठाऊकच नसे. ते प्रति दिवशीं चाफळाहून कृष्णास्नानासाठीं उंब्रजेस जात असत ! म्हणून तेथील गांवकऱ्यांनीं समर्थांस मठ बांधण्याकरितां जागा दिली. तेथेंही एक मठ बांधला. याप्रमाणें सर्व शिष्य मंडळींची योजना करून आपण कधीं कधीं पूजा करावी, कधीं कधीं अरण्यवास करावा. कधीं गुहेंत तर कधीं डोंगरावर, कधीं रानांत तर कधीं खडीवर मनास येईल तेथें वास करावा. क्वचित् चाफळासही यावें, जावें असा स्वच्छंद रीतीनें संचार करून जगदुद्धार करावा, लोकांस भक्तिमार्गास लावावेत, धर्मसंस्थापना करावी असें होतां होतां उत्तरोत्तर समर्थांची कीर्ति जगद्विख्यात होऊन राहिली.

**समर्थांचा शिष्यसमुदाय**—त्या वेळीं समर्थांचे शिष्य किती झाले होते, ह्याची गणना करणें सुद्धां अशक्य कोटींतील होतें. परंतु त्यांतील ७२ असामी मोठे महंत असे मानलेले असत. त्यांची याद डोमगांवचे मठांत आहे. त्यांपैकीं समर्थांबरोबर समर्थांच्या सेवेस हजर असत त्या शिष्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

**१ उद्धव गोसावी. २ कल्याण गोसावी. ३ रंगोबा गोसावी, ४ आक्काबाई. ५ वेणूबाई. ६ सतीबाई शहापूरकर. ७ त्रिंबक गोसावी. ८ देवदास गोसावी, ९ महादेव गोसावी १० मुसळराम गोसावी. ११ मौनी गोसावी. १२ भोळाराम गोसावी. १३ आनंदभट महाबळेश्वरकर. १४ भिकाजी गोसावी. १५ आपा गोसावी. १६ दत्तात्रय गोसावी, १७ रोकडाराम गोसावी. १८ हनुमंत गोसावी. १९ दिवाकरभट गोसावी. २० बाजीपंत शहापूरकर.**

ह्या वीस असामींपैकीं कोणी चाफळच्या मठांत असत व कोणी स्वामींबरोबर असत.

**एकादश रुद्रस्थापना**—ह्यावर समर्थांनीं येवढी तपश्चर्या करून 'जगदुद्धार' 'जगदुद्धार' तो काय केला ? अशी अर्वाचीन पंडितांची पृच्छाही येणारच. त्याचें उत्तर थोडक्यांत देतां येणें शक्य नाहीं. तथापि ठोकळ-

मानानें त्याचें उत्तर देतां येण्यासारखें आहे. तें येवढेंच कीं, '**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे**' हें जें श्रीमद्भगवद्गीतेंत भगवंताचें वाक्य आहे, तेंच त्यांनीं मूर्तस्वरूपाला आणलें. परमेश्वर अवतार कशाकरतां घेतो? धर्मस्थापनेकरतां घेतो. तीच धर्मस्थापना त्यांनीं केली. म्हणजे भक्तिपंथ वाढविला. ठिकठिकाणीं मारुतीची स्थापना केली; श्रीरामचंद्राचें देवालय बांधलें; मोठमोठ्या थाटामाटाचे उत्सव सुरू केले आणि लोकांस भजनमार्गास लावले. आतां अशा धर्ममार्गापासून जनांचें हित कोणतें? अशा धर्मभोळेपणानें जगांत ज्ञानाची वृद्धि होते, कीं अज्ञानाची वृद्धि होते? ह्या प्रश्नोत्तराच्या भानगडींत आम्ही मुळींच पडत नाहीं. तो प्रश्न अलाहिदा आहे. आम्ही सध्यां पूर्वपरंपरेनें चालत आलेल्या लोकांच्या समजुतीलाच धरून चालत आहों. त्यावरून पाहतां समर्थांनीं त्यांच्या मनांतील उद्देशाप्रमाणें ज्या वैदिक धर्माचा ऱ्हास होत चालला होता, त्याला पुन्हा ताजातवाना करण्याकरितां ठिकठिकाणीं मठ स्थापन केले, देवालयें बांधलीं, उत्सव सुरू केले आणि लोक ईश्वरभजनीं लावले. आणि शरण येतील त्यांस अनुग्रह देऊन लोक आपलेसे करून ठेविले. हेंही कार्य कांहीं सामान्य नव्हें.

ह्या कामांतच समर्थांचें आणखी एक कार्य असे. तें कोणतें? तर ठिकठिकाणीं मारुतीची स्थापना करावयाची हें. देवालय बांधणें, मठ स्थापना करणें, उत्सव सुरू करणें हीं कामें थोड्यातरी अवधीचीं असत, कारण, त्याला द्रव्याची अनुकुलता लागे, मनुष्यबळ लागे, व तीं सारीं जमवाजमव करावयाला थोडा तरी अवधी लागत असे. परंतु मारुतीची स्थापना करावयाला अशा प्रकारची एकही अडचण पुढें येत नसे. कारण त्याची स्थापना करावयाला जागा कोठेंही असली व कितीही लहान असली तरी चाले, आणि मूर्तीचें काम तर त्याहूनही सोपें असे. ती मूर्ति पाषाणाचीच लागे असें नाहीं, तर चुन्याची किंवा शेणाची केली तरीसुद्धां चालताचालत होत असे. आणि ती तयार करावयाला कोणत्याही कारागिराच्या पाय धरण्याही कराव्या लागत नसत. तर समर्थ स्वहस्तेंच ती तयार करीत. ह्यामुळें समर्थांची स्वारी ज्या ज्या गांवीं जात असे, त्या त्या गांवीं सर्वांआधीं मारुतीची स्थापना करणें हेंच आपलें एक आद्यकर्तव्य असें ते

समजत. म्हणजे मारुतीची स्थापना ही समर्थांच्या धर्मस्थापनेची एक मूहूर्त मेढच होती म्हटलें तरी चालेल.

अशा मारुतीच्या स्थापना समर्थांनीं पुष्कळच केल्या आहेत. परंतु त्यांपैकीं ' अकरारुद्र ' म्हणजे अकरास्थानें प्रमुख मानलीं जातात. कोणताही जिल्ह्याळ्याचा भक्त म्हटला कीं, समर्थ त्याला मारुतीची स्थापना करून देत. त्यांत त्यांचा हेतु हा कीं, मारुति हा सर्वांचा संरक्षणकर्ता आहे. तो जवळ असल्यावर आणि त्याच्यावर निष्ठा ठेविल्यावर भक्तास कोणत्याही प्रकारें भीति नाहीं. शिवाय मारुति म्हणजे माझाच अंश आहे. ह्याकरितां माझें केव्हांही स्मरण केलें तरी मी त्या भक्ताला सर्व संकटांतून मुक्त करीन. मारुति ही साक्षात् माझीच प्रतिमा आहे. ह्याकरितां माझेंच दर्शन घेण्याची ज्यास अपेक्षा आहे, त्यांनीं ह्या मारुतीचें दर्शन घेतलें म्हणजे पुरे.. त्यांनीं त्याच्या कृपेच्या बळावर स्वस्थ असावें, तिळमात्र काळजी करूं नये. टाकळीच्या झोपडींत उद्धव गोसाव्यांना, व शहापुरास सतीबाईंना शेणची व चुन्याची मूर्ति करून दिली होती, ह्यांतील तत्त्व हेंच होतें. असो.

अशा ज्या मारुतीच्या अकरा मूर्ति स्थापन केल्या, त्यांची नांवनिशीं व थोडीशी माहिती देतों. १ **शहापुरामध्यें** सतीबाईकरितां मारुतीची मूर्ति करून दिली, तो पहिला मारुती होय. २ **मसुरांत** श्री रामनवमीच्या उत्साहाकरितां मारुतीची स्थापना केली, तो दुसरा मारुती होय. ३ **चाफळांत** श्रीरामचंद्राची स्थापना केल्यानंतर त्यांच्या सन्मुख मारुतीची स्थापना केली, तो तिसरा मारुती. ४ समर्थ **उंब्रजेस** वारंवार कृष्णास्नानास जात असत म्हणून तेथें ही एक मारुतीची स्थापना केली, तो चवथा मारुती. ५ कसबे **शिराळे** येथें देशपांडे वगैरे शिष्यसांप्रदायी मंडळी होती. त्यांच्यासाठीं शिराळ्यास मारुतीची स्थापना करून मठही करून दिला, आणि तेथलि पूजा देशपांडे ह्यांसच सांगितली. तो पांचवा मारुती. ६ **पाडळींतील** भक्त मंडळीच्या प्रार्थनेवरून पाडळीस मारुति स्थापन केला, तो सहावा मारुती. ७ **पारगांवास** तेथील मंडळीच्या भक्तीस्तव स्थापन केलेला मारुती सातवा. ८ **मनपाडळेंगांवी** मारुति नव्हता. ह्यामुळें तेथें जातां येतांना मारुतीचें दर्शन होत नसे म्हणून समर्थांनीं तेथलि गांवकऱ्यांस विचारिलें कीं, येथें मारुति कां नाहीं? तेव्हां गांवकऱ्यांनीं विनंती

केली कीं, शिवेपुढें एक मोठा दगड आहे, त्यासच आम्ही मारुति म्हणतों. म्हणून समर्थांनीं त्याच दगडावर मारुति कोरून दिला. हा आठवा मारुति होय. ९ हिंगणवाडीच्या गुहेमध्यें समर्थांचें नेहेमीं स्नान-संध्या करण्याचें स्थान असे. ह्यास्तव तेथें ही एक लहान गोजिऱ्या मारुतीची स्थापना केली. हा नववा मारुती. १० दहावा मारुति आहे तरफ वाळवें येथलि आहे. ती अशीः—ह्याच्यासंबंधानें एक मोठी चमत्कारिक कथा आहे. बाहे हें कृष्णातीरीं असून तेथें कृष्णानदीचें दोन ओघ होऊन मध्यंतरीं एक बेट झालेलें आहे. त्यामध्यें रामानीं स्थापन केलेलें एक आणि लक्ष्मणांनीं स्थापन केलेलें एक अशीं दोन शिवलिंगें आहेत. ह्यास्तव त्यांच्या दर्शनासाठीं म्हणून स्वामी एकदां बाह्यास गेले. कृष्णा-माहात्म्य त्यांनीं तेथें श्रवण केलें. नंतर तेथील ग्रामस्थांस प्रश्न केला कीं, येथें मारुति कां नाहीं ? तेव्हां सर्वांनीं विनंति केली कीं, हा अक्षोभ्य डोहो आहे. त्यांत देवाच्या पश्चिम भागास शंभर धनुष्यावर भीमकुंड म्हणून आहे. त्या कुंडांत मारुति आहे. तें ऐकून समर्थ म्हणाले "नैवेद्याकरतां अकरा खंडी धान्याची सिद्धता कराल, तर त्या मारुतीस आम्ही बाहेर काढतों." तेव्हां गांवकरी म्हणाले "उत्तम आहे." असें म्हणून ते त्या तयारीस लागले.

त्यावरून स्वामी त्या डोहांत उडी घ्यावयास तयार झाले. तेव्हा कृष्णाजीपंत वोकील कोरेगांवकर हे त्यांच्या बरोबर होते. त्यांनींही समर्थांच्या कमरेस मिठी घालून त्यांच्या बरोबर डोहांत बुडी दिली. ते उभयतां ही अकरा प्रहर पर्यंत डोहांत होते ! नंतर स्वामींनीं मारुतीचें दर्शन घेऊन मूर्ति बाहेर आणली. तों तें ध्यान परम सुंदर, सुवर्णमय आणि अकरा गज उंच असें होतें. त्याच्या स्तवनपर समर्थांनीं श्लोक केलें ते येणेंप्रमाणेंः—

### श्लोक

**बळें सर्व संहारिलें रावणाला।**
**दिलेंहे अक्षयीं राज्य बीभीषणाला॥**
**रघूनायकीं देव ते मुक्त केले।**
**अयोध्यापुरा जावयालागिं आले॥ १ ॥**

पथामाजि कृष्णातिरीं रामराया ।
घडे राहणें स्नानसंध्या कराया ॥
सिता राहिली शीरटें गांव जेथें ।
रघूराज तो पश्चिमेचेनि पंथें ॥ २ ॥

जपध्यान पूजा करी रामराजा ।
तयाचे परी वीर सौमित्र दूजा ॥
न देहस्मरे चित्तध्यानस्थ झालें ।
अकस्मात तों तोय अद्भूत आलें ॥ ३ ॥

बळें चालला ओघ नेटें धडाडा ।
नभीं धांवती लोट लाटा भडाडा ॥
नदी चालली रामध्यानस्थ जेथें ।
बळें विक्रमें पावला भीम जेथें ॥ ४ ॥

उभा राहिला भीमरूपीं स्वभावें ।
बळें तुंब तो तुंबिला दोन गांवें ॥
नदी एक वीभागली दोन बाह्यें ।
म्हणोनी तया नांव हें गांव बाह्यें ॥ ५ ॥

सुखें लोटितां देखिलें रामलिंगा ।
बळें चालली भोंवतीं कृष्णगंगा ॥
परी पाहतां भीम तेथें दिसेना ।
उदासीन तें चित्त कोंठे वसेना ॥ ६ ॥

हनूमंत पाहावयालागि आले ।
दिसेना सखा थोर विस्मीत झाले ॥
तयावीण देवाल्य दीसे उदासें ।
जळांतूनि बोलाविलें रामदासें ॥ ७ ॥

मनांतील आणूनियां हा कुडावा ।
दिला भेटिचा जाहला थोर हावा ॥
बळें हाक देतांचि जैसा धडाडी ।
महामेघ गंभीर तैसा गडाडी ॥ ८ ॥

**रघूराज ऊपासकाला प्रसंगें ।**
**सख्या मारुती धावरे लागवेगें ॥**
**रघूराज वैकुंठधामासि गेले ।**
**तथीं दास हे मारुतीं नीरवीलें ॥ ९ ॥**
**प्रभूचे महावाक्य हें सत्य केलें ।**
**म्हणे दास हें प्रत्यया शीघ्र आलें ॥**
**जनामाजि हें सांगतांही पुरेना ।**
**अवस्था मनीं लागली हे सरेना ॥ १० ॥**

येणेंप्रमाणें प्रार्थना करून समर्थांनीं सर्वांस दर्शन करविलें. व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें नैवेद्याचें साहित्य आणावें म्हणून सर्वांस आज्ञा केली. परंतु समयास साहित्य तयार झाले नाहीं. हें पाहून मारुतींनीं आज्ञा केली कीं, ह्या कालीं ही मूर्ति बाहेर रहावयाची नाहीं, म्हणूनच मी डोहांत राहिलों आहें. तो तुम्हाकरतां म्हणूनच बाहेर आलों. पण आतां तुम्हीही ह्या मूर्तीची स्थापना करूं नये. ही मूर्ति पूर्वीप्रमाणें डोहांतच ठेवून येथें असलीच मूर्ति दुसरी तयार करून स्थापावी. अशी आज्ञा होतांच समर्थांनीं ती मूर्ति पुन्हा नेऊन डोहांत ठेवली. व कृष्णाजीपंत व इतर शिष्यांकडून चुना तयार करवून त्याची मारुतीची मूर्ति तयार केली. आणि तिची बाह्यास स्थापना करून रितीप्रमाणें पूजा नैवेद्याची वगैरे तजवीज लावून दिली.

कृष्णाजीपंत हे समर्थांबरोबर डोहांत गेलेच होते. त्यांनीं हा सर्व प्रकार इत्थंभूत पाहिला. ते नेहमीं समर्थांच्या बरोबरच असत. त्यांच्यावर समर्थांची फार कृपा होती. म्हणून त्यास पट्टाभिषेक रामाच्या मूर्ति नित्यपूजेस देऊन गृहस्थाश्रमांत राहण्याविषयीं आग्रहपूर्वक आज्ञा करुन निरोप दिला. [ही मूर्ति अद्याप बोकिल ह्यांच्या घरीं आहे.] हा दहावा मारुति होय. अकरावा मारुति म्हणजे चाफळांत श्रीराममूर्तीच्या पाठीमागें स्थापना करून त्यांस ' भीम ' असें नांव ठेवलें आहे तो. ह्या प्रमाणें अकरा मारुतींची स्थापना केलेली आहे. ह्या अकरा मारुतींचें नांवनिशीवार वेणूबाईनीं एका अभंगांत वर्णन केलें आहे. तो अभंग असा:—

## अभंग.

चाफळामाजी दोन, उंब्रजेस एक ।
पारगावीं देख चौथा तो हा ॥ १ ॥
पाचवा मसूरीं शहापुरीं साहवा ।
जाण तो सातवा शिराळ्यांत ॥ २ ॥
शिंगणवाडीं आठवा, मनपाडळें नववा ।
दहावा जाणावा माजगांवीं ॥ ३ ॥
बाह्यांत अकरावा, येणें रितीं गावा ।
सर्व मनोभाव पुरवीला ॥ ४ ॥
वेणी म्हणे स्वामी समर्थ रामदास ।
कीर्ति गगनांत न समाये ॥ ५ ॥

ह्या शिवाय आणखी एक स्थापन केलेला मारुति आहे. तो डोळेगांवचा मारुति. समर्थ हें कधीं कधीं डोळगांवीं उर्वशी नदीच्या तीरीं स्नानसंध्येस बसत असत. म्हणून तेथेंही एक मारुतीची पाषाणाची मूर्ति स्थापन केलेली आहे. समर्थ तेथून निघतांना त्यांनीं नेहमींप्रमाणें मारुतीस नमस्कार करून जावयास आज्ञा मागितली. तेव्हां तेथील मारुतींनीं बरें आहे असें म्हणून मान हालविली ! ती वांकडी झालेली मान अद्याप तशीच आहे ! समर्थांच्या धर्मस्थापनेच्या कार्यांपैकीं, मारुतींच्या मूर्ति स्थापन करण्याचें हें एक कार्य होय.

**मोरया गोसावी व तुकारामबावा यांची भेट**—एके दिवशीं तुकारामबावा हे आळंदीस गेले असतां तेथें चिंचवडच्या मोरयादेवांची व त्यांची सहज गांठ पडली. तेव्हां देवांनीं तुकारामबुवांची प्रार्थना केली कीं, तुमच्या आमच्या पंक्तीस फार दिवस झाले, ह्याकरितां आपण एक वेळ चिंचवडास येण्याची कृपा करावी, म्हणजे परस्पर पंक्तिलाभ होईल. तुकारामबावा म्हणाले "रामदासस्वामी आपल्या तिकडे येतील, त्या दिवशीं आम्हीही येऊं व तिवर्गांचीच पंगत करूं." हें ऐकून मोरयादेव आपल्या घरीं गेले. ह्या गोष्टीस थोडे दिवस गेले नाहींत तोंच एके दिवशीं अकस्मात् समर्थ रामदास स्वामींची स्वारी चिंचवडास आली. ती बातमी

लागतांच देव सामोरे जाऊन मोठ्या समारंभानें त्यांस घरीं घेऊन गेले आणि म्हणाले " आम्ही पूर्वीं तुकारामबावा यांस येण्याविषयीं विनंति केली होती. त्या वेळेस त्यांनीं सांगितलें कीं, रामदासस्वामी येतील त्या वेळेस आम्ही येऊं. त्याप्रमाणें आज योग आला आहे, परंतु तुकारामबोवा येतील तर उत्तम होईल." ह्यावर समर्थ म्हणाले " तुमची मर्जी आहे तर तुकारामही येतील." असें म्हणून स्नान करून संध्येस बसले आहेत तों अकस्मात् तुकारामबावाही येऊन दाखल झाले. तेव्हां देवांस बहुत संतोष झाला. नंतर स्वयंपाकाची सिद्धि होतांच पात्रें मांडूं लागले. तेव्हां तुकारामबावांनीं सांगितलें कीं, आपलीं त्रिवर्गांचीं पात्रें एकांतीं मांडावीं. त्यांत आमच्या पानाजवळ दोन, समर्थांच्या पात्राजवळ चार, व तुमचे पानाजवळ एक अशीं पात्रें मांडून सर्व पदार्थांची एक वाढ करावी. आणि तिकडे कोणी येऊं नये; असा बंदोबस्त ठेवावा. इतरांचीं पानें बाहेर मांडावींत."

हें ऐकून देवांनीं त्याप्रमाणेंच बेत केला. आपलीं त्रिवर्गांचीं तुकारामबावांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व पात्रें मांडलीं. व तिकडे कोणीही येऊं नये अशी सक्त ताकिद दिली. पात्रें वाढून झाल्यानंतर तुकारामबावांस व समर्थांस आंत येण्याविषयीं विनंती केली. देवांनीं केलेला तो बेत पाहून तुकारामबावा अगदीं खूष झाले. नंतर देवांनीं त्यांस विनंती केली कीं आपल्याजवळ दोन पात्रें वाढावयास सांगितल्याप्रमाणें वाढलीं आहेत. तरी आपले कोण जेवणारे असतील त्यांस हांक मारावी. तुकोबा म्हणाले "आमचे जेवणारे दुसरे कोण? मालकाशिवाय आपण कसे जेवावें? ह्या कारितां आपण आपल्या गजाननमहाराजांस हाक मारा, म्हणजे आम्हीही आमच्या विठ्ठल रखमाईस घेऊन येतों." हें तुकोबाचें वाक्य ऐकून मोरयादेव तर अगदीं स्तब्ध झाले व लागलेंच म्हणाले " तुकोबा! ह्या कलियुगांत येवढें सामर्थ्य कोणापाशीं आहे?" हें ऐकून तुकारामांनीं समर्थांच्या तोंडाकडे पाहिलें. तेव्हा त्यांचा उद्देश जाणून समर्थ म्हणाले " बरें बोवा! सर्वांच्या आमंत्रणाचें काम आम्ही पतकरतों." असें म्हणून नेत्र मिटून श्रीरामचंद्रांचें ध्यान करतांच राम, लक्ष्मण, सीता व मारुति चौघेही आपआपल्या पात्रावर येऊन बसलीं. नंतर विठोबा रखमाईचें ध्यान केलें, तेव्हा तींही दोघे येऊन तुकोबा शेजारच्या पात्रांवर

बसलीं. नंतर गजानन महाराजांचें ध्यान करतांच तेंही देवाशेजारीं आपल्या पात्रावर येऊन बसले! मोरयादेवसुद्धां तत्कालिन साधूंपैकीं एक नामांकित साधु व भगवद्भक्त होते. पण ह्या दोन साधूंचें हें अद्भुत व कल्पनातीत सामर्थ्य पाहून तेही अगदीं आश्चर्यचकित झाले!

नंतर त्रिवर्ग साधूंची आपल्या आपल्या दैवतां सहवर्तमान परमार्थपर भाषणें होत होत मोठ्या आनंदानें भोजनें झालीं. भोजनें होतांच तीं प्रत्यक्ष आलेलीं दैवतें आपोआप अदृश्य झालीं! हीं दैवतें त्या त्रिवर्ग साधूंशिवाय कोणासच दिसत नव्हतीं! परंतु शेवटीं भोजन केल्याचीं उच्छिष्ट पात्रें मात्र त्यांच्या त्यांच्या जाग्यावर शिलक राहिलीं होतीं! असो.

येथपर्यंत समर्थांच्या चवथ्या तपाचा अर्धा कार्यभाग झाला. आतां ह्याच्यापुढील ह्याच तपांतील भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. तो कोणता? तर छत्रपति शिवाजी महाराज व समर्थ यांची भेट, व त्यांनीं समर्थांपासून घेतलेला अनुग्रह हा होय. अलीकडच्या संशोधक लोकांची चिकित्सा, वादविवाद, हमरी तुमरी सारी चालते ती ह्याच्याच करितां. त्याच वृत्तांताकडे आपल्यास आतां वळावयाचें आहे तें वळूं या.

# समर्थांचें सामर्थ्य
## किंवा
# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## पूर्वार्ध.
## भाग पांचवा. चवथ्या तपांतील पुढील भाग.

### श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराज ह्यांची भेट व अनुग्रह.

ब्रह्मांडांतील कोणतेंहि कार्य घ्या; त्याला दोन शक्ति कारणीभूत असतात. दोन शक्तींचा मिलाफ झाल्या-खेरीज कोणतेंहि कार्य परिपूर्ण होत नाहीं. ब्रह्म आणि माया किंवा जड आणि चैतन्य ह्या दोन आद्य शक्तींशिवाय ब्रह्मांडांची रचनाच होणें शक्य नाहीं. जगांतील प्रत्येक कार्याला दोन शक्ति लागतात. स्त्री आणि पुरुष, नर आणि मादी ह्या जोडीशिवाय तर मुळीं उत्पत्ति नाहीं. निगेटिव्ह आणि पॉझिटिव्ह ह्या दोन प्रवाहांशिवाय विजेचें कार्य नाहीं. अंधार आणि प्रकाश, थंडी आणि उष्णता, वारा आणि पाऊस अशा ह्या साऱ्या जोड्याच भरलेल्या आहेत. कान दोन; पाय दोन; हात दोन; डोळे दोन असें कां? एका डोळ्यानेंच जर दिसतें तर मग दोन कशाला? कारण, दोहोंशिवाय परिपूर्तता होत नाहीं. एका डोळ्यानें दिसतें खरें, पण त्यांत अपुरेपणा रहातो. एकच बाजू दिसते; दुसरी बाजू मुळींच दिसत नाहीं. तोच प्रकार राष्ट्राचा किंवा

समाजाचा आहे. त्यालाहि ऊर्जितावस्थेला यावयाला दोन बाजू खंबीर असाव्या लागतात. एक धर्माची बाजू आणि दुसरी राजकारणाची बाजू. आपल्या महाराष्ट्र देशांतहि सतराव्या शतकांत ह्याच दोन बाजूंना जोमदार अंकुर येऊन त्याला मनोहर पालवी फुटली; त्याला मोहोर गजबजला व त्याचीं अमृतफलेंहि चाखावयास मिळालीं! त्या स्वर्गसुखाच्या सुगीचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे? ह्या सृष्टीच्या रहाटीचा क्रम फार अद्भुत आहे. त्यांतील गूढ तत्त्वें मानवी आकलनशक्तीच्या फार पलीकडे आहेत. एखादे वेळीं आंगाची अगदीं लाही लाही होत असते; आंगांतून घामाच्या धारा वहात असतात; रानावनांत कोठें गवताची काडीसुद्धां दृष्टीस पडत नाहीं; श्वापदें, गुरें, ढोरें, तृषाक्रांत होऊन पाण्यासाठीं लाहालाहा करीत हिंडत असतात; डोळ्यांना पाणी लावीन म्हटलें तरी कोठें थेंब दृष्टीस पडत नाहीं; थोडेसें बाहेर पडलें तर पायांना चटके बसत असतात; क्षणभर कोठें छायेला बसूं म्हटलें तर वृक्षावर एकही पान दृष्टीस पडत नाहीं; आकाश पहावें तों अगदीं स्वच्छ निर्मळ! अशा स्थितींतहि एखादे वेळीं लांब कोठें तरी एखादा कापसाच्या गोळ्यासारखा ढग दिसूं लागतो व तो हळुहळूं पसरून मोठा होऊं लागून त्याला पिंजलेल्या कापसाप्रमाणें विशाल स्वरूप येतें. इतक्यांत दुसरा एक तसाच दूर अंतरावर त्याहूनहि अधिक तेजस्वी चांदीसारखा ठिपका आकाशांत दिसूं लागतो, आणि तो असा फैलावतो कीं जणों काय आतां सर्व आकाश व्यापून टाकणार! पानाला चुना लावतों न लावतों तों ते दोन्ही ढग एकत्र होतात आणि एकदम विद्युत्तेज प्रगट होऊन असा कडकडाड होतो कीं, पृथ्वी व आकाश त्या मेघगर्जनेनें दुमदुमून जातें. मुसळधार पर्जन्य सुरू होऊन जिकडे तिकडे गारीगार होऊन नदीनाले पाण्यानें भरून जाऊन सारी सृष्टि आबादीआबाद होऊन जाते. हा जसा सृष्टिक्रम दिसून येतो तसाच चमत्कार राष्ट्रांत व समाजांतहि घडून येतो. महाराष्ट्रांतहि त्यावेळीं हुबेहुब असाच प्रकार घडून आला. महाराष्ट्रीयांचें स्वराज्य असूनहि तें स्वराज्याला पारखे झाले होते. धर्माचा उच्छेद झाला; परधर्मी लोक घरांत घुसन त्यांनीं नाहीं नाहीं सो जुलम व अन्वित कृत्यें चालविलीं; मराठ्यामध्यें जे थोडे बहुत तरवारबहाद्दर होते ते मुसलमानांच्या ताटाखालचीं मांजरें

होऊन राहिले ! अशा आपत्कालांत स्वधर्माचें व स्वराज्याचें संरक्षण करणें अत्यावश्यक होतें. देह व आत्मा हे जरी दोन भिन्न आहेत असें वाटतें तरी त्यांचीं स्वरूपें एकच आहेत. एकाशिवाय दुसऱ्याचें अस्तित्वच नाहीं. त्याप्रमाणेंच धर्म व स्वराज्य ह्यांचीही गोष्ट आहे. तीं दोन्ही एक-जीवच आहेत. तरी तीं दोन्हीं कार्यें एकाच व्यक्तीस तडीस नेण्यास जड जातात. म्हणून दोन कार्यांस दोन व्यक्ति असणें हें उचित होय. आणि अशा वेळीं आपण अवतार घेऊन जगावर येतो ही परमेश्वराची प्रतिज्ञा तर ताम्रपटावर खोदलेलीच आहे. त्याला अनुसरून आपल्या महाराष्ट्रांत एक समयावच्छेदेंकरून अशा ईश्वरी अंशाच्या दोन व्यक्ति उत्पन्न झाल्या. त्यांपैकीं पहिली व्यक्ति म्हणजे श्रीसमर्थ रामदासस्वामी ही होय. त्यांनीं धर्म संस्थापनेचा विडा उचलून ह्यापैकीं निम्मा कार्यभाग पार पाडण्याचा संकल्प करून त्याचा पाया ते कसे मजबूत करीत चालले होते तो भाग इतक्या वेळपर्यंत सांगितला. आतां यापुढें स्वराज्याचा पाया रचून तो खंबीर करीत दुसरीकडून येणारी दुसरी व्यक्तीरूप अद्भुत शक्ति त्यांस कशी मिळाली व महाराष्ट्रदेश सुखसौख्यानें कसा समृद्ध झाला, हा अत्यंत रमणीय वृत्तात ह्या भागांत कथन करावयाचा आहे. ही दुसरी व्यक्ति कोण ? तर आपले स्वराज्य स्थापनकर्ते परमपूज्य छत्रपति शिवाजी महाराज हे होत. समर्थांचा जन्म शके १५३० मध्यें झाला. शिवाजी महाराजांचा जन्म शके १५४९ त झाला. अर्थात् समर्थांचें वय १९ वर्षांचें होतें त्या वेळीं शिवाजी महाराज जन्मास आले. समर्थांचीं पहिलीं १२ वर्षें—अर्थात् बरोबर एक तप—बालपणांत खर्ची पडून पंचवटींतील खऱ्या खऱ्या तपश्चर्येचें दुसरें तप सुरू असून त्याचीं ७ वर्षें पुरीं झालीं होतीं. समर्थांचा जन्म जांबेंत; तपश्चर्या पंचवटींत. शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यांत; राहणें पुणें प्रांतीं ! 'कः केन संबंधः' खरोखर परस्परांची परस्परांना ओळख सुद्धां नव्हती; तरी परस्पराचे हेतु एक; परस्परांचे विचार एक; अशी ही अप्रतिम गुरुशिष्यांची जोडी परस्परांच्या साह्यार्थच परमेश्वरानें निर्माण केली होती. किंवा समर्थांनीं स्वधर्मस्थापनेचा पाया घातला; ऐहिक सुखावर त्यांनीं पाणी सोडलें; आत्मसुखाची त्यांनीं पर्वा बाळगली नाहीं; संसाराला लाथ मारली ! सोन्यासारखी स्त्री

बहुल्यावर उभी असतांनाच त्यांच्या अंगांवर रोमांच उभे राहिले; मातोश्रींच्या आज्ञेलाही त्यांनीं धाब्यावर बसावलें आणि लग्नाच्या मंडवळ्या फेंकून देऊन लग्नाच्या रंगाचा सारा बेरंग करून सोडला. सुग्रास अन्नाला कंटाळून भिक्षावृत्ति स्वीकारून तपश्चर्येची दीक्षा घेतली. गंगोदकांत प्रहर प्रहर उभे राहून रामचंद्राची आराधना! कशाकरतां? तर मला आत्महित नको, मला जगाचें हित साधावयाचें आहे; हाच बाणा; हेंच देवाजवळ मागणें. अशा कडकडीत तपश्चर्येला सात वर्षें झालीं. तेव्हां रामरायालाही त्याचा भार पडला. त्यांनाही करुणा आली. त्यांनाही वाटलें कीं, स्वधर्मस्थापनेला स्वराज्याची जोडगण पाहिजे. त्याशिवाय त्याला चिरस्थायीपणा येणें शक्य नाहीं. पुष्कळ गोष्टी परस्परावलंबी असतात. लेखणी आणि तरवार ह्यांचें परस्पर साह्य असावें लागतें; तरच उत्तम कार्यभाग पार पडतो. त्याप्रमाणेंच धर्माला क्षात्रधर्माचेंही साह्य पाहिजे. नाहींतर सारेंच फुकट जातें. ह्यास्तव स्वधर्मस्थापनेसाठीं आम्ही समर्थरूपी वैराग्याचा पुतळा निर्माण केला खरा पण त्याला आतां क्षात्रधर्मी पुरुष साह्यकर्ता पाहिजे. हें मनांत आणूनच शके १५४९ त शिवनेरी किल्ल्यामध्यें शिवाजी रूपानें क्षात्रतेजाचा दिव्य पुतळा निर्माण केला. हें तरी समर्थांच्या घोरतर तपश्चर्येचेंच फळ कां न म्हणावें? हीच कल्पना अधिक सयुक्तिक दिसते. आणि तेणेंकरून ईश्वरी नियमानियमाप्रमाणें महाराष्ट्रांत ह्या दोन दिव्य शक्ति उद्भूत झाल्या. दोघांचेंही ध्येय एकच; जगाचें कल्याण, जगदोद्धार हें. एकाजवळ कडकडीत वैराग्य व तपस्तेज तर दुसऱ्याजवळ देदीप्यमान क्षात्रतेज व लोककल्याणबुद्धि; एकानें आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षांत तपोबळानें उद्धव गोसाव्यांच्या वडिलास सजीव करून आपलें तपोबळ प्रगट केलें तर दुसऱ्यानें आपल्या एकोणिसाव्या वर्षीं तोरणा किल्ला हस्तगत करून आपल्या क्षात्रतेजानें जनाचे डोळे दिपाविले.

अशा रीतीनें हे दोन अद्भुत सामर्थ्याचें पुरुष एकोणीस वर्षांच्या अंतरानें महाराष्ट्रांत अवतीर्ण होऊन आपआपलें इष्ट कार्य युक्तिप्रयुक्तीनें सिद्धीस नेत होते. समर्थांनीं जें जें कार्य केलें तें तें सर्व इतक्या वेळपर्यंत सांगितलें. आतां त्या उभय पुरुषांच्या सामर्थ्याचा मिलाफ होण्याचा किंवा तीं एकवटण्याचा योग ह्या भागांत आला आहे. तेव्हां तो भाग व त्याच्या

पुढील सारेच भाग उत्तरोत्तर अधिकाधिक चित्ताकर्षक होणें हें स्वाभाविकच आहे. वास्तविक पाहिलें तर शहाजी महाराज हे विजापुरच्या बादशहाच्या पदरचे सरदार; त्यांचा पुत्र शिवाजी. परंतु समर्थांची वृत्ति जशी लहानपणापासूनच प्रापंचिकाहून भिन्न, त्याप्रमाणेंच शिवाजी महाराजांची वृत्तीही सेवाधर्मापासून फार भिन्न होती महाराष्ट्र हा खरोखर आपला महाराष्ट्रीयांचा देश; त्याच्यावर मुसलमानांसारख्या परधर्मी लोकांनीं हुकमत चालवावी आणि आपल्या लोकांनीं त्यांचें दास्यत्व पतकरून हांजी हांजी करीत रहावें हें त्यांना बिलकुल सहन होत नसे. मुसलमानांनीं आपल्या परमपूज्य दैवतांचा उच्छेद, गोब्राह्मणांचा छळ केलेला पाहून तर त्यांचा आत्मा तिळतिळ तुटत असे. समर्थांनीं ज्याप्रमाणें प्रापंचिक सुखावर लाथ मारण्याचें धाडस केलें, त्याप्रमाणें शिवाजी महाराजांनींही हें परकीय सत्तेचें जोखड फेटाळून देण्याचें धाडसच केलें; परंतु हें कार्य समर्थांच्या कार्यापेक्षांही फार विकट होतें. बादशहाशीं विरोध करणें, त्याच्या राज्याचे तुकडे काढणें ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हती. तरी तिचाच त्यांनीं अवलंब केला. त्यासाठीं त्यांनीं काय काय प्रयत्न केले ते इतिहासज्ञांस विदितच आहेत. आणि अखेर आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी बादशहाच्या ताब्यांतला तोरणा किल्ला हस्तगत करून स्वराज्याचें मंगल तोरण तर द्वारावर बांधलेंच!

त्याच्या पूर्वींच दोन वर्षे समर्थांची स्वारी कृष्णातीरीं संचारार्थ आलेली होती. तोंपर्यंत शिवाजी महाराजांनीं बहुधा समर्थांचें नांवही ऐकलेलें नसावें व समर्थांनींही शिवाजी महाराजांचें नांव ऐकलेलें नसावें. यापुढें मात्र उभयतांचीही कीर्ति कस्तुरीच्या परिमळाप्रमाणें दशदिशांना पसरत चालली. तेव्हां परस्परांची कीर्ति परस्परांच्या कानावर जाण्याचा योग ओघानुसारच प्राप्त झाला. शिवाजी महाराज स्वराज्याचें आक्रमण करीत करीत रायगडीं आले. त्याच्या आधींच समर्थांची कीर्ति त्यांच्या कानावर आली होती. रायगडीं आल्यावर आणखीही समर्थांची कीर्ति कानावर येऊं लागली. 'तेव्हां हे साधु ह्याच प्रांतांतील असून एवढे विख्यात आहेत तर त्यांच्या दर्शनास आपण अवश्य गेलें पाहिजे ' अशी त्यांच्या मनास उत्कंठा लागून राहिली, आणि तोच उद्देश मनांत धरून महाराज गडावरून खालीं उतरून महाडांत आले. तों तेथें एक सत्पुरुष गोसावी

[हरिदास] आले होते. महाराजांना सत्पुरुषांची व कथांकीर्तनांची मनापासून आवड असे. तुकाराममहाराजांच्या कीर्तनास तर ते सिंहगडाहून रात्रौ पुण्यास जात असत. तुकाराममहाराजांस महाराजांनीं बोलावण्यासाठीं दिवटी, छत्री, घोडे व कारकून पाठविल्याचा वृत्तांत इतिहासप्रसिद्धच आहे. कीर्तन म्हटलें कीं, तें अवश्य करावयाचें असा त्यांचा सांप्रदाय असे. त्याप्रमाणें महाडांत आलेल्या हरिदासांचेंही त्यांनीं कीर्तन करविलें. त्या कीर्तनांत हरिदासबोवांनीं ध्रुवाचें चरित्र लावून असें प्रतिपादन केलें कीं, सद्गुरूवांचून मोक्ष मिळणें मनुष्यास शक्य नाहीं. तें ऐकल्यापासून तर शिवाजी महाराजांचें चित्त फारच उद्विग्न झालें. समर्थांची कीर्ति कानांनीं मात्र ऐकतों परंतु त्यांचें दर्शन घडत नाहीं. इतर साधूंचीं दर्शनें होतात, पण त्यांपैकीं कोणास शरण जावें याबद्दल मनाचा निश्चय होत नाहीं. ह्यास काय उपाय करावा? या विवंचनेंत ते पडले. आतां देवीसच प्रत्यक्ष विचारून आज्ञा होईल त्याप्रमाणें करावयाचें असा निश्चय ठरवून स्वारी प्रतापगडास गेली. महाराजांच्या अंगांत देवीचा संचार होऊन त्यांना वेळोवेळीं पुढच्या कार्याची काय ती आज्ञा होत असे. ही गोष्ट इतिहासावरून सर्वविश्रुतच आहे. त्याप्रमाणें महाराजांनीं शुचिर्भूत होऊन श्रीची पूजा करून 'कोणत्या साधूस शरण जावें' ह्याविषयीं आज्ञा व्हावी अशी प्रार्थना करून देवालयांतच देवीच्या सन्मुख निद्रा केली. तेव्हां श्रीजगज्जननीनें स्वप्नामध्यें सुवासिनीच्या रूपानें महाराजांस दर्शन देऊन आज्ञा केली कीं, "सद्गुरूला शरण जाणें तर रामदासांनाच शरण जावें. कारण ते साक्षात् मारुतीचा अवतार असून तुम्हाकरितांच उत्पन्न झालेले आहेत. त्यांतील कारण कळावयाचें तें पुढें कळेल."

तीच देवीची आज्ञा हृदयांत ठेवून स्वामींच्या दर्शनास जावें म्हणून स्वारी तयार केली आणि कऱ्हाड प्रांतीं आले; तों चाफळास स्वामी असतात असें श्रवण केल्यावरून स्वारी चाफळास गेली. तेथें श्रीरघुपतींचें दर्शन घेऊन स्वारी सभामंडपांत आली. त्याकाळीं नरसोमलनाथ हे समर्थांचे शिष्य व सरकारच्या पदरचे चाफळखोऱ्याचे अधिकारी [ह्यांचें घर देवालयाच्या महाद्वाराजवळच होतें] ते स्वारी आली असें पाहून पुढें येऊन महाराजांस मुजरा करून भेटले. तेव्हां महाराजांनीं त्यांस

समर्थांच्या संबंधानें हकीगत विचारली. नरसोमलनाथांनीं हात जोडून विनंति केली कीं, "समर्थ नेहमीं कांहीं मठांत रहात नाहींत. बहुतकरून अरण्यवासच करतात. सांप्रत ते कोंडवणचे घळीनजीक भैरवगड येथें आहेत." इत्यादि वर्तमान सांगत आहेत तोंच श्रीची पूजा करणारे विठ्ठल गोसावी व भानजी गोसावी ह्यांनीं श्रीचा प्रसाद आणून दिला. त्यांस वंदन करून "हें देवालय कोणीं बांधलें?" म्हणून प्रश्न केला आणि म्हणाले "समर्थांची स्वारी या प्रांतीं असतां आम्हांकडून त्यांची सेवा कांहींच घडली नाहीं." असें म्हणून विस्मित झाल्याचें दर्शविलें. ह्यावर विठ्ठल गोसाव्यांनीं विनंति केली कीं, 'समर्थांची व आपली भेट नाहीं तरी, देवालयास सरकारचें द्रव्य लागलेंच आहे.' शिवाजी महाराज म्हणाले "आपण उगाच आम्हाला थोरपणा देतां इतकेंच. आमच्याकडून देवालयाला मुळींच द्रव्य आलेलें नाहीं." विठ्ठल गोसाव्यांनीं विनंति केली कीं "आम्ही कांहीं खोटें बोललों नाहीं. खरें होतें तेंच सांगितलें. सरकारचें द्रव्य कसें लागलें तें सांगतों. श्रवण करावें."

"गिरि गोसावी नाशिककर हे नाशकाहून समर्थांच्या दर्शनासाठीं आले असतां परत जातांना आपल्या उपाध्यायांच्या घरीं उतरले होते. त्या दिवशीं रात्रीं उपाध्यायांनीं त्यांचें कीर्तन करविलें. त्या कीर्तनास सरकार स्वारीसही बोलाविलें होतें. कीर्तन झाल्यानंतर सरकारची मर्जी संतुष्ट झाली, आणि २०० होन आपण त्यांस दिले. तेव्हां गिरि गोसावी ह्यांनीं विनंति केली कीं, "आम्ही निस्पृह आहों. आम्हांस आपले होन काय करावयाचे आहेत? आपला आग्रह आहे, तर आपण राजे असून ईश्वरभक्त आहां, त्यापेक्षां आपल्या कऱ्हाड प्रांतीं चाफळ गांवीं समर्थ श्रींचें देयालय बांधीत आहेत, त्यांजकडे मुद्दाम आपला मनुष्य बरोबर देऊन हे होन चाफळास पावते करावेत." त्याजरून आपण मुद्दाम मनुष्य बरोबर देऊन २०० होन पोंचविले. ते होन व आपले पदरचे नरसोमलनाथ यांनीही कांहीं द्रव्य दिलें, तें द्रव्य व कांहीं शिष्य मंडळींनीं आपल्या पदरचें द्रव्य लावून हें देवालय तयार केलें आहे. तेव्हां त्याला आपला ऐवजही लागलाच आहे. म्हणून आम्ही सरकारास विनंति केली."

हें ऐकून महाराज म्हणाले "होय; मलाही त्याची आठवण आहे खरी.

असो;" असें म्हणून शिवाजी महाराज देवळाभोंवतीं फिरून पाहूं लागले. तों उत्तरेकडून मांड नदी व दक्षिणेकडून हनुमंत ओढा ह्या दोहोंमुळें दरडीस उपद्रव होतो, हें मनांत आणून नरसोमलनाथास ७०० होन दिले आणि ओढा फिरवून साकू [बांधारा] बांधून दरवाजा करावा, म्हणून परवानगी दिली. नंतर श्रींचा प्रसाद ग्रहण करून दुसऱ्या दिवशीं नरसोमलनाथांच्या घरीं भोजन करून कोंडवणच्या घळींत समर्थांच्या दर्शनास म्हणून गेले. परंतु तेथेंही समर्थांची गांठ पडली नाहीं म्हणून त्यांनीं चहूंकडे मनुष्येंही शोधाकरितां रवाना केलीं. परंतु समर्थांची कोठेंच गांठ पडली नाहीं. त्यामुळें शिवाजी महाराजांचें चित्त अत्यंत उद्विग्न झालें. इतक्यांत कांहीं राजकारण उत्पन्न झाल्यामुळें महाराजांची स्वारी निराश होऊन पुन्हां प्रतापगडास गेली. तेथें ते जनरीतीप्रमाणे राज्यकारभार करावयाचा तो करीत; परंतु मनाला समाधान नाहीं. सारें चित्त समर्थांच्या दर्शनाकडे लागून राहिलें होतें. अशा स्थितींतच त्यांनीं वैशाख शु. ४ मंदवासरीं दिवसां उपोषण करून देवालयांत निद्रा केली त्यांतच समर्थांचें दर्शन् झालें. जागे होऊन पाहतात तों समर्थ नाहींत.

त्यामुळें तर त्यांना मुळींच कांहीं सुचेनासें झालें. शेवटीं स्वामींचे दर्शनाविषयीं आतां आपण स्वतःच प्रयत्न करावयाचा असा निश्चय करून मातोश्री जिजाबाईची आज्ञा घेऊन स्वारी तयार करून निघाले ते श्रीक्षेत्र महाबळेश्वरीं आले. तेथें नेहेमींप्रमाणें ब्राम्हणभोजन, दानधर्म वगैरे करूं लागले. तोंच समर्थांकडून एक शिष्य ओंवीबद्ध पत्र घेऊन राजेश्रीकडे आला. त्यानें तें पत्र महाराजांच्या हातांत दिलें. तें पत्र असें:—

## ओंव्या

**निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसि आधारु ॥**
**अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥**
**परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ॥**
**तयाचे गुणमहत्वासी । तुळना कैंची ॥ २ ॥**
**नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ॥**
**पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥**

यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ॥
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठायीं ॥ ५ ॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ॥
सावधपणें नृपवर । तुच्छ केले । ६ ॥
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ॥
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥
देव धर्म गोब्राह्मण । करावयां संरक्षण ॥
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ॥
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ॥ ९ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ॥
महराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकारितां ॥ १० ॥
आणीकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती ॥
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येका आश्रय झाले । शिवकल्याण राजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ॥
ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणूं ॥ १३ ॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ॥
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥ १४ ॥
उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागिलें ॥
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥ *

---

* समर्थांच्या कवितेंत काय आणि चरित्रांत तरी काय, पाठभेद फार आढळतात. त्यांत जरी फारसा भेद नाहीं, तरी थोडाबहुत फेरफार हा प्रत्येक बाबींत आढळतो. ज्या 'जलपति' शब्दाबद्दल रा. केळूसकरांनीं येवढें आकांडतांडव केलें आहे, तो 'जलपति' शब्द सन १९१० त छापलेल्या समर्थांच्या बखरींत मुळींच नाहीं. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

हें समर्थांकडून प्रेमादरानें गौरवयुक्त पत्र आलेलें वाचून पाहून शिवाजी महाराजांचें अंतःकरण सद्गदित झालें व कंठ भरून आला. त्यांनीं त्या पत्रास अभिवंदन केलें, आणि ह्या प्रांतांत अनेक साधुसंत आहेत, त्यांपैकीं बऱ्याच लोकांस आपण भेटलों, बऱ्याच लोकांचीं दर्शनें घेतलीं व बऱ्याच लोकांची यथाशक्ति सेवाही केली, परंतु समर्थ येवढे जगद्विख्यात साधु इतकें दिवस आपल्या प्रांतांत असून आजपर्यंत आपण त्यांस भेटलों नाहीं व त्यांचा समाचारही घेतला नाहीं. तेव्हां आपण किती हतभागी आहों ! असें मनांत येऊन त्यांस मोठा पश्चात्ताप झाला आणि त्यांनीं समर्थांस त्या पत्राचें उत्तर लिहिलें; तें असें:—

**" स्वामी ! मी बहुत अपराधी आहें. आपण क्षमावंत आहां. सांप्रत कृपा करून आशिर्वादपत्र पाठविलें तें पाहून परम आनंदातें पावलों. दर्शनाची इच्छा धरून येत आहें. त्यास कृपा करून दर्शन दिलें पाहिजे ही विज्ञप्ति."**

असें पत्र लिहून तेथून पत्र घेऊन जो ब्राह्मण आला होता त्याच्याच-पाशीं दिलें, आणि त्याचा बहुत प्रकारें सन्मान करून विचारलें कीं, " सांप्रत स्वामी कोठें आहेत ? " त्यावर ब्राह्मणानें उत्तर दिलें कीं, " सांप्रत स्वामी चाफळ खोऱ्यांत आहेत. हें मी वर्तमान सांगतों आहे खरें, परंतु स्वामी एका क्षणांत कोणत्या स्थळाहून कोणत्या स्थळीं जातात, ह्याचा नेम नाहीं. " असें सांगून राजांचा निरोप घेऊन ब्राह्मण निघून गेला.

दुसरे दिवशीं शिवाजीमहाराज स्वारी तयार करून निघाले ते मान-गांवापर्यंत स्वारीसहवर्तमान गेले. पुढें सड्या स्वारीनिशी बाळाजी आबाजी चिटणीस व निळो सोनदेव मुजुमदार वगैरे दहापांच मंडळींसुद्धां चाफ-ळास येऊन श्रींचें दर्शन घेतलें. आणि मठांत जाऊन आक्कास नमस्कार वगैरे करून विचारलें कीं, " समर्थांची स्वारी कोणें ठिकाणीं आहे ? " तेव्हां आक्कांनीं सांगितलें " शिंगणवाडीस श्रीमारुतीपाशीं आहेत. आपलें पत्राचें उत्तर काल अस्तमानीं आलें. तें पत्र कल्याण गोसावी आजच स्वामींकडे घेऊन गेले आहेत. आतां नैवेद्याचा समय आहे. आपण मंडळी-सह भोजन करावें. तों आम्ही स्वामींकडे कळवून आपणांस कळवितों. नंतर आपण समर्थांचे दर्शनास जावें. " असें म्हणतांच " स्वामींचे पाय

पाहिल्यावांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं," याप्रमाणें महाराज बोलले. त्यावर आक्का म्हणाल्या "आपण मंडळीसहवर्तमान गेल्यास गांठ पडेल न पडेल, ह्यास्तव जलदी करूं नये. पूर्वी कळवून जावें तें बरें."

महाराज म्हणाले "मी एकटाच जातों. बरोबर कोणी तरी माहितगार द्यावा म्हणजे झालें. त्यावरून आक्कांनीं दिवाकर भटजीस महाराजांबरोबर दिलें. नंतर महाराजांनीं आपलीं दोन माणसें बरोबर घेऊन शिंगणवाडीच्या मारुतीपाशीं गेले, पण तेथेंही स्वामी नव्हते. ते खिंडीच्या खालीं बागेंत होते. तेथें महाराज जाऊन पोंचण्याच्या पूर्वींच कल्याण गोसावी यांनीं जाऊन साष्टांग नमस्कार करून महाराजांकडून पत्रोत्तर आलेलें वाचून दाखविलें. तेव्हां स्वामी हास्य करून बोलले कीं, "शिवाजीची मर्जी दर्शन घेण्याविषयीं आहे." इतकें बोलून समर्थांची स्वारी एका औंदुबर वृक्षाखालीं जेठा मारून बसली. जवळ दासबोध लिहिण्याचा क्रम चालू होता, त्याचीं पानें पडलीं होतीं व कल्याण स्वामीही जवळ उभे होते. इतक्यांत दिवाकर भटजीही शिवाजीसहवर्तमान येऊन पोंचले. तों मार्गांत जाळीची दाटी, झाडी दाट आणि रस्ता अतिशय चिंचोळा, ह्यामुळें दिवाकर भट पुढें व मागें महाराज याप्रमाणें हळूहळू येतांना दृष्टीस पडले. त्यांस पाहून समर्थांनीं कल्याण गोसावी यांस विचारलें कीं, "कल्याणा! ते कोण येत आहे रे?" कल्याणांनीं विनंति केली कीं "पुढें दिवाकर गोसावी व मागून कोणी दोघे तिघे येत आहेत." इतकें भाषण होत आहे तों दिवाकरभटही येऊन पोंचलेच. त्यांस समर्थांनीं विचारलें "दिवाकरा! कां आलास?" "महाराज! शिवाजीराजे आपल्या दर्शनास आले आहेत. त्यांस घेऊन आलों." असें म्हणून त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. इतक्यांत शिवाजीराजेही येऊन पोंचले. त्यांनींही समर्थांस साष्टांग नमस्कार घालून सद्गदित अंतःकरणानें हात जोडून पुढें उभे राहिले.

त्यांजकडे पाहून समर्थ म्हणाले "शिवाजी! पत्र व तुम्ही बरोबरच आलांत. इतकी त्वरा कां केली? तुमच्या देशांत आम्ही आहोंत. आमचा परामर्ष तुम्ही बराच घेतला!" असें म्हणून समर्थ हांसले. समर्थांचें भाषण ऐकून शिवाजी महाराजांचा कंठ भरून आला आणि नेत्रांतून अश्रुपात वाहूं लागले. मुखांतून शब्दही फुटेना अशी दशा झाली. तथापि धैर्य

धरून विनयानें म्हणाले "महाराज! मी सर्वस्वी अपराधी आहे आणि समर्थ क्षमाशील आहेत. तस्मात् स्वामींनीं क्षमा करून कृपानुग्रह करावा. आजपर्यंत दर्शनाची एक इच्छा होती ती पूर्ण झाली. आतां दुसरी आहे, ती समर्थांनीं पूर्ण केली पाहिजे." असें म्हणतांच स्वामींनीं उत्तर केलें कीं, "आम्ही मंदवारीं तुम्हास भेटून रात्रीं नारळ प्रसाद वगैरे द्यावयाचा तो दिलाच आहे. त्यापेक्षां आणखी कोणती इच्छा राहिली?" ह्यावर शिवाजी महाराज म्हणाले "आपली आज्ञा झाली ती प्रमाण परंतु स्वामींनीं कृपापूर्वक अनुग्रह देऊन पावन करावें अशी इच्छा आहे तेवढी पूर्ण करावी." म्हणून फार कळकळीनें प्रार्थना केली.

तेव्हां समर्थांनीं कल्याणस्वामींच्या मुखाकडे पाहिलें. कल्याणस्वामींनीं समर्थांच्या मनांतील अभिप्राय जाणून हात जोडून विनंति केली कीं, "महाराज सत्पात्र आहेत. आणि मूळचा संकल्पही तोच आहे. जाणून स्वामींनीं कृपा करावी." यावर स्वामींनीं "बहुत बरें. सामुग्री आणवा." म्हणून आज्ञा केली. तेव्हां कल्याणस्वामींनीं महाराजांजवळ हळूच विनंति केली कीं, "सामुग्री येण्यासारखी आहे काय? कां रानांतील पुष्पें वगैरे आणून सिद्धता करूं?" महाराज म्हणाले "सामुग्री सर्व तयार आहे. आपण कांहीं आणावयास नको."

शिवाजीमहाराज आपल्याबरोबर जरी दोनच मनुष्यें घेऊन समर्थांच्या दर्शनास गेले होते तरी, त्यांनीं आपल्यापासून चाफळापर्यंत सारखें मनुष्यांचें टपाल ठेवलें होतें. त्या मनुष्याबरोबर त्यांनीं लागलीच बाळाजी आवाजी चिटणिसास निरोप पाठविला कीं; "पूजेचें साहित्य वगैरे सर्व घेऊन येणें." आणि आपण स्नानास गेले. महाराज स्नान करून परत येतात तों बाळाजी आवाजी चिटणीस व निळो सोनदेव मुजुमदार हे सर्व पूजासाहित्य वगैरे घेऊन आले. दिवाकर भटजींनीं यथापद्धति पूजा सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं परमभक्तीनें समर्थांची पूजा केली. नंतर समर्थांनीं त्रयोदशाक्षरी मंत्र सांगून महाराजांस अनुग्रह दिला. त्या दिवशीं वैशाख शुद्ध ९ गुरुवार शके १५७१ विकारी नाम संवत्सर होता. तेव्हां महाराजांस मोठी कृतकृत्यता वाटून त्यांनीं भूमीवर दंडप्राय पडून महाराजांस नमस्कार केला व परम नम्रतेनें कांहीं आत्मानात्म विचार सांगावा म्हणून प्रार्थना केली.

तेव्हां समर्थांनीं तो थोडक्यांत समजेल अशा रीतीनें 'लघुबोध' ह्या नांवाचा विचार सांगितला. तो येणप्रमाणें:—

## ओंव्या.

श्रीगणेशायनमः ॥

जीं बोलिजे तीं पंचतत्त्वें । त्यांचीं अभ्यासावीं नांवें ॥
तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ॥ १ ॥
त्यामध्यें शाश्वत कोण । आणि अशाश्वत तें कोण ॥
ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ २ ॥
पंचमहाभूतांचा विचार । नांव रूप सारासार ॥
तोचि बोलिजेल निर्धार । सावध ऐका ॥ ३ ॥
पृथ्वी आप तेज वायु आकाश । नांवें बोलिलीं सावकाश ॥
आतां रूपांचा विश्वास । श्रवण करावा ॥ ४ ॥
पृथ्वी म्हणजे ते धरणी । आप म्हणजे तें पाणी ॥
तेज म्हणजे अग्नि तरणी । सतेजादिक ॥ ५ ॥
वायु म्हणजे तो वारा । आकाश म्हणजे पैस सारा ॥
आतां शाश्वत तें कोण विचारा । आपुलें मनीं ॥ ६ ॥
एक शीत चांचपावें । म्हणिजे सर्व पडे ठावें ॥
तैसेंचि थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ॥ ७ ॥
पृथ्वी रचते आणि खचते । हें तों प्रत्ययास येतें ॥
नाना रचना होते जाते । सृष्टीमध्यें ॥ ८ ॥
म्हणोनि रचतें तें खचतें । आप तेंही आटोन जातें ॥
तेज तेंही प्रगटोनि विझतें । वारेंही न राहे ॥ ९ ॥
अवकाश नाममात्र आहे । तेंही विचारतां न राहे ॥
एवं पांच भौतिक राहे । हें तों घडेना ॥ १० ॥
ऐसा पांचा भूतांचा विस्तार । नाशिवंत हा निर्धार ।
शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ॥ ११ ॥
तो आत्मा कोणास कळेना । ज्ञानेवीण आकळेना ॥
म्हणोनियां संतजना । विचारावें ॥ १२ ॥

विचारितां सज्ञनांसी । ते म्हणती कीं अविनाशी ॥
जन्ममृत्यु आत्मयासी । बोलोंचि नये ॥ १३ ॥
निराकारीं भासे आकार । आणि आकारीं भासे निराकार ॥
निराकार आणि आकार । विवेकें ओळखावा ॥ १४ ॥
निराकार जाणावा नित्य । आणि आकार जाणावा अनित्य ॥
त्यासि बोलिजे नित्यानित्य । विचारणा ॥ १५ ॥
सारीं भासे असार । आणि असारीं भासे सार ॥
सारासार विचार । शोधोनि पहावा ॥ १६ ॥
पांच भौतिक तें मायिक । परंतु भासे अनेक ॥
आणि आत्मा एक । व्यापून असे ॥ १७ ॥
चहूं भूतांमध्यें गगन । तैसें गगनीं असे सघन ॥
नेहटून पाहतां अभिन्न । गगन आणि वस्तू ॥ १८ ॥
उपाधि योगेंचि आकाश । उपाधि नसतां निराभास ॥
निराभास तें अविनाश । तैसें गगन ॥ १९ ॥
आतां असो हे विवंचना । परंतु जें पाहतां नासेना ॥
तरी तेंचि अनुमाना । विवेकें जाणावें ॥ २० ॥
परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचारसार ॥
आणि आपण कोण हा निर्धार । पाहिला पाहिजे ॥ २१ ॥
देहास अंत येतां । वायु जातो तत्त्वतां ॥
हें लटिका म्हणाल तरी आतां । श्वासोच्छ्वास धरावा ॥ २२ ॥
श्वास कोंडतां देह पडे । देह पडतां म्हणती मढें ॥
मढ्यास कर्तृत्त्व न घडे । कदा कल्पांतीं ॥ २३ ॥
देहावेगळा वायू न करी । वायूवेगळा देह न धरी ॥
विचार पाहतां हींचि न करी । एकावेगळें एक ॥ २४ ॥
उगेंच पाहतां मनुष्य दिसे । विचार घेतां कांहींच नसे ॥
अभेद भक्तीचें लक्षण ऐसें । ओळखावें ॥ २५ ॥
कर्ता आपण ऐसें म्हणावें । तरी आपल्या इच्छेसारखें व्हावें ॥
इच्छेसारिखें न होतां मानावें । अवघेंचि निरर्थक ॥ २६ ॥

**म्हणोनि कर्ता नव्हे कीं आपण । तेथें भोक्ता कैचा कोण ॥**
**हें विचाराचें लक्षण । अविचारें न घडे ॥ २७ ॥**
**अविचार आणि विचार । जैसा प्रकाश आणि अंधार ॥**
**विकार आणि निर्विकार । एक नव्हे कीं ॥ २८ ॥**
**जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहींच चालेना ॥**
**खरें तेंचि अनुमाना । कदां नये ॥ २९ ॥**
**प्रत्ययास बोलिजे न्याय । अप्रत्यय तोचि अन्याय ॥**
**जात्यंधास परीक्षा काय । नाना रत्नांची ॥ ३० ॥**
**म्हणोनि ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणेशीं अनन्य ॥**
**आत्मनिवेदनें मान्य । परम पुरुष ॥ ३१ ॥ ***

खरोखर ह्या लघुबोधाच्या ओंव्या अवघ्या ३१ च आहेत तरी त्यामध्यें किती सुबोध, अनुभवशीर आत्मानात्म विचार सांगितला आहे, त्यावरून सहृदय मनुष्याच्या अंतःकरणावर तरी ह्या जगांतील क्षणभंगुरतेचा ठसा उमटल्यावांचून खास राहणार नाहीं अशी खात्री वाटते. मग शिवाजी महाराजासारख्या भक्तिमान् व विचारी पुरुषाचें अंतःकरण द्रवलें असेल हें काय सांगितलें पाहिजे ! समर्थांच्या ह्या तत्वबोधाचा विचार करूं लागतां लागतांच मनाला त्याचा अनुभव पटून त्यांच्या एकाग्रतेची तंद्री लागत जाऊन अखेर महाराज समाधींतच निमग्न झाले ! ही शिवाजी महाराजाची धारणाशक्ति पाहून समर्थही फार प्रसन्न झाले. आणि त्यांच्या मस्तकीं हात ठेवून त्यांस समाधींतून जागृत करून म्हणाले "राजा ! तुला अनुभवाचें सुख काय तें मिळालें. ह्यालाच आत्मासुखानुभव असें म्हणतात." राजश्री म्हणाले "महाराज ! आज आपण मला अनाथाचें सनाथ केलें." स्वामी म्हणाले "स्वानुभवाचें लक्षण असें आहेः—

---

* ह्या लघुबोधाचा समावेश पुढे दासबोध दशक १३ समास ६ ह्यांत केलेला आहे. तो बहुधा पुढे केला असावा. ह्यावेळीं दासबोधाची रचना कोठपर्यंत आली होती, हे नक्की सांगतां येत नाहीं.

### अभंग

स्वानुभवाचे पालवि । शून्य गाळिले आघवि ॥ १
सघनीं हरपलें गगन । सहज गगन तें सघन
सदाशुद्ध स्वप्रकाश । अवकाशाविण आकाश
रामीं रामदास म्हणे । स्वानुभवाची हे खुण ॥ १ ॥

हा अभंग ऐकून शिवाजीमहाराजांसही फार फार समाधान झालें. नंतर महाराजांनीं स्वामीस साष्टांग नमस्कार घातला. त्यांस समर्थांनीं श्रीफळ, मूठभर माती, दोन मुठी लीद व चार मुठी खडे ह्याप्रमाणें प्रसाद महाराजांच्या पदरांत घातला तो घेऊन शिवाजी महाराजांनीं पुन्हां एकदां स्वामीस प्रदक्षिणा घालून दंडवत प्रणिपात केला आणि हात जोडून विनंति केली कीं "महाराज! माझ्या अंतःकरणाला आज खरें खरें-आत्मसौख्य काय तें कळूं लागलें आहे. व मनाला जी अनुपम शांति असावीशीं वाटते ती आज मिळाली आहे. तरी हीच स्थिति निरंतर असावी. आजपर्यंत राज्यासाठीं उपद्याप केला तेवढा पुरें झाला. त्यांत काय सुख आहे त्याचा पुरा अनुभव घेऊन चुकलों. अतःपर त्यांत पडण्याची माझी इच्छा नाहीं. ही सारी मंडळी निरंतर आपली सेवा करून आपल्या समागमें असतात, त्याप्रमाणेंच सेवा करून रहाण्याची मला आज्ञा असावी." असें म्हणून नेत्रांतून आश्रुपात वाहूं लागले.

मनुष्य प्राण्याला परमेश्वरानें ज्या अद्भुत देणग्या दिल्या आहेत. त्या सर्वांत अधिकारयुक्त वाणी ही एक अद्भुत देणगी आहे. तिच्या परिणामाचें कार्य इतकें अपूर्व होतें कीं, तें दुसऱ्या कशानेंही होणें शक्य नाहीं. मात्र वक्त्याप्रमाणेंच श्रोताही तसाच किंबहुना थोडासा खालोखाल कां होईना, पण अधिकारयुक्त पाहिजे. फार कशाला? एखादा चांगला कीर्तनकार हरिदास असला, किंवा नाटककार असला, आणि त्यानें जर हरिश्चंद्राचें किंवा चिल्हयाचें आख्यान लावलें तर, कोणास रडूं येत नाहीं? सामान्य मनुष्याच्या डोळ्याचें सुद्धां पाणी खळत नाहीं कीं, तोंडांतून शब्द फुटत नाहीं! हा अनुभव एकदोघांसच नव्हे तर शेंकडों लोकांस आहे. सुप्रसिद्ध वक्ता एडमंड बर्क ह्याचें भाषण ऐकून खुद्द लॉर्ड हेस्टिंग आरोपी असतांही

त्यांचीं कृष्णकृत्यें त्याच्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं; त्याला गहिंवर आला; त्याच्या कृत्यांचा त्याला पश्चात्ताप झाला व त्यानें भर पार्लमेंटांत त्यास साष्टांग नमस्कार घातला ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. डिमास्थोनिसानें तर फिलिपासारख्या सार्वभौम बादशहालाही त्राहित्राहि करून सोडलें! असा ह्या वाणीचा प्रभाव आहे. जिव्हेपुढें तरवारीचा पराक्रम तो कितीसा? मग समर्थांच्या वाणीनें शिवाजी महाराजांना उपरति व्हावी, ह्यांत मोठेंसें नवल तें काय? ह्या सर्व गोष्टी निखालस अनुभवाच्या आहेत. त्या अलीकडच्या रा. तेंडूलकरासारख्या अननुभवी लेखकास कळाव्या कशा? त्यांनीं वितंडवाद घालीत बसावें, येवढीच त्यांची मजल! अशा लोकांना सहृदयता म्हणून काय, ह्याची ओळखच नसते, असें मोठ्या दिलगिरीनें म्हणणें भाग येतें. असो.

शिवाजी महाराजांच्या अंतःकरणाची स्थिति त्यावेळीं खरोखरच अशी झाली कीं, खरी खरी सौख्याची स्थिति म्हणजे एक समर्थांची होय. बाकी सारा संसार तर काय, पण राज्यवैभवसुद्धां दुःखाचेंच मूळ. असा त्यांच्या हृदयांत प्रकाश पडल्यामुळें त्यांस परत जाणेंच जिवावर आलें. त्यांस वाटलें कीं, कल्याणस्वामी, उद्धवस्वामी ह्यांच्याप्रमाणें समर्थांच्या सेवेंत देह झिजवणें हेंच खरें जन्माचें सार्थक होय. म्हणून तशी आज्ञा मिळण्याबद्दल ते समर्थांपाशीं अगदीं काकुळतीस आले. असें पाहून समर्थ हांसले आणि त्यांनीं त्यांस बोधपर चार गोष्टी सांगण्यांस प्रारंभ केला. ते म्हणाले:—

"वः! तुम्ही याकरितांच मला शरण आलां कीं काय? तुमचा मुख्य धर्म क्षात्र; क्षात्रधर्मी पुरुषांनीं नेहेमीं स्वराज्याचें पालन करावें, देवब्राह्मणांची सेवा करावी, हेंच त्यांचें कर्तव्य. तुमच्या हातून अद्याप पुष्कळ अमानुष कृत्यें व्हावयाचीं आहेत. पृथ्वी फार दिवस म्लेंछमय झाली आहे. त्यांच्यापासून तिची मुक्तता करावी अशी श्रीरघुपतीचीच इच्छा आहे.

## ओंवी

**बहुता दिवसांचें बंड। म्लेंच्छ माजले उदंड॥**
**त्यांचें करूनि दुखंड। राज्य करावें॥ १॥**

झांकरितां तोच क्षात्रधर्म तुमचा मुख्य होय. श्रीनीं म्लेंच्छ-निवारणार्थच तुम्हांस उत्पन्न केलें आहे, अशी आम्हांसही पंचवटींत श्रीची आज्ञा झालेली आहे. त्याप्रमाणें तुम्ही वर्णाश्रम धर्मानें धर्मसंस्थापना करावी. त्यांत स्वार्थ व परमार्थ दोन्हीही साधतील. पूर्वी जे जे पुण्यवंत राजे होऊन गेले त्यांची कीर्ति पुराणांतरीं तुम्ही श्रवण करीतच आहां. तुमचे पूर्वज कोणत्या वंशांतले होते त्याचाही विचार करा. तुमच्याच वाडवडिलांपैकीं शिसोदासिंह, पृथ्वीपालसिंह व लक्ष्मणसिंह इत्यादिकांनीं कसकसे प्रताप गाजविले तें लक्षांत आणा आणि वंशपरंपरागत चालत आलेला राजधर्म व क्षात्रधर्म तसाच पुढें चालवा. तो वंशपरंपरागत चालत आलेला तुमचा धर्म सोडून तुम्ही भलतेंच कर्म करण्याची इच्छा धरूं नका. ”

ही समर्थांची आज्ञा श्रवण करून महाराज म्हणाले “ समर्थांची आज्ञा झाली ती शिरसावंद्यच आहे. परंतु राजधर्म व क्षात्रधर्म काय हें समर्थांच्याच मुखांतून एक वेळ श्रवण करावयास मिळेल तर मी धन्य होईन. ” ही विनंति ऐकून समर्थांची मर्जी सुप्रसन्न झाली आणि ते म्हणाले “ राजा, ही तुझी इच्छा फार उत्तम आहे. तूं धन्य आहेस. तर तुला आतां तोच राजधर्म व क्षात्रधर्म सांगतों. तो स्वस्थ चित्तानें श्रवण कर. ” असें म्हणून समर्थांनीं राजधर्म सांगण्यास प्रारंभ केला तो असाः—

## ॥ राजधर्म ॥

### ओंव्या.

नमो मंगळमूर्ति विघ्नहरू ॥ सरस्वतीस नमस्कारू ॥
सद्गुरू संत कुलेश्वरू ॥ दाशरथी ॥ १ ॥
श्रोतीं मानेल तरी घ्यावें ॥ अथवा दाटूनि सांडावें ॥
प्रपंचाकारणें स्वभावें ॥ बोलिलों मी ॥ २ ॥
सावधपणें प्रपंच केला ॥ तेणें सुखची पावला ॥
दीर्घ प्रयत्नें मांडला ॥ कार्यभाग साधे ॥ ३ ॥
आधीं मनुष्य ओळखावें ॥ योग्य पाहूनि काम सांगावें ॥
निकामी तरी ठेवावें ॥ एकीकडे ॥ ४ ॥

पाहोन समजोन कार्य करणें ॥ तेणें कदापि नये उणें ॥
कार्यकर्त्याच्या गुणें ॥ कार्यभाग होतो ॥ ५ ॥

कार्यकर्ता प्रयत्नीं जाड ॥ कांहीं एक असला हेकाड ॥
तरी समर्थपणें पाठवाड ॥ केली पाहिजे ॥ ६ ॥

अमर्याद फितवेखोर ॥ यांचा करावा संहार ॥
शोधिला पाहिजे विचार ॥ यथातथ्य ॥ ७ ॥

मनुष्य राजी राखणें ॥ हींचि भाग्याचीं लक्षणें ॥
कठीणपणें दुरी धरणें ॥ कांहींएक ॥ ८ ॥

समयीं मनुष्य कामा येतें ॥ तया कारणें सोशिजेतें ॥
न्याय सांडितां मग ते ॥ सहजचीं खोटें ॥ ९ ॥

न्यायसीमा उल्लंघू नये ॥ उल्लंघितां होतो अपाय ॥
न्याय नसतां उपाय ॥ होईल कैचा ॥ १० ॥

उपाधीस जो कंटाळला ॥ तो भाग्यापासूनि चेवला ॥
समयीं धीर सांडिला ॥ तोही खोटा ॥ ११ ॥

संकटीं कंटाळों नये ॥ करावे अत्यंत उपाय ॥
तरी मग पाहतां काय ॥ उणें आहे ॥ १२ ॥

बंध बांधावे नेटके ॥ जेणें करितां चतुर तुके ॥
ताब न होता फिके ॥ कारभार होती ॥ १३ ॥

धुरेनें युद्धासीं जाणें ॥ अशीं नव्हेत कीं राजकारणें ॥
धुराच करोनि सोडणें ॥ कित्येक लोक ॥ १४ ॥

उदंड मुंडें असावीं ॥ सर्वही एक न करावीं ॥
वेगळालीं कामें घ्यावीं ॥ सावधपणें ॥ १५ ॥

मोहरा पेटला अभिमाना ॥ मग तो जिवास पाहेना ॥
मोहरे मिळवूनि नाना ॥ वरी चपेटे करी ॥ १६ ॥

देखोनि व्याघ्राचा चपेटा ॥ मेंढरें पळती बारा वाटा ॥
मस्त जो तो रेडा मोठा ॥ काय करावा ॥ १७ ॥

रायांनीं करावे राजधर्म ॥ क्षत्रीं करावे क्षात्रधर्म ॥
ब्राह्मणीं करावे स्वधर्म ॥ नानाप्रकारें ॥ १८ ॥
तुरंग शस्त्र आणि स्वार ॥ पहिला पहावा विचार ॥
निवटूं जातां थोर थोर ॥ शत्रु पळती ॥ १९ ॥
ऐसा प्रपंचाचा विवेक ॥ स्वल्प बोलिलों कांहीं एक ॥
एका मनोगतें स्वामी सेवक ॥ असतां बरें ॥ २० ॥

## ॥ इति श्रीराजधर्म समाप्त ॥

असा समर्थांनीं राजधर्म सांगून क्षात्रधर्म सांगितला तो:—

## ॥ अथ क्षात्रधर्म प्रारंभ ॥

अल्प स्वल्प संसार वर्म ॥ मागां बोलिलों राजधर्म ॥
आतां ऐका क्षात्रधर्म ॥ परम दुर्लभ जो ॥ १ ॥
जयास जिवाचें वाटे भय ॥ त्यानें क्षात्रधर्म करूं नये ॥
कांहीं तरी करूनी उपाये ॥ पोट भरावें ॥ २
विन्मुख मरणीं नर्क होती ॥ वांचून येतां मोठी फजीती ॥
इहलोक परलोक जाती ॥ पहाना कां ॥ ३ ॥
मारितां मारितां मरावें ॥ तेणें गतीस पावावें ॥
फिरोन येतां भोगावें ॥ महद्भाग्य ॥ ४ ॥
नजर करारी राखणें ॥ कार्य पाहून खतल करणें ॥
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें ॥ चकित होतीं ॥ ५ ॥
जैसा भांडयाचा गलोला ॥ निरभय भारा मध्यें पडिला ॥
तैसा क्षत्री रिचवला ॥ परसैन्यामध्यें ॥ ६ ॥
निःशंकपणें भार फुटती ॥ परवीरांचे तवके तुटती ॥
जैसा बळिया घालुनि घेती ॥ भरी उठतां ॥ ७ ॥
ऐसे अवघेच उठतां ॥ परदळाची कोण चिंता ॥
हरणें लोळवी चित्ता ॥ देखत जैसा ॥ ८ ॥

मर्दें तकवा सोडूं नये ॥ म्हणजे प्राप्त होतो जय ॥
कार्य प्रसंग समय ॥ ओळखावा ॥ ९ ॥
कार्य समजेना अंतरें ॥ तें काय झुकेल विचारें ॥
युद्ध करावें खबरदारें ॥ लोक राजी राखतां ॥ १० ॥
दोनी दळें एकवटें ॥ मिसळताती लखलखाटें ॥
युद्ध करावें खणखणाटें ॥ सीमा सांडुनी ॥ ११ ॥
देवमात्र उच्छेदिला ॥ जित्यापरीस मृत्यू भला ॥
आपुला स्वधर्म बुडविला ॥ ऐसें समजावें ॥ १२
मराठा तितुका मेळवावा ॥ आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ॥
येविषयीं न करतां तकवा ॥ पूर्वज हांसती ॥ १३ ॥
मरणेहाक तो चुकेना ॥ देहे वांचवितां वांचेना ॥
विवेकी होऊनी समजाना ॥ काय करावें ॥ १४ ॥
भले कुळवंत ह्मणावे ॥ तेही वेगीं हजीर व्हावे ॥
हाजीर न होतां कष्टावें ॥ लागेल पुढें ॥ १५ ॥
एक जाती दोन जाती पावला ॥ तो कैसा ह्मणावा भला ॥
तुह्मां सकळांस कोप आला ॥ तरी क्षमा केली पाहिजे ॥१६
देवद्रोही तितुके कुत्ते ॥ मारूनि घालावे परते ॥
देवदास पावती फत्ते ॥ यदर्थीं संशय नाहीं ॥ १७ ॥
देव मस्तकीं धरावा ॥ अवघा हलकल्लोळ करावा ॥
मुलुख बुडावा कां बुडवावा ॥ धर्म संस्थापनेसाठीं ॥ १८।
विवेक विचार सावधपणें ॥ दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ॥
तुळजावराचे निगुणें ॥ रामें रावण मारिला ॥ १९ ॥
अहो हे तुळजा भवानी ॥ प्रसिद्ध राम वरदायिनी ॥
रामदास ध्यातो मनीं ॥ यन्निमित्त्य ॥ २० ॥

॥ इति क्षात्रधर्म समाप्त ॥

ह्याप्रमाणें 'राजधर्म' व 'क्षात्रधर्म सांगून झाल्यानंतर समर्थ म्हणाले

" अशा राजनीतीनें राज्य केलें म्हणजे धर्मराजाचीच योग्यता प्राप्त होते." शिवाजी महाराजांनीं " तथास्तु " म्हणून पुन्हा दंडवत प्रणाम करून पुढें हात जोडून उभे राहिले, आणि समर्थांस विनंति केली कीं, "महाराज सर्व लज्जा आपली आहे." समर्थ म्हणाले " बावा! तुझी सर्व लज्जा श्रीस आहे. तूं तिळमात्र काळजी करूं नको." महाराज म्हणाले "आज्ञा प्रमाण आहे." हा राजांचा विनय पाहून समर्थ फार संतुष्ट झाले, आणि मस्तकावर वरदहस्त ठेवून नारळाचा प्रसाद दिला.

तेव्हां बाळाजी अबाजी चिटणीस व निळोसोनदेव ह्यांनींही समर्थांची पूजा घेण्याविषयीं प्रार्थना केल्यावरून समर्थांच्या आज्ञेवरून उभयतांनींही समर्थांची पूजा केली व त्या दोघांसही समर्थांनी अनुग्रह प्रसाद दिला.

प्रथम महाराजांनीं जेव्हां समर्थांची पूजा केली, त्यावेळीं वस्त्रें आभरणें, जवाहीर, मोतीं, पोंवळीं व पुतळ्या इत्यादि अपरिमित द्रव्य आणून समर्थांस अभिषेक केला होता. तें द्रव्य समर्थांनीं चहूंकडे उधळून दिलें! आणि गुराख्यांच्या पोरांस बोलावून आणून ' अरे ! हें द्रव्य गोळा करून घेऊन जा ' असें सांगितलें. [ त्या रानांत अद्यापही कधीं कधीं चौकटीरुपाया, किंवा मोहरा, पुतळ्या एखाद्याच्या नशिबाप्रमाणें सांपडतात अशी वदंता आहे. ]

इतकें झाल्यावर समर्थ उठले आणि डोंगरांत जावयास निघाले, आणि कल्याण स्वामींस आज्ञा केली कीं, " तुम्ही राजश्रीबरोबर जाऊन श्रीरघुपतीचें दर्शन करवावें, आणि या शिवबांस आपण स्वतः प्रसाद द्यावा, अशी आमची श्रीचरणीं विनंति सांगावी. नंतर मंडळींसहवर्तमान राजश्रीस भोजनप्रसाद देऊन त्रिरात्र ठेवून घ्यावें. आम्ही उदईक येतों." अशी आज्ञा करून स्वामी थोडोबाचें डोंगरांत निघून गेले.

ह्याप्रमाणें दिवाकर भटजी व कल्याणस्वामी राजश्री सहवर्तमान चाफळास गेले. सर्वजण श्रीस साष्टांग नमस्कार करून हात जोडून पुढें उभे राहिले. तेव्हां कल्याणस्वामींनीं श्रीची प्रार्थना केली कीं ' शिवाजीराजे ह्यांस आपण स्वहस्तें प्रसाद द्यावा अशी आपल्याला स्वामींची विनंति आहे." असें म्हणतांच श्रीरघुपतीचे मस्तकीं मोगऱ्यांच्या कळ्यांचा तुरा होता तो सरकन् खालीं आला. तोच कल्याणस्वामींनीं घेऊन शिवाजी राजे ह्यांच्या पगडींत

खोवला. तों तो तुरा तात्काळ मोत्यांचा झाला! हा चमत्कार पाहून सर्वांस परम आश्चर्य वाटलें! नंतर महाराजांचें सर्व सैन्यासहवर्तमान भोजन झालें. आणि समर्थांच्या आज्ञेप्रमाणें शिवाजी महाराजांनीं तेथेंच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळींच समर्थांची स्वारी मठांत आली. नंतर स्नानसंध्यादि आन्हिक आटोपल्यावर राजश्रीस पंक्तीस घेऊन मंडळींसह-वर्तमान भोजन करतेवेळीं आक्का, वेणुबाई, दिवाकर गोसावी, ह्या त्रिवर्गास बोलावून स्वामी बोलले कीं "आम्ही अरण्यवासी तर खरेंच, परंतु श्रीचे दर्शनास राजेलोक आले आहेत, त्यांस मेजवानी केली पाहिजे. तरी उदईक श्रीस नैवेद्य करून राजश्रीस निरोप देऊं." असें म्हटल्यावर शिवाजी महाराजांनीं विनंति केली "मी तर दासाचा दास आहें. आणि मेजवानीविषयीं आज्ञा होत आहे हें काय?" ह्यावर समर्थांनीं बरींच विनोदपर भाषणें वगैरे करून आनंदांत भोजन समारंभ आटोपला.

तिसरे दिवशीं प्रातःकाळीं आज्ञेप्रमाणें मेजवानीच्या पद्धतीनें नैवेद्याचे साहित्य सिद्ध असल्याचें कळतांच समर्थांनीं श्रीरघुपतीची पूजा करून नैवेद्य समर्पण केला. नंतर शिवाजी महाराजांनींही समर्थांची पूजा करून तीर्थप्रसाद घेतला.

समर्थांच्या आज्ञेप्रमाणें पंक्ति मांडल्या आणि पद्धतीप्रमाणें राजश्रीसह-वर्तमान सर्वांचीं भोजनें झालीं. नंतर बरोबर सैन्य होतें, त्यांत ज्या ज्या ज्ञाती होत्या त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें सर्वांस भोजन घातलें. नंतर श्रीच्या मंडपांत सभा बसली. समर्थंही पृथक् आसनावर बसले. त्यावेळीं राजश्रींनीं समर्थांस राज्य अवलंबनापासून सर्व वृत्त निवेदन केलें. तें समर्थांनीं श्रवण करून बोलले कीं "शिवाजी! फार चांगलें केलेंस. ह्या-विषयीं श्रीरघुपतींनीं सर्व कांहीं श्रुत करून आम्हास जी काय आज्ञा करावयाची ती केलीच आहे." हें ऐकून शिवाजी महाराजांनीं पुन्हा विनंति केली कीं, "श्री व आपण कांहीं दोन नाहीं. मज दीनाकडून जें करविलें तें निवेदन केलें. पुढें जी सेवा करवाल ती करीन." हें ऐकून समर्थ बोलले "तुझे हातून म्लेंच्छांचें निवारण श्री करविणार आहेत." असें म्हणून शिवाजी महाराजांस प्रसाद दिला. त्यांजपाशीं कारभारी मंडळी होती. त्यांत अति निकट निळोपंत व बाळोबा हे असत. वारंवार काम

सांगणें किंवा लोभानें कांहीं बोलणें तें त्यांच्यापाशींच महाराज बोलत असत. हें समर्थांनीं पाहून त्या उभयतांस पुढें बोलावून म्हणाले कीं, " तुम्हीं स्वामीसेवा करीत असून उत्तम कुळांतले आहां. परंतु सेवकांनीं सेवाधर्म कोणते रीतीनें पाळावा तें आम्ही सांगतों. असें म्हणून '**सेवकधर्म**' नांवाचे दोन समास सांगितले. ते असेः—

## ॥ सेवकधर्म ॥

### ओव्या.

ऐका प्रपंच विचार ॥ आपली करणी उतरे पार ॥
येथें नाहीं उत्तर ॥ श्रेष्ठांकडे ॥ १ ॥

पूर्वी दरिद्रें पीडिलें ॥ ते समर्थें अंगिकारिले ॥
शिकवूनि शिकवूनि शहाणे केले ॥ नानाप्रकारें ॥ २ ॥

पहिला होता नाचार ॥ श्रेष्ठीं वाढवोनी केला थोर ॥
या वचनीं होतां अनादर ॥ होता बरवें नव्हे ॥ ३ ॥

जो आपुलें हित न करी ॥ तो आपुला आपण वैरी ॥
येथें कांहीं कोणावरी ॥ शद्ब नाहीं ॥ ४ ॥

श्रेष्ठांचें मनोगत राखेना ॥ बळेंच करी वल्गाना ॥
युक्ति प्रयुक्ति नाना ॥ प्रकारें करी ॥ ५ ॥

श्रेष्ठांचें केलें मोडावें ॥ आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें ॥
तरी मग लागे भ्रष्टावें ॥ वैभवापासूनी ॥ ६ ॥

पुढें पुढें काम करी ॥ मागें काहींच न करी ॥
कार्यांतें नासतां उरी ॥ कांहींच पुढें ॥ ७ ॥

उगाच गर्वें मेला ॥ मागील दिवस विसरला ॥
स्वार्थेंची करूं लागला ॥ म्हणजे गेले ॥ ८ ॥

वडिलांसी बुद्धी शिकवी ॥ युक्ती बळें जाणीव दावी ॥
तया मूर्खासीं पदवी ॥ प्राप्त कैंची ॥ ९ ॥

जो सदाचा चोरटा ॥ जो सदांचा कळकटा ॥
कैंठीणं शद्वें बारा वाटा ॥ मनुष्यें केली ॥ १० ॥

आपला इतबार राखावा ॥ मग तो सर्व धणी जाणावा ॥
उदंड वैभवाचा हेवा ॥ करूं नये ॥ ११ ॥

कार्य करिता कांहीं न मागे । त्याची चिंता प्रभूस लागे ॥
ऐसें जाणुनि विवेक जागे । ह्मणिजे बरें ॥ १२ ॥

आपणास जपूं लागला ॥ श्रेष्ठांचे मनींचा उतरला ॥
येणें कोण स्वार्थ झाला ॥ विचारावा ॥ १३ ॥

स्वामींनीं जें जें बोलावें ॥ तेंचि सेवकीं प्रतिष्ठावें ॥
वेळ चुकवूनि बोलावें ॥ विनीत होऊनी ॥ १४ ॥

श्रेष्ठांपुढें शहाणपण ॥ हेंचि केवळ मूर्खपण ॥
मूर्खपणें नागवण ॥ आली घरा ॥ १५ ॥

कळेल तरी सांगूं नये ॥ वाडिलासीं बुद्धी शिकवूं नये ॥
नेणपणेंची उपाय ॥ विवेकीं करावा ॥ १६ ॥

पुढें पुढें निघूं नये ॥ आज्ञे वेगळें वर्तूं नये ॥
न मानितां अपाय ॥ नेमस्त आहे ॥ १७ ॥

आधीं वडिलांसीं पुसावें ॥ किंवा अपणचि करावें ॥
समय पाहूनि वर्तावें ॥ विवेकी पुरुषें ॥ १८ ॥

आधीं निश्चय करितो ॥ मग उगेंचि पुसतो ॥
इतका विचार करितो ॥ शाहाणा कैंचा ॥ १९ ॥

मी करितों ऐसें पुसणें ॥ तें पुसणें न पुसणें ॥
करूं न करूं हें विचारणें ॥ हें उत्तमोत्तम ॥ २० ॥

मी शहाणा ऐसें कळलें ॥ तरी स्वतंत्र पाहिजे केलें ॥
स्वतंत्र होतां मिरवलें ॥ न शहाणपण ॥ २१ ॥

हें मनींचें मनीं समजावें ॥ प्रगट कासया करावें ॥
घेऊं ये तरी घ्यावें ॥ चातुर्यासीं ॥ २२ ॥

न्याय मानील तो न्यायी ॥ न्याय न मानी तो अन्यायी ॥
दगलबाज चिडाई ॥ सुटेल कैसी ॥ २३ ॥

ज्याचे अंतरीं स्वार्थबुद्धि ॥ तेथें कैंची असेल शुद्धि ॥
शुद्धि सांडितां अवधी ॥ दुःखासी होय ॥ २४ ॥

ज्याकरितां प्राणी वाढले ॥ त्यासीच अडवूं लागले ॥
ते कैसे म्हणावे भले ॥ नीतिवंत ॥ २५ ॥

सेवकीं सेवाचि करावी ॥ स्वामी आसूदकीं द्यावी ॥
तरीच पाविजे पदवी ॥ कांहीं एक ॥ २६ ॥

समर्थांचें मनोगत ॥ तैसेंचि वर्तणें उचित ॥
तेथें चुकतां आघात ॥ नेमस्त आहे ॥ २७ ॥

सेवक तोचि अडेना ॥ शब्द भुईस पडेना ॥
काम चुकलें हें घडेना ॥ कदाकाळीं ॥ २८ ॥

उंच अश्व वेळेस अडे ॥ तरी पादछेद करणें घडे ॥
ऐसें कळोनियां वेडे ॥ अडोंचि लागे ॥ २९ ॥

मनोगत राखतां श्रेष्ठ वोळे ॥ मनोगत चुकतां खवळे ॥
ऐसें जयासीं नकळे ॥ तो जाणता कैसा ॥ ३० ॥

स्वामीस जें अवश्य व्हावें ॥ तैसें सेवक न व्हावें ॥
होऊनि आडवावें ॥ कोण्या विचारें ॥ ३१ ॥

आपस्वार्थ उदंड करणें ॥ आणि स्वामीकार्य बुडाविणें ॥
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें ॥ सेवकाचीं ॥ ३२ ॥

सेवकपणाचें मुख्य वर्म ॥ कांहीं नसावें कृत्रिम ॥
कृत्रिम केलिया संभ्रम ॥ कैंचा पुढें ॥ ३३ ॥

धनीकार्जीं जितुका सावधान ॥ सर्वकाळ परिछिन्न ॥
त्यासि चोरितां निदान ॥ बरें नव्हे ॥ ३४ ॥

थोडी बहुत लालूच करणें ॥ आणि महत्कृत्य बुडविणें ॥
महत्व जातां लाजिरवाणें ॥ जनामध्यें ॥ ३५ ॥

ऐसे बहुत ऐकिले ॥ कांहीं दृष्टीस देखिले ॥
देखत ऐकत चुकले ॥ ते मनुष्य कैसे ॥ ३६ ॥
कार्य करितां उदंड देतो ॥ चुकतां तो महत्त्व घेतो ॥
ऐसें कळोनि वर्ते तो ॥ प्राणी कैसा ॥ ३७ ॥
सेवक विश्वास दाविती ॥ वैरीयाकडे मिळोनि जाती ॥
त्यां चांडाळांसी गती ॥ कोठेंचि नाहीं ॥ ३८ ॥
सकळ लोक स्वामियांचे ॥ मागें पुढें अवज्ञेचें ॥
सेवक उगेचि मूर्ख नाचे ॥ शद्ब बोले ॥ ३९ ॥
धूर्तपणें अंतरसाक्षी ॥ नानाप्रकारें परीक्षी ॥
दुरी गेला परी लक्षी ॥ सर्व कांहीं ॥ ४० ॥
ह्मणोनि ऐसें न करावें ॥ करणें तें नेमस्त करावें ॥
नानाकारणें धरावें ॥ अंतर प्रभूचें ॥ ४१ ॥
इति श्रीसेवकधर्मनिरूपणं नाम प्रथम समास समाप्त ॥ १ ॥

## ॥ समास दुसरा ॥

सुचित करूनि अंतःकरण ॥ आतां करावें राजकारण ॥
प्रमाण आणि अप्रमाण ॥ समजलें पाहिजे ॥ १ ॥
आकल म्हणजे कल नाहीं ॥ अन्यायाचा साभिमान नाहीं ॥
न्याय नीति समर्थ पाही ॥ आप्त आणि परावे ॥ २ ॥
किती चुकती चांचूं घेती ॥ पदरीं घालितां न घेती ॥
अन्याय करूनि म्हणती ॥ अन्याय नाहीं ॥ ३ ॥
उदंड हांसती दुसऱ्याशीं ॥ तेचि गुण आपल्यापाशीं ॥
अखंड वर्णिती आपल्याशीं ॥ समर्थां देखतां ॥ ४ ॥
मागील दिवस विसरती ॥ उगेच तालदारी आणिती ॥
अखंड चूकती लालुचि करिती ॥ परम अन्यायी ॥ ५ ॥
आपणा वेगळें कार्य न व्हावें ॥ अवघे आपणाचि असावें ॥
आपलें केलें न मोडावें ॥ ऐसी वासना ॥ ६ ॥

व्याप आटोप करावा ॥ समर्थ वेळेस आडवावा ॥
आपुला हेका वाढवावा ॥ अत्यादरें ॥ ७ ॥
स्वयें आपणाशीं कळेना ॥ समर्थें सांगितलें येकेना ॥
सत्य असलें तरी मानेना ॥ अभिमानें ॥ ८ ॥
वैरियाकडे सख्य लावी ॥ समर्थांचें काम बुडवी ॥
व्यर्थ लाळूच उठाठेवी ॥ उद्दंड करी ॥ ९ ॥
इष्ट मित्र शरीरसंबंधी ॥ व्यापकपणें सूत्रें साधी ॥
वैरीवरी हिताळू कुबुद्धि ॥ अंतरीं वसे ॥ १० ॥
आज्ञेप्रमाणें असतां ॥ बहुत दुःख वाटे चित्ता ॥
आपले इच्छेनें वर्ततां ॥ बरें वाटे ॥ ११ ॥
आपले अवगुण लपवी ॥ श्रेष्ठांपुढें जाणीव दावी ॥
धीटपणेंची दटावी ॥ कोणी एकासीं ॥ १२ ॥
जें समर्थासी पाहिजे ॥ तें आपणासि न पाहिजे ॥
आपणासी मानेल तें कीजे ॥ कांहीं एक ॥ १३ ॥
काम सांगतांचि अडे ॥ मीस करूनी वेळेसीं दडे ॥
कुकर्मी आदरें पवाडे ॥ नानायत्नें ॥ १४ ॥
समर्थी अडानी ताल केला ॥ गर्वें लेखिना कोणाला ॥
काम नासूनि उडाला ॥ एकीकडे ॥ १५ ॥
जें पाहिजे समर्थासीं ॥ त्यासीं करणें बरकसी ॥
त्याची गोष्टी हरीकसी ॥ हळू पाडी ॥ १६ ॥
आपुले ठायीं वोढाणीं आणिती ॥ श्रेष्ठांसि मागें तुच्छ करिती
कठीण वेळेसीं मिळोनि जाती ॥ शत्रूकडे ॥ १७ ॥
समर्थासीं वळेंचि करणें ॥ मर्यादा सांडूनि चालणें ॥
मना येसें न होतां करणें ॥ अप्रमाद ॥ १८ ॥
मज वेगळें काम न चाले ॥ ऐसें मागें पुढें बोले ॥
कित्येक लोकांचि फोडिले ॥ आपणांकडे ॥ १९ ॥

समर्थांसीं कांहींच कळेना ॥ मी सांगतों तें ऐकेना ॥
शहाणपण दाखवी जना ॥ नाना प्रकारें ॥ २० ॥

श्रेष्ठ समजोनि न पाहे । मजवेगळें कोण आहे ॥
निकामी मिळवूनि काय हें ॥ गळंगळा अवघा ॥ २१ ॥

अवघें ढाळ भाग्यें चालतें ॥ येरवीं मुख्यास काय कळतें ॥
आम्हां लोकांकरितां वोळतें ॥ सकळ कांहीं ॥ २२ ॥

आम्हांप्रमाणें काय जाणें ॥ प्रभु होय परी कांहीं नेणें ॥
आम्हां वेगळें कोण शहाणें ॥ आहे येथें ॥ २३ ॥

पोटासाठीं सेवा करणें ॥ उगेच फुगती रिकामे ॥
थोरपण दिधलें कोणें ॥ सेवकासीं ॥ २४ ॥

ऐसे प्रकारींचे लोक ॥ त्यांस कैसा असेल विवेक ॥
मूर्खपणें अविवेक ॥ रक्षिती बळें ॥ २५ ॥

समर्थांसीं सांडून सेवकजन ॥ सेवकाकडे लाविती मन ॥
ते जाणावे परमहीन ॥ नीच काठींचे ॥ २६ ॥

ऐसे नेणतां चूक पडती ॥ जाणते अवघेंची जाणती ॥
निकामी आणि गर्व करिती ॥ मूर्खपणें ॥ २७ ॥

सेवक जनावरी विश्वासिला ॥ तो सेवकीं जेर केला ॥
समर्थ पराधीन झाला ॥ हेंही अपूर्व ॥ २८ ॥

कामाकारणें ठेविले ॥ काम पाहूनि वाढविले ॥
तेही उगेंच गर्वें फुगले ॥ कोण्या हिशोबें ॥ २९ ॥

याकारणें बदलीत जाणें ॥ सेवक आज्ञेच्या गुणें ॥
तरीच समर्थपण जाणें ॥ समर्थांसीं ॥ ३० ॥

काम नासलें तरी नासावें ॥ परी सेवकाधीन न व्हावें ॥
दास म्हणे स्वभावें ॥ बोलिलों न्याय ॥ ३१ ॥

न्याय अन्यायासीं मानेना ॥ विवेक अविवेक्या कळेना ॥
पुण्यमार्ग आवडेना ॥ पापी जनासीं ॥ ३२ ॥

**सेवक बहुतांसी असती ॥ परी पाहों नये हे प्रचीती ॥**
**तथापि हे क्षमा श्रोतीं ॥ केली पाहिजे ॥ ३३ ॥**
**इति श्रीसेवकधर्मनिरूपणंनाम द्वितीय समासं समाप्त ॥**

ह्या प्रमाणें सेवकधर्म सांगून निळोसोनदेव व बाळाजी आबाजी चिटणीस यांस समर्थ बोलले कीं, हा सेवकधर्म केवळ तुम्हांसच सांगितला आहे असा अर्थ नाहीं. मोरोपंत पिंगळे, जनार्दनपंत हणमंत इत्यादि सर्व कारभारी यांस व सरदारांपासून तों पायदळांतील सेवकांपर्यंत हाच सांगितलेला धर्म योग्य आहे. ह्या करितां सर्वांनींच उत्तम लक्षणें ग्रहण करवित आणि दुर्लक्षणांचा त्याग करावा.

त्याकाळीं सर्वांनीं स्वामींस हात जोडून विनंती केली कीं, " महाराज! आपण सर्वज्ञ व सर्व समर्थ आहां. आज्ञेप्रमाणें यथामति व यथाशक्ति सेवा करीत आहोंत. आजपर्यंत बहुत करून सेवेंत अंतर पडलें नाहीं. व पुढेंही पडणार नाहीं. परंतु न कळून अंतर पडल्यास क्षमा व शिक्षाही करण्यास स्वामी व महाराज समर्थच आहेत."

हें ऐकून मंदहास्य करून समर्थ बोलले कीं, "तुम्ही सारे कुलवंतच आहां. जें काय सांगावयाचें तें कुलीनासच सांगावें. अकुलीनास सांगण्यांत फळ काय? ह्यास्तव सर्वांनीं मिळून राजसेवा करीत आहां त्याप्रमाणें पुढेंही करीत जावी ह्यांतच कल्याण आहे."

हें सर्वांनीं ऐकून 'तथास्तु' म्हणून वंदन केल्यावर समर्थ उठले आणि सभा विर्सजन झाली.

चवथ्या दिवशीं भोजनोत्तर समर्थांनीं शिवाजी महाराजांस प्रसाद वगैरे देऊन निरोप दिला. निरोप देतेवेळीं महाराजांनीं समर्थांस विनंति केली कीं " काल महाराजांनीं 'राजधर्म' वगैरे सांगितला. त्याप्रमाणें काय घडणें तें आपल्या कृपेनें घडो. परंतु आपला नित्य दर्शनाचा लाभ व तीर्थ प्रसादलाभ घडावा अशी फार इच्छा आहे." समर्थ म्हणाले " शिवबा, तुम्ही राजे लोक; आम्ही अरण्यवासी; स्वेच्छाचारी. हा तुमचा हेतु सफल होणार कसा? व्हावयाचा नाहीं. ह्याकरितां आपल्या मातोश्रीस आम्ही तीर्थ दिलें आहे, त्यांतच गंध उगाळून त्याची गोळी करून ताइतांत

घालून तो दंडांत धारण करावा आणि त्याचें दर्शन व तीर्थ घेत जावें म्हणजे आमचेंच दर्शन झाल्याप्रमाणें समजावें; अंदेशा बाळगूं नये." तरी राजेसाहेब जरा घुटमळल्याचें दिसूं लागलें म्हणून कल्याणस्वामी म्हणाले "स्वामींची आज्ञा हीच प्रमाण, त्यांत अंदेशा असूं नये." हें ऐकून शिवाजी महाराजांनीं तीच आज्ञा प्रमाण म्हणून निरोप घेतला आणि प्रतापगडीं गेले. समर्थांपासून निघतांना शिवाजी महाराजांना अत्यंत वाईट वाटून गहिंवर आला हें सांगणें नकोच. धन्य ती गुरुशिष्याची जोडी असा प्रेमभाव अन्यत्र कोठें बरें दृष्टीस पडणार?

येथें समर्थ रामदासस्वामींच्या व छत्रपति शिवाजीमहाराजांच्या प्रथम भेटीचा वृत्तांत संपला. हा किती बरें मनोरम आहे! ह्यांत समर्थांचा अधिकार आणि शिवराजाची भक्ति ह्यांपैकीं अधिक तारीफ कशाची करावी हेंच समजत नाहीं. दोन्हींही अगदीं समसमान आहेत. समर्थांचा अधिकार केवढा! वाणी किती गोड! ज्ञान किती अगाध! समयसूचकता, शीघ्र कवित्वशक्ति, धोरण ह्यांचें किती किती म्हणून वर्णन करावें असें होऊन जातें. ह्या येवढ्याच भागाचा जरी आपण नीट विचार केला, व सूक्ष्म रीतिनें त्यांतील सार निवडलें तर आज आपल्या सुद्धां अंतःकरणास गहिंवर येतो, मग प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांस त्यावेळीं गहिंवर आला असेल ह्यांत नवल तें काय? असो.

शिवाजीमहाराज घरीं जाऊन त्यानीं आपल्या परमपूज्य मातोश्रीस हें अनुग्रहाचें सर्व वर्तमान सांगितलें, समर्थांची योग्यता वर्णन केली आणि त्यांजकडून मिळालेला मोत्यांच्या तुऱ्याचा व नाराळाचा वगैरे प्रसाद पुढें ठेवला. तो पाहून व तें सर्व ऐकून त्यांच्या मातोश्रीस पराकाष्टेचा आनंद झाला हें तर सांगणें नकोच. तुऱ्याच्या व नारळाच्या प्रसादाबद्दल कांहीं विशेष वाटलें नाहीं, परंतु माती, खडे व घोड्यांची लीद हा प्रसाद आलेला पाहून मात्र त्यांस कसेसेंच वाटलें. म्हणून त्यांनीं शिवाजीस प्रश्न केला कीं, "शिवबा! हा तुऱ्याचा व नारळाचा प्रसाद ठीक आहे. परंतु माती, खडे व लीद प्रसादांत दिली आहे ह्यांतील हेतु काय?" शिवाजी महाराज म्हणाले "आई! त्यांतील अर्थ थोडासा गूढ आहे खरा; पण तें महद्भाग्याचें लक्षण आहे. माती दिली आहे ह्यावरून विपुल भूमि

पादाक्रांत होईल; खडे दिले आहेत ह्यावरून असंख्य किल्ले हस्तगत होतील व लीद दिली आहे ह्यावरून घोड्यांच्या कित्येक पागा पदरीं राहतील." हें ऐकून त्या भाग्यवंत माउलीस किती बरें कौतुक वाटेल असेल आणि समर्थांबद्दल किती आदरबुद्धि उत्पन्न झाली असेल, ह्याची वाचकांनींच कल्पना करावी. अशा रीतीनें हा समर्थांच्या अनुग्रहाचा जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला.

**इच्छागमन**—शिवाजी महाराज जावयास निघाले तेव्हां त्यांनीं समर्थांच्या नित्य दर्शनाची इच्छा प्रगट केली होती व त्यावर स्वामींनीं सांगितलेंही होतें कीं, तुम्हांस कितकेंच कारण लागल्यास माझें स्मरण करा, म्हणजे मी केव्हांही दर्शन देईन. आणि त्याप्रमाणेंच ते कोणालाही दर्शन देत असत. ह्याचीं उदाहरणें पुढें आणखीं येणारच आहेत. येथें शिवाजी महाराजांसच प्रथम दर्शन दिल्याचा वृत्तांत सांगतों.

शिवाजी महाराजांनीं अनुग्रह घेतल्यापासून असा क्रम ठेविला होता कीं, दर गुरुवारीं समर्थांच्या दर्शनास जावयाचें, आठ दिवसांत काय काय राज्य-व्यवहार झाला तो समर्थांस विदित करावयाचा, आणि पुढील कार्याबद्दल काय काय आज्ञा होईल ती घेऊन परत जावयाचें. असा क्रम चालू असतां कोणे एके दिवशीं यवनांकडून चढाई झाल्याची बातमी आली. मोठें संकट प्राप्त झालें, परंतु समर्थांची भेट झाल्यावांचून कोणतीही मसलत करावयाची नाहीं असा महाराजांचा कृतनिश्चय. म्हणून समर्थांकडे मनुष्यांवर मनुष्यें रवाना केलीं. समर्थ कोठें आहेत याचा शोधच लागेना. प्रसंग तर अगदीं निकडीचा. हें पाहून कारभाऱ्यांनीं महाराजांस विनंति केली कीं, स्वामी कांहीं आपल्या स्वाधीन नाहींत; आणि आपण तर त्यांस विचारल्यावांचून करीत नाहीं. असें करून कसें चालेल? ह्याकरितां सर्वांच्या अनुमतानें आलेला प्रसंग पार पाडावा आणि मागून समर्थांस त्याबद्दल विनंति करीत जावी. परंतु शिवाजी महाराजांनीं सर्व कारभाऱ्यांस आज्ञा केली कीं, स्वामींची आज्ञा घेतल्याशिवाय कोणतेंही कार्य कर्तव्य नाहीं. असा निग्रह पाहून सारे लोक मोठ्या विचारांत पडले. गनीम तर चढाई करून आला. मोठें संकट पडलें. त्या वेळीं स्वारी रायगडावर होती. महाराज सर्व प्रधानमंडळासह दरबारांत बसले आहेत, स्वामींच्या शोधा-

साठीं कारकून जाऊन स्वामींची कोठेंही गांठ पडत नाहीं, गनीम तर चढाई करून आला, आतां कशी तरी मसलत शेवटास नेली पाहिजे अशी फार निकडीनें लोक विनंति करीत आहेत, महाराज सचिंत बसले आहेत, तोंच अकस्मात् पायांत पादुका, हातांत माळ, अशा वेषानें समर्थ सभेंत येऊन दाखल झाले. त्यांस पाहतांच महाराजांसहवर्तमान सर्व सभासदांनीं साष्टांग नमस्कार करून उभे राहिले.

समर्थ म्हणाले "शिवबा! तूं हा राज्यकारभार करतोस. त्यांत कोणत्या वेळीं कोणता प्रसंग येईल याचा नेम नाहीं. आम्ही तर तुम्हापाशीं नाहीं. आणि तुम्ही तर असा नेम धरून बसतां; तो चालणार नाहीं. ह्याकरितां जसा प्रसंग येईल तशी मसलत करून काम शेवटास नेत असावें."

शिवाजी महाराज सद्गदित अंतःकरणानें हात जोडून म्हणाले "हा प्राण जावो कीं राहो; दौलतीचा विषय तो किती? आज्ञेवांचून पाऊल पुढें पडावयाचें नाहीं."

ह्यावर स्वामी हास्यवदन करून बोलले "शिवाजी तूं धन्य आहेस. असो; आतां आम्ही सांगतों त्याप्रमाणें करीत जा. आतां परमार्थ दृष्टीनें म्हणशील तर आम्ही रात्रंदिवस तुझ्यापाशींच आहोंत, नाहीं असें नाहीं; पण लौकिक दृष्टीनें पाहिलें तर आम्ही जवळ नाहीं हेंही खरेंच आहे. ह्याकरितां असा कांहीं कठीण प्रसंग प्राप्त झाला तर श्रीकुलदेवीस विनंति करून तिची आज्ञा होईल त्याप्रमाणें करीत जावें."

राजेश्री म्हणाले "स्वामी महाराज! देवी तर प्रत्यक्ष नाहीं तेव्हां विनंति कोणापाशीं करावयाची? आणि आज्ञा तरी कशी मिळणार? ह्याबद्दल काय ती आज्ञा व्हावी."

समर्थ म्हणाले "हे राजा, तूं शुचिर्भूत होऊन आपल्या आप्तवर्गापैकीं एक चांगला लिहिणार व एक चांगला प्रश्न करणार व तुम्ही असे त्रिवर्गएकत्र बसून ज्या कार्याचा प्रश्न करणें असेल त्या कार्याचा प्रश्न करणारानें प्रश्न करावा. म्हणजे तुमच्या अंगांत देवीचा संचार होऊन तुमच्या मुखानें देवी बोलेल. त्याप्रमाणें लिहिणारानें लिहून घ्यावें. नंतर त्या लेखाचें तुम्ही अवलोकन करून त्यांत ज ी आज्ञा झाली असेल त्याप्रमाणें करीत जावें. सांप्रतचें जें संकट प्राप्त झालें आहे त्याचें निवारण श्री करून तुमचा उद्देश सिद्धीस नेईल."

इतकी आज्ञा करून समर्थ अदृश्य झाले !

नंतर समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महाराज यवनांच्या सैन्यावर चालून गेले व विजयश्री घेऊन परत आले. पुढें ज्या ज्या वेळीं असें संकट आलेलें आढळून येई तेव्हां तेव्हां महाराज देवीची प्रार्थना करीत, व महाराजांच्या अंगांत देवीचा संचार होऊन ज्या ज्या आज्ञा होत त्या त्या सरकारचे हितचिंतक लिहून ठेवीत, आणि राजेश्री पुढें त्याप्रमाणेंच योजना करीत, असा क्रम चालला होता.

**कुबडी तीर्थ**—एके दिवशीं नित्याप्रमाणें राजश्री समर्थांच्या दर्शनाकरितां निघाले. तों समर्थांची स्वारी चाफळखोऱ्यांतील निंबघळींत होती. तेथें राजश्रींनीं जाऊन नित्यपद्धतीप्रमाणें नमस्कार करून हात जोडून पुढें उभे राहिले. व बसावयास आज्ञा होतांच खालीं बसले. समर्थांनीं शिवाजी-महाराजांच्या मुखाकडे पाहिलें तों तें थोडेसें म्लान झालेलें दिसलें. तें पाहून समर्थांनीं विचारलें कीं, " काय शिवबा! तूं आज म्लान झालेला दिसतोस. तृषा वगैरे लागली आहे कीं काय? " महाराज " होय " म्हणाले. त्याबरोबर स्वामींच्या हातांत कुबडी होती तिनें पलीकडे एक लहानसा दगड होता तो उलटून टाकला! तो त्याच्याखालून उत्तम झऱ्याचें पाणी निघालें. तें पाहून समर्थ म्हणाले " हं ! शिवबा ! पाणी उत्तम आहे. प्या." शिवाजी महाराज पहातात तों पाणी उत्तम थंडगार. तें पाहून त्याचें यथेच्छ प्राशन केलें आणि तृप्त होऊन दंडप्राय नमस्कार घालून म्हणाले " स्वामीमहाराज ! मज दीनावर आपली तरी किती कृपा ही !" असें बरेंच संभाषण होऊन स्वामींची आज्ञा घेऊन शिवाजी महाराज निघून गेले. हें महाराजांकरितां जेथें पाणी निर्माण केलें त्या ठिकाणीं अद्यापपर्यंत तो झरा वहातच आहे. हा झरा निंबघळींत आहे. त्याला 'कुबडी तीर्थ ' असें म्हणतात.

**डोंगरांत २००० पात्रांचें भोजन**—असे अनेक अद्भुत चमत्कार समर्थांनीं शिवाजी महाराजांस दाखविल्याचें बखरींत व इतर कागदोपत्रांतही नमुद आहे. त्यांपैकींच खालीं दिलेलाही एक अद्भुत चमत्कार होय. एके दिवशीं नित्याप्रमाणें शिवाजी महाराज आपला सुमारें दोन हजारांचा फौज फाटा घेऊन चाफळ खोऱ्यांतून पुढें चालले होते. तों अकरा वाजावयाचा

सुमार झाला. इतक्यांत बातमी समजली कीं, समर्थांची स्वारी येथेंच डोंगरांत आहे. तेव्हां सहज अनायासें दर्शनाचा योग आला आहे, तर दर्शन घेऊन पुढें जावें असें मनांत येऊन दोन चार निवडक मनुष्यांसह शिवाजी महाराज थोडेसे वर डोंगरांत चढून समर्थांच्या दर्शनास गेले. तों रामघळींत समर्थांची गांठ पडली. त्यांस साष्टांग नमस्कार घालून 'बसा' अशी आज्ञा झाल्यावरून शिवाजी महाराज खालीं बसले. जवळ कल्याणस्वामी मात्र होते. दुसरें कोणी नव्हतें. घटका दोन घटका संभाषण झाल्यानंतर महाराजांनीं जाण्यासाठीं समर्थांस आज्ञा विचारली. तेव्हां समर्थ म्हणाले "आतां दुपार भरत आली आहे. तर रघुपतीस नैवेद्य समर्पण करून मग जावें." तेव्हां राजेश्रींनीं विनंति केली "माझ्याबरोबर मनुष्यें फार आहेत आणि येथें तर कल्याणस्वामी शिवाय दुसरें कोणी नाहीं. याकरितां मला आज्ञा असावी." समर्थ हास्य करून म्हणाले "शिवबा ! आमचा गोसावी सदा तयार आहे. चिंता करूं नये सर्वांनीं भोजनोत्तर जावें. किती मनुष्यें बरोबर आहेत ?" "सारीं मिळून २००० दोन एक हजार मनुष्यें होतील." समर्थ म्हणाले "कांहीं चिंता नाहीं. त्यांना तरी आमच्यासाठीं तुम्हांबरोबर रानोमाळ उन्हातान्हांतून हिंडावें लागतें. ते म्हणतील स्वामींची भेट होते, आणि आम्ही उपाशीं राहतों. याकरितां तसें करूं नये." असें सांगून कल्याणाकडे वळून म्हणाले "कल्याणा ! सर्वांची भोजनाची तयारी करावी." कल्याण म्हणाले 'आज्ञा' त्यांनीं लागलीच शिवाजीमहाराजांस व त्यांच्याबरोबरच्या मंडळीस स्नानें वगैरे करून सिद्ध व्हावयास सांगितलें. तेव्हां कारभाऱ्यांनीं सर्वांस हुकूम फर्मावला कीं, ज्यांस भोजन करणें असेल त्यानें स्नान करून तयार व्हावें. त्याप्रमाणें सर्व मंडळी स्नानास गेली. तेव्हां कल्याणस्वामी समर्थांपुढें सचिंत येऊन उभे राहिले. त्यांस पाहून समर्थांनीं विचारलें "काय ? कल्याणा ! काय पाहिजे ?" कल्याणस्वामींनीं हात जोडून विनंति केली कीं "सर्वांचीं स्नानें होत आलीं" समर्थ म्हणाले "ठीक आहे. ती पलीकडे डोंगरांतील गुहेच्या तोंडावर शिळा बसविलेली आहे, ती एका बाजूस ढकल, म्हणजे आंत सर्व कांहीं तयारी आहे." अशी आज्ञा होतांच कल्याणस्वामींनीं जाऊन ती गुहेची शिळा बाजूस केली. तों आंत मोठी

प्रशस्त जागा असून पाट रांगोळ्या घालून पानें मांडून तयार होतीं! जातीजातींप्रमाणें सर्वांच्या पंक्ती वेगवेगळ्या होत्या. समया तेवत असून सोंवळीं भांडीं वगैरे सर्व कांहीं व्यवस्था राजकीय थाटाची होती. हें पाहून कल्याण स्वामींनीं राजश्रींसहवर्तमान सर्वांस त्यांच्या त्यांच्या इतमामाप्रमाणें नेऊन पाटावर बसविलें. वाढलेलीं पक्वानें फारच उंची व प्रत्येक पदार्थ स्वादिष्ट असल्यामुळें सर्वांचीं यथास्थित भोजनें झालीं. आंचवावयाला मोऱ्यासुद्धां आंतच होत्या! भोजनोत्तर विडे आणून कल्याणांनीं सर्वांस दिले. ही समर्थांची अद्भुत लीला पाहून शिवाजीमहाराज तर आश्चर्यसागरांत अगदीं बुडून गेले! आपण आहोंत कोठें, आणि पाहतों काय, हेंच त्यांस कळेना! वसिष्ठ ऋषींनीं अरण्यामध्यें आपल्या पर्णकुटींत साऱ्या सैन्यासहवर्तमान विश्वामित्रांस मेजवानी दिली तेव्हां तोही आश्चर्यचकित होऊन

**" अस्मद्गृहींहि न कधीं वरिली हे तृप्ति जेवणारांनीं "**

असे त्यांच्या तोंडून उद्गार निघाले! तसाच हुबेहुब प्रकार ह्या वेळेस शिवाजी महाराजांचा झाला. ते मनांत म्हणूं लागले कीं ' मी येवढा राजा असूनही समर्थांचें सामर्थ्य मजमध्यें नाहीं. अशा ओसाड डोंगरांत आयत्या वेळीं इतक्या मंडळीस भोजन देणें हें माझ्या हातून होईल काय ? छे! असे सद्गुरु मला मिळाल्याबद्दल मी किती बरें धन्य आहे! परंतु त्यांच्या मनाला एक चटपट लागून राहिलीच कीं, हें झालें तरी कसें ? ह्याचा खुलासा समर्थांकडूनच करून घ्यावा. म्हणून भीत भीत हात जोडून राजेश्रींनीं त्याबद्दल समर्थांपाशीं विनंति केली. समर्थ हांसले आणि म्हणाले " ह्यांतील इंगितच तुम्हाला ऐकावयाचें असेल तर तुकाराम सांगतील," हें ऐकून शिवाजी महाराज उगाच राहिले. व थोडा वेळ संभाषण करून आज्ञा घेऊन प्रतापगडावर निघून गेले.

**तुकारामबावांचा मासला तोच**—खालीं दिलेल्या गोष्टीचा वास्तविक पाहिलें तर समर्थांच्या लीलेशीं फारसा संबंध नाहीं. तथापि ते समर्थांचे समकालीन होते; आणखी त्यांनीं तुकारामबावांस भेटण्याविषयीं शिवाजी महाराजांस आज्ञा केली होती. त्यांनीं केलेला अद्भुत चमत्कारही समर्थांच्याच तोडीचा होता. म्हणून तीही गोष्ट येथें सांगणें इष्ट दिसतें. केवळ ऐनरानांत निखालस डोंगराच्या कड्यांत दुपारीं आयत्या वेळीं २०००

मनुष्यांस समर्थांनीं सुग्रास अन्नाचें केवळ राजकीय थाटाचें भोजन घातलें ह्याबद्दल शिवाजी महाराजांच्या मनांत आधींच उत्कंठा लागलेली होती आणि त्यांत समर्थांनीं ती गोष्ट तुकाराबावा सांगतील म्हटल्यानें तर त्यांच्या मनांत त्यांतील हृद्य कळण्याविषयीं द्विगुणित उत्कंठा लागून राहिली. तो विषय त्यांच्या मनांत बऱ्याच दिवस सारखा घोळत होता. त्यांस नेहेमीं वाटे कीं, एकदां देहूस जाऊन तुकारामबावांचें दर्शन घ्यावें. आणि मनुष्याच्या मनांत एखाद्या गोष्टीची फारच हुटहूट लागलेली असली, म्हणजे ती एकदां केव्हां सिद्धीस जाते, असें होऊन जाते आणि तशी संधी येतांच ती मनुष्य सिद्धीस नेल्यावांचून राहत नाहीं, असा साधारण नियमच आहे. शिवाजी महारांचा प्रकारही तसाच झाला. तेही एके दिवशीं फौजेसहवर्तमान फिरत असतां देहूच्या जवळ आले व अकस्मात् तुकारामबावांच्या भेटीचा योग आलेला व्यर्थ दवडूं नये असें मनांत येऊन आपण देहू गांवच्या बाहेर उभे राहिले व एक कारकून पुढें तुकाराम महाराजांकडे पाठविला. त्या कारकुनानें जाऊन तुकारामबांवास विनंति केली कीं, "शिवाजी महाराज आपल्या दर्शनास आले आहेत. तरी त्यांस आज्ञा व्हावी." त्यावरून तुकाराम-बावांची आज्ञा झाली कीं, "हा भर दोनप्रहरचा समय आहे; भोजनाची सिद्धता आहे; ह्यास्तव मंडळीसहवर्तमान भोजनास येऊन भोजन झाल्यानंतर भेटीस यावें असें सांगा. आणि तुम्ही जाऊन फौजेंत जे शिधे घेणारे असतील त्यांस देण्याकरितां भोजनाचें साहित्य न्यावयास माणसें घेऊन या." अशी आज्ञा होतांच कारकुनानें शिवाजी महाराजांस विनंति केली कीं, "बुवांची आज्ञा अशी झाली आहे कीं, आतां दुपारची वेळ झालेली आहे. स्वयंपाक तयार आहे. जी मंडळी भोजनास येणार असतील त्यांस घेऊन महाराजांनीं स्वतः भोजनास यावें. ज्यांस भोजन करणें नसेल त्यांनीं शिधासामुग्री घेऊन जावी. घोड्यांच्या चंदीवैरणीसाठीं मनुष्यांस पाठवावें म्हणजे चंदी वैरण पाठवून देतों. नंतर भेटीस येणें तें दुपारीं भोजनोत्तर यावें. इतरउत्तर महाराज आज्ञा करतील तसें करूं." ही कारकुनाची विनंति ऐकून महाराजांनीं विचारिलें कीं "बावांच्या घरीं इतकें साहित्य आहे का?" कारकून म्हणाला "बावांचें घर तर चंद्रमौळी आहे! आणि स्वतः हातांत दगडाचे टाळ घेऊन भजन करीत आहेत." असें

म्हणतांच महाराजांनीं आज्ञा केली कीं, " ठीक आहे. दोन माणसें न्यावींत आणि बावा जें काय देतील तें प्रसादार्थ घेऊन यावें. " म्हणून महाराजांची आज्ञा होत आहे तोंच महाराजांकडचा कारकून परत यावयास विलंब लागला म्हणून तुकारामबावांनीं आपले चिरंजीव नारायणबावा यांस दाणा व कडबा देऊन पाठविले होते तेही तेथें जाऊन पोंचले. त्यांनीं सर्व स्वारांस हांक मारून आपआपली चंदी वैरण घेऊन जावयास सांगितलें. व महाराजांस विनंति केली कीं, "भोजनाची सर्व तयारी झाली आहे आपली मंडळी घेऊन स्वारीची तयारी करणें. "

नारायणबावांपाशीं वैरणीचा एक पाचुंदा व शेर दोन शेर सुमारें हरभरे पदरांत येवढाच काय तो सरंजाम होता ! त्यांनीं एका स्वाराला जवळ हांक मारून विचारिलें " हं ! बोला. तुमच्या घोड्याची चंदी किती ?" तो स्वार अगदीं आश्चर्यचकित झाला ! कारण पदरांत पुरते शेरभर हरभरे नाहींत आणि हे देणार काय ? तरी भीत भीत म्हणाला " माझ्या घोड्याची रोजची रतीबाची चंदी विचाराल तर पायलीभर आहे ! मग आपण काय द्याल ती !" नारायणबावा म्हणाले "मग द्याल ती कां ? पायलीभरच घे." असें म्हणून त्यांनीं पायलीचें माप त्याच्या पदरांत टाकलें ! दुसरा आला त्यालाही तसेंच. ह्याप्रमाणें ते सर्वांना चंदीवैरण पुरवीत होते, व हातांतला पुन्हा कडब्याचा पाचुंदा व पदरांतले हरभरे शिल्लक असावयाचे ते होतेच! हा अद्भूत चमत्कार पाहून सर्व मंडळी थक्क झाली. ह्याप्रमाणें सर्व सैन्यांत दाणावैरण, शिधासामुग्री पोंचविली. इतक्यांत शिवाजी महाराजही आपल्या खाशा मंडळीसह भोजनास जावयास तयार झाले. त्यांनीं नारायणबावांस विचारलें कीं, "भोजनास बसावयाची तयारी कोठें केली आहे ?" नारायणबावांनीं विनंति केली कीं, " इंद्रायणीच्या कांठीं मंडप घातला आहे तेथें. हा मीही बरोबरच येतों." असें म्हणून तेही राजश्रींच्या बरोबर निघाले. महाराजांबरोबर सारे मानकरी व ब्राह्मणमंडळी वगैरे होतीच. त्यांसहवर्तमान इंद्रायणीवर आले. पहातात तों मंडपाचा थाट काय विचारावा ? ठिकठिकाणीं वाळ्याचे व चिकाचे पडदे सोडलेले, बैठकीच्या जागा वेगवेगळ्या, भोजनशाळा, आरामस्थळें, हीं सर्व निरनिराळीं पाहून महाराज फार संतोषयुक्त झाले. नंतर ब्राह्मणांच्या पंक्ती,

मराठ्यांच्या पंक्ती, व आणखी ज्या ज्या इतर ज्ञाती होत्या त्यांच्या त्यांच्या पंक्ति सर्व निरनिराळ्या बसविल्या. वाढणारांची योजनाही तशीच निरनिराळी केलेली होती. ताटवाट्या, पाटरांगोळ्या वगैरे सर्वत्र बेत सारखा. ह्याप्रमाणें मोठ्या थाटानें सर्वांचीं भोजनें झाल्यावर महाराजांनीं तांबूल वगैरे घेऊन थोडासा आराम केला. आणि साधूंचें चरित्र केवळ अगाध होय, त्याचा अंत कळावयाचा नाहीं! म्हणून मनामध्यें परम विस्मय करूं लागले. नंतर नारायणबावांसहवर्तमान शिवाजी महाराज आपल्या सर्व मंडळीस बरोबर घेऊन तुकारामबावांच्या दर्शनास गेले. तों तुकाराम महाराज एका मोडक्याशा पडवींत भजन करीत बसले होते. तेथें जाऊन त्यांस नमस्कार करून राजश्री समर्याद बसले. बराच वेळ परस्पर संभाषणें होत होतीं. नंतर संतोष पावून महाराजांनीं विनंति केली कीं, "पूर्वी श्रीस्वामींकडेही असाच भोजनाचा प्रसंग झाला. व त्याबद्दल मीं त्यांस प्रश्न केला असतां ह्या प्रश्नाचें उत्तर आपणाकडून मिळेल अशी त्यांची आज्ञा झाली होती. तेव्हां त्याचें कृपा करून उत्तर मिळावें." हा राजांचा प्रश्न ऐकून तुकारामबावा हांसले आणि म्हणाले "राजा! तूं इतर मनुष्यांसारखा नव्हेस. अज्ञानी असेल त्यानें असली शंका घ्यावी. स्वामी तर प्रत्यक्ष मारुतीचे अवतार आहेत. ते काय एक न करतील? आम्ही साधु म्हणाल तर गरीब, श्रीहरीचे दास, दीनाहून दीन. आणि अनाथाहून अनाथ! आमच्या घरचें ऐश्वर्य काय? तर 'केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी' असें असतांही आमचा हुकूम त्रैलोक्यावर आहे. ऋद्धिसिद्धि ह्या आमच्या घरच्या दासी. ह्यास्तव साधूंचें माहात्म्य काय पहावयाचें आहे? ह्याकरितां त्यांच्याबद्दल कोणतीच शंका मनांत आणूं नये." असें सांगून तत्काल एक अभंग म्हटला. तो असाः—

## अभंग.

**लोंडिस्ते बोलिस्ते पलंग सूपती।**
**परी नाहीं लंगोटी नेसावया॥ १॥**
**ऋद्धि सिद्धि दासी कामधेनु घरीं।**
**परी नाहीं भाकरी भक्षावया॥ २॥**

**पुसालें जरि आम्हां वैकुंठींचा वास ।**
**परि नाहीं रहावयास स्थळ कोठें ॥ ३ ॥**
**तुका म्हणे आम्ही राजे वैकुंठींचे ।**
**परी नाहीं कोणाचें उरे पुरे ॥ ४ ॥**

असें बोलल्यावर तेंच खरें, असें मानून शिवाजीमहाराजांस अत्यंत संतोष झाला. आणि नंतर ते तुकारामबावांचा परमादरानें व विनयानें निरोप घेऊन स्वस्थानीं निघून गेले. हे दोन्हीही चमत्कार शके १५७१ मधील ज्येष्ठाच्या शुक्लपक्षांत झाले.

**वामनपंडितांची गाळण**—मोरोपंत आणि वामनपंडित ही कवि-वर्यांची जोडी आमच्या महाराष्ट्रांतील मंडळीच्या तर नेहेमींच्या परि-पाठांतील आहे.

**सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।**
**ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥ १ ॥**

ही आर्या कोणा सुशिक्षताच्या तोंडीं नाहीं असा मनुष्य विराळाच. हे वामन पंडित समर्थांचे समकालीन होते. समर्थांच्या आणि त्यांच्या भेटीचा प्रकारही मोठा गमतीचा आहे. तो सांगण्यापूर्वीं वामनपंडितांची थोडी तरी माहिती सांगणें अवश्य आहे. कारण, वामनपंडित म्हणजे कांहीं सामान्य प्रकरण नव्हतें. तर शास्त्रव्युत्पत्तींतील तें प्रचंड धेंड होतें. आणि त्यांची पंडितागिरी काशीपासून रामेश्वरापर्यंत गाजलेली होती. तेव्हां प्रत्येकाच्या कानावर ती असावी हें उक्त आहे. वारणातीरावर असलेल्या शिगांव कोरेगांवचे हे जोशी. हे लहानपणींच विद्याभ्यासाकरितां म्हणून सहकुटुंब काशीस जाऊन राहिले होते. हल्लीं ज्याप्रमाणें 'इंग्लंड' हें सर्वांचें विद्या-पीठ समजतात, व तेथें उत्तीर्ण होऊन आलेले लोक सर्वज्ञ व कृतकृत्य असें समजतात, त्याप्रमाणेंच पूर्वीं काशीस जाऊन उत्तीर्ण झालें कीं, तो अजिंक्य झाला असें समजत. तेथें त्यांनीं षट्शास्त्राचें उत्तम प्रतीचें अध्ययन केलें. संस्कृतांत कविता करण्याबद्दल तर त्यांचा हातखंडा असे. प्रथमतः तारुण्याच्या भरांत ह्यांना आपल्या विद्येचा फार अभिमान होता ते पूर्वकालीन पद्धती-प्रमाणें सभेंत मोठमोठ्या पंडितांशीं वादविवाद करून जयपत्रें मिळवींत

असत. हे जयपत्रें घेत घेत एक वेळ जयपुरास गेले. कारण, जयपूर त्यावेळीं विद्वज्जनसमूहाचें एक केंद्र होतें. असा कोणी पंडित वादास आला म्हणजे तो दिवसां मशाल लावून येत असे व जो कोणी त्याचा पराजय करील त्यानें ती मशाल विझवावयाची अशी चाल असे. त्याप्रमाणें ह्या पंडिता-बरोबरही दिवसां मशाल लावलेली होती. [आलीकडचे प्रसिद्ध शीघ्र कवि गट्टूलालजी हेही दिवसां मशाल लावून जात असल्याचें आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे.] रीतीप्रमाणें राजदरबारांतील शास्त्रीलोकांचा व पंडितांचा वादविवाद सुरू झाला. परंतु वामनपंडितांची विद्वत्ता दांडगी, बुद्धि अलोट व कवित्वशक्ति लोकोत्तर असल्यामुळें त्यांच्या प्रश्नावर उत्तर देण्यास कोणीहि टिकत नसे. जयपूर येथेंही तसाच प्रकार झाला. वामनपंडितांचा पूर्वपक्ष ऐकून जयपूरच्या महाराजांच्या पदरचे सर्व पंडित अगदीं कुंठित होऊन गेले. त्यांनाही यथायोग्य उत्तरें सुचेनात. तेव्हां तर वामनपंडित फारच चढून गेले व अखेर आपलाच जय झाला असें समजून मोठ्यानें गर्जना करून म्हणाले "अहंव्याघ्रः" म्हणजे विद्वत्तेमध्यें मी वाघ आहे. मी कोणास हार जाणार नाहीं, असा त्यांच्या भाषणांतील मथितार्थ होता. त्यांच्यापुढें कोणाचेंच तेज पडेनासें झालें. पण त्या सभेमध्यें एक पंडित मोठा समय-सूचक होता. त्यानें 'अहंव्याघ्रः' म्हणतांच चटकन् उत्तर दिलें "गोभक्षकः" हें उत्तर ऐकतांच 'विझवा मशाल! विझवा मशाल!' असा साऱ्या सभे-मध्यें एकच गोंगाट झाला. ह्यांच्याच संबंधानें दुसरी एक आख्यायिका अशी आहे कीं, ते असेच जयपत्रें घेत घेत पुन्हां काशीस गेले. तेथेंहि मोठ-मोठ्या पंडितांशीं ह्यांचा वाद झाला. तेथील एका शास्त्र्यानें 'शिव थोर कीं विष्णु थोर' असा पूर्वपक्ष केला होता. त्यांत वामनपंडितांनीं हरल्याचें कबूल केल्यानंतर त्यानेंच शिव थोर असें सिद्ध करून दाखविलें. तेव्हां वामनपंडित निरुत्तर झालें. शिव श्रेष्ठ कीं विष्णु थोर हें त्यांचें त्यांसच कळेनासें झालें. तेव्हां ते गोंधळांत पडले. आणि अतःपर आपण संस्कृत कविता करणार नाहीं असा कृतनिश्चय केला. आणिः—

**नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी।**
**हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी।**

**हरीवाटे काळाकरिस विपती मृत्यु भुजगा ।**
**जगाचा तूं ऐसा धनि कवण तो पाव मज गा ॥ १ ॥**

ह्या प्रथम श्लोकानें परमेश्वराची प्रार्थना केली !

ह्यांच्यासंबंधानें तिसरी आख्यायिका अशी आहे कीं, कांहीं केलें तरी पंडितांच्या मनाचें समाधान म्हणून होईना. म्हणून ते फिरत फिरत देहूस येऊन इंद्रायणी नदीवर स्नानसंध्या करीत बसले असतां, जवळच एक मोठा अश्वत्थाचा वृक्ष होता. त्याच्या एका मोठ्या ढाळीवर एका ब्रह्मराक्षसाचें ठाणें होतें. तेथें दुसरा एक ब्रह्मराक्षस आला व तो दुसऱ्या ढाळीवर बसूं लागला. त्यास पहिला ब्रम्हराक्षस म्हणाला "त्या ढाळीवर बसूं नको. दुसऱ्या ढाळीवर बस." दुसऱ्या राक्षसानें विचारलें "कां बरें ?" पहिला राक्षस म्हणाला "वामन पंडित म्हणून एक मोठा विद्वान् ब्राम्हण आहे. त्याला आपल्या विद्वत्तेचा मोठा अभिमान असून त्यानें भरसभेमध्यें अनेक विद्वानांची मानखंडणा केली आहे. म्हणून तो ब्रम्हराक्षस होऊन येणार आहे. त्याच्याकरितां ती ढाळी राखून ठेवलेली आहे." हा संवाद वामन पंडितांनीं ऐकला, तेव्हां त्यांस मोठा पश्चात्ताप झाला. ते तुकाराम-बुवांस शरण गेले. तेव्हां त्यांस तुकाराम म्हणाले "आपण सत्पात्र ब्राम्हण आहां. साक्षात् वेदो नारायण. मी केवळ शूद्र आहे. तेव्हां 'वर्णानां ब्राम्हणो गुरुः' या नात्यानें आपणच आमचे गुरु आहांत. आपणास अनुग्रह देण्याचा माझा अधिकार नाहीं. ह्यास्तव आपण श्रीरामदास्वामींस शरण जावें." त्याप्रमाणें पंडित समर्थांस शरण गेले. त्यांनीं त्यांस बदरिकाश्रमास जावयास सांगितलें. तेथें जाऊन बारा वर्षें तपश्चर्या करून ते परत आले. नंतर पुन्हा स्वामींच्या आज्ञेवरून कांहीं काल मलयाचलावर जाऊन राहिले. तेथें कदली वनांत असतां स्वामींनीं समाधिस्थितींत जाऊन त्यांच्या मनांतील सर्व शंकांचें समाधान केलें. ह्या गोष्टीचा उल्लेख पंडितांनीं '**निगमसार**' नामक आपल्या ग्रंथामध्यें केला आहे. त्यानंतर पंडितांनीं समक्ष येऊन समर्थांचा अनुग्रह घेतला. आणि समर्थांस विनंति केली कीं "यापुढें देह कसा वागवावा ?" समर्थांनीं आज्ञा केली कीं, "यापुढें संस्कृत कविता करण्याच्या भरीस पडूं नये. प्राकृत भाषेंतच कविता करीत जाव्यात. म्हणजे सर्व लोकांच्या उपयोगी पडतील."

त्याप्रमाणें पंडितांनीं यापुढें मराठी कविता करण्यास सुरुवात केली. प्रथमतः त्यांनीं रामदासस्वामींचें स्तोत्र संस्कृतांत रचलें. तें फारच उत्तम आहे. त्यानंतर त्यांनीं 'यथार्थ दीपिका' वगैरे बारा लक्ष ग्रंथ केला. 'यथार्थ दीपिका' खेरीज करून वामनपंडितांची कविता बहुतेक श्लोकबद्ध आहे. तींत 'यमक' फार साधलेले आहेत. त्यावरून समर्थ त्यांस 'यमक्या वामन' असें म्हणत असत. अनुग्रह घेतल्यानंतर वामन-पंडित नेहेमीं समर्थांपाशींच राहूं लागले. ते प्रत्यहीं 'दासबोधा' चा पाठ वाचून त्याचें मनन करित असत. एके दिवशीं दासबोधाच्या सातव्यादशकांतील तिसरा समास वाचीत असतां १४ ब्रम्हांची स्थापना करून ती पुन्हा मिथ्या ठरवून उडवून दिल्याचें वाचलें. तेव्हा १४ ब्रम्हांची स्थापना केलेली पंडितांस पटली. परंतु ती उडविल्याचें व्यासवाणींत कोठेंच आढळेना. ही शंका त्यांच्या मनांत बरेच दिवस घोळत होती. परंतु समर्थांपाशीं विचारण्याचें धैर्य होईना. तेव्हां त्यांनीं एक युक्ति काढली कीं, समर्थ रामघळींत असतां एकांतीं त्यांनीं विनंति केली कीं, "मी दासबोध वाचलों, आपण त्याचें स्पष्टीकरण करावें." ती गोष्ट समर्थांनीं मान्य केली. तेव्हां पंडितांनीं त्यांना पाहिजे होता तोच समास काढला. त्यांतलि चौदा ब्रम्हें स्थापनेचा विचार पंडितांस मानवला. परंतु तीं उडविल्याचें कांहीं त्यांच्या मनांत भरेना. समर्थांनीं दोन तीन वेळ त्यांच्या शंकांचें समाधान फिरून फिरून सांगितलें आणि पुन्हा विचारलें कीं "काय ? ध्यानांत आलें किंवा नाहीं ?" पंडित म्हणाले "हें कांहीं बरोबर समजत नाहीं." ह्याप्रमाणें बराच वेळ हुजत झाली, तरी पंडितांची समजूत म्हणून कांहीं पटेना. हें पाहून समर्थांनीं मारुतीचें रुप प्रगट केलें [मारुतीसारखें उग्र ?] आणि मोठ्यानें गर्जना करून विचारलें कीं, "काय वामना ? शंका फिटली कीं नाहीं ? बोल. भिऊं नको." पंडित लटलटा कांपत म्हणाले "फिटली ! सारी शंका फिटली !" समर्थ पुन्हा म्हणाले "भिऊं नको. वामना ! बोल." पंडित म्हणाले "नाहीं; कांहीं एक शंका उरली नाहीं." तेव्हां समर्थांनीं पूर्वरूप [पूर्वींचें सौम्य रूप ?] धारण करून सौम्य वृत्तीनें विचारलें कीं, "काय ? शंका फिटली कीं नाहीं ?" पंडित हात जोडून म्हणाले "खरोखर अद्याप

शंका कांहीं फिटली नाहीं." समर्थ हास्यवदन करून म्हणाले " मग मघाशीं आपण सर्व शंका फिटली असें कां म्हणाला ?" पंडित म्हणाले " आपल्या त्या उग्र स्वरूपापुढें बोलावयाचें सामर्थ्य कोणाला ? म्हणून म्यालों. परंतु खरोखर शंका कांहीं फिटली नाहीं. १४ ब्रह्में उडविण्यास कोठें आधार दिसत नाहीं." समर्थ म्हणाले " तुम्ही पंडितराव आहां. कोठेंतरी ग्रंथांत पहा." पंडित म्हणाले " पाहिला. पण असा आधार कोठें आढळत नाही." समर्थ म्हणाले " ओझेभर ग्रंथ वागवितां त्यांत कोठेंच कांहीं नांहीं काय ?" पंडित म्हणाले " नाहीं; आढळत नाहीं." तेव्हां समर्थ म्हणाले " बरें तर आतां बृहदारण्यकोपनिषदांत पहा. त्यांत न सांपडला तर मग आम्ही आपल्या दासबोधाला हरताळ लावूं." त्याप्रमाणें पंडितांनीं पाहतांच बरोबर आधार मिळाला. आणि तेथपासून समर्थांवर त्यांची विशेषच श्रद्धा जडली.

**अनुग्रह परत दिला ! !**— [ शके १५७१ तील ज्येष्ठ कृष्णपक्षांतील गोष्ट.]:समर्थांचा अनुग्रह घेतला व त्यांची मर्जी संपादन केली कीं, कोणाचीहि गणना शिष्यवर्गांत होत असे. आणि मठामध्यें यथास्थित दोन वेळ पुरल्या झोडावयाला मिळत असे. हें पाहून **' शितें तंवर तीं भुतें भोंवतीं '** जमावयास लागत असाच प्रकार चालू झाला. ज्याला कोठें कांहीं थारा नाहींसा होईल त्यानें समर्थांचे शिष्य बनावें आणि मठांत राहावें. अशा शिष्यांच्या झुंडीच्या झुंडी जमूं लागल्या. त्यांतच एक ब्राह्मण येऊन समर्थांचा अनुग्रह घेऊन समर्थांचा शिष्य म्हणून मठांत राहूं लागला. त्याला वाटलें कीं, येथें आपल्याला खुशाल स्वस्थ बसून खावयाला मिळेल. पण समर्थ त्याला आपल्याबरोबर हिंडवूं लागले. कधीं रानांत तर रानांत; कधीं थंडी तर कधीं ऊन; कधीं पानगे तर कधीं उपास ! अशी जेव्हां त्रेधा उडाली, तेव्हां मात्र तो कंटाळला. आणि तुकारामबावांची कीर्ति ऐकून व सत्वस्थ स्वभाव पाहून त्यांस शरण गेला. आणि म्हणाला:—

" मला आपण अनुग्रह द्यावा."

तुका०—" तूं पूर्वीं कोणाचा अनुग्रह घेतला होतास काय ?"

" होय; मीं रामदासांचा अनुग्रह घेतला होता."

" मग आतां आमचा कां मागतोस ?"

"आपली योग्यता अधिक आहे म्हणून."

"हें तुला कोणीं सांगितलें?"

"माझ्या मनालाच तसें वाटलें."

"पण एकदां ज्यानें अनुग्रह घेतला, त्याला आम्ही पुन्हा अनुग्रह देत नसतो."

परंतु त्या ब्राह्मणानें त्यांचे पाय धरून मनस्वीच गळ घातली. तेव्हां तुकारामबावा म्हणाले:—

"तर तूं जा आणि त्यांचा अनुग्रह त्यांस परत देऊन ये. मग पाहूं." हें ऐकून तो ब्राह्मण समर्थांकडे जाऊन त्यानें सर्व वृत्तांत समर्थांस निवेदन केला आणि म्हणाला "आपला अनुग्रह परत घ्यावा." समर्थ हांसले आणि म्हणाले "ठीक आहे. तोंडांत पाण्याची चूळ घे आणि अनुग्रहाचा मंत्र म्हणून त्या पलीकडच्या खडकावर ती चूळ थूक आणि जा." ब्राह्मणानें त्याप्रमाणें करतांच त्या खडकावर त्रयोदशाक्षरी मंत्र उठला! आणि त्या ब्राह्मणाची वाचा बंद झाली! तेव्हां तो रडत रडत तुकारामबावांकडे गेला आणि खुणेनें वाचा गेल्याचें सांगितलें. तें ऐकून तुकारामांस फार वाईट वाटलें. ते म्हणाले "हा खुळ्या! हें तूं काय केलेंस?" असें म्हणून त्या ब्राह्मणावर दया करण्याकरितां तुकारामबावा त्या ब्राह्मणास घेऊन समर्थांच्या दर्शनाकरितां उंब्रजेस गेले. आणि तेथें त्या ब्राह्मणाविषयीं समर्थांपाशीं रदबदली केली. तेव्हां समर्थांनीं तीं अक्षरें त्यास चाटावयास सांगितलें. तीं चाटल्याबरोबर त्या ब्राह्मणास वाचा फुटली! तेव्हां तो ब्राह्मण कांहीं दिवस समर्थांपाशीं राहून मग घरीं गेला.

**पंढरपूरची यात्रा**—[शके १५७१ तील आषाढमासीं] प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें आषाढी एकादशीला पंढरीस जाण्याकरितां यात्रा निघाली. त्यांतील कांहीं मंडळींनीं समर्थांची प्रार्थना केली कीं, आपण एक वेळ पंढरीस चलावें. ह्यावर समर्थांचें एक ठरीव उत्तर असे कीं, तेथें आमचें उपास्य दैवत नाहीं. ह्याकरितां आम्ही येत नाहीं. पुढें पंढरीनाथांच्याच मनांत आलें कीं, समर्थांस एक वेळ पंढरपुरास आणावें. म्हणून ते ब्राह्मणाच्या रूपानें समर्थांस भेटले, आणि मोठा आग्रह करून म्हणाले कीं यंदां आपण पंढरीस चलावें. समर्थांनीं त्या ब्राम्हणाला नेहेमींचेंच उत्तर

दिलें कीं 'तेथें राम नाहीं.' त्यावर तो ब्राह्मण म्हणाला "आपण महाज्ञानी असून असें कसें म्हणतां? रामावेगळें स्थळ कोणतें?" हें उत्तर ऐकून समर्थ निरुत्तर झाले. आणि त्यांनीं मुकाट्यानें पंढरीस जाण्याची तयारी करून त्या ब्राम्हणाबरोबर पंढरपुरास गेले. त्यांचें अंतःकरण सर्व राममयच झालें असल्याकारणानें श्रीविठ्ठलाची मूर्ति तीच रामचंद्राची मूर्ति, व पंढरी तीच अयोध्या दिसूं लागली. तेव्हां त्यांनीं दोहोंचा साम्यतादर्शक अभंग करून म्हटला तोः--

## अभंग

**येथें उभा कां श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा ॥ १ ॥**
**काय केलें धनुष्यबाण। कर कटावरि ठेवुन ॥ २ ॥**
**काय केली सीताबाई। येथें राही रखुमाई ॥ ३ ॥**
**काय केलें वानरदळ। येथें जमविले गोपाळ ॥ ४ ॥**
**काय केली अयोध्यापुरी। येथें वसवीली पंढरी ॥ ५ ॥**
**काय केली शरयुगंगा। येथें वाहे चंद्रभागा ॥ ६ ॥**
**रामदासीं जैसा भाव। तैसा झाला पंढरिराव ॥ ७ ॥**

**'संत येति घरा। तोचि दिवाळी दसरा'**—ह्या तुकारामांच्या उक्तीप्रमाणें समर्थ पंढरीस आल्याबरोबर तेथील भक्तमंडळीनाही परम उल्हास आला. त्यांनीं नामदेवाच्या शेजारीं जयरामस्वामी रहात होते, तेथेंच त्यांस ठेवून घेतलें. पंढरीस असतां अंताजीपंत कुळकर्णी ह्या नांवाचे गृहस्थ शरण आले, त्यांस अनुग्रह दिला व गोपाळकाला झाल्यावर सर्व मंडळीचा निरोप घेतला. इतक्यांत जांबेकडील मंडळी आली होती तीही भेटली. त्यांस घराकडील सर्व खुशाली विचारून घेऊन मातोश्रीस व श्रेष्ठांस ओंवीबद्ध पत्र लिहून त्यांच्यापाशीं दिलें. नंतर मेथवाडास जाऊन अंतोबास सांगितलें कीं, आम्ही प्रत्येक वर्षीं न आलों तरी आमच्या वांटणीचा गोपाळकाला तुम्ही करीत जावा. तेथील गांवकऱ्यांनीं दरसाल ५० रुपये देण्याचें कबूल केलें. ह्याप्रमाणें पंढरीची यात्रा करून आषाढ वद्य ११ स समर्थ चाफळास परत आले.

घरीं पाठविलेंलें पत्र—समर्थ पंढरीस गेले असतां, तेथें जांबेकडील लोक आलेले त्यांस भेटले. व त्यांनीं त्यांच्या घराकडील क्षेम समाचार कळविल्याचें त्यांच्यापाशीं समर्थांनीं व ती० मातोश्रीस व श्रेष्ठांस पत्र लिहून दिल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. तें पत्र असें:—

## ॥ मातोश्रीस पत्र ॥

सकळ गुणांची निधी। निर्गुणाची कार्यसिद्धी॥
विवेकाची दृढबुद्धी। तुझेनि गुणें॥ १॥
तूं भवसिंधूचें तारूं। तूं भक्तांचा आधारू॥
तूं अनाथाचे अवसरू। वैष्णवी माया॥ २॥
तूं भावार्थाची जननी। तूं विरक्तास जीवनी॥
तूं परमार्थाची खाणी। भजनशीळ॥ ३॥
तूं सर्व सुखाची मूस। तूं रत्नांची मांदूस॥
तुझेनि चुकती सायास। संसारीचें॥ ४॥
तूं परमार्थाविषयीं अंगण। सद्गुरुदासांचें मंडण॥
समाधानाची खूण। अंतरीं वसे॥ ५॥
सत्संगासि सादर। भक्ति मार्गासि तत्पर॥
धूर्त कुशल अती सादर। परोपकारी॥ ६॥
श्री गुरुभजनीं तत्पर। स्वामी कृपा निरंतर॥
म्हणोनि शुद्ध क्रियेचा उद्धार। तुमचे ठायीं॥ ७॥
आत्म चर्चेसी मुगुटमणी। अत्यंत सादरता निरूपणीं॥
बोलती अमृतवाणी। मृदुवचनीं॥ ८॥
विवेक निधी केवळ। अंतरशुद्ध निर्मळ॥
ज्ञानदीप प्रबळ। तुमचे ठायीं॥ ९॥
क्रिया शुद्धी निर्मळ मन। निराभिमानी परम सज्जन॥
निरंतर अनुसंधान। अंतरीं वसे॥ १०॥
भावार्थाचें आगरू। प्रबळ शांतीचा सागरू।
पाहतां उपमे मेरू। तोही उणा॥ ११॥

**तुकारामाची वं शिवाजीची भेट**—शिवाजी महाराजांची व तुकारामबावांची पुण्यास ही एकवार भेट झाल्याबद्दल बखरींत उल्लेख आहे. ही भेट कधीं झाली ह्याची नक्की तारीख कोठें उपलब्ध नाहीं. तथापि त्यांची भेट झाली होती यांत शंका नाहीं. समर्थांची कीर्ति ज्याप्रमाणें महाराष्ट्रांत सर्वत्र पसरली होती, त्याप्रमाणेंच किंबहुना त्याहूनही अधिकच तुकारामबावांची कीर्ति चहूंकडे पसरलेली होती. ती शिवाजी महाराजांच्या कानावर गेली, तेव्हां त्यांचेंही दर्शन व्हावें असें मनांत आणून दिवटी, छत्री, घोडे, वगैरे सरंजाम देऊन राजेश्रीनीं तुकाराबावांस आणण्याकरतां कारकून पाठविला. पण तुकारामबावांनीं न येतां ' दिवट्या छत्री घोडे। हे तों बऱ्यांत न पडे ' ह्या सुप्रसिद्ध पत्रानें शिवाजीस उपदेश मात्र केला. ही निस्पृहता पाहून शिवाजीस तर त्यांच्या दर्शनाची फारच उत्कंठा लागून राहिली. त्यांच्या भेटीसाठीं त्यांनीं अनेक प्रयत्न चालू ठेवले होते. तों एके दिवशीं पुण्यास शितोळे देशमुखांच्या घरीं तुकारामबावांचें कीर्तन असल्याचें त्यांनीं ऐकलें. तेव्हां रात्रीच्या रात्रीं ते तेथें गेले, आणि कीर्तन झाल्यानंतर एकांतीं तुकारामबावांस विनंति केली कीं "आपल्या चरणाचें नित्य सान्निध्य घडावें अशी इच्छा आहे." हें ऐकून तुकारामबावा म्हणाले "समर्थ आणि आम्ही कांहीं दोन नाहीं. एकदां जेथें भक्ति ठेवली, तेथेंच निरंतर ठेवावी. ती चळूं देऊं नये, हेंच श्रेयस्कर आहे. लोकांनीं माझ्यापाशीं कांहीं विशेष ज्ञान आहे, म्हणून तुम्हांस सांगितलें असेल तर तें खरें नव्हे." ह्याप्रमाणें राजेश्रींची समजूत करून त्यांची रवानगी केली.

**परळीस राहण्याचा निश्चय**—एकदां समर्थांची स्वारी घळींत बसली असतां तेथें शिवाजी महाराज त्यांच्या दर्शनास गेले. त्या दिवशींच्या संभाषणांत शिवाजी महाराजांची मुख्य विनंती हीहोती कीं, समर्थांचें नित्य सान्निध्य असावें. ही त्यांची विनंती बहुधा नित्याचीच असें. पण समर्थ त्यावर निश्चयात्मक उत्तर असें कांहींच देत नसत. आजच्या विनंतीला मात्र त्यांनीं बहुतेक रुकारच दिल्या सारखें केले. त्यामुळें शिवाजी महाराजांस जरा अधिक उमेद आली. महाराजांनीं सांगितलें कीं, मी परळीच्या किल्ल्यावर राहण्याची उत्तम सोय करून देतों. ती

गोष्ट समर्थांनीं मान्य केली, आणि महाराजांबरोबरच मोठ्या स्वारीच्या थाटमाटानें समर्थ परळीस निघून गेले. पण तेथील मंदिर तयार झालेलें नव्हतें म्हणून ते ओवरींतच राहिले. नैर्ऋत्येस कडा थोडा होता म्हणून तो वाढविण्याचें काम राजेश्रींनीं सुरू केलें होतें. तें पाहून समर्थ म्हणाले " असा खर्च करण्याचें कारण नाहीं. त्या संरक्षणाचा बंदोबस्त आम्ही करतों. " असें म्हणून समर्थांनीं तेथें मारुतीची स्थापना केली. हा समर्थांचा विश्वास व निष्ठा हीं ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. ह्या मारुतीची प्रचीति आजपर्यंत पुष्कळ लोकांस आलेली आहे. महाराजांनीं तो किल्ला समर्थांच्या स्वाधीन करून सर्व प्रकारचा बंदोबस्त करून दिला. समर्थांनीं त्या किल्ल्याचें नांव 'सज्जनगड' असें ठेवलें. भोजनखर्चास जें साहित्य वगैरे लागेल तें पुरविण्यास कोंडोपंत कारकून यांस ठेविलें. चाफळच्या खर्चासाठीं चाफळ व आणखी दोन तीन खेड्यांचा वसूल नेमून देऊन तेथील सर्व कारभार नरसोमलनाथ यांजकडेसच सोंपविला. जिजोजी काटकर हवालदार यास बोलावून किल्ल्याच्या सर्व किल्ल्या त्याच्या स्वाधीन केल्या. सर्वांनीं समर्थांच्या आज्ञेंत वागण्याविषयीं सर्वांस ताकीद दिली. किल्ल्याखालच्या सर्व खेड्यांतून सर्वांनीं समर्थांच्या आज्ञेनुसार वागण्याविषयीं दवंडी पिटली !

अंगापुरच्या डोहांतून दोन मूर्ति आणल्या होत्या, त्यांपैकीं एक देवींची मूर्ति चाफळास तशीच शिल्लक राहिली होती, ती आणवून किल्ल्याच्या दरवाजाच्या दक्षिणेस तिची स्थापना करून तिचें नांव 'आंगलाई' असें ठेविलें. अशा प्रकारें परळीच्या किल्ल्यावर शके १५७२ विकृतिनाम संवत्सर कार्तिक मासांत समर्थांचें वास्तव्य सुरू झालें.

**छाटी पडली**—एके दिवशीं नित्याप्रमाणें समर्थांची स्वारी सायंकाळच्या समयीं कांहीं मंडळीबरोबर गोष्टी बोलत बसली असतां पश्चिमेचा वारा फार जोराचा सुटला होता. त्या योगानें स्वामींच्या अंगावरची छाटी होती ती उडून किल्ल्याच्या तटावरून खालीं पडली तेव्हां स्वामी मोठ्यानें म्हणाले " कल्याण ! छाटी तटाखालीं पडली. कीं रे ! " हें ऐकतांच कल्याणांनीं धाडकर तटाखालीं उडी टाकलेली पाहतांच सभोंवतालचे सारे लोक " मेला मेला कल्याण मेला ! " असें मोठ्यानें

ओरडले! त्यांस समर्थ म्हणाले " काय? कल्याणाला मरण! छे? नांव सुद्धा घेऊं नका. ज्याचें नांवच 'कल्याण' असें आहे त्याला मरण येणार कसें?" असें म्हणतात तों सर्व मंडळी तटाच्या कडेवर जाऊन पाहूं लागली. तों कल्याण छाटी घेऊन निघाले आणि किल्ल्याच्या दरवाजांतून येऊन ती समर्थांपुढें ठेवली व समर्थांस साष्टांग नमस्कार घातला. हा चमत्कार पाहून सर्व लोक म्हणाले " आज समर्थांच्या कृपेंकरूनच कल्याण वांचला खरा."

धन्य ते गुरु आणि धन्य ते शिष्य! शिष्याची भक्ति आणि गुरूचें सामर्थ्य हीं अगदीं तोडीस तोड होती, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं.

पण ह्या गोष्टीपुढें आणखी एक चमत्कार दृष्टीस पडतो तो हा कीं, ह्या गोष्टीच्या पुढें [ ही गोष्ट शके १५७१ मध्यें घडली ] असा बखरींत उल्लेख आहे. 'रामदासस्वामी यांचें चरित्र अथवा बखर.' गोगटे यांनीं सन १९१० मध्यें छापलेली आहे. तिच्यावरून समर्थ शके १५७२ मध्यें परळीस रहावयास गेले असें होतें. मग १५७१ त म्हणजे त्या पूर्वींच ही तटावरून उडी मारल्याची गोष्ट घडणार कशी? ह्यावरून ह्या गोष्टीच्या शकांत तरी चूक असली पाहिजे, किंवा परळीस रहावयास जाण्याच्या शकांत तरी चूक असली पाहिजे, हें उघड होतें. तात्पर्य, तुकाराम-बावांचें प्रयाण, समर्थांचें परळीवरील राहणें, आणि सज्जनांचा मेळा, ह्या तिहींच्या कालसंबंधानें एक दोन वर्षांचा घोटाळा आहे खरा. मग तो कसा निघेल, व तो कोण काढील तो खरा.

**सज्जनगडावरील सज्जनांचा मेळा**—साधुसंत, कथाकीर्तन, दानधर्म ह्यावर शिवाजी महाराजांची प्रथमपासूनच फार भक्ति होती, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. परळीच्या किल्ल्यावर एका सज्जनाची स्थापना करून त्याला ' सज्जनगड ' हें नांव दिलें ह्यावरून ती गोष्ट अधिकच स्पष्ट झाली. तथापि कृष्णातीरची सर्व साधुसंत मंडळी तेथें जमवून कथाकीर्तनांचा गजरच्या गजर करून सारा गड दुमदुमून सोडावा तेव्हांच ' सज्जनगड ' ह्या नामाची खरी खरी पूर्तता होईल. असें शिवाजी महाराजांच्या मनांत फार दिवस घोळत होतें. व ती गोष्ट समर्थांपाशीं काढण्याची संधी केव्हां येते ह्याची ते वाट पहात होते. तों इतक्यांत सज्जनगडावरील पहिलाच

श्रीरामनवमीचा उत्सव आला. ही संधी उत्तम आहे असें पाहून महाराजांनीं समर्थांपाशीं विनंति केली कीं, माझ्या मनांतून या उत्सवांत मुक्तद्वार ब्राह्मणभोजन घालावें, कृष्णातीरची सर्व संतमंडळी येथें जमवावींत व चार दिवस कथाकीर्तनें श्रवणीं पडावींत असें फार आहे. ह्यावर स्वामींची आज्ञा होईल त्याप्रमाणें करूं. " अशा गोष्टीला समर्थांचा नकार थोडाच येणार ? त्यांनीं तत्काल " फार उत्तम आहे. सर्व तयारी करा आणि कोणास आमंत्रणें वगैरे पाठवायाचीं तीं पाठवा." अशी आज्ञा केली. ह्यावर शिवाजी महाराज म्हणाले " बाकी सर्व मंडळी येतील. परंतु तुकारामबावा येण्याचें लक्षण दिसत नाहीं. कारण आम्ही पूर्वी कारकून पाठविला होता तो त्यांनीं परत पाठविला होता व आम्ही स्वतः दर्शनास जाऊन कांहीं द्रव्य पुढें ठेविलें, तेंही त्यांनीं घेतलें नाहीं. ह्यावरून त्यांची येण्याची आशा दिसत नाहीं." समर्थ म्हणाले " ठीकच आहे. संतांना द्रव्याशीं काय करावयाचें आहे ? ते कोणत्याच आशेनें यावयाचे नाहींत. परंतु सत्संग व भक्ति म्हटलें कीं येतील. आम्ही येथें आहों असें त्यांस कळवाल तर ते आल्याशिवाय राहणार नाहींत." हें भाषण ऐकून शिवाजीनें 'आज्ञा' म्हणून सर्व साधुसंतांस आमंत्रणें पाठविलीं. तुकारामबावांस आणण्यासाठीं मेणा व कारकून पाठविला. निरोप पोंचतांच तुकारामबावा निघाले. त्यांस मेण्यांत बसण्याविषयीं कारकुनानें हवा तितका आग्रह केला. परंतु ते मेण्यांत न बसतां पायांनींच चालत आले. त्यांच्याबरोबर त्यांचे चवदा शिष्यही आले होते. आमंत्रणाप्रमाणें निंबराज बावा पैठणकर, रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, वगैरे इतरही साधूसंतमंडळी येण्यास सुरुवात झालीच होती. तुकोबांनीं सज्जनगडावर जातांच समर्थांस साष्टांग दंडवत घातला, आणि:—

**देशावरासि आलों आतां । लाभ कोणता ह्याहुनी ॥ १ ॥**
**प्रेमचित्तीं आनंद झाला । जीव धाला दर्शनें ॥ २ ॥**
**भाग्यें झाली संतभेटी । आवड पोटीं दुणावे ॥ ३ ॥**
**तुका म्हणे श्रम केला । तितका आला फळासी ॥ ४ ॥**

हा अभंग म्हटला. समर्थांनीं तुकोबास उठवून प्रेमालिंगन दिलें. प्रातः-

काळीं स्नानसंध्यादि आन्हिक उरकल्यानंतर संतमंडळींची सभा जमल्यावर मग तो आनंदीआनंद काय विचारावा! ज्ञानचर्चा सुरू झाली, व भक्ति आणि प्रेमरस केवळ उचंबळून आला. समर्थांसही अनेकांनीं ज्ञानप्राप्तीचे अनेक प्रश्न विचारले व त्यांनींही त्यांचीं समर्पक अशीं उत्तरें दिलीं. दुसरीकडे ब्राह्मणभोजन चालू होतें. तें उरकल्यानंतर त्यांस एक एक रुपया दक्षणा व विडे वगैरे देऊन रवानगी केल्यानंतर समर्थांनीं सर्व संतमंडळीसह भोजन केलें. रात्रीं कीर्तनास प्रारंभ झाला. तेव्हां समर्थांनीं प्रथमतः शिवाजीमहाराजांसच उभे राहून कीर्तन करण्यास आज्ञा दिली. ती मान्य करून शिवाजी महाराज स्वतः कीर्तन करावयास उभे राहिले. 'प्रातःकाळ झाल्या राम आठवा' हा समर्थांचा अभंग व दुसरेही अभंग, पदें व श्लोक वगैरे गाऊन पायांत चाळ बांधून नृत्ययुक्त कीर्तन केलें. त्याचवेळीं राजेश्रींनीं ललितांत म्हणण्यासाठीं स्वतः एक पद तयार केलें, तें असें:—

### पद.

**हो महाराज गरीब नवाज ॥**
**अजि हो महाराज ठारीं बनबाज ॥ धृ० ॥**
**सेवक हो सेवा मंगो इतना साहेब काज ॥**
**बंद कमिन कही तूं साहेब तेरी लाज ॥**
**छत्रपति तुम शेखदार शिव रखे हमारी लाज ॥ १ ॥**

अद्यापही हें पद सज्जनगडावर ललितामध्यें म्हणण्याचा परिपाठ आहे. ह्यावरून त्या काळीं 'यथा राजा तथा प्रजा' ह्या म्हणीप्रमाणें शिवाजीमहाराजांसही हिंदुस्थानी भाषेचाच अधिक व्यासंग होता असें दिसतें. ही भाषा आणि शिवाजी महाराजांचा पोषाख ह्याचा विचार मनांत आला म्हणजे हल्लीं जसा बूट, पाटलोण, इत्यादि साहेबी थाट झालेला दिसतो, त्याप्रमाणें त्या काळींही सारा यावनी किंवा म्लेंच्छमय थाट झालेला होता असें दिसतें. असो.

शिवाजी महाराजांचें कीर्तन आटोपल्यानंतर वेणूबाई, आक्काबाई, शहापुरीणबाई इत्यादि आपल्या शिष्यणींकडूनही समर्थांनीं कीर्तनें करविलीं.

नंतर वामन पंडितही कीर्तनास उभे राहिले. ह्याप्रमाणें पहिल्या दिवसाचा समारंभ आटोपला. एका रात्रींत इतकीं कीर्तनें म्हणजे त्या कालची कीर्तनावरील लोकांची भक्ति किती होती ह्याचीच साक्ष होय. हल्लींच्या काळीं एका कीर्तनासच प्रारंभापासून शेवटपर्यंत लोकांस बसवत नाहीं, मग लागोपाठ पांच चार कीर्तनें ऐकावयाची गोष्ट कशाला ? ह्यावरून हल्लीं जशीं 'कीर्तनसंमलनें' होतात त्याच पद्धतीचा हा सज्जनांचा मेळा म्हणजे एक प्रकारचें कीर्तनसंमेलनच होय, असें म्हटलें तरी सुद्धां कांहीं वावगें होणार नाहीं.

दुसऱ्या दिवशीं पुन्हा तिसऱ्या प्रहरींच कीर्तनास सुरुवात झाली. ह्यावरून समर्थांच्या कालांत पुराण सांगण्याचें महात्म्यं फारसें होतेंसें दिसत नाहीं. नाहीं तर, दिवसाची तिसऱ्या प्रहरची उत्सवांतील वेळ बहुधा पुराणाची असते. परंतु ह्या उत्सवांत पुराण झाल्याचें वर्णन कोठेंच आढळत नाहीं.

निंबराजबुवा पैठणकर हे एकनाथ सांप्रदायी असत. त्यांनीं एकनाथांच्या अभंगावर कीर्तन केलें. तोंपर्यंत अस्तमान झाला, म्हणून संध्या वगैरे उरकल्यानंतर पुन्हा कीर्तनास सुरुवात झाली. त्यात प्रथम रंगनाथस्वामींचें कीर्तन झालें. नंतर जयरामस्वामी, त्यांच्या मागून समर्थांचे शिष्य कल्याण, परशुराम, उद्धव ह्यांनींही थोडें थोडें कीर्तन केलें. नंतर समर्थांनीं तुकारामबावांस पुढें रहावयास सांगितलें. तुकारामांनीं आपलें स्वरचित अभंग म्हणून कीर्तन केलें. तुकारामाचें कीर्तनाचा रंग काय सांगावा ? साक्षात् वेदवाणिच ती! तिला दुसरी उपमा कशाची ? सारा ईश्वरीप्रसाद व ईश्वरप्रेमाच भरलेला ! दरोबस्त श्रोत्यांचीं मनें ब्रम्हरसांत तल्लीन होऊन सारेच लोक तुकारामांबरोबर नाचूं लागले ! तिसऱ्या रात्रीं समर्थांचें कीर्तन झालें. तथापि समर्थांनीं तुकारामबुवांचें कीर्तन ऐकण्याची पुन्हा इच्छा दर्शविली. सर्व मंडळींच्या मनांत तेंच होतें. त्याप्रमाणें तुकारामबुवांचीं कीर्तनें सुरू झालीं. आणि त्यामुळे त्या समारंभाला विशेषच शोभा आली. दिवसा ब्राह्मणसंतर्पण व रात्रौ हरिकीर्तन याप्रमाणें एक महिनाभर सारखा समारंभ सुरूं होता. ब्राह्मणांची सव्वा लक्षाची भरती झाल्यावर समारंभ पुरा केला. ब्राह्मणांस दक्षणा वांटली.

शिवाजींनीं स्वहस्तानें संतोषपूर्वक चरण धुऊन त्यांची पूजा केली. सर्वांस वस्त्रें दिलीं. तुकारामांच्या पूजेसाठीं महाराजांनीं पुतळ्या व होन आणले. ही बातमी तुकाराममहाराज ह्यांस समजतांच ते न कळतांच तेथून निघून गेले ! हें श्रवण करून शिवाजी महाराजांस अत्यंत दुःख झालें व ते म्लानवदन करून समर्थांपाशीं येऊन म्हणाले " आमचा मनोरथ यथासांग शेवटास गेला नाहीं. तुकारामांस चार गांव इनाम करून देऊन सनदा लिहून ठेवल्या होत्या, व तेवढ्या त्यांस देण्याची इच्छा होती. " समर्थ हांसून म्हणाले " संतांना त्रैलोक्याचें राज्य सुद्धां तृणवत् आहे

**महासिद्धीसी हाणुनि लाता।**
**निष्कामें भजे पंढरीनाथा ॥ १ ॥**
**चारी मुक्ति ज्याच्या नावडती चित्ता।**
**तेथें ह्या प्राकृतां काय पाड ॥ २ ॥**

अशी त्यांची वृत्ति आहे. शिवबा ! तुम्ही उगाच येवढ्या भरीला पडलांत. त्यामुळें सर्वांस त्यांचें दर्शनही अंतरलें ! ! " तुकाराम गेल्यामुळें सर्वांसच वाईट वाटलें. इतकेंच नव्हे, तर साऱ्या समारंभाचा विरसच झाला म्हटलें तरी चालेल. तथापि त्यांची वृत्ति पाहून समर्थांस फार संतोष झाला.

हा संत मेळ्यांचा वृत्तांत जसा रसभरित आहे, तसाच तो अत्यंत संभाव्य आहे ह्यांतही कांहीं शंका नाहीं. परंतु त्यावर थोडासा कालातिक्रमाचा दोष येतो. तो असा कीं, तुकाराम महाराज सदेह वैकुंठास गेले ते १५७१ त गेले हें सर्वत्र प्रसिद्ध आहे. आणि हा ' संतमेळा ' शके १५७२ त झाल्याचें नमूद केलेलें आहे. समर्थ परळीवर रहावयास गेले तेही शके १५७२ तच गेले. तेव्हां ह्यांत एक वर्षाचें अंतर पडतें. ह्यास्तव हा संतमेळा चाफळच्या शके १५७१ च्या वार्षिक उत्सवांत तर झाला नसेल ना ? तसें झालें असल्यास मात्र ह्या सर्व गोष्टी संभवनीय व उक्त दिसतात. ' चाफळा ' च्या ठिकाणीं ' सज्जनगड ' चुकीनें पडणें हेंही स्वाभाविक आहे. परंतु हा सज्जनांचा मेळा मुळींच झाला नव्हता, किंवा तुकारामबोवा त्यांत नव्हते ह्या दोन्हीही गोष्टी मान्य करवत नाहींत.

किंवा तुकारामांचा गुप्त होण्याचा शक १५७१ नसून तो १५७२ ही असूं शकेल ! नसेलच कशावरून ? ह्यापैकीं कोणताही निर्णय पक्केपणीं आज सांगतां येत नाहीं. पण शके १५७१ त शिवाजी महाराजांस समर्थांनीं अनुग्रह दिल्यापासून त्या वर्षांत समर्थ, शिवाजी व तुकारामबावा ह्यांच्या अनेकवार गांठी पडून अनेक गोष्टी घडल्या आहेत ह्यांत मात्र अंदेशा नाहीं.

**दगडांतली बेडकी**—इतर साधूंमध्यें व रामदासस्वामींमध्यें महदंतर होतें. निस्पृहपणा व सत्त्वस्थपणा हे कोणत्याही साधुवर्यांमध्यें आढळणारे गुण त्यांच्या अंगीं होते ह्यांत कांहीं विशेष नाहीं; परंतु त्यांच्या अंगीं जो एक विशेष गुण होता तो हा कीं, ते अंतर्साक्ष असत. ह्यामुळें एखाद्याच्या मनांत एखादी विशेष अहंकाराची कल्पना आली कीं पुरे, ते तत्काल कांहींतरी मनास प्रत्यक्ष पटेल असा साक्षात्कार दाखवून तो त्यांच्या मनांतलि किंतु काढून टाकीत अशीं उदाहरणें समर्थांच्या लीलेमध्यें अनेक आहेत. खालीं दिलेलें बेडकीचें उदाहरण त्यापैकींच एक होय.

शिवाजी महाराजांच्या मागें राजकीय व्याप मनस्वीच होता. एक तर त्यांनीं परकीय व्याघ्रांच्या घशांत गेलेलें स्वराज्य उसपून काढण्याचें भयंकर जोखम पतकरलेलें असल्यानें त्यांच्यांशीं नेहमीं सामना देण्याची तयारी ठेवावी लागे. युक्तिप्रयुक्ति रचण्यांत डोकें खर्चीं घालावें लागे. शिवाय राज्याचा बंदोबस्त, किल्ल्यांची डागडुजी, अशीं कांहीं ना कांहीं त्यांच्या मागें महत्त्वाचीं कामें हीं असतच.

एकदां राजश्रींनीं कर्यात (जुने) प्रांत हुकेरी येथें सामनगड या नांवाचा किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. त्या किल्ल्यापुढें एक मारुतीचें अनादि स्थान होतें. त्या ठिकाणीं किल्ल्यावरून जातां येतां यावें म्हणून मार्ग तयार करविण्याकरितां प्रातःकाळींच महाराजांची स्वारी तेथें आली असून हजारों मनुष्यें काम करीत होतीं. त्या सर्वांस पाहून शिवाजी महाराजांच्या मनांत सहजीं थोडीशी अहंभावाची कल्पना आली कीं, इतक्या जीवांचें पालनपोषण माझ्या हातून होत आहे. अशी कल्पना मनांत घोळत असतांच ते तटावरून फिरत होते. ही राजेश्रींच्या मनांतील भावना अंतर्ज्ञानानें जाणून समर्थांच्या मनांत आलें कीं, ह्याबद्दल शिवाजीला

थोडासा प्रत्यक्ष चमत्कार दाखवावा, म्हणून ते त्या ठिकाणीं त्याचवेळीं एकदम प्रगट झाले. त्यांस पाहतांच शिवाजी महाराजांनीं नमस्कार केला व " येथें अकस्मात् कोठून येणें झालें ? " असा प्रश्न विचारला. समर्थ थोडेसें हांसून म्हणाले " शिवबा ! तुझा हा येवढा कारखाना चाललेला ऐकला, तेव्हां म्हटलें आपणही एकदां जाऊन पहावा. " हें ऐकून महाराजांसही मोठी धन्यता वाटली. ते म्हणाले " महाराज ! आज माझें व ह्या स्थळाचें दैवच उदयास आलें असें समजतों. " समर्थ म्हणाले " शिवबा ! येथें साक्षात् मारुतीच वास्तव्य करितात, तेव्हां ह्या स्थळाचें दैव सदासर्वदां उदितच आहे. आणखी तुम्ही हजारों जीवांचें पालन-पोषण करतां तेव्हां तुम्हीही श्रीमंतच आहां. " राजेश्री म्हणाले " हें सर्व आपल्या आशिर्वादाचें फल आहे. " ह्याप्रमाणें बोलत बोलत रस्त्याचें काम चाललें होतें तेथपर्यंत आले.

पहातात तों रस्त्याच्या मध्यभागीं एक मोठी थोरली धोंड असून ती मध्यंतरी तशीच ठेवून बाकीचा रस्ता साफ करण्याचें काम चाललें आहे. हें पाहून समर्थांनीं राजेश्रीस विचारलें कीं, " हा दगड मध्येंच ठेवून काम चालविलें आहे ह्याचें कारण काय ? " " सर्व रस्ता तयार झाल्यावर मग दगड फोडण्याचा विचार आहे. " समर्थ म्हणाले " छे छे ! हातासरसें काम करून टाकावें तें बरें; पुढें होत नाहीं. करितां तबलदार बोलावून दगड फोडवा. " महाराजांनीं लागलीच तबलदार बोलावले आणि दगड फोडण्यास सुरुवात केली. सुमारें अर्धा दगड फुटल्यानंतर समर्थ त्या तबलदारास बोलले कीं, " आतां धोंड्याच्या मध्यभागीं घाव न घालतां सभोंवार सर्व फोडावा." त्याप्रमाणें फोडल्यानंतर सुमारें नारळापेक्षां थोडासा मोठा असा गोटा शिलक राहिला. तेव्हां समर्थांनीं आज्ञा केली कीं " ह्याची मोठ्या युक्तीनें दोन शकलें करा. " तबलदारही मोठा कसबी मनुष्य होता. त्यानें एखादा नारळ फोडल्याप्रमाणें बरोबर दोन छकलें केलीं. तों त्याच्या मध्यभागीं उखळाप्रमाणें अर्धा तांब्या पाणी राहण्या-जोगी पोकळ जागा असून त्यांत पाणी व त्यामध्यें एक बेडकी असलेली-समर्थ, महाराज व इतर सर्वत्रांनीं पाहिली ! त्यासमयीं समर्थ म्हणाले

" शिवबा ! तूं खरोखरच फार योग्य आहेस. तुझी योग्यता फार मोठी. तुझी कृतीही फार आश्चर्यकारक. पहा ह्या दगडामध्यें खळगा करून त्यांत पाणी ठेवून बेंडकांचें सुद्धां तूं पोषण केलेंस ! हें इतराच्यानें होईल कीं काय ! " हे समर्थांचें शद्ब ऐकून राजश्रींनीं विनंति केली कीं, " महाराज ! अशी गोष्ट मजपासून कशी घडेल ? " समर्थ म्हणाले " बापा ! तुझ्याशिवाय ह्या जीवांचें पोषण करणारा कोण आहे ? " महाराज मनांत उमजले व प्रार्थना करून म्हणाले " मी अपराधी खरा. पारिपात्यास योग्य. परंतु स्वामी समर्थ व दीनवत्सल आहेत. याकरितां माझ्या अपराधाची क्षमा असावी. " समर्थ म्हणाले " बापा ! तुम्ही श्रींचे आवडते सेवक. म्हणून इतरांस तुमच्या हातें सरकार शेर देवावितात. असें असतां तुमच्या मनांत अहंभावाचा विकल्प आला तो योग्य नाहीं. त्याची निवृत्ति व्हावी म्हणून ताबडतोब तुमच्याकडे आलों. " राजश्री म्हणाले " मी पूर्ण अपराधी आहे. क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. " समर्थ म्हणाले " क्षमा करण्याकारितांच मी येथें आलों. आतां जातों. " असें म्हणून निघाले. तेव्हां महाराजांनीं विनंति केली कीं, " महाराज ! दोन प्रहरचा समय झालेला आहे. ह्याकारितां नैवेद्य करून नंतर जाण्याची तयारी होईल तर बरें. " समर्थांनीं " उत्तम आहे. " असें म्हणून सर्व मंडळी सहवर्तमान मारुतीपाशीं आले.

नंतर स्वयंपाकाची सिद्धी होईपर्यंत समर्थांचें स्नानसंध्यादि आन्हिक आटोपून मारुतीची पूजा नैवेद्य होऊन राजेश्रीसहवर्तमान भोजन झालें. भोजनोत्तर शिवरायांनीं विनंति केली कीं, " किल्ल्यावर येऊन किल्ला पाहवा. " समर्थांनीं ' उत्तम आहे.' असें म्हणून राजश्रीबरोबर समर्थही तटावर गेले. तेव्हां कोठें कसें काय करावें तें समर्थांनीं महाराजांस सांगितलें. नंतर समर्थ राजश्रींस म्हणाले " तुम्ही आजपर्यंत किल्ले इमारती वगैरे बांधल्या आहेत; व पुढेंही बांधालच; परंतु कारखान्यांत सामान कसें असावें, कारखाना कसा करावा, ह्याविषयीं तुम्हास सांगतों. त्याप्रमाणें सामान वगैरे तुम्हास बरें दिसल्यास करावें. " असें सांगून एक समास सुरू केला. तो असाः—

## इमारती प्रकरण.

॥ ओंव्या. ॥

ऐका विटांचा प्रसंग ॥ लांबी रुंदी यथासांग ॥
चौक नेमस्त व्यंग ॥ असोंचि नये ॥ १ ॥
विट लांबी नऊ तसूं ॥ आणि रुंदी सात तसूं ॥
उंचि जाणिजे तीन तसूं ॥ पोट पाट नेमस्त ॥ २ ॥
खालीं बरड वरी खळगा ॥ तो विट कामा नये गा ॥
धारे कोरेपाशीं दगा ॥ कामा नये ॥ ३ ॥
भूमिपासूनी नीट करावी ॥ कलबुनाची कळाशी धरावी ॥
आंत पावेतों नेमस्त भरावी ॥ खिळे मारूनी ॥ ४ ॥
कडे खापरी कामा नये ॥ थोडें कमावणें कामा नये ॥
थोडी लीद कामा नये ॥ आणि बहुत ॥ ५ ॥
राख कोंडा बळग्यादाणे ॥ घालूं नये दैन्यवाणें ॥
अथवा कांहीं अधिक उणें ॥ करूंचि नये ॥ ६ ॥
घट्ट चिखल कामा नये ॥ पातळ तरी असूं नये ॥
दडपितां कळाशी वाहूं नये ॥ ना थर बुजे ॥ ७ ॥
खणखणीत वाळवाव्या ॥ झणझणीत भाजाव्या ॥
भट्या नेमस्त कराव्या ॥ आणि दरी ॥ ८ ॥
ओलें सरपण कामा नये ॥ कावळकाठ्या कामा नये ॥
मोठे ढोण कामा नये ॥ नेमस्त असावे ॥ ९ ॥
जाळ घालावा नेमस्त ॥ उमास करूं नये व्यस्त ॥
ठाव असावा प्रशस्त ॥ समान भूमी ॥ १० ॥
पूजाविधी चुकों नेदावी ॥ भट्टी बरी निऊं द्यावी ॥
विट हळू उतरावी ॥ टाकूं नये ॥ ११ ॥
पहिले पासून शेवटवरी ॥ अंतःकरण बरें विवरीं ॥
आळस करील तो वैरी ॥ कामा नये ॥ १२ ॥

कामकर्त्यांस गमूं देऊं नये ॥ काम घेतां त्रासूं नये ॥
कठीण शद्ब बोलूं नये ॥ क्षणक्षणा ॥ १३ ॥
दिवस उगवल्यावरी येऊं देऊं नये॥गमित माणूस कामा नये॥
अशक्त पोर कामा नये ॥ आणि ह्मातारे ॥ १४ ॥
बळकट लोक निवडावे ॥ काम पाहूनि लावावे ॥
सगट मुशारे करावे ॥ हें मूर्खपण ॥ १५ ॥
जेवणापुरते बसों द्यावे ॥ सर्वांचि कामास लावावे ॥
दिवसा धारे सांभाळावे ॥ क्षणक्षणा ॥ १६ ॥
वेळ गमूंचि नेदावा ॥ खोटा रुका बदलून द्यावा ॥
मुशारा रेउचिने द्यावा ॥ तमक खोटा ॥ १७ ॥
हिशेब बरा राखित जावा ॥ लिहिण्याचा आळस नसावा ॥
मुबदला करीत जावा ॥ उपसामुग्री ॥ १८ ॥
खिळे कुऱ्हाडी पायळ्या ॥ पाहरा संबळ कुदळ्या ॥
सन फावडे लेसरळ्या ॥ तरफा असाव्या ॥ १९ ॥
नाडे सोल काथे दोर ॥ कोढवण कळके ढोलर ॥
उथळ्या चाळण्या डाळ्या थोर॥तक्ते बळकट काथवटी ।२०।
मांदणे डेरे घागरी ॥ रांझण गाडगीं भारी ॥
पाळी बहुतां परोपरी ॥ दांडे असावे ॥ २१ ॥
धोंडे गुंडे चिपा चिपरे ॥ खरुस चुना वाळू कंकरे ॥
पाटे वरवंटे बरे ॥ कामगार असावे ॥ २२ ॥
पोशिंदे असावे सावधान ॥ हुन्नर बंदी तुफान ॥
दोघांचें एक चित्त मन ॥ कामा नये ॥ २३ ॥
तिकस्या सूत्रें वळवे ॥ काम पाहुनियां मनुष्य ओवें ॥
तरी मग इमारती खबडंगे ॥ उभे राहती ॥ २४ ॥

अशा प्रकारचा उपदेश करून समर्थ उठले. तेव्हां राजश्रींनीं विनंति केली कीं, "ह्या ठिकाणीं आपलें येणें कधीं झालेलें नाहीं. ह्यास्तव येथें त्रिरात्र वस्ती करून श्रीमारुतीची समाराधना करून नंतर जाण्याचें

करावें. आणखी कारखान्यासंबंधानें जो उपदेश केला, तोही मनांत ठसण्यासारखा पूर्णपणें करण्याची कृपा व्हावी." तेव्हां समर्थांनीं 'उत्तम आहे' असें म्हणून इमारती तयार करण्याविषयीं आणखी एक समास सांगितला तो असाः—

## ॥ स्फुट समास ॥

### ॥ ओंव्या ॥

यादी इमारती कारणें ॥ काय काय लागे करणें ॥
श्रोतीं अवधान देणें ॥ ह्मणे वक्ता ॥ १ ॥

द्रव्य पारपत्य खबरदारी ॥ सत्ता सामर्थ्य वेठ वेगारी ॥
गवंडी पाथरवट लोणारी ॥ बेलदार कोळी ॥ २ ॥

लोहार सुतार कुंभार ॥ कामगार लहान थोर ॥
मांग महार चांभार ॥ नाना याती ॥ ३ ॥

घन कुदळी संभळ ॥ कुराळीं पारा गुद्री गोल ॥
टाक्या हातोडे लोळ ॥ लोहपोलादाचे ॥ ४ ॥

विळे पायळे कुराडी ॥ खुरपीं थाप्या धावा येडी ॥
खिळे हलखे गांधे गाडी ॥ खोरें सनभापावडीं ॥ ५ ॥

तर्फा दांडे मुंगळ्या नाटा ॥ चोपणी बडवणी धुमसखाटा ॥
चाळण्या पाट्या बंधली साठा ॥ नाना प्रकारींचे ॥ ६ ॥

सर कोडके कळक चिवे ॥ फळ्या चांफ चौफळे व्हावे ॥
चवरंग चवक्या पाट करावे ॥ नाना गिलावयाचे ॥ ७ ॥

जाती शिळा वाटणी ॥ चाटु डंगारणी घांटणी ॥
तस्ते पाळी लाटणीं ॥ कलक मापें तराजु ॥ ८ ॥

कोळसे भट्टया लांकडें ॥ शिरटी फेस झाडेंझुडें ॥
नाना इमारतीचें सांकडें ॥ करतां जाणे ॥ ९ ॥

चुना चिरे वाळु कंकरे ॥ पारड्या चिपा लहान थोरे ॥
धोंडे गुंडे मार्ता नीरें ॥ रांजण डेरे घागरी ॥ १० ॥

मडकीं कुंडालीं गाडगें ॥ परळ वेळण्या मांदन मोघे ॥
विटा चुना खरुस लागे ॥ झेल इमारतीशीं ॥ ११ ॥

गूळ कात हिरडे तागा ॥ उडीद नाचण्या डीक यागा ॥
वजन हिशेबें यथासांग ॥ केलें पाहिजे ॥ १२ ॥

तिळ राळे आणि भात ॥ चिकणा माती आरक्त ॥
राख लीद बळग्या मिश्रित ॥ कमाऊन विटा कराव्या ॥१३॥

तिकोन्या चौकोन्या लहान थोर ॥ भाजून भिजवून सुंदर ॥
तिकया ओळंबे धरून सूत्र ॥ इमारती कराव्या ॥ १४ ॥

चौकट्या मेहेरपा ताकबंदी ॥ विटेबंदी चिरेबंदी ॥
लोहबंदी शिसेबंदी ॥ नीट नेमस्त उभार ॥ १५ ॥

काचबंदी पाचबंदी ॥ नाना रत्नें सुवर्ण बंदी ॥
नाना दर्पणें विचित्र बंदी ॥ नाना चित्र लेख ॥ १६ ॥

तोंड रचाया बळ कूसरी ॥ चित्र विचित्र वोवरीं ॥
कमळें पानें परोपरी ॥ एकाहुनि एक ॥ १७ ॥

कलबुद लादण्या बळकट ॥ जालंदरें झरोके सोनवट ॥
घोट घोटोनी लखलखाट ॥ सुरु सनाबदाचे ॥ १८ ॥

धाबे देउळें शिखरें ॥ उंच गोपूर मनोहरें ॥
वापी पोखरणी सरोवरें ॥ हमामें स्थान कारंजीं ॥ १९ ॥

गड कोट महाल मळ्या ॥ गुप्त द्वारें अंतर शिड्या ॥
छज्या लादण्याच्या तवकड्या ॥ नाना भुयारीं विवरें ॥२०॥

धनधान्य रसखाने ॥ दारुखाने जामदारखाने ॥
नाना अठरा कारखाने ॥ घुमट मशीदी मनोहरे ॥ २१ ॥

चित्रशाळा नाटकशाळा ॥ भोजनशाळा होमशाळा ॥
पाठशाळा धर्मशाळा ॥ नाना इमारती ॥ २२ ॥

वाटे चौथरे वृंदावनें ॥ कुंचे दारवटे भुवनें ॥
नानाप्रकारचीं स्थानें ॥ चांदया गडकोट भडकलो ॥ २३ ॥

**धरणें साकु कालवे ॥ नदी तीरीं पंथ बांधावे ॥**
**दीपमाळा चौक बांधावे ॥ हुडे खानगे भदालसा ॥ २४ ॥**
**गळ्या गुंफा कपाटें लेणीं ॥ देव दैत्य मानव करणी ॥**
**समाधी माझारी धरणी ॥ कोणें पाहिली ॥ २५ ॥**

**॥ इति इमारतीप्रकरण स्फुट समास द्वितीयः समाप्तः ॥**

ह्याप्रमाणें कारखान्याच्या संबंधानें आज्ञा झाली. ती श्रवण करून राजेश्रींनीं विनंति केली कीं, "स्वामी सर्वज्ञ आहेत. सारा मजकूर समर्थांस विदितच आहे. आज्ञा झाली त्याप्रमाणें घडणें असेल तें आपल्या आशिर्वादेंकरून घडेल आणि स्वामी करवितील तितकें करीत आहे." असें म्हणून साष्टांग नमस्कार घातला. समर्थांची स्नानसंध्या होऊन भोजनें झालीं. नंतर तेथें लिराल मुक्काम करून श्रीमारुतीची समाराधना करून महाराजांचा निरोप घेऊन समर्थ सज्जनगडीं निघून गेले.

श्रेष्ठांचें पत्र—एकदां समर्थांची स्वारी चाफळास असतां जांबेहून श्रेष्ठांचें एक पत्र घेऊन एक शिष्य मुद्दाम समाचाराकरतां आला. त्यानें समर्थांस नमस्कार करून श्रेष्ठांचें पत्र समर्थांच्या हातांत दिलें. तें पत्र असें—

## ॥ ओंव्या ॥

**चिरंजीव पदवी पावला ॥ त्यास लोक ह्मणती भला ॥**
**चिरंजीव तो झाला ॥ निश्चळरूप ॥ १ ॥**
**निर्गुणीं जो अनन्य ॥ तेंचि चिरंजीव पद जाण ॥**
**निश्चळीं निश्चळपण ॥ त्या नांव चिरंजीव ॥ २ ॥**
**आत्मानिवेदना जो मान्य ॥ त्यासीं ह्मणावें धन्य ॥**
**धन्य परते मान्य ॥ आणिक नाहीं ॥ १३ ॥**
**ऐसा जो तोचि नायक ॥ नायक तोचि चाळक ॥**
**चाळक तोचिं ब्रह्मादिक ॥ निर्माण कर्ता ॥ ४ ॥**
**ऐसा जो निर्वाणीचा धणी ॥ तो जाणा कौसल्येचे अंगणीं ॥**
**त्यांतें स्मरे जो मनीं ॥ तो धन्य जाणा ॥ ५ ॥**

**तो राम जानकी नाहो ॥ त्याचे चरणीं चित्त राहो ॥**
**तूं-मीपण तेथें जावो ॥ जाण बापा ॥ ६ ॥**
**गंगातिरीं जो जन्मला ॥ तोचि कृष्णातीरा गेला ॥**
**तेथें प्रताप प्रगटला ॥ तो धन्य साधु ॥ ७ ॥**

यापमाणें श्रेष्ठांचें आलेलें पत्र वाचून पत्ररूप श्रेष्ठांचें दर्शन झालें असें मानून त्या पत्रास साष्टांग नमस्कार केला, आणि सनाथ झालों म्हणून मातोश्रींसही साष्टांग नमस्कार घालून जो शिष्य आला होता त्याचे मुखें घराकडील सविस्तर वर्तमान श्रवण करून संतोष पावले. आणि त्याजला पंधरा दिवस जवळ ठेवून घेतलें. नंतर तो जाऊं लागला त्यावेळीं त्यास पत्राचें उत्तर देऊन निरोप दिला. तें श्रेष्ठांचें पत्रः—

## ॥ ओंव्या ॥

**सकळ तीर्थांचे सार ॥ सत्य स्वरूप निर्विकार ॥**
**तुमचें चित्त तदाकार ॥ निरंतर ॥ १ ॥**
**विमळ ब्रह्म परायण ॥ सगुण भक्तिसंरक्षण ॥**
**विशेष वैराग्य लक्षण ॥ तुमचे ठायीं ॥ २ ॥**
**मुक्त क्रियेचा अनादरु ॥ स्वधर्म कर्मी अत्यादरु ॥**
**आग्रह निग्रहाचा विचारु ॥ तोही नसे ॥ ३ ॥**
**नसे कामनेचा लेश ॥ जयंत्या पर्वाचा हव्यास ॥**
**अंतरीं माने विशेष ॥ हरिकथा निरूपण ॥ ४ ॥**
**तुमचे देह सार्थकाचे ॥ सर्वदां परोपकाराचे ॥**
**भगवंतें निर्मिले बहुतांचे ॥ समाधान ॥ ५ ॥**
**तुमचेनि वाग्विलासें ॥ बहु पाखंड नासे ॥**
**संशयातीत प्रकाशें ॥ विमळ वस्तु ॥ ६ ॥**
**सन्मार्गीचा कैपक्षी ॥ अनमार्ग करणें अलक्षी ॥**
**लोक पावती प्रत्यक्ष ॥ समाधान ॥ ७ ॥**
**दक्षता आणि चातुर्यता ॥ वित्पन्नता आणि लीनता ॥**
**उत्तम गुण सर्वज्ञता ॥ तुमचे ठायीं ॥ ८ ॥**

**तुमचें स्वरूप वर्णवेना ॥ ह्मणोनि देहाची वर्णना ॥**
**युक्त अयुक्त मित्र जना ॥ क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥**

याप्रमाणें श्रेष्ठांस पत्र व मातोश्रींस साष्टांग नमस्कार सांगून शिष्यास पाठविला.

**गोमांतकी आंबे**—आद्य शंकराचार्यांच्या अंगीं ज्याप्रमाणें अंतरिक्ष गमन करण्याचें सामर्थ्य होतें, त्याप्रमाणें समर्थांच्या अंगींही अंतरिक्ष गमन करण्याचें सामर्थ्य होतें; अशाबद्दल अनेक गोष्टी बखरींतून लिहिलेल्या आहेत. त्यांपैकींच ही एक गोष्ट आहे. कोणे एके दिवशीं कोणा एका गृहस्थाकडून शिवाजी महाराजांकडे 'गोमांतकी आंबे' नजर आले होते. हल्लीं हापूस, पायरी, कलमी वगैरे आंबे सवंग सुकाळाचे झाले आहेत. तसा प्रकार त्यावेळीं नव्हता. त्यावेळीं कलमी आंबे लावण्याची व स्वादिष्ट आंबे उत्पन्न करण्याची तऱ्हा महाराष्ट्रांत नुकतीच प्रचारांत येऊं लागली होती. ती प्रथमतः गोमांतकांत पोर्तुगीज लोकांनीं सुरूं केली. 'फर्नांडिस' हा गोमांतकांतील पहिला नामांकित आंबा होय. गोमांतक म्हणजे गोवें प्रांत. हा पहिल्यापासून पोर्तुगीज लोकांच्या अमलाखालीं आहे हें सर्वप्रसिद्धच आहे.

रात्रीं शिवाजी महाराज रायगडीं एकांतांत बसले असतां, जेष्ठ पत्नी सईबाई, दुसरी सोयराबाई आणि तिसरी सगुणाबाई अशा तिन्ही राण्या जवळ येऊन त्यांनीं हीं गोमांतकचीं फळें आणून चांदीच्या ताटांत ठेवलीं, व एक एक सोलून त्याच्या पाकळ्या करून त्या ताटांत भरीत होत्या. तीं फळें अत्यंत सुंदर, रंग केवळ मनोहर, असें पाहून महाराजांच्या मनांत लागलीच कल्पना आली कीं, असलीं अमृतफलें भक्षण करावयास श्रीसमर्थांची स्वारी असती तर किती उत्तम झालें असतें? पण तीं त्यांस वेळेवर पोंचतीं होतात कशीं? ह्या विचारांत ते पडले आहेत, तोंच कोणी दारावर धक्का दिला, म्हणून दार उघडून पाहतात तों समर्थांची स्वारी पुढें उभी! त्यांस पाहतांच शिवाजी महाराजांना अत्यानंद झाला. त्यांनीं त्यांस नमस्कार करून आंत आसनावर नेऊन बसविलें, व अर्घ्यपाद्यादि पूजा वगैरे करून अमृतफलांचा नैवेद्य मोठ्या प्रेमानें समर्पण केला.

स्वामींनीं तीं फळें खाल्लीं व शेषप्रसाद राजेश्रींनींही राण्यांसहवर्तमन भक्षण केला.

नंतर तांबूल वगैरे भक्षण करून क्षणभर थोडेंसें क्षेम कुशल भाषण झाल्यानंतर समर्थ जावयास निघाले. तेव्हां राजश्रींनीं विनंति केली कीं, "इतक्या रात्रीं येथें कसें येणें झालें? आणि आतां अशा रात्रीं स्वारी जाणार तरी कशी?" समर्थ दाराबाहेर पडून म्हणाले "या शिवबा! आम्ही कसें आलों व कसें जाणार तें तुम्हांस दाखवितों." असें म्हणून राजश्रींचा हात धरून ते किल्ल्याच्या तटावर गेले. आणि चटकर एक पाय खालीं व एक पाय वर करून "असा आलों व असाच जातों," असें म्हणून अंतरिक्षांतून पार निघून गेले. राजश्री आश्चर्यचकित होऊन आपल्या शयनागरांत गेले व समर्थांचें अद्भुत चरित्र सर्व राण्यांस सांगून मग हळुहळु निद्रावश झाले.

**समर्थांचा कित्ता**—समर्थांचा उपदेश परमार्थिक विषयांत जसा सांगोपांग असे, तसा व्यावहारिक विषयांतही त्यांचा उपदेश सांगोपांग असे. अमुक एक विषय म्हणजे त्यांच्या उपदेशांत आला नाहीं असें नाहीं. प्रत्येक विषय समजावून देण्याची त्यांची शैली अपूर्व होती. पुस्तक लिहावें कसें, अक्षर काढावें कसें, शाई कशी करावी, सामान काय काय असावें इत्यादि विषयानें दशक १९ समास पहिला संपूर्ण भरलेला आहे. समर्थ 'दासबोध' व इतर कविता ज्या ज्या म्हणून करीत, त्या त्या सर्व कल्याणस्वामी लिहीत असत.

एके दिवशीं समर्थांची स्वारी रामघळींत असतां कल्याणस्वामींनीं दासबोधाचा लिहून आणलेला कांहीं भाग दाखविला. तो पाहून समर्थ म्हणाले "कल्याणा! ग्रंथाचें अक्षर ह्याहीपेक्षां चांगलें पाहिजे बुवा!" कल्याणस्वामींनीं हात जोडून विनंति केली, "स्वामींनीं कृपा करून कित्ता घालून दिल्यास त्याप्रमाणें अक्षर वळविण्याची खटपट करीन आणि मग ग्रंथ लिहीन." समर्थांनीं लागलीच घळींत हात घातला आणि तींतून एक कित्ता बाहेर काढून तो कल्याणांच्या हातांत दिला. ह्याच कित्त्यावरून अक्षर वळवून पुढें त्याच वळणावर कल्याणस्वामींनीं सारे ग्रंथ लिहिले. 'हा कित्ता एका भूर्ज पत्रावर असून तो सोन्याच्या शाईनें लिहिलेला आहे! तो

लहान मुलानेंही वाचावा असा संस्कृत व प्राकृत आहे. अक्षरें जुळवून वाचलीं असतां अर्थबोध होतो व अक्षर बालबोध आहे.' असा एका हस्तलिखित बखरीमध्यें उल्लेख आहे. त्यांतील भाषेला देववाणी म्हणतात. त्यांतील अर्थ समर्थांस समजत असे. हा कित्ता डोंभगांवच्या मठांत कल्याणस्वामींनीं लिहिलेल्या हस्तलिखित प्रतींत आहे. [ ह्यावरून हा कित्ता समर्थांच्या हातचा नव्हे हें तर उघड दिसतें. मग तो कोणाच्या हातचा असावा ? ]

**तीन मागण्या**—[ शके १५७३ ] एके दिवशीं राजश्रींची स्वारी नित्याप्रमाणें समर्थांच्या दर्शनास आली असतां भाषणाचा उपक्रम काढला तो असा :—

**शिवाजी**—महाराज ! मी वारंवार सेवा घेण्याविषयीं विनंति करीत असतां कांहींच आज्ञा होत नाहीं. तस्मात् हें राज्य स्वामींचें नव्हें कीं मी सेवा करण्यास अनधिकारी आहे म्हणून आज्ञा होत नाहीं ?

**समर्थ**—हे पहा शिवबा ! तुम्ही हल्लीं जो राज्य आक्रमण करण्याचा व्यवहार चालविला आहे, त्यांत म्लेंच्छांचें निवारण होतें; देवब्राह्मणांची सेवा घडते आणि धर्माची स्थापना होते ही सेवा आमचीच नव्हे काय ? हें कृत्य तुमच्याकडून कोण करवितों ह्याचा विचार करून मग तरी बोला.

**शिवाजी**—आज्ञा होत आहे ही तर खरीच आहे त्यांत कांहीं अन्यथा नाहीं. ही सर्व सेवा आज्ञेवरूनच मी करीत आहे. परंतु श्रींच्या सान्निध्याला कांहींतरी सेवा व्हावी अशी आज्ञा झाली पाहिजे.

**समर्थ**—[ किंचित् हास्य करून ] परंतु आम्ही जें मागूं तें तुम्ही द्याल असा तुमच्या मनाचा निश्चय आहे काय ?

**शिवाजी**—[ हात जोडून ] हा देह स्वामींचा आहे. सर्व ऐश्वर्य, राज्यादिक सर्व स्वामींचेंच आहे असें असून कसोटीस लावण्यासारखी विचारणा होत आहे. पण कसोटीस लावून घेण्याइतकी माझी योग्यता नाहीं. याकरितां स्वामींनीं सेवा घेतलीच पाहिजे.

**समर्थ**—बापा ! फार उत्तम आहे. आम्ही तीन वस्तु मागतों त्या द्या.

**शिवाजी**—जी आज्ञा होईल त्या प्रमाणें मी देण्यास तयार आहे.

**समर्थ**—आमची पहिली मागणी ही:—

( १ ) **पहिलें;** तुम्ही पूर्वापार सांबभक्त आहां, त्या योगेंकरून तुम्हास हें ऐश्वर्य प्राप्त झालें. ह्याकरितां आतांही प्रति श्रावणमासीं तुम्ही आराधना करीत आहांच परंतु यापुढें कोटि पार्थिव लिंगें करवीत जावींत आणि त्याबद्दल ब्राह्मणभोजनादि करवीत जाणें हें एक.

( २ ) **दुसरें;** तुमचें राज्यांत ब्राह्मणांस नेमणुकी दक्षणा मिळत असते ती दरसाल श्रावणमासीं होत असावी हें दुसरें.

( ३ ) **तिसरें** तुमचें राज्य हिंदूंचें, असें असतां म्लेंच्छांप्रमाणें एकमेकांस 'जोहार' करणें हें धर्मविरुद्ध आहे. याकरितां हिंदूंनीं एकमेकांस 'राम राम' ह्मणावें व कागदोपत्रांतहि परस्पर 'रामराम' लिहीत जावें. यापुढें अंत्यजविरहित कोणत्याही हिंदूंनीं 'जोहार' म्हणूं नये हें तिसरें.

ह्या तीन गोष्टी आम्हास द्याव्या व त्याबद्दल बंदोबस्त करावा.

**शिवाजी**—[ नम्रपणानें ] महाराज! आज्ञेप्रमाणें सांगितलेल्या गोष्टींचा बंदोबस्त करतोंच. परंतु ह्या व्यतिरिक्त श्रीसान्निध्यसेवा होण्याची आज्ञा झाली पाहिजे.

**समर्थ**—ह्या तीन गोष्टींचा बंदोबस्त झाल्यानंतर जी आज्ञा करणें ती करूं.

हें ऐकून 'उत्तम आहे' असें म्हणून शिवाजीमहाराज समर्थांपाशीं त्रिरात्र राहून आज्ञा घेऊन गेले. नंतर राजेश्रींनीं समर्थांच्या आज्ञेप्रमाणें त्याच वर्षांतील श्रावणमासीं कोटिलिंगें करविलीं, व ब्राम्हणांस दक्षणा देण्याचाही क्रम सुरूं केला. तो असाः—

**दशग्रंथी ब्राम्हणांस**—नक्त रु० १० व दहा मण धान्य.

**पंचग्रंथी ब्राम्हणांस**—नक्त रु० ५ व पांच मण धान्य.

ह्याप्रमाणें ब्राह्मणांची परीक्षा घेऊन दक्षणा देऊं लागले. हा दक्षणा देण्याचा क्रम प्रथमतः रायगडास सुरूं केला. पुढें जसजशी दौलत वाढत चालली तसतशी दक्षणाही वाढली, व तेणेंकरून वेदविद्येचीही चलती होऊं लागली. त्याचप्रमाणें आपल्या पदरचे सरदार लोक वगैरे यांस समजूत देऊन सर्वांनीं एकमेकांस रामराम म्हणत जावें व लिहीत जावें, अशी ताकीद दिली आणि तेव्हांपासूनच मराठे मंडळींत रामराम म्हणण्याचा व लिहिण्याचा प्रघात सुरू झाला व तोच अद्याप चालत आहे.

**भोळाराम**—[ शके १५७३ ] समर्थांचा शिष्य सांप्रदाय म्हणजे एक भगव्या रंगाची पलटणच होती म्हटलें तरी चालेल. ह्यापैकी पट्टशिष्य म्हणून जे होते तेच मुळीं बाहत्तर होते ह्यावरून बाकीचे अलतूफालतू किती असतील ह्याची कल्पना करावी. तेव्हां अशा समुदायांत 'व्यक्ति तितक्या प्रकृति, ह्या असावयाच्याच. त्याप्रमाणें निरनिराळ्या स्वभावाचे लोक होते. एक औरंगाबादेकडचा मनुष्य ह्या शिष्यशाखेंत होता. हा समर्थांची एक सेवा बिनचूक करीत असे. ती कोणती ? तर समर्थांस वेळच्या वेळीं विडा कुटून द्यावयाचा. समर्थांना विडा खाण्याचा मनस्वी नाद असे. तरी रात्र असो; दिवस असो; केव्हांही समर्थांच्या विड्याची तयारी तो अगदीं जय्यत ठेवी, म्हणून समर्थ नेहेमीं विडा मागावयाचा झाला कीं ह्याच मनुष्यापाशीं मागत.

एकदां समर्थांना कफाची फार व्यथा जडली. म्हणून ते जवळ पिकदाणी बाळगूं लागले. एकदां थुंकतां थुंकतां कफानें ती पिकदाणी अगदीं भरून गेली, हें पाहून समर्थ त्या विडा देणाऱ्या शिष्यास म्हणाले " अरे ! जा; ही पिकदाणी नेऊन जेथें कोणी मनुष्य वगैरे नसेल अशा ठिकाणीं ओतून टाक आणि धुऊन घेऊन ये !" समर्थांच्या आज्ञेप्रमाणें तो गेला व त्यानें ती धुऊन आणून समर्थांपुढें ठेविली. तेव्हां समर्थांनीं त्यास विचारिलें कीं " कायरे ! पिकदाणी कोठें ओतलीस ? मनुष्यें जाण्यायेण्याच्या वाटेवर तर नाहींना कोठें ओतलीस ? " तो म्हणाला नाहीं; मी चहूंकडे हिंडलों परंतु जिकडे जावें तिकडे माणसें ! निर्मनुष्य स्थळ कोठेंच दृष्टीस पडेना. म्हणून ती पिकदाणी मीं स्वतःच पिऊन टाकली ! आणि धुऊन घेऊन आलों." समर्थ म्हणाले " हेः ! असें पुन्हा करीत जाऊं नकोस." असें म्हणून त्याचें नांव ' भोळाराम ' ठेवलें.

भोळाराम हा खरोखरच भोळा होता तरी अत्यंत एकनिष्ठ सेवक होता. म्हणून केव्हांही विडा मागावयाचा झाला तर समर्थ त्याच्याचपाशीं मागत असत; इतर कोणापाशीं मागत नसत व कोणीं दुसरा मनुष्य देऊं लागला तर घेतही पण नसत.

पण पुढें ही समर्थांची कफाची व्यथा फारच वाढली आणि प्रकृति दिवसें-

दिवस विघडत चालली. त्यावेळीं समर्थांनीं भीमरूपी ध्यानपर श्रीमारुतीची स्तुति केली. ती प्रार्थनाः—

## ॥ श्लोक ॥

फणिवर उठवीला, वेग अद्भूत केला ॥
त्रिभुवन जन लोकीं, कीर्तिचा घोष केला ॥
रघुपति उपकारें, दाटले थोर भारें ॥
परम धिर उदारें, रक्षिलें सौख्यकारें ॥ १ ॥

सबळ दळ मिळालें, युद्ध ऊदंड झालें ॥
कपिकटक निमालें पाहतां येश गेलें ॥
परदळ शरघातें, कोटिच्या कोटि प्रेतें ॥
अभिनव रणपातें, दुःख बीभीषणातें ॥ २ ॥

कपि रिस घनदाटी, जाहली थोर दाटी ॥
ह्मणवुनि जगजेठी, धांवणें चार कोटी ॥
मृत विर उटवीले, मोकळें सिद्ध झालें ॥
सकळ जन निवाले, धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥

बहुप्रिय रघुनाथा, मुख्य तूं प्राणदाता ॥
उठावें मज अनाथा दूर सारूनि व्यथा ॥
झडकरि भिमराया, तूं करीं दृढ काया ॥
रघुविर भजनाया लाग वेगेंसि जाया ॥ ४ ॥

तुजविण मजलागीं, पाहतां कोण आहे ॥
ह्मणवुनि मन माझें तूझीरे वाट पाहे ॥
मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें ॥
सकळिक निजदासा, लागिं सांभाळवीलें ॥ ५ ॥

उचित हित करावें, उद्धरावें धरावें ॥
अनुचित न करावें, त्वां जनीं येश घ्यावें ॥
अघटित घडवावें सेवका सोडवावें ॥
हरिभजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥

प्रभुवर विरराया, जाहली वज्र काया ॥
परदळ निवटाया, दैत्य कूळें कुटाया ॥
गिरिवर तुडवाया, रम्य वेशा नटाया ॥
तुजसि अलगडाया, ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥
बहुत सबळ साठा, मागतो अल्प वाटा ॥
नकरित हित कांटा, थोर होईल ताठा ॥
कृपणपण नसावें, भव्य लोकीं दिसावें ॥
अनुदिन करुणेचें, चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥
जलधर करुणेचा अंतरामाजि राहो ॥
तरि तुज करुणा हे, कां नये सांग पाहो ॥
कठिण हृदय झाले काय कारुण्य केलें ॥
न पवसि मज कांरे, म्यां तुझे काय नेलें ॥ ९ ॥
वाडिलपण करावें, सेवकां सांवरावें ॥
अनहित न करावें तूर्त हातीं धरावें ॥
निपटचि हठवादें प्रार्थिला शब्द भेदें ॥
कपि घन करुणेचा बोळला राम तेथें ॥ १० ॥
बहुतचि करूणा ही लोटली देवराया ॥
सहजचि कफ गेलें, जाहली दृढ काया ॥
परमसुखविलासें, सर्वदा दासानुदासें ॥
पवनज तनुतोषें, वंदिला सावकाशें ॥ ११ ॥

अशा प्रकारें मारुतीची स्तुति करतांच कफाची व्यथा तात्काळ नाहींशी झाली आणि पहिल्याप्रमाणें ते विडा खाऊं लागले. पण ते विडा मागणें तो नेहमीं भोळारामापाशींच मागत व तोच तो आणून देत असे. पुढें समर्थांच्या दांतांस कांहीं इजा होऊन दांत दुखूं लागले म्हणून विडा देणें तो खलबत्त्यांतून कुटून देण्याविषयीं आज्ञा झाली. त्याप्रमाणें भोळारामानें आपल्या जवळ खलबत्ता बाळगला, व त्यांतून तो नेहमीं विडा कुटून देऊं लागला.

परंतु ती गोष्ट समर्थांच्या इतर शिष्य मंडळींना अत्यंत दुःसह झाली.

त्यांस वाटे, समर्थ नेहमीं भोळारामापाशींच कां विडा मागतात ? भोळारामच कोण येवढा लाडका ? आम्ही नाहीं कां विडा देणार ? असा मनांत विकल्प येऊन भोळारामास ते अगदीं पाण्यांत पाहूं लागले ! एके दिवशीं कांहीं उपद्यापी मंडळींनीं तर असा कट केला कीं, भोळारामाचा खलबत्ताच लपवून ठेवूं या आणि मग पाहूं तो समर्थांस कसा काय विडा देतो तें ? असा बेत ठरवून त्यांनीं तो खलबत्ता हळूच आणून लपवून ठेविला.

नित्याप्रमाणें समर्थांनीं भोळारामास हांक मारून विडा आण म्हणून आज्ञा केली. भोळारामानें लौकर लौकर विडा तयार केला आणि तो कुटण्यासाठीं खलबत्ता पाहतों तों खलबत्ता कोठें सांपडेना. आणि समर्थांना विडा नेऊन देण्याची तर त्वरा पाठीमागें, अशा संकटांत पडल्यामुळें त्यानें त्याला एक तोड काढली ती अशी. त्यानें निर्मळ तोंड धुतलें आणि विडा तोंडांत घालून तो चावला आणि मग एका पानावर ठेवून समर्थांस नेऊन दिला. समर्थांनीं तो खाल्ला व खातां खातां म्हणाले "भोळ्या ! आजचा विडा फार गोड लागतो आहे. रोज ह्याच खलबत्त्यांतून कुटून आणीत जा." भोळाराम म्हणाला "आज्ञा."

अशा प्रकारें भोळारामानें तोंडांत विडा चावावा आणि तो उच्छिष्ट तांबूल समर्थांस नेऊन द्यावा व तो समर्थांनीं आवडीनें खावा, असा क्रम बरेच दिवस चालला होता. खलबत्ता लपवून ठेवला तरी भोळाराम विडा कुटून देतोच आहे, व समर्थ खातातच आहेत, हें काय आहे ? म्हणून इतर शिष्यांनीं भोळाराम विडा कशांत कुटतो, ह्याच्यावर पाळत ठेवली. तेव्हां त्यांस समजून चुकलें कीं, भोळाराम विडा आपल्या तोंडांत चावून समर्थांस देतो ! मग काय ? ते लोक अधिकच चेकाळले. तेंही कोणास पहावेना. ते म्हणूं लागले " उष्टा विडा ! आणि तो प्रत्यक्ष समर्थांना द्यावयाचा ? किती अनन्वित कृत्य हें ! छे छे ! ही गोष्ट समर्थांच्या कानावर घातली पाहिजे." पण घालणार कोण ? समर्थांच्या तोंडावर समक्ष सांगण्याची कोणाचीच मगदूर नव्हती. ह्यास्तव आक्का, उद्धव, वेणूबाई ही ठळक ठळक मंडळी खेरीज करून बाकीच्या मंडळींनीं असें ठरविलें कीं, ही गोष्ट शिवाजीमहाराजांच्या कानावर घालावी, म्हणजे आपोआप बंदोबस्त होईल. म्हणून त्याच संधीची ते वाट पाहूं लागले.

तों एके दिवशीं नित्याप्रमाणें गुरवारीं महाराजांची स्वारी समर्थांच्या दर्शनास आली. त्यांस कांहीं मंडळींनीं द्वारांतच गांठून भोळाराम चावलेला विडा रोज समर्थांस देतो हा मजकूर कळविला. तो ऐकून राजश्री म्हणाले " ठीक आहे. त्याचा बंदोबस्त करतां येईल. "

नंतर राजेश्रींनीं रीतिप्रमाणें समर्थांचें दर्शन घेऊन आज्ञेप्रमाणें बसले. क्षणभर गेला नाहीं तोंच समर्थांनीं भोळारामास हाक मारली. ती ऐकून राजेश्री म्हणाले " भोळाराम नाहीं. कोठें बाहेर गेला वाटतें. विडा पाहिजे असेल तो आज मीच देतों." समर्थ म्हणाले " नको, नको; भोळारामाच्याच हातचा विडा पाहिजे. त्याला म्हणावें खलबत्त्यासुद्धांच विडा पाठवून दे." ती आज्ञा ऐकून राजेश्री स्वतः उठून भोळारामाकडे गेले, व समर्थांनीं विडा व खलबत्ता मागितल्याचें त्यास सांगितलें. तें ऐकून भोळाराम म्हणाला " काय ? खलबत्ता मागितला आहे ? खरेंच कीं काय ? आपण पुन्हा एकदां विचारून या कीं, खलबत्ताच पाठवूं कीं काय ?" राजेश्री पुन्हा समर्थांकडे जाऊन त्यांनीं भोळारामाचा निरोप कळविला. समर्थ म्हणाले " होय; खलबत्त्यांत घालूनच विडा पाठवून दे म्हणावें." शिवाजी महाराजांनीं तोच निरोप पुन्हा भोळारामास कळविला. भोळाराम म्हणाला "ठीक आहे." असें म्हणून त्यानें हातांतलि विडा तोंडांत घालून चावला आणि उजव्या हातांत एक सुरी घेऊन डाव्या हातानें आपली शेंडी धरली आणि आपल्या हातानें गळा कांपून तें मस्तक राजेश्रींच्या हातांत दिलें ! हा भयंकर प्रकार पाहून राजेश्रींचा हात तर थरथर थरथर कांपूं लागला! तेव्हां भोळारामाच्या कंठनाळांतून शब्द निघाला कीं, ' आपण भिऊं नये. हा खलबत्ता नेऊन समर्थांपाशीं द्यावा. "

शिवाजी महाराज तें रक्तानें निथळत असलेलें भोळारामाचें मस्तक घेऊन समर्थांपुढें आले. पण त्यांच्या मनाची त्यावेळची स्थिति काय झाली असेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे. ते मनांत अगदीं घाबरून गेले होते. त्यांचा कंठ भरून आला होता व हात लटलट लटलट कांपत होता, तरी त्यांनीं तें तसेंच समर्थांच्या पुढें केलें. समर्थांनीं मोठ्या प्रेमानें त्याच्या मुखांतील चावित असलेला विडा घेतला, आणि " शिवबा ! भिऊं नका. हा आमचा खलबत्ता पुन्हा होता तेथें नेऊन ठेवा. " अशी आज्ञा

करतांच राजेश्रींनीं तें मस्तक नेऊन पुन्हा त्या भोळारामाच्या धडावर बसविलें. तों तें पूर्ववत् बेमालूम बसून भोळाराम पहिल्यासारखा बोलूं चालूं लागला! पण त्यांत इतकेंच झालें कीं, राजेश्रींचा हात कांपत असल्यामुळें मस्तक बसतांना किंचित् वांकडें बसलें व तें तसेंच कायम राहिलें. हें पाहून भोळाराम म्हणाला "बरें; श्रीची इच्छा!"

हा अद्भुत चमत्कार पाहून शिवाजी महाराज तर मनामध्यें अगदीं विरून गेले. त्यांनीं नेत्रांत प्रेमाश्रु आणून सद्गदित अंतःकरणानें समर्थांचे पाय धरले. तें पाहून समर्थ त्यांस म्हणाले "कां शिवबा! अशा खलबत्त्यांत कुटलेला विडा खाल्ल्यांत कांहीं दोष आहे काय?" राजेश्रीं म्हणाले आम्ही सर्वस्वी अपराधी आहोंत!"

असे मनांतील विकल्प नष्ट करण्यासाठीं समर्थांनीं हा एकचसा काय, पण शेंकडों चमत्कार केलेले आहेत. ही गोष्ट कोणासही निदान हल्लींच्या मन्वंतरांत तरी—मिथ्या वाटण्यासारखी आहे ह्यांत संशय नाहीं. परंतु समर्थ हे किती अंतर्ज्ञानी होते, ते शिष्यवर्गाच्या मनांतील विकल्प काढण्यासाठीं किती अलौकिक कृति करीत व त्यांचें सामर्थ्य किती लोकविलक्षण होतें, ह्याचें ज्यांनीं सूक्ष्म निरीक्षण केलें असेल, त्यांच्या मनाचा ग्रह तरी निदान ह्या गोष्टींत बरेंच तथ्य असलें पाहिजे असा झाल्यावांचून राहणार नाहीं; 'निवळ भाकडकथा' असें म्हणण्याला तरी जिव्हा खास धजणार नाहीं असें आम्हास वाटतें.

**रंगनाथस्वामींचा रेड्याचा चमत्कार**—[शके १५७२] एके दिवशीं शिवाजी महाराजांची स्वारी सातार्‍यास आली असतां समर्थांची स्वारी जरंड्यास आहे असें कळलें. म्हणून राजेश्री स्वतः जरंड्यावर जाऊन समर्थांस भेटले आणि त्यांनीं त्यांस सातार्‍यास आणून गणपतीच्या धर्मशाळेंत रहावयाची सोय करून दिली. समर्थ प्रातःकाळीं माहुलीस जाऊन स्नानसंध्या करीत व दुपारीं राजेश्रींचें व त्यांचें भोजन होत असे. हें वर्तमान रंगनाथस्वामीस समजतांच ते समर्थांच्या दर्शनाकरतां निगडीहून निघाले ते सातार्‍यास आले. ते रस्त्यानें चालले असतां शिवाजी महाराज माडीवर उभे होते त्यांनीं त्यांस पाहिलें. तो जामानिमा करून रंगनाथस्वामी घोड्यावर बसले आहेत, पंचहत्यारें कमरेस लटकावलीं आहेत,

आणि बरोबर ५।२५ लंगोटबंद चालत आहेत. अशी स्वारी पाहून महाराज मनांत म्हणूं लागले कीं, ह्यांस शिपाई गडी म्हणावें तर लंगोटबंद मंडळी आहे. गोसावी म्हणावें तर पोषाख सरदारीचा आहे. तेव्हां हें काय ! असें आश्चर्य करीत "हे कोण ? कोठून आले आहेत ? ह्याची चौकशी करून ये" अशी त्यांनीं एका चोपदारास आज्ञा केली. चोपदारानें जाऊन चौकशी करून परत येऊन विनंति केली कीं, ते निगडीचे रंगनाथस्वामी आलेले आहेत.

हें ऐकून तर शिवाजी महाराजांस फारच आश्चर्य वाटलें. ते मनांत म्हणाले "काय हे साधू ! आणि कसला यांचा वेष ? घोडा काय, पोषाख काय, हत्यारें काय, हें काय साधूंचें लक्षण ? आमच्या समर्थांची विरक्ति कोणीकडे आणि हा राजविलास कोणीकडे ! साधु या नांवाखालीं काय पाहिजे तें करावें !" अशा प्रकारें रंगनाथस्वामींच्या रहाणीवरून व पोषाखावरून राजेश्रींच्या मनांत थोडीशीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न झाली. तथापि रंगनाथस्वामी हे समर्थांच्या फार प्रेमांतले, चिरंजीव व वडील हें परस्परांतलें नातें ! आणखी रंगनाथस्वामींचा लौकिकही मोठा होता. ह्यास्तव त्यांचें यथोचित आदरातिथ्य करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें मनांत आणून त्यांनीं खासनिसास हांक मारून सांगितलें कीं "रंगनाथ स्वामी आलेले आहेत, त्यांजकडे जाऊन त्यांस सांगावें कीं, समर्थांची स्वारी येथेंच आहे. आपण त्यांचें पंक्तीस भोजनास येण्याची कृपा करावी. अशी त्यांस विनंति करून त्यांचा सर्व बंदोबस्त नीट ठेवावा. त्याप्रमाणें खासनिसानें रंगनाथस्वामींकडे जाऊन त्यांस ही विनंति कळविली व ती त्यांनींही मान्य केली.

समर्थ माहुलीवर नित्याप्रमाणें कृष्णास्नानास गेले होते, त्यांनीं अंतर्ज्ञानानें ही गोष्ट जाणली कीं, रंगनाथस्वामी आलेले असून शिवाजी महाराजांच्या मनांत त्यांच्या साधुत्वाविषयीं विकल्प उत्पन्न झाला आहे. तो त्यांच्याकडूनच कांहीं अद्भुत चमत्कार दाखवून काढून टाकला पाहिजे असें मनांत आणलें. त्याबरोबर त्यांनीं रोजच्यापेक्षां लौकरच स्नानसंध्या आटोपली आणि स्वस्थळीं येऊन भोजनाचीं पात्रें मांडण्याविषयीं घाई करूं लागले. तें पाहून शिवाजीमहाराजांनीं विनंति केली कीं "रंगनाथस्वामींना

पंक्तीस आमंत्रण दिलें आहे. त्यांचें स्नान वगैरे झालें; पूजा आटपेपर्यंत कृपा व्हावी." समर्थ म्हणाले "काय, रंगोबा आला आहे कीं काय?" राजेश्री म्हणाले "होय." हें ऐकतांच समर्थ म्हणाले "हेः! तो काय भ्रष्ट मनुष्य! त्यांच्या पंक्तीला आम्ही नाहीं जेवावयाचे! त्याला सांगून पाठवा कीं, तूं हिकडे जेवावयास येऊं नकोस. तूं तेथल्या तेथेंच काय करावयाचें तें कर." हें समर्थांचें भाषण ऐकून शिवाजी महाराज तर आश्चर्यानें अगदीं तटस्थ होऊन राहिले! त्यांस त्यावर कांहींच तोड सुचेना. रंगनाथ स्वामींचाही लौकिक मोठा; शिवाय समर्थांचीही त्यांच्यावर कृपा फार; म्हणून त्यांस भोजनास आमंत्रण दिलें. तों समर्थांचा हा साराच विपरीत प्रकार! आतां पुढें करावें काय ह्याबद्दल ते अगदीं घोटाळ्यांत पडले. भोजनास आमंत्रण दिलेल्या मनुष्यास आतां तुम्ही भोजनास येऊं नका म्हणून सांगणें ही साधारण मनुष्यास सुद्धां लाजिरवाणी गोष्ट; मग शिवाजी महाराजांसारख्या राजास त्याबद्दल केवढें लांछन वाटावें! त्यांतून 'तूं भ्रष्ट आहेस; तुझ्या पंक्तीला आम्ही बसत नाहीं, असें सांगून पाठविणें म्हणजे तर निखालस शिष्टाचाराच्या विरुद्ध होय. म्हणून महाराजही गोंधळांत पडले.

परंतु समर्थांनीं इतक्यांत एका कारकुनाला हांक मारून पुन्हा तसाच निरोप सांगून रंगनाथस्वामींकडे आवयास स्वतः आज्ञा केली. ही विचित्र आज्ञा ऐकून तो कारकूनही बुचकळ्यांत पडला. असा निरोप स्वामींस सांगावा तरी कसा? म्हणून तो शिवाजी महाराजांच्या तोंडांकडे पाहूं लागला. परंतु समर्थांच्या आज्ञेपुढें बोलणार कोण? राजेश्री मुकाट्यानें मनांतल्या मनांत खजिल होऊन उभे राहिले होते. बिचारा कारकून! तो एकदां महाराजांच्या तोंडांकडे पाही, एकदां समर्थांच्या तोंडांकडे पाही! अशी त्याच्या मनाची घालमेल चालली होती. अखेर समर्थांनीं जेव्हां पुन्हा दरडावून 'जा लौकर' म्हणून सांगितलें तेव्हां त्याचा नाइलाज होऊन तो राजेश्रींच्या मुखाकडे पहात पहात हळूहळू जाऊं लागला. शिवाजीमहाराज खालीं मान घालून उगाच शून्य वृत्तीनें उभे राहिले होते.

कारकूनही 'आतां काय करावें? कसें करावें?' हा जप करीत करीत रंगनाथस्वामींच्या बिऱ्हाडापर्यंत तर जाऊन पोंचला. स्वामींचें स्नान होऊन ते

पूजेस बसले होते. तेथें जाऊन स्वामींस नमस्कार करून त्यांच्या आज्ञे-वरून दूर बसला.

रंगनाथस्वामींनीं कारकुनास खुणेनें विचारिलें 'कां आला होता?' कारकून हात जोडून म्हणाला "सांगितलेली विनंति करण्यासाठीं आलों होतों." स्वामी म्हणाले "काय आहे?" पण कारकून त्यावर कांहींच उत्तर देईना. वाड्यांतून कारकून आला त्याअर्थी तो भोजनास बोलावण्या-साठीं आला असावा हें उघडच आहे, असें समजून शिष्यमंडळी मात्र सोंवळींभांडीं घेऊन तयार होऊं लागली! इकडे स्वामी काय निरोप आहे म्हणून कारकुनाला विचारीत आहेत, व कारकून तर कांहीं सांगत नाहीं, असा प्रकार चालला होता! अखेर कारकुनास गहिंवर आला, तो नेत्र पुसूं लागला व त्याच्या तोंडांतून शद्ब फुटेना! असें पाहून रंगनाथस्वामी हासले आणि म्हणाले "काय! समर्थांचा निरोप आहेना? कीं आम्ही भ्रष्ट आहों!" कारकून हात जोडून म्हणाला "होय; स्वामी सर्वज्ञच आहेत!" रंगनाथस्वामी म्हणाले "जेवावयाला येऊं नये. येथेंच जेवावें. हीच कीं नाहीं आज्ञा?" कारकून म्हणाला "होय;" "फार उत्तम आहे. आम्ही येथेंच स्वयंपाक करून जेवतों. आज्ञा प्रमाण आहे." असें म्हणून स्वामी आपल्या शिष्यास हांक मारून म्हणाले "अरे! जेवणाचें सामान-सुमान आणवून येथेंच स्वयंपाकाची सिद्धता करा." मंडळी म्हणाली "परंतु भांडींही नाहींत." स्वामी म्हणाले "मडकीं आणवा." त्याप्रमाणें मडकीं आलीं. मग सामानसुमान आणावयाचें. पण रंगनाथस्वामी जेथें उतरले होते तेथून बाजार फार लांब होता. ह्यास्तव शिष्य म्हणूं लागले येथें सामानसुमान कांहीं एक मिळत नाहीं. स्वामी म्हणाले "अरे बाहेर रस्त्यावर जा; आणि काय दृष्टीस पडेल तें घेऊन या." कांहीं शिष्य बाहेर रस्त्यांत जाऊन पाहून येऊन म्हणाले "कोठें कांहीं नाहीं. फक्त एक देवीला सोडलेला वळू रेडा मात्र मस्त होऊन भिंतीशीं टकरा देत आहे." स्वामी म्हणाले "कांहीं चिंता नाहीं. तो रेडाच इकडे घेऊन या." आज्ञेप्रमाणें शिष्यांनीं तो रेडा धरून आंत आणला. समर्थांचे जसे कल्याण शिष्य होते, त्याप्रमाणेंच रंगनाथस्वामींचे एक जनार्दन गोसावी म्हणून शिष्य होते. त्यास हांक मारून स्वामी म्हणाले "जनार्दन,

ह्या रेड्याची गर्दन उडीव." जनार्दन गोसाव्यांनीं हात जोडून प्रार्थना केली कीं, "हें कर्म माझ्याच्यानें होणार नाहीं!" हें ऐकतांच स्वामी म्हणाले "बरें तर; तो माझा तेगा घेऊन ये." तेव्हां एका शिष्यानें तेगा आणून पुढें ठेविला. स्वामींनीं उठून तेगा हातांत घेतला आणि त्या रेड्याची मान उडविली! आणि शिष्यमंडळीस सांगितलें कीं, ह्याचें मांस काढून मडक्यांत शिजवून रघुपतीस नैवेद्य तयार करावा! शिष्यमंडळी त्या खटपटीस लागली! वाड्यांतून आलेला कारकूनही तेथें बसलाच होता. त्यानें हा प्रकार पाहतांच त्याची तर बोबडीच वळली! त्यानें मुकाट्यानें उठून स्वामींस नमस्कार केला, जावयास आज्ञा घेतली, व डोळ्यांस पदर लावून दरवाजाबाहेर पडला!

तो वाड्यांत येऊन पोंचल्यावर त्यास शिवाजी महाराजांनीं विचारलें कीं "कसें काय झालें?" कारकून अगदीं घाबऱ्या घाबऱ्या म्हणूं लागला "साराच प्रकार विचित्र! समर्थांनीं त्यांस भ्रष्ट म्हटलें तें अगदीं खरेंच आहे!" राजेश्रींनीं विचारलें "तें कसें काय! तेथें काय प्रकार घडला?" कारकुनानें रेडा कापल्याचा सर्व मजकूर निवेदन केला. तो ऐकून महाराजांची मति तर अगदीं गुंगच होऊन गेली! त्यांना तर हें काय आहे हेंच समजेना. साधु म्हणवितात काय? आणि कारकून रेडा कापून स्वयंपाक चालल्याचें सांगतो काय? मी स्वप्नांत आहे, का हा सारा प्रकार खराच आहे हेंच त्यांना उमजेनासें झालें.

वाड्यांत रोजचीं पानें मांडून तयार झालीं. तीं पाहून समर्थ म्हणाले "शिवबा! तुम्ही आणि ब्राह्मण मंडळी बसा. रंगोबा जरी भ्रष्ट असला तरी तो आपल्या येथें आज आला आहे तेव्हां त्याच्या जेवणखाणाचें कसें काय झालें तें आपणांस पाहिलें पाहिजे. याकरितां मी त्याच्याकडे जाऊन येतों. तुम्ही सर्व मंडळी बसा." राजेश्री म्हणाले "मलाही आपल्याबरोबर येण्याची आज्ञा असावी. मंडळींना जेवावयाला बसूं द्या." तें समर्थांनीं मान्य केलें आणि बाकीची मंडळी जेवावयास बसली.

समर्थ राजेश्रींना घेऊन रंगनाथस्वामींच्या बिऱ्हाडीं गेले. तों दरवाजा बंद होता. तो ठोठावतांच एका शिष्यानें येऊन दार उघडलें. समर्थ व राजेश्री आंत जातात तों मधल्या चौकांत रेड्याचें रक्त, मांस व हाडें वगैरे

पडलेलीं ! हा देखावा पाहतांच राजेश्रींच्या अंगावर तर शहारेच उभे राहिले व मनास चिळसही उत्पन्न झाली. समर्थ आंत येतांच रंगनाथस्वामींनीं साष्टांग नमस्कार करून बसावयास आसन दिलें. समर्थ म्हणाले "रंगोबा ! लोक भ्रष्ट होतात पण तुझ्यासारखा रेडा खाणारा भ्रष्ट कोणीं पाहिलेला नाहीं."

**रंगनाथस्वामी**—महाराज ! मी कसाही भ्रष्ट असलों, तरी आपला म्हणवितों. आणि भ्रष्ट करविणारे तरी कोठें लांब आहेत ? तेही जवळच असतील. माझी लाज आपणांवांचून कोण राखील ?

**समर्थ**—शिवबा ! रंगोबा काय म्हणतो पहा ! प्रत्यक्ष रेडा कापून आणखी मोठ मोठ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो.

**शिवाजीमहाराज**—महाराज ! मला ह्यांत कांहींच समजत नाहीं. ह्यांतील भावार्थ समर्थच काय जाणत असतील तो खरा.

अशीं भाषणें होत आहेत, तोंच रंगनाथस्वामींनीं नैवेद्य लौकर आणण्यासाठीं शिष्यास आज्ञा केली. शिष्यानें चारीं मडकीं पुढें आणून ठेवलीं ! स्वामींनीं रघुपतीस नैवेद्य समर्पण करून पानें मांडावयास सांगितलीं.

**समर्थ**—रंगोबा ! तूं भ्रष्ट तर खराच, पण आम्हांस पंक्तीस घेतोस काय ?

**रंगनाथस्वामी**—आपणासारखा अतिथि प्राप्त झाला असतां नाहीं म्हणण्याइतका अभागी कोण आहे ?

**समर्थ**—तर मग हा रेडा येथें कशाला ? ह्याला उठवून बाहेर लावून दे म्हणजे भोजन करूं.

अशी समर्थांची आज्ञा होतांच रंगनाथस्वामींनीं समर्थांची पूजा करून चरणाचें तीर्थ घेतलें. तें पाहून—

**समर्थ**—कां रंगोबा ! आज फारशी भक्ति मांडली आहेस ?

**रंगनाथस्वामी**—महाराज ! मी आपला भक्त पूर्वींचाच आहे. परंतु आज रेडा मारल्याचा मजवर आरोप आला आहे, ह्याकरितां प्रायश्चित्त घेतों.

असें म्हणून परस्परांनीं आनंदित मुद्रेनें हास्य केलें.

**समर्थ**–शिवबा ! रंगोबा काय म्हणतो ?

**राजेश्री**—महाराज ! समजलों. मजकडून सेवेंत कांहीं तरी अंतर पडलें असावें, म्हणून हें कौतुक होत आहे. परंतु काय अंतर पडलें तें मला स्मरत नाहीं.

**समर्थ**—बापा ! हें जर तुम्हाला समजतें तर येवढी खटपट कशाला पाहिजे होती !

**शिवाजीमहाराज**—कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. माझा अन्याय काय पदोपदीं आहेच.

**समर्थ**—बापा ! तुम्हाला कोणी दोष लावूं नये व तुमच्या अंगीं दोषाचें वारें सुद्धां असूं नये येवढ्याकरतां इतकी खटपट करणें भाग पडतें.

**शिवाजीमहाराज**—परंतु माझ्या हातून कोणता अपराध घडला तें कळण्याची कृपा व्हावी.

**समर्थ**—बापा ! रंगोबा आला त्यावेळीं याचा वेष पाहून याच्या साधुत्वाविषयीं तुमच्या मनांत विकल्प आला होता किंवा नाहीं ? बसा-वयाला घोडा, पायांत तोडा, पंचहत्यारें, कलगीतुरा, हे साधु कसले ? असो तुम्हीं मनांत संशय आणलात, म्हणून त्याचें प्रत्यक्ष स्वरूप तुम्हांस दाखवावें लागलें.

**शिवाजीमहाराज**—मी अपराधी खरा; साधूचें स्वरूप ओळखण्याची योग्यता कोठून असणार ? परंतु कृपा करणार समर्थ आहेत.

**समर्थ**—ह्याकरितां अतःपर साधूची हेलना स्वप्नांत सुद्धां करूं नये. साधु कोणत्या वेषानें व कोणत्या वर्तणुकीनें वागतात त्याचा सामान्य मनुष्याला अंत लागत नाहीं. साधु म्हटलें कीं, त्याच्या चरणावर मस्तक ठेवावें. त्याच्या आचरणावर दृष्टि देऊं नये.

**शिवाजीमहाराज**—आज्ञा प्रमाण. असें म्हणून साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभे राहिले.

नंतर समर्थ रंगनाथस्वामींस म्हणाले "तर मग तो रेडा उठवून लावून दे. म्हणजे आपण भोजन करूं." आज्ञा म्हणून रंगनाथस्वामी त्या रेड्याजवळ गेले, आणि 'ऊठरे बापा ! तुला आतां समर्थ जाण्याविषयीं आज्ञा करीत आहेत.' असें म्हणून स्वामींचें चरणतीर्थ हातांत होतें तें त्याच्या

हाडामांसावर शिंपडलें. त्याबरोबर तो रेडा उठून बाहेर जाऊन पूर्ववत् भिंतीला धडका देऊं लागला!!

तों इकडे पानें मांडून तयार झालीं. तेव्हां समर्थ शिवाजीमहाराजांस म्हणाले "आम्ही तर ह्या रंगोबाबरोबर भोजन करून भ्रष्ट होणार. शिवबा! तुम्ही कसें काय करतां? तुमची असल्यास तुम्हीही भोजनास या." महाराज म्हणाले "महाराज, ह्यांत आपण भ्रष्ट, स्वामी भ्रष्ट कां मी भ्रष्ट? ह्यांतील रहस्य मला तर कांहींच कळत नाहीं. तें कृपा करून सांगावें." समर्थ म्हणाले "बरें; सध्या तर तुम्ही जेवावयाला बसा. तें रहस्य पुढें सांगूं."

असें म्हणतांच सर्व मंडळी पानावर बसली. शिष्य मंडळींनीं वाढावयाकरितां मडकीं उघडलीं तों त्यांतून दिव्य पक्वान्नें निघालीं! तीं त्यांनीं सर्व पात्रांवर वाढलीं. नंतर समर्थ, शिवाजीमहाराज, रंगनाथस्वामी वगैरे सर्वांची येथेच्छ भोजनें होऊन तांबूल भक्षण करीत बसले, तेव्हां रंगनाथस्वामींनीं समर्थांवरून एक कटिबंध करून म्हटला तो असाः—

## कटिबंध.

**रामदास चतुराक्षर मंत्र जप वारंवार।**
**दुस्तरतर भवसागर तारक सच्चित् सुखसार॥ ध्रु० ॥**

**रामदासद्वय अभिन्न नामें गोडी शर्करा।**
**रहाटे परिमळ भुवनीं हातीं घेतां कर्पूरा॥**
**राजस वर्तुळस्था त्या जिवनकी गारा।**
**राजाधिराज अवतरला या जगदोद्धारा॥ १ ॥**

**मनुष्यरूपें विलसे परि हा परिपूर्ण काम।**
**मकराकृति कुंडलें पाहतां स्वतःसिद्ध हेम॥**
**मंडण संत सभेचें साधुजनासि विश्राम।**
**मस्तक मणि हा शत कोटींचा निजबिज श्रीराम॥ २ ॥**

**दास तो उदास सेवुनि परमामृत कंदा।**
**दाता स्वात्मसुखाचा निरसुनि विषयाचा धंदा॥**

दानव षट् कुळ वैरी मर्दुनि तारक मतिमंदा।
दाराद्रव्य त्यजुनी सद्गुरु सद्भावें वंदा ॥ ३ ॥
सद्गुरुराज विराजित सज्जन गिरिवास।
सर्वस्वेंची शरण रिघावें धरुनी कास।
सत्य सनातन श्रीगुरु समर्थ मुनिमानसहंस।
सहज पूर्ण निजरंगीं रंगला तारक विश्वास ॥ ४ ॥

नंतर सभा विसर्जन होऊन समर्थ आपल्या बिऱ्हाडीं आले व शिवाजी महाराजही आपल्या वाड्यांत गेले. तेव्हां कारभाऱ्यांनीं महाराजांस विनंति केली कीं, "हें आज चरित्र काय झालें?" राजेश्रींनीं उत्तर दिलें "काय सांगावें? प्रत्यक्ष रेडा मारून मडक्यांत मांस शिजविलें असून नैवेद्याच्या वेळीं त्याचें दिव्यान्न झालें, आणि शेवटीं रेडाही जिवंत करून लावून दिला! इतकें करण्याचें कारण, रंगनाथस्वामींविषयीं माझ्या मनांत संशय आला होता तो जावा म्हणून. पूर्वी समर्थांनीं कढ्यांत जेऊं घातलें; तुकाराम महाराजांनीं मेजवानी दिली त्याप्रमाणें आज हा चमत्कार रंगनाथ-स्वामींच्या सामर्थ्याविषयीं दाखविला. एकंदरींत साधूंचा अंत पहाण्याची योग्यता कोणाचीच नाहीं." इत्यादि मजकूर सर्व कारभाऱ्यांस सांगितला. त्यावरून सारे कारभारीही आपआपले ठिकाणीं परमाश्चर्य मानून साधु हे महा थोर होत, ते काय करतील आणि काय न करतील ह्याचा नेम नाहीं, असें वर्णन करीत राहिले.

समर्थ साताऱ्यास होते तोंपर्यंत रंगनाथस्वामीही साताऱ्यास राहिले होते. कांहीं दिवसांनंतर समर्थ परळीस गेले, रंगनाथस्वामी निगडीस गेले व महाराजांची स्वारीही रायगडीं गेली.

**आगीचा भडका:**—एक वेळ समर्थ कांहीं शिष्यमंडळीसहवर्तमान चाफळाहून परळीस जावयास निघाले असतां मार्गामध्यें पाडळीपर्यंत आले तों दुपार झाली. तेव्हां सर्व शिष्यमंडळींनीं विनंति केली कीं, आतां येथेंच स्नानसंध्या उरकून मग पुढें जावें. समर्थांनीं 'ठीक आहे' असें म्हटल्यावर सर्व मंडळी नदीच्या कांठीं जाऊन उतरली, व कांहीं शिष्य मंडळी गांवांत भिक्षेला गेली. तों चावडीवर शेलदार, गांवकरी वगैरे

मंडळी बसली होती. शेखदारानें त्या शिष्यमंडळीस पाहतांच त्यांच्या अंगावर तोंड सोडिलें. तो म्हणाला "तुम्ही उनाडटप्पू लोक, गांवांत भिक्षा मागून खातां, आणि लंगोट्या नेसून उघडे नागडे फिरतां, हा कशाचा धर्म?" असें म्हणून त्यानें शिपायांकडून त्यांच्या झोळ्या व कुबड्या हिसकाऊन घेतल्या. तें पाहून जवळ बसलेल्या मंडळींनीं त्यास पुष्कळ सांगितलें कीं, श्रीसमर्थ रामदास-राजगुरु ह्यांचे हे शिष्य आहेत. त्यांचा असा अपमान करूं नये. परंतु शेखदारानें कोणाचें कांहीं न ऐकतां त्यांस धक्के मारून गांवाबाहेर घालविलें! तेव्हां शिष्यमंडळी समर्थांपाशीं जाऊन त्यांनीं झालेलें सर्व वर्तमान त्यांस श्रुत केलें. समर्थ म्हणाले "त्यानें झोळ्या घेऊन सोडलें हेच उपकार समजा; अशा गांवांत पाणी प्यावयालासुद्धां उभें राहूं नये." असें म्हणून ते सर्व मंडळी सहवर्तमान तडक निघाले आणि गांवाच्या बाहेर गेले. तों मागें साऱ्या पाडळी गांवासच आग लागली! साऱ्या गांवांत आरडाओरड व धांवाधांव सुरू झाली! साऱ्या लोकांच्या मनानें तेव्हांच घेतलें कीं, शेखदारानें साधूंचा छळ केला त्याचें हें फळ! ते लोक शेखदाराला हवें तसें बोलूं लागले. त्यामुळें शेखदारालाही अत्यंत वाईट वाटलें. आतां स्वामींस शरण जाऊन क्षमा मागितल्याशिवाय कांहीं हा अनर्थ टळणार नाहीं असें समजून सारे गांवकरी मुलाबाळांसहवर्तमान समर्थांकडे निघाले. समर्थ आंबराईत उतरले आहेत अशी बातमी होती, म्हणून लोक तिकडे गेले. तों ते तेथून पुढें गेल्याचें समजलें. गांवकरी मागें वळून गांवाकडे पाहतात तों एक वानर हातांत चूड घेऊन ह्या घरावरून त्या घरावर उड्या मारून सारीं घरें पेटवीत आहे! हा अनर्थ पाहून सारे लोक धांवतच समर्थांच्या मागें लागले. त्यांनीं समर्थांस खिंडीमध्यें गांठलें आणि सर्व अपराधांची क्षमा व्हावी म्हणून पायावर लोळण घेतली. समर्थांनीं "काळजी करूं नका, गांवाकडे पहा." म्हणून आज्ञा केली.

गांवकरी पाहतात तों वानर पूर्वीं जो चूड लावून घरें पेटवीत होता, तोच वानर खांद्यावर पाण्याच्या घागरी घेऊन सारीं घरें विझवीत आहे. हें पाहून सर्वांनीं समर्थांना पदर पसरून गांवांत येण्याविषयीं प्रार्थना केली. त्यावरून समर्थांनीं शिष्यांसहवर्तमान गांवांत जाऊन भोजन केलें. गांव-

करी पाहातांत तों इतकें झालें तरी गांवामध्यें कोणाचेंच कांहीं जळलें नाहीं. हा सर्व चमत्कार पाहून समस्त ग्रामस्थांनीं समर्थांची विनंति केली कीं "ह्या गांवच्या पांढरीवर समर्थांची ह्यापुढें कृपा असावी." समर्थ प्रसन्न मुद्रेनें म्हणाले "कांहीं चिंता नाहीं. ह्यापुढें तुमच्या गांवाला अग्नीचा उपद्रव कधींही होणार नाहीं." असा समर्थांनीं आशिर्वाद दिला. त्याची साक्ष अद्याप चालत आहे. म्हणजे पाडळी गांवाला तेव्हांपासून आजपर्यंत कधींही आग म्हणून लागलेली नाहीं. ही गोष्ट झाली त्या दिवशीं शके १७७३ तील फाल्गुन वद्य १३ होती.

**विलक्षण मागण्या**—एके दिवशीं समर्थांची स्वारी परळीस असतां नित्याप्रमाणें शिवाजीमहाराज दर्शनास गेले. आणि प्रार्थना केली कीं, "मजपासून कांहींतरी सेवा घडेल अशी आज्ञा व्हावी." समर्थ म्हणाले "शिवबा! आम्हांला अशा उपाधीचें कांहीं कारण नाहीं. तुम्ही राज्य-कारभार चालवून प्रजापालन करतां हीच आमची सेवा आहे." तरी महाराज ऐकेनात. त्यांनीं पुनः पुन्हा तोच आग्रह धरला. तेव्हां समर्थांनीं जेथें राजेश्रींचा मुळींच अंमल नव्हता अशीं कांहीं गांवांचीं नावें सांगून "ह्या गांवांच्या सनदा करून द्या" अशी आज्ञा केली. ती आज्ञा ऐकून शिवाजी महाराज थोडेसे गोंधळांत पडले. कारण, ज्या गांवांत आपला मुळींच अंमल नाहीं, त्या गांवच्या सनदा कशा काय करून द्यावयाच्या? म्हणून त्यांनीं हात जोडून समर्थांस विनंति केली कीं "महाराज! ह्या गांवांकडे माझा अंमल नाहीं ह्या करितां दुसरे कोणतेही गांवाची आज्ञा व्हावी." कल्याणस्वामी जवळच होते. त्यांनीं राजेश्रींस विनंति केली कीं, "आपण खुशाल त्या गांवच्या सनदा लिहून द्याव्यात. मनांत संशय घेण्याचें कारण नाहीं." समर्थांनीं ही तीच आज्ञा केली. तेव्हां शिवाजी महाराजांनीं समर्थांनीं आज्ञा केल्याप्रमाणें त्या त्या गांवच्या सनदा करून दिल्या आणि समर्थांनींही एक एक शिष्याची एक एका गांवीं नेमणूक करून तेथें तेथें मठ स्थापन करण्याविषयीं आज्ञा केली हा किती चमत्कार! परंतु समर्थांचें सामर्थ्य किती लोकोत्तर होतें तें पहा. हे सारे शिष्य त्या त्या गांवीं पोंचतात तोंच शिवाजी महाराजांच्या राज्याची सरहद्द त्या त्या गांवीं पोंचून ते सारे गांव त्यांच्या सत्तेंत आले आणि राजेश्रींनीं त्या त्या

गांवीं त्या त्या शिष्यांस मठ करून सर्व प्रकारें बंदोबस्त करून दिला तो असा. भोळाराम ह्यास करंजप्रांतीं वऱ्हाड येथें मठ बांधून पत्र करून ठेवलें. मुसळरामास बेदरप्रांतीं पाठविलें. जयराम गोसावी यांस बालेघाटीं निलंगें येथें पाठविलें. त्रिंबक गोसावी यांस भानगांवनजीक औरंगाबाद येथें पाठविलें. देवीदास गोसावी यांस देगांवीं रवाना केलें. ह्याप्रमाणें ७२ महंत शिष्यांस पत्रें देऊन काशीपासून रामेश्वरापर्यंत व पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत शिष्य पाठवून निरनिराळ्या नव्या मठांची स्थापना केली.

**मातुश्रीस पत्र**—अशा प्रकारें समर्थ परळीस असतां त्यांच्या मातोश्री राणूबाई ह्यांनीं एका शिष्याबरोबर त्यांच्याकडे मुद्दाम निरोप पाठविला कीं, "तुमचे भेटीस फार दिवस झाले याकरितां लौकर येऊन भेटून जावें." हा निरोप घेऊन जो ब्राह्मण आला होता, त्यास समर्थांनीं चार दिवस ठेवून घेतलें व 'लौकरच भेटीस येतों' असें सांगून त्या ब्राह्मणाचा यथोचित सत्कार करून त्याची रवानगी करून दिली. त्याच्याबरोबर मातोश्रीस एक पत्रही दिलें होतें. पूर्वींची संतमंडळी साधारण बोलणें झालें किंवा पत्र लिहिणें झालें तरी तें पद्यात्मक वाणीनेंच लिहीत व बोलत. पद्य हीच त्यांची सहज वाणी असे. समर्थांचीं सारीं पत्रें पद्यात्मकच आहेत. त्याप्रमाणें हें मातोश्रीस त्या ब्राह्मणापाशीं दिलेलें पत्रही पद्यात्मकच होतें. तें पत्र असें:—

॥ ओंव्या ॥

**सकळ तीर्थांची फलश्रुती ॥ सकळ भाग्याची संपत्ती ॥**
**सकळ पुण्याची गती ॥ आनंदमय ॥ १ ॥**

**तूं चतुर्विधा वागेश्वरी ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी ॥**
**जांचे निज व्यापारीं ॥ ब्रह्मादिक ॥ २ ॥**

**तूं भक्ती नवरत्नमाळा ॥ तूं कीर्ति चंद्राची कळा ॥**
**तूं महापुरुषाची लीळा ॥ ज्ञानशक्ति ॥ ३ ॥**

**तूं मुक्तीचें माहेर ॥ तूं भक्तांचा आधार ॥**
**तूं योगीजनांचें मंदिर ॥ सहज स्थिती ॥ ४ ॥**

तूं भगवंताची महिमा ॥ तूं निरुपमाची उपमा ॥
तुझेनि बोळे परमात्मा ॥ तुर्या साक्षिणी ॥ ५ ॥

तूं उन्मनीहुनी परती ॥ तूं संतांची संगती ॥
साधकाची सद्गती ॥ सद्गुरु कृपा ॥ ६ ॥

तूं गुरु कृपेचें सत्पात्र ॥ तूं अनन्यास क्षेत्र ॥
तूं चकोराचें सूत्र ॥ अर्धमात्रा ॥ ७ ॥

तूं भक्तीचें मंडण ॥ तूं समुदायाचें भूषण ॥
तुजवरोनि पंचप्राण ॥ ओंवाळीन ॥ ८ ॥

तूं माझी अंतरवृत्ती ॥ तूं माझ्या जिवाची गती ॥
तुज वर्णावया मती ॥ मग जिवास कैंची ॥ ९ ॥

तूं सखोलपणें गगन ॥ तूं माझें प्रीतीचें स्थान ॥
तुझे गुणीं माझें मन ॥ लांचावलें ॥ १० ॥

योगी वीतरागी तापसी ॥ ब्रह्मनिष्ठ सर्व संन्यासी ॥
भक्त मुक्त तुजपाशीं ॥ समाधान पावती ॥ ११ ॥

तूं भक्तांचें माहेर ॥ तूं भक्तांसी आधार ॥
तूं ज्ञानियांसी थोर ॥ संशयातीत ॥ १२ ॥

तूं योगीयांचें मंडण ॥ तूं साधकाचें भूषण ॥
सर्व सार्थकाचा क्षण ॥ संग तुझा ॥ १३ ॥

तूं धर्माचा आश्रयो ॥ तूं पुण्याचा निश्चयो ॥
तुझेनि वाक्यें मज जयो ॥ समाधानासि होय ॥ १४ ॥

तूं भजनाचें जीवन ॥ सगुणाचें रक्षण ॥
तूं शक्तीचें गोडपण ॥ आनंदमय ॥ १५ ॥

तुझेनि भक्तिरंग माजे ॥ तुझेनि उपासना गाजे ॥
तुझेनि परमार्थ साजे ॥ भावार्थपणें ॥ १६ ॥

तूं सन्मार्गाचा कैपक्षी ॥ तूं अनन्याचा अंतरसाक्षी ॥
तुझी कृपादृष्टी रक्षी ॥ अनाथासी ॥ १७ ॥

तूं मज अनाथाचा नाथ ॥ तूं मज दीनाचा समर्थ ॥
तूं मज कृपणाचा अर्थ ॥ निज ठेवा ॥ १८ ॥

तूं तापलियाची छाया ॥ तूं मज बालकाची माया ॥
तुझेनि सुखें माझी काया ॥ दृढ वाढली ॥ १९ ॥

तूं मज चकोराचा चंद्र ॥ तूं मज चातकाचा जलधर ॥
तुजविण मज आधार ॥ आणीक नाहीं ॥ २० ॥

तूं मज विदेशाचा देश ॥ तूं मज पक्षियाचें आकाश ॥
तुजवाचोनीं विश्वास ॥ आणीक नाहीं ॥ २१ ॥

तूं कृपाळू शरणांगतासी ॥ न बोलतां अंतर जाणसी ॥
लडिवाळाचे लळे पाळसी ॥ स्नेहाळुपणें ॥ २२ ॥

तुमची करावया स्तुती ॥ मज दीनासी कैंची मती ॥
एक वेळ कृपा मूर्ती ॥ कृपा करावी ॥ २३ ॥

जनस्थान गोदा तटीं ॥ परम पवित्र पंचवटी ॥
जेथें पडली कृपादृष्टी ॥ रघूत्तमाची ॥ २४ ॥

तेथील रामउपासक ॥ त्याच्या सेवकाचा सेवक ॥
तुह्मामध्यें मी एक रंक ॥ सरतें करावें ॥ २५ ॥

तुम्हीं निकट देवापाशीं ॥ मी पडलों दूर देशीं ॥
कृपाळूपणें रघुनाथासी ॥ माझी करुणा भाकावी ॥ २६ ॥

म्हणावे ते अनाथ ॥ समर्था तूं दीनानाथ ॥
म्हणावे ते पतीत ॥ तूं पतीतपावन ॥ २७ ॥

म्हणावे ते परम किंकर ॥ देवा तूं करुणाकर ॥
म्हणावे ते निराधार ॥ आधार इच्छी ॥ २८ ॥

सत्य मिथ्या तुझा म्हणवी ॥ त्याची चिंता असों द्यावी ॥
ऐशी करुणा करावी ॥ नाना प्रकारीं ॥ २९ ॥

तुझ्या दासामध्यें हीन ॥ माझे कोट्यावधी अवगुण ॥
परंतु अनन्यभावें शरण ॥ सेवक रघूनाथाचा ॥ ३० ॥

पुढें म्यां असोंच असावें ॥ माझें मन न पालटावें ॥
इतकें देवापाशीं मागावें ॥ बंधुवर्गीं ॥ ३१ ॥
प्रत्यहीं माझा नमस्कार ॥ देवासि करणें निरंतर ॥
मज कारणें शरीर ॥ इतुकें कष्टवावें ॥ ३२ ॥
शुद्ध उपासना निर्मळ ज्ञान॥ उपासना आणि ब्राह्मण्यरक्षण॥
गुरुपरंपरेचें लक्षण ॥ शुद्ध ज्ञान ॥ ३३ ॥
बाळ वृद्ध नरनारी ॥ सकळ भक्त कुमार कुमारी ॥
त्यां समस्तांस मी नमस्कारीं ॥ कृष्णातीरवासी ॥ ३४ ॥
ऐसें पंचधा बोलिले ॥ म्हणजे सकळ कांहीं पावलें ॥
इतुके पाहिजे यत्न केले ॥ ह्मणे दासानुदास ॥ ३५ ॥

शहाजीमहाराजांची भेट—शिवाजीमहाराज नित्याप्रमाणें एका गुरुवारीं समर्थांच्या दर्शनास गेले असतां त्यांनीं समर्थांपाशीं गोष्ट काढली कीं, तीर्थरूप शहाजीराजेमहाराज माझ्या भेटीकरतां रायगडीं आले आहेत व समर्थांच्या दर्शनास येण्याची त्यांची फार इच्छा आहे. तरी आज्ञे-प्रमाणें करीन. समर्थ म्हणाले "ठीक आहे. घेऊन या." त्याप्रमाणें रायगडा-हून शहाजीमहाराज, जिजाऊसाहेब, तुकाबाई (व्यंकोजीमहाराजांची आई) वगैरे मंडळी परळीवर समर्थांच्या दर्शनास आली. त्यांनीं अत्यंत भक्ति-भावानें समर्थांचें दर्शन घेऊन यथाविधि पूजन केलें. तेव्हां समर्थांनींही त्यांचा सत्कार करून सर्वांस त्रिरात्र राहण्याविषयीं आज्ञा केली. नंतर समर्थांचीं व शहाजीमहाराजांचीं भाषणें सुरू झालीं. त्यांत शहाजी-महाराजांनीं शिवाजीमहाराजांनीं राज्य आक्रमण करण्याच्या उद्योगास लागल्यापासून काय काय वर्तमान झालें तें थोडक्यांत निवेदन केलें. व त्याप्रीत्यर्थ विजापूरचे बादशहानें आपणांस भिंतींत चिणण्याचा प्रसंग आणला होता, त्यांतून ईश्वरकृपेनें आपण कसें पार पडलों इत्यादि मजकूर निवेदन केला. आणि शेवटीं हात जोडून म्हणाले "महाराज! आतां शिवबा सर्वस्वी आपला आहे. आपल्या आशीर्वादेंकरूनच त्यास राज्य प्राप्त झालें. तेंही आपलेंच आहे. ह्याकरितां पुढेंही त्याच्या माना-भिमानाचे धनी आपणच आहांत." ही विनंति ऐकून समर्थ म्हणाले

" शिवाजीराजांचे पराक्रम तुम्ही कर्णोपकर्णीं ऐकले असतीलच. शाहिस्तेखानाच्या वेळेस केवढी अमानुष कृत्यें केलीं तींही तुम्हाला माहींत असतीलच. तुमचें पूर्वार्जित पुण्य आहे व श्रीदेवीनें तुमच्या पूर्वजांना वर दिलेलाच आहे. त्यामुळेंच तुमच्या उदरीं असा हा प्रतापशाली शूर पुत्र जन्मास आला आहे. त्याच्यावर श्रीरघुपतीची परिपूर्ण कृपा आहे. तुम्ही त्याची मुळींच काळजी करूं नये."

हें समर्थांचें प्रेमळ भाषण ऐकून शहाजीमहाराजांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. कंठ सद्गदित झाला. त्यांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घालून व त्याच्या तेथील श्रीचा प्रसाद वगैरे सेवन करून नंतर निरोप घेतला आणि ते सहकुटुंब पुन्हा रायगडास निघून गेले. समर्थांनीं शिवाजी महाराजांस मागें ठेवून घेतलें होतें.

**मातृदर्शन**—शहाजीमहाराजांची स्वारी समर्थांचें दर्शन घेऊन गेल्यानंतर शिवाजीमहाराज पाठीमागें राहिले होते. त्यांजपाशीं समर्थांनीं गोष्ट काढली कीं, " शिवबा! मातोश्रीस भेटून फार दिवस झाले. व त्यांचें पत्रही आलें होतें. याकरितां आम्ही जाऊन एकदां मातोश्रींचें दर्शन घेऊन येतों." शिवाजीमहाराज म्हणाले " मीहि सैन्य घेऊन बरोबर येतों." समर्थ म्हणाले " शिवबा! येवढी खटपट कशाला? मी एकटाच जाऊन लौकरच परत येतों." राजेश्री म्हणाले " जशी आज्ञा. परंतु महाराजांनी लौकर येण्याची मात्र कृपा केली पाहिजे. नाहींतर हे चरण दूर झाल्यावर जिवास चैन पडत नाहीं." समर्थ म्हणाले " ठीक आहे. आम्ही लौकरच परत येऊं. काळजी नसावी." नंतर शिवाजीमहारास समर्थांचा निरोप घेऊन रायगडीं गेले व समर्थही कांहीं शिष्यमंडळीस बरोबर घेऊन जांबेस गेले. मातोश्रीस व श्रेष्ठांस अत्यंत प्रेमानें भेटून व वंदन करून थोडे दिवस त्यांच्या सहवासांत व भक्ति प्रेमाच्या महोत्सवांत राहून नंतर 'आम्ही कांहीं दिवस मातापूराकडे जाऊन येतों' म्हणून उभयतांची आज्ञा घेऊन मातापुरास गेले.

**श्रीदत्तात्रयाचें दर्शनः**—समर्थांची स्वारी मातापुरास जातांच प्रथम त्यांनीं तेथील देवीचें दर्शन घेतलें. नंतर तेथें एक दत्तात्रयाचें जागृत स्थान आहे तेथें दर्शनास गेले. उद्धव गोसावी व कल्याणस्वामी मात्र

बरोबर होते तेथें जातात तों बरीच ब्राम्हण मंडळी अनुष्ठानास बसलेली दृष्टीस पडली. त्यांस पाहतांच समर्थांनीं त्यांस साष्टांग नमस्कार करून विचारलें कीं, "आपण कशासाठीं अनुष्ठान आरंभिलें आहे ?" ब्राह्मण म्हणाले "श्रीदत्तात्रयाचें दर्शन घडावें म्हणून आम्ही अनुष्ठान करीत आहोंत." हें ऐकून समर्थ म्हणाले "हा योग तर उत्तमच आहे. आम्हीही आपल्याबरोबर अनुष्ठानास बसतों, म्हणजे आपल्याबरोबर आम्हालाही दत्तात्रयाचें दर्शन घडेल." असें म्हणून स्नान वगैरे करून आपण स्वतः, उद्धव गोसावी व कल्याणस्वामी असे त्रिवर्गही तेथेंच त्या ब्राह्मणांबरोबर अनुष्ठानास बसले.

घटका दोन घटका गेल्या असतील नसतील तोंच श्रीदत्तात्रय महाराजांची स्वारी मलंगाच्या रूपानें प्रत्यक्षच तेथें येऊन पोंचली. बरोबर एक बायको, [ ही माया होय. ] तीन मुलें, [ त्रिगुण ] पंचवीस कोंबडीं, सहा बकरीं, [ षड्रिपु ] एक रेडा [ अहंकार ] व त्यावर हें सर्व लादलेलें. हें सर्व लटंबच्या लटंबर त्या देवालयापाशीं येऊन दाखल झालें. तीं तेथील प्रशस्त जागा पाहून खांसाहेब बीबीसाहेबास म्हणाले "जगा तो बहोत अच्छा है. इसवास्ते यहां हंडी पकाना. फेर जाना." असें सांगतांच त्या स्त्रीनें तो रेडा उभा केला, त्याचेवरचें सर्व सामानसुमान उतरलें. आणि एक मोठा चुला तयार करून त्यावर एक धागर पाणी राहील येवढी हंडी चढवून खांसाहेबांस विचारलें कीं, "हंडीमें क्या डालना ?" फकीर बोलला "मुरगी काटकर डालो." असें म्हणतांच तिनें ती बरोबर असलेलीं पंचवीस कोंबडीं कापून त्यांत टाकलीं. तथापि मडकें रिकामेंच राहिलें. तें पाहून त्या स्त्रीनें सांगितलें कीं "हंडी भरी नहीं." असें म्हणतांच फकीर म्हणाला "बकरीं काटकर डालो." त्याप्रमाणें तीं सहाही बकरीं कापून घातलीं आणि पुन्हा सांगितलें कीं "अबतग हंडी भरी नहीं." त्यावर तो फकीर बोलला "रेडा काटकर डालो" त्याप्रमाणें तिनें रेडा कापून त्याचेंही सारें मांस त्या हंडींत घातलें व पुन्हा म्हणाली "हंडी तो नहीं भरता." फकीर म्हणाला "अच्छा ! अबी बचे काटकर डालो." असें म्हणतांच तिनें तीं मुलें कापून त्यांच्या हातापायांचे तुकडे करून टाकले व पुन्हा म्हणाली "हजरत ! अबीतक हंडी भरी नहीं"

हें ऐकतांच फकीर बोलला " क्या ? अबीतक हंडी नहीं भरी ? अच्छा ! ओ बम्मन लोक बैठे है उसकू काटकर उसमे डालो." असें म्हणतांच त्या बाईनें मोठा थोरला सुरा हातांत घेतला, आणि ती त्या अनुष्ठानास बसलेल्या ब्राम्हणांच्या अंगावर धांवली !

ब्राम्हणांनीं त्या बाईचें पूर्वीचें कर्म पाहिलेलेंच होतें. जिनें स्वतःचीं पोरें कापावयास मागें पुढें पाहिलें नाहीं, ती इतरांचा जीव काय ठेवणार ? हें जाणून कडासनें, गोमुख्या, माळा, पळीपंचपात्र्या जागच्या जागीं टाकून सारे ब्राम्हण भराभर पळत सुटले. कशाचें अनुष्ठान आणि कशाचें काय ? सार्‍यांना ' दे माय धरणी ठाय' असें होऊन गेलें. समर्थ, उद्धव गोसावी व कल्याणस्वामी मात्र आपल्या आसनांवरून हालले नाहींत ! तें पाहून ती स्त्री त्या फकीराजवळ जाऊन त्यास म्हणाली " हजरत ! बम्मन तो सब भाग गये ! अबी तीन अब्भी बैठ रह्या है. " फकीर म्हणाला " फिकीर नाहीं. ओ तीन अब्भीकूच काटना." असें म्हणतांच ती बाई सुरा घेऊन समर्थांच्या जवळ येतांच समर्थांनीं आपली मान तिच्यापुढें केली ! तें पाहतांच ती बाई म्हणाली " नहीं नहीं, तुमकू नहीं. पहिले ओ दोनोकू काटेंगा." असें म्हणून समर्थांस सोडून उद्धव गोसावी व कल्याणस्वामी बसले होते त्यांच्याकडे धांवली. त्यांनींही आपल्या माना पुढें केल्या. हें पाहतांच ती बाई एकदम अदृश्य झाली ! तो फकीरही दिसेनासा झाला व हंडी वगैरे सर्व सामानही कोठें गडप्प झालें ! इतक्यांत देवालयाच्या गाभार्‍यांतून मेघनाद झाला कीं 'रामदासा ! आंत ये.' त्याप्रमाणें समर्थ उठून देवालयांत गेले तों श्रीदत्तात्रय प्रत्यक्ष स्वरूपानें प्रगट होऊन समर्थांस आलिंगन दिलें. आाण विचारिलें कीं " तुम्ही दर्शनास आला असून आंत कां आला नाहीं ? ब्राह्मणांतच कां बसला ? " समर्थ हात जोडून म्हणाले " महाराज ! सर्व ब्राह्मण आपल्या दर्शनासाठीं अनुष्ठान करीत बाहेर बसले होते, त्यांच्या बरोबरच दर्शन होईल म्हणून बसलों होतों." दत्तात्रय महाराज म्हणाले " दर्शन देण्याइतकी त्या ब्राह्मणांच्या अंगीं पात्रता नाहीं. त्यांस आमचें दर्शन घडावें कसें ? तुम्ही धैर्य धरून बसला, तसे ते कां बसले नाहींत ?" समर्थांनीं सद्गदित अंतःकरणानें श्री अवधूत-चरणावर मस्तक ठेवलें. आणि प्रार्थना केली कीं, " ब्राह्मण बिचारे गरीब.

त्यांस स्वामींनीं दर्शन न देतां त्यांस भेवडावून पळवून लावलें, हें योग्य नाहीं. त्यांस दर्शन दिलें पाहिजे." दत्तात्रयांनीं सांगितलें कीं, " तुम्ही त्यास दर्शनाचे अधिकारी करा म्हणजे दर्शन देऊं." अशी आज्ञा करून दत्तात्रय महाराज अंतर्धान पावले.

नंतर समर्थांनीं उद्धव गोसावी व कल्याणस्वामी या उभयतांस पाठवून त्या पळालेल्या ब्राह्मणांस अभय देऊन परत आणले. ते चांगले कोस अर्ध कोस लांब गेले होते. त्या सर्वांस बोलावून आणले, व ते गेल्यापासून काय काय वृत्तांत झाला तो कल्याणस्वामींनीं व उद्धव गोसाव्यांनीं त्यांस इत्थंभूत निवेदन केला. तेव्हां त्या ब्राह्मणांस पश्चात्ताप झाला. त्यांनीं समर्थांचे चरण धरून त्यांस शरण आले व म्हणाले " आपण प्रत्यक्ष दत्तमहाराजच आहांत, आम्ही अज्ञानामुळें आपल्यास ओळखलें नाहीं, तरी आपण आतां सर्व अपराधांची क्षमा करून आम्हांस अनुग्रह प्रसाद देण्याची कृपा करावी." ती गोष्ट समर्थांनीं मान्य करून स्वयंपाक वगैरे सिद्ध करविला. सर्व ब्राह्मणांनीं भक्तिपूर्वक समर्थांची पूजा केली व समर्थांनीं त्यांस अनुग्रह दिला. नंतर दत्तात्रयाचें स्मरण करतांच पायीं पादुका, हातीं कमंडलु, अशी त्रिगुणात्मक मूर्ति प्रत्यक्ष प्रगट झाली. समर्थांनीं त्या सर्व ब्राह्मणांस व आपल्या शिष्यमंडळीस त्यांचें दर्शन करविलें आणि त्या सर्वांकडून पूजन करून नैवेद्य समर्पण केला. नंतर नवी आरती करून म्हटली ती:—

## ॥ आरती ॥

विधिहरिहर सुंदर दिगांबर झाले।
अनुसूयेचें सत्त्व पहावया आले॥
तेथें तीन बालक करूनी ठेविलें।
दत्त दत्त ऐसें नाम पावलें॥
जयदेव जयदेव जय दत्तात्रया।
आरती ओंवाळूं तुज देवत्रया॥
जयदेव जयदेव॥ धृ०॥ १॥

तिहीं देवांच्या युवती पति मागों आल्या।
त्यांना म्हणे वळखुंनि न्या आपुल्याला॥
कोमळ शद्बं करुनी करुणा भाकील्या।
त्यासी समजावील्या स्वस्थानीं गेल्या॥
जयदेव जयदेव०॥॥२॥

काशी स्नान करवीर क्षेत्रीं भोजन।
मातापुरीं शयन होतें प्रतिदीन॥
तैसें हें अघटित सिद्धं महिमान।
दास म्हणे हेंतों नव्हे सामान्य॥
जयदेव जयदेव०॥३॥

ह्याप्रमाणें आरती व पूजा झाल्यानंतर श्रीदत्तात्रयांनीं जो मी तोच रामदास अशी भावना धरून यांचीच निरंतर सेवा करावी असें सर्वांस सांगून अदृश्य झाले. नंतर ब्राह्मणमंडळीसहवर्तमान समर्थांनीं भोजन केलें आणि तेथें त्रिरात्र वास्तव्य करून नंतर स्वारी पुढें निघाली.

इंदूरची पर्जन्यवृष्टि—समर्थ मातापुराहून फिरत फिरत निघाले ते जे जे कोणी शरण येतील, त्यांच्यावर अनुग्रह प्रसाद करीत करीत व ठिकठिकाणीं मठ स्थापन करीत चालले. ते श्रीरंगपूर नजीक इंदूर येथें येऊन पोंचले. तेथें एक मोठा बाग असून त्यांत एक मोठा विस्तीर्ण व रमणीय तलाव होता त्या ठिकाणीं उतरले. तों त्या गांवांत पर्जन्य नव्हता म्हणून ग्रामस्थांनीं ६० ब्राह्मण पर्जन्याकरितां त्या तलावांत अनुष्ठानास बसविले होते. ते कमरेइतक्या पाण्यांत उभे राहून मंत्र जप करीत होते. इतक्यांत समर्थांची स्वारी तेथें जाऊन पोंचली. त्या ब्राह्मणांस पाण्यांत उभे राहिलेले पाहून समर्थांनीं त्यांस विचारिलें "तुम्ही पाण्यांत उभे कां?" तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "आम्हांला गांवच्या अधिकाऱ्यांनीं पर्जन्य पडावा म्हणून अनुष्ठानास बसविलें आहे. म्हणून आम्ही पाण्यांत उभे राहून पर्जन्यसूक्त पठण करीत आहों." त्यांस समर्थ म्हणाले "आम्ही सांगूं त्याप्रमाणें तुम्ही अनुष्ठान करीत असाल तर आज दुपारानंतर हवा तितका पाऊस पडेल." हा कोणीतरी विरक्त व साधु पुरुष असावा व ह्याच्या

बोलण्यांत कांहींतरी सामर्थ्य असावें असें वाटून सर्व ब्राह्मण म्हणाले "ठीक आहे. दुपारींच जर पाऊस पडेल तर आम्ही आपण सांगाल तसें अनुष्ठान करण्यास तयार आहों."

हें ऐकून समर्थांनीं सर्व ब्राह्मणांस पाण्यांतून बाहेर बोलावलें आणि तेथें एक मोठा दगड पडलेला होता, त्यावर एक कोळशानें प्रताप मारुतीचें ध्यान रेखटलें आणि त्यावर छाटी घालून त्याच्यावर महारुद्राचा अभिषेक करावा म्हणून सांगितलें. त्या सर्व ब्राह्मणांनीं समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महारुद्राचा अभिषेक सुरूं केला. समर्थ बोलले "अभिषेक होऊन पूजा नैवेद्य होऊन भोजन आटोपल्यानंतर पर्जन्य पडेल."

नंतर समर्थांनीं उद्धवास स्वयंपाक तयार करावयास सांगितलें. त्याप्रमाणें मंडळी स्नानें करून तयार झालीं. परंतु स्वयंपाकाला भांडींही नाहींत, व साहित्यही नाहीं. आणि समर्थ तर सर्वांस घाई करूं लागले. तेव्हां सारेच विचारांत पडले. एकानें समर्थांस जाऊन विनंति केली कीं "महाराज! स्वयंपाकाला भांडींही नाहींत व साहित्यही नाहीं. तेव्हां स्वयंपाक कसा करावा?" समर्थ म्हणाले "जा; त्या पलीकडच्या जाळींत भांडीं व साहित्य आहे तें आणा, आणि लौकर आटोपा." अशी आज्ञा होतांच सर्व मंडळी जाऊन पाहतात तों जाळींत सर्व साहित्य व भांडींकुंडीं तयार आहेत. नंतर सर्व मंडळी स्वयंपाकास लागली. समर्थांनीं स्नान वगैरे करून पूजेस बसले. समर्थांची पूजा संपते तों ब्राह्मणांचा अभिषेकही आटोपला.

तेव्हां समर्थांनीं जाऊन त्या दगडावरची छाटी काढली, तों त्या दगडावर टाकीनें घडविल्याप्रमाणें प्रताप मारुतीची मूर्ति कोरून तयार झालेली दृष्टीस पडतांच सर्व लोकांस परमाश्चर्य वाटलें. नंतर समर्थांनीं त्याची पूजा आरती वगैरे करून त्यास नैवेद्य समर्पण केला. आणि मग सर्व ब्राह्मणांसहवर्तमान समर्थांनीं भोजन केलें. विडा दक्षणा देऊन मंडळी बसली आहेत तोंच आकाशांत ढग आले आणि घटके दोन घटकेच्या आंत इतका मुसळधार पाऊस कोसळला कीं, जिकडे तिकडे सारें पाणीच पाणी होऊन गेलें. पण त्यांत आणखी एक चमत्कार असा दृष्टीस पडला कीं स्वामी जेथें बसले होते, तेथें पावसाचा थेंब नाहीं!

असा विलक्षण चमत्कार पाहून ब्राह्मण लोक समर्थांची स्तुति करीत बसले आहेत, तोंच गांवांतील लोक असा अचानक आलेला पर्जन्य पाहून फार आनंदित होत्साते अनुष्ठानास बसविलेल्या ब्राह्मणांचे धन्यवाद गाऊं लागले. इतकेंच नव्हे, तर त्या ब्राह्मणांस वाजत गाजत मिरवणुकीच्या समारंभानें गांवांत आणावें असा बेत करून सर्व मंडळी वाजत गाजत समारंभानें ब्राह्मणापाशीं गेली. तेथें पाहतात तों सारे ब्राह्मण समर्थ स्वामी-सहवर्तमान आनंदांत बसले आहेत. सर्व ग्रामस्थांस पाहून ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, "हा जो पाऊस पडला तो आमच्या अनुष्ठानानेंच पडलेला नाहीं, तर ह्या समर्थ रामदासस्वामींच्या प्रसादानें पडला." असें म्हणून त्यांनीं समर्थांनीं केलेला सर्व वृत्तांत त्यांस निवेदन केला. आणि म्हणाले "आतां आपल्याला जो काय समारभ करावयाचा तो स्वामींचा करावा. तें सर्व ऐकून गांवकऱ्यांस तर वाटलें कीं समर्थ हे साक्षात् ईश्वरच आहेत. त्या सर्वांनीं जाऊन त्या प्रताप मारुतीचें दर्शन घेतलें आणि स्वामींपाशीं येऊन "आम्ही सर्व दीन आपल्यास शरण आलों आहोंत तरी कृपा करून गांवांत चलावें." अशी प्रार्थना करून त्यांनीं समर्थांस मोठ्या समारंभानें वाजत गाजत गांवांत नेलें. येथें त्यांस उत्तम स्थळ वगैरे रहावयास देऊन तेथें म्हणजे इंदुरास एक मठही स्थापन केला. तेव्हां समर्थांनीं तेथें कोदंडधारी ध्यानाची श्रीरघुपतीची मूर्ती स्थापन करून प्रताप मारुतीपाशींही एक मठ केला व कांहीं दिवस इंदुरास वास्तव्य केलें. तेथें असतांना समर्थ कधीं इंदुरास रहात व कधीं खडीवर मारुतीपाशीं रहात. तेथें शरण येतील त्यांस उपासनानुग्रह देतां देतां तेथेंही मोठाच सांप्रदाय वाढला. एक वर्षानंतर परत जाण्याची तयारी केली.

परंतु तेथें शिष्य समुदाय व भक्त ह्यांचा भरणा फारच मोठा झाल्यानें सर्वांचा आग्रह पडला कीं. आम्हांस नित्य दर्शनाकरितां स्वामींनीं निरंतर येथेंच रहावें. त्यांस समर्थांनीं उत्तर दिलें " आम्हांस पृथ्वीपर्यटण करणें आहे. एके ठिकाणीं राहून कसें चालेल? आतां तुमचा फारच आग्रह आहे तर उद्धवगोसावी ह्यांस येथें ठेवतों. सर्वांनीं ह्याची सेवा करावी. म्हणचे आम्हांस पोचली.' असें सांगून समर्थ निघाले. तेव्हां उद्धवगोसावी यास समर्थांच्या वियोगदुःखाचा उमाळा येऊन तेही फार गयावया करूं

लागले. त्यांचीही समर्थांनीं समजूत केली कीं, "तुम्ही कांहीं दिवस येथें रहा आणि मग आम्हाकडे या" असें सांगून निघतांना पूर्वी जो मारुतीची स्थापना केली होती, तिच्या मागें एक डोंगर असून त्या डोंगरावरून पाण्यांत एक मोठा धबधबा पडत होता, त्या धबधब्याखालीं कड्यांत बसण्यासारखी एक जागा होती, तेथील दगडावर समर्थांनीं एक सवाई लिहून ठेवली. ती अशी आहे:—

## ॥ सवाई ॥

**श्रीरामभक्त मूळ रे । प्रसन्न सानुकूळ रे ॥**
**समर्थ ता तया गुणें । तयास सर्व ठेंगणें ॥ १ ॥**

ही सवाई अद्यापही तेथें कोरलेली आहे. असें म्हणतात समर्थांनीं तेलंगी भाषेंतील पुष्कळ कविता केलेली आहे. व ती त्या प्रांतांत प्रसिद्धही आहे. शके १५७५ सालीं समर्थ इंदुरास राहिले होते.

तुपाची धार:—समर्थ जांबेहून निघाले ते मतापुरास जाऊन एक वर्षानें परत जांबेस गेले. व मातोश्रींचें व श्रेष्ठांचें दर्शन घेऊन कांहीं दिवस तेथें राहिले. तों शके १५७४ *नंदननाम संवत्सरांतील चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्रीरामनवमीचा उत्सव समारंभ आला. व तो नवमी-

---

* ह्या गोष्टीच्या संबंधानें दोन बखरींत दोन भिन्न भिन्न शक आढळतात. एका बखरींत असें आहे कीं, श्रेष्ठांनीं आपला अंतकाळ समीप आला असें जाणून व समर्थांच्या भेटीसही फार दिवस झाले हें मनांत आणून समर्थांस जांबेस बोलवलें व ते गेले. त्या वेळीं शके १५९९ सालचा रामनवमीचा उत्सव पडला. व त्या उत्सवांत ही गोष्ट घडली. परंतु दुसऱ्या बखरींत १५७४ शकांतील उत्साहांत ही गोष्ट घडल्याचा उल्लेख आहे. व त्यांत 'नंदन' नाम संवत्सर दिला आहे हें विशेष आहे. तो दुसऱ्या बखरींत नाहीं. ह्यावरून हा १५७४ शक बरोबर असावा हें अधिक सयुक्तिक दिसतें. म्हणून तोच शक आम्ही या गोष्टींत नमुद केला आहे.

पर्यंत यथासांग पार पडला. दशमीच्या दिवशीं पारण्याचा समारंभ होता. सारा स्वयंपाक सिद्ध झाला. श्रेष्ठांनीं श्रीची पूजा करून 'नैवेद्य आणा' म्हणून आज्ञा केली. परंतु तूप आणावयासाठीं कृष्टीस मनुष्य पाठविला होता तो अद्याप आला नव्हता, त्यामुळें नैवेद्य बाहेर येईना. तेव्हां श्रेष्ठ पुन्हा म्हणाले "उशीर झाला; ब्राह्मण येऊन बसले, अद्याप नैवेद्य कां येत नाहीं ?"

हें ऐकून श्रेष्ठांचे चिरंजीव रामचंद्रबावा हे बाहेर जात व पुन्हा आंत येत अशा त्यांच्या सारख्या खेपा चालल्या होत्या, परंतु तूप कांहीं येईना व श्रेष्ठ तर रागें भरूं लागले. रामचंद्रबावांचें तोंड अगदीं उतरलें हें पाहून समर्थांनीं रामचंद्र, कारभारी व शिष्यमंडळी यांस जवळ बोलावून विचारलें कीं "कांहो ? उशीर कशाचा ?" तेव्हां रामचंद्रबावांनीं विनंति केली कीं, "तूप आणावयास जे गृहस्थ पाठविले आहेत ते अद्याप आले नाहींत. स्वयंपाक तर तयार आहे. पण तुपावांचून नैवेद्याचा खोळंबा आहे. म्हणून श्रेष्ठ रागें भरतात."

हें ऐकून समर्थ कारभाऱ्यास म्हणाले "ही तरतूद पूर्वींच करावयाची होती. आतां श्रेष्ठ रागें भरत आहेत; मुलांनीं तोंडें थेवटीशीं केलीं आहेत, हें काय ? असो. आतां तुम्हांपैकीं कोणी तरी एकानें सडा घालावयाचीं मडकीं व घागरी आहेत त्यांपैकीं एक घागर धुऊन विहिरींतून भरून आणा." अशी आज्ञा होतांच मुंजे ह्या उपनामाचा श्रेष्ठांचा एक शिष्य होता, त्यानें लागलीच जाऊन एक मातीची घागर घेऊन ती धुऊन विहिरींतील पाण्यानें भरून आणली. ती समर्थांच्या पुढें ठेवतांच समर्थांनीं त्या घागरीवर वस्त्र झांकून हस्तस्पर्श केला आणि मुंजे यांस सांगितलें कीं, आतां यांतील तूप काढून वाढावें. तेव्हां त्यानें लहानसें भांडें घेऊन त्यांतील तूप काढून दिलें. तें तूप नैवेद्यावर वाढतांच श्रेष्ठांनीं श्रीस नैवेद्य समर्पण केला आणि मग ब्राह्मणांचीं पानें वाढलीं. नंतर पंक्तींत तूप वाढावयाचें तेंही मुंजे यांजकडूनच काढून घेऊन वाढविलें, नंतर पुढचीं मागचीं सर्व भोजनें झालीं. नंतर वाढणारांचीं व इतर जातींचीं भोजनें होईपर्यंत मुंजे उपाशी राहून तूप वाढीतच होते. सर्वांचीं भोजनें झाल्यानंतर "आतां काय आज्ञा !" म्हणून मुंजे ह्यांनीं समर्थांस

विनंति केली. समर्थांनीं रामचंद्रबावास बोलावून सांगितलें कीं, " ही घागर धुऊन जपून ठेवावी. आणि पुन्हा दशमीच्या दिवशीं पारण्यास या घागरींतून तूप घालून हिची पूजा करावी आणि मुंजे ह्यांच्या हातानेंच तूप वाढवीत जावें, म्हणजे कितीही पात्रें होवोत तितक्यांना तूप पुरेल" म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाणें ती घागर धुऊन जतन करून ठेवली. आणि श्रेष्ठांस विनंति केली कीं, "समर्थांनीं घागरींतून पाणी आणवून त्यांतून तूप वाढविलें आणि ही घागर जतन करून ठेवण्याविषयीं सांगितलें." इत्यादि वृत्तांत समग्र सांगितल्यावरून श्रेष्ठ म्हणाले "ही केवळ तुझीच बेगमी केली असा अर्थ नाहीं, तर तुझ्या वंशाचीहि बेगमी करून ठेवली. ह्यःकरितां ही घागर फार जतन करून ठेवावी." म्हणून चिरंजीवास आज्ञा केली. ही घागर अद्याप पावेतों आहे. पांचशें किंवा पांच हजार पात्रें झालीं तरी त्यांतलि तूप सर्वांस पुरतें. तोटा म्हणून कधीं पडत नाहीं. [ असा बखरींत उल्लेख आहे. ]

**सर्पदंश**—समर्थस्वामींपाशीं इतकी शिष्यमंडळी जमलेली होती; त्यांना समर्थांचा निरंतर सहवास घडत असे; समर्थांचा उपदेश अहोरात्र त्यांच्या कानीं पडत असे; तरी त्यांचे षड्रिपु त्यांच्या ताब्यांत होते असें नाहीं. ते कमी जास्त प्रमाणानें त्यांच्यामध्यें दृष्टीस पडत असत. कोणावर आपल्यापेक्षां समर्थांची कृपा अधिक आहे असें पाहिलें कीं, ते त्याचा हेवा दावा करीत. आणि समर्थांची अधिक कृपा म्हणजे काय ? तर कोणतेंही काम सांगणें ही. समर्थ अमक्या अमक्याला काम सांगतात, मला सांगत नाहींत; याबद्दलच पुष्कळांना वाईट वाटत असे. परंतु ज्याची भक्ति अधिक दिसून येई त्यासच समर्थ पुनःपुन्हा काम सांगत, पण त्याबद्दल इतरांस हेवा वाटे. समर्थांवर कल्याणस्वामींची जितकी निष्ठा होती, तितकी इतर कोणाचीच नसे. म्हणून समर्थ केव्हांही हांक मारणें झाली, किंवा काम सांगणें झालें तर तें कल्याणस्वामींसच सांगत. हें पाहून बाकीचे इतर शिष्य कल्याणस्वामींचा अतिशय मत्सर करीत.

एके दिवशीं समर्थ रामघळींत असतां मध्यान्ह रात्रीं " कोणी तरी विडा घेऊन यारे !" असें समर्थ बोलले. म्हणून सर्व शिष्यमंडळी पान-

सुपारी पाहूं लागली. तों विड्याचीं पानेंच नाहींत! असें पाहून एकमेकांकडे पाहून बोलूं लागले, " समर्थांनीं तर विड्याची घाई लावली आहे आणि बटवींत तर पानें नाहींत तेव्हां आतां कसें करावें ? " ह्या विचारांत सारे आहेत तोंच समर्थांनीं पुन्हा हाक मारली. तेव्हां एका शिष्यानें जाऊन समर्थांस विनंति केली कीं, " पानें नाहींत; सुपारी आणतों. " हें ऐकून स्वामींनीं कल्याणास हाक मारली, आणि म्हणाले " कल्याणा ! विड्याचीं पानें नाहींतरे !" असें म्हणतांच " आज्ञा महाराज " असें म्हणून पानें आणण्याकरितां चाफळास जावयास निघाले. आणि पर्वत उतरून निम्यावर गेले तों ढळढळीत मध्यान्ह रात्र ! आंधार कोण डोळ्यांत बोट घातलें तर दिसावयाचें नाहीं ! तेथें रस्ता काय दिसणार ! त्यामुळें वाटेवर एक भला मोठा कृष्ण सर्प पसरला होता, त्याच्या शेंपटावर पाय पडतांच त्यानें त्यांच्या पायाच्या पोटरीला कडकडून दंश केला. त्यामुळें व्याकुळ होऊन 'रघुवीर समर्थ ! कृपा असावी !' असें मोठ्यानें म्हणून मूर्छना येऊन धाडकर जमिनीवर पडले ! हा कल्याणांचा शद्ब समर्थांच्या कानावर गेला. तेव्हां " समर्थ म्हणाले अरे ! कल्याणाला काय झालें ?" असें म्हणून उठले व कांहीं शिष्यांकडून चुडी पेटवून पर्वताखालीं गेले. तों कल्याणस्वामी मूर्छित पडले आहेत व कृष्णसर्प एकीकडे पसरला आहे. त्या सर्पास पाहून समर्थ म्हणाले " तूं ही अशी सर्वांना पीडा करणारा आहेस. ह्याकरितां तूं आतां येथें राहूं नकोस. निघून जा पाहूं. " असें म्हणतांच त्या सर्पानें फणी काढून स्वामींस एक प्रदक्षिणा करून तो निघून गेला. नंतर स्वामी कल्याणाजवळ जाऊन बसले आणि तेथें बहिरोबा होता, त्यास त्यांनीं नवस केला कीं, " माझ्या कल्याणाचें विष उतरून त्यास उठवावें म्हणजे आम्ही तुला अकरा मण गूळ वाटूं." असे म्हणून कल्याणाच्या मस्तकापासून पायापर्यंत सर्वांगावरून हात फिरविला आणि प्रेमार्द्र दृष्टीनें त्याच्याकडे पाहून " ऊठरे बाबा !" असें म्हणून त्यास उठविलें. त्या बरोबर कल्याणस्वामी सावध होऊन पानें आणण्यासाठीं पुढें निघाले. त्यांस समर्थ म्हणाले " बापा ! आम्हाला विडा पोंचला. आतां तूं जाऊं नको." असें म्हणून कल्याणाचा हात धरून त्यास घळींत घेऊन आले आणि 'झोळण्यांत पानें आहेत का नाहींत तीं पहा बरें,' अशी

कल्याणास आज्ञा केली. त्याप्रमाणें कल्याण झोळणा सोडून पहातात तों पानें सांपडलीं! तीं घेऊन कल्याणानें विडा करून दिला.

नंतर समर्थ सर्व शिष्यांस म्हणाले "पहा! कल्याणावरच स्वामींची कृपा का? त्यासच काम कां सांगतात? असा तुम्ही हेवा करीत होतां म्हणूनच आज मीं मुद्दाम तुमच्याचपाशीं विडा मागितला. पण 'घरांत पानें नाहींत' म्हणून तुम्ही स्वस्थ बसलांत! आणि कल्याणास पानें नाहींत म्हणतांच कांहीं एक विचार न करितां तो मध्यान्ह रात्रीं पाना-करतां निघाला. ह्यावरूनच तुमची निष्ठा कशी आणि त्याची निष्ठा कशी ह्याचा विचार करा." असें बोलतांच सर्व शिष्यांनीं खालीं माना घालून 'आम्ही सर्व अपराधी आहों' असें म्हणून समर्थांस साष्टांग नमस्कार घातला. तें पाहून स्वामी म्हणाले "हें पहा! कोणाचाही हेवा करीत जाऊं नये. आपल्या हातानें सेवा होईल तेवढी करीत जावी, आणि आनंदांत असावें. आम्ही काम सांगतों तें काम करणारासच सांगतों. तुम्हांसही सांगूं काळजी करूं नये." असा सदुपदेश करून सर्वांचें समाधान केलें.

**वेणूबाईची निष्ठा**—शके १५७६ तील रामनवमीचा उत्साह जवळ आला. तेव्हां त्याच्या साहित्याची जमवाजवम करण्यासाठीं आक्का बत्तीस शिराळ्याकडे जाण्यास निघाल्या. तेव्हां आपल्यामागें श्रींच्या सेवेंत अंतर पडूं नये म्हणून जातांना वेणूबाईस श्रींच्या स्वाधीन करून 'मी येईपर्यंत हिच्याकडून सेवा घ्यावी' म्हणून प्रार्थना केली, व आक्का निघून गेल्या. पण थोडे दिवस गेले नाहींत तोंच वेणूबाईस हिंवानें गांठलें, तें इतकें कीं, ती व्यथा त्यास अत्यंत दुःसह झाली. त्यामुळें उत्साहाचें साहित्य त्यांनीं चालविलें होतें त्यांत व्यत्यय येऊन तें तसेंच पडण्याची पाळी आली. कारण, त्यांच्यानें उठून सुद्धां उभे राहवेना. तेव्हां त्यांनीं कांहीं शिष्यांकडून आपणास श्रीरघुपतीपुढें बांधून उभे करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शिष्यांनीं त्यांस बांधून घातलें. अंगामध्यें हींव थडथड थडथड करीतच होतें. तरी तशा स्थितींतच त्यांनीं श्रीरघुपतीपुढें लक्ष लावून एक करुणापर अभंग म्हणण्यास सुरुवात केली. तो अभंग असाः—

## अभंग.

पतीत पावना जानकी जीवना।
अरविंद नयना रामराया ॥ १ ॥
आक्का गांवा गेली मज व्यथा झाली।
दयाळा राहिली नवमी तुझी ॥ २ ॥
आक्का गांवा जातां ऐका सीताकांता।
वेणीच्या आकांता पावा वेगीं ॥ ३ ॥
नवमी समारंभ पाहूं या बरवा ॥
मग देह राघवा जावो राहो ॥ ४ ॥
ऐकोनी करुणा अयोध्येचा राणा।
मूर्तीच्या नयना अश्रु आले ॥ ५ ॥
ऐकूनि वचन पतित पावन।
कृपेचा पवन वेणी खरी ॥ ६ ॥

ही प्रेमळ करुणास्पद दीनवाणी श्रवण करून श्रीरघुपतीच्या नेत्रांतून खरोखरच अश्रुधारा वाहूं लागल्या ! त्यांनीं आपल्या गळ्यांतील हार काढून तो वेणूबाईच्या गळ्यांत घातला. समर्थांनीं वेणूबाईच्या मागें उभे राहून तो सर्व प्रकार पाहिला. आणि एकदम पुढें येऊन म्हणाले " वेणे ! माझ्यापाशीं राहून देहास व्यथा झाली असतां देहाच्या ममतेस्तव श्रीस संकट घालावें येवढेंच शिकलीस वाटतें ? " हे शब्द ऐकतांच वेणूबाई दचकल्या ! आणि हात जोडून म्हणाल्या "उत्सवामध्यें भंग होऊं नये म्हणून असें केलें; देहाचा हेतु नव्हता." समर्थ म्हणाले " बरें; पुन्हा असें करूं नये." " आज्ञा." असें म्हणून वेणूबाई आपल्या कामास लागल्या. पण तेथपासून त्यांचें हींवही पार नाहींसें झालें ! ही गोष्ट शके १५७५ फाल्गुन शुद्ध ११ स झाली. नंतर १५७६ सालांतील उत्सव यथासांग पार पडला.

**माध्वपंथी सोंवळें !**—शंकराचार्य ज्याप्रमाणें अद्वैतमताचे संस्थापक, त्याप्रमाणें मध्वाचार्य हे द्वैतमताचे संस्थापक असून त्यांचा मठ उडपीस

असल्याचें सुप्रसिद्धच आहे. त्या मध्वाचार्यांच्या कानावर समर्थांची कीर्ति गेली कीं, समर्थ रामदामदासस्वामी म्हणून कोणी एक सत्पुरुष परम योग्य असून ते मारुतीच्या अंशानें निर्माण झाले आहेत. तेव्हां ही गोष्ट खरीच आहे कां लोकांनीं उगाच 'पराचा कावळा' केला आहे, ह्याचा पक्का शोध आणवावा आणि ते खरोखरच तसे अवतारी पुरुष असतील तर आपण त्यांच्या दर्शनास जावें, किंवा त्यांस आपल्या येथें आणवावेत, असा विचार करून त्यांनीं आपल्या शिष्यांपैकीं एक विद्वान्, चाणाक्ष असा शिष्य निवडून त्यास सांगितलें कीं "कऱ्हाड वांई प्रांतांमध्यें रामदास ह्या नामेंकरून एक अवतारी पुरुष उत्पन्न झाले आहेत. त्यांच्याकडे तुम्ही जाऊन त्यांची सर्व स्थिति व लक्षणें पाहून या." त्या शिष्यानें ती आज्ञा मान्य केली. तेव्हां मध्वाचार्यांनीं त्यांजबरोबर घोडा, स्वार, चाकरनोकर वगैरे सरंजाम देऊन त्यांची रवानगी केली. त्यांच्या बरोबर समर्थांस एक पत्रही पण दिलें होतें.

आचार्य निघाले ते मजलावर मजला करीत चालले. एके दिवशीं दुपारीं ते भोजनासाठीं एका नदीच्या काठावर उतरले. बरोबरचे स्वार, गडी, वगैरे चाकर होते तेही दुसऱ्या झाडाखालीं उतरून घोड्यास चंदी वैरण व आपल्यास भाकरी तुकडा करण्याच्या नादांत लागले. आचार्यांनीं आपला शिधा काढून घेतला आणि स्नानसंध्या करून भात झुणका तयार करून पान वाढून घेतलें आणि नैवेद्य समर्पण केला. आतां जेवावयास बसणार इतक्यांत पाहतात तों तांब्यांत पाणी नाहीं; तें संपलें. नदी अगदीं जवळच होती म्हणून ते उठले आणि तांब्या घेऊन तो नदीवरून भरून घेऊन परत पानाकडे आले. इतक्यांत पलीकडे कोठें एक कुत्रें लपून बसलें होतें तें चटकर पानाजवळ आलें. आचार्यांनीं तें लांबून पाहतांच 'हड! हड!' म्हणतच धांवत सुटले. तरी तितक्यांत त्या कुत्र्यानें त्या वाढून घेतलेल्या पानास तोंड लावलेंच! तेव्हां आतां काय करावें? मध्वाचार्य सांप्रदायी म्हणजे वैष्णवधर्मी लोक! तप्त मुद्रांकित! त्यांचें सोवळें किती! आपल्या हातानें स्वतः करून जेवावयाचें. दुसऱ्याच्या हातचें खावयाचें नाहीं; तेव्हां आचार्यांनीं मनांत विचार आणला कीं, आतां पान टाकून द्यावें तर उद्यां या वेळेपर्यंत पुन्हा अन्न मिळ-

णार नाहीं. बरें आतां पुन्हा स्वयंपाक करावा तरी त्रासच ! म्हणून त्यांनीं हिकडे तिकडे पाहिलें तो चाकर नौकर, कोणी झाडाआड कोणी नदीवर गेलेले. कुत्रें शिवल्याचें कोणी पाहिलेलें नाहीं. तेव्हां तुलसीपत्रानें तीर्थ सिंचन करून जेवावें असें मनांत आणून त्यांनीं त्याप्रमाणें तीर्थ प्रोक्षण केलें आणि जेवावयास बसले ! भोजन वगैरे उरकल्यानंतर रोजच्याप्रमाणें पुन्हा रस्त्याला लागले. व कांहीं दिवसांनीं चाफळास येऊन पोंचले.

आचार्यशिष्यांनीं चाफळास येतांच समर्थांची भेट घेतली आणि नमस्कार करून मध्वाचार्यांनीं दिलेलें पत्र समर्थांपुढें ठेवलें व स्वामी-कडील सर्व वर्तमान श्रुत केलें. मध्वाचार्यांचें मुद्रांकित पत्र पाहून प्रत्यक्ष दर्शन झाल्याप्रमाणें मानून समर्थांनीं त्यांस वंदन करून वाचून पाहिलें. आणि आलेल्या आचार्यांस आदरपूर्वक सांगितलें कीं, नैवेद्य सिद्ध आहे. आपण स्नान करावें. त्यावेळीं आचार्य-शिष्यांनीं विनंति केली कीं, "महा-राज ! आम्ही वैष्णव दुसऱ्यानें केलेल्या स्वयंपाकाचें आम्ही जेवण करीत नाहीं." हें ऐकून समर्थांनीं दिवाकर गोसाव्याकडून त्यांस सर्व साहित्य देवविलें. आचार्यांनीं स्नान वगैरे करून स्वयंपाक तयार केला. समर्थांनींही श्री रघुपतीस नैवेद्य समर्पण करून सांगितलें कीं, पंक्ती वाढून तयार कराव्यात; तूप मात्र वाढूं नये. तें आम्ही आपल्या हातानें वाढूं. असें सांगून मारुतीचें दर्शन घेऊन आले, तों पंगत वाढून तयार होती. आचा-र्यांनीं आपलें पान वाढून घेतलें. तें समर्थांनीं पाहून तुपाचें भांडें हातांत घेतलें आणि प्रथमच त्या आचार्यांच्या पानाजवळ जाऊन आपल्या हातां-तील द्रोण त्यांच्या पानावर ठेवून त्यांत तूप वाढलें. तें पाहून आचार्यांची मुद्रा अगदीं कावरी बावरी झाली. ते कपाळाला आठ्या घालून म्हणाले "आम्ही वैष्णव लोक ! स्वतः स्वयंपाक करून भोजन करणारे, दुसऱ्याचा स्पर्श झालेलें अन्न भक्षण करीत नाहीं अशी आपल्यास आम्ही पूर्वींच विनंति केली असतां आपण आमच्या पानाला स्पर्श केला त्यामुळें हें आमचें अन्न विटाळलें. आतां भोजन कसें करावें ?" समर्थ म्हणाले "आम्हीही वैष्णवच आहोंत, मग विटाळ कशाचा ?" आचार्य म्हणाले "आपणही वैष्णवच अहां हें खरें, परंतु तप्त मुद्रांकित नाहीं."

असें आचार्यांचें भाषण ऐकून समर्थ तुपाचें भांडें खालीं ठेवून

मोठ्यानें रडूं लागले ! हें पाहून सर्व शिष्य मंडळींनीं विनंति केली कीं, " महाराज ! आपण इतके कष्टी कां होता ?" समर्थ म्हाणाले " अहो ! ब्राह्मणानें आपल्या हातानें यातायात करून स्वयंपाक केला; पान वाढून घेतलें; आणि त्या भानाल की हो मी शिवलों ! त्यामुळें ब्राह्मणाचें भोजन अंतरलें. केवढा हा अपवित्र देह ! म्हणून मी रडतों." मंडळी म्हणाली " महाराज ! आपण श्रमी होऊं नये. आम्ही ब्राह्मणास पुन्हा साहित्य देतों. ते पुन्हा भात करून जेवतील." समर्थ म्हणाले " बापहो ! आचार्य स्वयंपाक करून जेवतील, पण त्याला चार घटका वेळ लागेल. त्यासाठीं सुद्धां मला वाईट वाटत नाहीं. पण माझा देह श्रीरघुपतीनीं इतका अपवित्र कां उत्पन्न केला ह्याचेंच मला दुःख होत आहे." शिष्य म्हणाले "महाराज ! हें काय आपण म्हणतां ?" हें ऐकून समर्थ तर गळा काढून मोठ्यानें ओकसाबोकशी रडूं लागले. मधून मधून कोणी विनंति केल्यास " माझा देह कुत्र्यापेक्षांही नीच हो !" असें वारंवार म्हणत.

हा विचित्र प्रकार पाहून व समर्थांचें तें भाषण ऐकून आचार्यांच्या मनाला वाटेंतील कुत्र्यानें विटाळलेल्या अन्नाची खूणगाठ पटली. ते चटकर उठले; त्यांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातला व म्हणाले " माझ्या अपराधाची क्षमा असावी. मी पानावर तीर्थ सिंचन करून नैवेद्य समर्पण करून भोजन करतों. आपण उठण्याची कृपा करावी. शिक्षा झाली येवढी पुरे झाली." समर्थांनीं विचारिलें " या देहाला तप्तमुद्रांकित देहाची योग्यता नाहीं काय ?" आचार्य हात जोडून म्हणाले " नाहीं असें कोण म्हणेल ? मी सर्वस्वी अपराधी आहे. आतां अधिक अंत पाहूं नये. मी जेवावयास बसतों आपण उठावें." हे ऐकून समर्थ हासले !

नंतर सर्व मंडळी पानावर बसून समर्थांसह आचार्यांचें भोजन झालें. समर्थांनीं त्या आचार्य-शिष्यांस कांहीं दिवस ठेवून घेऊन मग मोठ्या सत्कारपूर्वक निरोप दिला. निघतांना आचार्यानें समर्थांपाशीं पाय धरून एकांति विनंति केली कीं, " माझी फजिती झाली येवढी पुरे. आमच्या स्वामींपाशीं ह्याचा उच्चार होऊं नये." समर्थ हासले आणि मस्तकावर हात ठेवून म्हणाले " कांहीं चिंता करूं नये. स्वामींस आमचा साष्टांग

नमस्कार सांगावा व आम्ही रामेश्वरच्या यात्रेस येऊं तेव्हां आपल्या दर्शनास अवश्य येऊं असें सांगावें."

अशा रीतीनें आचार्य-शिष्यांची चाफळाहून रवानगी झाली. ते पूर्व पद्धतीप्रमाणें मार्ग क्रमण करीत उडपीस जाऊन पोंचले व त्यांनीं समर्थांच्या सामर्थ्याची आपल्या स्वामींपाशीं मनोभावें तारीफ केली, व ते साक्षात् मारुतीचे अवतार आहेत यांत तिळमात्र शंका नाहीं असें सांगितलें. नंतर स्वामींनीं त्यांस विचारिलें कीं 'समर्थांची स्वारी इकडे कधीं येणार आहे?' शिष्य म्हणाले "दक्षिण मानस यात्रा करावयास येऊं तेव्हां अवश्य येऊं, असें त्यांनीं सांगितलें आहे" हा सर्व वृत्तांत शके १५७६ जयनाम संवत्सरांत घडला.

**रामेश्वरची यात्रा**—समर्थांच्या मनांत रामेश्वरच्या यात्रेस जाण्याचा हेतु फार दिवसांचा होता. त्याप्रमाणें त्यांनीं शके १५७७ वैशाख शुद्ध द्वितियेला निघण्याची तयारी केली. भिकाजी गोसावी, आक्का, वेणूबाई वगैरे नेहेमींचीच शिष्यमंडळी बरोबर घेऊन समर्थ परळीहून निघाले. मार्गामध्यें जे कोणी भक्तीस लागून शरण येतील त्यांस अनुग्रह प्रसाद द्यावयाचा हें तर समर्थांचें व्रतच होतें. तोच क्रम चालतां चालतां चिकोडी येथें वस्तीस उतरले. तेथें तिमाजीपंत देशपांडे या नांवाचे एक भाविक गृहस्थ होते. त्यांनीं समर्थांचें तपस्तेज पाहून ते त्यांस शरण जाऊन त्यांनीं त्यांचा अनुग्रह प्रसाद घेतला. त्यांनीं समर्थांस आपल्या घरीं पांच चार दिवस ठेवून घेतलें. परंतु समर्थ निघाले तेव्हां समर्थांच्या वियोगाचें तिमाजी-पंतांस इतकें दुःख झालें कीं, तें पाहून समर्थांसही गहिंवर आल्यावांचून राहिला नाहीं. म्हणून त्यांनीं त्यांस श्रीरामपंचायतनाची मूर्ति पूजेसाठीं दिली* व ह्याची पूजा करून आपण स्वस्थ असावें असा आशिर्वाद देऊन समर्थ पुढें निघाले.

---

* ह्या मूर्तींच्या संबंधानें बखरीमध्यें एक गोष्ट मोठी अद्‌भुत लिहिलेली आढळते. ती अशी कीं, समर्थ चिकोडीहून गेल्यानंतर पुढें कांहीं दिवसांनीं तिमाजीपंत हे एके दिवशीं बहिर्दिशेस गेले असतां त्यांस सर्पदंश झाला. तेव्हां त्यांनीं हात पाय धुऊन शुचिर्भूत होऊन हातांत

समर्थ चिकोडीहून निघाले ते नेहेमींच्या क्रमाप्रमाणें अनुग्रह प्रसाद करीत करीत शिवकांची, विष्णुकांची, कुंभकोण, इत्यादि स्थानें पहात पहात चालले. वडदेसप्रांतीं कावेरीच्या उत्तरतीरीं आडपळें या गांवीं अप्पय्या दिक्षीत रहात होते. त्यांचीही समर्थांनीं मुद्दाम जाऊन भेट घेतली. ते साक्षात् श्रीशंकराचे अवतार आहेत अशी त्यांची प्रसिद्धि होती. त्यांस जाऊन भेटले.

नंतर समर्थांची स्वारी तंजावर प्रांतीं गेली. तंजावरालाच प्राचीन कालचे लोक ' चंदी चदांवर ' असें म्हणतात. तेथें शिवाजी महाराजांचे सापत्न बंधु व्यंकोजीराजे हे राज्य करीत होते. त्यांस समर्थ आल्याचें वर्तमान समजतांच ते लव्याजम्यानिशीं समर्थांस सामोरे जाऊन त्यांस आपल्या येथें घेऊन आले. त्यांना रहावयास उत्तम स्थळ देऊन जेवणाखाणाचा सर्व बंदोबस्त केला आणि आठ पंधरा दिवस त्यांना ठेवूनही घेतलें. व्यंकोजी महाराजांपाशीं एक आंध्र देशांतील विद्वान् ब्राह्मण असून त्यांचाच त्यांनीं अनुग्रह घेतलेला होत्या. महाराजांनीं समर्थांचे येवढें स्वागत केलें तें त्या आंध्रदेशस्थ शास्त्रीबुवांना खपलें नाहीं. ते समर्थांचें कांहींतरी उणें काढावयाची संधि पाहत होते. अखेर त्यांना तशीही एक बाजू मिळाली. त्यांनीं व्यंकोजी महाराजांदेखतच समर्थांपाशीं गोष्ट काढली कीं " आपण बहुत थोर, आपलें ब्रम्हचर्यव्रत ही मोठें, अशी

---

वीणा घेऊन समर्थांचे अभंग म्हणत ह्या मूर्तींपुढें रात्रीं भजन करीत बसले. पुढें पाहतात तों ती मूर्ति कृष्णवर्ण होतां होतां अगदीं काळी ठिक्कर पडली ! हें पाहून त्यांस अत्यंत दुःख झाले. कारण आपल्यास चढलेलें विष श्री रघुपतींनीं आपल्या अंगांत ओढून घेतलें ! हें पाहून त्यांनीं निश्चयपूर्वक रघुपतीची प्रार्थना केली कीं, " आपली मूर्ति पूर्ववत् न होईल तर मी कांहीं आपला देह ठेवणार नाहीं !" असें म्हणून त्यांनीं पुन्हा भजन सुरू केलें. तों त्या मूर्तींचा रंग पालटत पालटत उजडावयाच्या वेळेस सर्व मूर्ति पूर्ववत् झाली ! तेव्हां तिमाजीपंतांनीं दुसऱ्या दिवशीं मोठ्या आनंदानें ब्राह्मणभोजन घातलें. ह्या मूर्ति अद्याप पर्यंत तिमाजीपंत देशपांड्याच्या वंशजांच्या देव्हाऱ्यांत चिकोडीस आहेत.

कीर्ति ऐकण्यांत आहे, असें असतां स्त्रिया बरोबर असणें हें लौकिकांत विरुद्ध नव्हे काय?" हा शास्त्रीबोवांचा प्रश्न ऐकून समर्थ हासले व त्यांनीं शास्त्रीबोवांस व महारासांज एकांतीं नेऊन त्यांनीं त्यांस अद्भुत चमत्कार दाखविला. [ तो येथें देणें प्रशस्त दिसत नाहीं. ] तो पाहतांच त्या आंध्र-देशस्थ विद्वान् ब्राह्मणानें समर्थांस साष्टांग नमस्कार केला आणि आम्ही अपराधी आहों असें म्हणून तो समर्थांच्या पायावर लोळूं लागला. तेव्हां त्याचें अंतःकरण अत्यंत शुद्ध झालें असें पाहून समर्थांनीं त्यास उठवून पोटाशीं धरलें आणि म्हणाले कीं "तुम्ही बोलला तो लौकिक विचार खराच आहे." असें म्हणून त्यांनीं त्यांचें समाधान केलें. नंतर त्यांनीं स्वामींचे पुन्हा चरण धरल्यावरून समर्थांनीं त्यास अनुग्रह दिला.

नंतर समस्त ब्राह्मणांनीं व्यंकोजीराजे ह्यांसही विनंति केली कीं, समर्थ हे शिवाजी महाराजांचे गुरु आणि आम्हां सर्वांचेही गुरु आहेत. ह्यास्तव आपणही त्यांचा उपदेश घ्यावा. त्यावरून राजांनींही त्याप्रमाणें समर्थांची प्रार्थना करून ज्येष्ठ वद्य ३ शके १५७७ मन्मथ नाम संवत्सर ह्या दिवशीं अनुग्रह घेतला. प्रथम व्यंकोजी महाराजांनीं त्या आंध्रदेशीय शास्त्र्याचा अनुग्रह घेतलेला असून त्याच शास्त्र्यानें महाराजांस पुन्हा समर्थांचा अनुग्रह घेण्याविषयीं प्रार्थना केली ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. नंतर समर्थांची स्वारी कांहीं दिवस तंजावरास राहून पुढें जावयास निघाली.

तेव्हां व्यंकोजी महाराजांनीं विनंति केली कीं, "स्वामींनीं येथेंच वास्तव्य करावें, जाण्याचें मनांत आणूं नये. शिवाजीमहाराजापाशींच रहावें आणि आम्हापाशीं राहूं नये कीं काय? नेहेमीं राहवयाची कदाचित् मर्जी नसल्यास सहा महिने इकडे रहावें व सहा महिने तिकडे राहण्याची कृपा व्हावी." ह्यावर समर्थ हास्य करून बोलले "बापा! शिवबा व तुम्ही दोघेही मला सारखेच आहां. त्यांत अधिक उणें नाहीं. मग कांहीं दिवस येथें रहावें व कांहीं दिवस तेथें रहावें अशी वांटणी तरी कां करतां? आम्ही सतत तुमच्यापाशींच आहों. आम्ही नेहेमीं पर्यटनांत दिवस काढणारे. आम्हांस येथें म्हणा कीं तेथें म्हणा, सतत राहणें घडणार कसें?"

ही समर्थांची आज्ञा ऐकून समर्थांच्या वियोगाबद्दल राजे परम दुःख

करूं लागले. तेव्हां समर्थ त्यांस म्हणाले "तुम्हाला वियोगदुःख वाटूं नये असें करतों. असें म्हणून भिकाजीबावांस आज्ञा केली कीं "तुम्ही येथें मठ करून राजांपाशीं रहावें." तेव्हां भिकाजी बावांसही समर्थांचें दर्शन अंतरतें हें पाहून परम दुःख झालें. ते म्हणाले "मग आपल्या पायांचा वियोग होतो, त्याची वाट काय?" समर्थ म्हणाले तुम्ही जेव्हां जेव्हां मानसपूजा कराल, तेव्हां तेव्हा तुम्हांस माझें प्रत्यक्ष दर्शन होत जाईल."

नंतर मौनीबावा गोसावी प्रभृति त्रिवर्गास आज्ञा केली कीं, तुम्ही भिकाजी गोसावी यांजपाशीं रहावें. असें सांगून त्या सर्वांस चंदावरीं [ तंजावरास ] ठेवलें. आणि राजेश्रींस भिकाजीबावांच्या आज्ञेंत राहण्याविषयीं आज्ञा झाली. तेव्हां भिकाजीबावांनीं प्रार्थना केली कीं "महाराज! जें ध्यान मानस पूजेचें म्हणून सांगितलें, त्याप्रमाणें तसबीर काढून घेऊन उत्सव वगैरे करण्याची परवानगी असावी. म्हणजे आज्ञेप्रमाणें काय करणें तें करीन." त्यावर स्वामींची आज्ञा झाली कीं, "जेणेंकरून उपासना वाढून जगदुद्धार होईल त्या मानानें उत्सव करण्याची वहिवाट तुम्ही ठेवावी." अशी आज्ञा होतांच भिकाजीबावांनीं समर्थांच्या चरणावर मस्तक ठेवलें व समर्थांनींही वरदहस्त मस्तकीं ठेवला. ह्याप्रमाणें राजेश्रीसहित सर्वांचा निरोप घेऊन समर्थ तंजावराहून पुढें निघाले.

**समर्थांच्या अस्सल तसविरा**—भिकाजी गोसावी ह्यास तसबीर काढून घेऊन प्रतिवर्षीं उत्सव वगैरे करण्यास समर्थांची आज्ञा झाल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें भिकाजी गोसावी ह्यांनीं ती संधी वायां जाऊं दिली नाहीं. त्यांनीं समर्थांची स्वारी तंजावरीं होती तोंच त्यांची तसबीर स्वहतें काढून घेतली. त्यावेळीं फोटोग्राफीची कला इकडे नव्हती हें उघडच आहे. अशा वेळीं सुद्धां आपल्यांतील पुष्कळ लोक हातानें प्रतिमा हुबेहुब काढून घेत असत. ही किती आश्चर्याची गोष्ट बरें! भिकाजी बावांनीं समर्थांची तसबीर स्वहस्तें काढून घेतली याबद्दल त्यांचे जितके धन्यवाद गांवे तितके थोडेच होतील. हीच तसबीर हल्लीं परळीच्या मठांत आहे. त्याचप्रमाणें लक्ष्मण गोसावी ह्यांनीं शिरगांवांत असतांनाहि एक समर्थांची तसबीर काढून घेतलेली शिरगांवच्या मठांत आहे. ह्याच

दोन तसबिरा अस्सल होत. अर्वाचीन शास्त्राप्रमाणें जरी कांहीं त्यांत थोडें बहुत व्यंग असलें तरी त्या तसबिरा प्रत्यक्ष पाहून काढिलेल्या असल्यामुळें त्यांत पुष्कळ सादृश्य असलें पाहिजे हें उघड आहे. तीच राजा रविवर्म्यांनीं जी समर्थांची तसबीर काढलेली कितीही यथाशास्त्र असली, तरी तिच्या दर्शनानें व्हावें तसें मनाचें समाधानही होत नाहीं, व पूज्यबुद्धीही उत्पन्न होत नाहीं, तर उलट प्रकार मात्र होतो.

हा तंजावरचा सर्व वृत्तांत मौनी बाबांनीं लिहून ठेवलेला आहे.

**पुनरागमन**—तंजावराहून समर्थ निघाले ते श्रीरामेश्वरास गेले. तेथील सर्व तीर्थयात्रा करून पांचाळक्षेत्रीं श्रीराघवेंद्रस्वामी होते, त्यांस भेटून उडपी सुब्रह्मण्य क्षेत्रास गेले. त्या ठिकाणीं मध्वाचार्य स्वामींची भेट घेतली. ते पूर्वींपासूनच त्यांच्या भेटीविषयीं उत्सुक होते. त्यांस समर्थांच्या दर्शनानें फार आनंद झाला. त्यांनीं समर्थांस कांहीं दिवस परमादरानें ठेवून घेतलें, आदरसत्कार फार केला. सहवासाअंतीं समर्थ हे मारुतीचे अवतार आहेत अशी मध्वाचार्यांची पूर्णपणें खात्री झाली. मध्वाचार्यांचा निरोप घेतल्यानंतर समर्थांची स्वारी पुन्हा आपल्या शिष्यसमुदायासहवर्तमान कृष्णातीरीं येऊन पोंचली. हें वर्तमान शिवाजीमहाराजांस कळतांच ते त्यांस तोरगळपर्यंत सामोरे जाऊन मोठ्या समारंभानें चाफळास घेऊन आले. आणि कांहीं दिवस चाफळास राहून तंजावराकडे व्यंकोजीमहाराजांचें सर्व वर्तमान विचारून घेतलें. नंतर यासंबंधीं हकीगतही ऐकली आणि मग समर्थांची आज्ञा घेऊन ते रायगडीं गेले. ही सर्व हकीगत शके १५७७ तील आहे.

**मातोश्रींचें निर्याण**—पुढें एके दिवशीं समर्थांची स्वारी परळीवर असतां त्यांनीं आपल्या सर्व शिष्यांस जवळ हाक मारून सांगितलें कीं, "ह्या आमच्या खोलीचें दार लावून घऊेन बाहेरून कुलूप लावा व सोळाव्या दिवशीं उघडा. तोंपर्यंत आम्ही आंतच निजून राहणार आहों" शिष्यमंडळींना ती गोष्ट मोठी विलक्षण वाटली. परंतु समर्थांच्या आज्ञेला नाहीं होय म्हणण्याची कोणाचीच प्राज्ञा नव्हती. आणखी त्यांच्या कित्येक आज्ञा अशा विलक्षणही असत. त्यांचा उद्देश प्रथम कोणाच्याही लक्षांत येत नसे. त्याचें कारण मागाहून व्यक्त होत असे. ही नित्यपरिपाठांतीलच

गोष्ट असल्यामुळें शिष्यमंडळी समर्थांची आज्ञा कशी आणि काय ह्याचा विचारच करीत नसत. त्यांच्या आज्ञेप्रमाणें लागलेंच करावयाचें येवढेंच त्यांस माहीत असे. त्याप्रमाणें त्यांनीं समर्थांच्या खोलीचें दार लावून घेतलें व त्यास कुलूप लावून टाकलें. समर्थ आंतच बसले होते!

शिष्यमंडळींनीं बाहेरून कुलूप लावतांच समर्थ तेथून गुप्तरूपानें जे निघाले ते जांबेस जाऊन पोंचले. ह्याचें कारण असें कीं, समर्थांच्या मातोश्री राणूबाई ह्या वृद्धापकाळामुळें अतिशय थकून केवळ मरणोन्मुख झाल्या होत्या. त्यांची इहलोकची दुसरी कोणतीच आशा राहिली नव्हती. फक्त एक आशा राहिली होती. ती कोणती? तर अंतकाळीं माझा नारायण मला भेटावा आणि त्याकरितांच त्या समर्थ जांबेहून निघतांना त्यांनीं अतःपर देशांतरीं जाऊं नये म्हणून अतिशय काकुळतीस आल्या होत्या. परंतु त्यावेळीं समर्थांनीं त्यांस आश्वासन दिलें होतें कीं, "आई! तूं जेव्हां माझें स्मरण करशील तेव्हां मी तत्काल तुझ्या दर्शनास येईन." तीच वेळ ह्या दिवशीं येऊन ठेपली होती. राणूबाईचा जीव अगदीं घुटमळत होता. आतां काय आपण घटका अर्धघटकेच्या सोबती असें त्यांस वाटत होतें. म्हणून त्यांनीं श्रेष्ठांस जवळ हाक मारली, व मांडी देण्यास सांगितलें. श्रेष्ठांनीं मांडी देऊन मातोश्रींचें मस्तक मांडीवर घेतलें. त्यावेळीं मोठ्या आर्तस्वरानें त्यांनीं श्रेष्ठांच्या मुखाकडे पाहून विचारलें कीं, "माझा नारायण कोठें आहे?" आणि नारायण अशी मोठ्या दीनवाणीनें हाक मारली. त्याबरोबर समर्थ आंत जाऊन म्हणाले "आई! हा तुझा नारायण आला पहा. आतां भिऊं नको." हे प्रेमळ शब्द अंतकालीं कानावर पडतांच त्या माउलीला किती बरें आनंद झाला असेल? हे शब्द नव्हेत, तर ती एक अमृतधाराच तिच्या मुखांत पडून तिला तशा स्थितींतही नवजीवन प्राप्त झालें! त्या वेळीं खरोखर त्या बिचारीला नेत्र उघडण्यांची सुद्धां शक्ति राहिली नव्हती. तथापि ते आपल्या लाडक्या नारायणाचे शब्द ऐकतांच त्यांनीं चट्कन नेत्र उघडले. तोंच 'जयजयरघुवीरसमर्थ' असें म्हणून समर्थ मातोश्रींच्या जवळ जाऊन बसले. तेव्हां मातोश्रींनीं त्यांच्या पाठीवरून हात फिरवून त्यांस म्हणाल्या "तुम्ही उभयतां माझ्या पोटीं येऊन उभय वंशांचाही उद्धार केलात." असें म्हणतांच उभयतां नमस्कार करून

म्हणाले, " आई ! तूं आमचीच माता नसून केवळ जगन्माता आहेस. तुझ्या उदरीं जन्म घेऊन आमचेंही सार्थक झालें. तुमच्या पुण्यप्रतापेंकरून सर्व गोष्टी घडल्या. तुमच्या पुण्याईचें किती म्हणून वर्णन करावें ? आतां देहांत समयीं मूळस्वरूपीं लक्ष ठेऊन श्रीचें चरण अवयवयुक्त ध्यानांत ठेऊन तदाकार व्हावें." असें म्हणतांच मातोश्रींनीं 'उत्तम आहे' असें म्हणून 'जय राम' असा शब्द करून देह ठेवला ! हें मातोश्रींचें निर्याण ज्येष्ठ* शुद्ध ३ शके १५७७ मन्मथनाम संवत्सर या दिवशीं प्रातःकाळीं झालें. त्या समयीं करावयाचा पुत्रधर्म केल्यानंतर पंधरा दिवसांनंतर श्रेष्ठांची आज्ञा घेऊन समर्थ परळीस आले.

इकडे शिष्यमंडळींनीं आज्ञेप्रमाणें सोळाव्या दिवशीं खोलीच्या दाराचें कुलूप काढून दार उघडलें आणि आंत पाहतात तों समर्थ नाहींत ! तेव्हां ते कोणीकडे गेले असावेत या विचारांत मंडळी आहेत तोंच बातमी आली कीं, समर्थांची स्वारी आंगलाईच्या देवालयांत बसली आहे. तें ऐकतांच सर्व मंडळी आंगलाईच्या देवालयांत जाऊन त्यांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातले. आणि मुखाकडे पाहतात तों क्षौरविधि झालेला दृष्टीस पडला ! तो पाहून सर्वांनीं हात जोडून विनंति केली कीं " हें काय ?" समर्थ म्हणाले " आमच्या मातोश्री परंधामास गेल्या. ह्यास्तव पुत्रधर्म करावयाचा तो करून चौदा दिवस जांबेंत राहून श्रेष्ठांची आज्ञा घेऊन आलों. असें सर्वांस सांगून समर्थ आपल्या नेहेमींच्या स्थळीं आले. हें वर्तमान शिवाजीमहाराजांस कळतांच तेही समर्थांच्या दर्शनास येऊन त्रिरात्र वास्तव्य करून नंतर आज्ञा घेऊन परत गेले.

**एकनाथपंताची गोष्ट**—पैठणास एकनाथपंत कुळकरणी म्हणून एक गृहस्थ राहत असत. घरची गरीबी, बाप वयोवृद्ध झाला असून कुटुंबवत्सल. त्यामुळें प्रपंचाच्या निर्वाहास मोठी पंचाईत पडे. पीठ आहे तों मीठ नाहीं आणि मीठ आहे तों पीठ नाहीं अशी स्थिति असे. ह्यास्तव कोठेंतरी देशावरास जाऊन नशिबाची परिक्षा पहावी असें मनांत येऊन ते उत्तर हिंदुस्थानांत गेले व तेथें वकिली करून त्यांनीं तीन वर्षें काढलीं व

---

* एका प्रतींत कार्तिक शुद्ध १ असें आहे.

तेवढ्या अवधींत जेवढा पैसा मिळाला तेवढा घेऊन ते परत आपल्या घरीं यावयास निघाले. सारें द्रव्य मोजून पहातात तों तें ६१ होन होते. तेवढें पदरीं बांधून ते मार्गक्रमण करीत करीत महाराष्ट्रांत येऊन पोंचले तों मध्यंतरी समर्थांची अनुपम कीर्ति त्यांच्या कानावर आली. तेव्हां त्यांनीं विचार केला, येवढे अवतारी पुरुष नजीक असतां त्यांचें दर्शन घेणें अत्यंत इष्ट होय. ह्याकरितां जातां जातां त्या सत्पुरुषाचें दर्शन घ्यावें आणि मग घराकडे जावें, असा विचार करून ते तसेच चाफळास गेले तों तेथें समर्थांची गांठ पडली नाहीं म्हणून श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन समर्थांची स्वारी कोठें आहे त्याचा शोध केला, तों ते रामघळींत असल्याचें समजलें म्हणून कल्याणस्वामींस घेऊन एकनाथपंत रामघळींत गेले. तों समर्थ एका डोंगरांतील झऱ्यापाशीं बसले होते. त्यांस पाहून एकनाथपंतांनीं साष्टांग नमस्कार घातला. कोठील कोण? कां आलांत? वगैरे समर्थांनीं पूसतपास केल्यावर कल्याणस्वामींनीं त्यांची सर्व हकीगत निवेदन केली. ती ऐकून समर्थ म्हणाले "फार उत्तम आहे. बसावें." त्याप्रमाणें एकनाथपंत क्षणभर बसून पुन्हा आज्ञा मागून जावयास निघाले. तेव्हां समर्थ बोलले "आतां दुपार होत आली आहे. तरी रघुपतीचा नैवेद्य प्रसाद घेऊन जावें." ही आज्ञा ऐकून एकनाथपंत अगदीं बुचकळ्यांतच पडले. कारण तेथें तर बोलून चालून डोंगर. गांव ना शिव. नाहींत भांडीं, नाहीं शिधा; तेव्हां येथें नैवेद्य तो कसा काय होणार? तथापि समर्थांची आज्ञाही मोडतां येईना. म्हणून त्यांनीं "जशी आज्ञा." असें जेमतेम म्हणून ते स्नानाच्या तयारीस लागले. स्वामींनींही तेथील झऱ्यावर स्नान केलें. हें पाहून समर्थांनीं कल्याणास आज्ञा केली कीं, त्या जाळीच्या पलीकडे सर्व साहित्य आहे तें घेऊन स्वयंपाक तयार करावा. कल्याण व एकनाथपंत जाऊन पाहतात तों तिघांपुरतें सर्व साहित्य होतें. पानें ३ व द्रोण ६ होते. ते सर्व साहित्य घेऊन कल्यणस्वामी स्वयंपाकास लागले. समर्थांचेंही स्नान झालें.

इतक्यांत राजापूरचे ६० ब्राह्मण समर्थांचा शोध करीत करीत दर्शनासाठीं तेथें येऊन पोंहचले. नमस्कार वगैरे झाल्यानंतर आपण कोठून आला? कोठें जातां? असा समर्थांनीं प्रश्न केला. ब्राह्मण म्हणाले

" आम्ही राजापुराहून आलों. शिवाजी महाराज यज्ञ करीत आहेत असें ऐकून तिकडे जात आहों. मध्यंतरीं श्रीचें दर्शन घेण्याची इच्छा दृढतर झाल्यामुळें येथें आलों. आपल्या दर्शनाचा लाभ झाला, मोठा आनंद झाला. आतां जाण्यास आज्ञा असावी." समर्थ म्हणाले " आतां दुपार भरली आहे. रघुपतीचा नैवेद्य तयार आहे. तरी सर्वांनीं स्नानें करून नैवेद्य प्रसाद ग्रहण करून मग जावें." ब्राह्मण म्हणाले " आमचा समुदाय मोठा आहे. ह्याकरितां दर्शन झालें हाच प्रसाद. आतां निरोप घेतों." समर्थ हासून म्हणाले " समुदाय मोठा असला म्हणून काय झालें? रघुपति सर्वांहून मोठा आहे. याकरितां नैवेद्य करूनच जावें." ही समर्थांची विनंति ब्राह्मणांसही अमान्य करवेना. त्यांनीं घुटमळत घुटमळत 'बरें आहे' म्हटलें खरें, पण मनांत म्हणूं लागले कीं " येथें स्वयंपाक तर अवघा तीन पानांचा दिसतो. आणि आम्ही साठ असामी जेवणार कसे? तरी पण स्वामींचा आग्रहच आहे, त्याअर्थीं काय चार चार शितें वांट्यास येतील तेवढींच खाऊन वाटेस लागावें तें बरें."

असा विचार करून ते ब्राह्मण स्नानाच्या तयारीस लागले. त्यांनीं धोतरें धुऊन वाळवून सोंवळें नेसून आले. तेव्हां एकनाथपंतांनीं जाऊन समर्थांस विनंति केली कीं, ' द्रोण सहा असून पानें तीनच आहेत, ह्यांचें कसें?" समर्थ म्हणाले " कांहीं चिंता नाहीं. असतील तींच वाढूं लागा म्हणजे पुरतील." एकनाथपंत तीं तीनच पानें घेऊन वाढूं लागले तों साठ पानें पुरून आणखी तीनच शिल्लक राहिलीं. त्यांतील एकावर नैवेद्य घातला एक आपल्यास घेतलें व एक कल्याणांसाठीं ठेवून दिलें! द्रोणांची गोष्टही तशीच व अन्नाचीही तशीच! तूप साखरेसुद्धां सर्वांची यथास्थित भोजनें झालीं. साहित्यांत विडेही तीनच होते ते घेऊन एकनाथपंतांनीं भोजनोत्तर ब्राह्मणांस देण्यास सुरुवात केली, तों ते साऱ्या ब्राह्मणांस पुरून आणखी तीन शिलक राहिलेच! अशा प्रकारें भोजनें झाल्यानंतर ब्राह्मण जावयास निघाले. तें पाहून समर्थांनीं एकनाथपंतांस विचारलें कीं " तुमच्यापाशीं कांहीं होन वगैरे आहेत काय?" एकनाथपंत 'होय' म्हणाले. "द्या तर इकडे" असें म्हणतांच एकनाथपंतांनीं आपल्यापाशीं असलेले ६१ होन समर्थांच्या हातावर ठेवले. समर्थांनीं त्यापैकीं एक एक होन एक एका ब्राह्मणाच्या

हातावर ठेवून प्रत्येकास नमस्कार करून निरोप दिला. साठ ब्राह्मणांस साठ होन दिल्यानंतर एक होन समर्थांच्या हातांत शिल्लक राहिला. तो एकनाथपंतांच्या हातावर ठेवून समर्थांनीं त्यांस ही नमस्कार केला.

समर्थांनीं एकनाथपंतास चाफळास नेऊन बहुत आग्रहानें दोन तीन दिवस ठेवून घेतलें. नंतर जातांना त्यांस वस्त्रें वगैरे देऊन निरोप दिला. राजापुरच्या ब्राह्मणांस देण्यासाठीं घेतलेले ६१ होन समर्थ आज देतील उद्यां देतील अशी एकनाथपंत वाट पहात होते. परंतु समर्थांनीं त्यासंबंधानें एक अक्षर सुद्धां काढलें नाहीं. आणि होन घेतले ते ब्राह्मणांस दक्षणा देण्यासाठीं घेतले, तेव्हां आपण तरी ते परत कसे मागावेत ? म्हणून एकनाथपंतांसही तें कोडेंच पडलें. अखेर निघावयाच्या वेळीं 'येतों' असें म्हणून समर्थांच्या चरणावर मस्तक ठेवलें. तेव्हां समर्थ म्हणाले "ठीक आहे. आम्हीही तुमच्याबरोबरच तुम्हांस पोंचवावयास येतों." असें म्हणून तेही एकनाथपंतांबरोबर चांगले कोस दोन कोस गेले आणि मग त्यास म्हणाले "बरें आहे. जा तर आतां. वाटेनें जपून चला. आम्ही आतां दुसरीकडे जातों." असें म्हणून समर्थ तडक डोंगरांत निघून गेले ! समर्थ बरोबर होते तेथपर्यंत एकनाथपंतांना वाटत होतें कीं "समर्थांनीं होन बरोबर आणले असावेत व ते परत फिरतांना आपल्या हातावर ठेवतील." परंतु समर्थ तसें कांहीं न करतांच जेव्हां निघून गेले व पार दिसेनासे झाले तेव्हां मात्र एकनाथपंतांची खरी खरी निराशा झाली. बायका मुलें सोडून दोन तीन वर्षें परदेश कंठला ! हाडाचीं काडें करून पैसा पैसा जमवून ६१ होन सांठविले ते अशा रीतीनें गेले ! आतां रिकाम्या हातानें घरीं काय जावें आणि वडिलांना तोंड तरी काय दाखवावें ! खर्चापुरता एक होन तरी माझ्या हातावर टेकला, हेंच नशीब ! या प्रमाणें मनांत खेद करीत करीत एकनाथपंतांनीं कसें तरी पैठण गांठलें. परंतु दिवसां हें तोंड घेऊन घरीं काय जावें ? त्यापेक्षां रात्र पडल्यावर मुकाट्यानेंच जावें तें बरें. असा विचार करून पैठणाच्या अलीकडे एका कोसावर मुंगीपैठण म्हणून एक लहानसें गांव आहे तेथेंच त्यांनीं सायंकाळपर्यंत मुक्काम केला.

इकडे समर्थ जे निघाले ते एकनाथपंतांच्या पूर्वींच पैठणास जाऊन पोंचले

आणि एकनाथपंतांचें घर कोणतें? तें विचारीत विचारीत त्यांच्या घरीं गेले. तों एकनाथपंतांचें वडील ओसरीवरच बसलेले होते. त्यांनीं सांगितलें कीं, हेंच एकनाथपंतांचें घर. तो माझा मुलगाच आहे. कां? आपण कोण व काय काम आहे? समर्थ म्हणाले "ते व आम्ही सोबतीनें बरोबरच आलों होतों पण थोड्याशा अंतरावर त्यांची व आमची चुकामूक पडली. ते आतां सायंकाळीं येऊन पोंचतील. त्यांनीं माझ्यापाशीं कांहीं ऐवज ठेवलेला होता, तो हा घ्या." असें म्हणून त्यांनीं १२२ होन त्यांच्या स्वाधीन केले. ते पाहून तो म्हातारा तर अगदीं चकित झाला. मोठा उपकारी होऊन त्यानें त्यांस विचारिलें कीं "तुमचें नांव काय?" समर्थ म्हणाले "माझें नांव रामदास." तो म्हतारा म्हणाला "आपण आंत या, आजचा दिवस रहा, जेवा आणि मग जा." समर्थ म्हणाले "नाहीं नाहीं, मला पुढें जाण्याची फार त्वरा आहे, याकरितां मी जातों." असें म्हणून ते निघून गेले.

रात्रौ एकनाथपंतांनीं घोडें गडी पुढें पाठवून आपण सखलादीची टोपी पांघरून मुकाट्यानें घरीं आले. तों बाप अगदीं दरवाज्यांतच मोठ्या उत्सुकतेनें त्यांची वाट पहात बसला होता. त्यानें व घरच्या इतर माणसांनीं मोठ्या आनंदानें एकनाथपंताचें आगतस्वागत केलें. परंतु एकनाथपंतांच्या मनास चैन नाहीं, ते अगदीं मनांतल्या मनांत खिन्न होते, म्हणून बापानें विचारलें कीं "बाळा! तूं असा उदासीन कां? नीटपणें बोलत कां नाहींस?" एकनाथपंत म्हणाले "बाबा काय बोलूं? जसा गेलों तसा हात हालवित परत आलों!" बाप म्हणाला "अरे पुरे. आणलेंस तें काय कमी आहे?" एकनाथपंत म्हाणाले "बाबा! पण मीं कांहींच आणलेलें नाहीं." बाप म्हणाला "अरे! तुझ्याबरोबर आलेला तो रामदास येथें येऊन त्यानें १२२ होन माझ्यापाशीं देऊन ठेवले आहेत!" हें ऐकून एकनाथपंत अगदीं चित्रासारखे तटस्थ झाले. त्यांस ती गोष्ट क्षणभर खरी सुद्धां वाटेना. पण त्यांच्या वडिलांनीं ते १२२ होन प्रत्यक्षच त्यांच्या हातांत आणून दिल्यावर मग त्यांना कोणताच संशय उरला नाहीं. समर्थांच्या दयार्द्र अंतःकरणाबद्दल एकनाथपंतांस गहिंवर आला. त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. त्यांनीं परम भक्तिभावानें समर्थांचें सर्व चरित्र

वडिलांस वर्णन करून सांगितलें. इतकेंच नव्हे तर पुढें कांहीं दिवसांनीं म्हणजे शके १५७८ मध्यें पुन्हा समर्थांकडे जाऊन त्यांचा अनुग्रह घेतला आणि त्यांचे शिष्य होऊन राहिले.

**राज्यदान**—एके दिवशीं शिवाजीमहाराजांची स्वारी रायगडावरून निघून साताऱ्यास आली व किल्ल्यावर जाऊन तेथील देखरेख करून परत वाड्यांत येऊन बसले. इतक्यांत समर्थ नित्याप्रमाणें माहुलीस नदीवर प्रातःस्नान करून संध्यावंदन आटोपून करंजे गांवामध्यें भिक्षेस गेले. आणि तेथून पुन्हा माचीवरून भिक्षा मागत मागत महाराजांच्या वाड्यापर्यंत आले. अशा वेळीं शिवाजीमहाराज वाड्यांत असतील अशी समर्थांस कल्पनाही नव्हती. राजेश्रींची स्वारी रायगडावर आहे असेंच ते मनांत समजत होते. परंतु त्या दिवशीं खरोखर शिवाजीमहाराज नुकतेच येऊन राजवाड्यांत बसले होते. इतक्यांत समर्थांनीं नेहेमींच्या परिपाठाप्रमाणें '**जय जय रघुवीर समर्थ !**' अशी मोठ्यानें गर्जना केली. ती ऐकतांच शिवाजीमहाराजांचा कंठ सद्गदीत झाला व अंगावर प्रेमरोमांच उभे राहिले. नेत्रांत आनंदाश्रु भरले. त्यांच्या मनांत अशी कल्पना आली कीं "समर्थांसारखी विभूति आपल्या घरीं भिक्षेस आल्यानंतर त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें भिक्षा तरी काय घालावी ? त्रैलोक्याचें राज्यही त्यांच्यावरून ओवाळून टाकावें अशी त्यांची योग्यता आहे. असें असतां आपण आज काय त्यांच्या झोळींत चिपटें मापटें दाणे टाकावेत ? छे ! हें अगदीं गैरशिस्त होय." असें मनांत येऊन त्यांनीं बाळाजी आबाजी चिटणीस ह्यांस हाक मारली आणि एका चिठ्ठीवर "आपण आजपर्यंत जें जें कांहीं मिळविलें आहे तें तें सर्व राज्य स्वामीचरणीं अर्पण केलें आहे." असें लिहून त्यावर आपलें शिक्कामोर्तब करून ती चिठ्ठी समर्थांच्या झोळींत नेऊन टाकली ! व दंडप्राय नमस्कार करून हात जोडून पुढें उभे राहिले. हें पाहून समर्थांना हास्यवदन करून म्हणाले "काय शिवबा ? आज झोळींत कागदाचें चिटोरें कशाचें टाकलेंत? मूठ पसा दाणे घातले असते तर पानगा तरी भाजून खाता आला असता ! आज आमची कागदाच्या चिटोऱ्यावरच बोळवण कीं काय ?"

समर्थांची मुद्रा नेहेमीं प्रसन्नमुख असून स्वभाव अत्यंत विनोदी असे.

ही गोष्ट त्यांच्या अनेक लीलाकौतुकावरून वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखी आहे. असो; शिवाजीमहाराजांनीं हें समर्थांचें भाषण श्रवण करून विनंति केली कीं, "महाराज! मी झोळीमध्यें भिक्षाच घातली आहे. दुसरें कांहीं नाहीं." समर्थ म्हणाले "उद्धवा! ह्या झोळींतील चिट्ठी काढून वाच. पाहूं कसली काय भिक्षा आहे तें?" उद्धवांनीं झोळींतील चिट्ठी काढून वाचली तों तींत "मी आजपर्यंत मिळविलेलें सर्व राज्य स्वामीचरणीं अर्पण केलें आहे." असा मजकूर होता. तो ऐकून समर्थ हासले आणि म्हणाले "काय शिवबा! तुम्ही तर सारें राज्य आम्हांला अर्पण केलेंत. आतां तुम्ही काय करणार?" राजेश्री हात जोडून म्हाणाले "समर्थांनीं सेवा घ्यावी आणि मी सन्निध राहून ती करावी अशी इच्छा आहे." समर्थ हासून म्हणाले "फार उत्तम. चला तर आमच्याबरोबर." असें म्हणून समर्थांनीं आपली झोळी शिवाजी-महाराजांच्या गळ्यांत अडकविली व त्यांस आपल्याबरोबर घेऊन ते भिक्षेस निघाले! *

---

* ही अशी मोठ्या लोकांनीं भिक्षा मागण्याची चाल केवळ विचित्रच नव्हे, तर विक्षिप्तपणाची आहे असेंही अलीकडच्या लोकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. पण पुरातन कालच्या समजुतीप्रमाण व धर्मसंस्काराप्रमाणें पाहिलें तर त्यांत विक्षिप्तपणाचा प्रकार नसून ही एक पवित्र व धार्मिक बाब आहे असेच त्या वेळचे लोक मानीत. व अद्यापही तसेंच मानण्याची वहिवाट आहे. मुंजीच्या वेळीं केवढ्याही श्रीमंतांचा मुलगा असला तरी तो मोठ्या थाटामाटानें 'भिक्षावळी'ला निघतो. ज्या राजघराण्यांत देवीची उपासना आहे, त्या घराण्यांतील राज्या-सनावर असलेला पुरुष अद्यापही विवक्षित दिवशीं गळ्यांत कवड्याच्या माळा घालून मांगाच्या पांच घरीं तरी जोगवा मागतो, ह्यावरून भिक्षा-वृत्ति ही आतांप्रमाणें पूर्वींचें लोक निंद्य समजत नसून त्यांत एक प्रकारचा धार्मिक पवित्रपणाच आहे असें मानीत. आणखी राजेश्रींनीं राजरोस समर्थांचें शिष्यत्व पतकरलेंच होतें, त्या अर्थीं त्या दृष्टीनेंही ह्यामध्यें विशेष वावगें दिसण्यासारखें नव्हतें.

पुढें समर्थ व मागें शिवाजी ह्याप्रमाणें चालले. प्रत्यहीं समर्थ फारशी भिक्षा मागत नसत. दहा पांच घरें झालीं कीं परत फिरत. पण त्या दिवशीं त्यांनीं गांवांतील एकूण एक घरें टिपून घेतलीं! तों दुपारचे १२ वाजले. पण समर्थ त्या दिवशीं परळीस न जातां शिवाजीमहाराजांसहवर्तमान वेण्णेच्या तीरावर गेले, व तेथें उद्धवांनीं "इतर शिष्यांकडून रानशेणी आणविल्या आणि दगडावर पीठ मळून त्याचे पानगे भाजले नंतर रघुपतीस नैवेद्य समर्पण करून ते यथाविभाग जवळच्या मंडळींस, देऊन आपणास व शिवाजीमहाराजांसही वांटून घेतले. ते भक्षण करून उदक प्राशन केलें. नंतर तुलसीपत्र ग्रहण करून सर्व बसले.

तेव्हां समर्थांनीं प्रश्न केला कीं "कां शिवबा! आम्हांपाशीं राहून काय सुख लागतें तें पाहिलेंत ना?" शिवाजीमहाराज म्हणाले "महाराज! त्याच सुखाची इच्छा धरली आहे." समर्थ अत्यंत संतोषित होऊन त्यांनीं राजेश्रींस जवळ बोलाविलें आणि ते जवळ आल्यावर त्यांस म्हणाले "शिवबा! आम्ही एक मागतों तें आम्हांस द्याल काय?" राजेश्री म्हणाले "हा देहच आपला आहे. स्वामींनीं मागावें आणि मीं द्यावें तें काय? जें आहे तें स्वामींचेंच आहे." समर्थ म्हणाले "शिवबा! येवढा तुमचा दृढ निश्चय आहे तर आम्ही सांगितल्याप्रमाणें राज्य करून आमची सेवा करावी."

शिवाजीमहाराजांनीं पुनः नमस्कार करून "आपली आज्ञा उल्लंघन करण्याचें सामर्थ्य नाहीं. परंतु ह्या व्यापांतून सुटावें आणि स्वामींची सेवा अखंड घडावी ही इच्छा आहे." अशी प्रार्थना केली. तेव्हां समर्थ म्हणाले "शिवबा! ब्राह्मणानें तपश्चर्या करावी. आणि राजानें राज्य करून त्यांचें संरक्षण करावें, हाच मुख्य धर्म. ह्याविषयीं पूर्वींचीही अशीच कथा आहे, ती सांगतों.

श्रीरामचंद्रांनीं आपले कुलगुरु वसिष्ठ ह्यांस गुरुदक्षिणा म्हणून सर्व राज्य अर्पण केलें होतें. त्यावेळीं वसिष्ठांनीं राजधर्म व नीति त्यांस सांगितली. ते म्हणाले "ब्राह्मणांचा धर्म हाच कीं, त्यांनीं तपश्चर्या करावी. आणि राजानें यथान्याय राज्य करून त्यांचें पालन करावें, हाच त्याचा धर्म होय. त्याच्या योगानें स्वाभावीकच गुरुसेवाही घडते. आज तूंही

मला राज्य अर्पण केलेंस तेव्हां तें राज्य माझें झालें हें खरें आहे! पण मला तपश्चर्या सोडून राज्य करावयाचें नाहीं. आणि शिष्य हा गुरुचा पुतळच आहे. ह्यास्तव तूंच माझ्या राज्याचें संरक्षण करून प्रजेचें पालन कर." अशी वसिष्ठ गुरूंनीं श्रीरघुपतीस आज्ञा करून ते तपश्चर्येस गेले. आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणें श्रीरामचंद्रांनीं राज्य केलें. तद्वत् सांप्रत ह्या आमच्या राज्याचेंही संरक्षण तुम्हीच करावें."

अशी समर्थांची आज्ञा श्रवण करून महाराज संतुष्ट व सद्गदित होऊन "आज्ञा प्रमाण' म्हणून हात जोडून उभे राहिले. तेव्हां समर्थ उद्धवास म्हणाले, कीं "तुजवळ चिट्ठी आहे ती शिवबापाशीं परत द्यावी." हें ऐकून राजेश्री म्हणाले "स्वामी! माझें राज्य तूं चालवावें म्हणून आपली आज्ञा असतां चिट्ठी माघारी देऊन माझी परीक्षा करावयाची असल्यास मी पुरा कसा पडेन?" ह्यावर स्वामी हास्य करून म्हणाले "शिवबा! तुझें व माझें हा संकल्प तुजपाशीं असल्यास दिवाकर याजपाशीं चिट्ठी राहूं द्यावी, आणि तुम्ही राज्य करावें." अशी समर्थांची आज्ञा वारंवार झाली तरी "महाराज! पादुका दिल्यावांचून राज्य करणें प्रशस्त वाटत नाहीं." अशी महाराजांची आग्रहाची विनंति पडली. तेव्हां "बहुत बरें." असें म्हणून समर्थांनीं आपल्या पादुका शिवरायांच्या स्वाधीन केल्या आणि शिवाजीस पुन्हा राज्यावर जाण्याविषयीं आज्ञा केली.

तेव्हां राजेश्रींनीं नमस्कार करून विनंति केली कीं, "राज्यकारभार करण्याविषयीं आज्ञा होते, त्यास आजपर्यंत आपल्या स्वतःच्या व कारभाऱ्यांच्या मताप्रमाणें कळला तसा राज्यव्यवहार केला. आतां पुन्हा राज्यकारभार करण्याविषयीं आज्ञा होते, तर परलोक साधनाचा उपाय कसा करावा? त्याबद्दल आज्ञा व्हावी." समर्थ बोलले "व्यवहाररीत्या राजधर्म करून परमार्थ कसा करावा तें सांगतों. त्याप्रमाणें चाला म्हणजे झालें."

असें म्हणून राजधर्म सांगावयास प्रारंभ केला. तो असाः—

## राजधर्म व परमार्थ

"इहलोकीं सत्कीर्ति संपादन करावी, व परलोक साधनार्थ पुण्य

संपादन करावें म्हणजे देवयोनी प्राप्त होते. पातक फार झालें तर दैत्ययोनी प्राप्त होते. आणि पाप व पुण्य हीं समसमान झाल्यास मनुष्ययोनी प्राप्त होते. ब्राह्मणजन्म प्राप्त झाल्यास तो ऐहिक सौख्यासाठीं नव्हे तर पारलौकिक सौख्यासाठीं आहे हें लक्षांत ठेवावें. वर्णाश्रमधर्माप्रमाणें चालणें हीच जन्माची सार्थकता होय. श्रीगुरूस शरण जाऊन त्याची कृपा जेणें-करून होईल अशी निरंतर सेवा करावी. चित्तामध्यें निरंतर सद्गुरु-चरणाचें स्मरण करीत असावें. सद्गुरूंनीं सांगितलेल्या गोष्टींचें अहर्निश मनन करावें. आलस्य, निद्रा आणि निंदा हीं वर्ज्य करावींत. व्यवहार संबंधांत यथाशक्ति यथामति धर्मशास्त्राचें अवलोकन करावें. ब्राह्मणदेह प्राप्त झाल्यास त्याचा धर्म हाच.

बरें; दैवयोगानें राजाचा जन्म प्राप्त झाला तर राजधर्म, प्रजापालन, हीं नीतिन्यायें करून सर्वांस आपआपल्या वर्णधर्माप्रमाणें चालवावें. देव, देवस्थानें, ह्यांच्या ठिकाणीं प्रीति ठेवून त्या देवतांस नैवेद्य, नंदादीप इत्यादि समर्पण करावेत. नानाप्रकारच्या भाषा व लिपी शिकाव्यात कर्म-मार्ग [उद्योगधंदा] ध्यानांत आणावा व त्यांत सत्समागम सोडूं नये. नानाप्रकारचें तर्कज्ञान असावें. त्यांत ग्राह्य असेल तें ग्राह्य करावें. अति-विनोद असा कोणाशींच करूं नये. मसलती शिकाव्या. शिकवाव्या आणि मनुष्यें जवळ बाळगावयाचीं तीं परीक्षा करून बाळगावींत. कार्यकर्ते मनुष्य असतील त्यांच्यावर विश्वास ठेवावा. कार्यकर्तृत्वाची मगदूर पाहून बढती देत जावी. कार्यकर्ता विश्वासू असून हेकाड असल्यास आपण समुद्राप्रमाणें गंभीर व्हावें. सर्व प्रकारची साठवण करावी. कामदारामध्यें ज्याची जशी योग्यता असेल, त्या त्या मानानें त्याचा बंदोबस्त ठेवून त्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें निरालस्य सेवा घ्यावी. देश, दुर्ग, कोट यांचा बंदोबस्त विश्वासू मनुष्याकडूनच करीत असावा. त्या बंदोबस्ताची आपण नित्य चौकशी करीत असावें. जमादारांत नवा कोण व जुना कोण-कार्यकर्ता कोण व कार्य न कर्ता कोण हें ओळखून ठेवून ज्याच्यावर जितका विश्वास ठेवणें योग्य तितकाच विश्वास ठेवावा. सैन्याच्या अधिपतीचा अधिकार देणें तर शूर, धैर्यवान्, धार्मिक व एकपत्नीव्रती असून गुणवान् असेल त्यासच द्यावा. तो आपल्या प्रत्यायाम्नायाच्या

योग्यतेचा असावा. लेखक दोन असावे. अशा राजधर्माच्या रीतीनें राज्य चालवावें. तुम्ही चतुरच आहां. फार सांगावयास नको. धान्यकोश व द्रव्यभांडार इत्यादिकांचा संग्रह अजरामरवत् करीत असावें. देह हा क्षणभंगुर आहे हें जाणून परमार्थाविषयीं दक्ष असावें. मनोजयवृत्तीनें सर्व विषयांचा त्याग करून सावध असावें. याविषयीं वाक्य आहे तें असें:—

### श्लोक

अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थंञ्चसाधयेत् ॥
गृहीतइवकेशेषु मृत्यूनाधर्ममाचरेत् ॥ १ ॥

" बुद्धिमान् मनुष्यानें आपण जणों काय अजरामरच आहोंत असें समजून विद्या आणि द्रव्य हीं संपादन करावित. आणि मृत्यूची शेंडीच जणों काय हतांत सांपडली आहे असें समजून धर्मानें आचरण करावें."

अशा प्रकारें व्यवहार करून देहाचें सार्थक करावें. सद्गुरूची कृपा संपादन करून प्रपंचासह परमार्थ करावा. ह्याविषयीं पुन्हाही सांगतों, श्रवण करा. " असें म्हणून एक स्फुट समास सांगितला. तो:—

# सावधता.

### ओव्या

"कोणाचा भरंवसा न धरावा । आपुला आपण विचार करावा ॥
तकवा उदंड धरावा । हाही एकविषयीं ॥ १ ॥
देह दुःखें कदरों नये । उदंडचि करावे उपाय ॥
मग सर्व सुखास काय । उणें आहे ॥ २ ॥
एकांतीं चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ॥
नाना विचारणा करावी । अरि मित्राची ॥ ३ ॥
प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये ॥
सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ॥ ४ ॥
धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ॥
उद्योगरहित कामा नये । पशु जैसे ॥ ५ ॥

उपाधीस कंटाळला । विचाराच्या आळस आला ॥
म्हणजे जाणावा चेवला । बुद्धिपासुनि ॥ ६ ॥
खबरदारी आणि वेगीं । नेणें सामर्थ्य चढे अंगीं ॥
नानाप्रसंगें कार्य भागीं । अंतराचि न पडे ॥ ७ ॥
कार्यकर्ते दुरी करावे । प्रसंगीं सर्वांचि हातीं धरावे ॥
परंतु शोधानि पहावें । कपटाविषयीं ॥ ८ ॥
जेथें बहु विचार । तेथें ईश्वरी अवतार ॥
मागें झाले थोर थोर । धके चपेटे सोसूनी ॥ ९ ॥
आपल्या मनास शोधावें । परांतर शोधावें ॥
क्षणक्षणा सांभाळावें । बदलेल म्हणुनी ॥ १० ॥
पहिलेंच पाहावें । केलेंचि करावें ॥
शोधिलेंचि शोधावें । राजकारण ॥ ११ ॥
इशारतीचें बोलतां नये । बोलयाचें लिहू नये ॥
लिहावयाचें सांगूं नये । जबाबीनें ॥ १२ ॥"

॥ इति 'सावधता' प्रकरण स्फुट समास समाप्त ॥

हा समर्थांचा अधिकारयुक्त वाणीचा उपदेश श्रवण करून शिवाजी महाराजांचें अंतःकरण विरघळून गेलें. त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रूच्या धारा लागल्या. समर्थांची आज्ञा मोडण्यास त्यांचा धीरच होईना. म्हणून त्यांनीं समर्थांच्या पादुका घेऊन त्यांच्या नांवानें पुन्हा राज्यकारभार करण्याचें कबूल केलें. परंतु हें राज्य माझें नव्हे; समर्थांचें आहे, हें समजण्यसारखें कांहींतरी प्रधान चिन्ह असावें, ह्याबद्दल समर्थांस विनंति केली. तेव्हां समर्थ म्हणाले "आम्ही बोलून चालून गोसावी. आमचें चिन्ह तें काय ? भगवी छाटी ! ह्यास्तव आजपासून ह्या राज्याचा झेंडा भगव्या रंगाचा करावा." तीच गोष्ट शिवाजीमहाराजांनीं मान्य करून त्या दिवसापासून मराठ्यांचें निशाण [झेंडा] भगवें केलें आणि समर्थांचा निरोप घेऊन शिवाजी-महाराज रायगडावर गेले. ही राज्यदानाची चिट्ठी शिवाजीमहाराजांनीं समर्थांच्या झोळींत टाकली त्या दिवशीं शके १५७७ तील वैशाख शुद्ध द्वितीया होती. [ दुसऱ्या एका बखरींत वद्य पक्षही दिलेला आहे.]

धन्य ते गुरु आणि धन्य ते शिष्य ! शिष्य सर्व राज्य अर्पण करतात; आणि गुरु येवढें राज्य घरीं चालून आलें असतां, तें परत देतात ! ह्या दोन्हीही गोष्टी केवळ लोकोत्तर होत ! ह्यांत भक्ति आणि निस्पृहता ह्या दोहोंची परमावधि झाली नाहीं असें कोण म्हणेल ?

**दिलेलखानाची बचेरी !**—एक वेळ जयराम स्वामी व समर्थ हे उभयतां मिरजेस असतांना गांवामध्यें जयरामस्वामींचें एक कीर्तन झालें. कीर्तनास जागा मोठी विस्तीर्ण असून श्रोत्यांची अगदीं दाटी झाली होती. समर्थही कीर्तनास बसले होते. त्यावेळीं मिरजेस एक ठाणेदार म्हणून मुसलमान अधिकारी होता. त्याचें नांव दिलेलखान तो नित्याप्रमाणें रात्रीं गस्तीसाठीं गांवांतून रौंद करीत असतां जयराम स्वामींच्या कीर्तनांत चाललेला गजर त्याच्या कानीं आला. म्हणून तो कीर्तनाच्या जागेजवळ जाऊन क्षणभर उभा राहिला. तों त्याच्या कानीं असें वाक्य पडलें कीं, "जो कोणी साधु जातील त्या मार्गानें जाईल, त्याला तत्काल श्रीरामचंद्राचें दर्शन घडेल." तें वाक्य ध्यानांत ठेवून दिलेलखान आपल्या किल्ल्यांत निघून गेला. दुसऱ्या दिवशीं नित्य क्रमाप्रमाणें समर्थ प्रातःकाळींच उठून कृष्णास्नानास गेले. मिरजेपासून कृष्णानदी सुमारें दीड मैल आहे. जयरामस्वामी मठांतच बसलेले होते. इतक्यांत दिलेलखानाकडून एक मनुष्य जयरामस्वामीस पालखी घेऊन आला आणि म्हणाला "आपल्याला खानसाहेबांनीं अगत्य बोलावलें आहे. तरी येण्याची कृपा व्हावी." खानानें इतक्या अगत्यानें बोलावणें पाठविलेलें पाहून जयरामस्वामींस व त्यांच्या शिष्यांसही आश्चर्य वाटलें. कारण, मुसलमान अंमलदाराकडून हिंदुधर्मी साधूला पालखी पाठविणें ह्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. ह्यामध्यें दोन हेतु असले पाहिजेत हें तेव्हांच सर्वांच्या ध्यानांत आलें. एक तर त्याला रात्रीचें कीर्तन ऐकून संतोष झाला असावा, नाहींतर त्यांत कांहींतरी कपट असावें हें दुसरें. ह्यामुळें जावें किंवा न जावें ह्याचाच संशय पडला. तथापि ठाणेदारानें इतक्या सन्मानानें ज्याअर्थी बोलावलें आहे त्याअर्थीं जाऊन यावें हेंच बरें. असें ठरवून जयरामस्वामी आलेल्या पालखींत बसून निघाले. बरोबर पांच चार शिष्यमंडळीही गेली. खानानें किल्ल्यांत मोठा दरबार भरवून मध्यभागीं जयरामस्वामींकरतां

उच्च सिंहासन मांडलें होतें. पालखी दारांत येतांच खान मोठ्या विनयानें सामोरा आला व स्वामींस त्यानें आंत नेऊन उच्चासनावर बसविलें, आणि हात जोडून म्हणाला "आप तो हिंदूका बडा अवलिया है. कल तुम बोले कीं जिस मार्गसे साधु लोक जायेंगे ओ मार्गसे जो कोई जायेगा, उस्कू रामकी मुलाकत होगी. तब हम तयार हो. तुम साधु है. तुम जिस मार्गसे जायेंगे उस मार्गसे हम आतां है. तो तुमारा राम किदर है सो हमकूबी बताव." हा त्याचा विलक्षण सव्वाल ऐकून जयरामस्वामी चिंताक्रान्त होऊन क्षणभर स्तब्ध बसले.

इतक्यांत खानाच्या एका मनुष्यानें एका चांदीच्या तबकांत कांहीं पदार्थ घालून त्यावर उत्तम सरपोस घातलेले स्वामींपुढें आणून ठेवलें. तेव्हां सर्वांस असें वाटलें कीं, खानसाहेबांनीं स्वामीपुढें कांहीं तरी नजर नजराणा ठेवला असावा. परंतु कशाची नजर आणि कशाचा नजराणा? खानानें एकदम त्याच्या वरचा सरपोस काढला, पाहतात तों त्यांत गोमांस भरलेलें!! तें दाखवून खानानें बजावलें कीं "तुम्ही काल कीर्तनांत सांगितल्याप्रमाणें राम दाखवावा नाहीं तर हेंच मांस तुमच्या तोंडांत घालून तुम्हांस मुसलमान करूं!" हा दुर्धर संकटसमय पाहून खुद्द स्वामींच्या व त्यांच्या शिष्यांच्याही तोंडचें पाणी पळालें! आतां पुढें काय करावें हें कोणासच कांहीं सुचेना! सारे एकमेकांच्या तोंडांकडेच टकमका पाहत राहिले. असें पाहून जयरामस्वामींनीं मनांतल्या मनांत समर्थांचा धांवा केला. तेव्हां त्यांस धीर येऊन ते त्या खानास म्हणाले "ठीक आहे; आमचे गुरु स्नानास गेले आहेत. ते आतां येतील. आले म्हणजे आपल्यास रामदर्शन करवितों." खानानें ती गोष्ट मान्य केली, व सर्व मंडळी पुढें काय होतें तें पहात बसली.

समर्थांचे ज्याप्रमाणें कल्याणस्वामी हे पट्टशिष्य होते, त्याप्रमाणें जयरामस्वामींचे एक पट्ट शिष्य होते. त्यांचें नांव गोपाळबोवा. हा प्रसंग पाहून गोपाळबोवा धांवतच निघाले ते कृष्णेवर गेले. तेथें समर्थ स्नान संध्या करीत होते. त्यांस त्यांनीं हा घडलेला सर्व प्रकार सांगितला आणि रडूं लागला. त्यानें प्रार्थना केली कीं 'आपण तेथपर्यंत चलावें.' समर्थ रागाचा आव आणून म्हणाले "जा; आम्ही येत नाहीं. जे साधु असतील

त्यांनीं दाखवावा राम. नाहींतर बोलावें कशाला? 'ज्यानें करावें त्यानें भरावें.' दुसऱ्याला का उपद्रव?" इत्यादि पुष्कळ प्रकारें निर्भत्सना केली. गोपाळबुवांनीं हव्या तितक्या विनवण्या केल्या, काकुळतीस आले, परंतु समर्थांस दया म्हणून येईना. इतकेंच नव्हें तर अखेर "चल निघ; येथें उभा राहूं नको" असें म्हणून त्यांनीं त्यास धुडकावून दिलें. तेव्हां तो बिचारा अगदीं रडवें तोंड करून निराशेनें डोळ्यास पदर लावून मुकाट्यानें माघारा फिरला.

समर्थांची लीला सारींच कांहीं विचित्र असे! तो माघारा फिरतांच समर्थ जे दुसऱ्या वाटेनें निघाले ते मिरजेच्या किल्ल्यांतील दारापाशीं येऊन उभे राहिले! जयरामस्वामी तर केवळ दीन होऊन बसले होते. इतक्यांत 'जयजय रघुवीर समर्थ!' म्हणून समर्थांची गर्जना ऐकूं आली. मग काय? त्या आनंदास पारावारच नाहींसा झाला. समर्थांनीं मोठ्यानें हाक मारली "जयरामा! काय करतोस? काय आहे?" ही हाक ऐकतांच जयरामस्वामीसहवर्तमान सर्व मंडळी उभी राहिली. जयरामस्वामींनीं नमस्कार करून हात जोडून सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून समर्थ म्हणाले "इतकेंच ना? ठीक आहे. खानसाहेब आमच्या मार्गानें येत असतील तर आपण त्यास राम दाखवूं. चला खानसाहेब!" असें म्हणून दिलेलखानास बरोबर घेऊन समर्थ सर्व मंडळीसहवर्तमान किल्ल्यावरून फिरावयास निघाले. त्यांच्याबरोबर खान हा चालतच होता. असें किल्ल्याच्या तटावरून जातां जातां एका बुरजापाशीं आले. त्या बुरुजाला जंगीचीं बारीक बारीक भोंकें होतीं. त्यांतून सुळकर उडी मारून समर्थ किल्ल्याच्या खालीं जाऊन माचीवर उभे राहिले. आणि जयरामस्वामींस म्हणाले "जयरामा! ये खालीं." असें म्हणतांच जयरामस्वामीही त्याच जंगींतून खालीं जाऊन समर्थांपाशीं उभे राहिले! नंतर समर्थ दिलेलखानास म्हणाले "या या, खानसाहेब या! आमच्याच मार्गानें खालीं या. म्हणजे तुम्हास राम दाखवितों. हा येथें राम उभा आहे. या लौकर या." हा चमत्कार पाहून खान अगदीं पाण्यांत ढेंकूळ टाकल्याप्रमाणें विरघळून गेला. तो धांवत धांवत किल्ल्याच्या दरवाज्यांतून बाहेर पडून माचीवर गेला आणि त्यानें समर्थांचे घट्ट पाय धरले! आणि प्रार्थना केली कीं, "हमारी

मुसलमान जात बहूत क्रूर और नीच है. उस जात का मै हूं. वास्ते अब स्वामीनें मेरा गुन्हा माफ करना और गरीबका भला करना. और मेरी जातपर विचार करना नहीं." अशी बहुत प्रकारें प्रार्थना केली. त्यावरून स्वामींस त्याची दया येऊन त्यांनीं त्यास "तूं सदा सर्वदा राम राम म्हणत जा." अशी आज्ञा केली. नंतर खानाचें म्हणणें पडलें कीं, स्वामींनीं हमेशा मिरजेस रहावें. त्यावरून समर्थ म्हणाले "ह्याठिकाणीं आमचें रहाणें नेहेमीं होणें नाहीं. परंतु आम्ही राहिल्याप्रमाणेंच कोणास तरी येथें
५ ठेवून जातों. तुम्ही आम्हास मठ बांधण्याकरतां जागा मात्र दाखवून द्यावी." हें ऐकून दिलेलखान फार खूष झाला व त्यानें आपल्या मशिदी-ही जारींच जागा दाखवून दिली. नंतर समर्थांनीं वेणूबाईस आज्ञा दिली कीं, "खानाचा आपल्यापाशीं मी रहावें असा फार आग्रह आहे. ह्याकरितां येथें मठ करून तूं खुशाल रहा." हें ऐकून वेणूबाईंना फार वाईट वाटलें. त्यांनीं विनंति केली कीं "स्वामींची आज्ञा उल्लंघन कोण करणार? तथापि ह्या चरणांचा वियोग स न कसा व्हावा?" समर्थ हासून म्हणाले "वेणू! तुला काय? कोठेंही राहून सेवा करावयाची. तुला वियोग तो कशाचा? मी सतत तुझ्यापाशींच आहे. तथापि आमची पट्टाभिरामाची पूजेची मूर्ति आहे, ती मी तुला देतों. तिची पूजाअर्चा करून जगदुद्धार करावा. आणि प्रतिवर्षीं रामनवमीच्या उत्सवास चाफळास येत जावें." ह्याप्रमाणें आज्ञा करून तेथील संस्थानचा बंदोबस्त खानास सांगून सर्वांचा निरोप घेऊन स्वामी चाफळास आले. अशा प्रकारें शके १५७७ मन्मथनाम संवत्सरीं श्रावणमासांत ह्या मिरजेच्या मठाची स्थापना झाली.

**जलस्तंभिनी विद्या**—ही विद्या दुर्योधनाला साध्य होती, असें महाभारतांत वर्णन आहे. परंतु अर्वाचीन कालांत समर्थ व कल्याणस्वामी ही उभयतां गुरुशिष्याची जोडी ह्या विद्येंत किती प्रवीण होती ही गोष्ट खालीं दिलेल्या वृत्तांतावरून चांगली लक्षांत येण्यासारखी आहे. एके दिवशीं समर्थ कोंडवणच्या घळींतून चाफळास येण्याकरतां निघाले. मध्यंतरीं पाटणाजवळ आले तों कोयना नदीला मनस्वी पूर आलेला होता. म्हणून त्यांनीं पलीकडून सांगड आणण्याविषयीं हाका मारल्या. तेथें चांदजीराव पाटील म्हणून एक प्रमुख गृहस्थ होता. तो सांगडीची जमवाजमव करूं लागला.

पण त्यांस थोडासा उशीर झाला. ह्यास्तव समर्थांनीं त्याची वाट व पाहतां एकदम पुरांत उडी टाकली आणि पोहतच पलीकडे जावयास निघाले. ते धारेस लागले, हें पाहून पलीकडे पहावयास पुष्कळ मंडळी जमा झाली. समर्थ गेले ते एका भोंवऱ्यांत गेले व तेथें दोन तीन गिरक्या खाऊन आंत गेले ते पार बुडाले ! पुन्हा ठाव ना ठिकाण ! इतक्यांत चांदजीराव पाटीलही सांगडी घेऊन आला. पण पाहतो तों हा प्रकार ! स्वामी भोंवऱ्यांत बुडाले. 'स्वामी बुडाले, स्वामी बुडाले !' असा जिकडे तिकडे एकच हाहाःकार उडाला ! चांदजीरावानें चांगले पोहणारे पटाईत पांच चार मनुष्य नदींत पाठविले. त्यांनीं पाहिजे तितकें बुडून ठाव पाहिला पण स्वामींचा पत्ता नाहीं ! रात्रीं मशाली लावून कोस दोन कोसपर्यंत प्रे. वगैरे सांपडतें कीं काय तें पाहिलें, परंतु कांहीं नाहीं ! तेव्हां सर्व मंडळी फा हळहळूं लागली ! दुसऱ्या दिवशीं चांदजीरावानें चाफळच्या मठांत पत्र लिहिलें कीं, स्वामी कोयना नदींत बुडाले ! तें पत्र पाहतांच कल्याणस्वामी व उद्धवगोसावी हे उभयतां ताबडतोब निघाले. त्यांना पाटणास यावयास दोन दिवस लागले. त्यांनीं चांदजीरावास समर्थ बुडल्याची जागा दाखविण्यास सांगितलें. चांदजीराव नदीवर जाऊन त्यांनीं कल्याणस्वामींस स्वामी बुडल्याची जागा दुरून दाखवून म्हणाले " जागा पाहून तरी आतां त्याचा काय उपयोग ? आज तीन दिवस झाले. येवढा वेळ स्वामी तेथें कशाचे असणार ? ते कोठें वहात खालीं गेले असतील किंवा जलचरांनीं खाऊनही टाकले असतील ?" कल्याणस्वामी म्हणाले "समर्थांचा देह असा कांहीं वाटेवर पडलेला नाहीं समजलात ?" असें म्हणून त्यांनीं कपडे उतरून ठेवले आणि कास मारून ते नदींत उडी टाकण्यास तयार झाले तें पाहून चांदजीराव त्यांस म्हणाले " तुम्ही असें आतां धाडस करूं नये." कल्याणस्वामी म्हणाले " स्वामी बुडाले असतील तर आम्हीही त्यांच्याबरोबर बुडूं." असें म्हणून पोहत पोहत भोंवऱ्यापर्यंत गेले आणि एकदम आंत बुडी दिली. तळीं जाऊन चाचपून पाहतात तों समर्थ तळाशीं आसनमांडी घालून ध्यानस्थ बसले आहेत ! येवढें पाहून ते पुन्हा उसळी घेऊन वर आले आणि पुन्हा जोरानें खालीं गेले आणि समर्थांच्या आसनमांडींत डोकें घालून त्यांस घेऊन वर आले ! हा

चमत्कार पाहतांच तीरावर बसलेले चांदजीराव व उद्धवगोसावी हे आश्चर्यानें अगदीं चकित झाले आणि इतके दिवस स्वामी पाण्यामध्यें जिवंत राहिले कसे ? परमेश्वराची लीला किती अगाध आहे ? असें बोलत आहेत तोंच कल्याणस्वामी समर्थांस घेऊन पोहत पोहत तीरास पोंहचले. किनाऱ्यास पोंचल्यावर समर्थ म्हणाले "कल्याणा! आज तूं मला वांचविलेंस !" कल्याणांनीं हात जोडून विनंति केली " महाराज ! आपण त्रिभुवनास वांचविणार. आपल्याला मी काय वांचविणार ?" नंतर चांदजीराव पाटलांनीं समर्थांस घरीं नेऊन बहुत दिवस ठेवून घेतलें. समर्थांपासून चांदजीरावांनीं अनुग्रह घेतला व मग सर्व मंडळी चाफळास गेली. ही सर्व कथा तंजावरच्या मठावरील मौनीबुवांचे शिष्य मेरुगोसावी ह्यांनीं ओवी छंदानें वर्णन केलेली आहे. शके १५७८ श्रावणमास.

**अश्वसंजीवन**—प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें शके १५७८ मध्यें जयरामस्वामी समर्थांस माघ शुद्ध १५ ला अप्पांच्या पुण्यतिथीस घेऊन वडगांवास गेले. त्या वेळीं रंगनाथस्वामी भागानगरींत म्हणजे दक्षिण हैद्राबादेस होते. ह्या पुण्यतिथीला समर्थांनीं यावयाचें जसें ठरलेलें होतें त्याप्रमाणेंच रंगनाथस्वामींनींही यावयाचें ठरलेलें होतें. परंतु ते कांहीं त्या दिवशीं दुपारपर्यंत आले नाहींत. दुपारीं सर्व पंक्तीं मांडून तयार झाल्या. आतां उदक सोडावयाचें तों जयरामस्वामी समर्थांस म्हणाले " परंतु रंगनाथस्वमी अद्याप आले नाहींत." समर्थ म्हणाले " ठीक आहे. तर मग सर्व मंडळी बसूंद्यात; तुम्ही आम्ही रंगोबा आल्यावरच बसूं." त्याप्रमाणें इतर सर्व मंडळी भोजनास बसली. सर्वांचीं भोजनें झालीं. जयरामस्वामी व समर्थ यांनीं मात्र भोजन केलें नाहीं रंगनाथस्वामी भागानगरींत असून त्यांना ह्या पौर्णिमेची आठवणही नव्हती. ते नित्याप्रमाणें प्रात:काळीं स्नानास बसले असतां ब्राह्मणानें संकल्प सांगत असतां पौर्णितिथीचा उच्चार केला. त्याबरोबर त्यांस वडगांवच्या पुण्यतिथीची आठवण झाली. आणि ते म्हणाले, " अहो ! आज तर आप्पांची पुण्यतिथि. सरकार सेवेचा मुख्य दिवस." असें म्हणून त्यांनीं लौकर लौकर स्नान आटोपलें आणि घोडा तयार करून त्यावर स्वार होऊन निघाले. तेव्हां सर्व शिष्यमंडळींनीं विचारिलें कीं " स्वारी कोठपर्यंत जाणार ?" स्वामी म्हणाले "वडगांवास

जातों." मंडळी म्हणाली "कोठें वडगांव आणि कोठें भगानगर? स्वारी आजच्या आज पोंचणार कशी? स्वामी म्हणाले 'देह आणि घोडा पडेपर्यंत तरी जाऊं, मग पुढच्या पुढें." असे म्हणून घोडा सोडला तो अस्तमानच्या सुमारास कुकडवाडीची खिंड गांठली. त्या खिंडींत चाळीस पन्नास असामी चोर दबा धरून बसलेले होते. त्यांनीं हा उमदा घोडा; गळ्यांत गोफ; कानांत चौकडा; हातात सलकडीं; मस्तकावर शिरपेच; पायांत तोडा वगैरे स्वामींचा सरंजाम पहातांच त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यांना वाटलें ही शिकार बरी आली. बावा एकटाच आहे. घ्यावा याला लुबाडून. असें मनांत आणून त्यांनीं स्वामींस अडविलें. तेव्हां स्वामींनी त्यांस विचारलें "तुम्ही कोण आहां?" ते म्हणाले "आम्ही चोर आहोत?" "तुम्ही किती असामी आहांत?" "आहों पन्नास असामी." हें चोरांचें भाषण ऐकून स्वामी म्हणाले "तर आम्ही तुम्हांस कांहीं देणार नाहीं. कारण आम्ही २०० असामी आहों." चोर म्हणाले "आपण दिसण्यांत साधु दिसतां, आणि खोटें बोलतां, हें ठीक नाहीं. आपण एकटे आहां आपल्याबरोबर दुसरें कोणी नाहीं. असें असतां आपण दोनशे असामी कसे म्हणतां?" स्वामी म्हणाले "मी एकटाच तुम्हां दोनशेंच्या बरोबरीचा आहे. पाहूं या आतां तुमचीं आमचीं बळें ताडून!" चोरांनीं तें कबूल केलें. तेव्हां रंगनाथ स्वामींनीं आपल्या कावडीतील तिरकमान काढून तीस एक बाण जोडला आणि तो एका वृक्षाच्या खोडावर मारला. तो बाण त्या वृक्षांत इतका आंत घुसला कीं बाहेर त्याच्या पिसाऱ्याचा भाग तसू अर्धा तसू राहिला असेल नसेल!

नंतर स्वामी त्या चोरांस म्हणाले "हा ह्या वृक्षांत गेलेला बाण तुम्ही हातानें उपसून बाहेर काढा, म्हणजे तुम्ही आम्हांपेक्षां बलाढ्य खरे." हें ऐकून चोर तो बाण काढूं लागले, पण तो कोणासच बाहेर निघेना. त्यांनीं पाहिजे तितकी खटपट केली, परंतु बाण एक गहूंभरसुद्धां हालेना. हें पाहून स्वामींनीं त्यांस घोड्याची काढणी दिली आणि सांगितलें कीं "अरे! तो बाणाचा शेंडा आंखूड असल्यामुळें तुम्हाला ओढावयाला मिळत नसेल, तर ह्या काढणीचा त्याला फास घाला, आणि सारे मिळून ओढा, म्हणजे तो बाहेर निघेल." त्याप्रमाणेही त्या चोरांनीं केले परतु बाण म्हणून

कांहीं बाहेर निघेना. शेवट ते सारे चोर थकले असें पाहून स्वामींनीं स्वतः एका चिमटींत त्या बाणाचें तें उरलेलें टोंक धरून तो बाहेर उपसून काढला ! हें पाहतांच ते चोर फारच विरमले आणि त्यांनीं स्वामींच्या पायावर लोळण घेऊन सर्व अपराधांची क्षमा करण्याविषयीं प्रार्थना करूं लागले." ते म्हणाले "आम्ही जन्माचे चोर आहोंत, आतां आम्हाला साव करावें." स्वामी म्हणाले "ठीक आहे. चला आमच्याबरोबर म्हणजे आम्ही तुम्हाला साव करूं." ती गोष्ट चोरांनीं मान्य करून ते सर्व चोर त्यांच्या घोड्याच्या मागोमाग निघाले. त्या सर्वांना वडगांवास पोंचावयाला रात्रीचे दहा वाजले !

तों इकडे रात्र फार झाली असें पाहून जयरामस्वामी समर्थांस म्हणाले "महाराज ! रंगनाथस्वामी अद्याप आले नाहींत." समर्थ म्हणाले "तो सेवाधिकारी आहे. आल्यावांचून राहणार नाहीं." हें बोलणें संपतें आहे तोंच घोडा खिंकाळलेला ऐकूं आला. त्याबरोबर समर्थ म्हणाले "आला; रंगोबा आला." इतकें म्हणून बाहेर येतात तों रंगनाथस्वामीही आपल्या चोरांच्या लटांबरासहवर्तमान येऊन दाखल झाले. समर्थ म्हणाले "रंगोबा! हे रे कोण बरोबर आणलेस ?" तेव्हां रंगनाथस्वामींनीं त्या चोरांची सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून समर्थ पोट धरधरून हासले. नंतर जयरामस्वामींनीं गोपाळबोवास आज्ञा केली कीं, घोडा नेऊन पागेंत बांधावा. त्याप्रमाणें ते तो घोडा बांधण्यासाठीं पागेंत घेऊन गेले. नंतर रंगनाथ स्वामींस मंगलस्नान वगैरे घालून आनंदमूर्तीसहवर्तमान सर्वांचीं भोजनें झालीं. भोजनोत्तर समर्थांनीं रंगनाथस्वामींस कीर्तन करण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें रात्रभर त्यांचें कीर्तन चालू होतें. आरती, खिरापत वगैरे होईपर्यंत उजडावयास आलें. तों गोपाळबोवा येऊन समर्थांसह सर्वांस विनंति केली कीं, "रंगनाथ महाराजांचा घोडा रात्रीं पागेंत नेऊन तंगबार सोडतांच तो धाडकर खालीं पडला आणि गतप्राण झाला ! ही गोष्ट रात्रींच कानावर घालावयाची परंतु कीर्तनांत वगैरे विरस होईल म्हणून मी बोललों नाहीं. ती गोष्ट आतां श्रुत केली." हें ऐकून रंगनाथ स्वामी म्हणाले "घोडा सरकार कामास आला. तेव्हा आतां सरकारांतून तो पुन्हा मिळाला पाहिजे." हें ऐकून समर्थ जयरामस्वामींस म्हणाले

"जयरामा! रंगोबा काय म्हणतो?" जयरामस्वामी म्हणाले "रंगोबा म्हणतो तें खरेंच आहे!"

"बरें तर. चला बोवा! रंगोबाला घोडा दिला पाहिजे. तेव्हां पागेंत जाऊं या. असें म्हणून समर्थ पागेंत जावयास उठले. तेव्हां जयरामस्वामी रंगनाथस्वामी, आनंदमूर्ति, इतर शिष्य मंडळी व दुसरेही आलेले पुष्कळ लोक पागेंत काय काय चमत्कार होतो, हें पाहण्यासाठीं समर्थांबरोबर निघाले. पागेंत जाऊन पाहतात तों घोडा पाय पसरून गतप्राण होऊन पडला आहे! त्यास पाहून समर्थ बोलले "जयरामा! घोडा थकून निजला आहे. त्यास जागा कर." जयरामस्वामी म्हणाले "मी जागा केला तर झोपेंचा मोड होईल, ह्याकरितां त्यास वडिलांनीं जागें करावें." त्यावर समर्थ म्हणाले "कांहीं नाहीं. तूंच त्यास उठावयास सांग." तेव्हां जयराम स्वामींनीं त्याच्या पुठ्यावर थाप मारून त्यास म्हणाले "बापा! ऊठ. तूं सरकार कामास आला आहेस व सरकारचीच तुला उठण्याची आज्ञा होत आहे, तर ऊठ." असें म्हणतांच तो घोडा 'फुर्र' करून खडबडून उठून उभा राहिला! नंतर समर्थांनींही त्याच्या पुठ्यावर दोन तीनदां थोपटून म्हटलें "बाबा! तुला रंगोबाच्या सेवेला नेमलेलें आहे, ह्याकरितां तो असेंपर्यंत तूं मरूं नको. त्यांची सेवा पुरी कर."

ह्या अद्भूत चमत्कार पहावयास शेंकडों मंडळी जमलेली होती. त्यांनीं 'धन्य धन्य' म्हणून एकच जयजयकार केला. इतकेंच नव्हे तर तें समर्थांचें लोकोत्तर सामर्थ्य पाहून बाकीच्या त्रिवर्गस्वामींसही उगेच राहवलें नाहीं. त्यांनींही एक एका श्लोकानें समर्थांची यथायोग्य स्तुति केली. ती अशीः—

## जयरामस्वामींचा श्लोक.

**श्रीगुरुसमर्थ परलीला। काय एक न करी परलीला॥**
***सत्त्वरूप गुणसत्त्वाचि मूर्ती। रामदास म्हणतां बहुकीर्ती॥ १॥**

* ह्या सर्व श्लोकांमध्यें छंदोभंगादि बरेच दोष आढळतात. ते बहुधा लेखकाच्या हस्तदोषाचे असावेत. त्याचे मूळपाठ काय असावेत, म्हणून बरेच ग्रंथ चाळले, पण त्याचा खरा पाठ मिळाला नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. स्वबुद्धीनें त्यांत दुरुस्ती करणें निखालस अनुचित होय, सांगणें नकोच.

## रंगनाथस्वामींनीं केलेला श्लोक.

**रामरूप रामाचे अवतरला । रामदास म्हणतां परतला ॥**
**निर्जिवा करितसे सजीवा । अन्यकीर्ति स्मरतां जिवशीवा ॥ २ ॥**

## आनंदमूर्तींनीं केलेला श्लोक.

**जड जिवो तारिले बहुतांही । यावरी न सजिवा बहुताहे ॥**
**अश्व हे उठ म्हणे उठताहे । धन्य कीर्ति पाहतां बहु आहे ॥ ३ ॥**

## नंतर समर्थांनीं तिघांवरून एक श्लोक केला तो हा—

**धन्य साधु पहा जयरामा । धन्य रंग पहा निजरामा ॥**
**धन्य साधु पहा आनंदमूर्ती । पाहूं पहा स्वतःसिद्ध कीर्ति ॥४॥**

ही लीला पाहून सर्वांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातले. ह्या समुदायांत रंगनाथस्वामींबरोबरचे चोरही होतेच. त्यांनींही सद्गदित अंतःकरणानें समर्थांपुढें लोटांगणें घातलीं. व हात जोडून पुढें उभे राहिले. त्यांस समर्थ म्हणाले “ चोरहो ! तुम्हावर रंगनाथस्वामींनीं कृपा करून तुम्हांस साव केलें आहे. तर यापुढें चोरी न करतां सावाप्रमाणेंच वागा. म्हणजे तुमचें वर्तनही तसेंच होऊन तुमचें कल्याण होईल.” असा त्यांस आशिर्वाद दिला, व प्रसाद देऊन जाण्यास आज्ञा दिली. तेव्हां त्यांनीं आपल्या हातांतील सर्व हत्यारें समर्थांच्या चरणीं अर्पण करून ते आपआपल्या घरीं निघून गेले.

नंतर समर्थ आदिकरून चारही स्वामी सभेस येऊन त्यांनीं सर्व लोकांस प्रसाद दिला. तो घेऊन यात्रेकरू लोक निघून गेले. दुसरे दिवशीं स्नानसंध्यादि भोजन वगैरे आटोपल्यावर चौघेही एकमेकांत परमार्थपर भाषण करीत असतां आनंदानें एकमेकांस नमस्कार करीत, मध्येंच आलिंगन देत, असा प्रकार चालत होता. त्या प्रेमाचें वर्णन कोण करणार ? अशा विदेह स्थितींत असतां त्या विदेह स्थितीच्या लक्षणपर समर्थांनीं एका श्लोकाचा पहिला चरण म्हटला; दुसरा चरण जयरामस्वामींनीं म्हटला; तिसरा रंगनाथस्वामींनीं म्हटला व चौथा आनंदमूर्तींनीं म्हटला. तो श्लोकः—

[ समर्थांचा चरण ] **मुक्तासि कांहीं तनुभाव नाहीं।**
[ जयरामस्वामींचा चरण ] **असून देहीं परि तो विदेही ॥**
[ रंगनाथस्वामींचा चरण ] **प्रारब्ध कर्मास्तव देहि झाले।**
[ आनंदमूर्तींचा चरण ] **वायूसवें पादप जेवि हाले ॥ १ ॥**

ह्याप्रमाणें चौघेही ब्रह्मानंदांत निमग्न होऊन कांही दिवस वडगांवांत राहून तिघेही आपआपले स्थानीं गेले. जयरामस्वामी मात्र वडगांवास राहिले. [ ही गोष्ट शके १५७८ च्या माघ शुद्ध १५ स व वद्य प्रतिपदेस झाली असें चाफळच्या यादींत आहे. परंतु बखरींत हा शक १५७९ दिला आहे. असा थोडा थोडा प्राचीन लेखांत फरक राहणें साहजिक आहे. ह्यांतील अद्भुत चमत्काराबद्दल रंगनाथस्वामींची व आनंदमूर्तींची [ कवितात्मक ] साक्ष विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.]

**एकांती भोजन**—समर्थांचें दररोजचें जेवण होणें तें एकांतीं होत असे. त्यांच्या पानावर सारे पदार्थ एकदमच वाढावयाचे–व तें एकवाढ केलेलें पान त्यांच्या नेहेमींच्या बसावयाच्या खोलींत नेऊन ठेवीत. समर्थांचें जेवावयाचें ताट फार मोठें असे. ते शिवाजी महाराजांनीं त्यांच्या करतां मुद्दाम तयार करून पाठविलें होते. हें ताट चांदीचें असून त्यालाच वाट्या खिळलेल्या असत. त्यांतून सर्व पदार्थ एकदांच वाढीत. व एकदां ताट खोलींत नेऊन ठेवलें म्हणजे पुन्हा तिकडे कोणी जात नसे. ही नित्याची वहिवाट असून ती सर्वांस ठाऊकही होती.

एके दिवशीं वेणूबाईनीं सर्व ताट तयार करून तें खोलींत नेऊन ठेवलें, व नेहमींच्या पद्धतीप्रमाणें दारही लावून घेतलें. परंतु परत स्वयंपाक घरांत जाऊन पहातात तों एक पदार्थ त्या ताटांत वाढावयाचा चुकून राहिला होता. म्हणून त्या तशाच परत गेल्या, व हळूच खोलीचें दार उघडलें आणि जरा डोकावलें तों आंत मारुति विशालरूप धारण करून भोजन करीत होते. त्यांनीं हुंकार केला! तें उग्ररूप पाहतांच वेणूबाई मूर्च्छा येऊन धाडकर खालीं पडल्या! सर्व मंडळींचीं पानें बाहेर मांडलेली होती. परंतु वेणुबाई एकाएकीं निचेष्टित पडल्यामुळें कोणासच कांहीं सुचेना. सारी मंडळी धावाधाव करूं लागली. परंतु वेणूबाई कांहीं सावध होईनात. अखेर समर्थांचे जेवण होऊन तेही बाहेर आले आणि

वेणूबाईकडे रागारागानें पाहून म्हणाले " रोजचा नियम माहीत असतां, तो मोडावा कां ? " त्यावर आक्का म्हणाल्या " मातापिता एकेठिकाणीं असतां मुलास जावयास काय हरकत आहे ? तसा अपराध चुकून घडल्यास मुलांस दंड करणें योग्य नाहीं. " " एकूण आक्का ! तूं तर आम्हालाच शद्ब लावतेस ? " असें हास्ययुक्त मुद्रेनें म्हणून समर्थांनीं वेणूबाईस सावध केलें, व मग सर्वांचीं भोजनें झालीं.

# समर्थांचें सामर्थ्य
## किंवा
# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## पूर्वार्ध

## भाग ६ वा

## तप पांचवें.

इतक्या वेळपर्यंत समर्थांचीं चार तपें संपूर्ण झाली. म्हणजे शके १५७८ पर्यंतचा सर्व वृत्तांत सांगितला. आतां येथून पुढें पांचव्या तपांतील लीलांचें वर्णन करावयाचें आहे. अर्थात् त्यामध्यें १५७९ पासून १५९० पर्यंतची हकीगत येणार. पाचवें तप हा समर्थांच्या व शिवाजी महाराजांच्याही भर अमदानीचा काल असल्यामुळें त्यांतील लीला व अद्भुत चमत्कारही अत्यंत मनोल्हादक आहेत

तत्कालीन महाराष्ट्र [संतमंडळांत आणि समर्थांत पुष्कळच फरक होता. म्हणजे इतर ] संतमंडळींप्रमाणें समर्थांच्या अंगीं वैराग्य, भक्ति, सिद्धि वगैरे सर्व असून शिवाय व्यवहारोपयोगी असे गुण त्यांच्या अंगांत पुष्कळच होते. ते फर्डे लेखक होते; बाके कारकून होते; पट्टीचे पोहणार होते. त्याप्रमाणेंच ते घोड्यावर बसणारही पटाईत होते, हें खालीं दिलेल्या गोष्टीवरून लक्षांत येईल.

**रामबाण**—कोणतीही उत्कृष्ट चीज दृष्टीस पडली कीं, ती आपल्यास नसली तरी चालेल, पण ती समर्थांस अर्पण करावी असें निरंतर शिवाजी महाराजांस वाटत असे. इतके समर्थ त्यांस जिव की प्राण वाटत असत. एकदां कोणी एकानें शिवाजी महाराजांस एक उमदा घोडा नजर केला. तें जनावर फार देखणें, गुणी, रंगांत, रूपांत, कानकळाशींत फारच उत्कृष्ट होतें. चालीला तर विचारूंच नये. जणो काय वारा! असें पहातांच शिवाजी महाराजांनीं तो घोडा सरंजामासुद्धां समर्थांकडे पाठवून दिला. त्यास पाहून समर्थांचें मन प्रसन्न झालें. घोडा तंगबार केलेला होता. तो पाहून त्या मोतद्दारास समर्थ म्हणाले "अरे! त्याला असा बांधलास का? सोडून मोकळा कर." मोतद्दार म्हणाला "जनावर मोठें आहे. सोडल्यावर ऐकणार नाहीं." "काहीं चिंता नाहीं;" समर्थ म्हणाले "सोड तूं त्याला." ही समर्थांची आज्ञा ऐकून मोतद्दारानें त्या घोडयाचा तंगबार सोडला; सामान उतरलें; आणि लगाम काढणी काढूनही त्यास मोकळें केलें. येवढा खंदा घोडा मोकळा सुटतांच त्यानें एकदम 'फुर' करून दुगाण्या झाडल्या आणि पळत निघाला. पण समर्थांनीं तितक्यांत त्याचें आयाळ धरून ताडकर त्याच्या पाठीवर उडी मारून ते त्यावर स्वार झाले! त्याबरोबर तो घोडा किल्लयाच्या दरवाजांतून बाहेर पडून तडक च्चौफेर निघाला! समर्थांची बरीच शिष्य मंडळी पाठीस लागली. पण त्यांच्यानें काय त्या घोड्याचा पाठलाग करवतो! तो वाऱ्यासारखा निघून किल्लयाच्या पायथ्याच्या वाटेस लागला. उद्धव गोसाव्यांनीं मात्र पाठ सोडली नाहीं! ते त्याच्या मागोमाग सारखे साखरपाणी घेऊन पळत होते! घोडा निघाला तो काय विचारावें! त्याला उंच नाहीं, सखल नाहीं, दगड नाहीं, धोंडा नाहीं, झाड नाहीं, झुडुप नाहीं! सारखा दोन तीन कोस पळत गेला! तों दुपार भरली! उन्ह मनस्वी तावूं लागले. समर्थांना तृषा लागून जीव व्याकुळ झाला. तेव्हां घोडा थांबविला आणि मागें वळून कोणी आहे किंवा नाहीं तें पाहूं लागले. तों उद्धव गोसावी मात्र मागें होतें. त्यास ते म्हणाले "उद्धवा! पाणी आहे काय?" उद्धव गोसावी म्हणाले "होय." असें म्हणून त्यांनीं साखर व पाणी दिलें. तें यथेच्छ प्राशन केलें तेव्हां त्यांची तृप्ती झाली. त्यावेळीं समर्थ म्हणाले "उद्धवा! तूं पाणी देऊन माझें शिव म्हणजे कल्याण केलेंस, ह्यास्तव

आजपासून तुझें नांव 'शिव' असेंच ठेवतों." असें म्हणून त्या दिवसापासून शिवच म्हणूं लागले. अर्थात् त्या वेळेपासून उद्धव गोसाव्याला सर्व लोक 'शिव स्वामी' असेंच म्हणूं लागले. उद्धव गोसाव्यांनीं आपल्या कवितेंत सुद्धां 'शिव' अशाच नांवाचा पुढें उल्लेख केला आहे. असो.

ह्या घोड्याचें नांव समर्थांनीं 'रामबाण' असें ठेवलें, व तो नेहमीं चाफळच्या मठांत ठेवला. ही गोष्ट शके १५७९ मध्यें घडली.

**हुरड्याचें बक्षीस!**—निजानंदस्वामींच्या पुण्यतिथीकरितां समर्थांची स्वारी शके १५८० मध्यें कऱ्हाडास गेली होती. तेथून निगडीस जाऊन रंगनाथस्वामींची भेट घेऊन परत परळीस येण्याकरितां निघाले. बरोबर पांच पंचवीस शिष्य मंडळी होती. चालतां चालतां दोन प्रहर झाले, तेव्हां साऱ्या मंडळींना भूक लागली. दुतर्फा शाळवांचीं शेतें गजबरलेलीं असून कोंवळा लुसलुशीत हुरडा तयार झालेला होता. ह्यास्तव सर्वांनीं समर्थांस विनंति केली कीं, आम्हांस हुरडा काढून खाण्याची आज्ञा व्हावी. समर्थ म्हणाले, "तुम्ही इतके एका शेतांत हुरडा खाऊं लागला तर त्या साऱ्या शेताचा फन्ना पाडाल, याकरितां एक एका शेतांतून पांच पांच कणसें काढून जमा करा, आणि मग तीं एके ठिकाणीं बसून भाजून खा." अशी आज्ञा झाल्यावरून प्रत्येकांनीं एक एका• शेतांतून दहा दहा पांच पांच कणसें मोडलीं आणि देगावांनजिक आल्यावर तेथील पाटलाच्या शेतांत विहीर चांगली, पाणी निर्मळ, वृक्षांची छाया घनदाट असें पाहून सर्व मंडळी तेथें उतरली. छायेखालीं समर्थांस बसावयास आसन घालून दिलें व बाकीची मंडळी हुरडा भाजावयाच्या उद्योगास लागली. हुरड्याच्या ताटांचा जुडगा आणून एकानें मध्यें टाकला, दुसऱ्यानें त्याच्यावरचीं कणसें खुडलीं, तिसऱ्यानें रानशेणी वगैरे जमा केल्या. आणि आगटी पेटवून कांहीं मंडळी हुरडा भाजून तो समर्थांस देऊं लागली. इतक्यांत त्या शेताचा मालक पाटील होता तो गांवामध्यें चावडीवर बसला होता. त्यानें हा सर्व प्रकार पाहिला. त्यास वाटलें कीं ही बैराग्याची झुंडच्याझुंड येऊन त्यांनीं आपल्या शेताचा सारा नाश केला, म्हणून तो रागारागानें जो धांवत निघाला, तो आपल्या विहिरीपाशीं आला. पाहतो तों समर्थ मध्यभागीं आसनावर हुरडा खात आहेत. तेव्हां हाच बैरागी ह्या टोळींतला

मुख्य होय, असें मनांत येऊन त्याच्या तळव्याची अग अगदीं मस्तकास पोंचली. त्यानें तीं हुरड्याचीं खालीं पडलेलीं ताटें हातांत उचलून घेतलीं आणि समर्थांच्या पाठींवर पांच चार तडाके जोरानें मारले! समर्थ कांहींच बोलले नाहींत. पण शिष्यमंडळी मात्र हा अनुचित प्रकार पाहतांच सारी एकदम त्या पाटलाच्या अंगावर धांवलीं व त्यास यथेच्छ मारूं लागली. त्यांस समर्थ म्हणाले "अरे! त्या पाटलाला मारूं नका. त्याच्याच शेतांतला आपण हुरडा खात आहों आणि त्यासच मारणें उचित नव्हे." अशी आज्ञा झाली तेव्हां साऱ्या मंडळीचा इलाज खुंटला. ते मग त्यास नुसते तोंडानेंच बोलूं लागले. अशा रीतीनें हुरड्याचा साराच विरस झाल्यामुळें समर्थ तेथून निघाले व सर्व शिष्यांसहवर्तमान संगम माहुलीवर गेले. हें वर्तमान शिवाजी महाराजांस साताऱ्यास कळतांच ते समर्थांच्या दर्शनास माहुलीवर गेले व समर्थांस साताऱ्याच्या वाड्यांत घेऊन आले. मंगलस्नान घालते वेळीं पाहतात तों समर्थांच्या पाठीवर मोठमोठे वळ उठलेले! हें पाहून तर राजश्रींना कांहीं कल्पना होईना. त्यानीं समर्थांसच त्याबद्दल प्रश्न केला. परंतु त्यानीं ती गोष्ट ऐकली न ऐकलीशीच केली. अखेर भोजन वगैरे होऊन समर्थांनीं जरा वामकुक्षी केली. असें पाहून शिवाजीमहाराजांनीं शिष्य मंडळींत जाऊन चौकशी केली कीं 'समर्थांच्या पाठीवर वळ कसले?' कारण त्याबद्दल त्यांच्या जिवाला अगदीं रुखरुखच लागून राहिली होती. तेव्हां उद्धवांनीं देगांवच्या पाटलाची सारी हकीगत सांगितली.

ती ऐकून शिवाजी महाराज अत्यंत संतप्त झाले. देवापेक्षां व प्राणापेक्षांही प्रिय मानलेल्या आपल्या सद्गुरूंचा असा छळ एका यःकश्चित् पाटलानें केलेला ऐकून त्यांस असा क्रोध येणें साहजिकच होतें. त्यांनीं लगेच दोन ढालाइतास हाक मारून हुकूम फर्मावला कीं, "देगांवच्या पाटलाच्या मुसक्या बांधून त्यास येथें घेऊन या." समर्थ निजल्या निजल्या हा सर्व प्रकार ऐकतच होते. त्यांनीं ती गडबड ऐकून विचारिलें कीं "शिवबा! काय करतां?" महाराज म्हणाले "देगांवच्या पाटलास बोलावणें पाठवितों." समर्थ म्हणाले "मी सांगतों त्याप्रमाणें तुम्ही त्यास शिक्षा कराल काय?" राजेश्री म्हणाले "आज्ञा होईल

त्याप्रमाणें बरोबर शिक्षा करीन." समर्थ म्हणाले "ठीक आहे. तर त्यास येथें बोलावून मात्र आणा. मुसक्या वगैरे कांहीं बांधूं नये. येथें आल्यानंतर काय शिक्षा करणें ती करूं." महाराज म्हणाले "आज्ञा." नंतर त्यास आणावयासाठीं मनुष्य रवाना केले व दुसऱ्या दिवशीं त्यांनीं त्या देगांवच्या पाटलास राजदरबारांत आणून उभा केला.

पाटलास सरकारी बोलावणें आल्यापासून तो आधींच गर्भगळित झाला होता, व आतां आपलें काय होतें आणि काय नाहीं ह्या विवंचनेनें मनांतल्या मनांत भेदरून गेला होता. अशा स्थितींत पाहतो तों समोरच ज्याच्या पाठीवर आपण हुरड्याचीं ताटें मारलीं तो गोसावी उच्च सिंहासनावर बसला आहे व प्रत्यक्ष शिवाजी महाराज त्याज़पुढें हात जोडून उभे आहेत. हें पाहून तर भीतीनें त्याच्या अंगांत कांपरें भरलें. त्यानें 'चुकलों ! अपराधाची क्षमा असावी' असें म्हणून ताड ताड आपल्या तोंडांत मारून घेतल्या व दंडप्राय जमिनीवर पडला. तें पाहून समर्थांनीं त्यास 'तूं भिऊं नकोस.' असें म्हणून उठावयास सांगितलें. तेव्हां तो हात जोडून पुढें उभा राहिला. त्यास पाहून समर्थ म्हणाले "शिवबा ! आम्ही सांगूं ती ह्याला शिक्षा करतांना?" शिवाजीराजे म्हणाले "जी आज्ञा होईल त्याप्रमाणें तत्काल करतों. त्यांत अंतर होणार नाहीं."

त्यावर समर्थ म्हणाले "तर मग ह्याला त्याच्या त्या शेताची इनामी सनद करून द्या. आणि त्यास पागोटें, आंगारखा, धोतर व बनात देऊन त्याची रवानगी करा." ही समर्थांची आज्ञा ऐकून शिवाजी महाराजचसे काय, पण सारीच मंडळी आश्चर्यचकित झाली ! परंतु समर्थांच्या आज्ञेपुढें बोलणार कोण ? शिवाजी महाराजांनीं लागलीच त्याच्या शेताची इनामी सनद लिहून त्याच्या हवाली केली. व समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें पोषाख देऊन जावयास आज्ञा दिली. तेव्हां जातांना त्यानें समर्थांस व शिवाजीमहाराजांस किती कृतज्ञतापूर्वक नमस्कार केला असेल, त्यांच्याबद्दल त्याच्या मनांत किती पूज्यभाव उत्पन्न झाला असेल, प्रेमानें त्यांचें अंतःकरण किती भरून आलें असेल, ह्याची वाचकांनीं केवळ कल्पनाच केली पाहिजे. त्या शेताच्या इनामाचा उपभोग आज तागायत देगांवच्या पाटलाचे वंशज घेत आहेत. यापेक्षां क्षमेचें अधिक सोज्वळ उदाहरण दुसरें कोठें बरें आढळेल ?

म्हणूनच या क्षमाशीलतेचें कविवर्य मोरोपंतांनीं वर्णन केलेलें आहे. व तीच आर्या, या पुस्तकाच्या आरंभींच दिली आहे. हें चरित्र शके १५८० विलंबीनाम संवत्सरीं पौष मासांत झालें.

**छाटींतलें हींव !**—समर्थांच्या लीलेपैकीं पुष्कळ गोष्टी अघटित अशा आहेत. व्यवहार दृष्टीनें व सृष्टिनियमाप्रमाणें विचार केला तर त्या असंभवनीय वाटतात हें खरें आहे. परंतु समर्थांच्या सामर्थ्याचा परिपूर्ण विचार केला व आजूबाजूची परिस्थिति पाहिली म्हणजे त्यांना निवळ 'भाकडकथा' म्हणण्यालाही मनाचें धैर्य होत नाहीं. खालची गोष्ट अशापैकींच आहे.

समर्थांची स्वारी चाफळांत असतां त्यांस हिंवाची व्यथा जडली. पुष्कळ उपचार केले, परंतु गुण म्हणून नाहीं. आळीपाळीनें हींव हें येतच असे. एके दिवशीं थडथडून हींव आलें आहे तोंच शिवाजीमहाराज त्यांच्या दर्शनास आले. एका शिष्यानें आंत येऊन समर्थांस वर्दी दिली कीं, शिवाजीमहाराजांची स्वारी दर्शनास आली आहे. 'त्यांस आंत येऊं द्या ' अशी आज्ञा केली, आणि समर्थ आंथरुणावर उठून बसले. थंडी वाजतच होती. ह्यास्तव आंगावरची छाटी काढून ती मांडीखालीं घेतली, आणि शिवाजी महाराजांशीं नेहेमींप्रमाणें खुशाल बोलूं लागले. पांच दहा मिनिटें झालीं तों असा चमत्कार झाला कीं, समर्थांच्या मांडीखालची छाटी सारखी लटलट लटलट हालूं लागली ! हें पाहून शिवाजी महाराजांनीं कल्याणस्वामींच्या मुखाकडे पाहिलें. कल्याणस्वामींनीं हात जोडून विनंति केली कीं, स्वामींस आज बहुत दिवस हींव येत आहे. आतांही थंडी वाजत होती, परंतु स्वारी आली म्हणून हींव छाटींत ठेवून समर्थ आपल्याशीं बोलत आहेत ! हें ऐकून शिवाजी महाराजांनीं हात जोडून समर्थांस विनंति केली कीं, "येवढें सामर्थ्य अंगीं असतां मग प्रत्यक्ष व्यथा काय म्हणून भोगावयाची ?" समर्थ म्हणाले "बापा ! हा शरीरभोग प्रारब्धाप्रमाणें सर्वांना भोगलाच पाहिजे. हा प्रारब्धयोग प्रत्यक्ष ब्रह्मदेवालासुद्धां सुटावयाचा नाहीं. एखाद्या वेळीं अशी चालता चालत केली तर चालेल. पण ती नेहेमींच केली तर कसें चालेल ? [ सृष्टिक्रमासही व्यत्यय येणार नाहीं

काय ?" * ] हें ऐकून महाराजांनीं साष्टांग दंडवत करून असे सद्गुरु आपणास मिळाल्याबद्दल मनामध्यें धन्यता मानली. नंतर तिराल वास्तव्य करून आज्ञा घेऊन ते आपल्या कार्यास गेले.

**अंत्यजाकडून वेद बोलविले !**—समर्थांच्या कालीं श्रीक्षेत्रकाशी हें ब्राह्मणांच्या विद्येचें मूळपीठ असून तेथें अनेक विद्वान् पैदा होत हें पूर्वीं सांगितलेंच आहे. आणि त्या विद्वानांचें मुख्य कर्तव्य म्हणजे संस्कृत भाषेनें भर सभेंत वादविवाद करून अजिंक्य पत्र मिळवणें हें. ह्या विद्यापीठामध्यें सदाशिवशास्त्री देव येवलेकर म्हणून एक महान् विद्वान् तयार झाले व ते अजिंक्यपत्रें घेत घेत सर्व हिंदुस्थानभर पर्यटन करूं लागले. अशा विद्वानामध्यें 'अहंमन्यता' वाढून ती अगदीं शिखरास जाऊन पोंचे, हा मोठा दोष होता. व तोच दोष ह्या देवांच्या अंगीहीं प्राबल्यें-करून वसत होता.

हे शास्त्री उत्तर हिंदुस्थानांतून अजिंक्य पत्रें घेत घेत दक्षिण हिंदुस्थानांत आले. तों शिवाजी महाराजांचा लौकिक त्यांच्या कानीं आला व त्यांच्या पदरीं गागाभट्ट म्हणून प्रसिद्ध विद्वान् असल्याचेंही त्यांनीं श्रवण केलें. तेव्हां आणि त्यांच्यापासूनही अजिंक्य पत्र आणावें म्हणून ते साताऱ्यास आले. वासुदेव शास्त्र्यांचा थाटही त्यांच्या ब्रीदास अनुरूप असाच होता. म्हणजे बसावयाला पालखी, दिवसां मशाल पेटवलेली, यज्ञोपवीताला बांधलेली तीक्ष्ण सुरी ! अशाकरितां कीं, कोणी आपणांस वादांत हरविलें तर लागलीच स्वहस्तें जिव्हा छेदन करवयाची ही प्रतिज्ञा !

येवढ्या इतमामानें शास्त्रीबुवांची स्वारी आलेली पाहून शिवाजी महाराजांनीं त्यांचें यथोचित आदरातिथ्य केलें. तेव्हां देवांनीं शिवाजी महाराजांस सांगितलें कीं, मी वाद करण्यासाठीं आलों आहे. आपल्या पदरीं गागाभट्ट वगैरे विद्वान् शास्त्री आहेत असें ऐकतों. तरी उदईक

---

* येथें श्रीमद्भागवतांतील उद्धवाचा व भगवंताचा संवाद राजेश्रींस सांगून ह्या विषयाची समजूत नीट रीतीनें केल्याचा बखरींत उल्लेख आहे. परंतु विस्तारभयास्तव तो विषय येथें घेतां येत नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते.

आपला दरबार भरवून आमच्याशीं वाद व्हावा व तो आपण श्रवण करावा, अशी इच्छा आहे. शिवाजी महाराजांतीं ती गोष्ट मान्य करून दुसऱ्या दिवशीं दरबार भरविण्याचें ठरविलें. ही बातमी गागाभट्टांस लागतांच त्यांची अगदीं पांचावर धारण बसली.

हे काशीस षट्शास्त्रांचें अध्ययन करून चंग बांधून आलेले शास्त्री; शेंकडों ठिकाणीं ह्यांनीं अजिंक्य पत्रें मिळविलेलीं; वादें करण्याच्या कामीं ह्यांचा हातखंडा; यांच्या बरोबर आपला टिकाव कसा लागणार ? लागावयाचा नाहीं, आणि अजिंक्य पत्रावर सही करून देण्याचा प्रसंग येऊन त्यांत आपली मानहानि होईल, हें कांहीं ठीक नाहीं. हा विचार मनांत येऊन गागाशास्त्री मोठ्या विवंचनेंत पडले. उद्यांचा हा प्रसंग टाळण्यास काय उपाय करावा हेंच त्यांस सुचेना. अखेर त्यांच्या मनांत एक कल्पना आली. ती अशी कीं, रामदासस्वामींची व त्यांची गांठ घालून द्यावी, आणि आपण नामानिराळें व्हावें. म्हणजे अनायासें त्यांसही थोरपणा दिलासें होईल. ही कल्पना मनांत येतांच ते रातोरात वासुदेवशास्त्र्यांच्या बिऱ्हाडीं जाऊन त्यास म्हणाले " शास्त्रीबोवा ! आपण उद्यां दरबारांत वाद करणार कोणाबरोबर ? मी बोलून चालून वैदिक. माझें अध्ययन तें काय ? मी आपल्या अजिंक्य पत्रावर केव्हांही सही करण्यास तयारच आहे. परंतु मला वाटतें, श्रीसमर्थरामदास्वामी हे राजगुरु आहेत. ह्या दरबारांत चलती काय ती त्यांची. त्यांच्याशीं वाद केला तर कांहींतरी आमच्या सारख्याला ऐकावयाला मिळेल. आणि त्यांची सही आपल्या अजिंक्य पत्रावर मिळेल तर ती अत्यंत महत्त्वाची होईल."

ही गोष्ट वासुदेवशास्त्र्याला पूर्णपणें पटली. कारण समर्थांचा लौकिक त्यानेंही ऐकलेला होताच. 'राजगुरु' 'राजगुरु' म्हणवितात तेव्हां त्यांची विद्वत्ता किती आहे त्याचाही अदमास पहावा आणि आपल्या अजिंक्य पत्रावर त्यांची सही घ्यावी, तीच आपल्याला अत्यंत भूषणास्पद होईल असें वाटून त्यांनीं गागाशास्त्र्यांस सांगितलें कीं "फार उत्तम आहे. आपण उद्यां दरबारांत तुमच्याशीं मुळींच वाद करणार नाहीं. आपण समर्थांशींच वाद करूं." ह्याप्रमाणें बरोबर बार भरून गागाशास्त्री आपल्या बिऱ्हाडीं निघून गेले.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं शिवाजी महाराजांनीं वाड्यांत दरबार भरविला. महाराजांस मध्यभागीं उच्च सिंहासन; त्याचप्रमाणें उजव्या हाताला वासुदेवशास्त्र्यांना उच्चासन व डाव्या बाजूस गागाशास्त्र्यांकरितां त्याच्या समोर दुसरें उच्चासन याप्रमाणें सिद्धता झाली. महाराजयेऊन बसले; वासुदेवशास्त्री देव उजव्या हातच्या उच्चासनावर येऊन स्थित झाले. नंतर गागाशास्त्र्यांना पालखी गेली होती त्याप्रमाणें गागाशास्त्रीही आले. त्यांस शिवाजीमहाराजांनीं डाव्या हाताला उच्च आसनावर बसण्याविषयीं सुचविलें. परंतु त्यांनीं त्या आसनाजवळ जाऊन त्यास नमस्कार केला व 'हा अधिकार माझा नाहीं. ही समर्थांची जागा आहे' असें म्हणून ते त्या आसनाच्या खालींच बसले ! महाराजांनीं त्यांस वर बसण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला, परंतु ते वर बसले नाहींत.

नंतर शिवाजी महाराजांनीं वाद सुरू करण्याविषयीं आज्ञा केली. परंतु वासुदेवशास्त्री म्हणाले "आम्ही गागाशास्त्र्यांशीं किंवा इतर कोणाशींही वाद करणार नाहीं. आम्ही समर्थ राजगुरूशींच वाद करणार; त्यांस आणवावें." शिवाजीमहाराज म्हणाले "ते इकडे मुळींच येणार नाहींत व ते असल्या वादविवादांतही पडणार नाहींत. त्यांचा पंथ वेगळा आपला पंथ वेगळा. त्यांचा भक्तिमार्ग; उपासना मार्ग. ते शास्त्रीही नव्हेत व पंडितही नव्हेत. त्यांना आपण या वादांत पाडणें प्रशस्त नाहीं." ह्याप्रमाणें शिवाजी महाराजांनीं त्यांची पुष्कळ समजूत घातली. परंतु वासुदेवशास्त्री कांहीं ऐकेनात. ते म्हणाले "निदान त्यांचें दर्शन घेतल्यावांचून तरी आम्ही जाणार नाहीं." गागाशास्त्र्यांचेंही तसेंच मत पडलें. तेव्हां दुसऱ्या दिवशीं समर्थांच्या भेटीस जाण्याचें ठरलें. शिवाजी महाराजांनीं आपल्याकरितां एक, वासुदेव शास्त्र्याकरितां एक व गागाशास्त्र्याकरितां एक अशा तीन पालख्या तयार केल्या, व सर्व लव्याजम्यानिशीं शिवाजी महाराज ह्या उभय शास्त्र्यांस घेऊन समर्थांच्या भेटीसाठीं चाफळास जावयास निघाले. चाफळास जाऊन पहातात तों तेथें समर्थांची स्वारी नव्हती. ती रामघळींत असल्याचें समजलें. म्हणून सर्व मंडळी तशीच इतमामासह रामघळीकडे निघाली. परंतु समर्थ तेथेंही नव्हते. ते रामघळीच्या उत्तरेस एका डोंगरावर एक मोठा दगड होता, त्यावर उजव्या बाजूस कुबडी टेकून

बसले होते, व पुढें कल्याणस्वामी उभे होते. इतक्यांत पायथ्यापासून येतांना ही राजेश्रींची स्वारी दृष्टीस पडली. ती पाहून समर्थांनीं कल्याणास विचारिलें "कल्याणा, कोण येत आहेत रे?" कल्याणस्वामी म्हणाले "शिवाजी महाराजांची स्वारी असून आणखींही एक दोन पालख्या आहेत." इत्यादि भाषण चाललें आहे तोंच सर्व मंडळी तेथें येऊन दाखल झाली.

प्रथम शिवाजी महाराज पालखींतून उतरून त्यांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातला. मागाहून गागाशास्त्री उतरले, त्यांनींही समर्थांस साष्टांग नमस्कार घातला. त्यांच्या मागून सदाशिवशास्त्री आले. त्यांनीं समर्थांस नमस्कार वगैरे कांहीं एक न करतां समोर येऊन उभे राहिले. त्यांस पाहताच समर्थांनीं हात जोडून त्यांस नमस्कार केला. तें पाहून सदाशिवशास्त्री म्हणाले "आम्ही आपल्या वादाची परीक्षा पाहण्यासाठीं आलों आहोंत. त्यांत आपण श्रेष्ठ ठरल्यास आम्ही आपल्यास नमस्कार करूं. नाहींतर आशिर्वाद देऊं." हें ऐकून समर्थ हासले आणि म्हणाले "आपल्या नमस्काराची आम्हांस मुळींच अपेक्षा नाहीं. आपण साक्षात् भूदेव आहांत. आपला आशिर्वाद असला म्हणजे पुरे." शास्त्री म्हणाले "परीक्षा पाहिल्याशिवाय कोणतीही गोष्ट कर्तव्य नाहीं." समर्थ म्हणाले "आमची परीक्षा कशाची? आम्ही ना पंडित ना वैदिक. वनांतील वनचराप्रमाणें राहतों व रामाचे दास म्हणवितों. रामाच्या विभूति कोणत्या ठिकाणीं कशा आहेत त्यांचा अंत नाहीं. ह्याकरितां आपण अशा दुराग्रहांत पडूं नये." हें ऐकून शास्त्री म्हणाले "मी आपल्यापाशीं कांहीं ब्रह्मज्ञान शिकण्यासाठीं आलेलों नाहीं. असल्या गोष्टी भोळसर लोकांत व बायाबापड्यांत सांगाव्यात." समर्थांनीं पुन्हा सांगितलें कीं "आपण अशा दुराग्रहांत पडूं नये." परंतु शास्त्रीबुवा कांहीं ऐकेनात. हें पाहून समर्थ कल्याणाकडे वळून म्हणाले "कल्याणा, शास्त्रीबुवा काय म्हणतात?" कल्याणांनीं हात जोडून विनंति केली "महाराज सत्पात्र आहे, कृपा व्हावी."

आपण आलों तरी समर्थ दगडावरून उठले नाहींत; स्वस्थ कुबडीला टेंकून बसले आहेत, आणखी वर गुजगुज गुजगुज गोष्टी करतात. हें मनांत

येऊन सदाशिव शास्त्री अगदीं लाल होऊन गेले. इतक्यांत पलीकडून एक मोळक्या चाललेला दृष्टीस पडला. त्यास पाहून समर्थांनीं विचारिलें "कल्याणा ! तो तिकडून कोण जात आहे ?" कल्याण म्हणाले "तो मोळक्या आहे." समर्थ म्हणाले "त्याला जवळ हाक मार बरें." कल्याणस्वामींनीं त्याला जवळ बोलाविलें तेव्हां तो येऊन मोळी खालीं ठेवून हात जोडून दूर उभा राहिला आणि म्हणाला "काय हुकूम आहे जी मायबाप." त्यास समर्थांनीं विचारलें "तूं कोण आहेस ?" तो म्हणाला "मी अंत्यज हाय जी मायबाप. मी मठामधीं मोळी टाकतों, आणि देतील ती भाकर घेऊन निर्वाह करतों." हें ऐकून समर्थांनीं आपल्या हातांतील कुबडी कल्याणापाशीं देऊन म्हणाले "ह्या कुबडीनें एक रेषा काढून त्याला तिच्या आंत बोलाव." कल्याणांनीं त्याप्रमाणें रेषा ओढून त्या अंत्यजाला आंत बोलाविल्यावर समर्थांनीं त्यास विचारलें "आतां तूं कोण आहेस ?" मोळक्या म्हणाला "आतां मी शूद्र आहे." समर्थांनीं कल्याणास पुन्हा दुसरी रेषा काढून त्यास आंत बोलवावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो दुसऱ्या रेषेच्या आंत आल्यावर समर्थांनीं त्यास विचारलें "आतां तूं कोण आहेत ?" तो म्हणाला "आतां मी ब्राह्मण झालों आहे." समर्थांनीं पुन्हा तिसरी रेषा काढावयास सांगून पुन्हा त्यास आंत बोलावून विचारलें "आतां तूं कोण काहेस ?" तो म्हणाला "मी दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण असून षट्शास्त्रांत पारंगत आहे." हें ऐकून समर्थ म्हणाले "तर अनायासें येथें हे सत्पात्र ब्राह्मण आले आहेत, ह्यांच्याशीं वाद कर."

अशी आज्ञा होतांच अंत्यजानें उत्तर दिलें "आजपर्यंत मठांतील अन्न खाल्लें आहे, त्याचें फल आजच आहे." असें म्हणून त्यानें शास्त्रीबुवांस पूर्वपक्ष करावयास सांगितलें. हा अद्भुत चमत्कार पाहून शास्त्रीबुवांच्या काळजाचें बहुधा पाणी झालेंच होतें. तथापि त्यांनीं कसा बसा पूर्वपक्ष ह केलाच. त्याचा त्या अंत्यजानें श्रुतिस्मृत्याधारें उत्तरपक्ष करून यथास्थित खंडण केलें. कोणत्याही प्रकारें उपाय राहिला नाहीं; आपण सर्वतोपरी हरलों, असें पाहून सदाशिवशास्त्र्यांनीं समर्थांपुढें लोटांगण घातलें, स्वहस्तें मशाल विझवली व जानव्यांतील सुरीनें जिव्हा कापून घेऊं लागले.

तें पाहून समर्थ म्हणाले "कल्याणा; पाहतोस काय ? ब्राह्मण मरतो. धर, धर." कल्याणस्वामींनीं जाऊन शास्त्रीबोवांच्या हातांतलि सुरी घेतली. अंत्यजानें पुन्हा शास्त्रीबुवांस विनंति केली कीं "येवढा वेळ आपण पूर्वपक्ष केला व मी उत्तरपक्ष केला. आतां मी पूर्वपक्ष करतों, आपण उत्तरपक्ष करावा." तें ऐकून शास्त्रीबुवांनीं विचार केला कीं, "येथें कांहीं विद्वत्तेचें काम नाहीं. येवढावेळ पर्यंत जें झालें तेंच पुढें होणार, तेव्हां हात दाखवून अवलक्षण हवें कशाला !" असें जाणून शास्त्रीबुवांनीं हार घेतली. आणि "मी शरण आहे; आजपर्यंत मी अनेक ब्राह्मणांस छळलें. ह्याकरतां माझा उद्धार करावा." म्हणून समर्थांची प्रार्थना केली. तेव्हां समर्थ म्हणाले "जिव्हा कोणाची आणि कोणी कापावी ! दिपटी कोणाची आणि कोणी विझवावी ! रघुपतीच्या भांडारांत अनेक विभूति आहेत. ह्याकरितां असा दुराग्रह कोणीही धरूं नये." हें मधुर भाषण ऐकून शास्त्रीबुवांच्या नेत्रांतून प्रेमाश्रुंच्या धारा लागल्या. जवळ महाराजांसहवर्तमान पुष्कळ मंडळी होती, त्यांसही आश्चर्य वाटलें हें काय सांगावयास पाहिजे ?

अशा प्रकारें शास्त्रीबुवांचें पुराण संपल्यानंतर समर्थ अंत्यजाकडे वळून म्हणाले "बाबा ! तुझें काम झालें. आतां तूं आपल्या कामाला जा. तूं उत्तम सेवा बजावलीस." अंत्यजानें हात जोडून विनंति केली "महाराज, आपण जगदुद्धारकर्ते. आपण आपल्या कृपाप्रसादानें मला विद्वान् ब्राह्मण बनविलें आणि आतां पुन्हा अंत्यज करणार काय ? तें कसें शोभेल ? आणि आपल्या कीर्तीस तरी तें भूषणावह होईल काय ?" हें ऐकून समर्थ हासले आणि म्हणाले "एकुण तूं आम्हालाच पकडींत धरलेस ! बरें आतां तुझें म्हणणें काय ?" तेव्हां त्या अंत्यजानें पूर्वजन्मींचें सर्व स्मरण होऊन तो बोलूं लागला कीं, "मी पूर्वींचा चित्रसेन गंधर्व असून स्त्रीसहवर्तमान क्रीडा करीत असतां नारदांचा अपमान केला, म्हणून त्यांनीं मला शाप दिला. त्यामुळें मी पहिल्या जन्मीं जयपाळ राजाच्या येथें घोडा झालों. तेथें मुकुंदराजाचा अवतार घेऊन शंकरांनीं माझी मुक्तता केली. नंतर दुसऱ्या जन्मांत मी पैठणास रेडा झालों, तेव्हां श्री विष्णूंनीं ज्ञानेश्वराचा अवतार घेऊन माझ्या मुखानें वेद बोलवून माझी मुक्तता केली. सांप्रत चंपक कुलामध्यें अंत्यज झालों होतों. येथें नारदांच्या उश्शापाप्रमाणें रामदास-

स्वामीकडून माझी मुक्तता होणार होती. त्या भविष्याप्रमाणें सर्व कांहीं झालें. आतां मी मुक्ति घेणार." समर्थ म्हणाले "ठीक आहे. आणखी काय मागावयाचें तें माग." तेव्हां तो म्हणाला "माझ्या जातीला मानाचा नारळ असावा." असें मागितल्यावरून समर्थांनीं चाफळच्या रघुपतीची स्वारी रथारूढ होऊन निघाली म्हणजे अंत्यजास एक नारळ देण्याविषयीं आज्ञा केली. ती अद्याप चालत आहे.

नंतर त्या अंत्यजानें सर्वांदेखत तेथेंच देह ठेवला. तेव्हां समर्थ त्या धोंड्यावरून उठले व त्याच्या खालींच त्याचा देह पुरून त्यावर तोच धोंडा ठेवून दिला. त्या अंत्यजाचें नांव 'बहिऱ्या' असें होतें. त्यावरून त्या धोंड्यालाही अद्याप 'बहिर्धोंडा' असेंच नांव पडलें आहे. त्या दिवसापासून सदाशिवशास्त्र्यांनीं सर्वसंगपरित्याग करून आपला सर्व लवाजमा यवल्यास पाठवून दिला. आणि स्वतः समर्थांच्या सेवेंत राहिले. 'सर्वांभूतीं वासुदेव आहे' हें ध्यानांत रहावें म्हणून शास्त्रीबुवांचें नांव समर्थांनीं 'वासुदेव गोसावी' असें ठेवलें व त्यांची कण्हेरच्या मठावर स्थापना केली. ह्याप्रमाणें सर्व वृत्तांत झाल्यानंतर शिवाजी महाराज समर्थांसह चाफळच्या मठांत गेले, व त्रिरात्र राहून मग साताऱ्यास गेले. हें चरित्र शके १५८० विलंबीनाम संवत्सरीं माघमासांत झालें. त्यावेळीं श्रीशिवाजी महाराजांबरोबर जनार्दनपंत कोरडे, जनार्दनपंत हणमंते, मोरोपंत पिंगळे, निळोपंत मुजुमदार, बाजी व महादाजी खासनवीस व बाळाजी आवजी चिटणीस आदिकरून मंडळी होती. ह्या वासुदेव गोसाव्यांची समर्थांनीं पुढेंही एकदां षोडशोपचार पूजा केलेली आहे.

**अफजुलखानाचें पारिपत्य—** शिवाजीनें आपल्या राज्यांत धुमाकूळ मांडला, एकामागून एक किल्ले व प्रांत सर करीत चालला असें पाहून विजापूरच्या बादशहानें शिवाजीच्या वडिलांचा म्हणजे शहाजी राजांचा फार छळ मांडला. कारण ते बादशहाच्या पदरचे सरदारच होते. तरी कांहीं वळतीवर येण्याचें लक्षण दिसेना. म्हणून सामदामाचें बोलणें लावलें, तरी कांहीं नाहीं. अखेर बादशहानें आपला मेव्हणा अफजुलखान सरदार ह्यास बरोबर मोठी जय्यत फौज देऊन शिवाजीवर रवाना केलें. विजापुरास एक अवलिया फकीर, रामदासस्वामीप्रमाणेंच महा समर्थ असून

त्रिकालज्ञ असे. तो अफजुलखानानें गुरु केलेला होता. अफजुलखान बादशहाच्या हुकमानें २५००० सैन्य घेऊन शिवाजीवरच्या स्वारीस निघाला, तेव्हां आपल्या परमपूज्य गुरूच्या दर्शनास गेला व त्यांस वंदन करून त्याचा आशिर्वाद मिळावा म्हणून हात जोडून पुढें उभा राहिला. आपण कोणत्या स्वारीवर कोणत्या उद्देशानें निघालों आहों हें सर्व त्यानें त्यांस निवेदन केलें. तें सर्व ऐकून तो सत्पुरुष मोठ्या दुःखाने म्हणाला "परंतु अफजुल! तुला ह्या कामांत यश तर येणार नाहींच, पण उलट तुझा त्यांत नाश होईल असें दिसतें. कारण, तूं बोलतों आहेस खरा, पण तुझें मस्तक मला मुळींच दिसत नाहीं! फक्त धड मात्र दिसतें आहे! ह्याचा पूर्णपणें विचार करून मग काय करणें तें कर."

हें सत्पुरुषाचें वाक्य ऐकून अफजुलखानाच्या अंतःकरणास चरकाच बसला! ह्या साधूचें भाषण कधीं असत्य होणार नाहीं, अशी त्याची अनेक अनुभावांवरून खात्री होती. अफजुलखानाला ६० स्त्रिया होत्या. त्या आपल्या पश्चात् दुसऱ्याच्या हातीं पडूं नयेत म्हणून तो तेथून घराकडे परत गेला आणि एक एका स्त्रीला हाक मारून त्यानें त्या साऱ्या स्त्रिया छाटून टाकल्या! आणि त्याच्या गुरूस त्यांच्या ६० कबरा बांधण्यास सांगून तो बाहेर पडला! ह्या ६० कबरा अद्याप विजापुरास आहेत! इतक्या हत्त्या करून स्वारीस निघालेल्या मनुष्याला कोणतें फळ प्राप्त होणार हें सहजच कळतें व तेंच पुढें त्याच्या पदरींही पडलें!

अफजुलखान चालून आलेला ऐकतांच शिवाजी महाराजांसही मोठें संकट वाटूं लागलें. तरी त्यांनीं समर्थांच्या चरणीं लक्ष ठेवून त्यांच्या आज्ञेप्रमाणें श्रीभवानीची आराधना केली, आणि तिनें सांगितलेल्या मसलतीप्रमाणें पुढील सारा व्यूह रचून खानाला रडतोंडीच्या घाटानें कोयनातीरीं आणून प्रतापगडास त्याचा पाडाव केला. ही गोष्ट इतिहास-प्रसिद्धच आहे. शके १५८१ मार्गशीर्ष शुद्ध ५ शुक्रवारीं खानास मारलें. त्यावेळीं शिवाजी महाराजांस हत्ती, घोडे व संपत्ति मुबलक मिळाली. खानाचें प्रेत तेथेंच किल्ल्यावर पुरून त्यावर बुरुज बांधला. त्याला अफजुल बुरुज असें नांव असून तेथें अद्याप नंदादीपाची वगैरे व्यवस्था आहे.

अफजुलखानाचा शेवट लागतांच, शिवाजी महाराजांस एका मोठ्या

संकटांतून पार पडलों असें वाटून हायसें झालें. व ते मोठ्या आनंदानें त्या गुरुवारीं समर्थांस भेटावय गेले. त्यावेळीं समर्थांची स्वारी डेरवणाच्या घळींत असून दासबोध लिहिण्याचें काम चाललें होतें. अठराव्या दशकांतील पांचवा समास संपून सहाव्या समासाचा आरंभ होता. इतक्यांत शिवाजी महाराजांनीं जाऊन साष्टांग प्रणिपात केला आणि हात जोडून उभे राहिले. अफजुलखानासारख्या बलाढ्य शत्रूच्या हातून पार पडून राजेश्री विजयानंदाच्या भरांत आहेत असें पाहून त्यांचें धैर्य, चातुर्य इत्यादि गुण मनांत आणून समर्थांनीं 'उत्तम पुरुषलक्षण' ह्या नांवाचा सहावा समास सुरू केला. तो संपेपर्यंत राजश्री उभेच होते. नंतर बसण्याविषयीं आज्ञा झाली. नंतर तोच समास राजश्रींच्या हातांत देऊन वाचावयास आज्ञा केली. तो समास राजश्रींसच अनुलक्षून होता. तो वाचून शिवाजी महाराजांचें अंतःकरण अगदीं उचंबळून आलें. ते समर्थांस म्हणाले "आपण पतितांचे नाथ, व रंकाचे राव करणारे समर्थ आहांत; आणि मी 'दासस्यदासोस्म्यहं' केवळ अनाधिकारी आहे." त्यावर समर्थ किंचित् हास्यकरून म्हणाले "तूं जन्मजन्मांतरीं श्रींची सेवा बहुत केली आहेस, त्याचें हें फळ आज भोगीत आहेस. बरें असो; अबदुल्याच्या पेंचांतून तर सुटलासना? कसें काय वर्तमान झालें?" हा प्रश्न ऐकून शिवाजी महाराजाच्या नेत्रांतून ढळढळढळढळ प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यांनीं झालेलें इत्थंभूत वर्तमान समर्थचरणीं निवेदन केलें. तें श्रवण केल्यानंतर समर्थांनीं प्रश्न केला "बरें, त्यावेळीं तुला कसें वाटलें?" राजेश्रींस स्फुरण चढून ते सांगूं लागले "काय सांगूं महाराज! त्यावेळीं मनुष्य मात्र मला मुंगीप्रमाणें दिसत होतें. अबदुल्यानें मला काखेंत दाबलें, त्यावेळी मी देहभावनावरच नव्हतों. मी त्याच्या खाकोटींतून निसटलों तेव्हां मी फार लहान झालों असें वाटलें. त्यावेळीं अंगामध्यें अशी कांहीं वीरश्री चढली होती कीं तसले आणखी शतशः अबदुले आले असते तरी त्यांच्या नरडीचा घोट घेतला असता!" "शाबास बापा!" असें म्हणून समर्थांनीं परमार्थाच्या अनेक गोष्टी सांगितल्या. त्या दिवशीं शके १५८१ तील मार्गशीर्षाचा महिना होता.

**वस्त्रें भिजण्याचें कारण**—कोणे एके दिवशीं स्वामी चाफळास असतां

शिवाजी महाराज दर्शनास येऊन त्यांनीं पीतांबर, बादली चिरा, व चादर इत्यादि उत्तम वस्त्रें समर्पण करून पूजा केली, आणि चौखांबी मंडपांत परमार्थपर भाषणें करीत बसले आहेत तों अकस्मात् समर्थांचें सर्वांग भिजून महाराजांनीं दिलेलीं वस्त्रेंही पिळून काढल्याप्रमाणें भिजलीं. हें पाहून महाराजांनीं विनंति केली कीं अकस्मात् सर्वांग भिजून वस्त्रेंही भिजून चिंब झालीं हें काय ! " असें विचारतांच समर्थांनीं त्या वस्त्रांतील एक पदर राजेश्रींच्या हातावर पिळून 'उदकाची परिक्षा करावी ' म्हणून आज्ञा केली. त्यावरून राजेश्रींनीं आचमन घेऊन पाहिलें तों तें समुद्राप्रमाणें खारट घोट लागलें. तेव्हां समर्थ म्हणाले "ठीक आहे तर, आजची मिति लिहून ठेवावी. आजपासून पंधराव्या दिवशीं याचा सर्व खुलासा होईल. नंतर भोजन होतांच शिवाजी महाराजांनीं मिति लिहून ठेवून स्वामींची आज्ञा घेतली आणि स्वस्थानीं गेले.

पंधराव्या दिवशीं पुन्हा महाराजांची स्वारी चाफळास आली. त्याच दिवशीं राजापूरचे मुंजे ह्या नांवाचे सावकारही येऊन पोंचले, आणि त्यांनीं स्वामींस दंडप्राय नमस्कार घालून स्वामींस आपलें वृत्त निवेदन केलें तें असें:—

" आमचें माल भरलेलें जहाज समुद्रांतून येत असतां बुडूं लागलें. मी स्वत: त्याच्यावरच होतों तेव्हां आम्हीं स्वामींचें स्मरण करून प्रार्थना केली कीं, आम्ही अर्थानिशीं व प्राणानिशीं बुडतों आहों तरी स्वामींनीं आम्हांस या जहाजासुद्धां तारावें. अशी प्रार्थना करतांच तें जहाज मालासुद्धां सुरक्षित बाहेर निघालें. तेव्हां त्यांतील उत्तम उत्तम पदार्थ व चौथाई द्रव्य घेऊन कुटुंबसुद्धां आज स्वामींच्या दर्शनाप्रीत्यर्थ चाफळास आलों आहोंत. "

असें सांगून पुन्हा दंडवत प्रणिपात करून आणलेलें द्रव्य व वस्त्रें स्वामींस अर्पण केलीं. नंतर समर्थांनीं बसावयास आज्ञा केल्यानंतर शिवाजी महाराजांसहवर्तमान सर्व मंडळी खालीं बसली. त्या समयीं समर्थ म्हणाले " शिवबा ! हें वर्तमान ऐकलेंत काय ? " शिवाजी महाराज बोलले " महाराज, आपण सर्वसमर्थ आहां, स्मरण केल्याबरोबर समुद्रांत बुडी देऊन जहाज बाहेर काढलें ! हें प्रत्ययास आलें. " नंतर मुंजे सहकुटुंब तेथें आले होते ते त्रिरात्र राहून जाते समयीं स्वामींची महापूजा करून बहुत

वस्त्राभरणें अर्पण केलीं. ब्राह्मणसंतर्पण फार मोठें झालें. जाते वेळींही स्वामींची आज्ञा घेऊन गेले. नंतर शिवाजी महाराजही स्वस्थळीं गेले. ही गोष्ट शके १५८१ विकारी नाम संवत्सरीं पौष वद्य ५ स झाली.

**वासनात्याग**—समर्थ परळीस असतां नित्याप्रमाणें एके दिवशीं शिवाजी महाराज दर्शनास आले व नमस्कार वगैरे करून बसले. नंतर परमार्थपर संवाद उभयतांत सुरू झाला तोः—

**शिवाजी महाराज**—महाराज! जन्म होतें याचें कारण काय?

**समर्थ**—बापा! बीजरूपें करून राहिलेल्या वासनेनें जन्म होतें.

**शिवाजी महाराज**—महाराज! प्रपंचांत वासना सतत चालूच आहे. ही सर्व जन्मांची कारण कीं काय?

**समर्थ**—बापा! संकल्पविकल्पात्मक जें मन त्यांतच नानाप्रकारचे संकल्प उत्पन्न होऊन हा सर्व संकल्पात्मक प्रपंच उभा आहे. यांत वासना अखंड चालू आहेच. परंतु मरणांत समयीं जी वासना मनांत दृढ राहून मरण घडेल, ती वासना आपल्या अनुरूप जन्मास कारण होते.

**शिवाजी महाराज**—महाराज मरणसमयीं वासना न रहावी याची युक्ति काय? आणि प्रपंचांत असतां वासना न होणें हें कसें घडेल?

**समर्थ**—बापा! बरा प्रश्न केलास. शुद्ध प्रपंचीं आहे त्याला वासना न होणें घडावयाचें नाहीं. तर प्रपंचीं असून जो परमार्थी असेल त्यासच वासनात्याग घडेल. याचा विचार तुम्हास पूर्वीं बहुत प्रकारें सांगितलेला आहे. त्याच अन्वयें व्यवहार करावा. दासबोधादि ग्रंथांचें अवलोकन तुम्ही करीतच अहांत, त्यांतील लक्षणें ध्यानांत आणून पदार्थ मात्राच्या ठिकाणीं आसक्ति ठेवूं नये. म्हणजे आत्मा आत्म्याच्या ठायीं लीन होतो. आणि जन्मास कारणीभूत जी वासना ती होत नाहीं.

**शिवाजीमहाराज**—आत्मा आत्म्याच्या ठायीं लीन होतो ही गोष्ट दृष्टांतानें प्रत्ययास येईल अशी आज्ञा व्हावी.

ही विनंति ऐकून समर्थांनीं एक गंधाचा गोळा आणविला आणि तो राजश्रीपुढें ठेवून विचारलें कीं, "ह्यांत पाणी आहे किंवा नाहीं?" महाराजांनीं त्यांत पाणी असल्याचें कबूल केलें. आतां हें पाणी यांतल्या यांतच नाहींसें करावें, अशी आज्ञा करून त्यांच्याकडून आंगवस्त्र

आणवून तें गंध पिळलें. त्यांतून पाणी निघालें तें त्यांतच घालून पुन्हा पिळविलें. ह्याप्रमाणें राजेश्रींकडून पांच चार वेळां करविलें. तेव्हां पिळतां पिळतां गंध कोरडें होऊन तें पाणी त्यांतल्या त्यांतच मुरलें. ह्याअन्वयें साधनपरत्वें आत्मानात्म विचारें करून आत्मा आत्म्यांत लीन करावा."

अशी समर्थांची आज्ञा होतांच शिवाजींनीं साष्टांग नमस्कार करून म्हटलें आज्ञेप्रमाणें साधन करून आहे. कोणत्याही ऐहिक विषयाच्या ठिकाणीं वासना नाहीं, पण ह्या एका हत्यारांत मात्र राहिलेली आहे. तें हत्यारही आज ह्या पायाजवळ ठेवतों."

असें म्हणून शिवाजी महाराजांनीं आपल्या हातांत असलेली भवानी नांवाची तलवार होती ती स्वामींपुढें ठेवली, आणि नमस्कार करून आज्ञा घेऊन गेले.

**समर्थांचें वेड**—शिवाजी महारजांनीं अर्पण केलेली ही 'भवानी' तरवार समर्थ नेहमीं आपल्या उशाशीं बाळगीत. समर्थांचा स्वभाव विनोदी असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें एके दिवशीं कांहीं मौज करावी असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं प्रातःकाळीं उठावयाच्या पूर्वींच आपले केश मोकळे सोडले, कपाळीं मोठा थोरला मळवट भरला आणि उशाशीं असलेली भवानी तरवार नागवी हातांत घेऊन ते एकदम आपल्या खोलीच्या बाहेर पडले! तों नित्याप्रमाणें सर्व शिष्यमंडळी नमस्कारासाठीं खोलीच्या बाहेर जमलेली होती. त्यांस पाहतांच उग्र मुद्रेनें तरवार उगारून समर्थ त्यांच्या अंगावर धांवले, व 'मारतो' 'तोंडतो' म्हणूं लागले. हा प्रकार पाहतांच सारी मंडळी घाबरून धांवत सुटली, व समर्थ त्यांच्या मागें लागले. साऱ्या किल्ल्याभर एकच गवगवा उडाला! जमादार, हवलदारही धांवत आले, परंतु समर्थांपुढें जाण्याची कोणाचीच छाती होईना! समर्थ वेड्या पिशासारखे इकडून तिकडे व तिकडून इकडे धांवूं लागले. आणि अखेर किल्ल्याच्या तटावर चढून त्यांनीं धाडकर खालीं उडी टाकून ती तरवार घेऊन तसेच रानांत पळत सुटले! इकडे मठामध्यें शिष्यमंडळी 'स्वामींस वेड लागलें, म्हणून कोणी रडूं लागले, कोणी चिंताक्रांत व उदास होऊन बसले! कशाची पूजा आणि कशाचा नैवेद्य! कोणास कांहीं सुचेना. एक दिवस गेला, दोन दिवस गेले. सारे

उपाशी ! कल्याणस्वामी शिरगांवच्या मठांत होते, ते कांहीं समर्थांचा ग्रंथ लिहून घेऊन दाखवावयास आले. पाहतात तों मठांत सारा विपरीत प्रकार ! समर्थ कोठें आहेत, म्हणून विचारतां 'समर्थांस वेड लागून ते रानांत निघून गेले ' असें जो तो सांगूं लागला. त्यांस कल्याणस्वामी म्हणाले " समर्थांस तर कधीं वेड लागणें शक्य नाहीं, पण तुम्हां सर्वांस मात्र वेड लागलें आहे येवढें खरें. असो; आतां मीच जाऊन समर्थांस घेऊन येतों." असें म्हणून तत्काल बाहेर पडले.

परंतु समर्थांना शोधणार कोठें ? डोंगरांत, दर्‍यांत, खोर्‍यांत कड्यावर पहावयाचें हें ठरलेलें. त्याप्रमाणें कल्याण सुगावा काढित चालले. ज्या रानांत स्वामी गेल्याचें धोरण लागलें त्या रानांत जाऊन पाहतात तों उरमोडी ज्या कड्यावरून खालीं पडते, त्या कड्याच्या मध्यभागीं पिंप्रीच्या झाडावर बसले आहेत ! हें कल्याणस्वामींनीं खालून पाहिलें, परंतु कड्याची उंची अपरंपार, जावयास वाट नाहीं म्हणून वरून जाऊन खालीं उतरण्याचा प्रनत्न करावा असें मनांत आणून वर जाऊन पाहतात तों वाट नाहीं. आणि स्वामी तर ' कल्याणा ! कल्याणा ! ' म्हणून हाका मारीत आहेत. हें पाहून आतां खालीं उडीच टाकावी म्हणून कंबर बांधली. तेव्हां समर्थ मनांत समजलें कीं, आतां मात्र कल्याण हा खास उडी मारतो. म्हणून ते हातांत तरवार घेऊन वानराप्रमाणें उड्या मारीत कड्यावरून वर आले. त्यांस पाहतांच कल्याणस्वामींनीं नमस्कार करून त्यांच्या जवळ चालले. त्यास ' कल्याणा ! खबरदार ! येऊं नको ' असें समर्थ मोठमोठ्यानें दरडावीत, इतकेंच नव्हे तर दगड घेऊन भराभर त्यास मारीत. पण ते असें मारीत कीं ते त्यांच्या मस्तकावरून खांद्यावरून जावेत, त्यांना लागूं नयेत. पण कल्याणस्वामी तितकेही दगड सोसून समर्थांच्याजवळ जाऊन त्यांस त्यांनीं नमस्कार केला व घट्ट पाय धरले. हें पाहून समर्थ म्हणाले " कल्याणा ! तोडतों !" कल्याणस्वामी म्हणाले " सद्गुरूंच्या हातून मरण आल्यावर आणखी काय पाहिजे ?" येवढ्यानेंही कल्याण ऐकत नाहीं असें पाहून कल्याणस्वामींची शेंडी भली मोठी होती तिला हातानें वेढा देऊन समर्थांनीं ती गच्च धरून तरवार उगारून म्हणाले " कल्याणा तोडतों ! सोडीत नाहीं ! " कल्याण म्हणाले

" महाराज कृपा करून एका घावांत दोन तुकडे करा." समर्थ म्हणाले " मी काय तुझ्या हुकमांत वागूं कीं काय ? नाहीं, पाहिजे तसें करीन. मी शेंदाडाप्रमाणें तुझी कांपें करून सावकाश चिरीन." कल्याण म्हणाले " आज्ञा. जशी इच्छा असेल त्याप्रमाणें करावें." असें म्हणून कल्याणांनीं मान पुढें केली!

कल्यणस्वामींचा येवढा दृढ निश्चय पाहून समर्थांस गहिंवर आला. त्यांनीं हातांतील तरवार खालीं ठेवली आणि त्यास कडकडून भेटले व म्हणाले " कल्याणा! मला साऱ्यांनीं वेडा ठरविलें किरे!" कल्याण म्हणाले " महाराज! आपल्यास वेडे ठरविणारे सारेच वेडेपीर आहेत. असो; आतां कृपा करून चलावें. सारी मंडळी आज तीन दिवस उपोषित असून शोक करीत आहेत."

ही कल्याणाची विनंति ऐकून समर्थ कल्याणाबरोबर मठांत आले व येतां येतां तोंडानें पद म्हटलें तें:—

### पद.

पळा पळा ब्रह्मपिसा येतो जवळी ॥
रामनामें हाक देउनि डोई खांजोळी ॥ ध्रु ॥
वृत्ति शेंडी बंधनेंविण सदा मोकळी ॥
संसाराची धुळी करून अंगीं उधळी ॥ १ ॥
प्रपंच उकिरड्यावर बैसणें ज्याचें ॥
भोंवता पाळा फिरून पाहे जन अविद्येचे ॥ २ ॥
धाऊनि बैसे उठुनि पळे दृश्य वाटतें अदृश्याचें ॥
राहणें घेतां न चले कोणाचें ॥ ३ ॥
औट हात मज नवा ठायीं वितुळलें ॥
दहावा ठाव म्हणोनि तेथें ठिगळ दिधलें ॥ ४ ॥
ऐसें मन हें चंचल वृत्तींत गुंतलें ॥
परतोनि आलें म्हणउनि जिवेंच मारिलें ॥ ५ ॥

मीपणाचें शहाणपण जळालें माझें ॥
कोण वाहे देहबुद्धि वस्त्राचें ओझें ॥ ६ ॥
नलगे आम्हां मानापानाचें ओझें ॥
तुझी शुद्धि घेतां गेलें मीपण माझें ॥ ७ ॥
आम्ही जन धन देखोनि वार करितों ॥
आपणा ऐसें म्हणवुनी उमज धरितो ॥ ८ ॥
आतें भेटी येती त्यास वेड लावितों ॥
रामीं रामदास ऐसें अबद्ध बोलतो ॥ ९ ॥

ह्याप्रमाणें पद केल्यानंतर समस्त शिष्य मंडळींनीं नमस्कार करून संतोषित झाले. समर्थ शके १५८१ माघवद्य ५ च्या दिवशीं रानांत गेले ते नवमीच्या दिवशीं कल्याण गोसाव्याबरोबर परत माघारे आले. सर्वांचे नमस्कार झाल्यानंतर आनंदानें सर्वांचीं स्नानें व भोजनें झालीं. ही भवानी तरवार कांहीं दिवस खालीं मठांत होती नंतर कांहीं दिवसानीं गर्दी झाली तेव्हां कारभारी दिवाकरभट यांनीं ती करवीरकर पाटील ह्यांच्या स्वाधीन केली. शाहुमहाराज आल्यानंतर त्यांस हें तरवारीचें वर्तमान कळतांच महाराजांनीं त्या पाटलापासून ती तरवार घेतली. ती अद्यापि सरकारांत असून तिची पूजाही होत असते. [ येथपर्यंतच बखरींत उल्लेख आहे. परंतु पुढें ही तरवार कोल्हापुरचे कारभारी राव० बर्वे ह्यांनीं प्रिन्स ऑफ वेल्स ह्यांस नजर केली ! व ती हल्लीं लंदन म्युझियममध्यें आहे ! ]

**श्रेष्ठांचें श्रेष्ठत्व**—समर्थांचें वडील बंधु जांबेस राहत असत व त्यांना ‘ श्रेष्ठ ’ किंवा ‘ रामी रामदास ’ असें म्हणत असत, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हें जें त्यांचें ‘ श्रेष्ठ ’ नांव आहे तें त्याचें श्रेष्ठ बंधु म्हणून मात्र पडलेलें नव्हतें, तर ते लहान असतानांच पैठणच्या सुप्रसिद्ध एकनाथ महाराजांनीं ठेवलें होतें, व तेंच पुढें चालू झालें. समर्थ विरक्त होते, आणि श्रेष्ठ गृहस्थाश्रमी होते, येवढेंच काय तें उभयतांत अंतर. बाकी भक्ति, ज्ञान, सामर्थ्य ह्यांमध्यें उभयतांचाही अधिकार अगदीं समसमान होता. ही गोष्ट शिवाजी महाराजांनाही ज्ञात असून आपण श्रेष्ठांचेंही एकवार दर्शन घ्यावें असें त्यांस वाटत असे. एक वेळ शिवाजी

महाराजांची स्वारी गंगातीरावरून फिरत असतां राक्षसभुवनावर मुक्काम झाला. तेथें रात्रौ पंचपदी म्हणतांना एक श्रेष्ठांचें पद म्हटलें. त्यावरून महाराजांस सहजीं श्रेष्ठांचें स्मरण झालें कीं, श्रेष्ठांचें गांव जांब, तें येथून जवळच आहे. तरी सहज त्यांच्याकडेही जाऊन समर्थांप्रमाणें त्यांच्यापाशींही कांहीं चमत्कार व सामर्थ्य आहे कीं नाहीं पहावें.

असे मनांत विचार घोळत असतांच त्यांस निद्रा लागली. तों स्वप्नांत श्रेष्ठांनीं शिवाजीस दर्शन दिलें. सत्पात्र ब्राह्मण पाहून महाराजांनीं अर्घ्यपाद्यादि पूजन करून नामाभिधान विचारिलें. तेव्हां ह्या देहाला 'रामीरामदास' असें म्हणतात, आम्ही येथें जवळच जंबुग्रामीं राहतों, असें म्हणून माळ व प्रसाद दिला, आणि ग्राम जवळच आहे करितां श्री रघुपतीच्या दर्शनास यावें असें सांगून अदृश्य झाले.

महाराज प्रातःकाळींच शिवपूजन व पादुकापूजन वगैरे आटपून निघाले व सर्व मंडळीस सांगितलें कीं, आम्ही पुढें जातों तुम्ही सर्वांनीं जांबेच्या मुक्कामास यावें. असें सांगून निघाले ते दुपारीं जांबेस येऊन पोंचले. आणि मारुतीचें दर्शन घेऊन गांवांत गेले. तों श्रेष्ठ वैश्वदेव करून काकबळी टाकावयासाठीं बाहेर द्वारांतच उभे होते. त्यांस पाहून महाराज साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभे राहिले. श्रेष्ठ हस्तपाद प्रक्षालन करून बोलले कीं, " काय शिवबा! ओळख पटली कीं नाहीं? यावयाची फारच त्वरा केली. असो; बरेंच केलेंत. हा आश्रम आपलाच आहे. श्रींचें दर्शन करून भोजनास उठावें." असें म्हणतांच " समर्थ आपण एकच. उभयतांची लीला सारखी. यास्तव आपली आज्ञा प्रमाण." अशी विनंति करून राजे खासा दहा असामीनिशी उठून श्रींचें दर्शन घेऊन भोजनास बसले. तेव्हां श्रेष्ठ बोलले कीं, "दहा असामीनिशीच भोजनास उठला हें काय? स्वारीबरोबर ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत जितकी मंडळी असेल त्या सर्वांनीं श्रीरघुपतीचा प्रसाद घ्यावा." महाराज बोलले " स्वारीबरोबर सुमारें २००० मनुष्यें आहेत. ह्याकरितां दहा पांच मंडळी घेऊनच भोजनास उठलों." श्रेष्ठ बोलले " शिवबा! रघुपतीच्या दरबारांत काय न्यून आहे? तस्मात् सर्वांनींच प्रसाद घेतला पाहिजे." ही आज्ञा ऐकून महाराज मनांत जरा चकारले. परंतु तें बाहेर न दाखवितां 'आज्ञा प्रमाण'

असें म्हणून सर्व मंडळींसह भोजनास बसले. सुमारें २५ मंडळी होती तेवढी भोजन करून उठली. तों मागाहून सर्व फौजही येऊन पोंचली. तेव्हां त्यांस शिधा व चंदी वैरण देण्याकरितां एक शिष्य गेला. एकाजवळ एका मनुष्याचा शिधा; एकाजवळ पायलीभर हरभरे व एकाजवळ तेरा कडब्याच्या पेंढ्या ! ते सर्व फौजेंत जाऊन सर्वांस चंदी वैरण व शिधासामुग्री यथेच्छ देऊन पुन्हा एक मनुष्याचा शिधा; मणभर हरभरे व १३ पेंढ्या कडबा घेऊन परत आले ! हा चमत्कार पाहून शिवाजी महाराज तर अगदीं आश्चर्यानें थक्क झाले. नंतर तमाम मंडळींचीं जातीनिर्बंधाप्रमाणें भोजनें वगैरे झालीं.

राजेश्री आश्चर्यानें स्तब्ध झालेले पाहून श्रेष्ठ म्हणाले "शिवबा ! आमचा चमत्कार तो काय पहावयाचा ? आम्ही केवळ श्रींचे दास आहों. श्रींच्या इच्छेनें जें घडेल तें खरें." महाराज म्हणाले "आपण उभयतांही समर्थच आहां. आपला चमत्कार पाहण्याइतकी योग्यता कोणाची ? मी केवळ दीन आहे. मजवर कृपा असावी." श्रेष्ठ म्हणाले "कृपा करणाराची तुम्हावर पूर्वींचीच कृपा आहे. तुमच्यासाठींच रामदासांना कृष्णातीरीं पाठविलें आहे. आतां अधिक कृपा करण्याचें कांहीं राहिलेंच नाहीं."

असें म्हणून सूर्याजीपंतांच्या जन्मापासून आपला जन्म होऊन समर्थ कृष्णातीरीं जाईपर्यंत सविस्तर वर्तमान सांगितलें तें ऐकून अत्यंत संतोषित होऊन राजेश्रींनीं जावयास आज्ञा मागितली. तेव्हां श्रेष्ठ म्हणाले "शिवबा ! तुमचें येणें कधींनवत घडलें आहे. यास्तव कांहीं दिवस राहून मग जावें." असें बोलून शिवाजीमहाराजांस पंधरा दिवस ठेवून घेतलें. पहिल्या दिवसाचा बेत तोच पंधरा दिवस. कोणत्याही गोष्टीची कमतरता नाहीं. नंतर शिवाजी महाराज आज्ञा घेऊन जावयास निघाले. तेव्हां श्रीचा प्रसाद म्हणून श्रेष्ठांनीं वस्त्रें भूषणें व मोत्यांचा तुरा दिला. तें पाहून महाराज संकोच वृत्तीनें म्हणाले "श्रींची सेवा मजकडून कांहींच घडली नाहीं आणि हें काय ?" श्रेष्ठ म्हणाले "तुम्हांजवळ आहे तें सर्व रघुपतीचेंच आहे. त्याच्या संरक्षणाला रघुपतीच्या भांडारांतील घेतलें पाहिजे." "आज्ञा प्रमाण" असें म्हणून महाराजांनीं प्रसादाचा स्वीकार करून अत्यंत विनयानें श्रेष्ठांचा निरोप घेतला.

परत आल्यानंतर नेहेमींच्या सांप्रदायाप्रमाणें राजश्री समर्थांच्या दर्शनास गेले. नमस्कार घातल्यानंतर समर्थांनीं हास्य करून विचारलें " कां शिवबा ! तुम्ही श्रेष्ठांच्या परीक्षेकरितां जांबेस गेला होता. ती परीक्षा उतरली कीं नाहीं ! तुमची फजिती करण्याकरितां नाहीं बोलत हो ! " ही खुणेची गोष्ट ऐकून राजश्री सद्गदित अंतःकरणानें म्हणाले " याचें उत्तर काय द्यावें ? उभयतां एक मूर्ति; सर्व अपराधांची क्षमा असावी. " त्यावर समर्थ म्हणाले " बापा ! तुम्ही तर फजिती न होण्याचें त्यांच्याकडून कबूल करून घेतलें आहे. तर आतां तुमच्या शंकेचें निवारण करतों ऐका. "

" एका देहबुद्धीच्या हातून सुटून जन्ममरणांतून मुक्त व्हावें याकरितां सद्गुरूला शरण जाऊन उपासनेची आराधना सांप्रदायानुरूप करूं लागले असतां, कांहीं विशिष्ट साधन झालें म्हणजे सिद्धि प्रसन्न होतात. त्यांत गुंतून राहिल्यास मुळामध्यें अंतर पडतें. ह्याकरितां त्यांत न गुंततां मुळाकडे लक्ष देऊन संकल्प वृत्तीनें श्रीगुरूच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत असतां श्रीकृपेनें मुख्य धनीपणाच प्राप्त होतो. धनीपणा प्राप्त झाल्यावर चाकराच्या हातून चाकरी घेण्यास प्रत्यवाय काय ? धनीपणा नसतां सिद्धींत गुंतल्यास मुदलासच हानी बसते. अघटित चमत्कार सद्वृत्तीनें श्रीकृपेंकरून होतात. " हें भाषण ऐकून राजेश्रींची संशयनिवृत्ति झाली. नंतर राजेश्री आज्ञा घेऊन प्रतापगडावर गेले. हें वर्तमान शके १५८२ मध्यें घडलें.

**विषारी करट**—एकदां शिवाजी महाराजांकडून कांहीं कलमी आंबे समर्थांकडे आले होते. त्यावरून समर्थांच्या मनांत एक मौजेची कल्पना आली. एके दिवशीं रात्रीं त्यांनीं त्यांपैकीं एक उत्तम इरसाल कलमी आंबा घेऊन तो आपल्या पायाच्या पिंढरीवर बांधून त्यावरून फडकीं गुंडाळलीं व हांथरूणावर पडून मोठमोठ्यांनीं विवळावयाला व कुंथावयाला सुरवात केली. तेव्हां शिष्य मंडळी खोलीच्या दारापाशीं जाऊन " महाराज ! काय होत आहे आज ? " म्हणून चौकशी करूं लागली. त्यांस समर्थ आधीं बराच वेळ कांहींच उत्तर देईनात. बराच वेळ गेल्यावर व सर्वांचीच विनंति ऐकल्यावर मोठ्या आर्तस्वरानें ते म्हणाले

"काय करावें! पायाला करट झाले आहे व तें पुळणास आल्यामुळें आज मनस्वी ठणका लागला आहे." असें म्हणून पुन्हा विवळत. ह्याप्रमाणें क्रम सुरूं झाला.

उजाडलें तरी समर्थ उठून कांहीं खोलीच्या बाहेर येईनात. हा प्रकार पाहून खोलीच्या दाराशीं बरीच गर्दी जमली, व आक्का, वेणूबाई, उद्धव वगैरे अगदीं सलगींतले शिष्य आंत समर्थांच्या जवळ जाऊनही विचारपूस करूं लागले. त्या सर्वांस समर्थ आपल्या पायास फार मोठें करट झाल्याचीच गोष्ट सांगत. शेवटीं कित्येकांनीं केवढेसें करट झालें आहे तें पाहण्याची इच्छा केली. तेव्हां समर्थांनीं त्यांस मोठ्या कष्टानें हळूच पाय वर करून आपली चिंधी बांधलेली पायाची पिंढरी दाखविली. तों मोठ्या थोरल्या वांग्यायेवढें करट! तें पाहून सर्वांसच आश्चर्य वाटलें. कोणी म्हणाले "पोटीस बांधावें" कोणी म्हणाले "कांदा बांधावा" कोणी म्हणाले "सुईनें हळूच फोडावें" कोणी म्हणाले "साबणाची पट्टी बांधावी." असे नाना प्रकारचे उपचार सुचवीत. समर्थ त्यांपैकीं कोणताच उपचार पसंत करीनात. त्यांचा आपला विवळण्याचा सपाटा सुरूं होता, आणि तोही चढत्या स्वरांत! त्यामुळें मंडळीस कांहींच सुचेना. दुपार झाली तरी कोणाचें स्नान नाहीं. जो तो फिकिरींत पडलेला! सर्वांचीं तोंडें सुकून गेलीं. कोणताही उपचार करूं देइनात. ठणका मनस्वी. अखेर दुपार उलटून गेली. श्रीस नैवेद्य सुद्धां नाहीं! आक्का, वेणुबाई समर्थांपाशीं उभ्या. अगदींच निरुपाय झाला तेव्हां सर्वांनीं विचारलें कीं, "महाराज! मग ह्याला उपाय तरी काय?" समर्थ मोठ्या दीनवाणीनें कुथत कुथत सांगूं लागले. "बापहो! हें करट सातपडदी असून तें विषारी आहे. त्याच्यावर उपचार कशाचा? त्यांतून मनुष्याचा जीव वांचावयाचा नाहीं. यांतच आमचा शेवट!" मंडळींनीं हात जोडून विनंति केली कीं, "पण ह्यावर कांहींच उपचार नाहीं काय? नाहीं तर शस्त्रवैद्याला तरी बोलावण्यास आज्ञा व्हावी." समर्थ मोठ्या दीनवाण्या स्वरानें सांगूं लागले. "बाबा ह्यांतच माझा शेवट आहे! ह्याला उपचार कशाचा! कांहीं नाहीं. हें करट शुद्ध विषारी आहे. ह्याच्या रक्ताचा एक बिंदु मनुष्याचा पोटांत गेला तर मनुष्य तत्काळ मरून पडेल. आतां त्यालाही

एक उपाय आहे, पण तो निखालस असुरी उपाय आहे. तो करणार कोण ? तें नाहीं आहे तें खरें."

हें ऐकून आक्कांनीं वगैरे विचारलें "महाराज ! उपाय कोणता तो सांगावा तर खरा. म्हणजे करतां येईल." समर्थ म्हणाले "तो उपाय येवढाच कीं, कोणीतरी मनुष्यानें तें करट चोखून जर सारें रक्त काढून टाकलें तरच ह्यांतून मी वांचेन. परंतु तो मनुष्य पोटांत विष जाऊन मरेल ! तेव्हां तें काय उपयोगी ? असें मरावयाला तयार कोण होणार ? आणि झालें तरी मी कसें सांगूं त्याला ?"

हें भाषण ऐकतांच सारीच मंडळी चापापली, व एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागली. आक्का म्हणाल्या "अजून श्रीला नैवेद्य सुद्धां झाला नाहीं. मी जाऊन आतां आंग तरी धुतें." असें म्हणून त्या हळूहळू तेथून निघाल्या. वेणूबाई म्हणाल्या "मी थोडी सुंठसाखर तरी आणून देते. कालपासून समर्थांच्या पोटांत कांहीं नाहीं." उद्धवगोसावी म्हणाले "मी कसें तरी देवावर पाणी तरी घालतों." असें म्हणून तेही निघून गेले ! याप्रमाणें प्रत्येकानें तेथून आपआपला पाय काढला ! अशा रीतीनें दोन दिवस गेले. जेवण ना खाण ! समर्थ तळमळत पडलेच होते !

कल्याणस्वामी शिरगांवच्या मठांत होते. त्यांनीं समर्थांचा कांहीं ग्रंथ लिहून तो घेऊन तिसऱ्या दिवशीं आले. तों मठांत हा प्रकार ! समर्थ अगदीं अत्यावस्थ आहेत, असें मंडळी त्यांस सांगूं लागली. काय झालें आहे ? तर करट ! हें ऐकून कल्याणांना अत्यंत आश्चर्य वाटूं लागलें. त्यांनीं समर्थांच्या खोलींत जाऊन त्यांस साष्टांग नमस्कार केला व हात जोडून प्रकृतीचें मान विचारालें. समर्थांनीं सर्वांना सांगितल्याप्रमाणें सर्व हकीकत विव्ळत विव्ळत सांगितली व उपाय होता तोही कानावर घातला. तें ऐकून कल्याण म्हणाले "उपाय आहेना ? मग काय उशीर ? मी चोखतों करट !" हें पुढें काय होतें तें पाहण्यासाठीं सभोंवतीं मंडळी जमलीच होती. समर्थ म्हणाले "छे छे ! कल्याणा ! नको रे नको. असलें धाडस करूं नकोस. तुला मारून मी मागें राहूं होय ? छे छे ! त्याचें नांव काढूं नको. मला तरी आतां वांचून काय करावयाचें आहे ?" कल्याण म्हणाले "महाराज ! आपण जगदुद्धारकर्ते आहांत. मी काय

केवळ यःकश्चित् पामर ! वाचलों काय आणि न वांचलों काय ? सारखेंच. सद्गुरुप्रीत्यर्थ देह खर्ची पडल्यास आणखी पुण्याई ती कोणती ? देहाचें खरें सार्थक तें आज. याकरतां महाराज ! पट्टी सोडावी. हा मी तयार आहे." समर्थांनींही 'नको नको' म्हणून बराच आव आणला. अखेर नाहीं होय म्हणतां म्हणतां समर्थांनी पट्टी सोडण्याचें कबूल करून मोठ्या कष्टानें उठून बसले.

कल्याण करट चोखावयाला तयार झाला व तो आतां मरणार म्हणून तें पाहण्यासाठीं समर्थांच्या भोंवतीं शिष्यमंडळींची गर्दीच गर्दी जमा झाली. समर्थांनीं फडक्याची एक एक पट्टी सोडली व एकच पट्टी शिल्लक ठेवली. नंतर हलकेंच सर्वांची नजर चुकवून आंतील आंब्याचा डेख काढून तोंड मोकळें करून म्हणाले " हें बघ !" कल्याणस्वामी म्हणाले " ठीक आहे. हा मी तयार आहे." असें म्हणून त्यांनीं करटास तोंड लावून चोखूं लागले. त्यास समर्थ कळवळून म्हणाले " कल्याणा ! हळू चोख अं ! दुखवूं नको." कल्याण म्हणाले " नाहीं महाराज ! दुखवीत नाहीं. हळूं चोखतों. काळजी करूं नये. आपण हळू हळू करट दाबीत जावें." समर्थ म्हणाले " बरें आहे." असें म्हणून तो आंबा समर्थांनीं वरून हळू हळू दाबला. कल्याण चोखूं लागले. तों काय ? निखालस कलमी आंब्याचा रस ! निवळ अमृत ! कल्याणांनीं पांच चार झुरके घेतले आणि मग कांहीं त्यांचें त्यांस हांसे आवरेना ! त्यांनीं जरासें तोंड मागें करून समर्थांस विनंति केली कीं " महाराज ! करट एकाच पायास झालें आहे कां दुसऱ्यास आणखी झालेलें आहे ?" समर्थ म्हणाले " नाहीं बाबा ! दुसऱ्या पायाला नाहीं; हें येवढेंच आहे." कल्याण म्हणाले " महाराज! अशीं करटें रोज पांच चार होतील तर कृपा होईल !" हें ऐकून समर्थांसही हांसें आवरेना ! तेही त्याच्याबरोबर हासूं लागले ! हा चमत्कारिक प्रकार पाहून मंडळीही बुचकळ्यांत पडली. त्यांनाही हें काय आहे हें समजेना. अखेर समर्थांनीं आपली लीला पुरी केली आणि पायावरचें फडकें सारें सोडून आंतील कलमी आंबा सर्वांपुढें ठेवला ! तेव्हां सारेच लोक फजीत झाले ! त्या सर्वांस समर्थ म्हणाले " कल्याणाप्रमाणें तुम्हीही करट चोखलें असतें तर हरकत नव्हती ! पण तुम्हाला तुमचा जीव प्यारा वाटला ! कल्याणाला

तसें वाटलें नाहीं. ” हें समर्थांचें भाषण ऐकून सारी शिष्यमंडळी पाण्यांत ढेंकूळ टाकल्याप्रमाणें विरघळून गेली.

पैठणच्या ब्राह्मणांची परीक्षा—समर्थांची स्वारी पैठणास असतां तेथें मेलेली घार उठविल्याचा वृत्तांत पूर्वीं दिलाच आहे. पुढें समर्थांची कीर्ति चोहोंकडे फारच पसरली व ती पैठणकर ब्राह्मणांच्याही कानावर गेली. तेव्हां त्यांनीं विचार केला कीं, रामदासांची कीर्ति लोक इतकी वाखाणतात ती खरी आहे कीं काय, हें पाहून तरी यावें व पूर्वीं त्यांनीं येथें घार उठवली होती, तें सामर्थ्य अद्यापही त्यांच्यामध्यें आहे किंवा काय, तेंही पहावें म्हणून पांच पंचवीस ब्राह्मण जमून माहुलीस आले आणि शिवाजी महाराजांस सांगून पाठविलें कीं, “ आम्ही पैठणचे समस्त ब्राह्मण समर्थांस भेटावयास आलों आहों, तरी त्यांचें दर्शन केव्हां होईल तें कळविण्याची कृपा व्हावी. ”

हा निरोप ऐकतांच महाराजांनीं समर्थांस विनंति केली “ह्याबद्दल कसें काय करावयाचें? ब्राह्मण विद्वान् आहेत त्यांस सामोरे जावयास नको काय?” समर्थ म्हणाले “ होय; त्यांस सामोरे गेलें पाहिजे.” महाराज म्हणाले “ आज्ञेप्रमाणें सायंकाळीं चार वाजतां माहुलीवर स्वारी जाण्याची व्यवस्था करतों. ” समर्थ म्हणाले “ ठीक आहे. आम्हीही आज रानांत जाऊन थोडीशी शिकार करणार आहों, तर आम्ही तिकडूनच परभारें संगमावर येऊं. तुम्ही सर्व मंडळी घेऊन पुढें चला. ” राजेश्री म्हणाले “ हें काय ? कधींच शिकारीचा अभ्यास नसतांना आजच हें कोठून काढलें ? ” समर्थ म्हणाले “ खेळावयाचा नाद आहे. त्याला फार दिवस झाले, तेव्हां म्हटलें आज एकदां पुनरावृत्ति करावी. ” राजेश्री “ जशी आज्ञा ” असें म्हणून निघून गेले. समर्थांनीं आपली गलोल घेतली व कल्याणास घेऊन रानांत निघून गेले.

सायंकाळीं ठरल्याप्रमाणें संगम माहुलीवर मैदानांत बैठकी वगैरे घालून सर्व तयारी झाली. महाराज आपल्या मंत्रीमंडळासह लवाजम्यानिशी चार वाजतां जाऊन तथें पोंचले पैठणाहून आलेल्या सर्व ब्राह्मणांच्या वगैरे भेटी झाल्या. नंतर सर्व मंडळी बैठकीवर बसली, क्षेम कुशल प्रश्न वगैरे सुरू झाले. इतक्यांत पायीं खडावा, मस्तकीं जटाभार, अंगांत कफनी, पाठीशीं

गलोल, मागें कल्याणस्वामी. अशा थाटानें समर्थही येऊन दाखल झाले. समर्थांस पाहतांच महाराजांसह सर्व ब्राह्मणमंडळी उठून उभी राहिली. समर्थांनीं प्रथमच सर्वांस साष्टांग नमस्कार घालून मग सर्वांच्या विनंती-वरून बैठकीवर बसले. शिवाजी महाराजांनीं विचारलें कीं, "महाराज! आज येथपर्यंत स्वारी गेली होती?" समर्थ म्हणाले "शिकारीस जाऊन आलों." राजश्रींनी विचारिलें "आज येवढी कशाची शिकार केली?" असें म्हणतांच समर्थ म्हणाले "कल्याणा! आण ती शिकार आणि ओत येथं." असें म्हणतांच कल्याणस्वामींच्या काखोटीस सुमारें दोन पायली दाणे मावतील येवढी झोळी गच्च भरलेली होती, ती त्यांनीं आणून ओतली! तों शेंकडो मेलेल्या चिमण्यांचा ढीगच्या ढीग पडला. तो पाहतांच साऱ्याच मंडळींच्या मनांत चिळस उत्पन्न झाली. शिवाजी महाराजांची मुद्राही काळवंडली. ते मनांत म्हणूं लागले की, आज समर्थांनीं ही विचित्र लीला काय आरंभली आहे कोण जाणे! कित्येक उतावळे तरणे बांड होते ते तर एकमेकांच्या कानाशीं कुजबुजूं लागले कीं, "पाहतां काय! कशाचे साधु आणि कशाचे गुरु! कपाळाला शेण फासा आणि चला!" त्यांत किती एक समजंस व अनुभवी होते ते म्हणाले "अहो! पण थोडा धीर धरा! ते नांवाचे रामदास आहेत. पैठणास ब्राह्मणांचेच दांत ब्राह्मणांच्या घशांत कसे घातले होते माहीत आहेना? तेव्हां थोडा दम धरा. मग काय करावयाचे तें करा."

इकडे समर्थ सर्वांस म्हणाले "आपण येथवर येण्याची तसदी घेऊन दर्शन दिलेत फार आनंद झाला." राजेश्रींनीं विनंति केली कीं, "आतां गांवांत येऊन दोन दिवस राहून जाणें." ती गोष्ट ब्राह्मण मंडळींनीं मान्य करून सर्व मंडळी साताऱ्यास जाण्याकरितां उठली. सर्वांबरोबर समर्थही उठले व कल्याणास म्हणाले "कल्याणा! आपण आतां आपल्या घरोघर जाणार आणि ह्या चिमण्यांचीं पिलेंही त्यांची वाट पहात असतील, तेव्हां त्यास उपाशी कसें ठेवावें? ह्याकरितां त्या चिमण्यांना आपआपल्या घरीं पाठवून दे." कल्याणस्वामी म्हणाले "त्यांस कशा पाठवूं?" समर्थ म्हणाले "तें पलीकडे गवत पडलें आहे तें गोळाकरून त्यांच्यावर घाल आणि दे पेटवून म्हणजे त्या जातील

आपआपल्या घरीं!" हें ऐकून कल्याणांनीं लागलीच त्यांच्यावर गवत घालून आग लावून दिली. त्याबरोबर आंतील साऱ्या चिमण्या भराभर उडून गेल्या! हा चमत्कार पाहतांच ब्राह्मण मंडळी तर अगदीं विरघळून गेली!

त्या सर्वांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार घातला व "आम्ही केवळ कुत्सित बुद्धीनें आपली परीक्षा पहावी म्हणून आलों होतों, त्याबद्दल आम्हास यथायोग्य शासन झालें. आतां कृपा करून सर्वांस अनुग्रह प्रसाद देण्याची कृपा करावी." अशी प्रार्थना करितांच समर्थ त्यांस हात जोडून म्हणाले "महाराज! आपण प्रत्यक्ष भूदेव आहांत; वेदोनारायण आहांत; हें सर्व आपल्याच कृपचें सामर्थ्य. असो; आपल्या मनाप्रमाणें सर्व कांहीं होईल." असें त्यांस अश्वासन देऊन साताऱ्यास नेऊन चार आठ दिवस ठेवून घेऊन मंत्रानुग्रह देऊन सर्वांस निरोप दिला. शके १५८२.

**मेलेल्या गायीचें दूध!**—समर्थांच्या वेळीं पाटगांवास मौनीबोवा ह्या नांवाचे एक सत्पुरुष राहत असत. हे सन्यासदीक्षा घेतलेले होते. ते कधींही बोलत नसत. त्यावरून त्यांचे नांव 'मौनीबोवा' असें पडलें होतें. त्यांजवळ शिष्यसमुदायही बराच असे. त्यांच्या कानावर समर्थ रामदासस्वामींची कीर्ति गेली. त्यांनीं केलेले अनेक अद्भुत चमत्कार त्यांनीं श्रवण केले. तेव्हां एक वेळ समक्ष जाऊन त्यांचें दर्शन घ्यावें अशी त्यांच्या मनास उत्कंठा लागून राहिली. त्याकरितां त्यांनीं आपल्या गुरूपाशीं म्हणजे मौनीबुवांपाशीं एक दोन वेळ गोष्ट काढली. पण त्यावर ते खुणांनीं उत्तर देत कीं, कशाला जातां तिकडे? जाण्यांत कांहीं विशेष नाहीं. असा प्रकार चालला होता. अखेर कांहीं शिष्यमंडळी एकदां गुरूची आज्ञा घेऊन पंढरपुरास गेली व तेथून परत फिरत फिरत संगम माहुलीस आली. तेथें तर त्यांनीं समर्थांची कीर्ति पुष्कळच ऐकली. व आतां अनायासें बाहेर पडलोच आहोंत तर सहजासहजीं सज्जन गडावर जाऊन समर्थांचें दर्शन घेऊनच जावें, कारण मठांत गेल्यावर मग कांहीं गुरुमहाराज परवानगी देत नाहींत; या करितां नदीवर स्नान करून भोजनोत्तर निघावें.

असा बेत करून ते नदीवर स्नानास गेले. इतक्यांत समर्थांची स्वारीही परळीहून नित्याप्रमाणें माहुलीच्या संगमावर स्नानास आली. कल्याणस्वामीही झोळी घेऊन पाठीमागें होते. कल्याणांनीं नदीच्या तीरावर झोळी टेकली व समर्थही स्नानासाठीं नदींत शिरले कमरेइतक्या पाण्यांत जाऊन स्नान करूं लागले. व मध्येंच पाण्यांत उभे राहून कल्याणास हाक मारून म्हणूं लागले "कल्याणा! भूक लागली आहे. कांहीं खावयास आहे कारे?" कल्याणस्वामी म्हणाले 'होय; झोळीमध्यें शिळ्या थालीपिठाचा तुकडा असेल. पाहिजे तर देतों." समर्थ म्हणाले "आण तर." कल्याणस्वामींनीं थालीपिठाचे एक दोन तुकडे होते ते नेऊन समर्थांच्या हातांत दिले. ते समर्थांनीं डाव्या हातावर घेतले, आणि उजव्या हातानें त्यांतील एक एक तुकडा खाऊं लागले. मौनीबुवांचे शिष्य अलीकडच्या काठास असून ते ही सर्व मौज पहातच होते. त्यांना ह्याचा मोठा चमत्कार वाटला. ते आपआपसांत म्हणूं लागले हा कोण बुवा दाढीवाला गोसावी? भगवीं वस्त्रें; बरोबर शिष्य; पाण्यांत उभा; अर्धें स्नान झालेलें; आणि वानरासारखें थालीपीठ तेथें पाण्यांतच चघळीत बसला आहे! हा विक्षिप्त माणूस कोण? म्हणून त्यांनीं जवळ असणाऱ्या माणसांपाशीं चौकशी केली. तेव्हां त्यांस समजलें कीं, शिवाजीमहाराजांचे गुरु रामदास स्वामी ते हेच. हें ऐकतांच ते मनांतल्यामनांत हासूं लागलें. ते हळुहळू म्हणूं लागले "हे कशाचे गुरु! आणि कशाचे साधु! आहेत एक विक्षिप्त प्राणी दुसरें काय? आमचे मौनीबुवा कोणीकडे? आणि हे आचरट ध्यान कोणीकडे? पारोशानें थालीपीठ काय घेतलें आहे? इतक्या माणसांत नदीमध्यें खात काय उभे राहिले आहेत? तारतम्य ज्ञान म्हणून कांहींच नाहीं!"

हें इतकें चाललें आहे तों त्या नदीच्या काठीं दुसरा एक चमत्कार झाला. माहुली गांवामध्यें एका कुळकरण्याची एक गाय होती. ती भारी ओढाळ असे. ती हातांतून सुटलीरे सुटली कीं, सारखी धांवत सुटे, व रानांत शिरून लोकांचीं पिकें खाऊन त्यांची नासाडी करीत असे. म्हणून घरचा मालक स्वतःच तिला सोडी व पाण्यावर वगैरे नेणें तर स्वतःच नेत असे. एकदां कांहीं कामाकरितां परगांवीं त्यास जाणें भाग पडलें. तेव्हां

गांवास जातांना त्यानें आपल्या बायकोस ताकीद केली कीं, मीं येईं-पर्यंत ह्या गाईला सोडूं नको. नाहीं तर ती कोणाच्या हातास लागणार नाहीं. बायकोनें ती गोष्ट कबूल केली. नंतर तो गृहस्थ गांवास निघून गेला. तिकडे त्याला दोन चार दिवस अधिक लागले. त्यामुळें ती गाय बाहेर सोडण्याविषयीं फारच भडपड करूं लागली. फार दिवस न सोडल्यामुळें तिला अगदीं कंटाळा आला. म्हणून त्या कुलकरण्याच्या बायकोनें विचार केला कीं, तिला एकदां सोडून नदीवर नेऊन पाणी पाजून आणावें. दावें लांब हातांत धरून आपण बरोबर जावें म्हणजे झालें. असा विचार करून तिनें ती गाय सोडली, व तिचें दावें आपल्या हातांत धरलें. पण ती ओढाळ गाय त्या बायकोला काय आवरणार ? ती धूम पळत सुटली व त्या बाईच्या हातांतील दावें हिसकून घेऊन सैरावैरा धावूं लागली. गाय पुढें पळत आहे व बाई तिच्यामागें लागली आहे. गाय कांहीं हातीं लागण्याचें लक्षण दिसेना व आतां ती लोकांच्या पिकांत शिरली तर लोक काय म्हणतील, व नवराही रागें भरेल, या भीतीनें ती विचारी धामाधूम होऊन त्या गाईच्या मागें धांवत होती.

समर्थ जेथें स्नान करीत होते व मौनीबोवांचें शिष्य जेथें बसले होते त्याच्या समोरच नदीकाठीं एक मोठी दरड होती. ती गाय जी पळत पळत आली ती त्या दरडीवर आली आणि बेफामपणें तेथून उडी टाकतांच त्या दरडीवरून धाडकर खालीं खोलांत पडली आणि कोठें वर्मीं दगड लागून तत्काळ प्राणही निघून गेला ! बाईही मागाहून पळत पळत आली व ती दरडीखालीं जाऊन पाहूं लागली, तों काय ? गायीचा प्राण केव्हांच निघून गेलेला ! तेव्हां ती त्या गायीपाशींच मोठ्यानें हंबरडा फोडून रडत बसली. हें आहे तरी काय, तें पाहण्याकरितां लोकांचा घोळकाच्या घोळकाही सभोंवर येऊन उभा राहिला.

हा सारा चाललेला प्रकार समर्थांना दिसत होता, तसाच त्या मौनी-बोवांच्या शिष्यांनाही दिसतच होता. चारी पाय पसरून जीभ बाहेर काढून डोळे पांढरे करून मेलेली गाय पुढें पडली आहे व बाई कपाळ बडवून रडत बसली आहे ! सभोंवतालचे लोकही हळहळत उभे आहेत.

इतक्यांत समर्थ हातांतील थालीपिठाचा तुकडा खातां खातां

म्हणाले " कल्याणा ! शिळया थालीपिठाचा तोठरा बसतो रे! त्याच्या बरोबर थोडेंसें दूध तरी घेऊन ये." कल्याणस्वामी म्हणाले " आज्ञा महाराज! गांवांत जाऊन दूध घेऊन येतों." गावांत कशाला जातोस ? तुंबा घे आणि ती समोर गाय पडलेली आहे तिचें दूध काढून आण जा " "आज्ञा" म्हणून कल्याणस्वामी तुंबा घेऊन निघाले. हें पाहून मौनी बुवांची शिष्य मंडळी तर पोट धरधरून हासूं लागली! ते आपाआपसांत म्हणूं लागले "गुरु आणि शिष्य दोघेही वेडे पीरच दिसतात !" इतक्यांत कल्याणस्वामी तुंबा घेऊन त्या मेलल्या गायीकडे निघाले, पण गर्दीमुळें त्यांस वाट मिळण्याचीच मारामार पडली. तरी ते तितक्यांतून आंत घुसून हातांत तुंबा घेऊन गायपर्यंत पोचले. त्यास त्या बाईनें विचारलें कीं " बाबा ! तूं कोठें चाललास आणि काय करतोस ?" कल्याणस्वामी म्हणाले " बाई ! आमचे गुरु ते तेथें स्नान करीत आहेत. त्यांनीं या गाईचें दूध मागितलें, तें मी काढून घेऊन जातों." हें ऐकून सारीच मंडळी खोखो खोखो हासूं लागली ! का ण मेलेल्या गायीचें दूध काढणारा हा वेडा पीर कोण ? बाई म्हणाली " बाबा ! ती गाय तर मरून पडली आह ! आणि तूं दूध कशाचें काढतोस ?" कल्याणस्वामी म्हणाले "बाई ! मला तर स्वामींची आज्ञा आहे. त्याप्रमाणें मी करतों." असें म्हणून कल्याणस्वामी तुंबा घेऊन त्या गायीजवळ गेले, आणि तीस हात जोडून म्हणाले " बाई ! आमचे गुरु समर्थ स्वामीमहाराज यांनीं तुला दूध द्यावयास सांगितलें आहे, तें दे." असें म्हणून त्यांनीं तिची तटाटलेली कास पिळली व तुंबाभर दूध काढून ते पुन्हा समर्थांकडे गेले! हा चमत्कार पाहून सारीच मंडळी आश्चर्यचकित झाली. बाईनीं येऊन समर्थांचे पाय धरले. व ' माझी गाय उठवावी.' म्हणून प्रार्थना केली. तेव्हां समर्थांसही तिची दया येऊन त्यांनीं कल्याणस्वामींस सांगितलें कीं, " कल्याणा ! त्या गायीकडे जाऊन तिला इकडे बोलावून आण." त्याप्रमाणें कल्याणस्वामी त्या मेलेल्या गायीपाशीं जाऊन म्हणाले " माते ! चल, तुला येण्याविषयीं समर्थांची आज्ञा होत आहे." हे शब्द ऐकतांच ती गाय खाडकर उठली व शेंपूट वर करून हरणाप्रमाणें उड्या मारीत समर्थांपाशीं गेली व तेथील पाणी वगैरे पिऊन ताजी

तवानी झाली. तेव्हां समर्थ त्या बाईस म्हणाले " बाई ! जा आतां तुम्ही आपली गाय घेऊन घराकडे." तें ऐकून बाई म्हणाल्या " परंतु स्वामीमहाराज ! ही गाय मोठी ओढाळ आहे पुन्हा जाईल उधळून. या कारतां हा तुमचा शिष्य घरापर्यंत माझ्याबरोबर द्या."

समर्थ त्या गायीच्या जवळ गेले, तिच्या पाठीवरून त्यांनीं हात फिरवला आणि म्हणाले " बाई ! ही तुझी धनीण आहे, अन्नदाती आहे, तिला असा त्रास देऊं नये. जा, आतां मुकाट्यानें तिच्यामागून जा आणि पुन्हा असा ओढाळपणा करीत जाऊं नको. " असें बोलून बाईस म्हणाले 'बाई! जा आतां तुम्ही घरीं. गाय तुमच्या मागून येईल. कांहीं एक करावयाचा नाहीं. " त्याप्रमाणें बाई समर्थांस नमस्कार करून घरीं जावयास निघाली, व गायही तिच्यामागून मुकाट्यानें एखाद्या वासरा प्रमाणें निघून गेली.

हा सारा चमत्कार जसा सारे लोक पाहत होते, त्याप्रमाणें मौनीबोवांचे शिष्यही पहात होतेच. त्यांना तर ही सर्व लीला पाहून समर्थ साक्षात् ईश्वरच आहेत असें वाटलें. त्यांच्या मनाला उपरति होऊन त्यांनीं जाऊन त्यांचे पाय धरले. तेव्हां समर्थांनीं तुम्ही कोठचे कोण ? वगैरे त्यास विचारिलें. व तुम्ही परळीस चला म्हणाले. परंतु मौनीबोवांच्या शिष्यमंडळींनीं प्रार्थना केली कीं, "आम्ही येथें झाडाखालीं स्वयंपाक केला आहे. आतां दुपार भरत आली आहे. तरी स्वामींनीं कृपा करून येथेंच पंक्तीचा लाभ द्यावा. " समर्थांनीं त्यांची ती प्रार्थना मान्य करून कल्याणासहवर्तमान त्यांच्या मध्येंच जवण केलें, आणि मग त्या सर्वांसह समर्थ परळीवर आले. मौनी बोवांच्या शिष्यांस त्यांनीं चार दिवस ठेवून घेऊन मोठ्या सत्कारानें त्यांची रवानगी केली.

मौनीबोबांच्या शिष्यांनीं परत गेल्यावर मौनीबोवांस ही समर्थांची सर्व हकीगत निवेदन केली. ती ऐकून मौनबुवा पोट धरधरून हासले व त्यांनींही समर्थ हे फार थोर व ईश्वरी अंश आहेत असें खुणेनें सर्वांस सांगितलें.

**वाघिणीचें दूध**!—एके दिवशीं शिवाजी महाराजांचीस्वारी प्रतापगडाहून निघून माभळेश्वरीं गेली. तों तेथील रानांतच समर्थांची स्वारी असल्याची

त्यांस बातमी लागली. म्हणून ते दर्शनासाठीं निघाले. पुष्कळ दरीखोरीं धुंडलीं परंतु समर्थांची कांहीं गांठ पडेना. आणि शिवाजी महाराजांची समर्थांच्या चरणीं तर येवढी निष्ठा होती कीं, त्यांच्या दर्शनाकरितां कितीही कष्ट पडले तरी त्याची क्षिति मनावयाची नाहीं, असा त्यांचा सांप्रदाय असे. ह्यामुळें रात्र पडली तरी ते मशाली घेऊन निघाले. समर्थांची बसण्याची जागा म्हणजे कोठें असावयाची? तर नेहेमीं तुटलेल्या कड्यावर, घोर जाळींत, दुर्गम गुहेंत. ही त्यांची वस्तीचीं ठिकाणें! म्हणून तसलींच ठिकाणें धुंडीत चालले. वाटेंत कांटेकुटे, असल्यामुळें मशालजी, मनुष्यें दरडीवरून घसरून पडत. असें करतां करतां उजाडलें जवळ एकही मनुष्य राहिलें नाहीं. साऱ्यांचचि चुकामूक झाली. म्हणून दुसऱ्या दिवशीं राजे तसेच एकटे रानोमाळ फिरून पाहूं लागले तों वाघठाण्याच्या एका भयंकर गुहेंत कोणी मोठमोठ्यानें विवळत असल्याचा शब्द ऐकूं येऊं लागला. आंत जाऊन पहातात तों समर्थ अत्यंत विव्हळ होऊन गडबड गडबड लोळत आहेत. राजेश्रींनीं जवळ जाऊन चिंतायुक्त मुद्रेनें विचारलें कीं "महाराज! अशी स्थिति कशानें झाली? कोणती व्यथा होत आहे?" समर्थ मोठ्या कष्टप्रद स्वरानें म्हणाले "बापा! काय सांगूं! आज दोन दिवस पोटांत घडा उठला आहे. त्यामुळें प्राणांतिक वेदना होत आहेत आतां कांहीं माझी धडगत दिसत नाहीं." राजे म्हणाले "महाराज! त्याला काहींतरी औषध आणवितों. आपण कांहीं काळजी करूं नये." समर्थ म्हणाले "शिवबा! हें कांहीं नेहेमींच्या दुखण्यापैकीं दुखणें नव्हे. हा रोग निखालस असाध्य आहे." महाराजांनीं विनंति केली "काय? ह्याच्यावर कांहींच औषध नाहीं?" समर्थ म्हणाले "बापा! आहे, एक औषध आहे; पण तें नसल्यासारखेंच आहे. कारण तें परम दुर्मिळ आहे." शिवाजीराजांनीं प्रश्न केला "असे कोणतें औषध? तें निवेदन करण्याची कृपा व्हावी म्हणजे तें मी हरप्रयत्नानें आणीन." समर्थ म्हणाले "बापा! वाघिणीचें दूध मिळेल तरच माझी ही व्यथा दूर होईल. दुसऱ्या कशानेंही ह्याला गुण पडावयाचा नाहीं. रानांतील दगडावर थेंब पडून सुकलेलें दूध वैदू लोक घेऊन येतात. तसलें कामाचें नाहीं. अस्सल दूध पाहिजे." शिवरायांनीं विनंति केली "महाराज! मी जाऊन कसेंही करून

आपल्या कृपेनें तें पैदा करून आणतों." असें म्हणून समर्थांजवळ तुंबा पडला होता तो घेऊन राजश्री निघाले. समर्थ म्हणाले "बापा! तूं आपला जीव कशाला धोक्यांत घालतोस?" राजेश्रींनीं उत्तर दिलें "सद्गुरुसेवेंत देह खर्ची पडल्यावर आणखी सद्गति ती कोणती?" असें म्हणून शिवाजी-महाराज रानांत निघाले. पुष्कळ जंगल धुंडाळलें पण वाघीण कोठेंच दृष्टीस पडेना. वाघीण अशी काय वाटेवर पडलेली असणार? आणि ती आढळलीच तर दूध काढूं देणार थोडीच! शिवाजी शूर होते; त्यांनीं पाहिजे तर एखादी वाघीण ठार मारली असती पण त्यांस जिवंत वाघीणीचें दूध कसें मिळणार? हा एक मोठा बिकट प्रश्न होता. वाघीण कोठेंच दृष्टीस न पडल्यामुळें महाराजांची अधिकाधिकच निराशा होत चालली. इतक्यांत एका जाळीमध्यें वाघाचे दोन बच्चे आढळले. तेव्हां त्यांस अतोनात आनंद झाला. कारण, त्यांस अशी खात्री वाटूं लागली कीं, ह्या पिलांची आई जवळच कोठें तरी असणार, ती लौकरच इकडे येईल. म्हणून ते त्या जाळीजवळ तिची वाट पहात बसले. वाघीण आली तरी ती आपल्याला दूध काढूं देणार नाहीं हेंही ते पूर्णपणें जाणून होते तरी समर्थांची कृपा काय एक करणार नाहीं? ह्या भरंवशावर शिवाजी-महाराज समर्थांचें स्मरण करीत तशा ठिकाणींही बसले. थोडा वेळ गेला नाहीं तोंच, एक भयंकर वाघीण डुरकण्या फोडीतच जाळीकडे आली. वाघाची जात आधींच क्रूर, त्यांत वाघीण; पिलावर प्रेम; तेव्हां आपल्या जाळींत पिलांजवळ निर्भयपणें मनुष्य बसलेला पाहतांच त्याला आतां खाऊं का गिळूं असें तीस होऊन गेलें. ती चवताळून एकदम शिवाजी महाराजांच्या अंगावर धांवली व तिनें त्यांच्यावर झेंप घालून आपल्या जबड्यांत त्यांचें नरडें धरलें! राजेश्री कितीही शूर असले तरी त्या शौर्याचा येथें काय उपयोग? कारण येथें वाघिणीला जिवंत ठेऊन दूध काढावयाचें होतें! ह्यास्तव त्यांनीं मनाला धीर देऊन त्या वाघिणीला हात जोडून विनयानें म्हणाले "मातोश्री! मी येथें आलों आहे तों तुला मारण्याकरितां आलों नाहीं; किंवा तुझीं पिलें घेऊन जाण्याचाही माझा हेतु नाहीं. मी फक्त आमच्या स्वामींना थोडेसें दूध पाहिजे म्हणून आलों आहे. तेवढें कृपा करून मला काढूं दे. मला

मारावयाचेंच असेल तर मग मार." असें म्हणून ममतेनें त्यांनीं तिच्या पाठीवरून हात फिरविला. मुक्या जनावराचा मनुष्यमात्रावर येवढा जो विश्वास बसतो तो कशानें ? माया किंवा ममता हें एकच त्याचें कारण होय. मनुष्याच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम आहे अशी खात्री पटली कीं, जनावरसुद्धां हुकुमबंदें होऊन राहतें.

महाराजांचे प्रेमळ शद्ब आणि कोमळ हात पाहून त्या वाघिणीच्या मनांतील क्रोध शांत झाला. तिनें त्यांचा गळा सोडला व ती त्यांस एखाद्या मांजराप्रमाणें चाटूं लागली ! असें पाहतांच राजेश्रींनीं तिच्या कासेंत हात घालून दूध पिळून घेतलें, व तुंबा भरतांच त्या वाघिणीला नमस्कार करून ते मोठ्या आनंदानें निघाले ! थोडेसे दूर गेले नाहींत तोंच पाठीमागून शद्ब एकूं आले कीं, " शिवबा ! धन्य आहे तुझी ! वाघिणीचें दूधसुद्धां आणलेंस अं ! " राजेश्री पाठीमागें पाहतात तों समर्थांची स्वारी उभी ! महाराजांनीं सद्गदित अंतःकरणानें चरणावर मस्तक ठेवलें. समर्थ पहातात तों शिवाजीचीं वस्त्रें कांटेरीं झाडानें फाटलीं आहेत; व वाघिणीचीं नखें लागून आंगास जखमा झाल्या आहेत. ही स्थिति पाहून समर्थांसही गहिंवर आला. त्यांनीं शिवाजीस घट्ट आलिंगन दिलें. तेव्हां राजेश्रींनीं विचारिलें " महाराज ! आपलें पोटांत दुखणें राहिलें काय ? " समर्थांनीं हास्य करून उत्तर दिलें " बापा ! तुझ्यासारखा भक्तशिरोमणी औषध आणण्याकरितां जिवावर उदार झाल्यानंतर मग पोटांत दुखणें कशाचें राहणार ! तें केव्हांच बंद झालें ! असो; आतां तुला फार श्रम झाले आहेत. तर स्नान करून रघुपतीस नैवेद्य समर्पण करूं या. भोजनोत्तर मग आपआपल्या स्थळीं जाऊं. " शिवाजी महाराजांनीं विनति केली कीं, " येथें भोजनाचें कसें जुळणार ? " समर्थ म्हणाले " बापा ! रघुपतीच्या मनांत आलें तर काय होणार नाहीं ?" असें म्हणून स्नानास जावयास सांगितलें. इकडे जाळीमध्यें पांच चार मनुष्यें स्वयंपाक करीत होतीं. पण त्यांपैकीं एकही मनुष्य राजेश्रींच्या ओळखीचें नव्हतें. उभयतांचें स्नान झाल्यानंतर पानें वगैरे मांडून सर्व सिद्धता झाली. हें पाहून समर्थांनीं नैवेद्य समर्पण करून उभयतांही जेवावयास बसले. राजश्रींनीं तुंब्यांतून आणलेलें दूध तापवून वाढावयास सांगितलें व हें ' जिजाबाईचें दूध आहे.'

असें म्हणून समर्थांनीं परम भक्तीनें प्राशन केलें व शिवाजी महाराजांसही वाढलें. भोजनोत्तर विडा वगैरे भक्षण करून शिवाजी महाराज आपल्या फौजेंत जाऊन मिसळले, व समर्थही परळीवर निघून गेले.

समर्थांची अद्‌भुत गोष्ट म्हटली कीं, ती सपशेल खोटी, केवळ भाकड कथा, 'कल्पनातरंगाचे खेळ' वगैरे विधानें करण्याचें आलीकडच्या विद्वान् मंडळीनें जणों काय कंकणच बांधलें आहे. इतिहाससंशोधक मंडळांत आजकाल सुप्रसिद्ध म्हणून गाजणारे प्रोफेसर राजवाडे हे ह्या मंडळींतील प्रमुख किंवा मुगुटमणि म्हटलें तरी शोभण्यासारखें आहे. ह्यांनीं ह्या वाघिणीच्या दुधाच्या गोष्टीसंबंधानें चाफळ खोऱ्यांत शोध करून '**श्री सांप्रदायिक विविध विषय**'–द्वितीयखंड–ह्या पुस्तकांतून बरीच माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यांत त्या प्रांतीं ह्या गोष्टीचें एक बायकांचें गाणें आज शेकडों वर्षांचें चालत आलेलें दिलें आहे. *

---

* हें वाघिणीच्या दुधाचें गाणें:–

## वाघिणीचें पद.

वाघिणी ग मज बाळातें। निज दुग्धचि दे गे माये।
व्याकुळ व्यथेनें केलें। रामदास गुरु मायेला।
तुझिया स्तनिचें दुग्ध। औषध असें हें त्याला।
तद्दुःखें बहु घाबरलों। तुजपाशीं धांवत आलों।
रूपानें तुझिया भ्यालों। काकुळती येतों माये।
वाघिणी ग मज बाळातें। निज दुग्धचि देगे माये ॥ १ ॥
गर्जना माझ्या राणें। करितां वन सर्व दणाणे।
तरिबाई नाहिं मी आलों। तुजपाशीं कपटपणानें।
जिजाबाई माऊलि ऐसी। मानिली लेकपणानें।
देऊनी दुग्ध गुरूसी। मग येतों मी लवलाही।
वाघिणी ग मज बाळातें। निज दुग्धचि दे ग माये ॥ २ ॥
त्या करुणावचनें तेव्हां। पाषाण तरु पाझरले।
रामदास गुरु मायेचें। हृदय बहु प्रेमें भरलें।

समर्थांच्या अद्भुत लीला म्हणजे शुद्ध भाकडकथा, व हनुमान स्वामींच्या कल्पनेचे खेळ म्हणून बखरकरांची हुरवावडी करून देणारे जे हरीचे लाल आहेत त्यांतील प्रो. राजवाडे हे धुरीण होत. असें असतांहि ह्या वाघिणीच्या दुधाच्या गोष्टींत त्यांस किती हार खावी लागली आहे व आडवाटेंत शिरून किती चुकवाचुकव करावी लागली आहे, या गोष्टी उत्तम प्रकारें व्यक्त होतात.

" गीतांत रानांतल्या वाघीणीचें दूध महाराजांनीं काढलें म्हणून म्हटलें आहे, तें कदाचित् कवित्व असूं शकेल." ( ! )

" हिंस्र पशूंनाही द्रव आणण्याची कला महाराजांच्या आटोक्यांत नसेल कशावरून ?"

" तथापि. एकदम एखाद्या रानांतील वाघीणीला महाराजांनीं आपल्या करामतीनें गाय बनवावें, हें जरा [ येथें तरी जिव्हा व लेखणी कचरलीसें दिसतें.] अद्भुत दिसतें."

इतके लढविलेले तर्कही डळमळूं लागले तेव्हां त्यांची लेखणी हळूहळू नरम आली आणि एक एक पाय मागें काढूं लागली:—

प्रथमतः राजवाड्यांनीं आपल्या अद्वितीय तर्कशास्त्रांतून या गोष्टीवर संशयारोप केला आहे तो असा:—" कदाचित् पाळीव वाघिणीचें दूध दरवेशाकडून महाराजांनीं पैदा केलें असेल (!) "

---

**गाय जशी वाघिण जाली । निष्ठुरपण तिचें सरलें ।**
**पाडसास प्रेमें जैसा । इच्छेनें चाटी त्यासी ।**
**कन्वाळुपणानें पाहे । शिवपुण्य फळाला आलें ।**
**वाघिणी ग मज बाळातें । निज दुग्धचि देगे माये ॥ ३ ॥**

**हेरंब सन्मुख तिसरा । नृप होय उमेचा तान्हा ।**
**पात्रांत धार काढी । गोकुळींचा जैसा कान्हा ।**
**तुंबपात्र भरुनी राहे । वाघिणिचे वंदुनि पाये ।**
**पण घेउनि सत्त्वर जाये । रंगनाथ गुरुबाईला । (?)**
**वाघिणी ग मज बाळातें । निज दुग्धचि देगे माये ॥ ४ ॥**

"शकुंतलेला पांखरांनीं दूध पाजलें, किंवा रॉम्यूलसाला लांडगीनें थान दिलें, ह्या पुराणकथाहून शिवसमर्थांची ही कथा जास्त विश्वसनीय भासते."

इतके या गोष्टीवर तर्कवितर्क करून हे इतिहाससंशोधक शेवटीं मुद्दाम सांगावयाची गोष्ट सांगतात. ती कोणती ? तर हीः--

" मुद्दाम सांगावयाची गोष्ट म्हणजे ह्या काव्यांत (गाण्यांत) इतिहास-रसही ओतप्रोत प्रतीयमान होतो."

प्रतिपक्षाच्या सेनापतींनीं येवढी कबुलायत देऊन हार खाल्ली, यांपेक्षां समर्थांच्या अद्भुत लीलेच्या सत्यतेला ह्या पेक्षां आणखी बलवत्तरपुरावा तो कोणता पाहिजे ?

**भागानगरांतील म्हातारी!**—भागानगरास केशव स्वामी रहात असत, म्हणून प्रतिवर्षास रंगनाथस्वामी त्यांच्या भेटीस जात व महिना पंधरा दिवस त्यांचा तेथें मुक्काम असे. रंगनाथस्वामींची जेथ स्वारी असे, तेथें प्रत्यहीं कीर्तनाचा थाट हा असावयाचाच. हजारों लोक त्यांचें कीर्तन ऐकावयास येत असत. त्याप्रमाणें ह्या वर्षींही समारंभ चालू होते. त्यांत कोणी त्यांस जेवावयास बोलावीत, कोणी अन्य रीतीनें आदर सत्कार करीत. याप्रमाणें त्यांची तेथें एकसारखी सरबराई चालू होती. अखेर त्यांची जाण्याची तयारी होऊं लागली. तेव्हां तर लोकांची मनस्वीच गर्दी झाली. त्यांत अत्यंत गरीब अशी एक म्हातारी होती. तिची रंगनाथस्वामींवर अत्यंत भक्ति जडलेली असे. स्वामी जेव्हां जाणार म्हणून ऐकलें तेव्हां तिच्या मनांत दृढतर हेतु उत्पन्न झाला कीं, स्वामींचें पाय एकदां आपल्या घरास लागावेत. व त्यांचें उच्छिष्ट आपल्या येथें पडावें. परंतु ही गोष्ट घडणार कशी ? कारण घरामध्यें अठरा विस्वे दरिद्र ! तेव्हां परमेश्वरानें आपल्याला इतकी हीन स्थिति दिली म्हणून ती मनांतल्या मनांत अत्यंत कष्टी झाली. नेहमींप्रमाणें त्या दिवशींही रंगनाथस्वामींचें कीर्तन होऊन मंडळी घरोघर गेली. परंतु ही गरीब म्हातारी मात्र स्वामींपुढें हात जोडून नेत्रांत अश्रु आणून उभी होती. स्वामींनीं तिला जाण्याविषयीं सांगितलें, पण ती कांहीं जाईना. व तुम्हाला काय पाहिजे म्हणून विचारलें तर तेंही सांगेना. फक्त वरचेवर डोळ्याचें पाणी मात्र पुशी. त्यावरून रंगनाथस्वामींनीं तिच्या मनांतील

हेतु जाणला आणि म्हणाले " बाई ! आम्ही उद्यां येऊं बरें तुमच्या घरीं जेवावयाला." हे ऐकून त्या बाईला तर काय, 'अभाग्याच्या घरीं कामधेनु' आल्याप्रमाणेंच झालें. बाईनें त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून "गरीबावर कृपा झाली" असें म्हणाली. पण पुन्हा बाईच्या मनांत दुसरेंच संकट येऊन उभें राहिलें. तें हें कीं, स्वामींबरोबर पांचपंचवीस शिष्यमंडळी आहेत, ती बरोबर आली तर कसें होणार? म्हणून पुन्हा ती दीनवाण्या मुद्रेनें उभी राहिली. तो तिच्या मनातील आशय जाणून स्वामी म्हणाले " बाई ! मी उद्यां एकटाच येणार बरें. शिष्यमंडळी येथेंच जेवतील." हें ऐकून बाईचा जीव खालीं पडला आणि ती घरीं जावयास निघाली. तेव्हा स्वामींनीं एका शिष्यास त्या बाईचें घर कोठें आहे तें पाहून यावयास सांगितलें. त्याप्रमाणें एक शिष्य त्या बाईबरोबर जाऊन तिचें घर पाहून आला. दुसऱ्या दिवशीं स्वामींनीं आपल्या सर्व शिष्यमंडळीस सांगितलें कीं, आम्ही आज एकटेच कालच्या बाईच्या घरीं जेवावयास जाणार. तुम्ही सर्वांनीं येथेंच भोजन करावें. त्याप्रमाणें सर्व मंडळी स्वयंपाकाच्या तयारीस लागली. एका शिष्यानें स्वामींबरोबर जाऊन बाईचें घर दाखविलें व स्वामींचें देवपूजेचें सामान वगैरे नेऊन ठेवून तो परत आला. स्वामींनीं स्नान करून पूजा वगैरे केली, आणि बाईस नैवेद्य वाढावयास सांगितलें. बाईनें तीन पत्रावळी आणून ठेविल्या होत्या. मापट्याच्या कण्या करून दोन भाकरी व हरबऱ्याच्या पाल्याची भाजी केली होती त्याचा एका पानावर नैवेद्य वाढला. एक वीतभर फळकट होतें तें बसायास ठेवलें. स्वामींनीं नैवेद्य समर्पण केला, व त्या पानावर बसले. अन्नशुद्धीला तूप नव्हतें म्हणून बाईनें तुलसीपत्रच टाकलें होतें.

स्वामीं जाऊन पानावर बसले. त्या बाईची ती गरीबी; तिची निस्सीम भक्ति; सिधा स्वभाव व पुढें वाढलेल्या कण्या पाहून त्यांस भगवंतांनीं खाल्लेल्या विदुराच्या कण्यांची आठवण झाली आणि त्यांच्या तोंडास पाणी सुटलें. त्यांस वाटलें कीं, ह्या कण्या नव्हेत, तर प्रत्यक्ष अमृतच आहे. ह्यास्तव आज समर्थ ह्या पंक्तीस असतील तर मोठी बाहार होईल. असें मनांत म्हणून ते आपल्या पानावर वाट पहात बसले. हें पाहून त्या बाईनें विनंति केली कीं, "आतां बसावयास विलंब कां?" स्वामी

म्हणाले " समर्थ म्हणून आमचे वडील आहेत, ते जेवावयास येणार आहेत, म्हणून थोडीशी वाट पहातों." बाईनीं विचारलें " ते कोठें आहेत ?" " चाफळांत आहेत." ' चाफळ किती लांब आहे ?" " आहे २०० कोस ! " ह्या बोलण्याचा अर्थ त्या बाईला कांहींच समजेना. तीही मनांत गोंधळून स्वस्थ उभी राहिली.

इकडे चाफळामध्यें ब्राह्मणांची पंगत बसून तयारी झाली होती. तोंच समर्थ कल्याणास म्हणाले " कल्याणा ! सर्वांस जेवावयास बसूंदेत. आम्ही जातों रंगोबाच्या पंक्तीला." कल्याणांनीं विनति केली कीं, " रंगनाथस्वामी कोठें आहेत ?" समर्थ म्हणाले " तो भागानगरांत आहे. मला आतां बोलावयास वेळ नाहीं हा मी निघालों." असें म्हणून समर्थ बाहेर पडले आणि अदृश्य झाले ! इकडे भागानगरांत रंगनाथस्वामी त्या म्हातारीच्या घरीं पानावर खोळंबून बसले होते, तोंच ' जयजय रघुवीर समर्थ !' असें म्हणत समर्थांची स्वारी प्रगट झाली व रंगनाथस्वामींस विचारलें कीं, " कां रंगोबा ! आज आम्हाला कशाची मेजवानी करतोस ?" रंगनाथ स्वामी म्हणाले " आज ह्या विदुराच्या घरच्या कण्या आहेत. " असें म्हणून त्या म्हातारीस त्यांनीं दुसरें पान वाढावयास सांगितलें. म्हातारीनें दुसरी पत्रावळ मांडून त्यावर कण्या, अर्धी भाकर व हरबऱ्याची भाजी वाढली. समर्थ येऊन पानावर बसले आणि म्हणाले " रंगोबा ! केशव स्वामी ह्या गांवचा; त्याला चुकवून आपणच एकट्यानीं भोजन करणें नीट दिसतें का !" रंगोबा म्हणाले " होय, अवश्य; केशवस्वामींही पाहिजेत." इतकें बोलत आहेत तोंच केशवस्वामींची स्वारी येऊन पोंचली. मग तो आनंद काय विचारावा ? त्यांनीं लागलीच तिसरें पान मांडावयास सांगितलें. बिचाऱ्या म्हतारीनें तिसरें अपत्यास ठा म्हणून पान ठेवलें होतें तें वाढलें. व " आतां बसावें " म्हणून त्रिवर्गाची प्रार्थना केली.

तों इतक्यांत समर्थ म्हणाले " अशा ह्या लाभाला आपला जयराम व आनंदमूर्ति पाहिजे बुवा. त्यांच्याशिवाय कांहीं आपल्यास घांस जाणार नाहीं. " इतकीं समर्थांच्या मुखांतून अक्षरें निघालीं मात्र, तोंच जयराम-स्वामी व आनंदमूर्तींही येऊन पोंचले. रंगनाथस्वामी म्हणाले " बाई ! आणखी दोन पत्रावळी ठेवा." बाई वाईट तोंड करून म्हणाल्या "पत्रावळी

तीनच होत्या !" रंगनाथस्वामी म्हणाले " छे छे ! असें म्हणूं नये. त्या पहा तेथे दोन पत्रावळी आहेत. त्या आणा इकडे." बाई पहातात तों खरोखरच चुलीपाशीं आणखी दोन पत्रावळी होत्या. बाईस वाटलें कोठें चुकून राहिल्या होत्या वाटतें ! त्या त्यांनीं आणून मांडल्या व सर्वांस थोडथोड्या कण्या व अर्धी अर्धी भाकर वाढली, व हात जोडून सर्वांच्या चरणाचें तीर्थ घेऊन बसावयास प्रार्थना केली. तेव्हां सर्व मंडळींनीं नैवेद्य समर्पण करून भोजनास सुरुवात केली. त्या बाईच्या उत्कट भक्तीमुळें त्या कण्यांना खरोखरच विदुराच्या घरच्या कण्यांची अमृतमय रुचि आली होती. त्यामुळें सारी मंडळी कण्याचे भुरक्यावर भुरके मारूं लागली. मंडळींचीं रानें कडाडलेलीं ! आवडीचें भोजन ! मग काय ? वचकभर कण्या व अर्धी भाकरी संपावयाला वेळ तो किती ? पांच चार मिनिटें गेलीं नाहींत तोंच सर्वांचीं पानें रिकामीं झालीं ! रंगनाथस्वामी म्हणाले " बाई ! आणखी कण्या भाकरी आणा." हें ऐकतांच बिचारी म्हातारी तोंड फिरवून रडूं लागली ! रंगनाथस्वामी म्हणाले " बाई ! रडतां कां ?" म्हातारी रडत रडत म्हणाली " स्वयंपाक केला होता तेवढा संपला !" स्वामी म्हणाले " छे छे ! असें म्हणूं नये. त्या पहा, भाकरी आहेत तर खऱ्या. आणा त्या." बाई पहाते तों खरोखर पुन्हा दोन भाकरी चुलीशीं उभ्या केलेल्या आहेत. व तपेल्यांत पहातात तों तपेलेंही पुन्हा कण्यानें भरलेलें ! हा चमत्कार पाहतांच बाईनें मोठ्या आनंदानें पुन्हा चौघांच्या पानावर कण्या व भाकरी वाढाल्या ! तें काय बोलून चालून प्रीतिभोजन ! त्याचा रामरगाडा बराच वेळ चालला. तृप्ति म्हणून कोणाचीच होईना. अशा रीतीनें स्वामीपंचायतनाचीं यथेच्छ भोजनें झालीं. बाईला पुन्हा कण्याभाकरीचा प्रसाद मुबलक शिल्लक राहिलेला होताच. बाईनेंही जेवण उरकून घेतलें. सर्वांचीं भोजनें उरकल्यानंतर त्यांनीं तुलसीपत्रांचें ग्रहण केलें, आणि सर्वांनीं तेथेंच क्षणभर वामकुक्षी केली. थोडासा आराम केल्यानंतर हे सर्व संतमंडळ जावयास निघाले. तेव्हां समर्थ रंगनाथस्वामींना म्हणाले " कारे रंगोबा ! त्या बाईचें जेवण फुकटच जेवला कां ? तिला कांहीं बक्षीसबिक्षीस द्यावयास नको का ?" रंगनाथस्वामी म्हणाले " जेवावयाचें काम मुलांचें. बक्षीस देण्याचें काम वडिलांचें." हें ऐकून

समर्थ म्हणाले "वः ! हा न्याय उत्तम ! असो; आतां तिला कांहीं तरी दिलें पाहिजे खरें." असें म्हणून त्यांनीं बाईस जवळ हाक मारून तिच्या मस्तकीं वरद हस्त ठेवला. तेव्हां तिची समाधि लागून ती ब्रह्मानंदांत निमग्न झाली. नंतर क्षणभरानें ती समाधि उतरल्यावर तीच आनंदमय स्थिति तुझी कायम राहील असा समर्थांनीं तीस आशिर्वाद देऊन त्या दिवसापासून तिचें नांव "आनंदी" असें ठेवलें. नंतर ह्या स्वामीपंचायतनांच्या मूर्ति आपआपल्या स्थानीं गेल्या.

**बाह्यांतील रेडकूं**—एकदां, बाहे बोरगांव हें कृष्णातीरचें रमणीय स्थान आहे हें मनांत आणून समर्थ, जयरामस्वामी, रंगनाथावामी व आनंदमूर्ति हे चारही सत्पुरुष तेथें जाऊन एका ज्योतिषाची एक विधवा म्हातारी होती, तिच्या घरीं राहिले. ते सकाळींच उठून नदीच्या मधील रामलिंग नांवाच्या बेटावर जात आणि दुपारीं स्नानसंध्या आटोपून परत येत. म्हातारी मोठी सज्जन होती. ती या चौघांना फार जपत असे. तिच्या घरीं एक दुभती म्हैस असल्यामुळें ती त्या चौघांस दूध, दहीं, ताक, लोणी यांचा चांगला पुरवठा करीत असे. त्या बाईनें एके दिवशीं ह्या चौघांस विनंति केली कीं, आपण सकाळच्याच प्रहरीं नदीच्या पलीकडे जातां, तर जातांना माझी येवढी म्हैस व रेडकूं बरोबर नेत जावें. आणि तेथें त्यांस मोकळे सोडावें, म्हणजे दुपारपर्यंत तेथील हिरवळ खाऊन तुंद होतील व परत येतांना आपल्या बरोबर आणीत जावींत म्हणजे माझें मोठें काम होईल.

आनंदमूर्तींनें ती गोष्ट कबूल करून दररोज प्रातःकाळीं बेटावर स्नानसंध्येस जातांना ते त्या म्हशीला व रेडकाला आपल्याबरोबर नेत व दुपारीं परत येतांना त्या दोघांसही आपल्याबरोबर परत आणीत. ह्याप्रमाणें बरेच दिवस क्रम चालला होता. एके दिवशीं अशी गोष्ट झाली कीं, हें स्वामीमंडळ आपल्या स्नानसंध्येंत गुंतलें होतें, व रेडकूंही म्हशीला सोडून बरेंच दूर चरत होतें. इतक्यांत एका लांडग्यानें त्याच्यावर झडप घालून त्यांस खाऊन टाकलें ! दुपारीं परत जातांना आनंदमूर्ति पाहतात तों म्हैस आहे, पण रेडकूं नाहीं ! रेडकूं लांडग्यानें खाऊन टाकलें !

तेव्हां ते त्रिवर्गही म्हैस घेऊन समर्थांकडे आले, व त्यांनीं तिचें रेडकूं

लांडग्यानें खल्लयाचें वर्तमान त्यांस श्रुत केलें. तें ऐकून समर्थ बोलले "बापहो! आजपर्यंत त्या म्हातारीच्या घरीं दहीं दूध खाल्लेंत. रंगोबाला तर लोणी फार आवडतें म्हणून ती म्हातारी त्याला दररोज लोणी आणि भाकर वाढीत असे; पण आतां पुढें कसें काय होणार?" हें ऐकून सारीच मंडळी हांसूं लागली. नंतर चारही असामी ती म्हैस घेऊन म्हातारीच्या घरीं गेले, आणि त्यांनीं ती म्हैस दाव्यानें बांधून ठेवली. म्हातारीनें विचारलें, "रेडकूं कोठें आहे?" आनंदमूर्ती मोठ्या दुःखानें म्हणाले "बाई! तें रेडकूं आमची नजर चुकवून लांडग्यानें खाल्लें, त्यास इलाज नाहीं." हें ऐकून म्हातारीच्या तोंडाचा पट्टा सुटला! "तुम्हांस येवढेंसें काम सांगितलें तें सुद्धां तुमच्यानें झालें नाहीं. रेडकूं मारून आलांत; आतां धार कशी काय काढावयाची? रोज गळगळां घाशीं लागेपर्यंत दहीं, दूध, तूप, लोणी खात होतां. आतां काय खाल?" असें बोलून ती म्हातारी फारच विलाप करूं लागली. चौघेही उगाच बसले होते. तों धार काढावयाची वेळ झाली, व म्हैस ओरडूं लागली. म्हणून म्हातारी धार काढावयास बसली; पण ती धार देईना म्हणून ती फारच रडूं लागली.

तेव्हां समर्थ म्हणाले "अरे! इतक्या दिवस तुम्ही म्हातारीच्या घरीं दहीं दूध खाल्लेंत; आज तिचें रेडकूं मारलेंत; आणि आतां ती धार देत नाहीं, तर तुम्ही तेवढी तिची धार तरी काढून द्या." ह्यावर रंगनाथस्वामी म्हणाले "आज्ञा झाल्यास आजचा दिवस आम्ही तिची धार काढून देऊं. परंतु म्हातारीच्या घरीं आम्हीच जेवलों आणि वडील जेवले नाहींत काय? ह्याकरितां वडिलांनींच म्हातारीचें दुःख नाहींसें करून तिची म्हैस निरंतर दूध देईल असें करावें." समर्थ म्हणाले "आम्हीच करावें आणि तुम्ही करूं नये असें आहे कीं काय?" रंगनाथस्वामी म्हणाले "उभयतां वडिल असतां आम्हां मुलांकडे काय आहे?" हीं परस्परांचीं विनोदपर भाषणें ऐकून म्हातारी म्हणाली "माझें रेडकूं मारून आणखी वर माझी थट्टा करतां काय!" जयरामस्वामी म्हणाले "बाई, आम्ही तुमची थट्टा करीत नाहीं बरें. तुमची म्हैस दूध देईल असें करतों." समर्थ म्हणाले "कर कर. जयरामा! लौकर कर." जयरामस्वामी म्हणाले "हें काम वडिलांचें! मुलांचें फक्त जेवावयाचें काम." हें ऐकून समर्थ म्हणाले "बरें बाबा!"

असें म्हणून स्वतः समर्थ उठून म्हशीजवळ गेले आणि तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हणाले "बाई ! मृत्युलोकीं जो प्राणी जन्मास येतो तो मृत्यु हा पावावयाचाच. ह्यास्तव मेलेल्या रेडकाचें दुःख मनांत आणून धार न देणें हा कांहीं धर्म नव्हे. झाल्या गोष्टीस उपाय नाहीं. ह्याकरितां ह्या बाई जोंपर्यंत जिवंत असतील तोंपर्यंत निरंतर दूध देत जा. पुन्हा गाभण होऊं नकोस. वत्सासाठीं दुःख करूं नकोस." ह्याप्रमाणें म्हशीस सांगून पाठिवरून हात फिरवून बाईस सांगितलें कीं "तपेलें आणून धार काढा." बाई बोलली कीं "आतां धार कशी देईल ?" समर्थ म्हणाले "वेडे म्हातारे ! तुला काय ? तूं जोंपर्यंत जिवंत आहेस तोंपर्यंत तूं नेहेमीं काढीत होतीस त्याच्या दुप्पट दूध काढीत जा. त्याची काळजी तूं अतःपर करूं नको." "बरें बाबा !" असें म्हणून घरांतून तपेलें आणून बाईनें धार काढली. तों नित्यापेक्षां दुप्पट दूध म्हशीनें दिलें. हें म्हातारीनें पाहून चौघांच्या चरणीं मस्तक ठेवून संतोष पावली. ही म्हैस त्या म्हातारीच्या घरीं आमरणांत दूध देत होती. हें चरित्र झाल्यानंतर चौघेही आपआपल्या स्थानाकडे गेले. शके १५९०

**जयरामस्वामीस बुडविलें !**—एकदां समर्थ जयरामस्वामींच्या भेटीला वडगांवास गेले असतां, तेथेंच कांहीं दिवस राहिलें होते. एके दिवशीं समर्थ एकटेच नदीवर स्नानास गेले होते. तों त्याच गांवच्या ब्राह्मणाचा एक दहा वर्षांचा मुलगा पवनानदींत स्नानास गेला असतां पाण्यांत बुडून मरण पावला. त्याचें प्रेत बाहेर काढून त्याचे आईबाप त्याच्या सभोंवतीं बसून रडून रडून आक्रोश करूं लागले. इतक्यांत जयरामस्वामी समर्थांच्या पूजेकरितां साहित्य घेऊन नदीवर गेले. तों त्या ब्राह्मणाच्या मुलाचे आईबाप धाय धाय मोकलून रडतांना पाहिलें. तेव्हां त्यांस दया येऊन ते त्यांस म्हणाले "अरे ! हा तुमचा मुलगा तर जिवंत आहे. आणि तुम्ही रडतां का ?" असें म्हणून त्यांनीं त्या प्रेतावरून हात फिरविला. तोंच तो मुलगा झोपेंतून उठल्याप्रमाणें उठून बसला व बोलूं चालूं लागला ! हें पाहून तीं आईबापें मोठ्या आनंदानें आपल्या मुलास घेऊन घरीं गेलीं ! हें सर्व कृत्य समर्थ पहातच होते. परंतु त्यावेळीं ते त्याबद्दल कांहींच बोलले नाहींत.

दुसऱ्या दिवशीं समर्थ स्नानास निघालेले पाहून जयरामस्वामीही त्यांच्याबरोबर स्नानास निघाले. उभयतांही बरोबर चालत असतां रस्त्यांत एक विहीर लागली. ती पाहून समर्थ जयरामस्वामींस म्हणाले "जयरामा! आपण आज या विहिरींतच स्नान करूं या." जयरामस्वामी म्हणाले " या विहिरीला दोर नाहीं; रहाट नाहीं; पायऱ्या नाहींत कांहीं नाहीं. आणि मला तर मुळींच पोहतां येत नाहीं." समर्थ म्हणाले " त्याबद्दल तूं कांहीं काळजी करूं नकोस." असें म्हणून त्यांनीं प्रथम त्या विहिरींत स्वतः उडी टाकली आणि मागाहून जयरामस्वामींस त्या विहिरींत उडी टाकावयास सांगितलें. जयरामस्वामींनीं समर्थांच्या आज्ञेस मान देऊन त्यांच्यावर श्रद्धा ठेऊन चटकन त्या विहिरींत उडी टाकली! त्यांस पोहावयास येत नसल्याचें त्यांनीं पूर्वीं सांगितलेंच होतें. त्याप्रमाणें ते पाण्यांत पडतांच तळास गेले! समर्थ त्यांस तसेंच टाकून आपण वर आले आणि वडगांवच्या मठांत न जातां थेट निघाले ते चाफळास येऊन दाखल झाले!

इकडे वडगांवच्या मठांत स्वयंपाक तयार होऊन स्वामी स्नानाहून आले कीं, नैवेद्य समर्पण करावयाचा म्हणून मंडळी वाट पहात होती. घटका गेली, प्रहर गेला, दोन प्रहर गेले; समर्थांचाही ठिकाण नाहीं व जयराम स्वामींचाही ठिकाण नाहीं. अखेर शिष्य मंडळी शोधार्थ निघाली. पण काय? कोठेंच मागमूस नाहीं. नदीवर गेले कोणी नाहीं; गांवांत शोध केला पत्ता नाहीं. तेव्हां मात्र सर्वांच्याच तोंडचें पाणी पळालें. कोणास जेवण ना खाण! याप्रमाणें सारा दिवस विवंचनेंत गेला. अखेर गोपाळ बोवा चाफळास जाऊन समर्थांस भेटले व साष्टांग नमस्कार घालून डोळ्यांत अश्रु आणून विनंति केली कीं " आमचे स्वामी कोठें आहेत?" त्यावर क्रोधायमान होऊन समर्थ म्हणाले "तुमचे स्वामी आम्हाला काय ठाऊक? ते तेथेंच वडगांवास राहिले." हें निष्ठुरपणाचें उत्तर ऐकून गोपाळबुवा अगदीं गयावया करूं लागले. तेव्हां समर्थ त्यांस म्हणालें " कारे! गोपाळा! तुला त्याबद्दल इतकें वाईट कां वाटतें? " गोपाळबुवा हात जोडून म्हणाले " महाराज! दुःख करूं नको तर काय करूं? आपण व आमचे स्वामी वडगांवास बरोबर स्नानास गेलांत आणि आपण परभारें

इकडे चाफळास निघून आलांत. आणि आमच्या स्वामींचा तर आज तीन दिवस झाले, कोठें पत्ता नाहीं! हें काय?" हें ऐकून थोड्या हास्ययुक्त मुद्रेनें समर्थ म्हणाले "बरें तर; चल माझ्याबरोबर." असें म्हणून ते पुन्हा त्या वडगांवाच्या विहिरीपाशीं गेले. आणि कांठावर उभे राहून "जयरामा! वर ये म्हणून त्यांस हाक मारली." तेव्हां जयरामस्वामी आंतूनच म्हणाले "महाराज! मला पोहतां येत नाहीं." "ये; तसाच ये." अशी समर्थांची पुन्हा आज्ञा झाली. तेव्हां जयरामस्वामी कसें तरी विहिरीच्या कांठास धरून मोठ्या कष्टानें बाहेर पडले. आणि समर्थांस साष्टांग नमस्कार करून "मला तिराल पाण्यांत ठेवलें, हा दंड कशाबद्दल?" म्हणून प्रार्थना केली. तेव्हां समर्थ म्हणाले "बापा! तूं मेलीं माणसें उठवूं लागलास. आतां दररोज एक एक मेलें माणूस * तुझ्या दारांत येऊन पडेल. तें तूं उठवीत जा. म्हणजे आम्ही तुला ब्रह्मदेवच म्हणूं." हें समर्थांचें भाषण ऐकून जयरास्वामींनीं विनंति केली कीं, "अतःपर महाराजांचे आज्ञेव्यतिरिक्त कांहीं एक करणार नाहीं." "बरें आहे." असें म्हणून समर्थ वडगांवच्या मठांत गेले, व कांहीं दिवस तेथें राहून मग चाफळास गेले.

**आनंदमूर्तींची भेट**—कोणा एका समयीं समर्थ शिराळें येथें जाऊन करवीरास गेले, आणि तेथून परत येतांना ब्रह्मक्षेत्रीं [ ब्रह्मनाळेस ] जाऊन आनंदमूर्तींचे गुरु श्रीरघुनाथस्वामी ह्यांच्या समाधीच्या वृंदावनाच्या दर्शनास गेले. तों आनंदमूर्ति स्नानसंध्या करीत होते. त्यांस समर्थ आल्याची बातमी समजतांच ते तसेच उठून समर्थांच्या दर्शनास आले. समर्थांनीं वृंदावनास प्रदक्षिणा करून साष्टांग नमस्कार घालतांच वृंदावन डोलूं लागलें. हें पाहून सयर्थांनीं आनंदमूर्तींना पोटाशीं धरून "बाबा!

---

* समर्थांनीं सुद्धां स्वतः टाकळीच्या कुळकरण्याच्या स्त्रीचा पति, उद्धव गोसाव्यांचा पिता सजीव केला होता. मग त्यासही हाच नियम लागू नाहीं काय? यावरून पाहतां हें समर्थांचें विधान मोठें चमत्कारिक दिसतें! 'परंतु अशा कृति वारंवार करणें उचित नव्हे' येवढेंच सुचविण्याचा त्यांचा हेतु असावा.

तूं गुरुसेवेची सीमा केलीस. तूं एकनाथमहाराजांप्रमाणेंच गुरुभक्त आहेस. त्याशिवाय तुला दुसरी उपमा नाहीं. असें म्हणून त्यांनीं त्यासमयीं दोन श्लोक केले. ते असे:—

### श्लोक.

अतिकठिण शिळा ती डोलवी वृक्ष जैसा।
जननिजठर कोशीं जन्मला कोण ऐसा॥
गुरुपदभजनाची ख्याति झाली दिगंतीं।
अनुदिन भज चित्ता स्वामि आनंद मूर्ति॥ १॥
अचेतना जो बहु डोलवी तो।
सचेतना कां नच बोलवीतो॥ *
सच्चिद्घनानंद आनंदमूर्ती।
तदाकार राहोन्चि आनंदवृत्ती॥२॥

हे श्लोक ऐकून आनंदमूर्ति म्हणाले "मी कांहीं ह्या स्तुतीस पात्र नाहीं." समर्थ म्हणाले "अवश्य पात्र आहेस. नाहींस कसा?" नंतर आनंदमूर्तींनीं त्यावेळीं श्लोक म्हटला तो असा:—

### श्लोक.

समर्थ हें नामाचिसाच मानूं।
समर्थ हें नाम परा न मानूं॥

---

* साताराचे श्री. पंत प्रतिनिधी ह्यांच्या बखरींत हा श्लोक प्रतिनिधीचे पूर्वज परशुराम त्र्यंबक ह्यांनीं केलेला म्हणून दिला आहे, समर्थांच्या बखरींत हा समर्थांचा म्हणून दिला आहे. त्यापैकीं खरें कोणतें? ह्याच्या निर्णयाला कांहीं मार्ग दिसत नाहीं. तथापि श्लोकांतील भावार्थावरून व प्रतिनिधीच्या आख्यायिकेवरून हा श्लोक प्रतिनिधींच्या मुखामध्यें विशेष खुलतो, तितका तो समर्थांच्या मुखांतून निघण्यांत स्वारस्य वाटत नाहीं. मग काय असेल तें असो.

**समर्थ कृपेनें जड जीव तर्ती।**
**समर्थ हें नाम सद्यःप्रतीती ॥ १ ॥**

नंतर आनंदमूर्तीनी समर्थांस गावांत नेलें. तेथें मठांत भोजन वगैरे करून दोन तीन दिवसानीं समर्थ वडगावास जाऊन जयरामस्वामींस भेटून नंतर चाफळास गेले.

उद्धव **गोसाव्याचें पत्र**—सारंगधुर येथील श्रीमारुतीचे अधिष्ठाना करतां उद्धव गोसावी ह्यांची इंदुरास स्थापना केली होती हें पूर्वी आलेंच आहे. उद्धव गोसावी आज्ञेप्रमाणें इंदुरास * जाऊन राहिले होते. त्यास दोन वर्षे झाली. उद्धवगोसाव्यांनीं तेथें राहून आज्ञेप्रमाणें संस्थान व उपासना सांप्रदाय वाढवून होते. त्यांस फार दिवस झाल्यामुळें समर्थांच्या दर्शनाची त्यास अत्युत्कट इच्छा उद्भवली म्हणून त्यांनीं समर्थांस एक पत्र लिहिलें तें असें:—

श्लोक.

**गुरूराजया ब्रह्मरूपा दयाळा।**
**दयासागरा धांव वेगें कृपाळा ॥**
**अनाथा दिना कारणें तूं कुवासा।**
**महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ १ ॥**
**तुझें रूप पाहावया आस मोठी।**
**तरी दाखवी रूप तत्काळ दृष्टी ॥**
**जशी बाळका माय तूं धांव तैसा।**
**महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ २ ॥**
**मना इंद्रियां क्रोधकामासि मारी।**
**मदें मत्सरें वासनाही निवारी ॥**

---

* हें इंदूर म्हणजे होळकरांचें नव्हे. हें इंदूर मोंगलाईत निजामहैद्राबादेजवळ आहे. तें तीसपसतीस हजार वस्तीचें शहर असून मनमाडपासून हैद्राबादेकडे जो आगगाडीचा फाटा जातो, त्यावरचें एक स्टेशन आहे.

जळावेगळा तळमळे मीन जैसा।
महराजया श्रीगुरू रामदासा ॥ ३
नसे सूख संसार हा घोर मोठा।
जसा सिंह हस्तीसि मारी चपेटा ॥
अशा संकटीं सोडवी राजहंसा।
महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ४ ॥
चकोरें जसा चंद्रमा चिंतिताहे।
घरीं धेनुची वासरूं वाट पाहे ॥
तसें ध्यान तूझें मला हो कुवासा।
महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ५ ॥
नको अंत माया त्वरेने हरावी।
तुझी भक्ति वीरक्ति शांतीहि द्यावी ॥
बरा अंतरीं लावि वैराग्य ठसा।
महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ६ ॥
तुझे ब्रीद सांचचि असेल खरें।
प्रचीती मला दाखवी सत्वरी रे ॥
पतीतासि हा हेत आधार जैसा।
महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ७ ॥
मला वाटतें अंतरीं त्वां वसावें।
तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें ॥
परी आपल्या पाववी प्रेमरसा।
महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ८ ॥
म्हणे उद्धवा त्वाचि हाती धरावें।
सदा सर्वदा अंतरीं प्रेम द्यावें ॥
उपेक्षूं नका स्वामि दासासि हंसा।
महाराजया श्रीगुरू रामदासा ॥ ९ ॥*

---

* बखरींत कवितां संबंधानें जे लेख आले आहेत, ते बहुतेक अशुद्ध व छंदोभंग अशा स्थितींतच आढळतात. त्यावरून प्रतीवरून प्रतीकरतांना

ह्याप्रमाणें आलेलें उद्धवगोसावी ह्यांचें विनंतिपत्र ऐकून समर्थांनीं थोडेंसें हास्य केलें, आणि आपल्या दर्शनाविषयीं त्यांच्या अंतःकरणास तळमळ लागून राहिली आहे, हें मनांत आणून कल्याणाकडून पत्राचें उत्तर लिहिलें, तें असें:—

ओंव्या.

चिरंजीव ते निश्चळ। निश्चळीं जाहलें चंचळ॥
चंचळी जाणावा निश्चळ। निश्चळ रूपी॥ १॥
सदा सर्वदा निश्चळ। निश्चळींच पहावें सकळ॥
सकळ पाहतां केवळ। आपणचि वस्तु॥ २॥
वस्तुरूप आपण। अधिष्ठानीं पाहतां कोण॥
पाहतां पाहणें ज्यालागून। तोचि तो आत्मा॥ ३॥
आत्मारामीं आत्मा पहा। जाणूनियां सुखी रहा॥
स्वानंदामृत सेवूनि पहा। निखिल निजरूपा॥ ४॥
रूप तेंचि पाहतां सगुण। सगुण तेंचि आपण॥
आपणा परतें ज्ञान। वेगळें नाहीं॥ ५॥
वेगळेंपण पाहावें। मग तें वेगळेंचि जाणावें॥
मग मिळेना स्वभावें। मुक्त जैसा॥ ६॥
म्हणूनि वेगळें न साहे। न साहे म्हणणेंचि बाह्य॥
बाह्याबाह्य तें अबाह्य। जाण बापा॥ ७॥
ऐसें जें अधिष्ठान। तेथें जावया जाण॥
जाण जाणो परिच्छिन्न। आपणचि॥ ८॥
शरण जावें द्रुरूसी। म्हणजे कळे आपणासी॥
आपपर नाहीं त्यांसीं। दास म्हणे॥ ९॥

---

लेखकांच्या हातून वारंवार प्रमाद होत गेले असावेत एक, किंवा त्याकालीं सभयस्फूर्तीप्रमाणें शीघ्र कवित्व करण्याचा प्रघात असल्यामुळें, छंदोभंगाकडे वगैरे तितकेसें लक्ष कोणी पुरवीत नसावेत एक; दुसरी कल्पना चालत नाहीं.

याप्रमाणें उद्धवगोसावी यांस येण्याविषयीं समर्थांचें आज्ञोत्तर जातांच त्यांनीं तेथील मठाचा नीट बंदोबस्त करून महादेवगोसावी म्हणून एका शिष्याची तेथें नेमणूक करून व तेथील ग्रामाधिकारी, जमादार वगैरे सर्वांस आज्ञा केली कीं, त्यांचें कांहीं कमी पडूं देऊ नये. आणि ते शके १५७८ मध्यें देशांत समर्थांच्या भेटीस आले व तेथेंच राहिले.

**घटपटादि खटपट**—शास्त्रसंभार कितीही उपयोगी असला, तरी भक्तिमार्गांपुढें त्याची कांहीं मातब्बरी नाहीं. हें तत्त्व सर्व साधुसंतांना मान्य आहे व त्याचेंच अनुकरण ह्याखालीं दिलेल्या गोष्टींत आहे.

वासुदेवगोसावी कोण, हें आमच्या वाचकांच्या स्मरणांत असेलच. दिवसां मशाल लावून सुरीनें जीभ कापून घेणारे गृहस्थ ते हेच, येवढें सांगितलें म्हणजे पुरे. ह्यांच्या विद्वत्तेच्या घमंडीचें सारें पाणी होऊन ते समर्थांचे शिष्य बनले होते, व त्यांची कण्हेरच्या मठावर स्थापना केलेली होती. परंतु ' सुंभ जळलें तरी पीळ जळत नाहीं.' अशी एक म्हण चालत आलेली आहे. त्याप्रमाणेंच पुढें अनुभव आला. वादविवादाच्या अहंमन्यतेंत जन्म घालविलेल्या मनुष्यास भक्ति किंवा उपासना मार्गाच्या शांततेच्या साम्राज्यांत चैन पडावें कसें ? मनुष्याला उद्योग हा कांहींतरी लागतोच. त्याप्रमाणें वासुदेवगोसाव्यांनीं ' रामार्चन चंद्रिकेंतील ' पद्धतीप्रमाणें न्यास, ध्यान, विधीपूर्वक कसें करावें, व हल्लींच्या पद्धतींत काय काय दोष आहेत, इत्यादि विषयांचा एक मोठा ग्रंथ लिहिला आणि समर्थ परळीवर असतां तो त्यांस नेऊन दाखविला. तो समर्थांनीं सारा चाळून पाहिला आणि म्हणाले " आपण विद्वान् आहां; ग्रंथ उत्तम आहे, व त्यांतील विधीप्रमाणें आचरण्यासही आपणच योग्य आहांत. पण आधीं हा ग्रंथ येथून उचला पाहूं. आमच्या पुस्तकांत हें पुस्तक नको." असें म्हणतांच वासुदेवगोसाव्यांनीं मुकाट्यानें तें पुस्तक उचललें व आंत गेले. पण पाहतात तों वाचाच बंद झाली ! एक अक्षर सुद्धां बोलतां येईना. हें पाहून ते मोठमोठ्यानें रडूं लागले, व त्यांनीं समर्थांच्या पायावर लोळण घेतली. पण समर्थ त्यांच्याकडे मुळींच लक्ष देईनात. तेव्हां कल्याणस्वामी, उद्धवगोसावी वगैरे शिष्य मंडळी त्यांच्यावर क्षमा करावी म्हणून रदबदली करूं लागली. त्या सर्वांस समर्थ म्हणाले

" बापा ! हा दिवसां मशाल लावून जयपत्रें घेत हिंडणारा विद्वान शास्त्री; शास्त्राप्रमाणें व्यवहार करणारा; आणि आम्ही पडलों गोसावी. ह्याचें व आमचें जुळावें कसें ? ' भोळ्या बायाबापड्यांत गोष्टी सांगणारे ' आम्ही; तेव्हां यांचें व आमचें जुळावयाचें नाहीं. "

परंतु वासुदेव गोसाव्याच्या ऐवजीं इतर मंडळींनींच क्षमा मागून मनस्वी भीड खर्च केली. तेव्हां समर्थांनीं वासुदेव गोसाव्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेवतांच त्यांना पुर्ववत् वाणी फुटली ! तेव्हां वासुदेव गोसाव्यांनीं सद्गदित अंतःकरणानें समर्थांच्या चरणावर मस्तक ठेवलें. त्यावेळीं समर्थांनीं त्यांस उपदेश केला " बापा ! कलियुगामध्यें शास्त्राप्रमाणें चालणें कठीण आहे, म्हणून श्रीरामचंद्रांनीं निर्वाण समयीं भक्तिमार्ग चालविण्याविषयीं मारुतीस उपदेश केला. त्याविरुद्ध बोलणें हा मोठा अपराध आहे. ह्याकरितां श्रीच्या आज्ञेप्रमाणेंच चालून नामस्मरणानें जगाचा उद्धार करावा. " पुढें वासुदेव गोसावी त्याप्रमाणेंच चालूं लागले. फिरून त्यांनीं कोणत्याही प्रकारची विद्वत्तेची गडबड केली नाहीं.

**उद्धवगोसाव्यांचें कीर्तन**—एक वेळ समर्थांची स्वारी चाफळास असतां उद्धव गोसावी यांस कीर्तन करण्याविषयीं आज्ञा झाली. त्याप्रमाणें उद्धव गोसावी कीर्तनास उभे राहिले. त्यावेळीं समर्थही पोषाख करून कीर्तन श्रवणासाठीं आसनावर बसले होते. कल्याणस्वामी व शिवाजी महाराज मोरचलें वारीत होते, त्र्यंबक गोसावी व वासुदेव गोसावी यांच्या हातीं चवऱ्या व सोन्याच्या काठ्या होत्या, कीर्तनास दाटीही मनस्वी झालेली होती. कीर्तनास असा कांहीं रंग चढला कीं त्यामुळें समर्थही अत्यंत संतुष्ट झाले. हल्लीं कीर्तन म्हटलें कीं आधीं हार्मोनियमची पेटी पुढें पाहिजे. त्याशिवाय हरिदास बुवा कसले ! असा प्रकार पूर्वीं नव्हता. पूर्वीं मृदंग आहे आहे, नाहीं नाहीं; टाळ असला तर असला, नसला तर नसला; चिपळ्यावरच बहुधा काम भागे. वक्तीं त्या सुद्धां नसल्या तरी चालताचालत होत असे. तुकाराम बावांचा टाळ दगडाचा असल्याचेंही सर्वत्र प्रसिद्धच आहे. अशी स्थिति असल्यामुळें त्या दिवशीं उद्धव गोसाव्यांच्या मागें सुद्धां साथीस कोणी नव्हतें. फार तर काय, टाळ वाजवावयास सुद्धां कोणी नव्हतें. तरी 'कीर्तन कर' अशी समर्थांची आज्ञा होतांच ते उभे राहिले. हल्लींच्या

कीर्तनांत व त्या वेळेच्या कीर्तनांत महदंतर आहे. हल्लींचीं कीर्तनें केवळ दिखाऊ असतात. तबला, पेटी, पोषाख हा संच; लोक मला काय म्हणतील ह्याची लालसा; हीं हल्लींच्या कीर्तनांत दृष्टीस पडतात. त्या वेळच्या कीर्तनांत ह्या उपांगाकडे मुळींच लक्ष नाहीं म्हटलें तरी सुद्धां चालेल. अंतःकरणांत स्फूर्ति होईल तो विषय; आणि मुखांतून शब्द निघतील तें प्रतिपादन! त्या वेळच्या हरिदासांत नखशिखांत भक्ति व प्रेमच भरलेलें असे. त्यांतच ते नाचत, गात, गिरक्या घालीत, किंवा प्रसंगास उचित असे हवे ते हावभाव बिनदिक्कत करीत. त्या प्रेमरसाच्या भरांत त्यांचें देहभानच नष्ट होत असे. आपण आहों कोठें, करतों काय, आपले अंगविक्षेप पाहून जन काय म्हणेल ह्याची त्यांना दादही नसे. इतके ते भक्तिरसांत तन्मय होऊन जात. ही गोष्ट अलीकडच्या पांचपन्नास वर्षांतील हरिदासांत सुद्धां क्वचित् क्वचित् दृष्टीस पडत असलेली वाचकांच्या सुद्धां अनुभवांतील असेल. असो.

ह्याच पद्धतीप्रमाणें उद्धव गोसावीही प्रेमामध्यें अगदीं तन्मय झाले होते. तेही रंगांत आले म्हणजे हालत, डुलत व गिरक्या घेत. अशी त्या कीर्तनांत भक्तिरसाची केवळ लयलूट चालली होती. ती त्यांची अप्रतिम भक्ति पाहून प्रत्यक्ष मारुतीही प्रसन्न झाले, आणि उद्धवाच्या मागें टाळकरी कोणी नाहीं हें पाहून स्वतः टाळ घेऊन त्यांच्या मागें उभे राहिले! उद्धव गोसावी आपल्याच प्रेमरसांत दंग झाल्यामुळें, त्यांना ती गोष्ट कळली सुद्धां नाहीं. ते आपल्याच नादांमध्यें कथानुरोधानें वारंवार गिरक्या घेतच होते. ते गिरकी घेतांना मागें गेलें म्हणजे मारुतींच्या अंगाचा शेंदूर त्यांच्या झग्यास लागे. याप्रमाणें शेंदूर लागून लागून उद्धव गोसाव्यांचा सारा झगा लाल होऊन गेला! ही गोष्ट दृष्टीस पडतांच समर्थांनीं सहज मागें पाहिलें, तों उद्धवाच्या मागें मारुती स्वतः टाळ वाजवीत उभे आहेत! हें पाहून समर्थ एकदम उठले आणि म्हणाले "उद्धवा! कीर्तन समाप्त कर. आणि मागें नमस्कार घाल." त्याप्रमाणें उद्धवांनीं तत्काल मागें नमस्कार करून आरती केल्या नंतर समर्थांजवळ जाऊन त्यांना नमस्कार केला. तेव्हां समर्थांनीं त्यास पुढें घेऊन "भले शाबास!" असें म्हणून त्यांची पाठ थोपटली आणि 'तुझें कीर्तन धन्य

होय' असें म्हणून अतःपर कीर्तन करणें तें उभ्यानें करीत जाऊं नकोस. कारण मारुतीला श्रम होतातव कीर्तनाच्या प्रारंभीं व समाप्तीला मागें नमस्कार करीत जा." त्याप्रमाणें अद्याप चाल चालत आहे. म्हणजे उद्धवगोसाव्यांच्या परंपरेंत कीर्तन करणें तें बसून करतात, व आरंभीं आणि समाप्तीला मागें नमस्कार करतात. शके १५८१ तील ही गोष्ट आहे.

सर्वांवर चढ—एका पौषमासीं समर्थ परळीहून चाफळास येत असतां पालीस खंडोबाची यात्रा होती, तेथें तासेवाले, व हरदासवाले शाहीर ह्यांचा फड पडला होता. त्यांत एकमेकावर चढ घालून चार पांच दिवस न उठतां हट्टास धरून बसले होते. त्याच मार्गानें समर्थांची स्वारी आली तों शेंपन्नास मनुष्यें जमून बसलीं आहेत व सभोंवर तमासगिरांची दाटी झाली आहे. हें पाहून काय आहे? म्हणून समर्थांनीं प्रश्न केला. तेव्हां उभयतांनीं साष्टांग नमस्कार करून आप आपलें सविस्तर वर्तमान सांगितलें. समर्थ हासून म्हणाले "आम्ही तुम्हां दोघावरही चढ करतों. त्याचा जबाब द्या. नाहींतर डफावरची कलगी उतरून चालते व्हा." असें म्हणून स्वामींनीं एक डफगाणें म्हटलें तें असें:—

## डफगाणें

किती पृथ्वीचें वजन। किती आंगोळ्या गगन।
सांगा सिंधूचें जीवन। किती टाक ॥ १ ॥
किती आकाशींचा वारा। किती पर्जन्याच्या धारा।
तृणभूमीवरी चतुरा। संख्या सांगा ॥ २ ॥
वायूसरसे उडती। सांगा अणुरेणू किती।
लक्ष्य चौन्यांयशींची उत्पत्ति। संख्या सांगा ॥
अठरा भार वनस्पती। भूमंडळीं पाणी किती।
पुष्पें फळें जाती किती। संख्या सांगा ॥ ४ ॥
बीजवडीं आणि पिंपळी। किती आहे भूमंडळीं।
सर्व धान्यांची मोकळी। संख्या सांगा ॥ ५ ॥
सर्व सरितांची वाळू किती। सिंधु सागरीं वाळू किती।
हरखूं आहे किती। संख्या सांगा ॥ ६ ॥

**सांगा माझें डफगाणें। कीं डफ ठेवा शहाणपणें।**
**देहबुद्धीचीं लक्षणें। सोडवीन ॥ ७ ॥**
**ऐका जें जें तुम्हां आज। तें तें आतां सांगा मज।**
**अनंत ब्रह्मांड बेरीज। किती झाली ॥ ८ ॥**
**रामदासाचा विनोद। सांडा अहंतेचें बीज।**
**मग स्वस्वरूपीं आनंद। सुखी रहा ॥ ९ ॥**

ह्या समर्थांच्या डफगाण्याचें उत्तर दोही फडांच्या शाहिरांस देतां आलें नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां ते दोघेही शाहीर आपआपल्या डफावरच्या कलग्या उतरून समर्थांस साष्टांग नमस्कार करून आपआपल्या स्थळीं गेले.

**खंडोबाचें दर्शन**—एकवेळ समर्थ चिंचवडास जाऊन मोरयादेवांचें दर्शन घेऊन जेजुरीवरून जातांना, खालूनच खंडोबाला नमस्कार करून पुढें जाऊं लागले. हें पाहून खंडोबानीं शिवाजी महाराजांचें स्वरूप धारण करून एका निळ्या घोड्यावर बसून समर्थांच्या समोरूनच स्वारी आली. बरोबर दहा पांच असामी व एक कोतवाल घोडा. ह्या शिवाजी महाराजांनीं समर्थांस दुरून पहातांच ते घोड्यावरून खालीं उतरले व साष्टांग नमस्कार करून हात जोडून विनंति केली कीं, "स्वारी इकडे कोणीकडे गेली होती?" समर्थ म्हणाले "मी इकडे चिंचवडास मोरया देवांस भेटावयास गेलों होतों, तों आतां चाफळास जात आहे." समर्थांनीं विनंति केली "वर जाऊन म्हाळसाकांतांचें दर्शन घेतलें काय?" समर्थ म्हणाले "नाहीं; आम्ही कांहीं वर गेलों नाहीं. आम्ही येथूनच त्यांस नमस्कार केला." शिवाजीराजे म्हणाले "छे छे! हें ठीक दिसत नाहीं. मल्हारीच्या गांवांत येऊन त्यांचें दर्शन घेतल्यावांचून जाणें प्रशस्त नव्हे. याकरितां आपणही मजबरोबर वरती येऊन दर्शन घ्यावें." ही राजेश्रींची विनंति समर्थांसही अमान्य करवेना. तेही शिवाजीबरोबरच त्या बरोबरच्या कोतवाल घोड्यावर बसून परत फिरले, व जेजुरींत जाऊन पर्वतावर चढून म्हाळसाकांताच्या दर्शनास गेले. महाद्वारापर्यंत शिवाजी महाराजही त्यांच्याबरोबर होते. समर्थ आंत जाऊन मागें पाहतात तों शिवाजीमहाराज नाहींत! ते पार अदृश्य झाले! हा चमत्कार पाहून समर्थ मनांत समजले

कीं, प्रत्यक्ष खंडेरावच शिवाजी महाराजांच्या रूपानें येऊन आपणांस भेटले. असो; झालें तें उत्तम झालें. असें म्हणून देवदर्शन करून देव ब्राह्मणही केला. आणि तिरात्र जेजुरीस राहून निघतेवेळीं आरती केली ती अशी—

## आरती

पंचानन हयवाहन सुरभूषण लीला।
खंडा मंडित दंडित दानव अवलीला॥
मणिमल्ल मर्दूनियां धूसर जो पिंवळा।
विरकंकण बाशिंगें सुमनांच्या माळा॥
जयदेव जयदेव जयजय मल्हारी।
वारी दुर्जनवारी निंदक अपहारी॥ १॥
सुरवैरी संहारा वर दे मज देवा।
नानानामीं गाइन मी तुमची सेवा॥
अखंड गुण गावयासि वाटतसे हेवा।
फणिवर शिणला तेथें नर पामर केवा॥
जयदेव जयदेव जयजय मल्हारी। वारी दुर्ज०॥ २॥
रघुवीर स्मरणें शंकर हृदयीं निवाला।
तो हा मदनांतक अवतारचि झाला॥
यालागीं आवडीनें भावें वर्णीला।
रामीं रामदासा जिवलग भेटियला॥
जयदेव जयदेव जयजय मल्हारी॥ वारी०॥ ३॥

ह्याप्रमाणें आरती केल्यावर प्रसाद व आज्ञा घेतांना विनंति केली कीं, "महाराज! आपण त्रैलोक्याचे नाथ असतां शिवाजीचें स्वरूप धारण करून आम्हां भक्तजनांस फसविण्याचें कारण काय? श्रीरघुपतीचा दास तो आपलाच आहे." त्यासमयीं श्रीखंडेराव महाराजांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन सांगितलें कीं "आम्ही भक्तप्रिय आहों. आम्हांस भक्तांची आवड फार. हें तुम्हांस माहित असून असा भेद कां मानावा? तुम्हां आम्हांमध्यें भेद आहे काय?" ह्याप्रमाणें समाधान केलें. समर्थ बोलले

" आपण पतितपावन आहांत " असें म्हणून चरणीं मस्तक ठेवून आज्ञा घेऊन चाफळास गेले. शके १५८५ शोभकृत नाम संवत्सरांत हा वृत्तांत घडला.

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## पूर्वार्ध

## भाग ७ वा

### सहावें तप.

शके १५९० पासून शके १६०२ पर्यंत

हें समर्थांच्या लीलेचें सहावें तप म्हणजे बहुतेक शेवटचेंच होय. त्यांच्या लीलेचा प्रधान भाग तो सारा ह्यांतच आहे. कारण ह्यापुढें समर्थांची इहलोकची वस्ती अवघी एकच वर्षांची राहिली; तेव्हां त्यांची व त्यांचे पट्टछात्र जे छत्रपति शिवाजी महाराज ह्या उभयतांची शिखरास गेलेली लीला ती ह्यांतच पहावयास मिळते. शिवाजी महाराजांनीं आपल्यास राज्याभिषेक करून घेऊन 'छत्रपति', म्हणून घेतलें तें ह्याच तपाच्या कालावधींत व त्यांच्या अवताराची समाप्तीही ह्याच तपांतील होय. तेव्हां या सहाव्या तपाच्या लीलेची गोष्ट इतर तपांहून कांहीं विशेष आहे हें कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. त्यांतील ठोकळ गोष्टींचा गोषवारा आतां यापुढें क्रमशःच देतों.

**कर्नाटक प्रांतीं गमन**—शिवाजी महाराज शके १५९३ मध्यें कर्नाटक प्रांतीं जावयास निघाले. त्यावेळेस समर्थांची स्वारी चाफळास होती, तेथें त्यांची आज्ञा घ्यावयास गेले. तिकडे बरेच दिवस लागावयाचे; ह्यास्तव घोंडो नारायण यांस एकांती नेऊन मठाकडील खर्चाचा बंदोबस्त कसा काय आहे म्हणोन विचारलें. तेव्हां समर्थांची आज्ञा सांगावयास नाहीं; तरी आपली आज्ञा होत आहे म्हणून सांगतों, असें म्हणून घोंडो नारायण सांगूं लागले कीं "मठाकडील उत्पन्न खर्चास पुरत नाहीं. मागील वर्षी समर्थांनीं भिक्षेवर खर्चाची तूट भरून काढली." हें ऐकून राजश्री कारकुनास रागे भरले व 'इतकें दिवस कां कळविलें नाहीं?' म्हणून मर्जी फार खप्पा झाली. नंतर राजेश्रींनीं समर्थांपाशीं जाऊन विनंती केली कीं, "मठामध्यें खर्चाची तूट असल्यास मला आज्ञा कां होत नाहीं? हें राज्य स्वामींचें नव्हे, कीं मी सेवेस अनधिकारी आहे?" समर्थ हासून म्हणाले "बापा! तुम्ही सेवा करीतच आहां. खर्चाची टंचाई रघुपतीच्या येथें कशाची? ती कधींच पडावयाची नाहीं. तुम्हांस उगाच कोणी तरी मजकूर समजावला आहे." परंतु राजश्रींचा फार आग्रह पडला, तेव्हां समर्थ म्हणाले "बरें बापा! तुझ्या मर्जीप्रमाणें कर." तेव्हां कारभाऱ्यास सांगून सातारा व कऱ्हाड येथून गहूं व हरभरे पावते यावेत अशी तजवीज करून कापड खर्चाबद्दल नक्त ऐवजाची तजवीज करून सर्व मजकूर समर्थांस निवेदन केला. तेव्हां 'उत्तम आहे' असें म्हणून राजश्रींस सप्रेम निरोप दिला.

**दुर्जनाचा सज्जन**—'आपणासारिखे करिती तात्काल। नाहीं काळ वेळ तयालागी' असें जें सद्गुरूच्या संबंधानें तुकाराम महाराजांनीं विधान केलें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे. आणि तें समर्थांच्या ठिकाणीं तर पदोपदीं दृष्टीस पडत असे. समर्थांच्या शिष्य समुदायामध्यें रंगोबा गोसावी ह्या नांवाचा एक शिष्य होता. त्याचा कंठ बालपणापासूनच फार मधुर असे. तो समर्थांचे अभंग पदें वगैरे तालसुरांत फार उत्कृष्ट म्हणे. म्हणून समर्थांचीही त्याच्यावर मर्जी असे; पण त्याला बाहेरख्यालीचें दुर्व्यसन जडल्यामुळें त्याच्या त्या गुणाचेंच नव्हे तर जन्माचेंच मातेरें होऊन गेलें होतें. एरवीं पाहिला तर हा मनुष्य चांगला

दिसे; पण लहर लागली कीं, कोठें तरी शेण खाऊन येत असे. तें समर्थांस समजलें कीं, समर्थ त्यास ओढून मठाबाहेर टाकीत. परंतु त्याची समर्थांच्या ठिकाणीं इतकी निस्सीम निष्ठा होती कीं, समर्थांनीं ओढून त्याला ज्या कुशीवर टाकला असेल, त्याच कुशीवर तो दोन दोन दिवस चार चार दिवस सारखा पडून राही ! नंतर इतर मंडळी समर्थांपाशीं त्याची रदबदली करून मोठ्या यत्नानें त्यास जेवावयास घालून मठांत आणीत. पुन्हा तो पुराण सांगूं लागला कीं, समर्थ प्रसन्न होत, व त्यास नेहेमीं म्हणत " रंगोबा ! तूं चांगला आहेस. मात्र तुला वर ठेऊन खालचा तुझा भाग तोडला पाहिजे ! " हीच त्याची नेहमींची तऱ्हा. शके १५९४ सालच्या रामनवमीच्या उत्सवांत सप्तमीच्या दिवशीं हे रंगोबा गोसावी कीर्तन करीत होते. परंतु समर्थांची स्वारी मात्र त्या वेळीं रानांत गेलेली होती. ते रात्रीं येऊन वडाच्या झाडाखालीं बसून त्यांनीं रंगोबाचें सारें कीर्तन श्रवण केलें आणि मर्जी अत्यंत सुप्रसन्न होऊन आरती झाल्यावर समर्थांनीं दुसऱ्या शिष्यास सांगितलें कीं, रंगोबा गोसाव्यास इकडे बोलावून घेऊन या. त्याप्रमाणें रंगोबांनीं येऊन समर्थांच्या चरणावर मस्तक ठेवलें. तेव्हां समर्थ त्यास म्हणाले "तूं आज फारच उत्तम कीर्तन केलेंस. याकरितां काय पाहिजे तो वर माग." रंगोबागोसावी हात जोडून म्हणाला " किंचित् दुर्व्यसन आहे. त्याचा नष्टांश व्हावा. " समर्थ म्हणाले " हें काय मागितलेंस ? दुसरें कांहीं तरी एखादें माग." रंगोबा म्हणाला "दुसरें नाशिवंत काय मागूं ? कृपा करणें तर हाच हेतु पूर्ण करावा." हें ऐकून समर्थ कल्याणस्वामीस म्हणाले " कल्याणा ! रंगोबा काय म्हणतो ?" कल्याण म्हणाले " महाराज ! झाली, उपरति झाली. आतां कृपा करावी." हें ऐकून समर्थांनीं रंगोबाच्या मस्तकावर वरदहस्त ठेऊन म्हटलें " ठीक आहे; अतःपर तुझें व्यसन रहाणार नाहीं, व तुझ्या लंगोटीचें पाणी प्रसूत कालीं दिलें असतां तत्काल प्रसूति होईल." असा वर दिला. त्या दिवशीं शके १५९४ तील चैत्र शुद्ध ७ होती. ही वराची साक्ष पुढें तशीच चालत होती.

**निरंजनस्वामी**—एका वर्षी चाफळचा श्रीरामनवमीचा उत्सव सुरू व्हावयाच्या सुमारास तो पाहण्यासाठीं कऱ्हाडची कांहीं ब्राह्मण मंडळी

निघाली. तों तेथील जोशी या नांवाचा बारा वर्षें वयाचा एक मुलगा कृष्णेवर स्नानास आला होता. त्यानें तो ब्राह्मणसमुदाय पाहून आपण कोठें जातां म्हणून चौकशी केली. तेव्हां ते ब्राह्मण म्हणाले "आम्ही चाफळच्या रामनवमीच्या उत्सावास जात आहों." ह्या मुलानें समर्थांची कीर्ति पूर्णपणें ऐकलेली होती. तेव्हां आपणही ह्यांच्याबरोबर चाफळास जाऊन यावें असें त्याच्या मनांत आलें. आणि तो त्या ब्राह्मण मंडळीस मोठ्या काकुळतीनें म्हणाला "अहो! जरा थांबा. मी आतां धांवत धांवत घराकडून जाऊन येतों. मलाही चाफळास यावयाचें आहे. तेव्हां मीही आपल्या सोबतीनें येईन." ब्राह्मण, फार बरें आहे. जा; लौकर ये, असें सांगून तेथेंच थोडा वेळ थांबले. मुलगा घरीं जाऊन आई-बापास विचारून निघाला; परंतु मुलाचें वय अगदींच लहान, ह्यास्तव त्याचा बापही त्याच्याबरोबर निघाला. आणि ते उभयतांही त्या ब्राह्मणसमुदायाबरोबर चाफळास आले. प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें उत्साव व्हावयाचा तसा झाला. बहुतेक मंडळी जिकडच्या तिकडे गेली. तरी तो धाकटा मुलगा निरंजन व त्याचा बाप हे दोघे मात्र मागें राहिले होते.

चैत्र वद्य प्रतिपदेचें दिवशीं प्रातःकाळीं पूजा वगैरे झाल्यानंतर समर्थांची स्वारी सभामंडपांत येऊन बसली. कल्याण व उद्धव ह्यांच्या हातांत मोरचलें व राजश्री आणि पंतअमात्य यांच्या हातांत चवऱ्या होत्या. अशी सभा बसली आहे तोंच तो धाकटा मुलगा निरंजन समर्थांपुढें येऊन त्यांस साष्टांग नमस्कार घालून दंडवत् भूमीवर पडला, व मीं पतीत आहे माझा उद्धार व्हावा म्हणून पडल्या पडल्याच विनंति केली. ती ऐकून समर्थ म्हणाले "मुला, तूं ऊठ. तूं कोठचा? कोणाचा कोण? तुझें नांव काय?" त्यावरून तो निरंजन म्हणाला "मी कऱ्हाडकर जोशांचा मुलगा. माझें नांव निरंजन. स्वामींनीं कृपापूर्वक मजवर अनुग्रह करून मस्तकावर वरदहस्त ठेवावा. मी केवळ अनाथ आहे!" अशी त्यानें विनंति केल्यावरून समर्थ हास्य करून म्हणाले "तुझ्यावर कृपा करणारे श्रीरघुपती समर्थ आहेत. आतां ऊठ" म्हणून आज्ञा केली.

निरंजन स्वामी म्हणाले "महाराज! आपण समर्थ असून दीनदयाळ व पतितपावन आहां. मी तर बहुत जन्मांचीं दुःखें सोसतां

सोसतां श्रमी होऊन अकस्मात् या नरदेहीं प्राप्त झालों आहे. आतां स्वामी कृपाळु आहेत हें जाणून आपणास शरण आलों आहे तरी मज दीनाची उपेक्षा न करतां कृपा करावी. आणि आपलें ब्रीद संरक्षण करावें" हे त्याचे करुणापर शद्व ऐकून समर्थही अत्यंत प्रसन्न होऊन म्हणाले कीं, "हा अन्य जन्मींचा कोणीतरी योगभ्रष्ट असावा." कल्याणस्वामी म्हणाले "होय; ह्याकरतांच स्वामींनीं त्याच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून त्यास उठविण्याची कृपा करावी." हें कल्याणस्वामींचें भाषण श्रवण करून समर्थांनीं त्या मुलाच्या मस्तकावर हात ठेवून त्यास उठविलें. तेव्हां निरंजनस्वामी हात जोडून पुढें उभे राहिले, आणि म्हणाले "महाराज! आपण पतिताचें पावन करणारे आहां. आपलें नाम श्रवण करून पूर्वी पावन झालों होतों. आतां प्रत्यक्ष दर्शनेंकरून मुक्तच झालों." ह्या वाक्यानें परम संतुष्ट होऊन समर्थ म्हणाले "बापा! तूं मुक्तच आहेस. परंतु धोत्रें, पात्रें, तुला आहेत किंवा नाहींत?" निरंजन बोलला "मी फक्त कौपीन नेसून आलों आहे. दुसरें माझ्यापाशीं कांहीं नाहीं." हें ऐकून समर्थांनीं कल्याणास आज्ञा करून त्यास धोतें, पातें, गवाळें; आणि एक जपमाळ देवविली. आणि सांगितलें कीं, "मुला! तूं स्नान करून श्रीपुढें बसून ध्यान कर. म्हणजे जी आज्ञा करावयाची ती रघुवीर करतील."

अशी आज्ञा होतांच निरंजन मांडगंगेचें स्नान करून संध्यादिक झाल्यानंतर समर्थांच्या आज्ञेप्रमाणें श्रींचे सन्मुख एकाग्रचित्तें बसून ध्यान करूं लागला. तों श्रीरघुपतीचें ध्यान मनांत यावें तें न येतां श्रीगणपतीचें ध्यान दिसूं लागलें. तेव्हां त्या ध्यानाचें विसर्जन करून पुनः श्रीरघुपतीचें ध्यान करीत असतां पुनः श्रीगजाननाचीच मूर्ति प्रत्यक्ष येऊन आपले अंगावर पडली कीं काय, असा त्या मुलास भास होतांच तो घाबरा होऊन स्वामीपाशीं आला, आणि साष्टांग नमस्कार झालेलें वृत्त त्यांस निवेदन केलें. तें ऐकून समर्थांनीं आज्ञा केली कीं, "तुजवर श्रीगजाननाची कृपा आहे. तेच तुला कृपा करून प्रत्यक्ष अनुग्रह करतील. या गोष्टीचा संशय तिळमात्र आणूं नये." हें ऐकून निरंजनानें पुनः साष्टांग नमस्कार करून विनंती केली "महाराज! आपण आज्ञा करितां, हें प्रमाण. परंतु मजला प्रत्यक्ष दर्शन

होऊन अनुग्रहप्रसाद कसा व कोठें घडेल ?" त्याजवरून समर्थांनीं आज्ञा केली कीं, "कऱ्हाडक्षेत्रीं श्रीकृष्णातिरीं गणेशतीर्थ आहे तेथें श्रींचे देवालयामध्यें श्रीगजाननाची मूर्ति आहे. तिचें तुजला प्रत्यक्ष दर्शन घडेल. त्याच मूर्तीचें ध्यान, पूजन व स्मरण एकाग्र चित्तानें करीत जावें. म्हणजे तुला प्रत्यक्ष दर्शन होऊन अनुग्रह सुद्धां मिळेल. ह्याविषयीं चिंता करूं नये." ह्याप्रमाणें आज्ञा करून मस्तकीं हस्त ठेवून निरंजनास निरोप दिला. तेव्हां समर्थांच्या आज्ञेप्रमाणें निरंजन नित्य गणेशतीर्थी जाऊन दोन प्रहर पर्यंत स्नानसंध्या करून श्रीगजाननाची आराधाना करीत असतां शके १५९४ माघ शुद्ध ४ चे दिवशीं त्यास श्रीगजाननाचें प्रत्यक्ष दर्शन घडून त्यांच्यापासून अनुग्रहही प्राप्त झाला, व तेथपासून त्या मुलाचें नांव 'निरंजन' स्वामी हें सर्व प्रसिद्ध झालें.

**राजेश्रींची कर्नाटकांतील दुसरी सफर**—शिवाजी महराजांच्या मनांत पुन्हा एकदां कर्नाटकच्या स्वारीस जावयाचें आलें. म्हणून ते समर्थांचा निरोप घ्यावयास परळीस आले, आणि समर्थांची पूजा वगैरे करून निरोप मागितला. तेव्हां समर्थांनीं "जावें, व यश घेऊन लौकर परत यावें." अशी आज्ञा केली. नंतर राजश्रींनीं सर्व कारभाऱ्यांस आज्ञा केली कीं, "मठाकडे कोणतेही जिन्नस लागोत, ते अवकाश न करतां पुरवावेत. निसबतीस शागीर्द वगैरे आहेत त्यांचा बंदोबस्त नीट ठेवावा." नंतर राजश्रींनीं समर्थांची प्रार्थना केली कीं "शरिरास वृद्धपण आलें आहे. तरी कृपा करून आतां पर्यटण करूं नये. जाणेंच असेल तर निदान सरंजाम तरी घेऊन जात जावें." समर्थ म्हणाले "बरें बापा ! तुझी मर्जी."

ह्याप्रमाणें निरोप घेऊन राजश्री कर्नाटकांत गेले. तेथील जे पाळेगार शरण आले त्यांजपासून खंडणी घेण्याचें ठरवून, शरण न येणारांस करावयाचें तें शासन करून सोदस येथें जाऊन छावणी देऊन राहिले. वेरूळचा किल्ला बांधून त्यावर रघुनाथराव हनमंते यांस अधिकारी नेमले. नंतर स्वारी श्रीशैल्य मल्लिकार्जुनाच्या दर्शनास गेली, आणि पाताळगंगा व कदलीवन ह्या रमणीय स्थळांत वास्तव्य करून अनेक प्रकारचा दानधर्म केला. तेथें महिना पंधरा दिवस मुक्काम पडला होता. कदलीवनांतील

एकांत स्थान, रमणीय सृष्टीसौंदर्य वगैरे पाहून शिवाजी महाराजांस एकदम उपरति झाली, आणि त्यांनीं अकस्मात् कारभाऱ्यांस हाक मारून आज्ञा केली कीं "तुम्ही सारें सैन्य घेऊन परत जावें, मी येथेंच राहून देहसार्थक करणार. तुम्ही उभयतां पुत्रांचें संरक्षण करून समर्थांच्या आज्ञेंत वागावें. माझ्या हातानें जेवढी सेवा झाली तेवढी पुरे." शिवाजी महाराजांच्या मनांत असा हा विलक्षण व एकाएकीं बदल झालेला पाहून कारभारी मंडळीस अत्यंत वाईट वाटलें. त्यांत किती एक सुज्ञ व चतुर होते, त्यांनीं हात जोडून नम्रपणें विनंति केली कीं "महाराज! आम्ही तर बोलून चालून सेवक. केवळ अज्ञान; तथापि अर्ज करतों ह्याची क्षमा असावी. आमचा अर्ज इतकाच कीं, मातापितरांची सेवा सोडून सरकार परमार्थ साधन करणार हा धर्म कोणता!" महाराज म्हणाले "वासना झाली ती समर्थांच्या इच्छेनें झाली." कारभारी म्हणाले "महाराज म्हणतात ती गोष्ट सत्य आहे. परंतु आमच्या अंतःकरणांतही त्यांचेंच वास्तव्य आहे. ह्यास्तव आम्हास बुद्धि सुचते तीही त्यांचीच." ह्याप्रमाणें बरीच भवति न भवति झाली. पण शिवाजी महाराज कांहीं ऐकेनात. तेव्हां रघुनाथरावांनीं हात जोडून विज्ञाप्ति केली कीं, आतां एक तरी विनंति ऐकावी. ती येवढीच कीं "महाराजांनीं देवीची प्रार्थना करावी आणि आज्ञा होईल त्याप्रमाणें करावें." तेव्हां शिवाजी महाराज म्हणाले "फार उत्तम आहे. तुम्ही मला वडिलांप्रमाणें पूज्य आहां. तुमचें ऐकलें पाहिजे." असें म्हणून देवीची प्रार्थना केली. तेव्हां नेहेमींप्रमाणें महाराजांच्या अंगांत संचार झाला. आणि जी आज्ञा झाली ती कारभाऱ्यांनीं लिहून ठेवली. ती अशी होती. "राजश्रींनीं तपश्चर्येच्या भरीस पडूं नये; देशीं जाऊन सिंहासनारूढ व्हावें, आणि समर्थांच्या आज्ञेप्रमाणें चालावें. ह्या छत्रपतीच्या कुळामध्यें २२ पुरुष होतील. व त्यांचा शक १००० वर्षेंपर्यंत चालेल. सत्ताविसावा पुरुष जन्मांध होऊन त्याचें राज्य जाऊन शक मात्र राहील."

ही आज्ञा शके १५९५ चैत्र वद्य १३ स झाली. तेव्हां तीच प्रमाण मानून हणमंते यांस फौज व वस्त्रें देऊन तेथें ठेवलें. आणि राजेश्री आपल्या इतमामासह स्वदेशीं परत येऊन समर्थांच्या दर्शनासाठीं चाफळास गेले.

आणि तिकडील सर्व हकीकत समर्थांस श्रुत केली. त्यावर समर्थांची आज्ञा झाली कीं, "शास्त्री आणवून गागाभटास बोलावणें पाठवून राज्याभिषेक करवावा. तुमची तपश्चर्या करणारे करीतच आहेत." ह्यावर 'आज्ञेप्रमाणें करतों' असें सांगून शिवाजी महाराज प्रतापगडास जाऊन नंतर रायगडीं गेले.

**मठांत चोर !**—मठ हें खरोखर विरक्ताचें राहण्याचें ठिकाण. तेथें चोरावयास मिळणार काय? असें सहजीं मनांत येतें. परंतु समर्थांसारखे महंत जेथें वास्तव्य करतात तेथें शेंपन्नास मनुष्यांचा तरी शिष्यसमुदाय ही जमतोच. आणि समुदाय म्हटलें कीं तेथें नको काय? सारेंच लागतें. वस्त्र, पात्र, भांडींकुंडीं, सर्व कांहीं लागतें. कारण कोणी केवढाही विरक्त असो, पोट कांहीं कोणाला सुटत नाहीं. अशीच अवस्था समर्थांची झाली होती. समर्थ नेहमीं कड्यावर, पर्वतावर, रानांत वनांत राहत, तरी त्यांचा शिष्यसमुदाय मठांत असे. त्याकरितां बाकी कांहीं नसलें तरी कांहीं वस्त्रेंपात्रें व भांडीकुंडीं तरी लागत, तसेंच देवाचें आरती दुपारतीचें सामान, उपकरणीं, मूर्ति वगैरे तरी मठांत असतच. चोरांना काय येवढें सामान मिळालें तरी पुरे असें वाटे. शेंपन्नास चोरट्यांनीं एक वेळ पाळत राखून परळीच्या मठांत चोरी करावयाचा बेत केला, आणि रात्रीच्या वेळीं संधि साधून बऱ्याच सामानासुमानाची लांबवालांबव केली. त्याची चाहूल लागतांच मठांतील शिष्यमंडळीं जागीं होऊन गडबड करूं लागलीं. ती ऐकून समर्थ म्हणाले "बाबा, रिकामी गडबड कां करतां? आम्ही बोलून चालून गोसावी. चोरटे येऊन गोसाव्याचे नेणार काय?" शिष्यमंडळी म्हणाली "पण ही तरी आज्ञा कशी? देवाच्या वस्तू तरी फुकटच्या फाकट चोरांना काय म्हणून द्यावयाच्या?" समर्थ म्हणाले "तुम्ही देवाचे, आणि चोर देवाचे नाहींत काय? तेही देवाचेच आहेत. ह्याकरितां तुम्ही कोणीही त्यांच्या वाटेस जाऊं नये." ही आज्ञा ऐकून साऱ्यांचाच उपाय खुंटला. सर्व मंडळी स्तब्ध होऊन बसली. चोरांनीं साऱ्या जिनसांच्या सावकाश मोटा बांधल्या आणि तो सारा ऐवच घेऊन गेले. नंतर सर्वांनीं समर्थांची समजूत घातली कीं, इतका ऐवज त्यांस घेऊन जाऊं देणें हें बरोबर नाहीं. त्याला कांहीं तरी प्रतिबंध

करावा. अशी सर्वांचीच भीड पडली तेव्हां समर्थांनीं कल्याणास आज्ञा दिली कीं. "त्यांस पीडा न देतां काय करणें तें करा." इतकी पडत्या फळाची आज्ञा मिळतांच हातांत एकेक फोकाटी घेऊनच मंडळी धांवत सुटली. त्यांनीं त्या चोरांस खिंडींत गांठलें आणि त्यांच्या जवळच्या सार्‍या मोटा हिसकाऊन घेऊन त्या सार्‍या धुन्हा मठांत आणून टाकल्या. आणि समर्थांस झालेला सर्व मजकूर निवेदन केला. समर्थांनीं विचारिलें "बाबांनो ! त्या चोरांना मारलें तर नाहींना ?" कल्याण स्वामी म्हणाले "नाहीं, मारले नाहीं. त्यांस एक रेषा काढून देऊन त्याच्या आंत त्यांस उभे केलें. आणि ती रेषा उजाडेपर्यंत कोणीं ओलांडूं नये अशी ताकीद दिली आहे."

तिकडे चोरांनीं विचार केला कीं, ही रेषा ओलांडली म्हणून काय होणार आहे ? आपण जावें पळून म्हणजे झालें. म्हणून ते चोर त्या रेषेच्या बाहेर पडले. तोंच त्यांस दिसेनासें होऊन ते सारे आंधळे झाले. मग उजाडल्यावर कल्याणांनीं सर्वांस आणून समर्थांच्या चरणावर घातलें. तेव्हां ते चोर अत्यंत दीनवाणीनें समर्थांची प्रार्थना करूं लागले. समर्थांनीं त्यांच्या नेत्रावरून माळ फिरवितांच त्यांचे नेत्र पूर्ववत् झाले ! नंतर समर्थांनीं कल्याणास सांगितलें कीं, "या सर्व चोरांस भोजन घाला." त्याप्रमाणें सर्वांस भोजन घातलें. आणि त्यांचीं वस्त्रें, हत्यारे वगैरे त्यांस देऊन त्यांस निरोप दिला. त्या वेळीं चोरांनीं दंडप्राय भूमीवर पडून समर्थांची प्रार्थना केली कीं, याउपर आम्हांस अशी चोरी करण्याची बुद्धि देऊं नये समर्थांनींही अशी बुद्धि पुनरपि तुम्हांस होणार नाहीं असा आशिर्वाद दिला. आणि मग ते सारे लोक आपआपल्या घरीं निघून गेले.

**समर्थांचा बोका राम**—परळीस समर्थांनीं एक बोका बाळगला होता, त्यास ते राम म्हणत. त्याला दररोज तूपभात, दूधभात, दहींभात घालावयाचा, व त्याची एक वाटी केलेली असे, त्यांतून त्याला पाणी पाजावयाचें आणि 'रामा ! तूं तृप्त झालास ना ?' म्हणून विचारावयाचें आणि मग आपण जेवावयाला बसावयाचें असा समर्थांचा नित्य परिपाठ असे. असें आयतें जेवण मिळत असल्यामुळें त्या बोक्याचा कापूसही चांगलाच स्वस्था झालेला होता. तो सार्‍या स्वयंपाक घरांतून वावरे आणि

कोठें दूधदूभतें सांपडलें कीं, तें पार करून टाकी. म्हणून त्यांनीं उंच उंच शिंकीं केलीं. तरीही तो त्यावर उड्या मारून जाई आणि लोणीं, तूप सारें खाऊन टाकीत असे. यामुळें सारी मंडळी त्या बोक्यावर त्रासली व एके दिवशीं साऱ्यांनीं मिळून त्याची खोड मोडण्याकरितां त्याला धरून त्याच्या डोळ्यांत तिखट कोंबलें! त्यामुळें त्याच्या डोळ्यांची आग होऊन तो कोठें एका कोपऱ्यांत छपून बसला तो बाहेरच पडेना.

समर्थांनीं नित्य सांप्रदायाप्रमाणें भोजनास बसते वेळीं 'रामा! ये' म्हणून हाक मारली, परंतु तो बोका येईना. तेव्हां आज राम कोठें गेला, चौकशी करा म्हणून शिष्यमंडळीस आज्ञा केली. बरीच मंडळी शोधावयास लागली, परंतु बोका कोठें सांपडेना. 'रामाला' आधीं तृप्त केल्याशिवाय आपण जेवावयास बसावयाचें नाहीं, हा तर समर्थांचा प्रत्यहींचा नियम. बोका कोठें सांपडेना, समर्थ कांहीं जेवावयास बसेनात; असा बराच वेळ गेला. समर्थ तर त्यास आणण्याविषयीं घाई करूं लागले. ते म्हणाले "आज राम ज्याअर्थीं येत नाहीं, त्याअर्थीं त्यास कोणी तरी त्रास दिला असावा खास." पण त्यावर कोणीच कांहीं उत्तर देईना. तेव्हां त्यांनीं युक्तिप्रयुक्तिनें आडवेतिडवे प्रश्न करून ती गोष्ट बाहेर काढली. तेव्हां समजलें कीं, त्यानें दूधदुभतें खाल्लें म्हणून कोणी त्याच्या डोळ्यांत आज तिखट घातलें! तें सारें ऐकून घेऊन समर्थ शिष्यमंडळीस व शागीर्द मंडळीस अनुलक्षून म्हणाले "तुम्हीं तेवढे देवाचे, व देवाचें खाणारे; आणि तो कोणी चोर आहे कीं काय? सारे जीव रघुपतीचेच आहेत. ह्याकरितां अंतःपर कोणी त्यास उपद्रव देऊं नये." इतक्यांत साऱ्या किल्ल्यावर शोधून तो बोकाही एकानें आणून समर्थांपुढें ठेवला. त्याचे डोळे त्यांनीं आपल्या हातानें पुसले, त्यास तूप लावलें व नित्याप्रमाणें त्यास जेवावयास घालून, पाणी पाजून 'रामा! तृप्त झालास ना?' असें विचारून मग स्वारी भोजनास बसली. ह्यावरून समर्थांच्या अंतःकरणांत भूतदया कशी जागृत होती हें स्पष्ट होतें.

---

# श्रीमच्छत्रपति शिवाजीमहाराज ह्यांचा राज्याभिषेक.

शके १५९६ हें साल समर्थांच्या लीलेंत व तपांतच अत्यंत महत्त्वाचें आहे असें नाहीं, तर तें अखिल महाराष्ट्रीयांसही तसेंच चिरस्मरणीय आहे. कारण, पारतंत्र्याचा गर्द अंधार कमी कमी होत होत अखेर स्वातंत्र्याचा सर्वांस सुखकर असा सूर्योदय झाल्याचा सोन्याचा दिवस ह्याच वर्षांत उगवला. शिवाजीमहाराजांनीं महत्प्रयासानें स्वराज्यरूप आम्रतरूचा जो रोपा रुजत घातला, त्याला मोहोर येऊन अमृतफलें दिसून त्याच्या परिपक्क फलांचा खरा खरा रसास्वाद चाखावयास मिळाला, तो ह्याच वर्षांत मिळाला. तेव्हां त्या वर्षाचें भाग्य काय सांगावें ? इतिहासामध्यें हें वर्ष खरोखरच सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखेंच आहे. शिवाजी महाराजांचें हळुहळू बस्तान बसत चाललें. त्यांनीं एकामागून एक बादशाही किल्ले बळकावले; देवीनें द्रव्यानें भरलेले रांजणाच्या रांजण त्यांच्या हवालीं केले. अफजुलखानासारख्या मी मी म्हणविणाऱ्या सरदारांचा मागमूस नाहींसा केला. विजापूरच्या बादशहाचें व दिल्लीच्या बादशहाचें कांहीं चालेनासें झालें. तेव्हां मात्र शिवाजीमहाराजांचें स्वराज्य ‘ अकुतोभय ’ झालें. आतां स्वराज्याचे प्रभु म्हणून विधिपूर्वक पट्टाभिषेक करून घेणें उक्त अशी कल्पना मनांत उद्भवणें साहाजिकच आहे. मातोश्री जिजाबाईची संमति तीच पडली; समर्थांची आज्ञाही तशीच झाली, व देवीचा साक्षात्कार तर पूर्वीच झाला होता. ह्यास्तव तेंही एक महत्कार्यच आहे, तें उरकून घ्यावें असें शिवाजी महाराजांच्याही मनांत आलें. म्हणून त्यांनीं समर्थांच्या आज्ञेप्रमाणें गागाशास्त्र्यास बोलावून आणण्याची तयारी केली. समर्थांचा शिवाजी महाराजांनीं अनुग्रह घेतला व ते त्यांच्या आज्ञेनुसार वागूं लागले, हें गागाशास्त्र्यांना बरें

वाटलें नाहीं, म्हणून ते रुसून पैठणास जाऊन राहिले होते. ते बोलावलें तरी येईनात. तेव्हां त्यास बोलावावयास कोणी तरी चांगलेच मनुष्य पाठविले पाहिजेत म्हणून महाराजांनीं बाळाजी आवजी चिटणीस ह्यांचे आश्रित सोमेश्वर भट्टजी व भालचंद्र भट्टजी पुरोहित या दोघांस पालखी वगैरे देऊन गागाशास्त्री यांस आणावयास पाठविलें. पण त्यांनीं प्रथमतः तर असा हट्ट घेतला होता कीं, "आम्हांस रामदासस्वामींनीं बोलाविल्यावांचून आम्ही येणार नाहीं." परंतु गेलेले मनुष्य फार सुज्ञ होते, त्यांनीं त्यांची समजूत घातली कीं "समर्थांचा कोणत्याच भूतमात्राशीं द्वेष नाहीं. ते आपली वारंवार आठवण काढीत असतात. त्यांच्या आज्ञेवरूनच महाराजांनीं आम्हांस पाठविलें आहे." अशी समजूत घातली तेव्हां ते निघून रायगडास आले. शिवाजी महाराजही त्यांस दूरपर्यंत सामोरे जाऊन त्यांस घेऊन आले. नंतर महाराज व गागाभट्ट हे उभयतां समर्थांच्या दर्शनासाठीं परळीस गेले तेव्हां समर्थांनीं शास्त्रीबुवांस सांगितलें कीं, "राजेश्रीस सुमुहूर्तानें राज्याभिषेक करावा."

त्याप्रमाणें शास्त्रीबोवा व राजेश्री रायगडास जाऊन राज्याभिषेकाची सर्व तयारी केली, आणि मुहूर्ताचा निश्चय केला. आणि सर्व सिद्धता झाल्याबद्दल समर्थांस येऊन श्रुत केलें. तें ऐकून समर्थांनीं संतोष व्यक्त केला. तेव्हां शिवाजी महाराजांनीं पुन्हा समर्थांपाशीं गोष्ट काढली कीं, "ह्यावेळीं एक मागणें आहे, तें समर्थांनीं देतों म्हटल्यास मागेन." समर्थ म्हणाले "इतकें कठीण काय आहे.?" त्यावेळीं महाराजांनीं विनंति केली "कृपा केल्यावर कठीण असें कांहींच नाहीं." तेव्हां समर्थ म्हणाले "ठीक आहे. काय तें सांगावें." त्यावेळीं महाराजांनीं विनंति केली "समर्थांनीं यावेळीं जटाभार उतरावा अशी इच्छा आहे." समर्थ म्हणाले "शिवबा, हें काय मागणें मागितलें? व्रताच्या नेमांत अंतर पाडावें हा धर्म कोणता?" राजश्रींनीं विनंति केली "महाराज! अशा प्रकारच्या युक्तीप्रयुक्त्या काढून मजला ठकवूं नये. भक्तांनीं देवापाशीं आपल्यास इच्छित असेल तें मागावें व देवांनीं भक्ताच्या मनांतील हेतु पूर्ण करावे, हा धर्म होय. ह्याकरितां स्वामींनीं कृपा करून मजला येवढें देणें दिलेंच पाहिजे." म्हणून राजेश्रीनीं बहुत प्रकारें

विनंति केली. त्यांजवरून " बरें, तुझी मर्जी. " असें म्हणून स्वामींनीं विनंति मान्य केल्यावरून महाराजांनीं मोठ्या समारंभानें जटाभार उतरून समर्थांस विधिपुरस्सर मंगलस्नान घालून सिंहासनावर बसवून छत्रचामरें वगैरे सर्व राजचिन्हें अर्पण करून ब्राह्मणभोजनाचा समारंभही मोठा केला. दानधर्मही यथेच्छ करण्यांत आला. नंतर कांहीं दिवस राहून परत जातांना समर्थ म्हणाले " आतां कोणत्याही गोष्टीविषयीं संशय मनांत न आणतां शास्त्रीबोवांच्या विचारें कार्य शेवटास न्यावें." "आज्ञा" म्हणून राजेश्री निरोप घेऊन गेले.

राज्याभिषेकाचा मुहूर्त शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध १३ स धरला होता. ह्या समारंभ फार अपूर्व झाला. ३२ मण सुवर्णाचें जडावाचें तख्त; मोत्यांच्या झालरीचें सुवर्ण दंडाचें छत्र; अष्टप्रधान उभे राहावयाला रत्नजडित अष्टस्तंभ इत्यादि वस्तु केवळ अप्रतिम होत्या. सप्त महा नद्यांचीं तीर्थें, समुद्रोदक इत्यादि आणवून सर्व तयारी जय्यत केली होती. सर्व संस्कारांचे मुख्य अध्वर्यु गागाशास्त्री होते. त्यांनीं प्रथमतः राजांचा व्रतबंध संस्कार करून नंतर पट्टाभिषेक संस्कार केला. समर्थ व गागाशास्त्री ह्यांनीं प्रसाद वगैरे देऊन आशिर्वाद दिला. ब्राह्मण-भोजनाचा रामरगाडा सुरू होता. सरसकट सर्वांना चंदी, वैरण, शिधा—तूपसाखरेचा एक महिनाभर चालू होता. ह्या समारंभास एकंदर खर्च १ कोटि ४२ लक्ष होन झाल्याचा दाखला आहे. *

---

* ह्या स्वराज्यस्थापनेच्या वेळच्या सांपत्तिक स्थितीची थोडीशी तरी कल्पना व्हावी म्हणून त्या दिवशीं भांडारखान्यांत शिल्लक किती होती त्याची संक्षिप्त यादी देतोः—

६८ लक्ष होन शिल्लक; व १२॥ खंडी सोन्याच्या कांबी !

३४ लक्ष चांदीचीं नाणीं; व ५० खंडी चांदीचा पत्रा !

एकंदर सैन्य १०५००००

हत्ती, हत्तिणी व छावे मिळून १२६०

आरमारें ५००

उंट, उंटिणी, पिलें १५८४

ह्याच दिवसापासून शक व नाणीं हीं चालू झालीं. सर्व समारंभ आटोपल्यावर राजश्री उभयतां पुत्र, कुटुंब व अष्टप्रधान ह्यांसहवर्तमान परळीस समर्थांच्या दर्शनास गेले. आणि समर्थांची पुन्हा पूजा केली. राजाचिन्हें पूर्वींच समर्थांस अर्पण केलेलीं असल्यामुळें त्यावेळीं कोणतेंही राजचिन्ह धारण केलें नाहीं. नंतर समर्थांकडील नेमणुकीची व्यवस्था करून बंदोबस्ताकरितां मनुष्यांची नेमणूक केली तीः—

**कामदाराचें नांव** **काम.**

१ **रामचंद्र नीळकंठ अमात्य**—समर्थांच्या संस्थानचा बंदोबस्त राखणें.

२ **बाळाजी आबाजी चिटणीस**—कोठी, पागा, पीलखाना इ० सर्व खर्चाचा बंदोबस्त करणें.

३ **अण्णाजी दत्तो**—समर्थांची स्वारी बाहेर निघाली म्हणजे वातमी येऊन बंदोबस्त ठेवावा.

४ **कोंडो नारायण वांकनीस**—वांकनीशीचें काम पहावें.

५ **मुख्य प्रधान मोरो पंडित**—किर्तनानंतर खिरापत वांटणें.

६ **नवमीचे दिवशीं**—मठाचे कारभारी येऊन दक्षणा वांटावी.

७ **रामचंद्र पंडित**—बैठकीची तयारी.

८ **राजेश्रीनीं**—समर्थ सभेंत बसले म्हणजे उजवे बाजूस उभे राहून समर्थांवर मोरचल धरावें.

९ **रामचंद्र पंडित**--डावे बाजूस मोरचले व शागीर्द पेशाची व्यवस्था ठेवणें-

१० **अण्णा पंडित सचीव**—ब्राह्मणांस भोजन दक्षणा; पत्रावळी; सडासंमार्जन; छबिन्याची तयारी व कीर्तनाची बैठक वगैरे कामें करणें.

११ **दत्तो पंडित**—बुक्का लावणें व वाढण्याचा बंदोबस्त.

१२ **कोंडो नारायण**—दिनचर्येची बातमी राजश्रींस लिहून कळवावी.

१३ **जनार्दन पंडित सुमंत**—ब्राह्मणास विडे द्यावें.

१४ **बाळाजी पंडित न्यायाधिश**—पाकशाळेंतील सडासंमार्जन करविणें व पाणके यांचा बंदोबस्त.

१५ **रघुनाथराव पंडित**—ब्राह्मण, शूद्र इ० दर्शनास येतील त्यांचा आदरसत्कार करणें व मठाच्या कारभाऱ्याच्या संमतीनें संभावना करणें.

१६ **सेनापति बहिरराव मोहिते**—छबिन्याबरोबर दारूचा बंदोबस्त व कीर्तन समयीं उजवे बाजूस पंखा.

१७ **प्रतापराव गुजर परळीकर**—डावे बाजूस पंखा.

१८ **मुरारजी व महादजी खासनवीस**—श्रींचें जवाहीर वगैरे समर्थांस आणून देणें इ०

१९ **बाळाजी आवजी चिटणीस**—संस्थानसंबंधीं जमाखर्च श्री समर्थांचे व राजेश्रींचें आज्ञेप्रमाणें ठेवणें.

२० **राजेश्री**—पहांटेस उठून मठाचे सडासंमार्जन आंगीं करावें व सर्व कामांवर देखरेख व छबिन्याचे मागें चालणें.

२१ **रामचंद्र पंडित अमात्य**—रथाचे दिवशीं सोन्याची काठी घेऊन उजवे बाजूस चालणें.

ह्याप्रमाणें उत्सवांतील वगैरे व्यवस्था लावून राजेश्रींची स्वारी परत गेली. शके १५९६.

**दक्षणेचे दगड**—शके १५९७ मध्यें कपिलाषष्टीचा योग आला होता. कपिलाषष्ठी म्हणजे महापर्वणींतील पर्वणी म्हणून शिवाजीमहाराज व समर्थ उभयतांही संगम माहुलीवर स्नानास जाऊन स्नान करूं लागले. कोणत्याही क्षेत्रामध्यें पहा, तीर्थांत स्नानास उतरण्याचा अवकाश कीं ‘ गंगा गंगेतियो ब्रूयात् ’ ह्या संकल्पाचा चहूंकडून सारखा मारा सुरूं होतो. येथें संकल्प सांगणारे ब्राह्मण इतके विपुल व उतावळे असतात कीं, सांगतां सोय नाहीं. त्याप्रमाणेंच समर्थ स्नानास नदीमध्यें उतरतांच दहा वीस ब्राह्मणांनीं संकल्प सांगण्याचा समर्थांवर एकच गहजब करून सोडला ! समर्थ सारे संकल्प मुकाट्यानें ऐकून घेत होते. स्नान आटोपल्यानंतर ते संध्या ब्रह्मयज्ञ करूं लागले. शिवाजीमहाराज आधींच कांहीं कामानिमित्त निघून गेले होते. समर्थांचें सर्व आन्हिक उरकल्यानंतर तेही जावयास निघाले. तेव्हां तेथील संकल्प सांगणारे ब्राह्मण एकत्र होऊन समर्थांपाशीं आले त्यांनीं त्यांस विनंति केली कीं, “ आज कपिलाषष्ठीची पर्वणी आहे; आपण राजगुरु आहांत; तरी ब्राह्मणांना कांहीं तरी दक्षणा मिळावी.” समर्थांनीं वाळवंटांतील लहान लहान दहा वीस गोटे जमा करून घेतले आणि त्यांपैकीं एक एक गोटा एक एका

ब्राह्मणांच्या हातावर ठेवून त्यांस नमस्कार केला! हें समर्थांचें कृत्य तेथील ब्राह्मणांस अत्यंत तिरस्कार्य वाटलें असेल हे सांगणें नकोच बहुतेकांनीं कपाळाला आठ्या घातल्या, नाकें मुरडलीं आणि ते दगड फेकून दिले! पण त्यांत एक म्हातारा ब्राह्मण मोठा भावार्थी होता. त्यानें तो दगड फेकून दिला नाहीं, तर समर्थ हे एक महासत्पुरुष आहेत, त्यांच्या हातून आलेला दगड तोही पवित्रच होय, ह्यास्तव तो देव्हाऱ्यांत ठेवून त्याचीही शाळीग्रामाप्रमाणें पूजा करावी. अशा इराद्यानें त्यानें तो समर्थांनी दिलेला दगड आपल्या धोतराच्या एका पदरांत बांधून ठेवला.

ज्या धोतराच्या पदरांत तो दगड बांधला होता, तें धोतर त्या ब्राह्मणानें विस्मरणानें बायकोपाशीं धुवावयास दिलें. बायको तें नदीवर घेऊन गेली पण धुतांना पहाते तों त्यांत कायसेसें जड आहे म्हणून तिनें तो पदर सोडून पाहिला तों आंत एक सुवर्णाचा गोळा! तो पाहून ती अगदीं आश्चर्यचकित झाली, व तिनें तो दगड म्हणजे सोन्याचा गोळा नवऱ्यापाशीं नेऊन दिला. नवऱ्यानें तो पहातांच त्याला आनंद झाला. त्यानें तो सोन्याचा गोळा नेऊन साऱ्या ब्राह्मणांस दाखविला, व झालेली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून दगड फेकून देणाऱ्या साऱ्याच ब्राह्मणांना अत्यंत खेद झाला. ते आपआपलीं कपाळें बडवून घेऊन रडूं लागले.

मग ते सारे ब्राह्मण एकत्र होऊन त्यांनीं निश्चय केला कीं, आतां फिरून आपण नदींतील गोटे घेऊन परळीस समर्थांकडे जाऊं या, व त्यांस हस्तस्पर्श करण्याविषयीं प्रार्थना करूं या. म्हणजे त्यांच्या हाताच्या स्पर्शानें सारे दगड सोन्याचे होतील. आपण त्यांनीं दिलेले पाहिले दगड फेकून दिले याबद्दल क्षमा मागू या म्हणजे झालें.

असा निश्चय करून ते ब्राह्मण नदीवरील वाळवंटांत जाऊन तेथील दगडाचे गोटे आपआपल्या धोतरांत बांधून तें गाठोडें आपल्या मस्तकावर घेऊन परळीस निघाले. सज्जनगडावर जाऊन पोंचलें आणि महाद्वारावर पहारेवाले होते त्यांच्या हातीं समर्थांस सांगून पाठविलें कीं, आम्ही माहुलीचे ब्राह्मण आपल्यास भेटावयासाठीं आलों आहोंत. पहारेकऱ्यांनीं जाऊन समर्थांस वर्दी दिली कीं, माहुलीचे ब्राह्मण डोक्यावर

दगडांचीं ओझीं घेऊन परम संकटानें आपल्यां दर्शनास आले आहेत. हें ऐकून समर्थ म्हणाले "ब्राह्मणावर असा काय प्रसंग आहे कोण जाणे!" म्हणून ते स्वतः धांवतच द्वारापाशीं आले. पहातात तों दगडांचीं ओझीं घेऊन ब्राह्मण दारांत उभे! नंतर आपल्यावर काय संकट आहे म्हणून समर्थांनीं त्या सर्वांस विचारलें. तेव्हां त्यांनीं दगडाचा झालेला सर्व वृत्तांत निवेदन केला, व आतां सर्व अपराधांची क्षमा करून आणलेल्या दगडांस आपण स्पर्श करावा म्हणून समर्थांची प्रार्थना केली. ती सर्व ऐकून समर्थ हासले आणि म्हणाले "बापा! कालची वेळ कोठें आज येते काय? काल कापिलाषष्ठी होती, आज कोठें आहे? काल महापर्वणी होती, आज कोठें आहे? ह्याकरितां कालचा योग काल केला. असो. आतां आपण सर्वांनीं आंत चलावें." असें म्हणून त्यांनीं त्यांस मठांत नेलें स्नानें वगैरे करवून त्यांची सुग्रास अन्नाचीं भोजनें वगैरे झालीं. समर्थांनीं प्रत्येक ब्राह्मणास एक एक रुपया दक्षणा दिली. पण निरोप देते वेळीं त्यांनीं दगडाबद्दल फारच गळ घातल्यावरून समर्थांनीं त्या सर्व ब्राह्मणांस आज्ञा केली कीं, "आपण जातांना उरमोडींतील दगड एक एका बचकेंत मावतील तेवढे घेऊन घरीं जा. म्हणजे रघुपति तुमचे मनोरथ पूर्ण करील." त्याप्रमाणें ते ब्राह्मण समर्थांचा निरोप घेऊन निघाले व जातांना त्यांनीं समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें उरमोडींतील गोटेही आपल्याबरोबर नेले, व ते पुढें सोन्याचे झाले असेंही बखरींत लिहिलें आहे.

प्रारब्धाची परीक्षा—समर्थांची शिष्यमंडळी वेळ मिळाला म्हणजे पारमार्थिक विषयावर कांहींतरी प्रश्न करीत असत, व समर्थही त्यांचीं यथायोग्य अनुभवसिद्ध उदाहरणें देत असत. एके दिवशीं बोलतां बोलतां असा विषय निघाला कीं, "मनुष्याला सुखदुःख म्हणून जें प्राप्त होतें तें प्रारब्धानें प्राप्त होतें कीं प्रयत्नानें प्राप्त होतें? ह्यावर समर्थ म्हणाले "बापा! प्रयत्न हा विषय अगदीं पृथक् आहे. प्रयत्न करा कीं नका करूं; प्रारब्धयोग हा प्राप्त होतोच होतो." कल्याण म्हणाले "महाराज! प्रारब्धयोग हा प्रयत्नानें प्राप्त होणें संभवनीय आहे. परंतु प्रयत्नाशिवाय प्रारब्धयोग कसा काय येईल?" समर्थ म्हणाले "ही गोष्ट अनुभवानेंच प्रत्यक्ष दाखवूं." ह्या गोष्टीस बरेच दिवस गेल्यानंतर एके दिवशीं समर्थ म्हणाले

" कल्याणा ! रंगोबास भेटून फार दिवस झाले, आज जाऊं या त्याच्या भेटीला." असें म्हणून पायांत पादुका, गळ्यांत मेखळा, जटेवरून रुमाल, हातांत तुंबा व काखेंत कुबडी; कल्याण गोसावी ह्यांच्या गळ्यांत मेखळा, काखेंत झोळी व समर्थांचें पूजासाहित्य, अशा तयारीनें निघाले. ते वर्घ्याचे खिंडीपर्यंत गेले. तों तिकडून रंगनाथस्वामीही समर्थांच्या दर्शनास निघाले होते. त्यांचा नेहमींच सरदारी बाणा. पंचहत्यारें, शिरपेंच, तुरा इत्यादि आभरणांनीं युक्त असून घोड्यापुढें दहापांच शिष्य धांवत असावयाचे. अशा थाटानें स्वारी समोरून येत होती. तों मार्गामध्यें समोरून समर्थ व कल्याणस्वामींस येतांना पाहतांच घोड्यावरून खालीं उतरून, समर्थांस साष्टांग नमस्कार घालून पायीं चालत चालले. रंगोबा आला असें पाहून समर्थही लौकर लौकर पुढें चालले. कोंडमाळावर उभयतांची गांठ पडली. समर्थ म्हणाले " रंगोबा ! आम्ही तुझ्याच दर्शनासाठीं येत होतों." रंगनाथस्वामी म्हणाले " आपणास इच्छा झाली आणि इकडील इच्छाही आपल्याच स्वाधीन. म्हणून तिनें आम्हालाही ओढून आणलें."

असें म्हणून उभयतांही तेथेंच माळावर बसले व इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलूं लागले. त्यांत समर्थांनीं असा एक प्रश्न केला कीं " रंगोबा ! तूंही गोसावी आणि मीही गोसावी. असें असतां तुझा व्यवहार असा कां ? आणि आमचा व्यवहार असा कां ? तुला हा पोषाख, दागदागिने हत्यारें आणि घोडा; आम्हाला नुसती लंगोटी ! असें कां ?" रंगनाथस्वामी म्हणाले " ही आपलीच इच्छा. मला ह्याचें कारण नाहीं, आणि इच्छाही पण नाहीं, हें आपणांसही विदित आहेच. आपल्याच इच्छेप्रमाणें मी असा फिरतों." समर्थ म्हणाले " तर मग तूं आमच्या इच्छेनें चलतोस म्हणावयाचा ?" रंगनाथस्वामी म्हणाले " ह्यांत संशय तो कसला ?" समर्थ म्हणाले " बरें तर. आमची इच्छा अशी आहे कीं, तूं आज येथेंच कोंडमाळावर मुक्काम करून भोजन करावें. रात्रच्याराव येथें राहून सकाळीं निघून जाऊं. मी व कल्याण वसऱ्यास जाऊन भिक्षा घेऊन येतों. तोंपर्यंत तूं आपल्या मंडळीसहवर्तमान येथें बैस." " आज्ञा " असें म्हणून रंगनाथस्वामींनीं घोडा बांधून ठेवून कंठाळ लावावयास सांगितली.

आपण स्वतः उन्हांतच बसले. शिष्यमंडळी पाण्याच्या शोधास गेली, व त्यांनीं पाणी आणून ठेवलें.

समर्थ कल्याणस्वामींना घेऊन आसपासच्या गावांत भिक्षेला निघून गेले. इतक्यांत त्याच मार्गानें रामचंद्रपंत अमात्य यांची स्वारी पन्हाळा विशाळगडाकडे चालली होती. त्यांनीं असल्या रखरखीत मैदानांत, पाण्याचा कोठें टिपूसही नसतां येथें कोण उतरलें आहे, हें पाहून येण्यासाठीं हलकारें पाठविले. त्यांनीं शोध करून सांगितलें कीं, रंगनाथस्वामी निगडीकर उतरले आहेत. हें ऐकून पंत अमात्यांनीं विचार केला कीं, अशा ठिकाणीं रंगनाथस्वामी उतरण्याचें कारण काय असावें ? त्याबद्दल जवळ जाऊन शोध तरी करावा. म्हणून स्वामींच्या जवळ जाऊन चौकशी केली. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "समर्थ व कल्याणस्वामी बसऱ्यांत भिक्षेसाठीं गेले आहेत, त्यांच्या आशेवरून येथें बसलों आहोंत." हें ऐकून अमात्यसाहेबांनीं विचार केला कीं, कृष्णा वेण्णेच्या संगम आहे. अनायसें स्नान घडेल, व समर्थांचें दर्शनही घडेल. तर आजची रात्र येथेंच मुक्काम करून उदईक पुढें जाऊं. हा विचार मनांत येतांच त्यांनीं आपल्या सर्व सैन्याला तेथेंच त्या माळावर तळ देण्याविषयीं हुकूम केला, आणि रंगनाथस्वामी बसले होते तेथें खासा तंबू ठोकला. भोंवती कनाती वगैरे लावून सर्व सैन्याची छावणी तयार झाली. सभोंवर घोडेस्वारांचाही तळ पडला. थोड्या वेळानें समर्थ व कल्याण भिक्षा घेऊन माळावर आले. पहातात तों साराच देखावा निराळा ! रंगनाथस्वामी कोठें गेले त्याचा पत्ताच नाहीं ! चार पांच हजार सैन्याचा तळ मात्र पडलेला आहे. हें पाहून समर्थ कल्याणास म्हणाले "कल्याणा ! अरे रंगोबा कोठें आहे ? शोध तरी कर." रामचंद्रपंत अमात्यांनीं आपल्या सेवकास ताकीद देऊन ठेवलीच होती कीं, समर्थ येतांच वर्दी द्यावी. त्याप्रमाणें समर्थांची स्वारी आल्याचें त्यांनीं कळविलें. तेव्हां अमात्य व रंगनाथस्वामी उभयतां येऊन समर्थांच्या चरणीं लीन झाले. त्यांस पाहून समर्थांनीं अमात्यांस विचारिलें कीं "तुम्ही इकडे कोणीकडे ?" अमात्य म्हणाले "मीं रायगडाहून साताऱ्यास आलों होतों. व पुढें पन्हाळा विशाळगडाकडे जात होतों. तों अकस्मात् येथें रंगनाथस्वामींचें दर्शन झालें व समर्थही येथेंच येणार हें

ऐकून दर्शनही घडेल व संगमाचें स्नानही होईल म्हणून येथेंच आज तळ दिला आहे." हें ऐकून समर्थ हासून बोलले "रंगोबा! तुला आम्ही उन्हांत बसवून गेलों असतां तूं आपला पुन्हा सावलींत बसलासच!" "महाराज! ही आपली इच्छा! नको नको म्हटलें तरी पाठीस लागते. यास उपाय काय?" ह्याप्रमाणें परस्पर भाषणें झालीं. नंतर समर्थ कल्याणास म्हणाले "कल्याणा! प्रारब्धाचें माहात्म्य लक्षांत आलें किंवा नाहीं!" कल्याणांनीं विनंति केली "महाराज! बरोबर प्रत्ययास आलें." तेव्हां हा मजकूर काय म्हणून अमात्यांनीं प्रश्न केला. त्यांस समर्थांनीं पूर्वीं असा असा वाद निघालाचें श्रुत केलें. नंतर समर्थांसहवर्तमान सर्व मंडळी डेऱ्यांत येऊन सर्वांचीं भोजनें झालीं. सर्वांचा मुक्काम तेथेंच होऊन रात्रीं रंगनाथ-स्वामींचें कीर्तन झालें. प्रात:काळीं रामचंद्रपंत समर्थांची आज्ञा घेऊन पुढें निघून गेले, व समर्थ रंगनाथस्वामींसहवर्तमान निगडीस जाऊन थोडे दिवस तेथें मुक्काम करून पुन्हा रंगनाथस्वामींसह परळीस आले. रंगनाथ-स्वामीही कांहीं दिवस परळीस राहून मग निगडीस गेले.

श्रेष्ठांचें निर्याण:—श्रेष्ठांची योग्यता समर्थांइतकीच होती. तींत अणु-मात्रही उणेपणा नव्हता. ही गोष्ट खालीं दिलेल्या वृत्तांतावरूनही कळून येण्यासारखी आहे. श्रेष्ठ हे गंगातीरीं- म्हणजे गोदावरीच काठीं—जांबेंत राहून श्रीरामचंद्राच्या उपासनामार्गानें जगदुद्धार करीत होते हें प्रसिद्धच आहे. एके दिवशीं शिवळी प्रांतांतील एक शिष्य फार अधिकारी होते, त्यांच्या घरीं एक लग्नसमारंभ होता. त्या लग्नास आपण यावें म्हणून त्यांनीं श्रेष्ठांस विनंति केली. श्रेष्ठांनीं सांगितलें कीं, आपण मुलाबाळांस घेऊन जा; मी कांहीं यावयाचा नाहीं. परंतु त्या शिष्याचा असा आग्रह पडला कीं, आपली स्वारी न येईल तर लग्नच होणार नाहीं. इतकी भीड पडली तेव्हां श्रेष्ठांनीं येण्याचें कबूल केलें. परंतु त्याच वेळीं एक श्लोक म्हटला तो असा:—

कळेना पुढें काय होणार आहे।
कळेना तनू कोठपर्यंत राहे॥
कळेना मरावें स्वदेशीं विदेशीं।
कळेना पुढें वेळ येईल कैशी॥ १॥

नंतर लोकाचाराप्रमाणें सर्व तयारी करून ते त्या लग्नसमारंभास गेले. लग्न झाल्यानंतर निरोप घेऊन मंडळीसहवर्तमान परत निघाले. ते दहिफळ बुद्रुक परगणें शिवळी येथें दोन प्रहरच्या मुक्कामास आले, आणि त्यांतून उतरल्याबरोबर सर्वांस हाक मारून ' लौकर स्नान करून भोजनें आटोपून घ्या ' असें सांगितलें. असें कां ? म्हणून विचारतां मागाहून सांगूं असें सांगितलें. मंडळी भोजन करून आल्यानंतर सर्वांस भजन करा म्हणून सांगितलें व आपण स्नान करून प्रायोपवेशनास बसून व चिरंजीव रामचंद्र बावांस जवळ हाक मारून त्यास सांगितलें कीं, आतां आम्ही निजधामास जातों. हें ऐकून रामचंद्रबावा धाय मोकलून रडूं लागले. त्यांचें वय त्यावेळीं अवघें १६ वर्षांचें होतें. त्यांस श्रेष्ठ म्हणाले " इतकीं वर्षें आम्हांपाशीं राहून अद्याप शोक करावयाचा बाकी आहे काय ?" इत्यादि समाधानाच्या गोष्टी सांगून, आपण उपासना मार्ग वाढवीत जावा, समर्थांचें कृपाछत्र आहे त्यांच्या आज्ञेंत चालणें. याप्रमाणें रामचंद्रबावांस आज्ञा करून सर्व मंडळीस विचारून ' हरहर ' शब्द करीत असतां ' राम ' असें म्हणून शके १५९९ पिंगल नाम संवत्सरीं फाल्गुन वद्य १३ सह १४ दोन प्रहरीं श्रेष्ठ परंधामास गेले !

त्या काळीं रामचंद्रबावांचें वय १६ वर्षांचें होतें, व कनिष्ट चिरंजीव शामजीबावा यांचें वय १० वर्षांचें होतें.

हे दोघेही बंधु समर्थांच्या आज्ञेप्रमाणें चालत असून समर्थांस विनंति पत्र लिहिणारच होते पण तितक्यांत चाफळास असा चमत्कार झाला कीं, फाल्गुन वद्य १३ च्या दिवशीं स्नानसंध्या झाल्यानंतर दोन प्रहर पर्यंत कीर्तन झालें आणि दुपारीं कल्याण व उद्धव गोसावी वगैरे मंडळीस घेऊन समर्थ पुन्हा नदीवर स्नानास गेले. हें पाहून सर्वांस मोठें चमत्कारिक वाटलें. म्हणून सर्व मंडळींनीं विनंति केली कीं, आज असें मध्यंतरीं स्नान कां ? " आज श्रेष्ठ निजधामास गेले ! आमचें छत्र नाहीसें झालें !" म्हणून समर्थांनीं सर्वांस सांगितलें. होतां होतां तें वर्तमान शिवाजी महाराजांसही कळलें. तेव्हां तेही दर्शनास येऊन समर्थांस विनंति केली कीं, " महाराज ! तिकडून कोणी मनुष्य वगैरे आला नाहीं. मग आपणांस हें वर्तमान कळलें कसें ?" समर्थ म्हणाले " मातोश्रींच्या

निर्याणाच्या वेळीं आम्हीं समक्ष गेलों होतों, आणि यावेळीं गेलों नाहीं, म्हणून ती गोष्ट खोटी म्हणावी कीं काय ?" यावर राजश्री हात जोडून म्हणाले "समर्थ त्रिकालज्ञ आहेत. तेव्हां आमचें विचारणें निरर्थकच होय." असें म्हणून राजेश्री आज्ञा घेऊन गेले.

नंतर अमावास्येच्या दिवशीं श्रेष्ठांची पत्नी निजधामास गेली, असें सांगून पुन्हा समर्थांनीं स्नान केलें. नंतर पंधरा दिवस झाल्यानंतर मुलांस पत्र लिहून उद्धव गोसावी ह्यांस जांबेस रवाना केले. उद्धव गोसावी जांबेस जाऊन मुलांस भेटले. मुलेंही पत्र पाठविण्याच्याच विचारांत होतीं. तों उद्धवगोसावी आलेले पाहतांच त्यांस गहिंवर आला. त्यांनीं फार दुःख केलेलें पाहून उद्धवगोसाव्यांनीं त्यांचें समाधान केलें. आणि समर्थांचें पत्र त्यांच्या हातांत दिलें. नंतर थोडे दिवस तेथें राहून दोन्ही मुलांस घेऊन उद्धवगोसावी समर्थांपाशीं आले. ही दोन्ही मुलें एक वर्षपर्यंत समर्थांपाशींच होतीं. उभयतांचें आचरण पाहून समर्थांची मर्जी सुप्रसन्न झाली. त्यांस जेवावयास व निजावयास समर्थ आपल्यापाशींच घेत असत. एक वर्ष झाल्यानंतर रामचंद्रबावांनीं समर्थांपाशीं गोष्ट काढली कीं, "आज्ञा असल्यास जांबेस जातों." ती गोष्ट समर्थांनीं मान्य करून उद्धवगोसावी याजबरोबर त्यांस पाठविण्याची तयारी केली. आणि त्यांस बोध केला कीं, "बापहो ! तुम्ही श्रेष्ठ कुळांत जन्मलां आहांत. ह्यास्तव जगदुद्धार करावा. नाशिकपंचवटी व जांबपंचवटी हे श्रींचें अधिष्ठान होय. तेथें जाऊन श्रींची सेवा करावी. आत्मानात्म विचाराची गुरुकिल्ली पूर्वी सांगितलेलीच आहे. ती सर्वदा ध्यानांत ठेवावी. श्रीचरणास विसरूं नये" याप्रमाणें उपदेश केला. इतक्यांत ही बातमी राजेश्रींस कळल्यावरून राजश्रीही तेथें आले आणि त्यांनीं ही दोन्ही मुलांस वस्त्रें, भूषणें, अलंकार वगैरे देऊन बरोबर इतमामही दिला. त्यासहवर्तमान उद्धव गोसावी जांबेस जाऊन दोन्हीही मुलांस पोंचवून आले. हीं मुलें शके १६०० माघ वद्य प्रतिपदेच्या दिवशीं जांबेस गेलीं.

**नायट्याच्या नवसाची फेडः**—एके दिवशीं समर्थांची स्वारी भोजनोत्तर परळीच्या मंडपांत बसून शिष्यमंडळींशीं प्रश्नोत्तरें चाललीं असतां मध्येंच अंगावर उठलेला एक नायटा दृष्टीस पडला. त्यास पाहून

समर्थ म्हणाले "कां बाबा! आंबेचें आम्ही काय लागतों?" बराच वेळ गेल्यावर आठवण झाल्यासारखें करून समर्थ म्हणाले "अग वेणू! हो; आमच्या मातोश्रींनीं पुत्रप्राप्तीसाठीं मातापुरच्या देवीला सुवर्णाचें पुष्प वाहीन असा नवस केला होता. तो त्यांच्या हांतून फिटला नाहीं ह्यास्तव देवीनें त्याचें हें आम्हांस स्मरण दिलें आहे." वेणुबाई म्हणाल्या "तर मग तो नवस फेडला पाहिजे" "हो; फेडला पाहिजे तर खरा; पण मातापुरापर्यंत जाणार कोण?" वेणुबाई म्हणाल्या "नाहीं तर तुळजापुरास जावें." "तेथपर्यंत तरी जाणार कोण?" वेणुबाई म्हणाल्या "नाहीं तर प्रतापगडावर शिवाजी महाराजांनीं देवीची स्थापना केली आहे तिच्यापाशीं जाऊन नवस फेडावा." समर्थ बोलले "हो; तसें मात्र करतां-येण्यासारखें आहे."

नंतर समर्थांनीं एक तोळाभर सोन्याचें सुवर्णपुष्प तयार करविलें, आणि रात्रीं जेवणेंखाणें आटोपल्यानंतर समर्थ कल्याणास म्हणाले, "कल्याणा! चला; प्रतापगडास जाऊन देवीचा नवस फेडूं या." कल्याण म्हणाले "आज्ञा." असें म्हणून उभयतां जे गुप्त झाले ते प्रतापगडच्या देवीच्या देवळांत प्रगट झाले. राजेश्रींची स्वारी तेथेंच असल्यामुळें शेजा-रती होतांच पुजाऱ्यानें कपाटें बंद करून ठेविलीं होतीं. ह्यास्तव कोणतेंही द्वार न उघडतां समर्थ देवीपुढें जाऊन उभे राहिले. समर्थांस पाहून देवीस परमानंद झाला. समर्थांनीं श्रीचरणावर मस्तक ठेवून तयार करून आणलेलें नवसाचें फूल अर्पण करून ते ग्रहण करण्याविषयीं प्रार्थना केली. देवी म्हणाली "ह्या निमित्तानें तरी तुम्ही येथें आलांत." "आपली कृपा." असें म्हणून समर्थ तें पुष्प कोठें वहावें म्हणून स्थळ पाहूं लागले. पण रिकामें स्थळ कोठेंच दिसून येईना. कारण अलंकारांनीं सारें आंग झांकून गेलें होतें. तें पाहून देवीनें सांगितलें कीं, "मस्तकावर बिंदी आहे ती बाजूस सारून तेथें पुष्प वहावें." समर्थांनीं त्याप्रमाणें बिंदी बाजूस सारून तेथें फूल वाहिलें, व नमस्कार केला. तेव्हां देवी प्रसन्न होऊन म्हणाली "रामदासा! कांहीं तरी वर माग." समर्थ म्हणाले "आई! मी तर जोगी आहे. मला वर काय करावयाचा?" नंतर देवीनें पाठीवर हात फिरवून म्हटलें, "नाहीं; कांहीं तरी तूं मागच."

तेव्हां समर्थांनीं विनंति केली कीं " आई ! देणेंच असल्यास काय देणें तें शिवबास द्यावें." यावर देवीनें 'तथास्तु' म्हणून आपल्या गळ्यांतील नवरत्नांचा हार होता तो समर्थांच्या गळ्यांत घातला ! हें पाहून समर्थ म्हणाले " आई ! हें काय ? हा हार माझ्या वैराग्याच्या गळ्यांत कशाला ? नको" म्हणून परत देऊं लागले. परंतु देवी म्हणाली " रामदासा ! तो माझ्या गळ्यांत असावा आणि तुझ्या गळ्यांत कां बरें असूं नये ?" असें म्हणून समर्थांचा हात धरला तेव्हां समर्थांनीं तो प्रसाद ग्रहण करून कल्याण व आपण जसे आले त्याप्रमाणेंच रात्रींच्या रात्रीं चाफळास निघून गेले.

दुसऱ्या दिवशीं शिवाजीमहाराज नित्याप्रमाणें पूजा करतांना देवीवरचा निर्माल्य काढून पाहतात तों देवीच्या गळ्यांतील नवरत्नांचा हार नाहीं ! म्हणून त्यांनीं सेवकास हाक मारून चौकशी केली तों तो हार रात्रपर्यंत देवीच्या गळ्यांत होता असें म्हणत, परंतु पुढें त्याचें काय झालें तें कोणासच सांगतां येईना. शिवाजीमहाराज तर हट्टास पेटले. देवघरांतील हार जातो कसा ? म्हणून तेही सेवकांस छेडूं लागले.

इकडे चाफळामध्यें सकाळींच समर्थांनीं कल्याणास हांक मारून आज्ञा केली कीं, " कल्याणा ! जा; प्रतापगडास देवीचा हार गेला म्हणून फार बोभाट झाला आहे. तरी हा नवरत्नांचा हार शिवबापाशीं नेऊन देऊन ये. नाहीं तर तो आणखी सेवकांस त्रास देईल." " आज्ञा " म्हणून कल्याणस्वामी निघाले ते प्रतापगडास शिवाजीमहाराजांपाशीं जाऊन उभे राहिले. कल्याणस्वामींस पहातांच राजश्रींनीं नमस्कार करून त्यांचें स्वागत केलें. तेव्हां कल्याणस्वामींनीं नवरत्नांच्या हाराचा सर्व वृत्तांत सांगून तो हार त्यांच्या स्वाधीन केला. शिवाजीराजे कल्याणस्वामींस म्हणाले " आपण व समर्थ काल रात्रीं आलां असून मला कां उठविलें नाहीं ? " कल्याणस्वामी म्हणाले " आम्हांस यावयास रात्र फार झाली; वाड्यांत जिकडे तिकडे निजानीज झाली होती, म्हणून कोणास कळविलें नाहीं." राजेश्री म्हणाले " देवीनें प्रसाद दिलेला हार आहे त्याअर्थीं तो समर्थांचा समर्थांसच द्यावा." कल्याणस्वामी म्हणाले " मला तशी आज्ञा नाहीं. याकरितां मी तो नेत नाहीं." राजेश्री म्हणाले " बरें तर

मीच येतों आपल्याबरोबर. आपण व आम्ही बरोबरच जाऊं." कल्याण म्हणाले "मला आतांच्या आतां परत येण्याविषयीं आज्ञा आहे या- करितां मी आलों तसा जातों. स्वारी मागाहून यावी." ह्याप्रमाणें सांगून कल्याणस्वामी गुप्त झाले! ते चाफळच्या मठामध्यें दाखल होऊन समर्थांस नमस्कार करून 'राजेश्रीपाशीं हार देऊन आलों' म्हणून विनंति केली. त्यावर 'उत्तम झालें.' असें समर्थांनीं उत्तर दिलें. दुसरे दिवशीं राजेश्री तो नवरत्नांचा हार व इतरही आणखी जडजवाहीर घेऊन समर्थांच्या दर्शनास आले, आणि समर्थांस नमस्कारपूर्वक तो प्रसादाचा नवरत्नांचा हार व इतर जडजवाहीर अर्पण केलें. समर्थ म्हणाले 'शिवबा! आज ह्याचें कारण काय?" राजेश्रींनीं हात जोडून विनंति केली "महाराज! आपण देवीसही वंद्य; मग माझी ती प्रतिष्ठा काय? देवीचा प्रसाद आपल्याला झालेलाच आहे. तोच आपला आपल्याला आणून दिला. आतां अज्ञानामुळें सेवकांस वगैरे रागें भरलों. त्याबद्दल क्षमा असावी, व मजकडून वारंवार सेवा घेत असावी. समर्थ सेवा कां घेत नाहींत?" समर्थ म्हणाले "बापा! तुम्ही सेवा करीतच आहांत. आणखी ती काय करावयाची!" शेवटीं राजेश्रींचा फारच आग्रह पाहून म्हणाले "बरें तर, देवीचें देवालय सुंदर बांधून त्याच्यापुढें दोन दिपमाळा तयार कराव्या." ह्यावर "आज्ञेप्रमाणें करतों" म्हणून राजेश्रींनीं विनंति केली. नंतर 'प्रतापगडच्या देवीच्या दर्शनास चलावें.' म्हणून राजेश्रींनीं फारच आग्रह केला. तेव्हां समर्थ म्हणाले "आम्ही कालच दर्शन घेऊन आलों आहोंत. तेव्हां पुन्हा येण्याचें कारण काय?" राजेश्रींनीं विनंति केली "श्रेष्ठांचीं मुलें आलीं आहेत. त्यांस घेऊन येऊन माझी इच्छा पुरी करावी." समर्थ बोलले "बापा! मुलें आल्याचें तुम्हांस कोणी सांगितलें?" राजेश्री म्हणाले "मी येथेंच ऐकलें. परंतु मीं अद्याप पाहिलीं नाहींत." तें ऐकून समर्थांनीं मुलास हाक मारली. राजेश्रींनीं मुलांस नमस्कार करून आलिंगन दिलें. नंतर भोजन झाल्यावर समर्थ मुलांसहवर्तमान शिवाजी महाराजांबरोबरच प्रतापगडास गेले. तेव्हां तेथें महाराजांनीं मोठा समारंभ केला. समर्थांनीं तेथील दरवाजांत मारुतीची स्थापना केली. जातांनाही राजेश्रींनीं समर्थांस वस्त्रें पात्रें देऊन बहुत सत्कार केला. रामचंद्रबावा

व श्यामजीबावा यांसही बहुत जडजवाहीर दिलें. तें पाहून समर्थ म्हणाले "शिवबा! आज हें तूं काय मांडलें आहेस?" राजश्री म्हणाले "महाराज! ह्यांत विशेष तें काय? सर्व राज्य आहे तें श्रेष्ठांचें व समर्थांचेंच आहे. तेव्हां ज्याचें त्यांसच द्यावयाचें. त्यांत माझ्या पदरचें थोडेंच आहे?" ह्याप्रमाणें परस्परांनीं परस्परांचा प्रेमादरानें निरोप घेतला, व समर्थ चाफळास आले. ही गोष्ट शके १६०० मध्यें घडली. पुढें लवाजमा देऊन श्रेष्ठांच्या मुलांची रवानगी राजेश्रींनीं करून दिल्याचा उल्लेख मागच्या वृत्तांत आलाच आहे.

**वेणूबाईचें प्रयाण**—समर्थांच्या सर्व लीलेमध्यें वेणूबाईच्या प्रयाणाइतकी अघटित लीला दुसरी कोणतीच नाहीं म्हटलें तरी चालेल. हिच्यामध्यें ईश्वरी प्रभावाचें जें कौतुक दृष्टीस पडतें, तसें इतर कोणत्याही कृत्यांत दृष्टीस पडत नाहीं. दिलेलखान फजीत पावून शिष्य बनल्यानंतर त्यानें मिरजेस मठ करून दिला आणि त्या मठावर समर्थांनीं वेणूबाईची नेमणूक केल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. ह्या वेणूबाईस प्रत्येक वर्षीं रामनवमीच्या उत्सवांत चाफळास येण्याची आज्ञा असे, व त्याप्रमाणें त्या येऊन चार आठ दिवस राहून समर्थांची आज्ञा घेऊन परत जात असत. असा क्रम बरेच वर्षें चालला होता. एके वर्षीं त्यांस वाटलें कीं, आपला अंतकाळ जवळ आला तेव्हां आतां स्वामीसन्निध जाऊन त्यांच्या चरणींच देह ठेवावा. अशी इच्छा धरून त्या मिरजेहून चाफळास यावयास निघाल्या. हें समर्थांनी जाणून ते आक्कापाशीं म्हणाले "आक्का! वेणू मरणाला भिऊन इकडे येत आहे बरें का!" ह्याला थोडा वेळ गेला नाहीं तोंच वेणूबाईही चाफळास येऊन पोंचल्या, व समर्थांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून पुढें उभ्या राहिल्या. त्यांस समर्थांनीं विचारलें "कां? वेणे! मध्येंच कां आलीस?" वेणूबाई म्हणाल्या "महाराज! मला परलोकास जावयाचें आहे, ह्यास्तव आज्ञा घेऊन जावें, असें मनांत येऊन स्वामीचरणापाशीं आले." समर्थ हांसून म्हणाले "तुला आणखी दोन वर्षेंपर्यंत मरणाचें भय नाहीं. तूर्त तूं जा; आणि श्रीरघुपतीची सेवा कर. दोन वर्षांनंतर पाहूं." अशी आज्ञा झाल्यानंतर कांहीं दिवस तेथें राहून वेणूबाई पुन्हा मिरजेस निघून गेल्या.

त्या प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें प्रत्येक रामनवमीच्या उत्सवास चाफळास जात असत. पण दोन वर्षेपर्यंत त्यानीं आपल्या जाण्यासंबंधानें समर्थांपाशीं कोणतीच गोष्ट काढली नाहीं. दुसऱ्या वर्षीचा रामनवमीचा उत्सव संपूर्ण होऊन मंडळी जिकडच्या तिकडे गेली, तेव्हां एके दिवशीं समर्थ सकाळींच मुखप्रक्षालन करीत असतां वेणूबाई पुढें येऊन हात जोडून उभ्या राहिल्या आणि विनंति केली कीं " आतां मला माहेरीं जाण्यास आज्ञा असावी." यावर समर्थ म्हणत "इतकी घाई कशाची ? पाहूं उद्यां परवां !" असें म्हणून दुसऱ्या उद्योगास लागत. ह्याप्रमाणें आठ पंधरा दिवस गेले. रोजचा क्रम हाच. सकाळीं वेणुबाईनीं "आज्ञा व्हावी" म्हणावयाचें, आणि समर्थांनीं 'उद्यां पहातां येईल' हें उत्तर द्यावयाचें. याप्रमाणें बऱ्याच दिवस क्रम चालला होता. वेणुबाई रोज आज्ञा मागतात काय व समर्थ 'इतकी घाई कशाची ? ' पाहूं. उद्यां पाहूं' म्हणतात काय ? ह्यांतील भावार्थ कोणाच्याच कांहीं ध्यानांत येईना. एके दिवशीं सकाळीं मात्र समर्थांनीं सांगितलें की 'ठीक आहे; आज तूं आपल्या माहेरीं जा.' अशी समर्थांनीं त्यांस आज्ञा दिली. आणि लागलीच कल्याणास हाक मारून सांगितलें कीं, आंत जाऊन आक्कांस सांग कीं, आज वेणू माहेरीं जाणार आहे, तरी श्रीच्या नैवेद्याला पुरणावरणाचा स्वयंपाक करा. त्याप्रमाणें नैवेद्याची तयारी झाली. समर्थांचा स्नानसंध्या पूजा वगैरे आन्हिकाविधि आटोपला. सर्वांचीं पानें मांडून नैवेद्य समर्पण झालें. समर्थही पाटावर येऊन बसले आणि त्यांनीं विचारलें कीं, 'वेणू कोठें आहे ?' तों त्या आक्काबरोबर स्वयंपाक व पोळ्या करीत बसल्या आहेत म्हणून समजलें. तें ऐकून समर्थ म्हणाले "अरे, आज ती माहेराला जाणार, आणि तिलाच तुम्ही स्वयंपाकाला लाविलेंत हेरे काय ? बोलवा तिला इकडे." त्याप्रमाणें वेणुबाई पुढें येऊन उभ्या राहिल्या. त्यास पाहून समर्थ म्हणाले " हिचें पान आज माझ्याजवळ मांडा. तूं बैस; येथें माझ्याबरोबरच जेवावयास बैस." वेणुबाई विनयानें हात जोडून म्हणाल्या "आज उच्छिष्ट प्रसाद ग्रहण करावा अशी इच्छा आहे." समर्थ म्हणाले "वेणे ! तूं जन्मभर उच्छिष्ट प्रसाद खाल्लासच आहेस. ह्याकरितां आज तसें कांहीं नको." असें म्हणून त्यांनीं वेणुबाईचें पान

आपल्या शेजारींच मांडलें आणि त्यांस आपल्या पंक्तीस घेऊन भोजनास बसले. भोजन झाल्यानंतर कल्याणस्वामींस आज्ञा झाली कीं, मंडपांत बैठकी घालून कीर्तनाची तयारी कर. त्याप्रमाणें कीर्तनाची तयारी होतांच समर्थ मंडपामध्यें येऊन आपल्या आसनावर बसले आणि त्यांनीं वेणुबाईस कीर्तन करावयास आज्ञा दिली. वेणुबाईनीं हातीं तंबूरी व चिपळ्या घेऊन कीर्तनास आरंभ केला. सायंकाळीं ४।५ वाजेपर्यंत कीर्तन सुरू होतें. कीर्तनास गर्दीही बरीच झाली होती. कीर्तन समाप्त झाल्यानंतर आरती झाली. त्यावेळीं वेणूबाईनीं नेत्रांत प्रेमाश्रू भरून समर्थांच्या चरणावर मस्तक ठेविलें व आतां आज्ञा असावी म्हणून प्रार्थना केली. तेव्हां समर्थांनीं तीस उठवून तिच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला, व 'आतां माहेरीं जावें' अशी आज्ञा केली. त्याबरोबर वेणूबाईनीं 'जयजय रघुवीर समर्थ' असें मोठ्यानें म्हणून तेथेंच सभामंडपांत देह टाकला. आणि स्वस्वरूपीं लीन झाल्या !! हा अद्भुत चमत्कार पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले.

नंतर आक्का, उद्धव व दिवाकर भट ह्यांस समर्थांनीं आज्ञा केली 'वेणूचें देहसार्थक करावें.' त्या दिवशीं चैत्र वद्य १४ चा दिवस होता. वेणूबाई गेलेल्या पाहून आक्का फारच शोक करूं लागल्या. तें पाहून समर्थ त्यांस म्हणाले "आमच्या सहवासांत राहून हेंच साधन केलेंस वाटतें ?" आक्कांनीं विनंति केली "वेणू व मी मिळून आजपर्यंत सेवा करीत होतों; आतां मी एकटीच राहिलें. वेणूबाईची योग्यता येवढी कीं, तिच्याकरितां श्रीरघुपतीच्या मूर्तीच्या नेत्रांतून सुद्धां अश्रु पडले ! अशी सगुण मूर्ति नाहींशीं झाली म्हणून वाईट वाटतें." समर्थांनीं त्यांचें अनेक प्रकारें शांतवन केलें. वेणूबाईचें ज्या ठिकाणीं देहसार्थक केलें, तेथें एक चंपक वृक्ष उगवला होता, त्याचीं पुष्पें समर्थांच्या पूजेस बहुत दिवस बाहात असत. पुढें हा वृक्ष गत झाला. आतां तेथें वृंदावन आहे. श्रींच्या देवालयाच्या अग्नेयेस वृंदावन दिसतें तें हेंच.

**व्यंकोजीराजे ह्यांचें बोलावणें**—शिवाजीमहाराज ज्याप्रमाणें समर्थांचे अनुग्रहित शिष्य होते, त्याप्रमाणें शिवाजीमहाराजांचे सावत्र बंधु तंजावरचे व्यंकोजीमहाराज हेही एक अनुग्रहित शिष्य असून त्यांचीही समर्थांवर फार भक्ति होती. समर्थांस भेटून फार दिवस झाले असें वाटून व्यंकोजी

महाराजांनीं समर्थास बोलावण्यासाठीं मुद्दाम कारकून पाठविला, व त्याच्याबरोबर समर्थास एक पत्रही दिलें होतें. त्यांत असा मजकूर होता कीं, " बहुत दिवस झाले ह्याकरितां भेटीचा लाभ व्हावा." समर्थांनीं त्या कारकुनाचा सन्मान करून त्यास ठेवून घेतलें. नित्याप्रमाणें शिवाजीमहाराज समर्थांच्या दर्शनास आले तेव्हां समर्थांनीं व्यंकोजीमहाराजांचें पत्र त्यांस वाचावयास दिलें. तें वाचून पाहून राजश्री म्हणाले " उत्तम आहे. जाण्याची मर्जी असल्यास सर्व बंदोबस्त करून देतों." समर्थांनीं जाण्याचा संकल्प कळविला. त्याप्रमाणें राजश्रींनीं मार्गांतील सर्व बंदोबस्त करून दिला. समर्थांची स्वारी मजल दरमजल मनारगुंडापर्यंत जाऊन पोंचली. तेथपर्यंत व्यंकोजीराजे सामोरे येऊन मोठ्या समारंभानें तंजावरास घेऊन गेले. तेथें भिकाजीबावांचा मठ होता. तेथेंच समर्थांनीं मुक्काम केला. व्यंकोजीमहाराज मठांत येऊनच समर्थांची सेवा करीत असत. ह्याप्रमाणें दररोज सभा वगैरे चालल्या असतां एके दिवशीं समर्थ सिंहासनावर बसले आहेत, राजे व कारभारी मागें चवऱ्या व मोरचलें धरून उभे आहेत, तों समर्थांनीं कारभाऱ्यास प्रश्न केला कीं, " इकडे मूर्ति करणारे कारागीर फार उत्तम आहेत असें ऐकतों. तर एखादा चांगला मूर्तिकार आणवावा. आम्हांस श्रीरघुपतीची मूर्ति करविणें आहे."

हें भाषण श्रवण करून कारभाऱ्यांनीं विनंति केली कीं " शहरांत एक फारच उत्तम मूर्ति करणारा आहे. पण उपयोग काय ? तो दोन्ही डोळ्यांनीं अंध आहे." समर्थ म्हणाले ' कांहीं हरकत नाहीं. त्यालाच बोलावून आणा." कारभाऱ्यांनीं आज्ञेप्रमाणें बोलावून त्यास सभेमध्यें आणलें. त्यानें येऊन समर्थास साष्टांग नमस्कार घातला व हात जोडून उभा राहिला. त्यास समर्थांनीं विचारलें "तुम्ही मूर्ति करतां ना ?" कारागीर म्हणाला "होय जी मायबाप." त्यावर समर्थ म्हणाले " तर आम्हांस श्रीरघुपतीच्या मूर्ति सांगूं तशा करून द्याल काय ?" हा समर्थांचा प्रश्न ऐकून तो मूर्तिकार ढळढळ ढळढळ रडूं लागला. समर्थांनीं त्यास विचारलें " बाबा तूं रडतोस का ?" तो म्हणाला " महाराज काय सांगूं ? आपल्यासारख्या समर्थांनीं मला सेवा सांगितली, परंतु मला ती करण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें ठेवलें नाहीं." समर्थ म्हणाले " कां बरें ?

तुला काय कमी आहे ?" तो कारागीर म्हणाला "महाराज ! मी दोन्ही डोळ्यांनीं आंधळा आहे." समर्थ म्हणाले " ते तुझे डोळे आले तर मग तूं मूर्ति करशील कीं नाहीं ?" तो म्हणाला "मग काय विचारावें महाराज ! माझें भाग्यच उदयास आलें असें समजेन." हें ऐकून समर्थांनीं त्यास आपल्या जवळ बोलावून त्याच्या डोळ्यावरून माळ फिरवितांच त्याच्या डोळ्यानें पूर्ववत् दिसूं लागलें. तें पाहून त्या कारागिरानें उपकारबद्ध होऊन समर्थांच्या पायांवर लोळण घेतली. तेव्हां समर्थांनीं त्याचें अनेक प्रकारें समाधान केलें. नंतर कारागिरानें समर्थांस विनंति केली कीं, " मी मूर्ति करतों, पण आपण त्या मेणवून द्याव्यात." समर्थांनीं "उत्तम आहे" असें म्हणून राम, लक्ष्मण, सीता, व मारुति अशा चार मूर्ति मेणवून दिल्या. त्याप्रमाणें मूर्ति लौकरच तयार करून देण्याचें त्या मूर्तिकारानें कबूल केलें. परंतु तो म्हणाला " मला समर्थांपाशीं एक मागणें आहे. तें समर्थांनीं दिलें पाहिजे." समर्थ म्हणाले " काय पाहिजे तें माग. मोठ्या आनंदानें देऊं." तेव्हां तो कारागीर म्हणाला " ह्या डोळ्यांनीं आपल्या सारख्या ईश्वरी मूर्ति पाहिल्या, आतां पुन्हा त्याच डोळ्यांनीं जगांतील नश्वर पदार्थ काय पहावेत ? याकरितां मूर्ति तयार होतांच माझे नेत्र पुन्हा पूर्ववत् अंध व्हावेत !" ही विलक्षण मागणी ऐकून समर्थ म्हणाले " अरेरे हें तूं काय मागितलेंस ? दुसरें कांहीं माग." परंतु कारागिराचा निश्चय ढळेना. म्हणून समर्थांनीं त्यास तसाच आशिर्वाद देऊन तेथें महिना पंधरा दिवस मुक्काम करून समर्थांची स्वारी परत आली. समर्थ परत येतात हें कळतांच शिवाजीमहाराज त्यांस पांच मजला सामोरे गेले, व त्यांस आनंदानें भेटून चाफळास पोंचवून तंजावराकडील कुशल क्षेम विचारून चार दिवस राहून नंतर रायगडीं गेले.

**डोमगांवचा मठ**—पूर्वी एक वेळ समर्थांनीं शिवाजीमहाराजांचें जेथें राज्य नव्हतें, अशा ठिकाणच्या गांवच्या सनदा त्यांच्याकडून करून घेतल्या होत्या. त्यांपैकीं कित्ती एक गांवांत शिष्य पाठवून मठस्थापना केली होती. पण कित्येक गांवांत कोणीच मनुष्य वगैरे पाठविले नव्हते. ह्यास्तव एके दिवशीं समर्थांनीं सहज कल्याणस्वामींना हाक मारून सांगितलें कीं, " तूं आजच्या आज डोमगांवास जाऊन तेथें मठाची

स्थापना कर. आणि तेथेंच रहा." समर्थांची व कल्याणस्वामींची गांठ पडल्यापासून त्यांना समर्थांनीं कधीं क्षणभरही डोळ्याआड केलेलें नव्हतें. ते रात्रंदिवस समर्थांच्या सन्निध असत. समर्थांचा वियोग म्हणून कसा तो त्यांना माहितच नव्हता. असें असतां समर्थांची एकदम ही अशी आज्ञा झालेली ऐकून त्यांना केवळ आकाश कोसळल्याप्रमाणें झालें. कल्याणांस समर्थ केवळ मायबापाप्रमाणें वाटत. यामुळें त्यांस डोमगांवास जावयाची आज्ञा करणें म्हणजे मायलेंकरांची ताटातूट करण्याप्रमाणेंच वाटूं लागलें. ते मोठ्यानें हंबरडा फोडून रडूं लागले. तेव्हां समर्थांनीं त्यांची समजूत केली. ती अशी कीं "बाबारे! झाडाखालीं झाड कांहीं वाढत नाहीं. कोणालाही स्वतंत्रता दिल्याशिवाय त्याची योग्यता प्रगट होत नाहीं. याकरितां तू कष्टी होऊं नको. रघुपतीची इच्छा तशीच आहे. तुला तिकडे जाणें भागच आहे. कारण आम्ही पूर्वीं मंडळींसहवर्तमान सिनेच्या तीरानें चाललों असतां डोमगांवीं एक जाळी होती, त्या जाळीस आमच्या मेखळेचा पदर अडकला, तो तूं सोडविलास. त्या वेळेचें तुला स्मरण नसेल, पण त्यांतील भाव असा कीं, त्या ठिकाणीं आम्ही असावें. परंतु त्या जागीं तुम्ही पदर सोडविला म्हणून ती जागा तुम्हासच नेमली आहे. असें असतां तूं अज्ञानासारखा रडतोस याला काय म्हणावें?" कल्याण हात जोडून म्हणाले "समर्थांचा संकल्प असेल तो प्रमाण. परंतु आजन्म आपली चरणसेवा घडावी अशी इच्छा होती." तेव्हां समर्थ म्हणाले "कांहीं चिंता नाहीं. तूं काळजी करूं नको. बापा! तूं आहेस तावत्कालपर्यंत तुझ्याच हातून सेवा घडेल." असें बोलून मस्तकीं हात ठेवून त्यास जाण्यास आज्ञा दिली. त्यांच्याबरोबर दहाबारा वर्षांचीं ब्राम्हणांचीं कांहीं मुलें होतीं तीं दिलीं. त्यांचीं नांवें:—

१ निजामकर कुळकर्णी यांचा मुलगा जगन्नाथ.
२ वाईकर चित्राव यांचा पुत्र मुधोबा.
३ चोरेकर कुळकर्णी यांचे पुत्र मुरारजी व रामा.
४ वांईकर जुने देशपांडे यांचे पुत्र शिवाजी.
५ शहापूरकर पाटील यांचा पुत्र.

येणेंप्रमाणें ६ मुलें बरोबर देऊन कल्याणस्वामी यांस रवाना केलें.

त्याप्रमाणें कल्याणगोसावी यांनीं डोमगांवीं जाऊन मठस्थापना करून संप्रदाय वाढविला आणि एक वर्ष होतांच स्वामींचें दर्शनास परत आले. ह्याप्रमाणें प्रतिवर्षी येत जाणें म्हणून स्वामींची आज्ञा झाली, व त्याप्रमाणें प्रतिवर्षी ते येत असत.

**राजश्रींस शेवटचा निरोप**—शिवाजीमहाराज समर्थांच्या दर्शनार्थ वारंवार परळीस जात असत. त्याप्रमाणें शके १६०१ च्या पौष शुद्ध पौर्णिमेच्या सुमारास ते परळीस गेले होते. ते ह्या खेपेस सुमारें एक महिनाभर परळीसच होते. शिवाजीचें समर्थांवर अत्यंत प्रेम असल्यामुळें ते कधीं कधीं परळीवर बरेच दिवस मुक्काम करून राहत असत. व तितक्या अवधींत समर्थ त्यांस नानाप्रकारचा बोध करीत. व परस्परांत पुष्कळ प्रेमाचें भाषण चालत असे. परंतु ह्या खेपेचा उपदेश, भाषणें व उभयतांतील रहस्य ह्यामध्यें कांहीं निरळाच भाव दृष्टीस पडत असे. ही गोष्ट सामान्य जनांच्या जरी दृष्टोत्पत्तीस येत नव्हती, तरी समर्थांचे कल्याण, उद्धव, इत्यादि जे चाणाक्ष शिष्य होते, त्यांच्या लक्षांत ती गोष्ट आल्यावांचून राहिली नाहीं. ह्या त्यांच्या भेटींत उदासीनता, व निर्वाणीचीं भाषणें झाल्याप्रमाणें बोलणें होत असे. रात्रौ निजले म्हणजे उभयतांचीं कांहीं सांकेतिकही भाषणें होत. त्यांतील भावार्थ बहुधा कोणासच कळत नसे. तथापि ह्या उभयतांच्या भेटींत कांहीं तरी विशेष आहे, व तें गुप्त आहे ही गोष्ट मात्र बऱ्याच मंडळींच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं.

ह्या खेपेच्या उपदेशांत बहुधा निरवानिरवीच्याच गोष्टी होत्या; "राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारें राखावा; सरदार व सेवक एकदिलानें राहवेत; देशाधिकारी, सुभेदार, मामलेदार ह्यांनीं यथायोग्य वर्तन करून स्वामीसेवेंत अंतर पडूं देऊं नये. कोशभांडागाराचा बंदोबस्त नीट करावा. त्याजवर विश्वासू सेवक नेमावेत. तुरुंग, किल्ले व कोट, ह्यांवर शूर व विश्वासू लोकांची योजना करावी. त्यांनीं प्राण खर्ची घालावे, परतु शत्रूस फितूर होऊं नये. सेनेचा अधिपति नेमणें तो शूर, विश्वासू व एकपत्नीव्रती व निर्व्यसनी असावा. उभयता पुत्रांचा एक विचार करून बंदोबस्त करावा. ह्यांत विपर्यास होऊं नये. तुम्ही सुज्ञच आहां. फार काय सांगावें ? परंतु आमचा सांगण्याचा धर्म म्हणून निवेदन केला आहे."

हा व्यवहारासंबंधीं उपदेश झाला. पारमार्थिक उपदेशाच्या संबंधानें तर ह्या खेपेस ज्ञानामृताची परमावधीच झाली. इतका तो मधुर व अनुभव सिद्ध होता. तो श्रवण करतांच राजश्रींची ब्रह्मानंदांत समाधि लागून राहिली. नंतर त्या स्थितींतून पुनरपि देहभानावर आल्यानंतर त्यांस गहिंवर येऊन नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. हाच समर्थांचा अंतिम उपदेश होय. हे अमृतमय शब्द पुनरपि कानावर पडणें नाहींत. हें मनांत येऊन राजश्रींस एकच शेवटचा हुंदका आला! त्या सरशी ते समर्थांच्या पायास मिठी घालून मोठ्यानें ओकसाबोक्शी रडूं लागले. आलेला कड त्यांचा त्यांनाच आवरेना. हें जाणून समर्थांनीं त्यांस उठवून घट्ट पोटाशीं धरलें आणि म्हणाले "शिवबा! आजपर्यंत आमच्या सहवासाला राहून हेंच साधन केलें काय?" राजेश्री सद्गदीत स्वरानें म्हणाले "महाराज! मला कांहींच आज सुचत नाहीं." अशा प्रकारचीं प्रेमळ प्रश्नोत्तरें होऊन समर्थांचा निरोप घेऊन राजेश्री रायगडावर निघून गेले. पौष शुद्ध ९ च्या दिवशीं राजश्री आले होते, ते माघ शुद्ध १५ च्या दिवशीं परत गेले.

**शिष्यांची प्रश्नोत्तरें**—ह्या खेपेस शिवाजी महाराज सुमारें एक महिना परळीवर होते. त्यांच्या भाषणांतील रोख व दर्शनांतील भाव नेहेमींपेक्षां बराच भिन्न दिसत होता. त्यांतील भावार्थ कित्येक शिष्यमंडळींनीं ताडला व राजश्रींची स्वारी निघून गेल्यानंतर संधी पाहून उद्धवांनीं समर्थांपाशीं गोष्ट काढली कीं "राजेश्री ह्या खेपेस एक महिनाभर होते. एकांतांत वगैरे पुष्कळ भाषणें झालीं. त्यांतील कांहीं भाव लक्षांत आला. तेव्हां अवधि किती राहिला आहे तो दासास कळावा. बहुधा थोडा दिसतो. परंतु म्लेंच्छांचा समूळ नाश करण्याचा संकल्प होता; तो पूर्ण झाल्याचें दिसत नाहीं. त्याचें कसें? ह्याबद्दल आज्ञा व्हावी."

हें ऐकून समर्थ म्हणाले "बापा! या मंडळींत कोणी समजदार आहे किंवा नाहीं याचा मला संशयच होता. परंतु तूं तरी एक जाणता निघालास हें पाहून मला फार संतोष झाला. तूं श्रीचा वरद पुत्र आहेस. असो; तुझ्या प्रश्नाचें उत्तर सांगतों ऐक. म्लेंच्छमय पृथ्वी झाली, त्यांचा नाश व्हावा एतदर्थ शिवाजीनें श्रीकृष्णातीरीं श्रीचे आज्ञेनें जन्म घेतला. आमचें येणेंही शिवाजीप्रीत्यर्थच कृष्णातीरीं झालें. आतां म्लेंच्छांचा

पुरा नाश झाला नाहीं हा तुझा संशय आहे. परंतु जुन्या वृक्षाच्या फांद्या व मुळ्या तोडल्या म्हणजे तो आज ना उद्यां कधीं तरी मरावयाचाच, यांत संशय नाहीं."

उद्धवगोसाव्यांनीं विनंति केली. कीं " महाराज! शिवाजीच्या हातून संपूर्ण म्लेच्छांचा पराभव झालेला दिसत नाहीं." समर्थ बोलले " बापा! संकल्प झाला तो कधींही अप्रमाण होणार नाहीं. कांहीं शेष राहिला असें वाटतें, तो जातां जातां दिवा मोठा होतो त्यांतला प्रकार आहे, आणि शिवाजीही पूर्व स्थळावर जातात असें नाहीं. पुन्हा याच कुलांत उत्पन्न होऊन म्लेंच्छांचें निवारण करून कांहीं दिवस ऐश्वर्य भोगून पुनरपि ब्राह्मण जन्म घेऊन बद्रिकाश्रमीं योगसाधन करून नंतर पूर्व स्थळास जाईल ह्यांत संशय नाहीं. आणि श्रीनींही नाशिकापासून करवीरापर्यंत राहण्याचें सांगितलें आहे. ह्यास्तव त्या स्थानाला 'आनंदभुवन' असें नांव दिलें आहे. आणि सांप्रत श्रीचा पंचवटींत वास आहे. ह्यास्तव त्या स्थानाचें वर्णन आम्ही पूर्वींच करून ठेवलें आहे. तें ऐक.

## श्लोक

[ अनुष्टप् छंद. ]

कल्पांत मांडिला मोठा। म्लेंछ दैत्य बुडावया ॥
कैपक्ष घेतला रामें। आनंदवन भूवनीं ॥ १ ॥
बुडाले सर्वही पापी। हिंदुस्थान बळावलें ॥
कोपला देव देवाचा। आनंदवन भूवनीं ॥ २ ॥
पूर्वीं जे मारिले होते। तेचि आतां बळावले ॥
अभक्तांचा क्षय झाला। आनंदवन भूवनीं ॥ ३ ॥
त्रैलोक्य गांजिलें मागें। ठाउकें विवेकीं जना ॥
कैपक्ष घेतला रामें। आनंदवन भूवनीं ॥ ४ ॥
भीमासि धाडिला देवें। वैभवें धांव घेतली ॥
लांगूल चालिलें पूढें। आनंदवन भूवनीं ॥ ५ ॥
येथून वाढिला धर्म। रमाधर्म समागमें ॥

संतोष मांडिला मोठा। आनंदवन भूवनीं ॥ ६ ॥
बुडाला औरंग्यापापी। म्लेंच्छ संहार जाहला ॥
मांडिलीं मोडलीं क्षेत्रें। आनंदवन भूवनीं ॥ ७ ॥
बुडाले भेदवादी ते। नष्ट चांडाळ पातकी ॥
तुडविले बुडविले देवें। आनंदवन भूवनीं ॥ ८ ॥
गळाले पळाले मेले। गेले देशोधडीं पुढें ॥
निर्मळ जाहली पृथ्वी। आनंद वन भूवनीं ॥ ९ ॥

" पुढचा प्रकार ऐकणारे ऐकतील, व पाहणार पाहतील." त्यावर उद्धवांनीं पुन्हा प्रश्न केला "अवधि किती आहे ?" समर्थांनीं विचारलें "आज तिथी कोण ?" उद्धव म्हणाले "पौर्णिमा." समर्थांनीं उत्तर दिलें "आजपासून *साठाव्या दिवशीं शिवबाही स्वर्गस्थ होतील !" ह्याप्रमाणें भाषण होऊन सभा बरखास्त झाली.

छत्रपतींचें निर्याण !—आतां आपला अंतकाल समीप आला असें शिवाजी महारांसहि समजून चुकलें होतें हें वरील समर्थांच्या भेटीवरून सहजीं अनुमान होतें. अर्थात् समर्थांस भेटून रायगडास गेल्यावर ते आपल्या शेवटल्या तयारीस लागले. त्यांच्या पश्चात् व्यवस्थेमध्यें एक प्रश्न मोठा बिकट होता. तो मुलांच्या संबधाचा होय. वडील मुलगा संभाजी हा अत्यंत दुर्गुणी होता. ह्यास्तव त्या उभयतांचें जमणार नाहीं, हें ते जाणून होते. म्हणून त्यांनीं संभाजी महराजांस पन्हाळगडास नेऊन अटकेंत ठेवलें, आणि आपल्या पश्चात् आपल्या कनिष्ठ पुत्रास—राजारामास—तख्तावर बसवून सर्व कारभाऱ्यांनीं त्याच्या हुकमांत चालावें अशी योजना केली. आणि ते आपल्या परलोकसाधनास लागले. नित्य प्रातःस्नान,

---

* कित्येक बखरींत उद्धवांनीं आज अष्टमी म्हणून उत्तर दिलें, व आजपासून ७ व्या दिवशीं परिक्षिती राजाप्रमाणें शिवबाहि स्वर्गस्थ होईल. असा उल्लेख आहे. कोणतीहि गोष्ट ग्रहित धरली तरी निधनकाल तोच येतो. तथापि उद्धव गोसावी ह्यांनीं पौर्णिमाच सांगितली, व साठाव्या दिवशीं स्वर्गस्थ होईल, हें म्हणणें अधिक सयुक्तिक दिसतें.

नामस्मरण, रुद्राक्षधारण, पुराणश्रवण इत्यादि करून मग भोजन करीत. दुपारीं भोजनानंतर अस्तमानापर्यंत कीर्तन चालत असे. रात्रौ भोजनोत्तर पुन्हां कीर्तन सुरू होई. असें होतां होतां प्रकृति अधिकाधिक जर्जर होऊन प्रयाणकाळचा दिवस आला. त्या दिवशीं १०० धेनु दान दिल्या. लक्षावधि रुपये दानधर्म केला. भूमीदानें दिलीं. नंतर दर्भासन घालून प्रयोपवेशन करावयास बसले. भजन सारखें सुरू होतें. त्यांतच राजेश्रींनीं शिवनामाचा उच्चार करून शेवटीं 'राम' शब्दासरशीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें ! !

अशा प्रकारें महाराष्ट्रदेशावरचा प्रतापदिनकर अकस्मात् अस्तास जाऊन सारीच घडी विसकटली ! जिकडे तिकडे एकच हाहाःकार माजला ! त्या दिवशीं शके १६०२ चैत्र शुद्ध १५ रविवार होता. हें वर्तमान सज्जनगडावर समर्थांसही समजलें. तेव्हां "श्रीची इच्छा !" असें म्हणून समर्थ जे उठले ते खोलींत जाऊन बसले. ते फिरून पुन्हा बाहेर असे कधीं आलेच नाहींत म्हटलें तरी चालेल. तें पाहून शिष्यमंडळीसही वाईट वाटलें. आक्का म्हणाल्या "समर्थांस मायेनें कधींच बद्ध केलेलें नव्हतें, परंतु राजेश्रींचें वर्तमान ऐकून त्यांसही अत्यंत वाईट वाटलें !" उद्धवगोसावी म्हणाले "आक्का ! ह्यांत नवल तें काय ? समर्थांचा अवतार केवळ राजेश्रीकरितांच होता. आतां तोही लवकरच समाप्त होईल." अशा प्रकारें इतर महाराष्ट्रदेशांत पसरल्याप्रमाणें सज्जनगडावरही दुःख व उदासीनता पसरून राहिली.

**नंतरची परिस्थितिः**—शिवाजी राजे गेल्यापासून समर्थांनीं बाहेर फिरणें अगदींच वर्ज्य केलें. ते मठांतच बसून आपली कालक्रमणा करीत. प्रतिवर्षीं रामनवमीच्या उत्सवास चाफळास जावयाचें असा त्यांचा नेम असे. परंतु शके १६०२ मध्यें ते चाफळासही गेले नाहींत. त्यामुळें तेथेंही कुरबुरी उत्पन्न झाल्या ! त्या कशाच्या संबंधानें ? तर मानपानाच्या संबंधानें ! आमचे लोक एका सुपारीच्या मानाकरितांही रणावर रणें पाडतात, त्याप्रमाणें शहापूरकर व शिराळेकर ह्या दोघांच्या मानापानाच्या संबंधानें कटकटी उपस्थित झाल्या. तेव्हां दिवाकर भटजींनीं सज्जनगडावर जाऊन समक्षच समर्थांस भेटून त्याबद्दल निकाल करूं अशी समजूत करून

चाफळाचा उत्सव संपतांच ते उभयतांस घेऊन सज्जनगडावर आले. तोंच शिवाजी महाराजांचें दुःखदायक वर्तमान येऊन पोंचतांच समर्थांनीं दिवाकर भटजीस रायगडावरील समाचारास पाठविलें. ते पंधरा दिवस तिकडेच होते. ते पंधरा दिवसांनीं परत आले. तोंच संभाजी-महाराज सिंहासनारूढ व्हावयाचें ठरून त्यांचें व अष्टप्रधानांचें समर्थांस निमंत्रणपत्र घेऊन रायगडाहूनही कारकून आला. तें पत्र वाचून पाहून व आलेल्या कारकुनाचा आदरसत्कार करून " फार बरें आहे. कोणी तरी पाठवितों. " असें उत्तर लिहून पाठविलें. नंतर दिवाकर भटजींनीं चाफ-ळच्या उत्सवाच्या मानापानासंबंधीं गोष्ट समर्थांच्या कानावर घातली. तेव्हां समर्थ सभेमध्यें बसून त्यांनीं प्रत्येक कलमावर आज्ञा स्वतः सांगि-तली व ती दिवाकर भटजींनीं लिहून घेतली. ती यादी अद्याप चाफळच्या मठांत आहे.



# समर्थांचें सामर्थ्य
## किंवा
# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## भाग ८ वा

### उपसंहार.

श्रीचें शेवटचें दर्शन—नंतर शके १६०३ सालीं समर्थ चाफळच्या रामनवमीच्या उत्सवास गेले. रीतिप्रमाणें उत्सव वगैरे व्हावयाचा तो झाला. मारुतिजयंती वगैरे उरकल्यानंतर एके दिवशीं कारभारी यांनीं विनंति केली कीं, "महाराज! श्रींचें देवालय व दिपमाळ बांधावयाची आज्ञा झाली होती. परंतु तितक्यांत राजश्रींचा काळ झाला. तरी त्यांनीं दिलेला विषय मठांत आहे, तो खर्ची घालून आज्ञा झाल्यास देऊळ व दिपमाळ बांधवितों. हें ऐकून समर्थांनीं उत्तर दिलें "फार बरें आहे." त्यावरून कारभारी राजेश्रीकडून आलेले होन व जडजवाहीर बाहेर आणून त्याची समर्थांच्या समक्ष मोजदाद करूं लागले. तों समर्थांनीं कोणा तरी ब्राह्मणांस हाक मारावी आणि यादींतील जिन्नस त्यास देऊन टाकावा, असा क्रम सुरू केला. तेव्हां कारभारी यांनीं हात जोडून विनंति केली कीं, "महाराज! आज्ञा झाल्यावरून एकंदर जमेची याद करीत असतां त्यांतील विषय खर्च होत आहे तेव्हां त्या बद्दल काय ती आज्ञा व्हावी."

हें एकतांच त्या काढलेल्या जिनसांतच एक तरवार होती, ती घेऊन

समर्थ चवताळून सर्वांच्या अंगावर धांवूं लागले. तेव्हां सारीच मंडळी घाबरून पळाली. हें पाहून समर्थही मुकाट्यानें येऊन आपल्या असनावर बसले. परंतु आतां समर्थ शांत कसे होतील ह्याचाच सर्व मंडळी विचार करूं लागली. हें द्रव्य व जडजवाहीर वाटून टाकलें तर देऊळ व दीपमाळा होतील कशा ? ह्याबद्दल सर्वांसच विवंचना पडली. ह्यास्तव आक्का व उद्धव यांस पुढें करून समर्थास पुनरपि विनंति करण्याचा यत्न केला. त्यांनीं समर्थास साष्टांग नमस्कार करून प्रार्थना केली कीं “ महाराज! आपले आज्ञेवरून मठांतील विषय काढून याद करीत असतां त्यांतील विषय समर्थ खर्च करीत आहेत. तेव्हां स्वाभाविक विनंति केल्यानें इतका क्रोध आणावा हें काय ? त्याबद्दल काय आज्ञा होणें ती व्हावी. ” समर्थ म्हणाले “ बापा ! जो विषय एकवार खर्ची पडला तो पुन्हा जमेस कसा येईल ? ”

तेव्हां आक्का म्हणाल्या “ विषय प्रत्यक्ष दिसत असतां खर्च झाला म्हणून आज्ञा होत आहे हें काय ? ” समर्थ बोलले “ बापा ! ज्यांनीं ज्याकाळीं तो अर्पण केला, त्याच काळीं त्यांच्या घरीं खर्ची पडला. येथें दिसला तरी खर्ची पडलेलाच आहे. देवालयाबद्दल जो नूतन विषय येईल तो जमा होईल.” मंडळीनीं विनंति केली “ महाराज ! राजेश्री तर समाप्त झाले. आतां देवालय व दिपमाळ कोण बांधणार ? ” त्यावर आज्ञा झाली कीं “ ज्यास आमची आज्ञा झाली आहे तोच बांधविणार. त्याच्याकडे आमची पुष्कळ बाकी आहे. ते समाप्त झाले तरी चिंता नाहीं. त्याची काळजी तुम्ही करण्याचें कारण नाहीं. ” असें म्हणून जो विषय वांटून राहिला होता, तो नेऊन ठेवा म्हणून आज्ञा झाली, आणि आपण उठून खोलींत गेले.

ह्यानंतर आणखी थोडे दिवस समर्थांची स्वारी चाफळास होती. ती मागाहून परळीस जावयास निघाली, आणि श्रीची आज्ञा घेतांना प्रार्थना केली कीं, “ महाराज ! हा देह उत्पन्न करून सेवा घेतली तेवढी केली. पुढें आपली जे सेवा करतील त्यांचें कल्याण करावें. सांप्रदायाचा अभिमान आंस आहेच. ही विनंती करण्याइतकें माझें सामर्थ्य नाहीं.” याप्रमाणें बोलून देवालयांतून सर्वांस बाहेर जावयास सांगितलें. आणि आपण

एकटेच आंत बसले. ते चार घटका एकटेच होते. तोंपर्यंत सारें देवालय अत्यंत तेजःपुंज असल्याचें सभामंडपांत बसलेल्या मंडळीस दिसत होतें. नंतर आनंदयुक्त मुद्रेनें समर्थ बाहेर येऊन श्रीस साष्टांग नमस्कार घातला, आणि मारुतीची आज्ञा घेऊन शिबिकेंत बसून समर्थ सज्जनगडावर गेले. चाफळच्या मठाचें हेंच शेवटचें दर्शन होय.

**संभाजी महाराज**—आपल्या मागें आपल्या कनिष्ठ पुत्रास गादीवर बसवून राज्यकारभार चालवावा, असा शिवाजी महाराजांचा हेतु होता व त्याप्रमाणें कारभारी मंडळींनीं राजाराम महाराजांस गादीवर बसवून महाराजांचें उत्तर कार्य वगैरे पार पाडलें. परंतु तें राजकारण फुटलें आणि पन्हाळगडावर ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज यांस कळून पुढें ते येऊन सिंहासनवर बसले, इत्यादि मजकूर इतिहासज्ञ लोकांस विदितच आहे. संभाजीमहाराजांच्या राज्यारोहणसमारंभास समर्थांस निमंत्रण गेलें होतें, व त्यांनीं आपल्यातर्फें दिवाकर भटजीस तेथें पाठविलें होतें. त्याप्रमाणें संभाजी महाराज सिंहासनावर बसले. समारंभ मोठ्या थाटानें उरकला. दिवाकर भटजींचाही मानसन्मान व गौरव उत्तम रीतीनें करण्यांत आला.

पुढें संभाजी महाराज समर्थांच्या दर्शनासाठीं सज्जनगडावरही गेले होते. नजरनजराणा वगैरे पुष्कळ पुढें ठेवून साष्टांग नमस्कार घालून संभाजी महाराज हात जोडून पुढें उभे राहिले. त्यांस बसावयास आज्ञा करून समर्थांनीं बराच वेळ उपदेश केला व त्यांत विशेषेंकरून शिवरायांनीं राज्य केलें त्याप्रमाणें आपण करून आपणही तसेंच वागावें असें सांगितलें. महाराजांनींही ‘ आज्ञेप्रमाणें वागतों ’ म्हणून कबूल केलें. नंतर संभाजी महाराजांनीं उठून सारा मठ पाहिला. तों तो फार जीर्ण दशेस आल्याचें दृष्टीस पडलें. म्हणून तो नवा बांधण्याविषयीं कारभाऱ्यांस आज्ञा झाली, व तोंपर्यंत समर्थ ओवऱ्यांतच राहूं लागले. मठ तयार होतांच मठांत गेले, व अतःपर बाहेर जावयाचें नाहीं असें म्हणूं लागले. तेथपासून समर्थ बहुधा खोलींतच बसत, किंवा फार तर दक्षिणेकडील सोप्यांत बसत.

त्यानंतर पुन्हा संभाजीमहाराज समर्थांच्या दर्शनाकरतां गेले, व सातान्यांत मुक्काम करून गडावर सांगून पाठविलें कीं, “ मी दर्शनाकरितां आलों आहे. येण्यास आज्ञा असावी. ” त्यावर समर्थांचा निरोप आला

कीं, " जीवास समाधान नाहीं, ह्यासाठीं येणें होऊं नये. " असा निरोप आल्यावरून संभाजी महाराजांनीं कांहीं उपायन वगैरे पाठवून देऊन आपण परत रायगडास गेले. नंतर त्यांच्या अनन्वित कृत्यास प्रारंभ झाला, व तीं समर्थांच्याही कानावर येऊं लागलीं. बाळाजी आवजी चिटणीस, श्यामजी आवजी बोकील, विठोजी फर्जंद, ह्या चौघांस हत्तींच्या पायाखालीं ठार मारलें! अनाजी दत्तो यास चुन्याच्या भट्टींत घालून संगमेश्वरास जाळून टाकलें! अशा रीतीनें कलुषाच्या संगतीनें महाराज नाहीं नाहीं ते अनाचार करूं लागले. हें सारें ऐकून समर्थही फार हळहळले. वरच्या सारखीं मनुष्यें म्हणजे दिव्य रत्नें होत. तीं नष्ट होणें हें कांहीं बऱ्याचें लक्षण नव्हे. असें मनांत आणून पुष्कळ लोकांनीं समर्थांस विनंति केली कीं, " महाराजास एखादें पत्र लिहून ते ताळ्यावर येतील असा कांहीं तरी उपदेश करावा. " त्यावर समर्थ म्हणाले " श्रीच्याच इच्छेनें ती गोष्ट झाली. आतां इलाज काय ? उपदेशाचा फारसा उपयोग होणार नाहीं. " " परंतु एकवार पत्र लिहून तर पाठवावें. " असा मंडळींनीं गळ घातला तेव्हां शके १६०३ पौषमासीं समर्थांनीं संभाजी महाराजांस एक उपदेशपर उत्तम पत्र लिहिलें तें असें:—

## ओंव्या

**अखंड सावधान असावें ॥ दुश्चित कदापि नसावें ॥**
**तजवीज करित बसावें ॥ एका स्थळीं ॥ १ ॥**
**कांहीं उग्र स्थिती सोडावी ॥ कांहीं सौम्यता धरावी ॥**
**चिंता पराची लागावी ॥ अंतर्यामीं ॥ २ ॥**
**मागील अपराध क्षमा करावे ॥ कारभारी हातीं धरावे ॥**
**सुखी करून सोडावे ॥ कामांकडे ॥ ३ ॥**
**पाटांतील तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ॥**
**तैसें जनाच्या मना ॥ कळलें पाहिजे ॥ ४ ॥**
**जनांचा प्रवाहा चालिला ॥ म्हणजे कार्यभाग आटोपला ॥**
**जन ठायींठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥**

श्रेष्ठीं जें जें मिळविलें ॥ त्यासाठीं भांडत बसलें ॥
तरी मग जाणावें फावलें ॥ गलीमांशी ॥ ६ ॥

ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्याशि जाये ॥
धरि धरून महत्कार्य ॥ समजून करावें ॥ ७ ॥

आधींच पडली धास्ती ॥ मग कार्यभाग होय नास्ती ॥
याकारणें समस्तीं ॥ बुद्धी शोधावी ॥ ८ ॥

राजी राखतां जग ॥ मग कार्यभागाची लगबग ॥
ऐसें जाणोनियां सांग ॥ समाधान करावें ॥ ९ ॥

सकळ लोक एक करावे । गलीम निवटुन काढावे ॥
येणें कीर्ति धांवे ॥ दिगंतरीं ॥ १० ॥

आधीं गाजवावे तडाखे ॥ तरी मग भूमंडळ धाके ॥
ऐसें न होतां धक्के ॥ राज्यास होती ॥ ११ ॥

सभय प्रसंग ओळखावा ॥ राग निवटून काढावा ॥
आला तरी कळों न द्यावा ॥ जगामाजीं ॥ १२ ॥

राज्यामध्यें सकळ लोक ॥ सलगी देऊन करावे साफ ॥
लोकांचे मनाधाक ॥ उपजोंचिनये ॥ १३ ॥

बहुत लोक मिळवावे ॥ एक विचारें भरावे ॥
कष्ट करोनी घसरावें ॥ म्लेंच्छावरी ॥ १४ ॥
आहे तितकें जतन करावें ॥ पुढें आणिक मिळवावें ॥
महाराष्ट्रराज्य करावें ॥ जिकडेतिकडे ॥ १५ ॥

अहंमती लोकीं धरावी ॥ हिंमतीची तरवार करावी ॥
चढतीबढती पदवी ॥ पावाल येणें ॥ १६ ॥

शिवराजास आठवावें ॥ जीवित तृणवत मानावें ॥
इहलोकीं परलोकीं तरावें ॥ कीर्तिरूपें ॥ १७ ॥

शिवराजाचें आठवावें रूप ॥ शिवराजाचा आठवावा साक्षेप ॥
शिवराजाचा आठवावा प्रताप ॥ भूमंडळीं ॥ १८ ॥

**शिवराजाचें कैसें बोलणें ॥ शिवराजाचें कैसें चालणें ॥**
**शिवराजाची सलगी देणें ॥ कैसी असे ॥ १९ ॥**
**सकल सुखाचा करावा त्याग ॥ करूनि साधिजे तो योग ॥**
**राज्यसाधनाची लगबग ॥ कैसी केली ॥ २० ॥**
**त्याहून करावें विशेष ॥ तरीच म्हणवावें पुरुष ॥**
**याउपरी आतां विशेष ॥ काय लिहावें ॥ २१ ॥**

हें समर्थांचें पत्र पाहून संभाजीमहाराजांस परम संतोष होऊन तें पत्र देणारास वस्त्रें, पात्रें, जवाहीर वगैरे देऊन त्याबरोबर "आज्ञेप्रमाणें करतों" म्हणून उत्तर पाठविलें. परंतु तें शौर्यादि गुणांनीं संपन्न असूनही दुःसंगतीच्या योगानें अगदीं बिघडले होते. यामुळें हा समर्थांचा उपदेश म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी असें झालें. त्याचा फलादेश पुढें कोठपर्यंत जाऊन पोंहचला हें इतिहासावरून सर्वविश्रुतच आहे !

**अंतकालची स्थिति**—शके १६०३ मध्यें * पौषात्मक मार्गशीर्षमासीं कल्याणस्वामी डोमगांवाहून समर्थांच्या दर्शनास आले. त्यावेळीं दासबोधाचा विसावा दशक संपला. मूळ प्रत कल्याणांनीं लिहिली व समर्थांनीं ती वाचून पाहून चुकलेलीं अक्षरें स्वहस्तें घालून ठेवलीं. ही मूळ प्रत डोमगांवच्या मठांत आहे. थोड्या दिवसांनंतर कल्याणस्वामी निघून गेले, व त्या दिवसापासून समर्थांनीं अन्न वर्ज्य केलें. दुग्ध प्राशन करून राहत. उद्धव किंवा आक्कांनीं विडा दिला तर खात, किंवा आपल्या हातानेंही करून घेत. आक्काशिवाय व उद्धवाशिवाय दुसऱ्या कोणासही खोलींत जाण्यास परवानगी नव्हती. दिवसेंदिवस प्रकृति अधिकाधिक क्षीण होत चालली. त्यामुळें सर्वांसच काळजी उत्पन्न झाली. उद्धवांनीं व आक्कांनीं विचारलें कीं, "व्याधी शमनार्थ अनुष्ठान बसवितों; व उत्तम वैद्य आणतों." हें ऐकून समर्थ हांसले आणि म्हणाले "आजपर्यंत सर्व लोकांस ज्ञान पढवुन आपणच देहावर ममता धरावी होय ! जें काय होणें

* ह्यावरून शके १६०३ मध्यें मार्गशीर्षमास हा क्षय मास होता असें दिसतें.

तें देहाला होतच आहे. वैद्य आणविण्याचें कारण नाहीं, आणि वैद्याचा कांहीं उपयोगही व्हावयाचा नाहीं."

अशा स्थितींतच पंढरपूरकर उद्धवगोसावी म्हणून एक हरिदास आले. व त्यांचें कीर्तन करविलें. त्या कीर्तनाला समर्थ खोलीच्या बाहेर येऊन बसले होते. त्यावेळेस मुखकमल तेजःपुंज, शरीरकांति दिव्य वगैरे पाहून जिजोजी काटकर हावालदार वगैरे मंडळी आपआपसांत म्हणूं लागली कीं, समर्थांची प्रकृति बरी नाहीं म्हणतात, परंतु व्याधीचें चिन्ह कांहीं दिसत नाहीं. शरीर तर दिव्य आहे. यावरून खोलींत बसून कांहींतरी साधन करीत असावेत असें दिसतें." कीर्तन समाप्त झाल्यानंतर गोसावी यांस चार दिवस ठेवून घेऊन योग्य सत्कार करून निरोप दिला.

**अवतारसमाप्ती**—पण हा सारा देखावा निखालस वरपांगी होता. समर्थांच्या शरीरांतील व्यथा वाढतच होती. ती शेवटीं विकोपास जाऊन पोंचली. इतक्यांत माघ कृष्ण ५ च्या दिवशीं तंजावराहून व्यंकोजी राजे यांजकडून पंचधातूंच्या १३ मणांच्या चार मूर्ति पूर्वीं मेणवून दिल्या होत्या त्या येऊन पोंचल्या. त्या व्यंकोजी महाराज ह्यांनीं नेत्रांस मेण वगैरे लावून फार बंदोबस्तानें मल्हारराव निंबदेव थेऊरकर व केशव गोसावी ह्यांजबरोबर स्वामींकडे रवाना केल्या होत्या. त्या मूर्ति ह्याच दिवशीं परळीस येऊन पोंचल्या. त्या पाहून समर्थांनीं त्या मूर्तींच्या नेत्रा-वरील मेण काढून त्या अवलोकन केल्या. तों सांगितल्याप्रमाणें ध्यान अगदीं बरोबर आहे असें पाहून त्यांस परम संतोष झाला. आणि मग ते ज्या खोलींत निजत होते, तेथेंच सिंहासन करून त्यावर त्या मूर्तींची स्थापना करून अर्चा करविली. आणि पुढें या मूर्तींचें जे कोणी अर्चन व पूजन करतील त्याजवर श्री कृपा करतील असें बोलले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं म्हणजे माघ शुद्ध ६ चे दिवशीं आक्का, उद्धवादि सर्व मंडळी जवळ बसली असतां आतां आपणांस हा लोक सोडून परलोकीं लौकरच जाणें आहे हें: ह्या मंडळीमध्यें कोणास कळलें किंवा नाहीं हें पहावें व सुचविलें असतां समजतात किंवा नाहीं, समजून कोणी उत्तर देतात किंवा नाहीं याची परीक्षाही पहावी, या हेतूनें समर्थांनीं एक श्लोकार्ध म्हटला तो असाः—

## श्लोकार्ध

**रविकुल तिलकाचा वेळ सन्नीध आला ।**
**तदुपरि भजनानें पाहिजे सांग केला ॥**

ह्या प्रमाणें पूर्वार्ध ऐकल्याबरोबर उद्धव गोसावी यांणीं त्याच श्लोकाचा उत्तरार्ध म्हणून उत्तर दिलें, तें:—

## उत्तरार्ध

**अनुदिनि नवमी हे मानसीं आठवावी ।**
**बहुत लगबगीनें कार्यसिद्धी करावी ॥ १ ॥**

हा उद्धवांनीं तत्काल म्हटलेला उत्तरार्ध ऐकून समर्थांस अत्यंत संतोष झाला. व ते मोठ्यानें म्हणाले "उद्धवा! शाबास! भले शाबास!!" असें म्हणून भजनाचा समारंभ सुरू करविला. रात्रंदिवस सारखा नामघोष चालला होता. अखेर नवमीचा दिवस उजाडला. त्या दिवशीं समर्थ प्रातःकाळीं उठून मूर्तीस साष्टांग नमस्कार घालून दिगंबर होऊन भूमीवरच बसले. त्या समयीं नित्याप्रमाणें जिजोजी काटकर हवालदार, मुद्राधारी व समस्त गडकरी आदिकरून मंडळी खोलीबाहेर दर्शनाकरितां उभी राहिली होती. आक्का व उद्धव गोसावी मात्र खोलीच्या आंत होतीं. त्यांनीं स्वामींस प्रार्थना केली कीं, महाराज! मुद्राधारी बाहेर दर्शनास आले आहेत, त्यांस आंत येण्याविषयीं आज्ञा व्हावी. तेव्हां समर्थांनीं 'येऊं द्या' असें म्हटल्यावर जिजोजी काटकर, कारखानवीस, फडणीस व सबनीस यांणीं येऊन सद्गदित अंतःकरणानें दंडप्राय नमस्कार घालून साखर व मनुका पुढें ठेवल्या आणि विनंति केली कीं, "महाराज! आज नऊ दिवस झाले. पोटांत अन्नरस नाहीं कांहीं नाहीं, ह्यास्तव कृपा करून साखर पाणी तरी घ्यावें." तेव्हां समर्थांनीं "उत्तम आहे" असें म्हणून थोडीशी साखर तोंडांत टाकली, व आक्कांनीं वाटीभर पाणी दिलें तें प्राशन करून सर्वांस विडे देऊन बाहेर बसावयास आज्ञा केली.

खोलीमध्यें आक्का व उद्धव गोसावी मात्र होते. त्यांनीं विनंति केली कीं "महाराज! पलंगावर चलावें." समर्थ म्हणाले "आमच्यानें

उठवत नाहीं; तुम्हीच उठवा." म्हणून आक्का व उद्धव गोसावी दोघे मिळून उचलूं लागले पण ते उचलेनात म्हणून आणखी चौघांस हाक मारली. तरीही उचलेनात. तेव्हां उद्धवांनीं प्रार्थना केली कीं "महाराज! आपण उचलत नाहीं !" समर्थ म्हणाले "बरें; नाहीं तर नाहीं; तुम्ही सारे पलीकडे व्हा." त्या प्रमाणें सर्व मंडळी बाजूस झाली तेव्हां समर्थांनीं मूर्तीकडे ध्यान लावून प्राणाकर्षण करण्यास आरंभ केला. हें पाहून आक्का व उद्धव हीं मोठ्यानें रडूं लागलीं. तें पाहून समर्थ म्हणाले "तुम्ही आज-पर्यंत माझ्या सेवेंत राहून अनेक प्रकारें वेदांत श्रवण केला आहे. असें असून ह्या समयीं असे श्रमी होतां हें काय ? अरे! अध्यात्म ऐकल्याचें फळ हेंच कीं काय ?" त्या समयीं आक्कांनीं हात जोडून विनंति केली कीं, "महाराज! श्रमी होण्यासारखें किंवा ममतेंत गुंतण्यासारखें स्वामींनीं कांहींच ठेवलें नाहीं. परंतु या सगुण मूर्तीचें दर्शन इतःपर व्हावयाचें नाहीं म्हणून श्रम वाटतात !" हें ऐकून स्वामींनीं एक अभंग म्हटला, तो हाः—

## अभंग

**माझी काया गेली खरें, परि मी आहे जगदाकारें ॥**
**ऐका स्वहित उत्तरें, सांगेन तीं ॥ १ ॥**
**नका करूं खटपट । पहा माझा ग्रंथ नीट ॥**
**तेणें सायुज्याची वाट । ठायीं पडे ॥ २ ॥**
**राहा देहाच्या विसरें । वर्तू नका वाईट बरें ॥**
**तेणें मुक्तींचीही द्वारें । चोजविती ॥ ३ ॥**
**रामीं रामदास म्हणे । सदास्वरूपीं अनुसंधान ॥**
**करा श्रीरामाचें ध्यान । निरंतर ॥ ४ ॥**

अंतकाळचा समय फार कठीण आहे. कविवर्य विठोबा अण्णा दप्तरदार ह्यांनीं एका पदांत म्हटलें आहेः—

**अंतसमय परम घोर । दोषत्रय करिति जोर ॥**
**घुरु घुरु घुरु घुरु कंठ होय । भरिल भ्रम हरिल स्मृति करिल घाबरा ॥ करि० ॥धृ०॥**

अशा प्रकारची स्थिति प्राप्त झाली असतां, त्यांत नामस्मरण होणें सुद्धां दुरापास्त, असें असतां अशा समयीं समर्थांनीं ,इतरास बोध केला, नवा अभंग रचला, हें तरी केवढें सामर्थ्य ! अगाध नव्हे काय ?

हा अभंग सांगून स्वामींनीं सर्वांचें समाधान केलें. तेव्हां आक्कांनीं विनंति केली कीं, " महाराज ! परमार्थ दृष्टीनें स्वामी जगदंतरीं आहेत हें खरें, परंतु आजपर्यंत प्रत्यक्ष दर्शन होत असून परस्पर संभाषणादि व्यवहार होत होता, तो नाहींसा होणार; ह्याबद्दल खेद होतो. " स्वामी म्हणाले " दासबोध व आत्माराम हे दोन ग्रंथ पाहावे, व त्यांचीं पारायणें करावीं, म्हणजे आम्हांशीं प्रत्यक्ष भाषण केल्यासारखें होईल. "

ह्या वेळीं सर्व मंडळी खोलीच्या बाहेर उभी, व दाराजवळ उद्धव गोसावी, केशव गोसावी, शिवराम गोसावी व त्यांची बहीण व उद्धवपंत इतके होते. स्वामींच्या जवळ आक्का मात्र होत्या. तों समर्थांनीं एकवीस वेळा ' हर हर ' शब्द करून ' श्रीराम ' असें म्हणून मूर्तीकडे अवलोकन केलें. तों त्यांच्या मुखांतून दिव्य तेज निघून तें मूर्तीच्या मुखांत प्रविष्ट झालें ! तो दिवस शालिवाहन शके १६०३ दुर्मुखनाम संत्वसरीं माघ वद्य ९ मंदवारीं दोन प्रहरीं स्वामींनीं देह ठेवून स्वस्वरूपीं प्रवेश केला ! ! ! समर्थ असो कीं महासमर्थ असो; मृत्यूला सर्व सारखे !

देहसार्थक—समर्थांची कीर्ति इतकी दुमदुमलेली होती कीं, त्यांच्यावर भक्ति नाहीं असा मनुष्य काशीपासून रामेश्वरापर्यंत विरळाच आढळेल. मग त्यांच्या सान्निध्यास राहणाऱ्या सेवकांची त्यांच्यावर केवढी भक्ति व किती प्रेम असेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे. समर्थांचा सहवास क्षणभर घडला तरी ते आपल्या मायबापाप्रमाणें वाटत, मग ज्यांचा सारा जन्मच त्यांच्या सेवेंत खर्च झाला होता, ज्यांना कधीं क्षणभरही त्यांचें वियोगदुःख माहीत नव्हतें, अशा लडिवाळ भक्तांवरच त्यांच्या अखंड वियोगाचा प्रसंग आल्यावर त्यांस काय बरें वाटावें ? अशा ममतेचीं मनुष्यें म्हणजे आक्का, उद्धवगोसावी व कल्याणस्वामी हीं होत. ह्यांपैकीं कल्याणस्वामी तर जवळ नव्हतेच, ते डोमगांवीं गेले होते. परंतु समर्थांची प्रकृति इतकी क्षीण झालेली पाहून अशा स्थितींत त्यांना सोडून ते डोमगावांस कसे गेले ? हा एक गूढ प्रश्न मनांत उद्भवतो यांत शंका नाहीं. असो;

आक्का व उद्धवगोसावी ह्यांनीं मात्र समर्थांचें देहावसान होतांच जो शोक केला तो ' न भूतो न भविष्यति ' अशा प्रकारचा होता. परंतु त्यांचा अधिकारही तसाच मोठा, त्यांचीं अंतःकरणें कसलेलीं व अध्यात्मज्ञान आंगांत मुरलेलें असल्यामुळें त्यांनींही क्षणाभरानें तो शोक आवरला, व पुढील तयारीस लागले. समर्थांच्या देहाचें दहन कोणत्या स्थळीं करावें, हा पहिला प्रश्न उपस्थित होऊन त्याबद्दल बरीच भवति न भवति सुरू झाली. त्यांत कोणी म्हणाले "मठाच्या उत्तर भागीं पटांगण असून त्याच्यामध्यें एक खळगा आहे, तो भरून काढावा असें शिवाजी महाराज म्हणत असतां समर्थ म्हणाले " तो खळगा बुझवूं नये. पुढें कशाच्या तरी उपयोगीं पडेल." म्हणून तो खळगा तसाच ठेवलेला आहे. त्याच ठिकाणीं देहाचें दहन व्हावें. " इतक्यांत आक्का म्हणाल्या "होय; मलाही ती गोष्ट आठवते खरी. त्याप्रमाणें त्याच ठिकाणची स्थलशुद्धि करून बिल्वकाष्टें व तुळशीकाष्टें आणवून दहन करण्यांत आलें. समर्थांचें उत्तर कार्य यथाविधि व्हावें म्हणून संभाजी महाराजांनीं रामचंद्र पंत अमात्य यांस विपुल द्रव्य देऊन पाठविलें होतें. त्यांचें उत्तरकार्य उद्धव गोसावी यांजकडून यथासांग करविलें. नंतर त्या ठिकाणीं समाधि बांधून समर्थांचे शिष्य तारळेकर गोसावी यांजकडून चंदनाचा ओटा तयार करून त्यावर पादुका स्थापन केल्या आणि तेथें लहानसें देवालय बांधलें. अस्थि जमा करून त्या भागीरथीस नेण्याकरितां चाफळच्या मठासमोर वृंदावन तयार करून त्यांत ठेविल्या.

**नंतरचें वर्तमान**—समर्थांची स्थिति अत्यवस्थ आहे, तोंच संभाजी महाराजांच्या राज्यारोहणाच्या समारंभासाठीं समर्थांस आमंत्रण आलें होतें. त्याप्रमाणें समर्थांनीं दिवाकर भटजीस आपल्या तर्फेनें त्या समारंभासाठीं रवाना केलें होतें. तो समारंभ पुरा होतो न होतो तोंच समर्थ निजधामास गेल्याचें वर्तमान रायगडीं पोंहचलें. तेव्हां दिवाकर भटजी संभाजीमहाराजांची आज्ञा घेऊन तसेच निघून परळीस आले. त्यांस इत्यंभूत वर्तमान कळविण्याविषयीं महाराजांनीं सांगितलें होतें.

इतक्यांत चंदीचंदावराहून म्हणजे तंजावराहून श्रीसमर्थांचें दर्शनाकरितां भीमाजीबावाही येऊन पोंचले. तों त्या दिवशीं समर्थांस निज-

धामास जाऊन तीन दिवस झाले होते ! त्यांनीं हें दुःखदायक वर्तमान ऐकून पराकाष्ठेचें दुःख केलें. म्हणून त्यांस समर्थांनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांचें समाधान केलें, असें बखरींत वर्णन आहे. आक्का व उद्धवगोसावी यांसही समर्थांनीं प्रत्यक्ष दर्शन दिल्याचा उल्लेख आहे. समर्थ परंधामीं गेल्याचा सारा वृत्तांत भीमाजीबावा ह्यांनीं ओवी वृत्तांत लिहून ठेविला आहे. ह्या ओव्या ५१ आहेत. भीमाजीबावा हे एक संवत्सरपर्यंत परळीस होते. नंतर ते तंजावरास गेले.

**संभाजीमहाराजांची भक्ति**—संभाजी महाराजांच्या सद्गुणाविषयीं बहुधा चुकून सुद्धां कोणी उल्लेख केलेला नाहीं. केलाच असला तर तो खंडीमध्यें पाव रती सारखाच आढळतो. तथापि त्यांच्या अंगीं सुद्धां शौर्य, अभिमान वगैरे अनेक सद्गुण होते यांत संशय नाहीं. परंतु त्यांची ख्याती जी काय आहे ती दुर्गुणामुळें आहे. असो; त्यांच्या अंगी जे सद्गुण होते त्यांत गुरुभक्ति व गुणग्राहकता हा गुणही एक प्रमुख होता ही गोष्ट विसरतां कामा नये. संभाजी महाराजांच्या दुर्वर्तनामुळें समर्थांची त्यांच्यावर भक्ति नव्हती, किंबहुना त्यांचा त्यांना कंटाळाच वाटत होता, ही गोष्ट ते भेटावयास आले असतां ' जिवास समाधान नाहीं. याकरितां येणें होऊं नये.' अशा रोख ठोक आज्ञेवरून स्पष्ट दिसते. खरोखर दुसरा कोणी राजपुत्र असता तर समर्थांच्या दर्शनास पुन्हा कधींही गेला नसता; इतकेंच नव्हे, तर कदाचित् तेवढ्या अपमानानें तो चिडूनही गेला असता. परंतु संभाजी महाराजांची समर्थांवर परिपूर्ण भक्ति व पूज्य बुद्धि असल्याचें स्पष्ट दिसून येतें. त्यांनीं समर्थांविषयीं किती प्रकारें पूज्यबुद्धि व्यक्त केली आहे पहाः—

१ प्रथम परळीस जाऊन दर्शन घेतलें. मठ वगैरे लक्षपूर्वक अवलोकन करून तो जीर्ण झालेला आहे असें दिसून येतांच नवा बांधावयास हुकूम केला.

२ प्रथम समर्थांनीं जो उपदेश केला त्याप्रमाणें वागतों असें विनयानें सांगितलें.

३ पुन्हा दर्शनासाठीं साताऱ्यास जाऊन परळीस सांगून पाठविलें. त्यावर ' जिवास समाधान नाहीं, यासाठीं येण्याचें करूं नये. ' अशी

आज्ञा आली. तरी कांहीं आणलेलें उपायन वगैरे पाठवून खासा स्वारी परत रायगडास गेली, त्याबद्दल मनांत कांहीं किंतु ठेवला नाहीं !

४ राज्याभिषेकाच्या समारंभास येण्याविषयीं विनंतिपत्र देऊन परळीस समर्थांकडे कारकून पाठविला.

५ समर्थांनीं लिहिलेलें ओवीबद्ध पत्र शिरसावंद्य करून आज्ञेप्रमाणें चालतों असा सविनय निरोप पाठविला.

६ समर्थ निजधामास गेल्याचें वर्तमान समजतांच रामचंद्रपंत अमात्य यांजपाशीं विपुल द्रव्य देऊन उत्तरकार्यासाठीं तावडतोब सज्जनगडास पाठविलें.

७ दिवाकरभटजींस तावडतोब निरोप देऊन समर्थांच्या निधनाचें साद्यंत वृत्त लिहून कळविण्याविषयीं आज्ञा केली.

८ भिकाजीबावा यांस समर्थांचें समग्र चरित्र लिहिण्यास आज्ञा केली.

९ समाधीवर लहान देवालय होतें तें मोठें करून प्रतिवर्षीं उत्सव होण्यासारखी उत्तम नेमणूक करून दिली.

ह्यावरून संभाजी महाराजांचीहि समर्थांच्या ठिकाणीं केवढी भक्ति होती हें स्पष्ट होतें. आणि तें त्यांना अत्यंत भूषणप्रद आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.

**कल्याणस्वामींच्या काळाचा योगायोग**—समर्थांच्या पश्चात् उद्धव गोसावी टाकळीच्या मठांत होते. त्यांचा शके १६३२ त फाल्गुन कृष्ण १:स टाकळी येथें काळ झाला. उद्धव गोसावी हे समर्थांस पुत्रवत्च होते, म्हणून सर्व कारभार जरी आक्का व कारभारी वगैरे पहात तरी ते वर्षास सज्जनगडीं व चाफळास आले म्हणजे वर्षाचा सारा हिशेब त्यांना समजून देत, व पुढें काय काय करावयाचें व कसें करावयाचें त्याची आज्ञा घेत, व त्या बरहुकूम सर्व कारभारी मंडळी चालत असत. म्हणजे समर्थांच्या पश्चात् उद्धव गोसावी हेच खरे मालक आहेत असें सर्व लोक समजत. उद्धव गोसावी गेले, तेव्हां त्यांच्या पश्चात् त्यांचे शिष्य केशव गोसावी म्हणून होते. त्यांच्याकडे टाकळी मठाचा अधिकार आला. तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, आतां काय आपण उद्धव गोसाव्याप्रमाणें सर्व संस्थानचे मालक झालों. म्हणून ते चाफळास येऊन आक्कावर वगैरे

पाहिजे तसा अंमल चालवूं लागले ! ते आक्काना व सरकारचे कारभारी ह्यांस मुळींच आवडलें नाहीं. म्हणून त्यांनीं त्यांस स्पष्ट जबाब दिला कीं, उद्धव गोसावी हे खरे खरे मालक होते. तशी मालकी तुम्ही गाजवूं म्हणाल तर आम्ही मुळींच तुमचें ऐकणार नाहीं. तुम्ही कारभारी या नात्यानें राहणें असल्यास रहा.

हें भाषण केशव गोसाव्याना फार दुःसह झालें. तेव्हां त्यांस वाटलें कीं आतां येथें रहाण्यांत शोभा नाहीं. याकरितां आपण निघून काशी-यात्रेस जावें. म्हणून ते डोमगांवास गेले. आणि कल्याणस्वामींपाशीं त्यांनीं गोष्ट काढली कीं, मी समर्थांच्या अस्थि घेऊन भागीरथीच्या स्नानास जातों. परंतु कल्याणस्वामी म्हणाले " तूर्त घाई करण्याचें कारण नाहीं. पुढें पाहतां येईल. " तेथें त्यांचा असा हिरमोड झाल्यामुळें ते पुन्हा परत चाफळास आले व तेथेंही पुन्हा तीच खटपट चालविली, पण तिलाही कोणी मान्यता देईना. ह्याप्रमाणें त्यांच्या पांच चार खेपा झाल्या. कोणतेंच बस्तान बसेना. म्हणून त्यांनीं असा निश्चय केला कीं, कांहीं असो, आपण अस्थि घेऊन येथून बाहेर पडावें म्हणजे कल्याणस्वामी सहजच अनुमोदन देतील. असें म्हणून ते अस्थि घेऊन निघाले. तेव्हां अर्थात् आक्का व कारभारी ह्यांनीं त्यांच्या खर्चाची तजवीज करून दिली. तेव्हां आतां आपण डोमगांवास जाऊन कल्याणस्वामींस भेटून पुढें जावें असें त्यांनीं ठरविलें. हें सर्व कल्याणस्वामींनीं अंतर्ज्ञानानें जाणून डोमगांवामध्यें आपल्या शिष्य मंडळीस जमवून सांगितलें कीं " केशवाला समर्थांच्या अस्थि काढण्याची घाई करूं नको असें सांगत असतां त्यानें घाई करून अस्थि बाहेर काढल्या. समर्थ भागीरथीच्या स्नानास निघाले, तेव्हां आतां आम्हासही गेले पाहिजे. आम्हीही देह ठेवतों, आमच्या अस्थीही त्याच्याबरोबर द्या.'' असें सांगून सारी निरवानिरव करूं लागले. तें पाहून मंडळींनीं विनंति केली कीं " केशव गोसावी अस्थि घेऊन आले तरी ते येथें राहतील, अथवा गडी पाठवून त्यांस माघारे पाठवितों. " त्यावर कल्याणस्वामी म्हणाले " आतां त्याचा कांहीं उपयोग नाहीं. " " नंतर सेवेस कोणाला आज्ञा व्हावयाची ती व्हावी." अशी शिष्यांनीं विनंति केल्यावरून मुधोबा गोसावी यांच्या गळयांत मेखला घालून सांगितलें कीं, 'श्रीची पूजा

तुम्ही करावी आणि गंगाधरबुवा ह्यांचे आज्ञेंत चालावें.' असें सांगून रघुपतीपुढें दर्भासन घालून 'राम' शब्दाबरोबर देह ठेवला! तेरावे दिवशीं केशव गोसावी आले. तेव्हां सर्वांनीं त्यांचा फारच निषेध केला. त्यामुळें त्यांनाही फार वाईट वाटलें. नंतर कल्याणस्वामींच्याही अस्थि घेऊन केशव गोसावी निघाले ते काशीयात्रा करून परत उंब्रजेस येऊन राहिले.

**पश्चात् संस्थानची व्यवस्था**—श्रीची सेवा करण्याविषयीं समर्थांची आक्कांस आज्ञा झाली होती. त्याप्रमाणें दिवाकरभटजी व सरकारी कारभारी वगैरे असत, त्यांच्या अनुमतानें सर्व कारभार चालवीत. खर्चास द्रव्य पाहिजे तें सरकारांतून येत असे. उद्धव गोसावी प्रतिवार्षिक पुण्यतिथीला इंदूरच्या किंवा टाकळीच्या मठांतून येत व रामनवमीचा उत्साह झाला म्हणजे परत जात. त्या अवधींत वर्षामध्यें झालेला सर्व व्यवहार आक्का व दिवाकर भटजी उद्धव गोसाव्यांस समजून देत. व त्यामध्यें कमजास्ती काय करावयाचें तें उद्धव गोसावी सांगत, व त्याप्रमाणें पुढील तजवीज करीत असत. हा भाग पूर्वीं आलाच आहे.

पुढें शके १६१० मध्यें संभाजीमहाराजांस यवनांनीं धरून नेले व त्यांतच त्यांचा अंत झाला, आणि राजाराम महाराज गादीवर बसले. त्यानंतर शके १६२९ मध्यें संभाजी महाराजांचे चिरंजीव शाहू महाराज यवनांनीं दिल्लीमध्यें नेले होते ते परत आले. तेव्हां ते सज्जनगडावर येऊन त्यांनीं समाधीचें दर्शन घेतलें, व सारा वृत्तांत श्रवण करून श्रेष्ठांचे नातू गंगाधर स्वामी जांबेस होते त्यांस आणावयास पालखी पाठविली. त्याप्रमाणें ते माहुलीस येऊन पोंचले. हें कळतांच शाहूमहाराज स्वतः त्यास भेटावयास गेले. तों स्वामींची स्नानसंध्या होऊन नेत्र मिटून ते ध्यानस्थ बसले होते. इतक्यांत महाराजांची स्वारी आली असें पाहून शिष्यमंडळी गडबड करूं लागली. त्यांस महाराजांनीं हातानें सुचविलें कीं "गडबड करूं नये. ध्यान विसर्जन होऊं द्या." स्वामींचें ध्यान विसर्जन होण्यास सुमारें घटका अर्ध घटका लागली. तोंपर्यंत महाराज वाट पहात उभे होते. हा चमत्कार पाहून महाराजांबरोबर असलेल्या प्रतिनिधि वगैरे मंडळीस मोठा अचंबा वाटला. ते आपआपसांत म्हणूं लागले "शाहूपुढें कोणाचेंही आसन टिकावयाचें नाहीं. असें असतां ह्या स्वामींपुढें महाराज

उभे राहिले त्याअर्थी येथें तपश्चर्येचें तेज कांहीं विलक्षण दिसतें." इतकें होत आहे तोंच स्वामींनीं ध्यान विसर्जन केलें. तेव्हां महाराजांनीं त्यांस दंडवत् प्रणिपात करून हात जोडून पुढें उभे राहिले. व त्यांस 'बसावें' म्हणून आज्ञा होतांच बसले. इकडील तिकडील क्षेमकुशल प्रश्नोत्तर संपल्यानंतर महाराजांनीं विनंति केली कीं, "आजचा दिवस स्वामींचा मुक्काम येथेंच असों द्यावा. उदईक सरंजाम पाठवून नेण्याची तजवीज करतों." ह्याप्रमाणें सांगून निरोप घेऊन महाराज साताऱ्यास गेले.

दुसऱ्या दिवशीं शके १६३२ तील माघ शुद्ध ५ होती त्या मुहूर्तानें महाराज माहुलीपर्यंत सामोरे जाऊन सर्व लव्याजम्यानिशीं गंगाधरस्वामी यांस वाजत गाजत सज्जनगडावर नेलें. स्वामींस पाहतांच आक्का व उद्धव गोसावी त्यास नमस्कार करावयास सामोरे आले. त्यांस दुरून पाहतांच स्वामींनीं आधीं आपणच पुढें होऊन आक्कांच्या व उद्धव गोसाव्यांच्या चरणावर मस्तक ठेविलें. तें पाहून आक्कांनीं त्यांस उठवून म्हणाल्या कीं, आपण समर्थांचीं लेकरें आहां. आपणांस नमस्कार करण्याचा आमचा अधिकार आहे." स्वामी म्हणाले "छे छे! आपण समर्थांचीं मुलें; आणि मी समर्थांचा नातू. तेव्हां आपल्यास नमस्कार करणें हा माझाच अधिकार होय." ह्याप्रमाणें परस्पर आगतस्वागत होऊन सज्जनगडचें सर्व आधिपत्य गंगाधरस्वामींस देण्यांत आलें. मंगलवाद्यें वाजूं लागलीं. तोफांची सरबत्ती झाली. ब्राह्मणभोजन व दानधर्महीं करण्यांत आला. आतां पुढील व्यवस्था कशी करावयाची? असा स्वामींनीं प्रश्न केला असतां महाराजांनीं हात जोडून सांगितलें कीं "राज्य सारें स्वामींचें आहे. मी फक्त सेवेचा अधिकारी. जी आज्ञा होईल ती मान्य आहे."

अशा प्रकारें हें चाफळचें संस्थान शाहूमहाराजांच्या कारकीर्दींत श्रेष्ठांच्या वंशाकडे म्हणजे त्यांचे नातु जे गंगाधरस्वामी यांच्या सत्तेखालीं आलें. समर्थांचें चरित्र स्वमुखानें सांगून समर्थांची पहिली बखर तयार केलेली ती ह्यानींच. गंगाधरस्वामींच्या पश्चात् त्यांचें पुतणे लक्ष्मणस्वामी हे अधिकारापन्न झाले. त्यांचे चिरंजीव हनुमानस्वामी. शके १६९० मध्यें हनुमानस्वामींचा जन्म झाला. मागच्या सर्व आधारांवरून ह्यांनीं समर्थांचें चरित्र आपल्या शिष्यमंडळीस कथन केलें. तीच समर्थांची दुसरी बखर

होय. अशी ही श्रेष्ठांच्या वंशाची परंपरा चालत चालत आलेली आहे. हल्लींच्या चाफळच्या मठाधिपतींचें नांव गंगाधरबुवा असून त्यांची पहिल्या प्रतीच्या सरदारांत गणना आहे. ह्यांचें इंग्रज सरकारांतही वजन चांगलें आहे. सन १९०३ सालीं जो मोठा दिल्लीच्या दरबाराचा समारंभ झाला, त्यांत ह्यांना ब्रिटिश सरकाराकडून आमंत्रण होतें.

आक्का ह्या समर्थांच्या पश्चात् ४० वर्षें हयात होत्या! म्हणजे शके १६४३ मध्यें त्यांचा काल झाला. त्यांचें उत्तर कार्य गंगाधर स्वामींनींच केलें. सज्जनगडावर श्रींच्या देवालयाच्या ईशान्येस जें वृंदावन आहे, तेंच आक्कांचें समाधिस्थान होय.

येथें समर्थांच्या लीलेचा भाग संपला. चरित्रनायकानें स्वयंस्फूर्तीनें केलेल्या ज्या ज्या गोष्टी, अमानुष कृत्यें, अघटित घटना त्याचें नांव लीला. तिच्यामध्यें झालेल्या गोष्टींचें कथन मात्र असतें, परंतु स्पष्ट बोध नसतो. म्हणजे त्या गोष्टीवरून लोकांनीं तसेंच वागावें, किंवा तसें वागूं नये असें स्पष्टपणें कोठेंच सांगितलेलें नसतें. त्यांच्या ह्या लीलेंत जो भाग आपल्याला ग्राह्य वाटेल व जो आपल्याला ग्रहण करतां येण्यासारखा असेल, तो ज्यानें त्यानें आपआपल्या स्वशक्त्यनुसार ग्रहण करावा हें ज्याचें त्याचें काम असतें. त्यांतील वर्ज्यावर्ज्य भाग त्याचा त्यानें आपआपल्या विचारशक्तीप्रमाणें ठरवावा लागतो. परंतु ह्याच्या पुढचा भाग आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे तो कोणता? तर 'अनुग्रह' हा होय. अनुग्रह म्हणजे त्या महात्म्यानें केलेला प्रत्यक्ष उपदेश—बोध. लोकांना हाच भाग काय तो वेदतुल्य वाटत असतो. कारण, लोकांनीं वागावें कसें आणि न वागावें कसें, हें त्यांत त्या महात्म्यानें अगदीं विशद करून सांगितलेलें असतें. म्हणून प्रत्येक मनुष्यानें आपल्या हृदयाशीं सतत संलग्न करून ठेवण्याचा जो भाग त्याच भागाकडे आतां वळूं या.

**पूर्वार्ध समाप्त.**

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

## रामदासस्वामींचा लीलानुग्रह.

### उत्तरार्ध.

भाग पहिला.

अनुग्रह–दासबोध.

श्लोकः—यो जातो मरुदंशजो क्षितितले संबोधयत् सज्जनान्
ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम् ।
यः कीर्त्या पठनेन सर्व विदुषां स्वांतापहारिः सदा
सोयंमुक्तिकरः क्षितौविजयते श्रीरामदासोगुरुः ॥ १ ॥ *



पूर्वार्धामध्यें समर्थांच्या सर्व लीला कथन केल्या. ह्या भागांत त्यांच्या अनुग्रहासंबंधानें विचार करावयाचा आहे. परंतु 'अनुग्रह' शद्बाचे अर्थ दोन आहेत. एक विशिष्ट आणि दुसरा सामान्य. वास्तविक पाहिलें तर अनुग्रह याचा अर्थ उपदेश येवढाच आहे. पण उपदेशांतही असेंच विशिष्ट व सामान्य असे दोन भेद आहेत.

* जो मारुतीच्या अंशेंकरून मृत्युलोकावर अवतार घेऊन आला, त्यानें श्रीदासबोध नामक अत्यंत पावन ग्रंथ रचून साधुसंतांना उपदेशामृत पाजलें; ज्याची कीर्ति श्रवण केली असतां संपूर्ण विद्वज्जनांच्या अंतःकरणांतील हृत्ताप नाहींसा होऊन तीं सुप्रसन्न होतात; असा जो मुक्तिदाता सद्गुरु रामदास त्यांची ह्या पृथ्वीवर सदासर्वदा विजयध्वजा फडकत राहिली आहे.

एखाद्या सद्गुरुकडून एकादशाक्षरी किंवा त्रयोदशाक्षरी असा एखादा विधि-पूर्वक गुप्त मंत्र ग्रहण करून त्याचा जप करणें, किंवा त्या गुरूनें सांगितलेल्या दैवताची आमरणांत उपासना चालविणें ह्यालाही अनुग्रह किंवा गुरूपदेश असें म्हणतात. असा अनुग्रह समर्थांना साक्षात् श्रीरामचंद्रांनीं दिला होता, व पुढें ते तो स्वतः सर्वांस देत असत. त्यांनीं शिवाजी महाराजांस अनुग्रह प्रसाद दिला तो अशाच प्रकारचा होय. ह्या अनुग्रहापासून परिस्थींत काय काय बदल होतो, त्याचा मनाला अनुभव काय काय पटतो, ह्या गोष्टी ज्याच्या त्याच्या अनुभवाच्याच असल्याळें त्या अनिर्वचनीय होत. ह्यास्तव 'मंत्रानुग्रहाचा' भाग आम्ही सोडूनच देतों, आणि 'अनुग्रह' म्हणजे उपदेश हा जो साधारण अर्थ आहे व ज्यांत साधारणपणें सर्व आबालवृद्धांसच उपदेश केलेला असतो तेवढ्याच अनुग्रहाचा या लेखांत विचार करावयाचा आहे. असा अनुग्रह म्हणजे अशा समर्थ पुरुषांनीं जनांस वेळोवेळीं उपदेश केलेला असेल तो. हा उपदेश बहुधा काव्यमयच असतो. कारण अशा सत्पुरुषांची नेहेमींची बोलण्याची पद्धति असते ती काव्यमय किंवा छंदोमय असते. हें पूर्वीं अनेक वेळां येऊन गेलेंच आहे. तेव्हां समर्थांचीं अशीं काव्यें कोणकोणतीं आहेत व त्यांतील विषयाचें धोरण कसें काय आहे हें पाहावयाचें. असे समर्थांचे ग्रंथ म्हटले म्हणजे सर्व ग्रंथांत अग्रस्थानीं विराजमान होणारा 'दासबोध' हा होय. ह्याला पूर्वकालीन ज्ञात्यांनीं 'ग्रंथराज' असें म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे. तेव्हां समर्थांचा मुख्य अनुग्रह म्हणजे 'दासबोध' हाच ग्रंथ होय. त्यानंतर दुसरा ग्रंथ त्याच्या तोडीचा म्हणजे 'आत्माराम' हाही समर्थांचा केवळ आत्माच होय. "माझ्याशीं ज्यांना भाषण करावयाचें असेल, त्यानें 'दासबोध' व 'आत्माराम' हे दोन ग्रंथ पहावेत म्हणजे माझ्याशीं प्रत्यक्ष भाषण केल्याप्रमाणेंच आहे असें समजावें." ही तर समर्थांची अंतकालची सर्वांस आज्ञा आहे. तेव्हां या दोन ग्रंथांत विषय काय काय आहेत, त्यापासून जनांस ऐहिक व पारमार्थिक लाभ किती होण्यासारखा आहे, ह्याचाही यथाशक्त्या उहापोह करणें आमचें कर्तव्य असें आम्ही समजतों. याशिवाय 'जुना दासबोध' मनाचे श्लोक, अभंग, पंचकें, रामायण षड्रिपुविवेचन, भीमरूपी स्तोत्रें, करुणाष्टकें, अन्वयव्यतिरेक वगैरे अनेक

किरकोळ ग्रंथ व फुटकळ कवितां आहेत, त्या साऱ्या उपदेशपरच आहेत. ह्याशिवाय प्रसंगानुसार शिष्यवर्गास, मुलांस व राजेरजवाड्यांस पाठविलेलीं बोधपर पत्रें; त्यांचाही अंतर्भाव 'बोधपर अनुग्रहांतच' होतो. ह्यास्तव 'ग्रंथराज' दासबोधापासूनच ह्याचा आरंभ करूं. आणि स्थलावकाशाप्रमाणें इतर ग्रंथांसंबंधानेंही जेवढा शक्य तेवढा विचार करूं.

## दासबोध

मुकुंदराजांचा विवेकसिंधु, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, वामन पंडितांची यथार्थदीपिका, मोरोपंतांची केकावलि त्याप्रमाणेंच समर्थ रामदास स्वामींचाही 'दासबोध' हा सुप्रसिद्ध ग्रंथ आहे. ह्या प्रत्येक महात्म्याच्या प्रासादिक ग्रंथांत कांहीं ना कांहींतरी विशिष्ट गुण हे आढळतातच. त्या सर्वांचा निर्देश या स्थळीं करतां येणें मुळींच शक्य नाहीं. तथापि दोनच शब्दांत सांगावयाचें तर असें म्हणतां येण्यासारखें आहे.

१ **विवेकसिंधु**—विषय गहन वेदांताचा; भाषा सूत्रमय; फार प्राचीन. यामुळें सामान्य जनास दुर्बोध. प्राकृतांनीं घेण्यासारखा उपदेश त्यांत कांहीं नाहीं.

२ **भावार्थदीपिका-ज्ञानेश्वरी**—रचना सुंदर; भाषा मधुर व गोड; उपमा व दृष्टांतांची रेलचेल असून मनोल्हादक व रसाळ; गुरुभक्तीचें महात्म्य विशेष. परंतु गीतेचा अर्थ हा एकच विषय त्याला अनुसरून सारें प्रतिपादन; स्वतंत्र असा उपदेश नाहीं.

३ **यथार्थ दीपिका**—भावार्थ दीपिकेंतील गीतेचा अर्थ बरोबर नाहीं; चुकला आहे! म्हणून पंडितंमन्यांनीं 'यथार्थ दीपिका' केली! ह्यांत रस नाहीं; छंद नाहीं; गीतेशिवाय उपदेश नाहीं; कांहीं नाहीं. विद्वत्तेची सीमाच ज्यास

पहावयाची असेल त्याची हौस मात्र पुरी होईल. ह्यांत निव्ळ शब्दांचा कीस काढला आहे.

४ केकावलि—हें मयूर कवीचें स्तोत्र भक्तिप्रेमरसानें डवरलेलें आहे. कल्पनावैचित्र्य अप्रतिम ! रचना सुंदर. विचारस्वातंत्र्य, पण थोडेसें क्लिष्ट, आणि सामान्यजनांना प्रत्यक्ष उपदेश असा कांहींच नाहीं. काव्य अत्युत्कृष्टांपैकीं. परंतु मी अघोर पातकी; तूं दीनदयाळ; मी संसारसागरांत गटकळ्या खातों आहे; तूं येऊन माझा उद्धार कर, हेंच दैन्य भाकणें ह्याशिवाय दुसरा विषय नाहीं.

१ दासबोधांत याहून विशेष तें काय आहे ?

दासबोधांतील रचना मध्यकालीन इतर संतमंडळीच्या विषयरचनेहून पुष्कळ प्रकारें भिन्न आणि प्रापंचिक मनुष्यास घेण्यासारखा बोधच पुष्कळ असल्यामुळें, प्रत्येक मनुष्याच्या आचरणाचा घालून दिलेला तो एक कित्ताच आहे. एक तर तो स्वतंत्र ग्रंथ आहे; २ दुसरें, बोध हाच त्याचा स्वतंत्र विषय आहे, म्हणून त्याची उपयुक्तता ही विशेष आहे; भाषा अत्यंत गोड, शुद्ध व सुलभ अशी आहे. ३ तिसरें, विषयाची रचना अत्यंत व्यवस्थित व सुसंगत आहे. ४ चवथें; प्रपंच आणि परमार्थ ह्या दोहोंची यांत सांगड घातलेली आहे. पूर्वींची संतमंडळी संसार हा क्षणभंगुर मानून त्याच्याविषयीं उदासीन असावें अशा अर्थाचा विषय प्रतिपादन करीत. परंतु "प्रपंच करावा नेटका । मग भोगावें परमार्थसुखा !" असा हा प्रपंच–परमार्थ ह्यांचा मेळ घालून दिला असा एक समर्थांनींच.

इत्यादि दासबोधाच्या रचनेंत अनेक विशिष्ट गुण भरलेले आहेत. म्हणजे इतर साधुसंतांच्या ग्रंथांपेक्षां दासबोधांत जे विषय आहेत ते पारमार्थिक सुखापेक्षां ऐहिक सुखाच्या साधनास कारणीभूत असे फार आहेत. म्हणूनच गिरिधरस्वामींनीं जें त्यास 'ग्रंथराज' असें नांव दिलें तेंच अगदीं यथार्थ आहे. त्याचें विवेचन ओघानुसार येणारेंच असल्यामुळें आतां येथें त्याचा अधिक विस्तार करण्याचें कारण नाहीं.

परंतु एखाद्या भाग्यवंतानें उत्तम भूमी तयार करून त्यांत आम्रतरूचें बन तयार केलें, आणि पुन्हा त्या मालकानें किंवा त्याच्या वारसानें फिरून

त्या बागेकडे लक्ष दिलें नाहीं, तर त्याच बागेंतील बुंध्याशीं वारुळें वाढतात; रान फोंफावतें, व कांटेरी झाडें आंगांस ओरबाडूं लागतात. तसाच प्रकार ह्या दासबोधाच्या संबंधानें झाला आहे. 'दासबोध' नामक आम्रतरूचें उद्यान समर्थांनीं निर्माण करून तें महाराष्ट्रीय आर्तबंधूंच्या स्वाधीन केलें खरें; परंतु त्यामागें तशा प्रकारचा समर्थ सत्ताधीश त्याची जोपासना करण्यास कोणीच न राहिल्यामुळें त्याच्या सभोंवार सारें रानच रान माजून राहिलें आहे. त्यांतील किती एक झाडें इतकीं कांटेरी आहेत कीं, त्यामुळें सात्विक वृत्तीच्या मनुष्याच्या काळजाला घरे पडतात. कित्येक झाडें अशीं आहेत कीं, त्यांचीं कुसळें अंगास लागलीं तरी,कवसकुल्याप्रमाणें विचारी मनुष्यांच्या अंगाची लाही लाही होऊन जाते. त्यामुळें ह्या आम्रवृक्षांच्या पक्क फळांचा रसास्वाद बालगोपाळास जसा चाखावयास मिळावा तसा मिळत नाहीं. कित्येक झाडें आम्रवृक्षाच्या फांद्यावरच वाढून बळावलात. त्यांना ' बांडगूळ ' असें म्हणतात. सत्ताधीशानें—मालकानें अशीं बांडगुळें वाढलेलीं पाहिलीं कीं तत्काळ छिनून काढलीं पाहिजेत. नाहींतर बांडगुळेंच फोंफावत जाऊन मूळचा आम्रवृक्ष पार नाहींसा होऊन जावयाचा ! ह्यासाठीं ह्या बांडगुळांना फार जपलें पाहिजे. ह्या बांडगुळांना पान नाहीं, फूल नाहीं, फळ नाहीं, कांहीं नाहीं. म्हणजे स्वतः जनाच्या उपयोगीं पडावयाचें नाहीं, आणि दुसरें फलद्रूप झाड असेल तें खाऊन हीं त्याचा नाश मात्र करतात !

कोणतीही विद्या पूर्णावस्थेंत आली तर ती उत्तम, किंवा मुळींच ती न आली तरी उत्तम. पण अर्धामुर्धी विद्या ही मोठी घातक असते. पंडितांनीं सुद्धां म्हटलेलें आहे—

> **करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें ।**
> **धरूं येल पैं चित्तही जाण त्याचें ॥**
> **न जाणे न नेणें अशा पामराला ।**
> **बुझावूं शकेना विधाता तयाला ॥ १ ॥**

जो खरोखरच अक्षरशत्रु आहे, अडाणी: आहे, त्याची सुद्धां सहज समजूत घालतां येते; किंवा जो विद्वान् आहे त्याचीही समजूत घालतां येते. परंतु जो धड विद्वान्‌ही नव्हे आणि धड अक्षरशत्रूही नव्हे, अशा

ढेंढणाची गांठ पडली म्हणजे मात्र प्रत्यक्ष ब्रम्हदेव आला तरीसुद्धां त्याची समजूत पटावयाची नाहीं! अशीच स्थिति हल्लींच्या बहुतेक विद्वान् म्हणविणारांची झाली आहे. हल्लीं जिकडे तिकडे विद्यालयें स्थापन झालीं आहेत; त्यांत विद्वान् लोंक पैदा होत आहेत. शिक्का मोर्तब झालेल्या युनिव्हर्सिटीच्या सनदांवर सनदा झळकत आहेत, तेव्हां अशा लोकांना विद्वान् नाहींत असें तरी म्हणावें कोणीं? कतीही शिकले आणि कोणत्याही द्वारानें साध्य केली तरी ती विद्याच! तथापि हल्लींच्या विद्यार्जनाच्या पद्धतींत जें वैगुण्य आढळून येतें, त्याची छपवाछपवी करण्यांत कांहीं अर्थ नाहीं! भिक्षावृत्ति स्वीकारून एकाच गुरूच्या आश्रमांत सद्गुरुसेवा करून तपेंच्या तपें एकाच विद्येंत, एकाच शास्त्रांत जन्मच्या जन्म घालविणारे विद्यार्थी कोणीकडे, आणि हॉटेलामध्यें चहा काफी झोडणारे, बायसिकलवरून हेअरकटिंगसलूनमध्यें धांवणारे व दहा पांच वर्षांत सहा शास्त्रें, अठरा पुराणें व छपन्न भाषा पार पाडून सर्वज्ञता मिरविणारे विद्वान् कोणीकडे? ह्याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. हल्लींच्या विद्वानांना कळत नाहीं असा विषय जगांत सुद्धां मिळावयाचा नाहीं. परंतु खरा ठिकाण नाहीं एकाला सुद्धां. म्हणजे '**एक धड ना भाराभर त्या चिंध्या काशाला?**' अशांतलाच सारा प्रकार आढळून येतो. पेशवाईमध्यें 'पेशवे' हे एकच काय ते श्रीमंत होते. आतां घरोघरीं सारेच 'श्रीयुत' झाले आहेत. पूर्वीं मोरोपंत एकच कवि होते. आतां '**घरोघर झाले कवी। नेणें प्रसादाची चवी**' असाच सारा बाजार भरला आहे. आणि त्यामुळें झालें काय? तर 'उथळ पाण्याला खळखळाट फार' किंवाः—

**'अंगुष्ठोदक मात्रेण शफरी फर्फरायते!'**

अफाट महासागरामध्यें मोठमोठीं अजस्र जलचरें असतात. पण तीं शांत चित्तानें विहार करीत असतात. आकांडतांडव करावयाचें त्यांच्या कधीं स्वप्नींही येत नाहीं. पण घोटा बुडण्याइतकेंहि ज्यांत पाणी नसतें, अशा डबक्यांतील मासळी मात्र फडफड फडफड करीत सुटते! अशांतलाच हा प्रकार आहे. ज्याला त्याला वाटतें कीं, विद्वान् काय तो मी; शोधक काय तो मी; कल्पक काय तो मी; सिद्धांती काय तो मी; असाच सर्वत्र

माझा डिंडिम वाजावा. याला युक्ति काय तर ज्ञानेश्वर दोन होते म्हण; वामनपंडित पांच होते म्हण; शिवाजी अक्षरशत्रु होता म्हण; बाजीरावाला घोड्यावर बसावयाला येत नव्हतें म्हण; पंचवटी नाशकाजवळची नव्हे, ती मच्छलीपट्टणाजवळची ठरीव; जुनी बखर खोटी; जुने शक चुकीचे. इत्यादि सरसहा विधानें करीत सुटलें कीं, खर्डे घासणारांनीं सुद्धां 'गुरु' 'परात्परगुरु' म्हणून त्यांच्यावर छत्रचामरें ढाळावीत, असाच हा काल आलेला आहे! अशा अहंमन्य लोकांना किंवा चवचालांना दासबोध तरी काय होय आणि ज्ञानेश्वरी तरी काय होय? जेथें समर्थांसारख्यांची व ज्ञानेश्वरासारख्यांची 'अरे तुरे' नेंच बोळवण होते, तेथें इतरांचा पाड काय? हे वितंडवादी किंवा पाखांडी लोक आज कांहीं जगावर नवीनच निर्माण झाले आहेत अशांतला अर्थ नाहीं. तर हे त्रिकालाबाधीतच आहेत. प्राचीन कालीं चार्वाकादि भेदवादी होतेच, आजही आहेत व पुढेंही होतील. भेद इतकाच कीं, कोणी एखादा समर्थ पुरुष जगावर अवतीर्ण झालेला असला म्हणजे ते जरा बांकून असतात, आणि तसा कोणी दिसेनासा झाला कीं यांचें प्रस्थ माजतें!

समर्थांच्या मागें सारेच आपणाला समर्थ समजून त्यांनीं हवा तसा धुडगूस घालावयाला सुरवात केली आहे. शंका काढणें, तर्क चालविणें व कल्पना लढविणें ह्या गोष्टी कांहीं वाईट नाहींत. उलट सत्यशोधनाच्या कामीं त्यांचें मोठें सहाय्य होतें. पण प्रत्येक गोष्टीला जसें प्रमाण पाहिजे, तसें त्यालाही प्रमाण पाहिजे. शंकेची लंका होऊं नये; तर्कांचा चर्का होऊं नये किंवा कल्पनेची जल्पनाही होऊं नये. शंका असो, तर्क असो कीं कल्पना असो; ती ऐकून सज्जनांनीं सुद्धां मान डोलविली पाहिजे, तरच शोभा. नाहीं तर जनांचें हांसें करून घेण्यांत अर्थ कोणता? हल्लींच्या शंका बहुतेक अशापैकींच असतात. दासबोधासारख्या लोकोपयोगी व लोकवंद्य ग्रंथांवरही ह्या अहंमन्यांनीं नाहीं नाहीं ती किटाळें आणण्यास कमी केलेलें नाहीं.

समर्थांवर व त्यांच्या दासबोधावर हल्ला चढविणारे अर्वाचीन कलमबहाद्दर सरदार तीन असामी आहेत. ह्या त्रिवर्गांचा नामनिर्देश रा. रा.

शंकर श्रीकृष्ण देव—धुळें यांनीं यथातथ्य विशेषणपूर्वक केला आहे तो असा:—

"मराठी भाषेची घटना सांगतांना श्रीसमर्थांवर तुटून पडणारे सुधारक रा. रा. रामभाऊ जोशी हे एक; कांहीं एका मतलबानें श्रीशिवसमर्थभेटीचा काल पुढें लोटूं पाहणारे चातुर्वर्ण्यविरोधी प्रो॰ गोविंदराव भाटे हे दुसरे." ही एक जुगल झाली. तिसरे एक उत्पन्न झालें आहेत त्यांनीं तर सर्वांच्या वर ताण केली! ती काय ? तर 'दासबोधाचा कर्ता कोण ?' ही शंका घेऊन विविधज्ञानविस्तारांत' त्यावर बरेंच पांडित्य करून अखेर दासबोध हा समर्थांनीं लिहिलेला नसून त्यांच्या कोणीं तरी शिष्यानें लिहिला असावा, हा सिद्धांत काढला आहे. अशी ही व्यक्ति तरी कोण ? तर 'विद्यामयूर भैय्याशास्त्री देव जामखेडकर,' शास्त्रीबोवासारख्या विद्वद्वर्यांनीं 'दासबोधाचा कर्ता कोण ?' असली असंबद्ध शंका काढणें ह्यापेक्षां आणखी लाजिरवाणी गोष्ट ती कोणती ? शंका काढण्याचें काम तरी सामान्य नाहीं. तींत कांहींतरी भारदस्तपणा पाहिजे. कांहींतरी शंका काढावयाची म्हणून काढावयाची, हा प्रकार काय कामाचा ? बारा वर्षें रामायण ऐकून 'राम राक्षस कीं रावण राक्षस ?' असल्या शंकेपैकींच ही शास्त्रीबुवांची शंका होय.

'शंका' म्हटली कीं, ती किती किंमतीची आहे हें आधीं पहावें लागतें. ती जर योग्य असेल तरच तिला उत्तर देणें प्रशस्त. ती निखालस पोचट असेल, भिकार असेल तर तिचें उत्तर देण्याच्या खटपटींत पडण्यांत तरी अर्थ कोणता ? भैय्याशास्त्र्यांची शंका अशापैकींच आहे. तथापि समर्थांच्या सेवेकरतां काया वाचा मनें करून व्रत उचलणाऱ्या रा. रा. शंकर श्रीकृष्ण देवांनीं 'भाविक पण अज्ञानी' लोकांच्या समाधानाकरितां 'श्रीमत् दासबोधाचे कर्ते दुसरे कोण असणार ?' ह्या नांवाचें सुमारें ७५ पानांचें निराळेंच पुस्तक शके १८४३ मध्यें छापून प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांच्या 'किंवदंती' वर लढविलेल्या पांडित्यपणाच्या आचरटपणाचा चांगलाच समाचार घेतला आहे. त्यांत शास्त्रीबुवांचा प्रत्येक मुद्दा त्यांच्या पदरांत पडलेला पाहून शास्त्रीबोवांच्या आर्षपणाची कींव आल्यावांचून राहत नाहीं. जी समज शेंकडों वर्षें समाजामध्यें एकमतानें

निर्विकल्प चालत आलेली आहे, जिची श्रद्धा यच्चयावत् लोकांच्या अंतःकरणांत रुजून बसलेली आहे, अशाविषयीं होतां होईल तों विपरीत कल्पना काढूं नये, हाच उत्तम पक्ष. इतकेंही करून तशीच कल्पना डाचूं लागली तर ती एकदम कधींही प्रगट करूं नये. आधीं तिचा साधक बाधक प्रमाणांनीं परिपूर्ण विचार करावा. 'Consider well before you make a promise' हें इंग्रजी भाषेंतील सूत्र नेहमीं उराशीं बाळगावें. कोणताही मागचा पुढचा विचार न करतां, कोणतेही ग्रंथ पुरतेपणीं न चाळतां, लोकांच्या मनाला उद्विग्नता आणतील व आपली चार चौघांत खेडी उडून तोंड वर करण्यासही जागा राहणार नाहीं, असला आचरटपणा करणें हा निवळ आर्षपणा आहे. पाखांडी, नास्तिक मती म्हणतात तें यालाच. असा वितंडवाद उत्पन्न केल्यानें लेखकांच्या व विचारी लोकांच्या कालाचा निष्कारण अपव्यय होतो. आणि मिथ्या प्रलापाचें एक रोप विनाकारण समाजांत उपस्थित होतें तें वेगळेंच. म्हणून अशा प्रकारचीं बांडगुळें ज्यांना ज्यांना आढळतील त्यांनीं त्यांनीं तीं छाटून टाकून वरचेवर भांगलण ही केलीच पाहिजे. 'विद्यामयूरा'चें हें बांडगूळ देवांनीं परभारेंच पाळामुळांसकट होरपळून टाकलें याबद्दल त्यांचे महाराष्ट्रीयांनीं जितके उपकार मानावेत तितके थोडेच होतील. खरोखर देवांनीं हें काम फार बहारीचें केलें. त्यामुळें तिकडे पुन्हां पहावयास नको.

अशा प्रकारें ह्या एका शास्त्र्यांची देवांनींच वासलात लावली. प्रो० भाट्यांचीं विधानें कितपत खरीं आहेत त्याचा निकाल पूर्वार्धांत लागलाच आहे. आतां ह्या बांडगुळांपैकीं एकच व्यक्ति राहिली. ती कोणची? तर रा. **रामचंद्र भिकाजी जोशी** ही. ह्यांनीं दोघांच्याही वर ताण केली आहे! '**मराठी भाषेची घटना**' ह्या पुस्तकांत दासबोधासंबंधानें तें आपलें मत देतातः—

"**सर्व ग्रंथ अत्यंत अव्यवस्थित आहे. यांत एकंदर काय सांगितलें आहे हेंच सांगणें कठीण आहे.**"

पृ. २६७

हजारों रामदासोपासक मंडळी आजपर्यंत दासबोधाचा नित्य पाठ

करीत आले आहेत; आजही त्यांचे पाठ चालू आहेत; एक दोघांनीं कां होईना परंतु दासबोधाचीं शद्बशः भाषांतरें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांपैकीं एकासही ह्या दासबोधांत काय सांगितलें आहे याबद्दल कोडें पडलेलें आढळत नाहीं. ते खुशाल त्याला अर्थ करतात व लोकांस समजावूनही देतात. मग ह्या 'मराठी भाषेची घटना' करणाऱ्या पंडितांनाच त्यांत येवढा बाऊ तो काय वाटला? आणि खरोखर तसा वाटलाच असेल तर त्यांच्या डोक्यांत खचित बटाटे किंवा कांदेच भरलेले असले पाहिजेत; दुसरी कोणतीच गोष्ट संभवत नाहीं. दासबोधांत एकंदरींत काय सांगितलें आहे हें न समजण्याइतकेंच रा. जोशी ह्यांच्यापाशीं अज्ञान असलें तर त्यांनीं सारा अभिमान ताठा सोडून देऊन नाक मुठींत धरून एखाद्या सद्गुरूला शरण जावयाचें होतें, म्हणजे दासबोधांत काय सांगितलें आहे तें त्यानें विशद करून सांगितलें असतें. जी गोष्ट आपल्याला कठीण अशी वाटते ती खुशाल गुरूला विचारावी. त्यांत कमीपणा तो कसला? तितकाही त्यांना उरक नसला तर निदान आमच्यासारख्या भाषांतरकारांना तरी तो विचारण्याची तसदी घ्यावयाची होती. म्हणजे आम्हीही त्यांचें यथाशक्त्या यथामत्या समाधान केलें असतें. मग 'मुमुक्षु'कर्ते ह. प. पांगाकरासारख्यांनीं त्यांची जिज्ञासा परिपूर्ण केली असती हें काय सांगावयास पाहिजे? हा घोपट मार्ग सोडून देऊन कोंपऱ्यांत बसून 'दासबोध कठीण आहे, त्यांत काय सांगितलें आहे तें समजत नाहीं' असले जपमाळेचे मणी ओढीत बसण्यांत अर्थ कोणता? कठीणपणा वाटला तर तो नाहींसा करण्याची खटपट करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. तें जो न करील तो स्वतःच अज्ञानी समजला पाहिजे. आणि तो अज्ञानपणा दुसऱ्यावर लादूं पहाणें यासारखा दुसरा कोणताच खुळेपणा नाहीं.

रा. जोशी ह्यांनीं वर दिलेल्या विधानांत एक प्रकारची अन्योक्ति साधून बालगोपालांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न केला आहे. "ह्यांत काय सांगितलें आहे हेंच सांगणें कठीण आहे" ह्यामध्यें कठीणपणामुळें आपणास अर्थ समजत नाहीं हा आपला अज्ञानपणा आहे, असा हा सकृद्दर्शनीं आपणाकडे अज्ञानपणा घेतल्याचें दिसतें खरें. पण ही

केवळ उत्प्रेक्षा आहे. खरा अर्थ ह्याच्या अगदीं उलट आहे.

" आम्ही येवढे विद्वान्; मराठी भाषेची घटनाकर्ते; आम्हांस ह्यांत कांहीं समजत नाहीं! पण हा आमचा अज्ञानपणा नव्हे. तर तो ग्रंथ रचणाराचा मूर्खपणा आहे. त्याला तो आमच्या मनांत बिंबेल अशा तऱ्हेनें सांगतां आला नाहीं." हा ह्यांतील ध्वनितार्थ आहे.

समर्थांना मूर्ख म्हणणारा व दासबोधाला कवडीमोल ठरविणारा हरीचा लाल आजपर्यंत निदान आमच्या तरी प्रत्यक्ष पाहण्यांत नव्हता. तो रा. जोशांच्या रूपानें आज पहावयास मिळाला, हें तरी एक अपूर्वच होय! येवढे समर्थांसही अडाणी ठरविणारे त्यांच्यापेक्षांही महा समर्थ किंवा लोकोत्तर समर्थ असले पाहिजेत. अशा विद्वानांची यथोचित संभावना व गौरव आमच्यासारख्या असमर्थांच्या हातून तो काय होणार? बिचारा ब्रह्मदेवच पडला अरसिक! त्याला तुम्ही तरी काय करणार व आम्ही तरी काय करणार? त्यानें असल्या विद्वद्रत्नास समर्थांच्याच कारकीर्दींत जन्मास घातलें असतें, तर किती बरें बहार झाली असती? चंग बांधून आलेल्या सदाशिवशास्त्री देवाची षोडशोपचार पूजा बहिऱ्यामहाराकडूनच करविली; पण जोशासारखें प्रचंड धेंड पाहिल्यावर तर त्यांनीं त्याच्याहीपेक्षां उच्चतर जातीकडून महापूजाच नव्हे तर पाद्यपूजा सुद्धां करविली असती! तो योग आला नाहीं, व आज आम्हांस त्यांची बोळवण साध्या शद्बांनींच करण्याचा प्रसंग आला ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

पण किती केलें तरी समर्थ ते समर्थच! त्यांचा दृष्टि काय सामान्य होती? ते अत्यंत दूरदृष्टी होते. त्यांनीं मागचा पुढचा सर्व विचार करून ठेवला होता त्यांचीं धोरणें लांबवर होतीं. कोणाला नमस्कार करावयाचे, कोणाला पदव्या द्यावयाच्या, कोणत्या पदव्या देऊन त्यांचा गौरव करावयाचा, त्याची त्यांनीं आधींच तर्तूद लावून ठेवला आहे नमस्कार कोणाकोणाला करावयाचा? तरः—

> ऐसे पूर्वीं थोर थोर। जाले कवीश्वर अपार॥
> आतां आहेत पुढें होणार। नमन त्यांसी॥ १॥

द. १ स. ७–२५

"अनंत अपार असे मोठमोठे कवि पूर्वीं होऊन गेले, आज आहेत व पुढेंही होतील; त्या सर्वांस माझा नमस्कार असो." म्हणजे पुढें होणाऱ्या कवींना सुद्धां [ अडव्हान्स ] नमस्कार करून ठेवला ! यापेक्षां अधिक दूर दृष्टि, अधिक तर्तूद, व अधिक उदात्त कल्पना ती कोणती ? इतकी समर्थांनीं जर भावी कवींची सुद्धां तर्तूद करून ठेवली आहे, तर त्यांच्या ग्रंथाची नव्या कसोटीनें छान करून पास नापास ठरविणारे विद्वान् परीक्षक आपल्या येथें येतील, त्यांच्या राहण्यासवरण्याची व ऐषआरामाची तर्तूद त्यांनीं लावली नसेल काय ? असें कसें घडेल ? कधींच घडणार नाहीं. पाहुणे मंडळीची सोय त्यांनीं आधींच लावून ठेविली आहे. दुसऱ्या दशकाच्या पहिल्या समासांत मूर्खमंदिराची इमारत उभी करून मूर्ख म्हणून जे जे कोणी येतील त्यांची राहण्याची, आहारविहारची सोय सर्व त्यांत लावून ठेवली आहे; पण त्याहून उच्च प्रतीचे जे लोक येतील, त्यांच्याकरितां समर्थांनीं त्याच्यापासून पलीकडे बऱ्याच अंतरावर दुसरी एक इमारत बांधली आहे. ती भली टोलेजंग इमारत दुसऱ्या दशकाच्या शेवटच्या टोकाशीं आहे. तिचें नांव ' पढत मूर्ख मंदिर. ' जे जे कोणीः—

**समूळ ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण ॥**
**गुण सांगतां पाहे अवगुण । तो एक पढत मूर्ख ॥ १ ॥**

**भरोनि वैभवाचे भरी । जीवमात्रास तुच्छ करी ॥**
**पाखांड मत थावरी । तो एक पढत मूर्ख ॥ २ ॥**

**भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामध्यें उपंढर पडे ॥**
**ऐसिये कर्मीं पवाडे । तो एक पढत मूर्ख ॥ ३ ॥**

ह्या दर्जांतील लोक असतील त्यांची त्यांत बरदास्त होते. ह्याशिवाय सज्जन व दुर्जन, उत्तम पुरुष व मध्यम पुरुष, आळशी व करंट इत्यादि निरनिराळ्या दर्जांच्या लोकांकरितां निरनिराळीं मंदिरें राखून ठेवलीं आहेत. आणि त्याच्या त्याच्या लक्षणाप्रमाणें त्यांना त्यांना ॰बिल्लेही पण देण्यांत येतात. ' विद्यामयूर ' शास्त्र्यांनीं जर आपल्याच देशबांधवांस ' **भाविक पण अज्ञानी** ' असें पदवीदान करण्यास कमी केलें नाहीं; तर समर्थांचा ' कैपक्ष ' घेणारांनीं तरी दासबोधाच्या ' किंवदंती'ची चर्चा करण्याचा

आव घालणाराचा यथोचित् आदरसत्कार कां करूं नये? तेंही त्यांचें कर्तव्यच आहे. पण हें करण्यापूर्वी देवानेंच त्यांस यथायोग्य स्थान देऊन त्यांचा शिक्काही त्यांच्या नांवांपुढें ठोकून टाकला आहे!

रा. जोशांचें दासबोधासंबंधानें दुसरें विधान तर याहूनही बहारीचें आहे. तें हें कीं, "**सर्व ग्रंथ अत्यंत अव्यवस्थित आहे.**" हें विधान ऐकून आम्हांस तर खास वाटतें कीं, रा. जोशी यांचें माथें फिरलें असावें. एरवीं अशीं अक्षरें मुखांतून बाहेर पडण्याला दुसरा मार्ग नाहीं. कारण, दासबोध ग्रंथ इतका सुव्यवस्थित आहे कीं, तितका सुसंगत व व्यवस्थित ग्रंथ तत्कालीन साधुसंतांच्या ग्रंथांत सुद्धां क्वचित्च आढळेल. ह्याचें विवरण यापुढें ओघानुसारच येणारें असल्यामुळें त्याबद्दल अधिक चिकित्सा करण्याचें येथें कारणच उरलें नाहीं.

ह्याकरितां ह्या 'दासबोध' ग्रंथामध्यें समर्थांनीं कोणकोणते विषय ग्रथित केले आहेत त्याचा गोषवारा देऊं. म्हणजे ह्या साऱ्याच गोष्टींचा निकाल लागेल.

**दासबोधाच्या रचनेचा काल**—'दासबोधाचा कर्ता कोण?' अशी वेडगळ शंका वेड्या पिरावांचून दुसरा कोणी घेणार नाहीं! पोरकट शंकेवरून मनुष्याचा पोरकटपणा मात्र चांगला दिसून येतो. 'दासबोधाचा कर्ता समर्थांवांचून दुसरा कोण असणार?' ह्या पुस्तकांत रा. रा. शंकरराव देव ह्यांनीं विविधज्ञान विस्तारांतील 'विद्यामयूर' शास्त्र्यांचें माप त्यांच्या पदरांत सप्रमाण घालून त्यांचा वेडगळपणा चांगलाच चव्हाट्यावर आणला आहे. तो भाग वाचकांनीं अवश्य पहावा. तेव्हां ती शंका जमेस न धरतां तो एक गंधर्वनगरींतील उमाळा आहे असें समजून 'दासबोध'रचनेचा काल कोणता तें पाहूं. दासबोध ग्रंथ बराच मोठा आहे. म्हणजे तो जवळ जवळ ज्ञानेश्वरीयेवढाच आहे म्हटलें तरी चालेल. ज्ञानेश्वरीच्या ओव्या ९०४० आहेत. व दासबोधाच्या ७७५० आहेत. एवढा ग्रंथ एका सपाट्यासरशीं होणें बहुधा कोणासच शक्य नाहीं. त्यांतून समर्थांसारख्या अखंड व्यापृत पुरुषाकडून तर तें कार्य परम दुरापास्त होय. ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. दासबोधाच्या रचनेसंबंधानेंही हाच प्रकार आहे. शके १५७१त किंवा त्याच्याही पूर्वीपासून दासबोधाच्या रचनेस आरंभ झाला होता,

ह्यांत संशय नाहीं. कारण प्रथमच शिवाजीमहाराज समर्थांस भेटावयास गेले तेव्हा समर्थ शिंगणवाडीच्या बागेंत असून ते औदुंबराच्या झाडाखालीं दासबोध रचनेंत गुंतले होते असा उल्लेख आहे. पुढें शिवाजीमहराराजांची भेट झाली व त्यांस अनुग्रह दिला, त्या दिवेशीं 'लघुबोध' नामक समास सांगितल्याचा उल्लेख आहे. व पुढें तो समास १३ व्या दशकांत घातलेला दृष्टीस पडतो. परंतु त्याच दिवशीं दासबोधाची रचना १३ दशकापर्यंत आली होती, व त्यापुढेंच हा 'लघुबोध' नांवाचा समास रचला असें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. कारण, त्या वेळीं दासबोधाची रचना फारच थोडी झाली असावी. फार तर दोन चार दशक झाले असतील नसतील. शिवाय ही दासबोधाची रचना मधून मधून चालत असावी. शिवाजीमहाराजांनीं अनुग्रह घेतल्यानंतर पुढें दहा वर्षांनीं म्हणजे शके १५८१ मध्यें अफजुलखान मारला गेला ह्या विजयानंतर शिवाजीमहाराज समर्थांच्या भेटीस गेले, त्यावेळीं त्यास अनुलक्षून ' उत्तम पुरुष लक्षण ' हा समास रचून तो राजश्रींस वाचावयास दिल्याचा उल्लेख आहे. ह्यावरून दासबोधाची रचना दहा वर्षे तरी चालली होती खास. हा 'उत्तम पुरुष लक्षणाचा' समास अठराव्या दशकांत घातलेला आहे. त्यावेळीं दासबोधाची रचना १८ व्या दशकापर्यंत येण्याचा संभव आहे. तितकी रचना सुद्धां झाली असेल किंवा नसेल ह्याचाही वानवाच वाटतो. कारण शके १६०३ मध्यें कल्याणस्वामी डोमगांवाहून समर्थांच्या भेटीस आले होते त्यावेळीं दासबोधाच्या विसाव्या दशकाचें काम पुरें झालें असा उल्लेख आहे. तेव्हां १५८१ पर्यंत—म्हणजे दहावर्षांत—आठरा दशक झाले होते, तर पुढील दोन दशक व्हावयाला वीस वर्षे लागलीं कीं काय ? अशी सहजी शंका उद्भवते व ती खरीही दिसते. कारण दहा वर्षांत जर आठरा दशक संपले, तर राहिलेल्या दोन दशकाला वीस वर्षे लागावींत ही गोष्ट साधारण दृष्टीलासुद्धां असंभाव्य दिसते. बाकी सारे कसेंही असो; पण निदान दासबोधाची रचना हळू हळू होत असून ती बत्तीस वर्षे म्हणजे १५७१ पासून १६०३ पर्यंत चालू होता यांत मात्र शंका नाहीं, म्हणजे दासबोधांतील शेवटचा जो विसावा दशक तो अगदीं समर्थांच्या अंतकालाच्या वर्षीच तयार झालेला आहे, व ती प्रत समर्थांनीं स्वतः वाचून तिच्यांत

स्वहस्तानें कमजास्त अक्षरें घातलीं आहेत. ही पहिली व अस्सल प्रत कल्याणस्वामींनीं लिहिलेली असून ती डोमगांवच्या मठांत आहे.

येथपर्यंत दासबोधाच्या रचनेच्या कालासंबंधानें विचार झाला. आतां आंतील विषयासंबंधानें काय काय निष्पन्न होतें तें पाहूं.

समर्थांचें कवित्व म्हणजे एक निधीच भरलेला आहे. त्या सर्वांचें मथन करून सार काढणें म्हणजे कांहीं सामान्य काम नव्हे. त्यांत कितीतरी गोष्टींचा समावेश होतो. त्या सर्वांचाच येथें विचार करूं म्हटलें तर एक स्वतंत्रच ग्रंथ होईल. ह्याकरितां तसें न करितां त्यांतील मुख्य मुख्य मुद्यांचे प्रश्न तरी निदान सुटतील इतकें विवेचन करण्याचा हेतु आहे. ह्यांत पहिले मुद्दे दोन; एक ऐहिक सुखासंबंधानें त्यांत काय काय सांगितलें आहे ? आणि पारमार्थिक सुखासंबंधानें त्यांत काय काय सांगितलें आहे ? त्यापैकीं प्रापंचिकाला काय काय उपयोगी पडेल व विरक्ताला काय काय उपयोगी पडेल ? जन्माची इतिकर्तव्यता काय ? ती कशी साधावी ? समर्थांच्या कवित्वशक्तीमध्यें कोण कोणते गुण दृष्टीस पडतात ? भाषाशैली कशी काय आहे ? इत्यादि गोष्टींचा थोडथोडा तरी विचार केला पाहिजे.

परंतु प्रस्तुत कालची स्थिति फार शोचनीय झाली आहे. त्यामुळें कोणतीही गोष्ट सरळ सांगूं म्हटलें तर तें काम शेवटास जाणें बहुतेक दुरापास्तच होऊन बसलें आहे. कारण, साऱ्यांचींच मनें व्यग्र व संशयग्रस्त झालीं आहेत. कितीएकांस वाटतें कीं हा काल मोठा सुधारणेचा आला आहे; ह्यांत यांत्रिक कला वाढल्या; लोकांच्या सुखसाधनांची वृद्धि झाली; पहिला भोळसरपणा जाऊन ज्ञानाचें साम्राज्य पसरलें. परंतु सूक्ष्म विचार केला तर हाही सारा भ्रमच आहे. समुद्राची एक लाट वर उचलली तर दुसरीकडे खळगा पडतो, त्यांतलाच हा प्रकार आहे. आमच्या शास्त्राप्रमाणें हें कलियुग आहे. आणि त्यांतील होणाऱ्या परिस्थितींचें चित्र आमच्यांतील प्रत्येक साधुसंतानें पूर्वींच रेखाटून ठेवलें आहे व त्याचा पदोपदीं आज अनुभवही येत आहे. शांति, एकोपा, भक्ति, व सरळपणा कोठें दिसतच नाहीं. जिकडे तिकडे चिकित्सा, चवचालपणा, वादविवाद, हमरीतुमरी ह्यांचाच बाजार भरलेला दिसतो. ह्यांत सरळपणानें सांगणारा व ऐकणारा तरी आहे कोण ? कोणी-

करून तरी दुसऱ्यास खालीं पाडावें आणि आपला झेंडा वर चढवावा हीच ज्याची त्याची इच्छा. अशा वेळीं एखाद्याचें चरित्र तरी कोण व कसें लिहिणार ? समर्थांच्याच चरित्रासंबंधानें किती किती व कसकसे मतभेद आहेत तें पहा.

कै. न्या. रानडे ह्यांनीं आपल्या 'The rise of the Maratha power' ह्या इंग्रजी पुस्तकांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, शिवाजी महाराजांनीं जें पुढें स्वराज्य आक्रमण केलें, त्याची पूर्वभूमिका महाराष्ट्र देशांतील तत्कालीन साधुसंतांनीं पूर्वींच अनुरूप करून ठेवली होती. त्या सर्व साधुसंतांत रामदासस्वामींची कामगिरी अग्रेसर होय. इतिहास संशोधक प्रोफेसर राजवाडे ह्यांचें म्हणणें ह्या कामांत इतर साधुसंतांचा कोणताच भाग नाहीं. त्यांनीं संसार हा क्षणभंगुर, देह हा नश्वर इत्यादि नैराश्यतेचे विचार लोकांच्या मनांत भरवून देऊन लोकांस अगदीं उद्योग पराङ्मुख करून मेषपात्र बनवून सोडलें होतें. त्या सर्वाला एकट्या समर्थांनींच काय तो आळा घातला. सर्व जनांच्या मनांत कर्तव्याचें बीं रुजविलें. 'राजकारण' म्हणून जें काय उपस्थित केलें तें याच साधुवर्यानें. रामदासस्वामी हे वरून फक्त विरक्त साधु दिसत. परंतु ह्यांचीं गुप्त कारस्थानें फार होतीं. मोठमोठ्या दुर्गम कडपांत, दरींत, खोरींत ह्यांच्या अनेक गुप्त गुहा किंवा घळी होत्या. त्यांत ते एकांतीं बसून नानाप्रकारचे विचार करीत. तेथें त्यांचीं कारस्थानें चालत. त्यांनीं आसेतुहिमाचल शेंकडों मठ स्थापन करून आपला शिष्यसमुदाय वाढविला होता. ह्यांतील मुख्य मुख्य महंत त्यांस गुप्तस्थानीं येऊन भेटत, निरनिराळ्या ठिकाणच्या बातम्या मिळवीत, एकांत ठिकाणीं जमून निरनिराळीं राजकारणें रचीत, व पुष्कळ लोक आपलेसे करीत. शिवाजी महाराजांनीं जे स्वराज्य मिळविलें, त्यास मुख्यत्वेंकरून समर्थांचीच प्रेरणा होती. समर्थांचा अवतार पूर्वीं झाला होता म्हणूनच शिवाजी महाराजांना येवढें यश संपादन करण्यास सुलभ झालें. समर्थांची त्यांस प्रेरणा नसती, तर कदाचित् येवढा दिग्विजय होता ना. ह्यास्तव स्वराज्य आक्रमण करण्यांत शिवाजी महाराजांना खरोखरीं मदत किंवा प्रेरणा एक रामदासस्वामींचीच होती. तिचेंच फल त्यांना

मिळालें. समर्थांशिवाय इतर महाराष्ट्रीय साधुसंताकडे ह्यापैकीं किमपीही वाटा येत नाहीं. हे दोन पक्ष झाले.

पण तिसराही एक पक्ष आहे; तो तर ह्याहून फारच निराळा आहे. तो अलीकडे बोकाळलेल्या ब्राह्मणेत्तर किंवा 'वेदोक्त' पक्षाचा होय. 'येनकेन-प्रकारेण' ब्राह्मणांचा पक्ष म्हटला कीं, त्याचा होईल तितका उपमर्द करावयाचा —पाडाव करावयाचा हेंच त्यांचें व्रत. त्यांचें म्हणणें हें कीं "आमच्या शिवाजमिहाराजांनीं जें राज्य मिळविलें तें तरवारीच्या जोरावर मिळविलें. त्यांनीं आपल्या चातुर्याच्या बळानें नानाप्रकारच्या युक्ति प्रयुक्ति रचल्या, आपल्या सद्गुणांनीं मावळे लोकांस वश करून घेतले, त्यांनीं समरांगणांत स्वतः समशेर गाजविली, व स्वामिभक्त सेवकांनीं त्यांच्या प्रीत्यर्थ आपले प्राण खर्ची घातले, म्हणून त्यांस स्वराज्याची प्राप्ती झाली. ह्यास्तव त्याचें श्रेय पूर्णपणें त्यांसच देणें योग्य आहे. त्यांच्या ह्या यशःप्रभेंत रामदासासारख्या काखेंत झोळी अडकावून दारोदार फिरणाऱ्या गोसावड्याला त्यांचा भागीदार म्हणून त्यांच्या जोडीस नेऊन उभा करणें हा मोठा अन्याय व लाजिरवाणें कृत्य होय." एवंच ह्या पक्षाचें म्हणणें शिवाजीमहाराजांना स्वराज्यप्राप्तीच्या कामीं रामदासांची यत्किंचित्‌ही मदत झालेली नाहीं. लोक रामदासस्वामींचें जें येवढें स्तोम माजवितात तें निखालस ढोंग आहे.

अशीं हीं समर्थांच्या चरित्राच्या संबंधानें रणावर रणें पडलीं आहेत. तेव्हां ह्या संबंधानें त्यांच्या प्रत्यक्ष अनुग्रहांत—म्हणजे उपदेशांत—अर्थात् ग्रंथांत काय काय व कितपत स्पष्ट आधार सांपडतो तो पाहून समर्थांकडून शिवाजी महाराजांना कांहीं साह्य झालें किंवा नाहीं! झालें असल्यास किती अंशानें झालें? ह्याबद्दल विचार करून मग इतर गोष्टींचा विचार करूं. कित्येकांचें म्हणणें समर्थ रामदासस्वामी हे शिवाजी महाराजांचे फक्त अनुग्रहित गुरु होते इतकेंच. ते राजकारणांत मुळींच कधीं पडले नाहींत. परंतु बहुतेक इतिहासलेखकांचा असा समज आहे कीं, ते पक्के राजकारणी होते. 'राजकारण' हा शब्द त्यांनींच प्रथम प्रचारांत आणला. शिवाजी महाराज जरी तलवारबहाद्दर होते, शूर होते, तरी आंतून सारें कारस्थान रामदासस्वामींचेंच होतें. म्हणजे ते राजकारणांत पडले होते कीं पडले नव्हते, हाच काय तो मुख्य प्रश्न आहे. तेव्हां तो सोडविण्याला 'राजकारण' म्हणजे

काय, ह्याचा आधीं विचार केला पाहिजे. राज्यांतील व्यवस्थेचा विचार करणें म्हणजे राजकारण, कां परचक्रासंबंधीं विचार करणें हें राजकारण, कां एखादें कपटपाटव रचणें म्हणजे राजकारण, कां गुप्त रीतीनें सल्ला-मसलत देणें म्हणजे राजकारण ? राजकारण ह्या शब्दाचा अर्थ तरी काय? 'राजकारण' हा शब्द समर्थ रामदासस्वामींनींच प्रथम प्रचारांत आणला म्हणतात. तेव्हां त्याचा अर्थ त्यांनींच काय केला आहे तो पाहिला म्हणजे झालें. दासबोधामध्यें कित्येक ठिकाणीं एकच विषय दोन दोन वेळां, तीन तीन वेळांही आलेला आहे. त्याचप्रमाणें 'राजकारण' हा विषयही दासबोधामध्यें दोन वेळां आला आहे. प्रथम दशक ११ समास ५ वा हा 'राजकारणा'बद्दलच घातलेला आहे. त्यांत मुख्य उपदेश केला आहे तो असाः—

**अनन्य राहे समुदाव। इतर जनास उपजे भाव।**
**ऐसा आहे अभिप्राव। उपायाचा ॥ ३ ॥**

"समाज एकदिल व्हावा, इतरांची भक्ति जडावी, अशा उपायाची योजना करावी." त्याला काय केलें पाहिजे ? तरः—

**एक हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।**
**तिसरें तें सावधपण। सर्व विषयीं ॥ ४ ॥**

"पहिली गोष्ट ही कीं, हरिकथेचें निरूपण करावें. दुसरें, राजकारण ध्यानांत असावें, आणि प्रत्येक गोष्टींत दक्षता ठेवावी."

**चवथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आक्षेप॥**
**अन्याय थोर अथवा अल्प। क्षमा करीत जावे ॥ ५ ॥**

"चवथी गोष्ट ही कीं, अत्यंत उद्योगी असावें. नानाप्रकारच्या शंका दूर कराव्यात. अन्याय थोर असोत किंवा लहान असोत, त्यांची क्षमा करित जावें."

**'प्रपंचही सावराया। यथानुशक्त्या ॥ '**

"यथानुशक्त्या प्रपंचाचेंही बस्तान बसवावें." हें मात्र समर्थांचें वाक्य फार ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण 'प्रपंच साधून परमार्थ करावा'

असें वाक्य इतर साधुसंतांच्या उपदेशांत विराळाच आढळतें. ह्या समासांत आणखी एक गुरुकिल्ली थोडक्यांत सांगितली आहे. ती अशीः—

**आपार असावें पाठांतर। सन्निध असावा विचार॥**
**सर्वदा सर्व तत्पर। परोपकारासी॥ १॥**

" मुबलक पाठांतर असावें, विचार नेहमीं जवळ असावा आणि परोपकाराला सदासर्वदा तत्पर असावें." परमार्थाचें जे काय मुख्य तत्त्व तें हेंच.

**राजकारण बहुत करावें। परंतु कळोंचि न द्यावें॥**
**परपीडेवरी नसावें। अंतःकरण॥ १९॥**

" राजकारणें हवीं तेवढीं करावींत; परंतु त्यांपैकीं लवमात्रही बाहेर फुटतां कामा नये. त्यामध्यें इतरांस यत्किंचित्‌ही दुःख होईल अशी मात्र इच्छा ठेवूं नये."

पण 'राजकारण' म्हणजे काय, त्याचा कांहीं ह्यांत खुलासा नाहीं. त्याचा थोडासा उलगडा खालच्या ओव्यांत आहेः—

**लोक पारखून सोडावे। राजकारणें अभिमान झाडावे॥**
**पुनः मेळवूनि घ्यावे। दुरिल्या दोरें॥२०॥**
**हिरवटासि दुरी धरावें। कच्चरटासी न बोलावें॥**
**संबंध पडतां सोडूनि जावें। एकीकडे॥ २१॥**

" लोकांना पारखून ठेवावेत, राजकारण करून अभिमान झाडून टाकावा, पण पुन्हा त्यांना हळूच एक करून घ्यावेत. हिरवट असेल त्याला दूर करावें. हलकटाशीं भाषण करूं नये. तसल्याशीं संबंध पडण्याची वेळच आली तर त्याला सोडून दुसरीकडे जावें." राजकारण राजकारण म्हणून जें काय सांगितलें आहे त्याचा अर्थ येवढाच दिसतो. कारण, त्याच्याच पुढची ओवी अशी आहेः—

**ऐसें असें राजकारण। सांगतां तें असाधारण॥**
**सुचित असतां अंतःकरण। राजकारण जाणिजे॥ २२॥**

" राजकारण असतें तें असें असतें. तें सांगतांना पुरवायचें नाहीं. अंतःकरण सुचित असलें म्हणजे राजकारण सुचतें." ह्यावरून राजकारण

म्हणजे मसलत, युक्ति येवढाच अर्थ निघतो. त्यांत राज्यव्यवस्थेसंबंधींच मसलत असा कांहीं विशिष्ट अर्थ निपजत नाहीं. कोणत्याही कामासंबंधीं विचार, येवढाच अर्थ निष्पन्न होतो.

पण ह्याच 'राजकारणाचा' विषय पुन्हा दशक १९, समास ९ मध्यें आला आहे. त्यांतून आणखी कांहीं विशेष निष्पन्न होतें कीं काय, पाहूं या. परंतु या समासांत एक गोष्ट अतिशय महत्त्वाची सांगितलेली आढळते. ती कोणती ? तर राजा कसा असावा ? ह्याची व्याख्या. ती समर्थांनीं अशी दिली आहे:—

**गलिमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुरफुरती भुजा ॥**
**ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥ २५ ॥**

" गलिमाच्या म्हणजे शत्रूंच्या फौजा पाहतांच रणधुरंधर वीरांचे बाहू स्फुरण पावूं लागावेत. असाच धर्माचा कैवारी राजा पाहिजे." ही राजाची व्याख्या झाल्यानंतर राजकारण कसें पार पाडावें ह्याची माहिती दिली आहे. ती अशी:—

**ज्ञाता आणि उदास । समुदायाचा हव्यास ॥**
**तेणें अखंड सावकाश । एकांत सेवावा ॥ १ ॥**

समर्थांचें म्हणणें असें कीं, जो ज्ञानी व विरक्त असून ज्याला संघ निर्माण करणें असेल, त्यानें निरंतर एकांतवासांत असावें. ह्यावर एकांतांत बसून लोकसमुदाय जमावा कसा ? अशी सहजीं शंका येते. परंतु एकांतवासा-पासून कसकसे फायदे होतात त्याचें त्यांनीं पुढें विवरण केलें आहे. त्यापैकीं कांहीं भाग सरळ गद्यरूपानेंच येथें देतो:—

"म्हणजे तेथें [एकांतांत] त्याला युक्ति सुचतात निरंतर मनामध्यें तोच विषय घोळत राहतो; आणि प्राणिमात्राची सारी परिस्थिति लक्षांत येते. कोण-त्याही प्राण्याला दुःख न देतां जिकडे तिकडे राजकारणानेंच समुदाय आपलासा करून घेतां येतो. न समजतां कार्य करावें तें तत्काळ सिद्धीला जातें. चव्हाट्यावर गेल्यावर मग त्यांत मजा नाहीं. जो दुसऱ्यावर अवलंबून राहतो त्याचा कार्यभाग बुडाला म्हणून समजावें. ग्रामकंटक असतील ते वर्मी

पकडावेत. त्यांचें रगडून रगडून धीठ करून सोडावें. धीठ केलें तरी पुन्हा त्यांना सांवरून घ्यावेत, बुडूं देऊं नयेत. दुर्जनांची समजूत करावी. त्यांनाही सज्जनांप्रमाणें मोठेपणा देऊन प्रसन्न ठेवावेत. ठोंब्यापुढें ठोंबा लावून द्यावा. गलेलठ्ठापुढें गलेलठ्ठच उभा करावा. दांडग्याला दांडगाच पाहिजे. जशाला तशाची गांठ पडते तेव्हांच चढावर चढ होतो. पण मुख्य धनी कोण, हें मात्र समजत नाहीं."

राजकारणासंबंधानें जनाला जो काय समर्थांनीं उपदेश म्हणून केला आहे तो येवढाच. ह्याशिवाय राजकारणाचा म्हणून निराळा उपदेश असा कोठेंच नाहीं. तेव्हां येवढ्यावरून व इतर प्रत्यंतरीं पुराव्यावरून समर्थांनीं शिवाजीमहाराजांस राजकारणामध्यें कितपत साह्य केलें, किंवा त्यांस कितपत सहाय्य झालें, ह्याचा कयास काढावयाचा आहे.

हा विचार समर्थांनीं पूर्वींच सांगून ठेवलेला आहे. तोच जनापुढें मांडावयाचा व थोडासा विशद करून सांगावयाचा येवढेंच काय तें काम आमच्याकडे आहे. पुष्कळ लोकांस हा एक मोठा बिकट प्रश्न आहेसा वाटतो. तो हा कीं, **धर्म आणि राजकारण हीं परस्परावलंबी आहेत, कीं तीं आपआपल्यापरी स्वतंत्रही राहूं शकतील ?** ह्याचें उत्तर कितीएक लोक अनुकूल देतील व कितीएक प्रतिकूल देण्यासही चुकणार नाहींत. आमच्या मतानें तर आम्ही स्पष्ट म्हणतों कीं, तीं परस्परावलंबीच आहेत. पतीशिवाय स्त्री व स्त्रीशिवाय पति जगावर असत नाहीं असें नाहीं; परंतु तीं उभयतां एकजीवानें असतां जी शोभा, जो जोम त्यांच्यांत दृष्टीस पडतो, तो तीं विभक्त असतां पहावयास मिळणें कधींच शक्य नाहीं. धर्म ही एक कामधेनु आहे; आणि राजा हा एक तिचा पालक आहे. हीं दोन जेथें एकत्र नांदतात, तेथें स्वर्गसुखाला कमी तें काय ? म्हणूनच-

**प्रजा हाच कीं वत्स भू-धेनुकेचा ।**
**नृपा तूं करी नीट सांभाळ त्याचा ॥**

राजाला समर्थांनीं म्हटलें आहे कीं, "हे राजा ! प्रजा हा मायभूमीरूप कामधेनूचा पाडा आहे. त्याचें तूं मनःपूर्वक संरक्षण कर." आणि इतिहासांतसुद्धां कोणतेंही उदाहरण घ्या. '**यतो धर्मस्ततो जयः**'— जेथें धर्म असतो तेथेंच यशःसमृद्धि असल्याचें आढळून येतें. कितीही

-मोठा चक्रवर्ति असो, त्याला सुद्धां गुरु असल्याचीं उदाहरणें आहेतच, व अशा गुरुशिष्यांच्या जोडींत शिष्य हे आपलें उच्च सिंहासनावर असावयाचेच. श्रीरामचंद्राचे गुरु वसिष्ठ होते; भगवान् श्रीकृष्णाचे संदीपनी होते; अरिस्टाटल हा शिकंदर बादशहाचा गुरु होता. प्रथम दादोजी कोंडदेव व मागाहून समर्थ हे शिवाजी महाराजांचे गुरु होते. ब्रम्हेंद्रस्वामी हे पेशव्यांचे गुरु होते व बहिरामखान हा अकबर बादशहाचा गुरु होता. तात्पर्य, मोठे राजाधिराज झाले तरी त्यांस गुरु हे लागतातच. आणि ते कशाला ? तर धर्म संरक्षण करण्याला. आगबोट कितीही वेगाची असो, तिला सुकाणूं हें अवश्य पाहिजे. इतकेंच नव्हे, तर तिचा वेग जितका अधिक, तितकी तिला सुकाणूची आवश्यकता अधिक. राज्याची व राजाची गोष्ट हुबेहुब तशीच आहे. म्हणूनच कोणत्याही राजाला व राज्याला धर्महीं लागतो, व धर्मगुरुही लागतो. ही गोष्ट पुनरुक्त झाली खरी, तथापि तीच पुन्हा दृढतर करण्यासाठीं सांगतों कीं, लगामाशिवाय घोडा; वेसणीशिवाय बैल; सूर्याशिवाय पृथ्वी; नेत्रांशिवाय देह; ह्यांची जी दुर्दशा, तीच धर्माशिवाय राष्ट्राचीही दुर्दशा होय. ह्याला ठळक उदाहरण इतिहासांतील म्हटलें म्हणजे फ्रान्स देशांतील राज्यक्रांति हेंच आपल्या डोळ्यासमोर आहे.

रक्ताच्या नद्या वाहिल्या; पारिससारखें शहर वोंचिराख झालें; रोजचा शिधा पाळीप्रमाणें सरकारांतून आणून दुपारच्या वेळा भागविण्याचा प्रसंग आला; दररोज किती मनुष्यांचे प्राण घ्यावेत ह्याची गणती नाहींशी झाली. शिरच्छेद करणारे मांग थकले; गलबतें भरून बुडविलेलीं मनुष्यें खाऊन खाऊन मासे विषारी झाले. कत्तलींत मरणोन्मुख होऊन पडलेल्या शिपायांचीं काळजें बायकांनीं भोसकून काढून तीं कढयांत तळून लोकांस वाढलीं! आणि इतक्या सर्व अनर्थाचें मूळ काय, तर धर्मलंडपणा !

पढतमूर्खांचा सुळसुळाट झाला; चार्वाक दर्शनाचें पीक पिकलें; पाखांड्यांना ऊत आला; नास्तिकांचें बंड माजलें; दुष्टाचार्य म्हणविणाऱ्या लोकांनीं जगन्नायकालाच घाव्यावर बसविलें; नीतिनें तोंड चुकविलें; प्रातिव्रत्य अस्तास गेलें मोठे मोठे धर्माध्यक्ष राजदरबारांत येऊन 'परमेश्वर' म्हणून कोणी नाहीं, असें छाती ठोकून गर्जू लागले. व ढोंग्यांचे देव्हारे

माजले; पवित्र झगे फाडून त्यांच्या गाढवावर झुली घातल्या; बायबलचे पुण्यपावन ग्रंथ गाढवांकडून तुडविले; घांटा ओतवून तोफा केल्या; असे एक ना दोन ! हजारों अनर्थ कोसळले !

पण ह्या चक्रानें जेव्हां पुन्हा उलट गिरकी खाल्ली तेव्हांच लोकांचा तरणोपाय लागला. ‘ **परमेश्वर म्हणून एक आहे** ’ **असें लोकांनीं मानलें पाहिजे असा सरकारास कायदा करावा लागला !** तेव्हांच त्या अनर्थपातास–जविहत्येस–आळा बसला, व हळूहळू पूर्वस्थिति प्राप्त झाली. राष्ट्रकार्याला धर्माच्या पाठिंब्याची किती आवश्यकता असते, व तो नसला तर राष्ट्रावर केवढा कहर गुदरतो, ह्या गोष्टीची उत्तम साक्ष पटण्याला हें एकच उदाहरण पुरें आहे. हाच सिद्धांत पूर्णपणें मनांत आणून समर्थांनीं तो सर्व जनास विदित केला कीं:—

**एक हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ॥**

‘ हरिकथा निरूपण ’ हें समाजांतलें पहिलें कार्य आहे. राजकारण हें त्यानंतर. हरिकथा निरूपण–म्हणजे धर्मप्रसार–हें कांहीं सांगणें नको. त्याचा नंबर पहिला; आणि राजकारणाचा नंबर दुसरा ! अर्थात् धर्मप्रसार आधीं झाला पाहिजे, म्हणजे मग राजकारण सिद्धीस जाणें फारसें कठीण नाहीं. धर्माचा पाया बळकट असला तरच पुढील राजकारणाला शाश्वत स्वरूप प्राप्त होतें; नाहीं तर तें केव्हां ढांसळेल ह्याचा नेम नसतो. म्हणून प्रथमपासूनच त्यांनीं पायाशुद्ध काम केलें आणि तें कार्य त्यांनींच करावें असा ईश्वरी संकल्पही होता, असें त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसतें.

कोणतेंही उत्तम बीज रुजत घालून उत्कृष्ट पीक काढणें असेल तर प्रथम जमिनीची उत्तम मेहनत मशागत केली पाहिजे, तिच्यांतील दगड धोंडे वेचून काढून ती नांगरून साफ केली पाहिजे, तरच तेथें उत्तम बीज रुजतें. हाच दृष्टांत राष्ट्रासही लागू होतो. एखाद्या राष्ट्रांत स्वराज्याचें बीजारोपण करणें असेल तर आधीं स्वराज्याची भूमी साफसूफ व सरळ केली पाहिजे. म्हणजे त्यांतील आडदांड लोक, उडाणटप्पू लोक बदमाष लोक, ह्यांस सन्मार्गास लावून त्यांचीं मनें सरळ करून सत्कार्यास कधीं आड येणार नाहींत असें क्षेत्र बनवावें लागतें, तरच पुढील कार्यभाग उत्तम रीतीनें पार पडतो. उत्तम चितार्‍याला सुद्धां हाच मार्ग स्वीकारावा

लागतो. भिंतीवर चित्र काढणें असेल तर ती भिंत साफसूफ करून तिच्यावर सफेती दिली पाहिजे. कापडावर चित्र काढणेंअसेल तर कापड स्वच्छ धुऊन वाळवून त्यावर रोगण वगैरे देऊन त्यांतील सारीं बारकींसारकीं छिद्रें बुजवून टाकून सारी सपाटी तुळतुळीत केली पाहिजे. हें जमीन साफसूफ करण्याचें काम जितकें नीटनेटकें व सफाईदार होईल, तितकें चित्र-कौशल्याचें काम त्यावर खुलून वठतें. पहिली भूमिका व्हावी तशी सफाई-दार न बनेल तर, चितारी केवढाही कुशल असला तरी त्यावर त्याला काढावें तसें चित्र काढतां येणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें स्वधर्मानें जर स्वराज्यांतील लोकांचीं मनें व्हावीं तशीं निर्मल व प्रसंगास तोंड देणारीं बनणार नाहींत तर त्यावर स्वराज्याची इमारतही उठावी तशी उठणार नाहीं. हें सर्व मनांत आणूनच समर्थांनीं आपल्या इतिकर्तव्याचा उपक्रम सुरूं केला. समर्थ हे शिवाजी महाराजांच्या पूर्वीं १९ वर्षें जन्मले होते. अर्थात् समर्थांच्या बालपणांत शिवाजीचा कांहीं एक अर्थाअर्थीं संबंध नव्हता. तरी त्या दोघांचें ध्येय व बुद्धि अगदीं एकसारखीं होतीं. लोक-समुदाय जमा करावयाचा हें ध्येय दोघांचेंही एकच. पण उद्देश मात्र निरनिराळे. समर्थांचा उद्देश समुदाय वाढवून उपासनामार्ग—धर्म ह्याची अभिवृद्धि करावयाची आणि शिवाजीचा उद्देश समुदाय जमवावयाचा हा तर होताच; पण ध्येय मात्र निराळें. ते कोणतें ? तर स्वराज्याची अभिवृद्धि करावयाची. त्यासाठीं आधीं भूमिका तयार करावयाची हें पहिलें काम. तें आधीं आपण करून ठेवावें. मग दुसरें जें राजकारण ते करणाराही कोणी तरी पुरुष उत्पन्न होईलच. अशा भिस्तीवर त्यांनीं आपलें काम सुरूं केलें. धर्मस्थापनेच्या कामाला आधीं वैराग्य पाहिजे, उपासना पाहिजे, ती त्यांनीं नवव्या वर्षा-पासूनच सुरूं केली. केवळ नवव्या वर्षापासूनच उपासना व वैराग्य अंगांत मुरून राहणें यास ईश्वरी संकल्पाशिवाय आपण दुसरें काय बरें नांव द्याल ? नंतर '**सावधता सर्वविषयीं**' हें समर्थांचें तिसरें सूत्र होय. त्याचा त्यांनीं अवलंब केला. प्रपंचांत—मायाजाळांत—आपण गुंतून पडलों तर आपल्या हातून लोककार्य कांहींएक होणें नाहीं, हें ते पूर्णपणें जाणून होते. पण केव्हांपासून ? नऊ वर्षांपासून ! किंवा फार तर ११।१२ वर्षां-पासूनच ! अहाहा ! केवढी धन्य त्या कोमल अंतःकरणाची ! मातोश्रीच्या

आग्रहाकरतां बहुल्यावर उभे राहिले मात्र, पण ब्राह्मणांनीं 'शुभमंगल सावधान' म्हणतांच ' मी पूर्वींपासूनच सावध आहे ' असें म्हणून जी धूम ठोकली ती ठोकलीच ! आणि जणों काय ' मी आतां स्वधर्मस्थापना करून स्वराज्याची भूमिका तयार करतों. त्यासाठीं हे रघुपते ! तूं आतां आम्हांस सर्वतोपरी योग्य होईल असा राजा निर्माण कर.' अशी प्रार्थना करूनच नाशिकास एकनिष्ठ व कडकडीत तपश्चर्या आरंभिली. पहांटें उदकांत उभे राहून वयाच्या बाराव्या वर्षींच ह्या तपश्चर्येस आरंभ केला ! मग या बालार्क तपोनिधीची निष्ठा व तेज पाहून श्रीरघुपती तरी त्यांस कां न प्रसन्न होतील ? त्यांच्या तपश्चर्येच्या सातव्या वर्षींच शिवरायांचा शिवनेरी किल्ल्यांत जन्म झाला ! तेव्हां तेही समर्थांच्याच तपश्चर्येचें फळ असें का बरें न म्हणावें ? मनुष्याच्या आंगांत परमेश्वरी सामर्थ्य येणें कधीं शक्यच नाहीं; असाच ग्रह बनून राहण्याइतकीं ज्यांचीं अंतःकरणें कठोर असतील, त्यांना पाहिजे तर या गुरुशिष्यामधील हा पूर्वजन्मसंस्कार मिथ्या वाटत असेल तर वाटो, परंतु ज्याची थोडी तरी आस्तिक्य बुद्धि म्हणून आहे, त्याच्या मनावर ह्या लागाबांध्याचा थोडा तरी परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं अशी आम्हांस खात्री वाटते.

समर्थ नाशिक पंचवटीमध्यें एकोणिसाव्या वर्षीं तपश्चर्या करीत असतां शिवरायाचा जन्म झाला. त्यावेळीं परस्परांचा कांहींएक संबंध नव्हता. शिवाजी पांच वर्षांचा झाला तेव्हां समर्थांची बारा वर्षांची तपश्चर्या पुरी झाली व ते बारा वर्षांच्या पृथ्वीप्रदक्षणेस निघाले. ती बारा वर्षांची प्रदक्षिणा पुरी करून शके १५६६ मध्यें म्हणजे आपल्या वयाच्या छत्तीसाव्या वर्षीं—ते कृष्णातीरीं वास्तव्य करावयास गेले. त्यावेळीं शिवाजी महाराजांस सतरावें वर्ष चालू होतें. तोंपर्यंत त्या परस्परांचा अर्थाअर्थीं कांहीं एक संबंध नव्हता हें उघड आहे.

तरी त्या उभयतांचे उद्योग, प्रयत्न, व्याप व हेतु अगदीं समसमान होते ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. दोघांचे प्रयत्न वेगवेगळे परंतु ध्येय एक. तें कोणतें ? तर समुदाय जमवावयाचें. पण दोघांचा हेतु मात्र भिन्न भिन्न. तरी ते एकमेकांस पुष्टिदायक. समर्थांचा हेतु समुदाय जमवून धर्मस्थापनेचा; आणि शिवाजीचा हेतु समुदाय जमवून स्वराज्यस्थापनेचा.

तरी हा कालपर्यंत परस्परांस परस्परांची मुळींच कांहीं माहिती नव्हती. असें असतां ज्याअर्थीं समर्थ मुद्दाम येऊन कृष्णातीरीं याच सुमारास वास्तव्य करावयास आले, त्याअर्थीं असें मनांत येत नाहीं काय, कीं, 'माझ्या तपश्चर्येनें माझ्या मनासारखा राजा मिळाला आहे. व तो आतां स्वराज्याची स्थापना करणार. याकरितां जी भूमी तो संपादन करणार तींत आधीं धर्मस्थापना करून ती पवित्र करून ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे. ह्याकरितां आपणही तेथें जाऊन आपलें काम बजावूं या.' असेंच म्हणून जणों काय कृष्णातीरीं निवास केला.

समर्थ कृष्णातीरीं आले, त्यावेळीं शिवाजीमहाराजांचें वय सतरा वर्षांचें असून स्वराज्य आक्रमण करण्याविषयीं अटोकाट प्रयत्न त्यांनीं चालविले होते. ह्या उभयतांत समर्थ हे पहिले असून त्याचें कार्यही पहिलें होतें. म्हणून त्यांनीही कृष्णातीरीं येतांच आपल्या धर्मस्थापनेच्या कामाला सुरुवात केली. अनुग्रह प्रसाद देऊन हजारों शिष्यसमुदाय जमा केला. आणि शके १५६७ मध्यें म्हणजे आपल्या वयाच्या ३७ व्या वर्षीं मसूर येथें मठाची स्थापना करून प्रतिवार्षिक उत्सवास सुरुवात झाली, अर्थात शिवाजीमहाराजांना जणों काय अशी सूचनाच दिली कीं, 'आतां पहातोस काय? माझें काम करावयाचें तें मीं केलें. धर्मस्थापनेची मुहूर्तमेढ रोवावयाची ती मीं रोवून टाकिली. आतां स्वराज्याच्या कामाला तुझीही सुरुवात होऊं दे.' शिवाजीमहाराजही आपल्या कर्तबगारींत कांहीं कमी होते अशांतला भाग मुळींच नाहीं. समर्थांचा भाग उच्च प्रतीचा होता, पण शिवाजीमहाराजांचा भाग त्याहून बिकट होता. तरी ती गुरुशिष्यांची जोडी केवळ अपूर्वच होती. शिवाजी महाराजांनींही समर्थांच्या तोडीस तोड दिली. समर्थांनीं आपल्या यशःसिद्धीकरतां बाल्यवयांतच कडकडीत तपश्चर्या केली; पृथ्वीप्रदक्षिणा घातली; शिष्यसमुदाय जमविला आणि मसूरच्या मठाची स्थापना करून महाराष्ट्र धर्माच्या पायाची कोनशिळा बसविली; तर शिवाजी महाराजांनीं बाल्यावस्थेंतच घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, दांडपट्टा खेळणें, मृगया करणें इत्यादि शौर्याला साधनभूत कला संपादन करून, मावळ्यासारख्या काटक, शूर व स्वामिनिष्ठ लोकांचे समुदाय जमविले आणि दुसऱ्याच वर्षीं—फक्त समर्थांनीं मातृभूमीचें पुण्याहवाचन करण्याचा अवकाश—कीं,

शके १५६८ व्या म्हणजे आपल्या वयाच्या एकोणीसाव्या वर्षींच बादशहाच्या ताब्यांतला 'तोरणा' किल्ला हस्तगत करून स्वराज्यस्थापनेचा विडा उचलला, आणि स्वातंत्र्यमंदिराच्या महाद्वारावर तोरणा किल्ल्याचें तोरण बांधलें.

म्हणजे पहा! समर्थांच्या वयाच्या १९ व्या वर्षींच शिवाजी राजांचा जन्म झाला. अर्थात् समर्थांनीं आपल्या तपश्चर्येचें फळ आपल्या वयाच्या १९ वर्षीं मिळविलें. म्हणून त्यांना हवा होता तसा भावी राजा जन्मास आला. त्याच तोडीला जणों काय तोडच असा शिवरायानेंही आपल्या वयाच्या एकोणीसाव्या वर्षींच तोरणा किल्ला घेऊन आपल्या तपश्चर्येचें—पूर्वपुण्याईचें—किंवा आपल्या करामतीचें फळ लोकांस दाखवून आपलेंही सामर्थ्यतेज प्रगट केलें. अशी ही ह्या दोन तेजस्वी पुरुषांची दुकल महाराष्ट्रांत उत्पन्न होऊन एकावर एक चढ करूं लागली.

समर्थ कृष्णातीरीं येऊन वास्तव्य करीपर्यंत ह्या परस्परांची परस्परांस यत्किंचित्‌ही कांहीं माहिती नव्हती हें उघडच आहे. परंतु मसूरच्या मठाची स्थापना झाल्यापासून समर्थांची कीर्ति महाराष्ट्र देशांत सर्वतोमुखीं होत चालली. त्यांतून आंब्याची ढाळी तोडण्याविषयीं बादशहाकडून आयत्या वेळीं हुकूम आणला; कल्याणास वांचविलें; भिकाजीबावांस बाहेर काढलें; शहापुरकरास सोडवून आणलें; इत्यादि अद्भुत गोष्टींनीं तर समर्थांची कीर्ति साऱ्या महाराष्ट्रांत दुमदुमत होती. तेव्हां ती शिवाजी महाराजांच्या कानापर्यंत जाणें अगदीं साहजिक आहे. त्यावेळीं जणों काय शिवाजी महाराजांनाही वाटलें कीं, आपल्याला समर्थांसारखा पाठीराखा आला; धर्मस्थापनेनें भूमी पवित्र करून सोडली. आतां आपणालाही स्वराज्याचा झेंडा उभारावयास हरकत नाहीं. म्हणून त्यांनींही कंबर कसली, आणि त्याच्या दुसऱ्यास वर्षीं तोरणा किल्ला हस्तगत करून स्वराज्याचा पाया घातला.

यःकश्चित् १९ वर्षांच्या मुलानें बादशाहाचा किल्ला एकदम हस्तगत करणें म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. मोठमोठ्या मी मी म्हणविणाराला सुद्धां ती गोष्ट दुरापास्त होती. या कारणानें शिवाजीमहाराजांचीही कीर्ति तशीच लोकोत्तर पसरत चालली. ती कीर्ति समर्थांच्या कानावर गेली

असेल हें काय सांगितलें पाहिजे ? ही शिवाजी महाराजांची अश्रुतपूर्व कीर्ति ऐकिली:तेव्हां आपल्या योजनेप्रमाणें:—

**गलिमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुरफुरती भुजा ॥**
**ऐसा पाहिजे कीं राजा । कैं पक्षीं परमार्थी ॥ १ ॥**
**जयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ॥**

आपल्याला हवा तसा राजा मिळाला म्हणून त्यांना किती बरें धन्यता वाटली असेल ! इतक्यांत शके १५७० मध्यें चाफळच्या मठाची स्थापना होऊन श्रीचा उत्साह मोठ्या थाटामाटानें सुरू झाला. त्यामुळें तर समर्थांची कीर्ति अगदीं खेड्यानिहाय पसरून राहिली. अशा प्रकारें परस्परांची कीर्ति परस्परांच्या कानावर गेली. आणि परस्परांचें परस्परांत साह्य असणें अत्यावश्य वाटून भेटीची उत्कट इच्छा उद्भवली. परंतु प्रथम कोणीं जावें येवढाच काय तो प्रश्न होता. पण समर्थांकडे वडीलपणा, म्हणून त्यांनींच शिवाजीस पत्र पाठविलें, व तेंही अति उत्सुक असल्यानें पत्रोत्तराच्या पाठोपाठ जाऊन समर्थांस भेटले व त्याच दिवशीं त्यांनीं त्यांचा अनुग्रहही पण घेतला. ही गोष्ट शके १५७१ मध्यें झाली. त्या वेळीं शिवाजीचें वय २२ वर्षांचें होतें, व समर्थांच्या वयाला ४१ वें वर्ष लागलें होतें.

अर्थात् येथपर्यंत तरी शिवाजी महाराजांच्या राजकारणांत समर्थांचा अर्थाअर्थी सुद्धां संबंध नव्हता. समर्थांचा धर्मस्थापनेचा जसा स्वयंसिद्ध उपक्रम होता, तसाच शिवाजी महाराजांचाही स्वराज्यस्थापनेचा स्वयंसिद्ध उपक्रम होता. त्यांत निदान ह्या वेळेपर्यंत समर्थांचें कोणत्याही प्रकारचें अंग नव्हतें; त्यांच्या राजकारणांत समर्थ नडलेले नव्हते; किंवा त्यांनीं त्यांना कोणत्याही प्रकारची सल्लामसलतही दिलेली नव्हती, हें तर अगदीं स्पष्ट आहे. तेव्हां शिवाजी महाराजांच्या स्वराज्यप्राप्तीच्या उपक्रमामध्यें—राजकाणामध्यें—निदान अनुग्रहापर्यंत तरी समर्थांचा लेशमात्र अंश नव्हता. येथपर्यंत तरी त्याबद्दल कोणाचा वाद नाहीं. आतां यापुढें म्हणजे अनुग्रह घेतल्यानंतर समर्थ हे शिवाजी महाराजांच्या राजकारणांत कितपत पडले, किंवा त्यांनीं त्यांना त्या कामीं कितीशी सल्ला दिली, हें पाहिलें म्हणजे या वादाचा निकाल लागला.

समर्थांची व शिवाजीची प्रथम भेट झाली, त्याच दिवशीं त्यांनीं त्यांचा अनुग्रह घेतला. त्याच दिवसाचा समर्थांचा उपदेश करण्याचा रोख काय होता ? त्यांत कांहीं राजकारण होतें कीं काय ? किंवा पुढें तरी त्यांनीं राजकारणासंबधानें कधीं उपदेश किंवा सल्लामसलत दिली होती कीं काय ? दिली असली तर तींत राजकारण कितपतसें होतें ! ह्या दिवशी त्यांनीं प्रथम बोध केला तो लघु बोध होय. ह्यांत फक्त 'आत्मानात्म' विचार आहे. दुसरें कांहींच नाहीं. पंचमहाभूतात्मक सृष्टि ही सर्व नाशिवंत असून आत्मा येवढाच काय तो अमर आहे, इतकाच त्यांतील सारांश आहे. त्यांत प्रपंच किंवा राजकारण ह्याचा लवमात्रही उल्लेख नाहीं. पण त्या 'लघु बोध' रूप उपदेशानेंच शिवाजी महाराजाच्या अंतःकरणास उपरति झाली आणि ते सर्वसंगपरित्याग करून वैराग्यवृत्तीनें समर्थांपाशींच राहवयाची इच्छा करूं लागले. तेव्हां मात्र समर्थांनीं आपल्या उपदेशाचा रोख बदलून व्यावहारिक उपदेश केला आहे. त्यांतील सारांश असाः—

"बाबारे ! प्रत्येकाचे मार्ग व पंथ वेगवेगळे आहेत. ज्यानें त्यानें आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें चालावें. विरक्ताचा धर्म विरक्ताला, आणि संसाऱ्याचा धर्म संसाऱ्याला. क्षत्रियानें क्षत्रियांचाच धर्म पाळला पाहिजे. राजाचा धर्म राजानें पाळावा. गोरगरिबांचें संरक्षण करणें आणि दुष्टांचें पारिपत्य करणें हा राजाचा धर्म होय. मनुष्यें पारखून जवळ ठेवावींत, योग्यता पाहून काम सांगावें, धन्यानें आणि सेवकानें एकदिलानें असावें. ज्यांचें कर्तव्य त्यांनीं करावें; त्यांतच पुण्य आहे. स्वधर्म सोडून पर-धर्मांत पडणें हें पातक होय."

"कोणत्याही कामांत दक्ष व सावध असावे. देवद्रोही असतील ते सारे शत्रू समजावेत. अंगांत धैर्य असावें, पराक्रम असावा, आपल्याला पाहून शत्रूंनीं थरथर थरथर कांपावें. शत्रूंनां पार धुडकावून द्यावेत, पण त्यांचा नाश करूं नये. त्यांना पुन्हा समजुतीनें वळतीवर आणावेत. दुसऱ्यास केव्हांही दुःख देऊं नये, सेवकानें स्वामीनिष्ठ असावें."

हाच सारा त्यांच्या उपदेशाचा सारांश आहे. आणि ह्या प्रथम दिवसा-खेरीज पुन्हा त्यांनीं इतका साक्षेपानें कधीं उपदेशही पण केलेला नाहीं. नाहीं म्हणावयाला एकच प्रसंग पुन्हा आढळतो. तो कोणता ? तर अफजुलखानाच्या

वधानंतर समर्थांस भेटावयास प्रथमच राजश्री गेले, त्या वेळीं रचलेला द० १६ तील ६ वा, 'उत्तम पुरुषलक्षण' नांवाचा जो समास आहे तो. पण त्यांतही विशेष गुप्त असें राजकारण कांहींच नाहीं. राजेश्री प्रत्येक गुरवारीं समर्थांच्या दर्शनास येत असत. व कधीं कधीं एक दोन दिवस मुक्कामही होत असे. पण त्यांतही कधीं समर्थांनीं राजकारणाची सल्ला सांगितली नाहीं, व राजेश्रींनींही कधीं विचारल्याचा दाखला नाहीं.

उलट राजश्री राज्यव्यवहाराविषयीं सल्लामसलत विचारीत असतांही त्यांनीं ती आपण होऊन कधींच सांगितली नाहीं. महाराष्ट्रांतील इतर साधुसंत ज्याप्रमाणें ज्ञाते होते त्याप्रमाणें समर्थ तर ज्ञाते होतेच, पण त्यांच्यामध्यें आणखी एक विशेष गुण होता, आणि तो मोठा लोकोपयोगी होता. तो कोणता? तर व्यवहारचातुर्य आणि सत्कार्यास उत्तेजन देण्याची शैली. त्यामुळें शिवाजी महाराजांना नेहेमीं वाटत असे कीं, समर्थांच्या आशिर्वाचून राज्यकारभारांतील कोणतीही गोष्ट करूं नये. म्हणून ते त्यासाठीं दिवसांच्या दिवस आडूनही बसत असत. इतकी जरी शिवाजीमहाराजांची समर्थचरणीं निष्ठा होती तरी, समर्थांनीं त्यांस राज्यव्यवहारापैकीं एकही सल्ला कधीं दिली नाहीं, ही गोष्ट अतिशय लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ह्याचें कारण, ते परिपूर्णपणें जाणून होते कीं, आपण कितीही जाणते असलों तरी एका परमार्थविषयांत; राज्यव्यवहारांत आपण केवळ अज्ञ होत. त्यांत आपल्याला तिळमात्रही गम्य नाहीं. तेव्हां राजव्यवहारांत आपण कोणतीही सल्ला देणें उक्त होणार नाहीं. एखादा खर्डेघाशा किंवा टाळकुट्या एखाद्या लष्करांतील सेनापतीला युद्धाच्या कामीं सल्लामसलत देऊं लागला तर ती कितीशी शोभेल? व कितीशी उपयोगी पडेल? तोफांच्या सरबत्तीनें नाना फडर्णासांची काय दशा झाली हें इतिहासज्ञांना अवगतच आहे. पाटीलबुवांनीं श्रीमंतापाशीं नानाफडणीशी मिळण्याबद्दल पर्वतीच्या तळ्यांत भीड घातली होती. परंतु 'उजव्या अंगाला डावा हात व डाव्या अंगाला उजवा हात लावला, तर चालेल काय?' असा त्या राजबिंड्यानें रोखठोक जबाब देतांच पाटिलबुवांचा बालंपंच ढिला पडला! हेंही बहुश्रुत वाचकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं.

' जेनो काम तेनो थाय, बीजा करेसो गोते खाय ' हा नियम समर्थ पूर्णपणें जाणून होते. आपली स्फूर्ति वेगळी व शिवाजीची स्फूर्ति वेगळी.

स्वराज्यआक्रमणाचें बीज शिवाजीच्या अंतःकरणांत जन्मापासूनच रुजलेलें आहे, त्याचीं अनेक साधनें त्यानें अनुकूल करून घेतलीं आहेत, त्यांत अनिवार्य संकट आलें तर त्यांतून कसें पार पडावें, ह्याची क्लृप्ति जशी त्याला सुचेल तशी इतरांस सुचणार नाहीं. हें सर्व मनांत आणूनच ते शिवाजीनें कितीही प्रकारें विचारिलें तरी राज्यव्यवहारांतील सल्ला कधींही देत नसत. प्रत्येक खेपेस ते टाळाटाळ करीत. परंतु अखेर शिवाजी प्रत्येक खेपेस समर्थांच्या आज्ञेसाठीं आडून बसूं लागला, तेव्हां त्यांनीं एक उत्कृष्ट युक्ति योजली. ती अशी कीं, आपण जवळ नसलों आणि एखादा संकटाचा प्रसंग आला, तर राजेश्रींनीं शुचिर्भूत होऊन देवीपुढें बसून प्रार्थना करावी, म्हणजे त्यांच्या अंगांत देवीचा संचार होईल. तेव्हां कोणी तरी त्यांस प्रश्न करून जी आज्ञा होईल ती कारकुनानें लिहून ठेवावी, आणि त्याप्रमाणें पुढें वर्तणूक करीत जावी. शिवाजी महाराज ह्या समर्थांच्या आज्ञेप्रमाणेंच पुढें चालत असत.

ह्या योजनेंत केवढें चातुर्य दिसून येतें तें पहा. आधीं संकटसमयीं देवीची–कुलदैवताची प्रार्थना करणें हा तर अनादिसिद्ध व शास्त्रोक्तच मार्ग आहे. दुसरें त्यांत ईश्वरास स्मरून एकाग्र चित्तानें स्वयंस्फूर्तीनें जो विचार सुचेल तोच उत्तम, तोच बहुमोलाचा. अशा कामीं दुसऱ्याचें विचार कुचकामी होत. ' सबसे सुन्ना और दिलसे करना ' हीच चालत आलेली म्हण खरी आहे. सर्वांचें म्हणणें काय पडतें तें ऐकून घ्यावें, पण शेवटीं करावयाचें तें आपल्याच विचारानें करावें. स्वतः विचारानें जें कार्य करावें तेंच फलदायक होतें. दुसऱ्याच्या तोंडानें पाणी पिण्यानें कोणत्याही कार्याचा बिघाड मात्र होतो. आपल्या कार्याचा विचार आपण जसा साऱ्या बाजूनें करतों, तसा दुसरे लोक करीत नाहींत. कारण आपला विषय रात्रंदिवस आपल्या अंतःकरणांत घोळत असतो, तसा तो दुसऱ्याच्या अंतःकरणांत आपला विषय घोळत राहणें शक्य नाहीं. मुक्तेश्वरांनीं आदिपर्वामध्यें आत्मविचाराची महति फार उत्कृष्ट रीतीनें सांगितली आहे. ते म्हणतातः—

**विवेका ऐसा गुरु । चित्ता ऐसा शिष्य चतुरु ॥**
**जिवा ऐसा मित्र उदारु । भुवनत्रयीं मिळेना ॥ १ ॥**

"विचारासारखा गुरु, चित्तासारखा चतुर शिष्य आणि जिवासारखा उदार मित्र, त्रिभुवनांतसुद्धा मिळणार नाहीं." हीच गोष्ट अक्षरशः खरी आहे. आणि तेंच तत्त्व समर्थ रामदास स्वामींनीं शिवाजी संबंधानें अमलांत आणलें होतें. म्हणजे त्यांनीं त्यांस राज्यव्यवहारांत कोणत्याही प्रकारची सल्लामसलत कधीं दिली नाहीं. त्याचा त्यालाच विचार करावयाला लावून त्याच्याच विचारानें सारीं कामें पार पाडलीं.

म्हणून शिवाजी महाराजांना स्वराज्य घेण्याच्या कामीं समर्थ रामदासस्वामींची आंतून फूस होती, ते आंतून साऱ्या मसलती देत, व त्याप्रमाणें शिवाजी महाराज चालत, त्यांच्या आज्ञेशिवाय शिवाजी महाराज पाऊलही टाकीत नसत. म्हणून स्वराज्य आक्रमण करण्याचें सर्व श्रेय समर्थांकडेच आहे. रामदासस्वामी हें मोठें राजकारस्थानी पुरुष होते, हा जो प्रवाद ऐकूं येतो तो निखालास मिथ्या होय. शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवहारांत कीं राजकारणांत ते कधींहीं पडले नाहींत. चंद्रराव मोऱ्याला लग्नाचें आमिष दाखवून लंबा करा, अफजुलखानासाठीं वाघनखें तयार करून त्याचा कोथळा बाहेर काढा, कीं फळफळावळीचे पेटारे तयार करून दिल्लींतून पार पडा, अशापैकीं एकही गोष्ट समर्थांनीं त्यांस शिकविली नाहीं, व ती त्यांना शिकवितांही पण आली नसती. ह्या साऱ्या गोष्टी प्रसंगावधानानें त्यांच्या त्यांनींच पार पाडल्या आहेत. मिळून शिवाजीमहाराजांना स्वराज्य घेण्याच्या कामांत समर्थांचा जितका म्हणतात तितका उपयोग झाला नाहीं, किंबहुना मुळींच झालेला नाहीं म्हटलें तरी चालेल.

तरी पण अप्रत्यक्ष रीतीनें त्यांचा उपयोग बऱ्याच अंशीं झाला ही गोष्ट कोणासही कबूल केली पाहिजे. समर्थ शिवाजी महाराजांना प्रत्यक्ष सल्लामसलत देत नसत, तरी त्यांस उत्तेजन देत, आणि तें बिनमोल असे:—

**बहुतां दिवसांचें बंड । म्लेच्छ माजले उदंड ॥**
**त्यांचें करूनि दुखंड । राज्य करावें ॥ १ ॥**

**मनुष्य राजी राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें ॥ १ ॥**

**मारतां मारतां मरावें। तेणें गतीस पावावें॥**
**असे अवघेचि उठतां। परदळाची काय चिंता॥**
**हरणें लोळवी चित्ता। देखत जैसा॥**
**मराठा तेतुका मेळवावा। आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा॥**
**देवद्रोही तितुके कुत्ते। मारोनि घालावे परते॥**
**देवदास पावती फत्ते। यदर्थी संशय नाहीं॥**

महाराष्ट्रांतील जी साधु मंडळी होऊन गेली, त्यांच्यावर श्रीमुखांत विद्वानांचा असा आक्षेप आहे कीं, देह हा क्षणभंगुर आहे; संसार अशाश्वत आहे, शत्रूवरही दया करीत असावी, कोणी एक थोबाडींत दिली तर दुसरा गाल पुढें करावा अशी शांति असावी. असलीं मतें प्रदर्शित केल्याच्या योगानें लोकांच्या कर्तव्यांत शिथिलता उत्पन्न होऊन लोक मेषपात्र बनले, आणि त्यामुळें आपला सर्वस्वी नाश होऊन आम्ही पारतंत्र्यशृंखळेंत जखडून पडलों. असें ज्यांचें मत असेल त्यांनीं हे वरचे समर्थांचें उद्गार पहावेत म्हणजे त्यांचा समज किती चुकीचा आहे हें लक्षांत येईल. कोणताही साधु घेतला तरी 'दुष्टांचा संहार करावा' हें मत त्याला मान्यच असतें. गीतेंतही तसेंच सांगितलें आहे.

**तेथें पैंजारीचें काम। अधमाशीं तों अधम॥**
**तुका म्हणे ऐशा नरा। मोजुनि माराव्या पैजारा॥**

ह्या तुकारामांच्या उक्तीवरूनही त्यांच्या अंगांत मेषपात्रता होती असें दिसत नाहीं. साधुसंत हे 'वज्रादपि कठोराणि मृदूनिकुसुमादपि' अशाच स्वभावाचे असत. समर्थांचा व्यवहारदृष्टीकडे अधिक ओढा असल्यामुळें, व देवद्रोह्यावर त्यांचा कटाक्ष विशेष असल्यामुळें, त्यांचें शासन सांगण्यांत आवेश थोडासा अधिक दिसून येई इतकेंच. इतर साधुसंतांत व समर्थ रामदासस्वामींत विशेष म्हणून जें काय लोकांस वाटतें तें हेंच. पण त्याच्या योगानेंच कितीतरी मोठें कार्य झालें. तें हें कीं, शिवाजी महाराजांस स्वराज्य-प्राप्तीच्या कामीं अतिशय मदत झाली. ह्याचें कारण सत्कार्याला कोणीही 'भले शाबास' म्हटलें कीं, तें कार्य करणाराला अधिक हुरूप चढतो; 'वन्समोर' ऐकलें कीं, नटाचा सूर तृतीय स्वनांत जातो; 'अललल' म्हटलें कीं,

डोंबाऱ्याची उडी चार हात अधिक पुढें जाते. हा सृष्टींतला एक नियमच आहे. त्या नियमाला अनुसरून शिवाजीमहाराजांचें स्वराज्य प्राप्तीचें काम दुप्पट जोरानें चाललें, व दुप्पट जोरानें यशस्वी झालें.

परंतु समर्थांविषयीं दुसरा एक प्रवाद सर्वतोमुखीं ऐकावयास येतो तो हा कीं, शिवाजीमहाराजांना समर्थांची गुप्त रूपानें स्वराज्यप्राप्तीच्या कामीं अतिशय मदत होती. म्हणजे समर्थांचे शिष्य हे भिक्षेच्या रूपानें हेरांची कामगिरी करीत, त्यांना निरनिराळ्या ठिकाणच्या गुप्त बातम्या देत, सांकेतिक पत्रें पाठवून सूचना करीत, गुप्त स्थळांतून युद्धाची सामुग्री वगैरे ठेवीत. म्हणजे स्वराज्य आक्रमण करण्याच्या कामांतील समर्थ हे शिवाजी महाराजांचे एक गुप्त हस्तकच होते. कै. हरि नारायण आपट्यांनीं आपल्या 'उषःकाल' नामक कादंबरींत तर समर्थांचीं गुप्त स्थळें, कळसूली मारुती, हत्यारापात्यारांचीं गुप्त भांडारें असल्याचें स्पष्टपणें दर्शविलें आहे. पण त्याला आम्हास तर कोठें आधार दिसत नाहीं. 'रामघळ' 'हेळवाक' 'शिवराय' वगैरे अवघड ठिकाणें एकांतवासांत राहावयासाठीं केलीं होतीं हें खरें आहे. पण ते तेथें स्वतः एकटेच धर्मसंस्थापनेसंबंधीं विचार करीत. तेथें राज्यसंबंधीं मसलत कांहीं एक चालत नसे व तेथें युद्धसामुग्री ठेवीत असल्याचाही कोठें दाखला नाहीं. तसेंच ते सांकेतिक पत्रें पाठवीत असें म्हणण्यालाही फारसा कोठें आधार नाहीं. 'सांकेतिक लिपीचें' म्हणून आतांपर्यंत एकच पत्र उपलब्ध झालें आहे. तें 'रामदास आणि रामदासी' ग्रंथमाला 'भाग सतरावा' पान १९६ येथें छापलें आहे. तें असें:—

### ओंव्या.

वि वेकें करावें कार्यसाधन । जा णार नरतनु हें जाणून ॥
पु ढील भविष्यार्थी मन । र हाटोंचि नये ॥ १ ॥
चा लों नये असन्मार्गीं । स त्यता बाणल्या अंगीं ॥
र घुवीर कृपा ते प्रसंगीं । दा समहात्म्य वाढवी ॥ २ ॥
र जनीनाथ आणि दिनकर । नि त्य नेमें करिती संचार ॥
घा लिताती येरझार । ला विलें भ्रमण जगदीशें ॥ ३ ॥

**आ दिमाया मूळ भवानी। हे चि जगाची स्वामिनी॥**
**येकांतीं विवंचना करोनी। इष्ट योजना करावी॥ ४॥**

ह्या ओव्यांतील प्रत्येक चरणाचीं आद्याक्षरें एकत्र केलीं म्हणजे– ' **विजापूरचा सरदार निघाला आहे**' ह्या करितां [ पुढील दोन चरण ] '**एकांतीं विवंचना करोनी। इष्ट योजना करावी.**' हा या पत्रांतील सारांश आहे. हें पत्र कल्याणस्वामींचें म्हणून म्हटलें आहे. पण तें केव्हां लिहिलें ? कोणास लिहिलें ? तें अस्सल पत्र हल्लीं कोणाच्या संग्रहीं आहे ? ह्याचाच मागमोस नसल्याचें त्याच पत्राखालीं लिहिलें आहे !

ह्यावरूनच हें पत्र कितपत विश्वसनीय आहे याचा विचार करावा. तात्पर्य, समर्थांनीं शिवाजी महाराजांना गुप्तकारस्थानांत कोणत्याही प्रकारची सल्लामसलत दिली नाहीं, किंवा शिवाजी महाराजांसाठीं गुप्त स्थानें किंवा युद्धसामुग्रीचा संग्रह वगैरे कांहीं एक केला नव्हता; तर करतोस हें सत्कार्य आहे, तें नेटानें तसेंच पुढें चालीव; येवढेंच त्यांनीं त्यास उत्तेजन दिलें.

आतां पारमार्थिक दृष्टीनें किंवा आस्तिक्य बुद्धीनें विचार केला तर मात्र त्या कामांत समर्थांचा अंश विशेष होता हें कबूल करावें लागतें. सूक्ष्म विचारांतीं असें दिसून येईल कीं, समर्थांचा अवतार होता तो शिवरायाच्या तर्तुदीकरतांच होता ह्यांत संशय नाहीं. एकनाथ महाराजांचा आशिर्वाद; रामनवमीला दुपारींच जन्म; पांच वर्षांत विद्याभ्यास; सातव्या वर्षीं अनुग्रह आणि बाराव्या वर्षीं सर्वसंगपरित्यागपूर्वक तपश्चर्या, ह्या गोष्टी ईश्वरी संकेतच्या नव्हेत असें कोण म्हणणार असतील ते म्हणोत, आमचा तर तसा सूर वाहत नाहीं. समर्थांच्या १९ व्या वर्षींच शिवरायाचा जन्म, तो झाल्याबद्दल व तिकडे जाण्याबद्दल रघुपतींचा तगादा, ह्या गोष्टी तरी निवळ खोट्याच असतील काय ? राजश्री वयांत येण्याच्या सुमारासच समर्थ कृष्णातिरीं जाऊन त्यांनीं धर्मस्थापनेचा पाया घातला. शिवाजीनें १९ व्या वर्षींच तोरणा किल्ला घेऊन स्वराज्यास्थापनेचा पाया घातला.

समर्थांस राज्य दान देणें, तुमच्यासाठीं तपश्चर्या करणारे करतातच आहेत असें समर्थांनीं वारंवार सांगणें, ज्या गांवांत अंमल नाहीं अशा गांवांची सनद मागूनही ती देणें व त्याप्रमाणें अंमल चालू होणें, ह्या गोष्टी तरी कांहीं लागाबांध्यावांचून घडतील असें वाटतें काय ?

ह्यावरून भाविक लोकांचीं अनुमानें अशीं निघतात कीं, शिवाजी महाराजांकरितां समर्थांचा अवतार झाला. त्यांनीं बारा वर्षांच्या वयांत तपश्चर्या केली, त्याचेंच फळ शिवरायाचा जन्म हें होय. त्यांची वृत्ति परमार्थाकडे लावण्याकरितांच ते कृष्णातीरीं आले. त्यांच्या कल्याणाकरितां व यशोवृद्धीकरतांच त्यांनीं श्रीरघुपतीची उपासना केली. अर्थात् शिवरायांना स्वराज्यपदप्राप्ती हें सर्व समर्थांच्या कृपेचें व आशिर्वादाचें फळ होय. आणि तीच गोष्ट स्वतः शिवाजी महाराजांनीं सुद्धां कबूल केली आहे. पण त्यांचे चरित्रकार म्हणतात कीं, ती कबुली खरी नव्हे ! ती महाराजांच्या विनयाची द्योतक होय ! विनयांत तरी सत्याचा अपलाप करणें हें महाराजांस शोभतें काय ? विनयांत खोटें बोलावें–तोंडापुरतें बोलावें हें शास्त्र कोठचें ? आपण मिळविलेलें स्वराज्य आपल्या निढळच्या घामाचें आहे; त्यांत समर्थांसारख्या भिक्षापतीचें काय आहे ? अशी जर त्यांची भावना असती, तर त्यांनीं असें राज्यदान केलें असतें काय ? आपल्याला स्वराज्यप्राप्ती झाली, हें समर्थांच्याच कृपेचें फळ अशीच त्यांची भावना होती, म्हणूनच त्यांनीं राज्यदान दिलें; नाहींतर दिलें नसतें. खुद्द शिवाजी महाराजांनीं समर्थांवर येवढी पूज्यबुद्धि ठेवावी, स्वराज्य हें आपल्या कृपेचें फळ असें लेखांतसुद्धां कबूल करावें, आणि त्यांच्या ज्ञातिबांधव चरित्रकारांनीं त्याच समर्थांविषयीं "त्या गोसाव्याला स्वराज्यांतील श्रेयाचा भागीदार करणें म्हणजे निखालस अन्याय होय" असा अनुदारपणा व मनाचा संकुचितपणा प्रगट करावा हें निखालस दुर्भाग्य होय. समर्थांना स्वराज्यांतील अंशभाक् श्रेय दिलें म्हणून समर्थांनीं हातांत तलवार घेऊन युद्धांत जय मिळविला असें कांहीं होत नाहीं. स्वराज्यप्राप्तीची स्फूर्ति शिवाजी महाराजास स्वयंसिद्धच होती. त्यांना दुसरा कोणीही प्रेरक नव्हता. ते स्वतःच शूर व काटक निपजले, त्यांनीं स्वराज्याची स्थिति पूर्णपणें माहीत करून घेतली, आपल्या सद्गुणांनीं मावळे लोक वश करून घेतले, एकनिष्ठेनें श्रीजगदंबेस प्रसन्न केलें, दुर्धर प्रसंगांतूनही आपल्या अघटित चातुर्यानें पार पडलें आणि सदाचारानें वागून सर्वांची भलीभलाईकी घेतली यांत तिळमात्र शंका नाहीं, ही सारी त्यांची एकट्याचीच करामत, एकट्याचीच हिंमत, एकट्याचीच सद्दी ह्यांत

तिळमात्र संशय नाहीं. त्यांत त्याच शिवरायाच्या हेतूप्रमाणें संपूर्ण तर नव्हेच; पण अंशभाक् श्रेय समर्थांच्या पदरांत घातलें म्हणून ह्या गोष्टी कोणी नाकबूल करतात थोडेच ! परंतु नाहीं. त्या बाबतींत समर्थ रामदासस्वामींचें नांव काढलेलें सुद्धां ह्या ब्रह्मद्वेष्ट्यांना खपत नाहीं !

ह्या सर्वांचा इत्यर्थ हा कीं, कै० रानड्यांचें जें म्हणणें आहे कीं, महाराष्ट्रांतील सारीच संतमंडळी ही शिवाजीच्या स्वराज्यसाधनाच्या बाबतींत अंशभाक् आहेत. तेंही त्यांचें म्हणणें खरेंच आहे, कारण शिवाजीच्या कारकीर्दींत सर्वच संतमंडळीचा प्रत्यक्ष संबंध नव्हता, तरी भूमि साफसूफ करून, रंगसफाई देण्याचें काम प्रत्येक साधुवर्यानें हस्तें परहस्तें केलेलेंच होतें. ह्यास्तव त्यांचें विधानही थोड्या फार अंशानें कां होईना, परंतु खरेंच आहे. आतां प्रो० राजवाड्यांचें मत हें सर्व एकट्या समर्थांसच दिलें पाहिजे, हें त्यांचेंही म्हणणें खोटें नव्हे. कारण, शिवाजी महाराजांच्या स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नाप्रीत्यर्थ समर्थांनीं प्रत्यक्षतः किती परिश्रम केले हे प्रत्यक्षच दृष्टीस पडतात, तेव्हां त्यांच्या म्हणण्यांतही वावगें असें कांहीं नाहीं. तरी पण इतर साधुसंतांच्या उपदेशाचा लोकांच्या मनावर झालेला परिणाम अंशतःसुद्धां त्यास कारणभूत झाला नाहीं, इतका दुराग्रह तरी कां असावा ? आम्ही तर म्हणतों कीं ह्या कामांत सर्वांचाच कांहीं ना कांहीं अंश आहेच. आतां तो किती प्रमाणांत आहे ही निवडा निवड करणें कठीण आहे ही गोष्ट आम्हीही कबूल करतों.

हल्लींच्या सुशिक्षित लोकांच्या तोंडीं तर जिकडे तिकडे हेंच ऐकूं येतें कीं, समर्थ हे मोठे राजकारणी पुरुष होते. त्यांनीं शिवाजीला स्वराज्यप्राप्तीच्या कामीं अतोनात मदत केली. त्यांनीं हेर ठेवले होते. ते त्यांस गुप्त बातम्या देत. त्यांचीं गुप्त स्थळें असत तेथें युद्धसामुग्री ठेवीत व तेथें नाना प्रकारच्या गुप्त मसलती चालत. म्हणजे शिवाजीमहाराज बाहेरून स्वराज्याचे प्रवर्तक दिसत होते तरी आंतून सर्व सूत्रें समर्थच चालवीत. म्हणून स्वराज्यसंपादनाचें बरेंचसें श्रेय समर्थ रामदास्वामींकडेच आहे. पण ह्या प्रवादांतसुद्धां फारसा तथ्यांश नाहीं, किंबहुना मुळींच नाहीं म्हटलें तरी सुद्धां चालेल. नसतीच गोष्ट समर्थांच्या पदरीं बांधणें हें कांहीं इष्ट नव्हे. स्वराज्य-प्राप्तीची शिवाजी महाराजांची कल्पना जन्मसिद्ध होती. त्यासाठीं त्यांनीं

शरीरबळ, मनुष्यबळ स्वतः संपादन केलें. त्यांच्या युक्तिप्रयुक्तिमध्यें कोणाच्या बुद्धीचा यत्किंचित्‌ही अंश नव्हता. ती त्यांची स्वतःचीच सारी कर्तबगारी होती. तोरणा किल्ला हस्तगत होईपर्यंत समर्थांची व शिवाजी महाराजांची दृष्टभेट सुद्धां नव्हती. मग ते त्यांच्या राजकारस्थानांत पडणार कोठून ? रामघळ, हेळवाक वगैरे समर्थांची कांहीं एकांत स्थळें होतीं. पण ती स्नानसंध्या, ध्यानधारणादि परमार्थ साधनाचीं होतीं. त्यांत कांहीं राजकारणी मसलती झाल्या, किंवा त्यांत युद्धसामुग्रीचा संग्रह होता, असें कोठेंही निदर्शनास आलेलें नाहीं. प्रत्येक गुरुवारीं शिवाजी महाराज समर्थांस भेटत, पण त्यांतही कोठें एकही दिवस त्यांनीं राज्यकारस्थाना-संबंधीं गुप्त असा कोणताच उपदेश केलेला नाहीं. त्यांचा उपदेश आहे तो अगदीं उघड उघड सर्वमान्य व राजमान्य असाच आहे. मग स्वराज्य-प्राप्तीचें राजकारस्थान समर्थांच्या माथीं मारण्यांत अर्थ कोणता ? व त्यांत त्यांना येवढें भूषण तें काय ? सांकेतिक पत्रांची अफवाही याच मासल्याची ! अवघें एकच पत्र काय तें जिकडे तिकडे पुढें येत आहे. तें कोठचें व कोणाचें याचा पत्ता नाहीं. आणखी विजापुरचा सरदार निघाला तर तें समर्थांस आधीं कळेल का शिवाजीस आधीं कळेल ? शिवाजी महाराज हे खरे खरे कारस्थानी होते. त्यांस कोणतीही बातमी समर्थांस आधीं कळून ती सांकेतिक पत्रानें आपणापर्यंत येईपावेतों दम निघेल काय ? ही गोष्ट कधींच शक्य नाहीं. तात्पर्य, समर्थ हे राजकारस्थानांत होते हे म्हणण्यांत मुळींच कांहीं मातबरी नाहीं. त्यांनीं त्यांच्या कार्यास अपरिमित उत्तेजन दिलें ही गोष्ट मात्र खरी आहे.

आतां शिवचरित्रकाराचें विधान राहिलें. कमी प्रमाणांत असो, कीं अधिक प्रमाणांत असो, प्रत्यक्ष असो वा परोक्ष असो, शिवाजी महाराजांना स्वराज्यप्राप्तीच्या कामीं समर्थांचें साह्य होतें ह्यांत शंका नाहीं. देवब्राह्मणावर त्यांची पूज्यबुद्धि होती. समर्थांवर सर्वस्व अर्पण करण्याइतकी श्रद्धा होती. आपणास स्वराज्यप्राप्ती झाली ती केवळ समर्थांच्या कृपेनें झाली ही गोष्ट स्वदस्तुरानें त्यांनीं जगजाहीर केली होती. असें असतां, त्यांच्याच भक्तांनीं, त्यांच्याच सेवकांनीं, त्यांच्याच वंशजांनीं, त्यांच्याच ज्ञातिबांधवांनीं ब्रह्मद्वेष पदरीं बांधून येवढ्या सत्पुरुषाला, अवतारी

विभूतीला, महासमर्थाला, गोसावी [ गोसावडा ] म्हणून त्यांची संभावना करावी, त्यांच्या सर्ववंद्य ग्रंथराज दासबोधाला ‘ चिटोरें ’ म्हणून निखालस कवडीमोल ठरवावें आणि त्या गोसाव्याच्या पदरीं शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंपादनाच्या कीर्तीचा लवमात्र अंश घातल्यास मोठा अन्याय होईल म्हणून राजरोस दवंडी पिटवावी, हा शुद्ध कृतघ्नपणा आहे ! लाजिरवाणें आहे, लांछन आहे. हें विधान ऐकून शिवाजी महाराजांस स्वर्गलोकांतही खाली मान घालावी लागेल. पण त्याबद्दल मोठेंसें नवलही वाटावयास नको. कारण, ते त्यांच्या शीलाला व ब्रीदाला शोभेसेंच आहे. तसें विधान त्यांनीं केलें नसतें तर मात्र नवल वाटलें असतें खरें; असो.

येथपर्यंत दासबोधांत ‘ राजकारण ’ कितपत आहे, व समर्थ राजकारणांत कितपत पडले होते, ह्यासंबंधाचा विचार झाला. आतां दासबोधांत एकंदरींत विषय काय आहे व तो सामान्य लोकांस कितपत बोधप्रद आहे ? त्यांत कवित्वगुण कितपत आहे ? त्यांत गूढ भाग कांहीं आहे कीं काय ? असला तर तो कोणता ? याचा सामान्यत्वें विचार करूं. म्हणजे समर्थांच्या अनुग्रहाचा एक प्रधान भाग आटोपला.

हा विचार करतांना प्रथमच असा प्रश्न उद्भवतो कीं, ह्या दासबोधांत आहे तरी काय ? आणि तोच प्रश्न काय तो महत्त्वाचा आहे. कारण, आधीं कोणत्याही ग्रंथांतील विषयाचा गोषवारा कळणें इष्ट असतें. पण दैवघटना किती विचित्र ! ‘ संस्कृत मराठी भाषेची घटना ’ करतांना आमच्या विद्वच्छिरोमणी रा. रा. **रामचंद्र भिकाजी जोशी** ह्यांना ह्या दासबोधांत काय सांगितलें आहे तेंच मुळीं समजलें नाहीं ! मग तुम्हाआम्हासारख्या प्राकृतांना त्यांत काय कळणार आहे ? तर मग ज्यांनीं येवढा दासबोध ग्रंथ लिहिला, अनुग्रह देऊन हजारों शिष्यशिखा जमविली, शिवाजी महाराजांसारख्यांचें गुरुत्व संपादन केलें, ज्यांनीं आपल्या अनुग्रह प्रसादानें व रसाळ वाणीनें सारा महाराष्ट्रदेश आपलासा करून घेतला, ज्यांच्या कीर्तीनें सारा महाराष्ट्रदेश दुमदुमून राहिला होता, ज्यांचें बोधामृत प्राशन करण्याकरितां देशोदेशींचे लोक भ्रमराप्रमाणें उड्या घालीत होते, त्यांच्या दासबोधासारख्या सुबोध ग्रंथांत समजण्यासारखें कांहींच नाहीं, ही गोष्ट कोणास खरी तरी वाटेल काय ? येवढा ग्रंथ लिहूनही आपल्या मनांतील विचार

लोकांस समजून सांगण्याचें सामर्थ्य नाहीं इतके समर्थ कांहीं वेडेखुळे होते कीं काय ? ते तर इतके वेडेखुळे नव्हते खास. तर त्यांच्या ग्रंथांत काय आहे हें ज्यांस समजत नाहीं तेच वेडेखुळे असले पाहिजेत. कसें तें पहा:—

एक फौजदारी खटला कोर्टांत चालू असतां एका साक्षीदाराला आरोपीच्या वकीलानें प्रश्न केला " ही मारामारी झाली त्यावेळीं तूं किती अंतरावर उभा होतास ?" साक्षीदार म्हणाला २३६५ फूट ३ इंचांवर उभा होतो !" वकिलानें विचारलें "इतकें अंतर त्यावेळीं तूं बरोबर कशावरून सांगितलेंस ?" साक्षीदार म्हणाला " मीं तें अंतर प्रत्यक्षच मोजून पाहिलें. कारण, मला त्याच वेळेस वाटलें कीं, असें विचारणारे दीडशहाणे वकील कोर्टामध्यें कोणी तरी—निघतीलच !" असाच प्रकार येथेंही झाला आहे. समर्थ हेही मोठे दूरदर्शी होते. त्यांच्याही ही गोष्ट लक्षांत आली कीं, पुढेंमागें दीडशहाणे—नव्हे पावणेदोन शहाणे, दोन शहाणे का म्हणाना—कोणीना कोणी तरी आपल्या ग्रंथाला नांवें ठेवून ह्यांत आहे तरी काय ? असा प्रश्न करणारे तिस्मारखान पैदा होतीलच होतील. म्हणून त्याची तजवीज त्यांनीं आधींच लावून ठेवली आहे.

ग्रंथाच्या प्रारंभीं अगदीं पहिलीच नमनाची ओवी ही:—

**श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिले जी येथ ॥**
**श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥ १ ॥**

" श्रोत्यांनीं प्रथमच प्रश्न केला कीं, हा ग्रंथ कोणता ? ह्याचें नांव काय ? ह्यांत काय सांगितलें आहे ? तो श्रवण केल्यापासून फायदा कोणता ? "

समर्थांनीं हीच श्रोत्यांची आशंका अगदीं प्रथम सकृद्दर्शनींच काढून त्याचें उत्तर लागलीच दुसऱ्या ओवींत दिलें आहे. तें असें:—

**ग्रंथनाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ॥**
**येथें बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥ २ ॥**

" ग्रंथाचें नांव दासबोध; हा एक गुरुशिष्यांचा संवाद असून त्यांत भक्तिमार्ग स्पष्ट करून दाखविला आहे."

अशा प्रकारें या ग्रंथांत कोणता विषय आहे तें थोडक्यांत सांगून

त्याच्या अनुरोधानें आणखी कोणत्या कोणत्या विषयांचा, यांत समावेश होतो, त्याचाही खुलासा केला आहे.

समर्थांनीं प्रथम दर्शनींच इतकी सावधगिरी ठेवली असून रा. रा. जोशी म्हणतात—"ह्या दासबोधांत काय सांगितलें आहे तेंच समजत नाहीं!" तेव्हां त्यांच्या जाणीवशक्तीची तरी धन्यच समजलें पाहिजे! दुसरें काय?

रा. जोशी यांचें दुसरें विधान असें आहे कीं "**दासबोध हा अत्यंत अव्यवस्थित आहे.**" ह्या विधानावर उत्तर काय द्यावें हेंच समजत नाहीं. हें विधान पाहून आम्हांस तर खास वाटतें कीं, जोशांच्या मस्तकांतील मेंदू ठिकाणावर नसावा. तो जर असता तर असलें सपशेल खोटें विचित्र विधान त्यांच्या लेखांतून बाहेरच पडतें ना. आमचें तर असें ठाम मत आहे कीं, महाराष्ट्रीय साधुवर्गांत जे जे प्राकृत ग्रंथ झालेले आहेत, त्या सर्वांत समर्थांच्या दासबोधाइतका, सुलभ, उपयुक्त आणि व्यवस्थित—शिस्तवार लिहिलेला—दुसरा कोणताच ग्रंथ नाहीं. ह्याच्या समर्थनार्थ त्यांतील कांहीं विषयांचा अनुक्रम पाहिला पाहिजे. तो अनुक्रम असा धरलेला आहेः—

**पहिल्या दशकांत**—तर ग्रंथासंबंधानेंच सारा विषय आहे. ग्रंथाचें नांव, त्यांतील विषय, त्यांच्या अनुरोधानें येणारे रस, प्रतिपादनाला आधारभूत घेतलेले ग्रंथ, ग्रंथवाचनापासून लाभ व फलश्रुति, इत्यादि विषयांचा ह्या पहिल्या समासांतच उल्लेख केला आहे. ह्या पहिल्या समासांत देवतेस नमन सुद्धां केलेलें नाहीं. म्हणजे हा पहिला समास दासबोधाची प्रस्तावनाच होय म्हटलें तरी शोभेल.

( २ ) ऱ्यांत गणेशस्तवन; ( ३ ) ऱ्यांत सरस्वतीस्तवन; ( ४ ) थ्यांत सद्गुरुस्तवन; ( ५ ) व्यांत संतस्तवन; ( ६ ) व्यांत श्रोतृस्तवन; ( ७ ) व्यांत कवीश्वरस्तवन; ( ८ ) व्यांत संतसभावर्णन; ( ९ ) व्यांत परमार्थस्तवन आणि ( १० ) व्यांत नरदेहस्तवन याप्रमाणें विषय सांगून पहिला दशक संपविला आहे.

म्हणजे हा सारा पहिला दशकच बहुतेक प्रस्तावनेदाखल आहे म्हटलें तरी चालेल. ह्यावरून भाषणाला किती प्रकारचीं अंगें असतात

ह्याचें उत्तम प्रकारचें ज्ञान होतें. ह्या दशकांत ग्रंथसाहित्या शिवाय निराळे असें विषय दोनच आहेत. एक 'परमार्थ' आणि दुसरा 'नरदेह'. हाच काय तो विषयाचा प्रारंभ. जन्मास आल्यावर इतिकर्तव्य काय तर परमार्थ साधावयाचा. त्याला मुख्य साधन नरदेह. तो घट्टाकट्टा पाहिजे, येवढेंच पहिल्या दशकांत सांगितलें आहे.

नरदेहाची महति कळल्यानंतर सत्कृत्य कोणतें व असत्कृत्य कोणतें हें समजलें पाहिजे. म्हणून दुसऱ्या दशकांत त्याची फोड केली आहे. मूर्खांचीं लक्षणें कोणतीं? व शाहण्याची लक्षणें कोणतीं तीं स्पष्ट समजावीं म्हणून प्रत्येक लक्षणांचा एकेक समास निराळाच घातला आहे. त्याचप्रमाणें सद्विद्या म्हणजे काय व असद्विद्या म्हणजे काय ह्यांचींही स्वरूपें दाखवून दिलीं आहेत. त्यानंतर प्रत्येक प्राणीमात्रामध्यें दिसून येणारे सत्त्व, रज आणि तम ह्या तीन गुणांचें स्वरूप व्यक्त करून उत्तम, मध्यम व कनिष्ठ हे तीन प्रकारचे पुरुष कसकसे निर्माण होतात हें दाखविलें आहे. नंतर ह्या ग्रंथाचा मुख्य विषय भक्ति. भक्ति म्हणजे केवळईश्वरभक्तीच असें नव्हे, तर सर्वत्र सर्वांनीं प्रेम राखणें, प्रेमभावानें चालणें हें मुख्य तत्व आहे. 'मनुष्य राजी राखणें' हे समर्थांच्या साऱ्या शिकवणींतील मूख्य सूत्र आहे. ह्यासाठीं त्याचाही येथें थोडासा प्रस्ताव केला आहे. नंतर सदाचाराला मुख्य साधनीभूत जी विरक्ति, तिचेंही ह्यांत दिग्दर्शन केलें आहे. इतका विषय सांगून झाल्यानंतर समर्थांना आणखी एक विषय ह्या दशकांत सुचला. तो कोणता? तर पढतमूर्ख! जे अज्ञान असतात त्यांनीं मूर्खपणा केला तर त्यांत मोठेसें नवल नाहीं; पण कित्येक लोक शहाणेसुतें असून, शिकले सवरलेले असूनही मूर्खपणा करीत असतात. अशा लोकांचीं मोठ्या मोजेचीं लक्षणें सांगून हा दुसरा दशक संपविला आहे.

मनुष्याच्या अंतःकरणांत वैराग्य उत्पन्न होणें हेंच खऱ्या भाग्याचें लक्षण होय. हें वैराग्य उत्पन्न होण्याला संसारदुःख हेंच कारणीभूत होत असतें. म्हणून तिसऱ्या दशकांत संसारामध्यें कसकशा यातना असतात; मुलाबाळांच्या त्रासानें मनुष्य किती जिगजिगून जातो, त्रिविध ताप कोणते, व ते मनुष्यास कसकसे भोगावे लागतात, ह्या सर्वांचें वर्णन

प्रत्येक मनुष्याला पटेल, अंतःकरणाला जागृत करील असेंच हृदयद्रावक आहे.

चवथ्या दशकापासून मुख्य विषयाला प्रारंभ होतो. ह्यास्तव यांमध्यें प्रथमच 'श्रवण' 'कीर्तन' 'स्मरण' इत्यादि भक्तीचे नवविध प्रकार आहेत त्यांचें समजूत पटेल अशा रितीनें स्पष्ट वर्णन केलेलें आहे.

पाचव्या दशकांत गुरु किती प्रकारचे असतात ? सद्गुरूचें लक्षण कोणतें ? शिष्य कसा असावा ? उपदेश कसा असावा ? ज्ञानाचे प्रकार किती ? शुद्ध ज्ञान कशाला म्हणतात ? ह्या सर्वांचा खुलासा असून त्यापुढें बद्ध कोणाला म्हणतात व मुमुक्षु कोणाला म्हणतात ? साधक कोण व सिद्ध कोण ? ह्यांतील भेदाभेद सांगून हा दशक संपविला आहे.

येथपर्यंत समर्थांनीं आपल्या विषयाचा अनुक्रम किती बरें शिस्तीनें लावला आहे ? एकामागून एक जणों काय साखळीचा दुवा जोडल्याप्रमाणें क्रमवारीनें—आपल्या विषयाची सांखळीच जोडली आहे. असें असतांही रा. जोशी हे त्यावर ' अत्यंत अव्यवस्थितपणाचा ' छाप मारतात ! ह्यास काय म्हणावें हेंच समजत नाहीं; असो.

सहाव्या दशकामध्यें ज्ञानाच्या प्रतिपादनाला सुरुवात झाली आहे. त्यांत देवशोधन, ब्रह्मप्रतिपादन, मायोद्भव, ब्रह्मनिरूपण, सृष्टिकथन, सगुणभजन, दृश्यनिरसन, सारशोधन आणि अनिर्वाच्य म्हणजे परब्रह्म, इत्यादि विषयांचें निरूपण आहे.

सातव्या दशकांत मंगलाचरण, ब्रह्म, ब्रह्मांतील भेद, चतुर्दश ब्रह्म, विमलब्रह्म, द्वैतकल्पनानिरसन, बद्धमुक्त, साधनप्रतिष्ठा, श्रवण आणि देहातीताचें लक्षण इत्यादि उच्च प्रतीच्या ज्ञानाचें लक्षण सांगितलें आहे.

आठव्या दशकांत—देवदर्शन, आशंका, पंचमहाभूतस्वरूप, आकाश-भेद, दुश्चितलक्षण, मोक्ष, आत्मनिदर्शन सद्बोध व शून्यत्वनिरसन इत्यादि गहन विषय आहेत.

नवव्या दशकांत—ब्रह्मनिरूपण, निःसंदेह, जाणपणा, अनुमान, गुप्त-रूप, विकल्पनिरसन, देहातीत निरूपण, संदेहवारण, व अलिप्त स्थिति इत्यादि निरूपण आहे.

दहाव्या दशकांत—कारण, देहशंका, बीजलक्षण, पंचप्रलय, भ्रम-

निरूपण, सगुणभजन, प्रचीत, प्रकृतिपुरुष व चलाचलनिरूपण हे विषय आहेत.

अकराव्या दशकांत—सिद्धांत, चत्वारदेव [ भिन्नभिन्न देवता ], शिक्षण, विवेक, राजकारण [ ह्याचें विवेचन पूर्वीं आलेंच आहे. ] महंतलक्षण, चंचललक्षण, अंतरात्मविवरण, उपदेश, निस्पृह वर्तन इत्यादि विषय आहेत.

बाराव्या दशकांत—विमल, प्रत्यय, देवभक्त, विवेक, वैराग्य, आत्मनिवेदन, सृष्टीक्रम, विषयत्याग, काल, यत्नशिक्षा, व उत्तम पुरुष इत्यादि विषयांचें विवेचन आहे.

तेराव्या दशकांत—आत्मानात्मविवेक, सारासार, उभारणी, कल्प, काहाणी [ हें एक ब्रह्ममायात्मक रूपक आहे ], लघुबोध [ शिवाजी महाराजांस अनुग्रह दिला त्याच दिवशीं केलेला उपदेश ], प्रयत्न, कर्तृत्त्व, आत्मविवरण व बोधनिरूपण इत्यादि विषय आहेत.

चौदाव्या दशकांत—निस्पृह, भिक्षा [ ह्यांत भिक्षेला हीनपणा न देतां तें एक पवित्र कार्य असल्याचें फार मार्मिकतेनें प्रतिपादन केलें आहे. त्याचा थोडासा सारांश पुढें येईल. ] कवित्त्वलक्षण, कीर्तनलक्षण, हरिकथा, चातुर्य, युगधर्म, अखंडध्यान, शाश्वत आणि माया हे विषय आहेत. ह्यावरून वाचकांच्याही लक्षांत येईलच कीं, ह्यामध्यें गहन ज्ञानाचा विषय नसून, रामदासी पंथानें कसे वागावें, कोणते गुण संपादन करावेत, कोणकोणत्या कामीं दक्षता ठेवावी, निर्वाह कसा करावा आणि लोककार्य कसें साधावें ह्याचाच हितबोध आहे. विरक्तानें देशकार्य कसें साधावें तें ह्या समासावरून उत्कृष्ट रीतीनें समजतें.

पंधराव्या दशकांत—चातुर्य, निस्पृहपणा, श्रेष्ठांतरात्मा, शाश्वतब्रह्म, चंचललक्षण, अर्धोर्ध्वनिरूपण, सूक्ष्मजीवनिरूपण, पिंडोत्पत्तिनिरूपण, आणि सिद्धांत हे विषय आहेत. म्हणजे ह्या दशकांत बहुतेक उत्पत्तिशास्त्राचेंच कथन आहे म्हटलें तरी चालेल. किंवा इंग्रजींत ज्याला "Natural History" न्याचनरल हिस्ट्री किंवा प्राणीशास्त्र म्हणतात, त्यांचें प्रतिपादन आहे.

सोळाव्या दशकांत—प्रथम वाल्मिकीचें स्तवन, नंतर सूर्याचें

स्तवन आहे. त्यापुढें पृथ्वीचें स्तवन असून त्यांत प्राचीन कालचें भूगोलाचें वर्णन आहे. नंतर आप, अग्नि, वायु, महद्भूत, अंतरात्म उपासना, व गुणभूत हे विषय आहेत. ह्या दशकांत पंचमहाभूतांची व सृष्टचमत्कारांची माहिती फार वाचण्यासारखी आहे. ह्यावरून समर्थांचें सूक्ष्म निरीक्षण किती होतें तें दिसून येतें.

सतराव्या दशकांत—देवचमत्कार, शिवशक्ति, श्रवणोपदेश, अनुमान, अजपा [ मंत्राचे व गायत्री मंत्राचे प्रकार ] ' देहात्म, जगजीवन, तत्त्वविवरण, तनुचतुष्टय आणि सिद्धांतनिरूपण हे विषय आहेत.

अठराव्या दशकांत—बहुदेवस्थान, सर्वज्ञसंग, निस्पृह, देहदुर्लभ, करंटपरीक्षा, उत्तम पुरुष [ अफजुलखानाचा वध केल्यानंतर शिवाजी महाराज जेव्हां समर्थांस भेटावयास गेले, त्यावेळीं हा समास केल्याचें प्रसिद्ध असल्याबद्दल पूर्वीं सांगितलेंच आहे. ], जनस्वभाव, अंतर्देव, निद्रा, [ ह्यांत आळशी लोकांचें चित्र विनोदात्मक भाषेनें फार उत्तम वठविलें आहे. ] श्रोता व लक्षण इत्यादि विषय आहेत.

एकोणीसाव्या दशकांत—लेखनक्रिया, विवरण, करंट लक्षण, सदैव लक्षण, देहमान्य, बुद्धिवाद, यत्न, उपाधि, राजकारण आणि विवेक हे विषय आहेत.

विसाव्या दशकांत—पूर्णापूर्ण, त्रिविधसृष्टि, सूक्ष्म नामाभिधान, शिवशक्ति, चत्वारि जिन्नस, आत्मनिरूपण, देहक्षेत्र, सूक्ष्मनिरिक्षण आणि विमलब्रह्म हे विषय आहेत.

' दासबोध अत्यंत अव्यवस्थित आहे ' हा रा. जोशांनीं काढलेला आरोप कितपत खरा आहे हें स्पष्टपणें निदर्शनास यावें म्हणून त्यांतील विषयांचें अनुक्रमानें थोडें तरी दिग्दर्शन करणें भाग पडलें. अशा दासबोधाला अत्यंत अव्यवस्थित आहे असा शेरा मारणें म्हणजे सूर्य हा अत्यंत काळाकुट्ट आहे असें म्हणण्यासारखेंच हास्यास्पद होय. पण असें तरी कां म्हणा ? दिवाभीताच्या दृष्टीनें तो सिद्धांत खराही आहे; असो.

# समर्थांचें सामर्थ्य
## किंवा
# रामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## उत्तरार्ध.

### भाग २ रा.

#### दासबोध.

मागील भागांत 'दासबोधा' मध्यें येणाऱ्या विषयाचा गोषवारा दिला. आतां त्यांतील कांहीं विशेष भागाचें अवलोकन करूं.

**माहितीची विपुलता**—समर्थांनीं मोठीशी विद्वत्ता संपादन केलेली नव्हती; ते संसारांतही पडलेले नव्हते; ते जनसांसर्गांतही फारसे राहत नसत. तरी मुद्दां त्यांचा बहुश्रुतपणा कांहीं लोकविलक्षण होता. ग्रंथांचीं नांवें, जीवजंतूंचीं नांवें वनस्पतींचीं नांवें त्यांस इतकीं माहीत होतीं कीं, तीं पाहून मन अगदीं आश्चर्यचकित होतें. उदाहरणार्थ, पहिल्या दशकांतील पहिल्या समासांत आपण आपल्या विषयप्रतिपादनाला कोणकोणत्या ग्रंथांचा आधार घेतलेला आहे तें सांगतांना नुसत्या गीता सांगितल्या आहेत, तितक्या सर्वांची नांवें सुद्धां कधीं कोणाच्या फारशीं ऐकिवांत नसतील; मग त्या सर्व वाचावयाची गोष्ट कशाला पाहिजे ! त्या गीतांची नांवनिशी ही:—

*शिवगीता रामगीता। गुरूगीता गर्भगीता॥
उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदांत॥ १॥
भगवद्गीता ब्रह्मगीता। हंसगीता पांडवगीता॥
गणेशगीता यमगीता। उपनिषदें भागवत॥ २॥

---

* १ शिवगीता—हिचे अध्याय १८ असून ती शंकरांनीं रामचंद्रास सांगितली आहे. हिच्यामध्यें वेदांत विषयाचेंच उद्घाटन आहे. रा. रा. शिवराम शास्त्री गोरे ह्यांनीं हिचें मराठी भाषांतर केलें आहे. २ रामगीता—ब्रह्मांड पुराणांतर्गत अध्यात्मरामायणामध्यें असून हिचे ६२ श्लोक आहेत. ही गीता श्रीरामचंद्रांनीं लक्ष्मणास सांगितली आहे. रा. श्रीकृष्णशास्त्री आठल्ये ह्यांनीं ह्या गीतेच्या भाषांतराचें स्वतंत्र पुस्तक छापलें आहे. ३ गुरूगीता—स्कंधपुराणांतर्गत उत्तर खंडांत उमामहेश्वरसंवादरूपानें आहे. मूळ श्लोक २७४ आहेत. ४ गर्भगीता— हिचे श्लोक २५ असून त्यांत कृष्णार्जुनांचा संवाद आहे. ५ उत्तरगीता—हिचे अध्याय ३ असून त्यांत कृष्णार्जुनांचा संवाद आहे. ६ अवधूतगीता—हिचे अध्याय ८ असून ती श्रीदत्तात्रयांनीं कार्तिकस्वामीला सांगितलेली आहे. ७ भगवद्गीता—ही अठरा अध्यायांची ७०० श्लोकांची गीता सर्वत्र प्रसिद्धच आहे. हिच्यावर शंकराचार्यांचें भाष्य, ज्ञानेश्वरांची ९००० ओव्यांची 'भावार्थदीपिका'; वामन पंडितांची १५००० ओव्यांची ' यथार्थदीपिका,' व ' समश्लोकी' रा. बाबासाहेब गर्दे यांची 'गीतामृत शतपदी' इ० अनेक टीका फार मधुर व मनोहर आहेत. ८ ब्रह्मगीता—ही स्कंधपुराणांतर्गत सूत सांगत आहेत. ह्या गीतेंत ऐतरेय, तैत्तरीय इत्यादि उपनिषदांचा मथितार्थ असल्या मुळें ही गीता सर्व पंथांस संमत आहे. हिचे अध्याय १२ असून त्यावर मोठी थोरली एक टीका आहे; ह्या टीकेच्या शेवटीं 'माधवाचार्येण विरचिता' असा उल्लेख आहे;. ही गीता श्रुतींनीं व श्रुतिसिद्धांतांनीं भरलेली आहे. तिच्यापुढें सूतगीतेच्या संवादाचे ८ अध्याय आहेत. सूतगीतेच्या शेवटीं श्लोकवर्णानुक्रमाणिका दिली आहे. त्यामुळें तिची उपयुक्तता अधिक वाढली आहे. ह्या सुंदर ग्रंथाचें मुद्रण करून पुण्याच्या 'आनंदाश्रमा'नें ' सर्व महाराष्ट्रीयांस ऋणी करून ठेवलें आहे यांत शंका नाहीं. ९ हंसगीता—हिचे श्लोक ४५ आहेत. युधिष्ठरानें प्रश्न केल्यावरून भीष्मांनीं व हंसानें साद्ध्यांस सांगितली. काशीचे

येवढ्यामध्यें १२ गीतांचा उल्लेख आहे. उल्लेख आहे त्याअर्थी त्यांनीं त्या वाचून त्यांतील रहस्य समजून घेतलें असावें हें उघड दिसतें. इतक्या गीता वाचून त्यांतील विषयांचा यथायोग्य विचार करणें ही तरी सामान्य गोष्ट आहे काय ? प्रत्येक बाबीत समर्थांचे अवलोकन असेंच सूक्ष्म असलेलें दृष्टीस पडतें.

पहिल्या दशकाच्या शेवटीं दहाव्या समासांत 'प्रत्येक मनुष्य आपआपलें घर बांधतों व तें माझें माझें म्हणतो' परंतु त्या घरावर कितीकांची मालकी असते तें समर्थ सांगतातः—

मूषक म्हणती घर आमुचें। पाली म्हणती घर आमुचें॥
मक्षिका म्हणती घर आमुचें। निश्चयेंसी॥ १॥
कांतण्या म्हणती घर आमुचें। मुंगळे म्हणती घर आमुचें॥
मुंग्या म्हणती घर आमुचें। निश्चयेंसी॥ २॥
विंचू म्हणती आमुचें घर। सर्प म्हणती आमुचें घर॥
झुरळें म्हणती आमुचें घर। निश्चयेंसी॥ ३॥
भ्रमर म्हणती आमुचें घर। भिंगोऱ्या म्हणती आमुचें घर॥
आळिका म्हणती आमुचें घर। काष्ठामध्यें॥ ४॥
मार्जारें म्हणती आमुचें घर। श्वानें म्हणती आमुचें घर॥
मुंगसें म्हणती आमुचें घर। निश्चयेंसी॥ ५॥

---

पंडित रायबहादूर प्रमदादास ह्यांनीं हिचें इंग्रजींत उत्तम भाषांतर केलें आहे. १० पांडवगीता–हिचे ८० श्लोक असून त्यांत पांडव, इंद्र, माद्री, सुभद्रा, द्रुपद, सात्यकी, धृष्टद्युम्न इत्यादि अनेकांचे अनेक श्लोक आहेत. ११ गणेशगीता–हिचे अध्याय ११ असून ती श्रीगजाननांनीं वरेण्याला सांगितली आहे. हिचें स्वतंत्र पुस्तक छापलेलें आहे व त्याचें भाषांतर वे. रा. रा. श्रीकृष्णशास्त्री आठल्ये ह्यांनीं केलें आहे. १२ यमगीता–विष्णुपुराणांतर्गत मैत्रेयानें पराशराला व नकुलानें पितामह भीष्माचार्यांना विचारली आहे. हिचे मूळ श्लोक १९ आहेत. ह्याशिवाय श्रेष्ठी खेमराज श्रीकृष्ण- व्यंकटेश छापखान्याचे मालक--मुंबई ह्यांनीं पंचदशगीता म्हणून एक निराळेंच पुस्तक छापलें आहे.

ढेंकूण म्हणती आमुचें घर। चांचणे म्हणती आमुचें घर॥
घुंगरडों म्हणतो आमुचें घर। निश्चयेंसो ॥ ६ ॥
पिंगूळ म्हणती आमुचें घर। व्याळ म्हणती आमुचें घर॥
पिसुवा म्हणतो आमुचें घर। निश्चयेंसी ॥ ७ ॥
पिसोळे म्हणती आमुचें घर। गांधले म्हणती आमुचें घर॥
सोट म्हणतो आमुचें घर। आणि गोमी ॥ ८ ॥
पाहुणे म्हणती आमुचें घर। मित्र म्हणतो आमुचें घर॥
ग्रामस्थ म्हणती आमुचें घर। निश्चयेंसो ॥ ९ ॥
किडा मुंगी वाळवी मूषक। त्यांचें घर निश्चयात्मक ॥
हें प्राणी बापुडें मूर्ख। निघोनि गेलें ॥ १० ॥

जीवजंतूंचीं तरी इतकीं नांवें समजावयाला सृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण लागतें. समर्थांचें अवलोकन प्रत्येक विषयांत असेंच होतें कोणताही विषय निघो, त्यांत समर्थांच्या माहितीची भर नाहीं असें कधींच घडत नसे.

तिसऱ्या दशकामध्ये त्रिविध तापाचें वर्णन आहे. त्यांत रोगांची नामावळी दिली आहे. ती किती असावी? चमत्कार पहा! इतकीं नांवें वैद्यास तरी माहिती असतील कीं नाहीं कोण जाणे!

खरूज खवडे पुळिया नारू। नखुरड्या मांजऱ्या देवी गोवरू॥
कावमांजरी केसतोड। चोखटे वर्ण काळ कोड॥
अंगुळवेढे गालफुगी। कंड उठे जे वाउगी॥
नायटे अंदु गजकरण। नेहाचें पोट विस्तीर्ण॥
कुष्ट आणि ओला कुष्ट। पंडुरोग अति श्रेष्ठ॥
वाटी वटक वायगोळा। हातीं पायीं लागती कळा॥
वोलांडा आणि वळ। पोटशूळाची तळमळ॥
कुळिळ रतळ कांभिणी। मुरूम मुंडर माळणी॥
जळशोष आणि हिवारें। गिरिगिरि आणि आंधारें॥
सूतकोंडे आणि परमे। रक्तपिती आणि रक्तपरमे॥
मुरडा हगवण उन्हाळे। दिशा कोंडतां आंदोळे॥
एक व्यथा असोनि न कळे। या नांव अध्यात्मिक ।

असे उतारे घेतां घेतां आम्ही थकूं; परंतु समर्थांपाशीं थकव्याचें नांव नाहीं. हीं रोगांचीं नांवें इतकीं दिलेलीं आहेत कीं, आम्ही सांगितलेलीं हीं त्यांच्या पुढें कांहींच नव्हेत ! ह्यांत एक विशेष गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, नुसत्या रोगांचींच नांवें सांगा म्हटलें तर कोणीही सांगू शकेल. परंतु त्यांत अध्यात्मिकांत आधिभौतिक रोगाचीं नांवें चुकूनही येतां कामा नये. अशी निवडानिवड तत्काल होणें ही गोष्ट मोठ्या बुद्धिकौशल्याची आहे यांत शंका नाहीं.

आतां 'आधिभौतिक 'तापामध्यें त्या कालच्या राजदंडाचे प्रकार किती होते, ह्याचा मासला कळावा म्हणून त्यापैकीं कांहीं प्रकारांचे नमुने देतोंः—

प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक येत ॥
देमार तळवेमार होत । या नांव आधिभौतिक ॥
कोरडे पारंब्या फोक । बहुप्रकारें अनेक ॥
मोगरीमार बुधलेमार । चौखुरूनि डंगारणे मार ॥
बुक्या गच्यांड्या गुडघेमार । या नांव आधिभौतिक ॥
लाता चपराका शेणमार । कानखडे दगडमार ॥
टांचणें टिपऱ्या पिछाडे । बेडी बुधनाल कोलदांडे ॥
नाकवणी चुनवणी । मिठवणी रायवणी ॥
जळामध्यें बुचकळती । हस्तीपुढें बांधून टाकिती ॥
कर्णच्छेद घ्राणच्छेद । हस्तच्छेद पादच्छेद ॥
जिव्हाछेद अधरछेद । या नांव आधिभौतिक ॥
तीरमार शुळीं देती । नेत्र वृषण काढिती ॥
नखोनखीं सुया मारिती । या नांव आधिभौतिक ॥
कानीं खुंट्या आदळती । अपानीं मेखा मारिती ॥
सोल काढोनि टाकिती । या नांव आधिभौतिक ॥
शिरा वोढोनि घेती । टेंभे लावोनि भाजती ॥
पेशा नानापावित्ति । या नांव आधिभौतिक ॥

ही केवळ वानगी आहे. पण तेवढीवरूनच त्या कालाच्या राजदंडाचें किती बरें आश्चर्य वाटतें ? हेंही कांहींच नव्हे. समर्थांनीं ह्यापुढें ज्या पद्धतींचें वर्णन केलेलें आहे, ते सारे प्रकार ह्याहूनही भयंकर व विलक्षण आहेत ! ह्या अलौकिक माहिती वरून त्या कालच्या राजशासनपद्धतीचा इतिहासावरसुद्धां प्रकाश पडत नाहीं काय ? अवश्य पडतो.

समर्थांची माहिती प्रत्येक बाबतींत अशीच विपुल दृष्टीस पडते. ग्रंथ सांगूं लागले कीं, हवे तेवढे ग्रंथ; कवी सांगूं लागले कीं, हवे तेवढे कवी; गुरूंचे प्रकार निघाले कीं, सारे गुरूच गुरु. मंत्राचे प्रकार सांगूं लागले कीं, सारे मंत्रच; देवता सांगूं लागले कीं, साऱ्या देवताच; पिशाच्चांचें प्रकार सांगूं लागले कीं, सारे पिशाच्चांचेच प्रकार. सृष्टीचमत्कार सांगूं लागले म्हणजे सारे सृष्टीचमत्कारच. जीवसृष्टीची गोष्ट निघाली कीं, साऱ्या पशुपक्ष्यांचा व कृमिकीटकांचा हजिरीपट अगदीं पाहून घ्यावा.

' बागप्रकरण ' मागें दिलेंच आहे. त्यांत साऱ्या वनस्पतींचीच नांवनिशी दिली आहे. इमारती कारखाने प्रकरणांत विटा, विटाळीं, चुना, मसाला, गुण्या इत्यादि सारी सामुग्री व विटेची लांबी किती तसू, रुंदी किती तसू हीं सुद्धां त्यांत इत्थंभूत माहिती आलेली वाचकांनीं वाचलीच असेल. हें तर काय, पण पालीमध्यें शाहिरांचा फड पडला असतां त्या उभयतांवरही ' डफगाण्यांत ' चढ करून समर्थांनीं त्या उभयतांच्याही डफावरच्या कलग्या उतरविल्या, ही गोष्टही वाचकांच्या स्मरणांत असेलच. ह्यावरून समर्थांचें ग्रंथावलोकन जसें दांडगें होतें, त्याप्रमाणेंच त्यांचें सृष्ट पदार्थांचें अवलोकनही किती मार्मिक होतें, ह्याची उत्तम साक्ष पटते.

समर्थांच्या कवितेंतील दुसरा अप्रतिम गुण म्हणजे वर्णन करण्याची शैली व कविकल्पना हा होय. समर्थांनीं कोणत्याही एखाद्या रसाचा उठाव करावयाचा मनांत आणला पुरे कीं, तो रस सुलभ भाषेनें, सोप्या दृष्टांतानें अगदीं मूर्तिमंत वाचकापुढें ते उभा करितात अशी त्यांची हातोटी स्वभावासिद्धच आहे. त्यांतीलही कांहीं वेचे दाखवितों. [ द. १ स.२ ]

## गणपतीचें वर्णन.

भव्यरूप वितंड । भीम मूर्ति महाप्रचंड ॥

विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंदूर चर्चिला ॥ १ ॥
नाना सुगंध परिमळें । थबथबा गळतीं गंडस्थळें ॥
येथें आलीं षट्पद कुळें । झंकार शद्बें ॥ २ ॥
मुरडीव शुंडादंड सरळें । शोभे अभिनव आवाळें ॥
अलंबित अधर तीक्ष्ण गळे । क्षणक्षणा मद स्त्रवी ॥ ३ ॥
चौदा विद्यांचा गोसावी । ऱ्हस्व लोचन ते हालवी ॥
लवलवीत फडकावी । फडै फडै कर्ण थापा ॥ ४ ॥
रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फाकतो कीळ ॥
कुंडलें तळपतीं नीळ । वरी जडले झळकता ॥ ५ ॥
दंत शुभ्र सदृट । रत्नखचित हेमकट ॥
तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघूलघू ॥ ६ ॥
लवलवीत मलपें दोंद । वेष्टित कटि नागबंद ॥
क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ॥ ७ ॥
चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर ॥
फडके दोंदीचा फणिवर । धुधुःकार टाकी ॥ ८ ॥
डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालून बैसला वेटाळी ॥
उभारूनी नाभिकमळीं । टकमका पाहे ॥ ९ ॥
नाना याती कुसुममाळा । व्याळपर्यंत रुळती गळां ॥
रत्नखचित हृदयकमळा । वरी पदक शोभे ॥ १० ॥
शोभे परश आणि कमळ । अंकुश तीक्ष्ण तेजाळ ॥
एके करीं मोदक गोळ । तयावरि अति प्रीति ॥ ११ ॥
रुणझुणी वाजती नूपुरें । वाकी बोभाटती गजरें ॥
घागऱ्या सहित मनोहरें । पाउलें दोनी ॥ १२ ॥
ईश्वरसभेस आली शोभा । दिव्यांबराची फाकली प्रभा ॥
साहित्याविषयीं सुलभा । अष्टनायका होती ॥

हें वर्णन किती गोजिरवाणें आहे बरें ? एखाद्याला मंगलमूर्तीचें डिझाइन करावयाचें असेल तर तें समर्थांपेक्षां अधिक सुंदर कोण, बरें करूं

शकेल ! ह्या वर्णनावरून त्या विघ्नराजाच्या भव्य मूर्तीची केवढी बरें कल्पना आपल्या डोळ्यापुढें उभी राहते ? एखाद्या नामांकित चितान्याला तरी असें ध्यान रेखाटतां येईल काय ? कधींही रेखाटतां येणार नाहीं. समर्थ स्वतः चित्रें काढीत असत व मूर्तीही करित असत. इंदुरास शिळेवर त्यांनीं स्वतः मारुतीची मूर्ति रेखाटली होती. शहापूरकर बाईस चुन्याचा मारुती करून दिला होता. हें तर असोच; पण तंजावरांतील मूर्तिकारास समर्थांनीं स्वहस्तें राम, लक्ष्मण, सीता, मारुति अशा चार मूर्ति मेणवून [ मेणाच्या करून ] दिल्या होत्या ! ह्यावरून समर्थ हे इतर कलांप्रमाणें चित्रकलेंतही प्रवीण असल्याचें स्पष्ट होतें; असो.

आतां सद्गुरुमाहात्म्याचा नमुनाः—

आदित्यें अंधकार निवारे। परंतु मागुतें ब्रह्मांड भरे।
निशि जाहलिया नंतरें। पुन्हा काळांखें ॥ १० ॥
तैसा नव्हे स्वामीराव। करी जन्ममृत्यूचा वाव ॥
समूळ अज्ञानाचा ठाव। पुसून टाकी ॥ ११ ॥
सुवर्णाचें लोह कांहीं। सर्वथा होणार नाहीं ॥
तैसा गुरुदास संदेहीं। पडोंचि नेणें सर्वथा ॥ १२ ॥
परीस आपणा ऐसें करीना। सुवर्ण लोह पालटेना ॥
उपदेश करी बहुत जना। आंकित सद्गुरूचा ॥ १३ ॥
शिष्यास गुरुत्व प्राप्त होय। सुवर्णें सुवर्ण करितां नये ॥
म्हणोनि उपमा काय। सद्गुरूसी परिसाची ॥ १४ ॥
आतां उपमेसि द्यावा गभस्ती। तरी गभस्तीचा प्रकाश किती॥
शास्त्रें मर्यादा बोलती। सद्गुरु तो अमर्याद ॥ १५ ॥
म्हणोनि उपमेला उणा दिनकर। सद्गुरु ज्ञानप्रकाश थोर॥
आतां उपमावा फणिवर। तरी तो भारवाहो ॥ १६ ॥
सद्गुरू उपमावें अमृत। तरी अमर धरिती मृत्युपंथ ॥
सद्गुरुकृपा यथार्थ। अमरचि करी ॥ १७ ॥

सद्गुरूस म्हणावें कल्पतरू । तरी हा कल्पनातीत विचारू ॥
कल्पवृक्षाचा अंगिकारू । कोण करी ॥ १८ ॥
हरिहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ॥
सर्वदा अविनाश एक । सद्गुरुपद ॥

आतां ' संत स्तवनां ' तील एक चुटकाः—

संत धर्माचें क्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र ॥
ना तरी पुण्याचि पवित्र । पुण्यभूमि ॥ १ ॥
संत सत्याचा निश्चय । संत सार्थकाचा जय ॥
संतप्राप्तीचा समय । सिद्ध स्वरूप ॥ २ ॥
मोक्षश्रिया अलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ॥
जीव दरिद्री असंख्यात । नृपति केले ॥ ३ ॥
महाराजे चक्रवर्ती । झाले आहेत पुढें होती ॥
परंतु कोणी सायुज्य मुक्ती । देणार नाहीं ॥ ४ ॥
जें त्रैलोक्यीं नाहीं दान । तेंचि करिती संतसज्जन ॥
तया संतांचें महिमान । काय म्हणोनी वर्णावें ॥ ५ ॥
ऐसी संतांची महिमा । बोलों तितुकी उणी उपमा ॥
जयाचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होय ॥ ६ ॥

आतां ' श्रोतृस्तवना 'चा नमुनाः—

तुम्ही श्रोते जगदीश मूर्ति । तेथें माझी व्युत्पती किती ॥
बुद्धिहीन अल्पमती । सलगी करती ॥ १ ॥
व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित होती लोक ॥
परी त्यांचीं पिलीं निश्शंक । तयांपुढें खेळती ॥ २ ॥
तैसा मी संतांचा अंकित । तुम्हां संतांपाशीं बोलत ॥
परी माझी चिंता तुमचें चित्त । वाहेलचि कीं ॥ ३ ॥
आपुलेचि बोलें वाउगें । त्यांची संपादणी करणेंचि लागे ॥
परी कांहीं सांगणें न लगे । न्यून तें पूर्ण करावें ॥ ४ ॥

हें तों प्रीतीचें लक्षण । स्वभावेंचि करी मन ॥
तैसे तुम्ही संत सज्जन । मायबाप विश्वांचे ॥

'कवीश्वर स्तवन' ह्याहूनही बहारीचें आहे. त्यांतील कांहीं निवडक ओव्याः—

कवी सृष्टीचा अलंकार । कवी लक्ष्मीचा श्रृंगार ॥
सकळ सिद्धांचा निर्धार । ते हे कवि ॥ १ ॥

कवि सभेचें मंडण । कवि भाग्याचें भूषण ॥
नाना सुखांचें संरक्षण । ते हे कवि ॥ २ ॥

कवि देवाचे रूपकर्ते । कवि ऋषींचें महत्त्व वर्णिते ॥
नाना शास्त्रांचें सामर्थ्यातें । कवि वाखाणिती ॥ ३ ॥

नसतां कवींचा व्यापार । तरी कैंचा असतां जगदुद्धार ॥
म्हणोनि कवी हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ ४ ॥

नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवीश्वरावीण तें नाहीं ॥
कवीपासून सर्वही । सर्वज्ञता ॥ ५ ॥

मागां वाल्मिक व्यासादिक । जाहले कवीश्वर अनेक ॥
तयांपासूनि विवेक । सकळ जनांसि ॥ ६ ॥

पूर्वीं काव्यें होतीं केलीं । तरीच व्युत्पत्ति प्राप्त झाली ॥
तेणें पंडिता अंगीं बाणली । परम योग्यता ॥ ७ ॥

खालच्या ओवींतील कल्पना फारच हृदयंगम आहे:—

ऐसे पूर्वीं थोर थोर । जाहले कवीश्वर अपार ॥
आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ॥ ८ ॥

"असे हे मोठमोठे कवि आजपर्यंत होऊन गेले, आजही आहेत व पुढेंही होतील; त्या सर्वांनाच माझा नमस्कार असो!"

ही कविकल्पना ऐकून कोणास बरें कौतुक वाटणार नाहीं? पुढें होणाऱ्या कवींनासुद्धां समर्थांनीं आधींच नमस्कार करून ठेवला आहे! ही 'advance' नमस्कार करण्याची कल्पना खरोखरच सहृदय हृदयाच्या अंगावर प्रेमरोमांच उभे करणारी आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. म्हणून तिची पुनरावृत्ति झाली तरी पत्करली.

आतां नरदेहाच्या—म्हणजे मनुष्यजन्माच्या महतीच्या ओव्या किती उठावदार आहेत तेवढ्या देऊन हा वर्णनात्मक भाग पुरे करूं.

या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ॥
मुख्य सारासार विचारें । बहुत सुटले ॥ १ ॥
या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें ॥
अहंता सोडोनि स्वानंदें । सुखी जाहले ॥ २ ॥
नरदेहीं येऊनि सकळ । ऊर्ध्व गति पावले केवळ ॥
एथें संशयाचें मूळ । खंडोनि गेलें ॥ ३ ॥
पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ॥
म्हणोनि नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ॥ ४ ॥
संत महंत ऋषि मुनी । सिद्ध साधु समाधानी ॥
भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ॥ ५ ॥
तत्त्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी ॥
पिंड ज्ञानी षट्दर्शनी तापसी । नरदेहींच जाहले ॥ ६ ॥
अश्ववृषभ गाई म्हैशी । नाना पशु स्त्रिया दासी ॥
कृपाळूपणें सोडितां त्यासी । कोणीतरी धरील ॥ ७ ॥
तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जावो अथवा राहो ॥
परी यास कोणी पहा हो । बंधन करूं शकेना ॥ ८ ॥
नरदेह असिला मूर्ख । अथवा फेफऱ्या समंधाचें दुःख ॥
तरी तो जाणावा निरर्थक । निश्चयेसीं ॥ ९ ॥
इतुकेंही नसतां व्यंग । नरदेह आणि सकळ सांग ॥
तेणें धरावा परमार्थ मार्ग । लागवेगें ॥ १० ॥

विषय कोणताही का असेना ? त्याचें मंडण करतांना त्याची खुलावट करण्याची समर्थांची शैली केवळ अपूर्व आहे. फार काय सांगावें ! 'भिक्षावृत्ति' ही बहुधा नीच समजतात. तुकाराम महाराजांनींसुद्धां 'भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें' अशी त्याच्या विषयीं तिरस्कारबुद्धीच प्रगट केली आहे. परंतु लोककल्याणकर्त्याला

भिक्षावृत्तीसारखें दुसरें सुखदायक साधन नाहीं हें मनांत आणून समर्थांनीं भिक्षावृत्तीला जो कांहीं थोरवी दिली आहे ती फार अपूर्व आहे. म्हणून त्यापैकीं कांहीं ओव्यांचा मासला देतों:—

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा ॥
'ओंभवति' या पक्षा। सांभाळलें पाहिजे ॥ १ ॥
भिक्षा मागोनि जो जेविला। तो निराहारी बोलिला ॥
प्रतिग्रहा वेगळा झाला। भिक्षा मागता ॥ २ ॥
संतासंत जे जन। तेथें कोरान्न मागोन करी भोजन ॥
तेणें केलें अमृतपान। प्रतिदिनीं ॥ ३ ॥
ऐसा भिक्षेचा महिमा। भिक्षा माने सर्वोत्तमा ॥
ईश्वराचा अगाध महिमा। तोहीं भिक्षा मागतो ॥ ५ ॥
वार * लावून बैसला। तरी तो पराधीन झाला ॥
तैसीच नित्यावळीला। स्वतंत्रता कैची ॥ ५ ॥
भिक्षा मागतां किरकों नये। भिक्षा मागतां लाजों नये ॥
भिक्षा मागतां भागों नये। परिभ्रमणें ॥ ६ ॥
भिक्षा म्हणजे कामधेनू। सदा फळ नव्हे सामान्यू ॥
भिक्षेसी करी जो अमान्य। तो करंटा योगी ॥ ७ ॥
भिक्षेनें ओळखी होती। भिक्षेनें भ्रम चुकती ॥
सामान्य भिक्षा मान्य करितो। सकळ प्राणी ॥ ८ ॥
पृथ्वीमध्यें देश नाना। फिरतां उपवासी मरेना ॥
कोणेएके ठाईं जनां। जड नव्हे ॥ ९ ॥
गोरक्ष वाणिज्य कृषी। त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी ॥ §
विसंबो नये झोळीसी। कांहीं केल्या ॥ १० ॥
कांहीं भिक्षा आहे म्हणावें। अल्प संतोषी असावें ॥
बहुतां आणितां घ्यावें। मुष्टी एक ॥ ११ ॥

---

*'वार' लावून जेवणाराची किती दैना होते तें बहुधा पाहण्यांत असतेंच. ह्यावरून समर्थांचे विचार किती अनुभविक आहेत बरें !

§ अनंतफंदीनींही आपल्या एका फटक्यांत म्हटलें आहेच:—
"असल्यावर भिक मागूं नको। नसल्यावर सांगणें कशाला,—

'भिक्षावृत्तीसारखी हीन वृत्ति दुसरी कोणतीच नाहीं' असा ज्यांच्या मनाचा ग्रह असेल ते ह्यावर काय बरें उत्तर देतील ? तरी पण एक गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, 'भिक्षा' ही कांहीं सर्वांसच सांगितलेली नाहीं. तर कांहीं विवक्षित वर्गाकरतांच ती आहे. तो कोणता ? तर ब्राह्मणवर्ण ! कारण, ती—*

'ब्राह्मणाची मुख्यदीक्षा'

असेंच समर्थांनीं सांगितलें आहे. परंतु ब्राह्मणांना त्यांत आतां अप्रतिष्ठा वाटूं लागली ! ते राजकारणांत पडले ! ते हातांत समशेरी घेऊन हत्त्या करण्यास निघाले ! सर्वांपेक्षां नीच जो सेवाधर्म तोच त्यांना गोड वाटूं लागला ! ह्यामुळें त्यांची कशी दुर्दशा झाली आहे, ह्याचेंही वर्णन समर्थांनीं फार समर्पक केलें आहे. तें हल्लींच्या स्थितीलासुद्धां किती लागू पडतें तें पहाः—

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासूनि भ्रष्ट झाले ॥
गुरुत्व सांडूनि झाले । शिष्य शिष्याचे ॥ १ ॥
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पिरासीच भजती ॥
कित्येक तुरक [ मुसलमान ] होती । आपले इच्छेनें ॥ २ ॥
ऐसा कलियुगाचा आचार । कोठें राहिला विचार ॥
पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥ ३ ॥
गुरुत्त्व आलें नीच यातीं । कांहीं एक वाढली महती ॥
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥ ४ ॥
हें ब्राह्मणांसि कळेना । त्यांची वृत्ति वळेना ॥
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ ५ ॥
राज्य नेलें म्लेंछ क्षेत्रीं । गुरुत्त्व नेलें कुपात्रीं ॥
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ६ ॥

---

*—गांव तुझा भिड धरूं नको" ह्यामध्यें तरी अनिर्वाहपक्षींच भिक्षा मागावी असें म्हटलें आहे. होतां होईल तों न मागावी हें उत्तम, असेंच फंदीचें मत आहे.

ब्राह्मणांस ग्रामण्यानें बुडविलें। विष्णूनें श्रीवत्स मिरविले ॥
त्याच विष्णूनें शापिलें। परशुरामा ॥ ७ ॥
आम्हीही तेच ब्राह्मण। दुःखें बोलिलों हें वचन ॥
वडील गेले ग्रामणी करून। आम्हां भोंवतें ॥ ८ ॥
आतांच्या ब्राह्मणीं काय केलें। अन्न मिळेना ऐसें झालें ॥
तुम्हां बहुतांचें प्रचीतीस आलें। किंवा नाहीं ॥ ९ ॥
बरें वडिलांसि काय म्हणावें। ब्राह्मणांचें अदृष्ट जाणावें ॥
प्रसंगें बोलिलों स्वभावें। क्षमा कीजे ॥ १० ॥

हें समर्थांचें म्हणणें हल्लींच्या ब्राह्मण ज्ञातीला सुद्धां किती तुस्त लागूं पडतें ह्याचा प्रत्येकानें आपल्या मनाशींच विचार करावा, म्हणजे समर्थांचें अवलोकन किती व्यापक होतें ह्याचा प्रत्यय आल्यावांचून राहावयाचा नाहीं. परंतु ह्यावर कितीएक लोक म्हणतील कीं, असलेली दुर्दशा वर्णन करण्यापासून फायदा तो काय? एखाद्या मरणोन्मुख रोग्याला तुला क्षयरोग झाला आहे हें मोठ्या शास्त्रोक्त प्रमाणांनीं सिद्ध करून दिलें तर तें त्या बापड्याला काय होय? तो म्हणेल, रोग कोणताही कां असेना! त्याशीं मला काय करावयाचें आहे? त्यावर उपाय काय तो मला सांगाल तर खरें. त्याप्रमाणेंच समर्थांनीं ब्राह्मणांची स्थिति काय झाली आहे ती सांगितली. पण ती सुधारण्याला उपाय कोणता, हें जर त्यांनीं दाखविलें असतें तर मात्र सर्वांचाच फायदा झाला असता यांत संशय नाहीं.

पण समर्थ इतके कच्चे होते काय, कीं ते त्यावर उपाय सांगणार नाहींत? मग त्यांचें ब्रीद तें काय राहिलें? त्यांनीं ह्या समासाच्या पुढील समासाच्या आरंभींच ह्याच्यावर उपाय सांगण्यास सुरुवात केली आहे. ती अशीः—

बरें ऐसा प्रसंग झाला। झाला तो होऊन गेला ॥
आतां ब्राह्मणीं आपणाला। शहाणे करावें ॥ १ ॥
देव पूजावा विमल हस्तीं। तेणें भाग्य पाविजे समस्ती ॥
मूर्ख अभक्त अव्यवस्थीं। दरिद्र भोगिजे ॥ २ ॥

आधीं देवास ओळखावें। मग अनन्य भावें भजावें॥
अखंड ध्यान धरावें। सर्वोत्तमाचें॥ ३॥
तो सकळ देहामध्यें वर्ततो। इंद्रिय ग्राम चेष्टवितो॥
प्रचीतीनें प्रत्यय येतो। प्राणीमात्रीं॥ ४॥
देव वर्ततो जगदांतरीं। तोचि आपलेही अंतरीं॥
त्रैलोक्याचे प्राणीमात्रीं। बरें पहा॥ ५॥
दुर्जन प्राणी त्यांतील देव। त्याचा लाताड स्वभाव॥
रागास आला जरी राव। तरी तंडो नये॥ ६॥

"असो; आजपर्यंत झालें तें झालें. त्यास उपाय नाहीं. परंतु ह्यापुढें तरी ब्राह्मणांनीं शहाणपणा धरावा. निर्मल हातानें देवाची पूजा करीत जावी, म्हणजे पूर्वीचें सर्व वैभव प्राप्त होईल. मूर्ख, पाखांडी व अव्यवस्थित असेल तो दरिद्रांतच मरावयाचा. परमेश्वर सर्व ब्रह्मांड व्यापून राहिलेला आहे, व तोच आपल्याही हृदयांत वास करीत असतो. ह्याकरितां प्रत्येक प्राणिमात्राचें हितच करीत असावें. जे दुष्ट प्राणी असतील त्यांच्यांतील देवाचा स्वभावही 'लाथाड' च असतो. ह्याकरितां तो देव रागावला तरी आपण कलह करूं नये."

कोणत्याही विषयांच्या साधक व बाधक ह्या दोन्हीही अंगांचा समर्थ विचार करीत असत. ह्यामुळें कोणतेंही अंग घेतलें तरी ते त्याचें यथासांग विवरण करीत. ब्राह्मणांची झाली तरी ही एक बाजू सांगितली. परंतु ब्राह्मणांची महति सांगतांना त्यांचें श्रेष्ठत्व सांगण्यांतही त्यांनीं कसूर केलेली नाहीं.

'ब्राह्मण कोणाला म्हणावें?' 'ब्राह्मण' ह्याची व्याख्या तरी काय? ह्याबद्दल समर्थ म्हणतातः—

करिती ब्रह्मनिरूपण। जाणती ब्रह्म संपूर्ण॥
तेचि जाणावे ब्राह्मण। ब्रह्मविद॥ २४॥

द. ६, स. ४ था.

अशा ब्राह्मणांची थोरवीः—

ब्रह्मज्ञानाचा विचारू । त्यासी ब्राह्मणासीच अधिकारू ।
वर्णानां ब्राह्मणो गुरु । ऐसें हें वचन ॥ ३० ॥
द. १४ स. ७.

गुरु तो सकळासि ब्राह्मण । जरी तो जाहला क्रियाहीन ॥
तरी तयांस शरण । अनन्यभावें असावें ॥ ६ ॥
अहो या ब्रह्मणांकारणें । अवतार घेतला नारायणें ॥
विष्णूनें श्रीवत्स मिरवणें । तेथें इतर ते किती ॥ ७ ॥
ब्राह्मण वचनें प्रमाण । होती * शूद्राचे ब्राह्मण ॥
धातू पाषाणीं देवपण । ब्राह्मणाचेनि मंत्रें ॥ ८ ॥
सकळांसि पूज्य ब्राह्मण । हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण ॥
वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिय भगवंता ॥ ९ ॥
ब्राह्मणीं योगयाग व्रतें दानें । ब्राह्मणीं सकळ तीर्थाटणें ॥
कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ॥ १० ॥
ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत ॥
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्यें करोनी ॥ ११ ॥
ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती । होऊनि जडे भगवंतीं ॥
ब्राह्मणतीर्थें उत्तम गती । पावती प्राणी ॥ १२ ॥
लक्ष भोजनीं पूज्य ब्राह्मण । अन्य जातीस पुसे कोण ॥
परी भगवंतासि भाव प्रमाण । येरा चाड नाहीं ॥ १२ ॥
असो ब्राह्मणांसि सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती ॥
जरी ब्राह्मण मूढमती । तरो तो जगद्वंद्य § ॥ १४ ॥

अशा प्रकारें ब्राह्मणांचा मूळचा दर्जा अत्यंत उच्च प्रतीचा असून सांप्रत ते कर्तव्यपराङ्मुख झाल्यामुळें हीन दशेला पोंचले आहेत. त्यांनी

---

* विश्वामित्र, वाल्मिकी, इत्यादिकांवरून ही गोष्ट सिद्धच आहे, व ती गोष्ट समर्थांनाही संमत होती असें दिसतें.

§ तुकारामांनींही असेंच म्हटलें आहे:—

'ब्राह्मण झाला कर्म भ्रष्ट । तरि तो तिहीं लोकीं श्रेष्ठ ॥'

आतां तरी सावध होऊन योग्य मार्गाला कसें लागावें तें पूर्वी समर्थांनीं सांगितलेंच आहे.

आतां हे किरकोळ मुद्दे सोडून देऊन समर्थांचे अनुग्रहांतील मुख्य मुद्दे काय आहेत तेच सांगून त्यांच्या अनुरोधानें इतर विषयांचेंही थोड-थोडें विवेचन करूं. उपदेशांतही अनेक भेद आहेत. एक प्रापंचिक उपदेश आणि दुसरा पारमार्थिक उपदेश. दुसरा विधि आणि निषेध. म्हणजे अमुक अमुक करा, हा विधि होय; आणि अमुक अमुक करूं नका, हा निषेध होय. त्याचप्रमाणें मूर्ख कोणाला म्हणावें व शहाणा कोणाला म्हणावें ? इत्यादि अनेक प्रकार येतात. तरी समर्थांनीं प्रत्येक बाबींचा सांगोपांग विचार केला आहे. इतकेंच नव्हे, तर मूर्ख, पढत मूर्ख, सज्जन, दुर्जन, आळशी, झोंपाळू, प्रपंच, परमार्थ इत्यादि विषयांचा अगदीं निरनिराळा एक एक समासच घालून त्या त्या विषयाची फोड करून दिली आहे. ज्याला जो जो विषय पहावयाचा असेल त्यानें तो तो विषय काढून पहावा म्हणजे तो तो विषय अगदीं डोळ्यासमोर उभा राहतो, इतका तो विशद केलेला आहे. तथापि एकंदरींत समर्थांचा कल कोणी कडे व कसा वाहतो, तो थोडक्यांत कळावा म्हणून आम्ही संकलित रूपानें त्यांतील सार काढतों.

सर्वांत अज्ञानपणाचें कृत्य करणारा तो मूर्ख होय. तेव्हां समर्थ मूर्ख तरी कोणाला समजतात ? पण मूर्खांचीं लक्षणें त्यांनीं मूर्ख लक्षणांच्या समासा-मध्यें शेकडों सांगितलीं आहेत. तेव्हां अमुक एक करणारा तोच मूर्ख असें थोडक्यांत सागतां येणें कांहीं शक्य नाहीं. पण त्यांतही एक सार त्यांनीं मोठे मार्मिकपणानें काढलें आहे. तें हें कीं, मूर्खांचीं व पढतमूर्खांचीं शेंकडों लक्षणें सांगून झाल्यानंतर साऱ्या मूर्खांचा शिरोमणी—मूर्खांचा राजा कोण? तें सरतेशेवटीं सांगितलें आहे. तें कोणतें ? तरः—

**मूर्खांमाजी परम मूर्ख । जो संसारीं मानी सुख ॥**
**संसार दुःखायेवढें दुःख । आणीक नाहीं ॥ १ ॥**

“ इतक्यावेळ पर्यंत नानाप्रकारचे मूर्ख सांगितले. आतां ह्या सर्वांत मूर्खांचा शिरोमणी किंवा मूर्खांचा राजा कोण ? तर जो संसारामध्यें मोठें

सुख आहे असें समजतो तो. कारण, संसारासारखें दुःख दुसरें कोणतेंच नाहीं.”

समर्थांचा सर्वांत पहिला सिद्धांत काय तो हाच. परंतु जगाची प्रवृत्ति पाहिली तर ती ह्याच्या अगदीं उलट आहे. सुखाचें सर्वस्व काय तो प्रपंच असेंच त्यांस वाटत असतें. बायका, मुलें, घरदार, त्याला जीव कीं प्राण वाटत असतें. म्हणूनच तो त्यांत गुंतून पडतो. जगामध्यें संसारावर लाथ मारणारे लोक कितीसे निघतील? बहुतेक लोक संसारीच; आणि साऱ्यांनींच संसार सोडला, तर जग तरी चालणार कसें? हा एक मोठा प्रश्न आहेच. आणि समर्थ तर संसारांत सुख मानणाराला ‘मूर्खच’ नव्हे तर ‘महामूर्ख’ म्हणतात! तेव्हां हें कसें काय? आजपर्यंत कोट्यावधि लोक संसार करीत आले, आज करीत आहेत, व पुढेंही करणारच. ते सारेच महामूर्खांचे शिरोमणी काय? अशी सहजींच मनामध्यें शंका उद्भवणार. तिचें पुरतेंपणीं निरसन करण्यासाठींच ह्या संसारदुःखाचें, जन्माच्या तापत्रयाचें चित्र यथातथ्य रेखाटलें जावें म्हणून समर्थांनीं आपल्या दासबोधापैकीं एक सबंध तिसरा दशक खर्चीं घातला आहे! त्यांतील रचना, अनुभव व प्रतिपादनाची हातोटी इतकी अपूर्व आहे कीं, त्याच्यापुढें मोठ्या मोठ्या कवींनींही हातच टेकावेत! हा दशक इतका रसभरित साधला आहे कीं, त्याचें वर्णन करावें तितकें थोडें. ह्याची थोडीशी तरी कल्पना मनांत यावी म्हणून त्यांतील फक्त मुद्दे दाखल करतों.

नरदेह किती उपयोगी आहे हें पूर्वीं दाखविलेंच आहे; पण तो तितकाच अमंगलही आहे. ही गोष्ट ध्यानांत यावी म्हणून समर्थ सांगतातः—

**पाहतां शरीराचें मूळ। या ऐसें नाहीं अमंगळ॥**
**रजस्वलेचा जो विटाळ। त्यामध्यें जन्म त्यासी॥ १॥**
**अत्यंत दोष ज्या विटाळा। त्या विटाळाचाचि पुतळा॥**
**तेथें निर्मळपणाचा सोहळा। केवि घडे॥ २॥**
**रजस्वलेचा जो विटाळ। त्याचा आळोनि झाला गोळ॥**
**त्या गोळाचेंचि केवळ। शरीर हें॥ ३॥**

वरी वरी दिसे वैभवाचें । अंतरीं पोतडें नरकाचें॥
जैसें झाकणें चर्मकुंडाचें । उघडिताचि नये ॥ ४ ॥

कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यहीं धुइजे तें ॥
तरीं दुर्गंधी देहातें । शुद्धता नये ॥ ५ ॥

अशुद्ध शद्बे शुद्ध नाहीं । तेंही भरलें असे देही ॥
नाना व्याधि दुःखें तींहीं । अभ्यंतरीं वसतीं ॥ ६ ॥

नरकाचें कोठार भरलें । आंत बाहेरी लिडबिडलें ॥
मूत्र पोतडें जमलें । दुर्गंधीचें ॥ ७ ॥

जंत किडे आणि आंतडीं । नाना दुर्गंधींचीं पोतडीं ॥
अमूप लवथवती कांतडी । कंटाळवाणी ॥ ८ ॥

लाळ थुंका आणि मळ । पित्त श्लेष्मा प्रबळ ॥
तयास म्हणती मुखकमळ । चंद्रासारिखे ॥ ९ ॥ *

पोटीं घालितां दिव्यान्न। कांहीं विष्ठा कांहीं वमन ॥
भागीरथीचें घेतां जीवन। त्याची होय लघुशंका ॥ १ ॥

पोटीं नसता मळमूत्र वोक । तरी मरोनि जाती सर्वलोक॥
झाला राव अथवा रंक । पोटीं विष्ठा चुकेना ॥ ११ ॥

---

* भर्तृहरीच्या वैराग्यशतकांतील उद्गारही हुबेहुब असेच आहेतः—

स्तनौ मासग्रंथी कनककलशा वित्युपमितौ
मुखं श्लेष्मागारं तदपिच शशांकेन तुलितम् ।
स्रवन्मूत्रक्लिन्नं करिवरशिरस्पर्धि जघनम्
मुहुर्निंद्यं रूपं कविजन विशेषैर्गुरु कृतम् ॥ १ ॥

मासांचे शुद्ध गोळे स्तनयुग तुळिती स्वर्ण कुंभा समान
थुंका शेंबूड याचें सदन मुख मिळे त्याजला चंद्रमान ।
रक्तें मूत्रें स्रवोनी स्थळ मलिन जें हस्तिगंडा परी ते
घाणेरें रूप वायां सकळ कविवरें श्रेष्ठ केलें परी तें ॥ १ ॥

वैराग्य शतकादर्श ( स्वकृत ).

**निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्त्वता ॥**
**एवं देहाची व्यवस्था । ऐशी असे ॥ १२ ॥**

'संसार' हाच दुखाचें मूळ आहे असें नाहीं, तर जन्म हाच मुळीं दुःखास कारण आहे, हें सिद्ध करण्यासाठीं समर्थांनीं गर्भापासून तों मृत्यूपर्यंत किती किती व कसकशीं दुःखें भोगावीं लागतात त्याचा चित्रपट इतका सुंदर रेखाटला आहे कीं, एखादा मोठा कादंबरीकार सुद्धां इतका करुणरस उत्पन्न करणार नाहीं.

गर्भवासांत असतांना होणारा कोंडमारा; मातेस डोहळ्यापासून होणारा त्रास; नंतर प्रसूतिवेदनेचे कष्ट; त्यांतच गर्भ आडवा आला असतां तो कापून काढण्याचा प्रसंग; त्यांतून वांचलेंच तर नानाप्रकारच्या व्यथा; खरूज, देवी, गोवर, अपघात इत्यादि नाना प्रकार; त्यांतून माता मृत्युमुखीं पडावी म्हणजे त्या मुलाच्या दुःखाला पारावारच नाहीं. इतक्या साऱ्यांतून निभावला तर मातापितरें मोठ्या थाटानें लग्न करून देतात. जवळ पैसा नसला तर शेतवाडी विकतात किंवा सावकाराचें कर्ज काढून कर्जबाजारी होतात. बायको न्हातीधुती झाली कीं, त्याला स्वर्ग तीन बोटें राहतो! सुखाचें सर्वस्व जें काय तें बायको असें त्यास होऊन जातें. बायको सांगेल तें प्रमाण. आईबाप केवळ कस्पटाप्रमाणें! बायको नाहीं नाहीं त्या सासूच्या कागाळ्या सांगून मायलेंकरांत वितुष्ट आणते. तिच्या कैवारानें आईबापांवर हात टाकावयालाही तो कमी करीत नाहीं. आईबापांपासून वेगळा होतो. इतक्यांत आईच मरण पावते, व बाप दुसरें लग्न करतो. मग काय? सावत्र सासू आणि सावत्र सून! ह्यांचा फार्स विचारूंच नये. तों हिकडे वर्षावर्षांचा पाळणा सुरू होतो. घरांतील असेल नसेल तें जाऊन अखेर कफल्लक होतो! मग पैशाकरितां बायकापोरें टाकून परदेश कंठावा लागतो. पांचचार वर्षें शेदोनशे रुपये गांठीस मारून हायसें करावयास येतो, तों गांवांत दुष्काळ. पोरेंबाळें अन्न अन्न करून अस्थिपंजर राहिलेलीं! त्यांचें स्थिरस्थावर होतें न होतें तों परचक्र येऊन नीच लोक बायकोलाच पळवून नेतात! आपली धर्मपत्नी आपल्या डोळ्यादेखत दुसऱ्यानें नेणें म्हणजे किती दुःख! ह्याची कल्पना करावी. लहान लहान पोरें गळ्यांत पडतात! नाहीं अन्न नाहीं वस्त्र! दातांवर

मारावयाला पैसा नाहीं. भीक मागण्याची पाळी ! अशा विपत्तींत कसा तरी टांचा घांसून मरतो !

अशा या संसारयातना परम कठीण आहेत. त्यांचें यथार्थ वर्णन करण्यास समर्थांच्या वाणीशिवाय दुसरें कोण समर्थ होणार ? त्यांच्या मुखांतीलच कांहीं उतारे द्यावेत असा मनास अत्यंत मोह पडतो. परंतु त्या वेंच्यांमध्यें द्यावेत कोणते आणि व गाळावेत कोणते ? सारेच मनमोहक. ह्यास्तव वरील दशकाचा अगदीं थोडा गोषवारा गद्यांतच दिला आहे. तेवढा वाचूनसुद्धां कोणास संसारदुःखाची खूण पटल्यावांचून राहील ? कोणाला त्या स्थितीचा वीट येणार नाहीं ? म्हणून दासबोधांतील निदान हा तिसरा दशक तरी वाचून पाहण्याविषयीं वाचकांस आमची आग्रहाची विनंति आहे. येवढा दशक वाचला तरी हृदयास सारा अनुभव पटल्यावांचून राहाणार नाहीं. येवढेंच येथें सांगून आम्ही पुढील विचारास लागतों.

वरचें सर्व विवेचन वाचून असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, संसार हा जर इतका दुःखमूलक आहे, व त्यांत सुख मानणारे सारेच जर मूर्खांचे शिरोमणी; भिक्षा ही पवित्र व झोळी ही मंगलदायक; तर मग साऱ्यांनीं आपल्या संसारावर पाणी सोडून व बायकामुलें टाकून काखेस झोळी लावावी काय ? हेंच कां जन्माचें सार्थक ? व हीच कां नरदेहाची इतिकर्तव्यता ? मग ह्यांत समर्थांनीं विशेष तें काय सांगितलें ? ही गोष्ट साऱ्या साधूसंतांनीं पूर्वींच सांगून ठेवली आहे. मग समर्थांनीं विशेष तें काय सांगितलें ? आणि समर्थ तर राजकारणी पुरुष म्हणून ख्याति आहे. तेव्हां हें कसें ? ह्यावर उत्तर हेंच कीं, समर्थ असें कसें सांगतील ? भलतीच—जगाच्या रूढीविरुद्ध गोष्ट समर्थांच्या मुखांतून निघणें कधींच शक्य नाहीं. वास्तविक पाहिलें तर समर्थांना संसाराचा गंध नव्हता. बायकामुलांचें सुखदुःख काय हें त्यांच्या गांवींही नव्हतें. बारा वर्षांतच ते घर सोडून निघाले. बारा वर्षें एकांतवासांत तपश्चर्या केली. बारा वर्षें पृथ्वीप्रदक्षिणा झाली. मग संसारांतील सुखदुःख त्यांना पहावयास तरी कोठें व कसें मिळालें असेल ? असें असतांही त्यांनीं संसारांतील चित्र इतकें हृदयंगम वठविलें हा अद्भुत चमत्कार नव्हे काय ?

त्यांनीं स्वतः बाराव्या वर्षींच संसारावर पाणी सोडलें होतें. त्यांनीं स्वतः भिक्षेची दीक्षा पतकरली होती, तरी सर्वांनीं त्याच मार्गाचें अवलंबन करावें असें त्यांचें मुळीच सांगणें नव्हतें. तर ज्यांना महंत होणे असेल, ज्यांना आपला सारा जन्म लोककल्याणकार्यांत खर्च करणें असेल, ज्यांना जगदुद्धाराचेंच व्रत पतकरावयाचें असेल, त्यानींच प्रपंचाचा त्याग करावा व त्यानींच भिक्षावृत्ति पतकरावी. इतरांनीं प्रपंचाचा त्यागही करूं नये व भिक्षावृत्तीही पतकरूं नये. इतकेंच नव्हे, तर आधीं नीट प्रपंच करावा आणि मग परमार्थ साधावा. प्रपंचच ज्याला नीट करतां येत नाहीं, तो परमार्थ काय करणार ? असेंच त्यांचें ठाम मत होतें. तें आतां त्यांच्याच शब्दांनीं सांगतोंः—

**आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका॥**
**येथें आळस करूं नका। विवेकी हो ॥ १ ॥**

**प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल ॥**
**प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥**

**प्रपंच सांडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला ॥**
**मग त्या करंट्याला। परमार्थ कैचा ॥ ३ ॥**

**प्रपंच सांडोनि परमार्थ करिशी। तरी तूं यमयातना भोगिशी॥**
**अंतीं परम कष्टी होसी। यमयातना भोगता ॥ ४ ॥**

**साहेबकामास नाहीं गेला। घरींच सुखाडोनि बैसला ॥**
**तरी साहेबी कुठली तयाला। पाहती लोक ॥ ५ ॥**

**तेव्हां महत्त्वचि गेलें। दुर्जनाचें हांसें झालें ॥**
**दुःख उदंड भोगिलें। आपुल्या जावें ॥ ६ ॥**

**तैसेंचि होणार अंतीं। म्हणोनि भजावे भगवंती॥**
**परमार्थाची प्रचीती। रोकडी घ्यावी ॥७॥**

**संसारीं असतां मुक्त। तोचि जाणावा सुयुक्त ॥**
**अखंड पाहे युक्तायुक्त। विचारणा हे ॥ ८ ॥**

**प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण ॥**
**प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा ॥ ९ ॥**

म्हणोनि सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालवणें ॥
ऐसें न करतां भोगणें । नाना दुःखें ॥ १० ॥

—द. ११ स. १

ह्यावरून परमार्थापेक्षांही प्रपंचावर समर्थांचा कसा दुजोरा आहे ही गोष्ट उत्तम प्रकारें लक्षांत येण्यासारखी आहे. आधीं प्रपंच करून मग परमार्थ साधावा अशा प्रकारचे उद्गार आणखीही ठिकठिकाणीं गोंवलेले आहेत. पहाः—

प्रपंच करावा नेमक । पाहवा परमार्थ विवेक ॥
जेणें करतां उभयलोक । संतुष्ट होती ॥ १ ॥

द. ११. १

**विशिष्ट प्रकार**—प्रत्येक कवीच्या काव्यामध्यें कांहीं तरी विशिष्ट प्रकार असलेला आढळतो. मोरोपंतांच्या काव्यामध्यें 'अक्षरानुक्रम' चमत्कार आढळतात. वर्णाक्षर रामायण, मंत्ररामायण, परंतुरामायण अशीं विशिष्ट अक्षरांनीं युक्त रामायणें त्यांनीं एक दोनच नव्हेत, तर १०८ केलीं आहेत. ह्याशिवाय 'कमलबंध' वगैरे किरकोळ प्रकारही दृष्टीस पडतात. वामन पंडिताची यमकावरच फार मदार! ती इतकी कीं, त्यांना त्यावरून शेवटीं 'यमक्या' वामन हें टोपण नांव मिळालें! विठोबा अण्णा दप्तरदार ह्यांचा श्लेषालंकार फार आवडता! 'सुश्लोक लाघवा' मध्यें एक एक दोन दोनच नव्हे तर एक एका पद्याचे पांच पांच अर्थ साधले आहेत! तसें समर्थांच्या कवितेंतही एक दोन विशिष्ट गुण आढळतात. त्यांपैकीं एक हा कीं, श्रोत्याला एक गूढ किंवा कोडें (Problem) घालावयाचें. ह्याचें कारण येवढेंच दिसतें कीं, तेणेंकरून त्या विषयांचा आपआपसांत चांगला खल व्हावा, आणि विचारशक्ति वाढावी. याप्रमाणें दासबोधांतही त्यांनीं पांच चार कोडीं घालून ठेवलेलीं आहेत. त्यांपैकीं दशक १५ समास ६ ह्यांतील मौजेचें एकच कोडें येथें देतोंः—

पीतापासून कृष्ण झालें । तें जगीं विस्तारलें ॥
तेणेंविण उमजलें । हें तों घडेना ॥ १ ॥

आहे तरी स्वल्प लक्षण । सर्वत्राची सांठवण ॥
अधम आणि उत्तमगुण । तेथेंचि वसती ॥ २ ॥

महीसुत सरसावला । सरसावूनि द्विधा केला ॥
उभयतां मिळूनि चालिला । कार्यभाग ॥ ३ ॥

श्वेताश्वेतास गांठी पडतां । मध्यें कृष्ण मिश्रित होतां ॥
इहलोक सार्थकता । होत असे ॥ ४ ॥

विवरतां याचा विचार । मूर्ख तोचि होय चतुर ॥
सद्यः प्रचीत साक्षात्कार । इहलोकींचा ॥ ५ ॥

ह्या ओव्या पहावयाला गेलें तर पांचच आहेत; नव्हे पहिल्या चारच काय त्या विचार करण्यासारख्या आहेत. अर्थ पाहूं गेलें तर सरळ व साधा असाच आहे. कठीण शब्द असाही फारसा कोठें नाहीं. फक्त ' महीसुत ' येवढा एकच शब्द काय तो अपरिचित व घोटाळा पाडण्यासारखा आहे. तरी पण ह्या चार ओव्यांमध्यें सार काय हें मात्र ध्यानांत येत नाहीं हा किती चमत्कार आहे !* ह्या ओव्यांचा सरळ अर्थ पाहिला तर तो असा दिसतोः—

" पिंवळ्यापासून काळें झालें, आणि तेंच जगभर पसरलें. पण त्याच्याशिवाय कोणाला कांहीं समजेल म्हटलें तर तें मात्र व्हावयाचें नाहीं. पाहावयास गेलें तर गोष्ट क्षुल्लक आहे, पण त्यांतच सारें भरलेलें आहे. सद्गुण आणि दुर्गुण हीं तेथेंच राहतात. महीसुत—म्हणजे पृथ्वीचा पुत्र मोठा झाला आणि त्याचीं दोन शकलें केलीं, आणि तीं दोन्हीं मिळून कार्य सुरू झालें. पांढऱ्या पांढऱ्याची गांठ पडून त्यांत काळें मिसळलें कीं झालें ! आटोपलें. ह्या लोकांतली इतिकर्तव्यता संपली.

येवढ्याचा जरी नीट विचार केला तरी मूर्ख असला तरी तो शहाणा होईल. हाच या जगांतला आज प्रत्यक्ष साक्षात्कार आहे. "

ह्यांत पिंवळ्यापासून काळें झालें म्हणजे काय ? तें साऱ्या जगांत

* ह्या ओव्यांचा अर्थ आम्ही जाहीर रीतीनें विचारला असतांही तो कोणाकडून लिहून आला नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

पसरलें. त्याच्याशिवाय कोणालाच कांहीं म्हणे समजत नाहीं. उत्तम गुण आणि हलके गुण म्हणे त्यांतच राहतात. पहावयाला गेलें तर गोष्ट क्षुल्लक पण जें काय आहे तें त्यांतच आहे. पृथ्वीचा मुलगा पुढें आला काय? त्याचीं शकलें केलीं काय? आणि त्यानें काम सुरू झालें काय? पांढऱ्या पांढऱ्याची गांठ पडून त्यांत काळें पडलें कीं इहलोकींची कर्तव्यता संपली, ह्याचा अर्थ काय? ह्यांतील एकाचा तरी उलगडा पडतो काय? कांहीं नाहीं. साराच आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ! पण त्यावर आणखी शेरा काय? तर—" ह्याचा जर विचार केला, तर मूर्ख असेल तो सुद्धां चतुर होईल. हाच हातोहात ह्या जगांतला चमत्कार आहे." ही तर प्रतिज्ञा आहे. यावरून ह्यांत कांहीं पोकळ ब्रह्म नाहीं हें खास. कांहीं तरी महत्त्वाचें गूढ असलें पाहिजे. तें काय हें सांगतोः—

## कोड्याचा उलगडा.

पीत म्हणजे पिवळ्या रंगाचा दिवा ह्याच्यापासून काळें-काजळ उत्पन्न झालें. आणि काजळापासून उत्पन्न झाली शाई आणि तीच साऱ्या जगामध्यें पसरून राहिली आहे. शाईनें लिहिलेलें वाचल्याखेरीज कोणासच कांहीं कळत नाहीं. नानाप्रकारचे ग्रंथ, पुस्तकें, हिशेब, खतेंपत्रें व कागदपत्र सारे शाईनेंच लिहिलेले असतात. पहावयाला गेलें तर बाब थोडी. फक्त एक काळा रंग—शाई—पण सारें यच्चयावत् ज्ञान त्यांतच भरून राहिलें आहे. सद्गुण कोणते आणि दुर्गुण कोणते तें त्यांतच सांगितलेलें आहे. दुर्योधन कसा होता हें त्याच्यावरूनच कळतें, आणि पांडव कसे होते हेंही त्याच्यावरूनच कळतें. पृथ्वीचा मुलगा—जमिनींतून उत्पन्न झालेला पदार्थ—बोरू 'सरसावला'—मोठा झाल्यानंतर त्याचे दोन भाग करतात. टोकें चिरून लिहिण्याचें काम चालतें. कागद पांढरा आणि बोरू किंवा लेखणही पांढरी. ह्या दोन पांढऱ्यांची गांठ पडून त्यांत काळें म्हणजे शाई मिश्रित झाली, म्हणजे पांढऱ्यावर काळें करतां येऊं लागलें-लिहितां-वाचतां आलें कीं, ह्या जगांतील इतिकर्तव्यता संपली. विद्या आली कीं मिळवली.

ह्याचा विचार केला, मनन केलें तर मूर्ख असेल तो सुद्धां शहाणा होईल. अक्षरशत्रु असेल तो सुद्धां विद्वान् होईल. ह्याचा दाखला जगामध्यें प्रत्यक्षच आलेला दृष्टीस पडतो. अक्षरशत्रूपेक्षां विद्वानाला मान मिळालेला जगामध्यें प्रत्यक्षच दृष्टीस पडतो.

**दुसरा अर्थ**—'पीतापासून कृष्ण झालें' ह्याचा दुसराही एक व्यापक अर्थ उत्पन्न होतो, तो असा. पीत म्हणजे प्रकाश. प्रकाशाचा रंग पिंवळा असतो हें प्रसिद्धच आहे. ह्याच्यापासून अंधार झाला, सावली झाली; छाया झाली. छाया असल्याशिवाय कोणालाच कांहीं कळावयाचें नाहीं. प्रकाश आणि छाया आहे म्हणूनच आपल्याला सारे पदार्थ दिसतात व ओळखतात. छाया या जगावर नसती तर आपल्याला कांहींच दिसतें ना. डोळे असूनही आपण अंध झालों असतों. पुढील जागा उंच सखल आहे; खळगा आहे हें आपल्याला छाया असल्यामुळेंच दिसतें. छायाच नसेल तर पुढें आलेला खळगासुद्धां आपल्याला न समजतां आपण धाडकर त्यांत पडूं. आपला दिसण्याचा धर्म सारा छायेवर व प्रकाशावरच अवलंबून आहे. छायेचा धर्म नसता, तर फोटोग्राफची तसबीर मुळींच निघाली नसती. ही छाया पाहूं गेलें तर यःकश्चित् आहे. तरी सर्व काय तें त्यांतच भरलेलें आहे. असाहि एक अर्थ निघतो, पण पुढें पुन्हा लिहिण्यावाचण्यावर हें यावेंच लागतें. छाया आणि माया ह्या दोन्ही एकरूपच आहेत. ह्यास्तव हेंच रूपक मायेकडेही लागूं शकतें. छायेशिवाय ज्याप्रमाणें कोणत्याही गोष्टीचें यथार्थ ज्ञान होत नाहीं, त्याप्रमाणेंच मायेशिवायही परब्रह्मस्वरूप कळत नाहीं.

ह्याच ओव्यांचा दुसरा वेदांतपरही कोणी कोणी अर्थ लावतात. पण त्यांत मोठेंसें स्वारस्य नाहीं. तोही अर्थ ज्यांना पहावयाचा असेल त्यांनीं 'सार्थ व सटीप' दासबोधांत पहावा. पण प्रधान अर्थ हा वर दिलेलाच होय, व तोच समर्थांना संमत आहे. हें कशावरून? तर समर्थांनीं 'संकेत कुबडी' म्हणून एक लहानसा ग्रंथ केलेला आहे. त्यांत दासबोधाच्या प्रत्येक समासांत कोण कोणते विषय आहेत ह्याचें सार काढलें आहे. त्याप्रमाणें ह्या १५ व्या दशकांतील ६ व्या समासाचेंही सार दिलें आहे. तें असें:—

सहावा चातुर्य लक्षण । मुर्खा अंगीं बाणती जाण ॥
लिहूं वाचूं शिकवण । अर्थासहित ॥ २० ॥
कु. द. १५.

ह्यावरून समर्थांनीं ह्या समासांत 'लेखनवाचनक्रिया' हाच विषय सांगितला आहे, हें निःसंशय आहे. मग विनाकारण ओढूनताणून वेदांतांत शिरण्यांत मतलब कोणता ? असो.

अशा प्रकारचें हें एक कोडें आहे. दशक १५ समास ५ च्या आरंभीं 'दोघा ऐशी तीन चालती' अशा कांहीं ओव्या आहेत. तेंही असें कोडेंच आहे. त्यांत माल वेदांतच आहे. दुसरा तिसरा अर्थ त्याच्यापासून निघत नाहीं. तेराव्या दशकाच्या पांचव्या समासांत 'काहाणी' म्हणून एक विषय आहे. तेंही असेंच एक कोडें आहे. परंतु तें फारसें कठीण नाहीं. ह्या दोहोंच्याही अर्थाबद्दल संशय पडल्यास 'सार्थ व सटीप दासबोध' पहावा. त्यांचा उलगडा विस्तार भयास्तव येथें केला नाहीं.

असाच एके ठिकाणीं दासबोधांतही एक 'अक्षरचक्र' समास साधला आहे. तो चवदाव्या दशकांतील ४ था समास होय. ह्यांतील विषय 'कीर्तनलक्षण' असा आहे. ह्यांतील प्रत्येक ओवींत 'क' पासून 'ज्ञ' पर्यंत आद्याक्षराला अनुक्रमानें वर्ण साधले आहेत. त्याचा थोडासा चमत्कार दाखवितों:—

कलियुगीं कीर्तन करावें । केवळ कोमल कुशल गावें ॥
कठीण कर्कश कुडें सांडावें । एकीकडे ॥ १ ॥

खटपटखुंदून टाकावी । खळखळ खळासि न करावी ॥
खरें खोटें खवळीं न द्यावी । वृत्ति आपुली ॥ २ ॥

गर्वें गाणें गाऊं नये । गातां गातां गळूं नये ॥
गौप्य गुज गर्जों नये । गुण गावें ॥ ३ ॥

घष्टणीं घिसणीं घस्मरपणें । घसर घसरू घसा खाणें ॥
घुम घुमोजि घुमणें । योग्य नव्हे ॥ ४ ॥

नाना नामें भगवंताचीं । नाना ध्यानें मनुष्याचीं ॥
नाना कीर्तनें कीर्तीचीं । अद्भुत करावीं ॥ ५ ॥

चक चक चुकावेना । चाट चाकट चालवेना ॥
चरचर चुरचुर लागेना । ऐसें करावें ॥ ६ ॥
छळ छळ छळणा करूं नये । छळितां छळेतां छळूं नये ॥
छळणें छळणा करूं नये । कोणी एकाची ॥ ७ ॥
जी जी जी जी म्हणावेंना । जो जो जागे तो पावेना ॥
जप जपों जनीं जनार्दना । संतुष्ट करावें ॥ ८ ॥
झिरपे झरे पाझरे जळ । झळके दुरून झळाळ ॥
झडझड झळकती सकळ । प्राणी तेथें ॥ ९ ॥
या या या या म्हणावें नलगे । याना याना उपाय न लगे ॥
या ये ये या कांहींच न लगे । सुबुद्धासी ॥ १८ ॥

यापुढें 'श' पर्यंत असेच आद्याक्षरांचे शद्व साधले आहेत. ह्यामध्यें शद्ववैचित्र्याची चमत्कृति दृष्टीस पडते येवढेंच कायतें. क्षणभर मौज करण्याचा समर्थांचा स्वभाव प्रथमपासूनच असल्यामुळें ही एक प्रकारची कौशल्याची मौज दृष्टीस पडते. यापेक्षां त्यांत विशेष मातब्बरी नाहीं असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. अशा अक्षरचमत्कृतींत लय लागल्यानें मूळच्या प्रसादांत तुटवडा येतो हें कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण, कितीएक शब्द मुद्दाम ओढून ताणून आणल्यामुळें बहुतेक निरर्थकच योजणें भाग पडलेलें दिसतें. हरिदासाचें कीर्तन एखादे वेळीं अति उत्तम व परिपूर्ण ज्ञानबोधक असूनही तें कधीं कधीं बायकांमुलांकरितां मध्येंच एखादी क्षुल्लक नक्कल सांगून त्यांची झोप घालवून त्यांना तरतरी आणीत असतात. त्यांतलाच हा एक समर्थांचा करमणुकीचा प्रकार होय.

प्रगल्भ अंतःकरणाकरितां परमार्थाचा उपदेश दासबोधांत तर सारा भरलेलाच आहे. पण होतकरू मंडळींनीं अभ्यास करून चातुर्य संपादन करावें असे बोधप्रद व शिकवणीचे विषयही त्यांत कांहीं कमी नाहींत. त्यापैकीं कांहीं चुटके देतों.

'लेखननिरूपण' म्हणजे लिहावें कसें, याबद्दल दशक १९ यांतील १ ला समास घातलेला आहे. त्यांत लेखकानें ग्रंथ कसा लिहावा याबद्दल फार मार्मिक सूचना आहेत. त्यांतील कांहीं वेचे:—

ब्राह्मणें बालबोध अक्षर । घडसून करावें सुंदर ॥
जें देखतां चतुर । समाधान पावती ॥ १ ॥
वाटोळें सरळ मोकळें । ओतलें मशीचें काळें ॥
कुळकुळीत ओळी चालिल्या ढाळें । मुक्तामाळा जैशा ॥२॥
पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पावत गेलें ॥
एका टाकेंचि लिहिलें । ऐसें वाटे ॥ ३ ॥
ओळीस ओळ लागेचिना । अर्कुलें मात्रा भेदीना ॥
खालीचे ओळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥ ४ ॥
पानशिशानें रेखाटावें । त्यावरी नेमस्त लिहावें ॥
दुरी जवळी न व्हावें । अंतर ओळीचें ॥ ५ ॥
कोठें शोधासि अडेना । चुकी पाहतां सांपडेना ॥
गरज केली घडेना । लेखकापासूनी ॥ ६ ॥
ज्याचें वय आहे नूतन । त्यानें लिहावें जपून ॥
जनासि पडे मोह न । ऐसें करावें ॥ ७ ॥
बहु बारीक तरुणपणीं । कामा नये म्हातारपणीं ॥
मध्यम लिहिण्याची करणी । केली पाहिजे । ८ ॥
ऐसा ग्रंथ जपोन लिहावा । प्राणिमात्रास उपजे हेवा ॥
ऐसा पुरुष तो पहावा । म्हणती लोक ॥ ९ ॥

कुत्र्याचे पाय मांजराचे पाय काढणाऱ्या हल्लींच्या विद्यार्थ्यांना हा उपदेश डोळ्यासमोर ठेवण्यासारखा नाहीं असें कोण म्हणेल ? खालच्या ओव्यावरून समर्थांच्या वेळच्या लेखनसामुग्रीचा चांगला बोध होतो.:—

सुऱ्या कातऱ्या जागाईत । खळीं घोटाळी तागाईत ॥
नाना सुरंग मिश्रित । जाणोन घ्यावे ॥ १ ॥
नाना देशींचे बोरू आणावे । घट्ट बारीक सरळ घ्यावे ॥
नाना रंगांचे आणावे । नाना जिनसी ॥ २ ॥
नाना जिनसीं टांक तोडणीं । नानाप्रकारें रेखाटणी ॥
चित्र विचित्र करणीं । शिसे लोळ्या ॥ ३ ॥

हिंगुळ संग्रहीं असावे। वाळिले आळते पाहोनि घ्यावें
सोपे भिजवून वाळवावे। संग्रह मशीचे ॥ ४ ॥
तगटी इतिश्रिया कराव्या । बंदरीं फळ्या घोटाव्या ॥
नाना चित्रीं चिताराव्या । उंच चित्रें ॥ ५ ॥

पुस्तकाची जपणूक—

नाना गोफ नाना बासनें । मेणकापडें सिंदूरवर्णें ॥
पेट्या कुलुपें जपणें । पुस्तकाकारणें ॥ ६ ॥

हल्लींच्या व पूर्वींच्या लेखनसामुग्रींत किती फरक पडला आहे तो पहा ! हल्लींची सामुग्री म्हणजे घोपट्या, पेनसीली, टांक, रबर, कंपास स्लेटी; आणि त्या वेळचें सामान म्हणजे घोटणी, बोरू, टांकतोडणीं, रेखटणी, शिशाच्या गोळ्या, हिंगुळ, हरताळ, आळतें, फळ्या वगैरे. आणि ग्रंथ जपून ठेवण्याचा बंदोबस्त किती तो पहा ! हल्लीं सारीं कपाटें !

आतां कवित्वाची लक्षणें:—

परोपकाराकारणें । कवित्व अवश्य करणें ॥
तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजे तीं ॥ १ ॥
देवाचिया प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ॥
तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥ २ ॥
कवित्व नसावें पाल्हाळ । कवित्व नसावें बाष्कळ ॥
कवित्त्व नसावें कुटिल । लक्षूनियां ॥ ३ ॥
हीन कवित्व नसावें । बोलिलेंचि न बोलावें ॥
छंद भंग न करावे । मुद्राहीन ॥ ४ ॥
आवडीं लागली अंतरीं । तैशीच वदे वैखरी ॥
भावें करुणा कीर्तन करी । प्रेमभरें नाचत ॥ ५ ॥
त्याचें भक्तीचें कौतुक । त्या नांव प्रासादिक ॥
सहज बोलतां विवेक । प्रगट होय ॥ ६ ॥
कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें रसाळ ॥
कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ॥ ७ ॥

अमावें सोपें । कवित्व असावें अल्परूपें ॥
कवित्व असावें सुरूपें । चरणबद्ध ॥ ८ ॥
जेणें घडे समाधान । जेणें तुटे संसारबंधन ॥
जयास मानिती सज्जन । या नांव कवित्व ॥ ९ ॥

द० १४-३

'घरोघरीं झाले कवी । नेणें प्रसादाची चवी' ह्या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें अर्वाचीन कवींचा सवंग सुकाळ झाला आहे. ते जर वरचा उतारा वाचून प्रसाद म्हणजे काय तें लक्षांत ठेवतील तर त्यांच्या कविताही अधिक लोकमान्य होतील यांत शंका नाहीं.

हल्लीं 'कीर्तनाकडे' लोकांचें लक्ष बरेंच वेघलेलें दिसतें. संमेलनावर संमेलनें चालू आहेत. व हरिकीर्तनाचे वर्गही निघाले आहेत. अशा वेळीं समर्थांचे कीर्तनावरील विचार जनापुढें ठेवले तर त्याचा पुष्कळ प्रकारें उपयोग होण्यासारखा आहे. समर्थ 'कीर्तनाच्या संबंधानें' येणें प्रमाणें सांगतातः—

हरिकथा कैशी करावी । रंगें कैशी भरावी ॥
जेणें पाविजे पदवी । श्रीरघुनाथ कृपेची ॥ १ ॥

बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें अर्थांतर ॥
भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ २ ॥

भगवंतासि कीर्तन प्रिय । कीर्तनें समाधान होय ॥
बहुत जनासि उपाय । हरिकीर्तन कलियुगीं ॥ ३ ॥

करुणा कीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतेयांचीं श्रवणपुटें । आनंदानें भरावीं ॥ ५ ॥

पदें दोहरे श्लोक प्रबंध । धाटी मुद्रा अनेक छंद ॥
वीरभाटीव विनोद । प्रसंगें करावे ॥ ७ ॥

नाना नव रसिक श्रृंगारिक । गद्यपद्याचें कौतुक ॥
नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥ ८ ॥

पूर्वपक्ष त्यागूनि सिद्धांत । निरूपण करावें नेमस्त ॥
बहुधा बोलणें अस्ताव्यस्त । बोलोंचि नये ॥ ९ ॥

सत्य समाधान तें उडे। नीति न्याय साधन मोठें॥
जेणें सद्भाव विघडे। ऐसें न बोलावें ॥ १० ॥
सगुण हरिकथा या नांव कीर्तन। अद्वैत म्हणजे निरूपण ॥
सगुण जें तें रक्षून। निर्गुण बोलत जावें ॥ ११ ॥
असो वक्तृत्वाचा अधिकार। अल्पास न घडे प्रत्युत्तर ॥
वक्ता पाहिजे साचार। अनुभवाचा ॥ १२ ॥
कीर्तनें वाचा पवित्र। कीर्तनें होय सत्पात्र ॥
कीर्तनें प्राणीमात्र। सुशील होती ॥ १३ ॥
सदा सर्वदा हरिकीर्तन। ब्रह्मसुत करी आपण ॥
तेणें नारद तोचि नारायण। बोलिजेत आहे ॥ १४ ॥
म्हणोन कीर्तनाचा अगाध महिमा। कीर्तनें संतोषे परमात्मा ॥
सकल तीर्थें आणि जगदात्मा। हरिकीर्तनीं वसे ॥ १५ ॥
[द. १४ स. ५]

'कीर्तन करावें घडघडाटें' ह्या वाक्यावरून समर्थांची हरिकथे-विषयींची आवड व हुरूप किती दांडगी होती हें उत्तम प्रकारें व्यक्त होतें. ह्यांपैकीं पुष्कळ गोष्टी हरिदासांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. आंगीं पात्रता असल्यावांचून कीर्तनास उभें राहणें बरें नव्हे. हरिदासांच्या आंगीं पुष्कळ प्रकारचे गुण लागतात. केवळ गायनानेंही भागत नाहीं, व केवळ वक्तृत्वानेंही भागत नाहीं. त्याची श्रवणभक्तीच आधीं परिपूर्णतेस पोंचलेली पाहिजे.

समर्थांचा स्वभाव विनोदी असल्याचा पूर्वीं उल्लेख केलाच आहे. त्याप्रमाणें ते मधून मधून तसाच गमतीचा परंतु बोधप्रद विषय घालीतच असतात. त्यास अनुसरून त्यांनीं द० १८ स. ९ मध्यें 'निद्रा' हा विषय घालून त्यांत आळशी व अव्यवस्थित लोकांची जी तऱ्हा वर्णन केली आहे ती मनाला चांगलीच करमणूक करण्यासारखी असल्या-वरून त्यांतील भागांचाही कांहीं मासला दाखवितों:—

एकाचे डोळे झांकती। एकाचे डोळे लागती ॥
एक ते दचकोनि पाहती। चोहींकडे ॥ १ ॥

एक उलथोनि पडले । तिहीं ब्रह्मविणे फोडिले ॥
डुडकाचे तुकडे झाले । शुद्ध नाहीं ॥ २ ॥
एक टेंकोनि बैसलें । तेथेंचि घोरों लागले ॥
एक उताणे पसरले । सावकाश ॥ ३ ॥
एकाचीं वस्त्रें निघोनि गेलीं । तीं नागवींच लोळूं लागलीं ॥
एकाची मुंडाशी गडबडली । चहूंकडे ॥ ४ ॥
एक निजलीं अस्ताव्यस्तें । एक दिसतीं जैशीं प्रेतें ॥
दांत पसरोनी जैशीं भुतें । वाईट दिसती ॥ ५ ॥
एक मडकीं उतरतीं । एक भूमीं चांचपिती ॥
एक उठोनि वाटा लागती । भलतीकडे ॥ ६ ॥ *
एक हाका मारूं लागले । एक बोंबलतांचि उठले ॥
एक दचकोनि राहिले । आपुलें ठायीं ॥ ७ ॥
एक राऊत सोडिती । एक कर्पट ढेंकर देती ।
एक खाकारून थुंकती । भलतीकडे ॥ ८ ॥
मागें निद्रा संपलीं । पुढें जागृति प्राप्त झाली ॥
व्यवसायाची वुद्धि आपुली । प्रेरिते झाले ॥ ९ ॥
ज्ञाता तत्त्व सांडूनि पळाला । तुर्ये पलीकडे गेला ॥
आत्मनिवेदनीं झाला । ब्रह्मरूप ॥ १० ॥

हा समास जरी निवळ मौजेचा म्हणून घातलेला आहे, तरी त्यावरून आळशी, झोंपाळू, अव्यवस्थित अशा मनुष्याचें चित्र फारच उत्कृष्ट तऱ्हेनें रेखाटलेलें दृष्टीस पडते.

कित्येक वेळां असें वाटत असतें कीं, ' मूर्खाचीं लक्षणें ' तीं काय

---

* ' मधुमक्षिका ' म्हणून सुप्रसिद्ध ले. वि. को. ओक ह्यांनीं एक पुस्तक केलेलें आहे. त्यांत ' निद्राभ्रम ' म्हणून एक विषय आहे. त्यामध्यें झोपेंतून उठून कित्येक लोक किती विलक्षण कृति करतात त्याचें फार उत्कृष्ट वर्णन आहे. त्यांत मोठमोठें साधुवृत्तीचे पुरुष सुद्धां झोंपेमध्यें उठून त्यांनीं नीच कृत्यें केल्याचीं उदाहरणें दिलीं आहेत.

असावयाचीं ? तीं सारीं आपल्याला माहीतच आहेत. परंतु कित्येक संवयी आपल्याला अशा चमत्कारिक असतात कीं, त्या मूर्खपणाच्या आहेत असें आपल्याला वाटतही नाहीं. किंवा मनाला वाटलें तरी त्या आपण टाकीत नाहीं, ह्यास्तव तसल्या संवयी ज्या कितीएक लोकांमध्यें दृष्टीस पडतात, त्यांचाही त्यांनीं त्याग करावा म्हणून 'मूर्खांच्या' लक्षणाचे कांहीं वेंचे देतोंः—

जन्मला जयाचिये उदरीं। तयांसि जो विरोध करी॥
सखी मानिली अंतरीं। तो एक मूर्ख॥ १॥
परस्त्रियेशीं प्रेम करी। श्वशुरगृहीं वास करी॥
कुळेंवीण कन्या वरी। तो एक मूर्ख॥ २॥
तस्करासि ओळख सांगे। देखिली वस्तु तीच मागे॥
आपलें अनहित करी रागें। तो एक मूर्ख॥ ३॥
विद्या वैभव ना धन। पुरुषार्थ सामर्थ्य ना मान॥
कोरडाच वाहे जो अभिमान। तो एक मूर्ख॥ ४॥
दंत चक्षु आणि घ्राण। पाणी वसन आणि चरण।
सर्वकाळ जयाचे मळीण। तो एक मूर्ख॥ ५॥
जिवलगासि परम खेदी। सुखाचा शब्द तोंहीं नेदी॥
नीच जनांसि वंदी। तो एक मूर्ख॥ ६॥
पुत्रकलत्र आणि दारा। तुझकाचि मानूनिया थारा॥
विसरोनि गेला ईश्वरा। तो एक मूर्ख॥ ७॥
परपीडेचें मानी सुख। परसंतोषाचें मानी दुःख॥
गेले वस्तूचा करी शोक। तो एक मूर्ख॥ ८॥
बहुत दिवसांचे सेवक। त्यागूनि ठेवी आणिक॥
ज्याची सभा निर्नायक। तो एक मूर्ख॥ ९॥
घरीं असोनि सुंदरी। जो सदा परद्वार करी॥
बहुतांचें उच्छिष्ट अंगीकारी। तो एक मूर्ख॥ १०॥
कलह पहात उभा राहे। सोडवीना कौतुक पाहे॥
खरें असतां खोटें साहे। तो एक मूर्ख॥ ११॥

अक्षरें गाळूनि वाची। कांहीं घाली पदरचीं ॥
निगा न करी पुस्तकाची। तो एक मूर्ख ॥ १२ ॥
आपण वाचीना कधीं। कोणासि वाचावया नेदी ॥
पुस्तक बांधोनि ठेवी बंदीं। तो एक मूर्ख ॥ १३ ॥

पण ह्यापेक्षांही 'पढत मूर्खांचा' म्हणून आणखी एक वर्ग समर्थांनीं काढला आहे, व त्याचीं लक्षणें ह्याच्याहूनही बहारीचीं आहेत. 'पढतमूर्ख' हा शब्द सुद्धां समर्थांच्या पूर्वीं प्रचारांत होता असें वाटत नाहीं. कारण महाराष्ट्रकवींच्या काव्यग्रंथांत तो कोठें आलेला आढळत नाहीं. ह्यांत पढत मूर्खांची व्याख्या सांगून नंतर त्याच्या लक्षणांना सुरुवात केली आहे. 'पढतमूर्ख कोणाला म्हणतात?' त्याची व्याख्या अशी दिली आहे:—

मागां सांगितलीं लक्षणें। मूर्खां अंगीं चातुर्य बाणें ॥
आतां ऐका शहाणे। असोनि मूर्ख ॥ १ ॥
तयां नांव पढत मूर्ख। श्रोतीं न मानावें दुःख ॥
अवगुण त्यागितां सुख। प्राप्त होय ॥ २ ॥
आपुलेनि ज्ञातेपणें। सकळांस शद्व लावणें ॥
प्राणीमात्रांचें पाहे उणें। तो एक पढत मूर्ख ॥ ३ ॥
समूळ ग्रंथ पाहिल्यावीण। उगाच ठेवी जो दूषण ॥
गुण सांगतां पाहे अवगुण। तो एक पढत मूर्ख ॥ ४ ॥
जाणपणें भरी भरे। आला क्रोध नावरे ॥
क्रिया शद्बांस अंतरे। तो एक पढत मूर्ख ॥ ५ ॥
वक्ता अधिकारें वीण। वक्तृत्वाचा करी शीण ॥
वचन जयाचें कठीण। तो एक पढत मूर्ख ॥ ६ ॥
भरोनि वैभवाचे भरी। जीवमात्रास तुच्छ करी ॥
पाखांड मत सावरी। तो एक पढत मूर्ख ॥ ७ ॥
मागें एक पुढें एक। ऐसा जयाचा दंडक ॥
बोले एक करी एक। तो एक पढत मूर्ख ॥ ८ ॥
यथार्थ सांडूनि वचन। जो रक्षूनि बोले मन ॥
ज्याचें जिणें पराधीन। तो एक पढत मूर्ख ॥ ९ ॥

**निरूपणीं भले भले । श्रोते येवोनि बैसले ॥**
**क्षुद्र लक्षूनि बोले । तो एक पढत मूर्ख ॥ ६० ॥**

कोणच्याही काळीं मूर्खांचा जसा सवंग सुकाळ असतो, तसा पढत मूर्खांचाही असतो. आज मितीला तर त्यांचें प्रमाण व व्याप्ति पुष्कळच वाढली आहे!

समर्थांनीं अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करून व त्यावर नीट विचार करून प्रत्येक बाबतींत तथ्य काय तें ठरविलें होतें, ह्यामुळें त्यांस खऱ्याची व खोट्याची उत्तम परीक्षा असे. अस्सल कोणतें व कृत्रिम कोणतें, हें त्यांना तत्काळ कळत असे. यामुळें कोणत्याही गोष्टींत भ्रम म्हणून कसला तो त्यांस शिवत नसे. दशक १०, समास ६ मध्यें त्यांनीं ‘भ्रम’ या विषयावर एक समास फार उत्कृष्ट लिहिला आहे. त्यापैकीं कांहीं वेंचे देतों, म्हणजे भ्रमाच्या संबंधानें समर्थांचें विचार काय आहेत तेंही कळून येईल.

**मी तूंपण हा भ्रम । उपासना हाही भ्रम ॥**
**ईश्वर भाव हाही भ्रम । निश्चयेंसीं ॥ १ ॥**
**दशावतारीं वाटती नारी। कां ते मांडिली बाजेगिरी ॥**
**उगाच संदेह अंतरी। यां नांव भ्रम ॥ २ ॥**
**वृक्ष काष्ट पशु देखिले । मनांत वाटे भूत आले ॥**
**कांहींच नसतां हडबडिलें । या नांव भ्रम ॥ ३ ॥**
**ब्रह्मा लिहितो अदृष्टीं । आणि वाचून जाते सटवी ॥**
**ऐशा प्रकारच्या गोष्टी । या नांव भ्रम ॥ ४ ॥**

ह्यावरून समर्थांच्या वेळीं दशावतार, गारोड्याचे खेळ वगैरे असून त्यांतील कृत्रिम समर्थांनीं ओळखून ठेवलें होत. तसेंच ब्रह्मालिखित, सटवाई, भूत वगैरे सारा भ्रम असल्याचेंही त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे.

समर्थांची विषय प्रतिपादनाची शैली जशी सरळ व प्रमाणसूद असते, त्याप्रमाणेंच त्यांची शंका आशंका दूर करण्याची हातोटीही अपूर्व होती खालचा द. ७ स. ६ ह्यांतील ‘ बद्ध व मुक्त ’ ह्याविषयीं लोकांचे समज काय आहेत, त्याचें त्यांनीं उद्धाटण केलें आहे. त्यांपैकीं कांहीं ओव्या देतों:—

उपदेश काळीं तदाकार। होतां पडे हे शरीर॥
अथवा नेणें आपपर। ऐसें झालें पाहिजे॥ १॥
ऐसें नसतां जें बोलणें। तेंचि वाटे लाजिरवाणें॥
ब्रह्म होवोनि;संसार करणें। हेंही विपरीत दिसे॥ २॥
जो स्वयें ब्रह्मचि झाला। तो मागुता कैसा आला॥
ऐसें ज्ञान माझें मजला। प्रशस्त न वाटे॥ ३॥
श्रोता विनंति करी पुढती।' शुको मुक्तो वामदेवो वा 'ऐशी श्रुती॥
दोघेचि मुक्त आदिअंतीं। बोलत असे॥ ४॥
वक्ता बोले या उपरी। दोघेचि मुक्त सृष्टीवरी॥
ऐसें बोलतां उरी। कोणास आहे॥ ८॥
शुक वामदेव मुक्त झाले। येर अवघेचि बुडाले॥
या वचनें विश्वासले। ते पढत मूर्ख॥ ९॥
तरी वेद कैसा बोलला। तो काय तुम्ही मिथ्या केला॥
ऐकोन वक्ता देता झाला। प्रत्युत्तर॥ १०॥
शुक मुक्त ऐसें वचन। वेद बोलिला हें प्रमाण॥
परी तो नव्हता अचेतन। ब्रह्माकार॥ ११॥
जो ब्रह्माकार झाला। तो काष्ट होऊन पडिला॥
शुक भागवत बोलिला। परिक्षिती पुढें॥ १२॥
मीपणापासूनि सुटला। तोचि एक मुक्त झाला॥
मुका अथवा बोलिला। तरी तो मुक्त॥ १६॥

'शुको मुक्तो वामदेवो वा' ह्या श्रुति वाक्याविषयीं लोकांचा कसा गैरसमज आहे, त्याचा खरा अर्थ काय हें ह्या समासांत फारच उत्कृष्ट तऱ्हेनें प्रतिपादन केलें आहे. मुक्त होणें म्हणजे 'निचेष्टित होणें' किंवा लांकडासारखें पडणें असा कांहीं त्याचा अर्थ नाहीं. तर 'मीपणा-पासून—अहंकारापासून जो सुटला तोच खरा मुक्त होय. मग तो बोलला काय आणि न बोलला काय दोन्ही एकच. तो सदा सर्वदा मुक्तच आहे.

'यत्नदीक्षा' म्हणून १२ व्या दशकांतील एक दहावा समास केला

आहे. त्यामध्यें ' हे दरिद्या ! तूं भाग्यवान् कशानें होशील ?' ह्याबद्दल उपदेश केला आहे. तो विशेषकरून 'कसें करूं;काय करूं' असा जप करणाऱ्या होतकरू उमेदवारांना फार उपयोगाचा वाटल्यावरून त्यापैकीं कांहीं मुद्दे दाखल करतोंः—

दुर्बळ नाचारी ओडंगस्त । आळशी खादाड ऋणग्रस्त ॥
मूर्खपणें अवघे व्यस्त । कांहींच नाहीं ॥ १ ॥
खाया नाहीं जेवाया नाहीं । ल्याया नाहीं बैसाया नाहीं ॥
अंथराया नाहीं पांघराया नाहीं । खोंपट नाहीं अभागी ॥ २ ॥
तेणें कैसें करावें । काय जीवेसीं धरावें ॥
वांचावें कीं मरावें । कोण्या प्रकारें ॥ ३ ॥
म्हणोनि आळस सोडावा । यत्नें साक्षेप जोडावा ॥
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ४ ॥
प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरणें करावें ॥
नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ॥ ५ ॥

ज्याला कांहींच कोठें त्राण नसेल त्यानें आळस सोडून व्यवस्थेनें राहावें. ल्याहावयाला वाचावयाला शिकावें. लोकांस मान्य होईल असेंच भाषण करीत जावें. गावयास शिकून हरिकीर्तन करीत जावें, म्हणजे सहजच मोठेपणा प्राप्त होतो. मोठेपणा प्राप्त झाल्यानंतर त्याला वैभवाला कमी तें काय ? तात्पर्य, आळस सोडणें, व्यवस्थितपणानें वागणें, लोकांस वश्य करून घेणें सदाचरणानें वागणें हींच काय तीं वैभवास चढण्याचीं साधनें आहेत. त्यांचाच अवलंब करीत जावा, असा समर्थांचा ध्वनितार्थ आहे.

गुणाबद्दल व गुणी मनुष्याबद्दल समर्थांची केवढी पूज्यबुद्धि होती, हें [ द. ९ स. ४ ] खालील उताऱ्यावरून उत्तम प्रकारें लक्ष्यात येण्यासारखें आहे. 'जाणपण' ह्या नांवाच्या समासांत ते म्हणतातः—

हे सकळ गुणापाशीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती ॥
अवगुणास दरिद्रप्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं ॥ १ ॥
जो जेथें उपजला । तो तेथें व्यवसायीं उमजला ॥
तयास लोभ म्हणती भला । कार्यकर्ता ॥ २ ॥

जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी ॥
जाणता तो पोटभरी । नेणता भीक मागे ॥ ३ ॥
वडील आहे करंटा । आणि समर्थ होय धाकुटा ॥
कां जो विद्येनें मोठा । म्हणोनिया ॥ ४ ॥
विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं ॥
कुशळता नाहीं व्याप नाहीं । म्हणोन प्राणी करंटा ॥ ५ ॥
इतुकेंही जेथें वसे । तेथें वैभवास उणें नसे ॥
वैभव सोडितां आपैसें । पाठी लागे ॥ ६ ॥
पशुपक्षी गुणवंत । त्यास ग्रहण करिती समर्थ ॥
गुण नसतां जिणें व्यर्थ । प्राणीमात्राचें ॥ ७ ॥
या कारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण ॥
लक्षणेवीण अवलक्षण । सहजचि झाल ॥ ८ ।

कोणता तरी गुण अंगांत पाहिजे व आळस टाकला पाहिजे, म्हणजे दैन्य राहत नाहीं. कांहींतरी जाणतेपणा पाहिजे; सावधपणा पाहिजे; नेणतेपणानें–बेसावधपणानें आपली कसकशी दुर्दशा होते हें या समासांत धुढें फार उत्कृष्ट रीतीनें दाखविले आहे. पण तें असो.

आतां 'सगुण भजनांतील' कांहीं वेंचे देतों. हा उतारा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण ह्यांत समर्थांनीं आपला स्वानुभवच सांगितला आहे. [द. घ. स. ७]

वक्ता म्हणे सावधपणें । सांग ज्ञानाचीं लक्षणें ॥
तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ॥ १ ॥
करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन ॥
मळमूत्रत्यागलक्षण । तेहि सुटेना ॥ २ ॥
जनाचें समाधान राखावें । आपुलें पारिखें ओळखावें ॥
आणि भजनाचि सोडावें । हें कोण ज्ञान ॥ ३ ॥
ज्ञान विवेकें मिथ्या झालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें ॥
तरि मग भजनाचि काय केलें । सांग बापा ॥ ४ ॥

साहेबांस लोटांगणीं जावें। नीचासारखें व्हावें ॥
आणि देवास न मानावें। हें कोण ज्ञान ॥ ५ ॥
रघुनाथ भजनें ज्ञान झालें। रघुनाथ भजनें महत्त्व वाढलें ॥
म्हणोनि तुवां केलें। पाहिजे आधीं ॥ ८ ॥
हें तों आहे सप्रतीत। आणि तुज वाटेना प्रतीत ॥
साक्षात्कारें नेमस्त। प्रत्ययो करावा ॥ ९ ॥
रघुनाथ स्मरोनि कार्य करावें। तें तत्काळचि सिद्धी पावे ॥
कर्ता राम हें असावें। अभ्यंतरीं ॥ १० ॥
आपण आहे दो दिसांचा। आणि देव बहुता काळांचा ॥
आपण थोडे ओळखीचा। देवास त्रैलोक्य जाणे ॥ १४ ॥
देव उपेक्षी थोरपणें। तरी मग त्याचें तोचि जाणे ॥
अप्रमाणें तें श्लाघ्यवाणें। नव्हेच कीं श्रेष्ठा ॥ १५ ॥

परमेश्वराचें नाम घेऊन कार्य केलें असतां तें सिद्धीस जातें. कर्ता हा मी नव्हे; राम हा कर्ता आहे. अशी दृढतर भावना ठेवावी, म्हणजे आपल्याला कोठेंही वाण पडत नाहीं. देवाला सन्निध करणें किंवा दूर करणें हें फक्त एका भावनेवर अवलंबून आहे, आणि त्याची प्रचीति प्रत्यक्ष मीं घेतलेली आहे. तीही तुला खोटी वाटत असेल तर तूंही तसें करून पहा, म्हणजे तुलाही त्याचा अनुभव येतो किंवा नाहीं तें कळेल. ह्यावरून समर्थांची भक्ति आणि निश्चय केवळ अपूर्व होती यांत तिळमात्र शंका नाहीं.

हल्लीं जशा 'परिषदा' 'अधिनिवेशनें' 'संमेलनें' इत्यादि एक एक नवे बूट निघत आहेत, त्याप्रमाणें समर्थांच्या कालींही काय काय थोतांडें होतीं त्याचें त्यांनीं [द. १५ स. २] मध्यें 'निस्पृह लक्षणांत, चांगलें विवरण केलें आहे. त्यांतील कांहीं भाग असा:—

जितक्या मूर्ति तितुक्या प्रकृती। सारख्याच नसती आदी अंतीं॥
नेमचि नाहीं पहावें किती। काय म्हणोनी ॥ १ ॥
कित्येक म्लेंच्छ होवोनि गेले। कित्येक फिरंगणांत आटले ॥
देश भाषेनें रोधिले। किती एक ॥ २ ॥

**महाराष्ट्र देश थोडा उरला । राजकारणें लोक रोधिला ॥**
**अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥ ३ ॥**
**कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तमोगुणें उन्मत्त झाले ॥**
**रात्रंदिवस करूं लागले । युद्धचर्चा ॥ ४ ॥**
**उद्‌म्यास व्यासंग लागला । अवकाश नाहींसा झाला ॥**
**अवघा पोटधंदाच लागला । निरंतर ॥ ५ ॥**
**स्मार्तीं आणि वैष्णवीं । उरलीं सुरलीं नेलीं अघवीं ॥**
**ऐसी पाहतां गाथा गोवी । उदंड जाहली ॥ ६ ॥**
**या गलबल्यामध्यें गलबला । कोणी कोणी वाढविला ॥**
**त्यास देखों शकेनासा झाला । वैदिक लोक ॥ ७ ॥**
**त्याहीमध्यें हरिकीर्तन । तेथें ओढवले कित्येक जन ॥**
**प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान । कोण पाहे ॥ ८ ॥**
**या कारणें ज्ञान दुर्लभ । पुण्यें घडे अलभ्य लाभ ॥**
**विचारवंता सुलभ । सर्व कांहीं ॥ ९ ॥**

ह्या उताऱ्यावरून त्या वेळच्या महाराष्ट्रांतील लोकस्थितीचा उत्कृष्ट बोध होतो. म्हणजे कांहीं लोक बाटले होते, कित्येक फिरंग्यांत मिसळले होते. आणि कितीएक देशी विदेशी भाषा शिकण्यांतच निमग्न झाले होते. ह्यामुळें महाराष्ट्र देशांत कर्त्या पुरुषांचीच वाण होती. कित्येक लोक राजकारणाच्या विचारांत पडले होते, त्यांना अन्न खावयाला सुद्धां फुरसत नव्हती. कित्येक लोक स्वारीशिकारींतच गुंतून रात्रंदिवस युद्धाच्याच विचारांत पडले होते. व्यापारी लोक आपआपल्या व्यवसायांत गढून गेल्यामुळें त्यांनाही क्षणाची फुरसत नव्हती. तितक्यांतच स्मार्तांनीं व वैष्णवांनीं आपलें घोडें पुढें ढकलून आपआपले पंथ वाढविले. इतक्यांत हरिकीर्तनाचेंही पीक पिकून कांहीं लोक त्याच्याच पाठीमागें लागले. असे नाना प्रकार प्रचलित होते. त्यांतून विचारवंत असत तेच आपण आपला मार्ग काढीत. येवढी त्या वेळच्या लोकस्थितीची आज अनुभविक माहिती होते, हा तरी काय थोडा लाभ आहे ?

आतां उपदेशांमध्यें पाहूं गेलें तर मुख्य गोष्ट ही कीं, जगामध्यें

आपण वागावें कसें हें कळलें पाहिजे. त्यांतही दोन प्रकार आहेत. म्हणजे एक विधि आणि एक निषेध. करावें काय हा एक प्रकार, आणि करूं नये काय, हा दुसरा प्रकार. ह्या दोन्ही प्रकारांतील दोन लहान लहान नमुने देतों. म्हणजे ते आबालवृद्धांसही अत्यंत उपयोगी होतील. प्रथम निषेधाचा नमुनाः— [द. १४ स. १]

बहुसाल बोलूं नये। न बोलणें कामा नये॥
बहु अन्न जेऊं नये। उपवास खोटा॥ १॥
बहु साल निजूं नये। बहुत निद्रा मोडूं नये॥
बहु नेम धरूं नये। बाष्कळ खोटे॥ २॥
बहु जनीं असो नये। बहु अरण्य सेवूं नये॥
बहु देह पाळूं नये। आत्महत्त्या खोटी॥ ३॥

ह्यामध्यें 'युक्ताहारविहारस्य' ह्या गीतेंतील वचनाचेंच समर्थन केलें आहे. किंवा 'प्रमाणामधें सर्व कांहीं असावें' हेंच वाक्य नेहमीं ध्यानांत ठेवावें हा इत्यर्थ आहे. आतां कर्तव्याची गोष्ट. [द. ११ स. ३]
'शिक्षानिरूपण,:—

नाहीं न्याय नाहीं नीती। ऐसे हे लोक वर्तती॥
आणि अवघेंचि सार म्हणती। विवेकहीन॥ १॥
धोंडे सांडून सोनें घ्यावें। माती सांडून अन्न खावें॥
आणि अवघेंच सार म्हणावें। बाष्कळपणें॥ २॥
सार गार एकचि सरी। तेथें परिक्षेसि कैंची उरी॥
या कारणें चतुरीं। परीक्षा करावी॥ ३॥
आळस उदास नागवणा। आळस प्रयत्न बुडवणा॥
आळसें करंटपणाच्या खुणा। प्रकट होती॥ ५॥
म्हणोन आळस नसावा। तरीच पाविजे वैभवा॥
अत्रीं परत्रीं जीवा। समाधान॥ ६॥
ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबरदार॥
दुश्चितपणें तरी पोर। ओढा लावी॥ ७॥

**या कारणें सावधान । एकाग्र असावें मन ॥**
**तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ ८ ॥**
**कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ॥**
**शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ ९ ॥**

आळस सोडून द्यावा. निरंतर उद्योग करीत असावें. आपआपलें काम लक्षपूर्वक करीत असावें. प्रत्येक कामांत सावधगिरी ठेवावी. चित्त स्थिर असावें. कांहीं तरी मिळवावें आणि मग खावें. तरच जेणव गोड लागतें. दुसऱ्यास संकटांतून मुक्त करावें. शरीर कांहीं तरी कारणीं लावावें. ह्याच सर्वांचा सारांश आहे. हा किती बोधप्रद आहे त्याचा प्रत्येकानें विचार करावा.

समर्थांचा बहुश्रुतपणा व सूक्ष्मावलोकन इतकें अपूर्व होते तरी, हल्लींप्रमाणें त्या कानीं भूगोलविषयक व सृष्टिविषयक यथातथ्य ज्ञान होण्याला कांहींच साधन नव्हतें. त्या वेळीं जी काय माहिती असे ती पौराणिक तऱ्हेची असे. उदाहरणार्थ, द. ४ स. १० मधील 'मुक्तिचतुष्टयांतील' कांहीं माहिती देतों:—

**तया आवरणोदकाच्या आधारें । धरा धरिली फणीवरें ॥**
**वरती छपन्न कोटी विस्तारें । वसुंधरा हे ॥ १ ॥**
**इयेवरी परिघ सप्तसागर । मध्यें मेरु महा थोर ॥**
**अष्टदिक्पाळ परिवार । अंतरें वेष्टित राहिले ॥ २ ॥**
**तो सुवर्णाचा महा मेरु । पृथ्वी तयाचा आधारु ॥**
**चौऱ्यांशीं सहस्र विस्तारु । रुंदी तयाची ॥ ३ ॥**
**तेथें जावया मार्ग नाहीं । मार्गीं पसरले महा अही ॥**
**शीत सुखें सुखावले तेही । पर्वतरूप भासती ॥ ४ ॥**
**कामधेनूचीं खिल्लारें । कल्पतरूंचीं वनें अपारें ॥**
**अमृताचीं सरोवरें । ठायीं ठायीं उचंबळती ॥ ५ ॥**
**तेथें उदंड चिंतामणी । हिरे परिसांच्या खाणी ॥**
**तेथें सुवर्णमय धरणी । लख लखायमान ॥ ६ ॥**

* ज्ञानेश्वरांनीं 'ज्ञानेश्वरीच्या' ९ व्या अध्यायांत स्वर्गलोकाचें वर्णन केलें आहे तेंही हुबेहुब असेंच आहे:—

आतांप्रमाणें त्यावेळीं पृथ्वीचे नकाशे व भूगोलाचीं पुस्तकें उपलब्ध नसल्यानें पुराणग्रंथांतील भूगोलसंबंधीं जी माहिती कळे तेवढीच माहिती लोकांस असे. पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर आहे. तिच्या भोंवतीं अवरणोदक आहे. मध्यंतरीं मेरुपर्वत आहे, त्याच्या भोंवतीं लोकालोक पर्वत आहेत, अष्ट दिक्पाळ आहेत, पलीकडे स्वर्ग आहे. तेथें कामधेनूचीं खिल्लारें, कल्पतरूंचीं वनें, अमृताचीं सरोवरें, चिंतामणीचे तट, गंधर्वांचें गायन इत्यादि पुराणांतील माहितीवरच लोकांस निर्वाह करून घ्यावा लागत असे. ज्ञानेश्वरमहाराज, समर्थ, तुकाराम इत्यादि सर्व संतमंडळीची सर्व माहिती अशाच प्रकारची होती. तरी समर्थांस सृष्टिशास्त्राची, पदार्थांच्या गुणधर्मांची व प्राणीशास्त्राचीही माहिती पुष्कळ असल्याचें दिसून येतें. पृथ्वीच्या पोटांतील झरे, म्हणजे आर्टिशियन वेल्स, किंवा त्याचे प्रवाह, उन्हाळीं, बाटलीपासून उत्पन्न होणारी वीज [ जिला त्यांनीं अग्नि असेंच म्हटलें आहे ], घर्षणापासून उत्पन्न होणारा अग्नि, म्याग्निफाइंग्लासमधून पडणारा अग्नि इत्यादि माहिती पुष्कळच अवगत होती. त्यापैकींही कांहीं मासला कळावा म्हणून कांहीं प्रकरणांतील मिश्र वेंचे एकत्तच दाखल करतों.

उष्णता:—

अग्नी सर्वांगीं व्यापक । उष्णें राहे कोणी एक ॥
उष्ण नसतां सकळ लोक । मरोनि जाती ॥ १ ॥
कुपीपासून अग्नी होतो । उंच दर्पणीं अग्नि निघतो ॥
काष्टमंथनीं चमकतो । चकमकेनें ॥ २ ॥
अग्नि सकळां ठायीं आहे । कठीण घसणीं प्रगट होयें ॥
आग्या सर्पं दग्ध होय । गिरिकंदरें ॥ ३ ॥

अग्नीचें स्वरूप कसें असतें तें:—

चारी शिंगें त्रिपदीं जात । दोन शिरें सप्त हात ॥
ऐसा बोलिला शास्त्रार्थ । प्रचीतीविण ॥ ५ ॥

---

जेथ महा सिद्धींचीं भांडारें । अमृतांचीं कोठारें ।
जिये गांवीं खिल्लारें । कामधेनूंची ॥ ३२१ ॥

'चत्वारि शृंगा त्रयोअस्य पादाद्वेशीर्षे सप्त हस्ता सो अस्या ।' हें ध्यान नित्य वैश्वदेवांतही येतेंच. तीच समज सर्वत्र असे.

पाणीः—

नद्या पर्वतीहून कोसळल्या । नाना सांकडीमध्यें रिचविल्या ॥
धबाबा खळाळा चालिल्या । असंभाव्य ॥ १ ॥
कुप वापी सरोवरें । उदंड तळीं थोरथोरें ॥
निर्मळें उचंबळीती नीरें । नाना देशीं ॥ २ ॥

अशा प्रकारें, पृथ्वी, पंचमहाभूतें, वायु, आकाश, जीवसृष्टि इत्यादि विषय शोधले तर असे शास्त्रीय चमत्कार समर्थांनीं ठिकठिकाणीं सांगितलेले आढळून येतील. ह्यावरून त्यांच्या माहितीची व सूक्ष्म निरूपण करण्याची कुशलता किती होती ह्याची सहजच कल्पना होते.

परंतु समर्थांच्या अनुग्रहापैकीं मुख्य भाग म्हणजे परमार्थाचा, अर्थात् वेदांत. त्यांतील मुख्य तत्त्वें म्हणजे ब्रह्म आणि माया. त्यासंबंधानें समर्थांचे उद्गार कसे आहेत, त्याचा एक एक नमुना दिला म्हणजे दासबोधाचें बहुतेक निरीक्षण संपलें.

## माया.

माया दिसे परीं नासे । वस्तु न दिसे परी न नासे ॥
माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर ॥ १ ॥
गगनीं गंधर्व नगरें । दिसताती नाना प्रकारें ॥
नाना रूपें नाना विकारें । तैसी माया ॥ २ ॥
दसऱ्याच्या सुवर्णाचे लाटे । लोक म्हणती परी तें खोटें ॥
परंतु सर्वत्र राहाटे । तैसी माया ॥ ३ ॥
मेल्याचा महोत्सव करणें । सतीचें वैभव वाढविणें ॥
मसणीं जाऊन रूदन करणें । तैसी माया ॥ ४ ॥
राखेसी म्हणती लक्ष्मी । दुसरी भारंदारी लक्ष्मी ॥
तिसरी नाममात्र लक्ष्मी ॥ तैसी माया ॥ ५ ॥

**मुळी बाळ विधवा नारी । तिये नाम जन्मसावित्री ॥**
**कुबेर हिंडे घरोघरीं । तैसी माया ॥ ६ ॥**
**दशावतारांतील कृष्णा । उपजे जीर्ण वस्त्राची तृष्णा ।**
**कीं नदी नाम पयोष्णा । तैसी माया ॥ ७ ॥**

ह्या संसारांतील समर्थांचे अमूल्य दृष्टांत पाहून ज्ञानेश्वर महाराजांची कोणाला बरें आठवण होणार नाहीं ? सोंगाड्याचे, बहुरूप्याचे दृष्टांत तर असोतच, परंतु पाण्यामध्यें बोटें धरलीं तर तीं सरळ न दिसतां वांकडीं तिकडीं दिसतात हें सुद्धां ज्याअर्थी ह्यांत नमूद केलें आहे त्याअर्थी सूर्यकिरणाचें वक्रीभवन व परावर्तन शास्त्राचीं तत्त्वें सुद्धां त्यांस अवगत होतीं. तसेंच कानाच्या पाळींपाशीं, बोटांच्या सांध्यामध्यें सूर्याचे किरण पडले तर विस्तवाच्या निखाऱ्याप्रमाणें दिसतात. इत्यादि अवलोकन व त्याचें काव्यांत केलेलें ग्रंथन पाहिलें म्हणजे समर्थांचा बहुश्रुतपणा खरोखर कौतुकास्पदच वाटतो यांत तिळमात्र शंका नाहीं.

येथपर्यंत मायेचें भ्रामक स्वरूप कसें असतें तें कळलें. आतां परब्रह्माचें स्वरूप कसें सांगितलें आहे तें पहावयाचें. तें असें आहे:—

**धरूं जातां धरतां नये । टाकूं जातां टाकितां नये ॥**
**जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ॥ १ ॥**
**जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होता सन्मुख होतें ॥**
**सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्या ॥ २ ॥**
**बैसलें माणूस उठोनि गेलें । तेथें आकाशचि राहिलें ॥**
**आकाश चहूंकडे पाहिलें । तरी सन्मुखचि आहे ॥ ३ ॥**
**जिकडे प्राणी पळून जातें । तिकडे आकाशचि भोंवतें ॥**
**बळें आकाशाबाहेरि तें । कैसें जावें ॥ ४ ॥**

मागच्या उताऱ्यांत मायेचें स्वरूप दाखविलें व यामध्यें परब्रह्माचें स्वरूप दाखविलें, त्यावरून समर्थांची विषय विशद करण्याची शैली किती सुलभ व मार्मिकतेची असते ह्याचाही अनुभव येईल. येथपर्यंत दासबोधांतील विषयांचें सार शक्य तितकें निवडून काढलें व त्या प्रत्येकाचें महत्त्व

काय व किती तेंही दाखवून दिलें. आतां ह्याशिवाय दासबोधांत ‘ सुभाषितें ’ म्हणून निवडून काढल्यास तेंही लोकांस फार प्रिय होईल. त्याचाही थोडासा नमुना येथें देतोंः—

## दासबोधांतील ‘ सुभाषितांचा ’ नमुना.

# सुभाषितें.

नर तोचि नारायण । जरी प्रत्ययें करी श्रवण ॥
यत्नशील अंतःकरण । सर्व काल ॥ २८ ॥

द. २०–५

जेणें स्वयेंचि पोहावें । तेणें कासेस न लागावें ॥
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ २९ ॥

द. २०–५

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ॥
नाना बुद्धि अशक्ताला । म्हणूनि शिकवाव्या ॥ २२ ॥

द. १९–१०

एखादें मनुष्य तें शिळें । त्याचें करणेंचि बावळें ॥
नाना विकल्पांचें जाळें । करून टाकी ॥ १६ ॥

१९–८

विषयी लोक श्रवणा येती । ते बायकांकडेच पाहती
चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ॥ २६ ॥

१९–१०

धर्मःस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ॥
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ २० ॥

× × × ×

जेथें परिक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव ॥
गुणचि नाहीं गौरव । येईल कैंचें ॥ २१ ॥

१९–१०

ईश्वरें नाना भेद केले। भेदें सकल सृष्टि चाले॥
आंधळे परिक्षावंत मिळाले। तेथें परीक्षा कैंची॥ २०॥
द. १७-१०

नारायण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी॥
या कारणें तोषवावीं। कोणीतरी काया॥ २५॥
१५-९

मूर्खासि वाटे मी शहाणा। परी तो वेडा दैन्यवाणा॥
नाना चातुर्याच्या खुणा। चतुर जाणें॥ १३॥
१५—१

जाणीव म्हणजे अंतःकरण। अंतःकरण विष्णूचा अंश जाण॥
विष्णू करीतो प्रतिपाळण। येणें प्रकारें॥ २६॥
१०-२

उंच उंच वस्त्रें नीच ल्याला। आणि समर्थ उघडाच बैसला॥
परी तो आहे परीक्षीला। परीक्षावंतीं॥ ७॥
९-१०

खेळतां नेटके दशावतारीं। तेथें येती सुंदर नारी॥
नेत्र मोडिती कळा कुसरी। परी तें अवघें धटिंगण॥ ११॥
६-८

ब्राह्मण वचनें प्रमाण। होती शूद्राचे ब्राह्मण॥
५-१

आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजन रत्नें गोमटीं॥
ईश्वरीं अर्पुनियां लुटी। आनंदाची करावी॥ २७॥
३-१०

संसारदुःखें दुखवला। त्रिविध तापें पोळला॥
तोचि अधिकारी जाहला। परमार्थासी॥ ७॥
६-६

या कारणें ज्ञाता पहावा। त्याचा अनुग्रह घ्यावा॥
सारासार विचारें जीवा। मोक्ष प्राप्त॥
६-१

**ऐके ज्ञानाचें लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ॥**
**पहावें आपणास आपण। या नांव ज्ञान ॥**

६-१

**बहुत प्रकारचीं ज्ञानें। सांगों जातां असाधारणें।**

\+ + + +

**वेष असवा बावळा। अंगीं असव्या नानाकळा॥**

\+ + + +

अशा प्रकारचीं सुभाषित वचनें दासबोधांतून निवडून काढून त्याचें एखादें स्वतंत्र पुस्तक काढल्यास तेंही बायकांमुलांस, विद्यार्थ्यांस वगैरे फार उपयोगी व बोधप्रद होईल.

समर्थ कोणत्याही विषयाचा विचार करणें तो अगदीं सांगोपांग करीत असत. म्हणूनच त्यांनीं आपल्या 'दासबोधांत' कोणकोणता विषय आहे तें प्रथमतःच सांगितलें. तो विषय कोणकोणत्या ग्रंथांच्या आधारें रचला आहे त्या ग्रंथांची नांवनिशीसुद्धां त्यांनीं दिली आहे. इतकें केलें असूनही विनाकारण त्यांच्या ग्रंथास कोणी दूषण देईल, त्याला त्यांनीं आगाऊच सर्टिफिकीट देऊन ठेवलें आहे. तें असें:—

**समूळ ग्रंथ पाहिल्यावीण। उगेंच ठेवी जो दूषण॥**
**तो दुरात्मा दुरभिमान। मत्सर करी॥**

तेव्हां दासबोधास विनाकारण तो ग्रंथ पुरता चाळल्याशिवायच तो असा आहे, तो तसा आहे, त्यांत अमुकच नाहीं आणि तमुकच नाहीं, अशी बडबड करतील त्यांस उत्तर देण्याचें आम्हांस कारणच उरलें नाहीं, कारण समर्थांनीं तें कार्यही आपण स्वतःच करून आमचा भार हलका केला आहे.

याकरितां आतां ग्रंथाचा समारोप करण्याची समर्थांची शैली कशी आहे, अभिमानाची आहे, लीनतेची आहे कीं मार्मिकतेची आहे तीही स्पष्टपणें कळावी म्हणून दासबोधांतील समाप्तीच्या तेवढ्या चार ओव्या देतों.

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ॥
* समर्थ कृपेचीच वचनें । तो हा दासबोध ॥ १ ॥

× × × × × × × ×

ग्रंथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काय प्रयोजन ॥
येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पहावा ॥ २ ॥

देह तव पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथींचा ॥
आणि कवित्त्व प्रकार मनुष्याचा । कशावरूनी ॥

ह्याच्या खालची ओवी किती हृदयंगम आहे ती पहाः—

सकल करणें जगदीशाचें । आणि कवित्व तेवढें मनुष्याचें॥
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ॥ ४ ॥
ऐशीं विचाराचीं कामें । उगाच भ्रमों नये भ्रमें ॥
जगदीश्वरें अनुक्रमें । सकल केलें ॥ ५ ॥

'सर्व कांहीं कर्ता करवितां परमेश्वर आहे असें म्हणावयाचें आणि 'कवित्व तेवढें मात्र मनुष्याचें' असें समजावयाचें अशा खोटसाळ बोलणाराचें काय घ्यावयाचें ? म्हणोत बिचारे ! ह्या साऱ्या विचाराच्या गोष्टी आहेत. विनाकारण भ्रमांत पडूं नये. प्रत्येक गोष्ट परमेश्वरच करीत असतो, हें लक्षांत ठेवावें.'

हा उपसंहार किती गंभीरपणाचा व थोरपणाचा आहे बरें ? 'अप्रमाण बोलण्याचें' आणि 'काय घ्यावें' ह्या दोन शद्बांच्या ठेवणीबद्दल समर्थांची तारीफ करावी तितकी थोडीच आहे ! ह्यांत कोणाला दुःशद्बानें दुखविलें नाहीं, कठोर शद्ब वापरला नाहीं, आणि करावयाची तितकी शोभा तर केली आहे. ही अपूर्व हातोटी एक समर्थांनाच साध्य आहे; इतरांना साधावयाची नाहीं.

येथपर्यंत 'दासबोधांतील' विषय कोणता, त्याचे प्रकार, त्याचा अनुक्रम, त्यांत ऐहिक व पारलौकिक भाग किती, त्यांत विशिष्ट गुण

---

* येथें 'समर्थ' म्हणजे श्रीरघुपति असा अर्थ आहे. कारण, श्रीलाच स्वामी स्वतः 'समर्थ' म्हणत असत.


काय, राजकारणाचा संबंध कितपत येतो, वर्णनाची शैली कशी, जन्माचें सार्थक कसें करावें, देहामध्यें चांगलें वाईट काय, इत्यादि निरनिराळ्या भागांतील या पुस्तकांत वेंचे देऊन त्याचा यथामत्या थोडा थोडा उहापोह केला आहे. ज्यांस समग्र दासबोध लक्षपूर्वक वाचावयास सवड नसेल किंवा ज्यांनीं तो समग्र पाहिला नसेल, त्यांस हें टांचण बऱ्याच अंशानें उपयोगीं पडेल अशी आशा आहे.

यथाशक्त्या यथामत्या जेवढें झालें तेवढे कार्य केलें आहे. येवढ्यावरून ‘दासबोध अव्यवस्थित’ नसून तो अत्यंत व्यवस्थित व संगतवार आहे, इतकेंच नव्हे तर इतका सुसंगत ग्रंथ इतर महाराष्ट्र साधुसंतांत सुद्धां क्वचितच आढळेल, आणि ‘संस्कृत व मराठी भाषेची घटना’ करणारे रा. रामभाऊ जोशी ह्यांच्या मनाचा ग्रह पालटेल व दासबोधांत काय आहे तें रहस्य त्यांस नीट कळेल व तो ग्रंथ अत्यंत व्यवस्थित आहे अशी त्यांची समजूत होऊन ‘दासबोध’ हा ग्रंथ ‘अत्यंत अव्यवस्थित’ आहे ‘व त्यांत काय आहे तेंच समजणें कठीण आहे’ अशीं जीं गैरसमजुतीचीं दोन विधानें त्यांनीं केलीं आहेत तीं ते निरभिमानानें परत घेतील अशी दृढतर आशा आहे. आणि इतक्याही उपर दुर्दैवानें त्यांच्या हृत्पटालावर कांहींच संस्कार न घडेल तरः—

**न ज्या लक्षणें ऐकुनी तर्क चाले।**
**तयाच्या पुढें सर्वही रद्द झालें॥**

ह्याच आमच्या वाक्याची आम्हीं पुनरावृत्ति करून व त्यांस कोपरापासून नमस्कार करून पुढील भागापासून समर्थांच्या इतर ग्रंथांच्या अवलोकनाकडे वळतों.

[ दासबोधाच्या एकंदर ओव्या ७७५० आहेत. ]



# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# रामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## उत्तरार्ध–भाग ३ रा.

### 'जुना दासबोध' व 'आत्माराम.'

मागील भागांत समर्थांच्या दासबोधाच्यासंबंधानें शक्य तेवढें विवेचन केलें. आतां ह्या भागांत वास्तविक म्हटलें तर त्यांच्या दुसऱ्या कोणत्या तरी ग्रंथाचें विवेचन सुरू करावयास पाहिजे होतें. परंतु समर्थांच्या समग्र ग्रंथांत ' जुना दासबोध ' अथवा 'एकवीस समासी' म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. तेव्हां त्याच्या संबंधानें विवेचन आधीं करणें अवश्य आहे. परंतु 'जुना दासबोध' हें आहे तरी काय? असा सकृद्दर्शनींच प्रश्न उद्भवतो, आणि 'जुना' ह्या शब्दावरून दुसरा 'नवा'ही एक दासबोध असावा असा सहज तर्क होतो. तेव्हां मागच्या भागांत ज्या दासबोधाचें आम्हीं विवेचन केलें तो दासबोध नवा असला पाहिजे हें उघड दिसतें. आणि तो नवा असेल तर हा 'जुना' म्हणजे त्याच्या आधींचा असला पाहिजे हेंही उघडच झालें. पण असा एखादा पूर्वींचा दासबोध असल्याबद्दल

त्या दासबोधांत मुळींच उल्लेख नाहीं. बरें मागाहून केला असेल असें मानलें तर तेंही शक्य नाहीं. कारण मूळच्या दासबोधाचा शेवटचा म्हणजे विसावा दशक संपला तो समर्थांची व्याधि अत्यवस्थ स्थितींत असतां कल्याणस्वामी डोमगांवाहून परळीस भेटावयास आले होते त्यावेळीं संपला, असें बखरीमध्यें स्पष्ट लिहिलें आहे. त्यापुढें नवीन ग्रंथ करण्याची समर्थांमध्यें मुळींच ताकद राहिलेली नव्हती. तेव्हां हा दासबोध मागाहून लिहिला जाण्याचा तर मुळींच संभव नाहीं. मग हा 'जुना दासबोध' कोणाचा, कोणी केला व कधीं केला ? ह्या संशयामध्यें मन गढून जातें.

परंतु ह्या संशयाचा निरास व्हावयाला मुळींच उशीर लागत नाहीं. कारण, हा जुना दासबोध एकदां वरवर चाळला तरी पुरे. वाचणाराची तेव्हांच खात्री होते कीं, हा समर्थ रामदासस्वामींचा खास नसावा. ह्याचीं कारणें:—

१ प्रत्येक समासाच्या शेवटीं नांव आहे. असें नांव समर्थांनीं आपल्या दासबोधांत कोठेंच घातलेलें नाहीं. फारतर काय, पण साऱ्या ग्रंथाच्या अखेरीला सुद्धां त्यांनीं आपलें नांव घातलेलें नाहीं.

२ नांव आहे तें 'रामदास' असें नसून 'रामीरामदास' असें आहे; एक दोन समासांतच रामदास असें आहे. तेव्हां तेवढ्यावरूनच तो ग्रंथ समर्थांचा असें म्हणतां येत नाहीं.

३ कित्येक समास तर अक्षरशः अथपासून तों इतिपर्यंत पूर्वीच्या दासबोधाची नक्कल उतरलेली आहे. ह्यावरून त्याची नक्कल ह्यांनीं तरी केली असावी, किंवा ह्याची नक्कल त्यांनीं तरी केली असावी; दुसरा मार्गच नाहीं.

४ रचना व भाषा बहुतेक समर्थांसारखीच आहे, म्हटलें तरी चालेल. कित्येक ठिकाणीं तर समर्थांच्या दासबोधाहूनही कांकणभर सरसच वाटतो.

ह्यावरून हा 'जुना दासबोध' श्रीसमर्थ रामदास ह्यांनीं केलेला नसून तो त्यांचे वडील बंधु श्रेष्ठ ह्यांनीं केलेला बहुतेक स्पष्टच दिसतो. तेव्हां त्याचा प्रस्तुत ठिकाणीं मुळींच विचार करण्याचें कारण नाहीं. तथापि त्याचाही थोडासा विचार करण्याच योजिलें आहे. ह्याचें कारण एक तर तो 'श्री-

रामदासस्वामींच्या समग्र ग्रंथांतून' प्रसिद्ध झालेला आहे. यावरून तोही ग्रंथ समर्थांचाच असावा असा कित्येकांचा समज आहे असें दिसतें. दुसरें ह्या साऱ्या ग्रंथांतील समासांच्या शेवटीं 'रामीरामदास' असेंच जरी नांव आढळतें, तरी एक दोन समासांच्या शेवटीं नुसतें 'रामदास' असेंही नांव आढळतें. यास्तव तें गैरसमजुतींचें असलें तरी यत्किंचित तरी संशयाला जागा ही राहतेच. तिसरें कारण असें कीं, त्याची रचना कित्येक ठिकाणीं इतकी मनमोहक आहे कीं, तिच्यावरून समर्थांची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. किंबहुना कांकणभर वरचढपणाच असल्याचा भास होतो. ह्यास्तव ह्याही ग्रंथाला अगदींच बाजूस सारून पुढील मार्गास लागणें प्रशस्त वाटत नाहीं.

ह्या जुन्या दासबोधाचे समास एकवीस असल्यामुळें त्यास 'एकवीस समासी' असें ही एक नांव आहे. ह्यांत एकंदर १३४० ओंव्या आहेत. प्रत्येक समासाच्या शेवटीं 'रामींरामदास' असेंच नांव दाखल केलेलें आहे. त्याचा नमुनाः—

१ पहिल्या समासाच्या शेवटीं:—

**"इतिश्री रामदास राम। पुढें वर्णील पूर्णकाम ॥ १ ॥**

असा उल्लेख आहे. ह्यांत 'रामीरामदास' नसून 'रामदासराम' असें आहे.

२ दुसऱ्या समासाच्या शेवटीं:—

**"इतिश्री रामीरामदास म्हणे ॥ १ ॥:**

असें स्पष्टच आहे. तेव्हां हें नांव श्रेष्ठांचें यांत शंका नाहीं. तिसऱ्या समासांत 'श्रीरामीरामदास' असेंच आहे.

४, ५, ६, ७ समासांत 'रामीरामदास' असेंच आहे. ८ व्या समासांत मुळींच नांव नाहीं?

९, १०, ११, १२, १३, १४ पर्यंत 'रामीरामदास' असेंच आहे.

१५ व्याच्या शेवटीं 'श्रीरामदासरामीं' असें आहे.

१६ व्यांत 'रामदास रामाचा.'

१७ व्यांत 'रामींरामदास.'

१८ व्यांत 'श्रीदासपणाची कारणें' येवढेंच आहे. यांत रामी रामदासही नाहीं; फक्त 'दासपण' येवढा मात्र नामाचा निर्देश आहे.

१९ व्याच्या शेवटीं ' रामीरामदास ' असें स्पष्ट नांव आहे.

२० व्या समासाच्या शेवटीं मात्र ' इतिश्री रामदास म्हणे ' असा ' रामदास ' ह्या एका नांवाचाच उल्लेख आहे. तेवढ्यावरून हा सारा ग्रंथ समर्थ रामदासांचा असें मुळींच म्हणतां येत नाहीं.

२१ व्या समासाच्या शेवटीं म्हणजे ग्रंथ समाप्तीला ' रामीरामदास ' असेंच आहे.

ह्यावरून अगदीं उघड उघड दिसतें कीं हा ' जुना दासबोध ' श्रेष्ठांचा विरचित असून तो समर्थांच्या नांवाखालीं गैरसमजुतीनें मोडत असावा. ह्यांत समर्थ रामदासस्वामींचा बिलकूल संबंध दिसत नाहीं.

हें जरी खरें आहे, व हा जुना दासबोध श्रेष्ठांनीं रचला आहे असें मानलें—व तसेंच तें आहे—तरी त्यावर एक जबरदस्त शंका राहते. ती ही कीं, ह्यांतील कितीएक समास तर श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या दासबोधांतील समासांची अक्षरशः नक्कल—अगदीं कापी टु कापी—आहे, हें कसें झालें ? श्रेष्ठांची नक्कल समर्थ करतील, किंवा समर्थांची नक्कल श्रेष्ठ करतील ह्या दोन्हीही गोष्टी संभवनीय वाटत नाहींत. तथापि कित्येक समास अगदीं अक्षरशः उतरलेले आहेत यांत तिळमात्र शंका नाहीं. उदाहरणार्थः—

जुन्या दासबोधांतील समास ४ ' **सद्‌गुरूचीं लक्षणें** '

आणि समर्थ रामदास स्वामींचा दासबोध दशक ५ समास २ 'सद्गुरुलक्षण ' ह्या दोहोंचाही आरंभः—

**जे करामती दाखविती । तेहि गुरु म्हणी जैती ॥**

या पहिल्या ओवीपासून दहा ओव्यांची नक्कल उतरली आहे, व पुढें कांहीं मधून मधून ओव्या सोडून देऊन समर्थ दासबोधच्या १०४ ओव्यांपैकीं फक्त ७३ ओव्या कायम ठेवून त्यांतील शेवटची ओवी जीः—

" **नाना सद्विद्येचे गुण । याहीं वरी कृपाळूपण** "

येथपर्यंत सर्व ओव्यांचा उतारा घेऊन अखेरच्या नांवाची एक ओवी मात्र अधिक घालून त्यांत ' रामीरामदास ' असें नांव गोवलें आहे. अर्थात् हा सर्व समास समर्थांच्या मूळ दासबोधावरून घेतला आहे हें सांगणें नकोच.

बहुतेक समासांचा नमुना हाच.

जुना दासबोध समास ५ 'सच्छिष्य लक्षण',

समर्थांचा दासबोध दशक ५ समास ३ 'सच्छिष्य लक्षण'

जुना दासबोध समास ६ 'वैराग्य लक्षण'.

समर्थांचा दासबोध दशक ३ समास १० 'वैराग्य लक्षण'

जुना दासबोध समास ८ 'आत्मनिवेदन'.

समर्थांचा दासबोध दशक १२ समास ५ 'आत्मनिवेदन'.

इतके समास निवळ कॉपी टु कॉपी आहेत. तेव्हां अशा पुनरुक्त ग्रंथाचें विवेचन करण्यांत अर्थ कोणता? आणि तें करावयाचें तरी कसें काय? तो एका बाजूस सारून पुढील समर्थांच्या इतर ग्रंथांचें चालन करणें हेंच उक्त. तथापि ह्यांतही कितीएक विषय अगदीं नवे असून ते अत्यंत वाचनीय आहेत म्हणून अगदींच तसें करणें उचित दिसत नाहीं.

आतां गुंतागुंतीचा प्रश्न येवढाच उत्पन्न होतो कीं, जुना दासबोध व समर्थांचा दासबोध हे परस्परांचे उतारे आहेत हे तर खास. पण ते केले कोणी? श्रेष्ठांनीं समर्थांचा भाग घेतला कीं समर्थांनीं श्रेष्ठांचा भाग घेतला? परंतु समर्थ श्रेष्ठांच्या कृतींतील अनुकरण करतील असें म्हणवत नाहीं. त्यापेक्षां श्रेष्ठांनीच समर्थांच्या दासबोधांतील उतारा घेतला असाव ही गोष्ट अधिक संभवनीय दिसते, आणि तसें होणें स्वाभाविकही आहे. समर्थांनीं श्रेष्ठांचा उतारा घेतला म्हटलें तर अधिक विसंगतपणा येतो. कारण तसें असेल तर जुना दासबोध आधीं लिहिला गेला असला पाहिजे. व तो 'जुना दासबोध' ह्या नांवाप्रमाणें आधींचाच असेल तर समर्थांनीं आपल्या ग्रंथाला 'दासबोध' हें जें नांव दिलें तें सुद्धां उसनेंच दिलें असें होतें. असे समर्थांसारखे हिमतीचे स्वतंत्र बाण्याचे पुरुष कधींहि करणें शक्य नाहीं. श्रेष्ठांचा स्वतंत्रतेचा तितकासा बाणा नव्हता. बाकी श्रेष्ठ व समर्थ हे दोघेही बंधु ज्ञानानें, भक्तीनें, आचरणानें, बहुश्रुतपणानें व कवित्त्वशक्तीनें अगदीं समतोल—तोडीस तोड होते यांत तिळमात्र शंका नाहीं. तथापि समर्थांची कला कित्येक कारणांनीं थोडीशी अधिक होती हांही गोष्ट विसरतां कामा नये. असो; तर हा 'जुना दासबोध' ग्रंथ आमच्या

मतेंच नव्हे तर अनेक दृष्टींनीं व प्रमाणांनीं श्रेष्ठांचा आहे हेंच सिद्ध होतें. तरी त्यांतील कांहीं प्रकरणें अगदीं स्वतंत्र असून त्यांत ईश्वरी प्रसाद व कवित्वचातुर्य अगदीं ओतप्रोत भरलेलें आहे. ह्यास्तव त्यापैकीं कांहीं भागाचे थोडथोडे उतारे देऊन ह्या ग्रंथाचें विवेचन पुरे करतों.*

जुन्या दासबोधांत बरेच समास पुनरुक्त आहेत हें पूर्वींच सांगितलेलें आहे. तथापि कांहीं समास त्यांत स्वतंत्र विषयांचें असून त्यांतील वर्णनही मोठ्या बहारीचें आहे. 'रघुनाथध्यान' 'श्रोतृलक्षण' 'सगुणध्यान' 'विविधनिरूपण' प्रारब्धप्रयत्न' 'संतस्तवन' 'मीपणनिरसनन' 'पूर्ण समाधान' 'एकंकार निरसन' इत्यादि प्रकरणें ह्यांत अगदीं स्वतंत्र असून त्यांपैकीं कित्येकांतील विचार व वर्णन समर्थांच्या विचाराशीं व कवित्वाशीं अगदीं स्पर्धा करणारीं अशीं वठलीं आहेत. म्हणून जातां जातां त्याच्या प्रसादाची वानगीही पुढें ठेवल्यावांचून राहवत नाहीं.

# १ रघुनाथाचें ध्यान.

ह्या समासांत नामनिर्देशाप्रमाणें श्रीरघुपतीच्या सगुण स्वरूपाचें वर्णन मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. पण ह्यांत ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीमध्यें ज्याप्रमाणें ठिकठिकाणीं आपल्याकडे लीनता व अज्ञानपणा घेऊन शालीनता दर्शविली आहे, त्याप्रमाणें या समासांतही वक्त्यानें म्हणजे रामीरामदासानें आपल्याकडे नम्रता घेऊन आपली शालीनता प्रगट केली आहे. त्यांतील गौल्यता पाहून रसिकांच्या मनावर संस्कार झाल्यावांचून राहत नाहीं. पहाः—

श्रोत्यांची थोरवी व स्वतःची लीनताः—

* समर्थांचें दासबोध रचनेचे काम पंचवीस तीस वर्षें चाललेंच होते. आणि श्रेष्ठांनीं आपला दासबोध लहान असल्यामुळें लौकरच पुरा केला असावा. कारण श्रेष्ठांनीं समर्थांच्या आधींच आपला अवतार संपविला होता. ह्यामुळें श्रेष्ठांनीं समर्थांचा दासबोध आधीं पाहून त्याची बरीचशी नक्कल केलेली होती. तरी श्रेष्ठांचा दासबोध आधीं समाप्त झाला असल्यानें त्याला 'जुनादासबोध' असें नांव पडलें असावें. हें जास्त संभवनीय दिसतें.

**जे विवेक रत्नाचे सागर। जे साहित्य सिंधूचे जलधर॥**
**जे वृत्ति किरणांचे दिनकर। सर्वांग श्रोते ॥ १ ॥**

**जे तार्किक विषयीं वरिष्ठ। जयांचे सर्वही उच्छिष्ट ॥**
**तयांपुढें मी कनिष्ठ। काय बोलों ॥ २ ॥**

**जें कांहीं म्यां आठवावें। तें जयांस पूर्वीच ठावें ॥**
**तेथें ज्ञातेपण बोलावें। काय हो आगळें ॥ ३ ॥**

**जैसा विधीप्रती मुका। करी बोलावयाची आशंका ॥**
**तैशी मज आठवली रंका। बुद्धि वक्तृत्वाची ॥ ४ ॥**

बाणभट्टाच्या पुत्रानें पित्याच्या ' कादंबरीचा ' सांधा जसा बेमालूम जोडला, तसाच हा समर्थांच्या व्युत्पत्तीचा व विचाराचा सांधा श्रेष्ठांनींही अगदीं बेमालूम जोडला ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. आतां संस्कृत भाषेंतील विचार प्राकृत भाषेंत आणले म्हणून कांहीं त्यांतील रहस्य कमी होत नाहीं. हें दृष्टांतानें किती खुलविलें आहे. तें पहाः—

**भोजनकर्ते हो ऐका। हे या प्राकृताची टीका ॥**
**अन्नाची चाड तरी नका। शब्दीं गुंतों ॥ १ ॥**

**आज्य म्हणतां प्राप्त झालें। तूप म्हणता तेंचि आलें ॥**
**तैसें अर्थ इच्छितां लाधलें। श्रोतयां ब्रह्म ॥ २ ॥**

**अहो प्राकृत बोली। परी संस्कृताची एकता आली ॥**
**जाणोनि कथा श्रवण केली। पाहिजे श्रोतीं ॥ ३ ॥ ***

हा विषय दृष्टांतानें विशद करण्याची हातोटी किती स्पृहणीय आहे !

---

* मोरोपंत कवींनीही आपल्या प्राकृत रामायणाच्या प्रारंभी असेच म्हटलें आहे:—

रामाचे रचिलें चरित्र मुनिने वाल्मीकिने संस्कृतीं ।
नाहीं हानि कदापि लेश कविला तें वर्णितां प्राकृतीं ॥
मुक्तांचा पहिलाच हार वहिला जो रेशमांच्या गुणें ।
तो कार्पास गुणे करूनि करितां काय प्रभेला उणे ॥ १ ॥

आतां 'वक्तृश्रोतृलक्षण'—म्हणजे श्रोत्यावक्त्यांचे गुणावगुण. वक्ता कसा असावा ?

जैसें बोलणें तैसीच क्रिया । ऐसा वक्ता जोडालिया ॥
तत्काळ बाणे श्रोतयां । अंगीं निरूपण ॥ १ ॥
वक्ता तोचि जो शांत । आणि असे पूर्ण प्राप्त ॥
सर्वकाळ क्रोधें संतप्त । तो वक्ता नको ॥ २ ॥
वक्ता पाहिजे उदास । जयाचें बोलणें नैराश्य ॥
जयाचे हृदयीं वसे आस । तो वक्ता नको ॥ ३ ॥

रागीट वक्ताः—

सर्वकाळ क्रोधें संतप्त । आशंका घेतां करी घात ॥
वक्तृत्वाचा अर्थ जात । भलतीकडे ॥ ४ ॥
अयुक्तचि प्रतिपाद्य करी । उच्छेद होतांचि गुरगुरी ॥
बोलिला शब्द यावरी । बोलेचि अप्रमाण ॥ ५ ॥
बोलतां येती वळा । हातपाय कांपती चळचळा ॥
क्रोधें उफावती वेळोवेळा । शीघ्र कोणी ॥ ६ ॥
बहुश्रवण घडोनि धाला । ताडेतोडे शिकोनि आला ॥
तया वक्तृत्वें श्रोतयाला । स्वहित न घडे ॥ ७ ॥
वक्ता पाहिजे अनुभवाचा । ज्ञाता नसावा पुस्तकाचा ॥
पुस्तकज्ञानें श्रोतयांचा । भ्रम तुटेना सर्वथा ॥ ८ ॥
वक्ता भीड भारू जोडे । तरी श्रोतयासि अंधार पडे ॥
म्हणोनि वक्तयाकडे । भीड तेही नसावी ॥ ९ ॥

सभेंतील बचबचपुरीः—

मिथ्या वादी अमंगळ । हरिकीर्तनीं उठे कपाळ ॥
ऐसा जो खळ चांडाळ । त्यासि भगवंत कैचा ॥ १ ॥
वक्ता बहु भाष्य वाचाळ । तैसाचि श्रोताही टोंडाळ ॥
दोहीं मिळून खळखळ । उदंड करिती ॥ २ ॥
वक्तृत्व श्रोता ऐकेना । बोलों बैसला आटोपेना ॥
युक्तिजाळ पसरूनियां । जनां जाणीव दावी ॥ ३ ॥

उभयतां एकचि गलबला । निरूपणीं हाट भरला ॥
एक शद्बांचा दुमाला । बैसला घेउनी ॥ ४ ॥
एकापुढें एक बोले । अवघेंचि वक्ते झाले ॥
जैसे ते जंबूक मिळाले । कोल्हाळ करिती ॥ ५ ॥

वक्त्याचें छिद्र काढून वचेरी करण्याकरतांच कांहीं कुत्सित लोक टपलेले असतात. अशा लोकांना किती विलक्षण दृष्टांत योजला आहे. पहाः—

अंतरीं काळकूट भरलें । गुल्म अभिमानाचें वाढलें ॥
तें निरूपण वितुळलें । परी वितळोंचि नेदी ॥ १ ॥
निरूपणीं सावकाश । पाहावे वक्त्याचे गुणदोष ॥
जैसे मिळाले वायस । विष्ठा धुंडिती ॥ २ ॥

सभेंत झोंप घेणारे शिष्ट ! झोपाळ माणसांचा व त्यांच्या अव्यवस्थितपणानें आंग टाकून निजण्याचा विनोद समर्थांनीं आपल्या दासबोधांत केलेला पूर्वीं दाखविलाच आहे. ह्यांतही जवळजवळ त्याचाच अनुवाद आहे. पण यांत निद्रा ही किती विघ्न करणारी आहे, ह्याचें स्वरूप फार मनोरम रेखटलेलें आहे हें यांत विशेष होय.

कडकडा जांभया देती । घाबरे होवोनि पाहती ॥
डकडका डुकल्या देती । क्षणक्षणा दुश्चित ॥ ३ ॥
नेत्रीं झांपडी पडली । विमल मुखें विकसलीं ॥
नावरे सर्वांगीं भरली । निद्राभरें बळें ॥ ४ ॥
निःशेष देहभाव गळे । अवचितीं नेत्र उडविले ॥
एक ते कलथोनि पडले । एकें फोडिली ब्रह्मवीणा ॥१॥*

निद्रेची निर्भत्सनाः—

निद्रा उदास नागवणी । निद्रा आयुष्य बुडवणी ॥
निद्रा अगत्य निरूपणीं । घाला घाली ॥ २ ॥

---

* ह्या ओव्या समर्थांच्या दासबोधाहून निराळ्या आहेत तरी त्यांतील मुख्याचे शब्द झाडून सारे त्यांतलेच आहेत ही गोष्ट सहज लक्षांत येते.

निद्रा आळसाची पेटी । निद्रा भ्रमाची कोटी ॥
निद्रा हे परम वोखटी ॥ साधका बाधी ॥ ३ ॥

निद्रा प्रकाशासि झापडी। निद्रा विवेकासि विघडी ॥
निद्रा नागवण उघडी । साधकासि होय ॥ ४ ॥

सांडून निरूपण गोड । पुरवीती निद्रेचें कोड ॥
ते साधक जाणावे झोंड । संत निजधन नेणती ॥ ५ ॥

हा एक त्यापैकीं चुटका आहे. बाकीचें वर्णन विस्तृत असून त्यांतील दृष्टांत व शब्दलालित्य इतके परिणामकारक आहे कीं, प्रत्येकाच्या मनावर त्याचा थोडातरी संस्कार झाल्यावांचून रहावयाचाच नाहीं.

यापुढें ' विविध शिकवण ' म्हणून एक समास आहे. त्यांत कोण-तेंही काव्य वाचतांना किंवा श्रवण करतांना त्यांतील यमकाकडे, अनु-प्रासाकडे, छंदाकडे किंवा अलंकाराकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. त्यांतील अर्थाकडेच आपलें अनुसंधान असावें; अशा प्रतिपादनाच्या कांहीं ओव्या अत्यंत हृदयंगम आहेत.

पदप्रास आणि व्युत्पत्ति । क्षराक्षर ज्ञातीची संपत्ति ॥
हृदयीं वृत्ती फाकती । त्या फाकों नेदाव्या ॥ १ ॥

व्युत्पत्ति असली तरी आपणासि काय । आपण धरावी अर्थाची सोय ॥
अर्थ टाकूनि येर न्याय । करूं नये सर्वथा ॥ २ ॥

लाधल्या त्वचाचि खावी । किंवा वस्तूचि टाकून द्यावी ॥
कीं तयाची शोधावी । अंतर कळा ॥ ३ ॥

जरी तूं भिडेनें दाटसी । आणि तोंडीं प्रचीती तों म्हणसी ॥
तरी उभय अर्थीं नाडसी । मग माझेंही कांहीं चालेना ॥ ४ ॥

इतुका आग्रह यासि कारणें । जें तूं वैराग्याचें उणें ॥
आणि तुज मुक्त करणें । हे प्रतिज्ञा आपुली ॥ ५ ॥

ह्यांतील प्रतिपादनाची धाटी समर्थांसारखीच किंबहुना थोडीशी अधिकच रसाळ वाटत नाहीं काय ?

'प्रारब्ध यत्न' म्हणून दुसरा एक समास आहे. ह्या समासांतील नांवावरून सुद्धां ह्या ग्रंथाचा कर्ता समर्थांहून भिन्न असावा अशी सहजीं कल्पना होते. ह्या समासांत वैद्याचा व औषधाचा दृष्टांत देऊन कुपथ्यानें मनुष्याच्या प्रकृतीचें कितां मातेरें होतें ह्याचें विवरण फार मनोरंजक केलें आहे. त्यापैकीं कांहीं वेंचेः—

वैद्यें औषध दीधलें। आणि पथ्यही सांगितलें॥
पथ्य सोडोनि कुपथ्य केलें। तरी काय बोल वैद्यासी॥ १॥

कुलाकुड वायां गेले। झक मारायां पथ्य मोडिलें॥
तें औषध मारक झालें। कुपथ्य करितां॥ २॥

× × × × ×

वैद्य जवळून गेला। आणि जीव कुपथ्या धाविन्नला॥
आवरी असतांही झाला। आधार एक॥ ३॥

माय धांवूनि कळवळा करी। म्हणे जीव धाविन्नला जयावरी॥
तें खादलें तरी। दुरी होईल व्यथा॥ ४॥

विषयीं म्हणती बरें बरें। तेव्हांचि नांडिलें आधारें॥
वैद्य सांगूनि गेले तें खरें। न मानितीच कोणी॥ ५॥

तेथें भवव्यथा जडावली। उफराटी सुजी धाविन्नली॥
सकळ म्हणती कां केली। क्रिया ऐसी॥ ६॥

आंग आवघें सुजोन फुटलें। दुर्गंधीनें गळों लागलें॥
तें समर्थीं जाणवलें। तो आधार खोटा॥ ७॥

नाना विकल्पाचे किडे। चुळचुळ करिती मागें पुढें॥
मग भोंवतीं पाहे पुढें। केवीलवाणें॥ ८॥

हात टणटण फुटती। सर्वांगीं तिडका उठती॥
स्वजन देखोनि पळती। दुर्गंधी घेववेना॥ ९॥

प्राणी कष्टला थोर। हा कुपथ्याचा विचार॥
काळजी बैसलें बाहेर। धोके आदळती॥ १०॥

ह्या जुन्या दासबोधांत उपमा व दृष्टांत यथायोग्य देण्याचाच गुण विशेष दृष्टीस पडतो. घरास अग्नि लागलेल्या दृष्टांताचा मासला पहा:—

कां गृहासि आग लागली । देखोनि का बोंब केली ॥
लोकांची मांदी मेळविली । आगी विझाया कारणें ॥ १ ॥
तैसी परमार्थीं बोंब मारावी । कांहीं काढाकाढी करावी ॥
हळूहळू सोडवावी । मिठी प्रपंचाची ॥ २ ॥
मुक्ताफळ आणि दिव्यांबर । नाना वस्तूंचें भांडार ॥
भस्म करोनि वैश्वानर । विझोनि जाई जेवीं ॥ ३ ॥
जरी हा प्रपंच शाश्वत जाणतो । तरी आम्ही यासीच धरतों ॥
हा अशाश्वत म्हणोनि रडतों । तुम्हाभोंवतीं ॥ ४ ॥
तुम्ही कैसें रे परमार्थी । परघात आणि अपस्वार्थी ॥
डोळे झांकूनि दोहीं अर्थी । नागवलेत कीरे ॥ ५ ॥

खालचा दृष्टांतही असाच रसभरीत आहे:—

अहंकार गज डुलती । जंववरी संतसिंहाचे चपेटे न येती ॥
थापा मारून विदारिती । गंडस्थळें तयांची ॥ १ ॥
देहमात्र तेतुका निंदिला । तेथ स्थूळ लोभी कैसा वांचला ॥
लंडीच्या युद्धासि गेला । तो मोडतां वेळ नाहीं ॥ २ ॥
विष्टा तितुकी दुर्गंध । नृपतीचें विष्ठे सुगंध ॥
ऐसें ऐकतां सुबद्ध । मानीत ना सर्वथा ॥ ३ ॥

‘ मीपण निरसनां ’ तील एक उपमा:—

का पाषाण पाथरें घडिला । देव आणि वरवंटा केला ॥
परी त्याच्या पाषाणपणाला । तोटा न ये कीं ॥ १ ॥
कां लेंकरें खेळ खेळतीं । मृत्तिकेच्या नाना व्यक्ती ॥
केल्या तरी अंतीं । मृत्तिकाचि आहे ॥ २ ॥
ऐसें बोलतां उदंड आहे । परि मातीपण सरसें पाहे ॥
उंच नीच केलिया न साहे । वियोग तयाचा मीपणाशीं ॥ ३ ॥

तैसें मीपण हें एकलें। अवघ्या विश्वाच्या घाट्यांस आलें ॥
परी घोटे तरी पालटलें। आहे मातें ॥ ४ ॥

आतां देवाशीं लडिवाळपणाच्या भाषणाचा मासला देऊन हें प्रकरण आटपतों.

तुम्ही स्वामी होवोनि बैसावें। आणि आम्हां सभोंवतें भोवावें
रागेजोनी राहतां न यावें। हें काय बरें ॥ १ ॥
तूं राज्य सांडोनिया जालिया उदास। तरी आम्ही तुझेचि दास ॥
तां काय बोलिजेल बापास। तैसें आम्हीही तुज करूं ॥ २ ॥
तुवां पाषाण तारिले। तरी आम्हीही जडजीव उद्धरिले ॥
तुवां देव मुक्त केले। बंधनापासुनी ॥ ३ ॥
तरी आम्हीही भाविकासी। सोडवोनिया मोक्षपदासी ॥
पावविले तयांसी। मागुता जन्म नाहीं ॥ ४ ॥
तुवां जरामरण केलें दुरी। तें मुळींच नाहीं आमुचे घरीं ॥
तूं राजा अकरा सहस्रवरी। तरी आम्हांस संख्या नाहीं ॥ ५ ॥
तुवां पुरी नेली वैकुंठा। आम्ही वैकुंठींच्या बारा वाटा ॥
करूनि या मांडिला चोहटा। तया वैकुंठींचा ॥ ६ ॥
ऐसें बोलती रामदास। निघडे सर्वस्वें उदास ॥
वैभव वाटे जयांस। कसपटाऐसें ॥ ७ ॥
ऐसें बोलणें ऐकिलें। रामें मंद हास्य केलें ॥
धांवोनिया ह्रदयीं धरिले। आपुलिया निजदासा ॥ ८ ॥

भक्त आणि भक्तवत्सल ह्यांचा हा प्रसंग खरोखरच हृदयाला द्रव आणणारा आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. पण ह्यांत आणखी एक शंका येण्यासारखें स्थळ आहे. तें कोणतें ? तर ह्यामध्यें 'ऐसें बोलती रामदास, असें म्हटलें आहे. 'रामीरामदास' असें कांहीं म्हटलेलें नाहीं. हें एक; आणि दुसरें हे रामदास कसे ? तर '**निघडे उदास। वैभव वाटे जयास' कसपटाऐसें ॥**' हीं विशेषणें जितकीं समर्थांना लागू पडतात तितकीं श्रेष्ठांना लागू पडत नाहींत. **कारण** ते बोलून चालून प्रापंचिक होते.

परंतु 'रामदास' हें समर्थांचें जरी विशिष्ट नांव होतें तरी श्रेष्ठ हेंही श्रीरामचंद्राचेच उपासक व कट्टे भक्त होते. तेव्हां 'रामदास' हें नांव श्रेष्ठांसही लागतेंच. शिवाय 'रामीरामदास' असें त्यांस म्हणतही असत. त्यांच्या ग्रंथाच्या शेवटींही तेंच नांव आहे. तेव्हां 'रामदास' येवढ्या विशेषणावरूनच तें श्रेष्ठांचें विशेषण नव्हे असें होत नाहीं.

आतां श्रेष्ठ हे संसारी होते, गृहस्थाश्रमी होते, तरी ते संसारांशीं नेहमीं अलिप्तच असत, हें त्यांच्या एकंदर चरित्रावरूनही लक्षांत येण्यासारखें आहे. येवढ्यावरून वरील शंकेचा निर्वाह होण्यासारखा आहे. असो; येथपर्यंत ह्या 'जुन्या दासबोधाचा' विचार झाला. आतां समर्थांचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ जो आत्माराम त्याचेंही थोडेसें विवरण करूं.

# आत्माराम.

दासबोधाच्या तुलनेनें पाहिलें तर 'आत्माराम' या ग्रंथाचें तितकेंसें महत्त्व नाहीं. ह्याचें कारण एक तर हा ग्रंथ दासबोधाच्या मानानें अगदींच लहान आहे. ह्यान्तें पांचच समास असून ओव्या तर अवघ्या १८२ च आहेत, आणि त्यांतस्याच एक एक दोन दोन ओव्या प्रत्येक समासाच्या मंगलाचरणाला व उपसंहाराला गेल्या आहेत. तरी दुसऱ्या दृष्टीनें त्याचेंही महत्त्व अधिक आहे. समर्थांच्या अंतसमयीं आपली सगुण मूर्ति पुन्हा दृष्टीस पडणार नाहीं, व आपलें अमृततुल्य उपदेशामृतही पुन्हा कानावर पडणार नाहीं म्हणून शिष्य मंडळी शोक करूं लागली असतां समर्थांनीं सांगितलें कीं, "तुम्ही दासबोध व आत्माराम वाचीत जा म्हणजे तोच माझा उपदेश होय." ह्यांत समर्थांनीं दासबोधाबरोबर 'आत्मारामा'चें नांव घेतलें आहे, त्याअर्थी तो ग्रंथही तसाच महत्त्वाचा असला पाहिजे. तेव्हां येवढें त्यांत काय महत्त्व आहे, तेंही पाहणें अवश्य आहे.

दासबोधामध्यें प्रपंच व परमार्थ किंवा ऐहिक किंवा पारलौकिक अशा दोन्हीही विषयांचा समावेश आहे, आणि आत्मारामामध्यें फक्त ब्रह्म, माया, शाश्वत, अशाश्वत, इत्यादि आत्मानात्मविचार—म्हणजे वेदांतच सारा भरलेला आहे. त्यांत ऐहिक विषयांचा किंवा व्यवहारज्ञानाचा लवलेशही सांगितलेला नाहीं. ह्यामुळें सामान्य मनुष्यांना—प्रापंचिकांना दासबोध जितका प्रिय व उपयोगी वाटेल तितका आत्माराम वाटणार नाहीं हें उघड आहे. कारण कीं त्यांत गहन वेदांताशिवाय दुसरा विषयच नाहीं. पण जो विरक्त आहे; खराखुरा मुमुक्षु आहे; निस्सीम भगवद्भक्त आहे; त्याला जितका 'आत्माराम' प्रिय होईल व उपयुक्त वाटेल, तितका दासबोध प्रियही होणार नाहीं व उपयोगीही वाटणार नाहीं. उघडच आहे. मूर्खांचीं लक्षणें, पढतमूर्खांचीं लक्षणें, राजकारण, संसारदुःख, असले विषय त्यांना काय होत ? त्यांना ते उपयोगाचेही नाहींत, आणि त्यांत गोडी वाटणेंही शक्य नाहीं. असले विषय प्रापंचिकांना गोड वाटतात, व त्यांचा त्यांना व्यवहारांतही उपयोग होतो. आत्मानात्म विचारामध्यें किंवा मायाब्रह्मामध्यें त्यांना तितकीशी गोडी वाटत नाहीं, व त्याचा त्यांना प्रत्यक्षही पण फारसा उपयोग नसतो. परंतु जे विरक्त असतात, खरे खरे मुमुक्षु असतात, त्यांना मात्र अध्यात्म-विषय म्हणजे केवळ अमृत वाटतें, जीव कीं प्राण वाटतो; इतकेंच नव्हे तर केवळ परब्रह्माशींच गांठ पडली असें त्यास होऊन जातें. तेव्हां अशा पुरुषास आत्माराम हाच ग्रंथ अत्यंत प्रिय वाटावा हें स्वाभावीकच आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरी हा ग्रंथ तयार केल्यानंतर आपले बंधु व गुरु निवृत्तिनाथ ह्यांस दाखविला. ज्ञानेश्वरमहाराजांना वाटत होतें कीं, आपली ही ज्ञानेश्वरी पाहून निवृत्तिनाथ हे फार प्रसन्न होतील. परंतु निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरी पाहून तितकेसे प्रसन्न झाले नाहींत. ते म्हणाले, हा ग्रंथ चांगला आहे, परंतु केवळ गीतेची टीका आहे; स्वतंत्र ग्रंथ नव्हे. स्वतंत्र वेदांतपर ग्रंथाची योग्यता कांहीं विशेष आहे. हें भाषण ज्ञानेश्वर महाराजांना थोडेसें लागलें. म्हणून त्यांनीं 'अमृतानुभव' हा तशा प्रकारचा दुसरा स्वतंत्र ग्रंथ केला. तो ज्ञानेश्वरीहून पुष्कळच लहान आहे, पण त्यांत केवळ वेदांतच भरलेला असून तो ग्रंथ अगदीं स्वतंत्र आहे. म्हणून

तात्विक दृष्टीनें ज्ञानेश्वरीपेक्षांही 'अमृतानुभवा'ची योग्यता अधिकच समजतात, व तो ग्रंथ पाहून निवृत्तिनाथही अत्यंत प्रसन्न झाले अशी आख्यायिका आहे. तसाच हुबेहुब प्रकार ह्या आत्मारामासंबंधानें आहे. म्हणजे आत्माराम हा ग्रंथ दासबोधाहून जरी लहान आहे तरी तो निवळ आत्मानात्म विचाराचा असल्यानें निखालस निवृत्तिपर आहे व दासबोध निवृत्तिपर असला तरी प्रवृत्तिमार्गाचें त्यांत मिश्रण आहे. म्हणून दासबोध सामान्य जनांना प्रिय होतो, उपयोगी होतो, तसा आत्माम होत नाहीं. तरी निवृत्तिमार्गाच्या दृष्टीनें आत्मारामाची योग्यता उच्चप्रतीची आहे. यास्तव त्यांतील कांहीं निवडक भाग देऊं:—

'आत्मारामा'चे समास पांचच आहेत, व दासबोधांतील समासाप्रमाणें त्यांना विषयावारीचीं नांवें वगैरे कांहीं दिलेलीं नाहींत.

'आत्माराम' हे प्रकरण निवृत्तीपर व आत्मानात्म विचाराचेंच असल्यानें ह्यांत कोणत्याही देवतेस—सगुण मूर्तीस नमस्कार नाहीं किंव मंगलाचरणही नाहीं. ह्याचा आरंभ असा आहे:—

**जयासि लटिका आळ आला । जो माया गौरीपासून झाला ॥**
**जाला नाहीं तया अरूपाला । रूप कैंचें ॥ १ ॥**
**तेथें स्तवनाचा विचार । न घडे निर्गुण निर्विकार ॥**
**तैसियासीच नमस्कार । भावबळें माझा ॥ १ ॥**

ह्यांतील विषय 'दासबोधा' वरूनच पुढें चालू केल्याचें खालीं दिलेल्या ओवीवरून स्पष्ट दिसतें. कारण तींत दासबोधाच्या नावांचा स्पष्टच उल्लेख आहे. ती ओवी ही:—

**दासबोधींचे समासीं । निर्मूळ केलें मीपणासी ॥**
**त्या निरूपणीं वृत्तीसी । पालट दिसेना ॥ २० ॥**

असें सांगून विषयारंभ असा केला आहे:—

**अरे तूं कोण कोणाचा । कोठूनि आलासि कैंचा ॥**
**असा विचार पूर्वीचा । घेईं बापा ॥ १ ॥**
**येथें तुझें कोणी नाहीं । भुलला आहेस काई ।**
**चुकोनि आलासि जाईं । जेथील तेथें ॥ २ ॥**

तूं समर्थाचें लेंकरूं । अभिमानें घेतला संसारू ॥
तो टाकितां पैलपारूं । पावसी बापा ॥ ३ ॥
ईश्वरापासोनि झालासि । परंतु त्यासी चुकलासी ॥
म्हणोनि हें दुःख भोगिसी । वेगळेपणें ॥ ४ ॥
तुझें अढळपद गेलें । तुज मायेनें वेड लावलें ॥
तें जरी तुझें तुज दिधलें । मज काय देशी ॥ ५ ॥

येथें अधिक उतारा घेण्याला सवड नाहीं याबद्दल वाईट वाटतें. तरी पण आत्मानात्म विचाराची फोड समर्थांनीं ह्यांत फारच सुलभ व गोड केली आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. आतां दुसरा समासः—

मायेचें स्वरूपः—

मायेकरितां माया दिसे । मायेकरितां माया भासे ॥
मायेकरितां लाभ असे । परमार्थाचा ॥ १ ॥
माया भवसिंधूचें तारूं । माया पाववी पैलपारू ॥
मायेवीण उद्धारू । प्राणीयासि नाहीं ॥ २ ॥
मायेकरितां देवभक्त । मायेकरितां ज्ञाते विरक्त ॥
मायेकरितां जीवन्मुक्त । होती स्वानुभावें ॥ ३ ॥
मायेकरितां वेदश्रुती । मायेकरितां वित्पत्ती ॥
मायेकरितां होती । मूढ ते विवेकी ॥ ४ ॥
मायेवीण ज्ञान कैंचें । माया जींवन सकळांचें ॥
मायेवीण साधकाचें । कार्य न चले ॥ ५ ॥
मायेवीण परमार्थ जोडे । ऐसें हें कधींच न घडे ॥
मायेवीण सहसा नातुडे । गुज योगियांचें ॥ ६ ॥
माया योग्यांची माउली । जेथील तेथें नेऊन घाली ॥
कृपाळूपणें नाथिली । आपण होय ॥ ७ ॥

हें मायेचें वर्णन 'दासबोधांतील' मायेच्या स्वरूपाहूनही अधिक परिणामकारक नाहीं असें कोण म्हणेल ?

आतां तिसऱ्या समासांतील सारीपाटाचा दृष्टांत, संसाराची क्षणभंगुरता, संसाऱ्याचा रिकामा अभिमान किती वायफळ वाटतो पहाः—

**जैसा सारीपाट खेळती । सारी एकाच्या मागून आणिती ॥**
**खेळों बैसतां वाटोनि घेती । आपुलाल्या ॥ १ ॥**
**नसतां अभिमान माथां । सारी मरतां परम व्यथा ॥**
**डाव येतां सुखस्वार्था । दोघेही पडले ॥ २ ॥**
**फांशासी दे दे म्हणती । येक ते रडी खाती ॥**
**क्रोधें पेटल्या घेती । जीव एकमेकांचे ॥ ३ ॥**
**तैशा कन्या पुत्र नारी । वांटून घेतल्या सारी ॥**
**अभिमान वाहती शिरीं । पांग प्रपंचाचा ॥ ४ ॥**
**इतुकीं वेडें लावलीं । ते माया खेळे खेळ एकली ॥**
**ते मायेनेंच विराली । पाहिजे माया ॥ ५ ॥**
**जैसें चक्रविहूचे उगवणें । बाहेर येऊन आंत जाणें ॥**
**कां अंतरीं जाऊनि येणें । अकस्मात वाहेरी ॥ ६ ॥**
**त्या कवाडीच्या कड्या । गुंतगुतों उगवाव्या ॥**
**तैसी जाण हीं माया । गुंतोनि उगवावी ॥ ७ ॥**

"सोंगट्याचा डाव मांडावयाचा मनांत आलें म्हणजे आधीं त्या दुसऱ्याच्या मागून आणावयाच्या आणि त्या माझ्या इतक्या व तुझ्या इतक्या म्हणून वांटून घ्यावयाच्या, आणि फुकटच्या इरेला पडून नसत्या अभिमानाला पेटावयाचें. सोंगटी मेली म्हणजे केवढें दुःख ! आपला डाव झाला कीं, तीन बोटें स्वर्ग ! आणि बाजू आंगावर आली कीं जणों काय घात झाला ! डाव रंगांत आला म्हणजे मग तो आवेश आणि वीरश्री पहावी ! 'फाशा फाशा चल ! बारा ! बारा !' फासा उताणा पडला कीं बाजूला पडला ह्याबद्दल कोण हमरी तुमरी ! शेवटीं रडी घेतली म्हणून प्रतिपक्षानें चिडवावयाचें ! आणि अखेर लठ्ठालठ्ठी ! हाच नमुना संसाराचा आहे. कन्या, पुत्र, बायको हीं सोंगट्यांप्रमाणेंच उसनीं आणलेलीं आपलीं आपलीं म्हणून वांटून घेतात, आणि त्यांचा सारा बोजा, सुखदुःख, आपल्या माथीं घेऊन प्रपंचाची यातायात करीत बसतात. अशीं सर्वांना निरनिराळीं वेडें लावून एकटी मायाच सारा खेळ खेळत आहे ! ह्या करितां मायेनेंच ती माया नष्ट करून टाकली पाहिजे."

त्याच्या खालचा चक्रव्यूहाचा दृष्टांत तरी किती समर्पक व मनास थक्क करून सोडणारा आहे तो पहा. चक्रव्यूहाच्या आंत जावयाचें झालें तरी गिरक्या खात जावें लागतें, किंवा बाहेर पडावयाचें झालें तरी गिरक्या घेतच यावें लागतें. दारांच्या कड्या उलटसुलट बसविल्या तर तशाच त्या पुन्हा उलट काढून बाहेर यावें लागतें. त्याप्रमाणेंच मायेच्या शृंखळेचा एक एक दुवा सोडवून मोकळें व्हावें लागतें.

ह्या दृष्टांतांत किती मौज व किती अनुभव भरलेला आहे बरें ! खरें, पाहिलें तर समर्थांनीं प्रपंच म्हणून कसला तो पाहिलेला सुद्धां नाहीं; ते कधीं उनाड मुलांबरोबर खेळलेले नाहींत. असें असतां सोंगट्या मागून आणतात; दान देतांना ओरडतात; रडीला येतात इतक्या बारीक सारीक गोष्टी त्यांस कळल्या कशा ? यावरून त्यांचें सूक्ष्म निरीक्षण व समय-सूचकता या दोन्हीही गोष्टी उत्तम प्रकारें व्यक्त होतात.

'वासनेनें पुनरावृत्ति घडते व तो पुनरावृत्तीचा फेरा चुकविणें हेंच भक्तीचें फळ होय,' हा विषय ४ थ्या समासांत १०।५ ओव्यांत कसा सांगितला आहे पहा:—

**प्राणी देह सांडोनि जाती । वासना शरीरें असतीं ॥**
**पुनरावृत्ति भोगिती । वासना उरलिया ॥ १ ॥**
**कारण देह अज्ञान । ज्ञान तो आत्मा जाण ॥**
**तया नांव महा कारण । बोलिजे ते ॥ २ ॥**
**जरी मनाचा थारा तुटला । म्हणजे भवसिंधू आटला ॥**
**प्राणी निश्चितार्थे सुटला । पुनावृत्तीपासोनी ॥ ३ ॥**
**हेंचि जाण भक्तीचें फळ । जेणें तुटे संसारमूळ ॥**
**निःसंग आणि निर्मळ । आत्मा स्वयें ॥ ४ ॥**
**ऐशी स्थिती जया पुरुषाची । तया पुनरावृत्ती कैंची ॥**
**जाणोनि भक्ति केली दास्याची । देवासी अत्यंत ॥ ५ ॥**

आतां पांचवा समास राहिला तोच शेवटचा. त्यापैकीं एकदोन ओव्यांचे नमुने व उपसंहाराचा चुटका देऊन ह्या ग्रंथाची परिसमाप्ति करतों.

**स्वामी परिसाचा स्पर्श होतां । शिष्य परीस झाला तत्त्वतां ॥**
**गुरुशिष्यांची ऐक्यता । झाली स्वानुभावें ॥ १ ॥**
**गुज स्वामींच्या हृदयींचें । शिष्यासि वर्म तयाचें ॥**
**प्राप्त झालें योग्याचें । निजबीज तें ॥ २ ॥**
**बहुता जन्मांच्या शेवटीं । झाली स्वरूपाची भेटी ॥**
**येका भावार्थासाठीं । परब्रह्म जोडलें ॥ ३ ॥**
**जो वेदशास्त्रांचा भावगर्भ । निर्गुण परमात्मा स्वयंभ ॥**
**तयाचा एकसरा लाभ । झाला सद्भावें ॥ ४ ॥**

आतां उपसंहाराच्या दोन तीन ओव्याः—

**जो स्वामीस शरण गेला । तेणें जन्म सार्थक केला ॥**
**संदेहा वेगळा झाला । जो देवा दुर्लभ ॥ ५ ॥**
**ग्रंथ संपता स्तुति उत्तरें । बोलिजेति अपारें ॥**
**अर्थासि कारण येरें । चाड नाहीं ॥ ६ ॥**
**इतिश्री आत्माराम । रामदासीं पूर्ण काम ॥**
**साधकें पाहतां श्रम । बाधिजेना ॥ ७ ॥**

'आत्माराम' ग्रंथांतील ह्या दिलेल्या गोषवाऱ्यावरून पारमार्थिक दृष्टीनें त्याची योग्यता केवढी आहे ही गोष्ट लक्षांत येईलच. ह्यांत व्यावहारिक विषय मुळींच नसल्यामुळें प्राकृत जनांना त्यांत मनोरंजकता वाटणार नाहीं हें खरें, पण वेदांताचें सार थोडक्यांत ज्याला समजून घेणें असेल, त्याला ह्या लहानशा ग्रंथायेवढा सुलभ ग्रंथ इतरत्र क्वचितच आढळेल. म्हणूनच समर्थांनीं अंतसमयीं त्याचीही महति दासबोधाबरोबर सांगितली आहे. तरी ' आत्माराम ' हा ग्रंथ फारसा प्रसिद्ध नाहीं. फार तर काय, पण समर्थांच्या ग्रंथांचीं नांवें घेतांना आत्मारामाचें कोणी नांव सुद्धां फारसें काढीत नाहीं. ह्याचें कारण येवढेंच कीं, तो ग्रंथ अगदीं लहान आहे हें एक; आणि दुसरें तो सामान्य जनांना तितकासा बोधप्रद वाटत नाहीं. कारण त्यांतील विषय गहन व शुद्ध परमार्थपर आहे. आतां समर्थांचा तिसरा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ जो ' मनाचे श्लोक ' याच्या-कडे वळूं.

# मनाचे श्लोक.

समर्थांच्या 'मनाचे श्लोक' या काव्यांत भुजंगप्रयात या लहानशा वृत्तांतील अवघे २१० च श्लोक किंवा पद्यें आहेत. पण तीं इतकीं सरस आहेत कीं, ते समर्थांच्या इतर सर्व ग्रंथांतच नव्हे, तर दासबोध जो 'ग्रंथराज' म्हणून नांवाजला गेला आहे, त्याहूनही त्यांची योग्यता विशेष आहे. फार काय सांगावें ? कविकुलगुरु कालिदासाविषयीं जें म्हटलें आहे कीं, कालिदासाचे रघुवंश, शाकुंतल इत्यादि मोठमोठे व नामांकित म्हणून जे ग्रंथ जगावर गाजत आहेत, ते सारे ग्रंथ जरी आज उपलब्ध नसते, व एक 'मेघदूत' हें त्याचें लहानसें काव्यच जरी जगावर शिल्लक राहिलें असतें, तरी त्याची योग्यता सर्व संस्कृत कवींत श्रेष्ठच ठरली असती व त्याचें कविकुलगुरुत्व कायमचें कायम राहिलें असतें. तीच आख्यायिका समर्थांसही बरोबर लागूं पडते. म्हणजे समर्थांचे इतर कोणतेही ग्रंथ उपलब्ध नसते आणि फक्त मनाचे श्लोक असते, तरी सुद्धां त्यांचा कवित्वाची श्रेष्ठता कायमच राहिली असती, अशीच त्यांची रचना व प्रसाद आहे.

म्हणजे कालिदासाचें ' मेघदूत ' मोरोपंतांच्या 'केकावलि' जगन्नाथरायांची ' गंगालहरी ' विठोबा अण्णांचा ' सुश्लोक लाघव ' भर्तृहरीचें ' वैराग्य शतक ' हीं जशीं सारभूत काव्यें आहेत, त्याप्रमाणेंच समर्थांचें ' मनाचे श्लोक ' हेंही एक सारभूतच काव्य आहे. म्हणून त्याचें वर्णन करावें तितकें थोडेंच होईल.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं म्हटलें आहे कीं, मेघदूत काव्यांतील वियोगदुःखानें वेडावलेल्या यक्षानें मेघाला दूत कल्पिणें ही कल्पनाच मोठ्या बहारीची आहे. त्याप्रमाणेंच ' मुमुक्षु ' मनुष्यानें परमार्थाकडे तंद्री लागून राहिली असतां, मन हाच आपला आज्ञाधारक शिष्य आपल्या-

पुढें हात जोडून उभा आहे असें समजून 'अरे मना! तूं असें कर; अरे मना! तूं असें करूं नको' म्हणून त्याला कळकळीनें बोध करणें ही कल्पनाच खरोखर लोकोत्तर होय यांत तिळमात्र शंका नाहीं. आणि मेघदूतकाव्याच्या विषयाला 'मंदाक्रांता' हें वृत्त अत्यंत समर्पक आहे, त्याप्रमाणेंच मनासारख्या उच्छृंखळ शिष्यालीही ताळ्यावर आणण्याला 'भुजंग प्रयात' हेंही वृत्त फार अनुकूल आहे. ह्या वृत्ताची चालही मोठ्या बहारीची आहे. त्याचा एक चरण थोड्याच अक्षरांचा असल्या- मुळें तो खड्या सुरावर म्हणतांच जणों काय गद्याचें एक एक वाक्यच अधिकारी मनुष्य मोठ्या कळवळ्यानें जनास सांगत आहे असा भास होऊन मनावर त्याचा परिणाम फार लागू पडतो.

समर्थांच्या उपदेशाचा ठसा जनांच्या अंतःकरणावर उठविण्याला दासबोधापेक्षांही समर्थांचे मनाचे श्लोकच विशेष कारणीभूत झालेले आहेत. मनाच्या श्लोकांची रचनाच काहीं अपूर्व आहे. प्रथमतः समर्थांनीं जे मनाचे श्लोक केले ते एका विशिष्ट हेतूनेंच केलेले आहेत. तो हेतु हा कीं, आपल्या प्रत्येक शिष्यानें भिक्षेच्या वेळीं घरोघर जातांना ह्यांपैकीं एकेक श्लोक उच्च स्वरानें म्हणावा व शेवटीं 'जयजय रघुवीर समर्थ' म्हणून भगवन्नामाची गर्जना करावी. उच्च स्वर, अर्थगांभीर्य, नामोच्चार, वैराग्यवृत्ति हीं सर्व एकत्र झालीं म्हणजे धर्मशील मनुष्याच्या अंतः- करणांत केवढा पूज्यभाव उत्पन्न होतो, ह्याचा ज्याचा त्यानेंच आपल्या मनाशीं विचार करावा, म्हणजे त्याबद्दल खरोखरच कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. खरोखर हे मनाचे श्लोक, त्यांचें छोटें वृत्त व त्यांतील अर्थगौरव येणेंकरून समर्थांच्या उपासनेची वृद्धि होण्याला, रामदासी पंथ पसरावयाला, व त्याचा सर्व महाराष्ट्र देशांत आदर व्हावयाला जितकें साधन झालें आहे, तितकें दुसऱ्या कशानेंही तें कार्य इतकें झपाट्यानें झालें नसतें. हें काम दासबोधानें सुद्धां इतकें होणें शक्य नव्हतें. दास- बोध वाचणारांची संख्या ती कितीशी असणार? परंतु मनाचे श्लोक अगदीं बायकामुलांच्या सुद्धां तोंडीं असलेले दृष्टीस पडतात. जेवणावळींत मुलेंलेंकरें सुद्धां हे मनाचे श्लोक मोठ्या भक्तिभावनेनें म्हणतात.

**उपासनेला दृढ चालवावें। भूदेव संतांसि सदा लवावें॥**
**सत्कर्म योगें वय घालवावें। सर्वांमुखीं मंगल बोलवावें॥१॥**

हा श्लोक भोजनसमारंभाच्या वेळीं कोणी ऐकलेला नाहीं? ह्या श्लोकांत किती बरें खोल अर्थ आहे? "स्वीकारलेलें व्रत निश्चयानें चालवावें, भूदेवांना–ब्राह्मणांना–आणि साधुसंतांना नेहमीं नम्र असावें–सारा जन्म सत्कर्मांत घालवाया, आणि सर्वांच्या तोंडून आशीर्वाद घ्यावा." ह्यापेक्षां अधिक जन्मास येऊन करावयाचें तें काय? हा श्लोक दिसण्यांत पाहिला तर अगदीं साधा आहे. तरी त्यांत अर्थगौरव केवढें आहे व शब्दांची रचना तरी किती सुंदर आहे पहा! 'उपासना' म्हणजे भक्ति किंवा स्वीकारलेलें व्रत. हा शब्द किती व्यापक आहे? तसेंच 'भूदेव' ह्या शब्दाची योजनाही फार समर्पक आहे. भूदेव म्हणजे साधारणपणें ब्राह्मण असेंच समजतात; परंतु समर्थांनीं ब्राह्मण असा शब्द वापरला नाहीं, तर भूदेव म्हणजे जगावर देवाप्रमाणें तेजस्वी, समर्थ पूज्य पुरुष असे जे संत–असें म्हटलें तरी सुद्धां चालेल. त्यांसच नम्र असावें. 'मंगल बोलवावें' ह्यांतील मंगल शब्द तरी किती मौजेचा घातला आहे! चांगलें म्हणवून घ्यावें, सर्वांचा आशीर्वाद संपादन करावा, भलेपणा घ्यावा, अर्थ पाहूं गेलें तर येवढाच; पण मंगल शब्दाची ठेवण केवळ बिनमोल आहे. म्हणजे मनाचे श्लोक ही एक समर्थांच्या मुखांतून निघालेली लहानशी श्रुतीच आहे असें वाटतें.

खालीं दिलेला श्लोक पुष्कळ लोक रोज भोजनास बसतांना म्हणतांना आढळतात. तो ऐकून अंतःकरण किती प्रसन्न होतें पहाः—

**सदा सर्वदा योग तूझा घडावा।**
**तुझ्या कारणीं देह माझा पडावा॥**
**उपेक्षूं नको गूणवंता अनंता।**
**रघूनायका मागणें हेंचि आतां॥१॥**

खरोखरच एकाद्याला जर परमेश्वर प्रसन्न होऊन 'वर माग' म्हणाला तर त्यास वर कोणता मागावा ह्याचें मोठें कोडें पडेल. परंतु समर्थांनीं किती एकनिष्ठतेचें मागणें मागितलें आहे बरें! "सदा सर्वदा

तुझेंच सान्निध्य असावें, अंतःकरणांतून तुला कधींही दूर करूं नये. तुझ्या सेवेमध्यें—अर्थात् लोककल्याण हीच तुझी सेवा होय, त्यांतच माझा देह खर्ची पडावा. हे गुणवंता ! हे अनंता ! माझी उपेक्षा करूं नका. रघुपते ! येवढेंच आपल्यापाशीं मागणें आहे." ह्यापेक्षां आणखी परमेश्वरभक्ति ती किती असावी ? ह्या एका मागणींत सर्व कांहीं साघलें आहे. ह्या मनाच्या श्लोकांचा आरंभ असा आहेः—

**गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥**
**नमो शारदा मूळ चत्वारिवाचा ।**
**गमो पंथ आनंत या राघवाचा ॥ १ ॥**

ह्या श्लोकांतील रहस्याचा विचार करण्यापूर्वीं ह्या ठिकाणीं एका थोड्याशा निराळ्याच विषयासंबंधानें चार शब्द सांगणें इष्ट वाटतात. तो विषय कोणता ? तर समर्थांच्या कवित्व गुणाच्या संबंधानें. निरनिराळ्या कवींचे निरनिराळे सांप्रदाय असतात. कित्येक कवि अतिशय विद्वान् असतात. व कित्येक कवि भाविक भक्त असतात. विद्वान् कवि असतात त्यांच्या कविता अत्यंत शुद्ध असतात. कारण, त्यांच्यामध्यें व्याकरण, शुद्धाशुद्ध, छंद-शास्त्र, उपमा, अलंकार, श्लेष वगैरे अनेक गुण दृष्टीत पडतात. आणि तेणेंकरूनही रसिकांच्या मनास मोह उत्पन्न होतो. परंतु विद्वानापाशीं बहुघा भक्तीचा अभाव किंवा निदान कमतरता तरी असल्यामुळें अशा कवितांमध्यें बहुघा प्रसादही कमीच असतो. कित्येक कवि विद्वान् नसतात, पण भाविक असतात. त्यांच्या कवितेंत व्याकरण, शुद्धाशुद्ध, छंदःशास्त्र, अलंकार इत्यादिकाकडे तितकेसें लक्ष पुरविलेलें नसतें. पण त्यांच्या वाणींत भक्ति व अंतःकरणांत कळकळ असल्यामुळें त्यांच्या कवितेंत प्रसादच भरलेला असतो. ह्यामुळें त्यांची कविता विद्वानापेक्षांही रसिकाच्या मनाला आल्हाद देते. विद्वानाची कविता शास्त्रीय दृष्टीनें पाहिली म्हणजे मनमोहक वाटते, तशी भाविकाची कविता शास्त्राच्या कसाला उतरत नाहीं. तरी खऱ्या भोक्त्याला तीच अत्यंत प्रिय वाटते. विद्वानाची कविता नीटनेटकी व शोभिवंत असते, पण खरें हृद्य नसेल तर ती व्यर्थ होय.

भाविकाची कविता ओबडधोबड असेल, पण तींत अंतर्हृद्य अंतःकरणास चटका लावणारें असल्यामुळें तीच लोकांना अधिक प्रिय होते.

समजा; कीं एक स्त्री नट्टापट्टा करून आली. दागदागिन्यांची रेलचेल, हिरे काय, मोत्यें काय, सोनें काय सारा लखलखाट. भरजरी शालू चापून चोपून नेसलेली. उत्तम वेणी फणी करून टाकंटीकला केलेली आहे. पण स्वरूप मात्र हिडंबीचें ! तर त्या वरच्या सर्व शृंगाराला काय करावयाचें आहे ? त्या पेक्षां **विराजे सिंदूरे धवलवसने भूप वनिता**'एखादी स्त्री अगदीं साधें पांढरें पातळच नेसलेली असेल. अंगावर श्रीमंती थाटाचें जड जवाहीर कांहीं नसलें आणि स्वरूपच मुळीं राजबिंडें असलें तर तिला पाहून कोण बरे प्रसन्न होणार नाहीं? तसाच प्रकार कवितेचा आहे. स्त्रियांमध्यें ज्याप्रमाणें सौंदर्य किंवा स्वरूप, त्याप्रमाणें कावितेमध्यें प्रसाद होय. ह्यास्तव सौंदर्य किंवा स्वरूप नसून शृंगार केला व नीटनेटकेपणा ठेवला तरी तो व्यर्थ, त्याप्रमाणेंच कविता कितीही शुद्ध असली, साजरी गोजरी असली तरी ती व्यर्थ होय. समर्थ अत्यंत बहुश्रुत होते, बुद्धिवान् होते, घोरणी होते व शीघ्र कवीही होते. परंतु ते विद्वान् नव्हते. विद्वान् नव्हते म्हणजे ते अक्षरशत्रु होते अशांतला तर भाग नाहींच. त्यांनीं पंचवटीसारख्या क्षेत्रामध्यें पुराण सांगितलें होतें. ह्यावरून ते व्युत्पन्न होते यांत तर शंकाच नाहीं. शिवाय दासबोधाला किती किती ग्रंथांचा आधार घेतला आहे. त्याची नांवनिशी त्यांनीं दिलीच आहे. तेव्हां त्यांनीं तितकेही ग्रंथ अवलोकन केले असावेत हें तर उघडच दिसतें. शिवाय वामन पंडितासारख्यालाही बृहदारण्योपनिषदाचा आधार काढून दिला होता, यावरून त्यांची विद्वत्ताही कमी होती अशांतला भाग नाहीं. परंतु ते पट्टीचे विद्वानही नव्हते व पट्टीचे शास्त्रीही नव्हते ही गोष्ट निर्विवाद आहे. उलट त्यांना ' घटपटादि ' पंडितंमन्यांचा तिरस्कारच होता. भक्तीपुढें व उपासनेपुढें त्यांना विद्वत्तेची मुळींच मातब्बरी वाटत नसे हे विद्वान् व पंडित केवळ भक्तिहीन अतएव निरुपयोगी असेच ते समजत असत. हे विद्वद्वर्य सदाशिवशास्त्री देव ह्यांच्या वादविवादाच्या वेळींही दिसून आलें, व त्यांच्याच वासुदेव गोसावी ह्या रूपांतरांत त्यांनीं विद्वत्ताप्रचुर ग्रंथ पुढें ठेवलेला वाचून ' तो उत्तम

आहे. पण आधीं तो येथून उचल पाहूं.' ह्या आशेवरून ह्या गोष्टी अगदीं स्पष्ट दिसून येतात.

ह्यावरून समर्थ जरी प्रथम कविता करीत—शीघ्र कविताही करीत—तरी त्यांनीं यथापद्धतीनें छंदःशास्त्रही पाहिलेलें नसावें, किंवा पाहिलें असलें तर त्याच्याकडे ते फारसें लक्ष देत नसावेत, हें त्यांचें कवित्व सूक्ष्मपणानें अवलोकन केलें असतां कळण्यासारखें आहे. ओवी छंद असतो तोंपर्यंत ह्या छंदःशास्त्राची फारशी अवश्यकता नसते. कारण, ओव्यांमध्यें अक्षरांचा किंवा मात्रांचा फारसा निर्बंध नसतो. ओवी करण्याचे निर्बंधही वृत्तदर्पणांत सांगितलेले आहेत. तशी नियमबद्ध ओवी केल्यास ती फार शोभिवंत दिसते. पण ते निर्बंध वक्तीं न पाळले तरी त्यांत फारसें व्यंग दिसून येत नाहीं, व म्हणतांनाही तें जाचक होत नाहीं. तरी सुद्धां वामनपंडितासारख्या विद्वान् कवीनें 'यथार्थदीपिके' सारख्या सुप्रसिद्ध ग्रंथांत ओवी छंदाचे सुद्धां म्हारमातेरें करून सोडलें आहे. ओवी छंदामध्यें शेवटच्या चरणांत पांच सहा अक्षरेंच फार तर शोभतात, व तसाच नियम आहे. व ज्ञानेश्वर महाराजांनीं तो किती साक्षेपानें पाळला आहे व त्यामुळें त्यांची ओवी किती प्रतिभासंपन्न दिसते हें कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. पण पंडितांनीं आपल्या ओवीच्या चरणांत दहा दहा बारा बारा अक्षरें गुंफून ट्रेनच्या ट्रेन लांबवून जणों काय मारुतीचें पुच्छच बनवून सोडविलें आहे! अभंग हा छंदही ओवीसारखाच साधा आहे. त्यालाही मात्रा गणांचा फारसा निर्बंध नाहीं. म्हणूनच तुकारामांसारख्या पांडुरंगभक्तांनीं तोच छंद पतकरला आहे. म्हणजे काय, कीं ओव्या न अभंग करण्याला छंदःशास्त्राची माहिती नसली तरी चालते; ते छंद सहज रीतीनें तयार करतां येतात. पण श्लोक करण्याचा प्रसंग आला कीं, छंदःशास्त्राची अवश्यकता लागते. छंदःशास्त्र अवगत नसेल व शुद्धाशुद्धाचे नियम माहीत नसतील तर छंदोभंगादि दोष होतात. आतां ह्यावर कोणी असेंही विचारतील कीं, छंदःशास्त्राच्या अभ्यासाशिवाय श्लोक करतांच येणार नाहींत काय? श्लोकचसे काय; पण पदें, साक्या, आर्या, दिंड्या, कटाव, फटके पाहिजे तीं पद्यें छंदःशास्त्र अवगत असल्याशिवायही करतां येतात, नाहीं असें नाहीं. पण छंदःशास्त्र अवगत नसेल तर तीं कशीं करतां

येतील ? त्याला एक युक्ति आहे. ती ही कीं, कोणत्याही एखाद्या चालीवर पद्य म्हटलेलें ऐकावें, ती चाल ध्यानांत धरावी, तें पद्य तोंडपाठ करावें आणि त्याच चालीवर शब्द किंवा अक्षरें जुळवावींत म्हणजे झालें. ह्या युक्तीनें पाहिजे त्या चालीवर पद्य होतें हें खरें, परंतु छंदःशास्त्राच्या अभावीं मध्येंच छंदोभंगाच्या वगैरे चुका होतात. त्यांतून श्लोकामध्यें त्या विशेष होतात. कारण, श्लोक हे गणांनीं बद्ध असल्यामुळें त्यांतील छंदोभंगाचे दोष वारंवार घडतात, तसे इतर छंदांत घडत नाहींत. शिवाय छंदामध्यें शुद्धाशुद्ध, ऱ्हस्वदीर्घ ह्यांची माहिती उत्तम लागते. ती नसली तर छंदोभंगाचा दोष होतो, आणि तो कानाला मध्येंच कटु लागतो.

ह्या मुद्यावर इतकें विस्तृत विवेचन करण्याचें कारण हें कीं, समर्थांच्या श्लोकबद्ध कवितेंत छंदोभंगादि दोष बरेच आढळून येतात. हे दोष समर्थांच्याच कवितेंत आढळतात असें नाहीं, तर त्या वेळेच्या इतर साधुसंतांच्या कवितेंतही आढळतात. जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ति, श्रेष्ठ इत्यादिकांनीं वेळोवेळीं तात्काल स्फूर्तीनें केलेले श्लोक पूर्वीं दिलेच आहेत. त्या प्रत्येकांत बहुधा छंदोभंग व ऱ्हस्वदीर्घादि दोष आढळतात. त्या सर्वांस लेखकप्रमाद तरी कसे म्हणावेत ? कारण, कित्येक ठिकाणीं मुख्य मुद्याचा शब्दच मुळीं छंदोभंगांत असतो !

ह्यावरून येवढेंच अनुमान निघतें कीं, पूर्वींचे साधुसंत छंदोभंगादि क्षुल्लक दोषांकडे मुळींच नजर देत नसत. त्यांच्या तात्काल स्फूर्तीनें जें काय मुखांतून निघे तें निघे. पण छंदोभंग असो कीं ऱ्हस्वदीर्घ असो, त्यांच्या दिव्य वाणींत ईश्वरी प्रसादच सारा भरलेला असल्यामुळें तीच वाणी सर्वांस अमृतमय वाटत असे. अमृतफलांतील मुख्य अमृताशीं गांठ घालावी म्हणजे झालें. तो गोड असला म्हणजे मनुष्य तृप्त होतो, व त्याचें आकंठ सेवन करतो. वरच्या टरफलाकडे तो लक्षच देत नाहीं. त्याचा रंग लाल असो, पिंवळा असो कीं हिरवा असो; रंगाच्या भपक्याला करावयाचें काय ? आंतील रसाशीं आपल्याला काम. त्यानें आत्मा तृप्त झाला म्हणजे बस्स. नाहींतर वरून रंगरूप उत्कृष्ट आणि आंत आंबट ढाण ! असें असेल तर काय उपयोग ? ह्याच तत्त्वावर समर्थांचीही सारी कविता आहे. ओव्या व अभंगात्मक वाणीमध्यें ह्या

प्रकार कोठें आढळत नाहीं. श्लोकात्मक प्रकरणात हे दोष मधून मधून आढळतात. परंतु त्यांतील अर्थस्वारस्यामुळें व ईश्वरी प्रसादामुळें त्याचें कांहीं वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांतील एखादा छंदोभंग दुरुस्त करण्यासाठीं त्या ठिकाणीं त्याच अर्थाचा शब्द जर एखाद्या कवीनें बसविला तर तें शालजोडीला घोंगड्याचें ठिगळ होऊन तेंच पद्य अगदीं बेचव लागतें हा मोठा चमत्कार होय. ह्याचेंच नांव ईश्वरी प्रसाद. उदाहरणार्थ ह्या मनाच्याच श्लोकांतील एक श्लोक देतों:—

**देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी।**
**मना सज्जना हेचि कीया धरावी॥**

ह्याचे सारे श्लोक 'भुजंगप्रयात' वृत्ताचे आहेत हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ह्या वृत्ताच्या प्रत्येक चरणांत बारा बारा अक्षरें असून त्यांत चार 'य' गण असतात, आणि '**अद्यलघू तो य गण गणावा**' ह्या वृत्तदर्पणांतील किंवा **पिंगलनागाच्या** छंदःशास्त्रांतलि नियमाप्रमाणें आद्य म्हणजे पाहिलें अक्षर लघु व पुढील दोन अक्षरें दीर्घ अथवा गुरु असतील तोच य गण होय. ह्या छंदःशास्त्राच्या नियमाप्रमाणें ह्या श्लोकांतील पहिलें अक्षर ऱ्हस्वच पाहिजे. आणि इतर श्लोकांतील पहिलीं अक्षरें ऱ्हस्वच आहेत. पण ह्या श्लोकांत मात्र 'देहे' हा शब्द पहिला असून त्यांतील पाहिलें अक्षर दीर्घ आहे. म्हणून हा छंदोभंग आहे, आणि त्यांतील दुसरें अक्षर 'हे' आहे. तेंही दीर्घ आहे. तें छंदाप्रमाणें बरोबर होतें; पण व्याकरणदृष्ट्या अशुद्ध होतें. कारण 'देह' असा शब्द लिहितात; 'देहे' असा लिहित नाहींत. [ निदान हल्लीं तरी ] तसेंच 'कीया' हा शब्द छंदःशास्त्रदृष्ट्या बरोबर आहे, परंतु व्याकरणरीत्या बरोबर नाहीं. कारण क्रिया शब्दांतील क्री दीर्घ लिहीत नाहींत, ती ऱ्हस्व लिहितात. ती तशी शुद्ध लिहिली तर छंदोभंग होतो. असे शास्त्रीय दृष्टीनें ह्यांत कांहीं कांहीं दोष आढळतात. ह्या समर्थांच्या मनाच्या श्लोकांपैकीं कांहीं निवडक वेंचे मुलांस बोधप्रद म्हणून सरकारानें क्रमिक पुस्तकांत घेतले आहेत. ते घेतांना त्यांतील छंदोभंगाचा दोष काढून टाकावा म्हणून अलीकडील विद्वानांनीं त्यांतील ह्यावर दिलेल्या श्लोकां-

तील छंदोभंग करणारा 'देहे' शब्द काढून टाकून त्या ठिकाणीं 'तनू' हा शब्द घातला आहे. त्यामुळें हाच श्लोक असा होतो:—

**'तनू' त्यागितां कीर्ति मागें उरावी ।**
**मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥**

'तनू' शब्द घातल्यामुळें छंदःशास्त्रदृष्ट्या हा श्लोक शुद्ध झाला खरा, पण 'तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी' हा शब्द कानालाच किती बेचव लागतो पहा! आणि समर्थांच्या 'देहे' शब्दानें छंदाचा जरी थोडासा भंग होतो तरी तो कानाला किती गोड लागतो ! आणि मनावर त्याचा केवढा संस्कार होतो बरें ? ह्याचेंच नांव प्रसाद, व ह्यांचेंच नांव दिव्य वाणी ! आतां 'देहे' शब्दानें छंदोभंग होतो हें खरें, तरी पण 'दे' अक्षर थोडेसें सफाईत व ऱ्हस्व उच्चारलें म्हणजे हा श्लोकही म्हणतां येतो, नाहीं असें नाहीं. तरी पण समर्थांच्या श्लोकरचनेंत बऱ्याच ठिकाणीं छंदोभंग दृष्टीस पडतो, व शद्बांचीं रूपेंही ऱ्हस्वदीर्घांच्या व्युत्क्रम स्थितींत आढळतात. मनाच्या ह्या श्लोकाच्या वर दिलेल्या पहिल्या श्लोकांत सुद्धां हा प्रकार आहेच.

**"गमू पंथ आनंत या राघवाचा"**

ह्या शेवटच्या चरणांत 'आनंत' शद्ब घातला आहे, तो व्याकरण-रीत्या बरोबर नाहीं; 'अनंत' असा पाहिजे. परंतु 'अनंत' शब्द श्लोकांत घालूं म्हटलें तर त्यामुळें छंदोभंग होतो. असा प्रकार क्वचित् थोड्या ठिकाणीं कां होईना, परंतु आढळून येतो ही गोष्ट कबूल करणें भाग येतें. त्याचीं कारणें पूर्वीं सांगितलींच आहेत, व ते दोष प्रसादवैपुल्या-मुळें लोपूनही जातात व क्षम्यही वाटतात हेंही पूर्वीं कळविलेंच आहे.

येथपर्यंत कथेंत आड कथा आली, ती सोडून आतां पुन्हा मनाच्या श्लोकांतील काय काय रहस्य निघतें तें पाहूं या.

समर्थांचें मनाचे श्लोक म्हणजे मराठी सर्वोत्कृष्ट सुभाषितांचें एक भांडारच भरलेलें आहे.

**सुख पाहतां जवा पाडे । दुःख पर्वतायेवढें ॥**

हें जसें तुकाराममहाराजांचें सुप्रसिद्ध सुभाषित सर्वतोमुखीं आहे, तसेंच:—

## जगीं सर्व सुखी असा कोण आहे ।

हेंही समर्थांचें सुभाषित सर्वतोमुखीं आहे. पुण्याच्या प्रसिद्ध चित्र शाळेनें घरोघरीं भिंतीवर लावण्याकरिता मराठी कवींच्या कवितांतील सुभाषितें एकत्र करून तीं सुंदर मोठ्या अक्षरांत छापलीं आहेत. त्यांत समर्थांच्या मनाच्या श्लोकांचीच भर फार आहे. ह्यावरूनही त्याची महती कळून येईल.

वरच्या सर्व प्रतिपादनांत ही एक गोष्ट लक्षांत आली असेलच कीं, मनाचे श्लोक यांमध्यें एकच विषय असा कांहीं नाहीं, फुटकळ फुटकळ श्लोक असल्याप्रमाणेंच आहेत. ह्यामुळें त्यांचा अनुक्रमही सर्व प्रतींतून सारखा नाहीं. रा. ढवळे ह्यांनीं देवस्थळींचें भाषांतर छापलें आहे, त्यांत ह्या श्लोकांची संख्या २०५ आहे. आणि रा. बा. भा. जोशी, म्यानेजर 'यशवंत प्रेस' ह्यांनीं जें भाषांतर छापलें आहे, त्यांत ह्या श्लोकांची संख्या २१० आहे. अशी कमजास्त संख्या असण्याचें कारण तरी हेंच कीं, हे मनाचे श्लोक प्रथम फुटकळ फुटकळच सर्वांच्या तोंडीं असावेत. त्यामुळें त्यांच्या ज्या प्रती झाल्या त्या एकाच अनुक्रमानें झालेल्या नाहींत. ह्यांमध्यें विषय जरी एक नाहीं तरी कांहीं विषय एके ठिकाणीं ग्रथित केलेले आढळतात. ह्यांत सांगितलेल्या सिद्धांताचें वाक्य पुनरुक्त केलेले असे श्लोक बरेच आहेत. म्हणजे त्या श्लोकांचा शेवटचा चरण एकच आहे. असे चौथा चरण एकच असलेले ज्यांत दहादहा पांचपांच श्लोक आहेत असे विषय ९ आहेत. त्यांच्यांतील शेवटचे चरण अनुक्रमवारीनेंच देतों:—

**[ १ ] नुपेक्षी कदा रामदासाभिमानी**

" राम हा आपल्या भक्तांचा कैवारी आहे. तो त्याची कधींही उपेक्षा करणार नाहीं."

**[ २ ] मना सज्जना राघवीं वस्ती कीजे**

" हे सजना मना ! तूं नेहमीं रामचंद्राच्याच सान्निध्याला राहत जा."

**[ ३ ] जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा.**

" तोच पुरुषोत्तमाचा दास आणि तोच धन्य होय."

**[ ४ ] प्रभाते मनीं राम चिंतीत जावा.**

" प्रातःकाळीं श्रीरामचंद्राचेंच स्मरण करावें."

**[५] तुटे वाद संवाद तो हीतकारी ।**

" वितंडवाद नष्ट होईल तितका आपल्याला हितकर असतो."

**[६] नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।**

" देव हा आपल्या भक्ताचा अभिमानी आहे. तो त्याचा कधींच अव्हेर करीत नाहीं. "

**[७] जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।**

" अहंपणाच्या योगानें पूर्वसंचित काय आहे तें कळत नाहीं."

**[८] मना संत आनंत शोधोनि पाहे ।**

" हे मना ! सत्पुरुष कोण आणि परमात्मा कोण ह्याचा विचार करून पहा."

**[९] सदा संगतीं सज्जनाची धरावी ।**

" निरंतर संगती धरावयाची ती सत्पुरुषाचीच धरावी. "

हे नऊ सिद्धांत म्हणजे सदाचाराची किंवा इतिकर्तव्यतेची मूलतत्त्वेंच होत. येवढीं ध्यानांत ठेवून वागणूक केली, तरी त्याची गणना सत्पुरुषांतच होईल. आतां ह्या सिद्धांतांतील कांहीं कांहीं वेचें देतों.

**दिनानाथ हा राम कोदंडधारी ।**
**पुढें देखतां काळ पोटीं थरारी ॥**
**जनीं वाक्य नेमस्त हें सत्य मानी ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १ ॥**

" धनुष्यबाण हातांत घेतलेला श्रीरामचंद्र हा गोरगरिबांचा वाली आहे. तो समोर पाहिला कीं मृत्यूच्याही पोटांत धडकी भरते, असें जें लोक आजपर्यंत म्हणत आले आहेत तेंच खरें आहे हें तूं पूर्णपणें लक्षांत ठेव. रामाला आपल्या सेवकाचा मोठा अभिमान आहे. तो त्याची कधींही उपेक्षा करावयाचा नाहीं. " ह्यांतील 'कोदंडधारी' हें विशेषण अत्यंत समर्पक होय. आपल्या उपास्य देवतेचा ज्याच्या अंतःकरणाला येवढा भरंवसा असेल त्याला जगामध्यें कमी तें काय ?

**समर्थांचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥**
**जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ २ ॥ ***

" थोरांच्या माणसांकडे वांकडा डोळा करून पाहण्याची त्रिभुवनांत तरी कोणाची छाती आहे काय? [ छे छे! नांव कशाला पाहिजे! अहाहा! हें सुभाषित किती आत्मविश्वासाचें व स्वामिनिष्ठेचें आहे! ] त्रिभुवनांतील सारे लोक ज्याच्या लीलेचे पोवाडे गातात तो सेवकाचा अभिमानी श्रीरामचंद्र आपल्या भक्ताचा कधींही अव्हेर करणार नाहीं. "

**वसे मेरु मांदार हे सृष्टि लीळा ।**
**शशी सूर्य तारांगणें मेघमाळा ॥**
**चिरंजीव केलें जगीं दास दोन्ही ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ३ ॥**

" मेरु व मांदार पर्वत जोंपर्यंत कायम आहेत, ह्या सृष्टीची घडामोड जोंपर्यंत चालू आहे, हे चंद्र, सूर्य व नक्षत्रमंडळ अस्तित्वांत आहे, तोंपर्यंत आपले दोन्हीही भक्त [ मारुति व बिभीषण ] ज्यानें चिरंजीव करून सोडले, तो आपल्या सेवकाचा अभिमानी रामचंद्र आपल्या भक्ताची कधींही उपेक्षा करावयाचा नाहीं. "

**सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा ।**
**उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ॥**

---

* ह्या मनाच्या श्लोकांचीं दोघांनीं भाषांतरें केलीं आहेत म्हणून पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांतील रा. देवस्थळींच्या भाषांतरांत प्रथम श्लोकाचा गोषवारा देऊन त्यावर गीता, तुकारामाचे अभंग, समर्थांचा दासबोध इत्यादिकांतील वेंचे देऊन त्यावर बरेंच व्याख्यान केलेलें आहे, व रा. बा. भा. जोशी ह्यांचा सरळ अर्थच आहे, पण तो वेदांत तत्त्वावर आहे. हीं दोन्हीही भाषांतरें एकवार अवश्य अवलोकन करण्यासारखीं आहेत.

**हरीभक्तिचा घाव घाली निशाणीं ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ४ ॥ ***

" चक्रवाक पक्षांच्या जोडप्याला विरहदुःखांतून सोडविण्याकरितां जसा प्रत्यहीं सूर्य येतो, त्याप्रमाणें भक्तावर संकट कोसळलेलें पाहिलें कीं, हा प्रभु रामचंद्रही तसाच उडी टाकून धांवत येतो. ' ह्याकरितां संकटानें झेंडा उभारलेला दृष्टीस पडला कीं, त्याच्यावर हरिभक्तीच्या तरवारीचा एक

---

* मनाचे श्लोक हे वस्तुतः प्राकृत भाषेंतीलच आहेत, व भाषांतर करणारांनीं त्यांचीं भाषांतरें प्राकृत भाषेतच परंतु सरळ गद्यात्मक केलीं आहेत, तरी त्यांची किती तारांबळ उडाली आहे ती पहा. ह्या श्लोकांतील तिसरा चरण हाः—

**' हरीभाक्तिचा घाव घाली निशाणीं ॥ '**

ह्याचें रा. देवस्थळींनीं केलेलें भाषांतर " हरीभक्तीचा डांगोरा भक्त एकसारखा पिटीत असल्यावर भक्ताभिमानी श्रीराम भक्ताची उपेक्षा कधींच करणार नाहीं."

ह्याच अर्थाचें रा. जोशांचें भाषांतर " हरिभक्तीचें टिपरूं नगाऱ्यावर तर दणाणत आहे ! दासाभिमानी राम भक्ताला केव्हांहि विसरत नाहीं."

ह्या दोघांनींहि मराठी भाषेला मखलाशी तर खूप चढविली आहे. एक म्हणतात " भक्तीचा एकसारखा डांगोरा पिटीत असल्यावर..." तर दुसरे म्हणतात " हरिभक्तीचें टिपरूं तर नगाऱ्यावर दणाणतें आहे ! " पण ' निशाणीं ' या शब्दाचा दोघांनींही फराळ केला ! त्याची त्यांना दादही नाहीं ' हरीभक्तीचा घाव घाली निशाणीं '—निशाणावर हरीभक्तीचा घाव घाल—असा सरळ अन्वय आहे. ह्यांत अवघड असें कांहींच नाहीं. परंतु ' निशाण ' ह्या शब्दाचा अर्थ न कळल्यामुळें व तो कोणाकडे लावावयाचा ह्याचा संदर्भ न समजल्यामुळें हे दोघेही गृहस्थ भलतीकडे वाहून आडमार्गांत शिरले आहेत. बाकी दोघेही योग्य आहेत. एक नामांकित व्युत्पन्न आहेत आणि दुसरे वेदांती म्हणून नांवाजलेले आहेत. पण येथें त्यांनीं कसा प्रकार केला आहे पहा. 'डांगोरा' हा कशाचा अर्थ ? घाव याचा कीं निशाण ह्याचा ? ह्याचा कांहीं तरी शास्त्रीबुवांनीं विचार करावयाचा होता. ' घाव घालणें ' म्हणजे डांगोरा

सपाटा मार, कीं राम हा सेवकाचा अभिमानी असल्यामुळें तो आपल्या भक्ताची कधींही उपेक्षा करणार नाहीं."

---

पिटणें होय ? हें एकाचें झालें. दुसरे म्हणतातः—" नगाऱ्यावर टिपरूं दणाणतें आहे ! " वारे वा ! हा अर्थ आणला तरी कोठून ? नगाऱ्याला शब्द कोणता ? व टिपरूं याला तरी शब्द कोणता ? ' निशाण ' म्हणजे नगारा, व घाव म्हणजे टिपरूं होय ? सारेंच पोतडींतलें ! तर ' निशाण ' ह्याचा अर्थ काय, व त्याचा संदर्भ कोणीकडे लावावयाचा ? ह्याचा ह्या उभय लेखकांनीही विचार केलेला दिसत नाहीं. कांहीं तरी तोंडावर तुकडा टाकून जिज्ञासूंची समजूत केली, एवढाच अर्थ दिसतो.

ह्या श्लोकांतील खरें रहस्य हें कीं, पूर्वीच्या चरणांत सांगितलें आहे कीं, " चक्रवाकासाठीं जसा सूर्य सदा सर्वदा धांवून येतो, त्याप्रमाणें हा आमचा प्रभु रामचंद्रही भक्ताला संकट पडलें कीं, तेथें उडी टाकून धांवत येतो. [ हें त्याचें ब्रीद आहे; गुण आहे; स्वभाव आहे. ] ह्याकरितां संकट आपणावर जेव्हां जेव्हां चढाई करून येईल, व आपलें ' निशाण '—झेंडा पुढें उभा करून झगड्यास तयार होईल, तेव्हां तेव्हां तूं भिऊं नको; घाबरूं नको; किंवा पळूनही जाऊं नकोस. तर धैर्य धरून त्याच्या तोंडाला तोंड दे; आणि हरिभक्तीचा त्या संकटाच्या भरजरी निशाणावरच सपाटून घाव घाल. परमेश्वराच्या नामघोषाच्या बाणांची त्यावर वृष्टि कर म्हणजे त्याचा तो झेंडा मोडून तोडून फडशा पडेल आणि तूं विजयी होशील, संकटांतून मुक्त होशिल. ह्याकरितां तिळमात्र मागें सरूं नको. कारण, राम हा आपल्या भक्ताचा पूर्ण अभिमानी असल्यामुळें तो आपल्या भक्ताचा कधींच अव्हेर करीत नाहीं. " हा सरळ व मागच्या पुढच्या संदर्भास जुळून अर्थ असतां, श्लोकांतील कांहीं शब्द गाळून व कांहीं शब्दांचा भलताच अर्थ करून उभय लेखकांनींही वेळ मारून नेलेली पाहून मौज वाटते. असा प्रकार आणखीही कित्येक ठिकाणीं आढळतो. परंतु तो प्रस्तुतचा विषय नाहीं, व तसें करण्यास येथें स्थळही नाहीं व काळही नाहीं. फक्त नमुन्याकरितां म्हणून ओघानुसार एक प्रकार दाखविलेला आहे.

आतां दुसऱ्या सिद्धांतांतलि कांहीं वेंचेः—

मना प्रार्थना तुजला एक आहे ।
* रघूराज अंकित होऊनि राहे ॥
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥

" हे मना ! तुला बाबा, हात जोडून एक माझी प्रार्थना आहे. ती हीच कीं, तूं श्रीरामचंद्राचा आज्ञांकित सेवक होऊन रहा. ह्या माझ्या प्रार्थनेकडे तूं कधींही दुर्लक्ष करूं नकोस. हे सच्छील मना ! तूं रामचंद्राच्या सान्निध्यांतच वस्ती करून रहा. "

बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं ।
शिणावें परी नातुडे हित कांहीं ॥
विचारें बरा अंतरीं बोध कीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥ ३ ॥

" काशीरामेश्वराच्या कितीही खेपा केल्यास तरी सुख म्हणून कांहीं होणार नाहीं. किंवा कितीही देवदेव करून थकलास तरी तुझें हित म्हणून कांहीं साधावयाचें नाहीं. ह्याकरितां नीट विचार करून खरें काय तें शोधून काढ, आणि बाबारे ! रामचंद्राच्या सेवेंतच निरंतर गढून रहा. "

---

* रा. ढवळे ह्यांच्या प्रतींत 'रघुराज थक्कीत होऊनि पाहे' असा पाठ घातला आहे व त्याचा अर्थ–'रघुपतीकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पहा' असा केला आहे. हा पाठ कोणत्या प्रतीवरून घेतला आहे तें समजत नाहीं. आमच्या संग्रहीं असलेल्या इतर प्रतींत व 'रामदासस्वामींच्या समग्र ग्रंथांत' आम्ही दिलेलाच पाठ आहे आणि तोच उक्त दिसतो. 'आश्चर्य चकित मुद्रेनें पहा, असें ह्मणण्यांत स्वारस्य नाहीं- त्यापेक्षां त्याचा अंकित होऊन रहा'दास होऊन रहा, असें म्हणणें अधिक शोभतें. आणि शिवाय 'थक्कीत' हा शब्द निखालस अपरिचित असल्यामुळें तो खुलत नाहीं, व समर्थांनींहीं अन्यत्र कोठें त्याचा उपयोग केलेला नाहीं.

आतां परमेश्वराचा खरा भक्त कोण ? तरः—

**मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धि ।**
**प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ॥**
**सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ १ ॥**

" मदमत्सरापासून उत्पन्न होणारी स्वार्थबुद्धि ही जो सोडून देतो त्याला प्रपंचाचीही उपाधि नसते. सदा सर्व काल जो नम्रपणानें बोलतो; आणि ज्याच्या वाणींत माधुर्य असते, असा जो परमेश्वराचा भक्त असेल तोच एक जगामध्यें धन्य होय. "

**नसे मानसीं नष्ट आशा दुराशा ।**
**वसे अंतरीं प्रेमपाशा पिपाशा ॥**
**ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ २ ॥**

" चांगली किंवा वाईट आशाच ज्याच्या मनांतून नाहींशी झालेली; ज्याच्या अंतःकरणांत प्रेमभावनाच उत्पन्न झालेली; ईश्वर भक्तीचीच ज्याला तृष्णा; भक्तीभावानें देवालाच ज्यानें ऋणी करून ठेवलें आहे; तोच परमेश्वराचा भक्त जगामध्यें धन्य होय. "

**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।**
**स्नेहाळू कृपाळू जनीं दास पाळू ॥**
**तया अंतरीं क्रोध संताप कैचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ३ ॥**

" दीन अनाथावर दया करणारा; मनाचा कोमल; प्रेमी; सदय आणि सेवकांचा प्रतिपाळ करणारा, असा असेल त्याला राग कशाचा आणि लोभ तरी कशाचा ? तोच परमेश्वराचा भक्त जगामध्यें धन्य होय. "

आतां ' अति सर्वत्र वर्जयेत् ' ह्या सूत्रावर एकच श्लोक किती उठावदार केला आहे पहाः—

**अती मूढ त्या दृढ बुद्धि असेना ।**
**अती काम त्या राम चित्तीं वसेना ॥**

**अती लोभल्या क्षोभ होईल जाणा ।**
**अती वीषयीं सर्वदा दैन्यवाणा ॥ १ ॥**

" ढतला ढ असेल त्याच्या बुद्धीला कधीं स्थिरताच असत नाहीं. ज्याची हाव दांडगी, त्याच्या हृदयांत रामाची कधीं आठवणही होत नाहीं. अति लोभ धरला तर क्षोभ मात्र उत्पन्न होतो. आणि अत्यंत विषयासक्त मनुष्य असला तर तो सदा सर्वकाल निस्तेज, कळाहीन व भिकार स्थितींतच जन्म काढतो. "

ह्यांतील 'काम' 'राम' 'लोभ' 'क्षोभ' इत्यादि अनुप्रास अत्यंत कर्णमधुर आहेत. रामनामाचा सुलभपणाः—

**न वेंचे कदा ग्रंथिचे अर्थ कांहीं ।**
**मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ॥**
**महा घोर संसार शत्रू जिणावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ १ ॥**

" तोंडानें परमेश्वराचें नांव घ्यावयाला कांहीं गांठींचा पैसा सोडून द्यावा लागत नाहीं किंवा तें घेतांना मोठेसे कष्टही पडत नाहींत. संसार मोठा भयंकर शत्रु आहे; त्याला जिंकावयाचें असेल तर प्रातःकाळींच रामनामाचा घोष करीत असावा. "

**बहूतां परी संकटें साधनाचीं ।**
**व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं ॥**
**दिनाचा दयाळू मनीं आठवावा ।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ १ ॥**

" परमार्थाचीं तपश्चर्यादि साधनें करूं म्हटलें तर त्यामध्यें नाना प्रकारचीं दुर्धर संकटें असतात. व्रतें करावींत, दानधर्म करावा, उद्यापनें करावींत तर त्याला पैसा लागतो. हीं साधनें दुःसाध्य आहेत. याकरितां दीनदुबळ्यावर कृपा करणारा जो राम त्याचें मनामध्यें स्मरण करावें म्हणजे झालें, म्हणून प्रातःकाळींच रामाचें ध्यान करीत असावें. "

समर्थ हे मारुतीचा अवतार अशी सर्वत्र प्रसिद्धी होती, आणि त्यांची लीलाही मारुतीच्या नांवाला शोभण्यासारखीच होती. त्यांना मारुती-

विषयीं अत्यंत प्रेम होतें; तें प्रत्यक्ष श्रीरामचंद्रापेक्षांही कांकणभर अधिकच म्हटलें तरी चालेल. ते प्रत्येक ठिकाणीं मारुतीची स्थापना करीत. कोणालाही मारुतीचीच उपासना करावयास सांगत. ठिकठिकाणीं मारुतीचीच उपासना चालू करीत व स्वतः मारुतीची मूर्ति तयार करून देत. मारुतींनीं केलेल्या लीलेबद्दल व पराक्रमाबद्दल त्यांना मोठा अभिमान असे. मारुती असला कीं, संरक्षणाचें काम बिनधोक झालें असा त्यांना परिपूर्ण विश्वास वाटे. पुढें 'भीमरूप्या' 'सवाया' या सदरामध्यें ह्याचा अधिक उल्लेख येणारच आहे. अशी ज्या दैवतावर त्यांची भक्ति जडलेली होती, त्या मारुतिरायाचें वर्णन त्यांनीं मनाच्या एकाच श्लोकांत किती जोरानें केलें आहे पहाः—

**मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।**
**गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ॥**
**हरीभक्त तो शक्त कामास मारी ।**
**जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥ १ ॥**

" मुखामध्यें रात्रंदिवस रामनाम असल्यामुळें त्याला कामाची मुळींच पीडा झाली नाहीं. त्याच गुणामुळें प्रसंगाला जें धैर्य पाहिजे तें कधींही ढळलें नाहीं. तो ईश्वरभक्त असल्यामुळें मदनासारख्या शत्रूलाही ठार मारण्यास समर्थ झाला. असा अखंड ब्रह्मचर्यव्रत पाळणारा जो मारुति तो जगामध्यें धन्य होय. "

परमेश्वरप्राप्तीचीं साधनें इतकीं सुलभ असतांही मनुष्याचा जन्म कसा फुकट जात असतो त्याचें चित्रः—

**यथासांग रे कर्म तेंही घडेना ।**
**घडे कर्म तें पुण्य गाठीं पडेना ॥**
**दया पाहतां सर्व भूतीं असेना ।**
**फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ॥ १ ॥**

" अरे ! एखादें कर्म करूं लागलें तर तेंही नीटपणें शेवटास जात नाहीं; इतक्यांतून एखादें कर्म शेवटास गेलेंच तर त्याचें फळ पदरींच पडत नाहीं. प्राणीमात्रावर दया म्हणावी तर तीही असत नाहीं. बरें,

फुकटचें देवाचें नांव घ्यावें तर तेंही तोंडाला येत नाहीं. अशा रीतीनें सारा जन्मच्या जन्म फुकट जातो. "

रिकामा वादविवाद हा घातक आहे, शुष्क बडबड कामाची नाहीं. ह्या विषय खालील श्लोकांत उत्कृष्ट दर्शविला आहेः—

**तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें ।**
**विवेकें अहंभाव यातें जिणावें ॥**
**अहंता गुणें वाद नाना विकारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १ ॥**

" ज्यांत वादाचें कारण संपतें त्यालाच संभाषण म्हणावें. अहंकारानें वितंडवाद मात्र माजून राहतो. याकरितां विचारानें अहंभावच नष्ट करून टाकावा. अहंकाराच्या योगानें वाद हा विकोपास जाऊन नाना प्रकारचे कलह मात्र वाढतात. ह्याकरितां वितंडवाद सोडून देऊन जें भाषण करतात तेंच हितप्रद होतें. "

**हिताकारणें बोलणें सत्य आहे ।**
**हिताकारणें सर्व शोधूनि पाहे ॥**
**हिताकारणें बंड पाखांड वारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १ ॥**

" हिताकरितांच खरें बोलावें लागतें; हिताकरतांच सारा विचार करून ठरवावें लागतें; हिताकरतांच सारें बंड व पाखांडमत सोडावें लागतें. वादविवादाचें बंड मोडेल तेंच भाषण हितकर होतें. "

**जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला ।**
**परी वाद वीवाद तैसाचि ठेला ॥**
**उठे संशयो वाद हा दंभधारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १ ॥**

" लोकांना सांगतां सांगतां व लोकांचें ऐकतां ऐकतां सारा जन्म गेला पण वितंडवाद कांहीं नष्ट झाला नाहीं. ज्यामध्यें संशय उत्पन्न होतो तो अहंपणाचा वाद होय. वितंडवाद नाहींसा होईल तेंच भाषण हितकर असतें."

योगी श्रेष्ठाचीं लक्षणें कोणतीं ? तरः—

**नसे गर्व अंगीं सदा वीतरागी।**
**क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी ॥**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा।**
**इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥ २ ॥**

"ज्याच्या अंगांत गर्व नाहीं; सदासर्वदा वैराग्यसंपन्न; क्षमा, शांति व दया ह्यांनीं युक्त असून दक्ष; योगसाधन करणारा; राग नाहीं; लोभ नाहीं; ज्याला दैन्य नाहीं, अशा लक्षणांनीं युक्त असेल तोच योगी श्रेष्ठ होय."

**म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे।**
**अतर्कास तर्कीं असा कोण आहे ॥**
**जनीं मीपणें पाहतां पाहवेना।**
**तया लक्षितां वेगळें राहवेना ॥ १ ॥**

"मी ज्ञाता आहे असें म्हणतो तो मूर्ख होय. कल्पनातीत वस्तूची कल्पना करणारा कोण ? असें असतां अहंपणा धरून कोणी पाहतो म्हणेल तर तें पाहतां येणार नाहीं. आणि तो दृष्टीस पडलाच तर आपल्याला वेगळें असें राहतांच येणार नाहीं. म्हणजे तद्रूपताच प्राप्त होईल."

समर्थांना शास्त्राचा कीस काढणें आवडत नसे. भक्तिभाव हाच त्यांना प्रधान वाटे. ही गोष्ट पूर्वीं अनेक वेळ आलीच आहे. तेंच तत्त्व खालच्या श्लोकांत प्रदर्शित केलें आहेः—

**श्रुती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें।**
**स्मृती वेद वेदांत वाक्यें विचित्रें ॥**
**स्वयें शेष मौनावला स्थीर पाहे।**
**मना सर्व जाणीव सांडून राहें ॥ १ ॥**

"वेद, न्याय, मीमांसा, तर्कशास्त्र, स्मृति, वेदांतील भिन्नभिन्न वाक्यें ह्यांची तरी ब्रह्मज्ञानाविषयीं एकवाक्यता कोठें आहे ? फार काय सांगावें ?

पण प्रत्यक्ष शेष सुद्धां सांगतां सांगतां थकला आणि मौन धरून बसला. ह्याकरितां हे मना ! तूं आपला मीपणा कशाला मिरवतोस ? तो सोडून दे."

'अहंता' हीच काय ती गोत्यांत घालणारी आहे. त्या अहंतेला किती मजेदार दृष्टांत दिला आहे तो पहाः—

**जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची ।**
**तया भोजनाची रुची प्राप्त कैची ॥**
**अहंभाव ज्या मानसींचा विरेना ।**
**तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥ १ ॥**

"अहंतारूप माशी ज्यानें गिळली, त्याला ज्ञानामृताचें भोजन पचणार कसें ? आणि त्याला त्याची रुचि तरी काय लागणार ? कारण त्याच्या पोटांत मळमळ असल्यानें वारंवार ढवळूनच येणार. ज्याच्या अंतःकरणांतील अहंभाव नष्ट होत नाहीं, त्याला आत्मज्ञानरूपी अन्नही जिरावयाचें नाहीं."

आतां सृष्टिकर्त्याविषयीं कल्पनाः—

**जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना ।**
**भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना ॥**
**क्षयातीत तो अक्षयीं मोक्ष देतो ।**
**दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो ॥ १ ॥**

"डाळ्यानें पाहूं म्हटलें तर ज्याला पाहतां येत नाहीं; तो संसाराचा नाश करूं लागला म्हणजे कितीही रक्षण केलें तरी तो टिकत नाहीं. त्याला कधींही क्षय नाहीं, तरी तो अक्षयीचा मोक्ष देतो. दया करण्यामध्यें तो मोठा तत्पर आहे. तो आपण अलिप्त राहून भक्ताचा कैवार मात्र घेतो."

खालच्या श्लोकांतील कल्पना मनास अत्यंत रिझविणारी आहेः—

**विधी निर्मितां लीहितो सर्वभाळीं ।**
**परी लीहितां कोण त्याचे कपाळीं ॥**
**हरू जाळितो लोक संहारकाळीं ।**
**परी शेवटीं शंकरा कोण जाळी ॥ १ ॥**

" ब्रह्मदेव ज्या प्राण्यास उत्पन्न करतो, त्याच वेळीं तो त्याचें जन्मलिखित त्याच्या कपाळावर लिहून ठेवतो. पण त्या ब्रह्मदेवाच्या कपाळावर जन्मलिखित लिहावयाचें तें कोण लिहितो ? प्रळयकाळीं शंकर हा सर्व लोकांस जाळून टाकतो. पण अखेरीस त्या शंकराला कोण जाळतें ? " अर्थात् ह्या सर्वांवर आणखी कोणीतरी अधिपति असला पाहिजे असा भाव.

पण असा देव तरी कोण ? देव पाहूं गेले तर त्यांचा सवंग सुकाळच आहे. त्यांपैकीं कांहीं ऐका:—

जनीं द्वादशादित्य हे रुद्र अक्रा ।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा ॥
जगीं देव धुंडाळितां आकळेना ।
जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना ॥ १ ॥

" जगांत पाहूं गेलें तर बारा आदित्य, अकरा रुद्र, आणि इंद्र तर असंख्यात; त्यांची मोजदाद करणार कोण ? परंतु खरा देव कोण ? तो शोध शोध शोधला तरी सांपडत नाहीं. आणि सर्वांत मुख्य कोण हेंही कळत नाहीं. "

तुटेना फुटेना कदा देवराणा ।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ॥
कळेना कळेना कदा लोचनासी ।
नसेना दिसेना जनीं मीपणासी ॥१ ॥

" देवाधिदेव आहे तो कधीं फुटतही नाहीं व तुटतही नाहीं. तो कधीं हालतही नाहीं आणि डुलतही नाहीं. डोळ्यांना तर तो कधीं दिसावयाचा नाहींच नाहीं आणि त्यांतून अहंपणा असला म्हणजे तो तर दिसावयाचा नाहीं आणि जगामध्यें तो आहे असें वाटावयाचेंही नाहीं. "

जया मानला देव तो पूजिताहे ।
परी देव शोधूनि कोणी न पाहे ॥
जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी ।
जया मानिली भक्ति जे तेच मोठी ॥ १ ॥

" ज्याला जो देव आवडतो त्याची तो पूजा करीत असतो. परंतु खरा देव कोण ? ह्याचा कोणीच विचार करीत नाहीं. जगामध्यें शोधूं लागलों तर देव हे काय, कोट्यावधि आहेत; परंतु ज्याला ज्याच्या भक्तीची आवड उत्पन्न होते, त्याचीच भक्ति त्याला प्रिय वाटते. "

खरा देव आहे तो सद्गुरुशिवाय कळत नाहीं:—

**तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले ।**
**तया देवरायासि कोण्ही न बोले ॥**
**जगीं थोरला देव तो चोरलासे ।**
**गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥ १ ॥**

" ज्याच्यापासून हें त्रैलोक्य उत्पन्न झालें, त्या देवाधिदेवाला कोणीच विचारीत नाहीं. खरोखर सर्व ब्रह्मांडामध्यें जो श्रेष्ठ देव आहे तो तर दडूनच बसलेला आहे. तो सद्गुरुशिवाय मुळींच कधीं दिसावयाचा नाहीं."

मग सद्गुरु तरी कोण ? भलत्यालाच सद्गुरु समजूं नका. कारण पुष्कळ लोक ढोंगी असतातः—

**गुरू पाहतां पाहतां लक्ष कोटी ।**
**बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ॥**
**मनीं कामना चेटकें धातमाता ।**
**जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥ २ ॥**

" गुरूच शोधावयास लागलें तर लक्षावधि, नव्हे कोट्यावधि सुद्धां दृष्टीस पडतात. पुष्कळांपाशीं नानाप्रकारचे मंत्र असून त्यांचेंही सामर्थ्य मोठें असतें. पण त्यांच्या पोटामध्यें आशा भरलेली असते. ते नाहीं नाहीं तीं चेटकें करतात. किमया करून दाखवितात. असे जगामध्यें अनेक प्रकारचे गुरू दृष्टीस पडतात. पण बाबारे ! असले गुरू सारे व्यर्थ होत. आपल्यास मुक्ति देणारा त्यांपैकीं कोणी एकही नाहीं. "

तर मग सद्गुरु असतो तरी कसा ?—

**नव्हे वाउगी चाउटी काम पोटीं ।**
**क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ॥**

**मुखें बोलिल्या सारिखें चालताहे।**
**मना सद्गुरू तोचि शोधून पाहे॥ १॥**

"पोकळ पांडित्य करावयाचें नाहीं. पोटामध्यें आशा धरावयाची नाहीं. कृतीशिवाय बडबड मात्र मोठी अशापैकीं नव्हे. बोलल्याप्रमाणेंच चालतो. हे मना! अशा प्रकारचा सद्गुरु असेल तोच हुडकून काढ."

बा मना! राम हा नेहेमीं तुझ्याजवळच आहे. तो तुला दिसावयाला एकच गोष्ट केली पाहिजे. ती कोणती?—

**सदा सर्वदा राम संनीध आहे।**
**मना सज्जना सत्य शोधूनि पाहे॥**
**अखंडीत भेटी रघूराज योगू।**
**मना सांडिरे मीपणाचा वियोगू॥ १॥**

"राम हा सदासर्वदा तुझ्याजवळच आहे. हे सज्जना मना! तूंच खऱ्याखोट्याचा विचार करून पहा, म्हणजे रामाचें दर्शन व सान्निध्य हें निरंतरचेंच आहे. मात्र तूं आपला मीपणा सोडून दे. म्हणजे रामाचा तुला मुळींच वियोग वाटणार नाहीं."

बरें, हा देव आहे तरी कसलासा?

**नव्हे जाणतां नेणता देवराणा।**
**नये वर्णितां वेदशास्त्रा पुराणां॥**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा।**
**श्रुती नेणती नेणती अंत त्याचा॥ १॥**

"देवाधिदेव आहे तो जाणताही नाहीं आणि नेणताही नाहीं. श्रुतीला, स्मृतीला किंवा पुराणांनाही त्याचें स्वरूप सांगतां येत नाहीं. तो दृश्यही नाहीं आणि अदृश्यही नाहीं. पण त्या सर्वांचा साक्षी आहे. त्याच्यापुढें वेद सुद्धां भ्रमांत पडले आहेत. त्यांना सुद्धां त्याचा अंत लागत नाहीं."

पण ह्यावर एक शंका उभी राहते:—

**वसे हृदयीं देव तो कोण कैसा।**
**पुसे आदरें साधकू प्रश्न ऐसा॥**

**देहे टाकितां देव कोठें रहातो ।**
**परी मागुता ठाव कोठें पहातो ॥ १ ॥**

" परंतु साधकानें मोठ्या आतुरतेनें ह्यावर असा प्रश्न केला कीं, आपण आपल्या हृदयांत देव आहे असें म्हणतां तर तो देव कोण ? आणि तो हृदयांत कसा काय राहतो ? आणि देह पडला म्हणजे मग तो कोठें जातो ? आणि पुन्हां तो आपल्याला दुसरी जागा कोठें पाहतो ? "

ह्याचें उत्तर खालच्या श्लोकांत दिलें आहेः—

**वसे हृदयीं देव तो जाण ऐसा ।**
**नभाचे परी व्यापकू जाण तैसा ॥**
**सदा संचला येतना जात कांहीं ।**
**तयावीण कोठें रिता ठाव नाहीं ॥ १ ॥**

" तर बाबारे ! हृदयामध्यें देव राहतो तो असा राहतो. लक्षांत ठेव. आकाश ज्याप्रमाणें सर्वांत व्यापून राहतें त्याप्रमाणेंच तोही सर्व व्यापून राहिलेला आहे. तो सर्वदा जिकडे तिकडे भरलेलाच आहे. तो कोठें येतही नाहीं आणि कोठें जातही नाहीं. त्याच्याशिवाय रिकामी जागा अशी कोठेंच नाहीं. "

**नभीं वावरे जो अणूरेणु कांहीं ।**
**रिता ठाव हा राघवावीण नाहीं ॥**
**तया पाहतां पाहतां तेंचि जालें ।**
**तेथें लक्ष आलक्ष सारें बुडालें ॥ १ ॥**

" आकाशामध्यें जे जे कांहीं अणुरेणू फिरत असतात त्यांतसुद्धां सारा राम—देवच—भरलेला आहे. त्याच्याशिवाय रिकामी अशी जागा कोठेंच नाहीं. त्याला पाहूं लागलें, त्याचा विचार करूं लागलें म्हणजे पाहतां पाहतांच आपणही तद्रूपच होतों, आणि आपण तद्रूप झालों म्हणजे पाहणें आणि न पाहणें हे सारेच प्रकार लयास जातात. "

**नभासारिखें रूप या राघवाचें ।**
**मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ॥**

**तया पाहतां देहबुद्धी उरेना।**
**सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना॥ १॥**

"ह्या रामचंद्राचें–देवाधिदेवाचें स्वरूप त्या आकाशासारखें आहे. त्याचें मनामध्यें चिंतन केलें असतां संसाराचें मूळच तुटून जातें. तें स्वरूप पाहिलें म्हणजे देह म्हणजे 'मी' ही बुद्धीच रहात नाहीं. सदा-सर्वकाळ एकसारखें तेंच स्वरूप पाहात राहावें असें वाटतें. तृप्ति म्हणून होतच नाहीं."

**अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे।**
**तिथें तर्क संपर्क तोही न साहे॥**
**अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें।**
**दुजेंवीण जे खूण स्वामि प्रतापें॥ १॥**

"तें रूप अत्यंत अनादि आणि अत्यंत विस्तृत असें आहे. त्यामध्यें तर्क, वितर्क सुद्धां चालत नाहींत. असें तें स्वरूप अत्यंत गूढ असूनही ज्ञानाच्या योगानें–विचारानें अगदीं तत्काल सहज कळून त्याबद्दल पूर्ण खात्री होते, आणि सद्गुरूच्या प्रसादानें तें स्वरूप दुसरें कोणतेंही नसून केवळ आत्मस्वरूप होय ही खूण पटते."

**कळे आकळे रूप तें ज्ञान होतां।**
**तेथें आटली सर्व साक्षी अवस्था॥**
**मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।**
**तो हा तोचि तो राम सर्वत्र पाहे॥ १॥**

"तें ज्ञान प्राप्त झालें कीं जें रूप समजतें व नेत्रांना दिसूं लागतें, आणि सर्वसाक्षित्वाची अवस्था तेथें कुंठीत होते. मन उन्नतीच्या स्थितीस पोंचून शब्दच कुंठीत होतात, आणि तोच तो राम जिकडे तिकडे दिसूं लागतो."

पण इतकें सर्व होण्याला साधन काय? तर साधन एकच. तें कोणतें? तरः—

**मना सर्वही संग सोडूनि द्यावा।**
**अती आदरें सज्जनाचा धरावा॥**

**जयाचेनि संगें क्षुहादुःख भंगे।**
**जनीं साधनावीण सन्मार्ग लागे ॥ १ ॥**

" हें जर तुला साधावयाचें असेल तर हे मना! इतर सर्व संगाचा परित्याग कर, आणि परमभक्तीनें सज्जनाची संगति धर. म्हणजे त्यांच्या संगतीनें केवढेंही दुःख असलें तरी तें नष्ट होईल, आणि इहलोकांतच इतर कोणत्याही खटपटींत न पडतां सन्मार्ग लागेल. म्हणून सत्संगति हेंच ह्या सर्वांचें मूळ आहे."

येथपर्यंत मनाच्या श्लोकांतील इत्यर्थ काय तो सांगितला. आतां मनाचे श्लोक वाचल्यापासून फलश्रुति काय ही गोष्ट सांगणें इष्ट आहे. तेवढा श्लोक देऊन हा भाग पुरा करूं. फलश्रुतीचा अंतिम श्लोक असा आहेः—

**मनाची शतें ऐकतां दोष जाती।**
**मतीमंद ते साधना योग्य होती ॥**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं।**
**म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥ १ ॥**

" हे मनाच्या शतकाचे श्लोक श्रवण केले असतां सारे दोष दूर होतात. बुद्धीचे जड असले तरी ते परमार्थसाधनाला पात्र होतात. अंगामध्यें ज्ञान, वैराग्य व सामर्थ्य येऊन तें वृद्धिंगत होतें. रामदास म्हणतात, ह्यावर जो कोणी विश्वास ठेवील तोच मुक्तिसौख्याचा उपभोग घेईल. मनाच्या श्लोकाच्या श्रवणपठणापासून कोणकोणते लाभ होतात ते समर्थांनीं स्वतःच ह्या श्लोकांत स्पष्टपणें निवेदन केले आहेत. तेव्हां त्याबद्दल पुनरुक्ति करण्याचें कारणच नाहीं.

येथपर्यंत समर्थांचा काव्यांपैकीं अत्यंत परिणामकारक काव्य जें 'मनाचे श्लोक' त्यांतील शक्य तेवढें रहस्य सांगितलें. ह्यावरून दिसून येईलच कीं, त्याची सुंदर रचना, यथायोग्य वृत्त व म्हणण्याची चाल, सूत्रवत् सिद्धांत व सुभाषित येणेंकरून त्याची योग्यता 'दासबोधाहूनही अधिकच आहे म्हटलें, तरी शोभेल.' समर्थांच्या उपासनेला, समर्थांच्या ग्रंथाला व समर्थांच्या चरित्राला आजकाल जागृति ठेवण्याला हे एक

मनाचे श्लोकच फार कारणीभूत आहेत. त्यांतील सूत्रमय सिद्धांत व सुभाषितें इतकीं बोधप्रद व प्रतिभासंपन्न आहेत कीं, प्रत्येक कुटुंबांतील बायकामुलांनींसुद्धां त्यांचें रात्रंदिवस पठपाठण करावें. रा. शंकरराव देवासारखे जे समर्थांचे निस्सीम भक्त कायावाचामनें करून त्यांच्या सेवेंत तनमनधन खर्ची घालीत आहेत, त्यांनांसुद्धां मनाचे श्लोक जितके स्फूर्तिदायक झाले असतील, तितकीं समर्थांचें चरित्र किंवा त्यांचीं इतर काव्येंसुद्धां झालीं नसतील असें आम्हांस वाटतें.

समर्थांचें सामर्थ्य जागृत ठेवण्याला, त्यांची उपासना पुढें चालविण्याला, रामदासी पंथ वृद्धिंगत करण्याला व त्याविषयीं आदर बुद्धि ठेवण्याला हे समर्थांचे श्लोकच साधनीभूत आहेत व त्यांच्याच उच्च घोषानें समर्थांच्या अनुग्रहाचा घरोघर लाभ होत असून हजारों रामदास भक्तांचा योगक्षेम चालत आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. प्रास अनुप्रास आणण्याची जी समर्थांची नेहेमींची हातोटी ती ह्या काव्यांतही उत्कृष्टपणें दृष्टोत्पत्तीस येते.

येथपर्यंत मनाच्या श्लोकांचा भाग आटोपला. आतां पुढील भागांत समर्थांच्या इतर काव्यांचें आलोचन करून त्यांतील सारामृताचें यथाशक्त्या घोट घेऊं.

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# रामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## उत्तरार्ध—भाग ४ था.

### अभंग व रामायण.

मागच्या भागांत समर्थांच्या मनाच्या श्लोकांचें विवरण झालें. आतां त्यापुढील ग्रंथांचें आलोचन करावयाचें. समर्थांच्या इतर ग्रंथांमध्यें अभंगांचा भरणा विशेष असून त्यांतही नानाविध विषय आहेत, आणि त्यांतही अनुपम उपदेश भरलेला आहे. आणखी विशेष गोष्ट ही कीं, ह्या छंदांची रचना उत्कृष्ट असून त्यांत काव्यचातुर्यही उत्तम प्रकारें व्यक्त होतें. ह्यासाठीं आतां प्रथम अभंगवाणीच श्रवण करूं या. अभंगांतील पहिलें प्रकरण—

### बालक्रीडा.

हें आहे. हें प्रकरण अगदीं लहान, केवळ ८९ लहान लहान अभंगांचें आहे. तथापि तेवढ्यांतच समर्थांच्या अंगचें कवित्वचातुर्य मनास अगदीं प्रसन्न करून सोडतें. ओंवी व अभंग हे दोन छंद साधे असून त्यांना मात्रागणांचा मोठासा कडक निर्बंध नाहीं, हें पूर्वींच्या भागांत आम्हीं सांगितलेंच आहे. श्लोकबद्ध काव्य करावयाला छंदःशास्त्राचा अभ्यास

अत्यावश्य लागतो. त्यांत थोडासा जरी कमीपणा असला तरी छंदोभंगादि दोष उत्पन्न होतात. अशा प्रकारचे बरेच दोष मनाच्या श्लोकांत आढळत असल्याचेंही आम्हीं पूर्वीं दाखविलेंच आहे. तसा प्रकार ह्या अभंगात्मक काव्यांत मुळींच नाहीं. इतकेंच नव्हे तर हें सारें काव्य अत्यंत शुद्ध असून शिवाय त्यांत उत्कृष्ट कवीचे गुण ओतप्रोत भरलेले आहेत. ह्या बालक्रीडेच्या अभंगांत समर्थांनीं आधीं एक अनुप्रासाचा चमत्कार फार आश्चर्यकारक साधला आहे. तो असा कीं, प्रत्येक अभंगाच्या शेवटीं जे एक दोन शब्द येतात, तेच पुन्हा दुसऱ्या अभंगाच्या आद्यस्थानीं आणून दुसरा अभंग केलेला आहे. ह्या सर्व अभंगांची रचना ह्याच कौशल्यानें युक्त आहे. मोरोपंत कवींनींही अशाच मासल्याची एका काव्यांत रचना केलेली आढळते. पंतांनीं निरनिराळ्या अक्षरांनीं युक्त १०८ रामायणें केल्याची प्रसिद्धि असून त्यांपैकीं ७३ रामायणें तर उपलब्ध आहेतच. त्यांत एक ‘दामरामायण’ म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या रामायणांतील प्रत्येक आर्येच्या शेवटचा शब्द [ अक्षर नव्हे, हें ध्यानांत ठेवावें. ] दुसऱ्या आर्येच्या आद्यस्थानीं योजून [ त्यांत दुसरा अर्थ साधला आहे हें विशेष ] त्याच नियमानें युक्त असें हें सर्व रामायण संपविलें आहे. प्रत्येक पद्यांतील शेवटचा शब्द दुसऱ्या पद्यांत प्रथमच आल्यामुळें ही मोड सांखळीसारखी दिसते, म्हणून हिला पंतांनीं ‘ दाम रामायण ’ असें नांव दिलें आहे. दाम म्हणजे दावें असा अर्थ. दाव्यामध्यें ज्याप्रमाणें दोन पदरांची गांठ देऊन दोहोंचें एक पेंडें बनविलें असतें, त्याप्रमाणें अशा पद्यरचनेचेंही पेंढेंच वळविलेलें असतें. अशीच रचना हुबेहुब समर्थांनीं ह्या अभंगांत केलेली आहे. अशा रचनेपासून एक मात्र फार मोठा फायदा असतो. तो हा कीं, एका पद्यापुढील दुसरें पद्य कोणतें तें ध्यानांत ठेवण्याची पंचाईत पडत नाहीं. कारण पहिल्याचा शेवट तोच दुसऱ्याचा प्रारंभ असतो. ह्या चमत्कृतिजनक दोनतीन अभंगांचा नमुनाच देतों, म्हणजे आम्ही सांगितलेल्या गोष्टींची नीट समजूत पटेल. ह्या अभंगात्मक प्रकरणाचा आरंभ असा आहेः—

**राहों सर्वकाळ गोविंदाचें नाम । कीर्तन उत्तम यादवाचें ।**
**यादवाचें कुळीं गोकूळीं गोविंद । आनंदाचा कंद अवतरला ॥१॥**

अवतरला पूर्ण अवतारी अच्युत । आयुधें मंडित चतुर्भुज ॥२॥
चतुर्भुज हरी डोळस सांवळा । वैजयंती माळा पीतांबर ॥३॥
पीतांबरधारी प्रगटे मुरारी । मथुरे माझारीं कंसगृहीं ॥ ४॥

ह्या वरील अभंगावरून याची जडणी कशी असते ही गोष्ट लक्षांत येईलच. समर्थांच्या ह्या काव्यांत ऱ्हस्वदीर्घादि अशुद्धें मुळींच नाहींत. त्यामुळें हें काव्य अत्यंत निर्मळ आहे, आणि त्यांत इतर काव्यगुण फार उत्कृष्ट रीतीनें नजरेस येतात. छंदोभंगांचा दोष होण्याचें यांत कारणच नाहीं हें पूर्वींही सांगितलें आहेच.

ह्याशिवाय 'कुळीं' 'गोकुळीं' 'गोविंद' 'आनंदाचा कंद' 'अवतारी' 'आयुधें' 'अच्युत' 'धारी' 'मुरारी' 'मथुरे' 'माझारी' इत्यादि शब्दांत अक्षरांची पुनरावृत्ति कशी साधली आहे ती पहा! ह्यावरून हें समर्थांचें काव्य अगदीं अत्युत्तम काव्यांत गणण्यासारखें आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.

ह्या अभंगात्मक प्रकरणांच्या संबंधानें आणखीही एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें अवश्य आहे. पहिली गोष्ट म्हणजे नांवाच्या संबंधानें. 'जुन्या दासबोधा' संबंधानें लिहितांना त्यावर 'रामीरामदास' असें नांव असल्याचें सांगितलेंच आहे. तसाच कांहीं प्रकार ह्या अभंगांतही आढळतो. म्हणजे कांहीं अभंगांत 'रामदास' असें नांव आहे; कांहीं मध्यें नुसतें 'दास' आहे, कांहींमध्यें 'रामदास' ही आहे. 'रामीरामदास' म्हणजे श्रेष्ठ ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे. तेव्हां ह्यापैकीं 'रामीरामदास' नांव घातलेले अभंग श्रेष्ठांचे असावेत असा संशय दृढ होणें साहाजिक आहे. आणि नुसत्या 'दास' नांवाखालीं असलेले अभंग कोणाचे? हा संशय कायमचा कायमच राहणार. ह्यास्तव त्याच्या निवडणुकीच्या भानगडींत न पडतां 'रामदास' या नांवाखालचे निवडक अभंग आहेत तेवढ्यासंबंधानेंच उहापोह करण्याचा आम्हीं केला आहे. म्हणजे त्या विवेचनासंबंधानें कोणालाच कांहीं संशयाला जागा राहणार नाहीं.

दुसरी ह्या अभंगात्मक काव्यांत विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे दैवतासंबंधानें होय. त्या काळीं ज्या भक्ताचें जें उपास्य

दैवत असे, त्याजवरच त्याची निस्सीम भक्ति असे. अन्य दैवत कोणतेंही असो, त्याचा ते सर्वस्वी तिरस्कार करीत. आपलें उपास्य दैवत सोडून ते अन्य दैवतास कधींही भजत नसत. इतकेंच नव्हे, तर त्याचें चुकून सुद्धां दर्शन घेत नसत. कित्येक भक्त तर इतर दैवतांचा नामोच्चार करणें सुद्धां पातक समजत. तुकारामांनीं सुद्धा इतर दैवतांस अशींच नावें ठेवून आपला 'पंढरीरावच' श्रेष्ठ असा अभिमान बाळगला आहे. खालचा अभंग पहा:—

**नव्हे जाखाई जोखाई । मायराणी म्हैसाबाई ॥**
**गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ॥**
**बळिया माझा पंढरिराव । जो का देवांचाही देव ॥**

'जाखाई' 'जोखाई' राहूं द्या; परंतु गणपति हें तर वैदिक धर्मातील आद्य दैवत होय. चिंचवडाच्या मोरयागोसाव्यांचें उपास्य दैवत 'श्रीगजानन' हें तर सुप्रसिद्धच आहे. असें असतांही तुकाराम महाराजांनीं त्याच गणपतीला 'गणोबा' म्हटलें आहे, 'विक्राळ' म्हटलें आहे; इतकेंच नव्हे तर तो केवळ 'लाडू मोदकांचा काळ' असें म्हणण्यासही कमी केलें नाहीं. आणि आपल्या उपास्य दैवताला 'पंढरीराव' म्हटलें आहे, 'माझा' म्हटलें आहे, त्याला 'बळिया' विशेषण लावलें आहे; एवढेंच नव्हे तर 'जो का देवांचाही देव' अशी पदवी दिली आहे. ह्यावरून तत्कालीन भक्तांना, साधुवर्यांना आपल्या उपास्य दैवताचा केवढा अभिमान असे, ते त्याचा केवढा गौरव करीत, ते त्याला किती श्रेष्ठ समजत, व इतर उपास्य देवतांना किती गौण समजत ह्याचा चांगलाच दाखला पटतो.

नरहरि सोनाराची गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे. तो कट्टा शिवभक्त होता. तो चुकून सुद्धां कधीं विठोबाचें दर्शन घेत नसे. परंतु एका श्रीमान भक्तानें विठोबाला सुवर्णाचा कटिबंध अर्पण करण्याचा नवस केला होता, व नरहरी सोनारासारखा दुसरा उत्तम कारागीर मिळेना म्हणून त्यानें तें काम नरहरीकडे दिलें. त्यानें उत्तम प्रतीचा कटिबंध तयार केला पण तो देवाच्या कमरेला बसेच ना. मोजमाप नेलें तरी व्यर्थ!

अखेर नरहरीला स्वतः जाऊन तो प्रत्यक्ष बसविण्याचा प्रसंग आला. पण तो ती गोष्ट कबूल करीना! कारण, विठोबाला—अन्य दैवताला—डोळ्यांनीं पहावयाचें नाहीं हें व्रत! अखेर त्यानें डोळे बांधून तें काम केल्याची कथा संतमालिकेंत गोंवलेलीच आहे!! इतकी त्याकाळीं आपल्या उपास्य दैवताची निष्ठा व अन्य दैवताची तिरस्कारबुद्धि भक्तांच्या अंतःकरणांत उद्भवलेली असे.

समर्थांच्या संबंधानें सुद्धां अशी आख्यायिका आहेच कीं, ते पंढरपुरास प्रथम जात नसत, कारण तेथें माझा राम नाहीं असें म्हणत. अखेर इतर भगवद्भक्तांनीं त्यांस फारच भीड घातल्यामुळें ते पंढरीस गेले, व तेथें विठ्ठलाची मूर्ति तीच रामचंद्राची मूर्ति दिसूं लागली, हीही आख्यायिका पूर्वी आलीच आहे. तेव्हां समर्थांनीं ‘रामायण’ वगैरे काव्यें केलीं तें उक्तच झालें. कारण, ते त्यांच्या उपास्य दैवताचेच गुणानुवाद होते. पण चमत्कार हा आहे कीं, या अभंगांत त्यांनीं गोपालकृष्णाची बालक्रीडा वर्णन केली आहे आणि तीहि अत्यंत प्रेमळपणानें व भक्तिभावानें केली आहे, हें त्यांतील रसाळ वाणीवरून अगदीं स्पष्ट कळण्यासारखें आहे. ह्यावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं, समर्थांना आपल्या उपास्य दैवताचा जरी अभिमान होता, त्याच्यावर त्यांचा परिपूर्ण विश्वास होता, तरी इतर दैवतांविषयीं त्यांना मुळींच तिरस्कार नसे. ते कोणत्याही देवतेला पूज्यच समजत. ते पंढरपुरास गेले होते; जेजुरीस जाऊन त्यांनीं खंडोबाचें दर्शन घेतलें होतें; नायट्याचा नवस फेडण्यासाठीं त्यांनीं अंबाबाईस सुवर्णपुष्प वाहून फेडला होता; कल्याण स्वामींसाठीं त्यांनीं बहिरोबास नवसाचा गूळ वांटला; शिवाजीमहाराजांस श्रावण मासांत कोटि लिंगें करावयास सांगितलीं; भवानीच्या प्रसादानेंच रामांनीं रावणाचा वध केला, इत्यादि समजूत घातली. ह्यावरून उघड होतें कीं, समर्थांची आपलें उपास्य दैवत जें रामचंद्र त्याच्यावर जरी एकनिष्ठ भक्ति होती, त्याचा परिपूर्ण भरंवसा होता तरी, अन्य देवतांस ते तुच्छ मानीत नसत. एवढेंच नव्हे, तर ते कोणत्याही देवतेस पूज्यच मानीत. ज्यांस विशिष्ट अशी कोणतीच उपासना नसून जे कोणी त्यांस शरण येत, त्यांच्यापासून अनुग्रह घेत त्यांसच ते रामाची उपासना करावयास सांगत. नाहींतर ज्याची

ञी उपासना असेल, तीच त्यानें चालवावी असेंच त्यांचें सांगणें असे. निराकार, निर्विकार अशा एका परब्रह्मापासूनच हे परमेश्वराचे अवतार झाले आहेत असेंच त्यांचें सांगणें होतें व तेंच त्यांनीं 'दासबोध', 'आत्माराम' 'मनाचे श्लोक' इत्यादि ग्रंथांतून स्पष्टपणें सांगितलेंही आहे. असें असतां शिवचरित्रकार म्हणतात, 'शिवाजीनें कधीं आपल्या भवानीची भक्ति सोडून श्रीरामाची उपासना केल्याचा दाखला नाहीं!' हा किती चमत्कार आहे! समर्थांनीं कधीं कोणास सांगितलें होतें कीं, आपलें उपास्यदैवत टाका आणि रामाची उपासना धरा. ज्यांची कोठेंच दृढतर भक्ति नसे; व जे संशयांत पडल्यामुळें त्यांस शरण येऊन अनुग्रह घेत त्यांसच ते रामाची किंवा मारुतीची उपासना करावयास सांगत. असें त्यांचें तत्त्व उच्च प्रतीचें होतें; असो.

ह्या 'बाळक्रीडेच्या' अभंगांत समर्थांनीं जी श्रीकृष्णाची लीला वर्णन केली आहे, ती भक्तिरसानें परिप्लुत असून तींत काव्यप्रतिभा तर रसिकांनीं मान डोलविण्यासारखी आहे. खालील अभंगांत श्रीकृष्णाचा जन्म आणि कंसाची उडालेली हबेलंडी किती रसभरित आहे पहा:—

**अवतरला पूर्ण अवतारी अच्युत। आयुधें मंडित चतुर्भुज ॥**
**चतुर्भुज हरी डोळस सांवळा। वैजयंतीमाळा पीतांबर ॥**
**पीतांबरधारी प्रकटे मुरारी। मथुरे माझारीं कारागृहीं ॥**

× × × ×

**विश्रांतिसी आले स्थळ पालटलें। नवल जाणवलें कंसराया ॥**
**कंसराय जाय मारूं आपटूनी। मन गडबडोनी उसळला ॥**
**उसळला म्हणे कंसा तुझा वैरी। गोकुळामाझारी वाढतसे ॥**

× × × ×

**थोर चिंता करी म्हणे माझा वैरी। वाढतसे मारी कोण आतां ॥**
**कोण आतां तरी करावा उपाय। वैरीया अपाय होय जेणें ॥**
**होय जेणें मृत्यु तया बाळकासी। तव आले जोशी म्हाबळभट ॥**

आतां म्हाबळभटांची संभावना——

**नंदजीचें बाळ आलें मुळावरी। बैसवूनि नारी सांगतसे ॥**
**सांगतसे म्हणे हें तुम्हां वाईट। कुळाचा शेवट करूं आलें ॥**

दिसतसें दुष्ट सांगतों मी स्पष्ट। बुद्धीनें वरिष्ठ आहों आम्ही ॥
आहां तुम्ही माझे कीं हो यजमान। म्हणोनि सांगणें लागे आम्हां॥
लागे आम्हा शब्द ऐसें न करावें। सत्वर वधावें लेंकुरासी ॥
लेंकुरासी क्रोध ऐकुनी वचन। मग पिढेदान आरंभीलें ॥
पळतसे पुढें मागें पिढें जाय। पृष्ठीचें कंदन तें होतसे ॥
पळतसे भय भरलें अंतरीं। म्हणे हरी हरी नारायण ॥
नारायणें मज रक्षिलें जीवेसीं। दावी रामापाशीं पृष्ठभाग ॥
पृष्ठभागीं थोर झालेसें ताडण। भटो बहू शीण पावलेती ॥

नंतर पूतनामावशी निघाल्या, त्यांची बोळवणः—

पावली पूतना म्हणे काय झालें। बाळकें मारीलें ब्राह्मणासी ॥
शीघ्रकाळें विष भरी पयोधर। पावली मंदीर पूतना ते ॥

× × × ×

बाळकासि पुढें घेउनी चुंबन। देत स्तनपान आदरेंसी।
आदरेंसी हरी स्तनपान करी। पूतना अंतरीं जाजावली।
जाजावली म्हणे पुरे बापा आतां। जाऊंदे अनंता सोड वेगीं ॥
सोड वेगें हातें लोटीलें श्रीमुख। निघेना बाळक शोषीतसे ॥
शोषीली पूतना आक्रंदे मानसीं। मुकली प्राणासी कृष्ण मुखें ॥

पुढें कालियामर्दनांतील भागः—

गौळियांच्या गाई राखी तये वेळीं। खेळे चेंडूफळी गोपाळांसी ॥
गोपाळांसी चेंडू खेळतां उडाला। जाउनी बुडाला डोहामध्यें ॥१॥

× × × ×

डोहामाजी क्रूर कालिया विखार। परस्परें थोर युद्ध झालें ॥
युद्ध झालें थोर कालिया नाथिला। गोकुळासी आला कृष्णनाथ॥१॥

ह्याप्रमाणें श्रीकृष्णाची सर्व बाललीला संक्षेपानें ह्या प्रकरणांत गोंवली आहे. ह्यांतील वर्णनशैली अत्यंत रसभरित आहे, व ह्या पद्यांची जडणीही फार मनोवेधक आहे. ह्यास्तव समर्थांचें सारें काव्य वाचावयास कोणास सवड न झाली, तर निदान येवढा भाग तरी एक वेळ वाचावा अशी आमची अगत्याची सूचना आहे.

ह्यापुढें ( १ ) वैराग्यशतक, ( २ ) ज्ञानशतक, ( ४ ) उपदेशशतक, ( ५ ) सगुण निर्गुण शतक, अशीं पांच शतकें आहेत. ह्यांतील बहुतेक सारभूत विषय दासबोधांतच आलेला असल्यामुळें त्यांतील सारासार विचार सांगण्याच्या भरीस न पडावें तें बरें. कारण समर्थांच्या कविता म्हणजे एक महोदधि आहे. त्याचें तथातथ्य शोधन तरी करणार कोण ?

ह्याच्यापुढें ‘ भक्ति पंचक, ’ ‘ कलियुग पंचक ’ मूर्ख पंचक ’ अशीं ३८ पंचकें आहेत. ह्यांपैकीं कित्येकांतील विषय अत्यंत बोधक, मार्मिक असून मनास फार आल्हाद देणारे आहेत. ह्याकरितां त्या पैकीं कांहीं थोडेसे वेचक अभंग देतों:—

‘ भक्ति पंचकांत ’ अन्नावरच मोठी मौज केली आहे. त्यांतील काहीं वेचे:—

अन्न व्हावें पोटभरी । मग ते ज्ञान चर्चा करी ॥ १ ॥
ऐसें बोलती अज्ञान । ज्यांसि नाहीं समाधान ॥ २ ॥
आधीं अन्न तें पाहिजे । मग ध्यानस्थ राहिजे ॥ ३ ॥
अन्नावीण तळमळ । अन्न करितें सकळ ॥ ४ ॥
कैचाराम कैचादास । अवघा पोटाचा सायास ॥ ५ ॥

× × × ×

देव तारी देव मारी । देव कांहीं सर्व करी ॥ १ ॥
अन्नोदक देवें केलें । सर्व तेणेंचि निर्मिलें ॥ २ ॥
तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करितीं वेडीं ॥ ३ ॥
रामदास म्हणे एक । देव त्रैलोक्यनायक ॥ ४ ॥

× × × ×

देव एका भाग्य देतो । एका भिकेसि लावितो ॥ १ ॥
भगवंताचें करणें । राव रंक तत्क्षणें ॥ १ ॥
तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करितीं वेडीं ॥ ३ ॥
रामदास म्हणे पाहीं । देवावीण कांहीं नाहीं ॥ ४ ॥

× × × ×

हात धुणें पाय धुणें । नाना उपचार करणें ॥ १ ॥
सर्व काळ लोभासंगें । करणें लागे हो अव्यंगें ॥ २ ॥

वस्त्रें अलंकार पहातां । पुढती घालितां काढितां ॥ ३ ॥
सदा इंद्रिय गळतां । त्यासि करावी शुद्धता ॥ ४ ॥
अवघा धंदाचि लागला । दिवसेंदिवस काळ गेला ॥ ५ ॥
रामदास म्हणे हित । कैसें घडावें स्वहित ॥ ६ ॥

× × × ×

कलियुगपंचक:—

आलें भगवंताच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥
जैसा कलिराजा आला । धर्म अवघाचि बुडाला ॥ २ ॥
नीती मर्यादा उडाली । भक्ति देवाची चुकली ॥ ३ ॥
दास म्हणे पाप झालें । पुण्य अवघेंचि बुडालें ॥ ४ ॥

× × × ×

विप्रीं सांडिला आचार । क्षेत्रीं सांडिला विचार ॥ १ ॥
मेघवृष्टि मंदावली । पिकें भूमीनें सांडिलीं ॥ २ ॥
बहु वृष्टी अनावृष्टी । दास म्हणे केली सृष्टी ॥ ३ ॥

मूर्ख पंचक—हरिकथेचा वीट:—

येथें कायरे वाजतें । कोठें काय गजबजतें ॥ १ ॥
उगा करिती कल्होळ । माझें उठलें कपाळ ॥ २ ॥
हाका मारूनि वरडती । टाळ अवघेचि कुटती ॥ ३ ॥
कोठें केंचे आले लुटे । वायां झाले टाळकुटे ॥ ४ ॥
वेडी संसार सांडिला । व्यर्थ गलबला मांडिला ॥ ५ ॥
दास म्हणे या मूर्खाला । हरिकथेचा कंटाळा ॥ ६ ॥

× × × ×

हरिकथेचा आला राग । खेळ होतां घाली त्याग ॥ १ ॥
ऐसे प्रकारचे जन । नाहीं देवाचें भजन ॥ २ ॥
कळावंताचें तों गाणें । ऐकतांचि जीव माने ॥ ३ ॥
करितील लग्नाचा उत्सव । नाहीं देव महोत्सव ॥ ४ ॥
भूतदया नाहीं पोटीं । खाती लोभाचीं चोरटीं ॥ ५ ॥
रामीं रामदास म्हणे । देव धर्म कोण जाणे ॥ ६ ॥

× × × ×

जन्मवरी शीण केला । अंतकाळीं व्यर्थ गेला ॥ १ ॥
काया स्मशानीं घातली । कन्या पुत्र मुरडलीं ॥ २ ॥
घर वाडा तो राहिला । प्राणी जातसे एकटा ॥ ३ ॥
धनधान्य तें राहिलें । प्राणी चर्फाडित गेले ॥ ४ ॥
इष्ट मित्र आणि सांगाती । आपुलाले घरा जाती ॥ ५ ॥
दास म्हणे प्राणी मेले । कांहीं पुण्य नाहीं केलें ॥ ६ ॥

× × × ×

अंतिम स्थितिः—

दैन्यवाणा झाला प्राणी । चंद्री लागली नयनीं ॥ १ ॥
म्हणती ऊचला ऊचला । आतां भूमीभार झाला ॥ २ ॥
घोर लागला अमूप । प्राणी झाला प्रेतरूप ॥ ३ ॥
दांतखीळ बसली वाणी । ताठा भरला करचरणीं ॥ ४ ॥
डोळे विक्राळ दिसती । झांका झांका मुले भीती ॥ ५ ॥
रामी रामदास म्हणे । अवघीं सुखाचीं पीसुने ॥ ६ ॥

× × × ×

स्नान नाहीं संध्या नाहीं । देव नाहीं धर्म नाहीं ॥ १ ॥
उगाच बसूनीया घरीं । सज्जनाची निंदा करी ॥ २ ॥
तीर्थ नाहीं क्षेत्र नाहीं । दान नाहीं पुण्य नाहीं ॥ ३ ॥
तप नाहीं शास्त्र नाहीं । मंत्र नाहीं गायत्री नाहीं ॥ ४ ॥
पोटीं नाहीं निस्पृहता । नाहीं विद्येनें पूरता ॥ ५ ॥
रामदास सांगे खुणें । पापी सर्वांपरी उणें ॥ ६ ॥

उन्मत्तपंचकः—

ज्याच्या उदरासि आला । त्यासी फिरोनी पडला ॥ १ ॥
तोचि जाणावा चांडाळ । देव ब्राह्मणांचा काळ ॥ २ ॥
झाला स्त्रियेसी लंपट्ट । मायबापांसि उद्धट्ट ॥ ३ ॥
भय पापाचें न धरी । सज्जनाची निंदा करी ॥ ४ ॥
तेणें माय कीं मावशी । कोणें सांगावें तयासी ॥ ५ ॥
रामी रामदास म्हणे । यम केला त्या कारणें ॥ ६ ॥

परधीन पंचकः—

ऐसें कैसें रे भजन। करिताति मूर्खजन ॥ १ ॥
गधड्यासि नमन केलें। तेणें थोबाड फोडिलें ॥ २ ॥
उंच नीच सारिखेची। दास म्हणे होत छी छी ॥ ३ ॥

प्रास्ताविक पंचक–वार्धक्यदशाः—

डोळे खिरीव चांगले। वृद्धपणीं सरक्या झाले ॥ १ ॥
ओले मातीचा भरंवसा। काय मानीसी माणसा ॥ २ ॥
मुख रसाळ चांगलें। पुढें अवघें सुर्कुतलें ॥ ३ ॥
रम्य नासीक सरळें। सर्व काळ पाणी गळे ॥ ४ ॥
कर्णभूषणें सुंदर। पुढें जाहलीं बधिर ॥ ५ ॥
बरवी दंतांची पंगती। परी उन्मळोनी पडती ॥ ६ ॥
बरवे कर आणि चरण। परि ते झाले निष्कारण ॥ ७ ॥
अंगकांती होती बरी। झाली चिरगुटाचे परी ॥ ८ ॥
केश होताती पांढरे। लाळ गळतां नांवरे ॥ ९ ॥
बहु साल होतें बळ। पुढें जाहाल निर्बळ ॥ १० ॥
देह होतें जें निर्मळ। तेंचि झालें अमंगळ ॥ ११ ॥
सर्व तारुण्यें चंगला। प्राणी दीनरूप झाला ॥ १२ ॥
रामारामदास म्हणे। आतां सावधान होणें ॥ १३ ॥

× × × ×

सेवकासि भाग्य चढे। त्याचे अधीन होणें पडे ॥ १ ॥
देव करील तैसें व्हावें। काय करील तें पहावें ॥ २ ॥
वर्तमान घडे जैसें। उगेच व्हावें लागे तैसें ॥ ३ ॥
दास म्हणे वेळ कैसी। राज्य जाहले कलीसी ॥ ४ ॥

× × × ×

ऐसें कैसें रे सोवळें। शिवता होतसे ओवळें ॥ १ ॥
स्नानसंध्या टिळे माळा। पोटीं क्रोधाचा उमाळा ॥ २ ॥
नित्य दंडितोसि देह। परी फिटेना संदेह ॥ ३ ॥
बाह्य केली झळफळ। देह बुद्धीचा विटाळ ॥ ४ ॥

नित्य नेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥ ५ ॥
रामदासीं दृढ भाव । तेणेंविण सर्व वाव ॥ ६ ॥

× × × ×

देह विटाळाचा गोळा । कैसा होतसे सोवळा ॥ १ ॥
तुज कळेना विचारू । पैसांयासीं काय करूं ॥ २॥
दृढ केला अभिमान । येणें साधनें बंधन ॥ ३ ॥
रामदास स्वामींविण । केला तितुका होय शीण ॥ ४ ॥

वैराग्य पंचकः—

प्रपंच सांडुनीया बुद्धी । जडली परमार्थ उपाधी ॥ १ ॥
मना होईं सावचित्त । त्याग करणें हा उचित ॥ २ ॥
संप्रदाय समुदाय । तेथें जडे अहंभाव ॥ ३ ॥
रामदास म्हणे नेम । भिक्षा मागणें उत्तम ॥ ४ ॥

× × × ×

देह बहुतांचे खाजे । मूर्ख म्हणे माझें माझें ॥ १ ॥
विंचू विखारें अजगर । नाना श्वापदें अपार ॥ २ ॥
नाना पक्षी गीध काक । श्वान मार्जार जंबूक ॥ ३ ॥
लाव लासी भूत खेत । सांगो जातां असंख्यात ॥ ४ ॥
किती सांगा वारंवार । जीव जीवाचा आहार ॥ ५ ॥
म्हणे रामी रामदास । कैंचा देहाचा विश्वास ॥ ६ ॥

× × × ×

कोणें कोणासी रडावें । एकामागें एक जावें ॥ १ ॥
एक वेळ गेली माता । एक वेळ गेला पिता ॥ २ ॥
द्रव्य दारा जाती पुत्र । जिवलगे आणि मित्र ॥ ३ ॥
प्राणी संसारासी आला । तितुका मृत्युपंथें गेला ॥ ४ ॥
पूर्वज गेले देवापासीं । तेचि वाट आपणांसी ॥ ५ ॥
रामदास म्हणे लोक । करी गेलियांचा शोक ॥ ६ ॥

संशय पंचक—संतांचीं लक्षणेंः—

तेचि जाणावे सज्जन । जया शुद्ध ब्रह्मज्ञान ॥ १ ॥
जंववरी देहाची संगती । तंववरी सगुणा भजती ॥ २ ॥

जाणोनीया सारासार। सदा श्रवणीं तत्पर ॥ ३ ॥
बाह्य त्याग संपादणें। अंतर त्याग निरूपणें ॥ ४ ॥
कर्म करीती आवडी। फलाशांची नाहीं गोडी ॥ ५ ॥
शांति क्षमा आणि दया। सर्व सख्य मानी जया ॥ ६ ॥
हरिकथा निरूपण। सदा श्रवण मनन ॥ ७ ॥
बोलासारिखे चालणें। हींच संतांचीं लक्षणें ॥ ८ ॥
एकनिष्ठ उपासना। अति तत्पर भजना ॥ ९ ॥
स्वार्थ सांडुनिया देणें। नित्य तेंचि संपादणें ॥ १० ॥
म्हणे रामी रामदास। जया नाहीं आशापाश ॥ ११ ॥

नीतिपंचकः—

कामक्रोधें खवळला। तेणे सन्निपात झाला ॥ १ ॥
त्यास औषध करावें। पोटीं वैराग्य घरावें ॥ २ ॥
कुपथ्य अवज्ञेचें झालें। मग तें पुढें उफाळलें ॥ ३ ॥
मर्यादेनें निबुंझलें। वारें अभिमानें घेतलें ॥ ४ ॥
दडपणाचा घाम आला। प्राणी उठोनि पळाला ॥ ५ ॥
रामदास म्हणे भले। लोक म्हणती पिसाळले ॥ ६ ॥

भक्ति पंचकः—एकादशीमहात्म्यः—

एकादशी नव्हे व्रत। वैकुंठीचा महा पंथ ॥ १ ॥
देवभक्त वेलाईत। रावरंक नाहीं तेथ ॥ २ ॥
एकादशीं उपोषणें। विष्णुलोकीं ठाव घेणें ॥ ३ ॥
रामी रामदास म्हणे। काय प्रत्यक्षा प्रमाणें ॥ ४ ॥

× × × ×

रुक्मांगद होता नर। आम्ही काय आहों खर ॥ १ ॥
देवभक्त वेलाइत। रावरंक नाहीं तेथ ॥ २ ॥
तेणें नेला अवघा गांवूं। आम्ही स्वयें तरी जाऊं ॥ ३ ॥
रामी रामदासीं काज। धरा एकामेकां लाज ॥ ४ ॥

× × × ×

ध्यानपंचकः—

मुकुट किरीट कुंडलें । तेज रत्नांचें फांकलें ॥ १ ॥
ऐसा राम माझे मनीं । सदा आठवे चिंतनीं ॥ २ ॥
कीर्तीमुखें बाहुवडे । दंडीं शोभती गोमटे ॥ ३ ॥
जडित रत्नांचीं भूषणें । दशांगुळीं वरि कंकणें ॥ ४ ॥
कासे शोभे सोनसळा । कटिं सुवर्ण–मेखळा ॥ ५ ॥
चरणीं नूपुरांचे मेळे । वांकी गर्जती खळाळे ॥ ६ ॥
राम सर्वांगीं सुंदर । चरणीं ब्रीदांचा तोडर ॥ ७ ॥
सुगंध परिमळ दुसरें । झेंपावती मधुकरे ॥ ८ ॥
गळां पुष्पांचीया माळा । वामे शोभे भूमीबाळा ॥ ९ ॥
स्वयंभ सुवर्णाची कास । पुढें उभा रामदास ॥ १० ॥

आपत्तिः—

वेळे पाऊस पडेना । नासकवणी उघडेना ॥ १ ॥
ऐसें कुळवाडयाचें बंड । दुःख जाहलें उदंड ॥ २ ॥
बहु पडी आलें शेत । रेड्यापाड्यांचें आउत ॥ ३ ॥
कांहीं केल्यानें पिकेना । धान्य वेळेस विकेना ॥ ४ ॥
फाळा लाविला उदंड । अवघें जाहलें थोतांड ॥ ५ ॥
वारीं रोगांचीं वाजतीं । नाना आभाळें फारतीं ॥ ६ ॥
टोळपक्षीमूषकादिक । खातीं श्वापद आणिक ॥ ७ ॥
दावेदारांची यातना । चोरां पोरां राहवना ॥ ८ ॥
नित्य पोटाचे मजुर । वेठाखालीं निघे उर ॥ ९ ॥
घर खोंपट मोडकें । एक पटकूर फाटकें ॥ १० ॥
बहु रोगें गुरें गेलीं । धारणीनें मुलें मेलीं ॥ ११ ॥
सर्व संसार बुडाला । दास म्हणे जोगी झाला ॥ १२ ॥

हाच अभंग एखाद्या खेड्यांत नेऊन एखाद्या शेतकऱ्याला हल्लीं जी वाचून दाखविला तरी त्याला किती बरें पटेल ? जणो काय आपलें 'आत्मचरित्रच' लिहिलेलें आहे असें त्यास वाटणार नाहीं काय ? अगदीं खरोखर वाटेल. इतकी ही शेतकऱ्याची आपत्ति हुबेहुब रेखाटलेली आहे.

वड पिंपळ वाढले । बहुसाल विस्तारले ॥ १ ॥
तरि ते जाणावे निर्फळ । त्याचें खातां नये फळ ॥ २ ॥
नाना वृक्ष फळेंवीण । परि ते जाणा निष्कारण ॥ ३ ॥
रामदास म्हणे विचार । नसतां तसे होती नर ॥ ४ ॥

समर्थ म्हणतात "एक विचार नसला म्हणजे असलेच 'खायाला काळ आणि धरणीला भार' असेच पुरुष निर्माण होतात"

खालच्या अभंगांत देवाचा किती भरंवसा वाटतो तो पहाः—

देव म्हणे मी जात नाहीं । आतां चिंता न करीं कांहीं ॥१॥
मज पाहावें संतांपासीं । सेवीं जाणत्या भक्तासी ॥ २ ॥
मज जाणावें विचारें । सगुणाचें भजन द्वारें ॥ ३ ॥
देव म्हणतो दासासी । रे मी आहे तुजपासीं ॥ ४ ॥

खालचे दोन तीन अभंग लहानच आहेत, पण ते केवळ्या ईश्वर-निष्ठेचे आहेत पहाः—

माझीं ब्रीदें कां विसरतां । आणि व्यर्थ कां चेष्टतां ॥ १ ॥
भक्तवत्सल दीनानाथ । तुम्हां आधार समर्थ ॥ २ ॥
भय दाखवी निवारी । तोचि सर्व चिंता करी ॥ ३ ॥
दासा समीप राहतो । योग क्षेमही वाहतो ॥ ४ ॥

'दासा समीप राहतो' आणि 'योगक्षेमही वाहतो' येवढा अंतःकरणांत भरंवसा असल्यावर मग आणखी ते कार्यकर्त्या पुरुषाला काय पाहिजे !

मज गांजिलें तें साहे । परि भक्तांचें न साहे ॥ १ ॥
माझ्या भक्तां शीण व्हावा । मग मज त्यास दावा ॥ २ ॥
मज अवतार घेणें । माझ्या भक्तांचे कारणें ॥ ३ ॥
निज दासांसि पाळावें । दुर्जनासी निर्दाळावें ॥ ४ ॥

× × × ×

आतां बोलावें तें किती । मनीं पाहावी प्रचिती ॥ १ ॥
तुम्हां संकटांचे वेळे । काय झांकितों मी डोळे ॥ २ ॥
सेवकाचा साभिमान । समर्थांचें हें लक्षण ॥ ३ ॥
देव म्हणे दास जनीं । चिंता न धरावी मनीं ॥ ४ ॥

'होळी पंचकामध्यें' होळीचें रूपक फार मौजेचें केलें आहे. त्यांतील रहस्य समजावयाला थोडासा विचार करावा लागतो, तरी विरक्त मनुष्य संसाराची होळी करून त्यांतील खोबरें कसें खातो हें सांगण्याची समर्थांची शैली अनुपम आहे यांत शंका नाहीं. हा अभंग असा आहे:—

अवघेचि बोंबलती । होळीच्या भोंवतीं भोंवतीं ॥ १ ॥
माया होळी प्रज्वळली । सृष्टि वेव्हारें लाविली ॥ २ ॥
ज्या कारणें गुंडाळती । तेंचि वाचे उच्चारिती ॥ ३ ॥
होळीमध्यें खाजें आहे । तें तूं विचारूनि पाहे ॥ ४ ॥
खाजें खातां सुख होय । परि कठीण हातां नये ॥ ५ ॥
खोल दृष्टीनें पाहिलें । खाजें त्याच्या हातां आलें ॥ ६ ॥
एक उडी घालूं जाती । लंडी चुकोनी पडती ॥ ७ ॥
एक देहाचें पांगलें । तेचि आगीं हुर्पळले ॥ ८ ॥
उडी अवघ्यांचीच पडे । परि तें हातांस न चढे ॥ ९ ॥
एके थोर धीर केला । खाजें घेऊनी पळाला ॥ १० ॥
एक आपणचि खाती । एक सकळांते वांटिती ॥ ११ ॥
एक घेऊनि पळाले । तंव त्यावरि पडे जाळें ॥ १२ ॥
रामीरामदास होळी । केली संसाराची धुळी ॥ १३ ॥

हें रूपक असल्यानें ह्याचे अर्थ दोन आहेत हें उघड आहे. एक व्यवहार दृष्ट्या किंवा लौकिक दृष्ट्या आणि दुसरा तात्विक दृष्ट्या किंवा परमार्थ दृष्ट्या. लौकिक दृष्ट्या अर्थ असा:—

"शिमग्यांतील होळी पेटलेली पाहून सारे लोक तिच्याभोंवतीं जमतात, बोंबलतात, आरडाओरडा करितात! ही होळी मायेचीच असते. म्हणजे त्यांची त्यांनींच पेटविलेली असते. पण ती भडकली कीं, सारेंच सृष्टिचक्र उलटतें. जें गुह्य गुप्त ठेवावें म्हणून सर्वांनीं वस्त्राच्छादन केलेलें असतें, त्याच गुह्याच्या तोंडानें नामावळी सुरूं होतात! म्हणून तुला वाईट वाटत असेल, पण त्या होळीच्या आंत नारळ आहे; खोबरें आहे तें तुला कोठें माहीत आहे? तें कोठें आहे तें पहा. खोबरें तर मोठें फक्कड आहे बुवा! पण तें हातीं लागणें कठीण दिसतें. एकानें

बारीक दृष्टीनें न्याहाळून पाहिलें तों त्याला खोबऱ्याची वाटी तर दिसली, म्हणून सारेच जिभळ्या चाटूं लागले. एकानें आतांच उडी टाकून खोबरें चटकर घेऊन यावें म्हणून उडी टाकण्याचा आव आणला होता, पण आगीचा चटका लागतांच लंडी घाबरली, आणि बाहेरच्याच बाजूला कोलमडून पडली ! कोणी नाजूक होते, त्यांच्या आंगाला थोडीशी धग लागतांच ते हाय हाय करीत बसले. अशा रीतीनें पुष्कळांनीं उड्या घातल्या, पण तें खोबरें होळीच्या अगदीं मध्यावर असल्यामुळें तें कोणाच्याच हातास लागेना. इतक्यांत एका मनुष्यानें धाडस केलें आणि तें खोबरें घेऊन सूं बाल्या दिला ! पण खोबऱ्याच्या वाट्या होळीमध्यें पुष्कळ होत्या. त्या पाहून दुसऱ्या कितीकांनींही तशाच आंत उडया टाकून तें खोबरें काढलें. पण त्यापैकीं कोणी आपलें आपणच खाऊं लागले. ते दुसऱ्या कोणास एक तुकडा सुद्धां देईनात. पण कित्येकांनीं तें आपण न खातां सर्वांनाच त्या होळीचा प्रसाद वांटला. जे कोणी खोबरें घेऊन एकटेच पळत होते, त्यांवर बाकी ज्यांची अगदीं झड पडली. ते त्यांच्या अंगास झोंबूं लागले. ते त्यांस कांहीं केल्या सोडीनात. असा प्रकार चालला होता. त्यांतच रामदासांनींही आपली होळी पेटवून आपल्या संसाराची धूळधाण करून सोडली !"

हा व्यवहार दृष्टया शिमग्यांतील प्रतिवार्षिक होळीपूजनाचा देखावा झाला. आतां हेंच रूपक पारमार्थिक दृष्टीनें वैराग्याकडे कसें लागतें तें पहाः—

" तापत्रयाची होळी पेटली; संसाराची आग भडकली म्हणजे प्रत्येक मनुष्य हायहाय करूं लागतो; रडतो; आरडतो; बोंबलतो; ओरडतो; व संसाराभोंवतींच गिरक्या घालीत बसतो. बायको मेली तर पुन्हां संसारांत पडतो [ होळीलाही प्रदक्षिणा घालतात हें प्रसिद्धच आहे. ] पण ह्या होळींतही दोन प्रकार असतात. एक होळी प्रत्येक घरांत पेटते; तिची घरचा यजमान एकटाच पूजा करतो व लहानशीच बोंब मारतो व तिच्या भोंवतींही प्रदक्षिणा घालतोच. पण ह्याशिवाय गांवची मोठी होळी म्हणून असते ती वेगळीच असते. ती होळी समस्त ग्रामस्थ लोक मिळून वेशींत किंवा चव्हाटयावर पेटवीत असतात. ही फार मोठी

असल्यानें तिची आग घरांतील होळीहून फार भयंकर असते. तिच्या ज्वाळा फार दुःस्सह असतात. संसारतापाची आग ही घरगुती होळी होय. पण दुसरी गांवची होळी कोणती ? तर सर्वसंगपरित्यागाची. संसारावर पाणी सोडावयाचें, मुलाबाळांची ममता धरावयाची नाहीं आणि सुखाची राखरांगोळी करावयाची. ही होळी म्हणजे मायेची, मोहपाशाची होय. ह्याच मायेच्या होळीमध्यें परब्रह्मरूप खोबरें असतें. तो खोबऱ्याचा प्रसाद गोड असतो, अमृतासारखा असतो. पण तो हातीं लागणें कठीण असतें. मायाहोळीच्या ज्वाळा फार भयंकर व अत्यंत तीव्र असतात. ' ब्रह्मज्ञान नव्हे लेंकुराच्या गोष्टी । तेथें व्हावी पोटीं अनुभव ॥ ' ' मेल्या मनुष्याची न धरीती आस । तैसा हो उदास संसारासी ' ' चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे । ' इत्यादि वाक्यावरून ब्रह्मपदरूपी-खाजें खोबरें मिळविणें किती कठीण आहे, तें पूर्वींपासून प्रसिद्धच आहे. संसाररूपी होळीमध्यें सर्वसंग परित्यागरूपी ज्वालांतून खोबऱ्याशीं गांठ घालण्याचें महाकर्म कठीण आहे. जें परब्रह्म आजपर्यंत गुप्त गुप्त म्हणून वाटत असतें, किंवा मुळींच असल्याचाही संशय वाटत असतो, तेंच परब्रह्म कोठें आहे म्हणून ही मायेची होळी पेटली म्हणजे लोक ओरडूं लागतात, आणि सूक्ष्म दृष्टीनें विचारानें, पाहिलें म्हणजे त्याच मायेच्या होळीमध्यें खोबऱ्याप्रमाणें आंत असल्याचें त्यांसच दिसूं लागतें आणि मग सारेच लोक त्या मेव्याकरितां लाळ घोटूं लागतात. कोणी त्याच्यावर लुब्ध होऊन पुरता विचार न करतां व आपलें अवसान मनांत न आणतांच एकदम त्या होळींत उडी टाकावयास जातात, ते तोंडघशी पडतात. विश्वामित्र ऋषींनींही अशीच साऱ्या संसाराची होळी पेटवून त्यांतील परब्रह्मरूप खाजें म्हणजे खोबरें घेण्यासाठीं मोठ्या जोरानें उडी टाकली, पण मध्येंच मेनकेच्या पायांत पाय अडखळून हे राजर्षि सपशेल तोंडघशी पडले ! कित्येक लोक त्या धगीला भिऊनच मागें सरतात. त्यांना कशाचें खाजें आणि कशाचें काय ? ते हात चोळीतच बसतात ! असे ह्या मायारूप होळीमध्यें उडी टाकणारे पुष्कळ असतात, पण आंतलें खोबरें कोणाच्याच हातास लागत नाहीं. अर्थात् वैराग्यामध्यें

घुष्कळ शिरतात परंतु परब्रह्म हें कोणाच्याच हातीं लागत नाहीं. तितक्यांतून एखादा धैर्यवान् व साहसी पुरुष तेवढ्याही आगीला न जुमानतां एकदम आंत उडी घेतो व सारेंच खोबरें पळवितो. पण बाकीचे लोक त्याला पुढें कोठें जाऊं देतात? ते त्याच्या पाठीमागून धांवत जाऊन त्याला गांठतात व त्याच्याशीं हिसकाहिसकी करून एखादा तुकडा तरी घेतातच. रामानंद स्वामींनीं ह्या होळींत उडी घातली, खोबरें मिळविलें आणि कोणाला दिलें न दिलेसें करून बाकीच्या साऱ्यांच्याच हातावर तुरी देऊन जात होते. इतक्यांत त्यांच्यावर एका मुसलमानाची नजर गेली; आणि तो शिखानष्ट त्यांच्यामागें धांवत सुटला. बिचारा ब्राह्मण त्रासला, व आतां आपणांस विटाळ होतो म्हणून त्यानें त्या मुसलमानाच्या डोक्यांत पळतां पळतांच आपली खडाव इतक्या जोरानें मारली कीं, त्याचें मस्तक सारें रक्तबंबाळ होऊन गेलें! हा मुसलमानभाई कोण? तर कबीर! इतकें झालें तरी त्या पठ्ठ्यानें त्यांची पाठ सोडली नाहीं. त्यांच्या हातांतल्या ब्रह्मरूप खोबऱ्याचा तुकडा हिसकून घ्यावयचा तो घेतलाच! तो कांहीं सोडला नाहीं.

दुसरे कितीएक सात्विक स्वभावाचे गृहस्थ होते. उदाहरण, तुकारामबुवा! हें परम सहनशील होते. त्यांच्याभोंवतीं संसाररूप होळीच्या ज्वाळा फारच भडकल्या होत्या. तरी ते त्या होळीच्या मध्यावर जाऊन खुशाल उभे राहिले, त्यांनीं तें परब्रह्मरूपी खोबरें हातांत घेऊन सुखरूप बाहेर आले आणि तो प्रसाद यच्चयावत् बालगोपालांस अर्पण केला. शिवाजीमहाराजांस मात्र दिला दिला; न दिला न दिला असें करून समर्थांकडे बोट दाखविलें. त्यांच्या मागून समर्थांची स्वारी आली. हे प्रथमपासून सावधच! कुळकरण्याचे बच्चे! कच्चे नव्हेत. त्यांनीं जेव्हां पाहिलें कीं तुकाराम महाराजांचें आंग प्रपंचरूप ज्वाळांनीं पार होरपळलें. म्हणून त्यांनीं एक युक्ति केली कीं, आपली संसाराची होळी पुरती पेटते न पेटते तोंच त्यांनीं तींत उडी घेऊन सारेंच खोबरें पटकावलें, आणि त्याचा प्रसाद सर्वांस मनमुराद वांटला. त्यांपैकींच हा एक लहानसा तुकडा आज परमभाग्यानें आपल्या वांट्यास आला आहे. तो किती बरें गोड आहे!" असो.

येथपर्यंत परमार्थपर व वैराग्यपर विषय झाले. ह्यापुढें 'भ्रमपंचक' म्हणून एक प्रकरण आहे. त्यांत भित्रा व संशयी मनुष्य यःकश्चित् भ्रांतीनें किती भेदरून जातो ह्याचें चित्र दाखविलें आहे. त्या भ्रांतीनेंच भुताखेतांच्या कल्पना मनुष्यामध्यें उत्पन्न होतात असें ध्वनित केलें आहे. त्यांपैकीं एकदोन अभंग देतों:—

छाया देखोनी आपली । जीव झाला दिशाभुली ॥ १ ॥
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥
मुखें बोलतां उत्तर । तेथें झालें प्रत्युत्तर ॥ ३ ॥
डोळां घालिती आंगोळी । एकाचीं तीं दोन झालीं ॥ ४ ॥
पोटीं आपण कल्पिलें । तेंच आलेसें वाटलें ॥ ५ ॥
दास म्हणे हे उपाधी । शंका धरितां अधिक बाधी ॥ ६ ॥

एकाद्या वेळीं बायका कामाच्या धांदलींत असल्या म्हणजे नाकांतील नथ काढून गळ्यांतील गळेसरींत अडकवून ठेवतात. आणि मग त्याची आठवण राहिली नाहीं म्हणजे घरभर शोधीत बसतात. कधीं कधीं आपल्याला सुद्धां असा भ्रम पडतो. एखादा पदार्थ आपल्या हातांतच असतो, आणि आपण तो साऱ्या घरांत शोध शोध शोधतों. अशा भ्रमावर समर्थांनीं खालचा अभंग फार मजेचा केला आहे.

पोतें आहे खांद्याचरी । गेलें म्हणोन हांका मारी ॥ १ ॥
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥
नेणोनियां जना पुसे । पाहों जातां हातीं असे ॥ ३ ॥
शोकें जाहला विकळ । पाहों जातां कंठीं माळ ॥ ४ ॥
वस्तु बांधोनी पदरीं । पुसतसे दारोदारीं ॥ ५ ॥
रामदास म्हणे जनां । जवळी असोनी कळेना ॥ ६ ॥

परमेश्वराची स्थिति हुबेहुब अशीच आहे. आतां आणखी कांहीं भ्रमः—

कांहीं दिसे अकस्मात् । तेथें आलें वाटे भूत ॥ १ ॥
वांया पडावें संदेहीं । मुळीं जेथें कांहीं नाहीं ॥ २ ॥
पुढें देखतां अंधारें । तेथें वाटे आलें भरें ॥ ३ ॥

झाड झुडूप देखिलें । जिवीं वाटे कोणी आलें ॥ ४ ॥
पुढें रोविलासे झेंडा । श्रोत्या म्हणे कोण उभा ॥ ५ ॥
रामदास सांगे खूण । भितो आपणा आपण ॥ ६ ॥

× × × ×

वाजे पाऊल आपुलें । म्हणे मागें कोण आलें ॥ १ ॥
कोण धांवतसे आड । पाहों जातां झालें झाड ॥ २ ॥
भावीतसे अभ्यंतरीं । कोण चाले बरोबरी ॥ ३ ॥
शब्द पडसाद ऊठला । म्हणे कोण रे बोलिला ॥ ४ ॥
रामीरामदास म्हणे । संशयाचीं हीं लक्षणें ॥ ५ ॥

आतां स्फुट अभंगापैकीं ' हरिदास कसा असावा ? '

ज्याचे पाय हो नमावे । त्याचें कीर्तन ऐकावें ॥ १ ॥
दुजियासि सांगे कथा । आपण वर्ते त्याचि पथा ॥ २ ॥
कीर्तनाचें न करी मोल । जैसे अमृताचे बोल ॥ ३ ॥
सन्मानितां नाहीं सुख । अपमानितां नाहीं दुःख ॥ ४ ॥
किंचित दिलें दातयानें । तेंहि घेत आनंदानें ॥ ५ ॥
ऐसा आहे हरिदास । लटकें न वदे रामदास ॥ ६ ॥

हरिदासानें देतील त्यांत संतोष मानावा हेंच समर्थांचें मत. परंतु जेथें " हरिकीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें " अशा प्रकारें तुकारामांनीं तर बिदागी घेण्याचा अगदींच निर्बंध केला आहे. त्यापेक्षां समर्थांचा विचारच उत्तम दिसतो. कारण हरिदासानें कथा करावयाची तेथें जेऊं सुद्धां नये, तर अगांतुकी करावयाला दुसऱ्या गांवांत जावें कीं काय ? असा प्रश्न सहजीं उद्भवतो. कांहींच घेतलें नाहीं, तर हरिदासासारख्या उपदेशकाचा योगक्षेम तरी चालावा कसा ? हें मनांत आणलें म्हणजे समर्थांचें मतच विशेष उक्त दिसतें.

खालीं दिलेले करुणापर अभंग हृदयाला किती पाझर फोडणारे आहेत पहा.

आम्हां पतितांची सांड केली जरी । आमुचा कैवारी कोण आहे? ॥१॥
आम्हीं भरंवसा कोणाचा धरावा । सांगावें केशवा दयानिधे ॥२॥

तुजविण आम्हां नाहीं त्रिभुवनीं । धांवे चक्रपाणी दीनबंधो ॥ ३ ॥
पतीत पावन ब्रीद हें बांधिलें । तारावें पहिलें दासालागीं ॥ ४ ॥

× × × ×

पळशील तूं तरी नाम कोठें नेशी । आम्ही अहर्निशीं नाम घोकूं १
आम्हापासोनीयां जातां नये तुज । तें हें वर्म नाम जपूं ॥ २ ॥
देवा आम्हां तुझें नामही पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे॥३॥
भोळे भक्त आम्ही चुकलोंचि कर्म । सांपडलें वर्म रामदासा ॥४॥

• परस्परांचीं उणीं काढून एकमेकवार तोंडसुख घ्यावें, हें हल्लीं एक वर्तमानपत्रांचें कर्तव्यच बनल्यासारखें दिसतें. अशा लोकाना खालीं दिलेला अभंग केवळ अंजनरूपच आहे.

श्वानाचीया पुत्रें कल्लोळ मांडिला । कलहो लागला एक सरा॥१॥
भुंकितां गुरगुरी वासि तोचि तोंड । वरती थोबाड करोनीया॥२॥
एक ते भुंकती एक ते रडती । दास म्हणे गती निंदकांची ॥ ३ ॥

खालच्या अभंगांतील देवस्वरूपी माणसाचें लक्षण पहा.

जाणावा तो नर देवचि साचार । वाचे निरंतर रामनाम ॥ १ ॥
सगुणीं सद्भाव नाहीं ज्ञान गर्व । जयालागि सर्व सारिखेचि ॥२॥
निंदका वंदका सगट सांभाळीं । मन सर्वकाळीं पालटेना ॥ ३ ॥
पालटेना मन परस्त्रीकांचनीं । निववी वचनीं पुढिलियासी ॥ ४ ॥
पुढिलियासी सुख तोच देत आहे । उपकारीं देह लावितसे ॥५॥
लावीतसे देह राम भजनास । रामीरामदास हरिभक्त ॥ ६ ॥

× × × ×

ह्यापुढें 'पंचीकरण' म्हणून एक २१५ अभंगांचें प्रकरण आहे. ह्यांत प्रथमतःच श्रोत्यानें वक्त्याला २५ प्रश्न विचारले आहेत, व वक्त्यानें त्या पंचवीस प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत. ह्या पंचवीस प्रश्नांचा पहिला अभंगच येथें देतों म्हणजे ह्या प्रकरणांत काय काय विषय आला आहे ह्याचें सहजच ज्ञान होईल. हा अभंग असा आहे.•

नमूं योगेश्वरी शारदा सुंदरी । श्रोता प्रश्न करी वक्तयांसी ॥ १ ॥
वक्तयासी पुसे जीव हा कवण । शिवाचें लक्षण सांगा मज ॥२॥

सांगा मज आत्मा कैचा परमात्मा। बोलिजे अनात्मा तो कवण ॥३॥
कवण प्रपंच कोणे केला संच । मागुता विसंच कोण करी ॥ ४ ॥
कोण ते अविद्या सांगि जो र्जा विद्या। कैसें आहे आद्या स्वरूप तें॥५॥
स्वरूप तें माया कैसी मूळमाया । इसी चाळावया कोण आहे ॥६॥
आहेसें शून्य कोणतें चैतन्य । समाधान अन्न तें कवण ॥ ७ ॥
कवण जाणता कवणाची सत्ता । मोक्ष हा तत्त्वता कोण सांगा ॥८॥
सांगा ब्रह्म खुण सगुण निर्गुण । पंचवीस प्रश्न दासें केलें ॥ ९ ॥

ह्या पंचवीस प्रश्नांचीं थोडक्यांत उत्तरें दुसऱ्याच अभंगांत दिलीं आहेत, तीं अशीं.

नमूं वेदमाता नमूं त्या अनंता । प्रश्न सांगों आतां श्रोतयांचे ॥ १ ॥
श्रोतयांचे प्रश्न जीव हा अज्ञान । जया सर्व ज्ञान तोचि शिव ॥२॥
शिवापर आत्मा त्या पर परमात्मा। बोलिजे अनात्मा अनिर्वाच्या॥३॥
वाचा हा प्रपंच मायिक जाणावा । घडामोडी देवापासूनीया ॥४॥
विषय अविद्या त्यागावीते विद्या। निर्विकल्प आद्या तेंचि रूप॥५॥
कल्पना हे माया सत्व मूळमाया । इसि चाळावया चैतन्यचि॥६॥
नकार तें शून्य व्यापक चैतन्य । ईश्वर अनन्य समाधान ॥ ७ ॥
जीव हा जन्मला जीवा मृत्यु आला। बद्ध मुक्त झाला तोही जीव॥८॥
ईश्वर जाणता ईश्वराची सत्ता । मोक्ष हा तत्त्वता ईश्वराचि ॥ ९ ॥
ईश्वर निर्गुण ईश्वर सगुण । हेंचि ब्रह्म खूण दास म्हणे ॥ १० ॥

ह्याशिवाय ह्या प्रकरणांत ‘ उत्पत्ति ’ व ‘ संहार ’ ह्या विषयाचे दोन अभंगही फार देण्यासारखे आहेत, तथापि आंतां त्या मोहांत न गुंततां ‘ पंचीकरण ’ म्हणजे पंचमहाभूतांचा व्यापार हा जो मुख्य विषय त्याचाच तेवढा एक अभंग येथें देऊन हें प्रकरण पुरें करूं.

पृथ्वी आणि तेज वायु आणि आकाश ।
पांचांचे हें ऐसे पंचवीस ॥ १ ॥
अस्थिमांसत्वचा नाडी आणि रोम ।
पांचाच हें वर्म सांगईन ॥ २ ॥

शुक्लित शोणीत लाळ आणि मूत्र ।
स्वदेहीं निश्चित पंचतत्त्वें ॥ ३ ॥
क्षुधा तृषा जाण आळस शयन ।
पांचवें पेभूत तेजाचेंचि ॥ ४ ॥
चळण वळण आणि प्रसरण ।
वायुनिरोधन आकुंचन ॥ ५ ॥
काम क्रोध शोक मोह आणि भये ।
स्थूळ देहाचीये पंचवीस ॥ ६ ॥
पंचवीस तत्त्वीं स्थूल देह वर्तत ।
ऐकें सावचित्त लिंग देह ॥ ७ ॥
अंतःकरण मन बुद्धि आणि चित्त ।
पांचवा निश्चित अहंकार ॥ ८ ॥
प्राण आणि अपान व्यान आणि उदान ।
समानहि जाण पांच वायु ॥ ९ ॥
चक्षु श्रोत्र जिव्हा आणि घ्राण त्वचा ।
अंश हा तेजाचा ज्ञानेंद्रियें ॥ १० ॥
वाचा आणि पाद शिश्न आणि गुद ।
पांच हीं प्रसिद्ध कर्मेंद्रियें ॥ ११ ॥
शब्द स्पर्श रूप रस आणि गंध ।
पांचहि प्रसिद्ध विषय हे ॥ १२ ॥
ऐसें पंचवीस लिंग देहीं असे ।
ऐसीं पंचवीस तत्त्वें झालीं ॥ १३ ॥

पौराणिक पद्धतीनें पंचमहाभूतांची व त्यापासून होणाऱ्या पंचवीस तत्त्वांची ह्यांत चांगलीच फोड केली आहे. ह्यांत शरीरशास्त्राचाही समावेश होतोच. ‘ एकाचे एकवीस ’ व ‘ पांचाचे पंचवीस ’ अशी आपल्यामध्यें जी म्हण चालत आली आहे, तिची उपपत्ति ही ह्या पंचकिरण विवरणावरून चांगली लक्षांत येते.

# रामायण.

समर्थांचा दुसरा मोठा ग्रंथ म्हणजे रामायण हा होय. हा श्लोकबद्ध असून त्याचें वृत्त—मनाच्या श्लोकांचेंच—म्हणजे 'भुजंगप्रयात' आहे. कोणत्याही कवीला किंवा भक्ताला आपल्या उपास्य देवतेचें वर्णन करण्याचा प्रसंग आला कीं, त्याच्या अंतःकरणाला जी स्फूर्ति उत्पन्न होते ती कांहीं अपूर्व असते, आणि तसें होणें हेंहि स्वाभावीकच आहे. ज्ञानेश्वर महाराजांचे गुरु हेंच उपास्य दैवत होतें. म्हणून 'ज्ञानेश्वरीच्या' दहाव्या अध्यायांत 'आचार्योपासनं' हा शब्द येतांच त्यावर त्यांनीं १९२ ओव्यांचें विवरण केलें आहे. आणि त्यांत गुरुसेवा कशी करावी हा भाग भक्तिरसाची केवळ सीमाच आहे. माझ्या जिवांत जीव आहे तेथपर्यंत तर मी गुरुसेवा करीनच करीन, परंतु मरण आल्यानंतर सुद्धां मी गुरुसेवेंत अंतर पडूं देणार नाहीं. ह्यावर जी त्यांनीं कल्पना रचली आहे ती केवळ अश्रुतपूर्व आहे. असो.

समर्थांचें उपास्य दैवत श्रीरामचंद्र असल्यानें रामायणाची कथा वर्णन करतांना त्यांना जी प्रेमाची स्फूर्ति आली आहे ती केवळ अलोट होय. यामुळें हें रामायण अत्यंत रमणीय झालें आहे. ह्या ग्रंथाला 'रामायण' असें जरी नांव दिलेलें आहे तरी तें कांहीं समग्र रामायण नाहीं. तर 'किष्किंधा' 'सुंदर' व 'युद्ध' येवढीं तीनच कांडें काय तीं त्यांत आहेत. किष्किंधा कांडाचे १८१ श्लोक आहेत व सुंदर कांडाचे श्लोक १०१ आहेत. पण तिसरें जें 'युद्धकांड' आहे तें मात्र फार मोठें आहे. ह्या कांडांतील प्रत्येक प्रसंगांत शंभराच्या वर १०।५ श्लोक इतकीं पद्यें असून असे प्रसंग १३ आहत. म्हणजे ह्या एका युद्ध कांडाचेच श्लोक १३०० च्यावर आहेत. तथापि प्रत्येक प्रसंगाला समर्थांनीं साधारणपणें 'शतक' असेंच म्हटलेलें आहे. समर्थांचा उत्साह, हुरूप व आवेश हा सदा सर्वकाळ ताजा असे. ह्यामुळें रामरावणाच्या युद्धांत जणों काय त्यांचे बाहू अगदीं फुरफुरून गेलेले दिसतात. ह्यामुळें युद्धकांड

हें वीररसानें अगदीं भरलेलें आहे. प्रत्येक कार्यांत समर्थांची वीरश्री तशीच जागृत होती. ह्यामुळें ह्यांतील 'युद्धकांड' हें अत्यंत सरस वठलेलें आहे. रघुपतीचा पराक्रम वर्णन करावयाचा म्हटलें कीं, समर्थांच्या भृकुटी जणोंकाय वर चढत, व त्याचें वैभव सांगण्याचा प्रसंग आला कीं, त्यांच्या अंतःकरणाला प्रेमाचा पाझर फुटे. ह्या दोन्हीही गोष्टी ह्या रामायणांत अगदीं व्यक्त स्वरूपानें दृष्टीस पडतात. सृष्टिसौंदर्य निरूपण करण्याची समर्थांची हातोटी तर केवळ अनुपम आहे.

ह्या रामायणामध्यें 'किष्किंधा' कांडापासून अर्थात् रावणानें सीता चोरून नेल्यापासून तों सुग्रीवाशीं सख्य, वालीचा सहार, मारुतीचें सहाय, सेतुबंधन व रावणाशीं घोर युद्ध होऊन रावणाचा वध, बिभीषणास राज्याभिषेक आणि श्रीरामचंद्राचें सीतेसह अयोध्येत परत येणें येथपर्यंत कथा आहे, व शेवटीं रामचंद्र सिंहासनावर बसून सर्वांस प्रसाद देऊन हा कथाभाग संपविला आहे.

ह्यांत रसभरित असे अनेक प्रसंग आलेले आहेत. त्या सर्वांची कल्पना केवळ चार पांच देऊन होण्यासारखी नाहीं. ह्यास्तव त्यांतील कांहीं ठळक ठळक प्रसंगांचा गोषवारा देऊन नंतर कांहीं निवडक श्लोकांची रचना दाखवूं, म्हणजे ह्या रामायणांतील कथाप्रसंगाचें यथातथ्य स्वरूप समजण्यास चांगलें साधन होईल. पहिलीं दोन कांडें म्हणजे 'किष्किंधा कांड' आणि 'सुंदर कांड' हीं तर अगदीं लहानच आहेत. म्हणजे तीं 'युद्धकांडांतील' बहुतेक एकएका प्रसंगाइतकींच भरतील. तेव्हां त्यांत फारसा विस्तृत विषय नाहीं, हें तर उघडच आहे. तथापि त्यांतही कितीएक वर्णनें फार बहारीचीं आहेत.

लक्ष्मणाची व मारुतीची भेट, मारुतीनें पाहिलेली लक्ष्मणाची परीक्षा, रामचंद्राची व मारुतीची मुलाखत, सुग्रीवाशीं सख्य, सुग्रीवादि वानरांस आलेला रामपराक्रमाचा संशय, रामांनीं दाखविलेली पराक्रमाची चुणूक, वालीशीं केलेलें युद्ध, वालीनें अंतकाळीं सुग्रीवास व अंगदास केलेला उपदेश हे भाग अत्यंत चित्तवेधक आहेत.

'सुंदर कांडांत' रामचंद्राचें व सुग्रीवाचें सख्य होऊन त्यानें सीतेनें मार्गामध्यें टाकलेलीं अलंकारभूषणें रामचंद्रास दिलीं, आणि तीं सर्व

वानरसेना सीतेचा शोध करण्यास निघाली. त्यावेळीं त्यांना मार्गांत लागलेलीं घोर जंगलें, नद्या, नाले, पर्वत ह्यांचें वर्णन अत्यंत रसभरीत केलें आहे. अशा रीतीनें ही वानर चमू–कळपचे कळप–चालले. परंतु सीतेचा कोठेंच कांहीं शोध लागेना. अखेर जातां जातां त्यांच्या पुढें महासागर आडवा आला*! तेव्हां मात्र सर्वांचें हात पाय गळाले! कारण, वानराच्या जातीला पोहावयास येत नाहीं, हें सर्वप्रसिद्धच आहे. म्हणून ते चिंताक्रांत होऊन बसले. तेव्हां मारुतीनें आपण सीतेचा शोध लावून येतों असा सर्वांस धीर देऊन त्या महासागरावरून उड्डाण करून तो लंकेंत गेला, व तेथें सूक्ष्म रूप धारण करून लंकेंतील रावणाचे सारे वाडे, मंदिरें, गोपुरें, बाजार, व्यापाऱ्यांचीं दुकानें पाहिलीं, व नंतर ता सरकारी बंदिखाना पहावयास गेला. तों तेथें सारे देव दीनवाणीनें काबाडकष्ट करीत होते. असे ते निर्जर निखालस जर्जर झालेले पाहून त्याला रावणाचा अधिकच संताप आला व अशा या उन्मत्ताला आपल्या बळाचेंही कांहींतरी कौतुक दाखवावें म्हणून आपलें पुच्छ मोठें करून साऱ्या शहरांत सोडलें! मग तो प्रळय काय विचारावा? सारे राक्षस त्याला अडखळून धडाधड पडूं लागले! कपाळावर कपाळें आपटलीं. मारुतीनें शेपटानें त्यांचे भारे बांधून उचलून खालीं आदळले! ह्याप्रमाणें साऱ्या लंकेत दाणादाण उसळली. म्हणून दरबारांतील लोक धांवाधांव करूं लागले. तों आंधार पडला! म्हणून मशाली पेटविल्या. त्या भराभर विझूं लागल्या! कोणास कांहींच सुचेना. रावणही भेदरून गेला!

अखेर रावणानें ब्रह्मदेवास धरून आणलें, आणि माधवराव पेशव्यांनीं नागपूरकर भोंसल्यांच्या वकिलाला जशी तंबी दिली कीं, "आठ दिवसांच्या आंत तुमचे यजमान पुण्यास हजर न होतील, तर मेसकुटाखालीं टाळकें सडकीन; ब्राह्मण म्हणणार नाहीं." त्याप्रमाणें रावणानेंही ब्रह्मदेवाला तंबी दिली कीं 'हा चाललेला अनर्थ बंद कर; नाहीं तर तुझीही चांदरात आटवीन.' तें ऐकून ब्रह्मदेवही बिचारा घाबरला आणि त्यानें ताबडतोब रामचंद्रास पत्र लिहिलें कीं "कृपा करून हा लंकेंतील अनर्थ बंद करावा, नाहीं तर माझें ब्रह्मत्व राहत नाहीं." तें पत्र पाहून राम हांसले आणि त्यांनीं तो अनर्थ बंद करविला. नंतर मारुति अशोक-

वनांत जाऊन सीतेचा शोध लावून तें आनंदाचें वर्तमान घेऊन सर्व वानरसेनेंत मिसळले. तेव्हां रामलक्ष्मणासहवर्तमान सर्वांचाच जीव खालीं पडला. येथपर्यंत कथाभाग सांगून सुंदरकांड संपविलें आहे.

ह्या कथानकांत समर्थांनीं हास्यरस अगदीं ओतप्रोत भरला आहे. लंकेंतील नागरिकांची व राक्षसांची झालेली विटंबना इतकी रसभरीत वर्णन केली आहे कीं, ती ऐकून श्रोत्यांचीं तर हंसतां हंसतां पोटेंच दुखतील ! त्याच्यापुढें वत्सलाहरणांतील घटोत्कचाची लीला कांहींच नव्हे. कौरवांप्रमाणें लंकेंतील राक्षसांनासुद्धां समर्थांनीं दिगंबर दीक्षा देऊन सोडली आहे !

तिसरें 'युद्ध कांड' हें वरच्या दोन कांडांहून फार मोठें आहे. ह्यांतील 'त्रयोदश प्रसंग' म्हणजे स्वतंत्र तेरा कांडेंच आहेत म्हटलें तरी चालेल.

**पहिल्या प्रसंगांत**—वानरसेनेचा समुद्रतीरीं तळ पडला; मंदोदरीनें बिभीषणाला रावणाची समजूत करावयास पाठविलें. त्यानें त्याची निर्भत्सना करून त्यास लाथ मारली ! कित्येक राक्षसांनीं सीतेवर बलात्कार करण्याविषयीं सुचविलें, पण तें रावणानें नाकारलें. नंतर बिभीषण रामचंद्राकडे गेला. रामानें त्यास लंकेचा राज्याभिषेक केला. रावणानें सुग्रीवास फितुर करण्याकरितां शुक नामक राक्षसास पाठविलें. त्याचें सुग्रीवानें ऐकलें नाहीं, उलट त्याची चांगलीच कणीक मऊ केली. तेव्हां तो म्हणाला "रिसा—वानरांच्या संगतीनें तूंही एक मूर्ख बनला आहेस." इतका भाग आहे.

**दुसऱ्या प्रसंगांत**—रामानें समुद्राची प्रार्थना केली, तरी तो ऐकेना. तेव्हां राम क्रुद्ध होऊन त्यानें धनुष्यबाण हातांत घेतलें, तेव्हां 'मजवर शिळा ठेवाव्यांत म्हणजे मी त्या तारीन' असें सांगितल्यावरून सेतु तयार केला. सारणानें रावणास पुष्कळ बोध केला, तरी तो ऐकेना. अखेर रामचंद्राचें मायावी मस्तक तयार करून तें कापून आणलें म्हणून सीतेस दाखविलें ! तें पाहून सीतेनें फार शोक केला, परंतु ती रावणास वश झाली नाहीं. तेव्हां रावणानें युद्धाची तयारी केली.

**तिसऱ्या प्रसंगांत**—रामचंद्रांनीं अंगद शिष्टाईस पाठविला. परंतु रावणानें त्याचा धिःकार केला. नंतर इंद्रजित प्रतिज्ञा करून युद्धास आला. तुंबळ युद्ध झालें. प्रेतांचे ढीगच्या ढीग पडले. पुन्हां वानरांनीं गर्जना करून चाल केली, म्हणून धूम्राक्ष आला. तो पळून जाऊन त्यानें रावणास सर्व वृत्तांत सांगितला. नंतर लक्ष्मण युद्धास पुढें झाला.

**चवथ्या प्रसंगांत**—दशशीराचें व लक्ष्मणाचें युद्ध जुंपलें. रावणही स्वतः युद्धास आला, त्यास रामानें पळवून लावलें म्हणून त्यानें कुंभकर्ण निजला होता त्यास उठवावयास सांगितलें. नंतर नगारे, ढोलगीं, ताशे, वगैरे हजारों वाद्यें लावलीं; चिमटे घेतले; सुया टोंचल्या; तरी कुंभकर्ण जागा होईना. अखेर गायन सुरू केलें, तेव्हां तो जागा झाला! [ हा भाग फारच मनोरम वठला आहे. ] कुंभकर्ण युद्धास गेला तों सुग्रीवानें त्याचें नाक कापलें. तो मेला. तेव्हां मेघवर्ण आला. त्याचाही पराभव झाला. नंतर पुन्हां इंद्रजित आला व त्यानें सर्व वानरसेना ठार केली ! म्हणून मारुतीस द्रोणागिरी आणावयास पाठविलें.

**पांचव्या प्रसंगांत**—मारुतीनें द्रोणागिरी आणतांच त्याच्यावरील वनस्पतींच्या परिमळानेंच सारें वानरसैन्य सजीव झालें. रावणास तें ऐकून परम दुःख झालें; तो युद्धासच येईना. म्हणून लंकेस आग लावून द्यावी अशी सुग्रीवानें कल्पना काढली, व त्याप्रमाणें सारे वानर चुडी घेऊन त्यांनीं लंका पेटविली. त्यावेळच्या दुर्दशेचा देखावा फारच वाचण्यासारखा आहे. नंतर इंद्रजित पुन्हां युद्धाला आला. रामानें असंख्य राक्षस मारले. इंद्रजितानेंही वानरसेनेचा मनस्वी संहार केला.

**सहावा प्रसंगांत**--इंद्रजितावर मारुती चालून गेला, तेव्हां त्यानें मायेची सीता पुढें आणून तिची अत्यंत निर्भत्सना करून शिरच्छेद केला ! त्यामुळें रामही फार आक्रोश करूं लागला. पण बिभीषणानें त्यांतील खरा प्रकार सांगून त्याचें शांतवन केलें. नंतर इंद्रजिताच्या होमाचा विध्वंस करण्यासाठीं लक्ष्मण मारुतीच्या पाठीवर बसून त्या गुप्त ठिकाणीं निघाले. तों मध्यंतरीं घोर जंगल, सर्प, व्याघ्र, वगैरेंचें वर्णन फार चित्तवेधक आहे.

**सातवा प्रसंग**--इंद्रजितानें लक्ष्मणाचा धिःकार केला. तेव्हां लक्ष्मणानें आपण शेषाचा अवतार असल्याची ओळख दिली. हा भाग अत्यंत वाचनीय आहे. नंतर त्या उभयतांत घोर संग्राम झाला. पर्जन्यास्त्र, वातास्त्र, गरुडास्त्र, इत्यादि भडिमार होऊन अखेर इंद्रजित पतन पावला ! इंद्रजिताचा हात सुलोचनेच्या महालांत जाऊन त्यानें पत्र लिहिलें. ती त्रिकुटाचळाहून निघून लंकेस जाऊन रावणास भेटली. नंतर ती रामचंद्राच्या संनिध सती गेली !

**आठव्या प्रसंगांत**--रावण सीतेचा वध करावयास निघाला. त्यास सुपार्श्वानें बोध करून परत आणलें. नंतर विरूपाक्ष, विद्युन्मत्, मंतू, इत्यादि योद्धे सरसावून पुढें आले. इंद्रजितानें लक्ष्मणावर शक्ति सोडली, व लक्ष्मण निचेष्टित पडला. त्यावेळीं 'न भूतो न भविष्यति' असा रामानें शोक केला. बिभीषणानें वैद्यास आणविलें, व त्याच्या सांगण्यावरून मारुतीनें द्रोणागिरी आणला, व त्यांच्यावरील वनस्पतींच्या रसानें लक्ष्मण पुन्हां जिवंत होऊन सारा आनंदी आनंद झाला.

**नवव्या प्रसंगांत**--रावणाच्या होमाचा विध्वंस करण्याचें सर्व वानरांनीं ठरविलें. अंगद रावणाच्या अंतःपुरांत जाऊन मंदोदरी आदि करून सर्व स्त्रिया धरून आणल्या व त्यांचा अपमान केला. म्हणून त्या रावणावर रुष्ट झाल्या. रावणानें वृंदा, पुलोमा इत्यादि स्त्रियांवरील प्रसंग सांगून त्यांची समजूत केली. नंतर रामाचें व रावणाचें प्रत्यक्ष युद्ध सुरू झालें. रावण रथांत व राम पायीं, हें पाहून इंद्रानें मातलीबरोबर आपला रथ रामास पाठवून दिला. परंतु रावणानें मातलीस ठार केलें. तेव्हां देवांना भय पडलें. आगस्ति ऋषि त्या समरांगणांत येऊन त्यांनीं रामास एक मंत्र दिला. रामानें रावणाच्या हृदयांतील अमृताची कुपी फोडली ! त्यामुळें रावण गतप्राण होऊन पडला ! नंतर रामचंद्रांनीं बिभीषणाला नगरांत पाठवून रावणाच्या आप्तजनांस बोलावून आणलें.

**दहाव्या प्रसंगांत**--स्त्रियांचा शोक, रावणाचें दहन, व बिभीणास राज्याभिषेक; नंतर मारुतीला जानकीस आणावयास पाठविलें, सारे देव भेटावयास आले. अग्नीची मूर्ति ! सीतेला पाहण्यासाठीं जमलेली दाटी; [ हा भाग अत्यंत मनोरम आहे. ] रामानें सीतेचा धिःकार केला.

सीतेनें अग्निकुडांत उडी टाकून पुन्हा शुद्ध होऊन ती रामाच्या अंकावर बसली.

**अकराव्या प्रसंगांत**—शंकराचीं व ब्रह्मदेवाची स्तुति, रामचंद्र बिभीषणादि मंडळीस घेऊन पुष्पक विमानांतून अयोध्येस जावयास निघाले. त्यांस मध्यंतरीं भारद्वाज ऋषींनीं ठेवून घेऊन मंगलस्नान भोजनादि फार थाट केला. नंतर मारुतीस पुढें नंदीग्रामास भरताकडे पाठविलें. भरतानें अयोध्येंतील आपल्या सर्व माता, वसिष्ठ, नागरिक, सैन्य वगैरे नंदिग्रामीं आणवून स्वागताची तयारी केली.

**बाराव्या प्रसंगांत**—सर्व मंडळीच्या आनंदानें भेटी होऊन नमस्कार चमत्कार झाले. येथील मेजवानीचा थाटही अपूर्व होता. भोजनोत्तर धर्मचर्चा सुरू झाली. रात्रौ कीर्तनें वगैरे होऊन आनंदी आनंद झाला.

**तेराव्या प्रसंगांत**—सर्व मंडळी लव्याजम्यासह अयोध्येस जावयास निघाली. तेथील नगर-शृंगार, नागरिकांचा उत्साह, मंगलस्नानें व भोजनाचा रामरगाडा, कळावंतिणीचे नाच, धर्मचर्चा, कीर्तनें, देणग्या, रात्रीची अतषबाजी हे भाग केवळ लोकोत्तर होत. नंतर सर्वांस निरोप. वानर म्हणाले "आम्ही वनचर, अरण्यवासी, आमचीं तोंडें काळीं असें असून आपण आम्हाला पावन केलेंत" इत्यादि मनोरंजक संवाद व प्रसाद, इत्यादि भाग सांगून परिसमाप्ति केली आहे.

ह्या रामायणांतील थोडे तरी वेंचे घेणें अवश्य होतें. परंतु विस्तारभयामुळें हात आखडणें भाग आहे. वाचकांनीं येवढयावरच तृप्ति करून घ्यावी. ह्या रामायणांत छंदोभंग, ऱ्हस्वदीर्घ व अपरिचित शब्द इत्यादि बरेच आढळतात, परंतु आंत सारा प्रसादच भरलेला असल्यामुळें तिकडे फारसें लक्ष जात नाहीं.

---

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# रामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## उत्तरार्ध–भाग ५ वा.

### इतर ग्रंथ व किरकोळ स्फुट प्रकरणें.

‘षड्रिपु–विवेचन’—म्हणून एक अनुष्टुप छंदात्मक लहानसें प्रकरण आहे. ह्यामध्यें काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ह्या सहा विकारांपासून मनुष्याच्या मनास कसकशी विकृति होते याचें वर्णन आहे.

ह्याशिवाय समर्थांचें आणखी एक वेदांतपर प्रकरण म्हटलें म्हणजे ‘अन्वय व्यतिरेक’ हें होय. हें प्रकरण ओवीबद्ध असून त्याचे लहान लहान अकरा समास आहेत. ह्यांत काय आहे हें समजण्यासाठीं ‘अन्वय’ म्हणजे काय व ‘व्यतिरेक’ म्हणजे काय? तेवढें समर्थांच्याच शब्दांनीं सांगतों म्हणजे त्यांतील विषयाची कल्पना होईल.

**व्यतिरेक अनन्य हे दोनी। अष्ट देहांची उभवणी॥**
**त्यासि बोलिजे वचनीं। अन्वय ऐसें॥ १॥**
**उद्भवाचा संहार। ज्ञान प्रलय निरंतर॥**
**त्यासि बोलिजे साचार। व्यतिरेक ऐसें॥ २॥**

अर्थात् ह्यामध्यें सृष्टीची उत्पत्ति, संहार ह्याचें विवरण असून 'तत्त्वमसि' ह्या वाक्याचें उद्घाटन आहे.

हे मुख्य ग्रंथ झालें. पण ह्याशिवाय, 'भीमरूपी स्तोत्रें' 'करुणाष्टकें' व 'नित्य नैमित्तिक विधिसंग्रह सोपान' इत्यादि किरकोळ प्रकरणांचें भांडारगृह भरलेलेंच आहे.

ह्या प्रकरणांना 'किरकोळ' असें जरी आम्हीं म्हटलें आहे, व लोकही त्यांच्या आकुंचित स्वरूपावरून तसेंच समजतात, तरी हींच सारीं प्रकरणें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. धावे, स्तोत्रें आणि करुणाष्टकें हीं तर खरीं खरीं ईश्वरप्राप्तीचीं महाद्वारें होत. भक्तिमहात्म्याचें खरें खरें रहस्य तें यांतच भरलेलें आहे. परमेश्वरास करुणा येणें, तो प्रसन्न होणें, त्याच्या हृदयाला खरा खरा पाझर फुटणें ह्याचीं जागती ज्योत साधनें हींच. ह्यांच्या पुढें 'दासबोध' 'आत्माराम' 'रामायण' हीं सुद्धां फिकीं पडतील. खऱ्या खऱ्या संसारदुःखानें गांजलेल्या मुमुक्षूनें उच्च स्वरांत ह्या समर्थ वाणीनें 'टाहो' फोडला तर त्या दीनदयाळ भक्तवत्सल प्रभूला पान्हा फुटल्यावाचून कधींच रहाणार नाहीं, अशीच त्यांची प्रसादमय रचना आहे. फार काय सांगावें? त्या प्रेमळ प्रार्थना, व तें प्रेमळ भजन ऐकून ऐकणाराच्याही अंगावर प्रेमरोमांच उभे राहतील अशीच त्यांची योग्यता आहे. ह्यास्तव कितीही विस्तार झाला तरी त्यांपैकीं पांचचार तरी उतारे आम्हांस देणें भाग आहे असें वाटतें.

समर्थांचें उपास्य दैवत जरी श्रीरामचंद्र हें होतें, तरी मारुतीरायावर त्यांची फार भिस्त असे, हें पूर्वीं अनेक वेळां सांगितलेंच आहे. म्हणून त्यांनीं 'भीमरूपी' नांवाचीं श्रीहनुमतांच्या स्तुतिपर १३ स्तोत्रें श्लोकबद्ध केलीं आहेत. तीं भक्तिभावानें पठण केलीं असतां अनेक प्रकारचीं संकटें व व्याधि दूर होतात अशी प्रसिद्धि आहे, व समर्थांनींही तसा त्यांत उल्लेख केला आहे. त्यापैकीं पहिलें एक व पांचवें एक अशीं दोनच स्तोत्रें देतों:—

# भीमरूपीं स्तोत्रें.

मनोजवं मारुततुल्यवेगं । जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती । वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥ १ ॥ महाबळी प्राणदाता । सकळां ऊठवी बळें । सौख्यकारी शोकहारी धूर्तवैष्णव गायका ॥ २ ॥ दिनानाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा । पातालदेवताहंता भव्य सिंदूरलेपना ॥ ३ ॥ लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना । पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका ॥ ४ ॥ ध्वजांगें उचली बाहो आवेशें लोटला पुढें । काळाग्नी काळरुद्राग्नी देखतां कांपती भयें ॥ ५ ॥ ब्रह्मांडें माविलीं नेणो आवळे दंतपंगती । नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा भ्रकुटी ताठिल्या बळें ॥ ६ ॥ पुच्छ तें मुर्डिलें माथां किरीटी कुंडलें वरीं । सुवर्ण कटि कासोटी घंटा किंकिणि नागर ॥ ७ ॥ ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू । चपलांग पाहतां मोठें महाविद्युल्लते परी ॥ ८ ॥ कोटिच्या कोटि उड्डाणें झेपावे उत्तरेकडे । मंद्राद्रीसारिखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥ आणिला मागुती नेला आला गेला मनोगती । मनासि टाकिलें मागें गतीशि तूलना नसे ॥ १० ॥ अणूपासूनि ब्रह्मांडा एवढा होत जातसे । ब्रह्मांडाभोंवते वेढे स्वपुच्छें घालवूं शके ॥ ११ ॥ तयासी तूलना कोठें मेरुमांदार धाकुटे । तयासी तुलना कैची ब्रह्मांडी पाहतां नसे ॥ १२ ॥ आरक्त देखिलें डोळां गिळिलें सूर्यमंडळा । वाढत वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडळा ॥ १३ ॥ भूतप्रेतसमंधादी रोगव्याधी समस्तही । नासती तूटती चिंता आनंदे भीमदर्शनें ॥ १४ ॥ हे धरा पंधरा श्लोकी लाभली शोभली भली । दृढ देह निःसंदेहो संख्या चंद्रकळागुणें ॥ १५ ॥ रामदासी अग्रगण्यू कपिकुळासि मंडनू । रामरूपीं अंतरात्मा दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥

हनुमंता रामदूता वायुपुत्रा महाबला । ब्रह्मचारी कपीनाथा विश्वंभरा जगत्पते ॥ १ ॥ कामांतका दानवारी शोकहारी दया-

घना । महारुद्रा मुख्यप्राणा मूळमूर्ती पुरातना ॥ २ ॥ वज्रदेही सौख्यकारी भीमरूपी प्रभंजना । पंचभूता मूळमाया तूंचि कर्ता समस्तही ॥ ३ ॥ स्थितिरूपें तूंचि विष्णू संहारक पशूपती । पंचभूता स्वयंज्योति नामरूपा गुणातिता ॥ ४ ॥ सांगतां वर्णितां येना वेदशास्त्रां पडे ठकां । शेष तो शिणला भारी 'नेति नेति' परा श्रुति ॥ ५ ॥ धन्यावतार कैचा हा भक्तालागि परोपरी । रामकार्जी उतावीळ भक्तां रक्षक सारथी ॥ ६ ॥ वारितो दुर्घटें मोठीं संकटीं धांवतो त्वरें । दयाळू हा पूर्ण दाता नाम घेतांचि पावतो ॥ ७ ॥ धीर वीर कपी मोठा मागें नव्हेची सर्वथा । उड्डाण अभ्दूत ज्याचें लंघिलें सागरा जळा ॥ ८ ॥ देउनी लिखिता हातीं नमस्कारी सितावरा । वांचिता सौमित्र अंगें राम सूखें सुखावला । ॥ ९ ॥ गर्जती स्वानंदमेळीं ब्रह्मानंद सकळही । अपार महिमा मोठा ब्रह्मादिकांस नाकळे ॥ १० ॥ अभ्दूत पुच्छ तें कैसें भोंवंडी नभपोकळीं । फांकलें तेज तें भारी झांकिलें सूर्यमंडळा ॥ ११ ॥ देखतां रूप पैं ज्याचें उड्डाण अदभुत शोभलें । ध्वजांत ऊर्ध्व तो बाहु वाम हस्त कटीवरी ॥ १२ ॥ कसिली हेमकासोटी घंटा किंकिणी भोंवत्या । मेखळे जडिलीं मुक्तें दिव्य रत्नें परोपरी ॥ १३ ॥ माथां मुगुट तो कैसा कोटि चंद्रार्क लोपलीं । कुंडलें दिव्य तीं कानीं मुक्तमाळा विराजते ॥ १४ ॥ केशर रेखिलें भाळीं मुख सुहास्य चांगलें । मुद्रिका शोभती बोटीं कंकणें कर मंडित ॥ १५ ॥ चरणीं विजता अंदू पदीं तोडर गर्जती । कैवारी नाथ दीनाचा स्वामी कैवल्यदायका ॥ १६ ॥ स्मरतां पाविजे मुक्ती जन्ममृत्यूसि वारितो । कांपती दैत्य तेजासी भुभुःकाराचिया बळें ॥ १७ ॥ पाडितो राक्षसू नेटें आपटी महिमंडळा । सौमित्रप्राणदाता कीपकूळांत मंडणू ॥ १८ ॥ दंडिली पाताळशक्ती अहीमही निर्दाळिले । सोडविलें रामचंद्रा कीर्ति हे भुवनत्रयीं ॥ १९ ॥ विख्यात ब्रीद तें कैसें मोक्षदाता चिरंजीव । कल्याण त्याचेनि नामें भूतपीशाच्च कांपती ॥ २० ॥ सर्प वृश्चिक पश्वादी विष शीत निवारण । आवडीं स्मरतां भावें काळ कृतांत धांकतो ॥ २१ ॥

**संकटें दूरने-बाधा दुःख दारिद्र नाशक । ब्रह्मग्रह-पिडा व्याधी ब्रह्महत्यादि पातकें ॥ २२ ॥ पुरवी सकळही आशा भक्तकामकल्पतरू । त्रिकाळीं पठती स्तोत्र इच्छिलें पावती जनीं ॥ २३ ॥ परंतु पाहिजे भक्ती संशी कांहीं धरूं नका । रामदास सहकारी सांभाळीतो पदोपदीं ॥ २४ ॥ इति श्री रामदासकृत भीमरूपी स्तोत्रं समाप्तम्.**

पहिल्या स्तोत्राच्या योगानें भूत पिशाच्चादि बाधा दूर होतात आणिः—

ह्या दुसऱ्या स्तोत्राच्या योगानें विंचू व सर्प ह्यांच्या दंशाच्या बाधा दूर होतात. मात्र ग्रहणामध्यें ह्या मंत्रांचें यथाविधि पाळण केलें पाहिजे. ही भीमरूपी मनामध्यें पठण करून रक्षा घेऊन दंशाच्या ठिकाणीं थोडें चोळावें म्हणजे विष उतरतें. ह्यांतील सर्व गुण भक्तिपाशीं आहे.

आतां आपल्या अंतःकरणाला, श्रोत्यांच्या अंतःकरणाला व परमेश्वराच्या अंतःकरणाला सद्गदित करणारा, गहिंवर आणणारा असा एखादा धांवा, करुणाष्टक व सवाईचा मासला देऊन समर्थांच्या अनुग्रहाची परिसमाप्ति करूं.

खालील धांवा किती बरें करुणरसोत्पादक आहे ?——

**धांवरे रामराया । किती अंत पाहाशी ॥ धांवरे०॥ध्रु०॥**
**प्राणांत मांडिलासे । नये करुणा कैशी ॥**
**पाहीन धणिभरी । चरण झाडीन केशीं ॥**
**नयन शीणले बा । आतां केधवा येशी ॥ धांवरे०॥१॥**

हा धांवा उत्तम स्वरांत म्हणतांना कोणाच्या अंतःकरणांत बरें गहिंवर उत्पन्न होत नारीं ? मग त्या दयाघनासही त्या भक्ताची दया येणार नाहीं काय ?

तसेच खालचें करुणाष्टकः——

**अनुदिनि अनुतापें तापलों देवराया ।**
**परम दिनदयाळा नीरसी मोह पाया ॥**
**अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।**
**तुजविण शिण होतो धांवरे धांव आतां ॥ १ ॥**

खालचें अष्टक किती अनुतापदर्शक आहे पहाः—

**युक्ति नाहीं बुद्धि नाहीं। विद्या नाहीं विवेकता ॥**
**नेणता भक्त मी तूझा। बुद्धि दें रघुनायका ॥ १ ॥**

अहाहा! ह्याखालील मागणी किती मधुर आहे!

**विमळ वाचा दे दे राम। विमळ करणी दे दे राम ॥**
**प्रसंग ओळखी दे दे राम। धूर्त कळा मज दे दे राम ॥ १ ॥**

समर्थांची भक्ति आणि प्रेमच कांहीं विलक्षण होते. आपल्या उपास्य देवतेशीं अत्यंत लडिवाळपणा करावयाचा म्हणजे उपास्य दैवत स्त्रिलिंगी असलें तर त्याला पुल्लिंगानें संबोधून पिता म्हणावयाचें, किंवा उपास्य पुल्लिंगी असल्यास त्यास स्त्रिलिंगानें संबोधून त्याला जगज्जननी म्हणावयाचें. तुकाराम महाराजांनीं आपल्या विठ्ठलास 'विटाबाई माउली' असें प्रेमभरांत म्हटलें आहे. प्रेम हें चहूंकडे सारखेंच. म्हणून समर्थांनीं आपल्या रामचंद्रास प्रेमाच्या भरांत 'रामाबाई'ही म्हटलें आहे. पहाः—

**सुंदर रामाबाई। सबरा भरींत सर्वां ठायीं हो ॥**
**लिगमापार नाहीं। तें म्यां वर्णावी ते काई हो ॥सुंदर०॥१॥**

विवेकानंदांचे गुरु भगवान् रामकृष्ण परमहंस तर स्वतः स्त्रीचा वेष घेऊन आपल्या उपास्य दैवताशीं प्रणय करीत असल्याचें त्यांनीं लिहिलें आहे.

पण सर्वांत समर्थांचा विशेष गुण व सर्व संतमंडळींत तारिफ करण्यासारखा गुण म्हणजे 'आवेश' किंवा 'तडफ' हा होय. त्यांतून मारुतीरायांचा पराक्रम वर्णन करण्याचा प्रसंग आला कीं, त्यांच्या अगदीं रोमारोमांतून स्फुरण चढे व तें स्फूर्तिदायक शब्दरूपांनीं बाहेर पडे. ह्या गुणाच्या दर्शक त्यांच्या 'सवाया' आहेत. त्या उत्सवांत उच्च स्वरानें म्हणतांना व भक्तिभावानें तल्लीन होतांना मनुष्याच्या हृदयांत आत्मविश्वास उत्पन्न झाल्यावांचून राहतच नसे. त्यांपैकीं एकच सवाई येथें देतोंः—

## सवाई.

**जब हनुमंत जनक दुहिता शुद्ध लेनेकू गभार दौर**
**दौर आये है ॥ तब कंठ गुर गुर गुरीत नेत्र गर गर**
**गरीत रोम थर थर थरीत पुच्छ झारे ॥ तबलक घर घर**

घरीत बनमो दर दर दरीत सीताशोक हरत झर झर झरीत बन उफारे ॥ तब कंठ कुच कुच कुचीत इंद्रजीत चक चक चकीत रावण थक थक थकीत कर नगर ज्यार ज्यार मख मख मखीत दास लियो जयतु राम मिले तब कपि भुभुःकारे ॥ १ ॥

आतां सरते शेवटीं समर्थांचें आवडतें ध्यान करून हें प्रकरण आटपूं.

## जोहार.

परम सुंदर रूप शामल । इंद्रनील किल कांति कोमल ॥
भय निवारण भक्तवत्सल । वर पराक्रम कीर्ति वीमल ॥
भुवन कंटक दैत्य मारक । अमर मोचक दैन्य हारक ॥
दुरित नाशक पुण्यकारक । हरित संकट दास तारक ॥

असा हा समर्थांचा गोड अनुग्रहप्रसाद द्यावा तितका व घ्यावा तितका थोडाच आहे. रत्नराशींतून निवडणारानें तरी निवडावें काय ? रत्नप्रभेनें सारे डोळेच दिपून जाऊन दिशाभूल होते. ह्याशिवाय, समर्थांची मानसपूजा, स्तोत्रें, आरत्या, काकड आरत्या, प्रत्येक दिवशीं म्हणावयाचीं ध्यानें वगैरे इतकीं विपुल आहेत कीं, तो एक अनंत असा सागरच होय. त्यांतून शक्य तेवढीं अनुपम रत्नें निवडून घेतलीं आहेत. त्यांपैकीं कितीएक अगदीं वेदतुल्य असूनही विस्तारभयास्तव लिहून काढलेलींही रद्द करावीं लागलीं. असो; जीं यथाशक्त्या यथामत्या निवडलीं आहेत तेवढींच गोड करून घेऊन प्रेमळ वाचकांनीं समर्थांचे दास व्हावें. मनांत भक्ति व प्रेम असल्यावर समर्थांच्या कृपेनें तो दासही समर्थच होईल ह्यांत किमपीही संशय नाहीं. कारण तुकारामांचाही अनुभव व प्रतिज्ञा हीचः—

**"आपणा सारिखें करिती तत्काल"**

ती व्यर्थ कशी होईल ? येवढीच प्रार्थना करून हा अनुग्रहाचा भाग आम्ही पुरा करतों. ह्याविषयीं आणखी कांहीं सांगणें तें प्रस्तावनेंतच सांगण्याचें अभिवचन देऊन हें प्रकरण येथेंच संपवितों.

---

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

## उत्तरार्ध—भाग ६ वा.

## समारोप.

येथपर्यंत समर्थांच्या लीलानुग्रहांतील निवडक निवडक भाग सांगितला. आतां त्यापासून घेण्यासारखा बोध कोणता ? आणि हल्लींच्या आपल्या परिस्थितींत त्यापासून कांहीं उपयोग होण्यासारखा आहे कीं, काय ? ह्या दोन महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार राहिला. आणि तेंच तर ह्या पुस्तकाचें मुख्य सार आहे. ह्यासाठीं त्याचा विचार ह्या भागांत करण्याचें योजिलें आहे.

आजकाल दारिद्र्यानें लोक जिगजिगले आहेत; विपत्तीनें ग्रासले आहे; महर्गतेनें त्यांस पछाडलें आहे; प्रपंच अगदीं नको नकोसा झाला आहे; पराधीनतेला ते कंटाळले आहेत; त्यांना स्वराज्याची तृष्णा लागली आहे; त्याकरितां जो तो धडपड करीत आहे; देशांतील विद्वान् पुढाऱ्यांनीं ह्या कामांत अग्रमान स्वीकारला आहे व ते आपआपल्या विचाराप्रमाणें निरनिराळे उपाय सुचवीत आहेत, व 'यद्यदाचरतिश्रेष्ठ-स्तत्तदेवेतरो जनाः' या नियमाप्रमाणें ते ते उपाय लोक जारीनें अमलांतही

आणीत आहेत. कांग्रेस काढा, काढली; परिषदा काढा, काढल्या; बहिष्कार टाका, टाकला; परदेशी साखरेला फाटा द्या, दिला; गुळाच्या श्रीखंडाचेच लोक ढेंकर देऊं लागले! खादी वापरा कीं, खादीच सुरू झाली. स्त्रियांचीं पातळें सुद्धां खादीचीं! महात्मा गांधींनीं सांगितलें कीं चरखे सुरू करून सूत काढा कीं, दहा महिन्यांत मी स्वराज्य तुमच्या हातीं देतों! कीं घरोघरीं, गल्लोगल्लीं चरखे* सुरू झाले! बायकांचे वर्ग निघाले! मुळशी पेट्यांत आडवे पडा, पडले; तुरुंगांत जा, गेले. परंतु अखेर काय? कांहीं नाहीं. इतक्या उपायांतून एकानेंही सिद्धि झाली नाहीं, व पुढें तरी होईल किंवा नाहीं व झाल्यास ती कधीं होईल ह्याचें वर्षफल वर्तविणारा कोणी ज्योतिषीही पण पैदा होत नाहीं.

एखादा मनुष्य आसन्न मरण झाला म्हणजे तो जसा आपल्या आरोग्याविषयीं आतुर होऊन जो जो मनुष्य जें जें औषध किंवा जे जे उपाय सांगेल ते ते करीत सुटतो, तशीच आज आमची परिस्थिति झाली आहे. तो जसा भांबावून जातो व अधिकाधिक निराश बनतो तशीच आजकालची आमची स्थिति आहे. वरच्या सर्व उपायांना आम्ही नांवें ठेवितों किंवा त्यांची निंदा किंवा हेटाळणी करतों, असें मात्र कोणी समजूं नये. तर त्यापासून अद्याप कोणताच गुण दृष्टीस पडत नाहीं; म्हणून इतरांबरोबर आम्हीही मनापासून दिलगिरी प्रदर्शित करतों. आणि दहा जसे दहा उपाय सांगतात, त्यांतलाच ह्या समर्थांच्या लीलानुग्रहावरून जो काय आमच्या अल्प मतीस उपाय सुचतो तोही एक त्यांतलाच अकरावा उपाय म्हणून लोकांपुढें मांडीत आहों. तो कोणास बरा वाटल्यास व अंतःकरणास पटल्यास त्या मार्गास लागावें आणि तोही एक करून पहावा

---

* आमच्या हिंदुस्थानांतील एक पुढारी गृहस्थ युरोपमध्यें गेले असतां ते डेन्मार्कमध्यें जाऊन माजी युद्धप्रिय जर्मनीचे बादशहा यांस भेटले होते. त्यांस बादशहा म्हणाले "तुमच्या लोकांविषयीं मला मोठी आदरबुद्धि आहे. गांधींना मी साधुत्त्वाच्या दृष्टीनें पूज्य मानतों. परंतु चरख्यानें स्वराज्यप्राप्ति होईल ही गोष्ट निखालस वायफळ आहे!"

अशी आमची दृढतर इच्छा आहे. तो उपाय कोणता ? तर प्रथम समर्थ पुरुष उत्पन्न करावा, कीं मागाहून हवे तितके शिवाजी महाराज उत्पन्न होतील. पण समर्थ उत्पन्न करणें व शिवाजी उत्पन्न करणें आपल्या हातची गोष्ट आहे काय ? हें तर शुद्ध मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्यासारखें हास्यास्पद दिसतें, असें वाटेल. परंतु यांत हास्यास्पद असें कांहीं नाहीं. समर्थांच्याच मार्गानें तुम्ही जाल तर तुम्हीही समर्थ व्हाल. मात्र मध्यंतरी कष्टाला कंटाळूं नका, दुःखाला भिऊं नका, त्यांचाच अनुग्रह पुढें ठेवून चाला कीं, तुम्हीही समर्थच व्हाल ह्याबद्दल तिळमात्र शंका नाहीं. साधुसंतांच्या प्रतिज्ञा तुमच्या ध्यानांत नाहींत काय ? त्या तुम्हांला खोट्या वाटतात काय ?

**‘ जब नर करनी करे सो नरका नारायण होय ’**

मनुष्य कर्तबगारी करील तर नराचा नारायण होणार नाहीं काय ? अलबत होईल. असे आजपर्यंत अनेक नराचे नारायण झाले आहेत व पुढेंही होतील. मनुष्याला हिंमत पाहिजे, धैर्य पाहिजे; म्हणजे पाहिजे तें होऊं शकतें. सामर्थ्यवान् पुरुषांच्या कोशांत ‘ अशक्य ’ हा शब्दच नाहीं. आपण आज समर्थांच्या अनुग्रहाप्रमाणें चालण्यास व त्यांनीं सांगितलेल्या मार्गानें जाण्यास तयार आहांना ? मग आपल्याला काय कमी ? समर्थ म्हणतातः—

**‘ रुक्मांगद होता नर। आम्ही काय आहों खर ’**

रुक्मांगद म्हणे जीवन्मुक्त झाला. मग आपल्याला त्याच्यासारखें जीवन्मुक्त होतां येणार नाहीं काय ? रुक्मांगद तेवढा नर होता, आणि आम्ही काय खर—गाढवें आहोंत कीं काय ? ह्याकरितां मनांत धैर्य धरा, क्षणिक वैभवाला भुलूं नका, मनाला आळा घाला, म्हणजे तुम्हीही रुक्मांगदासारखेच व्हाल. तर मग ठीक आहे. समर्थ होण्याला जर कांहीं मार्ग असला तर दाखवा. आम्ही त्या मार्गानें एका पायावर जाण्यास तयार आहों. फार उत्तम. तर मग तुम्हाला अगदीं सोपा मार्ग सांगतों. तोही मी आपल्या पदरचा सांगत नाहीं, तर समर्थांनींच जो मार्ग दाखविला आहे,

समर्थांनींच ज्याचा कित्ता घालून दिला आहे तोच मार्ग मी विशद करून सांगणार आहे; तर ऐका, नीट चित्त देऊन ऐका.

कोणतेंही कार्य उत्तम प्रकारें सिद्धीस जाण्याला नेहमीं दोन शक्ति लागत असतात. जड आणि चैतन्य ह्या दोन शक्तींनींच ब्रह्मांड चाललें आहे. प्राणी उत्पन्न होण्यालासुद्धां नर आणि मादी ह्या दोन शक्तीच एकत्र व्हाव्या लागतात. परमेश्वरानें आपल्याला अवयव दिले आहेत ते सुद्धां दोन दोन दिले आहेत. हात दोन; पाय दोन; डोळे दोन; कान दोन. मनुष्याला एकच हात असता तर काय करतां आलें असतें ! एकाच पायानें मनुष्य कितीसा चालणार ? केव्हांही एकाचा दुसऱ्याला आधार पाहिजेच, तरच तें कार्य यथायोग्य रीतीनें पार पडतें. हीच गोष्ट स्वधर्माची व स्वराज्याची आहे. तींही उभयतां परस्परावलंबी आहेत. एकाशिवाय एक चालणें कधींच शक्य नाहीं. राज्य हा देह मानला तर धर्म हा त्याचा आत्मा होय. आत्म्याशिवाय देह व्हावयाचाही नाहीं आणि रहावयाचाही नाहीं. त्याचप्रमाणें देहाशिवाय आत्म्यालाही प्रगट होण्याला दुसरा मार्ग नाहीं. अशी ही जोडगण आहे. जड आणि चैतन्य हीं जरी वेगवेगळींशीं दिसतात, तरी तीं एकरूपच आहेत. हें जाणूनच आपल्यांतील साधुवर्यांनीं व ऋषिवर्यांनीं त्यावर अर्धनारी नटेश्वराचें रूपक बसविलें आहे. हीं जरी दोन्हीं एकरूप आहेत तरी श्रेष्ठत्व द्यावयाचें तें चैतन्याला किंवा आत्म्यालाच देतात. देह हा कौशल्यानें केलेला व कार्यकर्ता असतो; आणि आत्मा हा निराकार असून तो डोळ्यांना प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळें अस्तित्वांत आहे असें सुद्धां वाटत नाहीं. तरी देहाचा मुख्य चालक तोच. त्याचप्रमाणें स्वराज्याची व स्वधर्माची स्थिति आहे. स्वराज्याचीं खरीं खरीं सूत्रें स्वधर्माच्याच हातांत असतात. धर्म अजिबात नष्ट झाला तर केवढाही बलाढ्य राजा असला तरी त्याला राज्य चालवितां येणार नाहीं. याकरितां आधीं धर्मस्थापनेचा विचार आणि मागाहून स्वराज्य. स्वधर्म हातीं आला कीं, त्याच्यामागें स्वराज्य हें सुईच्या पाठीमागें दोरा ह्याप्रमाणें धांवत येईल. म्हणून प्रथमतः समर्थच निर्माण होणें अवश्य आहे. ते कसे व्हावेत ! त्याचा मार्ग प्रथम सांगून नंतर शिवाजी महाराजांचा विचार करूं.

समर्थांची योग्यता अंगीं आणण्याचा पुढाकार प्रथमतः ब्राह्मणांनींच घेतला पाहिजे. कारण 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' सर्व वर्णांमध्यें ब्राह्मण हेच श्रेष्ठ समजले जातात. ब्राह्मणांची महति केवढी आहे ती पूर्वी दासबोधामध्यें दिलीच आहे. जे ब्राह्मण पूर्वी गुरूसारख्या श्रेष्ठ व उच्चतम पदवीला पोंचले होते, त्यांची आज दशा काय? नीचापेक्षांही नीच जो सेवाधर्म तो ते मोठ्या आनंदानें मिटक्या मारून पतकरतात. कोणी शिंपी बनतात; तर कोणी डेरी घालतात! सोवळें नाहीं, ओंवळें नाही. शुद्धता नाहीं. संध्येंतील चोवीस नांवें येत नाहींत कीं, गोत्र कोणतें? म्हणून विचारल्यास फे फे उडते! इतर लोक तुमची निंदा करतात; उपहास करतात; हे भटुकडे बुडवे म्हणतात; भोंदू म्हणतात; लुटारू म्हणतात; नव्हे तमाशांत सोंगें आणून कानांनीं ऐकवत नाहीं अशी तुमच्या जातीची विटंबना करतात. ह्याची तुम्हांस कांहींच लज्जा वाटत नाहीं काय? तुम्ही जर तुमच्या धर्माप्रमाणें चालत असतां, तर अशा कुटाळ लोकांची तुमच्या वाटेस जाण्याची मगदूर होती काय?

मग तुमच्या मतें ब्राह्मणांनीं काय करावें? ह्यांत आमचें मत नको आणि कोणाचेंच मत नको. समर्थांच्या आज्ञेप्रमाणें वागावें. तें कसें काय? तें कसें काय म्हणजे? 'ब्राह्मणाची मुख्यदीक्षा' कोणती? तर 'भिक्षा.' ती पतकरून सुखेनैव कालक्रमणा करावी. म्हणजे साऱ्या ब्राह्मणांनीं आपआपल्या नोकऱ्यांचे राजीनामे द्यावेत, बायकामुलें उपाशी ठेवावींत आणि साऱ्यांनीं कांखेस झोळी अडकवून फिरावें होय? छे छे! सर्वांनींच भिक्षा मागावी असें कोण म्हणतो? ती गोष्ट शक्य नाहीं. आणि समर्थ तरी असें कसें सांगतील? तर देशाची, लोकांची ज्यांना कळकळ वाटत असेल, लोककल्याणाकडेच आपला देह वहावयाचा असा ज्याचा कृतसंकल्प असेल त्यानेंच हें भिक्षेचें व्रत पतकरावें. जनाचें–देशाचें–हित साधावयाचें तर आत्मसुखावर पाणी हें सोडलेंच पाहिजे. स्वार्थत्याग हा केलाच पाहिजे. स्वार्थत्यागाशिवाय जनाचें हित करूं म्हटलें तर तें कसें होईल? हल्लीं सुद्धा शेंकडों लोकांनीं देशहिता-करितां स्वार्थत्याग केला नाहीं काय? आत्मसुखावर पाणी सोडलें नाहीं काय? कित्येकांनीं संसार सोडून गोरक्षणाचें व्रत पतकरलें आहे; किती-

एक स्वयंसेवक बनले आहेत; कित्येकांनीं आपली सर्व संपत्ति देशहिताच्या कामीं अर्पण केली आहे; शेंकडों लोकांनीं निवळ देशकार्यासाठीं कारागृहाचें दुःख व यातना सोसल्या आहेत, व कित्येक लोक महिना महिना उपास काढीत आहेत! ह्यावरून देश कार्याला लागावयाचें तर आधीं स्वार्थत्याग केला पाहिजे व आपल्या ऐषआरामावर पाणी सोडून देह झिजविण्याला तयार झालें पाहिजे. हें जर खरें तर ते ब्राह्मणांनींच आधीं कां पतकरूं नये? तो तर त्यांचा अनादि कालाचा धर्म आहे, आणि तेंच त्यांना भूषण आहे. ह्याकरितां देशकार्य करावयाचें—लोककल्याणाप्रीत्यर्थ देह खर्ची घालावयाचा असा मनाचा एकदां निश्चय झाला कीं, तत्काळ भिक्षेची दीक्षा घ्यावी. संसाराच्या मायापाशांत गुंतूं नये. कारण आपल्याच बायकामुलांच्या पोषणाच्या यातायातींत मनुष्य गुंतलें कीं, त्याच्या हातून देशहिताचें कार्य व्हावें तसें होत नाहीं. ह्याकरितां होतकरू ब्राह्मण मंडळींना समर्थांचा उपदेश हा कीं, 'बाबांनो! तुम्हाला जर लोककल्याण हीच जन्माची इतिकर्तव्यता वाटत असेल तर तुम्ही लग्नाच्या किंवा संसाराच्या भरीस पडूं नका, तर भिक्षेची दीक्षा घेऊन सारा दिवस पर्यटण करा. सर्व लोकांत ऐक्य उत्पन्न होईल, परस्परांचें प्रेम वाढेल व ईश्वरनिष्ठा जागृत होईल अशा उपदेशाचें आमरण व्रत चालवा. अंतर्बाह्य निर्मळ रहा. भिक्षावृत्तीला ब्रह्मचर्य व्रत पाळणें अवश्य आहे. तें एकनिष्ठेनें पाळा. सर्व स्त्रिया मातुश्रीसमान लेखा. अंतःकरणांत विषयाचा, व्यसनाचा गंध ठेवूं नका. ढोंग माजवूं नका. ढोंगासारखें अधोगतीला नेणारें दुसरें पातक नाहीं! कोणी भिक्षेला सूपभर दाणे आणून पुढें ठेवले तरी तुम्ही एक मूठभरच घेत जा, अधिक आशा धरूं नका. मधुर वाणीनें सारे लोक आपलेसे करून घ्या. असें केलें तर तुमचे शत्रु असतील तेही मित्र होतील. मग तुमच्या वाटेस जाणार कोण? हजारों लोक तुमच्या आज्ञेला तत्पर होतील.

कोणाचीं लग्नें कार्यें आधींच होऊन नंतर देशकार्याची स्फूर्ति उत्पन्न झाली, तर लागलीच बायका मुलें उपाशीं टाकून 'भिक्षावृत्ति पतकरूं नका. आणि तशी संधी आल्यास वायां जाऊं देऊं नका. जी येतांच ही दीक्षा घ्या. मागें सरूं नका. दुर्दैवानें म्हणा कीं

सुदैवानें म्हणा, असेही मनुष्यांवर कैक प्रसंग येतात कीं, तरुणपणांत एकाएकी पत्नी गतप्राण होते. मुलेंही एकामागून एक जाऊन मनुष्य उदास होतो. अशा वेळीं मात्र पुन्हां संसाराच्या फेऱ्यांत पडूं नका. लग्न व संसार तुम्हांला प्रथम मोठा गोड वाटतो. परंतु 'विषकुंभंपयो मुखं' असें त्याचें स्वरूप आहे. त्याच्या यातना काय आहेत त्या आपण समर्थांच्या दासबोधाच्या तिसऱ्या दशकांत वाचल्याच असतील ! त्या ध्यानांत आणून सावध व्हा आणि ही ब्राह्मणांची मुख्य दीक्षा सोडूं नका.

सध्यां आपल्या देशाचें नष्टचर्य ओढवलें आहे; त्याला चहूंकडून क्षयरोग जडला आहे; त्याची विपन्नावस्था झाली आहे, म्हणून त्यावर आम्ही ह्या समर्थांनीं तयार केलेल्या 'भिक्षावृत्ति' व 'ब्रह्मचर्य' ह्या रामबाण मात्रा सांगितल्या. पण ह्यावर आपण असें म्हणाल कीं, 'ह्यांत हो काय आहे ? हें कसलें भिकार औषध ! त्यानें काय होणार कपाळ ! त्या आम्ही केव्हां पाहिजे तेव्हां घेऊं. पण लांब कशाला ? आज भिक्षा मागणारे ब्राह्मण काय थोडे आहेत? भगवीं वस्त्रें परिधान करून, हातांत कुबडी घेऊन 'जयजय रघुवीर समर्थ' म्हणणारे रामदासी दाराशीं काय थोडे येतात ? त्यांपैकीं एखादा कोणी समर्थ झाला आहे काय ? नाहीं ना ? मग त्यांत अर्थ कोणता ? आणि त्या मात्रांपासून गुण तो काय येणार ? जेथें लोकमान्यांसारख्या डॉक्टरांनीं महात्मा गांधीसारख्या सर्जनांनीं व लाला लजपतरायासारख्या आश्विनीकुमरांनीं हात टेंकले, तेथें हे एक दोह्राचार्य नाकाडोळ्याचें वैद्य आले आहेत उपाय सांगावयाला ! लोक औषधें सांगतात म्हणून ह्यांनीं एक जडीबुट्टी ठोकून दिली ! हेः !!'

होय; गोष्ट खरी आहे. आम्हीं दोन मात्रा सांगितल्या खऱ्या. पण त्यांचें पथ्य कोठें आपण ऐकलें आहे ? तें आपण यथासांग पाळाल तर एक नव्हे पण दहा समर्थ पैदा होतील. तें पथ्य ऐका मात्र, कीं आपण ही भयानें गांगरून जाल, व तें औषध घेणेंही नको आणि तें पथ्य करणेंही नको असें म्हणाल. इतकें तें बिकट आहे. औषधाचा गुण एकपट असला तर पथ्याचा गुण दसपट असतो. म्हणूनच तुकारामांनीं म्हटलें आहे—

**‘ विठ्ठल मात्रा जेणें घ्यावी । तेणें पथ्य सांभाळावी । ’**

पथ्यासारखें आरोग्यकारक व कुपथ्यासारखें प्राणघातक दुसरें कांहींच नाहीं. कुपथ्य केल्यानें मनुष्यजीविताचा कसकसा नाश होतो ह्याचा एक मजेदार चुटका ‘ अनुग्रह ’च्या भागामध्यें आलेलाच आहे. ह्याकरितां व्याधिग्रस्तानें कोणतेंही औषध घेतलें तरी पथ्याच्या वेळीं आपली जिव्हा, वासना व मन हीं आंवरून धरलीं पाहिजेत. तीं जर का सैल सुटतील तर अमृत वल्लीचेंही विष होतें हें पक्कें लक्षांत ठेवावें. हल्लींच्या ब्राह्मण भिक्षुकांत हा पथ्याचा धरबंध मुळींच राहिलेला नाहीं. मग सामर्थ्य प्राप्त होणार कसें ? आणि समर्थ तरी होणार कोण ? ह्यासाठीं आतां त्या दोन मात्रांच्या पथ्याचाच पाढा वाचतों. कारण आज विशद करून सांगण्याचा विषय तोच आहे.

आमचें जें धडधडीत कुपथ्य चालून देशाची प्रकृति दिवसेंदिवस विकोपास चालली आहे, त्यांतील सर्वांत प्राणघातक कुपथ्य म्हणजे **आम्हांस लागलेली चैनीची चट**. ती पार नष्ट होऊन कांटकपणा वाढला पाहिजे, म्हणजे आम्ही वज्रदेही बनूं. हल्लीं आमचें इतकें कुपथ्य चाललें आहे कीं, त्याला ताळ ना तंत्र ! आमचें खाणें, पिणें, निजणें, चालणें, पोषाख घालणें हें निसर्गाच्या इतकें उलट आहे कीं, त्यामुळें आम्ही अर्थशास्त्राचा, आरोग्यशास्त्राचा, वैद्यशास्त्राचा व धर्मशास्त्राचा चक्काचूर उडविला आहे. आम्ही दरिद्र्यांतील दरिद्री बनलों आहोंत; अशक्तांतले अशक्त झालों आहोंत; अशा स्थितींत जर हा असा उलट प्रकार कायम राहिला तर आमच्या अंगीं सामर्थ्य येणार कसें ? आम्ही समर्थ होणार कसे ? कधींच शक्य नाहीं. उत्तरोत्तर खड्यांतच जाण्याची पाळी येणार. ह्याची सत्यता पटण्यासाठीं थोडीशीं उदाहरणें देणें अवश्य आहे. आणखी दुर्दैवाची गोष्ट ही कीं, हल्लींच्या विद्यार्थी मंडळींतच हा प्रकार जारीनें सुरू होतो आणि तो पुढें पुढें वाढत जातो, हें सर्वांत विघातक होय. पण आतां त्याची निवडानिवड करीत न बसतां सरसकटच कांहीं मासले दाखवितों.

**चहा**--हाच पदार्थ प्रथम घेऊं. कारण, आजकाल चहा हेंच आमचें कुलदैवत बनलें आहे. सकाळीं आठ वाजावयाच्या आंत चहा हा

झालाच पाहिजे, व दुपारीं चारपांच वाजतांचा नियम टळावयाचा नाहींच. [ ज्यांच्या घरीं ही चाल नाहीं अशीं घरें विरळाच ! ] ह्याशिवाय मध्यंतरीच्या वेळा निराळ्या. उपासतापासाला तो निदानीचा आश्रयदाता आहेच. शिवाय कोणिही घरीं परका माणूस येवो, कीं त्याच्या स्वागताला चहा हा पाहिजेच. न्हावी असो, धोबी असो, परीट असो, कीं मोळक्या असो, त्याचें चहापानावांचून पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. शहरांतील गल्लोगल्लींतून जीं चहाचीं दुकानें खेटलेलीं दिसतात त्यावरूनच ह्याच्या कलकलाटाची कल्पना होते. आतां चहामध्यें विषाचा अंश असतो; त्याच्यापासून अग्निमांद्य येतें; मधुमेह जडतो; इत्यादि ज्या कुत्सित कल्पना आहेत त्या आम्हांस मान्य नाहींत. चहापासून तरतरी येते, तो करावयाला व पचावयाला सुलभ पडतो, इत्यादि गुणच आम्हास मान्य आहेत.

परंतु अर्थशास्त्रदृष्ट्या मात्र आम्ही त्यास दारिद्र्याचा व भिकेचाच पाया असें म्हणतों. कारण प्रत्येक कपाला कमींत कमी अर्धा आणा खर्च धरला व दोन कपच जरी दिवसाचे धरले तरी माणशीं दरमहा दोन रुपये चहाकडे जातात. घरांत मुलेंबाळें, बायको ह्यांना कांहीं टाकून घेतां येत नाहीं. शिवाय चहाबरोबर पाव, बिस्कुटें, सांजा, अशी जोडगण लागते ती वेगळीच. खेरीज पाहुणा, आला गेला आहेच. म्हणजे कुटुंबवत्सलाला १० कप तरी दिवसांतून पाहिजेत. अर्थात् महिना १० रुपये तरी चहाचा खर्च येतो; पण याशिवाय त्याच्या मागें शेपूट आहे तें शुद्ध शेंडें नक्षत्रासारखें आहे. म्हणजे चहा घेतला कीं 'स्टोव्ह' पाहिजे. त्याला ८।१० रुपये, किटली वगैरे ४।५ रुपये. स्पिरिट, पिन्स, रिपेर, इत्यादि खर्च. आणि तो प्यावयाला काय ? तर बशी पेले ! ते काय ? आज बशी फुटली तर उद्यां पेला पडला; आज मुलानें चार फोडले, तर उद्यां यजमानांनीं दोन फोडले ! आणा नवे ! ह्या खर्चाखालीं कुबेर असला तरी सुद्धा दरिद्री व्हावयाचा; मग पन्नास साठ रुपये दरमहा-वाल्याची दशा काय विचारावी ? आणखी हें व्यसन एकदां जडलें म्हणजे सुटत नाहीं. 'बाटलींतलें मद्य आणि किटलींतलें अद्य' मिळून दोन्ही कफल्लकच करणारीं अस्त्रें आहेत. हा चहा जोंपर्यंत सुटणार नाहीं

तोंपर्यंत सामान्य लोकांच्या संसारांत बरकत म्हणून कधीं येणें शक्य नाहीं. कर्जदार आला कीं तोंड चुकवावें हेंच त्याचे कपाळ ! ह्याशिवाय कॉफी, कोको, सोडा, लेमोनेड, बर्फ, आइस्क्रीम, कुल्पी आइस्क्रीम वगैरे त्याचीं भांवडें असतात तीं वेगळींच !

हा अर्थशास्त्रदृष्ट्या विचार झाला; पण आरोग्यशास्त्रदृष्ट्या तर त्याचा परिणाम ह्याहूनही भयंकर आहे. कारण 'भूक लागल्यावांचून जेऊं नये व झोंप आल्यावांचून निजूं नये' हा आरोग्याचा ठोकळ नियम जगजाहीरच आहे. सकाळच्या प्रहरीं प्रकृति शांत असते. भूक तहान कांहीं लागत नाहीं. भुकेची वेळा १० पासून १२ पर्यंत. म्हणूनच ब्राह्मणांनीं स्नानाच्या पूर्वीं कांहीं खाऊं नये असा शास्त्रानें निर्बंध घातला आहे. पण आतांचे ब्राह्मण तें सारेंच धाब्यावर बसवितात. आणि पोटांत क्षुधा तृषा नसतांही एक पेला, दोन पेले, कोणी कोणी हरीचे लाल तांब्या तांब्या चहा ढोसतात ! मग त्या प्रकृतीनें त्यांच्या नांवानें रडूं नये, कुथूं नये तर काय करावें ?

दुसरी बाब म्हणजे गलिच्छपणाची. चहा हा घरांत करून घेतला तर तें एक असो. कारण तो निर्मळ तरी असतो, परंतु आतां लोकांची प्रवृत्ति हाटेलांत चहा पिण्याची फार. तेथच्या वश्यापेले धड विसळित सुद्धां नाहींत. एकाच पाण्यांत बुचकळे तर बुचकळे नाहीं तर नाहीं ! ही स्थिति. अशा ठिकाणीं ब्राह्मण जाऊन बसतात. एका बाजूला न्हावी येऊन बसतो, व दुसऱ्या बाजूला परीट ! मग ती शोभा काय विचारावी ! त्यांतच एक पाव ! दोन भजी ! ! तीन मिसळ ! ! ! शिवशिव ! शिवशिव ! ! हें काय ? तर चैनीची चट.

आतां कपडालत्ता किंवा पोषाख—लोकांना ही चैनीची चट केवळ आज कालच लागलेली आहे असें नाहीं, तर ती प्राचीन कालापासूनही कमजास्त प्रमाणानें चालत आलेली आहेच. सांप्रतकालीं तिचा थोडासा अतिरेक झाला आहे इतकेंच. वास्तविक विचार केला तर वस्त्राचा उपयोग काय ? तर शरीराचें आच्छादन व्हावें आणि थंडीचें निवारण व्हावें, येवढा गुण त्यांत असला म्हणजे पुरे. पण नाहीं; त्याला रेशीम-काठ, रुईफूल, रंग, कशिदा, खडी इत्यादि नाहीं नाहीं त्या तऱ्हा आणि

चोचले! श्रीमंत लोक तर भरजरीचेंच कपडे वापरतात. म्हणजे अज्ञानपणाचा कळसच होय! अद्यापपर्यंत सुवर्णाचे पत्रे कोणी नेसावयास काढले नाहींत हेंच भाग्य! भरजरी कपडा अगदींच निरुपयोगी होय. तो बोजड असल्यानें नेसावयाला जड; अंगा बरोबर बसत नाहीं आणि थंडीही निवारण होत नाहीं. उलट अंगास खरखरीत मात्र लागतो! हें येवढें कशाकरितां? तर श्रीमंती दाखविण्याकरितां! मग त्यापेक्षां सोन्या रुप्याची रासच मांडून ठेवली तर काय वाईट? किंवा कलकत्त्यांतील एका लक्ष्मीपुत्रानें तीन कोटींच्या तीन नोटा काढून त्या भिंतीस टांगल्या होत्या, तशा टांगल्यातरी बरें. कारण त्यांत श्रीमंतीच दिसेल; अज्ञान तरी दिसणार नाहीं.

हल्लींच्या जामानिम्याची तऱ्हा तर याहूनही अजब आहे. पायांत आधीं लोकरीचे पायमोजे, त्यावर रबरी बंद, त्यावर बूट नंतर आंत धोतर; वर पाटलोण, त्याच्यावर शर्ट, त्यावर जाकिट, त्यावर कॉलर, त्यावर कोट, गळ्याला कडकडीत गळपट्टी आणि वरून प्रसंगोपात ओव्हर कोट, गळ्याला गळपट्टयाचा वेढा! हा काय पोषाख का घोड्यावरचें खोगीर! हेंच आम्हांस समजत नाहीं. युरोपांत भयंकर थंडी असल्यामुळें तेथील लोकांना हा पोषाख सुखकर आहे. पण येथें ह्या उष्ण प्रदेशांत त्याचेंच अनुकरण करणें हा वेड्यांचा बाजार नव्हे काय? बुटांचे बंद बांधण्याचा आणि सोडण्याचा केवढा समारंभ? ह्यापेक्षां दोन रुपयांचा जोडाच सुखकर नव्हे काय? पण नाहीं; आठ रुपयांचा बूट पाहिजे. पाटलोण घातली कीं, बसावयाला खुर्ची पाहिजे. खालीं बसावयाचें म्हटलें कीं, आली अडचण! ही तरी वायफळ खर्चाची बूड नव्हे काय!

ही चैनीची चट विद्यार्थीदशेंतच सुरू होते आणि तिचीच पुढें वाढ होते. पूर्वीं विद्यार्जन करावयाचें तर तें गुरुगृहीं राहून भिक्षावृत्तीनें करावयाचें व व्रतबंधानें रहावयाचें हा धर्म. तो आमच्या धर्मशास्त्रानें ह्याकरितांच घातला होता कीं, मुलांना ही चैनीची घातुक संवय लागूं नये व त्यांचीं शरीरें नाजुक होऊं नयेत, तीं कांटक बनावींत, हा त्यांचा उद्देश होता. ब्रह्मचारी म्हणजे विद्यार्थी. त्यानें विडा खाऊं नये, जोडा घालूं नये, स्त्रीशीं बोलूं नये, गायन ऐकूं नये, नटाचें तोंड पाहूं नये,

छत्री घेऊं नये, इत्यादि कडक नियम त्याला लावलेले होते. आतां तर सारा प्रकार त्याच्या उलट चाललेला आहे. चिरंजीव शहरांत विद्या शिकत असतात, आणि वडील खेडेगांवांतून पैसे पुरवीतच असतात. ह्या महिन्याला बोर्डिंगचा खर्च ४०; ह्या महिन्याला पन्नास; आज काय ब्याट मोडली; आज काय बॉल फुटला; आज काय सायकल पंक्चर झाली, ही ओरड ! बापाची साल कशी निघते याची कल्पनाही नाहीं !

**नाटकें**—ह्यासारखी अधोगतीला नेणारी आजकाल दुसरी संस्थाच नाहीं. एक वेळ जेवण चुकेल पण बहुतेक विद्यार्थ्यांची शनवार व बुधवारची नाटकाची वारी चुकावयाची नाहीं. मराठींत प्रथम नाटकें सुरू झालीं तेव्हां नटांचीं तोंडें पाहूं नयेत म्हणून सांगलींत केवढी दंगल ! पण आतां तो विषय अगदीं सर्वांच्या आवडीचा होऊन बसला आहे. आणि शाळाखात्यानें त्याचे देव्हारे माजविले आहेत. कां ? तर तो शिक्षणाचा विषय ! 'शाकुंतल' 'विक्रमोर्वशीय' 'मृच्छकटिक' हीं क्लासांत चालतात, मग काय ? 'माकडाच्या हातांत कांकडा' अशी अवस्था होते. ग्यादरिंग म्हटलें कीं, विद्यार्थ्यांनीं स्वतः नाटक हें केलेंच पाहिजे. त्याचा महिना दोन महिने धुडगूस ! हा अभ्यास ! मुलांनीं शकुंतला, रुक्मिणी व्हावें, तालीम पाठ करावी आणि गुरूंनीं व उपगुरूंनीं त्यांना हावभाव शिकवावेत ! मोठमोठे विद्वान् पुण्यपत्तनासारख्या गुणज्ञ शहरांत टांचा घांसून प्राण सोडतात आणि नाटकवाले सोन्याचीं कडीं घालून मिरवतात ! प्रो. मोडकांसारख्या विद्वानाचे शास्त्रीय ग्रंथ कसरी खातात आणि नाटकवाल्यांच्या थैल्या भरून तिकिटें बंद होतात ! काय ही रसिकता ! एक महाराजांच्या आश्रयाखालील, तर दुसरी प्रजेच्या खास आश्रयाखालील मंडळी ! वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें तर काय त्यांच्यावर सारीं फिदा ! 'आवडत्या माणसाचा फोटो' 'लोकोत्तर गुणी' म्हणून सुप्रसिद्ध नटांचे रंगीबेरंगी फोटो मोठ्या दिमाखानें प्रसिद्ध करतात ! आणि नटही आपल्या द्विजपंक्ती प्रसिद्ध करून प्रसन्न मुद्रेनें आबालवृद्धांस दर्शन देतात ! ह्यांत कोणालाच कांहीं क्षिति वाटत नाहीं ! असे वेडे वेडे चार करून स्वराज्याची अपेक्षा करणें हा किती मूर्खपणा आहे !

लोकांचा व विद्यार्थ्यांचा हा उल्लूपणा नष्ट होईपर्यंत समर्थ तरी कशाचे आणि सामर्थ्य तरी कशाचें ?

**क्रिकेट**—व्यायाम व आरोग्य ह्या नांवाखालीं हल्लींच्या शिक्षणांत हें एक खूळ माजलें आहे. ब्याटीला पांच पांच रुपये; बॉलला दहा दहा रुपये; त्याचा सामना; त्यीचा जय व पराजय; त्याचे बक्षीससमारंभ इत्यादि जें कांहीं प्रस्थ माजलें आहे तें 'न भूतो न भविष्यति.' यापेक्षां नमस्कार घालण्याचा परिपाठ ठेवला तर धर्माच्या धर्म होऊन आरोग्य-वृद्धि होत नाहीं काय ? चेंडूदांडू, लगोऱ्या, आट्यापाट्या, खोखो, हे आपले खेळ काय वाईट ? पण नाहीं; बापजाद्यांना निष्कांचन केल्याशिवाय चिरंजिवांना चैनच पडत नाहीं ! ह्या शुष्क बाबींना आळा हा बसलाच पाहिजे.

**बायासिकली**—ह्यांचा हल्लीं किती सुळसुळाट झाला आहे तें सर्व लोक जाणतातच. परमेश्वरानें एक सोडून दोन खंबीर पाय दिले असतां टीचभर जावयाला सायकल कशाला ? 'वेळ वांचविणें' ही सबब पोकळ ! असा काय तोळेवारीनें लोक आपला वेळ सांभाळतात ! कधीं भोजनाला, कीं सभेला वेळेवर येणें जन्मांत ठाऊक नाहीं. आगगाड्यासुद्धां आळसानें चुकतात, मग बाकीच्याची कथा काय ? त्या बायासिकलला १००।१०० रुपये किंमत. मग आज काय टायर फुटली २५ रुपये, आज काय पन्क्चर ! असें करतां करतां रिपेरींत शेंपन्नास रुपये जाऊन अखेर पांच चार महिन्यांत हातांत खटारा ! नवीन शिकण्याचा तर फार्स विचारूच नये. मास्तराची फी, मग पडझडीची दुखापत व हंसें ! दारींतून मुलें लेंकरें चेंगरतात त्यांचे तंटे. भाडेवाल्याची साय-कल मोडली म्हणजे भूर्दंड ! दोन नवखे सायकवाले समोरासमोर आलें कीं टक्कर ! दोघेही पडतात, त्यांचे पाय परस्परांच्या सायकलींत अडकून उठतां येत नाहीं; मग गुद्दागुद्दी चालते ! आणि लोक तमाशा पहातात. येवढ्यावरच भागतें असें नाहीं. अधिक चैनी असतात ते मोटार सायकल घेतात ! आणि तिच्या रिपेरीखालीं पैशाची नासाडी करून मध्येंच मोड-तोड झाली कीं, डोक्यावरून घरीं आणतात. मिळून काय ? तर पैशाची उधळपट्टी !

**केंसाची शुश्रूषा**—पोषाखाचें एक असो; पण केंसाच्यासंबंधानें तरी विद्यार्थ्यांचा किती टाकंटिकला ! दोन पैशांत न्हावी श्मश्रु करतो ती कामाची नाहीं. त्यांना 'हेअर कटिंग सलून पाहिजे' म्हणजे प्रत्येक खेपेस सहा आणे ! कारण बसावयाला खुर्ची, अंगांत कफनी, समोर आरसा, घाटलींत तेलें आणि तोंडाला फेर्स ! नंतर आरशांत पाहून भांग काढावयाचा. केस मखलावयाचे आणि शस्त्रें नोपाडावयाची ! अशी नटवेगिरी विद्यार्थ्यांस निखालस विशोभित होय.

**धूम्रपान**:—विड्या हा श्रीगणेशा. नंतर सिगारेट—हत्तीछाप—कातरछाप नंतर बर्ड्स आय, त्रिचनापल्ली चिरूट आणि शेवटची परीक्षा म्हणजे पाइप ! आणि ओठ काळे, तोंडाला घाण, राखेचे ढीग, विड्यांचे तुकडे व कपड्याला जळकीं भोकें. गळ्यांत कफ, छातींत दम आणि रात्रीं खोकला ! हा त्याचा परिणाम ! खिसा रिकामा आहेच आहे.

असें हें इष्कबाजीचें पुराण वाचावें तेवढें थोडेंच होणार. ह्यास्तव तें सोडून देऊन **'आतां आम्ही पुढें काय करावें ?'** ह्या प्रश्नाचा विचार करूं.

विद्यार्थी काय आणि लोककल्याणकर्ते काय ह्या उभयतांनाही एकच नियम लागू आहे. तो हा कीं, त्यांनीं आपल्या ऐषआरामावर, इष्कीवर, चैनीवर व सुखावर पाणी सोडलें पाहिजे, हें पहिलें कलम.

**'सुखार्थीनः कुतोविद्या विद्यार्थीनः कुतः सुखम्'**

हा नियम त्यांनीं सदासर्वदा हृदयाशीं बाळगला पाहिजे. त्यांनीं गाद्यागिर्द्यांवर निजूं नये; सुग्रास अन्न खाऊं नये; वाहनांत बसूं नये; बांकावर निजावें; जमिनीवर पडावें; कदान्न भक्षण करावें; पायांनीं चालावें; जोडा घालूं नये; अनवाणी फिरावें म्हणजे पाय मजबूत होतात आणि प्रत्येक बाबतींत काटकसर असावी. खूपसें हिंडावें. रानोमाळ फिरावें; जनास उपदेश करावा; परोपकारार्थ देह झिजवावा; नेहेमीं कष्टाळू असावें; ह्या गोष्टी समर्थांनींचशा काय, पण इतर जातींतील सुद्धा जे संतमहंत व लोककल्याणकर्ते व समर्थ होऊन गेले, त्यांनींही हेंच केलें आहे.

महंमद पैगंबर हा धर्म स्थापनकर्ता महात्मा सर्वप्रसिद्धच आहे. त्याला वैभवाला कांहीं कमी नव्हतें. त्यानें गाद्यागिर्द्यांवर लोळावयाचें मनांत

आणलें असतें तर त्याला कांहीं कमी नव्हतें. तरी तो नेहेमीं तट्टावर निजत असे. एके दिवशीं तो निजून उठला तों त्याच्या पाठीवर त्या राठ तट्टयाचे वण उठलेले त्याच्या सेवकांच्या दृष्टीस पडले. तेव्हां त्यांनीं प्रार्थना केली, “ पैगंबर साहेब ! आपल्या पाठीला तट्ट्या रुतला आहे, तर आम्ही गादी वगैरे कांहीं तरी मऊ बिछाना पसरून देतों. ” त्यास त्या महात्म्यानें उत्तर दिलें:—

“ बाबा ! मऊ बिछाना माझ्यासाठीं नाहीं. मी जगदुद्धाराचें कार्य अंगिकारलें आहे. ह्याकरितां शरीराला थकवा येतो तेव्हांच मी आडवा होतों. पण तो कसा ? तर ज्याप्रमाणें एखादा घोडेस्वार थकून भागून येऊन एखाद्या झाडाखालीं लगाम हातांत धरून क्षणमात्र डुकली घेतो, आणि आपल्याला झालेला उन्हाचा ताप कमी करतो आणि लागलीच उठून पुन्हा स्वार होऊन आपल्या रस्त्याला लागतो, त्याप्रमाणें मीही क्षणमात्र झोंप घेतों. * ”

ह्यावरून समर्थांच्या अंगीं सामर्थ्य येण्याला कसा कांटकपणा लागतो हेंही कळून येतें.

६५० वर्षांपूर्वीं नसुरुद्दीन म्हणून एक हिंदुस्थानचा बादशहा होऊन गेला. त्याचा चुलता प्रथम बादशहा असून तो अत्यंत दुष्ट होता. त्यानें नसरुद्दीनास लहानपणापासूनच कैदेंत ठेवलें होतें. तेथें तो पुस्तकें लिहीत बसे. त्याचें अरबी अक्षर फार उत्तम होतें. पुढें त्याचा चुलता वारल्यानंतर सर्व सरदारांनीं नसुरुद्दीनासच बादशहाच्या तक्तावर बसविलें. तरी तो गरीबीच्या रीतीनें राही. राज्यांतील एका कवडीलाही तो शिवत नसे.

---

* “ A soft bed not for me. I have work to do the world. I take rest when the body demands rest, but only as a horseman, who reins up his horse for a little while under the shadow of a tree, that so he may take a little shelter from the heat of the sun; but soon he passes on his way.”—“ Younth's noble Path.”

स्वतः पुस्तकें लिहून जें द्रव्य मिळे तेवढ्यावरच तो आपला निर्वाह करी. त्याच्या बायकोचें नांव फातमा. ती त्यास स्वयंपाक करून वाढी, भांडीं घांशीं व स्वतः धुणीं धुई. तिला दासदासी किंवा गडीमाणसें कोणी नसत. एके दिवशीं स्वयंपाक करतांना तिचा हात भाजला. तेव्हां तिनें नवऱ्यास विनंति केली कीं, माझ्या हाताखालीं कोणी तरी एक बाई ठेवा. तीस बादशहा म्हणाला "मी बादशहा आहे तरी मी गरीब आहे. मी राज्यांतील एका कपर्दिकेसही हात लावावयाचा नाहीं. राज्यांतील सारें द्रव्य माझ्या प्रजेच्या कल्याणाकडेच खर्च झालें पाहिजे. गरीबाच्या बायकोला चाकरमाणसें नसतात. मी कष्ट करतों तसे तूंही कष्ट कर म्हणजे मरणोत्तर परमेश्वर तुलाही त्याचें उत्तम फळ देईल !!*"

इतकें साधेपणानें कष्ट सोसून वागावें तेव्हांच समर्थांच्या अंगीं सामर्थ्य प्राप्त होतें.

अत्यंत गरीबीनें राहून काबाडकष्टांत दिवस काढले तरच मनुष्य कांटक होऊन लोककल्याण कार्यास उपयोगी पडतो हें तत्त्व अत्यंत प्राचीन कालापासून पृथ्वीवरील सर्व देशांस माहीत होतें.

ग्रीस देशांत प्राचीन कालीं एक विश्वविद्यालय स्थापन केलें होतें. त्यांत मोठमोठे सरदार व श्रीमंत ह्यांचीं मुलें असत. त्या विद्यालयाचे नियम अत्यंत कडक होते. म्हणजे तेथें शिळी भाकर व चटणी मात्र खाऊं

---

* "I am a poor man" he said "although I am the king. I will not touch the money of the state, that ought all to be spent for the good of people. The wife of a poor man should not have a servant. Work hard, as I do, and when you die God will reward you." Easy stories from Indian History.

घालीत; तट्टयावर निजवीत; अनवाणी* चालावयास लावीत. तेथील विद्यार्थ्यांस थंडींत, वाऱ्यांत, उन्हांत, पावसांत उघडें हिंडावें लागे. ह्यामुळें तेथील मुलें कांटक, रांकट, धिप्पाड, निरोगी व वज्रदेही अशीं बनत आणि तीं मोठमोठे पराक्रम करीत, राष्ट्राकार्यास उपयोगी पडत.

अशा रीतीनें कांहीं तरी ब्राह्मण लोक ब्रह्मचारीव्रतानें राहून, भिक्षावृत्ति पतकरून सदाचारानें वागतील, अनवाणी फिरत राहतील, कदान्न भक्षण करतील, इष्क, चैन, विलास, सुख, सर्व सोडून परोपकारार्थ देह झिज-वितील, ईश्वरावर परिपूर्ण निष्ठा ठेवतील तरच त्यांच्या अंगीं ईश्वरी सामर्थ्य येऊन तेही समर्थच होतील. कारण तोच समर्थांनीं दाखवून दिलेला मार्ग आहे; आणखीः—

**आपणासारिखे करिती तत्काळ।**
**नाहीं काळ वेळ तयां लागीं॥**

अशी तुकाराम महाराजांची प्रतिज्ञा आहे. त्याअर्थीं त्यामध्यें तिळ-मात्र संशय धरण्याचें कारण नाहीं. वर सांगितलेल्या कुपथ्याबद्दल मात्र त्यानें घट्ट मन केलें पाहिजे.

पण ह्यावर पुन्हा आपला एक प्रश्न उरणारच कीं, ह्या मार्गानें समर्थ कदाचित् पैदा होतील, पण शिवाजी महाराज कसे उत्पन्न होणार? त्याची वाट काय? अहो! ह्याचें उत्तर अगदीं सोपें आहे. समर्थ आणि शिवाजी महाराज हे भक्त आहेत; ते एकरूप आहेत; ते कधीं विभक्त व्हावयाचे नाहींत. 'सुईपाठीमागें दोरा' त्याप्रमाणें तेही त्यांच्या पाठी-मागें उभेच असणार. ज्ञानेश्वरांनीं गीतेच्या शेवटच्या श्लोकाच्या प्रथम ओवींतच म्हटलें आहेः—

**चंद्र तेथें चंद्रिका। शंभु तेथें आंबिका।**
**संत तेथें विवेका। असणें कीं जी॥ १॥**

---

* सव्वालाखी अष्टें येथें एक बाबाजी तगारे या नावांचा ब्राह्मण गृहस्थ असे. त्याचा सारा जन्म शेतकीच्या कामांत गेला होता. तो कधीं आपल्या पायांत जोडा घालीत नसे. यामुळें त्याचे पाय इतके घट्ट बनले होते कीं, जणों काय दगडच. तो निवडुंगाच्या फणावर खुशाल पाय ठेवी, पण ते कांटे पायांत न मोडतां आपोआप खालींच मोडून जात!

" चंद्र उगवला कीं, चादणें हें असावयाचेंच; शंकर असतील तेथें पार्वती ठेवलेली; संत असतील तेथें विवेक, हें काय सांगावयाला पाहिजे ? ह्या साऱ्या जोड्या एकरूपच आहेत. त्याप्रमाणें समर्थ आणि शिवाजी हेही एकरूपच आहेत. समर्थांचा अवतार झाला कीं, शिवाजीचा जन्म झालाच म्हणून समजावें.

ह्याचें कारण, जी परिस्थिति प्राप्त होईल तदनुसार प्राणी जन्मास यावा असाच सृष्टीचा अबाधित व अनादि कालचा नियम आहे. पृथ्वी प्रथम उत्पन्न झाली त्यावेळीं ती जळजळीत बाष्पमय होती, त्यावेळीं प्राणी उत्पन्न होण्यासारखी मुळींच परिस्थिति नव्हती. त्या कालीं कोणताच प्राणी जन्मास आला नव्हता. पुढें तिच्यावरील वाफ वितळून ती जलमय झाली. तेव्हां त्या परिस्थितीनुरूप मत्स्या-कत्स्यादि जलचरें निर्माण झालीं. तीं जलचरें मृत होऊन त्यांचीं मृत्तिका बनली. तेव्हां मृत्तिकेच्या परिस्थितीनुरूप वनस्पती उत्पन्न झाल्या. वनस्पती हें भक्ष्य तयार होतांच हरणें, मेंढरें, ससे इत्यादि पशु निर्माण झाले. मोठें जंगल व पशु होतांच वाघोबा तयार ! असेंच हें सृष्टिनिर्माण-शास्त्र आहे. उबारा, घाम, अंधार, मनुष्यवस्ती, अशी परिस्थिति प्राप्त झाली कीं, ढेंकणांचा सुळसुळाट ! नासकें पाणी, दलदल व घाण म्हटली कीं डांसाचें पीक पिकलें ! शेण व दहीं एकत्र नासविलें कीं, विंचवांची वीणच्या वीण !

ह्या उत्पत्तिनियमाप्रमाणेंच परिस्थिति अनुकूल प्राप्त होतांच साधु तर साधु व शूर वीर तर शूर वीर असेच निपजतात. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ इत्यादि साधु तर साधूच उत्पन्न झाले ! समर्थ रामदास्वामी अवतीर्ण होतांच लगेच स्वामीपंचायतन तयार ! सारेच समर्थ. शिवाजी-महाराज जन्मास येतांच, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी फसलकर, नेताजी पालकर इत्यादि शूर वीरच निपजले. ह्यावरून तशा प्रकारची परि-स्थिती निर्माण करणें येवढेंच आपलें काम आहे. तें आपण करा. ब्रह्मचर्य पाळा; भिक्षावृत्ति स्वीकारा; उपदेश करा; परोपकारार्थ देह झिजवा; ऐषआराम सोडून द्या; कांटक बना. हीच तुमची तपश्चर्या. हाच समर्थांचा व समर्थ होण्याचा मार्ग. तो धरून खरे खरे ईश्वरभक्त व्हा. म्हणजे

तुम्हीही समर्थ व्हाल ह्यांत काडीइतका अंदेशा नाहीं. आणि तुम्ही समर्थ बनलात कीं, क्षत्रियवीर शिवाजीही धांवून येईल, ह्यांत यत्किंचित् संदेह धरू नका. हाच समर्थांचा खरा खरा अनुग्रह आहे. त्याच मार्गाला लागा.

हें आमचें बोलणें आपल्यास पटत:असेल तर उठा. ‘ शुभस्य शीघ्रं ’ ह्या सदुक्तीप्रमाणें कार्यास लागा. म्हणजे तुम्हीही समर्थ व्हाल. अशी तुमची वृत्ति बदलली कीं:—

**समर्थांचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥**

मग तुमच्याकडे वांकडी नजर करून पाहण्याची कोणाची छाती आहे ? जे आज तुमचा तमाशा करीत आहेत तेच तुमचे पवाडे गाऊं लागतील. निंदक आहेत तेच वंदन करतील. तर उठा; आतां विलंब करण्याची वेळ नाहीं. ह्यांत माझ्या पदरचें असें कांहीं नाहीं. मी समर्थांचीच आज्ञा खुली करून दिली आहे. तीस अनुसराल तर तुमचें कोटकल्याण होईल. रा. रा. शंकर श्रीकृष्ण देवांसारखे देव तुम्हास साह्य करतील. समर्थांच्या हयातींत समर्थांचे कल्याण होते. आतां त्यांच्या पश्चात् देव हेच त्यांचे एकनिष्ठ कल्याण आहेत, ते तुम्हास कधींही दूर करणार नाहींत.

इतकेंही बोलणें आपल्यास न पटेल तर:—

**“ उत्पस्यतेहि मम कोपि समान धर्मा ।**
**कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥ ”**

ह्या भवभूतीच्या उक्तीप्रमाणें माझ्या मतासारखींच ज्याचीं मतें आहेत असा पुरुष आज ना उद्यां, येथें ना तेथें, कोणी ना कोणी तरी उत्पन्न होईलच होईल असें मनाचें समाधान करून ह्या ग्रंथाची समाप्ति करतों.

समाप्त.